महर्षी विठ्ठल रामजी शिंदे
समग्र वाङ्मय

खंड २ रा : आत्मपर लेखन

रोजनिशी
माझ्या आठवणी व अनुभव
प्रवासवर्णन

संपादक : गो. मा. पवार । रणधीर शिंदे

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे समग्र वाङ्मय

खंड २ रा

आत्मपर लेखन

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांचे वाङ्मय

१. **विठ्ठल रामजी शिंदे यांचे लेख, व्याख्याने व उपदेश,**
(संपा.) बी. बी. केसकर, मुंबई, दामोदर सावळाराम आणि मंडळी, १९१२.

२. **The Theistic Directory and A Review of the Liberal Religious Thoughts and Work in the Civilized World,**
Depressed Classes Mission, Parel, Bombay, १९१२.

३. **भारतीय अस्पृश्यतेचा प्रश्न,**
नागपूर, नवभारत, ग्रंथमाला, १९३३.

४. **माझ्या आठवणी व अनुभव (पूर्वार्ध),**
पुणे, वत्सला प्रकाशन, १९४०.

५. **माझ्या आठवणी व अनुभव (पूर्वार्ध व उत्तरार्ध),**
पुणे, श्री लेखन वाचन भांडार, पुणे, १९५८.

६. **शिंदे लेखसंग्रह,**
(संपा.) मा. प. मंगुडकर, पुणे, ठोकळ प्रकाशन, १९६३.

७. **भारतीय अस्पृश्यतेचा प्रश्न,**
(संपा.) मा. प. मंगुडकर, गो. मा. पवार इत्यादी समाजकल्याण विभाग, महाराष्ट्र शासन, १९७६.

८. **महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांची रोजनिशी,**
(संपा.) गो. मा. पवार, औरंगाबाद, मराठवाडा साहित्य परिषद, १९७९.

९. **धर्म, जीवन आणि तत्त्वज्ञान,**
(संपा.) मा. प. मंगुडकर, गो. मा. पवार इत्यादी मुंबई, समाज कल्याण विभाग, महाराष्ट्र शासन, १९७९.

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे समग्र वाङ्मय

खंड २ रा : आत्मपर लेखन

रोजनिशी
माझ्या आठवणी व अनुभव
प्रवासवर्णन

संपादक
गो. मा. पवार
रणधीर शिंदे

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई

पुस्तकाचे नाव : महर्षी विठ्ठल रामजी शिंदे समग्र वाङ्मय
खंड २ रा : आत्मपर लेखन, रोजनिशी, माझ्या आठवणी व अनुभव, प्रवास वर्णन

संपादक : गो. मा. पवार / रणधीर शिंदे

प्रथमावृत्ती : २०१६

प्रकाशक :

सचिव,
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ,
रवींद्र नाट्य मंदिर इमारत, दुसरा मजला,
पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी आवार, सयानी रोड,
प्रभादेवी, मुंबई ४०० ०२५.

© प्रकाशकाधीन :

मुद्रक :

व्यवस्थापक,
शासकीय मुद्रणालय व लेखनसामग्री भांडार,
ताराबाई पार्क, कोल्हापूर-४१६ ००३.

किंमत : रु. १११४/-

या पुस्तकात व्यक्त केलेली मते स्वत: लेखकाची असून, या मतांशी साहित्य आणि संस्कृती मंडळ व महाराष्ट्र शासन सहमत असेलच असे नाही.

अनुक्रमणिका

निवेदन	..	vii-viii
संपादकीय	..	ix-xxii

विभाग पहिला

रोजनिशी

प्रथमावृत्तीचे निवेदन व प्रस्तावना	..	पाच ते शेहेचाळीस
फर्ग्युसनमधील रोजनिशी (१८९८-१८९९)	..	१-४०
इंग्लंडमधील रोजनिशी (१९०१-१९०३)	..	४१-१०४
येरवड्याच्या तुरुंगातील रोजनिशी (१९३०)	..	१०५-१३२
ब्राह्मसमाज शतसांवत्सरिक सफर (१९२८)	..	१३३-१७२
टिपा	..	१७३-१९४

विभाग दुसरा

माझ्या आठवणी व अनुभव	..	१९५-६१६

विभाग तिसरा

प्रवास वर्णन	..	६१७-७४०

अध्यक्षांचे निवेदन

स्वातंत्र्यपूर्व काळातील दीडशे वर्षांचा भारत आणि महाराष्ट्राच्या सामाजिक आणि राजकीय सुधारणांचा आढावा घेतल्यास ठळकपणे पुढील बाबी समोर येतात. ब्रिटिशांनी छोटीमोठी संस्थाने एकतर बर्खास्त केली अथवा मांडलिक म्हणून जखडून ठेवली. यात अपवाद होते बडोदा येथील गायकवाड आणि नेपाळचे नरेश. दोघांशी इस्ट इंडिया कंपनीने केलेले करार मित्रत्वाचे होते. उर्वरित राजे रजवाडे रयतेच्या जीवावर हौस मौज करण्यात आणि सार्वभौम सत्तेचे आपण नम्र मांडलिक आहोत, हे दाखवण्यात मश्गुल होते. ब्रिटिशांनी फोडा नि तोडा नीती अस्त्राने परस्परात दुही लावून हिकमतीने त्यांना जेरीस आणले आणि पुढे दीर्घकाळ मोठ्या प्रमाणात शोषण करत राहिले. भारतभर कमीअधिक हीच स्थिती होती.

या काळात महाराष्ट्रात एकोणिसाव्या शतकात न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे, न्या. भांडारकर, गो. ग. आगरकर, महर्षी कर्वे हे शिक्षणातून सामाजिक सुधारणांचा प्रयत्न करत होते. मात्र हे कार्य बहुतांशी उच्चस्तरीय आणि उच्चभ्रू समाजाच्या उन्नतीसाठी होते. या उलट महात्मा जोतीबा फुले यांनी १८५१ साली पुण्यात प्रथमच वंचित अस्पृश्य समाजातील मुला-मुलींसाठी शाळा सुरु करून सामाजिक, सुधारणेची सुरुवात स्वत:पासून केली. शिक्षणातून प्रगती अन् परिवर्तनाचा म. फुले यांचा एकट्याचा प्रयत्न होता. त्या काळात समाजात धर्माच्या आश्रयाने जातीच्या चौकटी बंदिस्त होत्या. सर्वसामान्यांना विद्या मिळत नसल्याने अज्ञानाचे राज होते. ऐपत असलेला मूठभर वर्गातील उंबऱ्यापर्यंत विद्या पोहचल्याने या वर्गाचे सगळीकडे वर्चस्व होते.

समाजातील अस्पृश्य-आदिवासी समजल्या जाणाऱ्या समाजाची स्थिती तर खूपच बिकट होती. समाजातील इतर घटक एक दुसऱ्यांपासून तुटलेले होते. एकजिनसीपणाचा पूर्ण अभाव होता. रानडे-भांडारकर-आगरकर-कर्वे प्रभुर्तीनी शिक्षणाचा प्रसार-प्रचार करण्यासाठी पुण्यात व इतरत्र शाळा सुरू केल्या; पण त्या शहरी लोकांसाठीच होत्या. इथे शिकणारे उच्चवर्गीयच होते. या पार्श्वभूमीवर प्रथमच महात्मा जोतीबा फुले यांनी शुद्रातिशुद्रांच्या शिक्षणाची सुरुवात केली. यानंतर महाराजा सयाजीराव गायकवाड या शेतकऱ्याच्या पोराने प्रजाहित लक्षात घेऊन १८८२ साली हुकूम काढून अस्पृश्य आदिवासी मुलांसाठी सरकारी खर्चाने शिकविणे सुरू केले. वंचित वर्गाला सरकारने शिकविणे असा हा जगातील फार मोठा समाज क्रांतिकारक निर्णय होता. रयतेला शिकवून शहाणे करणे ही प्रगती-परिवर्तनाची गुरूकिल्ली आहे, हे ओळखून या राजाने १८९२ साली हिंदुस्थानात प्रथम सक्तीचे प्राथमिक मोफत शिक्षणही सुरू केले. अस्पृश्य कार्यकर्त्यांना शेजारी बसवून भोजन केले. राजवाड्यातील पंगती भेद दूर केला आणि अस्पृश्यता निवारण्याचा हुकूमही काढला. अस्पृश्यांसाठी वैदिक शाळा सुरू केली. ब्राह्मणेतरांचे पुरोहित तयार केले. अस्पृश्यता दूर करणे ज्या काळात अवघड होते. त्या काळात सयाजीराव गायकवाडांनी सामाजिक सुधारणांची सुरुवात स्वत:पासून केली.

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी आयुष्यभर अस्पृश्यता निवारण आणि बहुजन समाजाच्या प्रबोधनाचे कार्य केले. ज्या काळात अस्पृश्यता दूर करणे अवघड काम होते, त्या काळात धर्मशास्त्राचा अभ्यास करून त्यांनी काम सुरू केले. अभ्यास, लेखन आणि कृती यातून ते काम करू लागले. महर्षी शिंदे यांना विलायतेत उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती देऊन नंतर त्यांच्या या कार्यात सर्व प्रकारचे सहाय्य सयाजीराव यांनी डोळसपणे केले.

अस्पृश्योद्धाराचे कार्य केलेल्या महात्मा गांधींचे आपणांस स्मरण होते. पण त्यांनी या क्षेत्रात काम सुरू करण्यापूर्वी सयाजीराव गायकवाडांनी बडोद्यात अस्पृश्यांना शिक्षण सुरू केले. या शाळा तपासण्यास महर्षी शिंदे यांना सांगितल्या. महर्षी शिंदे यांची या कामातील तळमळच सयाजीरावांनी ओळखली होती. महर्षी शिंदे यांनी स्पृश्य-अस्पृश्यातील दरी दूर करण्याचा प्रयत्न म्हणून धार्मिक व सामाजिक सुधारणासाठी लेखनातून कृतीतून काम करत होते. हे उद्दिष्ट गाठण्यासाठी प्रार्थना समाजाच्या माध्यमातून काम केले. अखिल भारतीय अस्पृश्यता निवारण परिषदा भरविल्या. काही परिषदांचे अध्यक्ष सयाजीराव गायकवाड होते.

महर्षी शिंदे यांचे अस्पृश्यता निवारण आणि धर्म सुधारणा संबंधीचे महाराष्ट्रातील कार्य आणि त्यांचे प्रबोधनपर लेखन अत्यंत महत्त्वाचे असूनही दुर्लक्षितच राहिले. बहुजन विचारवंतांच्या वाट्याला येणारी उपेक्षाच त्यांच्याही बाबतीत खरी ठरली. महर्षी शिंदे यांची ओळख महाराष्ट्राला करून देण्याचे कार्य गेली काही वर्षे आदरणीय डॉ. गो. मा. पवार यांनी मेहनतीने केल्याने, ते मौलिक विचारधन वाचकांसमोर येत आहे.

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ विठ्ठल रामजी शिंदे यांचे समग्र साहित्य प्रकाशित करत आहे. पहिला खंड यापूर्वीच प्रकाशित झाला असून आता 'महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांचे आत्मपर स्वरूपाचे लेखन' हा दुसरा खंड प्रकाशित होत आहे, याचा आम्हाला आनंद आहे.

बाबा भांड
अध्यक्ष
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ

दिनांक
१३ नोव्हेंबर, २०१५



महर्षी विठ्ठल रामजी शिंदे

जन्म : २३ एप्रिल, १८७३ मृत्यू : २ जानेवारी, १९४४

संपादकीय....

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांचे समग्र वाङ्मय प्रसिद्ध करण्याचा प्रकल्प साहित्य संस्कृती मंडळाने संकल्पिला असून त्याचा पहिला खंड 'भारतीय अस्पृश्यतेचा प्रश्न, संशोधन आणि चिंतन', हा प्रसिद्ध झाला आहे. 'महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांचे आत्मपर स्वरूपाचे लेखन', हा दुसरा खंड आता प्रसिद्ध होत आहे.

विठ्ठल रामजी शिंदे हे मराठी साहित्यसृष्टीत अपवादात्मक ठरावेत एवढे वैशिष्ट्यपूर्ण लेखक होत, असे म्हणता येते. त्याचे कारण असे की, ते कृतिवीर असून लेखक होते. वृत्तीने ते धर्मनिष्ठ पुरुष होते त्यांनी आपले आयुष्य उदार धर्म प्रचाराच्या कार्यासाठी वाहून घेतले. त्यांच्या धर्म कल्पनेतूनच उद्‌भूत होणारे अस्पृश्यतानिवारणाचे व अन्य सामाजिक सुधारणेचे कार्य ते प्रत्यक्षात सातत्याने करीत राहिले. म्हणून ते मूलत: कृतिवीर होते. महाराष्ट्र त्यांना कर्मवीर, महर्षी या नावांनी संबोधून त्यांचा गौरवही करीत राहिला. अशा कर्मवीराने केलेली ही साहित्य निर्मिती हा एकप्रकारे, त्यांच्या कार्याचा भाग आहे. म्हणजेच, त्यांच्या उन्नत धर्मविचारांचा व मूल्यनिष्ठेचा आविष्कार त्यांच्या लेखनातूनही होत राहिला. त्यांची वैचारिक भूमिका अथवा जीवनदृष्टी, त्यांनी केलेले कार्य आणि त्यांची साहित्यनिर्मिती यामध्ये कमालीची एकरूपता आहे. म्हणूनच अशा प्रकारच्या धर्मनिष्ठ कर्मवीराने केलेली साहित्यनिर्मिती ही मराठी साहित्य सृष्टीतील अपवादात्मक घटना म्हणावी लागेल. स्वाभाविकपणेच त्यांच्या कार्यातून त्यांच्या वृत्तीचे जे विशेष प्रकट होतात तेच त्यांच्या साहित्यनिर्मितीतूनही प्रकट होतात असे आपणांस दिसून येते.

विठ्ठल रामजी शिंदे यांच्या आत्मपर लेखनामध्ये त्यांनी लिहिलेली 'रोजनिशी' 'माझ्या आठवणी व अनुभव' हे आत्मपरस्वरूपाचे लेखन व त्यांनी लिहिलेले 'प्रवासवर्णन' यांचा समावेश होतो. त्यांच्या या तीन प्रकारच्या लेखनाच्या प्रस्तुत खंडात तीन विभागामध्ये समावेश केलेला आहे. या तीनही प्रकारच्या लेखनाचे विशेष प्रारंभी या प्रास्ताविकामध्ये आपण ध्यानात घेऊ.

शिंदे यांनी आपल्या आयुष्याच्या तीन वेगवेगळ्या कालखंडामध्ये रोजनिशी लिहिली आहे. १८९८ साली ते फर्ग्युसन कॉलेजमध्ये शिकत असताना, १९०१-०३ मध्ये धर्मशिक्षणासाठी ते ऑक्सफर्डला गेले असताना व कायदेभंग केल्यामुळे १९३० साली येरवड्याच्या तुरुंगवासात असताना त्यांनी बऱ्याचशा विस्ताराने रोजनिशी लिहिली. त्यांची ही रोजनिशी मी संपादित करून १९७९ मध्ये सविस्तर प्रस्तावनेसह प्रसिद्ध केली. त्यांनी १९२८ साली ब्राह्म समाजाच्या शतसांवत्सरिक उत्सवानिमित्त कलकत्त्यापर्यंत जी सफर केली तिचा वृत्तांत तारीखवार, कथन करणारी रोजनिशी उपलब्ध झाली.

तीन वेगवेगळ्या कालखंडात लिहिलेली शिंदे यांची रोजनिशी त्यावेळच्या आजूबाजूच्या वास्तवावर प्रकाश टाकणारी आहे, तशीच ती त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचाही प्रत्यय देणारी आहे. शिंदे यांनी फर्ग्युसन कॉलेजमध्ये बी. ए. च्या शेवटच्या वर्षात असताना लिहिलेली रोजनिशी ही त्यांची पहिली रोजनिशी व त्यांचे पहिले लेखन होय. २४ मार्च, १८९८ पासून २९ एप्रिल, १८९९ या वर्षभराच्या कालखंडात त्यांनी ही रोजनिशी अधूनमधून लिहिली आहे. शिक्षणासाठी पुण्यात येऊन सहा वर्षाचा कालावधी लोटला होता.

शिंदे यांच्या मनाची तयार झालेली उदारमतवादी ठेवण, सर्वसामान्यांच्या हिताची कळकळ व बाह्य भपक्याला न भुलता आंतरिक गुणवत्तेला महत्त्व देण्याची त्यांची वृत्ती यामुळे त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा पुण्याच्या संस्कृतीशी संवाद जुळत नव्हता, असे त्यांच्या या रोजनिशीवरून दिसून येते.

शिंदे यांची १८९८-९९ ची ही रोजनिशी म्हणजे १९ व्या शतकाच्या अगदी अखेरच्या टप्प्यातील पुण्याच्या शैक्षणिक, सांस्कृतिक, धार्मिक स्वरूपाच्या संस्थात्मक जीवनावरील भाष्य आहे. हे भाष्य एका विचारी, चौरस दृष्टीच्या, भावनाशील मनाने केलेले आहे याचाही सतत प्रत्यय येतो. प्रस्तुत रोजनिशीत, या भाष्याच्या जोडीने एका रसिक, काव्यात्म, संवदेनशील, रोमँटीक मनाच्या अंत:स्थ हालचालीचा आलेखही आपल्या प्रत्ययास येतो. म्हणून या रोजनिशीचे स्वरूप पाहता, या काळात शिंदे यांच्या मनाची घडण होताना दिसते हे खरे असले तरी, जे प्रगल्भ मन आधीच घडले होते त्याचा आविष्कारही रोजनिशीमधून होताना दिसतो. भावी जीवनात कार्यरूपाने अथवा विचाररूपाने शिंदे यांच्या मनाचा जो आविष्कार झाला, त्याचे सारे कंद येथे पाहावयास मिळतात.

शिंदे यांनी बी. ए. च्या वर्गात असताना लिहिलेल्या रोजनिशीमधून प्रकट होणारी त्यांच्या मनाची प्रगल्भता, बुद्धीचा चौरसपणा जो आपल्याला प्रत्ययाला येतो तो अपवादात्मकच म्हणावा लागेल.

शिंदे यांची 'इंग्लंडमधील रोजनिशी' तुलनेने मोठी आहे व ती दोन वर्षेपर्यंत बऱ्याचशा सातत्याने लिहिलेली आहे. तेथे त्यांना मिळणाऱ्या मोठ्या सुट्या त्यांनी लंडन शहर, इंग्लिश व स्कॉच सरोवरप्रांत, फ्रान्स, स्वित्झर्लंड व इटली या परिसरात घालविला. विविध ठिकाणचा प्रवास त्यांनी जाणीवपूर्वक निरीक्षणासाठी केला. नवी संस्कृती, नवा प्रदेश, वेगवेगळ्या प्रकारचे लोकजीवन आणि विविध प्रकारच्या परोपकारी संस्था त्यांना पाहावयास मिळाल्या. स्वाभाविकपणेच या रोजनिशीला बऱ्याच प्रमाणात माहितीपर स्वरूप आले असले तरी ही माहिती व निरीक्षणे नोंदवतानाही शिंदे यांच्या व्यक्तिमत्त्वाची वैशिष्ट्ये, त्यांचा व्यापक दृष्टिकोन आणि वैशिष्ट्यपूर्ण संवेदनशीलता दिसून येते.

या रोजनिशीच्या कालखंडात शिंदे यांच्या मन:स्थितीतही फरक पडला. त्यांनी आपले जीवित ध्येय निश्चित केले होते. एक प्रकारच्या आत्मविश्वासाने ते वावरत होते. त्यांची मुळातील विनोदवृत्ती खुलली. मनाची आध्यात्मिक बैठक, दीन-दलितांच्या उन्नत्तीची कळकळ व स्वाभाविक रसिकता ही त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची मूळ वैशिष्ट्ये त्यांच्या रोजनिशीतून प्रकट होतात. युरोपची उद्योगप्रधान संस्कृती, लोकशाहीवादी वातावरण ह्या बाबी शिंदे यांना जरूर आवडल्या; मात्र पाश्चात्त्य संस्कृतीचे त्यांच्यावर यत्किंचितही दडपण पडलेले दिसत नाही. तेथील वास्तव्यात ते फेटा घालून मोकळेपणाने वावरत. त्यांच्या ठिकाणी स्वदेशीचा फाजील आत्माभिमान नव्हता, की पाश्चात्त्य संस्कृतीमुळे निर्माण झालेला न्यूनगंडही नव्हता. युरोपमधील सांस्कृतिक वातावरण, तेथील धर्मसंस्था, सार्वजनिक व कौटुंबिक जीवन, लोककल्याणकारी संस्था इत्यादी विविध अंगांचा या रोजनिशीद्वारा परिचय होतो.

धर्मसंस्थांच्याकडून चाललेले परोपकाराचे कार्य ते सहेतुकपणे पाहात होते. ऑक्सफर्ड येथील वर्कहाऊसचे किंवा कंगालखान्याचे ते बारकाईने वर्णन करतात. अडीचशे म्हातारी, दुबळी अनाथ स्त्री-पुरुष तेथे असतात व त्यांची व्यवस्था कळकळीने चोख ठेवली जाते, इत्यादी वर्णन करून ते उद्‌गारतात. 'संस्था पाहून अत्यंत समाधान वाटले; हा खरा ख्रिस्तीधर्म !' लंडन, मँचेस्टर येथील व अन्य ठिकाणचीही अशा प्रकाराची चालणारी कामे त्यांनी जाणीवपूर्वक पाहिली हिंदुस्थानामध्ये गेल्यानंतर आपण अशाप्रकारचे दु:खनिवारणाचे काम मिशनरी वृत्तीने करावे अशी प्रेरणा त्यांना तेथेच निर्माण झाली.

कोणतेही निरीक्षण करीत असताना ते धार्मिक, सांस्कृतिक व नैतिक अंगाने करतात. केसिक कनव्हेन्शन, ऑक्सफर्ड येथील पदवीदान समारंभ, पॅरिस येथील ऑलिंपिया हे नाटकगृह इत्यादींची त्यांनी केलेली वर्णने वाचून याची प्रचिती येते. त्यांच्या या दृष्टिकोनाबरोबरच यथातथ्य वर्णन करण्याची त्यांची शक्ती किती मोठी आहे व त्यांची संवेदनशीलता किती तरल आहे याची आपणाला कल्पना येते.

पाश्चात्त्य संस्कृतीचा अनेक अंगानी वेधक परिचय करून देणारी शिंदे यांची इंग्लंडमधील रोजनिशी वैशिष्ट्यपूर्ण म्हणावी लागेल.

महर्षी शिंदे यांची ब्राह्म समाजाच्या शतसावंत्सरिक उत्सवानिमित्त १९२८ साली केलेल्या कलकत्त्यापर्यंतच्या प्रवासाची रोजनिशी अलीकडेच त्यांच्या नातलगाकडून प्राप्त झाली. तिचाही समावेश येथे केला आहे. तिचे यथायोग्य संपादन करून डॉ. रणधीर शिंदे हे ती स्वतंत्रपणाने लवकरच प्रसिद्ध करणार आहेत. तसेच या खंडातील रोजनिशी विभागात त्यांच्या प्रस्तावनेचा समावेश केला आहे. महर्षी शिंदे हे ब्राह्मधर्माचे प्रचारक म्हणून मंगलोर येथील आचार्यपद स्वीकारल्यापासून काम करीत होते. कलकत्त्याच्या ब्राह्म समाजाच्या निमंत्रणानुसार त्यांनी शतसांवत्सरी-निमित्त हा दौरा पार पाडला. ब्राह्म धर्माचा प्रसार तसेच अस्पृश्य वर्गाची सर्वांगीण सुधारणा हे महर्षी शिंदे यांच्या आस्थेचे, कळकळीचे विषय होते, हे डॉ. रणधीर शिंदे यांनी या रोजनिशीचा परिचय करून देताना एका लेखात (समाज प्रबोधन पत्रिका) सांगितले आहे. ब्राह्मसमाजाची तत्कालीन स्थिती; त्याबद्दलची निरीक्षणे, अस्पृश्य मुलांच्या शाळांना, संस्थांना. गावोगावच्या ब्राह्म समाजाची अवनत अवस्था बघितल्यानंतर महर्षी शिंदे यांना हळहळ वाटते. अस्पृश्यता निवारण कार्याचा तर त्यांना आयुष्यभराचा ध्यास होता. म्हणून गावोगावच्या अस्पृश्यवर्गाची स्थिती, त्यांच्या शाळांची स्थिती ते कळकळीने पाहत होते. इतर रोजनिशीत महर्षी शिंदे यांच्या व्यक्तिमत्त्वाचे व वाङ्मयीन गुणवत्तेचे ज्याप्रमाणे विशेष प्रकट होतात, तसेच स्वाभाविकपणे याही रोजनिशीतून प्रकट होतात. आंतरिक मनःस्थिती, बाह्य परिस्थिती, वेगळे वातावरण, घडलेले प्रसंग आणि पाहिलेल्या व्यक्ती या सर्वांचे ते अत्यंत प्रत्ययकारी वर्णन करतात.

येरवड्याच्या तुरूंगातील रोजनिशी ही महर्षी शिंदे यांची सर्वात छोटी व अखेरची रोजनिशी. महात्मा गांधींच्या कायदेभंगाच्या चळवळीत भाग घेतल्याने त्यांना शिक्षा झाली व मे, १९३० पासून पाच महिने येरवड्याच्या तुरुंगात त्यांना राहावे लागले. त्यापैकी शेवटीच्या अडीच महिन्यांच्या कालावधीत ही रोजनिशी त्यांनी लिहिली. (याच कालावधीत तुरूंगामध्ये ते 'माझ्या आठवणी व अनुभव' या आपल्या आत्मचरित्राचेही लेखन करीत होते.)

ही रोजनिशी लिहितेवेळी महर्षी शिंदे यांचे वय सत्तावन्न वर्षाचे होते. अस्पृश्यता निवारण्याच्या कामी भारतभर त्यांनी संस्थापक पातळीवरून प्रयत्न केला होता. सार्वजनिक जीवनात अपमानाचे व मानाचे अनेक प्रसंग अनुभवले होते. या मानापानाच्या पलीकडे जाणारी प्रौढ, शांत, स्थिर अशी त्यांची मनोवृत्ती झालेली होती. महात्मा गांधी यांनी आरंभिलेल्या स्वातंत्र्ययुद्धात धर्मबुद्धीने त्यांनी भाग घेतला होता. या रोजनिशीत शिंदे यांच्या प्रसन्न व्यक्तिमत्त्वाचा, तत्त्वचिंतक व काव्यात्म मनाचा व विनोदी वृत्तीचा आधिक्याने प्रत्यय येतो. त्यांच्या मनाची आध्यात्मिक ठेवण व धर्मप्रवणता ही साऱ्यांच्या मुळाशी आहे.

आत्मचरित्र लेखनामुळे आईबापांच्या प्रेमाचा व खेळकर बाल्याचा ते पुन्हा एकदा अनुभव घेत होते. या आठवणींच्या लेखनामुळे ते एका वेगळ्या प्रसन्न आनंदमय वातावरणात गेलेले दिसतात. त्यामुळे रोजनिशीतून त्यांची प्रसन्न वृत्ती प्रकट होते. तुरुंगातील बारीकसारीक अडचणीकडे ते खेळकरपणे,

विनोदात्मवृत्तीने बघतात. तुरुंगातही त्यांचे आध्यात्मिक साधना चालूच होते. दर मंगळवारी होणाऱ्या कॅथालिक उपासनेला ते हजर राहत. कधी स्वामी सहजानंद व छोटात्मल गांधी यांच्या समवेत ते धर्मचर्चा करीत असत. कुटुंबाच्या सहवासाला दुरावलेल्या शिंदे यांना तुरुंगातून सुटका कधी होईल याची उत्कंठा लागून राहिली होती. अखेर सुटका झाल्यानंतर शिंदे यांच्या अभिनंदनार्थ पुण्याच्या रे मार्केटात जाहीर सभा झाली. शेवटी माळ घातल्यावर शिंदे म्हणाले, "आता कायदेभंग करून तुरुंगात जाणे इतकी सामान्य गोष्ट झाली आहे, की अशा माळा तुरुंगातून परत आलेल्यांच्या गळ्यात न घालता, त्या माळा अद्यापि तुरुंगात न गेलेल्यांच्या गळ्यात घातलेल्या बऱ्या." हा त्यांचा विनोदही स्वत:कडे मोठेपणा न घेण्याच्या त्यांच्या स्वाभाविक विनम्र वृत्तीतून निर्माण झालेला आहे. रोजनिशीचा हा प्रसन्न शेवट त्यांच्या तुरुंगातील मनोवृत्तीशी अत्यंत सुसंगत आहे.

महर्षी शिंदे यांची ही रोजनिशी वाचताना आपण एक चांगल्या दर्जाची वाङ्मयीन कृती वाचत आहोत असा अनुभव येतो. याचे कारण तीमधून लेखकाच्या प्रगल्भ, असाधारण अशा व्यक्तिमत्त्वाचा आपल्याला प्रत्यय येतो. शिंदे यांची 'फर्ग्युसनमधील रोजनिशी' तसेच 'येरवड्याच्या तुरुंगातील रोजनिशी' महाराष्ट्राच्या सामाजिक, सांस्कृतिक जीवनाच्या दृष्टीने जशी महत्त्वाची आहे, तशीच ती वाङ्मयीन गुणवत्तेच्या दृष्टीनेही मोलाची आहे.

एकंदरीत, मराठी साहित्यात अत्यल्प असणाऱ्या रोजनिशी वाङ्मयात महर्षी शिंदे यांनी विविध काळात रोजनिशी लिहून मोलाची भर घातली आहे.

• •

महर्षी शिंदे यांच्या आत्मपर लेखनाचा दुसरा आविष्कार म्हणजे त्यांनी लिहिलेले 'माझ्या आठवणी व अनुभव' हे आत्मचरित्रपर पुस्तक. या ग्रंथाचा पूर्वार्ध १९४० साली प्रसिद्ध झाला व तो संपूर्ण स्वरुपामध्ये प्रथमत: १९५८ साली प्रसिद्ध झाला. प्रस्तुत ग्रंथाच्या निर्मितीचा इतिहास कळण्याच्या दृष्टीने महर्षी शिंदे यांच्या चिरंजिवांचे निवेदन जोडले आहे. आधीच्या आवृत्तीची डॉ. वि. भि. कोलते यांची प्रस्तावना व श्री. यशवंतराव चव्हाण यांची 'आदरांजली' आधीच्या आवृत्तीप्रमाणे येथे समाविष्ट केली आहे.

प्रस्तुत ग्रंथाला स्वत: महर्षी शिंदे यांनी 'माझ्या आठवणी व अनुभव' असे शीर्षक दिले असले तरी ती कालानुक्रमे सांगितलेली जीवितकथा असल्याने तिला आत्मचरित्र म्हणणे योग्य ठरते. त्यांचे जीवन सदैव प्रत्यक्ष कार्य करण्यात व्यतीत होत असल्यामुळे निवांतपणे वाङ्मयीन निर्मिती करण्याला त्यांना फुरसद मिळणे शक्य नव्हते. १९३० साली म. गांधींनी सुरू केलेल्या कायदेभंगाच्या चळवळीत त्यांनी भाग घेतला त्याबद्दल त्यांना सहा महिन्याची सक्त मजुरीची शिक्षा ठोठावली जाऊन येरवड्याच्या तुरुंगात त्यांची रवानगी झाली. दिवसभर त्यांना काथ्या वळण्याचे काम करावे लागत असे. तरी रात्रीच्या वेळी कोठडीतला एकांतवासातला वेळ कसा व्यतीत करावा असा प्रश्न त्यांच्यापुढे होता. तेव्हा मनाला विरंगुळा म्हणून त्यांनी आपल्या आयुष्यातील आठवणी लिहावयास प्रारंभ केला.

सुमारे चारशे पृष्ठांच्या या पुस्तकांची पहिली एकशे सात पाने भरतील एवढा मजकूर त्यांनी तुरुंगवासामध्ये असताना लिहिला. त्यामध्ये प्रामुख्याने त्यांच्या बालपणाच्या काळाचे चित्रण आले आहे. त्यानंतरच सुमारे तीनशे पृष्ठांचा भाग १९३९ साली शारीरिक विकलतेच्या अवस्थेत आयुष्याच्या अखेरच्या काळामध्ये त्यांनी लिहिलेला आहे.

या आत्मचरित्रपर ग्रंथातील लेखन तीन भागात विभागले असून, पहिल्या भागात विलायतेतील शिक्षणापर्यंतचा वृत्तांत समाविष्ट केलेला आहे. दुसऱ्या भागात १९०३ च्या अखेरीस विलायतेहून आल्यानंतर मुंबई प्रार्थनासमाजाचे प्रचारकार्य सुरू केल्यापासूनचा वृत्तांत आहे. १९०६ मध्ये भारतीय निराश्रित साह्यकारी मंडळी (डिप्रेस्ड क्लासेस मिशन सोसायटी ऑफ इंडिया) ची स्थापना करून त्यांनी अस्पृश्यतानिवारणाचे जे कार्य केले. त्याचे १९१२ पर्यंतचे वर्णन आले आहे. तिसऱ्या भागामध्ये मिशनचे ठाणे, पुणे येथे हलविल्यानंतर अस्पृश्यतानिवारणाचे केलेले कार्य, राजकारणामधील त्यांचा सहभाग, मंगळूर येथे ब्राह्मसमाजाचे आचार्य म्हणून काम, केरळमधील व्हायकोम सत्याग्रहामधील सहभाग, शेतकरी चळवळीमधील काम व कायदेभंगाच्या चळवळीत घेतलेला भाग आणि तुरुंगवास यांचे वर्णन येते. त्याचप्रमाणे त्यांनी केलेली ब्रह्मदेश यात्रा व ब्राह्मसमाजाच्या शतसांवत्सरिक उत्सवानिमित्त केलेला दौरा या प्रवासाचे वर्णन येते. अखेरीस, स्वत:च्या साहित्यसेवेच्या संबंधी त्यांनी थोडक्यात केलेले निवेदन एवढा भाग समाविष्ट आहे.

शिंदे तुरुंगामध्ये असताना लिहिलेला बालपणीचा व पुणे येथील कॉलेज शिक्षण पूर्ण होईपर्यंतचा भाग एकंदर आत्मचरित्रात फारच हृद्य उतरला आहे. सुरुवातीचा बालपणीचा काळ चित्रित करताना त्यांना अत्यंत प्रिय अशा आठवणीमध्ये ते रमून गेले होते. त्यामुळे त्यांनी समरसून आपले आई-वडील, आजोबा व अन्य कुटुंबीय, सवंगडी, शिक्षक यांचे आणि आपल्या घरातील उदारमतवादी, मोकळ्या वातावरणाचे हृदयंगम चित्र रेखाटले आहे. त्यांच्या बालपणीच्या या काळातच त्यांची पूर्वीची आर्थिक सुस्थिती जाऊन दारिद्र्याची, हलाखीची परिस्थिती आली होती. या कमालीच्या दारिद्र्यातही त्यांच्या आईच्या प्रेमळपणाचा, तिच्या सहनशीलतेचा व आनंदीवृत्तीचा ठसा त्यांच्या मनावर कायमचा उमटला. दारिद्र्याच्या अवस्थेतही तिने मोठ्या समाधानी वृत्तीने आणि कौशल्याने घर सांभाळून मुलांना समाधानी ठेवले याचे हृदयाला हात घालणारे वर्णन त्यांनी केले आहे. "दर दुसरे वर्षी आमच्या आईचे बाळंतपण हे ठरलेलेच असे आणि त्यावेळी मागले मूल काही जिवंत नसे. बाळंतपण, मुलांचा आजार किंवा मरण याखाली माझ्या आईची सर्व शक्ती खचली. तरीपण मुलांचा कंटाळा किंवा संसाराचा तिटकारा किंबहुना दु:खाचा किंवा निराशेचा एक उद्‌गारही कधी आईच्या तोंडातून आमच्या कानावर आला नाही. उलट दारिद्र्याच्या असह्य वेदना, नवऱ्याचा रागीट स्वभाव व मुलांचा जोजार सोसूनही आम्हा लहानग्यांना नेहमी आपल्या माहेरच्या सुखदु:खाच्या गोष्टी रसिकपणाने सांगून आई आमची गोड करमणूक करीत असे. आईच्या गोष्टी व गाणी हाच आमचा मोठा मेवा होता. तिची आनंदी आणि विनोदी वृत्ती हीच आमची विश्रांती होती. तिच्या गोष्टीची आम्हाला पुढे-पुढे चटक लागली. इतकी की, जर भूक लागली असली, स्वयंपाकाला अवकाश असला, किंबहुना भाकरी बरोबर खावयास चांगली भाजी नसली, तर आम्ही आईच्या काठवटीभोवती जमून तिला गोष्टी सांगण्यास लावीत असू. मग तिने आम्हांस अशा प्रेमळ कहाणीत गुंतवावे की स्वयंपाक केव्हा झाला, आम्ही काय खाल्ले की मुळीच काही खाल्ले नाही याचे आम्हास भान राहात नसे." आईच्या एकंदर व्यक्तिमत्त्वाचाच त्यांच्या मनावर फार खोलवर परिणाम झाला.

शिंदे यांना लहानपणापासूनच निसर्गाची ओढ होती व आपण निसर्गाला हृदयदान दिले असे सांगतानाही आपण त्यापूर्वीच आईला हृदयदान दिले होते याचा उल्लेख ते करतात. वडिलांचा उदार स्वभाव, शिक्षकांचे प्रेमळ शिकविणे, वडिलांच्या बरोबर वनभोजनास जाणे, सवंगड्यासमवेत चालणारे दांडगाईचे खेळ इत्यादीचे वेधक अशा प्रकारचे चित्र त्यांनी रेखाटले आहे. या काळात त्यांनी घरीच

केलेले श्रीधर, महिपती वगैरेसारख्या संतकवींच्या पोथ्यांचे वाचन, शाळेमध्ये कालिदासाचे रघुवंश, बाणभट्टाची कादंबरी वगैरेचे केलेले अध्ययन व शाळेत पाश्चात्त्य संस्कृतीचा अनुभव देणारा इंग्रजी साहित्याचा अभ्यास व स्वतंत्रपणे केलेले मराठीमधील अद्‌भूतरम्य, प्रणयप्रधान कादंबऱ्यांचे वाचन अशा विविध संस्कारातून त्यांच्या मनाची घडण कशी घडली याचे उठावदार चित्र त्यांनी रेखाटले आहे. आपल्या सौंदर्योन्मुख वृत्तीचे वर्णन करताना त्यांनी म्हटले आहे, "माझ्या घरी जातिभेद नव्हता, तसा माझ्या हृदयात संस्कृतिभेदाचा किंवा पक्षपाताचा कृत्रिमपणाही नव्हता. सौंदर्य जेथे भेटेल तेथे ऊर्ध्वहस्ताने स्वीकारण्यास मी लहानपणापासून एका पायावर तयार आहे. मग ते इंग्लंडतले असो, की स्वदेशातले असो, शहरातले असो, की खेड्यातले असो, संस्कृत असो, की प्राकृत असो, ते सहज व स्वाभाविक असले की पुरे. मी त्याला बिलगलो असे समजावे."

या पुस्तकाच्या पुढील भागाचे लेखन बराच खंड पडल्यानंतर व शिंदे कंपवाताने आजारी असताना आयुष्याच्या अखेरच्या अवस्थेत केलेले आहे. त्यांच्या आयुष्यातील १९०३ च्या पुढचा काळ हा प्राधान्याने कार्यकाळ आहे. या भागाचे लेखन त्यांनी वर्तमानपत्रातील कात्रणे, अहवाल, स्वतःची टिपणे सहकाऱ्यांनी मिळवून दिलेली माहिती यांचा आधार घेऊन केलेले आहे. या निवेदनात बराचसा भाग त्यांच्या कामाच्या व चळवळीच्या माहितीचा असा आहे. असे असले तरी ते निवेदन कोरडेपणाने केलेले नाही ; तर एका भावनाप्रधान, धर्मप्रवण व प्रगल्भ व्यक्तीने केलेले हे निवेदन आहे, याचा ठसा वाचकांच्या मनावर उमटतो.

महर्षी शिंदे यांचे हे आत्मचरित्र एका सात्त्विक, निरहंकारी, क्षमाशील वृत्तीच्या पुरुषाने लिहिलेले आहे, असा प्रत्यय वाचकांना सातत्याने येत राहतो. शिंदे यांनी अपूर्व अशा प्रकाराचा स्वार्थत्याग करून धर्मप्रचार करण्याचे व अस्पृश्यतानिवारणाचे कार्य आयुष्यभर केलेले आहे. या कार्यासाठी त्यांनी उपसलेले कष्ट, त्यांना करावा लागलेला संघर्ष, गिळावे लागलेले अपमान याबद्दलची यथायोग्य माहिती ज्यांना असेल त्यांना तर या आत्मचरित्राची थोरवी विशेष पटल्यावाचून राहात नाही. आत्मचरित्र लेखकाने आत्मप्रौढी मिरवू नये, आत्मगौरव करू नये, आत्मसमर्थन करू नये, ही स्वाभाविक अपेक्षा असते. ब्राह्मधर्म प्रचारक या नात्याने, डिप्रेस्ड क्लासेस मिशनची स्थापना करून कार्य करणारे या नात्याने शिंदे यांचा हिंदुस्थानातील कितीतरी ज्येष्ठ पुढाऱ्यांचा परिचय झालेला होता. आपल्या कामासाठी त्यांनी त्यांचे सहकार्य घेतले होते. डॉ. भांडारकर, न्यायमूर्ती रानडे, नामदार गोखले, मिसेस ॲनी बेझंट, म. गांधी इत्यादी थोर व्यक्तींचा त्यांना जवळून परिचय होता. या थोर विभूतींचा जो थोडाफार उल्लेख येतो तो विशिष्ट तपशील पुरविण्याच्या संदर्भात. वस्तुतः महात्मा गांधीचा त्यांचा विशेष परिचय होता व त्यांच्या वारंवार भेटीगाठी होत असत. मात्र आत्मगौरव वाढेल अशा प्रकारे यांपैकी कोणत्याही व्यक्तीचा उल्लेख आपल्या चरित्रात करण्याचे त्यांनी टाळले आहे, असेच दिसते. संतांप्रमाणे त्यांची आत्मसंकोची वृत्ती होती. १९२३ साली त्यांना पुणे येथे दिलेल्या मानपत्रास त्यांनी जे उत्तर दिले त्यातून त्यांची आत्मसंकोची मनोवृत्ती प्रकट होते. "मनुष्याच्या चरित्रात ज्या कित्येक आपत्ती येतात, त्यातील आपली झालेली अकटोविकट स्तुती आपल्याच कानाने ऐकणे ही एक होय. जेव्हा जेव्हा असे दुर्धर प्रसंग माझ्यावर येतात तेव्हा ते सहन करण्याचा एकच तोडगा माझ्याजवळ आहे. तो हा, की इतर वेळा माझी जी निंदा व अपमान झालेला असतो त्याची मी आठवण करतो आणि स्तुतिनिंदेचे ओझे ब्रह्मार्पण करून मी माझ्या कार्याला मोकळा होतो." मुंबई प्रार्थना समाजातील धुरिणांशी, त्याचप्रमाणे डॉ. आंबेडकर, म. गांधी यांच्याशी त्यांचे काही बाबतीत मतभेद झाले होते. मात्र आत्मसमर्थनासाठी आपल्या चरित्रात

त्यांनी एक ओळही लिहिली नाही. या व्यक्तीचा जो उल्लेख केलेला असेल तो त्यांचा मोठेपणा लक्षात घेऊन गौरवयुक्त शब्दांतच केलेला आढळतो. अशा उन्नत मनोवृत्तीने लिहिलेले हे आत्मचरित्र वाचकांना उदात्त स्वरूपाचा आनंद देते.

व्यक्तीचे असो, प्रसंगाचे असो किंवा मनोवृत्तीचे असो, प्रत्ययकारी चित्रण करणे हे शिंदे यांच्या लेखनशैलीचे प्रमुख वैशिष्ट्य आहे. एखाद्या स्थळाचे अथवा वातावरणाचे चित्र हुबेहुब वाटावे अशा प्रकारे शिंदे रेखाटतात. जगन्नाथपुरी येथील जगन्नाथ मंदिराचे, आजूबाजूच्या ओंगळ वातावरणाचे चित्र त्यांनी रेखाटले आहे, तसेच कलकत्ता येथील हुगळी नदीच्या काठी असलेल्या कालिमातेला कोकरांचा बळी देण्याच्या प्रसंगाचे अत्यंत क्रूरपणाचे वर्णन केले आहे. एखाद्या व्यक्तीचे चित्र साक्षात करण्याची क्षमताही त्यांच्या लेखणीत आहे. ब्राह्म समाजाच्या शतसांवत्सरिक उत्सवानिमित्त १९२८ साली ते कलकत्त्यास गेले असताना उपासना चालविणाऱ्या रवींद्रनाथ टागोरांचे त्यांना प्रथम दर्शन कसे घडले याचे त्यांनी वर्णन केले आहे. "मी त्यांना प्रथमच पाहिले. चेहरा अत्यंत सुंदर व गंभीर किंचित औदासीन्याची छटा दिसली. प्राचीन ऋषिकाळाची कल्पना मूर्त स्वरूपास आली. वेदी-सर्वस्फूर्त झाली. वेदीभोवतीची मोठमोठी शुभ्र व लाल उत्फुल्ल गुलाबाची फुले विकसित होऊन कविवर्याचे उद्‌गार ऐकण्यास टपलेली होती, असा भास झाला. खाली मान घालून कविवर्यांनी जे आसन घातले ते अर्धातास वर पाहीचनात. आवाज अलगुजासारखा कोमल व हृदयप्रवेशी होता. मग पुढे विरल व अपांग दृष्टीने श्रोतृवृंदाकडे पाहात ते आपले प्रवचन वाचू लागले. त्यावेळी कमलनयन म्हणून काय चीज आहे, ती अनुभवास आली. केशकलापांची शुभ्र शोभा गोधूम कांतीच्या भव्य कपाळावर विलसत होती. पिंगट रंगाचा रेशमी सैल सदरा असून त्यावर त्याच रंगाची चादर पसरली होती. सरळ नासिका, विखुरलेली दाढी, पाणीदार दृष्टिविक्षेप. एकंदरीत एक दैवतच पुढे दिसले." वस्तुनिष्ठ वर्णनाबरोबरच आपल्या मनावर होणाऱ्या परिणामांचेही त्यांनी वर्णन केले आहे. भावस्थितीला अनुरूप असा संस्कृत शब्दांचा काहीशा विपुलतेने उपयोग केला आहे.

व्यक्तिवर्णनाप्रमाणेच संवाद प्रसंगाचेही यथार्थ चित्रण शिंदे करतात. 'लंडन इंडिया सोसायटीत' वयोवृद्ध दादाभाई नौरोजी आपल्याला नातू शोभतील अशा तरुणांना प्रेमळपणे कसे दटावतात हे त्यांनी वर्णिले आहे. डॉ. भांडारकरांसमवेतचा विनोदी प्रसंगही ते रेखाटतात. त्याचप्रमाणे तुरुंगात भेटण्यास आलेले ना. भास्करराव जाधव यांच्या समवेत झालेल्या तणावपूर्ण संवाद प्रसंगाचेही त्यांनी उत्तमप्रकारे चित्रण केले आहे.

विनोदात्म वृत्ती हा महर्षी शिंदे यांच्या व्यक्तिमत्त्वाचा एक प्रमुख विशेष आहे, व संपूर्ण चरित्रातून किंबहुना त्यांच्या सर्वच लेखनातून तो मंदपणे प्रकट होताना दिसतो. त्यांचा विनोद त्यांच्या समंजस, क्षमाशील वृत्तीतून निर्माण होणारा आहे. नागपुरात शिमग्याच्या वेळचे बीभत्स प्रकार टाळण्यासाठी शिंदे यांनी सभा बोलावली होती. प्रतिकूल असणाऱ्या मंडळींनी त्यांनाच वाटेत अडवून रंगाने न्हाऊ घातले. या प्रसंगाचे ते वर्णन करतात, "मला सायकलवरून खालीदेखील उतरू न देता चौघाधटिंगणांनी मला सायकलवरच रंगस्नान घातले. सर्व कपडेच नव्हे तर शरीरसुद्धा रंगाने भिजून चिंब झाले. स्नानविधी चालू असता होळीचा अर्वाच्य ध्वनी दुमदुमू लागला. इतक्या थाटात लग्नातसुद्धा माझे स्नान झाले नव्हते ! " स्वत:च्या फजितीचे आणि प्रावात्य प्रसंगाचे या व्याज भारदस्त शैलीत त्यांनी जे वर्णन केले आहे ते त्यांच्या ठिकाणी असलेल्या विनोदात्म वृत्तीमुळेच.

म. शिंदे यांचे हे आत्मचरित्रपर लेखन कृतिवीर असणाऱ्या एका धर्मनिष्ठ पुरुषाचे आहे. संपूर्ण लेखनात त्यांच्या सच्चेपणाचा प्रत्यय येतो. वस्तुनिष्ठतेला कोठेही बाध येऊ न देता त्या प्रसंगाच्या भावनात्मकतेचेही ते वर्णन करतात. आत्मगौरव टाळून स्वतःच्या कार्याचे वर्णन करावयाचे ही कसरत त्यांना संपूर्ण लेखनांमध्ये करावी लागली आहे. धार्मिक व सामाजिक अशा सर्वांगीण परिवर्तनाचा ध्यास, वृत्तीचा निःस्पृहपणा आणि परखडपणा आत्मसमर्थन व आत्मगौरव यांचा अत्यंत अभाव या नैतिक गुणांच्या जोडीने तरल संवेदनशीलता, उच्च प्रतीची विनोदात्मता आणि भाषेचा सर्जकपणे उपयोग करण्याची क्षमता या गुणविशेषांमुळे त्यांचे हे आत्मचरित्रलेखन श्रेष्ठ दर्जाचे ठरते.

• •

प्रवासवर्णनपर लेखन हाही एक महर्षी शिंदे यांच्या आत्मपरलेखनाचा लक्षणीय असा भाग आहे. बालपणी वडिलांच्याबरोबर निसर्गरम्य ठिकाणी केलेल्या सहलींमुळे व आईने सांगितलेल्या रानावनातल्या गोष्टींमुळे त्यांच्या ठिकाणी बालपणापासूनच निसर्ग सौंदर्याची व वेगवेगळी स्थळे पाहण्याची आवड निर्माण झाली होती. बी. ए. च्या वर्गात असताना त्यांनी कोल्हापूर जवळील पन्हाळगड, विशाळगड या निसर्गरम्य ठिकाणी सहल काढली होती. १९०१-०३ या कालावधीत लिहिलेल्या त्यांच्या इंग्लंडमधील रोजनिशीत पॅरिस, रोम, पाँपी येथे केलेल्या प्रवासाचे उत्तम प्रकारचे वर्णन पाहावयास मिळते. त्याशिवाय त्यांनी मुद्दाम असे लिहिलेले तीस एक प्रवासवर्णनपर लेख आहेत. मुंबई प्रार्थना समाजाचे मुखपत्र असलेल्या 'सुबोध पत्रिके'च्या संपादकाच्या विनंतीवरून त्यांनी सुमारे सोळा प्रवासवर्णनपर लेख युरोपमध्ये असताना लिहिले. भारतात आल्यानंतरही त्यांनी केलेल्या प्रवासासंबंधी आवडीने लेख लिहिले आहेत प्रवास करून निसर्गरम्य ठिकाणी ऐतिहासिक स्थळे, मंदिरे, शिल्पे बघावी आणि आपण बघितलेले इतरांना कथन करावे, ही महर्षी शिंदे यांच्या ठिकाणची स्वाभाविक उर्मी दिसते.

इंग्लंडपर्यंतच्या जलप्रवासाचे तसेच युरोपमधील मार्सेय, पॅरिस, लंडन ही शहरे, शेक्सपिअर, वर्डस्वर्थ वगैरे प्रतिभावंताशी संबंधित स्थळे, इंग्लंड व स्कॉटलंडमधील सरोवरप्रांत इत्यादीचे वर्णन त्यांनी आपल्या प्रवासवर्णनपर लेखांतून केले आहे. भारतामधील मंगळूर, मुडबिद्री, कारकळ इत्यादी लहानमोठ्या शहरांची वर्णनेही त्यांनी केली आहेत.

या प्रवासवर्णनपर लेखनातून महर्षी शिंदे यांनी अनुभवलेला निसर्ग, ऐतिहासिक स्थळे, मंदिरे, शिल्पे त्याचप्रमाणे तेथील सामाजिक, सांस्कृतिक व धर्मविषयक स्थिती इत्यादीबद्दल वर्णन केले आहे. सांस्कृतिक ठिकाणे, निसर्ग आणि लोकस्थिती यांचे निरीक्षण करण्यामध्ये त्यांना विलक्षण आस्था होती. त्यांनी बघितलेला निसर्ग असो, वास्तू अथवा शिल्पे असोत किंवा लोकजीवन असो या सर्वांचे वस्तुनिष्ठ चित्रण ते वेधकपणे करतातच, मात्र त्यांचे हे वर्णन केवळ वस्तुनिष्ठ स्वरूपाचे केवळ माहिती देणारे असत नाही. बघितलेल्या दृश्याने त्यांच्य अंतःकरणामध्ये उदित केलेली भावना, तीमधून निर्माण झालेले चिंतन अथवा वैचारिक स्वरूपाच्या जाणिवा ते प्रकट करतात.

शिंदे यांच्या मनावर निसर्गाचा आध्यात्मिक स्वरूपाचा परिणाम कसा होतो, त्याचप्रमाणे त्यांची वैचारिकता ही किती व्यापक होती हे त्यांच्या १९०३ साली लिहिलेल्या 'जनातून वनात आणि परत' या लेखातून उत्कटपणे जाणवते. त्यांना सुंदर निसर्ग भावतो. मात्र सुधारणेच्या नावाखाली या यंत्रयुगात माणुसकीचे होणारे अवमूल्यन हेही तीव्रपणाने कसे जाणवते याचा प्रत्यय प्रस्तुत लेखावरून येतो.

ऑक्सफर्डवरून ते आगगाडीने सुप्रसिद्ध सरोवर प्रांती मिळालेले होते. वाटेत त्यांना लागलेल्या नर्मिंगहॅम, मँचेस्टर अशा दगडी कोळशावर चालणाऱ्या कारखान्याच्या 'ब्लॅककंट्री' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या प्रदेशातून जाताना मांडीवरच्या वर्तमानपत्रावर कोळशाची भुकटी कशी साचे व बाहेर पाहिल्यास नुसती गिरण्यांची धुराडी व त्यातून निघणारे धुरांचे कल्लोळ कसे दिसत व घरे, देवळे व झाडी ही कशी सारखीच काळवंडून गेलेली दिसे याचे यथातथ्य वर्णन केले आहे. या वातावरणात अष्टौप्रहर राहणाऱ्या हतभागी मजुरांची काय स्थिती असेल या कल्पनेने त्यांच्या मनामध्ये अनुकंपेची भावना निर्माण होते. प्रगतीची ही काळी खरखरीत बाजू पाहून त्यांचे मन चिंतनमग्न होते. या यंत्रयुगातील तथाकथित सुधारणा ही माणसाची माणुसकी नष्ट करणारी आहे, ही त्यांना जाणीव झाली. यंत्रयुगाबद्दलचा निषेध त्यातून प्रकट होतो.

शिंदे यांना निसर्गातील स्वाभाविक जीवन हेच सुंदर वाटते. म. गांधींच्या प्रमाणेच, शिवाय त्यांच्या काही वर्षे आधी, यंत्रयुगाला महर्षी शिंदे यांचा स्वाभाविक विरोध होता हे जाणवते. पुढे १९०६ साली ते बंगालच्या सफरीत कुचबिहार संस्थानात गेले असताना गावाकडे नजर टाकली असताना केळी पोफळीच्या विस्तीर्ण व सुंदर बनातील झोपड्या बघितल्यानंतर त्यांना वाटते. "आधुनिक सुधारणेच्या प्लेगाला कंटाळून जणू एक संग्रिगेशन कँपच बांधला आहे."

निसर्गरम्य एकांतामध्ये त्यांना उच्च कोटीचा आध्यात्मिक अनुभव येऊ शकतो. सरोवर प्रांती प्रो. कार्पेंटर यांच्याकडे मुक्कामास असता एका रात्री ते बौरोडेल दरीमध्ये शतपावलीस गेले होते. त्यावेळी त्यांना अशा प्रकारची आध्यात्मिक प्रतीती येते, या अवस्थेचे त्यांनी वर्णन केले आहे.

"आनंद होत होता काय आम्हाला ?
सांगवत नाही. काही वेळापूर्वी मात्र झाला होता खरा.
आम्ही काही पाहत होतो काय ?
नव्हतो ! दिसत होते पण काही तरी !
मागितले का नाही ?
छे हो ! काय मागावयाचे ?
जिवाला कसे होत होते ?
मधूनमधून सुस्कारे बाहेर पडत होते !
ते का म्हणून ?
कोणी सांगावे ! काही तरी आतून बाहेर निघत होते.
व काही बाहेरून आत शिरत होते."

चैतन्यरूप परमेश्वरतत्त्वाचा जणू त्यांना साक्षात्कार झाला होता. या प्रकारची आध्यात्मिक प्रतीती बेनलोमंड शिखरावरून अतिभव्य विशाल निसर्गदृश्य बघितल्यानंतरही आल्याचे त्यांनी वर्णन केले आहे.

आध्यात्मिक पातळीवरून पाहणे आणि अनुभव घेणे हा जसा शिंदे यांच्या प्रवासवर्णनपर साहित्याचा एक मुख्य विशेष आहे. त्याचप्रमाणे त्या ठिकाणच्या लोकजीवनाचे, तेथील संस्कृतीचे निरीक्षण करणे व त्याचा अर्थ लावणे हाही एक दृष्टिकोन शिंदे यांच्या प्रवासवर्णनपर लेखनात आढळतो. लंडन शहराचे त्यांनी केलेले वर्णन देखील लोकजीवनाच्या आणि संस्कृतीच्या मर्मावर नेमके बोट ठेवणारे आहे.

लंडन शहराचे वस्तुनिष्ठ स्वरूपाचे वर्णन तर ते करतातच, पण त्यामागे असलेली लोकजीवनातील सांस्कृतिक, नैतिक वैशिष्ट्यही ते हेरतात. छप्पन्न लाख वस्तीचे लंडन शहर बघितल्यावर 'मानवी महासागरात आपण जणू गटांगळ्या खातो आहोत की, काय' असे त्यांना वाटू लागते. कुठल्याही रहदारीच्या रस्त्यावर गेल्याबरोबर स्त्री-पुरुषांच्या लाटांवर लाटा थडकत असल्याचे पाहून 'जगावर मनुष्यप्राणी सवंग झाला आहे असे वाटते ', अशी प्रतिक्रिया ते नोंदवतात.

जमिनीवर धावणाऱ्या विविध वाहनांचे वगैरे वर्णन केल्यावर लंडन शहराच्या जमिनीखालचे ते वर्णन करतात, "लंडनच्या जमिनीत खाली कोठे काय आहे हे सांगवत नाही. विजेच्या दिव्यांच्या तारा, धुराच्या दिव्यांच्या तोट्या, पाण्याचे बंब, मैल्याची गटारे आणि आगगाडीचे बोगदे यांनी सगळी जमीन मधमाश्याच्या पोळ्याप्रमाणे पोखरली आहे. खाली जमिनीत ही नभी तर वरती हवेतून टेलिग्राफ व टेलिफोनचे जाळे पसरले आहे. याप्रमाणे लंडन नावाचे दोनशे-तीनशे चौरस मैल क्षेत्रफळाचे एक सावयवी शरीर आहे."

इंग्लंड हे बोलून चालून व्यापाऱ्यांचे राष्ट्र आहे असे विधान करून येथील व्यापाऱ्यांची तऱ्हा ते वर्णन करतात "माल तर मोहक खराच, पण तो दुकानात मांडून ठेवण्याची ढब त्याहून मोहक. आमच्याकडील दुकानदार आपल्या मालाचे ढीगच्या ढीग दुकानात लपवून ठेवून आपण दाराशी येऊन बसतात. एखाद्यास वाटावे हे जणू रखवालीच करताहेत." मात्र इंग्रजाचा व्यापार केवळ बाह्य भपक्याने वाढलेला नाही. त्यांना गिऱ्हाईकाची कदर असते हे सांगून व्यापारांतील त्याच्या यशाबद्दल ते विधान करतात, "एकंदरीत व्यापार, बुद्धी आणि नीती या तीनही मुख्य तत्त्वांची समान सांगड घालून दीर्घोद्योग व अचाट साहस व निश्चल श्रद्धा यांच्या पायावर या लोकांनी आपल्या व्यापार शास्त्राची इमारत उभारली आहे. म्हणून लंडन शहरास हल्लीचे वैभव आले आहे."

इंग्लंडमधून पाठवलेली प्रवासवर्णने तेथील विविध प्रकारच्या संस्था, लोकोपयोगी कार्ये, वस्तुसंग्रहालये वगैरेबद्दलची माहिती देणारी व बोधप्रद स्वरूपाची आहेत. भारतामधील केलेल्या प्रवासाची वर्णने वेधक व उद्‌बोधक उतरली आहेत. वेगवेगळ्या संस्कृती, धर्म, मानववंशशास्त्र, इतिहास व भाषा यांच्या अध्ययनामुळे त्यांचे हे प्रवासवर्णनपर लेखन अनेक संदर्भांनी अर्थघन बनले आहे. बंगळूरच्या रस्त्यावर एक फेरी मारली असता तेथे द्राविड, आर्य, मुसलमानी आणि इंग्रजी अशा विविध परंपरांची आणि संस्कृतीची कशी बेमालूम भेसळ होऊन गेल्याचे दिसते याचे चटकदार वर्णन ते करतात. शहरात हिंडत असताना द्राविडी देवळांची पसरट व बोथट शिखरे, ख्रिस्ती चर्चची गॉथिक निमुळती स्पायर्स, मुसलमानी मशिदीचे पांढरेशुभ्र मनोरे या साऱ्यांचे एकच विसंगत चित्र नजरेला दिसते. माणसांतही आर्य-अनार्य वंशाचे चित्रण आणि मुसलमानी-ख्रिस्ती संस्कृतीचा वरकरणी प्रभाव कसा दिसतो, याचेही ते आकर्षक चित्र रेखाटतात. मंगळूर शहराबद्दल लिहिताना युरोपातील अथेन्स, एडिंबरो या सात टेकड्यांवर वसलेल्या शहरापेक्षाही अधिक टेकड्यांवर मंगळूर शहर वसले आहे, हे सांगतात. गोरखनाथांची कोणी मंगळा नावाची दासी होती तिच्यावरून गावाचे नाव पडले, ही दंतकथा ते नमूद करतात. गावाची नावे कशी पडतात याचा व्युत्पत्ती, इतिहास व दंतकथा यांच्याद्वारा शोध घेणे ही शिंदे यांची आवड सर्वच प्रवासवर्णनात दिसून येते. मुडविद्री, कारकळ वगैरे मंगळूर जिल्ह्यातील गावी असलेल्या देवळांचे, वास्तूचे व शिल्पांचे माहितीपूर्ण, उद्‌बोधक असे वर्णन त्यांनी केले आहे. हा मुलूख पावसाळी व रेताडी असल्याने दगडाची उणीव व लाकडाची चंगळ म्हणून या सर्व भागातील देवळाचा अधिक भाग

लाकडी आणि फार तर भिंती व खांब तेवढे लॅटराईट म्हणजे ठिसूळ दगडाचेच असावयाचे. छप्पर मात्र सगळीकडे लाकडी दिसून येते. त्याचा घाट इतर प्रांतात कोठेही न आढळणारा व फक्त केरळ देशातच आढळणारा असा आहे. शिवाय नेपाळ, तिबेट व ब्रह्मदेशातील छपरांच्या घाटाशी अगदी तंतोतंत जुळणारा आहे. ही बाब नमूद करून शिल्पशास्त्रज्ञ फर्ग्युसन यांचा तर्क ते सांगतात. नेपाळात पाऊस व लाकूड फार व दगड कमी, ही भौतिक परिस्थिती इकडेही असल्याने एखाद्याच कोपऱ्यात हा प्राचीन अवशेष दिसतो. ही शिल्पकला ईशान्येकडून आलेल्या बौद्ध व जैन मिशनऱ्यांनीच प्राचीन काळी इकडे आणली असावी असे फर्ग्युसनचे मत असल्याचे ते सांगतात. वास्तुशास्त्रामध्ये शिंदे यांना रूची होती हे त्याच्या सगळ्या प्रवासवर्णनातून दिसून येते.

प्रवासवर्णनपर लेखनातूनही शिंदे यांचे उच्च प्रतीचे चिंतन आपल्याला आढळते. कारकळ येथील त्रेचाळीस फूट उंचीचा एकाच दगडातून कोरलेला घुमटाराज नावाचा दिगंबर पुतळा पाहून शिंदे फारच प्रभावित होतात. ते लिहितात, "अगदी नग्न सावयव शरीर, धीरोदात्त व प्रसन्न मुद्रा, साधेपण भरीव सौंदर्य आणि भोवतालचे शांत वातावरणही सर्व पाहून जैन धर्माविषयीच नव्हे, तर शिल्पकाराविषयी देखील अनुकूल अशी पूज्य भावना उत्पन्न होते." शिंदे यांनी इंग्लंड, फान्स, जर्मनी व इटली वगैरे देशांत ऐतिहासिक विभूतीच्या व संतांच्या उठावदार मूर्ती बघितल्या होत्या. पण त्या कोणीही आपल्याला घेरले नाही इतके या घुमटाराजाने का घेरले, याचा ते स्वत:शी विचार करतात. कलकत्त्यातील जनरल औट रॅमचा अश्वारूढ पुतळा त्यांना आठवतो, "सत्तावन्न सालच्या बंडात बंडखोराच्या नरडीचा घोट घेण्यासाठी, चवताळून झेप घेणाऱ्या वाघाप्रमाणे आपल्या घोड्यावरून मागे वळून तलवारीचा वार करीत आहे असा आव या पंचरशी पुतळ्याने दाखविला आहे. तो पाहून क्षणभर अंगावर शहारे उभारतात, पण ते क्षणभरच. लगेच या पाशवी व्यक्तीचे असले उर्मट प्रदर्शन पाहून तिरस्काराच्या लाटा उसळू लागतात. त्या दाबणे जवळ जवळ अशक्य होऊन जाते. पण घुमटाराज ! तुझ्या कपाळावरील गांभीर्याच्या व हनुवटीवरील माधुर्याच्या रेखा माझ्या काळजात अद्यापि खोल खोलच रूतत आहेत याचे रहस्य काय असेल बरे ?" या प्रकारच्या चिंतनातून ते कलानिर्मितीच्या अंतरंगापर्यंत पोहोचतात. "काव्याचे व कलेचे हृदय म्हणजे पावित्र्य ऊर्फ धर्म हेच होय. हे हृदयच आपल्या अंगाबाहेर टाकून कवीने अथवा शिल्पकाराने कितीही ओढाताण करून अजबसृष्टी निर्माण केली तर ती नुसती आश्चर्यकारक होईल, पण जर जीवाला उद्धारक होणार नाही. आमचे प्राचीन शिल्पकार पुष्कळदा धर्माने झपाटलेले असत म्हणून त्यांच्या हातून अशा सृष्टी निर्माण झाल्या. पाश्चात्त्य शिल्पकार पुष्कळदा भक्तीपेक्षा चातुर्यावर भिस्त ठेवून कामाला लागतात. म्हणून त्याच्या कृतीला तादृश किंमत येत नाही." धर्म हेच कलेचे हृदय होय हे त्यांच्या चिंतनाचे फलित प्रकट होते. महर्षी शिंदे यांच्या प्रवासवर्णनातून दिसून येणारी सूक्ष्म निरीक्षणशक्ती, वास्तवाचे हुबेहुब वर्णन करण्याची क्षमता, अनेकविध शास्त्रांचे नेमकेपणाने दिले जाणारे संदर्भ, त्यांची अनुभव घेण्याची तरल संवेदनशीलता, अनुभव प्रकट करताना दिसून येणारी नर्म विनोदबुद्धी आणि या सर्वांत वरची बाब म्हणजे त्यांची आध्यात्मिकता, या अनेकविध वैशिष्ट्यांमुळे त्यांच्या प्रवासवर्णपर लेखनांमध्ये वरच्या दर्जाची वाङ्मयीन गुणवत्ता प्रकर्षाने आविर्भूत होते.

• •

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांच्या आत्मपर स्वरूपाच्या लेखनाचे काही विशेष साकल्याने आपण ध्यानात घेऊ. त्यांच्या या आत्मपर स्वरूपाच्या लेखनांमध्ये अत्यंत स्वाभाविकपणे लालित्य, म्हणजेच वाङ्मयीन सौंदर्य निर्माण होते. त्याचे महत्त्वाचे कारण म्हणजे त्यांच्या लेखनातून त्यांच्या प्रगल्भ, उन्नत्त अशा

व्यक्तिमत्त्वाचा सच्चपणाने होणारा स्वाभाविक आविष्कार. त्यांच्या मनाची आध्यात्मिक ठेवण जीवनदृष्टीचा व्यापकपणा, त्यांची सत्यनिष्ठा, तरल संवेदनशीलता, काव्यात्मवृत्ती आणि मधुर अशा प्रकारची विनोदवृत्ती हे त्याच्या व्यक्तिमत्त्वाचे विशेष होत, याचा आधीही उल्लेख विवेचनाच्या अनुरोधाने आलेला आहेच. त्यांच्या समृद्ध व्यक्तिमत्त्वाचा आविष्कार हा त्यांच्या आत्मपर लेखनात वाङ्मयीन सौंदर्य निर्माण करणारा कायमस्वरूपाचा घटक आहे, असे आपल्याला जाणवते.

महर्षी शिंदे यांच्या लेखनामध्ये सौंदर्य अथवा लालित्य निर्माण करणारा महत्त्वाचा दुसरा घटक म्हणजे त्यांचा भाषेचा वैशिष्ट्यपूर्ण उपयोग. ते आपली भाषा केवळ संदेशवहनासाठी अथवा निवेदनासाठी वापरीत नाहीत, तर त्याच्या जोडीने ते अधिकचा अर्थ प्रकट करतात. शिंदे यांची भाषा ही या प्रकारचा अधिकचा प्रकट करणारी साहित्यिक भाषा आहे. त्यांची मराठी शैलीची जाण अतिशय प्रगल्भ स्वरूपाची आहे. मॅट्रिकपर्यंतच्या शालेय शिक्षणाच्या काळातच ज्ञानेश्वर, तुकाराम, महिपती, श्रीधर या संतांचे साहित्य मनापासून वाचले होते. भाषेची दृष्टी सदैव अर्थाच्या गाभ्यावर असावी व हा अर्थ प्रकट करीत असताना डोळ्यात न भरणारे अलंकरण असावे अशी त्यांच्या ठिकाणी भाषाविषयक जाण निर्माण झाली होती. शिंदे आपल्या लेखनांतून एखाद्या प्रसंगाचे मनोवृत्तीचे, व्यक्तीचे अथवा स्थळाचे वर्णन करीत असोत, किंवा गहन स्वरूपाचे धर्मचिंतन करीत असोत, भाषेच्या समुचित आणि सर्जक वापरामुळे तो वर्ण्यविषय आपल्या प्रत्ययाला आणून देतात. त्यांच्या शब्दवापराचा विचार केला तरी असे दिसते की, ते अनेकदा फारसी वा संस्कृत व क्वचित इंग्रजी शब्दांचा सहेतुकपणे उपयोग करतात. परभाषेतील शब्दांचा उपयोग करताना देखील तो अगदी अपरिहार्य आहे असे वाचकाला देखील जाणवते. "चांगल्या गुणाला मात्र ईश्वर कारण आणि वाईटाला मनुष्य कारण, असे म्हणणे म्हणजे ईश्वरावर ही मोठी मेहरबानीच करू पाहणे होय," या वाक्यातील 'मेहेरबानी' या शब्दांने जो आणि जेवढा अर्थ प्रकट होतो तो संस्कृत 'कृपा' शब्दांने प्रकट होऊ शकत नाही. मॅक्समुल्लरच्या धर्मविषयक तत्त्वज्ञानाने ते प्रभावित झाले व त्यांच्या मनावरील नास्तिक्याचे सावट दूर झाले. या संदर्भात वर्णन करताना, 'ते मला नवीनच एक आप्तपुरुष भासू लागले ', असे वर्णन करतात. 'आप्तपुरुष हा हिंदू धर्मपरंपरेत विशिष्ट अर्थ असलेला शब्द येथे अत्यंत समर्पक वाटतो.' 'छबिना', 'ललित' यासारखे जुन्या मराठीतील शब्द योग्य त्या संदर्भात उपयोगात आणून असे शब्द अर्थदृष्ट्या ते पुनरूज्जीवित करतात. नामाप्रमाणेच ते विशेषणांचा मार्मिकपणे उपयोग करतात. 'पुण्यासारख्या वाचाळ' व 'मुंबईसारख्या चवचाळ' शहरांचा संपर्क, आवाज अलगुजासारखा 'कोमल' व 'हृदयप्रवेशी' यासारखी विशेषणे वापरल्याची असंख्य उदाहरणे आहेत.

महर्षी शिंदे केवळ वाङ्मयीन विलास म्हणून अलंकार वापरत नाही तर, यथायोग्य वर्णन करण्यासाठी त्याचप्रमाणे एखाद्या बाबीबद्दलचा आपला अनुकूल वा प्रतिकूल स्वरूपाचा भावनिक दृष्टिकोन प्रकट करण्यासाठी आवश्यक तेथे ते अलंकाराचा उपयोग करतात. त्यांच्या अलंकार उपयोजनांचा एक विशेष असा आहे, की साध्या सरळपणाने उपमान-उपमेयांचा उपयोग करून उपमा-उत्प्रेक्षा यासारखी अलंकार निर्मिती न करता ते अर्धस्फुट रूपकाचा उपयोग करून व्यंगार्थ सुचवितात. 'घरकोंबडे कादंबरीकार' या शब्दयोजनेतील 'घरकोंबडा' हे विशेषण अतिवापरामुळे त्यातील रूपक लक्षात न येता साधे विशेषण बनून गेले आहे. परंतु, शिंदे यांनी कादंबरीकाराचे विशेषण म्हणून 'घरकोंबडा' हे विशेषण वापरल्यामुळे त्यातील व्यंगार्थ पुनरूज्जीवित होतो व जगाचा अनुभव न घेता निव्वळ घरी बसल्या बसल्या केवळ कल्पनेने कादंबऱ्या लिहिणारा असा अर्थ प्रतिकूल भावनिक दृष्टिकोनाबरोबर आपल्या प्रत्ययाला येतो. धर्म या विषयाला वाहिलेले एकही वर्तमानपत्र नाही. हे सांगताना "हल्ली देशात

वर्तमानपत्राचा दररोज इतका केर पडतो, पण त्यात धर्माच्या नावाने एक निर्माल्यही आढळत नाही !" असे त्यांनी लिहिले आहे. एखादे वर्तमानपत्र जर धर्मविषयासाठी काढले असते तर ते धर्माला वाहिलेले फूल ठरले असते अशा प्रकारचा गौरवार्थ ते सूचित करतात. सक्तीच्या शिक्षणासाठी पैसा पाहिजे असेल तर दारूचे परवाने देऊन तो मिळविला पाहिजे हे जे १९२० च्या सुमाराला धोरण म्हणून सांगितले त्याचे वर्णन करताना 'शिक्षणाचे मंगळसूत्र दारूच्या बाटलीच्या गळ्यात बांधण्याचा प्रकार' असे त्याचे वर्णन केले आहे. एका मंगल गोष्टीची जोड दुसऱ्या अभद्र गोष्टीशी घालणे असा अर्थ ते प्रतिकूल भावनेसह सूचित करतात. वैचारिक स्वरूपाच्या लेखनातही भावनिकतेचा आशय असलेली कितीतरी विधाने आपल्याला त्यांच्या लेखनात पाहावयास मिळतात.

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांचे लेखन हे उन्नत धर्मावर नितांत श्रद्धा असलेल्या धर्मनिष्ठाचे लेखन आहे. त्यांचे स्वत:चे जगणे, प्रत्यक्ष कार्य आणि त्यांच्या साहित्यातून प्रकट होणारी वैचारिकता आणि संवेदनशीलता यांच्यामध्ये एकवाक्यता आहे. सच्चेपणाने जगण्यातून त्यांचे हे लेखन निर्माण झालेले असल्याने स्वाभाविकपणेच त्याला गुणवत्ताही प्राप्त झाली आहे. मराठी साहित्य क्षेत्रातील अभिनिवेशरहित जाणकार समीक्षक-वाचकांचा जो वर्ग आहे त्याला शिंदे यांचे वाङ्मय फार मोलाचे वाटते. त्यांना शिंदे हे प्रबोधन युगातील आदर्श, विचारवंत लेखक वाटतात. महर्षी शिंदे यांनी संशोधनपर वाङ्मयात, त्याचप्रमाणे वैचारिक स्वरूपाच्या वाङ्मयात मोलाची भर घातली आहे. त्यांचे आत्मपर स्वरूपाचे हे ललित साहित्य हेही त्यांच्या जीवनसंबद्ध दृष्टिकोनामुळे, उन्नत प्रगल्भ व्यक्तिमत्त्वाचा आविष्कार करणारे असल्यामुळे व आपल्या वैशिष्ट्यपूर्ण संवेदनशीलतेने मराठी साहित्याच्या संपन्नतेत भर घालणारे आहे, असे चोखंदळ अभिरुची असणाऱ्या अभिज्ञ वाचकवर्गाचे मत पडते.

मराठी साहित्याच्या क्षेत्रात स्वातंत्र्योत्तर काळात व विशेषत: १९६० नंतर फरक पडलेला दिसत आहे, त्याचप्रमाणे साहित्यविषयक अभिरूचीविषयी योग्यप्रकारचे स्थित्यंतर घडताना दिसत आहे. महाराष्ट्राच्या प्रबोधनयुगात महर्षी शिंदे यांनी सुधारक म्हणून केलेल्या कामगिरीचे महत्त्व उत्तरोत्तर अधिक प्रमाणात जाणवू लागले आहे. जीवनाच्या समग्रतेचा विचार मांडणारे शिंदे यांचा मार्ग हाच खराखुरा सुधारणेचा मार्ग आहे, असे अनेक विचारवंत आज प्रतिपादन करीत आहेत. महर्षी शिंदे यांची सुधारक व विचारवंत म्हणून जशी थोरवी आज पटू लागली आहे, त्याचप्रमाणे एक श्रेष्ठ दर्जाचे आत्मपर ललितसाहित्याचे सर्जनशील लेखक म्हणूनही त्यांची मान्यता उत्तरोत्तर वाढू लागली आहे.

महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाचे विद्यमान अध्यक्ष श्री. मधु मंगेश कर्णिक यांनी तसेच पूर्वाध्यक्ष प्राचार्य रा. रं. बोराडे यांनी महर्षी शिंदे यांच्या समग्र वाङ्मयाचे संपादन करण्याची जबाबदारी माझ्यावर सोपविली, याबद्दल साहित्य संस्कृती मंडळाच्या या दोन्ही अध्यक्षांचा, तसेच मंडळाचा मी अत्यंत ऋणी आहे.

गो. मा. पवार
रणधीर शिंदे
संपादक

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे समग्र वाङ्मय

खंड २ रा : आत्मपर लेखन

विभाग पहिला

रोजनिशी

प. वा. प्रतापराव शिंदे

व

प. वा. रवींद्र शिंदे

यांच्या स्मृतीस

वाय ४७३-४

प्रथमावृत्तीचे संपादकीय निवेदन....

महर्षी विठ्ठल रामजी उर्फ अण्णासाहेब शिंदे यांचे ज्येष्ठ चिरंजीव श्री. प्रतापराव यांनी आपल्या वडिलांच्या पश्चात त्यांची कागदपत्रे, पत्रव्यवहार, लेख इ. साहित्य जपून ठेवले. या सामग्रीचा योग्य उपयोग व्हावा अशी त्यांना तळमळ होती. त्यांच्याच प्रयत्नामुळे 'शिंदे लेखसंग्रह' हा अण्णासाहेबांच्या वैचारिक लेखांचा संग्रह १९६३ मध्ये प्रसिद्ध झाला. श्री. प्रतापराव शिंदे हे माझे सासरे. त्यांनी त्यांच्या संग्रही असलेले साहित्य मला उपलब्ध करून दिले. म. शिंदे यांच्या संग्रहात काही छोट्या डायऱ्या व तुलनेने मोठ्या अशा तीन रोजनिशा आढळल्या. छोट्या डायऱ्यांत सामान्यत: स्मरणार्थ केलेल्या नोंदी वा टिपणे आहेत. त्यांच्या संग्रहातील मोठ्या रोजनिशा येथे संपादित केल्या आहेत.

पहिल्या दोन रोजनिशांचा उल्लेख म. शिंदे यांनीच 'फर्ग्युसनमधील रोजनिशी' व 'इंग्लंडमधील रोजनिशी' असा नंतरच्या काळात केला आहे. तिसरीवर 'येरवड्याच्या तुरुंगातील रोजनिशी' असे नाव स्वत: लिहिले आहे. 'फर्ग्युसनमधील रोजनिशी' २२ सें.मी. x १६ सें.मी. आकाराच्या जाड, कोऱ्या, चतकोर कागदाच्या वहीवर लिहिलेली असून प्रत्येक पृष्ठावर सामान्यत: २०-२१ ओळीचा मजकूर आहे. तीवर त्यांनी पृष्ठ क्रमांक टाकले आहेत. ह्या वहीची १०२ पृष्ठे लिहिलेली असून बाकीची कोरी आहेत. कागद अत्यंत जीर्ण झाल्याने सुरवातीच्या पृष्ठांचे कोपरे व कडा झिजून काही शब्द व ओळी गेलेल्या आहेत. वहीचा कागद चिकटल्यानेही काही शब्दांचे नुकसान झाले आहे. 'इंग्लंडमधीन रोजनिशी' ही ३१ सें.मी. x २० से.मी. आकाराच्या जाड आखीव कागदाच्या जमखंडीस बांधून घेतलेल्या मोठ्या रजिस्टरसारख्या वहीवर लिहिलेली आहे. पृष्ठ क्रमांक टाकलेले नाहीत. प्रत्येक पृष्ठावर २९ ओळी असून वहीची १०८ पृष्ठे लिहिलेली आहेत. कोऱ्या पानावर उलट बाजूने त्यांच्या आत्मचरित्रपर पुस्तकाचा पक्का मजकूर त्यांचे धाकटे चिरंजीव रवींद्र यांनी उतरला आहे. 'येरवड्याच्या तुरुंगातील रोजनिशी' २० सें.मी. x १६ सें.मी. आकाराच्या साध्या आखीव वहीवर लिहिलेली आहे. प्रत्येक पृष्ठावर २० ओळी असून दोन्ही पृष्ठांना मिळून एक असे क्रमांक म. शिंदे यांनी टाकले आहेत. वहीचा अशी ४५ पाने त्यांनी लिहिली आहेत.

म. शिंदे यांच्या लिहिण्याच्या लकबा कायम ठेवून सामान्यत: नव्या शुद्ध लेखनाचा अवलंब येथे केला आहे. शब्दारंभीच्या आणि उपांत्य स्वरांचे लेखन दीर्घ करण्याकडे त्यांचा कल आहे. उदाहरणार्थ- आभाव, आगत्य, आंगची सुशिक्षीत, दूषित, घातूक. 'अवडंबर असतो', 'पोलाद लागली' ह्या प्रयोगात त्यांचा शब्दांच्या लिंगाचा उपयोग वेगळा आहे. 'पंधरावड्यात'असा शब्द ते वापरतात. त्यांच्या ह्या सर्व लकबा येथे कायम ठेवल्या आहेत. अनेक नामे अथवा विशेषणे एकामागोमाग लिहिताना ते स्वल्पविरामांचा उपयोग करीत नाहीत. अशा ठिकाणी अर्थसौकर्यासाठी स्वल्पविराम दाखविले आहेत. अनुस्वारांचा उपयोग करण्याकडे त्यांचा कल कमीच आहे. पारंपरिक लेखनपद्धतीप्रमाणे ते अनुस्वारांचा विपुल उपयोग करीत नाहीत. प्रस्तुत संपादनात अनुस्वार व अंत्य स्वर नव्या शुद्धलेखनाप्रमाणे दाखविले आहेत.

महर्षी शिंदे यांनी मूळ रोजनिशीतच काही ठिकाणी गोल कंसात मजकूर लिहिलेला आहे. गोल कंसातील त्यांचा मजकूर नेहमीच्या टाइपात तसाच गोल कंसात ठेवला आहे. रोजनिशीचे

लेखन करताना अनवधानाने म. शिंदे यांच्याकडून शब्द सुटला आहे असे जेथे संपादकाला वाटले तेथे अर्थ स्पष्ट होण्याच्या दृष्टीने गोल कंसात असा शब्द तिरक्या टाइपात दाखविला आहे. मूळ रोजनिशीतील कागद फाटल्याने वा झिजल्याने मुळात अर्धवट शब्द जेथे राहिला आहे वा अस्पष्ट आहे तेथे असा शब्द चौकटी कंसात दाखविला आहे. जिथून मजकूर अगदीच नाहीसा झाला आहे अशी स्थळे टिंबांच्या चिन्हांनी दाखविली आहेत.

प्रस्तुत रोजनिशीचे काम करताना मला अनेक वडिलधाऱ्या व्यक्तींचे, मित्रांचे तसेच अपरिचितांचेही बहुमोल साह्य झाले याचा मी कृतज्ञतापूर्वक निर्देश करू इच्छितो. माझे सासरे श्री. प्रतापराव शिंदे यांनी अत्यंत विश्वासाने व आत्मीयतेने म. शिंद्यांचे हे साहित्य माझ्या हवाली केले. प्रा. वा. ल. कुळकर्णी, प्रा. मे. पुं. रेगे, आमदार श्री. पी. बी. साळुंखे, प्रा. म. वा. धोंड, डॉ. सुधीर रसाळ व डॉ. विद्याधर पुंडलिक यांनी ह्या कामाबद्दल आस्था दाखवून अनेक उपयुक्त सूचना केल्या. प्रत्यक्ष भेटीत वा पत्रद्वारे माहिती पुरविण्याच्या कामी अनेकांनी मदत केली. कोल्हापूरच्या श्रीमती सुशिलाबाई मोहिते, सौ. शकुंतलाबाई जमदग्नी, श्री. नानासाहेब सूर्यवंशी, डॉ. वि. बा. घुगे, जमखंडीचे श्री. विष्णू ऊर्फ बाबूराव दामोदर हुल्याळकर, डॉ. दामुअण्णा हुल्याळकर, श्री. बाळासाहेब अनिखिंडी, तेरदाळचे श्री. भाऊराव देशपांडे, अहमदनगरचे श्री. द. बा. डावरे, विजापूरचे पद्मश्री काकासाहेब कारखानीस, पुण्याचे श्री. गणपतराव शिंदे, श्री. बाबूराव जगताप, श्री. केशव नरहर कानिटकर, श्री. का. य. भांडारकर, श्री. ग. ह. खरे, म. म. दत्तो वामन पोतदार, श्री. म. श्री. दीक्षित, श्री. विश्वनाथ कृष्णराव भट, श्री. केशव गणपतराव शिंदे, श्री. द. ब. माडीवाले, श्री. हरिभाऊ जोशी, श्रीमती कमलाबाई भागवत; पुणे विद्यापीठातील प्रा. अरविंद महादेव देशपांडे, डॉ. एस्. आर्. साळकर, मुंबई विद्यापीठातील प्रा. जे. व्ही. नाईक, औरंगाबाद येथील श्री. मोतीलाल हिराचंद गांधी, बिशप ॲब्रिओ, प्रा. रियाज फारुकी, प्रा. गंगाधर पानतावणे या मंडळींना मला आवश्यक ती माहिती पुरविली. डॉ. सुधाकर चांदजकर व श्री. अरविंद कुरुंदकर यांनी मुद्रणप्रत तयार करण्याच्या कामी साह्य केले. या सर्वांचा मी अतिशय आभारी आहे. श्रीमती लक्ष्मीबाई शिंदे, श्री. अशोक शिंदे, श्री. दिलीप शिंदे, सौ. उमा शिंदे व सौ. सुजाता पवार ह्या कुटुंबीय मंडळीचे सर्व प्रकारे साह्य झाले याचा निर्देश करणे मला आवश्यक वाटते.

महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाने या पुस्तकाच्या प्रकाशनार्थ अनुदान दिले. याबद्दल मंडळाचा व मंडळाचे अध्यक्ष तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचा मी आभारी आहे.

या पुस्तकाचे मुद्रण श्री. सर्जेराव घोरपडे यांनी आपल्या व्यावसायिक नैतिकतेला धरुन सुरेख, दक्षतापूर्वक तसेच स्नेहभावाने केले याबद्दल मी त्यांचा आभारी आहे.

महर्षींचे चिरंजीव श्री. प्रतापराव व श्री. रवींद्रराव यांना वडिलांच्या साहित्याबद्दल फार आस्था होती. हे पुस्तक पाहण्यास ते आज जीवित नाहीत याची मला फार खंत वाटते.

शेवटी वाचकांना विनंती ही, की म. शिंदे यांच्या अभ्यासास उपयोगी पडू शकेल अशी माहिती कोणाकडे असली तर ती त्यांनी मला कळवावी. मी यांचा आभारी होईन.

मराठवाडा विद्यापीठ, **गो. मा. पवार**
औरंगाबाद.

प्रस्तावना....

महर्षी विठ्ठल रामजी ऊर्फ अण्णासाहेब शिंदे यांच्यासारख्या लोकोत्तर पुरुषाने काही काळ रोजनिशी लिहिली व ती प्रसिद्ध करण्यासाठी उपलब्ध होऊ शकली, ही अतिशय भाग्याची गोष्ट आहे. आणि ही रोजनिशीही साध्या नोंदीच्या स्वरूपाची नव्हे, तर अंतरंग प्रकट करणारी आहे. त्यामुळे ह्या रोजनिशीला सामाजिक इतिहासाच्या दृष्टीने तसेच वाङ्मयीन गुणवत्तेच्या दृष्टीनेही फार मोठे मोल आहे. आपल्याकडे सामान्य वा असामान्य व्यक्तीने रोजनिशी लिहिलेली असणे ही अतिशय दुर्मिळ बाब आहे. त्याचे महत्त्वाचे कारण आपल्या परंपरेतच असावे. आपल्या समाजात एकंदरीतच व्यक्तीला व तिच्या भावजीवनाला महत्त्व कमी आणि तिच्या सार्वजनिक जीवनाला महत्त्व जास्त. एकोणिसाव्या शतकाच्या अखेरच्या अथवा विसाव्या शतकाच्या प्रारंभीच्या काळात लिहिलेल्या रोजनिशा फारशा आढळत नाहीत. म्हणूनच महर्षी शिंदे यांच्या रोजनिशीचे महत्त्व अभूतपूर्व म्हणावे लागेल.

अण्णासाहेब शिंदेही दररोज आयुष्यभर रोजनिशी लिहीत होते अशातला भाग नाही. प्रचंड उद्योगात त्यांचा काळ जात असल्याने एरव्ही रोजनिशी लिहिण्यास त्यांना फुरसत मिळणेही कठीण. इ. स. १८९८ मध्ये ते पुण्याला फर्ग्युसन कॉलेजात शिकत असताना, १९०१-१९०३ मध्ये धर्मशिक्षणासाठी ऑक्सफर्डला गेले असताना व कायदेभंग केल्यामुळे १९३० मध्ये येरवड्याच्या तुरुंगवासात असताना त्यांनी बऱ्याचशा विस्ताराने रोजनिशी लिहीली. ही जी तीन वेगवेगळ्या कालखंडात त्यांनी रोजनिशी लिहिली आहे, ती आजूबाजूच्या वास्तवावर प्रकाश टाकणारी आहे, तशीच त्यांच्या व्यक्तिमत्त्वावर व जीवनकार्यावर प्रकाश टाकणारी आहे. हिचे यथार्थ स्वरूप कळण्यासाठी त्यांच्या जीविताचे, कार्याचे व मनाच्या घडणीचे थोडक्यात का होईना परंतु सामग्र्याने आकलन करणे आवश्यक आहे.

महर्षी शिंदे हे एक संपन्न, त्यागशील आणि प्रसन्न व्यक्तिमत्त्वाचे पुरुष होते. विसाव्या शतकातील पहिल्या पंचवीस-तीस वर्षांत त्यांच्या कर्तुत्वाचा भरघोस अविष्कार झाला. आध्यात्मिक-सामाजिक ध्येयासाठी आयुष्यभर फकिरी पत्करणारी त्यांच्यासारखी विद्याविभूषित व्यक्ती महाराष्ट्रात तरी दुसरी आढळत नाही.

आपली नेहमीची विभागणी पत्करून म्हणायचे झाले तर आध्यात्मिक, सामाजिक, राजकीय तसेच संशोधन क्षेत्रात त्यांनी महत्त्वपूर्ण कार्य केले. १८९८ साली ते बी. ए. झाले. त्याच वर्षी प्रार्थनासमाजाची त्यांनी दीक्षा घेतली. ऐहिक सुख डोळ्यांसमोर दिसत असतानाही आजन्म ब्राह्म धर्मप्रचारक होण्याचा निर्णय त्यांनी घेतला व युनिटेरियन शिष्यवृत्ती घेऊन ऑक्सफर्ड येथील मँचेस्टर कॉलेजात तौलनिक धर्मशास्त्राचे शिक्षण घेण्यासाठी गेले. इंग्लंड व अमेरिकेतील युनिटेरियन अथवा एकेश्वरवादी मंडळींनी ही शिष्यवृत्ती सुरू केली होती. तेथून आल्यानंतर १९०३ पासून १९१० पर्यंत मुंबई प्रार्थनासमाजाचे प्रचारक म्हणून त्यांनी काम केले. या प्रचारकार्यातही त्यांनी कल्पकता आणि संघटनाकौशल्य दाखविले. पत्रद्वारा धर्मप्रचार करण्यासाठी 'पोस्टल मिशन' च्या स्थापनेला प्रेरणा देऊन पुढे ते स्वत: चालविले. धर्मविषयाची गोडी वाढविण्यासाठी 'उदार धर्मग्रंथवर्ग' चालविला. धर्मविधी चालवण्याचे शिक्षण देण्यासाठी त्यांनी 'तरुण ब्राह्मसंघ' काढला. १९०४ ते १९१३ पर्यंत

राष्ट्रसभेच्या अधिवेशनाच्या वेळीच 'भारतीय एकेश्वरी धर्मपरिषद' नियमितपणे भरविण्यात पुढाकार घेतला. सुबोध पत्रिका या प्रार्थनासमाजाच्या मुखपत्रासाठी अनेक लेख लिहिले व भारतातील अनेक ठिकाणी शेकडो व्याख्याने दिली. पुढील काळात मंगलोर येथील ब्राह्मसमाजाचे आचार्यपद सांभाळले. पुणे येथे 'कौटुंबिक उपासना मंडळा'ची स्थापना केली व वाई येथे ब्राह्मसमाज स्थापन करण्यास प्रेरणा दिली. जीवनाच्या अंतापर्यंत ते एकनिष्ठ ब्राह्म होते.

मुंबई येथे प्रार्थनासमाजाचे कार्य करीत असतानाच त्यांनी आपल्या जीवनातील दुसऱ्या एका महत्त्वाच्या कार्याला प्रारंभ केला. अस्पृश्य मानल्या गेलेल्यांची उन्नती करण्यासाठी 'डिस्प्रेस्ड क्लासेस मिशन सोसायटी ऑफ इंडिया' अथवा 'भारतीय निराश्रित साह्यकारी मंडळी' या संस्थेची मुंबई येथे १९०६ मध्ये स्थापना केली. अस्पृश्यांच्या स्थितीचे त्यांनी भारतभर अवलोकन केले होते. १९०६ मध्ये मुंबई येथे 'सोशल रिफॉर्म असोसिएशन' पुढे त्यांनी एक व्याख्यान देऊन त्यात प्रथमच हिंदुस्थानातील बहिष्कृत वर्गाच्या अडचणी, त्यांची प्रांतवार संख्या इत्यादी बाबींची व्यवस्थित मांडणी केली. "ह्या लोकांच्या उद्धारासाठी जिवंत व्यक्तिगत पुढाकार आहे असे मिशन तयार झाले पाहिजे व अशा मिशनने ख्रिस्ती मिशनऱ्यांप्रमाणे ह्या लोकांच्या जीवितामध्ये क्रांती नव्हे, तर विकास घडवून आणला पाहिजे" अशी त्यांची भूमिका होती. मिशनची स्थापना केल्यानंतर मिशनच्या कामाचा व्याप त्यांनी झपाट्याने वाढविला. पहिल्या तीन वर्षांच्या काळातच मुंबई येथे परळ, देवनार, मदनपुरा, कामाठीपुरा येथे शाळा स्थापन केल्या. नवीन पद्धतीचा चामड्याचा कारखाना सुरू केला. 'निराश्रित सेवासदना'ची स्थापना केली, दवाखाना उघडला, व वसतिगृहे चालविली. मुंबईबाहेर मनमाड, इगतपुरी, इंदोर, अकोला, मद्रास, महाबळेश्वर, मंगळूर इ. ठिकाणी मिशनच्या शाखा उघडल्या. १९०८ पर्यंत मिशनच्या बारा शाखा स्थापिल्या. सोळा शाळा चालविल्या, १६१८ विद्यार्थी त्यांमधून शिक्षण घेत होते. चार उद्योगशाळा काढल्या. मिशनसाठी सात आजीव कार्यवाहक मिळविले. १९०९ मध्ये पुण्यास मिशनची पहिली प्रांतिक परिषद यशस्वीपणे घेतली. या कार्यातून महर्षी शिंदे यांची अस्पृश्यतेच्या प्रश्नांची समज जशी प्रगट होते, तसेच त्यांचे संघटनाकौशल्यही दिसून येते. अस्पृश्य वर्गाची उन्नती करणे, त्यांचा आत्मविश्वास जागृत करून स्वोद्धाराची तळमळ निर्माण करणे हा एक भाग, तर अस्पृश्यांच्या मनात अस्पृश्यांबद्दल समानतेची भावना निर्माण करणे हा दुसरा भाग. हे कार्य करताना त्यांनी स्वतःची राजकीय मते आड येणार नाहीत याची दक्षता घेतली. मिशन राजकारणापासून अलिप्त ठेवले, व या कामासाठी सर्वांचे सहकार्य व सहानुभूती मिळविली. श्री. सयाजीराव गायकवाड, तुकोजीराव होळकर, यांसारखे संस्थानिक, सन जॉन क्लार्क, सर म्यूर मॅकॅन्झी, डॉ. मॅन यांसारखे इंग्रज अधिकारी; सर नारायणराव चंदावरकर, प्रिन्सिपल र.पु. परांजपे, महर्षी धोंडो केशव कर्वे, लो. टिळक यांसारखे मवाळ-जहाल पुढारी; श्री. शिवराम जानबा कांबळे, श्री. डांगळे, श्री. नाथा महाराज यांसारखे अस्पृश्य वर्गातील पुढारी या सर्वांचे त्यांनी सहकार्य मिळविले. १९१२ मध्ये मिशनचे ठाणे पुण्यास हलवून कामाचा व्याप आणखी वाढविला. अस्पृश्यता निवारण्याचा प्रश्न राष्ट्रीय सभेसारख्या सभेने हाती घ्यावा असा त्यांनी सातत्याने सातआठ वर्षे प्रयत्न केला. अखेर १९१७ च्या कलकत्त्याच्या अधिवेशनात मिसेस् ॲनी बेझंट यांच्या अध्यक्षतेखाली अस्पृश्यता निवारण्याचा ठराव मंजूर झाला. त्यानंतर ठिकठिकाणच्या प्रांतिक परिषदांमध्येही ठराव झाले. अस्पृश्यता निवारण हा राष्ट्रीय सभेच्या कार्याचा एक भाग झाला. अस्पृश्यता निवारण्याचे

कार्य संस्थात्मक प्रयत्नाच्या द्वारा पहिल्यांदा त्यांनी अखिल भारतीय पातळीवर नेले. यात त्यांची तळमळ तशीच दूरदृष्टी दिसते. १९२३ मध्ये मिशन अस्पृश्य वर्गातील कार्यकर्त्यांच्या हवाली करून ते मिशनच्या कार्यातून बाहेर पडले तरी अस्पृश्यांच्या उन्नतीचा ध्यास त्यांना अखेरपर्यंत होता.

अस्पृश्यतानिवारणाच्या ह्या कामाशिवाय इतर सामाजिक स्वरूपाचे कार्यही त्यांनी केले. मुरळी सोडण्याची चाल बंद व्हावी यासाठी त्यांनी प्रयत्न केले. हे काम करण्यासाठी मुंबईस १९०७ मध्ये एक संस्था स्थापून ते तिचे सेक्रेटरी झाले. १९११ मध्ये त्यांनी मुरळी प्रतिबंधक परिषद भरविली. स्त्रियांच्या शिक्षणाबद्दल त्यांना आस्था होती. १९१९ मध्ये पुणे म्युनिसिपालिटीने केवळ मुलांसाठीच सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाची योजना तयार केली होती. मुलींनाही मुलांप्रमाणेच सक्तीचे प्राथमिक शिक्षण असावे ह्यासाठी अण्णासाहेबांनी लोकमान्य टिळक वगैरेंच्या विरोधात जाऊन चळवळ केली.

महर्षी शिंदे यांनी जे राजकारण केले ते व्यापक राष्ट्रहिताच्या व एकजुटीच्या पायावर अधिष्ठित होते. स्वत: अण्णासाहेब हे एकनिष्ठ ब्राह्म असल्याने जातीयतेच्या पलीकडेच होते. १९१७ च्या सुमारास ब्राह्मणेतरांना एकत्र आणण्याचा प्रयत्न होऊ लागला तेव्हा सर्व राष्ट्राची जागृती होत असताना नव्याने निर्माण होऊ पाहणारा ब्राह्मणेतरवाद राष्ट्रीय ऐक्याला विघातक ठरेल असा इशारा त्यांनी अमरावतीच्या एका सभेत दिला. राष्ट्रीय प्रवाहापासून मराठा समाज बाजूला पडू नये म्हणून राष्ट्रीय मराठा संघ स्थापन करण्यात त्यांनी पुढाकार घेतला. मागासलेल्या वर्गाचा कैवार घेण्याच्या हेतूने १९२० मध्ये पुण्याहून कायदे कौन्सिलची त्यांनी निवडणूक लढविली, परंतु ती मराठ्यांसाठी असलेल्या राखीव जागेवरून नव्हे; तर या तत्त्वाला विरोध म्हणून सर्वसामान्य मतदारसंघातून. (अर्थात अशी तत्त्वनिष्ठ व्यक्ती निवडणुकीत पराभूत झाली असणार हे उघडच आहे). १९२५ नंतर त्यांनी शेतकऱ्यांच्या अनेक परिषदांमध्ये भाग घेऊन शेतकऱ्यांच्या चळवळीला मार्गदर्शन केले व त्यांना एकजुटीचा मंत्र सांगितला. राजकारणात महात्मा गांधींचा उदय झाल्यानंतर उतारवयात कायदेभंगाच्या चळवळीत भाग घेतला. पुणे जिल्ह्यात शेकडो मैलांचा पायी दौरा केला, अनेक सभा घेतल्या, मिठाची विक्री करून कायदेभंग केला व कारावास पत्करला. अण्णासाहेबांच्या जीवनकार्याचा हा स्थूल आराखडा.

अण्णासाहेबांचे व्यक्तिमत्त्व समजून घेण्याच्या दृष्टीने त्यांच्या जीवनातील एक परिवर्तन लक्षात घेऊ. ते मिशनच्या कामाचा व्याप झपाट्याने वाढवीत असतानाच मुंबई प्रार्थनासमाजाचे प्रचारकपद त्यांना १९१० मध्ये सोडावे लागले. असे का घडले ? प्रार्थनासमाज सामान्यत: सामाजिक सुधारणेला अनुकूल असला तरी त्याचे कार्य मुख्यत: धर्मविचारापुरते मर्यादित होते. पारंपरिक धर्मविधीच्या ऐवजी प्रार्थनासमाजाच्या पद्धतीनुसार धर्मविधी करणे, पुनर्विवाहासारख्या अथवा स्त्रीशिक्षणासारख्या मवाळ पांढरपेशा सुधारणा करणे यांत प्रार्थनासमाजाच्या धुरीणांना समाधान होते. अण्णासाहेबांसारख्या प्रार्थनासमाजाच्या प्रचारकाने अस्पृश्यता निवारण्याच्या कार्याला धडाडीने प्रारंभ करून त्यात बराचसा वेळ घालवावा व या कामाचा व्याप वाढवावा, त्यामध्ये स्वत:ला गुंतवून घ्यावे हे मुंबई प्रार्थनासमाजाला फारसे रुचण्यासारखे नव्हते. येथेच प्रार्थनासमाजाचे धुरीण व महर्षी शिंदे यांच्या दृष्टिकोनातील तफावत जाणवते. समाजाची अपेक्षा अशी होती, की आपल्या प्रचारकाने

धर्मप्रसाराच्या कामालाच बहुतेक वेळ द्यावा. तर अण्णासाहेबांच्या दृष्टीने अस्पृश्यतानिवारणाचे कार्य हे धर्मकार्यच होते. आपण धर्मकार्य करीत आहोत या श्रद्धेने व निष्ठेने त्यांनी अस्पृश्य मानलेल्यांच्या कामाला प्रारंभ केला होता. 'अण्णासाहेबांनी चालविलेले अस्पृश्योद्धाराचे कार्य त्यांच्या अंत:करणातील धार्मिक वृत्तीतूनच निर्माण झाले होते. धर्मभावना हा मूळ पाया आणि अस्पृश्योद्धाराचे कार्य ही त्यावर उभारलेली इमारत होय', असे यथार्थ आकलन डॉ. वि. भि. कोलते दाखवितात.[१] केवळ अस्पृश्यतानिवारणाचेच नव्हे, तर अन्य सर्व सुधारणांची कामे त्यांनी धर्मबुद्धीनेच केल्याचे दिसते. त्यांच्या मनाचा पिंडच आध्यात्मिक होता. त्यांच्या लौकिक आणि आध्यात्मिक जीवनाचा एकमेळ कसा झाला हे समजण्यासाठी त्यांची धर्मकल्पना स्पष्ट करून घेऊ व त्यांच्या मनाची घडण कशी झाली हे पाहू.

फर्ग्युसनमधील रोजनिशीतील दोन नोंदी वरील संदर्भात महत्त्वाच्या आहेत. या काळात त्यांच्या मनाने प्रार्थना समाजाची दीक्षा घेण्याचा निश्चय केला होता (प्रस्तुत रोजनिशी, पृ.३९) आणि याच काळात आपण महारमांग ह्या अति नीच मानल्या गेलेल्या लोकांसाठी काही एक करावयास पाहिजे अशी तळमळही त्यांना लागून राहिली होती. (पृ.२८). या दोन्ही गोष्टी त्यांच्या आध्यात्मिक वृत्तीचा आविष्कार करणाऱ्या आहेत. धर्मकार्य आणि अस्पृश्य वर्गाची सुधारणा करण्याचे कार्य या दोन बाबी त्यांच्या दृष्टीने वेगळ्या नव्हत्याच. एवढेच नव्हे तर लौकिक व्यवहार करण्याच्या पाठीमागे जर उन्नत भावना असेल तर अशी भावना आणि धर्मभावना यांतही ते फरक करीत नव्हते. आपली ही धर्मकल्पना त्यांनी येरवड्याच्या तुरुंगातील रोजनिशीत विशद केली आहे व तिचाच पुनरुच्चार आपल्या 'आठवणी व अनुभव' ह्या पुस्तकात केला आहे. ते लिहितात, "लहानपणी मुलांची खेळाची आवड, तरुणपणी तरुणीसंबंधी उदात्त रस आणि म्हातारपणी एखाद्या ऐहिक बाबतीतील सात्त्विक चिंतामग्नता ह्या तिन्ही भावनांहून भक्तीची भावना तत्त्वत: अगदी भिन्नच आहे असे म्हणता येणार नाही. ह्या भावनांत जी वयपरत्वे अंत:करणाची परिणती होत जाते तीच किंचित आणखी थोडी जास्त शुद्ध, जास्त व्यापक आणि जास्त जोरदार झाली, की तिला आम्ही भक्ती हे नाव देतो. ज्या सहज आनंदाने मूल खेळते, तरुण रमतो आणि वृद्ध सात्त्विक चिंतेने व्याकुळ होतो तोच आनंद ईश्वराच्या उत्तमोत्तम भक्तीत आहे, हे माझे मत कित्येकांना विपरीत वाटेल. ऐहिक रस आणि पारमार्थिक रस यांना मी एकाच माळेत गोवतो."[२] रसिकता, भक्ती आणि प्रेम ह्या गोष्टी त्यांच्या दृष्टीने एकरूप आहेत. ते म्हणतात- "माझ्या जीवनात सहज रसिकता ऊर्फ प्रेम ऊर्फ भक्ती ऊर्फ Love-कोणी काही म्हणोत, कोणी निंदोत, कोणी वानोत- प्रत्यक्ष ईश्वरही कृपा करो न करो- माझे प्रेमच मला खरे आणि म्हणूनच मला ते पुरे." (रोजनिशी, पृ. १८५). त्यांच्या धर्मकल्पनेत निवृत्ती नसून प्रवृत्ती आहे व ते श्रद्धेच्या जोडीनेच निर्लोभ प्रेमाचा समावेश धर्मकल्पनेत करतात. प्रेमाचे स्वरूप सांगताना ते म्हणतात, 'प्रेम म्हणजे उत्साह, उदासीनता नव्हे; प्रेम म्हणे जीवन,

१. वि. भि. कोलते, 'प्रस्तावना', विठ्ठल रामजी शिंदे, 'माझ्या आठवणी व अनुभव', पुनर्मुद्रण, पुणे, श्री लेखन वाचन भांडार, १९५८, पृ.४.

२. वि. रा. शिंदे, 'माझ्या आठवणी व अनुभव', उनि., पृ.७७.

जीवनाचा कंटाळा नव्हे '. समाजसेवेलाही या प्रेमाचेच अधिष्ठान असल्याचे ते सांगतात.[१] त्यांच्या दृष्टीने प्रपंचातील प्रत्येक व्यवहार जागृतपणे आणि प्रेमाने करणे म्हणजे धर्मसाधन होय. द्वा. गो. वैद्यांच्या लेखसंग्रहाला संपादकांनी दिलेल्या 'संसार आणि धर्मसाधन' या नावाला आक्षेप घेताना ते म्हणतात, "धर्मसाधन म्हणजे काय? पोथी वाचणे, प्रार्थना करणे, स्तब्ध बसणे, तप करणे म्हणजेच धर्मसाधन काय? मुळीच नव्हे. ब्राह्मसमाज म्हणतो प्रपंचातील प्रत्येक व्यवहार जागृतपणे आणि प्रेमाने करणे म्हणजे धर्मसाधन होय. एखादा प्रामाणिक सुतार, हुशार न्हावी, विशेषत: प्रेमळ भंगीदेखील पोटभरू पुरोहितापेक्षा शतपटीने धार्मिकच म्हणता येणार नाही काय ? असे जर आहे-तर संसार म्हणजेच धर्मसाधन ठरते."[२]

राजा राममोहन राय यांच्याबद्दल म. शिंदे यांच्या मनात अतीव आदर होता. त्यांच्या धर्मनिष्ठेचे स्वरूप सांगताना ते म्हणतात, "त्याचा धर्म म्हणजे केवळ एक मत किंवा मनोवृत्ती नसे तर साक्षात् जीवन होता, व ते जीवनही सर्व बाजूचे असे. राजकारण आणि आर्थिक अभ्युदय, धर्मसुधारणा आणि समाजसुधारणा ह्या सर्वांसाठी त्याचे जिणे, त्याचा प्रयत्न व त्याचे मरण ही घडली."[३] म. शिंदे यांची धर्मकल्पना अशीच सर्व बाजूची, सारे जीवन व्यापून टाकणारी होती. जीवनाची सारी अंगे उंचावू पाहणारी त्यांची जीवनदृष्टी व जीवनकार्य ही धर्मरूपच होती.

त्यांची ही धर्मभावना लक्षात घेतल्यावर त्यांच्या जीवितकार्याचे आकलन अधिक सुलभ होते. लहानपणीच भागवतधर्माचे उदार संस्कार त्यांच्या मनावर झालेले होते. म्हणून मूर्तिपूजा हा ईश्वरोपासनेचा खरा प्रकार नव्हे असे सांगणारा, अवतारवाद आणि ग्रंथप्रामाण्य मान्य नसणारा व सर्व मनुष्ये एका परमेश्वराची लेकरे आहेत म्हणून भेद न राखता परस्परांशी बंधुभावाने वागावे असे सांगणारा एकेश्वरवादी उदार ब्राह्मधर्म त्यांच्या मनाला भावला व ते त्याकडे आपोआप ओढले गेले. त्यांनी आयुष्यभर ह्या उदारधर्माच्या प्रचाराचे कार्य केले. मानवनिर्मित भेदभावाला व उच्चनीचतेला त्यांच्या मनात जागा नव्हती. म्हणून अस्पृश्यता नष्ट करण्याच्या व अस्पृश्य मानलेल्यांची सर्वांगीण उन्नती करण्याच्या कामी स्वत:चे आयुष्य वाहून घेतले. "अस्पृश्यतानिवारण हा तर माझ्या धर्मकार्यांचा भाग" असेही त्यांनी स्पष्ट नमूद केले आहे.[४] आध्यात्मिक तसेच सामाजिक बाबतीत स्त्रियांचा दर्जा उंचावण्याची त्यांची जी तळमळ होती तिचे मूळही त्यांच्या ह्या आध्यात्मिक बैठकीतच आहे. म्हणूनच ते स्त्रीसदस्यांसह कौटुंबिक उपासना मंडळाचे सदस्यत्व देण्याचा आग्रह धरतात, व मुलांच्या जोडीनेच मुलींनाही सक्तीचे शिक्षण मिळावे यासाठी चळवळ करतात. मुरळीची चाल बंद व्हावी यासाठी प्रयत्न करतात. त्यांच्या शेतकऱ्यांसंबंधीच्या तळमळीचे अधिष्ठानही आध्यात्मिक आहे. तेरदाळ येथील संस्थानी शेतकरी परिषद, बोरगांव येथील वाळवे तालुका परिषद व वडनेर येथील चांदवड तालुका शेतकरी परिषद व पुणे येथील मुंबई इलाखा शेतकरी परिषद ह्या परिषदांमधून

---

१. वि. रा. शिंदे, 'लेख, व्याख्याने व उपदेश, (संपा.) बी.बी. केसकर, मुंबई, दामोदर सावळाराम आणि मंडळी, १९१२, पृ.१४२.

२. वि. रा. शिंदे, 'प्रस्तावना', द्वा. गो. वैद्य, संसार व धर्मसाधन, संपा. व प्रका. बी.बी. केसकर, मुंबई, १९३५, पृ. १२-१३.

३. वि. रा. शिंदे, 'लेख, व्याख्याने व उपदेश, उनि., पृ. १५७.

४. वि. रा. शिंदे, 'माझ्या आठवणी व अनुभव, उनि., पृ. २६४.

त्यांनी शेतकऱ्यांच्या प्रश्नांचा विचार केला, तत्कालीन स्थितीचे विश्लेषण करून ती स्थिती सुधारण्याचा उपाय म्हणून खंबीर एकजूट करण्याचा मंत्र सांगितला. शेतकऱ्यांची स्थिती सुधारण्याची पोटतिडीक त्यांना होती म्हणूनच ते त्यांच्या प्रश्नांचे मूलगामी विश्लेषण करून बिनतोड उपाय कळकळीने सुचवितात. ब्राह्मसमाजाच्या शतसांवत्सरिक उत्सवानिमित्त बंगालच्या फिरतीवर जाण्याचे लांबणीवर टाकून पुण्याच्या मुंबई इलाखा शेतकरी परिषदेला ते हजर राहिले. 'हे काम धार्मिकच समजून मी पत्करले आहे' असे त्यांनी सांगितले.[१]

त्यांच्या राजकारणालाही आध्यात्मिक अधिष्ठान आहे. १९२० मध्ये पुण्यातील मराठा समाजाने त्यांना निवडणुकीला उभे राहण्याचा आग्रह केला. मराठ्यांच्यासाठी सात राखीव जागा होत्या. परंतु जातिवाचक तत्त्वाच्या आपण विरुद्ध असल्याने त्या राखीव जागेवरून निवडणूक लढविणार नाही असे त्यांनी सांगितले व सर्वसाधारण जागेवर उभे राहण्यास पाठिंबा मिळाल्यामुळे बहुजनपक्ष या नावाने जाहीरनामा काढून त्यांनी निवडणूक लढविली. त्यांचा हा जाहीरनामा त्यांच्या वृत्तीचा निदर्शक आहे. ' विद्याबल, द्रव्यबल अथवा अधिकारबल नसल्याने नाइलाजाने मागासलेला वर्ग अथवा बहुजनसमाज जो आहे ' त्याचा कैवार घेण्याची भूमिका त्यांनी मांडली. ह्या बहुजन समाजात ते शेतकरी, शिपाई, शिक्षक, उदमी, दुकानदार, मजूर, अस्पृश्य व स्त्री अशा आठ वर्गांचा समावेश करतात, ही गोष्ट लक्षणीय आहे.[२]

भारतीय राजकारणात महात्मा गांधींचा उदय झाल्यानंतर महर्षी शिंद्यांना जणू त्यांच्यामध्ये समानधर्मा आढळला. महात्माजींच्या जवळ समग्र जीवनाचा विचार होता व त्याला आध्यात्मिक बैठक होती. महात्माजींच्या व्यक्तिमत्त्वाने ते प्रभावित झालेले दिसतात. म. गांधींच्या इतका आदरभाव अन्य कोणत्याही समकालीन राजकारणी पुरुषांबद्दल त्यांना वाटत असल्याचे दिसत नाही. १९३० च्या कायदेभंगाच्या चळवळीत भाग घेऊन त्यांनी कारावास पत्करला. महात्मा गांधीच्या ह्या चळवळीचा उल्लेख ते अगदी सहजपणे 'धर्मयुद्ध' असा करतात ही गोष्टही त्यांच्या आध्यात्मिक वृत्तीची साक्ष देणारी आहे.

महर्षी शिंदे यांच्या साऱ्याच जीवनकार्यामध्ये एक अंत:सूत्र दिसते. त्यांचे समाजकारण असो की राजकारण असो, त्यांची सारी धडपड जुटीसाठी, एकात्मतेसाठी होती. फुटीचे सोपे, तात्कालिक यश देणारे पण अंतिमत: हानिकारक असणारे समाजकारण, राजकारण त्यांनी केले नाही, की सहजी लोकप्रियता देणारा फुटीचा एकदेशी विचार कधी मांडला नाही. दोन संस्कृती असोत की दोन जाती असोत, दोन प्रांत असोत की दोन पंथ असोत अथवा दोन भाषा असोत- त्यांतील भेदापेक्षा त्यांच्यातील एकात्मता, लागेबांधे त्यांच्या दृष्टीला दिसतात. हे अंत:सूत्रही त्यांच्या आध्यात्मिक बैठकीतून निघते. तथाकथित अस्पृश्य आणि स्पृश्य असे दोन्ही वर्ग एकमेकात अगदी मिसळून जावेत ह्या प्रेरणेने तर त्यांनी आयुष्यभर कार्य केले. अस्पृश्यांच्या राखीव मतदारसंघाला त्यांनी या भूमिकेतून विरोध केला. अस्पृश्यांना राखीव मतदारसंघ देणे म्हणजे त्यांची अस्पृश्यता कायम करणे होय अशी त्यांना भीती वाटत होती. मराठ्यांनी राष्ट्रीय प्रवाहापासून अलग राहू नये असा त्यांनी

१. वि. रा. शिंदे, 'शिंदे लेखसंग्रह', संपा. मा. प. मंगुडकर, पुणे, श्री लेखन वाचन भांडार, १९६३, पृ. २५६.
२. वि. रा. शिंदे, 'माझ्या आठवणी व अनुभव, उनि., पृ. ३०६-८.

प्रयत्न केला. ब्राह्मणेतर पक्षाला जसा त्यांचा विरोध होता तसाच मराठा-मराठेतर असा नवा भेद करणारानांही होता. स्त्रिया ह्या पुरुषांच्या जोडीने यायला पाहिजेत अशी त्यांची तळमळ होती. विद्यार्थी-विद्यार्थिनी यांचे खऱ्या अर्थाने सहशिक्षण घडून यावे, गुरू-गुरूपत्नींनी त्यांना आपल्या प्रेमपंखाखाली घेऊन शाळा हे घरच वाटेल असा कुलभाव त्यांच्या ठिकाणी निर्माण करावा ही त्यांची आत्मीय शिक्षणाची कल्पना होती. राजकीय, सामाजिक, शैक्षणिक बाबतीत त्यांचे हे असे एकत्वाचे अंत:सूत्र होते. याच वैशिष्ट्याचा आढळ त्यांच्या संशोधनपर लेखनातही दिसून येतो.

अण्णासाहेबांचे बालपण आता कर्नाटक राज्यात असलेल्या जमखंडी या गावी कानडी व मराठी संस्कृतीच्या संमिश्र वातावरणात गेले. या दोन्ही संस्कृतींचे संस्कार त्यांच्या मनावर झाले. अर्धा युरोप त्यांनी डोळसपणे पाहिला. अनेकवार भारताच्या सगळ्या प्रांतांत हिंडून चिकित्सकपणे निरीक्षण केले. इतिहास, तौलनिक भाषाशास्त्र, मानववंशशास्त्र, तौलनिक धर्मशास्त्र यांच्या व्यासंगाची जोड त्यांच्या विवेकबुद्धीला मिळाली. त्यांचे निरीक्षण सूक्ष्म आणि दृष्टी वस्तुनिष्ठ. एका संस्कृतीपेक्षा दुसरी संस्कृती श्रेष्ठ, एका वंशापेक्षा दुसरा वंश श्रेष्ठ अशा प्रकारच्या पूर्वग्रहाचा पूर्ण अभाव. उलट वृत्ती विश्वकुटुंबी. यामुळे 'भारतीय अस्पृश्यतेचा प्रश्न', 'भागवतधर्माचा विकास', 'मराठ्यांची पूर्वपीठिका' यांसारख्या त्यांच्या संशोधनपर लेखनाला एक वेगळीच मौलिकता लाभली आहे. भारतीय संस्कृती म्हणजे आर्यसंस्कृती, येथील आर्यपूर्व संस्कृती ही मागासलेली अविकसित संस्कृती होती तर आर्यसंस्कृती ही श्रेष्ठ संस्कृती होती हे गृहीत धरूनच त्यांच्याआधी सामान्यत: विचार केला जात होता. अण्णासाहेब शिंदे हे भारतातील मूळ रहिवाशांची संस्कृती, आर्यपूर्व अथवा द्रविड संस्कृती आणि आर्यांची संस्कृती यांच्या मिलाफातून भारतीय संस्कृती निर्माण झाली असे प्रतिपादतात. अस्पृश्य हे देखील मूळचे राजवैभव भोगलेले राजे असावेत, मराठे हे मध्य आशियातून आलेल्या शक, पल्लव वंशाचे असावेत अशी मीमांसा ते भाषाशास्त्र, समाजशास्त्र इत्यादींच्या आधारे करतात. संशोधनाच्या क्षेत्रात अंतिम असा सिद्धांत नसतो ही भूमिका घेऊन जरी ते हे विचार मांडत असले तरी त्यांची ही मीमांसा मौलिक स्वरूपाची आहे. त्यांनी संशोधन करून काही नवे पुरावे पूढे आणले एवढेच महत्त्वाचे नाही. तर पुराव्याचा अर्थ लावण्यात, मीमांसा करण्यात त्यांनी वेगळेपणा दाखविला आहे. त्यांचा अनेक शास्त्रांचा व्यासंग या मीमांसेला सहाय्यक आहे ही गोष्ट जशी खरी, तसेच वर उल्लेखलेली एकात्मता पाहणारी त्यांच्या मनाची बैठकही कारणीभूत आहे.

भेदाला थारा न देणारी, एकात्मतेची ओढ व प्रेमाचे अधिष्ठान असलेली त्यांच्या मनाची जी आध्यात्मिक घडण तयार झाली ती त्यांच्या बालपणीच. त्यांचे निसर्गाचे प्रेम, सौंदर्याची आवड व चांगल्या दर्जाची रसिकता यांचाही समावेश त्यांच्या आध्यात्मिकतेतच करावा लागतो. त्यांचा आध्यात्मिक मन:पिंड लहानपणीच घडला होता. त्यांच्या तरुणपणी व कर्तृत्वकालात त्याचा फक्त आविष्कार होत राहिला, असे म्हणणे रास्त ठरेल.

कानडी आणि मराठी अशा दोन्ही संस्कृतीची वैशिष्ट्ये जमखंडीच्या वातावरणातच नव्हे तर त्यांच्या घरातही त्यांना पाहावयास मिळत होती. अण्णासाहेब वर्णन करतात, की त्यांच्या आजोबात मराठ्यांची तर आजीत कर्नाटक्यांची लक्षणे भरपूर होती. आजोबा नागरिक, दरबारी व गुलहौशी तर आजी खेडवळ, राकट व कुणबाऊ, यल्लम्मा या द्रविड देवतेला मानणारी. त्यांचे वडील लिहायला, हिशोब ठेवायला शिकलेले. संस्थानात त्यांनी शिक्षकाची नोकरी केली. प्राकृत पोथ्यांचा व्यासंग चांगला.

वळण ब्राह्मणी राहाटीचे. सर्व जातीतील संभावित माणसांचा स्नेह असायचा. त्यांची वृत्ती धार्मिक होती. पंढरपूरच्या वारकरी संप्रदायाकडे ते आकृष्ट झाले, व वाऱ्या करू लागले. आपल्या वडिलांच्या भागवतधर्मातून आपली भावी सामाजिक सुधारणा उदय पावली असे स्वत: अण्णासाहेब विश्लेषण करतात.

विष्णुमय जग वैष्णवांचा धर्म। भेदाभेदभ्रम अमंगळ।
कोणाही जीवाचा न घडो मत्सर। वर्म सर्वेश्वरपूजनाचे।।

या अभंगाचा ठसा आपल्या बाबांनी व आईने शुद्ध व प्रेमळ आचरणाने आपल्या ग्रहणशील मनावर उठविल्याचे अण्णासाहेब सांगतात. या संस्कारात ब्राह्मसमाजाने काही भर घातली असे त्यांना वाटत नाही. आपण ब्राह्मसमाजात गेल्याने सुधारक झालो असे नाही, तर सुधारक होतो म्हणून ब्राह्मसमाजात गेलो असे ते सांगतात. त्यांच्या घरी पडदा नव्हता की जातिभेद पाळला जात नव्हता. जातिभेदाचा संस्कारच मनावर झाला नसल्याने आधुनिक सुधारकाप्रमाणे जातिभेद मोडण्याचा खटाटोप करण्याचा प्रश्नच उद्‌भवला नाही. मराठ्यांच्या घरी सामान्यत: न जेवणारी ब्राह्मणलिंगायत मंडळी त्यांच्या विश्वकुटुंबी घरी जेवत. न्हावी, धोबी, मुसलमान यांच्याशी कधी त्यांच्या घरात पंक्तिभेद केला जात नसे. घरात साहजिकपणेच सामाजिक सुधारणेची तत्त्वे पाळली जात. त्याचे रहस्य समता आणि स्वतंत्रता, उदारता आणि स्वाभिमान यांच्या समतोलात होते. पोकळ डौल सोडून अंत:करणपूर्वक प्रेमाने जे वागत त्यांच्याशीच हा समतेच्या पातळीवरून प्रेमपूर्वक व्यवहार व्हायचा.[१]

अण्णासाहेबांच्या मनाच्या विकासात त्यांच्या आईलाही महत्त्वाचे स्थान आहे. आजारपण, दारिद्र्याच्या वेदना सहन करूनही तिच्या मनाची शांती, रसिकता, आनंदी वृत्ती कमी झाली नाही. अण्णासाहेबांच्या धार्मिकसामाजिक विचारात आणि कार्यात स्त्रियांना महत्त्वाचे स्थान मिळालेलेल दिसते. स्त्रियांबद्दलच्या दाक्षिण्यभावाचा उगम त्यांच्या मातृप्रेमात असावा. निसर्गाच्याही आधी आपण पहिले हृदयदान दिले ते आईलाच, असे ते म्हणतात.[२]

जमखंडी गाव तीन डोंगरांच्या कुशीत वसलेला. अण्णासाहेबांचे वडील पावसाळ्याच्या अखेरच्या दिवसांत घरातील सर्वांना घेऊन एखाद्या रम्य डोंगरावर वनभोजनाला जात. अण्णासाहेबांच्या ठिकाणी जे निसर्गप्रेम निर्माण झाले त्याचे मूळ त्यांच्या वडिलांच्या ह्या आवडीत होते.

त्यांच्या हायस्कूलच्या काळात इंग्रजी आणि संस्कृत साहित्याचा त्यांना परिचय झाला. मराठीवर अकृत्रिम प्रेम जडण्यात शाळेपेक्षा घरीच साधने अधिक होती. श्रीधर, महिपती, तुकाराम, ज्ञानेश्वर, यांच्या ग्रंथांची पारायणे वडील करीत असत. इंग्रजी चौथी पाचवीत गेल्यावर ते रामविजय-हरिविजय या पोथ्यांचा अर्थ आपल्या मित्रांना सांगत. अभ्यासाच्या सर्वच विषयात त्याची चांगली गती होती. याचे श्रेय ते आपल्या बुद्धीपेक्षा रसिकतेलाच देतात. आणि ही रसिकता त्यांनी शाळेपेक्षा घरातच अधिक, गुरूपेक्षा आईवडिलांकडून मिळविली, असे सांगतात.[३]

---

१. वि. रा. शिंदे, 'माझ्या आठवणी व अनुभव', उनि., पृ. ८१-८५.

२. कित्ता, पृ. ६४.

३. कित्ता, पृ. ४५-४६.

अण्णासाहेबांच्या ज्या व्यक्तिमत्त्वाचा आविष्कार त्यांच्या पुढील आयुष्यात त्यांच्या कार्यातून आणि विचारातून झालेला आढळतो त्याची घडण अशाप्रकारे त्यांच्या बालपणीच झाली. घरातील ह्या वातावरणाचा परिणाम त्यांच्या ग्रहणशील मनावर होऊन त्यांची बैठक अध्यात्मप्रवण बनली. मनाला उदारपणा, व्यापकपणा आला. संमिश्र संस्कृतीत वाढल्याने भेद जाणवण्याऐवजी ऐक्यभावनाच जोपासली गेली. मन भावनाप्रवण बनले. वृत्ती सौंदर्योन्मुख झाली.

वर उल्लेखिलेल्या अनेकविध वैशिष्ट्यांचा एकमेळ होऊन अण्णासाहेबांच्या मनाची आध्यात्मिक घडण घडली होती हे लक्षात घेतले नाही तर त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे आकलन यथार्थपणे होऊ शकत नाही. एरव्ही अण्णासाहेबांच्या कार्याचे महत्त्व नीट ओळखणाऱ्या श्री. धनंजयराव गाडगिळांचीही या बाबतीत फसगत झाल्यासारखी दिसते. ते म्हणतात. "आपल्या आयुष्यात कोणत्याच प्रचलित विचार अगर कार्यप्रवाहात कर्मवीर शिंदे पूर्णपणे समरस झालेले दिसत नाहीत."[१] म. शिंद्यांच्या जीवनकार्यावर नुसती नजर टाकली तर काय दिसते ? १९०३ मध्ये त्यांनी ब्राह्मधर्मप्रचारक म्हणून जीवितकार्याला प्रारंभ केला. १९०६ मध्ये भारतीय निराश्रित साह्यकारी मंडळीची (डिप्रेस्ड क्लासेस मिशन सोसायटी ऑफ इंडियाची) स्थापना केली. १९१० मध्ये मुंबई प्रार्थनासमाजाशी प्रचारक या नात्यानं असलेला संबंध सोडला. १९१२ मध्ये मिशनचे ठाणे मुंबईहून पुण्यास हालविले, व मिशनच्या कामाचा झपाट्याने भारतभर प्रसार केला. १९२० मध्ये बहुजनपक्ष स्थापन करून मुंबई कायदेकौन्सिच्या निवडणुकीत भाग घेतला. १९२३ मध्ये मिशनचा प्रमुख चालक म्हणून असलेला संबंध सोडला व संस्था अस्पृश्य वर्गातील कार्यकर्त्यांच्या स्वाधीन केली. पुढील दोन वर्षे मंगलोरला ब्राह्म समाजाचे आचार्यपद सांभाळले. १९२६ मध्ये पुण्यास कौटुंबिक उपासना मंडळाची स्थापना केली. महात्मा गांधींनी प्रवर्तित केलेल्या कायदेभंगाच्या चळवळीत १९३० मध्ये भाग घेऊन खेडोपाडी दौरे काढले, शेतकऱ्यात जागृती करण्याचा प्रयत्न केला, व प्रत्यक्ष कायदेभंग करून कारावास पत्करला. त्यानंतरच्या काळात 'भारतीय अस्पृश्यतेचा प्रश्न' हा ह्या विषयावरील पहिलाच असा संशोधनपर प्रबंध तयार केला. अण्णासाहेबांच्या जीवनातील या मुख्य घटनांकडे व वळणांकडे वरवरच्या दृष्टीने पाहिले तर अशी फसगत झाल्यावाचून राहात नाही.

खरी गोष्ट अशी आहे, की महर्षी शिंदे यांचा मनःपिंड आणि त्यांनी केलेले कार्य यांमध्ये कमालीचा सुसंवाद आहे. त्यांच्या मनाची घडण हीच मुळी अध्यात्मनिष्ठ असल्याने त्यांच्या मनात अध्यात्म, समाजकारण, राजकारण असे वेगवेगळे कप्पे नव्हतेच. त्यांचे सामाजिक, राजकीय स्वरूपाचे वाटणारे कार्य हा सुद्धा त्यांच्या आध्यात्मिक प्रवृत्तीचाच आविष्कार आहे. त्यांचे चिंतन, व्यासंग आणि विविध क्षेत्रांतील भासणारे कार्य ह्या तिन्ही गोष्टी एकत्रितपणेच आयुष्यभर चाललेल्या होत्या. त्यांच्या जिव्हाळ्याचे, चिंतनाचे विषय त्यांच्या आयुष्यात कधी मनावेगळे झाले नाहीत. १८९८ मध्ये पुण्याला विद्यार्थी असताना त्यांना प्रार्थनासमाजासारख्या उदारधर्माची जशी ओढ लागली होती तशीच आपण म्हार, मांग या दलित लोकांसाठी काहीएक करावे ही तळमळ लागून राहिली होती; धर्मप्रवृत्ती प्रबळ होऊन केवळ धर्माला वाहिलेले वृत्तपत्र काढावे असे त्यांना वाटत होते, तसेच त्यांच्या अंतःकरणातील हळुवार प्रेमवृत्ती आणि रसिकताही प्रकट होत होती आणि त्याचवेळी

१. धनंजय गाडगीळ, 'पुरस्कार', वि. रा. शिंदे, शिंदे लेखसंग्रह, उनि., पृ. ७.

सामाजिक जीवनातील आणि शैक्षणिक क्षेत्रातील तोकडेपणा आणि विसंवाद त्यांना खुपत होता. इंग्लंडला धर्मशिक्षण घेताना ते व्यासंगपूर्ण निबंध लिहीत होते तसेच शेतावर जाऊन जिव्हाळ्याने शेतमजुरांच्या आर्थिक स्थितीबद्दल माहिती घेत होते, दीनदुबळ्यांची सेवा करणाऱ्या संस्थांचे निरीक्षण करीत होते, तर कधी इंग्लंडमधल्या सरोवर प्रांतीच्या अलौकिक निसर्गसौंदर्याने देहभान हरपून श्रेष्ठ दर्जाचा आध्यात्मिक अनुभव घेत होते. भारतात परतल्यावर ब्राह्मधर्माचा प्रचार करीत होते आणि अस्पृश्यांची स्थिती सुधारण्यासाठी मिशनरीवृत्तीने समरसून काम करीत होते, व त्यांच्या स्थितीबाबत अभ्यासपूर्ण निबंध लिहीत होते. पुण्यात मिशनचे काम करीत असतानाच निवडणुकीला उभे राहिले होते, आणि मिशनमधून बाहेर पडल्यावरही अस्पृश्यांच्या हिताच्या ध्यासाने महात्मा गांधीशी भांडण विकत घेत होते. राजकीय हेतूने कायदेभंग करून ते तुरुंगात गेले, पण तेथेही ते कॅथॉलिक उपासनांना हजर राहात होते, तौलनिक भाषाशास्त्रावर व्याख्यान देत होते आणि खिडकीतल्या साळुंकीच्या जोडप्याशी काव्यमय हितगुज करीत होते. म्हणूनच त्यांच्या एकसंघ अशा आध्यात्मिक मनःपिंडाचा आविष्कार त्यांच्या विविध भासणाऱ्या कार्यातून आयुष्यभर होत होता असे म्हणणे अधिक युक्त वाटते. अण्णासाहेबांच्या व्यक्तिमत्त्वाचे हे आकलन केले तर त्यांच्या रोजनिशीचे स्वरूप आपल्याला अधिक यथार्थपणे समजू शकेल.

अण्णासाहेब शिंदे यांनी आयुष्याच्या तीन वेगवेगळ्या कालखंडात लिहिलेली रोजनिशी येथे एकत्रित केलेली आहे. बाह्य परिस्थितीचा परिणाम होऊन त्यांच्या मनात विचारभावनांची जी आंदोलने निर्माण होत त्यांचे प्रकटीकरण त्यांनी आपल्या रोजनिशीत केलेले आहे. ह्या तीनही कालखंडात म. शिंदे ह्याची मनःस्थिती वैशिष्ट्यपूर्ण असल्याने व बाह्य परिस्थितीही बदलणारी असल्याने प्रत्येक कालखंडातील रोजनिशीला काही एक वेगळेपण प्राप्त झाले आहे. असे असले तरी अण्णासाहेबांच्या अखंड व्यक्तिमत्त्वाचा आविष्कार तीमधून झाल्याने काही समान वैशिष्ट्यांचा आढळ ह्या तीनही कालखंडातील रोजनिशीत पहावयास मिळतो. पुनरुक्तीचा दोष पत्करून म्हणावे लागते, की तीमधून त्यांच्या आध्यात्मिक मनःपिंडाचा, विचारांना असलेल्या व्यापक, मानवतावादी बैठकीचा व सर्वांगीण सुधारणेच्या तळमळीचा प्रत्यय आपणांस येतो. त्यांचे मन व्यापक अर्थाने सौंदर्यसक्त आहे. निसर्गाकडे ते स्वाभाविकपणे आकृष्ट होते. मनुष्यस्वभावात जिथे जिथे त्यांना उच्च नैतिक दर्जा आढळतो तेथेही ते नैतिक सौंदर्याकडे आकृष्ट होतात. त्यांच्या ठायी स्वाभाविक रसिकता आणि तरल संवेदनशीलता आहे. मात्र बाह्य भपक्याला भुलणारा त्यांचा स्वभाव नाही. त्यांची दृष्टी सदैव गाभ्यावर असते. म्हणून ते स्वाभाविकपणे बाह्य कवच भेदून अंतरंगाचे सौंदर्य, चांगुलपणा, नैतिकता पाहतात. व्यक्ती असो, वस्तू असो की परिस्थिती असो तिचे आकलन ते अंतर्भेदी दृष्टीने करतात. मात्र त्यांचे अंतःकरण भावनामय असल्याने त्यांच्या प्रतिक्रियांना कुठे कोरडेपणा येत नाही.

१८९८ साली फर्ग्युसन कॉलेजात बी. ए. च्या वर्गात शिकत असताना अण्णासाहेबांनी पहिली रोजनिशी लिहिली. रोजनिशी लिहिण्याची प्रेरणा त्यांना कशी झाली असावी ह्यासंबंधी आपण काहीएक तर्क करू शकतो. ह्या प्रेरणेचा व ह्या कालखंडातील रोजनिशीला प्राप्त झालेल्या स्वरूपाचा काहीएक संबंधही प्रस्थापित करून दाखविता येईल. फर्ग्युसन कॉलेजात इंटरमीजिएटचे वर्गात असताना आपली मानसिक स्थिती कशी होती याचे वर्णन अण्णासाहेबांनी आपल्या माझ्या 'आठवणी व अनुभव' ह्या आत्मचरित्रपर पुस्तकात केले आहे. कॉलेजच्या ठरीव अभ्यासावरून

त्यांचे मन उडाले होते. एकंदरीतच विश्वविद्यालयीन शिक्षणपद्धती चैतन्यशून्य वाटून तीसंबंधी विरक्ती आणि विमनस्कता वाढू लागली होती. मात्र आंतरिक ओढीमुळे अभ्यासक्रमाबाहेरचे वाचन चाललेलेच होते. त्यांनी मिल् आधीच वाचला होता. इंटरच्या वर्षी स्पेन्सरची पुस्तके वाचली व अज्ञेयवादाने ते झपाटल्यासारखे झाले. नुसते वाचूनच ते थांबत नसत तर चर्चा करण्याची अनिवार उर्मी त्यांच्या ठिकाणी होती. म्हणून त्यांनी आपल्या मित्रांचे असे चर्चामंडळ स्थापन केले. ते म्हणतात, "पोटात घटकाभर विष आवरेल पण नवीन विचार अगर एखादा सुंदर अनुभव मनाला घडला की कोणातरी सहानुभूतीच्या मित्राजवळ किंवा आप्ताजवळ ओकून टाकल्याशिवाय मला चैनच पडत नसे. ह्यामुळे केळकरांच्या वाड्यात असताना माझ्या नेतृत्वाखाली आमच्या खोलीत एक छोटेखानी डिबेटींग युनियन (चर्चामंडळ) स्थापन करण्यात आले होते. त्यात माझाच सुळसुळाट जास्त असायचा. ह्या लहानशा मंडळात नवीन भेटलेल्या मिल्ल-स्पेन्सरच्या विचारांची पुनरावृत्ती करण्यात मी मोठे वक्तृत्व पाजळीत असे."[१] स्वतःवर झालेल्या मिल्-स्पेन्सरच्या प्रभावाचे आणि तज्जन्य उत्साहाचे वर्णन स्वतःचाच उपहास करीत अण्णासाहेबांनी मोठ्या मौजेने केले आहे. असे असले तरी भावना-विचारांच्या प्रकटीकरणाची उर्मी त्यांच्यात प्रबळ होती हे यावरुन दिसते. इंटरच्या वर्गात असताना त्यांनी हे चर्चामंडळ सुरू केले होते. जमखंडीत मॅट्रिकच्या परिक्षेत पहिल्या येणाऱ्या विठ्ठल रामजींना कॉलेजातील प्रीव्हियसच्या परिक्षेत जेमतेम तिसऱ्या वर्गात पास होता आले. १८९८ सालापर्यंत तर परिस्थितीत आणखीनच फरक पडला होता. १८९४ साली ते इंटरच्या परिक्षेत नापास झाले आणि पुन्हा १८९७ साली बी.ए. च्या परिक्षेत नापास झाले. विचारात अधिक परिपक्वपणा आलेला आणि बाह्य जगाबद्दलचे वाढते असमाधान अशी त्यांची ह्या वर्षातली मनःस्थिती असणार. लौकिक अपयशाला दाद न देणारा स्वतःबद्दलचा एक खोलवरचा आत्मविश्वासही त्यांच्या ठिकाणी असणार. याच काळात त्यांच्या व्यक्तिगत भावजीवनात एक अंतःस्थ खळबळ माजून राहिली होती. त्यामुळेही एक प्रकारचे असमाधान त्यांच्या मनात होते. पाश्चात्य तत्त्वज्ञानाचा परिणाम झाल्याने व्यक्तिनिष्ठा प्रबळ झालेली असणार. ह्या साऱ्याचा परिणाम म्हणून त्यांनी आत्मप्रकटीकरणासाठी रोजनिशी लिहिण्याचा अवलंब केलेला असावा.

१८९८-९९ च्या रोजनिशीत वैचारिक-भावनिक प्रतिक्रिया व्यक्त होताना त्यांच्यामध्ये तीव्रपणा जाणवतो. वाचन, निरीक्षण आणि चिंतन यांतून मनास प्रगल्भता आलेली. काहीतरी करावे ही उर्मी दांडगी. मूळचीच वृत्ती भावनाप्रधान आणि बाह्य वास्तवाबद्दलचे असमाधान. ह्या साऱ्या कारणांचा परिणाम म्हणून वृत्तीची ही तीव्रता निर्माण झालेली दिसते. काही चांगले दिसले की ते मनःपूर्वक कौतुक करतात. आदरभाव दाखवितात. आणि वाईट दिसले की तीव्र निषेध करतात. मात्र ही भावनिक तीव्रता असली तरी ते चांगल्यावाईटाचा निवाडा यथायोग्यच करतात. त्यांच्या आकलनात आणि प्रतिक्रिया प्रकट करण्यात कुठेही एकांगीपणा दिसत नाही. तीव्रता असली तरी मानसिक प्रगल्भपणामुळे विवेक सुटत नाही.

अण्णासाहेब शिंदे यांची १८९८-९९ ची रोजनिशी म्हणजे विसाव्या शतकाच्या अगदी अखेरच्या टप्प्यातील पुण्याच्या शैक्षणिक, सांस्कृतिक, धार्मिक स्वरूपाच्या संस्थात्मक जीवनावरील भाष्य आहे. हे भाष्य एका विचारी, चौरस दृष्टीच्या भावनाशील मनाने केलेले आहे याचाही सतत

१. विठ्ठल रामजी शिंदे, माझ्या आठवणी व अनुभव, उनि., पृ. १००.

प्रत्यय येतो. सार्वजनिक जीवनात प्रतिष्ठा पावलेल्यांचेही शिंदे मोजमाप करून त्यांचे खुरटेपण वा उंची यथायोग्य दाखवितात. ह्या भाष्याच्या जोडीने एका रसिक, काव्यात्म, संवेदनाशील, रोमँटिक मनाच्या अंत:स्थ हालचालींचा आलेखही आपल्या प्रत्ययाला येतो. म्हणून या रोजनिशीचे स्वरूप पाहता, ह्या काळात त्यांच्या मनाची काही घडण होताना दिसते हे खरे असले तरी जे प्रगल्भ मन आधीच घडले होते त्याचा आविष्कार होताना दिसतो असेच म्हणण्याकडे जास्त कल होतो. भावी जीवनात कार्यरूपाने अथवा विचारूपाने त्यांच्या मनाचा जो आविष्कार आला त्याचे सारे कंद येथे पाहावयास मिळतात.

अभ्यासक्रमाबाहेरील अवांतर परंतु महत्त्वाच्या विषयांचे वाचन करण्याचा तसेच विविध विषयांवरील भाषणे ऐकण्याचा विठ्ठल रामजींना उत्साह होता. अशा वाचनभाषणाने त्यांच्या विचाराला खाद्य पुरविले जायचे. पुण्यात त्याहीवेळी भरपूर व्याख्याने होत असत. कॉलेजातील प्रासंगिक, वसंत व्याख्यानमालेतील अथवा शिवजयंत्युत्सवानिमित्त घडणारी व्याख्याने शिंदे नेमाने ऐकत. ह्यातील बहुसंख्य व्याख्याने त्यांच्या पसंतीला उतरली नाहीत. ह्या व्याख्यानांवरील त्यांचे अभिप्राय मोठे मार्मिक असून त्यांच्या वैचारिक व्यापकपणाचा, विवेचकत्वाचा व त्यांच्या आदर्शवादी मनोवृत्तीचा प्रत्यय देणारे आहेत.

त्यांना आवडलेल्या एकदोन व्याख्यानांपैकी एक म्हणजे नामदार गोपाळ कृष्ण गोखल्यांचे 'इंग्लंडातील व हिंदुस्थानातील शिक्षण' या विषयावरचे इंग्रजीमधील भाषण (पृष्ठ १८-२२) 'एकाग्रतेने भाषण' ऐकण्याची उत्कंठा दाबवेल तितकी दाबून' त्यांनी ह्या भाषणाची टिपणे घेतली व त्याचा तीनचार पाने इतका विस्तृत गोषवारा दिला आहे. व्याख्यानाचा प्रारंभ, अध्यक्षांचा समारोप, तेथे घडणारा विनोद, श्रोतृवर्गावरील परिणाम इत्यादिकांचे वर्णन करून त्यांनी व्याख्यानप्रसंगाचे चित्रच आपल्या डोळ्यासमोर उभे केले आहे. गोखल्यांच्या भाषणावर शिंदे बेहद्द खूष झालेले आहेत. हे व्याख्यान ऐकण्यासाठी दुपारी तीन वाजता भर उन्हातून दोन मैल चालत जावे लागले याचे श्रम उरले नाहीत. उलट, 'मी जे भाषण ऐकले त्यासाठी दहा मैलही चालत गेलो असतो' (पृ.१७) असे ते सांगतात. चांगले व्याख्याने कशाने सिद्ध होते याची समजही ते दाखवितात.'या (वाणीच्या) विलासास केवळ त्यांचे जिव्हाचापल्यच कारणीभूत नसून त्यांच्या अंत:करणाची मार्मिकता व रसिकताही आहेत हे उघड दिसले' (पृ.१७) असे म्हणून केवळ भाषेवरचे प्रभुत्व आणि बौद्धिकता ह्यांच्या जोरावर व्याख्यान चांगले होत नसते असे सुचवितात. मात्र गोखल्यांच्या व्याख्यानाची तारीफ करूनही शिंदे आपले विवेचकत्व, बहुश्रुतता व मूल्यमापनाच्या स्वतंत्रपणा प्रकट करतात. व्याख्यानाचा गोषवारा दिल्यावर अखेरीस, "गोखल्यांनी तेथील शिक्षणपद्धतीचे केलेले वर्णन एकतर्फीच दिसते, कारण खुद्द इंग्लंडातही तेथील पद्धतीबद्दल सारखी ओरड आहे, ते केवळ निर्दोष असेल असे मुळीच वाटत नाही" (पृ.१८) असा स्वत:चा अभिप्राय देतात. ह्या एकतर्फीपणाची मीमांसा करताना ते म्हणतात की, येथील पद्धत इतकी दुष्ट आहे की हीत रूळलेल्यास तेथल्या पद्धतीतले फार दोष दिसणे संभवनीय नाही.

शिवजयंत्युत्सवातील व्याख्याने त्याचप्रमाणे वसंत व्याख्यानमालेतील व्याख्याने यांवरील शिंदे यांचे अभिप्राय त्यांच्या व्यापक, उदारमतवादी दृष्टिकोनाचे, प्रगल्भ मनाचे व चोखंदळ अभिरुचीचे द्योतक आहेत. तत्कालीन सर्वसामान्य सुशिक्षित पुणेकर समाज आणि अण्णासाहेब शिंदे यांच्या

दृष्टिकोनांत व अभिरुचीत फार मोठी तफावत होती हे जाणवते. १८९८ च्या सुमारास लो. टिळकांच्या नेतृत्वाचा प्रभाव पडून ते पक्के झाले होते. सार्वजनिक सभेसारख्या संस्थेतून न्या. मू. रानड्यांसारख्यानी अंग काढून घेतले होते. लो. टिळकांचा प्रभाव तेथेही पडला होता. ह्या वर्षी श्री. शि. म. परांजपे हे वसंत व्याख्यानमालेचे चिटणीस होते ही गोष्ट त्याचीच द्योतक आहे. त्यावेळचा पुण्यातील सर्वसामान्य सुशिक्षित समाज राष्ट्रवादी झाला होता खरा; परंतु सामाजिक बाबतीत सुधारणाविरोधी, प्रतिगामी, रूढ धर्माचे म्हणजे एक प्रकारे सनातन रूढीचेच गोडवे गाणारा बनला होता. व्यापक उन्नत धर्मकल्पना फारशी लोकांपर्यंत पोहोचली नव्हती. बहुजन समाजाचे हित आणि सुधारणा यांकडे फारसे कोणाचेच लक्ष नव्हते; एवढेच नव्हे, तर त्याची त्यांना जाणीवही दिसत नाही. तत्कालीन वातावरण असे असल्याने अण्णासाहेबांचे व्याख्यानावरील व त्याचप्रमाणे श्रोतृवर्गासंबंधीचे अभिप्राय प्रतिकूलच पडलेले दिसतात.

शिवजयंत्युत्सवातील भाषणात प्रो. जिन्सीवाले यांनी दाखला देताना पुनर्विवाहित स्त्रीचे उदाहरण घेऊन आपली सनातनी वृत्ती आणि कुत्सितपणा प्रकट केला त्यावेळी श्रोत्यांनी टाळ्या वाजवून पसंती दर्शविली. त्यावर शिंदे लिहितात, "टाळ्या होत होत्या त्या असल्याच प्रसंगी. पुण्याच्या सार्वजनिक सभातून एखाद्या वक्त्यास टाळ्या मिळाल्या की त्याने काही पोरकटपणा केला असावा असे बाहेरच्याने खुशाल समजावे अशी स्थिती झाली आहे" (पृ.२३). प्रो. परांजपे यांच्याबद्दलची प्रतिक्रियाही अशीच तिखट आहे. "बिचाऱ्यात एक म्हणजे एकच गुण दिसला. तो हा की तो 'सुधारक' नाही. टाळ्या मिळवायला इतकेच बस्स आहे. लेखाप्रमाणे यांचे भाषणही बुळबुळीत, निःसत्त्व, असंबद्ध, अशुद्ध, तुटक, विपुल व पोकळ शब्दांनी भरलेले असते" (पृ.२३). वसंत व्याख्यानमालेतील व्याख्यानांमुळे बहुशः त्यांची निराशाच झाली. सेटलूर यांच्या 'विचारात नवेपणा अगर खोलपणा' आढळून न आल्याने शिंदे यांचे समाधान होत नाही (पृ.३२). न. चिं. केळकर यांचा सुधारणेच्या बाबतीतला मोघमपणा त्यांना न आवडून त्यांच्या व्याख्यानाचे 'काहीतरी दुतोंडी अर्धवट भाषण करून वेळ मारून नेण्याची कला' असे वर्णन ते करतात (पृ.३२). मालेतील दहाबारा व्याख्याने ऐकल्यावर एकंदरीत अशा मालेचे स्वरूप कसे असावे याबद्दल गंभीरपणे ते विचार करताना दिसतात व तिच्या उथळ स्वरूपाबद्दल तीव्र नाराजी प्रकट करतात. ते म्हणतात, "माझ्या मते असल्या मालेच्या द्वारा काही खऱ्या विद्येचे विलास लोकांपुढे आले पाहिजेत. नुसते वक्तृत्व पाजळणे किंवा शाळेच्या चार पोरांकडून टाळ्या घेणे किंवा सर्वांना माहीत असलेल्याच चालू चळवळीचे पाणचाट चर्वितचर्वण करणे वगैरेकरता ही माला नव्हे. महाराष्ट्रातल्या चार विद्वान डोक्यात ज्या काही विचारांची वर्षभर घालमेल होत असेल ती सर्व मालेच्या रूपाने लोकांसमोर आली पाहिजे. म्हणजे माला ही ह्या अंतस्थ उलाढालीचे कार्य झाली पाहिजे" (पृ.३०). मालेतील व्याख्यानांतून प्रकट होणारी विचाराची दिशा शिंदे यांना पटणारी नव्हती. कारण 'यंदाच्या सर्व मालेचा रोख बहुतेक निवृत्त मार्गाकडेच दिसतो' (पृ.३६) असे त्यांना जाणवले. निवृत्त हा शब्द reaction प्रतिगामी या अर्थी शिंदे वापरतात. 'आमचे पूर्वीचे चांगले' हा सूर त्यांना अमान्य आहे. न रूचणारा स्वतंत्र विचार प्रकट झाला तर सभा उग्र रूप धारण करील ही भीतीही व्याख्यात्यांच्या मनात असते. 'एकंदर आमच्यात स्वतंत्र विचार कमी व असलाच जर काही तर तो पुण्याच्या लोकांपुढे उघडपणे येण्याचा संभव मुळीच नाही' (पृ.३६) असे ते आपले दुहेरी निरीक्षण नमूद करून मालेचा आपल्याला

तिटकारा आल्याचे सांगतात. हल्ली सार्वजनिक सभेत झालेले स्थित्यंतर हे मालेच्या निवृत्तीपर अथवा प्रतिगामी रोखाचे कारणही यथार्थपणे सांगतात (पृ.३६).

रोजनिशीलेखनाच्या या काळात त्यांचे वाचन विविध विषयांवरचे असायचे याची कल्पना त्यांच्या रोजनिशीतील नोंदीवरून येते. पुस्तकवर्तमानपत्रांवरील त्यांच्या प्रतिक्रियाही व्याख्यानांवरील प्रतिक्रियांप्रमाणेच तीव्र आणि त्यांची विचारशीलता व मनाचा व्यापकपणा जाणवून देणाऱ्या आहेत. लिव्हिंगस्टनचे चरित्र वाचून त्याच्या दृढनिश्चय, स्वीकृत कार्यावरील निष्ठा इ. नैतिक गुणांनी ते भारावून जातात. प्रत्यक्ष अनुभवाचा आधार नसलेल्या व केवळ कल्पनेने निर्माण केलेल्या पोकळ कांदबऱ्यांचे वर्णन, 'घरकोंबड्या कादंबरीकारांनी लिहिलेली खोटीनाटी चरित्रे' अशा शब्दांत करतात (पृ.३). प्रो. बेनच्या अर्थशास्त्रावरील पुस्तकाच्या विविध अंगावर ते अभिप्राय देतात. त्यांना पसंत पडलेल्या भागाचे कौतुक करतात. परंतु प्रो. बेनची सोशालिझमवरची टीका त्यांना मंजूर नाही. भांडवलशाहीचा अतिरेक व मजूरवर्गाची उपेक्षा यांच्याविरुद्धची प्रतिक्रिया म्हणून सोशालिझमची बाजू सर्वांनी उचलून धरावयास पाहिजे असे त्यांना वाटते (पृ.४). अशा शास्त्रीय पुस्तकात भाषेचे अलंकरण व विनोदाचा सूर त्यांना अस्थानी वाटतो. तत्त्वज्ञान हा अभ्यासाचा विषय राहिला नसतानाही लेविसच्या तत्त्वज्ञानाच्या इतिहासाचे मन लावून वाचन करतात. चिटणिसाच्या बखरीचे मूल्यमापन उपलब्ध पुराव्याच्या आधारे परखडपणे करतात. मराठेशाहीच्या अवनतीचे खापर एका बाजीच्या माथी न फोडता सर्व महाराष्ट्रीय त्याला जबाबदार असल्याचे सांगून आपली ऐतिहासिक दृष्टी व निःपक्षपातीपणा प्रकट करतात.

'काळ' आणि 'केसरी' या वृत्तपत्रांवरील अभिप्रायातून त्यांच्या विचारांचा स्वतंत्रपणा दिसून येतो. शि. म. परांजप्यांच्या 'काळ' चा पहिला अंक वाचल्यानंतर 'मुख्य लेखात व्यवहार अगर तात्त्विकतेपेक्षा कवित्व अधिक दिसते' (पृ.५) अशा संयत शब्दात आपले असमाधान प्रकट करतात. परंतु 'काळा'चे चार अंक वाचल्यानंतर त्याचे परखडपणे मूल्यमापन करतात. 'काळा'ची त्यांनी 'केसरी'शी केलेली तुलना मार्मिक आहे. 'स्वाभाविक खरमरीतपणा, जाज्वल्य अर्थगांभीर्य, शब्दाचा नेमकेपणा व साधी ढब, नखरेबाज अलंकाराविषयी निष्काळजीपणा' ह्या 'केसरी'च्या चांगल्या गुणांचा उल्लेख करून ते काळात उतरलेले नाहीत, 'पण 'केसरी'चा चांगल्या गुणांचा उल्लेख करून ते काळात उतरलेले नाहीत, पण 'केसरी' चा कुत्सितपणा व व्यक्तीला व पक्षाला टोचून लिहिण्याची सवय मात्र काळात बऱ्याच ठिकाणी चमकते' असे सांगतात. त्यांना 'काळा'च्या चार अंकात 'मनाला तल्लीन करणारा एकही विचार अगर विकार दिसला नाही.' वर्तमानपत्रात विचारांचा खोलपणा, भाषेचा नेमकेपणा व साधेपणा असावा; वृत्ती पक्षपाती असू नये, खरी स्थिती समजून घ्यावी व यथातथ्य स्वरूपात प्रकट करावी अशी वर्तामानपत्राबद्दलची अपेक्षा ते व्यक्त करतात (पृ.१६). त्यांना ही अपेक्षा पूर्ण करणारी वर्तमानपत्रे आढळत नाहीत. एका वेगळ्या संदर्भात 'हल्ली देशात वर्तमानपत्राचा दररोज इतका केर पडतो पण त्यात धर्माच्या नावाने एक निर्माल्यही आढळत नाही' (पृ.२८) असे लिहीत असताना देशातील वर्तमानपत्राबद्दलचे त्यांचे असमाधान तीव्रपणे प्रकट होते. सामाजिक बाबतीतील प्रतिगामीपणावर प्रखर हल्ला करणारे अण्णासाहेब राष्ट्रीय बाबतीत तितकेच जहाल आहेत. रानटी टोळ्यांना सुधारण्यासाठी त्यांचे निःशस्त्रीकरण करावे असे सुचविणाऱ्या यंगहजबंडवर ते तुटून पडतात (पृ.१०).

समाजात आजूबाजूला घडणाऱ्या घटनांचे पडसाद त्यांच्या मनावर उमटतात. जातिभेदाची जाणीव त्यांना अस्वस्थ करते. एका गौडसारस्वत वानप्रस्थाश्रमी रामदासीबोवाच्या दक्षिणी ब्राह्मण पाया पडतात. म्हणून एक जात्यभिमानी ह्या बोवाशी अत्यंत असभ्य वर्तन करतो हे बघून त्यांना खंत वाटते आणि त्यांचा सात्त्विक संताप होतो (पृ.९). मुंबई प्रार्थनासमाजातील मंडळी जातिभेद उघडपणे झुगारून देत नाहीत याबद्दल त्यांना असमाधान वाटते (पृ.२९). बंडगार्डन्सवरून परत येताना एका बंगल्यात सत्यनारायणाची पूजा चाललेली दिसते. 'पाश्चात्य फॅशनच्या आवारात हिंदू चालीचे मंडण' चाललेले पाहून त्यांना मौज वाटते (पृ.१३).

समाजातील काही घटना अथवा व्याख्याने, वर्तमानपत्रे इत्यादिकांबद्दल अण्णासाहेब शिंदे यांच्या ज्या वैचारिक प्रतिक्रिया प्रकट होतात त्यात त्यांचा वेगळेपणा जाणवल्यावाचून राहात नाही. आपल्या आजूबाजूला जे काही चालले आहे त्यात त्यांना बहुजनसमाजाचा विचार फारसा आढळत नाही. अण्णासाहेबांच्या मनात सर्वसामान्यांच्या हिताचा विचार असायचा. त्यांना वाटते. की व्याख्यात्यांनी माहीत असलेल्या गोष्टींचेच चर्विततचर्वण करण्यापेक्षा नवीन शास्त्रीय शोधाचे ज्ञान बहुसमाजास द्यावे. प्रार्थनासमाजाच्या उच्च धर्ममताचा अधिक प्रसार तर गावढळातच म्हणजे सर्वसामान्य बहुजनसमाजातच होणे आवश्यक आहे. उच्चवर्णीयांच्या जातीय अहंकाराचा त्यांना तिटकारा वाटतो. व्यक्ती समाजात कितीही लोकप्रियता वा मान्यता पावलेली असो; तिच्यातील दोषांचा ते निषेध करतात. पुण्याच्या तत्कालीन सुशिक्षित समाजापेक्षा वेगळ्या प्रकारची वैचारिकता अण्णासाहेबांची होती हे जाणवते. त्यावेळच्या व्याख्यानांतून, वर्तमानपत्रांतून जे विचार प्रकट होत होते ते सामान्यत: परंपराभिमानातून निघालेले सनातनी वा राष्ट्रवादी. महात्मा फुल्यांचा मृत्यू होऊन गेलेला. त्यांच्या कार्याचा बोलबाला त्यावेळी असेल असे वाटत नाही. फुल्यांचे लिखाण त्यांच्यासारख्या कॉलेजशिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचणे कठीण. ते त्यांच्या वाचनात १९१२ नंतर कधीतरी आलेले आहे. मग त्यांचा हा जो व्यापक दृष्टिकोन बनलेला दिसतो त्याला कारणीभूत त्यांच्या घरचे उदारमतवादी संस्कार, त्यांचा व्यापक सहानुभव, त्यांचा स्वाभाविक चांगुलपणा व त्यांनी केलेले चिंतनच असावे. कदाचित रा. कळसकरांसारख्या उदारमनस्क कर्त्या पुरुषाचा सहवास त्यांना जो झाला तो ह्या बाबतीत साह्यकारक ठरला असेल.

प्रस्तुत रोजनिशीत अण्णासाहेबांचे त्यांच्या मित्रमंडळाशी असणाऱ्या जिव्हाळ्याच्या संबंधाचे चित्र येते. ह्या मित्रमंडळात कोल्हापूरचे गोविंदराव सास्ने, वाईचे केशवराव कानिटकर, जमखंडीचे माधवराव हुल्याळ होते. बारामतीचे रा. रामचंद्र अण्णाजी कळसकर यांच्याबद्दल त्यांच्या मनात आदरभाव निर्माण झालेला आहे. कळसकरांनी महाराष्ट्र व्हिलेज एज्युकेशन सोसायटी स्थापन करून खेडेगावच्या लोकांत तसेच महार, मांग ह्या अस्पृश्य लोकांसाठी कार्य करावयास सुरूवात केलेली होती. त्यांचे साहस, उद्योग व स्वार्थत्याग अण्णासाहेबांच्या कानी आला होता. अशा प्रकारचे कार्य करण्यासाठी आपणही एक मंडळी स्थापन करावी अशी प्रेरणा त्यांना झाली होती. अण्णासाहेब, हुल्याळ, कानिटकर व सास्ने यांचे बंडगार्डन्सवर पुढे काय करायचे याबद्दल बोलणे झाले होते (पृ.१६). सास्न्यांशी ह्या भावी मंडळीसंबंधी बातचीत झाल्याचा व असे काम करण्यासाठी मंडळीत सामील होण्याचा सास्ने यांचा निश्चय ठरल्याचा रोजनिशीत उल्लेख येतो (पृ.५, १३). रा. कळसकर ह्याची महार, मांग यांच्याबद्दलची कळकळ, त्यांच्यासाठी त्यांनी केलेले कार्य ऐकून स्वत:बद्दल मन:पूर्वक लाज वाटल्याचे शिंदे नोंदवितात (पृ.२७). त्यांनी आपले भावी जीवन स्वार्थत्यागपूर्वक सार्वजनिक कार्याला वाहून घेतले. त्याची बैठक ह्याच काळात तयार झाली होती, हे लक्षात येते.

अण्णासाहेबांच्या बौद्धिक, सामाजिक जीवनाबरोबरच त्यांच्या आध्यात्मिक व अंत:स्थ भावजीवनाचेही सुरेख चित्र ह्या रोजनिशीत पाहावयास मिळते. १८९८-९९ या काळात अण्णासाहेबांच्या मनाची ओढाताण चालली होती. कॉलेजातील पहिल्या दोन वर्षांत मिल्स्पेन्सर यांचे संस्कार होऊन ते नास्तिक बनले होते. परंतु मुळातील आस्तिक्यबुद्धीमुळे त्यांचे मन असमाधानी राहिले होते. १८९५ मध्ये प्रो. संडरलँड ह्या एकेश्वरवाद्याचा परिचय घडून तिकडे त्यांचा कल होऊ लागला होता. त्यांच्या धर्मविचाराचा विकासही ह्याच कालखंडात कसा घडला त्याचे दर्शन या रोजनिशीत होते.

दि. २२ मे १८९८ च्या रोजनिशीत त्यांचे ह्या विषयावरील चिंतन आढळते. "आजपर्यंत अज्ञेयवादापर्यंत मजल पोचली होती. पण आज विचाराच्या तरंगात आमच्या अत्युच्च ब्रह्मतत्त्वाची कल्पना अगदी सुबक झळकू लागली. होता होता मला, हल्लीच्या शास्त्रीय दृष्टीने पाहू लागलो तो ब्रह्मतत्त्वात व अज्ञेयवादात भेद दिसेना" (पृ.२७). पुण्याच्या प्रार्थनासमाजातील उपासना ते पाहावयास जातात व त्यांच्या मनात मोठा पूज्यभाव उत्पन्न होतो. पुणे प्रार्थनासमाजाचा साधेपणा त्यांच्या मनाला पटतो. मुंबई प्रार्थनासमाजाबद्दल तेथील भपक्यामुळे त्यांच्या मनात प्रतिकूलता निर्माण झालेली असते व त्याचा उल्लेख रंगमहाल असा ते करतात. साधेपणामुळे पुणे प्रार्थनासमाज गावढळांना जवळचा वाटेल. गावढळांचीच बहुसंख्या असल्याने त्यांना आपल्यात घेतल्याशिवाय समाजाचा खरा प्रसार होणार नाही असे नमूद करून खऱ्या धर्माच्या प्रसाराबद्दलची योग्य जाणीव ते दाखवितात. (प.२८, २९). रा. ब. का. बा. मराठे यांची उपासना त्यांना फार आवडते. मन श्रद्धेने मृदू व पवित्र झाल्याची भावना ते अनुभवतात. (पृ. २९). यानंतर नेमाने ते प्रार्थनासमाजात उपासनेसाठी जावू लागतात. "इतर बाबतीप्रमाणे धर्मबाबतीतही केवळ बुद्धीच्या जोरावरच विचरण्याचा माझा पूर्वीचा आग्रह थोडा ढिला पडत आहे व त्यासरशी श्रद्धा बळावत आहे. पण ह्या धांदलीत मनाची शांतता वाढत आहे!" (पृ.३) असा वैचारिक-मानसिक बदल ते नोंदवितात. जनाबाईचेही मन प्रार्थनासमाजाकडे आकृष्ट झाले याचा त्यांना आनंद होतो (पृ.३८). या श्रद्धेची परिणतीच वर्षअखेर समाजाची दीक्षा घेण्यात होते.

ह्याच काळात अण्णासाहेबांच्या मनातील दुसऱ्या खळबळीचे दर्शन घडते. एका बाजूस उच्च धार्मिक भावनेची प्रबळ ओढ व दुसऱ्या बाजूने विकाराने चालविलेली निर्दय फरफट यामध्ये त्यांच्या मनाची ओढाताण चालली होती. सास्ने, हुल्याळ, कानिटकर या मित्रांचा प्रत्यक्ष सहवास पुण्यात त्यांना मिळायचा खरे परंतु त्यांना आणखी मनोमन सहवास असायचा तो त्यांच्या विष्णुपंत देशपांडे या तेरदाळच्या जिवलग मित्राचा. अंतरंगातील खोलवरची गुह्ये ते त्याला उद्देशून रोजनिशीत उघड करतात. ह्या रोजनिशीतील त्यांच्या अंत:स्थ खळबळीचे स्वरूप लक्षात येण्यासाठी काही बाबी लक्षात घेतल्या पाहिजेत. दि. ११ मे १८९८ च्या रोजनिशीत त्यांनी आपली विधुरावस्था खडतर ताप देत आहे असा उल्लेख करून अतृप्त वासनेचा दाह कसा त्रासदायक होत आहे ह्यात वर्णन केले आहे (पृ.२६). वस्तुत: अण्णासाहेबांचा विवाह त्यांच्या लहानपणीच झालेला होता व पत्नी रुक्मिणीबाई हयात होती. स्वत:च्या पत्नीविरहित अवस्थेचा उल्लेखच ते विधुरावस्था ह्या शब्दाने करतात. "प्रेमाचा पहिला अंकूर माझ्या काळजात उद्भवल्यापासून तो (जिच्यावर माझ्या पत्नीत्वाचा आळ आला होता) तिने त्याचा खुजट रोपा उपटून टाकेपर्यंत माझ्या उरात प्रेमाच्या पिकाऐवजी भावी सुखाच्या कल्पनेचे नुसते गवतच वाढले होते" (पृ.२६) ह्या त्यांच्या आलंकारिक वर्णनावरून त्यांच्या

पत्नीपासूनच्या अपेक्षांचा भंग झाला होता असे दिसते. त्या दोघांच्या वयात नऊ वर्षांचे अंतर होते. १८९६ साली त्यांनी आपल्या पत्नीला पुण्यास शिकायलाही आणले होते. परंतु ह्या काळात त्या दोघांच्या मनाचा मिलाफ झालेला नसावा. अण्णासाहेबांची वृत्ती काव्यात्म, रसिक, मन हळुवार. वयान लहान असलेल्या, शिक्षणाचा व संस्काराचा अभाव असलेल्या पत्नीकडून त्यांच्या भावनांना त्यांना अभिप्रेत असा प्रतिसाद मिळाला नसावा. म्हणून त्यांच्या ठायी प्रेमनैराश्य येऊन ते तिचे पत्नीपणच नाकारीत असावेत असे दिसते. त्यांच्या निराश मनाला आपल्या 'अमोघ प्रेमाचे चीज करणारी जन्ममैत्रीण' (पृ.३७) भेटावी अशी ओढ लागली होती. पत्नीच्या बाबतीत निराश पावलेले मन दुसऱ्या व्यक्तीकडे ओढ घेऊ लागले होते. ही दुसरी व्यक्ती केळवकर दंपतीच्या तीन मुलींपैकी एक असावीसे दिसते. त्यांच्या घराचे वर्णन करताना ते म्हणतात, " सर्व कुटुंबात जादू भरली आहे. कुटुंबात असे एकही माणूस नाही की ज्यास पाहून मन द्रवत नाही. बुद्धी, सौंदर्य, विनय, विनोद, आदर इत्यादी मोहक गुणांचे विलास ह्या घरी सहज दृष्टीस पडतात" (पृ.४५). अशा गुणांवर लुब्ध होऊन त्यांनी विवाह जुळावा असा प्रयत्न केला. परंतु त्यांची वैवाहिक स्थिती आड आल्याने म्हणा वा अन्य कारणाने म्हणा हा विवाह जुळला नाही. ह्या प्रकरणात गोविंदराव सास्ने यांची मध्यस्थी होती. तिला यश येत नाही हे लक्षात येताच त्यांच्या मनाची तळमळ होत होती. ह्याच विषयावर त्या विशिष्ट व्यक्तीबद्दलचे संभाषण त्यांनी गोविंदरावांशी रात्रभर जागून केले होते व भावी सुखाच्या कल्पनेने ते विलक्षण आनंदित झाले होते. पुढचे बोलणे करायचे ह्या उद्देशाने ते मुद्दाम कोल्हापुरास गेले होते. गोविंदरावांकडून निराशेचा सूर ऐकून व त्यांचा निरुत्साह पाहून त्यांच्या मनाची तगमग झाली होती. आणि प्रत्यक्ष निराशा झाल्यानंतर त्यांना दुःख झाले, परंतु त्यानंतर हा विषयच मनाच्या हद्दीबाहेर त्यांनी प्रयत्नपूर्वक टाकलेला दिसतो. कारण ह्या प्रसंगानंतर ते मित्रांसह व जनाबाईसह पन्हाळा वगैरे गडाच्या सहलीला जातात व त्यात ते रमून गेल्याचे दिसते. पुढील वर्णनात फक्त एक नोंद त्यांच्या आंतरिक वेदनेची संदिग्ध सूचना देणारी आहे. पावनगडावरून दिसणाऱ्या सुंदर दृश्याचे ते वर्णन करतात. "सडकांवरून खडी पसरवली होती ती अगदी सोनकावीच्या रंगाची होती. त्यामुळे मला अति प्रियकर उषःकालच्या फिकट आबाशायी रंगाची काळ्या फत्तरातून व हिरव्या झाडीतून सडकांची हृदयंगम वळणे पाहून वारंवार माझे मन द्रवत असे व अंतरंगातील अति गूढ विषयाकडे हट्टाने ओढ घेत असे." (पृ. ५०)

हा विषय अण्णासाहेब मनातून काढू शकले, कारण ही ओढ उच्च पातळीवरची होती. ह्या ओढीत काही गैर, हिणकस प्रतीचे वा केवळ शारीरिक पातळीवरील आहे असे त्यांना वाटत नव्हते, मनाच्या ह्या तगमगीच्या काळात त्यांचे आध्यात्मिक साधन चाललेच होते. त्यांनी स्वतःकरता एक आदितत्त्वाचे भजन रचले होते व हे भजन म्हणताना त्यांचा त्यात लय लागायचा (पृ. ४४). ह्या विषयाचा ध्यास जवळजवळ वर्षभर लागल्याचा ते उल्लेख करून म्हणतात, "इतक्या अवधीत विचार आणि विकार यांनी मला अगदी भंडावून सोडले आहे. पण दोन्हीही उच्च प्रकारचे आहेत." (पृ.४२).

येथे दुसऱ्याही एका गोष्टीचे स्पष्टीकरण देणे आवश्यक आहे. पृ. ३९ वरील दि. १ ऑगस्ट १८९८ च्या रोजनिशीतील नोंद अपुरी आहे. कारण या शब्दानंतरची पुढील तीन पाने म्हणजे सहा पृष्ठे (मूळ रोजनिशीतील पृष्ठ क्र. ६७ ते पृष्ठ क्र. ७२ अखेर) नाहीत. ह्या पृष्ठांवर वरील संदर्भातील

व्यक्तीचा कदाचित नामोल्लेख असल्याने शिंदे यांनी ही पृष्ठे उत्तरकाळातील वाचनात काढून टाकली असावीत. आपण केलेल्या ह्या नामोल्लेखामुळे एखादी व्यक्ती अडचणीत येऊ नये ह्याबद्दल त्यांनी दक्षता घेतली असल्याची शक्यता आहे.

अण्णासाहेबांच्या ठिकाणी असलेल्या निसर्गाच्या ओढीचे व ऐतिहासिक स्थळे पाहण्याच्या आवडीचे आल्हाददायक दर्शनही ह्या रोजनिशीत घडते. पन्हाळगडच्या सहलीत त्यांनी पन्हाळ्यास मुक्काम करून आजूबाजूचे पावनगड, वाडी रत्नागिरी, पांडवदरी, विशाळगड असे गड व स्थळे पाहिली.

अण्णासाहेबांच्या रोजनिशीत नुसतेच निसर्गाचे यथातथ्य चित्र येत नाही. निसर्ग त्यांच्या मनावर परिणाम करतो. निसर्गाचा देखावा भव्य, भयानक असो, की रम्य, सुंदर असो, त्यात ते रममाण होतात. स्वत:मधील आंतरिक चैतन्याची खूण पटून वृत्ती उन्नत झाल्याचा आध्यात्मिक अनुभव त्यांना येतो. विशाळगडाच्या परिसरातील 'विराटस्वरूपी निसर्गाचे कठोर विलसित' पाहून ते स्तिमित होतात (पृ. ५७). मलकापुराहून बैलगाडीतून केलेल्या रात्रीच्या प्रवासाचे व निर्माण झालेल्या चित्तवृत्तीचे हृदयंगम वर्णन ते करतात. (पृ. ५८). सोनचापा, सुवर्णपुष्प, नेवाळी इत्यादी फुलझाडांनी परिमळलेल्या; बोरे, आंबे, जांभळे ह्या फळझाडांनी बहरलेल्या, पन्हाळ्याच्या परिसराचा माणसाच्या मनावर कोणता परिणाम होतो ते सांगतात. पाहणारा रसिक अजून नास्तिक असेल तर तो "सबाह्यआंतर आनंदमय होऊन आपल्या स्वत:ला विसरून जातो. पण आस्तिक असेल तर ह्या सुंदर अंतर्बाह्य विश्वाच्या सच्चिदानंद परमात्म्याचे ठायी लीन होतो." (पृ. ५५). अण्णासाहेब हे अर्थातच दुसऱ्या वर्गात मोडतात.

अण्णासाहेबांची इंग्लंडमधील रोजनिशी तुलनेने मोठी आहे. एकतर ती दोन वर्षेपर्यंत बऱ्याचशा सातत्याने त्यांनी लिहीली आहे. ह्या दोन वर्षांच्या अवधीत त्यांना ज्या मोठ्या सुट्ट्या मिळाल्या त्या त्यांनी लंडन, इंग्लडंच्या दक्षिण किनाऱ्याचा परिसर, इंग्लिश व स्काचसरोवर प्रांत, कॉर्नवॉल ह्या परिसरात घालविल्या. एक सुटी ऑक्सफर्डमध्ये व अखेरची सुटी जर्मनी, स्वित्झर्लंड व इटली देश पाहण्यात घालविली. हा विविध ठिकाणचा प्रवास त्यांनी जाणीवपूर्वक निरीक्षणाच्या हेतूने केला होता म्हणून त्या त्या ठिकाणची शक्य तितकी माहिती त्यांनी रोजनिशीत टिपली आहे. खुद्द ऑक्सफर्डमधील नोंदी, विशेषत: प्रारंभीच्या काळातीलच आहेत. नंतरच्या नोंदी प्रामुख्याने त्यांनी केलेल्या भ्रमंतीच्या काळातील आहेत.

ह्या रोजनिशीलेखनाच्या काळातील अण्णासाहेबांची मन:स्थिती आधीच्यापेक्षा वेगळी आहे. ते बी.ए. होऊन मुंबईस एल्एल्बी. चा अभ्यास करीत होते. त्यांच्या संसाराला प्रारंभ झाला होता. त्यांची आणि पत्नीच्या मनाची जुळणी तोपर्यंत झाली असावी. इ.स. १९०० मध्ये त्यांना मुलगा झाला. प्रार्थनासमाजाची रीतसर दीक्षा तर त्यांनी १८९८ मध्येच घेतली होती. पुणे आणि मुंबई अशा दोन्ही ठिकाणी उपासनेची निमंत्रणे येऊ लागली होती. धर्मकार्याला वाहून घेण्याचे जीवितध्येय त्यांनी निश्चित केले होते. धर्मशिक्षणासाठी ऑक्सफर्डला पाठविण्यासाठी कलकत्त्याच्या ब्राह्मसमाजाने व मुंबईच्या प्रार्थनासमाजाने त्यांची निवड केली होती. अशा अनेक घटनांमुळे त्यांच्या मनाला स्थैर्य प्राप्त झाले होते. वृत्तीतील तीव्रपणा कमी होऊन त्या शांत झाल्या होत्या. मूळच्या कर्तव्यनिष्ठेच्या

आणि ध्येयवादित्वाच्या जोडीने जबाबदारपणाची भावना निर्माण झालेली होती. मात्र त्याचा परिणाम अती गांभीर्यात झाला असे नव्हे. उलट त्यांची मुळातील विनोदवृत्ती खुलली, आत्मविश्वासामुळे एक प्रकारचा मोकळेपणा आला. आध्यात्मिक बैठक, दीनदलितांच्या उद्धाराची कळकळ, निसर्गाची ओढ व स्वाभाविक रसिकता ही त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची मूळ वैशिष्ट्ये तर येथेही प्रकट होतात.

बाह्य परिस्थितीमध्ये तर उघडच फरक पडला होता. युरोपचा निसर्ग वेगळा, संस्कृती उद्योगप्रधान, वातावरण लोकशाहीवादी, व्यक्तिगत व सार्वजनिक शिस्त हीही भारतीयांना अपरिचित अशीच. अशा वातावरणात वावरताना अण्णासाहेबांनी लिहिलेल्या ह्या रोजनिशीला एक वेगळेपण प्राप्त झालेले आहे.

युरोपमधील सांस्कृतिक वातावरण, तेथील धर्मसंस्था, शिक्षणपद्धती, सार्वजनिक व कौटुंबिक जीवन, लोककल्याणकारी संस्था, तेथील निसर्ग अशा अनेक अंगांचा परिचय ह्या रोजनिशीद्वारा आपणांस होतो.

अण्णासाहेबांच्या इतर काळातील रोजनिशीपेक्षा ह्या रोजनिशीत केवळ माहिती देणाऱ्या नोंदी तुलनेने जास्त आहेत. विशेषत: लंडनच्या वास्तव्यात त्यांनी जी रोजनिशी लिहिली तीमध्ये अशा नोंदी बऱ्याच आढळतात. बाह्य वास्तवाच्या वर्णनाच्या जोडीने अण्णासाहेब जेव्हा स्वत:च्या वैचारिक, भावनिक प्रतिक्रियाही प्रकट करतात तेव्हा त्या लेखनाला त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा रंग चढून त्याला विशेष प्रकारचे स्वारस्य प्राप्त होते. केवळ माहितीपर नोंदी काही एक प्रमाणात ह्या रोजनिशीत आहेत त्याचे एक कारण आहे. अण्णासाहेब ज्यावेळी इंग्लंडला जावयास निघाले तेव्हा त्यांना सुबोध पत्रिकेसाठी प्रवासवर्णनपर लेख लिहिण्याची विनंती संपादकांनी केली होती व त्याप्रमाणे अण्णासाहेब लेख लिहून पाठवीत होते. जलप्रवासाचे व मार्सेय, पॅरिस, लंडन या शहरांची वर्णने करणारे लेख, डेव्हनपोर्ट येथील गुडफ्रायडे, इत्यादि लेख त्यांनी सुबोध पत्रिकेसाठी पाठविले. इंग्लिश व स्कॉच सरोवर प्रांती बघितलेल्या निसर्गाचे व आलेल्या अनुभूतीचे आणि सुचलेल्या विचारांचे अप्रतिम वर्णन त्यांनी 'जनातून वनात आणि परत' या लेखात केलेले आहे. इंग्लंडहून त्यांनी लिहून पाठविलेल्या लेखांची संख्या वीस आहे. या लेखांत अण्णासाहेबांची सूक्ष्म निरीक्षणशक्ती, विचारांची गहनता, सखोल चिंतनाची प्रवृत्ती यांचा अनुभव येतो त्याचप्रमाणे त्यांच्या उत्कृष्ठ लेखनशैलीचाही प्रत्यय येतो. उदाहरणार्थ 'लंडन शहर' या लेखात लंडनला येण्याचा उद्देश सांगताना ते म्हणतात, " ज्या पाश्चात्य सुधारणेचे गोडवे आपण शाळांतून, कॉलेजांतून, ग्रंथांतून, गुरूमुखातून ऐकतो-एवढेच नव्हे तर जे हे सुधारणाचक्र, खाऊन पिऊन घरी स्वस्थ राम राम म्हणत बसणाऱ्या आमच्या साध्या भोळ्या राष्ट्रास सुमारे शंभर वर्षे चाळवीत आहे त्याची काही कळसूत्रे वरील अचाट शहरात दिसतील तर पाहावी असा एक हेतू निघतेवेळी मनात दडून राहिला होता."[१] "कुठल्याही रहदारीच्या रस्त्यांत गेल्याबरोबर स्त्रीपुरुषांच्या लाटांवर लाटा थडकत असलेल्या पाहून जगावर मनुष्यप्राणी फार सवंग झाला आहे, असे वाटते आणि त्याविषयी फारशी पूज्यबुद्धी राहात नाही"[२] लंडनमधील दुकानाचे ते वर्णन करतात, "माल मोहक तर खराच. पण तो दुकानात मांडून ठेवण्याची ढब त्याहून

१. वि. रा. शिंदे, 'लंडन शहर' लेख, व्याख्याने व उपदेश नि., पृ. १५.

२. कित्ता, पृ. १५.

मोहक, आमच्याकडील दुकानदार आपल्या मालाचे ढिगाचे ढीग दुकानात लपवून ठेवून आपण दाराशी येऊन बसतात. एखाद्यास वाटावे हे जणू रखवालीच करीत आहेत."[१] फ्रान्समधील मार्सेय शहरासंबंधीच्या लेखात ते म्हणतात, "आमच्या व्यापारी पारशी सोबत्यास फ्रेंच भाषेत थोडीशी जीभ हलविता येत होती, त्याचा आम्हास अतोनात फायदा झाला."[२]

सुबोध पत्रिकेसाठी ज्या विषयांवर त्यांनी लेख लिहावयाचे ठरविले त्या विषयांच्या साध्या नोंदीच, पुनरुक्ती टाळण्याच्या उद्देशाने, त्यांनी रोजनिशीत केल्या असाव्यात. अशा नोंदी वगळल्या तर ह्या रोजनिशीच्या बाकीच्या भागात अण्णासाहेबांच्या व्यक्तिमत्त्वाचा आणि लेखशैलीचा प्रत्यय येतो.

अण्णासाहेब इंग्लंडास गेले ते केवळ धर्माचे पुस्तकी शिक्षण घेण्यासाठी नव्हे. स्वतःची धर्मबुद्धी विशद करून धर्मप्रसाराची तयारी करणे हा त्यांचा मुख्य परंतु एक उद्देश होता. ग्रंथांचे वाचन ते करीत होतेच. शिवाय विद्वानांची व्याख्याने ऐकत, चर्चा आणि धर्मसाधन करीत, वेगवेगळ्या पंथांच्या देवळांत जात, त्यांच्या रूढीचे अवलोकन करीत असत. निसर्गाच्या सहवासातही त्यांना आध्यात्मिक अनुभव प्राप्त होत असे. नैतिक गुणांच्या आढळातही त्यांचे आध्यात्मिक शिक्षण घडत असे. ऑक्सफर्डमधील पहिल्याच टर्ममध्ये बिझांटबाई, फोक्स जॅक्सन यांच्या धर्मविषयक ग्रंथांचे वाचन केल्याचे ते नमूद करतात. मार्टिनो क्लबमध्ये रशियातील धार्मिक शिक्षण हा चर्टकॉफचा निबंध ऐकतात व त्याचा परिचय करून घेतात. युनिटेरियन, कॅथॉलिक चर्चमधील उपासनांना हजर राहून त्यांचे तपशीलवार वर्णन देतात. कॉक ह्या सहाध्यायाचा धार्मिक वृत्तीमुळे त्यांचे ह्याच्याशी विशेष जुळते. शोन, बार्न्स, कॉक व शिंदे प्रत्येक आठवड्यात आध्यात्मिक साधनासाठी एकत्र जमतात. मांसाहार सोडण्याचाही प्रयोग ते या काळात करतात हा त्यांच्या आध्यात्मिक वृत्तीचाच आविष्कार म्हणावा लागेल. शिंदे यांच्या आध्यात्मिक पिंडाचा वेगळेपणा जाणवतो. तो आणखी एका प्रसंगी. पिअर्सन कुटुंबात ते दुसऱ्या एका सहाध्यायाप्रमाणे 'पेईंग गेस्ट' म्हणून राहात असत. पिअर्सन हे एक कनिष्ठ मध्यमवर्गातील कुटुंब. मिस् अलाइस् पिअर्सन ही या कुटुंबातील मोठी मुलगी. एकदा कॉलेजातील लेक्चरकडे त्यांचे मन लागले नाही. मग नंतरच्या उपासनेला न थांबता घरी येऊन ते मिस् पिअर्सनशी बोलत बसले. "ह्या संभाषणाने मला ठराविक व्याख्यानापेक्षा अधिक ज्ञान मिळाले. इतकेच नव्हे तर माझी आध्यात्मिक उन्नती झाली" (पृ. ७४) असे ते सांगतात. तिचे त्यांनी वर्णन केले आहे. "ही किती साधी आहे. हिची बुद्धीही साधी (साधारण) तसेच मनही साधे (सरळ). कला आणि कावेबाजी ह्यांचा हिला स्पर्शही नाही. आपल्या उणिवा लपविण्याची हिच्यात शक्ती नाही. तशीच पण इच्छाही नाही, इतकेच नव्हे तर आपल्या उणीवाबद्दल हिला असमाधानही वाटत नाही. हिच्यात कोणतीही नैतिक वाण दिसत नाही म्हणून हिचा हा भोळा व मुग्ध स्वभाव हिला फारच शोभतो. गरीब स्थितीतील हे निष्कलंक अंतःकरण पाहून माझ्या आध्यात्मिक शिक्षणात बरीच भर पडली" (पृ. ७४). लंडनला सुट्टीत गेल्यानंतर रा. राजाराम पानवलकरांशी वृत्तिसाधर्म्याने त्यांचा स्नेह जुळतो व उदारधर्मावर व्याख्याने देणे, स्नेह संपादणे, बंधुता वाढविणे हा धंदा करीत जगाचा प्रवास करायचा असे स्वप्न ते बघतात. स्वतंत्र धर्ममते असणाऱ्या व्हॉयसेच्या लंडनमधील

---

१. कित्ता, पृ. १६.

२. 'मार्सेय शहर', कित्ता, पृ. ९.

चर्चमध्ये ते उपासनेस जातात. युनिटेरिअन सेक्रेटरी बोवी ह्यांजबरोबर एकेश्वरवादावर चर्चा करतात. 'पोस्टल मिशन'ची माहिती करून घेतात. नंतरच्या सुट्यांमध्येही विविध पंथांची देवळे पाहणे, उपासना ऐकणे व निमंत्रणावरून स्वत: उपासना चालविणे हे त्यांचे कार्य चालून होते. ब्रिडपोर्ट येथील उपासना चालविताना रंगून जातात (पृ. ९३). डेव्हनपोर्ट येथील कॅथॉलिक चर्चमध्ये 'गुडफ्रायडे'चा विधी कसा असतो हे ते तपशिलाने पाहतात (पृ. १०२). पारीस येथे नॉत्र दाम, व्हिनासां द पाल इ. देवळांतील उपासना पाहताना. प्रो. जाँ रेव्हील यांना भेटून तेथील धर्मपंथाची माहिती मिळवितात व धर्मस्थिती समजून घेतात. ह्या प्रोफेसराच्या व्याख्यानास ९ पुरुष व ४ म्हाताऱ्या बायका हजर होत्या असे सांगून 'पारीस येथे धर्माचे नाव काढल्यास कित्येकास हासे येते' असेही ते नमूद करतात (पृ. १३७).

बहुजनसमाजात धार्मिकता वाढीस लागावी ह्या हेतूने सुरू झालेल्या केसिक कन्व्हेन्शनला ते जातात. सभेचे चालक जुन्या मताचे असूनही तेथील, देव व साधक ह्यांचे दरम्यान कोणाची मध्यस्थी असू नये हे प्रतिपादन, भावनाप्रधान उपरतीचा देखावा, पंथाभिमानाचा अभाव व साधकाचे लक्ष केवळ ख्रिस्ताकडे लागावे व त्याचे वर्तन सुधारावे हा हेतू, हे सर्व बघून अण्णासाहेबांना संतोष होतो (पृ. १३). एडिंबरो येथील जुन्या मताच्या देवळात उदारमताचा शिरकाव कोठे झालेला पाहून त्यांना आनंद वाटतो. असे घडले तर युनिटेरिअनसारख्या चळवळींची जरूरीही नाही असे म्हणताना त्यांची खरीखुरी उदार धर्मदृष्टी प्रकट होते (पृ. १२०).

प्रस्तुत रोजनिशित अण्णासाहेब धर्माचे अनेक अंगांनी कसे निरीक्षण व चिंतन करीत होते हे पाहावयास मिळते. त्याचप्रमाणे त्यांचे काही आध्यात्मिक पातळीवरचे अनुभवही पाहावयास मिळतात.

"१२.३० (वाजलेले). रस्त्यात चांदणे स्वच्छ पडले होते. अगदी सामसूम होते. देखावा सौम्य गंभीर होता. थोडेसे फिरून येऊन निजलो. माझी परमेश्वरावर श्रद्धा कायम राहिली. पण जीविताचे गूढ काय आहे ते कळेना. संशयाच्या यातना दु:सह झाल्या. परमेश्वरा, हे गूढ कधीतरी उकलेल काय?"(पृ. १०४). कधी अशी संशयाची अवस्था त्यांच्या मनाची होते तर क्वचित् निसर्गाच्या सहवासात श्रेष्ठ प्रतीचा आध्यात्मिक अनुभव त्यांना येतो. इंग्लिश सरोवर प्रांती प्रो. कार्पेंटर ह्यांजकडे मुक्कात असतेवेळचा एक अनुभव अण्णासाहेबांनी सांगितला आहे. रात्रौ ९ वाजल्यानंतर मि. कॉकबरोबर बॉरोडेल दरीतून शतपावलीस ते निघतात. "डरवेंट नदीचे मंजुळ गाणे चाललेले. चहुकडे इतके निवांत की पातळ पानही लवत नव्हते. बाह्य शांतीमुळे अंत:करणातील शब्द अधिकाधिक स्पष्ट ऐकू येऊ लागले. सुधारलेल्या जगाची धडपड शेकडो मैल दूर होती... ९.३० वाजले तरी असा गोड संधिप्रकाश पडला होता की वाचता सहज येत होते. आम्ही दोघेही समानशील. दरीतून पुढे पुढे जात असता सृष्टी आपल्या अंत:पुरात बोलावतेच असे भासले. खोल दरीतून नदीच्या काठाने जात असता कॅसलरॉकचा अगदी सुळकेदार मनोरा समोर होता. त्यावर दशमीचा चंद्र लोंबत होता. अशा आसंमतच्या देखाव्यात आम्ही स्वत:स विसरलो. ऐहिक अत्यंत प्रिय विषयांचाही विसर पडला हे सांगणे नको. अगदी आपलेच असे काही येथे मिळाले म्हणूनच असा हा विसर पडला. 'ह्या उदात्त भेटीच्या प्रसंगी' विचारास अवकाश नव्हता...देवा, अशी वारंवार भेट दे." (पृ. १०७-१०८). कुमारी ह्युगा ह्या बाईंच्या सहवासानंतरची अण्णासाहेबांची जी वृत्ती होते तीमध्ये त्यांची विशुद्ध रसिकता व

एका आध्यात्मिकाची तरल संवेदनशीलता आढळते. अण्णासाहेब पारिसला गेले असता कुमारी द्युगा ह्या अध्यापिकाबाईची भेट घेतात. हिचे फारच सुरेख चित्र त्यांनी रेखाटले आहे. तिचा पोशाख व वागणूक साधी. माहिती देण्याची उत्कंठा, तिचा सुस्वभावीपणा व निरागसपणा अण्णासाहेबांना आवडतो. दुसरे दिवशी रात्री फ्रान्समधील स्त्रीशिक्षण, विवाहपद्धती इ. बद्दल मनमोकळे बोलणे होते. ते लिहितात, "रात्री ११ वाजता ट्राममधून सेन नदीचे काठाने येताना तो रात्रीचा देखावा पाहात, नुकत्याच घडलेल्या शुद्ध सहवासाविषयी माझे मनात अनेक गोड विचारतरंग येऊ लागले. आत्मा आत्म्यावर लुब्ध झाला होता. म्हणून वियोग झाल्यावरही सुखच होत होते. शरीराची सर्वच सुखे दु:खपर्यवसायी आहेत. आत्म्याला पर्यवसानच नाही. कारण आत्मा अनंत आहे म्हणून त्याची वृत्ती अखंडित राहते." (पृ. १४७).

इंग्लंडच्या रोजनिशीत अनेक गोष्टींबाबत माहिती खचून भरलेली आढळते. अण्णासाहेब शिंदे यांचा स्वभाव चौकस, निरीक्षण सूक्ष्म आणि नवनवीन गोष्टी माहीत करून घेण्याचा त्यांचा उत्साह उदंड. काही गोष्टी हिंदुस्थानातील समाजसुधारणा अशा धर्तीवर घडावी ह्या आस्थेतून त्यांना महत्त्वाच्या वाटत असणार; तर काही बाबींबद्दल त्यांची व्यक्तिगत अभिरुची आणि जिज्ञासूपणा कारणीभूत असणार. ते इंग्लंडमधल्या शेतमजुराला मजुरी किती मिळते याची आस्थेवाईकपणे चौकशी करतात. ऑक्सफर्ड येथील वर्क हौस किंवा कंगालखान्याचे बारकाईने वर्णन करतात. अडीचशे म्हातारी, दुबळी, अनाथ स्त्रीपुरुषे येथे असतात व त्यांची व्यवस्था चोख, कळकळीने ठेवली जाते. इ. वर्णन करून 'संस्था पाहून अत्यंत समाधान वाटले. हा खरा ख्रिस्ती धर्म' असे उद्‌गारतात (पृ. १०५). गरीब लोकांस फुकट वाचावयास देणारे ४८००० पुस्तकांचे जंगी वाचनालय एडिंबरो येथे असते. मजूर लोक त्याचा लाभ घेतात. 'हे खरे लोकशिक्षण' अशी समाधानाची भावना अण्णासाहेबांची होते (पृ. १२०). मँचेस्टर येथे दरिद्री आणि गलिच्छ वस्तीच्या आठदहा घरी जाऊन तेथील परिस्थिती ते मुद्दाम पाहतात (पृ. १३०).

इंग्रजी खेड्यातील शिक्षण कसे असते ते पाहण्यासाठी बर्टन येथील शाळेचे तपशीलवार निरीक्षण त्यांनी केले आहे (पृ. ९४-९७). ही निरीक्षणे करीत असता हिंदुस्थानातील गोरगरिबांची स्थिती कशी सुधारेल, ही तळमळ अण्णासाहेबांच्या मनामध्ये असणार, यात शंका नाही.

ऐतिहासिक स्थळे, सुंदर इमारती इ. पाहाव्यात, विविध विषयांची माहिती करून घ्यावी अशी अण्णासाहेबांच्या ठिकाणी तीव्र जिज्ञासाबुद्धी होती. लंडनच्या मुक्कामात येथील ॲश्मोलियन म्युझियम, ट्रॅफल्गार स्क्वेअरमधील नॅशनल पिक्चर गॅलरी, रीजंट पार्कमधील प्राणिसंग्रहालय, ब्रिटीश म्युझियम; एगार्डन टेकडीवरील रोमन छावणीचे अवशेष, मँचेस्टर येथील दगडी कोळशाची खाण, बॉस कॅसल येथील शर्ट करण्याचा कारखाना, ऑक्सफर्ड जवळच्या खेड्यातील पवनचक्की (पृ. १३५), इंग्लिश सरोवर प्रांतातील ड्रूइडिकल सर्कल (११७), एडिंबरोजवळील फोर्थ ब्रिज (पृ. १२२), पारीसमधील कितीतरी प्रेक्षणीय स्थळे, शेक्स्पीयअर, वर्डस्वर्थ वगैरे प्रसिद्ध व्यक्तींची स्थाने, इत्यादि अत्यंत बारकाईने पाहून त्यांनी त्यांचे तपशीलवार वर्णन केले आहे.

केसिक कन्व्हेन्शन (पृ ११२), ऑक्सफर्ड येथील पदवीदान समारंभ (पृ. १४८-४९), पारीस येथील गुड फ्रायडे अथवा व्हेद्र दी सां (पृ. १४४-४५), पाँपी शहराचे अवशेष (पृ. १५३-५४),

पारीसमधील ऑलिंपिया नाटकगृह (पृ. १३९), बॉइ बॉला हे सार्वजनिक नाचाचे ठिकाण (पृ. १४०-४१), इत्यादींचे त्यांनी जे वर्णन केले आहे ते पाहता अण्णासाहेबांची हुबेहुब वर्णन करण्याची शक्ती किती दांडगी आहे व त्यांची संवेदनशीलता किती तरल आहे याची कल्पना येते.

अण्णासाहेबांच्या ठिकाणी स्वाभाविक रसिकता होती, मनाची ठेवण प्रेमळ होती. त्यांनीच म्हटल्याप्रमाणे भक्ती, प्रेम, रसिकता ही त्यांना एकरुपच वाटतात. त्यांचा धर्मविषयक व्यासंग चालला असला तरी ते जीवनातील आनंदाला पारखे झाले नव्हते. उलट ते जीवन चवीने, रसिकतेने, आनंदाने जगत होते. बाइसिकल शिकणे, बोट वल्हविणे त्यांना आनंददायक वाटत होते. ते पियानोवर गाणे वाजवितात, चित्रे काढतात, नाटके बघतात. कला, चांगुलपणा, निरागसता, चैतन्य दिसले की ते आनंदतात, 'गरीब लोकांची घरे कितीही कंगाल असली तरी त्यात दहावीस चित्रे, काही मूर्ती ' असतात हे त्यांना चांगले वाटते (पृ. ८७).

प्रस्तुत रोजनिशीत अशी कितीतरी स्थळे आहेत की त्यातून अण्णासाहेब शिंदे यांची वेगळीच संवेदनशीलता व सूक्ष्म सौंदर्यदृष्टी आढळते. इंग्लिश व स्कॉच सरोवर प्रांतीच्या निसर्गसौंदर्याचा अनुभव घेतलेल्या अण्णासाहेबांना पारीसजवळचे बो द बलोनचे कृत्रिम उपवन आवडत नाही. ते लिहितात, "एकाद्या सिंहाचे दात व नखे उपटून काढावीत व त्यास मिंधे करून एकाद्या श्रीमंताच्या लाडक्या पोरास खेळावयास द्यावे तशीच गत ह्या पारीसजवळच्या उपवनाची झाली आहे. झाडे दुकानात ठेवल्याप्रमाणे एकाच नमुन्याची. एकंदर देखावा इतका माणसाळलेला की ह्यास उपवन म्हणण्यापेक्षा आरण्याचे प्रदर्शन म्हणणे अधिक शोभते." (पृ. १३७-३८).

त्यांनी कुटुंबांची सुरेख चित्रे रेखाटली आहेत. उदाहरणार्थ :- ऑक्सफर्ड मधील पिअर्सन कुटुंब (पृ. ७३-७४), ब्रिडपोर्ट येथील व्हाईट कुटुंब, (पृ. ९८), पारीसमधील रोज कुटुंब (पृ. १३८). कुटुंबात जिव्हाळा, प्रेम, शांती, आनंदी वातारण इ. बघितली की त्यांच्या मनाच्या तारा कंपित होतात. रोज कुटुंबाचे ते वर्णन करतात, "मादाम रोज ही फार गोड व कुशल बाई आहे. ही इंग्रजी शिकत आहे. निदान तशी मोस्यू रोजची समजूत आहे. मी काही इंग्रजीत विचारले की मादामची जी कासावीस होते मग ती आर्तपणे आपल्या नवऱ्याकडे पाहते, त्याचे मला मोठे कौतुक वाटते." (पृ. १३८), लॉख लोमंडजवळ टार्बेटला एका झोपडीत ते वास्तव्य करतात. शेजारच्या कुटुंबातील मुलींचे ते वर्णन करतात, "शेजारी झिपऱ्या मुली ॲग्नेस व जेसी आणि उनाड जॉनी आणि टॉमी हुदोड्या घालीत. जेसी तीन विती पण फार धीट असे. तिने मला स्पष्ट सांगितले, तिची बाहुली माझ्याइतकी मोठी आहे." (पृ. १२६). त्यांच्या अंत:करणाच्या प्रेममयतेमुळे कुटुंबातील सोज्वळ दृष्ये त्यांना आवडतात. त्याच कारणाने प्रेमी जोडप्याचे उघड्यावरील प्रियाराधनही त्यांना आनंददायक वाटते. इंग्लिश सरोवर प्रांतातील वास्तव्याच्या काळातील हे वर्णन. "वाटेने येताना आंधारात व आडवळणीस कित्येक प्रेमी जोडपी प्रियाराधनात गर्क दिसली. हे मानवी संसारातील अत्यंत गोड पवित्र चित्र मला येथे वारंवार दिसते." (पृ. ११३). एडिंबरोस असता ब्लाकफर्ड हिल्वरील अशाच प्रसंगाचे काहीसे मौजेने ते वर्णन करतात. "टेकडीवरून एडिंबरोचा सौम्य, शांत व सुंदर देखावा दिसला. पुष्कळ लोक आपल्या प्रिय पात्रास बरोबर घेऊन फिरावयास आले होते. अशा तरुण जोडप्यांची ही टेकडी मोठी आवडती दिसली. टेकडीच्या वळणांतून, खाचखळग्यांत,

झुडुपांखाली, गवतांतूनही प्रेमाने बद्ध झालेली जोडपी सर्व जगास विसरून आपापल्यातच गर्क झाली होती. वाटेने जाताना अवचित, अनपेक्षित अशा अवघड ठिकाणी जोडपे पाहून चमत्कार वाटे. न जाणो चुकून एकाद्यावर पाय पडेल म्हणून आजूबाजूस पाहून चालावे लागले." (पृ. ११९), मानवी प्रेमाचे हे स्वाभाविक प्रदर्शन बघून ज्याला विषाद वाटेल त्याला ते हातभागी, खोट्या तत्त्वज्ञानाने बिघडलेला इ. दूषणे देतात.

विनोदात्मता हा खरे तर अण्णासाहेबांच्या रसिक व्यक्तिमत्त्वाचा एक भाग. फर्ग्युसनमधील रोजनिशी लिहिली त्या काळात त्यांचे मन एक प्रकारे ताणलेल्या अवस्थेत होते म्हणून तेथे त्यांच्या या अंगाचा फारसा आविष्कार होताना दिसत नाही. प्रस्तुत रोजनिशीत आणि त्या काळात त्यांनी सुबोध पत्रिकेमध्ये जे लेखन केले त्यामध्ये त्यांचा सूक्ष्म व प्रसन्न विनोद बऱ्याचदा आढळतो. अण्णासाहेब इंग्लंडमध्ये गुलाबी फेटा घालून वावरत ह्याचे लोकांना विशेषत: बायकामुलांना फार कुतूहल वाटत असे. तरुण मुली घरात पळत पळत जाऊन इतरांना ओढून आणून हे दृश्य दाखवीत असत असा फ्रान्समधील अनुभव त्यांनी नमूद केलेला आहे.[१] बर्टन येथील उत्तम रीतिने शाळा चालविणाऱ्या मि. मिलबोर्नचे ते वर्णन करतात, "मि. मिलबोर्न ह्या कामाला अगदी लायक दिसला. मुलावर त्याची अशी जरब होती की कधी न पाहिलेल्या माझ्या फेट्याकडे फारसे न पाहता नेहमी पाहिलेल्या त्याच्याच तोंडाकडे सावधपणे पाहत." (पृ. ९६). ग्लासगो येथील कॅथीड्रलमध्ये ते उपासनेला जातात त्यावेळेचे वर्णन ते करतात, "फेट्यामुळे मला बराच नेहमीप्रमाणे मान मिळाला. अगदी पुढची जागा मिळाली. मद्रासला एकदा मागे बिशप होते त्यांचा आज उपदेश झाला. भाषणात हिंदुस्थानसंबंधी बोलताना माझाही उल्लेख केला. मी फेट्याचे आभार मानले." (पृ. १२४). डेव्हनपोर्टमधील 'मांजराने दार उघडावयास सांगितले' ह्या हकीगतीतील मांजर बंद दाराच्या कडीकडे पुढचे पाय उचलून जणू दार उघडण्याची सूचना अण्णासाहेबांना करीत होते. ते लिहितात, "एवढी खूण मला बस झाली. मी दार उघडल्यावर मांजर मुकाट्याने चालू लागले. काय ते 'थँक यू' म्हणावयाचे उरले होते." (पृ. १००). अनेक व्यक्तिंच्या वर्णनातही ही विनोदाची छटा पाहावयास मिळते.

तात्पर्य, अण्णासाहेबांच्या इंग्लंडमधील रोजनिशीत त्यांच्या मनाच्या आध्यात्मिक ठेवणीचा, धर्मप्रवण मनोवृत्तीचा, लोकहिताच्या कळकळींचा तसेच त्यांच्या स्वाभाविक रसिकतेचा व सौंदर्यदृष्टीचा प्रत्यय येतो.

येरवड्याच्या तुरुंगातील रोजनिशी ही महर्षी शिंदे यांची सर्वांत छोटी रोजनिशी आहे. दि. १२ मे, १९३० रोजी त्यांना तुरुंगात दाखल करण्यात आले व १४ ऑक्टोबर, १९३० ला त्यांची सुटका झाली. ह्या पाच महिन्यांच्या वास्तव्यापैकी सुमारे शेवटच्या अडीच महिन्याच्या कालावधीत त्यांनी ही रोजनिशी लिहिली आहे.

ह्या वेळी अण्णासाहेबांचे वय सत्तावन्न वर्षांचे होते. अस्पृश्यतानिवारण्याच्या कामी भारतभर संस्थात्मक प्रयत्न त्यांनी केला होता. ह्या अवधीत अन्य कितीतरी कामांना त्यांनी हात घातला होता. सार्वजनिक जीवनात मानाचे तसेच अपमानाचे प्रसंग अनुभवले होते. ह्या मानापमानाच्या पलीकडे जाणारी प्रौढ, शांत, स्थिर अशी त्यांची मनोवृत्ती झाली होती. महात्मा गांधींनी आरंभिलेल्या स्वातंत्र्ययुद्धात

---

१. वि. रा. शिंदे, 'मार्सेय शहर', लेख, व्याख्याने व उपदेश, उनि; पृ. १०.

धर्मबुद्धीने त्यांनी भाग घेतला होता. ह्या रोजनिशीत अण्णासाहेबांच्या प्रसन्न व्यक्तिमत्त्वाचा, तत्त्वचिंतक आणि काव्यात्म मनाचा व विनोदी वृत्तीचा प्रत्यय येतो. त्यांच्या मनाची आध्यत्मिक बैठक व धर्मप्रवणता ह्या साऱ्याच्या मुळाशी आहेच.

आधीच्या रोजनिशीतल्याप्रमाणे येथे बाह्य परिस्थिती नाही, तर तिचा एक प्रकारे अभावच आहे. तुरुंगातील चाकोरीचे जीवन आहे. त्यात फारशी विविधता नाही. त्यांच्या इतर कालखंडातील रोजनिशीत बाहेरच्या जगातील व्यक्ती, वस्तू अथवा घटना यांचा त्यांच्या मनावर जो परिणाम होतो त्याचे ते वर्णन करतात. तुरुंगात याचा अभाव असल्याने छोट्या छोट्या गोष्टींना आपोआपच मोठे परिमाण प्राप्त होते. दुसरे वैशिष्ट्ये म्हणजे बाह्य जगातील लक्षणीय घटनांच्या अभावी स्वाभाविकपणेच त्यांची अंतर्मुखता आणि चिंतनशीलता वाढलेली जाणवते.

अण्णासाहेब तुरुंगात आपल्या आयुष्यातील आठवणी व अनुभव लिहीत होते. त्या लेखनाच्या जोडीनेच ह्या रोजनिशीचे लेखन चालले होते. तुरुंगवासात त्यांनी आठवणीची सुमारे दोनशे पाने, म्हणजे त्यांच्या छापील पुस्तकातील १०३ पृष्ठे लिहिली. यात प्रामुख्याने त्यांच्या घरचा बालपणीचा काळ येतो. हा भाग लिहीत असताना घरच्या आनंदमय वातावरणाचा, आईबापांच्या प्रेमाचा व खेळकर बाल्याचा ते पुन्हा एकदा अनुभव घेत होते. त्यांच्या आयुष्यातील अत्यंत आनंदाचा हा कालखंड आहे. ह्या आठवणींच्या लेखनामुळेही ते एका वेगळ्या प्रसन्न आनंदमय वातावरणात गेलेले दिसतात. ह्या रोजनिशीतील प्रसन्नपणाच्या मुळाशी हे एक अधिकचे कारण असण्याची शक्यता आहे.

लिहावयाचे सामान मिळावे म्हणून काय प्रयास पडले, किती वेळ गेला; व शेवटी उंदराच्या कानाएवढी दौत मिळते व तीही अंधारात पाय लागून फुटते ह्या दुर्दशेचे मौजेने आणि विनोदात्म पद्धतीने ते वर्णन करतात. कानिटकरांकडून कांदा मिळताच त्यांना कोण आनंद होतो. नवीन जास्तीची भांडी मिळाल्यावर आपल्याजवळ पंचपात्रे आहेत असे इतर तुरुंगसोबती म्हणू लागले तेव्हा हॉस्पिटलमध्ये आपल्याला मिळालेले मातीचे परळ भरीला घालून अण्णासाहेब मी षट्पात्री आहे असे आढ्यतेने सांगतात. ह्या छोट्या छोट्या गोष्टींतून त्यांची वृत्तीची प्रसन्नता आणि विनोदबुद्धी दिसते.

ह्या रोजनिशीच्या प्रारंभीच्या भागात पोलीस पकडावयास येतात व म. शिंदे त्यांच्याबरोबर निघतात, या प्रसंगाचे आणि त्यांच्यावर खटला चालून शिक्षा होते त्या प्रसंगाचे पूर्वनिवेदन आले आहे. या दोन्ही प्रसंगांतील त्यांची शांत, धीरोदात्त व प्रसन्न वृत्ती जाणवते. अण्णासाहेबांनी १८९८ मध्ये त्यांचे मित्र रा. हुल्याळ यांची त्यांच्या आजारपणात आठ दिवस परिश्रमपूर्वक सुश्रुषा केली होती. हे आता पुण्यास डे. कलेक्टर असतात व त्यांच्यावरच अण्णासाहेबांना शिक्षा ठोठावण्याचा प्रसंग आला होता. खटल्याचा फार्स आटोपल्यावर अण्णासाहेब रा. व सौ. हुल्याळ यांच्याशी पूर्वीचा मैत्रभाव आठवून प्रसन्नपणे वागतात, त्या दोघांशी विनोद करतात. तुरुंगातही त्यांचे आध्यात्मिक साधन चालूच होते. तेथे दर मंगळवारी होणाऱ्या कॅथॉलिक उपासनेला हजर राहण्याची परवानगी जे मिळवतात. ह्या उपासनेला ते विनोदाने मंगळागौर म्हणतात, व "आजपर्यंत चार मंगळवार झाले" (पृ. १६५) असा उल्लेख करतात. कधी स्वामी सहजानंदांबरोबर, तर कधी छोटालाल गांधी यांजबरोबर धर्मचर्चा करतात. नित्याची भजनप्रार्थना आहेच. कधी विशेष धार्मिक चर्चा वा प्रवचन असते.

अध्यक्ष अण्णासाहेब असतात. आपल्या नातीला जन्मून दोन महिने झाले ही तारीख लक्षात ठेवून तिच्यासाठी प्रार्थना करतात. ता. ६ सप्टेंबरच्या रोजनिशीत त्यांचे तत्त्वचिंतन पाहावयास मिळते. अण्णासाहेबांच्या धर्मकल्पनेत प्रेम, रसिकता आणि भक्ती ह्या वेगळ्या नाहीत हे येथेही जाणवते (पृ. १८४-८५).

अण्णासाहेब तुरुंगात कॅथॉलिक उपासनांना उपस्थित राहात. तेथील कैद्यांच्या आध्यात्मिक उन्नतीची कळकळ त्यांच्या मनात निर्माण होते. आपल्या सुटकेनंतर कोणत्याही विशिष्ट धर्माचा नव्हे तर, सर्वसामान्य आध्यात्मिक उपदेश या कैद्यांना करण्यासाठी परवागी मिळेल का, अशी विचारणा ते करतात.

तुरुंगात निसर्ग दिसून दिसून किती दिसणार ? तुरुंगातील अंधारी वॉर्डात आल्यावर त्यांना विशेष आनंद होतो ह्याचे कारण तेथे तीन झाडे असतात. ही तीन झाडे आकारवैशिष्ट्यामुळे त्यांना त्यांची पत्नी रुक्मिणीबाई, सून माई व बहीण जनाक्का यांची आठवण करून देतात. ते ह्या झाडांची कुटुंबातील व्यक्तींशी इतकी एकरूपता कल्पितात की त्या झाडांना आक्का (म्हणजे पत्नी), माई, जनाक्का असेच संबोधतात. आपल्या कुटुंबियांबद्दलच्या प्रेमाचा वर्षाव झाडांवर करतात (पृ. १६९). दुसऱ्या बराकीत बदली झाल्यावर 'आळंदीच्या वाटेवरील डोंगर पावसाने हिरवेगार' झालेले बघताना ते आनंदतात (पृ. १७५).

त्यांच्या खोलीत एक साळुंकीचे जोडपे येत असते. त्याला बघून अण्णासाहेबांना त्यांचे जिव्हाळ्याचे प्रेमळ मित्र गणपतराव शिंदे व ज्यांच्याबद्दल त्यांच्या मनात आदरयुक्त प्रेम आहे त्या अहल्याबाई ह्या जोडप्याची आठवण येते. हे साळुंकीचे जोडपे म्हणजे शिंदेदंपती कल्पून ते त्यांच्याशी अत्यंत भावपूर्ण हितगुज करतात. 'माझ्या खोलीच्या उंच खिडकीत बसून हे जोडपे गुलगुल बोलू लागले म्हणजे माझे काळीज जणू उठून त्या दोघांच्या मध्ये जाऊन बसे. इतका आनंद मला होई (पृ. १७६)' असे वर्णन ते करतात. हा साराच भाग म. शिंदे यांच्या अंतःकरणाचा हळुवारपणा, प्रेमळपणा व काव्यात्म आणि प्रसन्न वृत्तीचा उत्कट प्रत्यय देणारा आहे. कौटुंबिक जिव्हाळ्याचे दर्शन त्यांना नेहमीच आनंदित करते. इथे तुरुंगातही साळुंकीच्या मिषाने ते शिंदेदंपतीचे आल्हाददायक चित्र भावपूर्णतेने रेखाटतात.

कौटुंबिक सुखाला दुरावलेल्या अण्णासाहेबांना तुरुंगातून सुटका कधी होईल याची उत्कंठा लागून राहिली होती. म्हणून समेटाच्या बातम्यांकडे इतरांप्रमाणे त्यांचीही नजर होती व आशाअपेक्षाभंगाची आंदोलने ते अनुभवीत होते. तुरुंगात इतरांशी त्यांचे होणारे जे वर्तन आहे त्यातून त्यांचा खेळीमेळीचा व प्रेमळ स्वभाव दिसतो. सगळ्यांसाठीच तेथे एकत्र आध्यात्मिक साधना, प्रवचन व व्याख्यान घडते. नगरचे नानासाहेब देवचके व रामभाऊ हिरे यांच्याशी त्यांचा फार जिव्हाळा जमला होता. नाशिकच्या तुरुंगात या दोघांची बदली झाल्यानंतरच्या निरोपप्रसंगातून त्यांच्यामधील जिव्हाळा आपल्याला दिसतो (पृ. १९०). तुरुंगातून सुटका झाल्यानंतर अण्णासाहेबांच्या अभिनंदनार्थ रे मार्केटात जाहीर सभा झाली. शेवटी माळ घातल्यानंतर अण्णासाहेब म्हणाले "आता कायदेभंग करून तुरुंगात जाणे इतकी सामान्य गोष्ट झाली आहे की अशा माळा तुरुंगातून परत आलेल्यांच्या गळ्यात न घालता त्या माळा अद्यापि तुरुंगात न गेलेल्यांच्या गळ्यात घातलेल्या बऱ्या" (पृ. १९४). हा ह्या रोजनिशीचा प्रसन्न शेवट त्यांच्या तुरुंगवासातील मनोवृत्तीशी अत्यंत सुसंगत आहे.

महर्षी शिंदे यांची रोजनिशी वाचताना एक चांगल्या दर्जाची ललित वाङ्मयकृती आपण वाचीत आहोत असा अनुभव येतो. हे का घडते ? रोजनिशी हा ललितवाङ्मयाचा प्रकार आहे काय ? रोजनिशी लिहिणाऱ्याचा हेतू काय आहे व त्याचे व्यक्तिमत्त्व कसे आहे, यावरून रोजनिशीचे स्वरूप ठरते.

रोजनिशांचे सामान्यपणे दोन स्थूल प्रकार संभवतात, एक, केवळ वस्तुनिष्ठ स्वरूपाच्या नोंदी असणार रोजनिशी; व दुसरी, लिहिणाऱ्याच्या व्यक्तिमत्त्वाचा प्रत्यय देणारी. आपण जे पाहिले ते महत्त्वाचे आहे, पुढेमागे सार्वजनिक दृष्टीने त्याचा उपयोग होईल असे वाटून ज्या रोजनिशीत वस्तुनिष्ट स्वरूपाच्या नोंदी केलेल्या असतात ती रोजनिशी पहिल्या प्रकारात मोडते. अलिप्त वृत्तीनेच काय घडले याच्या नोंदी अशा रोजनिशीत असल्यामुळे तिच्यात वाङ्मयीन गुण उतरणे कठीण. अशी रोजनिशी इतिहास वा इतिहासाची सामग्री ठरेल. रोजनिशीचा दुसरा प्रकार संभवतो तो म्हणजे जीमध्ये काय घडले या निवेदनाच्या जोडीनेच लेखकाच्या व्यक्तिमत्त्वाचा आविष्कार होतो. अशा रोजनिशीत स्वाभाविकपणेच वाङ्मयगुण उतरतात; आणि लेखकाचे व्यक्तिमत्त्व जी विविध पैलूंनी युक्त आणि संपन्न असेल तर तिला श्रेष्ठ दर्जाची वाङ्मयीन गुणवत्ता लाभते. अण्णासाहेब शिंद्यांची रोजनिशी ही ह्या प्रकारची आहे.

आपण आतापर्यंत तीनही कालखंडातील रोजनिशीचे स्वरूप लक्षात घेताना तीमधून ज्याचा गाभा आध्यात्मिक आहे असे अनेक पैलुंनी युक्त असणारे अण्णासाहेबांचे व्यक्तिमत्त्व कसे प्रगट होते ते पाहिलेच आहे. ह्या संपन्न व्यक्तिमत्त्वाचा प्रत्यय आपल्याला सहज यावा अशी महर्षी शिंदे यांची लेखनशैली आहे.

विविध प्रकारची वर्णने ते यथातथ्यपणे करतात. विस्तार टाळण्यासाठी अवतरणे न देता अशा विविध प्रकारच्या वर्णनांचा पुढे उदाहरणादाखल फक्त निर्देश करतो. हुल्याळाचे आजारपण व शिंदे यांनी केलेली सुश्रुषा (पृ. १४-१५), जनाक्काचा झालेला अपमान (पृ. ५, १६-१७) अशी घटनांची निवेदने आहेत. मलकापूर ते विशाळगड असा रात्रीचा प्रवास (पृ. ५५-५६), ऑक्सफर्ड ते इंग्लिश सरोवर हा प्रवास (पृ. १०६) यांसारखी उत्तम प्रवासवर्णने आहेत. पांडवदरी (पृ. ५३-५४), ऑक्सफर्डयेथील कंगालखाना (पृ. १०४), पारीसमधील ऑलिंपिया नाटकगृह व बॉइ बॉला हे सार्वजनिक नाचाचे ठिकाण (पृ. १३९-४०), व्हर्साय्य येथील चौदाव्या लुईचा राजवाडा (पृ. १४७-१४८) अशा कितीतरी स्थळांची तपशीलाने वर्णने केली आहेत. पन्हाळ्याचा परिसर, इंग्लिश व स्कॉच सरोवरप्रांत येथील निसर्गाचे वर्णन ते वेधक रीतीने करतात. प्रसंगांची वर्णनेही तो तो प्रसंग डोळ्यांसमोर उभा राहील, अशीच असतात. लंडन इंडियन सोसायटीची सभा व दादाभाई नवरोजींचे भारतीय तरुणांशी होणारे प्रेमळ वर्तन (पृ. ८०), मांजराने दार उघडावयास सांगितले हा प्रसंग (पृ. ८०), केसिक कन्व्हेन्शनमधील भावपूर्ण उपासना (पृ. ११४-११५), ऑक्सफर्ड येथील पदवीदानसमारंभ व मुलांचा व्रात्यपणा (पृ. १४८-४९), अण्णासाहेबांना मि. मिलर अटक करावयास येतात तो प्रसंग (पृ. १६०-६१), येरवड्याच्या तुरुंगात युरोपियन वॉर्डरशी घडणारा विनोदी संवाद (पृ. १८९), असे कितीतरी प्रसंग त्यांनी शब्दद्वारा साक्षात् केले आहेत. कुटुंबातील वातावरणाची आणि व्यक्तींची वर्णनेही प्रत्ययकारी आहेत. सगळ्याच बाबतीत साधी असणारी अलाइस् पिअर्सन

(पृ. ७४), उत्साहमूर्ती काटक प्रो. कार्पेंटर (पृ. १०८), तीन वितीची धीट जेसी (पृ. १२६), इंग्रजी शिकणारी परंतु बोलण्याचा प्रसंग येताच कासावीस होणारी मादाम रोज (पृ. १३८), अत्यंत निरागस व सौजन्यमूर्ती असणारी मॅडेमोझील द्युगा (पृ. १४५-१४६) अशी नमुनेदार व्यक्तिचित्रे आपणांस पाहावयास मिळतात.

म. शिंदे वर्णने यथातथ्य करतात त्याचप्रमाणे आपल्या मनातील विचारही सुस्पष्ट असे मांडतात. लिव्हिंग्स्टनचे चरित्र वाचल्यानंतर मनात आलेले विचार (पृ. ३), वसंत व्याख्यानमालेचे स्वरूप (पृ. २९-३०), पारीसमधील वैवाहिक नीतिसंबंधीचे विचार ही याप्रकारची काही उदाहरणे. स्वत:च्या मनातील भावनांचे चित्रही ते हुबेहूब रेखाटतात. विकारवशतेमुळे मनाची झालेली स्थिती (पृ. २६), इंग्लंडप्रवासाचे वेळी मचवा हलताच होणारी हताश भावस्थिती (पृ. ६२, ६३) अथवा कुमारी द्युगाच्या सहवासानंतर अनुभवाला येणारी उदात्त भावावस्था यांसारखी स्वत:च्या भावनिक अवस्थांची चित्रे परिणामकारक अशी त्यांनी रेखाटली आहेत. बॉरोडेल दरीतून हिंडताना आलेला आध्यात्मिक अनुभव (पृ. १०७-१०८), ब्रह्मतत्त्वाची सुबक झळकू लागणारी कल्पना (पृ. २७-२८) आणि तुरुंगात भक्ती, प्रेम, रसिकता यांसंबंधी केलेले चिंतन (पृ. १८४-८५) यांसारख्या अभिव्यक्तीस कठीण अशा अनुभूतींचेही प्रकटीकरण ते करतात. प्रवास असो की निसर्ग असो, प्रसंग असो की स्थळ असो, भावना असो की विचार असो, कुटुंब असो की व्यक्ती असो अथवा श्रेष्ठ दर्जाचा आध्यात्मिक अनुभव असो-या साऱ्यांचे वाचणाऱ्याच्या मनाला साक्षात् प्रत्यय देणारे वर्णन अण्णासाहेब करतात. ही चित्रे डोळ्यांसमोर दृश्य उभी करणारी असली तरी ती नुसती एकेरी, वस्तुनिष्ठ अशी वर्णने नसतात. त्यांत बघणाऱ्याची भावना व त्याच्या मनात उठणारे विचार यांची जोड असल्याने ह्या वर्णनाला भरघोसपणा प्राप्त होतो. अण्णासाहेबांच्या व्यक्तिमत्त्वाचे रंग त्या वर्णनाला प्राप्त होतात व ती परिणामघन होतात.

अशा प्रकारचा प्रत्यय देण्याचे सामर्थ अण्णासाहेबांच्या शैलीत आहे. त्यांची लेखनशैली सरळ, नेमकी व जोरकस आहे. तिचे वळण अस्सल मराठी आहे. संस्कृत वा इंग्रजी वळणाने त्यांची शैली अजिबात दूषित झालेली नाही. अण्णासाहेबांना चांगल्या शैलीची योग्य कल्पना त्यांच्या अगदी पहिल्या रोजनिशीलेखनाच्या काळापासून होती हे त्यांच्या काळ-केसरी ह्या वृत्तपत्राच्या व शि. म. परांजप्यांच्या भाषणावरील अभिप्रायांवरूनही दिसून येते. म. शिंदे यांनी एका वेगळ्या संदर्भात मराठी शैलीबद्दलचे आपले विचार नमूद केले आहेत. मराठी साहित्यिक जगात शैलीची फारशी यथायोग्य कल्पना आढळून येत नसल्याने व अण्णासाहेबांचे मराठी शैलीसंबंधीचे विचार महत्त्वाचे असल्याने ते येथे उद्धृत करण्याचा मोह होतो. मराठी भाषेच्याद्वारा ब्राह्म धर्माचा प्रचार कसा करावयाचा ह्या प्रश्नांसंबंधी एका लेखात विचार मांडल्यावर अण्णासाहेब लेखाच्या अखेरीस म्हणतात, "शेवटी एका नाजूक मुद्द्यावरील माझे किंचित विक्षिप्त मत कळवून आटोपते घेतो. हल्ली आम्ही इंग्रजी शिकलेले लोक मराठी म्हणून जी भाषा बोलतो व लिहितो ती अशिक्षित बहुजन समाजास-विशेषत: खेड्यात राहणाऱ्यांस कळत नाही. ह्याचे कारण, आमचे शब्द जरी मराठी असतात तरी विचार इंग्रजी व अबालबोध असतात. 'अबालबोध' हा अवघड शब्द मी येथे मुद्दाम वरील दुबळेपणाच्या उदारहरणार्थच योजिला आहे. खरी मराठी भाषा ज्ञानेश्वरापासून तुकारामापर्यंत होती. ती प्रथम

मोरोपंताने बिघडविली. बिघडता बिघडता लोकहितवादी आणि जोतिबा फुले ह्यांचेपर्यंत ही कशीबशी जीव धरून होती. पण चिपळूणकर व आगरकरांनी तर तिचा गळाच चेपला. टिळकांनी व हरिभाऊ आपट्यांनी तोंडात शेवटचे दोन घोट सोडले. पण ते शेवटचेच ठरले. आजकाल चिपळूणकरांचा इंग्रजी-संस्कृत कित्ताच आम्ही सर्वजण आधाशासारखे मिरवत आहो. ह्यामुळे आम्ही एखाद्या खेड्यातल्या पिंपळाचे पारावर आमच्या मराठीचा हार्मोनियम सुरू केल्याबरोबर खेडवळ समाज अर्थ न कळल्यामुळे आम्हाला पाहून आपल्या कानांऐवजी डोळ्यांचेच अधिक पारणे फेडीत असतो. व ते कोणी आम्हाला विनोदाने सुचविले तरी ते आम्हाला समजतही नाही."[१]

शैलीची ही जाणीव अण्णासाहेबांना होती म्हणून साध्या साध्या शब्दांचे सामर्थ्य ओळखून ते त्याचा सहजपणे उपयोग करतात. सूक्ष्म भावावस्थांचे निवेदनही ते साध्या शब्दांतून करतात. कॉलेज सहाध्यायी कुकनूर मरण पावलेला असतो. त्याचे प्रेत ठेवलेल्या खोलीत ते तासभर एकटेच बसतात. त्याचे वर्णन "त्या निर्जीव सोबत्याशी माझा एकांतवास फारच उदासवाणा झाला" (पृ. ३४) अशा शब्दांत करतात. इंग्लंडला जाताना निरोप द्यायला आलेल्या आईचे व बहिणीचे वर्णन "आईच्या व जनाबाईच्या तोंडाकडे पाहून वरचेवर उमळून येऊ लागले. त्या दोघी तर भानावर नसल्यासारख्याच दिसत होत्या (पृ. ६१)" अशा साध्या परंतु परिणामकारक शब्दात करतात. पन्हाळ्यावरील 'एजन्सी बंगला अगदी ठेवल्यासारखा दिसत होता' या शब्दांतून ते नेमके चित्र आपल्या डोळ्यासमोर उभे करतात. 'संगीत, चित्रे विणकाम इ. पैकी कोणते तरी लळीत साधल्याशिवाय सभ्यता मिळत नाहीसी झाली आहे' (पृ. ९३), 'खाणीत काम करणारी माणसे पिशाच्चासारखी दिसली' (पृ. १३२), 'नानासाहेब देवचक्यांना आजीबाईसारखी सर्वांची काळजी घेण्याची सवयच लागली आहे' (पृ. १८३) यांसारख्या वाक्यांतून नेहमीच्या वाक्प्रचारांचा अथवा व्यवहारातील उपमांचा ते परिणामकारक उपयोग करताना दिसतात. मात्र याचा अर्थ असा नव्हे, की अण्णासाहेबांना संस्कृत, इंग्रजी शब्दांचे अथवा अलंकाराचे वावडे आहे. साधेपणा हे अण्णासाहेबांच्या शैलीचे वैशिष्ट्य नव्हे, तर तिचा अस्सल मराठीपणा हे वैशिष्ट्य आहे. मनातील अभिप्राय प्रकट करण्यासाठी मराठी वळणाशी जुळेल असे संस्कृत, इंग्रजी शब्द ते वापरतात. 'स्मारकबुक' यासारखा मराठी इंग्रजी जोडशब्दही ते सहजतेने घडवतात. शिंदे यांची शैल काही अलंकाररहित नाही. त्यांचा मन:पिंड भावनात्मक असल्याने भावनिक प्रतिक्रिया ते सातत्याने व्यक्त करतात व त्यासाठी अलंकारांचा उपयोग त्यांच्याकडून पुष्कळ प्रमाणात होतो. परंतु डोळ्यांत भरेल असे अलंकाराचे प्रदर्शन ते कधी मांडत नाहीत. त्यामुळे अलंकाराची जाणीव होऊ न देताही अलंकाराचा परिणाम साधण्याची अभिजातता त्यांच्या भाषेत आहे. 'वर्तमानपत्राचा केर' असे रुपक वापरून मनातली निषेधाची भावना ते प्रकट करतात. वेगळ्या प्रकारची अनुभूती आणि संवेदनशीलता प्रकट करण्यासाठी ते अलंकारांचा मार्मिकपणे उपयोग करतात. उदाहरणार्थ, पारीसमधील स्मशानाचे तपशीलवार वर्णन केल्यावर 'असा एकंदर देखावा पाहून आपण पाताळ लोकात मृतांच्या स्तब्ध शहरातच आहो असे वाटते.' (पृ. १४२). पारीसमधील उपवनाचे कृत्रिम वर्णन केल्यावर ते लिहितात, 'एकंदर देखावा इतका माणसाळलेला की ह्यास उपवन म्हणण्यापेक्षा आरण्याचे प्रदर्शन म्हणणे अधिक

१. वि. रा. शिंदे, 'मराठी भाषेच्याद्वारा ब्रह्मा धर्माचा प्रसार', सुबोधपत्रिका.

शोभते' (पृ. १३८). विशेषणांची खैरात न करता सत्पात्री दान करावे त्याप्रमाणे आवश्यक तेथे समुचित विशेषणांचा ते उपयोगी करतात. त्यांना गद्यशैलीचा कान आहे. म्हणून मोठे संयुक्त वाक्य लिहितानाही ते त्यातील वाक्यांशांचा योग्य तोल सांभाळतात. त्यामुळे भाषेला बोजडपणा तर येत नाहीच, उलट परिणामकारकता वाढते.

मराठीमध्ये रोजनिशी वाङ्मयाची वानवाच आहे. अलीकडच्या काळातील एकदोन लक्षणीय रोजनिशा म्हणजे ग. वा. मावळंकर यांची 'काही पाउले' व ना. ग. गोरे यांची 'कारागृहाच्या भिंती' या होत. एकोणिसाव्या शतकाच्या अखेरच्या काळातील वा विसाव्या शतकाच्या प्रारंभीच्या काळातील रोजनिशी जवळजवळ दुर्मिळ. सातारच्या प्रतापसिंह महाराजांनी आपल्याविरुद्धचे ब्रिटीश हस्तकांचे कारस्थान हाणून पाडावे या उद्देशाने आपल्या काही हस्तकांना इ.स. १८३९ मध्ये लंडनला पाठविल होते. यशवंतराव राजे शिर्के हे त्यांपैकी एक होते. 'यशवंतराव राजे शिर्के यांची रोजनिशी' म्हणून एक पुस्तिका अलीकडे प्रसिद्ध झाली आहे.[१] परंतु तारीखवार नोंदीचे स्वरूप तेथे आढळत नाही तर दोनएक वर्षात लंडनला काय घडले याचे या पुस्तिकेच्या अखेरीस दोनतीन पानांत वर्णन येते, व तेथेही गोषवारा देऊन काही तारखांचा उल्लेख आढळतो. जहाजावर खाण्या-पिण्याच्या बाबतीत सांभाळलेले सोवळे, जहाजावरील स्वयंपाक, लंडन शहर, तेथील धान्ये, नाचतमाशे यांचे दोनतीन वाक्यांत जुजबी असे वर्णन केलेले आढळते. 'एका सरकारी कामगाराचे रोजनिशीतील उतारे' या शीर्षकाखाली 'टोमदेव' या टोपणनावाने 'विविधज्ञानविस्तारा', मधून (पुस्तक ४६ ते ५०, जाने. १९१६-नोव्हेंबर १९२०) काही एक लिखाण प्रसिद्ध झालेले आहे. हे लिखाण रा. ब. का. ना. साने यांचे असावे, असा अंदाज प्रा. वा. ल. कुळकर्णी यांनी व्यक्त केलेला आहे.[२] पुणे, रत्नागिरी आदि जिल्ह्यातील गावांची, तेथील देवस्थानांची, कुळांची इ. माहिती देण्याचाच लेखकाचा प्रमुख उद्देश आहे, आत्मप्रकटीकरण करण्याचा नव्हे. सोयीसाठी रोजनिशी लेखनाची भूमिका त्याने घेतली आहे एवढेच. लेखकाने टोपणनावाने स्वत:च ती प्रसिद्ध केली आहे यावरूनही ते स्पष्ट होते. 'कै. रघुनाथ पांडुरंग ऊर्फ दादासाहेब करंदीकर यांची दैनंदिनी'[३] ह्या पुस्तकात कै. करंदीकरांच्या रोजनिशीतील उतारे पाहावयास मिळतात. परंतु मूळ रोजनिशी इंग्रजीत असून नोंदी व्यावहारिक स्वरूपाच्याच आढळतात. श्री. बाबासाहेब खापर्डे यांनी 'श्री. दादासाहेब खापर्डे यांचे चरित्र'[४] लिहिताना रोजनिशीतील नोंदींचा भरपूर उपयोग केला आहे. परंतु बाबासाहेबांची रोजनिशी ही इंग्रजीत असून मजकूर बंव्हंशी माहितीपरच आहे.

अण्णासाहेबांच्या रोजनिशीत इंग्लंड व युरोपमधील काही देशांचे वर्णन आहे. म्हणून विलायतेतील प्रवासवर्णनपर काही ग्रंथांचा निर्देश या संदर्भात योग्य ठरेल. श्री. रावजी भवानराव पावगी यांचा 'विलायतचा प्रवास' हा ग्रंथ दोन भागात १८९२ पर्यंत प्रसिद्ध झाला. ह्या ग्रंथात बोटीच्या प्रवासाचे व लंडन शहराचे पुष्कळ तपशीलवार वर्णन आले आहे. त्या काळात माहिती मिळण्याच्या दृष्टीने

---

१. यशवंतराव राजे शिर्के यांची रोजनिशी, (संपा.) ज. बा. कुलकर्णी, मुंबई, इतिहास संशोधन मंडळ, १९७०.
२. वा. ल. कुळकर्णी, 'विविधज्ञानविस्तार : कार्याचे स्वरूप' युगवाणी, दिवाळी अंक, १९७४.
३. कै. रघुनाथ पांडुरंग ऊर्फ दादासाहेब करंदीकर यांची दैनंदिनी, संकलक प्रकाशक विठ्ठल रघुनाथ करंदीकर, सातारा, १९६२.
४. बा. ग. तथा बाबासाहेब खापर्डे, श्री. दादासाहेब खापर्डे यांचे चरित्र, पुणे, प्रसाद प्रकाशन, १९६२.

हा ग्रंथ अत्यंत उपयुक्त म्हणता येईल असा आहे. परंतु पावगींच्या ठिकाणी वृत्तीचा स्वतंत्रपणा नाही. बोटीच्या प्रवासाला प्रारंभ केल्यापासून त्यांचा न्यूनगंड जाणवतो. "ह्या देशात सर्व साहेब लोक आमचे वरिष्ठ तेव्हा सर्वांला मान देण्याची आम्हाला पडली सवय आणि आता प्रसंग पडला त्यांच्याशीच. नोकरचाकर देखील तेच." कोणीही गोरा दिसला की त्याला खडी ताजीम द्यावयाची नाही, कारण कदाचित तो नोकरही असेल असा त्यांना बुद्धीपूर्वक निश्चय करावा लागतो.[१] इंग्लंडमधील स्थळांची वगैरे बारीक तपशीलवार वर्णने पावगींनी केली आहेत. परंतु ती कमालीची वस्तुनिष्ठ. हे सारे पाहताना आपल्याबरोबर कोण होते, त्यांच्या प्रतिक्रिया काय पडतात हेसुद्धा ते उल्लेखित नाहीत. ज्या संस्थानिकांसोबत ते इंग्लंडला गेले होते त्याचा नामनिर्देशसुद्धा येत नाही. एवढी त्यांची वस्तुनिष्ठता असल्याने वर्णनपर पुस्तकाच्या पलीकडे त्याची योग्यता जात नाही. डॉ. पां. दा. गुणे जर्मनीत अभ्यासाला गेले असता इ.स. १९१० ते १९१३ ह्या काळात त्यांनी लिहिलेली पत्रे 'माझा युरोपातील प्रवास' ह्या नावाने ग्रंथरूपाने प्रसिद्ध आहेत.[२] गुणे यांची शैली उत्तम मराठी वळणाची आहे. त्यांच्या वर्णनात थोडीफार व्यक्तिगतता असली तरी त्यामध्ये त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा आविष्कार होताना दिसत नाही. अलीकडच्या काळातील प्रभाकर पाध्ये, गंगाधर गाडगीळ यांची परदेशातील प्रवासाची व अनुभवाची वर्णने लालित्यपूर्ण आहेत. मात्र ती ललितवाङ्मय निर्माण करण्याच्या हेतूतूनच लिहिली गेली आहेत. अशी हेतुपूर्वकता नसूनही म. शिंदे यांचे हे लेखन लालित्यपूर्ण झाले आहे. याचे कारण त्यामधून त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा आविष्कार प्रत्ययकारी रीतीने आपोआप होतो, हेच म्हणावे लागेल.

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांच्या व्यक्तिमत्त्वाचे आकलन करून त्या अनुरोधाने आपण त्यांच्या रोजनिशीचे स्वरूप ध्यानात घेण्याचा प्रयत्न केला. मनाची आध्यात्मिक ठेवण, व्यापकपणे विचार करणारी जीवनदृष्टी, तरल संवेदनशीलता, सूक्ष्म सौंदर्यदृष्टी, भाषेच्या सामर्थ्याची यथोचित जाण इ. वैशिष्ट्यांनी युक्त असणारे म. शिंदे यांच्यासारखे व्यक्तिमत्त्व अपवादात्मकच म्हणावे लागेल. अशा एका असाधारण व प्रगल्भ व्यक्तिमत्त्वाचा प्रत्यय देणारी ही रोजनिशी महाराष्ट्राच्या सामाजिक-सांस्कृतिक जीवनाच्या दृष्टीने जशी महत्त्वाची आहे तशीच वाङ्मय गुणांच्या दृष्टीनेही मौल्यवान आहे.

गो. मा. पवार

---

१. रावजी भवानराव पावगी, विलायतचा प्रवास, भाग १ पुणे, आर्यभूषण, १८८९, पृ. ९.

२. पां. दा. गुणे, माझा युरोपातील प्रवास, मनोरंजक ग्रंथप्रसारक मंडळी, मुंबई, १९१५.

ब्राह्मसमाज शतसांवत्सरिक सफरीची प्रस्तावना

(प्रस्तुत रोजनिशी विभागात नव्याने उपलब्ध झालेली ब्राह्मसमाज शतसावंत्सरिक सफर या रोजनिशीचे संक्षिप्त संपादकीय डॉ. रणधीर शिंदे यांनी लिहिले आहे.)

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी आयुष्यभरात विविध रोजनिर्शीचे लेखन केले आहे. या आधी महर्षी शिंदे यांच्या तीन रोजनिर्शीचे एकत्रित संपादन १९७९ साली महर्षी शिंदे यांच्या जीवनकार्याचे अभ्यासक प्रा. गो. मा. पवार यांनी केले आहे. (यात महाविद्यालयीन विद्यार्थीदशेतील (१८९८), इंग्लंडमधील (१८९९ ते १९०१), येरवड्याच्या तुरुंगातील (१९३०) अशा रोजनिर्शींचा समावेश होता.) इतरही त्यांच्या पॉकेट स्वरूपातील काही अप्रकाशित रोजनिशी आहेत. प्रस्तुतची रोजनिशी १९२८ सालातली आहे. ती पहिल्यांदाच प्रकाशित होत आहे. महर्षी शिंदे यांनी १९२८ साली बंगाल प्रांतात ब्राह्मधर्माच्या शतसांवत्सारिक उत्सवानिमित्त जी सफर केली; त्या काळातील ही रोजनिशी आहे.

गडद चॉकलेटी विटकरी रंगाची २०० पानांची ही वही आहे. कागदाचा रंग पिवळसर झालेला आहे. दोन्ही बाजूंनी मजकूर लिहिला आहे. वहीच्या शेवटून निम्म्या भागापर्यंत काही माहितीपर स्वरूपाचा तपशिल, व्यक्तींची नावे, भेटलेल्या व्यक्ती यांचे निर्देश आहेत. पहिल्याच पानावर *वि. रा. शिंदे ब्राह्मसमाज शतसावंत्सरिक सफर* असे मोठ्या अक्षरात लाल खडूने त्यांच्या हस्ताक्षरातील शीर्षक आहे. साधारणतः ७१ पानांचा हा मजकूर आहे. निळ्या वा काळ्या रंगाच्या शाईच्या पेनने बारीक लयबद्ध, लपटेदार हस्ताक्षरात लिहिलेला हा तारीखवार दैनंदिन वृत्तांत आहे. प्रत्येक दिवसाचा वृत्तांत हा अर्धा किंवा एक पानांचा भरेल एवढा मजकूर आहे. समासात तारीख, वार, महिना स्थळांचे, गावांचे निर्देश आहेत, उत्तरार्धातील नोंदींना शीर्षकेही आहेत. महर्षी शिंदे ब्राह्मधर्माच्या प्रचारदौऱ्यासाठी बंगालकडे पुण्याहून दि. ३ ऑगस्ट, १९२८ ला निघाल्याची पहिली नोंद आहे. तर १४ नोव्हेंबर, १९२८ ला परत मुंबईला घरी पोहचल्याची शेवटची नोंद आहे.

महर्षींच्या यापूर्वीच्या रोजनिशीप्रमाणेच ही रोजनिशीदेखील ऐतिहासिक, सामाजिक व वाङ्मयीनदृष्ट्या फार महत्त्वाची आहे. महर्षींच्या या रोजनिशीत त्यांच्या संपन्न आणि समृद्ध व्यक्तिमत्त्वाचा आविष्कार झालेला आहे. या रोजनिशीमध्ये निव्वळ प्रवासातील नोंदी नाहीत तर महर्षींच्या समाजनिरीक्षणाचा व विचारविश्वाचा भरघोस आविष्कार झाला आहे. एका बाजूला ते समाजवृत्तांत आहे तसेच तो प्रवासवृत्तांतही आहे. असे तिचे दुहेरी मोल आहे. या रोजनिशीला अनेकविध स्वरूपाचे पैलू आहेत. कलकत्त्याच्या ब्राह्मसमाजाचे सेक्रेटरी व शिंदे यांचे स्नेही हेमचंद्र सरकार यांच्या विनंतीवरून महर्षींनी उत्तर बंगाल, बिहार अशा प्रांतात ब्राह्मसमाजाच्या विस्तारासाठी प्रचार दौरा केला. या रोजनिशीचा एक महत्त्वाचा विशेष म्हणजे बंगालमधील ब्राह्मसमाजाची सद्यःस्थिती सांगणारे हे विवरण आहे. बंगाल ब्राह्मसमाजाचे हेमचंद्र सरकार यांची इच्छा होती की शिंदे यांनी उत्तर बंगाल, बिहार व संयुक्त प्रांत आणि पंजाब अशा ५० ते ६० ठिकाणी ब्राह्मसमाजाच्या शतसावंत्सरीनिमित्ताने व्याख्याने द्यावीत व उपासना चालवण्यात. ब्राह्मसमाजाच्या वाढीसाठी व विकासासाठी शिंदे यांचा दौरा त्यांना महत्त्वाचा वाटत होता. शिंदे यांनी जरा नाखुषीनेच हा प्रचारदौरा पत्करला होता, याचे कारण त्यांची तब्येत. वर्षभर ते मलेरियाच्या आजाराने त्रस्त होते. तसेच वाटेतही त्यांना अनेकवार या आजाराचा सामना करावा लागला. मात्र ब्राह्मसमाजाविषयी त्यांच्या मनात असणाऱ्या अंतरिक तळमळीपोटी त्यांनी ही जबाबदारी स्वीकारली होती.

पूर्व बंगालमधील ब्राह्मसमाजाच्या तत्कालिन स्थितीचे चित्र या रोजनिशीत आहे. राजा राममोहन तसेच बंगालमधील ब्राह्मसमाजाचे पुढारपण करणाऱ्या लोकांबद्दल त्यांच्या मनात अतीव आदराची भावना होती. त्याकाळातील बंगालमधील ब्राह्मसमाजाची चित्रे रोजनिशीत आहेत. एका नोंदीत ब्राह्मसमाज हे राममोहनांचे मूर्त स्वरूपातील स्वप्न होते असे म्हटले आहे. तसेच विचारी माणसे स्वप्न आधी पाहतात आणि मग त्याची पूर्तता करतात असे म्हटले आहे. मायकेल अँजोलेच्या मूर्तीचे स्वप्न आधी आणि मग मूर्ती साकार झाली. ताजमहालचे स्वप्न आधी आणि मग ताजमहाल तसेच राजाराममोहन आणि ब्राह्मसमाज यांच्यातील संबंध आहे. तसेच प्रार्थना समाजाने महाराष्ट्रात वारकरी संप्रदायाविषयी आस्थेवाईक भूमिका घेतली होती. प्रार्थना समाजाने तुकारामांचे थोरवी पुढे आणली असे नोंदविले आहे. या काळातील बंगालमधील ब्राह्मसमाजाची स्थिती व समाजाचा व्यवहार या दैनंदिनीत शिंदे यांनी नोंदविला आहे.

महर्षींनी ज्यावेळी पूर्व बंगालमध्ये हा प्रचारदौरा केला होता तो साधारणत: ब्राह्मसमाजाच्या उतरणीचा काळ होता. काही भाग वगळता ब्राह्मसमाजाचा विस्तार होण्यात अनेक अडचणी असाव्यात. एका बाजूला स्वातंत्र्य आंदोलनाचा लढा तीव्र झालेला होता. ब्राह्मसमाजाचे राष्ट्रीय चळवळ व सामाजिक सुधारणांबद्दलचे धोरण हे कचखाऊपणाचे होते. तसेच समाजातील नेतृत्वामध्ये संघटनात्मक बाबींवर काहीसे दुर्लक्ष झालेले होते. तसेच एकीचा अभावही त्यामध्ये नव्हता. या साऱ्या ब्राह्मसमाजाच्या ऱ्हासपर्वाच्या काळातील महर्षींना जसे दर्शन घडले तसे त्यांनी वेळोवेळी या रोजनिशीत नोंदवून ठेवले आहे. अर्थात ब्राह्मसमाजाचे हे वळण महर्षींना सुसह्य वाटत नाही. आंतरिक वेदनेने व तळमळीने ते या ब्राह्मसमाजाच्या स्थित्यंतराकडे पाहत आहेत.

शिंदे यांचा हा प्रचारदौरा एका समाजनिष्ठ, बहुश्रुत व्यक्तिमत्त्वाचा प्रवास होता. तो केवळ ब्राह्मसमाजापुरता सीमित नव्हता. या प्रवासात उघड्या डोळ्यांना दिसणारा सारा समाज, निसर्ग, मानवी स्वभाव, वर्तन याविषयीची चौफेर अशी निरीक्षणे त्यांनी रोजनिशीत नोंदविली आहेत. तसेच त्या निरीक्षणावरच्या खास अशा शिंदे यांच्या प्रतिक्रिया आहेत. आपल्या अवतीभोवतीच्या वास्तवाचा कोरडा संस्कार त्यांच्या मनावर उमटत नव्हता तर त्यावरच्या मूल्यात्मक स्वरूपाच्या प्रतिक्रियाही त्यांनी वेळोवेळी नोंदविल्या आहेत. एका समाजशास्त्रज्ञाच्या वा जाणून घेण्याच्या भूमिकेतून हा सारा पसारा त्यांनी डायरीत नोंदवून ठेवला आहे. ब्राह्मसमाज, कुटुंबे उपासनापद्धती, त्यांची राहणीमान यासंबंधीच्या या प्रतिक्रिया आहेत.

बंगालमधील दुर्गापूजा उत्सवाचेही शिंद्यांनी असेच वैशिष्ट्यपूर्ण निरीक्षण नोंदविले आहे. दुर्गापूजा मेळा पाहण्यास सुशिक्षित बंगाली, पहाडी, नेपाळी, भूतानी मजूर आल्याचे सांगून शिंदे यांनी महाराष्ट्रातील गणपतीउत्सवाशी दुर्गापूजेशी तुलना केली आहे. गणपती उत्सव हा केवळ राष्ट्रीय करमणूकप्रधान असून दुर्गाउत्सवात पूजेचे अंग जास्त असल्याचे नोंदविले आहे. या दुर्गात्सवात वाजंत्र्याचा आणि भटजींचा सुळसुळाट असल्याचेही त्यांनी नमूद केले आहे. इतिहासकाळात दोन वेगवेगळ्या प्रदेशात निर्माण झालेल्या उत्सवाची ही एका अर्थाने समाजमीमांसाच आहे.

त्यांच्या या समाजनिरीक्षणाचा आणखी एक पैलू म्हणजे त्यांनी त्या त्या स्थलावकाशाचे फार बारकाईने चित्रण केले आहे. ते गाव असो की मंदीर की एखादे नदी वा शेत त्याचे वास्तव चित्रदर्शी वर्णन केले आहे. दार्जिलिंगला उतरणीवर दिसणारे चहाचे अतिसुंदर मळ्यांचे वर्णन आहे. बाजारच्या

दिवशी नेपाळी, भुतानी बायका पाठीवर बांबूच्या पाट्या व त्यात आपली मुले घेऊन जाणाऱ्या स्त्रिया, त्यांचा पोशाख याचे वर्णन केले आहे. बांकीपूर या पाटण्याजवळचे रेल्वेतून दिसणारे *गंगेच्या नयनमनोहारी सुजलसुफल तटाकीचे* फार सुंदर वर्णन आहे. तेथील शेतात दिसणारी १५-१६ फूट उंचीची ज्वारी आणि सात-आठ फूट उंचीच्या तुरीचे वर्णन त्यांनी केले आहे. मिरची, तंबाखू, एरंड त्याचप्रमाणे शिशवी, आंबा, वड वगैरे झाडाचा बंगालचा देखावा मागे पडून शिंदीचे साम्राज्य दिसू लागल्याचे त्यांनी नमूद केले आहे. गयेस मारुतीची मंदीरे व मुर्ती पाहिल्याचे नोंदविले आहे. नव्यानेच उभ्या राहिलेल्या बनारस हिंदू विश्वविद्यालयाचे तपशीलवार चित्र आहे.

या तीन महिन्याच्या प्रवासात महर्षींनी ज्या गावात मुक्काम असेल तेथे विविध विषयांवर व्याख्याने दिली. शेतीजीवन, हिंदूधर्म व सुधारणा, भारतीय इतिहास व आधुनिक शिक्षणपद्धती या विषयांवर त्यांनी व्याख्याने दिली. या प्रवासातील शिंदे यांच्या व्याख्यानाचे विषय जरी आपण ध्यानात घेतले तरी त्यातील वैविध्याची आपणांस कल्पना येते.

अस्पृश्यतानिवारणाचे कार्य हा शिंदे यांच्या जीवनकार्याचा एक महत्त्वाचा भाग होता. मानवी जीवनाला कलंकभूत असणारा जातिभेद नष्ट व्हावा यासाठी त्यांनी आयुष्यभर ध्यास घेतला होता. २८ सालातील या प्रवासात त्यांनी अस्पृश्यता सुधारणाविषयक जे काही काम केले त्याच्या नोंदी या रोजनिशीत आहेत. या प्रवासात ते जाणीवपूर्वक अस्पृश्यांच्या वस्तीत जात. त्यांच्याशी चर्चा करत. शिवाय त्यांच्याबरोबर सहभोजनही घेत असत. या रोजनिशीत त्यांनी नाशिक जिल्ह्यातील नांदगाव मुक्कामी जुना व नवा म्हारवाडा पाहिल्याची नोंद आहे. तसेच बऱ्याचवेळेला ते प्रवासातील अस्पृश्य मुलांच्या बोर्डिंगची पाहणी करत. त्या मुलांबरोबर जेवण करत. बोर्डिंगमधील मुलांना मिळणाऱ्या सोयी सुविधांबद्दलच्या, चांगल्या वाईटपणाबद्दलच्या आपल्या प्रतिक्रिया नोंदविल्या आहेत. पुढे बंगाल, ब्रह्मदेशचा काही भाग, बिहारमध्ये त्यांनी बौद्धविहारास व पागोड्यास भेटी दिल्याच्या नोंदी आहेत. सारनाथच्या बौद्धकालीन अवशेषाबद्दल त्यांनी तपशीलवार लिहिले आहे. नागपूरहून महर्षी रेल्वेने कलकत्त्याला निघाले होते. त्यावेळी स्टेशनवर शिंदे यांना निरोप देण्यासाठी नागपुरातील गवई, बंदसोडे यांच्याबरोबरच त्यांचे काही अनुयायी व चोखामेळा बोर्डिंगची मुले उपस्थित होती. या मंडळींनी शिंदे यांच्या गळ्यात पुष्कळ हार घातले व त्यांना सोबत *शिदोरी व पाथेय* दिले. यानंतर शिंदे यांनी त्याबद्दल एक वाक्य लिहिले आहे, *मला ते फार आवडले.*

महर्षींच्या एकूणच जीवनदृष्टीमध्ये स्त्रीबद्दलचा प्रागतिक दृष्टिकोण पहायला मिळतो. तो या रोजनिशीमधूनही व्यक्त झाला आहे. स्त्रियांच्या हळव्या भावदर्शनापासून ते तिच्या स्वातंत्र्याबद्दलची कल्पना महर्षींच्या मनात वसलेली होती. त्याचा आविष्कार या रोजनिशीतून झाला आहे. या प्रवास दौऱ्यात अनेकवार स्त्रियांच्या स्थितीबद्दल व सुधारणेबद्दलचे महर्षींचे विचार प्रकट झाले आहेत. स्त्रियांना समानतेच्या नात्याने वागणूक मिळाली पाहिजे, असे त्यांना मनोमन वाटे. दि. २४ ऑगस्ट च्या उपासनेप्रसंगी घडलेल्या प्रसंगाचे शिंदे यांनी निवेदन केले. या प्रसंगातून शिंदे यांची स्त्रियांबद्दलची उदार दृष्टी व्यक्त झाली आहे. प्रेमाला बंधन असलेच पाहिजे असे ब्राह्मसमाजाचे मत होते. महर्षींना ते पटत नाही. त्यावेळी त्यांनी नोंदविले आहे, *गेल्या शतकात ब्राह्मसमाजाने स्वातंत्र्याचा पुकारा केला आहे. आता पुढल्या शतकात जनता जागृत होणार आहे. स्त्रिया समानाधिकारी होणार आणि युवक स्वतंत्र होणार. दास मनोवृत्तीचे प्रत्यक्ष समाजाकडून निर्मूलन झाल्यावर वरील तिन्ही बाजूनी*

वावटळ उठणार त्याला ब्राह्मसमाज तयार आहे काय ? आजवर धार्मिक स्वातंत्र्याचे भावनामय युद्ध झाले. येथून पुढे आर्थिक स्वातंत्र्याचे व्यावहारिक युद्ध जुंपणार यात ब्राह्मसमाज माघार घेईल तर आपणच उठविलेल्या वावटळीत आपणच गारद होण्याची आपत्ती येणार.

दार्जिलिंगला एक दिवशी संध्याकाळी गावाबाहेर भटकंती करीत असताना त्यांना चहाचे मळे दिसतात. त्यावेळी त्यांना भगिणी जनाक्कांची तीव्रतेने आठवण होते. एका चहाच्या झाडाची हिरवीगार पाने वा काही फुले ते पत्रातून जनाक्काला पाठवून देतात. तसेच या सफरीची अखेरही या प्रेमभाववृत्तीच्या संदर्भाने झाला आहे. मुंबईला ते पंजाब प्रांताची सफर सोडून जनाक्काच्या वाढदिवसासाठी परत येतात. आणि जनाक्कांच्या वाढदिवसाच्या कार्यक्रमात आनंदाने सहभागी होतात. त्यादिवशी छोटेखानी उपासना करतात याची नोंद या रोजनिशीत आहे. महर्षींच्या मनातील या नव्या स्त्रीदर्शनाबरोबरच, त्यांच्या उदात्त दृष्टिकोणाबरोबरच त्यांच्या मनातील हळव्या भावबंधाचे प्रकटीकरण या रोजनिशीतून झाले आहे. या रोजनिशीत शिंदे यांच्या मनातील भावदर्शन आणि मूल्यविचारही प्रकट झालेला आहे. युरोपियन व भारतीय जीवनासंदर्भातील तौलनिक दृष्टीही आहे. भौतिक साधनांची रेलचेल व आधुनिकीकरणाने काही पेच भारतीयांच्या जीवनात उद्‌भवले आहेत. त्याबद्दलची निरीक्षणे महर्षी शिंदे यांनी नोंदविली आहेत.

शिंदे यांची ईश्वरविषयक कल्पनाही वैशिष्ट्यपूर्ण आहे. सनातनी, कर्मठ व परंपरानिष्ठ मूर्तिपूजा त्यांना मान्य नव्हती. मानवी सेवाधर्मात ते ईश्वराचे रूप पहात होते. परंपरानिष्ठ सणांचा व ईश्वरी केंद्राचे दडपण त्यांच्यावर नसावे त्यामुळेच महाराष्ट्रातील गणपती उत्सवाकडे व बंगालमधील दुर्गोत्सवाकडे ते तिरकसपणाने पाहू शकतात. आपल्या या प्रवासात कौटुंबिक उपासनाप्रसंगी ते ईश्वराचे चिंतन करत असत. या उपासनांत ते वेगवेगळ्या पदांचा उपयोग करत. मांडूक्योपनिषदातील काही पदांचे वाचन तसेच धम्मपदातील सहस्त्र वर्गाचे विवेचन त्यांनी विवेचनासाठी घेतले आहे. बंगालमध्ये एका व्याख्यानात त्यांनी ईश्वरविषयक कल्पनेचा सारांश एका नोंदीत दिला, 'ईश्वराला आपली स्तुती, आराधना आवडत नाही. वृक्ष, लता, पर्वत, समुद्रांना त्यांच्या सौंदर्याच्या व गाभी यांच्या आराधना आवडत नाहीत. मानवीयतेला त्या आवडत नाहीत. केवळ आपल्या मुलाने सुखी व्हावे इतकीच तिची अपेक्षा. मग स्वर्गीय मातेच्या अपेक्षा जास्त काय असणार ? ईश्वराप्रमाणे आम्ही त्यांच्या पुत्राने पवित्र व सात्विक व्हावे.' अशी शिंदे यांनी अपेक्षा व्यक्त केली आहे. ईश्वराच्या स्तुतीपरायणतेला व भक्तिपरायणतेला शिंदे येथे विरोध दर्शवितात. शिंद्यांची ईश्वरविषयक कल्पना ही उदात्त व उन्नत स्वरूपाची होती. त्याचा प्रत्यय या नोंदीवरून येतो.

शिंदे यांना याही प्रवासात अनेक मानहानीच्या प्रसंगांना सामोरे जावे लागले. शिंदे यांच्या एकंदरीतच जीवितकार्याला शोकात्म अशा कारुण्याची किनार आहे. आपले व्यक्तिगत आयुष्य समाजसेवेसाठी अहर्निश वाहूनही त्यांच्या वाट्याला नेहमीच उपेक्षा आली. ब्राह्मसमाजाकडूनही महर्षींना अवमानकारक वागणूक मिळालेली आहे. पूर्व बंगालचा हा खडतर प्रवास करुन ते मुंबईत पोहचले. त्यावेळी त्यांची आणि दा. गो. वैद्य यांची भेट झाली. वैद्य यांनी शिंदे यांना सांगितले की १९६० चा मुंबई समाजाच्या महर्षींच्याबद्दल अन्यायकारक ठराव कमिटीला न विचारता अध्यक्षांनी खासगीरित्या कलकत्त्याकडे ब्राह्मसमाजाच्या सेक्रेटरीकडे पाठविला आहे. त्यावेळी हे ऐकून मनोमन शिंदे यांना फार वाईट वाटले. त्या प्रसंगाबद्दल त्यांनी लिहिले आहे, ह्या मुंबई प्रार्थनासमाजाच्या अन्यायाची

व भीवदेखल्या खुनशी अत्याचाराची मला कल्पना आली. धर्माच्या नावाने अधर्म आजवर कसे होत आले आहेत हे आठवून मी शांत झालो. धर्मावरील अनन्य निष्ठा हा त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा अपरिहार्य भाग होता. त्यामुळे ते आपल्या जीवनातील आघात पचवू शकले.

महर्षींच्या आजारपणाच्या व दगदगीच्या काळात त्यांनी बंगालचा प्रवास केला. ब्राह्मसमाजाच्या अंतर्गत दुहीमुळे व लोकांच्या अनास्थेमुळे त्यांचे मन उदास आणि निराश झाले होते. मनाच्या अशा उदास अवस्थेत त्यांचा खराखुरा सोबती होता तो निसर्ग. निसर्गाची रमणीय रूपे पाहून त्यांच्या मनाला उल्हास वाटे. निसर्गाची संगत हे त्यांच्या मनाच्या विसाव्याचे ठिकाण होते. महर्षींनी या प्रवासात जो निसर्ग पाहिला त्यात ते अंत:करणापासून रमले व त्याची आस्थेवाईक चित्रे रोजनिशीत रेखाटली आहेत. त्यांच्या अंत:करणातील शुद्धतेचा, सहजलयीचा सूर निसर्गाशी जुळतो. या निसर्गरूपांची अत्यंत लाघवी रूपे महर्षींनी या रोजनिशीत रेखाटली आहेत. हिमालयातील बर्फाच्छादित कांचनगंगेचे दर्शन घेण्यासाठी ते पहाटे साडेतीन वाजता उठत. पाऊस व ढगाळ वातावरण असले की ते निराश होत. मैदानातील टीस्टा नदीच्या देखाव्यात व मेघांच्या विलासात रमतात. कांचनगंगेचे दर्शन त्यांना सोज्ज्वळ वाटते. निसर्गाच्या सहवासात त्यांच्या मनाची तद्रूपता होते. *दार्जिलिंगचा पहाटेचा थंडीतील धुक्याचा प्रशांत आणि गंभीर देखावा कधी विसरणार नाही* असे एके ठिकाणी त्यांनी म्हटले आहे. कांचनगंगेच्या टेकडीच्या शिखरावर दोन इंच जाडीचा भरगच्च रंगीबेरंगी गालिचा पसरल्याचे चित्र त्यांना दिसते. दवाने चिंब भिजलेल्या गालिच्याचे दर्शन ते तद्रूप होऊन प्रार्थना करीत असताना त्यांच्या पायावर दोन-तीन जळवा चढून यथेच्छ रक्त शोषण करीत होत्या. असे त्यांनी नोंदविले आहे. निसर्ग हा त्यांना जगायला प्रेरक वाटे. कांचनगंगेच्या ६०० फुटावरील शिखरावरून ते खालील मैदानाचा सुंदर देखाव्याचे पाहतात. त्याचे वर्णन त्यांनी असे केले आहे. *नद्या, झाडे वरील ढग ही सारी चित्रांतल्याप्रमाणे दिसत होती. मन फारच रमले. येथील एकांतात एकेकच झोपडी त्यातील गुरे, कुत्री, कोंबडी फारच मोहक दिसल्या. हा माझा प्रवास स्कॉटलंडमधील बेनलोमंड शिखरापेक्षा अधिक प्रेरक होता.* असे नोंदविले आहे.

महर्षी शिंदे यांच्या व्यक्तिमत्त्वात एक प्रसन्न निकोपवृत्तीची विनोदात्मता होती. या त्यांच्या अंत:करणातील निखळ विनोदात्मतेचा प्रत्यय त्यांच्या या रोजनिशीतून झाला आहे. प्रवासातील विविध सामाजिक निरीक्षणबद्दल असो किंवा व्यक्तिगत स्वरूपाच्या नामुष्कीचा प्रसंग असो त्याकडे ते विनोदात्म नजरेतून पाहतात. मलियाट या पाणथळीच्या गावी शिंदे गेले होते. सकाळी उठल्यावर आपली व सहका-याची प्रात:विधीची पंचाईत कशी होते हे त्यांनी खुमासदारपणे सांगितले आहे. सर्व बाजूंनी पाणी वेढलेले असल्यामुळे होडीने त्यांना प्रात:विधीस जावे लागते. होडी पाण्यात डगमगू लागते. बंगाली येत नसल्यामुळे कुणाला विचारताही येत नाही. हा प्रसंग मिश्किलपणे रेखाटला आहे. कॉमिला येथे ते व्याख्यानस्थळी पोहचल्यावर त्यांना आठवते की ब्रह्मदेशातून आणलेली शाल आणि पिशवीतील टॉवेल, लोटा, वाटी वगैरे गाडीतच विसरली. याप्रसंगी त्यांनी लिहिले आहे, *जी माझी वैराग्याची झोळी मला सोडून गेली ह्यावरूनच वैराग्यास अद्यापि मी किती अपात्र आहे. ह्याची सूचना मला वरुन मिळावी. झोळी गेली तर मला वाईट वाटण्याचे थांबेना मग काया सोडतेवेळी काय वाटेल ते आठवले. तथापि वैराग्य माझे हळूहळू वाढत आहेसे दिसते.* या प्रसंगाकडे शिंदे यांनी विनोदात्म नजरेतून पाहिले आहे. आपल्या अंतरंगातील विचारभावनांचे अत्यंत प्रामाणिक असे हे निवेदन आहे.

भाषेच्या व वाङ्मयीन गुणवत्तेच्या दृष्टीने शिंदे यांची ही रोजनिशी फार वरच्या दर्जाची आहे. विसाव्या शतकाच्या पूर्वार्धातील मराठी गद्यशैलीचा नमुना या रोजनिशीतील भाषेतून पहायला मिळतो. शिंदे यांच्या बहुविध स्वरूपाच्या व्यासंगाचा व प्रगल्भ भाषारूपाचा तीमधून आविष्कार झ ाला आहे. महर्षीची ही रोजनिशीही वाङ्मयीनदृष्ट्या सरस अशी आहे. दि. २२ ऑगस्ट रोजी कलकत्त्याला शतसावंत्सरिक उत्सवाच्या मुख्य दिवशी रवींद्रनाथ टागोर उपासना चालविणार होते. रवींद्रनाथांना पाहिल्यानंतर त्या प्रसंगाचे शिंदे यांनी वर्णन पुढील शब्दात केले आहे.

आज प्रसिद्ध कविवर्य रवींद्रनाथ ठाकूर उपासना चालविणार होते. साडेसात झाले तरी ते आजारी असल्यामुळे आले नाहीत. साडेआठ वाजता कवीवर्य आले. मी ह्यांना प्रथमच पाहिले. चेहरा अत्यंत सुंदर, गंभीर किंचित औदासिन्याची छटा दिसली. प्राचीन ऋषीकाळाची कल्पना मूर्त स्वरूपात आली. वेदी सर्व स्फूर्त झाली. वेदी भोवतील मोठे मोठे शुभ्र व लाल उत्फुल्ल गुलाबाची फुले विकसित होऊन कवीचे उद्‌गार ऐकण्यास टपण्याचा भास झाला. खाली मान घालून जे पद्मासन घातले ते अर्धा तास वरच पाहीनात. आवाज अलगुजासारखा कोमल व हृदयप्रवेशी होता. मग पुढे विरळ विरळ अपांग दृष्टीने श्रोतृवंदाकडे पाहत पाहत आपले प्रवचन वाचू लागले. त्यावेळी कमलनयन म्हणून काय चीज असते ती अनुभवयास आली. केशकलापांची शुभ्रशोभा गोधुमकांतीच्या भव्यकपाळ फलकावर विलसत होती. पिंगट रंगाचा रेशमी सदरा व सैल सदरा व त्याच रंगाची चादर पसरली होती. सरळ नासिका. विखुरलेली दाढी. पाणीदार दृष्टीविक्षेप एकंदरीत एक दैवतच पुढे दिसले.

रवींद्रनाथांच्या प्रथमदर्शनाचे इतके विलोभनीय काव्यात्म वर्णन क्वचितच कोणी केलेले असेल. रवींद्रनाथाच्या उदात्त आणि रूबाबदार व्यक्तिमत्त्वाचा संस्कारठसा या नोंदीत आहे. काव्यात्म वर्णन करताना चिंतनाचा पदर ते कुठेही ढळू देत नाहीत. रवींद्रनाथांच्या वैशिष्ट्यपूर्ण शरीर ठेवणीचे, प्रवचनाचा जो संस्कारठसा शिंदे यांच्या मनावर उमटला. त्याचे काव्यात्म दर्शन महर्षींनी उभे केले आहे. यातील प्रतिमासृष्टी, शब्दांचा वापर प्रतिभावंत कवीलासुद्धा आव्हानपर वाटावा असा आहेत. रवींद्रनाथाच्या हळुवार, ऋषिवत चाहुलीचे, विभ्रमांचे फार बारकाईने हे वर्णन केले आहे. त्यातून त्यांची भव्यताच व्यक्त झाली आहे. रवींद्रनाथांच्या उच्चाराला आवाजाला त्यांनी अलगुजाची उपमा दिली आहे. तसेच तो कोमल व हृदयप्रवेशी होता असे म्हटले आहे. शिंदे या रवींद्रदर्शनाने व त्यांच्या साक्षात्कारी माहोलाने अंत:रंग व बहिरंगाने किती प्रभावीत झाले होते. त्यात ते किती गुंतले होते याची साक्षच या वर्णनातून प्रकट झाली आहे.

७१ दिवसांच्या या नोंदी केवळ दैनंदिन अंतरंगाचा आविष्कार करणाऱ्या या नोंदी आहेत. जीवनाविषयी, माणसांविषयी व निसर्गाविषयी आस्था व प्रेम असणाऱ्या संवेदनशील मनाची ओथंबलेली ही चित्रे आहेत. अगदी या रोजनिशीच्या शीर्षकावरुनही आपणास त्याचा प्रत्यय येतो. शतसांवत्सरिक सफर असे त्यांनी म्हटले आहे. सफर या शब्दप्रयोगातूनही त्यांच्या या दैनंदिनीची दिशा आपणास कळते. या रोजनिशीतील स्थलदर्शन असो, व्यक्तीची वर्णने असोत, निसर्गाच्या विलोभनीय रूपाचे केलेले निवेदन असो किंवा अंतरंगातील भावदर्शन हे सारे फार वरच्या दर्जाचे आहे. एखाद्या सरस अशा प्रवासवर्णनाचे गुण या रोजनिशीतून प्रकटले आहेत.

विसाव्या शतकाच्या पूर्वाधातील गद्यशैलीची अनेक उदाहरणे या रोजनिशीतील भाषावापरातून पहावयास मिळतात. वारंवार येणारे शब्द म्हणजे *दोन प्रहरी, खास पद रचिले, दिवसभर निजून होतो, ओवळणी.* शिंदे यांची स्वत:ची काही व्यक्तिविशिष्ट अशी शब्दरूपेही वारंवार आहेत. गायकवाडसाठी *गाइकवाड* असे शब्दरूप वापरतात. तर *देखावा* हा शब्दप्रयोग ते वारंवार वापरतात. शिंदे यांच्या मनाचा सात्विकपणा काही विशिष्ट शब्दप्रयोगातून वारंवार आवृत्त झाला आहे. सेवाभाव असो वा सहकार्याची भावना त्याविषयी शिंदे यांच्या मनातील सात्त्विक स्वरूपाचा कृतज्ञताभाव वैशिष्ट्यपूर्ण शब्दप्रयोगातून व्यक्त झाला आहे. *अमृतलाल गुप्त ह्यांची प्रांजल प्रार्थना झाली असे लिहिले आहे.* एका उपासनेविषयी ब्राह्मी कुटुंबातील स्त्रीविषयी *तिने फारच पूज्यबुद्धी दाखवून अगत्य प्रकट केले.* असे म्हटले आहे. इतरांविषयी आपल्या मनात वसत असलेला आदरभाव हे केवळ एका शब्दाने नोंदवून त्यांना पुरेसा होत नाही तर शिंदे त्यासाठी आपल्या मनातील उदारता, कृतज्ञता, आदरभावना अधिक उदार व विस्तारित रूपात व्यक्त करण्यासाठी यासारख्या विशेषणरूपाचा अधिकांशाने वापर करतात. महर्षींची ही गद्यशैली व्यासंगयुक्त घडीव भाषारूपाची शैली आहे. त्या काळातील खास देशी अशी अनेक भाषारूपे शिंदे यांच्या या रोजनिशीत आहेत. *हाथरूणात पडून राहिलो, मजविषयी पूज्यबुद्धी दाखविली,* राममोहन यांच्या श्राद्धादिवशी *प्रा. राममोहन मुसलमानप्रिय दिसतो, दोन प्रहरापासून मी निजून राहिलो.* यासारखे शब्दप्रयोग या रोजनिशीत ठिकठिकाणी आहेत. बंगालमधील एका व्याख्यानाचे वर्णन करताना त्यांनी लिहिले आहे. *माझे व्याख्यान उत्तम वठले. प्रथम बंगालीत पाचसात मिनिटे बोललो.* अशा प्रकारे *स्वभाषेत परकीयाने नांदी केल्यामुळे श्रोतृवृंद खुष होते.* याप्रकारचे निवेदन केले आहे.

त्यांच्याविषयी एकाने शिंदे यांच्या विरोधात केलेला खोटा पत्रव्यवहारास त्यांनी *हिरवट प्रकरण* असा शब्द वापरला आहे. खेड्यातील सकाळच्या उपासनांना *उषाकीर्तने* असे संबोधले आहे. चष्म्याच्या बॉक्सला त्यांनी *चष्म्याचे घर* असे म्हटले आहे. बनारसमधील रस्त्यावरील गर्दीचे महर्षींनी त्यांच्या मिश्किल शैलीत वर्णन आहे. 'पंजाबी, बंगाली, गुजराथी, तेलंगी ह्यांचा रंगबेरंगी देखावा व त्यांच्या भाषांचा हार्मोनियम नेत्रांना व कर्णांना सुखावह वाटत होते.'

एकेका शब्दांनी तपशीलभरीत त्या चित्राला समूर्त करण्याची त्यांची शैली आहे. बनारसमधील अनेक ठिकाणचे वर्णन त्यांनी याप्रकारचे केले आहे. तेथील अन्नछत्राचे वर्णन त्यांनी किती बारकाईने केले होते. याचा प्रत्यय पुढील निवेदनापासून येतो. *दोन बाजूनी तीन चार मजली हवेल्या त्यांत माणसांची व गुरांची खेचाखेची. बनारशी रेशमी वस्त्र व पितळेची सुंदर सामानांची दुकाने येथेच आहेत. मोठमोठ्या अन्नछत्राचे दारात शेकडो अतिथी, अभ्यागत, वैरागी, अनाथ, विधवा, विद्यार्थी जेवणाची वाट पाहत बसलेले दिसले. १००-१५० लोकांत साडेदहाच्या आत अशा ठिकाणी अन्न मिळते. महिन्यातून तीनवेळांपेक्षा जास्तदा मिळत नाही. डाळ-भात, भाज्या, दूध, दही भरपूर मिळते. मात्र येथेच बसून खाल्ले पाहिजे. भिक्षेकरी, यात्रेकरी, गिऱ्हाईक ह्यांची खेचाखेची होते.* असे यथातथ्य वर्णन केले आहे. महर्षींच्या या रोजनिशीचा एक महत्त्वाचा भाषाविशेष म्हणजे या रोजनिशीत आलेली निसर्गवर्णने. सृष्टीची आल्हाददायक आणि विलोभनीय रूपे त्यांना भावत आणि ती रूपे जिव्हाळ्याच्या भाषेत त्यांनी वर्णन केली आहेत. त्यांच्या या भाषावापराला अपूर्वता व लक्षणीय वेधकता लाभते.

या रोजनिशीचा शेवटही फार परिणामकारकरित्या त्यांनी नोंदविला आहे. एखाद्या महाकाव्याचा शेवट शोभावा अशा शोकात्म प्रसंगाने या रोजनिशीची अखेर झाली आहे. महर्षी शिंदे हे सव्वा तीन महिन्याच्या दगदगीचा प्रवास संपवून अखेरीस पुण्यास येतात. उतार वय, मलेरियाचा आजार, प्रवास याचा त्यांना शारीरिक आणि मानसिक त्रास झालेला होता. प्रवास संपल्यानंतर दोन आठवडे झाले तरी त्यांना हुशारी वाटेना. या प्रवासात त्यांनी ब्राह्मसमाजाची जी स्थिती पाहिली त्यावरून त्यांचे मन अस्वस्थ होते. समाजाचे कसे होईल या विचारांनी त्यांच्या मनात काहूर माजले होते. मन काही शांत होत नव्हते. तीनचार दिवसांनी दिवाळीचा सण होता. भगिनी जनाक्काचा एकावन्नावा वाढदिवस त्यांनी घरीच उपासना चालवून साजरा केला. ही उपासना संपवून त्यांनी आपल्या मनातील खळबळीला व अस्वस्थतेला विराम दिला आहे. रामदासांच्या काव्यपंक्तीचा आधार घेऊन या रोजनिशी शेवट केला आहे. त्या ओळी पुढीलप्रमाणे. प्रवासात काय किंवा घरी काय, सुख हे मानून घेण्यातच आहे.

जगी सर्व सुखी असा कोण आहे ।।

विचारी मना तूच शोधूनी पाहे ।।

-रामदास

ॐ शांतिःशांतिःशांतिः

अशा शब्दांत या रोजनिशीचा शेवट केला आहे. आपल्या मनातील व्यक्तिगत आणि सामूहिक विचारांच्या वादळांना अशा पद्धतीने विराम दिला आहे.

एकंदरीतच महर्षींची ही रोजनिशी सामाजिक आणि वाङ्मयीनदृष्ट्या फार मोलाची आहे. खानदेश, विदर्भाबरोबरच बंगालमधील लोकस्थितीचे तसेच ब्राह्मसमाजाच्या स्थितीचे तीमध्ये वर्णन आहे. महर्षींच्या अंतरंगाचा व वैशिष्ट्यपूर्ण दृष्टीचा आविष्कार तीमध्ये आहे. एका प्रगल्भ कृतिशील समाजसुधारकाची वाङ्मयीनदृष्ट्या अत्यंत सरस अशी ही रोजनिशी आहे.

रणधीर शिंदे

फर्ग्युसनमधील रोजनिशी
(१८९८-१८९९)

quite unintelligible. For it is not an element but a compound that may be again analysed into Rent etc. etc. Thus the whole Distribution takes place between the owners of matter of the labourers [physical and intellectual]. [The] rhetoric and the constant humourous..... of the author are out of place in a scientific expositon which he attempts and go to swell the volume unneccessarily. The same ideas are repeated and hammered out into an unnatural length. The refutation of the Recardian theory of Rent is not perfectly satisfactory, though well-attempted.

२७ मार्च ९८

चिंतामणीस[३] भेटावयास स्टेशनवर जायचे म्हणून पहाटे ३ वाजताच उठलो. पण वेळ कळेना. स्टेशनापर्यंत वाटेने म्युनिसिपालिटीचा एकही कंदील दिसला नाही. रे मार्केटात घड्याळ पहाण्यास गेलो तर तेथेही उजेड नव्हता. म्युनिसिपालिटीची दरिद्रावस्था पाहून वाईट वाटले. चिंतामणी तर त्या गाडीने आलाच नाही. तसाच डेक्कन कॉलेजात गेलो. संध्याकाळी बंडगार्डन्समध्ये सास्न्यांशी[४] चिंतामणीसंबंधी [बोलणे] झाले. आमच्या भावी मंडळीविषयही [बातचीत झाली]. सास्ने यांचा काय तो निश्चय ठरणार हो [ता]. [त्या] विषयी त्यास विचारण्यास विसरलो. त्यांनीही सांगितले नाही!! काय विसराळूपणा व हलगर्जीपणा!

ता. २८ मार्च ९८ सोमवार

'काळ' चा[५] पहिला अंक वाचला. मुख्य लेखात व्यवहार अगर तात्त्विकतेपेक्षा कवित्व अधिक दिसले. 'काळ' शब्दाची व्युत्पत्ती चांगली केली आहे. तिजवरुन 'काळ' च्या ऐवजी 'काल' असे म्हटले असते तर अधिक अनुरूप व अर्थबोधक झाले असते. कारण 'काळ' या महाराष्ट्र रूपात दुष्ट प्रसंग, संहारक, यम इ. अर्थ येतात. कदाचित संपादकास देशी भाषेचा फार अभिमान वाटून काल हे संस्कृतरूपही खपले नसेल. निघालेल्या अंकावरून लोकपक्षाला ही नवीनच भर झाली म्हणावयाची. पण हे निराळेच पत्र न काढता केसरी पत्रच आठवड्यातून २ दा अगर ३ दा काढले असते तर फार बरे झाले असते. केसरीने आतापर्यंत प्रत्याहिक झाले पाहिजे होते. पण एकाचे दोनही त्यास अद्यापी का होता येत नाही व ज्ञानप्र [काश].... झाले हे कळत नाही.

आज आमच्या वाड्याच्या मालकाची [६] (कंत्राटदाराची) गृहस्थिती अवचित समजली. मी आजपर्यंत हे कुटुंब फार कुलीन व सुशील मराठ्यांचे असेल असे समजत होतो. व पुढे जनाबाईची चांगली सोय जमेल अशी फार आशा झाली. आल्यापासून आम्ही दोघांनी सर्व कुटुंबाच्या माणसास फारच लावून घेऊन राहण्याचा यत्न केला. पण लवकरच ही माणसे फारशी माणसाळण्यासारखी दिसली नाहीत. म्हणून हळुहळू निराशा होऊ लागली. मालकास 'काका', मालकिणीस 'काकू', मुलीस (जनाबाईच्या सोबतीणीस) 'ताई' अशा नावांनी आम्ही हाका मारितो. बऱ्याच वेळा यांच्या वर्तनावरून आपण श्रीमंत आहो ही गोष्ट त्यांच्या ध्यानात वाजवीपेक्षा जास्त ठसली आहे असे दिसून आले. तेव्हा जनाक्काला राग येई. काल काकांच्या भावांच्या घरी हळदी-कुंकवाला काकू व

माझे मन वेधत आहे! अहाहा! रामदेवरावा, तुझा मला फार हेवा वाटत आहे. करमणूककारा, तुझ्या पत्रातल्याहीपेक्षा मायादेवीचे चित्र माझे हृदयावर किती तरी सुरेख उठले आहे! पुढील अंकी तू कृष्णदेवास मायादेवीचे पाणिग्रहण करायला लावणार हे आताच कळून चुकले आहे. उष्णकाळी कुलीन वधूंनी नेसलेल्या पातळ वस्त्रातून त्यांची कोमलांगे (त्यांस) कळत न कळत अस्पष्ट दिसल्याने त्या जशा एकसमयावच्छेदेकरुन समर्याद पण मनोज्ञ होतात तद्वतच कादंबरीकारांच्या गौप्यातच त्याचा परिस्फोट लीन असल्याने ते एकाच काळी कावेबाज[१०] व प्रसादमय होतात!

ता. ३१ गुरुवार मार्च १८९८

मल्हार रामराव चिटणीसकृत थोरले शाहू महाराज यांचे चरित्र आता नुकतेच वाचून संपले. ह्या बखरीतील काही काही मुख्य गोष्टींचे शक चुकले आहेत. पुष्कळ गोष्टी मागे पुढे लिहिल्या आहेत. दाभाड्यांचे घराण्याची व पेशव्याची चुरस, पेशव्यांचा व भोसल्यांचा तंटा (नानासाहेब व रघोजी याचा), पेशवे व प्रतिनिधी यांचे वैमनस्य इत्यादी ऐतिहासिक महत्त्वाच्या वादग्रस्त बाबींचा करावा तितका खुलासा बखरकाराने केला नाही. त्यावरून चिटणीसाजवळ बरेच कागदपत्र असूनही त्यांचा उपयोग त्यांनी किती केला असेल याची शंका वाटते. सर्व प्रसंगी पेशव्याची तरफदारी केलेली आढळते. ज्या बाळाजीवर ग्रांट डफ आपमतलबीपणाचा व अराजनिष्ठतेचा आरोप करितो व ज्याने सखवारबाईस जुलमाने सती जाण्यास भाग पाडले असे डफ म्हणतो, व ज्या बाळाजीने शाहूचे मरणानंतर सातारा हा राजकीय तुरुंग व पुणे हीच महाराष्ट्राची राजधानी केली हे तर इतिहास प्रसिद्धच आहे, त्याच बाळीजीची एखाद्या कृतयुगातल्या सेवकास शोभतील अशी दोन बावनकशी राजनिष्ठतेची उदाहरणे बखरीत सांगितली आहेत. व त्याच उदाहरणावरुन शाहूची हुकमत किती होती हे दाखविण्याचा प्रयत्न केला आहे. पण ज्याचे विलासी कारकिर्दीत बहुतेक प्रधान व सरदार शिरजोर होत चालले होते, त्याचेच आज्ञेवरून सर्व गोष्टी होत होत्या असे मानण्यास आप [णास] फारच निराळा पुरावा पाहिजे.

शाहूची कारकीर्द म्हणजे मराठेशाईची (पेशवाईची [नव्हे]) भरभराट होय. शिवाजी महाराजांनी कमावले, संभाजीने गमावले, राजारामाने सावरले, शाहूने शहाण्या प्रधानाचे मदतीने वाढविले व उपभोगिले. शककर्त्या महात्म्याचा कडवेपणा व शूरपणा संभाजीत उतरला; राजकीय धोरण, हिंमत राजारामात उतरली व अवशेष राहिलेला व्यक्तिविषयक चांगुलपणा तेवढा शाहूचे वाट्यास आला. या राजश्रींनी मराठ्यास न शोभणारे गुण विलास व नेभळेपण व परावलंबिता इत्यादी मोगली झनान्यातून आणिले होते. त्या योगाने मोठमोठ्या व्यक्तींनी त्याचे भोवती जमून त्याचे नावाचे आश्रयाखाली राज्याची मर्यादा दूरवर वाढविली तरी सर्वाकर्षक मध्यशक्तीचा कमजोरपणा याच वेळी त्यास दिसून चुकल्यामुळे ते डोयीजड होऊन परस्पराशी विरोध करू लागले. व शाहूचे मरणानंतर तर मध्यशक्तीचा पूर्ण ऱ्हास होऊन अगर तिचे रूपांतर होऊन ते स्वतंत्रपणे वागू लागले. एथेचे मऱ्हाटेशाई संपली! नारायणरावाचे खुनानंतर पेशवाईचीही अगदी अशीच स्थिती होऊन साताऱ्याप्रमाणे पुण्यातही एक राजकीय तुरुंग होऊन शिंदेशाई व फडणीसशाई यामध्ये दंडेली चालली. पुढे महादजीच्या व सवाई माधवरावाच्या मरणानंतर सर्व जगाच्या इतिहासास काळिमा

2nd April 98 Saturday

Bacon and Descartes are generally recognized as the Fathers of Modern Philosophy, though they themselves were carried along by the rapidly-swelling current of their age, then decisively setting in the direction of science. (Page 115). "A revolution"[13] says Dr. Whewell "was going on, as all the greatest investigators of the sixteenth century were fully aware. But their writings conveyed this conviction to the public at large very slowly.—But Bacon's lofty eloquence, wide learning, comprehensive views, bold pictures of coming state of things, were fitted to make men turn a far more general and earnest gaze upon the passing change." (Page 125). He released Philosophy from the grip of Theology and made to depend upon wholly Science. There was little novelty in his denunciations of the erroneous Method then popular or in his exhotrations to pursue Observation, Experiment and Induction. But it is not less apparent that he had wider and profounder views of the philosophy of Method than any of his predecessors-He insisted on the importance of Experiment, but he could not teach what he did not himself understand-the Experimental Method. He exhorted men to study nature, but could give no available directions.— He had fervent faith in the possible conqests of Science but never having thoroughly mastered any one science he was incapable of appreciating the real conditions of research. Bacon did not understand what Copernicus profoundly saw that the only value of an hypothesis was its reconciliation of calculations with observations. (Pages 121, 122). Bacon was a philosopher (rather than a scientist). He is one of the most striking illustrations of the Literature of Power (rather than the Literature of Knowledge). His distiugnishing characteristic is a large opulence of mind, at once massive and florid, wide-sweeping and subtle; and the main source of his influence has been the dignity with which he invested the objective mode of looking at things, a mode liable to degenerate into a creeping prosaism and trivial love of detail, a mode wanting also in the attractions of a facile, though illusory subjective tendency, but the only mode of reaching truth and securing-solid-results. (Page 123).

There was, and still is, an instinctive antagonism between philosophers and the savans : the philosophers complaning that Science is too narrow in its scope, the savans proclaiming that Philosophy is too vague in its principles. Bacon was the first to conceive a Philosophy of the sciences. He says, "But let none expect any great promotion of

whether any thinker of finer calibre has appeared in our country; although the future alone can determine the position he is to assume in History. At present he is too close to us for an accurate estimate; and moreover, to this end his system should be before us in its entirety, whereas only two parts-First Principles (1862) and The Principles of Biology (1964-7) and the first volume of the Principles of Psychology-have as yet appeared. He alone of British thinkers has organized a system of Philosophy. (Pages-756-57).

Mr. Spencer is unequivocally a Positve Philosopher, however he may repudiate being considered a desciple of Come. His object is that of the Positive Philosophy namely, the organization into a harmonious Doctring of all the highest generalities of Science by the application of the Positive Method and the complete displacement of Theology and Metaphysics. The peculiar character he impresses on it by his thorough working out in detail of the Law of Evolution-a-Law which Shelling said was the peculiar creation of Modern Thought, and which the Germans have worked out with great success in almost every direction, constitutes a real claim to our admiration." (Page 758).

I was anxiously searching for my own idol in this splendid pantheon of worthies built by Lewes and Lo! to my greatest satisfaction I find him (Spencer) seated at the very end of the series, as a veteran with due honours at the rearguard of an army !!

ता. ३ एप्रिल ९८ रविवार

संध्याकाळी मी व चि. जनाक्का बंडगार्डन्सवर सास्ने यास भेटावयास गेलो. ५।।। चे सुमारास त्यांची तेथे भेट झाली. मग जवळच्या टेकडीवरील सांबाच्या पोखरलेल्या देवळात गेलो.[१६] तेथे पाणी वगैरे पिऊन टेकडीच्या माथ्यावर शहराकडे तोंड करून सुमारे ७।। वाजेतोपर्यंत बसलो होतो. पण सास्ने डेक्कनला गेले व आम्ही रम्य चांदण्यातून वाटेवरच्या बंगल्यांची शोभा पाहत परत घरी आलो. वाटेत एका बंगल्यात सत्यनारायणाची पूजा चालली होती. पाश्चात्य फॅशनच्या आवारात ह्या आमच्या हिंदू चालीचे मंडण चाललेले पाहून मौज वाटली.

पंधरा दिवसामागे हुल्याळ,[१७] कानीटकर,[१८] मी व सास्ने यांमध्ये बंडगार्डन्समध्येच आम्ही पुढे काय करायचे याबद्दल बोलणे झाले होते. त्यात सास्ने ह्यांनी एकट्यांची विचार करून आपला निश्चय कळवितो असे सांगितले होते आज त्यांनी आमच्याप्रमाणेच आपलाही विचार आहे असे कळविले.

ता. ७ एप्रिल १८९८ गुरुवार

सास्ने व इतर कोल्हापुरच्या मंडळीस सेल्बी साहेबाने क्वारंटायीनस्तव १० दिवस आधी सोडिले. म्हणून ते आज कोल्हापुरास गेले. सास्ने यांचे सोबती मोहित्ये यांचे बरेच सामान गावातून

धोमास गेला. हुल्याळही फार भ्याला होता. (साहजिक आहे). दोन दिवस ताप थांबवून घरी जावे असेही म्हणत होता. पण मला हे शहाणपणाचे वाटले नाही. वरून भ्यालो नाही असे [दाखविले]. पण पहिले दिवशीच "A slight disease recalls the idea of Death" हे त्याचे तोंडचे वाक्यातून त्याचे अंतर्याम दिसले. मागचे प्लेगचे वेळी मला ताप आला असता हुल्याळ व करंदीकर यांनी कशी थट्टा केली हे आठवले. व सगळे सारखेच असता प्रसंगी मात्र एकमेक का थट्टा करितात हे कळले.

ता. १५ शुक्रवार एप्रिल १८९८

आजचा 'काळ' चा अंक वाचला. मद्रास ले. कौन्सिल पुढचे 'आन. जंबुलिंग मुदलियरचे बालविवाह निषेधक बिल' यावरची टीका वाचून काळ कोणच्या पक्षाचा हे कळले. काळ म्हणजे केसरीची नक्कलच दिसते. पण केसरीचा स्वाभाविक खरमरीतपणा, जाज्वल्य अर्थगांभीर्य, शब्दाचा नेमकेपणा व साधी ढब, नखरेबाज अलंकाराविषयी निष्काळजीपणा वगैरे चांगले गुण काळात तंतोतंत उतरलेले दिसत नाहीत. पण केसरीचा कुत्सितपणा व व्यक्तीला व पक्षाला टोचून लिहिण्याची सवय मात्र बऱ्याच ठिकाणी काळात चमकते. काळ हे विशाळ नाव घेऊन प्रसंगविशेषी देखील असली लघुता पत्रकाराने दाखवू नये. आजपर्यंत ४ चार अंक वाचले. पण मनाला तल्लीन करण्यासारखा एकही विचार अगर विकार यात मला दिसला नाही. कदाचित पत्र नव्हे आहे म्हणून असे झाले असेल. तरी पत्रकर्ते विद्वान व शांत आहेत म्हणून देशी पत्रात जी २/३ च चांगली मासलेवाईक आहेत [त्यात] आपली लवकर गणना करून घेतील. पण असल्या कटकटीच्या दिवसात मुद्दाम अवतार घेतलेल्या 'काळा'त इतर सर्व पत्रापेक्षा काही विशेष सापडेल अशी जी आशा ती मात्र गेली. बहुतेक पत्रांना कसला तरी पक्षघात झालेला आढळत आहे. त्यामुळे पत्रलेखकांचे खरे व अकलुषीत मत प्रतिबिंबित होत नाही. किंबहुना सवयीच्या जोराने पत्रकाराच्या डोक्यात असल्या मतास थारा मिळेनासा होतो. ह्या स्थितीचा अभाव म्हणजे खऱ्या स्थितीचे दिग्दर्शन करणे व अपले मत स्पष्ट व निर्भयपणे प्रकट करणारा (आगरकराचा आवतार) केव्हा येईल तेव्हा येवो! खरी स्थिती कळणे ही एक अडचण व कळल्यावर प्रामाणिकपणे व बिनधोक प्रसिद्ध करणे ही तीहून खडतर अडचण. ह्या दोन्ही अडचणीस भीक न घालणारी वर्तमानपत्रे इलाख्यातून एक एक जरी निघाली तरी सुदैव. मग पायोनीयरच्या एडिटरला नायनटीन्थ सेंचरी मासिक पुस्तकात लिहिलेल्या 'नेटिव्ह पेपर्स' प्रमाणे आमच्या सर्व देशास खाली मान घालावयास लावणारे लेख लिहिण्यास अवसर सापडणार नाही.[१९]

ता. १६ एप्रिल ९८ शनिवार

कॉलेजमधून घरी येत असता सकाळी चि. जनाक्का वाटेतच भेटली. जमखंडीकराच्या वाड्यातून मला बोलावून आणण्यास निघाली होती. चर्या खिन्न व कंठ दाटला होता. परत येताना, घराच्या मालकीणीने जे तिच्याशी हलकट वर्तन केले होते व ज्यासाठी तिला इतका राग येऊन वाईट होते ते सांगू लागली. जनाक्का विटाळशी झाली असून आज दुसरा दिवस. पुण्यास राहिल्यापासून तिच्या विटाळाची पाळी म्हणजे तिच्या व माझ्या त्रासाची व उद्वेगाचीच पाळी असे झाले आहे. वेळेवर कोणी मनाजोगती मोलकरीण सापडत नाही. जरी एखादीला आणिलेच तर ती आपले गुण

जे भाषण ऐकिले त्यासाठी दहा मैलही चालत गेलो असतो! इंग्रजी भाषेत शुद्ध, गोड, अस्खलीत बोलणे म्हणजे प्रो. गोखल्यास काहीच वाटत नाही, हे नव्याने सांगणे नकोच. तरीपण काल जे त्यांच्या जिभेचे विलास मला पहाण्यास सापडले ते काही अप्रतीम होते. या विलासास केवळ त्यांचे जिव्हाचापल्यच कारण नसून त्यांच्या मृदू अंत:करणाची मार्मिकता व रसिकताही आहेत हे उघड दिसले. आठ दिवसांपूर्वी कॉलेज रेसिडेन्सिमध्ये मुलांनी व प्रोफेसरांनी 'मून लाईट पार्टी' केली होती. त्याचवेळी हे लेक्चर होणार होते. पण आम्हा गावातल्या विद्यार्थ्यांच्या नशीबाने ते आज झाले. कॉलेजचे प्रोफेसर, न्यू स्कूलचे मास्तर, कॉलेजची व शाळेची मंडळी मिळून सुमारे ३०० मंडळी जमली होती. सुमार दीड तास एवढा समाज चित्रासारखा तटस्थ होता. अध्यक्षस्थान प्रिन्सिपाल राजवाड्यांनी[२२] शोभविले होते. एकतानतेने भाषण ऐकण्याची उत्कंठा दाबवेल तितकी दाबून मला जी फार थोडी टिपणे घेता आली, त्यावरून खालील सारांश आहे. "विषयाला जे गंभीर नाव दिले आहे ते मला विचारल्याशिवाय दिल्यामुळे व नावानुरूप तयारी करण्याला मला वेळ मुळीत न झाल्यामुळे आपली आज बरीच निराशा होईल. परवा मूंलाइट पार्टीचे दिवशी जेवणानंतर चार गप्पा सांगणार होतो. पण आज त्या विषयास व्याख्यानाचे गंभीर स्वरूप आले आहे! इंग्लंडला जाऊन आल्यापासून माझ्या आयुष्यात मोठा पालट झाला आहे. विचार, मत व कल्पना यांस निराळेच वळण बसले आहे. इंग्लंडातील शिक्षणाचे उत्तम व विविध प्रकार व त्याचा अवाढव्य प्रसार पाहून मी थक्क झालो. प्रकार, प्रसार व पद्धत या तिन्ही बाजूंनी ते तेथे कोणत्या थराला पोचले आहे याची येथे बसून कल्पनासुद्धा करवत नाही. अगोदर प्रसाराची बाजू घेऊ. ७ सात वर्षाची झाली की प्रत्येक मुलास शाळेत घातलेच पाहिजे असा सक्तीचा सरकारी कायदाच आहे. हे सक्तीचे शिक्षण केवळ प्राथमिक असून 'बोर्ड स्कुलात' गरीबास मोफत मिळते व त्यात धार्मिक शिक्षणाची भेसळ होत नाही. सर्वात प्राथमिक शिक्षण मिळाल्यामुळे गाडीवाले, हजाम, मजूर वगैरे फावल्यावेळी रस्त्यातूनच खिशातून एकादे वर्तमानपत्र काढून वाचीत असलेले आढळतात. तरीपण ज्यास ऐपत आहे असे लोक खर्च देऊन आपले मुलास पब्लीक स्कुलात अगर ग्रामर स्कुलात घालतात. तिकडे आईबापांच्या उत्पन्नापैकी.... भाग मुलांच्या शिक्षणाकडे जातो व बोर्ड स्कुला [त] मुलास पाठविणे कमीपणाचे समजतात. ह्या पब्लीक स्कुलातील शिक्षणपद्धती मुलास होता होईल तो मनोवेधक होईल व मुलांच्या स्वाभाविक शक्तीचा विकास होईल अशी असते. तसेच शिक्षक नेमावयाचे ते फार हुशार नेमतात व शिक्षकांनी तेवढ्याच धंद्याकडे आपले सर्व आयुष्य अर्पिले असते. मुलास मानसिकाप्रमाणे नैतिक शिक्षण घडत असते. सभ्य गृहस्थ व सभ्यपणा हे इंग्रजी भाषेत काही विशिष्ट शब्द होऊन बसले आहेत. दुसऱ्यांनी नावे ठेवण्यासारखे एकही कृत्य सभ्यगृहस्थाकडून होणार नाही की असले कृत्य त्याने जरी पाहिले तरी त्याचा विनाकारण बभ्रा अगर उहापोह करणार नाही. प्रसंगाशिवाय दुसऱ्याच्या वाटेस जाणार नाही. अपमान करणार नाही. की तो नेभळेपणे सहनही करणार नाही. असल्या सभ्यपणाचे परिणामही शाळातून घडतात. तरी ते विशेषकरुन गृहशिक्षणापासून होतात. (तेथे वक्त्याने कॉन्स्टंटाइन नामक एका सभ्य गृहस्थाचे आपण घरी राहत होते तेथील एक गोष्ट फार चटकदार रितीने सांगितले). ह्या शाळा गावाबाहेर लांब असतात व त्याचे भोवती मोठ-मोठी पटांगणे असतात. मानसिकाइतकेच शारीरिक शिक्षणाकडेही अवश्य लक्ष असते. त्याचप्रमाणे

काही परिणाम होत नाही. तथापि जेवढे उरले आहे तेवढ्यावरच आम्ही आपला पाया घातला पाहिजे. शेवटचे शिक्षण मात्र आमच्या हातची गोष्ट आहे. राजकीय सामाजिक, औद्योगिक अशा चोही बाजूंनी.... कर्तव्याचे प्रचंड पर्वत पडले आहेत. हे सर्व... केवळ सुशिक्षीत वर्गावर पडले आहे. तो वर्ग.... फार लहान आहे. इतकेच नव्हे तर परस्परांची फूट, विरोध, मत्सरादींनी हीन दशेला पोचला आहे. मनमुराद व मर्मभेदक वायफळ टीका केली की दमून 'हुश्य' करून बसण्यापुरती त्यांची कर्तव्य दक्षता! असे बोलण्याचा प्रसंग येऊ नये पण वस्तुस्थिती अगदी अशीच आहे, अशी माझी पक्की खात्री असल्याने मला बोलणे भाग पडते. शेवटी सांगणे इतकेच की इंग्रजांच्या कर्तव्यासक्तीचे उदाहरण आम्ही गिरवले पाहिजे. जे कर्तव्य आम्ही समजतो व जसे समजतो ते तसेच नेटाने केले पाहिजे. मग ते कसेही असो. त्यावर शुष्क टीका करून आपला व दुसऱ्याचा उत्साह भंग करू नये. कोणी केला तर त्यास जुमानू नये. ह्यानेच आमचा झाला तर उद्धार होईल !" नंतर अध्यक्ष प्री. राजवाडे उठले. ते घोकंपट्टी व पोकळ ज्ञान ह्या विषयी म्हणाले की ज्या अर्थी आम्ही शिकतो हे ज्ञान अगदी नवीन मागविलेले असे आहे, त्या अर्थी ते आपल्या पदरी पडले असे नुसते वाटायला निदान घोकंपट्टीच पाहिजे. परक्या देशातील ह्या झाडाची लागवड तूर्त काही दिवस तरी अशा जबरीच्या उपायानेच एथे करावी लागत आहे खरे त्याला इलाज नाही. तसेच तिकडचे प्रोफेसर व हिकडचे यांमधील लज्जास्पद अंतर पाहून तर मी अगदी खचूनच जातोय. असेही वाटते की या जागेचा राजीनामा देऊन स्वथ्य बसावे!! गोखल्यांनी [नको] असे उद्‌गारले व सर्व श्रोतृसमाज मोठ्याने [हसला]. स्वतः राजवाडेही मोठ्याने खिदळले! शेवटी आभार मानले जावून सभा उठली.

गोखल्यांनी तेथल्या शिक्षणपद्धतीचे वर्णन केले आहे ते सर्व एकतर्फी दिसत आहे. खुद्द इंग्लंडातही तेथील पद्धतीबद्दल सारखी ओरड आहे. म्हणून त्यांनी तिचे काही दोष दाखवयाचे होते. ती केवळ निर्दोषी असेल असे मुळीच वाटत नाही. तरी येथल्या शिक्षणास ताडून पाहता गोखल्याचे भाषण म्हणजे केवळ अतिशयोक्ती असे म्हणण्यास जागा नाही. येथील पद्धत इतकी दुष्ट आहे की [हीत] रुळलेल्यास तेथल्या पद्धतीतले फारच थोडे [दोष] दिसणे संभवनीय आहे. नेहमीच्या संभाषणातले वक्तृत्व त्या दृष्टीने पाहिले तर गोखले यांचे भाषण अगदी नंबर एकचे झाले. यापेक्षा कोणी युरोपियनही चांगले बोलील असे वाटत नाही. किंबहुना थोड्याच युरोपियनांना असे बोलता येईल. स्वतः गोखल्यासही आपली जन्मभाषा इतक्या झोकात वठविता येणार नाही. तो बोलताना ऐकणे म्हणजे एक लाभच.

ता. २६ एप्रिल १८९८ सोमवार

काल श्रीशिवजयंतीचा एथील उत्सव संपला.[२५] पुण्याचे मानाने हा उत्सव व्हावा तसा होत नाही. तरी दुष्काळ, प्लेग व सरकारच्या मूर्खपणाचे प्रताप याकडे लक्ष दिले असता हा उत्सव असा तरी साजरा झाला [यासाठी] मंडळीचे आभार मानले पाहिजेत. पहिल्या दिवशी (२३ तारखेस) एक निबंध वाचला; नंतर प्रो. जिन्सीवाल्याचे[२६] व्याख्यान झाले. त्यात विद्यार्थ्यांस त्यांनी चांगला उपदेश केला. विद्यार्थ्यांनी कृतीच्या भानगडीत पडू नये, नुसते ज्ञान मिळवावे, मनाची समता ठेवावी, Politics चा शिक्षणाशी काहीच संबंध नाही, असे चुकीचे आहे- वगैरे त्यांनी सांगितले. पण उपदेश

२७ एप्रिल १८९८

आज कंत्राटदारच्या वाड्यातून जमखंडीकरांच्या वाड्यात बिऱ्हाड बदलले. मालकास कळवण्यास मी गेलो तर नुसते 'बरे आहे' इतकेच म्हणाले. मला चमत्कार वाटला.

ता. २ मे १८९८ सोमवार

श्रीमंत सयाजीराव महाराजास माझी स्कॉलरशिप यावर्षी चालू ठेवण्यास अर्ज केला.[२८] हा अर्ज लिहू नये म्हणून ४/५ दिवस बराच विचार केला. शेवटी लिहिणेच बरे वाटले.

सकाळी कॉलेजात गेलो तो जुनियर बि.ए. तील मि. टिकेकर नावाचा विद्यार्थी क्वार्टर्समध्ये काल रात्री ३ वाजता मरण पावला असे कळले. क्वार्टर्समध्ये त्याचे प्रेत पाहून फार वाईट वाटले. आईबाप ५०/६० वर्षाचे म्हातारे आहेत. एकुलता एकच हा त्यांचा मुलगा. नुकतेच लग्न झालेले! प्रि. राजवाडे येऊन पाहून विचारपूस करून गेले. 'येथील पाणी दूषीत आहे असे वाटत असल्यास तापवून प्या पण भिवून जाऊ नका, असल्या अशक्त मुलांनी आपल्या आई-बापाजवळच राहावे हे बरे' असे म्हणाले. सुमारे ९ वाजता ओंकारेश्वरावर नेले. क्वार्टर्सचे सर्व विद्यार्थी प्रो. गोखले, राजवाडे, कर्वे व मि. मोतीबुलासा,[२९] ही मंडळी शेवटपर्यंत होती. पण मयताचा नातलग कोणीच नसल्यामुळे अन्त्यविधी काहीच झाला नाही. कालेजला सुटी होती.

ता. ४ बुधवार मे स....

संध्याकाळी रा. माधव हुल्याळ यांच्याशी त्यांच्या गृह [संबंधी] सुमार तास दीड तास भाषण झाले. हुल्याळांनी आपल्या गृहस्थितीसंबंधी व आपल्या कुटुंबाच्या सर्व माणसासंबंधी आपली फारच स्तुती व पूज्यभाव प्रकट केला. विशेषकरून आज्याची, आईची व सासऱ्याची अतीशयच स्तुती केली. My grand father was an ableinfluential and economical man. My mother a model of womanly virtues. I am fortunate that I am born of such parents! In that notorious neighbourhood of Hulyalkars our house a temple! Oh the religion of my mother. Her excellent frugality and management of the household. She is a living Lakshmi indeed in our house!! I owe much to my home education and the influence of my mother on me. My father-in-law a truly generous man" असले कित्येक त्यांनी मोठ्या कळकळीने उद्‌गार काढिले पण कुलकर्णी करकंबकर व पांडाच... याजकडून मला जे कळले आहे त्याच्याशी [ह्या] उद्‌गारांची कशी संगती जुळवावी हे मोठे कोडे आहे. हे कोडे कसेही सोडवण्याचा प्रयत्न केला तरी कोणत्यातरी पक्षास (दोन्ही पक्ष माझे मित्रच) घाणेरडा कलंक लागणार! म्हणून मी हे कोडे येथेच या पानाखाली पुरून टाकितो. मनाची खंबीर समजूत असल्याविना कोणीही हे कोडे सोडवण्याचे धाडस करू नये.

खासगी **ता. ११ मे १८९८ बुधवार संध्याकाळ**

जीवलगा विष्णू-[३०] माझी विधुरावस्था[३१] मला कोण खडतर ताप देत आहे. अविवाहीत राहण्याचा माझा विचार तर ह्या तुफानात फुटून तुकडे तुकडे होतो. किती दिवस तरी ही अवस्था

खात्री झाली. जोपर्यंत जात्याच मनाचा तितका मोठेपणा नाही व जोपर्यंत स्वत:भोवतालचे हल्लीचे वातावरण बदलत नाही, अगर नैसर्गिक नियमानुसार आपोआप घडणारे सर्व (त्या वातावरणाचे) परिणाम ह्या आत्म्यावर घडून कालानुरोधाने तोच जोपर्यंत परिणत दशेस जात नाही, तोपर्यंत ह्या विकारमय आत्म्याला असा त्रास होणारच. तेव्हा इतकी लांबची वाट पाहत न बसता, जीवलगा विष्णू, तुला मागे एकदा दर्शविल्याप्रमाणे ह्या सर्वात दुष्ट व दुर्निवार कामविकारास काही जड औषधोपचार करून जबरीने हाकलून द्यावे म्हणजे मुद्दाम नपूसक व्हावे असे फार वाटले.

ज्या आमच्या भरतभूमीत इतका अत्युज्ज्वल विचार पिकला तीतच हल्ली खऱ्या धर्माचा इतका दुष्काळ असावा हे मला संभवेना. कुठे हिमालयाच्या गुहेतून, कुठे विंध्याच्या शिखरावर, कुठे नदीकाठी, कुठे खेड्यातून आणि मुंबई सारख्या शहरातून देखील खरे 'रामकृष्ण परमहंसासारखे' धर्मात्मे भटकत असतीलच. पण जोपर्यंत ते जगापुढे येत नाही तोपर्यंत रानात उमलून रानातच कोमेजणाऱ्या फुलाप्रमाणे जे जगाला मुकले व त्याहीपेक्षा अधिक वाईट काय तर जग त्यांना मुकले. हल्ली देशात वर्तमानपत्राचा दररोज इतका केर पडतो पण त्यात धर्माच्या नावाने एक निर्माल्यही पण आढळत नाही. अगदी स्वतंत्र एक धार्मिक पत्रच काढावे असे किती वेळ तरी वाटले. पण मला हे कसे साधेल, लोकादरास ते कसे पात्र होईल व मग त्याचा उपयोग किती होईल. इ. इ. कल्पना भरारा धावत गेल्या झाले.

२२ मे १८९८

आज आमच्या बिऱ्हाडी बारामतीचे रा. रा. कळसकर,[३३] तेथील महाराष्ट्र व्हिलेज एज्युकेशन सोसायटीचे स्थापक आले आहेत. त्यांचे साहस, उद्योग व स्वार्थत्याग ऐकतच होतो. ह्यांचे स्वत: भाषण ऐकून तर ह्यांनी म्हार मांग ह्या अतिनीच जातीची किती किती कळकळ दाखविली, त्यांनी काय काय केले पण आणखी किती तरी करण्यासारखे आहे हे सर्व मनात येऊन मला स्वत:ची मन:पूर्वक लाज वाटली व तिटकारा आला.

प्रार्थनासमाज

ता. २९ मे रविवार १८९८

आज सकाळी ८ आठ वाजता रा. कळसकर, हुल्याळ व मी हे प्रार्थनासमाजातली उपासना पाहावयास गेलो होतो. पुण्यातील मंदिरातील उपासना मी आजच प्रथम पाहिली. गेल्या डिसेंबरात मुंबईतील देवळातील ढंग पाहून मला मुळीच बरे वाटले नाही. पूज्यभाव दूर राहून समाजाविषयी तेव्हापासून माझा किंचित दुराग्रह झाला होता. समाजाचे उद्देश, भाषण व मेंबराची कृती अथवा वागणूक यांमधील विरोध पाहून तर मला अद्यापही चीड येते आहे. समाजात कसल्याही प्रकारे जातिभेद असता कामा नये असे असता इतर सुधारकांत व समाजात मला काही भेद दिसत नाही. म्हणजे दोघेही अद्याप जातिभेद उघड उघड झुगारण्यास तयार आहेतसे दिसत नाही.

मंदिरातील उपासना पाहून माझ्या मनात मोठा पूज्यभाव उत्पन्न झाला ह्याचे एक कारण हे की मुंबईतल्यापेक्षा हे मंदिर फारच साधे आहे. दुसरे कारण हे की मुंबईतले माझे जाणे पहिलेच असल्याकारणाने तेथल्या उपासनेत ख्रिस्ती चर्चमध्यल्या प्रेअरची हुबेहुबे नक्कल उतरलेली दिसली.

व्याख्यात्याला सहजच पर्वतीचे दर्शन घेऊन यायला सापडले असते. असो. ह्यापुढे काही चांगले व्याख्याते व विषय येतील अशी आशा आहे. परवा एका व्याख्यात्याने असे शेवटी सांगितले, की माझे व्याख्यान लहान मुलांकरिता आहे. पण ह्या अर्भकांच्या कनवाळूने एखाद्या शाळेत आपले गुऱ्हाळ लावायाचे होते. व्याख्यानमाला व क्रमिक पुस्तके यांत जोपर्यंत अंतर आहे तोपर्यंत या विद्यार्थ्यांच्या वालीने मालेपासून दूर असावे व मालेचा एकादा विषय दुर्बोध असेल तर मुलांनीही आपण तितका वेळ खेळण्यात खर्चलेला बरा !

ता. ३१ मंगळवार १८९८ मे

आजचे व्याख्यान 'आधुनिक शास्त्रामुळे धर्मास विरोध येतो काय ?' हे रा. काशिनाथ बाळकृष्ण मराठे सातारचे सब जज् यांचे खरोखर मालेस शोभणारे झाले. मराठे हे रानडे-भांडारकर यांचे जोडीचे व वेळचे आहेत असे ऐकिले. यावरून युनिव्हर्सिटीच्या अव्वल अमदानातील जे पदवीधर झाले त्यात काही तथ्य आहे व होते हे खरे दिसते. पाश्चात्य ज्ञानापासून Reaction झालेली यांच्यामध्ये दिसते. तरी ती फार विचारी, शांत व स्वाभाविक दिसते. यांचा धर्म म्हणजे रूढ धर्म नव्हे तर तात्त्विक धर्म अगर मूल तत्त्वज्ञान अथवा ब्रह्मवाद हा होता. व्याख्यात्याचा कटाक्ष सर्व शास्त्रांचे आद्य गृहीत सिद्धांतावरच होता. मानव जातीच्या सनातन धर्म कल्पनेस दरवर्षी व प्रत्येक शोधकाच्या शोधाने बदलणाऱ्या सिद्धांताने विरोध येणार नाही. Sound motor = शब्द ब्रह्म = ध्वनिशक्तीविषयी न्यूयॉर्कमध्ये शेली साहेबाने एक विलक्षण शोध काढला आहे. तो हा की काही विशेष यांत्रिक रचना केली आहे की सतारीची एक तार वाजवून शेवटी असलेल्या fly wheel ला २५ हॉर्स पावरची शक्ती येते असे सांगितले!

ता. २ जून गुरुवार १८९९

नेहमीप्रामणे आमचे कॉलेज आजच सुरू होईल असे वाटले नव्हते म्हणून आम्ही गेलो नव्हतो. पण प्रि. राजवाडे यांच्या नियमितपणामुळे आज लेक्चर्स देखील झाली असे ऐकून फार आश्चर्य झाले. इंग्लदच्या इतिहासामध्ये मला २४ च मार्कस पडलेले पाहून वाईट वाटले व चीड आली. पण पोलीटीकल एकानॉमीत ४५ मार्क्स पाहून समाधान झाले.

ता. ४ शनिवार जून १८९८

कळसकर यांस मेजवानी झाली. साडे दहा आण्याचे आंबे आणिले. स्वयंपाक कळसकर, दाजीबा-त्यांचे एजंट, हुल्याळ, मी व जनाक्का इतक्यांस पुरे असा पहिल्या दोघांनीच केला. दिवस आनंदाचा गेला.

ता. ५ रविवार. जून

आज सेटलूरचे[३६] मालेत Our Social Institution सामाजिक संस्था यावर इंग्रजीत व्याखान झाले. यांच्या नावाप्रमाणे वक्तृत्व मुळीच नव्हते. विचारातही नवेपणा अगर खोलपणा म्हणण्यासारखा नव्हता. आमची समाजरचना हक्काच्या तत्त्वावर नसून कर्तव्यावर आहे. पाश्चात्य सुधारणा आधिभौतिक असून [आपली] आध्यात्मिक होती. आमच्या सर्व संस्था याच पायावर

ता. ९ जून १८९८ गुरुवार

सकाळी डा. नायडूच्या दवाखान्यात आमच्या रेसिडेन्सीतले दोन आजारी विद्यार्थी रा. कुकनूर धारवाडचे व रा. पोटे जमखंडीचे यास पाहण्यास गेलो तो कुकनूर वारल्याचे ऐकून उरात धस्स झाले. एका वर्षात आमच्या रेसिडंट विद्यार्थीपैकी हा सहावा मृत्यू. कॉलेजचे दुर्दैव!! कोणी म्हणतात पाणी वाईट, कोणी म्हणतात खोल्यातून हवा फार खेळते. कोणी म्हणतात विद्यार्थ्यांचा अडाणीपणा व निष्काळजीचे वर्तन. ह्यांतून कोणतेही कारण घेतले तरी तेथील देखरेख ठेवणाऱ्या प्रोफेसरांकडून आपली जबाबदारी पूर्णपणे ओळखून ती पूर्णपणे पाळली जात आहे काय हा प्रश्न सहज उभारण्यासारखा आहे. मोठमोठे मिशाळ बी.ए. च्या वर्गातले विद्यार्थी असून ते आरोग्यशास्त्रातले केवळ आडाणी असे दु:खाने कबूल करावे लागत आहे. युरोपियन खेळ खेळण्यास युरोपियन खेळणी असली की काम झाले असे आम्हा साऱ्यास वाटत आहे. त्यांचे व्यायामास योग्य पोषाख, नियमितपणा, नेमस्तपणा व इतर बातबेत यांचे अज्ञान तरी असते किंवा मुळीच महत्त्व वाटत नाही. फर्ग्युसन रेसिडन्सीमधले बहुतेक विद्यार्थी काही श्रीमंताची मुले नसतात. मोकळ्या हवेत राहण्याचा हा त्यांचा पहिलाच किंबहुना शेवटलाही प्रसंग असल्यामुळे ती नवीनच बाहेर काढलेल्या वासरांप्रमाणे वेड्यासारखीच वावरू लागतात. नाहीतर चांगले अन्न, स्वच्छ हवा, व्यायामास मुबलक साधने व सुखाचे राहणे इतके असून रेसिडन्सीत सहा मरावेत व गावातला (अपमृत्यू सोडून) एकही मरू नये, याचा अर्थ काय? आणि गावातल्याची संख्या निदान दीडपट आहे! प्रोफेसरांचे लक्ष इकडे जावे तितके गेलेले दिसत नाही. कायमचा दवाखाना व कांपाँउडर असा तेथे नुकताच ठेवला आहे. शिवाय मुलांच्या नेहमीच्या वर्तणुकीवर त्यांनी यापेक्षा जास्त दाब का ठेवू नये, हे मला कळत नाही. गुराप्रमाणे फुटबॉल काही वेळ लाथाडून घाम गळतच पानावर बसणे, जेवल्याबरोबर वाऱ्यात पुलावर गप्पा मारीत बसणे, मग व्हरंड्यात निजणे, सापडली वेळ की अनवाणी शेंडी उडवीत टेनीस ग्राउंडवर हुदडणे अगर काही क्रिकेटचे सामान सापडल्यास ते खराब करणे इ. इ. गोष्टींकडे नजर पुरवण्यास प्रोफेसरांस वेळ होत नसेल काय?

काही असो, फर्ग्युसनवाल्यांस आपल्या सहध्यायांचा अंत्यविधी पाहण्याची जणू चटच लागली आहे! कुकनूरचे प्रेत डा. नायडूने दुसरीकडेच एकीकडच्या घरात ठेवून दिले होते. जवळ कोणीच नव्हते. सुमारे तासभर मी एकटाच त्या प्रेताजवळ बसलो होतो. नंतर सुमारे आठाचे सुमारास क्वार्टर्सची मंडळी आली. दहन होऊन घरी येण्यास १२।। वाजले. त्या निर्जीव सोबत्याशी माझा एकांतवास फारच उदासवाणा झाला. तो मरून चार तास झाले होते तरी त्याचे आंग हातास किंचीत गरम लागत होते. मी त्यास दोनदा शिवलो. व प्लेग डाक्टरने त्याची तपासणी केल्यावर जेव्हा आपले हात स्वच्छ एक प्रकारच्या साबणाने धुतलेले मी पाहिले तेव्हा मात्र माझ्या कृतीचा पश्चाताप झाला. घरी आल्यावर देखील मी जेवल्यानंतर काही वेळाने स्नान केले. कारण फार भूक लागली होती. मला फार घाम आला होता. तशात स्नान करणे मला बरे वाटले नाही.

ता. १० जून १८९८

आज वालुताईच्या[३८] लग्नाकरिता आमचे वाड्यात जमखंडीचे वऱ्हाड आले. सुमारे ३० पुरुष व ५/६ बायका आहेत. आम्हाला किंचित स्थानांतर करावे लागले. आठ एक दिवस आमच्या

ता. १९ जुलै सन १८९८ मंगळवार

आज बरेच दिवस लिहिले नाही. ता. २५ जूनपासून माझ्या प्रकृतीत एकदम फरक झाला. सकाळी भयंकर क्षीणता भासू लागली. तेव्हापासून आतापर्यंतही कंबर दुखत आहे. न कळत शक्तिपात होऊ लागला. मी फारच भिऊन गेलो, कारण काही कळेना. ता. २६ रोजी जबर स्वप्नावस्था झाली. फार क्षीण झालो. क्षय झाल्यासारखे वाटू लागले. सुमारे ७ दिवस म्युनिसिपल दवाखान्यातले औषध घेतले. हाळीवाची खीर घेतली. सुमारे पावशेर हाळीव खपविले ! संध्याकाळी ६ चे आत जेवण आटपू लागलो. डाक्तराने दिवसा नुसते चांगले जेवण जेवण्यास सांगितले होते. म्हणून रोज पुरणाचे जेवण होत असे. होता होईल तो लक्ष वाईट गोष्टीकडे न जाईल असा प्रयत्न करी. एकंदरीत हा माझ्या विधुरावस्थेचा परिणाम. आभ्यासाकडे अद्यापी नीट लक्ष लागत नाही. लागले तर लवकर शीण येतो. माझी मला अतिशय लाज व खंती वाटू लागली. ही स्थिती मी माझे मित्रास कळविली. तेणेकरून मनावरचे ओझे कमी होई. अगोदर हा आजार मला फार भयंकर वाटू लागला. मी फार रोडलो होतो म्हणून कळसकर मला फारच विचारू लागले. पुष्कळदा डात्कर च्छत्रे याजकडे जावेसे वाटले पण त्यास पैसे देण्यापेक्षा चांगले अन्न खावे आणि फार सावधपणे राहवे असाच निश्चय चालविला. ६।।-७ वाजल्यावर जेवून फिरायला जाई. आता जरा प्रकृती बरी आहे. चित्तास थोडी शांती मिळत असते. लवकरच अगदी बरा होऊन झपाट्याने अभ्यास करू लागेन असे वाटते. पुस्तकाचा (परीक्षेच्या) मला आताप्रमाणे कधीच तिटकारा आला नसेल. पण इलाज नाही. माझ्या प्रेमाची अशी खडतर निराशा झाली नसती तर अशी दैन्यावस्था झाली नसती. अद्यापीही थोडक्याच दिवसात (वर्षात) माझ्या अमोघ प्रेमाचे चीज करणारी कोणी जन्ममैत्रीण न भेटल्यास मी फार दिवस टिकत नाहीसे मला वाटू लागले आहे. आणि जरी भेटल्यासही मागे झालेला त्रास व तोटा कितपत भरून येईल याची शंका आहे. यापेक्षा मी अनीतिचा मार्ग स्वीकारला असता तर अधिक सुखी झालो असतो काय ? च्छे माझ्या शरीरयातनापेक्षा मनाच्या यातना कष्टतर झाल्या असत्या.

ता. ३० शनिवार माहे जुलै १८९८

रा. दौलतराव विचारे हे आमच्या येथे येऊन १५ पंधरा दिवस होत आले. ते आज गेले. त्यांनी आमच्या भिडस्तपणाचा वाजवीपेक्षा अधिक फायदा घेतला. काही अंशी त्यांचाही नाइलाज झाला. एक दोन दिवसात काम आटपेल म्हणून आमच्याकडे जेवले. पण आठ दिवसांनीही ते आटपले नाही म्हणून मग दुसरीकडे जाणेही त्यास बरोबर वाटेना, कारण शेवटी जाताना काही तरी आम्हास द्यावे असे त्यांचे मनात होते. जाताना ते दोन २ रुपये देऊ लागले. असे करणे व्यवहाराला बिलकुल शोभत नाही अशी त्यांची समजूत घालून मी ते नाकारले.

ता. ३१ जुलै १८९८

आता दर रविवारी प्रार्थनासमाजास सकाळी प्रार्थनेला जाण्याची कायमची सवय लागली आहे, असे म्हणावयाला काही हरकत नाही. किंबहुना चटकच लागली आहे. गेले ५/६ रविवार मी नियमाने व मोठ्या आवडीने जात आहे. जनाक्काचा भाव तर अगदी दृढ बसला आहे. प्रार्थनेत ती

ता. ३ सोमवार एप्रिल १८९९

आमचे बरोबर विष्णू तू येशील म्हणून आजपर्यंत तेरदाळास राहिलो. शेवटी तुला बरोबर नेण्या [ची] परवानगी मीच स्वत: तुझे वडिलास विचारणेचे धाडस केले आणि खात्रीपूर्वक निराशा करून घेतली. कष्टी होऊन सकाळी कुडचीस निघालो. कुडचीस पत्रावरून कळले की गोविंदराव एकटेच शिरोळ क्वारंटाइनात आले. जनाबाई आली नाही, हे पाहून फार वाईट वाटले. शिवाय मला कुडचीवर अगर मिरजेवर शिरोळचे तिकीटच मिळेना. संध्याकाळी मिरजेस गेलो व क्वारंटाइनात निजलो.

ता. ४ सोमवार[४३] एप्रिल १८९९

सुमारे तीन वाजता मिरज क्वारंटाईनात माझा शोध करीत गोविंदरावाकडून शिरोळाहून भिवा गडी आला. मला फार आनंद झाला. लगेच त्याजवर माझा बोजा देऊन मी शिरोळास पायवाटेने अंकलीवरून निघालो. ७ वाजता सायंकाळी शिरोळात पोचलो. दादासाहेब व रखमाबाई केळवकर[४४] माझी वाट पाहून परवा दिवशी गेली होती. मागे कुमारी कृष्णाबाई, यमुनाबाई व अहल्या ह्या क्वारंटाइनात होत्या. मला गोविंदरावांनी डाक्टर धनवडे ह्यांचे बंगल्यात जेथे कुमारिका राहत होत्या तेथेच नेले. लवकरच अहल्येने चहा व थोडेसे उपाहाराचे पुढे ठेविले. नंतर जनाबाईला आणण्याविषयी कृष्णाबाईसी थोडा वेळ बोलणे झाले. कुमारींच्या आदराने मी फार उपकृत झालो. मदरकडे जनाबाईस पाठविण्यासंबंधी स्वत: कृष्णाबाईनीच एक मसुदा करून दिला. ही बहुतेक सारी रात्र अंतस्थ विचारांत, कल्पनांत गेली. हृदय किती विकारकलुषीत झाले !!

ता. ५ एप्रिल १८९९

गोविंदराव व तिघी कुमारिका सकाळी कोल्हापुरास गेल्या. बंगल्यात मला करमेचना. सकाळच्या देखाव्याने चित्त फार व्यग्र झाले.

ता. ७

विष्णू, तुला एक अंत:स्थितीचे पत्र लिहिले.[४५] चैन नाही.

ता. ८ शनिवार

जनाक्का पुण्याहून शिरोळपर्यंत एकटीच आली. माझ्या मनाची वृत्तीच पालटली. आजचा दिवस बोलण्यातच गेला. बोर्डींगच्या अन्नाचा कंटाळा आल्यामुळे जनाक्कास अन्नच जाईना. तिला शक्तिही फार कमी होती. वाईट वाटले.

वर्षप्रतिपदा ता. ११ मंगळवार १८९९ एप्रिल

डा. धनवडे फारच गरीब व चांगले गृहस्थ आहेत. सरकारी नियम पाळून लोकांस देववेल तितकी सवलत देतात. त्यात पक्षपात करीत नाहीत. मला ह्यांनी फार चांगल्या रीतिने वागविले. हे सर्वांना प्रिय आहेत. आज आम्ही नदीवर उदगावच्या पुलाजवळ पोलीस नाईक मल्हारजी साळुंके ह्यांचेच झोपडीत राहण्यास गेलो. झोपडी स्वच्छ सुंदर आणि मजबूत आहे. निजण्यास बसण्यास तीन निराळ्या खोल्या आहेत. नदीच्या अगदी काठावर. दोहो बाजूस दोन जंगी पूल. एकांतवास, रम्य

ता. १६ एप्रिल १८९९

नदीवर आल्यापासून रोज रात्री निजण्याचेपूर्वी काही वेळ मल्हार नाईक, गोविंदराव व मी मिळून भजन करीत असतो. हे भजन पंढरपूरच्या संप्रदायाचे असते. झोपडीत टाळाच्या दोन जोड्या व चिपुळ्या आहेत. आम्ही शिकलेले असून (मी) पद्धतशीर भजन करितो ह्याचे मंडळीना कौतुक वाटते. क्वारंटाइनानिमित्य पुलावर वारकऱ्यांची बरीच गाठ पडते. नाइकांची त्यावर श्रद्धा आहे. बाळोबा नावाच्या उदगावच्या एका म्हाताऱ्या वारकऱ्याचा दृढ आणि भोळा भाव पाहून फार आश्चर्य वाटले. इतका म्हातारा असून ४० कोसाची दर पंधरावड्याची वारी कधी चुकत नाही! १/२ दिवस विश्रांती घेऊन पुन्हा वारीला निघतो. त्याच्या हातात धरावयाची काठी आहे ती ३। सवातीन हात लांब भल्या मोठ्या मुसळापेक्षा जाड व जड आहे! मला दोन मैलाच्यावर काही तिला घेऊन जाववणार नाही!! एकदा दोन्ही पायाला नारू झाले होते आणि नदीला पूर आला होता अशात म्हातारा 'विठ्ठल' असे ओरडत गेला, असे सांगतात.

कोणते तरी लहानसे पद्य अगर चरण वरचेवर म्हणून भजन करण्याची चाल मला फार आवडते. पण मी अैकलेल्या सर्व भजनात देवाचे अत्यंत साकार व सगुण रूप वर्णलेले असल्यामुळे त्यांची अर्थगोडी लागत नसे. म्हणून मी आज स्वत:करता आदि तत्त्वाचे एक भजन रचले आहे ते हे.

जय जय सच्चिद्घन मूर्ती। जय जय चिदानंद स्फूर्ती।।

जय त्रिविध ताप हर्ता। जय जय भक्तिमुक्तिदाता।।

जय जय सकलगुणगणनिधान। जय जय निर्गुण वस्तुस्थान।।

जय जय अंतिम मंगल धाम। जय जय मुनिजन मन विश्राम।।

जय जय स्वसंवेद्य सुखभोग। जय जय जीव शिव संयोग।।५।।

हे मला फार गोड लागते. ह्यात माझा लय लागतो. वृत्ती सात्त्विक होते. सर्व अैहिक ताप निवतात ! पण ही निवृत्तावस्था फार वेळ राहत नाही. विचारात देखील मला प्रवृत्तीचा सर्वथैव त्याग करवेना. इतका मायावश होतो की उलट निवृत्तीमार्गातच धन्यता व पुरुषार्थ नाहीत असे वाटते !!

१८ एप्रिल १८९९ मंगळवार

आज जनाक्काचे १० दिवस क्वारं. चे भरले. सकाळी १० चे सुमारास कोल्हापुरास पोचलो. पुत्रजन्मोत्सवानिमित्त घरोघर गुड्या उभ्या केल्या होत्या. पेठेतून निशाणे तोरणे फडकत होती. हात्ती, घोडे, उंटस्वार, पायदळ इतक्या सरंजमांनी भर रस्त्यातून प्रत्येक घरी हत्तीवरून साखर वाटण्याची गडबड चालली होती. मी स्वत: संस्थानची प्रजा असून मला अद्यापि अशा सुप्रसंगामुळे आनंदलेल्या सर्व शहराचा देखावा पाहवयास मिळाला नाही, म्हणून वाईट वाटले. प्रथम पुत्रोत्सवाचे वेळची करवीरस्थांची किती उल्हास वृत्ती झाली असेल. छे ! एक लाख रुपये त्यावेळी खर्चले असे सांगतात. खालसातल्या लोकांस ह्या आनंदाची कल्पनाच नाही. अशा प्रकारचा आनंद सर्व करवीर इलाख्यातून एकसारखा बारा दिवस चालणार !

ता. २३ एप्रिल १८९९

कोल्हापुराहून पन्हाळ्याला यावयाचे झाले तर पावनगडाला वळसा घालून यावे लागते. कोल्हापूरचे वायव्येस पन्हाळा बरोबर १२ मैल आहे. ७ व्या मैलापासून हळूहळू चढण सुरू होते. सिंहगडप्रमाणे ह्याची उंची एकदम सुरू नसल्याने ह्याच्या माथ्यावर उभे असता उंचीचा देखावा तितका चांगला दिसत नाही. तरीपण जागोजागी ह्याच्या तटाची उंची बरीच आहे. माथ्याचे क्षेत्रफळ सिंहगडच्या दुपटीने येईल. पण सिंहगडची उंची ह्याच्यापेक्षा सवाईने, कदाचित दिढीने जास्त येईल. सभोवतालच्या टेकड्यांच्या उंच मैदानावर गडाची दुसरी उंची असल्याने चौकोनी चौथऱ्यावर बांधलेल्या अंतर्गोल अर्धवर्तुलाकार मनोऱ्याप्रमाणे गडाची शोभा दिसते. पावनगडचे वायव्य टोक व पन्हाळगडचे ईशान्य टोक ह्यामधील दोन्ही गडाच्या तटाचे हे वरील अंतर्गोल बरोबर अर्ध वर्तुळ बनले आहे. पन्हाळ व पावन गड या दरम्यानच्या पावन खिंडीमुळे ह्या अर्धवर्तुळाचा थोडासा भंग झाला आहे. येथे आल्यापासून माझी दिशा-भूल झाली असल्यामुळे मी सर्व दिशा सूर्याचे गतीवरून अनुमानाने ठरविल्या आहेत. गडाच्या भोवती पायथ्याशी ७ वाराच्या ७ पेठा (लहान वाड्या) आहेत. मुख्य दरवाज्याजवळ आले असता ह्या अर्धवर्तुलाच्या मधोमध येतो ह्या वर्तुलाच्या एका टोकावर एजन्सी बंगला अगदी ठेवल्यासारखा दिसतो. दुसऱ्या शेवटास पावनगडचे टोक दिसते. ह्या देखाव्याने मन चांगले वेधते. मुख्य दरवाज्यास चार दरवाजा असे म्हणतात. हल्ली हा सर्व पडला आहे. केवळ पायावरूनच रचना समजते. तो ओलांडण्यापूर्वीच साधूबोवांचा सुंदर दर्गा दिसतो. पुढे लहानसे तळे आहे. ह्या अवलियाचे प्रसादाने गडावर साप वगैरे चावला तर उतरतो असा समज आहे. तसेच गडावर पटकी वगैरे साथी कधीच होत नाही (*त*) असे म्हणतात. उत्तरेकडे वर चढल्यास सरकारी इस्पतळ, पोष्ट ऑफीस लागते. पुढे धर्मकोटी संभाजी महाराजांचे देऊळ, लायब्ररी, सरकारी कचेऱ्यांची वगैरे इमारती लागतात. पन्हाळा हे पेठ्याचे गाव आहे. म्हणून मुख्य अधिकारी मामलेदार आहेत. पन्हाळा हे पन्नंगालय ह्याचा अपभ्रंश असे सांगतात. ह्यावरून येथे पूर्वी साप फार होते असे दिसते. पण आता कोठे दिसत नाही.

आम्ही तटावर फिरत फिरत गडाला एक प्रदक्षिणा तीन दिवसात केली. डोंगरी किल्ल्याचा तट म्हणजे तुटलेले कडे तसेच भिंत बांधून उंच केलेला असतो. तटाची आतील सपाटीवरची उंची बहुतेक जागी पडली आहे. हे मोरचेबंदी व माऱ्यासाठी केलेली बंदुकीची व तोफांची भोके कोठेच दिसली नाहीत ह्यावरून दिसते. तटाखाली जागोजागी मोठ्या ८/१० तोफा गंजत पडल्या होत्या. माऱ्याच्या बाजूस व दरवाज्यापुढे तट दुतर्फी आहे. चार दरवाजा, तीन दरवाजा, वाघ दरवाजा व राज दिंडी असे चार गडाला पूर्वीचे दरवाजे आहेत. तट पडल्यामुळे आता आणखी दोनतीन वाटा जास्त झाल्या आहेत. चार दरवाजा हल्ली जमीन दोस्त आहे. तीन दरवाजा शाबुद व पाहण्यालायख आहे. वास्तविक पाहता ह्या रचनेत दोनच दरवाजे एकमेकाशी तिरकस बांधले आहेत. दोहोमध्ये एक कमानीदार चौक साधला आहे. वर उंच गच्ची आहे. तीवरून अस्तमानाचे वेळी खाली दरीत झाडी, खेडी, कडे वगैरे अवलोकण्याचे मोठे सुख वाटते. अगदी बाहेरच्या दाराच्या शिरोभागी एक मुसलमानी लेख आहे आणि आतल्या दरवाज्यावर गणपती कोरला आहे. म्हणून हा दरवाजा मुसलमानांनी बांधला की मराठ्यांनी मागाहून गणपती कोरला की भोजराजा म्हणून मुसलमानाचे पूर्वी इकडे एक

कोणते स्थान नाही. पश्चिम बाजूला तटाचे गर्भातच लगुडबंद म्हणून कोणी पिराचा दर्गा आहे. तटाला बाहेरून एक भोक दिसते त्यातून पायऱ्या आंधारातच आहेत. त्या चढून वर गेले असता भिंतीतच सुमारे ७/८ खणाचे ह्या पिराचे देऊळ आहे. जुना झाल्याकारणाने व माती चांगली नसल्याकारणाने देवळासकट तटाची वरपासून खालपर्यंत सबंध भिंत गडाला सोडून सुमारे १।।-२ फूट पुढे झुकली आहे. त्यामुळे जिना चढून वर जाण्यास नवख्यास फार भिती वाटते. वर जावे तो देवळाचा सर्व भाग जागोजाग चिरून विकल झालासा दिसतो. इतका उंच तट असा चिरलेला आणि सुटलेला केव्हा ढासळेल याचा नियम नाही. आणि ढासळला तर अपरंपार खाली दरीत कोठे पडेल ही भंयकर कल्पना मनात येऊन येथे फार वेळ राहवत नाही. पण ह्याच स्थितीत हे पूर्वीचे काम आज कितीतरी वर्षे असेच अनेक पावसाळ्याची चेष्टा करीत आहे. हे ऐकून आपल्या जिवाची भिती जाऊन पूर्वजाच्या अकलेची धन्यता वाटते ! लगुडबंदाच्या कबरीच्या खालच्या मजल्यात अंधारात खाली कोठेशी एक वाट जात आहे तिचा पत्ता नाही. हे स्थान पूर्वी मार्कंडेय ऋषीचे होते असे म्हणतात. पण ह्यावरुनच ह्यास पावन गड हे नाव मिळाले हे संभवत नाही. २ री व्युत्पत्ती, पाव उणा गड म्हणजे पाऊण गड अशी म्हणजे पावगड अद्यापी बांधावयाचा आहे ही. पण तसाही प्रकार कोठे आढळला नाही. गड चहुकडे बांधलेला दिसतो. ३ री व्युत्पत्ती, पाहून गड म्हणजे पन्हाळा पाहून हा बांधला. कारण येथे बहुतेक तितक्याच उंचीची आणि माऱ्याची ही जागा आहे. हीच व्युत्पत्ती सर्वात अधिक संभवनीय दिसते. ह्या गडावर वस्ती तीन-चार मुसलमानांची घरे आहेत तेवढीच. एक मोठी भयाण जुनी विहीर आहे. शिवाय सांबाचे एक पडके देऊळ आहे. पूर्वीच्या कचेऱ्याची वगैरे इमारत पडली आहे. सिंव्हगडप्रमाणे येथेही वर कोठेही फारशी झाडे नाहीत. क्षेत्रफळ सिंहगडपेक्षा थोडे कमीच येईल. म्हणजे सुमारे चार चौरस फर्लांग येईल. आकार गोल आहे. ह्याचे पूर्वेस जोतीबाचा डोंगर (वाडी रत्नागिरी) आहे. सायंकाळी ह्याची सावली ह्या डोंगरावर पडते. ह्या गडाचे दोन कोपरे पूर्वेचा व ईशान्येचा तुटलेले अगदी पुढे आले आहेत. त्यावरून खाली खोल खोऱ्यातून कोल्हापुराहून पन्हाळ्यास व खाली मलकापुरास गेलेल्या सडकांचा सुंदर देखवा दिसतो. पन्हाळ्याहून व एथून मिरजेच्या मिरासाहेबांचा सुमारे ४० मैलावरचा घुमट दिसतो असे म्हणतात. आम्ही मुळी पाहिलाच नाही. कोल्हापूरचा राजवाडा मात्र दिसला. वर सांगितलेल्या पूर्वेकडच्या कोपऱ्यावरच्या बुरुजाच्या अगदी टोकातून एक पिंपळाचे झाड हवेत वाढले आहे. त्या झाडाच्या एका फांदीवर मी खाली पाय सोडून (मंडळी नको म्हणत होती) देखावा पाहत बसलो. गोविंदरावांनी बरोबर काही कापशीची बोंडे घेतली होती. हारडीकरांनी त्याचे पतंग करून वाऱ्यात सोडले, ते वाऱ्याच्या झुळकीसरशी उंच वर जात आणखी खाली येत. असे उंच झोके खात ते जोतीबाच्या डोंगराच्या बाजूवर पडले असावेत. सडकांवरून खडी पसरवली होती ती अगदी सोनकावीच्या रंगाची होती त्यामुळे मला अति प्रियकर उषःकालच्या फिकट आबाशायी रंगाची काळ्या फत्तरातून व हिरव्या झाडीतून सडकांची हृदयंगम वळणे पाहून वारंवार माझे मन द्रवत असे व अंतरंगातील अतिगूढ विषयाकडे हट्टाने ओढ घेत असे !! माझ्या हातातील गाठीच्या काठीची गवांड्याची झाडे मी येथे पाहिली. रात्री चांदण्यातून घरी आलो.

असे सांगतात. हे दुसरे दैवत. तिसरे दैवत स्वत: जोतीबा अगर केदारलिंग दक्षिणाभिमुखी आहे. देवूळ मोठे व मजबूत असून काम सुंदर कोपरेदार आहे. दक्षिणेतील सौंदतीचे यल्लामाचे देऊळ हुबेहुब असेच आहे. शिखरे उंच कोनदार चौकोनी आहेत. देवळावर सुरेख गच्ची आहे. समोर नगारखाना असून एक स्नानाची व एक सकाळच्या काकड आरतीची अशा दोन जंगी घंटा आहेत. चोहीकडे फरसबंदी आहे. विस्तीर्ण चौफेर प्रदक्षिणामार्ग आहे. जोतीबासमोर मुख्य भव्य सभामंडप आहे. त्यास तीन तीन फूट जाडीचे पितळेने मढविलेले भक्कम चार खांब आहेत. मंडपाचे डावे बाजूस अंधेरात तुकाईची मूर्ती आहे. देवळाबाहेर जोतीबाचे पाठभिंतीत काळभैरवची मूर्त आहे. लोक याच्याच पुढे नारळ फोडतात. देवळाचे उत्तरेकडे लांब खालचे बाजूस यमाईचे स्वतंत्र देऊळ आहे. ह्या देवाचा पौराणिक इतिहास काय आहे ते नीट कळले नाही. केदार-विजय म्हणून एक पोथी आहे. तीत येथील सर्व महात्म्य आहे. जोतीबा हा जमदग्नीचा अवतार असे सांगतात. यमाई त्याची बहीण म्हणे. ती त्यास नवरी पाहण्यास गेली होती. ती सापडली नाही म्हणून ती बाहेरच राहिली. पौर्णिमे दिवशी सायंकाळी चार वाजता जोतीबाचा यमाईच्या देवळापर्यंत हत्ती, घोडे, उंट, काठ्या इतर जामानिशी पालखीचा च्छबिना निघतो तो यमाईचे देवळास ६ सहा वाजता पोचतो. पालखी देवळास पोचतात यमाईचे गर्भदेवळाचे दार पूर्वी आपोआप लागत असे सांगतात. कारण जोतीबा लग्नाचे थाटाने घरी आला. असता यमाईला नवरी सापडत नाही, म्हणून ती त्यास तोंड दाखवीत नाही. हल्ली पुजारी आपणच दार लोटतात! शेवटी तेथेच जोतीबाचे गोरज मुहूर्तावर कट्यारीशी लग्न होते. लग्नाची अंतर्पाटासह सर्व तयारी होते. कोल्हापूरकराकडून या लग्नाकडे दीडशे १५० रुपयांची नेमणूक आहे. आम्हाला उशीर झाला म्हणून लग्न पाहावयाला राहिलो नाही. जोतीबाच्या मूर्तीच्या सर्वांगभर लिंगेच आहेत असे कळले. पण आज पूजा बांधिली होती म्हणून ती आम्हांस पाहण्यास मिळाली नाहीत. संध्याकाळी साडेसहा (ला) निघून आठ वाजता घरी पोचलो.

पांडवदरी

ता. २६ एप्रिल १८९९

सकाळी नऊ वाजता दसम्या वगैरे करून घेऊन जनाक्कासह चालतच आम्ही सर्वजण पांडवदरीत निघालो. दरी पन्हाळ्याचे पश्चिमेस सुमारे ५ पाच मैलावर आहे. दरम्यान म्हसाईचे मोठे पाठार ओलांडावे लागते. हे पाठार बहुतेक पन्हाळ्याइतकेच उंच असून वर आफाट सपाट मैदान आहे. पन्हाळ्याचा हांडा बुरुज आणि हे पाठार यास मध्ये एका उंच पातळ सुळकेदार नैसर्गिक भिंतीने जोडले आहे. ही भिंत सुमारे आर्धा मैल लांब असून हिच्या शिरोभागी १०।१२ फूट उंच अणकुचीदार दगड उभे आहेत. ते पांढरे असल्याकारणाने ही भिंत नुकतीच घासलेल्या करवतीप्रमाणे तीक्ष्ण व चमकदार दिसते. ह्या दगडातून वाघाला राहण्याला चांगले ठिकाण आहे. शिवाय ह्या उंच भिंतीमुळे पन्हाळ्याच्या दक्षिणेस रांगण्यास जावयाचे झाले तर पावन खिंडीतूनच वाट आहे. नाहीतर पावन गडास अगर म्हसाईच्या अवाढव्य पाठारास वळसा घालावा लागतो. म्हणूनच बाजी देशपांड्ये यांनी पावनखिंड आडविली होती. ह्या मनोहर कडप्यास घाटशिळ असे म्हणतात. पन्हाळा उतरून लगेच म्हसाईचे पाठार चढताना खंडाळ्यातील टायगर लीप नावच्या अती खोल खळीची आठवण झाली. ह्या बाजूवर एकसारखी दाट उंच झाडी आहे. मधून स्वच्छ गोड पाण्याचा मोठा झरा धो धो

अंतर्जगात आमच्या पूर्वजांनी येथे गाजवलेल्या पराक्रमाची आठवण होऊ लागली की पाहणारा सबाह्यआंतर आनंदमय होऊन आपल्या स्वत:ला विसरून जातो. रसिक असून तो नास्तिक असेल तर त्याच्या मनाची मजल इतकीच होते; पण अस्तिक असेल तर ह्या सुंदर अंतर्बाह्य विश्वाच्या सच्चिदानंद परमात्म्याचे ठायी लीन होतो !

विशाळगड

ता. २७ एप्रिल १८९९

आज संध्याकाळी बरोबर ७ वाजता बैलगाडीत बसून विशाळगडास निघालो. अर्धवर्तुलाकार गडावरून वळशावळशांनी खाली उतरत असता मागे वरचेवर पाहून मला वाईट वाटत होते. रात्रीचा वेळ, वाटेत चोरट्यांची भीती आहे, म्हणून कोणी सांगितले म्हणून आम्ही बराच वेळ गाडीमागून चालतच होतो. बांबोड्याचे धर्मशाळेत २ तास निजून सकाळी मलकापुरास आठ वाजता पोचलो. हा गाव सुमारे ३/४ हजार वस्तीचा असून कोल्हापूरचे पंतप्रतिनिधी श्रीमंत विशाळगडकर यांची राजधानी आहे. पन्हाळ्याहून २१ मैल आहे.

ता. २८ एप्रिल १८९९

मलकापुराहून दोन प्रहरी ३ वाजता निघालो. एथून सारखी चढण लागते. मांजरे गावाला येईपर्यंत रात्रीचे ११ वाजले. येथे जंगलातच निजलो. वाटेने दाट जंगल लागले. पहाटे तीन वाजता निघालो. चांदणे पडले होते. येथे आम्हा सर्वांची इतकी दिशाभूल झाली की चंद्र अगदी थेट पश्चिमेकडे उगवून पूर्वेकडे मावळतो असा दिसला! येथून मात्र पहाटेपर्यंत भयंकर पारधीचे किर्र जंगल लागले. दुतर्फा एकमेकांशी लागलेले गगनचुंबीत वृक्ष स्तब्ध तापशाप्रमाणे उभे होते. त्यावरून दाट रानवेली शेंड्यापासून बुडक्यापर्यंत लोंबत होत्या. वाट चढणीची असल्यामुळे बैल हळू चालले होते. मधून मधून पालवीतून रस्त्यावर चांदण्याचे ठिपके पडले होते. चहुकडे इतके सामसुम होते की गाडीच्या चाकाचा आवाज व बैलांच्या गळ्यातल्या जंगांचा नाद आरण्यभर गुंगत होता. आमचा गाडीवानही रंगेल गवयी होता. 'माझ्या चतुरा बैला चल। माझ्या पट्टाण्या बैला वड' इ. लकेऱ्या कंठ मोकळा सोडून ललकारू लागला. तशा प्रशांत समयी तशा घनघोर स्थळी ह्या लकेऱ्यांचे गंभीर प्रतिध्वनी उमटू लागले. एकही घातूक जनावर भेटले नाही. आम्हाला वाटले की, गाडीवानाच्या ताना ऐकून हिंस्त्र वनपशूंना देखील झोप लागली असावी. अशा प्रसंगी कैद्याप्रमाणे मला गाडीत बसवेना. म्हणून मी चटकन गाडीखाली उडी टाकली. मागून चिंतामणी आणि हारडीकर हेही उतरले. उतरू नका असा जनाक्काचा सारखा आग्रह होता. आमची चाहूल ऐकून झाडावरच्या वानराचा घूत्कार प्रतिध्वनीसकट घुमू लागला. ह्याच रानात कोल्हापूरकर, इचलीकरंजीकर वगैरे वाघांची पारध करितात. इकडून अस्वल उतरेल काय, इतक्यात वाघ डुरकावेल काय ? अशी प्रतिक्षणी मनातल्या मनात धास्ती वाटत होती. पण कपी वर्गाशिवाय आमचे स्वागत कोणीच केले नाही हे पाहून शेवटी आमची किंचित निराशा झाली ! बरोबरच आहे. कारण असले अश्रुतपूर्व गाणे बजावणे ऐकून तटस्थ न होणारा एका चावट माकडाशिवाय दुसरा कोण अरसिक प्राणी आहे !! पहाट झाली तेव्हा

इंग्लंडमधील रोजनिशी
(१९०९-१९०३)

कळला नाही. लवकर येऊन भेटून जा असे चिठीत होते. पण इतक्यात मचवा निघाला आणि नंतरच मला चिठ्या वाचावयाला सापडल्या म्हणून जाणे झाले नाही. आणि काही तरी झाले आहे की काय ह्याबद्दल जिवास फार हुरहुर लागली. मचव्यात बसेतोपर्यंत मला तितके वाईट वाटले नाही. पण हातातील बॅग खाली ठेऊन बसल्याबरोबर मी केले ह्याचे पूर्ण स्वरूप पुढे उठले व मनाची काही अवर्णनीय स्थिती झाली. सभोवती इतकी गर्दी असता ओळखीचा चेहरा एकही दिसेना. जीवलग माणसांना निदान २ वर्षे तरी अगदी अंतरलो हे मनात येऊन त्या सर्वांची चित्रे चित्तचक्षूपुढे तटस्थ येऊन उभी राहिली. अशात व्हिक्टोरियामध्ये कानीटकरांनी सांगितलेल्याची आठवण झाली. मी केला तो प्रकार अत्यंत मूर्खपणाचा झाला असे वाटू लागले. छे ! ह्या कठीण स्थितीची मला कधीही विस्मृती पडणार नाही. ईश्वरा, २ मिनिटातच माझी कोण तारंबळ उडाली ! माझ्या धैर्याचा मागमूस देखील उरला नव्हता. अशात मचवा झपाट्याने निघाला. मी घाबरल्यासारखा लोकांचे तोंडाकडे पाहू लागलो. जास्त काय लिहू-असे देखील मनात आले की सामानसुमान टाकून झटकन मचवयातून खाली उडी मारावी आणि आईबाबांस धावत जाऊन घट्ट मिठी मारावी. निर्दय मचवा माझ्या स्थितीकडे अगदीच दुर्लक्ष करून तसाच पुढे चालला. मला अशी दहशत पडली की आता परतणे तर शक्यच नाही पण अशा भयंकर स्थितीत मला दोन वर्षे काढावी लागतील!! ती दोन मिनिटे मला दोन वर्षासारखी भासली तर ह्या दोन वर्षास मी कसली उपमा देऊ ? अशा हताश अवस्थेत मला अखेरीस परमेशाची आठवण होऊन ह्या पाशातून सोडविण्यास मी त्याची गयावया प्रार्थना करू लागलो. त्यानेच गाऱ्हाणे ऐकिले. तरी ह्या वियोगाच्या दु:सह चटक्याची फुणफुण मी आगबोटीवर गेल्यावर देखील किती वेळ तरी होती.

एक वाजता आम्ही पर्शिया आगबोटीवर दाखल झालो. माझे तिकीट दुसऱ्या वर्गाचे आहे. दुसऱ्या वर्गाच्या प्रवाशांची सर्व सोय बोटीच्या पिच्छाडीचे बाजूस व पहिल्या वर्गाच्या प्रवाशांची आघाडीस अशी व्यवस्था केलेली असते. माझ्या जाग्याचा नंबर ३६२ होता. सुमारे दोन दोन खणांची एक एक खोली असते तीस केबिन म्हणतात. प्रत्येक केबिनमध्ये चौघांची सोय असते. त्या प्रत्येकाच्या जाग्यास बर्थ असे म्हणतात. माझ्या केबिनमध्ये आम्ही चौघे प्रवाशी आहो. चौघेही हिंदुस्थानचेच रहिवाशी आहे. ३६१ बर्थमध्ये कलकत्त्याचे बी. ए, मि. मित्र हे कायस्थ आहेत. ३६२ मध्ये मी स्वत: आहे. ३६३ मि. कोतवाल म्हणून कोणी मुंबईचे पार्शी आहेत. ३६४ मध्ये जलालुदिन मिर्झा हे लाहोर मुसलमान गृहस्थ आहेत. मित्र आणि मिर्झा हे माझ्या आधीच बोटीवर गेले होते. कोतवाल व मी मिळून बोटीवर चढलो. आम्ही गेल्यावर १ तासाने आमचे सर्व सामान आम्हांस मिळाले.

दोन प्रहर १२ घंटे शनिवार

२२ सपटंबर १९०१

ता. २५ बुधवारी बोर्डवर नोटीस लागली की ता. २६ दिवशी सकाळी आगबोट एडनला पोचेल. तर ज्यांना पत्रे पाठवायाची असतील त्यांनी संध्याकाळी ५ ते ६ चे दरम्यान पोष्ट ऑफिस उघडे राहील तितक्यातच आपली सर्व पत्रे टाकावीत. १२ तासाचा अवकाश असता इतक्या आधी

व इतका थोडा वेळच पोष्ट आफीस का उघडे असावे ह्याचे कारण समजले नाही. असो. ता. २५ चा दिवस माझा सर्व पत्रे लिहिण्यातच गेला. सुबोध पत्रिकेस १४ पानांचे एक पत्र लिहिले.[१०] त्यात पर्शिया आगबोटीचे व तीतील व्यवस्थेचे सविस्तर वर्णन केले आहे. मुंबईपासून एडनपर्यंतचा प्रवास थोडाबहुत कंटाळवाणा होतो. पहिले दिवशी सभोवती अगदीच नवीन देखावा असल्याकारणाने तो दिवस सहजच निघून जातो. दुसऱ्या दिवशीचा प्रातःकाळही बरा जातो. पण दोन प्रहरपासून कंटाळा येऊ लागतो. पाहिलेले तेच नजरेस पडू लागल्यामुळे मनाचा उत्साह नाहीसा होतो. २४ तास आंग हालल्यामुळे तोंडाला थोडीबहूत मळमळ सुटते. नवीन सोबत्यांची नीट घसट अद्यापि न पडल्यामुळे एकांतवास वाटू लागतो. अन्नाचीही नीट सवय न झाल्याकारणाने शिसारी येते. अशा प्रकारे ४ दिवस गेल्यावर ५ वे दिवशी एडन लागते. मग सगळाच प्रकार बदलतो. मला स्वतःला दोनच दिवस १/२ तास मळमळले. पण पुढे बरे वाटू लागले. उद्या एडन दिसणार असे समजल्याबरोबरच मनास हुषारी येऊ लागते.

ता. २६ गुरुवारी सकाळी एडनजवळची टेकडी दिसू लागली आणि मनाला अत्यानंद झाला. मला ह्या वेळी कोलंबसाची आठवण झाली. बोटीत आमची सर्व प्रकारे सोय-चैन असता, आम्ही एडनला लवकरच व सुखरूप पोंचू अशी मनाची खात्री असता मुंबई सोडून ३/४ दिवस झाले नाहीत तोच, आम्ही कधी जमीन पाहू असे झाले होते; तर कोलंबसाचा ह्याच्या उलट अगदी भयंकर प्रकार असल्याने त्याने जेव्हा प्रथम जमीन पाहिली तेव्हा त्यास कसे झाले असेल! असो. आम्हाला काही कमी आनंद झाला नाही. वेळ सकाळचा असल्याने तर एडन बंदर फारच सुंदर दिसले. ते उंच टेकड्यांमध्ये लपून बसल्यासारखे दिसते आणि मधून मधून डोकावते. टेकड्यांचे कडे उंच सुळकेदार व वर निमुळते होत गेलेले आहेत. पण कोठेही झाड झुडुप किंवा एक हिरवे पानही दिसत नाही. डोंगर काळा फत्तर नसून रेतीचा बनलेला असावा असा दिसतो. दुरून रेसिडन्सी व इतर बंगले दिसू लागतात. सुमारे ७ वाजता आगबोट बंदराजवळ गेली पण अगदी जमीनीस जाऊन भिडली नाही. कारण येथे प्लेगसंबंधी क्वारंटाईन आहे. आगबोटीवर क्वारंटाइनचा काळा झेंडा व मेलचा तांबडा झेंडा हे दोनही फडकू लागले. बंदराचे पश्चिम बाजूस बोट पूर्वेकडे तोंड करून उभी राहिली. मागले बाजूस शहर व आरबस्थानचा किनारा लांबवर दिसू लागला. व्यापारी लोक लहान लहान भाड्याचे होड्यातून आपला माल विकण्यास अगदी आगबोटीजवळ येऊ लागले. होड्या हाकणारे लोक बहूत करून सोमाली अगर शिद्दी असत. व्यापारी गोरे आरबी असत. क्वारंटाईनमुळे त्यांस बोटीवर येण्यास अगर प्रवाश्यांस त्यांचेकडे जाण्यास परवानगी नव्हती. म्हणून खालूनच ते आपले जिन्नस आम्हांस दाखवित व ओरडून किमती सांगत. 'टू शिलिगंज, फोर' 'व्हेरी फाइन, लेडी' वगैरे. आपल्या तुटक इंग्रजी भाषेत ते साहेब लोकांशी व्यवहार करीत आणि केव्हा केव्हा आपल्या जिनसांनी किंवा भाषेने, केव्हा आपल्या आंगविक्षेपांनी ते गिऱ्हाईकांचे चित्त वेधीत असत.

दोन प्रहर घंटे १२।। तास १ आक्टोबर, १९०१ मंगळवार

हे व्यापारी लोक मुसलमानी चांगले बोलत असत. ह्यांचा पोषाक बोहरी लोकासारखा असे. कानावर केसाची लांब झुलपी असत. ह्याशिवाय टाळूवर केस किंवा दाढी राखिली नव्हती. सोमाली पोर अर्धी नागवी उघडीच होती. ही पोरेही स्वतः लहान सहान जिनसांचा व्यापार करीत. येथे विक्रीचे

जिन्नस म्हणजे मडमा आपल्या गळ्याभोवती वापरतात ते काळ्या किंवा करड्या रंगाचे झुपके दार पिसांचे लांब हार, सुटी लांबरुंद शोभिवंत पिसे, सांबराची शिंगे, माशांचे सांगाडे व हाडे, शहामृगाची अंडी, खजूर आणि मुख्यत्वेकरून सिगार्स किंवा चिरूट व इतर काही सटरफटर इतकेच होते. मी एक शिंपल्याचा व मोत्यांचा विणलेला हार व दोन बिंदल्या घेतल्या. त्यांची मला १ शिलिंग किंमत पडली. सोमाली पोरांनी मला त्यांची किंमत प्रथम चार शिलिंग सांगितली. येथे ह्याच तत्त्वावर व्यापार चालतो. माल खपेनासा झाला म्हणजे ही पोरे ८/१० मिळून बँडचे चालीवर इंग्रजी गाणी गाऊ लागतात. ती ऐकून मोठी मौज वाटते. मग कोणी त्यांजकडे पेनी दोन पेनी टाकतात. ह्या प्रकारचे संगीत बोट निघेपर्यंत मधून मधून चाललेच होते. पूर्वी प्रवाशी लोक लहान लहान नाणी समुद्रात फेकीत असत व ही पोर चटकन पाण्यात बुडी मारून ती नेमकी बाहेर काढीत. फेकणारास मौज वाटे व ह्या पोरांचा तिच्यावर निर्वाह चाले. पण ह्यामुळे वरेचेवर फार अपघात होऊ लागले म्हणून ही चाल सरकारांनी सक्त बंद केली वगैरे हकीकत मी ऐकीली होती. पण ह्या ठिकाणी असला काही प्रकार दिसला नाही.

सकाळचे घंटे १०

ता. २ आक्टोबर, १९०१

ता. २६ सकाळी ९।। वाजता आमची आगबोट एडन बंदरातून निघाली. बोटीवरच्या घड्याळात ८ वाजले होते. तेव्हा माझे घड्याळात ९-५५ नऊ वाजून ५५ मिनीटे झाली होती. मी माझ्या घड्याळात मुंबईची वेळ कायम ठेविली आहे. आणि प्रत्येक बंदराची वेळ आणि मुंबईची वेळ ह्यात अंतर पाहत आहे. जागोजागच्या दिनमानाप्रमाणे बोटीवरच्या घड्याळातील वेळ बदलत आहे. त्यामुळे माझे घड्याळ कितपत बरोबर चालते हे पाहण्याचे येथे साधन नाही. हवेत फरक पडून माझ या घड्याळातही काही थोडा फरक होत असेल. असो. मुंबईच्या वेळेपेक्षा एडनचा सुमारे २ तास मागे आहे. १ वाजण्याच्या सुमारास समुद्रात पोर्पस् नावाचे २/३ फूट लांब मासे पुष्कळ दिसले. ते पाण्यावर २/३ फूट उड्या येत एकमेकामागून धावत जात. काही बोटीबरोबर धावत येत. मध्य समुद्रात ह्या प्राण्यांचा हा खेळ पाहून, सारखा एकच देखावा पाहून कंटाळलेल्या मनास थोडे समाधान वाटले. आगबोट झपाट्याने चालली असता लहान लहान बेडक्याएवढे मासे आगबोटीपासून दूर पाण्यावरून उडत जातात आणि त्यांचे पंख उन्हात चकचकतात.

ता. ३ आक्टोबर, १९०१ रात्र घंटे ९

ता. २६ संध्या ४। वाजता आम्ही पेरीम बेटाजवळ आलो. हे बेट आफ्रिकेच्या बाजूस आहे. येथे एक दीपस्तंभ आहे. एथून बाबेल मांडेबची सामुद्रधुनी लागते. ह्या शब्दाची आरबी भाषेतील व्युत्पत्ती बाब् + बिल + मंदब अशी आहे. बाब = दार, बिल = चे (षष्ठीचा प्रत्यय), मंदब = रडणे, अश्रु. एकंदरीत रडण्याचे दार असा ह्या पदाचा अर्थ होतो.[११] ह्या ठिकाणी एकीकडे पेरीमबेट आणि आफ्रिकेचा किनारा आणि दुसरीकडे आरबस्थानचा आशियाचा किनारा हे दोन्ही जमीनीचे प्रदेश जवळ जवळ आले आहेत. त्यामुळे आगबोटीस जाण्यास येण्यास हे ठिकाण धोक्याचे आहे. २/४ वर्षापूर्वीच एथे एक बोट दगावली आहे. आणि असे अपघात किती तरी झाले असतील म्हणून आरबी लोकांनी पूर्वीपासून ह्या स्थळास वरील अन्वर्थक नाव देऊन भयसूचक कायमचे चिन्ह करून

ता. ४ आक्टो. १।। वाजता कॉर्सिका व सार्दिनिया बेटे दिसू लागली. तिसरे प्रहरी ४।। वाजता बोनिफॅशिओ सामुद्रधुनीतून गेलो. **ता. ५ आक्टोबर** मार्सेय्यची (टेकडी) सकाळी ६ वाजता दिसू लागली सकाळी ९।। वाजता मार्सेलीसचे किनाऱ्यावर पाय ठेविला ११ वाजता हॉटेल डी जि नीव्हो येथे उतरलो. लगेच नॉटर दाम लगार्ड[१४] हे देऊळ पाहवयास गेलो. १ वाजता जेवण आटपून ३ वाजता पॅलेस डी लाँग शॉपकडे निघालो. सायंकाळी ५ वाजता स्टेशनवर पोचलो. ६ वाजता हॉटेल डी बफेत जेवलो. प्रत्येकास ५ फ्रांक पडले (१ फ्रांक = १० आणे). रात्री ८-४० ला पॅरिसला निघालो. सकाळी ६ वाजता डी जॉन स्टेशनवर जागा झालो. पुढे ॲव्हिग्नान, लिओ वगैरे स्टेशने लागली. गाडी दर तासी ५०/६० मैल धावत होती. **ता. ६ आक्टोबर १९०१** रोजी १० वाजता पारीसला पोचलो. हॉटेल डी लिऑन डी मिलानी येथे उतरलो- ३ वा. पॅलेस डी न्याशनल इन्व्हॅलिड (नेपोलीयनची कबर) पाहिली. ३।। (वाजता) बिग व्हील, ४ (वाजता) एफेल टॉवर पाहिली. वादळ फार होते. शिखरापर्यंत जाणे झाले नाही.

ता. ७ आक्टोबर १९०१ सकाळी ७ वाजता लंडन येथे पोचलो. इंग्लीश चॅनेलमध्ये समुद्र लागून फार हैराण झालो. पण आतापर्यंत समुद्राचा म्हणण्या-सारखा कोठेच त्रास झाला नाही. टालबट रोड बेज वांटर नं ८२ रोमेशचंद्र दत्त[१५] ह्यांचे खोलीत उतरलो. स. १० वाजता रेव्ह. कोपलंड बोवीना[१६] भेटलो. पारा ५५ अंशावर होता. **ता. ८ आक्टोबर रोजी** ११।। ते ८ रात्रीपर्यंत युनिटेरिअन प्रॉव्हिन्सीअल असेंब्लिच्या वार्षिक सभेत घालविले. बोवीकडे जाण्यास व्हिक्टोरियास २।। शिलिंग दिलेले पाहून बोवीसो. हासले. परत २ पेनी देऊन टालबट रोडवर आलो.

ऑक्सफर्ड

शुक्रवार ता. ११ आक्टो. सुमारे ३ वाजता निघालो तो ऑक्सफर्ड येथे ४ ला पोचलो. लंडन येथे टॅक्सीभाडे २ शिलिंग २ पें, ऑक्सफर्ड येथे २ शिलिंग पडले. लंडनहून माझी एक जड ट्रंक ऑक्सफर्डला पोचविण्याबद्दल कुक कंपनीला ७ शि. २ पेन्स दिले. माझा सर्व प्रवास खर्च पडताळून पाहता ता १९ आक्टो. अखेर मजजवळ शिल्लक रोख ४ पौंड ७ शि. ३ पेन्स शिल्लक आढळली."

(वि. रा. शिंदे, पुणे ता. १८ मार्च १९२६).

ता. ८ नवंबर १९०१

चि. जनाबाईला आणि बाबाला अशी दोन पत्रे लिहिली. संध्याकाळी ७ वाजता मार्टिनो क्लबच्या जेवणास गेलो. सुमारे ४० जण हजर होते. जेवण आटपल्यानंतर चर्टफॉफ[१७] नामक रशियन गृहस्थाने 'रशियातील धार्मिक शिक्षण' ह्या विषयावर निबंध वाचला. सदर गृहस्थ टॉलस्टोईचे मित्र व अनुयायी असून पक्के सोशॅलिस्ट व अनॅर्किस्ट आहेत. त्यांनी रशियाची मोठी शोचनीय स्थिती सांगीतली. ती किंचित् एकपक्षीय असावी अशी शंका आली. त्यांनी आपली काही पुस्तके व स्वत:विषयी माहिती मला पाठवून देण्याचे कबूल केले. 'मार्टिनो क्लब' डा. मार्टिनोच्या स्मरणार्थ मँचेस्टर कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी व प्रोफेसरांनी काढिला आहे. प्रत्येक टर्ममध्ये हा दोनदा भरतो आणि कोणतरी मोठ्या गृहस्थाकडून निबंध वाचिला जातो. मग त्यावर विद्यार्थ्यांचा वादविवाद होतो.

केली. पण मार्टिनो क्लबची दोनदा बैठक होते त्यामुळे सभा फार होतात, अशी दुसऱ्यांची तक्रार आली. शेवटी ज्यास वाटेल त्यांनी निराळी खाजगी सभा काढावी असे ठरले. नंतर मि. फर्ग्युसन ह्यांनी जमीनिच्या उत्पन्नावर कर बसवावा की नाही ? हा विषय पुढे आणून बसवावा असे आपले मत सप्रमाण दिले. थोडा वाद होऊन बसवावा असेच ठरले. एकंदरीत पहाता अशा सभा येथे विशेष आस्थेने चालतात असे दिसले नाही.

ता. १५ शुक्रवार

रात्री ९ वाजता मि. शोन, मि. बार्न्स आणि मी असे तिघे मि. कॉक ह्याचे घरी आध्यात्मिक साधनाकरिता जमलो होतो. मी प्रथम प्रार्थना केली नंतर कामास सुरुवात झाली. मि. कॉकने आपली कल्पना सांगितली की प्रत्येक आठवड्याला एकाने काहीतरी एखाद्या काही तरी एकाद्या मोठ्या साधूचा प्रासादिक विचार वाचून दाखवावा किंवा त्याचा विशेष उहापोह करावा. नंतर मी माझे विचार लिहून काढीले होते ते वाचले. नंतर मि. शोन व माझा युनिटेरियन मताविषयी थोडा वाद झाला. मि. बार्न्स ह्यांनी सुचविले की आम्ही एकत्र जमल्यावर ५/१० मिनिटे स्वस्थ समाधिस्त बसावे व कोणास काही स्फूर्ती अगर प्रेरणा झाल्यास तिच्याविषयी सर्वांनी विचार करावा. इतके झाल्यावर पुढचे शुक्रवारी जमण्याचे ठरले. आज सुबोध पत्रिकेला पत्र फ्रान्समधील प्रवासाचे वर्णनासंबंधी पाठविले आहे[२१].

ता. १७ आदित्यवार नवंबर

सकाळी १०।। वाजता युनिव्हर्सिटी चर्चमध्ये सर्मन ऐकिले. येथे सुमारे ३०० लोक आले. पुरुषापेक्षा बायका फार दिसल्या. त्यांपैकी बऱ्याच भक्तीने ऐकत होत्या. सर्मन साधारणच होते. पण बोलणारा स्पष्ट, जोराने, अस्खलित व कळकळीने बोलत होता. नंतर आमच्या कॉलेजमध्ये देवळात प्रो. रेव्ह. एडिस् ह्यांनी उपासना चालविली. हे आमच्या प्रोफेसरांपैकी सर्वांत अधिक जुन्या मताचे आहेत. श्रोतृसमाज सुमारे १००/१२५ होता. पैकी ३/४ पेक्षा जास्त बायका. हेच देऊळ काय ते सर्व ऑक्सफर्ड (मध्ये) युनिटेरिअन पंथाचे. संध्याकाळी खाईष्ट चर्च कॉलेजच्या देवळात उपासनेला गेलो. येथे उपासना एपिस्कोपल चर्चच्या[२२] नमुन्याप्रमाणे होते. प्रार्थना, पदे बायबलातील उतारे वाचणे ही एका ठराविक च्छापिल बुकातून वाचली जातात. देऊळ बरेच जुने असून गावात सर्वात मोठे आहे. प्रार्थना करीत असता गुडघे टेकणे, पद म्हणताना उभे राहाणे व उतारा वाचीत असता बसणे हे आळीपाळीने पुष्कळदा चालते. युनिटेरिअन देवळातही हाच प्रकार असतो. येथे मात्र एक विशेष दिसला की मध्ये एकदा सर्वांनी पूर्वेकडे आपली तोंडे वळवून कांही प्रार्थना केली. कदाचित हे जेरुसलेमकडे ह्यांनी तोंड केले असेल. मुसलमान लोक प्रार्थनेच्या वेळी हिंदुस्थानातून मक्केकडे पश्चिमेकडे पाहतात आणि उठाबशा करितात.

आज पारा ४६ अंशावर होता.

ता. १८ सोमवार

१२ वाजण्याचे सुमारास टेम्स नदीवर फिरावयास गेलो होतो. द्रोणातील तुपाप्रमाणे पाणी काही ठिकाणी थिजले होते. काठावर पांढरे सफेत बर्फाचे थर बसले होते. संध्या ४।। वाजता अरियंटल काफी नावाच्या चहागृहात काफी घेतली. तरुण युवती सुस्वर फिडल वाजवीत होत्या. १ कप कॉफी व चार बिस्किटाला ४ आणे पडले.

२० बुधवार नवंबर १९०१

संध्याकाळी मि. जॅक्सचे लेक्चर झाले. माझे मन तिकडे लागले नाही. त्या नंतरच्या विद्यार्थ्यांच्या उपासनेला मी राहिलो नाही. धर्मप्रचारणा हा मि. जाक्सच्या शिकविण्याचा विषय आहे. ह्याचे व्याखान झाल्यावर आमच्या कॉलेजबंधूपैकी कोणाची तरी उपासना चालविण्याची पाळी असते. व्याख्यान उपासकास लिहून काढावे लागते. तेच उपदेशरूपाने बोलल्याप्रमाणे त्याने वाचून दाखवावयाचे असते. मि. जॅक्स दूर बसून ऐकतो व पहातो. त्याचे व्याख्यान आपल्याबरोबर घेऊन जातो. दुसऱ्या आठवड्यात त्यातील गुणदोष व्याख्यात्या विद्यार्थ्यांस खाजगी रीतीने दाखवितो व आपले मत देतो.

मी आजच्या उपासनेला बसलो. नाही. मी घरी येऊन मिस् पिअर्सन्शी बोलत बसलो. ह्या संभाषणाने मला वरील ठराविक व्याख्यानापेक्षा अधिक ज्ञान मिळाले. इतकेच नव्हेतर माझी आध्यात्मिक उन्नती झाली. मी एथे आल्यापासून (नवंबर १९०१ इ. स.) ता. १६ शनिवार संध्याकाळपर्यंत मि. ग्रेडन व मिसेस ग्रेडन ह्यांच्याबरोबर 'पेयींग गेष्ट' पैसे देऊन पाहुण्याप्रमाणे राहत होतो. हे लोक मध्यम स्थितीतले असल्यामुळे ह्यांच्याकडे वरचेवर सभ्य पाहुणे मंडळी येत असे. ह्यामुळे व इतर ह्यांच्या शिष्ट रहाटीमुळे मला इंग्रजी सभ्य चालीरीतीचे बरेच ज्ञान मिळून जरी पुष्कळ फायदा झाला तरी विद्यार्थ्यांच्या दृष्टीने ह्या घरी मला बरीच गैरसोय होती. म्हणून मी गेल्या शनिवारी ता. १६ रात्रीपासून मिसेस पिअर्सन् हिचे घरी जागा घेतली आहे. मजबरोबर आमचा कॉलेजबंधू मि. शोन हाही येथेच आहे. हे घर आम्हाला अगदी स्वस्त पडून येथे आमची सर्व प्रकारे सोय आहे. आम्हा दोघाला स्वतंत्र दोन निजण्याच्या खोल्या असून बसण्याला दोघांमध्ये एक खोली सर्व सामान असलेली आहे. पण ह्यापेक्षा चांगली गोष्ट ही आहे की ह्या घरची सर्व माणसे प्रामाणिक, नम्र ममताळू, मानसाळू अशी आहेत. हे कुटुंब मध्यम स्थितीतील अगदी खालच्या दर्जाचे आहे. किंबहुना फॅशनेबल लोक ह्यास मध्यम स्थितीत न गणता लोअर क्लास म्हणजे खालच्या दर्जात घालतील. मिस्टर आणि मिसेस पिअर्सन, त्यांची तीन मोठी मुले आणि चार मुली अशी नऊ माणसे ह्या कुटुंबात आहेत. हे फार गरीब दिसतात. तरी आपल्या स्थितीत संतुष्ट दिसतात. ही सर्व आमचा वरिष्ठपणाचा मान राखून असतात. सर्व मुलगे आपल्या उद्योगात असतात. वडील मुलगी सुमरे २२ वर्षाची आहे. ती आमच्या दिमतीला आहे. तीन लहान मुली आहेत. पैकी दोघी शाळेस जातात. सर्वात लहान ३/४ वर्षाची घरीच खेळून आहे. दोन्ही लहान मुलीशी माझी मोठी मैत्री झाली आहे. सर्वात लहान आहे ती मजजवळ यावयाला भिते !

सर्वात वडील मिस् अलाइस् पियर्सन् , नंतर नेली, मेरी व मॅगी अशी क्रमाने नावे आहेत. सर्व सुशील आहेत. आज काही वेळ अलाईस् हिच्याशी बोललो. ही किती साधी आहे. पोषाख साधा, हिचे रूप साधे, हिची बुद्धीही साधी (साधारण) तसेच पण मनही साधे (सरळ). कला आणि कावेबाजी ह्यांचा हिला स्पर्शही नाही. आपल्या उणीवा च्छपविण्याची हिच्यात शक्ती नाही. तशीच पण इच्छाही नाही ; इतकेच नव्हेतर आपल्या उणीवाबद्दल हिला असमाधानही वाटत नाही ! हिच्यात कोणतीही नैतिक वाण दिसत नाही म्हणून हिचा हा भोळा व मुग्ध स्वभाव हिला फारच शोभतो. गरीब स्थितीतील हे निष्कलंक अंत:करण पाहून माझ्या आध्यामिक शिक्षणात बरीच भर पडली !!

ता. २३ शनिवार नवंबर १९०१

सकाळी फोक्स जॅक्सनच्या चर्चच्या इतिहासाची २५ पाने, १७३ पानापर्यंत वाचली. दोन प्रहरी ३-४।। पर्यंत टेम्स नदीवर बोटीतून फिरावयास गेलो होतो. हा माझा वल्हविण्याचा पहिलाच प्रसंग असता मला चांगले वल्ह्विता आले. मजबरोबर मि. शोन होता. प्रत्येकास बोटीचे भाडे ५ पेन्स म्हणजे ८६ आणे द्यावे लागले. सुमरे १।। मैल जाऊन परत आलो. व्यायाम चांगला होऊन मनात मोठी हुषारी आली. ४।। वाजता जपानचे वर्गबंधू मि. टोयो साकी[२३] याजकडे चहाला गेलो, त्याजकडे जपानची राजकीय व धार्मिक माहिती करून घेतली. ३५ वर्षामागे जपानात जी राज्यक्रांती झाली ती जपानच्या इतिहासातच नव्हेतर जगाच्या इतिहासात महत्त्वाची होणार आहे.

रात्री मिसेस बिझांटचे हिंदुस्थानातील जातिभेद हे व्याख्यान 'Ancient Ideals and Modern Life ' ह्या पुस्तकातून वाचले.

गेल्या शुक्रवारी माझी थोडी प्रकृती बरी नव्हती म्हणून मि. कॉकचे घरी आमच्या साधनसभेस मला जाता आले नाही. मि. शोन गेले होते. त्यांची वाट पाहात (स) काळ ११ पर्यंत बसलो. ते आल्यावर माझे त्यांचे धार्मिक भाषण १२।। पर्यंत झाले. काही धर्मग्रंथातील वाक्य घेऊन त्यावर प्रत्येकाने आपले विचार सांगणे; मग एकाने काही घरून निवडून आणलेले उन्नती आणि प्रेरणा करणारे उतारे वाचणे, नंतर काही आम्ही आपले पुढे धार्मिक आचरण कसे ठेवावे ह्या बद्दल संभाषण करणे हा तूर्त आमचा क्रम आहे.

ता. २९ शुक्रवार नवं. १९०१

आज रात्री ८ वाजता मार्टिनो क्लबची सभा झाली. मँचेस्टरचे रेव्ह. डॉसन यांनी 'टेनिसनची कविता' ह्यावर फार चांगला निबंध वाचला. ह्यावर वादविवादही मनोरंजक झाला. टेनिसनला सृष्टीचे चित्र जशाचे तसेच वठविता येत होते. पण वर्डस्वर्थप्रमाणे सृष्टीत दैवी तत्त्व टेनिसनला दिसले नाही, असा निबंधाचा व वादाचा झोक होता.

ता. ३० शनिवार नवं.

मि. कॉक ह्याचे घरी आमची तिसरी साधनसभा झाली. मि. बार्न्स, मि. कॉक, मि. शोन आणि मी स्वतः असे चौघे तूर्त जमत आहो. आजची सभा ३ री होती. मि. बार्न्स लंडन येथे उपदेश करण्यास गेला होता. आम्ही तिघांनी प्रार्थना केल्या 'Follow after Love desire for spiritual gifts and prophecy' अशा अर्थाचा उतारा वाचला. नंतर उच्च प्रेम आणि विरक्ती ह्यावर थोडा वाद झाला. मि. कॉकने बुद्धासंबधाने प्रीतीनेच द्वेषाचे निर्मूलन करावे व करणे शक्य आहे अशा अर्थाची एक गोष्ट वाचली. आम्ही तिघेही सात्त्विक अन्न ग्रहण करणारे आहो. मि. कॉक आणि मि. शोन पक्के Theosophists कर्मवादी आहेत.

सुट्टी : लंडन

ता. ८ दिशं. १९०१

दोन प्रहरी १ वाजता ऑक्सफर्डहून निघून लंडन येथे ३ वाजता पोचलो. रात्री 'पॅगेट' ह्यांच्याविषयी व्याख्यानास गेलो. ग्रेज इन रोड, कॉल्थोर्प स्ट्रीट नं. ७ येथे एक खोली घेतली आहे. ती सुमारे दोन खणांची आहे. भाडे रोज १ शिलिंग आहे. मुंबईचे स्वामी निर्विकल्प ह्यांचे शिष्य व कोल्हापूरचे जोशी (योगी) ह्यांचे मित्र रा. राजाराम पानवलकर[२५] आणि नाशीकचे व्यापार शिकण्यास आलेले रा. पंगे हे दोघे लगतच्याच खोलीत आहेत. पानवलकर हाताने स्वयंपाक आम्हा तिघांसाठी करितात. तो आम्हांस फार गोड असतो. तो सात्त्विक व शुद्ध वनस्पतीचाच असतो. ह्यामुळे बिनत्रासाने थोडक्यात स्वच्छ अन्न मिळते; आणि ह्यांचे सोबतीत लंडन चांगले पाहण्यास सापडते.

दोन प्रहरी युनिटेरियन सेक्रेटरी बोवीस भेटल्यावर साऊथ केन्सींगटन येथील मोठे प्राणिशरीरसंग्रहालय पाहिले. पण पाऊण तासातच हे बंद झाल्यामुळे दोनच खोल्या पाहिल्या.

ता. ९ दिशं.

दोन प्रहरी २ वाजता ट्रफालगर स्क्वेअरमधील National Picture Gallery चित्रसंग्रहालय पाहिले. जवळ जवळ अर्धी चित्रे धार्मिक म्हणजे येशू आणि कुमारी मेरी ह्यांचीच व काही साधूंची होती. राफील, रूबेन इ. प्रसिद्ध चित्रकारांची सुंदर चित्रे येथे दिसतात. निरनिराळ्या देशांची निरनिराळी अशा व्यवस्थेने मांडली आहेत. आणि एकेएक चित्र इतके सुंदर होते की ते सोडून पुढे जाववत नसे. १।। (दालन ?) पाहिल्यावर दारे बंद होऊ लागली म्हणून काही भाग पहावयाचा राहिला. अशा ठिकाणी प्रेक्षक समुदाय भरला असतो. दालनाच्या मधोमध खुर्च्यांची रांग आहे. त्यांवर बसून कित्येक रसिक प्रेक्षक भिंतीवरील तसबिरीकडे पुष्कळ वेळ टक लावून स्वत:ही चित्राप्रमाणेच तटस्थ दिसतात. ह्यानंतर पिकॅडिलीमधील काही चित्रे व तेथील चावटपणाचा मासला पाहिला आणि घरी आलो.

ता. ११ दिशं. १९०१ बुधवार

सकाळी नॅशनल इंडियन असोसियेशनचा १९०१ चा रिपोर्ट वाचला. ब्रि. ॲ. फॉ. युनेटेरियन असो. चा रिपोर्ट वाचला. तीन वाजता सेंट पॉलचे देऊळ पाहिले. हे जुने भव्य आणि उंच आहे. बाहेरचा भाग धुराने काळा झाला आहे. ह्यांचे भोवताली अरुंद रस्ते असल्याने माणसांची खेचाखेची असते. आम्ही गेलो तेव्हा उपासनेची वेळ झाली होती. म्हणून चहूकडे पाहण्यास मिळाले नाही. ह्यानंतर क्रिस्टमसकरिता गमतीच्या जिनसा विकण्याचे एक ४/५ मजल्याचे भले मोठे दुकान पाहण्यास गेलो. हे एक मोठे प्रदर्शनच होते. ह्यात लक्षावधी रुपयांचा माल होता पण सर्व खेळण्याचे नखऱ्याचे जिन्नसच होते. हा सर्व चैनीचा देखावा पाहून किळस येतो. ह्या लोकांची कमीत कमी एक चतुर्थांश तरी संपत्ती केवळ निरर्थक वस्तूंत गुंतली आहे !

ता. १३ शुक्रवार १९०१ दिशंबर

दोन प्रहरी ३ वाजता मिस मॅनिंगचे घरी गेलो. तिला किती आनंद झाला ! इकडचे तिकडचे बोलणे झाल्यावर तिने मला आपली लायब्ररी दाखविली. नंतर हिंदुस्थानची चित्रे, मौजेच्या गोष्टी,

यात्रा कराव्यात. तेथील देखाव्यांचे फोटो घ्यावेत. ह्यासाठी राजारामाने ऑक्सफर्ड येथे फोटोग्राफी शिकावी. उदार धर्मावर आम्ही जागोजाग व्याख्याने देऊन आपला निर्वाह करावा. देखावे मॅजिक लँटर्नने दाखवून व्याख्याने द्यावीत. यूरोपात प्रवास झाल्यावर अमेरिकेत, नंतर जपान आणि चीन देशांतून परत कलकत्ता व मद्रास शहरांतून परत स्वदेशी जावे. वाटेत व्याख्याने देणे, स्नेह संपादणे, बंधुता वाढविणे हाच धंदा ठेवावयाचा, पुढील मार्ग साधावयाचा व मागील जोडलेल्या प्रेम व ऐक्य ह्या संपत्तीचाही मेळ घालावयाचा हा क्रम पाळावयाचा इ. इ. इ. इ.

गेल्या गुरुवारी ह्यासंबंधाने थोडे बोलणे झाले होते. येत्या गुरुवारचा दिवस पवित्र करून त्या दिवशी कोठे तरी बाहेर जाऊन ह्यासंबंधाने व्रत ग्रहण करण्याचे ठरवून आज रात्री आम्ही एकत्र निजलो. पण दोघांसही झोप लागली नाही.

ता. १५ दिशंबर आदित्यवार

११ वाजता चार्लस व्हायसेच्या चर्चमध्ये उपासनेस गेलो. हे एका बोळात आहे. एका तास गीते गाणे, उतारे वाचणे आणि प्रार्थना करणे इ. झाल्यावर १२ पासून १२।। पर्यंत उपदेश चा. व्हायसे ह्यांनी केला. हे अगदी कडक सुधारक एकेश्वरी आहेत. ह्याना युनिटेरियानिझमही पसंत नाही. ह्यात व्हॉयसेचीच थोडीसी चुकी होत आहे. युनिटेरियन लोकांत शुष्क वाद न करिता मिळून काम करण्याचा मोठा गुण दिसून येतो. तो व्हायसेने घेतल्यास दोघांसही जास्त बळ येईल. पण ह्या गोष्टीस व्हायसेचीच नाखुषी दिसते. त्यास काम फार असल्याने अद्यापी खासगी भेट झाली नाही. चर्चमध्ये व्यवस्था फार चांगली आहे. उपासक सुमारे १०० हजर होते. दरात व्हायसेची पुष्कळ पुस्तके विकावयास ठेविली होती. बोळात शिरतानाच एक छापील व्याख्यान फुकट मिळते. संध्याकाळी पुन्हा उपासना होते. दोन्ही वेळा धर्मार्थ पैसे गोळा होतात. सर्व इंग्लंडांत इतक्या उदार मताचे हे एकच चर्च आहे हे आठवून व्हायसेची धन्यता वाटते !!

मिस् मॅनिंग ह्याचीच अनुयायी आहे. पण तिलाही ह्याचा कडकपणा आवडत नाही. पण त्याचा स्वार्थत्याग व असिधाराव्रत ह्यांबद्दल फार मान आहे. आज मिस् मॅनिंगला 'द्रौपदी व सुदेष्णा' हे रविवर्म्याचे चित्र बक्षीस दिले. ते तिला आवडले.

ता. १६ दिशंबर सोमवार

रीजंट पार्क येथील अचाट प्राणीसंग्रहालय पाहिले. अनेक तऱ्हेचे पक्षी, साप, सरड, पाली, सुसरी, किडे, कासव, मासे, जलचर, भूचर, खेचर ह्यांचा हा संग्रह पाहून थक्क झालो. वाघ, सिंह, चित्ते ह्यांस खावयास घालण्याची वेळ झाली होती. भक्ष्य दिसल्याबरोबर गर्जना करीत व उड्या घेत. सर्व प्राण्यांस त्यांना माफक अशा उष्णतेत सर्व तऱ्हेची हितावह व्यवस्था केली होती. अजगरास वेळखे मारण्यास झाडे, वाघास लपून बसण्यास गुहा, हरिणास बागडण्या (स) मैदाने व गरूडास उडण्यास मोठे विशाल तारांचे पिंजरे केले आहेत. हत्ती, पाणघोडा, गेंडा, जिराफ, झीब्रा, सील वगैरे प्राणी पाहून प्रेक्षक विस्मयानंदात गर्क होतो. तिकिटाचे प्रत्येकास ६ पेन्स सोमवारी व इतर दिवशी १ शिलिंग पडतो.

येतात व ह्याचा (उद्देश ?) सर्व मजूर लोकांसाठी आहे. कारण सुटीचे दिवस आणि फुरसतीचा वेळ अशा प्रकारच्या उच्च करमणुकीत घालविल्याने त्यांचे मन व्यसनाकडे वळत नाही. पासमोर नावाच्या उदार व कनवाळू मनुष्याने पदरचे हजारो रुपये खर्चून व बऱ्याच देणग्या मिळवून ही अत्यंत उपयोगी संस्था उभी केली आहे.

ता. २२ आदित्यवारी दिशं १९०१

पोर्टलंड स्ट्रीटमधील युनिटेरियम देवळात रेव्ह. पेरिसचे व्याख्यान झाले. शांती हा विषय होता. आफ्रिकेतील लढाईविषयी ह्याने जोराने प्रतिकूल मत दिले. 'धर्म जर व्यवहार येत नसेल, अगर कोणताही नीतीचा व न्यायाचा व्यवहार धर्मात गणला जात नसेल तर मी आजच प्रचारकाचा राजीनामा देईन.'

ता. २३ सोमवारी दिशं. १९०१

११ वाजता 'फाउंडलिंग हॉस्पीटल' पाहिले. ह्याची व डॉ. बर्नाडोच्या अनाथ आश्रमाची माहिती मी लवकरच सुबोध पत्रिकेत पाठविणार आहे[२७].

ता. २४ मंगळवार, दिशं. १९०१

ब्रिटिश म्युझियम नॅचरल हिस्ट्री ब्रँच पुन्हा पाहिली. वाघ, सिंव्ह, हत्ती, गेंडा इ. ची शरीरे जशीच्या तशीच ठेविली आहेत. डार्विनचा पुतळा पाहिला. डार्विनच्या विकासवादावर हजारो व्याख्याने ऐकण्यापेक्षा ही म्युझिअम एकदा नीटपणे पाहून ही अधिक माहिती होते. ४ वाजल्यावर व्हिक्टोरिआ व आलबर्ट म्युजीअम पाहिली. ह्यामध्ये सर्व कलाकौशल्याचे संग्रहालय आहे. नंतर शास्त्रीय उपकरणांचे संग्रहालय पाहिले.

वाटेत घरी येताना पिकॅडिलीमध्ये एका तळघरात एका दुतोंडी राक्षसाचे (२००/३०० वर्षापूर्वी मारलेल्या) प्रेत पाहिले.

ता. २५ नाताळ दिशंबर

पोर्टलंड स्ट्रीटमध्ये स्टॉफर्ड ब्रूकची उपासना ऐकली. श्रोतृसमाज २०० वर होता. आज आम्ही फराळ केला. म्हणजे जडान्न खाल्ले नाही. आज रस्त्यात गर्दी मुळीच नव्हती. पण दारू पिऊन बायकामुले व पुरुष ही झुकांड्या खात व गाणी म्हणत जाताना पुष्कळ पाहिली. ह्याशिवाय नाताळ विशेष पाहण्यास मिळाला नाही.

ता. २७ शुक्रवार

पोस्टल मिशनची २२ अध्यक्ष मिस् टॅगर्ट हिचे घरी मी व राजाराम जेवायास गेलो होतो. तेथे चिटणीस मिस हिल्ल ही आली होती. पोस्टल मिशनची माहिती करून घेतली.

ता. २८ शनिवार

लंडन टॉवर पाहिला. ह्या ठिकाणी पुष्कळ जुन्या ऐतिहासिक इमारती आहेत. एकीत सर्व देशातील हत्यारे व चिलखती ठेविली आहेत. दुसरीत राजकीय जवाहीर आहेत. तिसरीत पूर्वी राजकी कैदी ठेवीत असत. ह्या ठिकाणी टेम्स नदीवर एक भव्य पूल आहे. आगबोट आली की हा अजस्त्र

पूल मध्ये दुभंगून, दोन्ही कडे आपोआप उठतो. दोन्ही बाजूस दोन बुरूज आहेत. ते १५० उंच आहेत. त्यांच्यामधील दुभंगणारा पूल १०० पावले अथवा सु. ३०० फूट लांब आहे. ह्या दोन्ही बुरूजावरूनही एक पूल आहे.

ता. २९ आदित्यवार

साउथ प्लेसमधील नैतिक समाजात उपासना ऐकावयास गेलो. ही इमारत व उपासना देवळातल्याप्रमाणे आहेत. पण परमेश्वराचा येथे उल्लेखही होत नाही. लोकांस जबरीने लढाईवर पाठविणे हे निंद्य आहे असे उपासकाने प्रतिपादले. ॲडम स्मिथ[२९], सिजविक[३०] वगैरेंचे उतारे वाचले. टेनिसनची[३१] काही पदे गाईली. सुमारे २०० श्रोते हाजर होते. हे बहुतेक अत्यंत उदार मताचे होते. ही संस्था पाहून विस्मय वाटला!

ता. ३० सोमवार दिशंबर १९०१

डोमेस्टिक मिशनपैकी रेव्ह. समर्सचे जॉर्जेस रोमधील मिशन पाहिले. ह्या भागातील गरीब लोकांची स्थिती चार पाच ठिकाणी त्यांचे घरांत आम्हास नेऊन समर्सने दाखविली. पैकी तीन ठिकाणी अगदी म्हाताऱ्या बाया फार आजारी होत्या. दोघा आजाऱ्या बायाजवळ मी प्रार्थना केली. एक अगदी बहिरी असल्यामुळे तिच्या कानात मला ओरडून प्रार्थना करावी लागली. ह्या बाईने राजा राममोहन राय[३२] बद्दल मोठ्या आदराने व आस्थेने उल्लेख केला. रस्त्यातून हिंडत असता आमच्या मागे २००/२५० मुलांचा घोळका जमला होता. काहींनी आम्हास थोडा त्रास दिला. आम्ही घरात शिरलो की ही गर्दी आम्ही बाहेर येईपर्यंत आमची वाट पाहात उभी असे. एका घरात कामकरी बाया सर्व दिवसभर कामावर गेल्या असता त्यांची मुले संभाळण्याची व्यवस्था केली होती. एकंदर अशी लहान मोठी २३ मुले होती. प्रत्येक मुलास २ पेन्स ४ = आणे रोजचा चार्ज असे. गरीब लोकांची घरे कितीही कंगाल असली तरी त्यात निदान १०/२० चित्रे, काही मूर्ती, काही दिखाऊ सटरफटर सामान होतेच. मिशनचे प्रार्थना मंदीर साधे पण पुरेसे होते. बहुतेक सर्व खर्च युनिटेरियन असोशियन मार्फत आहेत. अशी ३ मिशने निराळ्या भागात आहेत. आज येथे चहाची पार्टी होती. मुलींचे ताल सुरावर ड्रील व डंबेल झाले. नंतर आम्हाला थोडी भाषणे करावी लागली.

ता. १ जानेवरी १९०२

स्वामी विवेकानंद ह्यांनी येथे काय काम केले व त्यांचेमागे काय काम चालले हे समजून घेण्याकरिता, मि. स्टर्डी नावाच्या गृहस्थाकडे गेलो. पण त्याने ह्या कामातून आपले आंग काढले आहे आणि त्यासंबंधी आपली काहीच बोलण्याची इच्छा नाही असे सांगितले. पुढे जे थोडे बोलणे झाले त्यात असे सांगितले की हल्ली काहीच काम चालले नाही. स्वामींच्या बोलण्या (चा) परिणाम नुसता काही बायकांवर मात्र झाला. त्यांची पुस्तके अद्याप बरीच खपत आहेत वगैरे, वगैरे.

संध्याकाळी ८ वाजता युनिटेरियन एसेक्स हॉलमध्ये थिऑसफिक सोसाईटीचा वर्ग पाहावयाला गेलो. प्रत्येक महिन्याचे पहिले बुधवारी सेक्रेटरी एक छापील व्याख्यान देतात. त्यावर जमलेल्या मंडळीत विवाद होतो. सुमारे ३० मंडळी जमली होती. पैकी थिऑसफीस्ट २/४ असतील. हा वर्ग इतरांसाठीच आहे. विषय पुनर्जन्म हा होता. व्याख्यात्याने प्रतिपादन केल्यावर मंडळींनी अनेक प्रश्न

विचारिले. व्याख्यात्याने शांतपणे बरी उत्तरे दिली. कोणाचे विशेष समाधान झाल्यासारखे दिसले नाही, तरी सभेचे काम किती शांतपणे व सत्य समजून घेण्याच्या बुद्धीने चालले होते ते पाहून व्याख्याते, चिटणीस, श्रोतेमंडळी ह्यांच्याबद्दल पूज्यबुद्धी वाटली. आणि हिंदुस्थानातील मिशन-याचा ख्रिस्ती उपदेश व ऐकणा-याची वर्तणूक ही आठवून विस्मय वाटला. व्याख्यात्याशी बिझांटबाई (बद्दल) बोलताना त्यांनी सांगीतले की बिझांटबाईने हिंदुस्थानात जे काम चालविले त्याचा जगातील इतरत्र थिऑसॉफीक चळवळीशी काही संबंध नाही. ते काम ती आपण हिंदू म्हणवून करीत आहे; म्हणून ती व तिचे काम ही दोन्ही दुस-या थिऑसाफिस्टना मान्य नाही. लंडनमध्ये आल्वे मार्ल स्ट्रीटमध्ये दुसरी एक थिआ. सभा आहे, ती पाहणे झाले नाही.

ता. २ जानेवारी १९०२

मिस् हिल्लच्या आमंत्रणावरून पोस्टल मिशनच्या कौउन्सिलमध्ये मुंबईच्या बाजूला एक पोस्टल मिशनची शाखा काढण्याचा माझा विचार कौन्सिलपुढे ठेविला. कमिटीला तो पसंत पडून त्यांनी मला लागेल तशी पुस्तकांची मदत देण्याचे कबूल केले. कमिटीत १०/१२ बायका होत्या. पोस्टल मिशनचे सर्व देशभर काम केवळ बायकाच चालवितात.

संध्याकाळी ६ वाजता मॅनस्फर्ड स्ट्रीटमधे कॅडमन यांचे युनिटेरियन मिशन पाहिले. सुमारे २०० मुलांचा मेळा जमला होता. सुमारे ३० मुलींचे तालसुरावर गाणे, नाचणे, ड्रील व डंबेल करणे पाहून फार आनंद झाला. अत्यंत गरीबाच्या मुलास कर्मणूक करून फुकट शिक्षण देण्याची ही योजना आहे.

३ जानेवारी

इनकायरर[३३] पत्राचे एडिटर डेव्हिस यांजकडे चहा घेण्यास गेलो. हे इंडियन कमिटीचे चेअरमन आहेत. हे फारच मनमिळाऊ आहेत. नवराबायकोने मला फार प्रेमाने व सत्काराने वागविले. हिंदुस्थानातील एकेश्वरी मंडळीचा व येथील युनिटेरियन्सचा काही ऑफिशल घटनात्मक संबंध असणे तुम्हाला इष्ट वाटत नाही काय म्हणून मी त्यांस विचारता ते म्हणाले की तुमच्या समाजात आधीच पुष्कळ दुही झाली आहे, असे आम्ही ऐकतो. म्हणून असा संबंध इष्ट दिसत नाही. शिवाय मतात कसलाही फरक नसताना असे संबंध आणून तुमच्या कामात विनाकारण ढवळाढवळ केल्याचे अपश्रेय येईल.

४ जानेवारी

दोन प्रहरी २ वाजता वेस्ट मिनिष्टर ॲबे पाहिले. हे ठिकाण फार जुने म्हणजे एडवर्ड दि कनफेसरपासूनचे आहे. ह्या ठिकाणी राष्ट्रीय सर्व मोठे कवी, इतिहासकार, ग्रंथकार, योद्धे, धमापदेशक वगैरे विभूतींचे पुतळे व थडगी आहेत. तसेच सर्व राजांचीही थडगी आहेत. ही इमारत उंच असून कमानी गॉथिक थाटाच्या आहेत. मंडपाची उंची १००/१२५ फूट आहे. नंतर पार्लमेन्ट हाऊस पाहिले. नंतर दर पंधरवड्याची लंडन इंडियन इन्स्टिट्यूटची सभा होती तेथे गेलो. अध्यक्ष दादाभाई नवरोजी व दुसरी ५/६ मंडळी हाजर होती. पण व्याख्याते व दोन्ही चिटणीस आले नाहीत (शेवटपर्यंत) म्हणून सभा लांबणीवर टाकावी लागली. इंडियन लंडनात गेला म्हणून काय झाले. इंडियनच तो ! ह्या सभेस कोणी युरोपियन येत नाहीत हे एक भाग्यच. नाहीतर ही हिंदी व्यवस्था त्यास कळली असती. सभेची ही नेहमीची रड आहे.

सुट्टी
ब्रिडपोर्ट (डेव्हन शायर)
दक्षिण किनारा
C/o. Mr. Cornick, 10 West Str.,
Bridport

ता. १५ मार्च १९०२

सकाळी ९ वाजता ब्रिडपोर्टला निघालो. आमचे कॉलेजास ६ आठवड्यांची आजपासून सुटी झाली. ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटीतील विद्यार्थ्यांपैकी १४ जणांनी दक्षिण आफ्रिकेतील लढायीत स्वच्छेने कामगिरी पत्करली आहे. त्यापैकी दोन विद्यार्थीशिपाई ह्याच गाडीने लढाईवर निघाले. म्हणून त्यास पाठविण्याकरिता विद्यार्थ्यांची गर्दी स्टेशनवर जमली होती. लष्करी ब्यांड सुरू होता. हे पाहून माझे मन विचाराने व विकाराने भरून गेले. ह्या तंद्रीतच सारा प्रवास झाला. आज हवा स्वच्छ आणि ऊन पडले होते. ब्रिडपोर्ट येथे १-३५ ला नियमितपणे पोचलो. मि. कॉर्निक मला नेण्यास स्टेशनावर आले होते. हे मध्यम प्रतीचे दुकानदार आहेत. त्यांचे स्वच्छ, सुंदर आणि नीटनेटके घर पाहून आनंद झाला. संध्याकाळी मि. हेन्स नावाच्या गृहस्थाकडून दुसरे दिवशी (आदित्यवार) 'तरुण लोकांच्या उपासना सभेत' भाषण करण्याविषयी आमंत्रण. पण मला फुरसत नसल्यामुळे कष्टाने नाकारावे लागले.

ता. १६ मार्च आदित्यवार

काल संध्याकाळी येथील युनिटेरियन मंदिराचे आचार्च मि. सॉली ह्यांची भेट झाली. त्यांनी सर्व उपासनाक्रम समजावून दिला. त्यांचे राहणे आचार्याच्या मानाने फार थाटाचे दिसले. युनिटेरिअन समाजास पैशाची विशेष वाण दिसत नाही. आज सकाळी ११ वाजता ह्यांचीच उपासना झाली. उपासनेनंतर कॉल्फॉक्स नावाच्या अती श्रीमंत युनिटेरियन गृहस्थाची मुलाखात झाली. ते फार साधे दिसले. दोन प्रहरी गावापासून १।। मैलावर कॉर्निकच्या वडिलाचे घर होते. तेथे गेलो. दोघे वृद्ध आईबाप अगदी साधे. त्यांची राहटीही साधी. हे फळझाडाची लागवड करितात. सुमारे ३ एकर जमीनीस फाळा (भाडे) दरसाल २८ पौंड देतात. साधारण जिराईत लागवड जमीनीस एकारास ३ पौंड पडतात. नंतर मि. कॉर्निक उपदेश करण्यास दोन खेड्यास गेले व मी, मिसेस कॉर्निक घरी आलो. संध्याकाळी युनिटेरियन मंदिरात माझी उपासना झाली. १/२ आठवडे आधीच मजबद्दलच्या जाहीराती प्रसिद्ध झाल्या होत्या. मी पद्धतीप्रमाणे आठवी उपासना वाचली. ह्या पद्धतीत आचार्य व उपासक आळीपाळीने काही वाक्ये म्हणतात. तेणेकरुन दोघांचेही लक्ष उपासनेत लागते. ही पद्धत मला फार आवडली. हिला लिटनी असे म्हणतात. श्रोतृसमाज बहुत करुन ३००-३५० पर्यंत जमला होता. केवळ मी परका म्हणूनच इतकेजण जमले होते असे वाटते. युनिटेरियन, शिवाय इतर सर्वांचा भरणा होता. १ तास उपासना झाल्यावर सुमारे वीस मिनीटे माझे व्याख्यान झाले. विषय 'ब्रह्मासमाज' होता. बहुतेक सर्वास व्याख्यान कळलेसे दिसले. १०/१२ लहान थोरांनी तसे येऊन सांगितले. सर्व उपासना अती उंच स्वराने करावी लागल्याने थोडा शेवटी थकवा आला. पण उपासनेत मी स्वत: फार रंगलो!!

खासगी शाळा व ईटन इ. मोठ्या शाळा आहेत. असो. शाळेत गेल्यावर प्रथम ख्रिस्ताची मोठमोठी चित्रे भिंतीवर दिसली. समोर एका तसबिरीत तो काही लहान मुलांस आपल्याजवळ घेत होता. खाली त्याचे हे वाक्य होते. 'लहानग्यास मजकडे येऊ द्या. स्वर्गीय राज्य अशांचेच आहे.' भोवती त्याच्या इतर परोपकाराचे प्रदर्शन केले होते. ह्या शिवाय भिंतीवर चंद्र, गोल, कोन इ. अनेक रंगाच्या निरनिराळ्या आकृती लावल्या होत्या. मधून खंडाचे व देशाचे नकाशे सोडले होते. शिवाय काही प्रसिद्ध स्थळाचे व पुरुषांचे फोटो लावले होते. शाळेचे हेड मास्तर मि. मिल्बोर्न हे फार हुषार संभावीत दक्ष दिसले. आजुबाजू ह्यांची ख्याती आहे. ह्यांची पत्नी शाळेत शिकवित होती व दुसरी मदतनीस शिक्षकीण होती. वहिवाटीप्रमाणे मुलाच्या ७ ईयत्ता होत्या. पण शिक्षकांच्या अनुभवाप्रमाणे शिक्षणाच्या सोयी प्रमाणे व मुलाच्या हुषारीप्रमाणे (मुलांचे) खरे वर्ग ४ च होते. ६ अगर ७ व्या वर्षी मूल शाळेत येते, १५ व्या वर्षी कामावर जाते. मुलामुलींचे येथे एकत्र सारखेच शिक्षण चालले होते. मुलांपेक्षा मुली मोठ्या दिसल्या कारण मुलास आपला धंदा शिकण्यास लवकर शाळेतून जाण्याची घाई असते. शाळेतून बाहेर पडल्यावर ५/७ वर्षांत कोणता तरी विशेष धंदा शिकून आपला निर्वाह साधावा लागतो. शाळा सकाळी ९ पासून १२ पर्यंत व २ पासून ५ पर्यंत उघडी असते. दररोज २ प्रमाणे वर्षांतून निदान प्रत्येक मुलाच्या ४०० तरी हाजऱ्या असल्या पाहिजेत. ह्या शाळेत ४३० होतात. बाजूच्या एका खाली (त) अगदी लहन मुलांचा वर्ग होता. ह्यांच्या स्लेटीवर खिळ्याने कायमच्या आडव्या उभ्या रेषा मारल्या होत्या. अक्षरे अगर आकडे लिहावयाचे ते प्रत्येक चौकात लिहीत असत. त्यामुळे लहानपणापासून प्रमाणशीर व्यवस्थेने लिहिण्याची सवय होत आहे. ७ वर्षापर्यंत मूल अशा वर्गात असते. ३/४ वर्षांची ३ अर्भके लाकडाच्या तुकड्यांनी घरे बांधून एका बाजूस खेळत होती. नंतर काही परिक्षेच्या लेखी उत्तराचे कागद पाहिले. हे छापलेले व आखलेले ठरीव नमुनेच होते. त्यात उत्तरे इतक्या व्यवस्थेशीर रीतिने लिहली होती की परीक्षेच्या घाईत ती लिहिली असावीत हे संभवनीय वाटेना. कोठेही डाग अगर टिपका दिसला नाही. त्याच प्रमाणे नकाशे व ड्रायींगच्या वह्याही व्यवस्थेशीर दिसल्या. शाळेत एक लहानशी म्यूजीअम होती. वरच्या खान्यात साबण तयार करण्याचे सामुग्री क्षार, तेले वगैरे ठेविली होती; व साबणाचे मासलेही होते. खालच्या खान्यात दगडी कोळसा, इतर उभ्दिजे होती. दुसऱ्या बाजूस उसाचे कांडे, मक्याचे कणीस इ. पासून तो तयार झालेला साखरेपर्यंत रूपांतरे होती. त्याचे खाली रेशमी किड्याच्या वेष्टनापासून तो तयार झालेला सुंदर लडीपर्यंत रूपांतरे होती. दुसऱ्या बाजूस शेजारच्या कागडन हिल्लवर सापडलेले जुन्या रोमन लोकांचे दात, हाडे, थडग्यांतील भांडी, काही हत्यारे ह्या जिनसा होत्या. खालच्या खणात धान्ये, बिजे आणि कापसापासून तो कापडापर्यंत गिरणीतील रूपांतरे होती. दुसरीकडे निरनिराळ्या आकाराचे लहान मोठे ठोकळे ठेवले होते. एका तावदानी पेटीत शिसपेन्सलीचे पर्याय व दुसऱ्या पेटीत पोलाद आ(णि) तांब्याच्या पट्टी पासून तो निरनिराळ्या टाकाच्या टोकापर्यंत कृती दाखवली होती. एका बाजूस चित्राचे काही कित्ते ठेविले होते. त्यात खेड्याचा पाटीलबुवा आणि दरबारातील रणशूर सेनानी ह्यांचे हावभाव हुबेहुब पण साध्या रेघांनी दाखविले होते. काही निरनिराळ्या रिवाजाचे गोंडस खोजे व मातीची इतर भांडी ठेविली होती. शिवाय एका झाडाचे खोड कित्येक सहस्त्र वर्षांपूर्वी भूगर्भामध्ये दडपून जाऊन साक्षात दगड बनलेले पाहण्यासाठी ठेविले होते. इत्यादी सामुग्रीच्या

ता. १८ मंगळवार, मार्च १९०२

सकाळी ९ वाजता मि. कॉर्निक, रेव्ह. वुइंटर आणि मी असे तिघे ब्रिडपोर्ट पासून ६/७ मैलावर एगार्डन टेकडीवरचे रोमन च्छावणीचे अवशेष पाहवयास गेलो. गार वारे सुटले होते. अगदी डोंगराळ प्रदेशात टेकडीच्या माथ्यावरून ही घोड्याची गाडी अगर बाईसिकल जाण्यासारख्या सुंदर सडका आहेत. ही रस्त्याची सुधारणा बाईसिकल्स आल्यापासून झाली आहे. एगार्डन हिल्ल समुद्र सपाटीपासून .... मैल उंच आहे. जमीन मऊ चिकणाईत चुनखडीची आहे. गवताने आच्छादित आहे. टेकडीच्या माथ्यावर रोमन लोकांची एक सडक सरळ बाणासारखी खाली जाते. सडका अगदी सरळ करण्याची रोमन चाल असे. टेकडीच्या माथ्यावर जुनी रोमन च्छावणी होती व अद्यापि आहे. मध्ये दोन पुरुष खोल खंदक व दोन्हीकडे समांतर बांध ह्याप्रमाणे वर्तूल टेकडीच्या माथ्यावर आहे. येथून सुमारे १/१।। मैलावर समुद्र दिसतो. ही चांगली माऱ्याची जागा आहे. टेकडीवर अद्याप केव्हा केव्हा रोमन लोकांची हत्यारे, हाडांचे सांगाडे सापडतात. बर्टन खेडे येथील शाळेतील म्युजीयममध्ये काही करटी मी पाहिली. टेकडीच्या खाली दरीतून परत येताना पॉवरस्टॉक, एस्करवेल इत्यादी कित्येक खेड्यांचा सुंदर देखावा दिसला. एका खेड्यातील मेथाडिस्ट चर्च पाहिले. सुमारे ५० जणांना सुखाने बसता येतील अशी बाके मांडिली होती. एक बाजाची पेटी होती. I am with you मी तुमच्याबरोबर आहे, हे येशूचे आश्वासन भिंतीवर स्पष्ट पाहून जिवास किती धीर वाटला ! दोन गरीब लोकांच्या घरांत जाऊन पाहिले. पैकी एक बाई १० वर्षे आजारी, ५/६ वर्षे अगदी हांतरुणात खिळलेली होती तिला भेटलो. तिला फार आनंद आणि आभार वाटले. येथे प्रार्थना केली. ही घरे स्वच्छ. मुख्य खोलीत चित्रे, चिमुकल्या वस्तू पुष्कळ होत्या. धर्मपर वाक्ये लिहिलेल्या पाट्या पाहून तर मला फार आनंद झाला. अगदी खेड्यांतील हीन लोकांतही येशूची वाक्यरत्ने चमकत आहेत ! मेथाडिस्ट लोकांची गरीबात धर्मप्रचारणा करण्याची मोठी हातोटी पाहण्यासारखी आहे. आठवडाभर कामधंदा करणाऱ्या तरुणास हुरूप देऊन त्यांना रविवारी खेडोपाडी उपासना करण्यास पाठवितात.

ता. २१ शुक्रवार मार्च १९०२

परवा मि. व्हाईट ह्यांचे घरी जेवणास गेलो होतो. ह्यांस दोन मुली आणि मुलगे आहेत. सारी पोक्त आहेत. मि. व्हाईट मध्यम प्रतिचे व्यापारी असून विनोदी गृहस्थ आहेत. हे जुन्या मताचे ख्रिस्ती (मेथाडिस्ट) असून ह्यांना गौतम बुद्धाविषयी बराच आदर व माहिती आहे. सर्वांनी मला अत्यंत आगत्याने वागविले. मिस् फ्लो. व्हाईट हिची चित्रे पाहून अत्यंत आनंद झाला. तिने आपला एक देखावा मला दिला आहे. ही जशी देखणी तशीच कुशल व नम्र दिसली. हिचे वडील बहीण फारच मर्यादशील आहे. ह्या लोकामध्ये सर्वत्र अशी चाल आहे की कोणी सभ्य पाहुणा अगर मित्र घरी आला (असता) त्याच्याकडून आपल्या सुंदर स्मारकबुकात काही लहान, चटकदार, बोधपर कोणा मोठ्या लेखकांची अगर स्वत: त्यांची वाक्ये लिहून घेतात. आणि दुसरे एका बुकात वर्षाच्या सर्व तारखा लिहिल्या असतात. त्यात पाहुण्याचा जन्मदिवस आणि नाव गाव त्याच्याकडून लिहून घेतात. वडील बहिणीच्या बुकात मी बुद्धाचा एक उपदेश लिहिला. व धाकटी फ्लो. व्हाईट हिच्याकडे मन अत्यंत ओढ घेऊ लागले म्हणून तिला माझे हे वाक्य दिले.

I Live in Love, I Live for Love.
My Bread, my Salt is Love.
Love Leads me, all my worldly ways,
Love Lights my path Above.

ता. २२ शनिवार.

सकाळी ८-४० वाजता बसगाडीत मी क्रूकर्न स्टेशनास निघालो. ब्रिडपोर्ट पासून हा गाव १३ मैल लांब आहे. प्रदेश पाहण्यास मी मुद्दाम ह्या गाडीतून निघालो. गार वारे सुटले होते. मला लवकर आत बसावे लागले. वाटेने काही अगदी साधी खेडी दिसली १०.३० ला क्रूकर्न येथे पोचून १२ वाजता तेथून आगगाडीने डेव्हनपोर्टला निघालो. क्रूकर्न स्टेशनवरील वेटिंग रूममध्ये परोपकारी मंडळ्याच्या धर्मदाय पेट्या पाहिल्या त्या 1 For Rg-widows & orphans 2 The blinds 3 Travellers (female) aid 4 deven Mercy House 5 Krekern Hospital 6 National Life Boat Association. एक्झिटर येथे गाडी बदलून ३.३० ला डेव्हनपोर्ट येथे आलो. वाटेने टॅव्हस्टॉक दरीत वळणावळणांत बसलेले रमणीय दिसले. शहराच्या माथ्यावरून आमची गाडी घारीसारखी उडून जाताना गावातील कवलारू व धुराडी मात्र खाली खोल दिसली.

डेव्हनपोर्ट

४ स्टोक डेव्हनपोर्ट

२३ रविवार मार्च १९०२

मांजराने दार उघडावयास सांगितले.[३६]

मी माझ्या खोलीत बुद्धाचे शुभवर्तमान वाचीत बसलो होतो. घरचे मांजर खोलीत होते. त्याला बाहेर जावयाचे होते. पण दार घट्ट झाकले होते. ते दोन तीनदा ओरडले पण माझे लक्ष तिकडे गेले नाही. शेवटी मी जेव्हा तिकडे पाहिले तेव्हा मांजर मजकडे पहात आपल्या मागच्या पायावर उभारून दाराच्या कडीकडे आपले पुढचे पाय नेऊ लागले. येवढी खूण मला बस झाली. मी दार उघडल्यावर मांजर मुकाट्याने चालते झाले. काय ते 'थँक यू' Thanku you ... म्हणावयाचेच उरले होते.

२३ आदित्यवार मार्च

डेव्हनपोर्ट, येथिल युनिटेरियन मंदिरात सकाळी ११ वाजता माझी उपासना झाली. विषय Worldliness and Godliness लौकिक व धार्मिक जीवन हा होता. देऊळ भव्य आहे. पण युनिटेरियन चळवळ येथे फार मंद आहे. उपासकांची संख्या ३० वर नव्हती. संध्याकाळच्या उपासनेत ब्रह्मसमाज हा विषय होता. उपासक ५० सु. होते. विशेष आगत्य दिसले नाही. सुधारक चळवळीस औदासिन्याप्रमाणे दुसरे काहीच घातूक नाही. पण ते येथे व दुसऱ्या काही ठिकाणी दिसते.

२४ सोमवार मार्च

डेव्हनपोर्ट, प्लिमौथ व स्टोनहौस ही तिन्ही शहरे एकमेकास अगदी भिडून तिन्हीचे आता एकच गाव बनले आहे. एकंदर लोकसंख्या सुमारे २ दोन लाख आहे. ही गावे अगदी टेकड्यावर

वसली असल्याने एकही रस्ता सपाट नाही. बऱ्याच ठिकाणी इतके उंच चढउतार आहेत(की) गाडी हाकणे परक्यास अत्यंत धोक्याचे दिसते. तशात इंग्लंडचे रस्ते हिवाळ्यात बर्फ पडून घसरट होतात की सपाट रस्त्यातही केव्हा माणसे बद्कन आपटतात. पण अशा चढउतारावरूनही विजेच्या ट्रॅमगाड्या अशा शिताफीने धावतात, मध्येच अशा उतारावर थांबतात की पहात राहावे. हे शहर आरमाराचे सैन्याचे मोठे स्थान असल्याने येथे लष्करी देखावे पुष्कळ दिसतात. आदित्यवारी लष्करचे लष्कर उपासनेस कवाइतीने जाताना मौज का वाटू नये ? समुद्रकाठ, डोंगराळ प्रदेश, आधुनिक सुधारणेची सर्व चिन्हे धारण करणारे शहर ही सर्व येथे एकत्र दिसतात. खोल दऱ्यातून आगगाड्या धावतात. दोन्ही बाजूने उतरणीवर बराकीप्रमाणे घराच्या रांगा आहेत. तशात नदीचे पात्र रुंद असल्यामुळे समुद्र आगंतुकासारखा आत शिरला आहे. ब्लॉक हॉसस नावाचा एक लहानसा किल्ला असा चांगली माऱ्याची जागा आहे. येथे चार मोठ्या तोफा लावून ठेवल्या आहेत.

२५ मंगळवार

८.३० वाजता युनिटेरियन मंदिरात लिटररी सोसाईटीत माझे 'पाश्चात्यांचे हिंदुसमाजावर परिणाम' हे व्याख्यान झाले. युनिटेरियनांस हिंदुस्थानाबद्दल बरीच सहानुभूती आहे. आमच्या चालीरिती ऐकून त्यांस मोठा आचंबा वाटला.

ता. २६ बुधवार

(प्लिमथ) ऑक्सफर्ड स्ट्रीटमधील बोर्डस्कूल पाहिले. ३६४ मुले हाजर होती. ड्राईग व नकाशे काढणे, गाणे, नीटनेटकेपणा, जरब इ. मुख्य लक्षणे दिसली. घरी तयार करण्यास फारसे धडे देत नाहीत. अशा शाळेत केवळ कामकरी लोकांची मुलेच येतात. शिक्षण सक्तीचे व मोफत. ड्रायिंगचे सामान पाट्या, पुस्तके इ. सर्व शाळेमार्फत मिळते. चवदा वर्षानंतर मुलास कोणत्याही कामावर अगर धंद्याच्या शाळेत जाण्यास मोकळीक आहे. धंद्याच्या (शाळेत) नुसती एक प्रवेश फी आहे. बायबलची साधारण माहिती कोणत्याही पंथाची विशेष मते न शिकवता देण्यात येते. शाळा सुटताना प्रत्येक शिक्षक उपासना करतो. सर्व मुले प्रार्थना म्हणतात. नंतर शिक्षक बँडचे चालीवर पिऑनो वाजवितो व सर्व मुले पाय हापटीत कवाइतीने बाहेर जातात. बहुतेकांचे दप्तर वगैरे काही दिसले नाही. शाळेचे मुलांचा पोषाक चहूकडे सारखाच दिसतो. वर्गात एकादा प्रश्न विचारल्याबरोबर ज्यांना त्याचे उत्तर माहित असते ती सर्व मुले उठून आपला हात पुढे करतात आणि उत्तर देण्यास जो तो असा धडपडत स्-स-सर-सर करतो की विचारणाऱ्या परक्याची तारंबळ उडते ! हेड्मास्तराने मोठ्या आगत्याने वर्ग दाखविले.

ता. २७ गुरूवार मार्च

डेव्हनपोर्टच्या दक्षिण भागाकडे फिरावयास गेलो (५ संध्या). येथे अगदी गलिच्छ लोकांची घरे होती. सडका घाणेरड्या होत्या. इकडच्या शहरांतही गरीब लोकांचे मोहले ज्यास इकडे स्लम्स म्हणतात व श्रीमंतांच्या गल्ल्या ह्यांत पुष्कळ फरक दिसतो. पण म्युनिसीपालीटीकडून जरूर ती व्यवस्था केली असते. येथून जाताना माझ्यामागे ४०/५० मुलांचा घोळका जमला. अशा दरिद्री मुलांसही वरील बोर्डस्कुलात सक्तीने शिक्षण मिळते. मि. कुंबी ह्याने मला स्नॅप शॉट कॅमऱ्याची मोठ्या आगत्याने, तासभर माहिती दिली.

भाग आहे. बुद्धाने आत्मा म्हणजे हा एक मोठा भ्रम आहे हे सिद्ध केले आहे. नंतर कर्मवाद सांगितला आहे. त्यामुळे घटांची (प्राणमय) पुनरावृत्ति अथवा पुनर्जन्म कसा होतो हे निरूपिले आहे. मग ह्या फेऱ्यातून कसे पार पडावे ते सांगितले आहे. डेव्हिडसाहेबांस कर्मवाद म्हणजे निव्वळ श्रम वाटत आहे.

१२।। (वाजलेले) रस्त्यात चांदणे स्वच्छ पडले होते. अगदी सामसूम होते. देखावा सौम्य गंभीर होता. थोडेसे फिरून येऊन निजलो ! माझी परमेश्वरावर श्रद्धा कायम राहिली. पण जीविताचे गूढ काय आहे ते कळेना. संशयाच्या यातना दुःसह झाल्या. परमेश्वरा, हे गूढ कधी तरी उकलेल काय ?

ता. ८ आदित्यवार जून १९०२

दोन प्रहरी ३ वाजता ऑक्सफर्ड पॅरिशचे वर्क हौस (कंगालखान) पाहण्यास गेलो होतो. एक मोठे आवार आणि त्यात स्वच्छ अशा ४/५ इमारती होत्या. खान्याचे मुख्य पालक आम्हास दाखविण्यास होते. तेथे सुमारे २५० म्हातारी, दुबळी, अनाथ स्त्रीपुरुषे होती. सुमारे २५/३० अगदी वृद्ध अथवा आजारी होते. माझे मित्र मि. आणि मिस् कॉक ह्या आजाऱ्यास काही गाणी म्हणून दाखविण्यास आले होते. दर आठवड्यास ह्यांच्या करमणुकीकरता मि. ग्रब (पालक) असे गाणे करवितात. ऐकण्यास ३ पुरुष आणि ९ वृद्ध बायका होत्या. बाकीचे आजारी येण्यासारखे नव्हते. असे गाणे ऐकून एक औदासिन्याने अगदी मरावयास टेकलेली बाई सुधरून बरीच वर्षे वाचली असे मि. ग्रब म्हणाले. बायका पुरुष उदास दिसले. नंतर आजारी निजले होते तेथे गेलो. एक नव्वद वर्षाची म्हातारी होती. तिला हांतरूण सोडून उठवत नव्हते. पण तिला ऐकू सुरेख येत असून खणकर बोलत असे. मी तिला नीट दिसते काय म्हणून विचारता मी नुकतेच पुस्तक वाचीत होते असे सांगून जवळचे बुक दाखविले. येथे चहूकडे व्यवस्था, स्वच्छता आणि टापटीप फार उत्तम होती. सार्वजनिक खर्चाने पोसले जाणारे हे आगदी कंगाल लोक असता व्यवस्था तर आमच्याइकडील वरच्या वर्गातील लोकांप्रमाणे होती. एका सोळा वर्षाच्या अंधळ्या मुलाची फारच कठीण स्थिती होती. त्याचे दोनी पाय उरावर आले होते. तो दोन वर्षे आंथरुणांतच आहे. घरची दाई त्याची आईप्रमाणे व्यवस्था करिते हे पाहून आश्चर्य वाटले. एकीकडे पुरुषांची व दुसरीकडे बायकांची व्यवस्था आहे. वृद्ध दांपत्य असल्यास व वर्तणूक बरी असल्यास एकत्र निजण्याची परवानगी आहे. सुमारे ८/१० एकर जमीनीची लागवड ह्या लोकांनी करावयाची असते. बायका धुणे वगैरे करितात. बागा, फुलेझाडे, जेवणाची, बसण्याउठण्याची सुरेख व्यवस्था दिसली. भटकणाऱ्या भिकाऱ्यांची निराळी व्यवस्था आहे. भिकारी येथे आल्याबरोबर त्यांस प्रथम चांगले उन पाण्याने स्नान घालण्यात येते. नंतर त्यांचे सर्व गलीच्छ कपडे वाफवितात. दुसरे दिवसभर त्यांचेकडून काम करून घेऊन तिसरे दिवशी सकाळी न्यहारी देऊन त्यास घालवून देतात. रोज सुमारे २०/३० भिकारी येतात. काम बहूतकरून खडी फोडण्याचे असते. ज्यांचे हातून मुळी काम होत नाही अशा थकलेल्या वृद्धांची वर लिहिल्याप्रमाणे ह्या घरात कायमची व्यवस्था होते. ते सर्व फार संतुष्ट व सुखी दिसले. दायी व अधिकाऱ्याशी त्यांचे प्रेम दिसले. संस्था पाहून अत्यंत समाधान वाटले. हा खरा ख्रिस्ती धर्म !

जूनअखेर

बोर लढाई संपल्यावर अभिनंदनार्थ ऑक्सफर्ड येथे जो अदृष्टपूर्व प्रकार घडला आणि ७ व्या एडवर्ड बादशहाची प्रकृती बिघडल्या(मुळे) राज्यारोहण समारंभाचा कसा विरस झाला ह्याबद्दल थोडी हकीकत सुबोध पत्रिकेस पाठविली आहे.[३८]

सुट्टी

स्ट्रॅट्फर्डची यात्रा

ता. १० जुलै १९०२

हे शहर महाकवी शेक्सपिअरचे जन्मस्थान म्हणून बायसिकलवरून पाहवयास गेलो. हे ऑक्सफर्डहून ३८ मैल लांब आहे. सकाळी ११।। वाजता निघालो. ७ मैलावर वुड्स्टॉकजवळ पावसाने भिजवले आणि वाऱ्याने वाकविले. पण निश्चय इतका दृढ होता की आताच थकलो होतो तरी तसाच पुढे चाललो. एनस्टो येथे फराळ करून ४ वाजता निघालो. वारा तर छातीवर चालून येई. बरेच चालावे लागले. लाँग कॉमटनजवळ सुंदर दरी लागली. ९ वाजता स्ट्रॅट्फर्डला पोचलो. जनाबाई(स) १ पत्र लिहिले.

दुसरे दिवशी न्याहारीनंतर १ वाजेपर्यंत शेक्सपिअरसंबंधी सर्व ठिकाणे पाहिली. तो जन्मल्याचे घर, त्याने लावलेल्या झाडाचा एक दुसरीकडे लावलेला भाग इ.चे फोटो घेतले. ४ वाजता बांनबरीस निघालो. डेडिंगटन येथे वसती करून दुसरे दिवशी जेवणास १२।। वाजता ऑक्सफर्डला आलो. शेक्सपिअर जन्मला त्या घराजवळ रस्त्यातील मुले एक पेनीकरिता त्याचे चुटकेदार चरित्र पाठ म्हणून दाखवितात त्याचे आश्चर्य वाटले. कदाचित् पत्रिकेस लिहीन.[३९]

इंग्लिश सरोवर प्रांत[४०]

English Lakes

Leathe's Cottage, Borrowdale

१४ जुलै १९०२

ऑक्सफर्डहून ९।। वाजता सकाळी इंग्लंडचे उत्तरेस लेक डिस्ट्रिक्टमध्ये बॉरोडेल येथे कारपेंटरसो. बरोबर १ पंधरवडा राहवयास निघालो. बरोबर स्नेही मि. कॉक आणि बार्न्स हे होते. नॉर्थँपटनपासून लँकस्टरपर्यंत इंग्लंडच्या मोठमोठ्या वखारींच्या शहरांचा प्रदेश लागला. येथे धूर आणि धुरळ्याने बेजार केले. तोंडावर व हातावर कोळशांची भुकटी साचली. ह्यास एथे ब्लॅक कंट्री (काळा देश) असे म्हणतात. सुधारणेची ही काळी व खरबरीत बाजू दिसली. गाडीच्या खिडकीबाहेर पाहिले की चोहिकडे गिरण्यांची धुराडीच दिसत. ही जगाची वखार. हितली धडधड केवळ असह्य होती. ६ वाजता केसिक् स्टेशनावर पोचलो. कारपेंटरसो. आणि मि. फर्ग्युसन् आम्हाला घरी नेण्यास आले होते. सामान बसमधून पाठवून आम्ही बोटीने डरवेंटवॉटर सरोवरांवरून व डरवेंट नदीवरून घरी आलो. पाळीपाळीने दोघादोघांनी वल्हविले. बोटीत वजन फार झाल्यास आधी शिंद्यांना (मला) नदीत ढकलू अशी कारपेंटरसो. नी थट्टा केली. अत्यंत धडधडीच्या प्रदेशातून अत्यंत शांत स्थळी आल्यामुळे मनास विलक्षण आनंद व विराम वाटला. सरोवरचे पाणी स्तब्ध व स्वच्छ होते. जणू

एक मोठा आरसाच. दोन बाजूस उंच पर्वत. स्किडो पर्वताची उंची ३०५८ फूट आहे. हे सरोवर बॉरोडेल नावाच्या दरीत शिरते. एका बाजूस १००० फूट (सुमारे) उंचीचा कडा तुटलेला, दुसरीकडे गवताने आच्छादलेली टेकडी, मध्ये आमची बोट चालली. पर्वताच्या प्रतिबिंबाची तर काय बहार ! सृष्टिसुंदरी एकांतात आरशात आपले रूप पाहून धन्य मानीत असता पाहून कोणास धन्यता वाटणार नाही. एथे प्रतिध्वनी फार श्रवणीय होतात. त्यासाठी एक तोफ ठेवली आहे. ह्यासंबंधी मी डीक्विन्सीचा उल्लेख आठविला.[४१] संध्याकाळी जेवणानंतर प्रो.सा. बरोबर आम्ही पाच-सहा विद्यार्थ्यांनी दरीत शतपावली केली. ह्या उन्हाळ्यात सर्व विद्यार्थ्यांचा (२०/२२) प्रो.सो. असा पाहूणचार करणार आहेत.

१५ जुलै १९०२

सकाळी ७ वाजता उठलो. ८ वाजता न्यहारी झाली. नंतर मि. कॉक्, बार्न्स, फग्र्यूसन, लॉकेट व मी बोटीतून फिरावयास गेलो. डरवेंट नदीतून डरवेंटवॉटर सरोवरात सुमारे २ मैलावर हर्बट नावाच्या लहानशा बेटापर्यंत गेलो. बेटावर दाट झाडी होती. तेथे वनभोजनाकरिता आलेल्या लोकांनी बीच झाडाच्या सालीवर आपली नावे कोरलेली दिसली. विशेषकरून नवविवाहित दंपतींनी वर्तुलांत आपली नावे कोरली होती. वर्तुले अंत:करण दर्शविण्यासाठी. लग्नाची अगर तेथे आल्याची तारीखही कोरलेली असे. दोन प्रहरी प्रोफेसर साहेबाबरोबर आम्ही सर्वजण स्किडो नावाच्या एका सुमारे १००० फूट उंच डोंगरावर फिरावयास गेलो. सकाळी प्रोफेसर पाली, बुद्धधर्म ग्रंथाचे संशोधनाचे काम करीत होते. प्रोफेसर जसे विद्वान तसेच हौशी, उल्हासी आणि काटक आहेत. ३०/३५ मैलांची अशा डोंगरात ते सहज मजल करितात. डोंगराच्या माथ्यावर मी दोन फोटो घेतले. आठ वाजता घरी परत आलो. केसविक् स्टेशनाहून घरापर्यंत डरवेंटरवॉटर सरोवरातून बोटीने आलो. मला वल्हवू न देता प्रोफेसरांनी स्वत:च वल्हविले. ९ वाजता जेवण आटपल्यावर मि. कॉक ह्याजबरोबर पुन: बॉरोडेल दरीतून शतपावलीस निघालो.

बॉरोडेलमधील भेट

ही शतपावली की विसरणार नाही. दोन्ही बाजूस १००० फुटांचे उंचवटे. मधून डरवेंट नदीचे मंजूळ गाणे चाललेले चहूकडे इतके निवांत की पातळ पानही लवत नव्हते. बाह्य शांतीमुळे अंत:करणातील शब्द अधिकाधिक स्पष्ट ऐकू येऊ लागले, सुधारलेल्या जगाची धडपड शेकडो मैल दूर होती. सुधारणा उद्धारणावगैरेंचा गवगवाही बंद पडला होता. ९।। वाजले होते तरी असा गोड संधिप्रकाश पडला होता की वाचता सहज येत होते. आम्ही दोघेही समानशील. दरीतून पुढे पुढे जात असता सृष्टी आपल्या अंत:पुरात बोलावतेच जणूंसे भासले. खोल दरीतून नदीच्या काठाने जात असता कॅसलरॉकचा अगदी सुळकेदार मनोरा समोर होता. त्यावर दशमीचा चंद्र लोंबत होता. अशा आसमंतच्या देखाव्यात आम्ही स्वत:स विसरलो. अैहिक अत्यंत प्रिय विषयांचाही विसर पडला हे सांगणे नको. अगदी आपलेच असे काही येथे मिळाले म्हणूनच असा हा विसर पडला ! 'ह्या उदात्त भेटीच्या प्रसंगी' विचारास अवकाश नव्हता.

“Prayer is the burthen of a sigh, the falling of a tear
The upward glancing of an eye, when none but God is near !![42]”

ता. १७ जुलै

मांड्या भरून आल्या होत्या. घरी पत्रे लिहिली. कार्पेंटरसाहेब दोन प्रहरी १५/१६ मैल फिरून दोन उंच टेकड्या ओलांडून आले. ४ वा. चहानंतर मी बोटीतून ४ मैल डरवेंट वॉटरवरून केसिकला जाऊन आलो. रात्री जेवणानंतर घरातील मंडळींनी लिहिलेल्या बॉरोडेल पॉझ ४३ वर्तमानपत्राचा १ ला अंक कारपेंटर सो. (नी) वाचिला. त्यात कारपेंटरसाहेबानी टोकिओची कविता फारच सुरेख वठली. सर्वच मजकूर विनोदाने भरला होता. पुस्तकपरीक्षणाचा भाग चटकदार झाला. एडिटर फार्ले, पुढच्या वर्षाचे मँचेस्टरचे सीनिअर स्टुडंट, ह्याची हुषारी दिसली. ११।। वाजता झोपी गेलो. आज सकाळी जनाबाईकडून आंब्याच्या वड्या पोचल्या.

ता. १८ जुलै १९०२ शुक्रवार

सकाळी ८/२० मिनिटांनी न्यहारी आटपून प्रोफे., आम्ही ५ विद्यार्थी आणि रेव्ह. लमिस असे सातजण अल्सवाटर सरोवर पाहण्यास निघालो. केसविकपासून ट्रटबेकपर्यंत आगगाडी, नंतर बस घेतली. अल्सवाटर हे उंच टेकड्यामध्ये झाकले आहे. तसेच ह्याच्या (जवळ) फारशी वस्ती नसल्या(मुळे) अगदी निवांत जंगली देखावा दिसतो. १ मैल लांबी, व रुंदी अर्ध्या मैलावर नाही. वरच्या टोकास पॅटरडेल नावाचे स्वच्छ आणि चित्रासारखे खेडे आहे. काठाने दाट झाडीतून सुंदर सडक आहे. अल्सवाटर हॉटेल तर नंदनवनासारखे दिसले. मला सर्वात हेच तळे आवडले. कित्येकाच्या मते डरवेंटवॉटर सर्वांत सुंदर आहे. नंतर आम्ही हेलविलन पर्वत चढू लागलो. उंचीने हा सर्व इंग्लंडात दुसरा आहे. समुद्रसपाटीपासून ह्याची उंची ३११८ फूट आहे. १००० सुमारे चढल्यावर फराळ केला. आज थंडी बरीच पडल्यामुळे पाण्याची फारशी गरज नव्हती आणि पर्वताच्या दुसऱ्या बाजूस जाईपर्यंत पाणी मिळाले नाही. सु. २००० फूट चढल्यावर एक उंच व तीक्ष्ण सुमारे आर्धा मैल घाटशीळ लागली. माथ्यावरून जी वाट होती ती ३/४ फूटच रुंद होती. दोन्ही बाजूने खोल दऱ्या होत्या. उजवीकडे रेड्टार्न नावाचे, हेलविलनच्या अगदी कुशीत, एक मनोहर तळे २००० फूट उंची वर होते. काही ठिकाणी वाट फार कठीण व भयंकर होती. येथेही चतुष्पाद व्हावे लागले. शिखरावर पोचलो तेव्हा भव्य व दूरवर देखावा दिसला. शिखरावर एक शिलालेख दिसला.. १८०५ मध्ये चार्लस गाऊ नावाचा गृहस्थ बर्फात गोठून शिखराच्या पायथ्याशी मेला. त्याचा प्रामाणिक कुत्रा त्याच्या प्रेताचे रक्षण करीत तीन महिने ह्या डोंगरात होता. शेवटी एका धनगरास हा कुत्रा (व) त्याच्या धन्याचा अस्थिपंजर दिसला. ह्या कुत्र्याच्या एकनिष्ठेच्या स्मारकार्थ फ्रॉन्सिस पॉवर कॉब ह्या प्राण्याच्या कनवाळू बाईने १८९० मध्ये हा सुंदर शिलालेख रोविला आहे [४४] त्यावर वर्डस्वर्थने ह्या कुत्र्याच्या स्मारकार्थ रचिलेल्या Fidelity नामक कवितेचा एक उतारा कोरला आहे.[४५] वाचून अवर्णनीय स्थिती झाली ! दैवी गुण पशूत दिसावे !!

नंतर दुसऱ्या बाजूने आम्ही थर्लमिअर सरोवराकडे उतरलो, लॉकेट व मी धावत सर्वापुढे २० मिनिटे आधी पायथ्याशी आलो. ३ मैलावर जेम्स हॉटेल मध्ये चहा घेतला. येथे कार्पेंटरबाई व टिंडल दंपती घोड्याच्या गाडीने घरी (लीथ कॉटेज) येथे पोचलो. लीथ कॉटेज ही कारपेंटर साहेबांनी उन्हाळ्यात भाड्याने घेतली आहे. येथून सुमारे १०० पावलावर रमणीय डरवेंट नदी आहे. एका हाकेवर डरवेंटवाटर नावाचे सुंदर सरोवर आहे. हे सुमारे ३ मैल लांब, १ मैल रुंद आहे.

कित्येक लोक आपली सुट्टी घालविण्याकरिता येऊन धर्मही साधतात. सभेचे चालक अगदी जुन्या ख्रिस्ती मताचे असूनही आजच्या वक्त्याचे भाषण भिक्षुकी धर्माचे नव्हते. देव (ख्रिस्त) व साधक ह्यांचे दरम्यान कोणाची ही गरज नाही, हे त्याने जोराने प्रतिपादले. १ तास भाषण झाल्यानंतर सर्व लोकांनी गुडघे टेकले व वक्ता सौम्य शब्दांनी व सुराने त्यांस पश्चाताप पावण्यास सांगून क्षमा मागण्यास व मोक्ष मिळविण्यास त्यांस सांगू लागले. सुमारे ७/८ मिनिटे हा देखावा पहाण्यासारखा होता. बहुजनसमाजा(वर) ह्याचा फार चांगला आध्यात्मिक परिणाम झाला असावा. कोणत्याही प्रकारचा मताभिमान व पंथामिमान दिसला नाही. लोकाचे लक्ष केवळ ख्रिस्ताकडे लागावे व त्यांचे वर्तन सुधारावे येवढाच हेतू दिसला व त्याप्रमाणे कामही वठले. मला एकंदरीत संतोष झाला !

वाटेने येताना आंधारात व आडवळणीस कित्येक प्रेमी जोडपी प्रियाराधनात गर्क झालेली दिसली. हे मानवी संसारातील अत्यंत गोड पवित्र चित्र मला येथे वारंवार दिसते. गरीब लोकांस दिवाणखाने व बागा नसल्याने त्यांस सार्वजनीक उपवनांत व रस्त्याने आराधना करावी लागते. त्यांस इतराची फारशी शरम वाटत नाही. घरी परत आल्यावर ह्याचसंबंधी प्रोफेसर व पाहुणे स्त्रीपुरुष ह्यांच्याशी मौजेचे भाषण (झाले). प्रोफेसर व इतर सभ्य गृहस्थ अशीच आराधना करितात काय असा माझा प्रश्न ऐकून मंडळीस भारी कौतुक वाटले. कार्पेंटरबाई निजावयास जाताना माझ्या कानाशी येऊन म्हणाल्या की "मला एक गुप्त गोष्ट सांगावयाची आहे. ती ही की प्रोफेसरही अशीच आराधना करितात बरे !!"

ता. २१ जुलै १९०२ सोमवार

सकाळी बाउडर स्टोन नावाची मोठी शिळा पाहिली. ही सर्वात सुंदर जी बॉरोडेल दरी तीत अगदी नाक्याचे ठिकाणी आहे. ही जगात सर्वात मोठी शिळा आहे असे म्हणतात. ही ३० फूट उंच व ६० फूट लांब असून वजन १९०० टन आहे. पर्वतशिखरावरून तुटून खाली पडताना ही एका अरुंद कोपऱ्यावर तोल संभाळून आहे, हा सृष्टीचा अत्यंत चमत्कार आहे. ज्या कोपऱ्यावर उभी आहे त्याच पाया फार तर ३/४ फूटच रुंद असेल. मध्ये पायाशी एक भोक (असून) त्यातून दोहीकडच्या माणसांना हात हालविता येतात. वर चढण्याला एक शिडी लावली आहे. हिच्या टोकावर माझे मित्र मि. कॉक उभे असता मी शिळेचा फोटो घेतला आहे. संध्याकाळी आम्ही कॅट्स बेल नावाचे शिखर ओलांडले. नंतर ग्रेज खेड्याच्या मागे एक सुंदर आरण्य पाहिले. त्यात एका लहानशा टेकडीवर झाडीत आम्ही दोघांनी सु. १५ मिनिटे ध्यान केले. आज सारखा पाऊस लागला होता म्हणून कोठे बाहेर गेलो (नाही). पण कार्पेंटरसाहेबांनी सुचविले की आजचा दिवस केसिक् कनव्हेनशनला आम्ही घालवावा. आपल्या कामात गुंतले असताही आपल्या पाहुण्याची अशा क्षुल्लक बाबतीतही काळजी त्यांची पाहून फार आश्चर्य वाटले. ह्या कनव्हेनशनच्या आज ११।। ते १, ३ ते ४ व ६।। ते ८।। अशा तीन बैठकांत हाजर होतो. कनव्हेनशचे धर्माचरणाचे कार्य सकाळी ७ पासून रात्री १० पर्यंत राहून चालले असते. असा १ आठवडाभर क्रम चालतो. पाहिली साधारण सभा झाली. दोघांची भाषणे झाली. दुसरीत मिशनऱ्यांची भाषणे झाली. सुधारकांची (युनिटेरियन लोकाची निंदा अगर थट्टा आढळली नाही. एकत्र उल्लेख झाला पण त्यात वरील प्रकार नव्हता). दुसरीत पहिल्या वक्त्याने Students Voluntarg Missionary Union मार्फत भाषण केले. ऑक्सफर्ड केंब्रिज युरोपातील इतर विद्यार्थ्यांच्या मिशनच्या कामाकडे कल वळविण्याचा ह्या मंडळीचा हेतू आहे.

ता. २४ जुलै

स्कॉफेल नावाचा इंग्लंडातील सर्वात उंच पर्वत चढलो. (३२१० फूट उंच). चढण्यास एकच वाट आहे. आम्ही चौघे विद्यार्थी गेलो. दिवस व .... अत्यंत चांगली होती. एवढ्या कठीण वाटेने व इतक्या उंचीवर ह्याच वेळी दुसरी १५/२० माणसे दिसली. पैकी ७/८ स्त्रिया होत्या. हेलविल पर्वतावर पाहावयास आलेल्या तीन बायका व एक पुरुष दिसली. हिमालय पर्वतावर सर्वात उंच प्रवासही एका अमेरिकन बाईनेच केल्याने मागे टाईम्स ऑफ इंडिया पत्रात वाचले होते. ह्यावरून सुधारलेल्या देशांत बायकाचा उत्साह दिसून येतो. डरवेंट नदीचा उगम येथूनच आहे. येताना दरीतून ह्या नदीच्या काठाने अत्यंत रमणीय देखावा दिसला व चालण्याचे श्रम मुळीच झाले नाहीत. **२२ सप्टंबर.** बेनलोमंड पर्वतावर २ बायका व तीन पुरूष भेटले.[४९]

ता. २५ जुलै १९०२

तिसऱ्या प्रहरी ४ वाजता डरवेंटवाटरच्या किनाऱ्यावर झाडीत चहापार्टी केली. आम्ही दहाजण होतो. ही जागा खासगी असल्यामुळे एकाच नेमिलेल्या ठिकाणी विस्तव करण्याची परवानगी होती. डोंगरातून हिंडत आम्ही जेथे जेथे बसून फराळ केला तेथे तेथे मागे कागदकचरा टाकून जंगलाचे सौंदर्य घालविले नाही, तर एकीकडे सर्व कागद जमवून जाळीत होतो. अशा बाबतीत ह्या लोकांची दूरवर काळजी पाहून मला आश्चर्य वाटले. चहानंतर बॉरोडेल पॉझचा दुसरा अंक प्रसिद्ध केला. ह्यात लेख आमच्याच मंडळीचे होते. प्रो. सा. चे We are Seven हे गाणे चटकदार होते ता. २० संध्याकाळी मी प्रियाराधनाचा जो प्रकार पाहिला त्यासंबंधाचे एक पत्र मी लिहिले होते. मि. लॉकेट एडिटर होते. त्यांनी सुमारे १ तासभर हा अंक वाचला.

ता. २६ जुलै

ग्रिसडेल शिखरावरून सूर्योदय पहावयास जाण्याकरिता आम्ही आज रात्री १२ वाजता उठून न्यहारी करून निघालो. पण लवकरच पावसाने गाठले म्हणून मंडळी परतली. पण मला ही निराशा सोसवेना म्हणून प्रोफेसरसा. ची परवानगी घेऊन मी एकटाच बॉरोडेल दरीतून फिरायला निघालो. हातात ६ फूट लांब पहाडी (अल्पाईन) काठी होती. तिला शेवटास बर्चीप्रमाणे लोखंडी टोक होते. ह्यावेळी एका (न्ता) चा अम्मल होता. चहूकडे अंधार व शांतता होती. ह्या देशी केव्हाही कोठेही विंचूकाट्याची, चोराची अगर वनपशुंची तिळमात्र भीती हे प्रकार ह्यांच्या कादंबरीतुनही आढळत नाही. ह्यासंबंधी मी काही प्रश्न विचारले की सर्वास कौतुक वाटून हशा पिकतो. शेवटी पॉझ पत्रात ह्यासंबंधी एक लेखही आला ! असो. एक मैल गेल्यावर पाऊस जोराचा आला म्हणून मला आश्रय पहावा लागला. शेवटी दगडाच्या खाणीत मी एका गुहेत जाऊन बसलो. ह्या खोल दरीत, मध्यान्ह रात्री पावसाची शोभा मी सुमारे दोन तास येथे वनचर निशाचराप्रमाणे बसून पाहिली. थंडी लागल्या (वर) ऊब आणण्यास उठाबशा करीत होतो. २।। वाजल्यापासून अंधुक अंधुक दिसू लागले. ३।। वाजता पहाट झाली. पाऊस थोडा कमी झाला. नंतर मी धावत आमच्या झोपडीत आलो व कपडे बदलून निजलो.

२७ जुलै, आदित्यवार १९०२.

११ वाजता उपासना झाली. १० जण हजर होतो. जेवणानंतर ड्रुइडिकल सर्कल पाहवयास गेलो.[५०] सुमारे २००० वर्षापूर्वी ह्या देशात ड्रुइड धर्म होता. ३-४ फूट अंतरावर एकेक मोठी ३-४ फूट उंच शिळा उभारून एक वर्तुल बनविला आहे. पूर्वेकडच्या बाजूस ह्या वर्तुलात दुसरा एक असाच वर्तुल आहे. मोठ्या वर्तुलात ३८ दगड व लहानात १० आहेत. ह्यासंबंधी कोणास काहीच माहिती नाही व तर्कही होत नाही. हे सर्व दगड ह्या प्रदेशात मुळीच सापडणारे नाहीत असे भूगर्भशास्त्रांनी ठरविले. तेव्हा इतके दुरून एवढे मोठाले दगड इतक्या उंच का व कसे आणिले असतील हा मोठा चमत्कार आहे. नंतर आम्ही केसिक गावात चहा घेतला. प्रत्येकास १।। शिलिंग (१८ आणे) पडले. नंतर रास्थवेट चर्चमध्ये उपासनेस गेलो. येथे साउदे [५१] कवीचा हांतरुणावर पडलेला सुंदर पुतळा आहे. परत येताना सूर्यास्ताचा अती रमणीय देखावा पाहिला. जेवण आटपल्यावर १० वाजता रात्री बॉरोडेल दरीत पुन्हा एकटाच फिरावयास गेलो. एकांतवासातील सृष्टीसमागम फार हितावह झाला.

कार्लाइल

woodside, Wreay, Carlisle
C/o Rev. James Arlosh

ता. २८ जुलै, १९०२ सोमवार.

सकाळी ११ वाजता लीथस् कॉटेजमधून निघालो. १।। वाजता कार्लाइल शहरी येथून उडसाईड नावाच्या ४००/५०० वर्षांच्या जुन्या वाड्यात रे. ऑर्लश ह्याचे येथे आलो. हा वाडा इगलवूड नावाच्या प्रसिद्ध जुन्या आरण्यात आहे. ह्या संबंधी वर्णन जनाबाईचे पत्रात पाठविले आहे. फावल्यास सुबोध पत्रिकेस पाठवीन.

एडिंबरो

C/o Mrs. Somerville,
46, Marchmont,
Crescent, Edimburgh

ता. ३१, गुरुवार जुलै.

कार्लाइल येथील कॅथीड्रल व किल्ला पाहिला. माहितीचे एक लहानसे पुस्तक घेतले. किल्ल्याचे तळघरात ब्लॅकहोलप्रमाणे १२५ मनुष्यांस ठेविले होते. पैकी २५/३० मेलेले दुसरे दिवशी आढळले. ३।। वाजता एडिंबरो येथे पोचलो. आगबोटीवरचे मित्र नायडू (हैद्राबादचे) ह्यांनी मार्चमाँट क्रेसंट नंबर ४६ मध्ये मजकरिता बिऱ्हाड ठरविले. संध्याकाळी ब्ल्याकफर्ड हिल्लवर फिरावयास गेलो. हे उन्हाळ्याचे दिवस असूनही मला येथे थंडी वाजत होती. फॅशनेबल लोकांची बहुतेक घरे बंद होती. रस्ते शांत व स्वच्छ दिसले. टेकडीवरून एडिंबरोचा सौम्य, शांत व सुंदर देखावा दिसला. पुष्कळ लोक आपल्या प्रिय पात्रास बरोबर घेऊन फिरावयास आले होते. अशा तरुण जोडप्यांची ही टेकडी मोठी आवडती दिसली. टेकडीच्या वळणांतून, खाचखळग्यांत, झुडपांखाली, गवतांतूनही प्रेमाने बद्ध

झालेली जोडपी सर्व जगास विसरून आपापल्यातच गर्क झाली होती. वाटेने जाताना अवचितच अनपेक्षित अशा अवघड ठिकाणी जोडपे पाहून चमत्कार वाटे. न जाणो चुकून एकाद्यावर पाय पडेल म्हणून आजूबाजूस पाहून चालावे लागले. मानवी प्रेमाचे हे स्वाभाविक प्रदर्शन पाहून ज्यास विषाद वाटेल तो खरा हतभागी, करंटा, खोट्या तत्त्वज्ञानाने बिघडलेला, खोट्या नीतीच्या कल्पनांनी कुजलेला म्हणावयाचा. मि. फर्ग्यूसन, आमच्या कॉलेजचा सिनीयर विद्यार्थी एकदा म्हणाला, जगात ह्या देखाव्यापेक्षा अधिक सुख मला कोणत्याही देखाव्याने होत नाही. मला त्याच्या म्हणण्याचा रस कळला! आम्हा पौरस्त्यांना ह्या सर्व प्रकारांत केवळ अनीतीच दिसण्याचा संभव आहे. पण दिसणे व असणे ह्यात दोहों पक्षी पुष्कळ वेळा कितीतरी फरक असतो.

ता. २ शनिवार, १९०२ जुलै.

एडिंबरोचा किल्ला (मेरी क्वीन ऑफ स्कॉट्सची खोली, ६ वा जेम्स जन्मला ती खोली वगैरे) पाहिला. किल्ला उंच टेकडीवर बळकट व दुरुस्त आहे. नंतर चित्रसंग्रह पाहिला.

सार्वजनीक पुस्तकालय नावाची गरीब लोकांस फुकट वाचावयास देण्याची एक जंगी संस्था पाहिली. पुस्तके सुमारे ४८००० हजार होती. शिवाय १०-१२ हजार तरुण पोरास वाचण्याकरिता होती. खालच्या मजल्या (वर) वाचनालय होते. तेथे सुमारे १०० (शंभर) मजूर वर्तमानपत्रे व मासिकबुके वाचित होते. मे महिन्यात (१९०२) ४६९५७ पुस्तके वाचण्यास देण्यात आली. गेल्या नवंबरात ७१३६९ पुस्तके देण्यात आली. ह्यावर सरासरी कळेल. मजूर लोकांस काम मिळेनासे झाले म्हणजे ते केवळ बसावयास म्हणून येथे येतात, व सहजच एखादे पत्र अगर पुस्तक वाचतात. इमारत भव्य, सुंदर, स्वच्छ होती. व्यवस्थाही फार चांगली दिसली. हे लोकशिक्षण खरे!

ता. ३, आदित्यवार.

सकाळी कथबर्ट चर्चमध्ये उपासनेस गेलो. हे फार सुंदर देऊळ होते. उपासकांची संख्या सुमारे ७००-८०० होती. संध्याकाळी फ्री सेंट जॉर्ज चर्चमध्ये उपासनेस गेलो. हे नॉनकन्फॉर्मिस्ट कॉंग्रिगेशन्ल लोकांचे होते. सुमारे १२०० वर लोक हजर होते. हारमोनियम वाजविणारा मनुष्य अगदी आंधळा असून फार सुरेख वाजवीत होता. उपदेशक रे. ब्लॅक् हे तरुण फारच कळकळीने बोलले. विषय धार्मिक ढोंग हा होता. दुराग्रह अगर जुनी मते ह्याचा उल्लेख नव्हता. जोपर्यंत जुन्या धर्माचे उपदेश अशा पद्धतीवर होतात तोपर्यंत युनिटेरिअनसारख्या नवीन चळवळीचा झपाट्याने प्रसार होणे कठीण आहे; व त्याची तितकी जरुरीही नाही. कारण उदारमतांचा शिरकाव हळूहळू जुन्या देवळांतच झाला तर युनिटेरिअनिझम्चे काम सहजच झाले म्हणावयाचे. उन्हाळ्यात आगष्ट महिनाभर एथील देऊळ बंद असते. कारण बहुतेक लोक सुटीसाठी बाहेरगावी जातात.

ता. ४ सोमवार , आगष्ट.

सिव्हील सर्व्हीसकरिता आलेल्या बेळगाव भाटवडेकरांची गाठ पडली. त्याचेबरोबर आर्थर सीट व सॅलिसबरी क्रॅग वगैरेस वळसा घालून आलो. ह्यांची मते राजकीय बाबतीत अत्यंत जहाल आहेत. उत्साह, कळकळ व आवेश फार दिसतो. प्रकृतीने अगदी बळकट पाहून आनंद वाटला. एडिंबरो युनिव्हर्सिटी व्हालंटयर्समध्ये हे लष्करी शिक्षण मार्मिकतेने घेत आहेत व लढण्याची आंगात फार खुमखुमी दिसते. राजकीय मतामुळे सामाजिक व धार्मिक बाबतीत थंड आहेत.

जवळच्या क्वीन्स फेरी नावाच्या खेड्यात सुटीसाठी (१५ दिवस) म्हणून गरीबांची सुमारे १०० मुले धर्मार्थ खर्चाने ठेविली आहेत. दर पंधरावड्यास १०० अशी एकंदर ३०० मुले दर उन्हाळ्यास येथे आणतात. ही सर्व मुले-मुली एडिंबरोतीलच आहेत. त्यांची वये १०/१२ वर्षाचे खालची आहेत. ती नुसती खेळूनबागडून असतात. जवळ आईबाप नसतात. एकेका घरात ५/१० अशी ठेवण्यात येतात. सर्व सुखी दिसली. काय चमत्कारिक धर्मार्थ हा!!

मि. मॅकार्थी नावाच्या एका सुताराने मला आपल्या घरी चहाला नेले. तेथे एक बोलका राघू त्याच्या वृद्ध पत्नीने मजपुढे आणिला[५८]. त्याने मोठ्या सभ्यपणे माझ्याशी आपल्या पंज्याने (शेकह्यांड) हात हालविले आणि स्पष्ट 'How do you do' (कसे काय आहे) म्हणून विचारले. ह्याशिवाय तो 'प्रेटी पॉली' वगैरे म्हणे. त्याच्या धनिणीने त्यास गाण्यास सांगितल्यावर I have got cold मला थंडी झाली असे सांगितले. टेबलावर चहा मांडल्यावर I want a cup of tea (मला एक चहाचा पेला पाहिजे) असे वरचेवर म्हणे. हिंदुस्थानच्या चालीरीतीवर आमचे बोलणे चालले असता आम्ही मध्ये जेव्हा जेव्हा हसलो तेव्हा तेव्हा पोपटही कळल्याप्रमाणे आमच्यासारखेच हुबेहूब हासे!! ह्या मुक्या जनावराची वाचाळता व बुद्धी पाहून मला आश्चर्य व शरम वाटली. नंतर आगबोटीने लीथ शहरातून सायंकाळी ९ वाजता एडिंबरोस परत आलो.

ता. ७ गुरुवार, आगष्ट १९०२.

संध्याकाळी ब्लॅकफर्ड हिलच्या भोवती फेरी केली. ब्लॅकफर्ड ओलांडून एका कड्यावर आलो तेव्हा मागच्या दरीचा अती शांत व सुंदर देखावा दिसला. खाली एका लाकडी पुलाच्या शेवटावर एक प्रेमी जोडपे बसले होते. मी दरीचा फोटो घेतला. मी पाहत असताही ह्या जोडप्याने एकमेकाचे चुंबन घेतले 'कामातुराणां न भयं न लज्जा' हे सत्य ह्या टेकडीवर चांगले दिसून (आले). इतके की लवकर मला ह्या आडरानात पोलीस अधिकारी दृष्टीस पडला. मी त्यास त्याचे येथे काम काय ते भीड सोडून विचारले. उघड्या जागेत 'घडू नये तो प्रकार' घडू लागल्यास त्याचा प्रतिकार करण्यास व जुलूम जबरी तंटे वगैरेही होऊ नयेत म्हणून ते तेथे हिंडत होते असे कळले.

शेवटी मी एका कड्यावर जाऊन एकांतात गात बसलो. इतक्यात मागून रा. भाटे ह्यांनी एकदम हाक मारिली. नंतर ते व रा. नायडू असे त्रिवर्ग घरी परत आलो.

ग्लासगो

Young Men's Christian Club

ता. ८ शुक्रवार, आगष्ट.

दोन प्रहरी १।।। वाजता ग्लासगो शहरास निघालो. सु. ४ वा. पोहचलो. लखनौचे अझीझ ा अहमद हे नं ३६ बँक स्ट्रीट हिल हेड, ग्लासगो येथे राहत होते तेथे गेलो. ह्यांनी एका इंग्रज बाईशी लग्न केले आहे. तिच्या पोटी हैदरी नावाची वडील १६ वर्षांची मुलगी, ११ वर्षांची सखिना आणि १४ वर्षांचा मुलगा उस्मान अशी मुले आहेत. सर्व अत्यंत गरीब मनमिळाऊ व आगत्यपर आहेत. अहमदसाहेब ख्रिस्ती आहेत पण मते ब्राह्म आहेत. ह्या शहरी हिंदुस्थानातून जे खलाशी मजूर येतात

त्यांची उस्तवार ते करीत असतात. त्यांना शिकवणे, चालचलणूक सांगणे आणि उपयोगी पडणे वगैरे करितात. वर्गणी गोळा करून स्वतःचा व कुटुंबाचा निर्वाह करितात.

Y. M. C. 100, Bothwell Str.
Glassgow

ता. ९ शनिवार, आगष्ट.

आज बादशहाचा राज्याभिषेकाचा दिवस. ११ वाजता येथील कॅथीड्रलमध्ये अभिषेकाप्रीत्यर्थ उपासना झाली तिला गेलो होतो. फेट्यामुळे मला बराच नेहमीप्रमाणे मान मिळाला. अगदी पुढची जागा मिळाली. मद्रासला एकदा मागे बिशप होते त्यांचा आज उपदेश झाला. भाषणात हिदुंस्थानासंबंधी बोलतांना माझाही उल्लेख केला. मी फेट्याचे आभार मानिले. गर्दी बरीच झाली होती. गाणे फार आवडले.

ग्लासगो हे संयुक्त राज्यात लंडनच्या खाली दुसऱ्या नंबरचे शहर आहे. त्या मानाने शहरात बराच शृंगार केला होता. रात्री रोशनायी फार झाली होती. विजेच्या ट्रॅमगाड्यांची येथे फार चांगली व्यवस्था आहे. तीन गाड्या (वर) बिजली दिव्याचे सुंदर कार्तीक [५९] लावले होते. दिव्याचा रंगीबेरंगी मोठा मुकूट अग्रभागी होता. बाजुने राजाराणी ह्यांची मोठी चित्रे होती. वरती बँड सुरू होता. अशा ह्या गाड्या मुख्य रस्त्याने मध्यान्हपर्यंत हिंडत होत्या. लोकांत पुष्कळ उल्हास दिसला. गर्दीही मनस्वी होती. ट्रॅमवर तर खेचाखेची. सखीना, तिची आई व मी गाडी वर चढलो, पण जागाच मिळेना. मी मागे उभा राहून, त्या दोघी तिसऱ्या चौथ्या पायरी (वर) उभ्या राहून सर्व रस्ता गेलो. तहाच्या दिवशी रात्री ऑक्सफर्डात व लंडनात जो आचरटपणा झाला तो येथे आजच्या आनंदाच्या प्रसंगी कोठे नजरेस आला नाही.

१० आदित्यवारी, आगष्ट, १९०२.

११ वाजता युनिटेरिअन देवळात उपासनेस (गेलो) येथील देवळास जुलै महिन्यात सुटी असते. सुमारे ५०-६० मंडळी हाजर होती. उपदेश Living Crown ह्यावर जोराचा झाला. संध्याकाळी वनस्पतिसंग्रह Botanical garden पाहिली.

स्कॉच सरोवरे

ब्रॅड्'स हॉटेल अरख्हर लाख लाँग

११ सोमवारी.

सकाळी १० वाजता लॉख लोमंड सरोवरास [६०] निघालो. आगगाडीतून गोरॉकपर्यंत येऊन नंतर आगबोटीतून अरखर खेड्यास लॉख लाँगच्या शिखरावर आलो. ब्रॅड ह्यांचे हॉटेलात बिऱ्हाड केले आहे. येथे जागा फार महाग आहेत. आठवड्याचे ३० शिलिंगप्रमाणे येथे दर आहेत हे मोठे भाय समजावयाचे. दुसरी ५०, ६०, ७० शिलिंग आठवड्याचे आहेत. येथून २ मैलावर लॉख लोमंडचे काठी टार्बेट गाव आहे. लॉख लाँगचे काठाने झाडीतून व सुंदर दीरतून ९ मैल व्हिसलफिल्डपर्यंत चाललो. परत टार्बेटला आगगाडीतून सुंदर देखावा पाहिला. स्वच्छ उन पडले होते. दिवस सुखाचा गेला.

मंगळवार १२ आगष्ट, १९०२.

सकाळी ९ वाजता टार्बेट पियरवरून राउर्डेनान धक्क्यावर आगबोटीने गेलो. हा बेनलोमंड पर्वताचा पायथा आहे. ह्या पर्वताचे शिखर ३१९२ फूट उंच आहे. ९।।। पासून चढू लागलो. १२। वाजता अगदी शिखरावर पोचलो. वाटेने अगदी एकटाच होतो. केव्हा तरी एकादे मेंढरू मात्र दिसे. डोंगर चढण्यास कठीण नव्हता. सुंदर देखावा पाहत स्वत:शीच रमत असता सुंदर विचार मनात येऊ लागले. मनुष्य आपला आपण किती चांगला सोबती आहे, गुरू-उपदेशक आहे ते कळले. शिखरावर दोन जर्मन गृहस्थ भेटले. ते गेल्यावर ह्या उंचीवरच्या एकांतवासात २ वाजेतोपर्यंत तटस्थ पाहत बसलो होतो. वारा वाहत नव्हता. थंडी वाजत नव्हती. उष्मा वाटत नव्हता. इतका चांगला दिवस तशा उन्हाळ्यातला येथे पहिलाच असे सांगतात. भोवतालचा ५० मैलांचा देखावा दिसत होता. ग्लासगोचा धूर व धूळ दिसत होती. येथे एक पाखरूही नव्हते. पुढे अनंत काल व अनंत विश्व साक्षात् जणू दिसू लागले. अशा उच्च वातावरणात उदात्त व पवित्र विचार सुचणे फार सोपे आहे. अशा एकांतवासात मन शुद्ध राखणे व तत्त्वज्ञानी होणे साहजीक आहे. पण जनसमुहात मिसळून जीवनकलहात गुंतलो असता मनाची अशी स्थिती ठेवणे मात्र अत्यंत कठीण. थोर पुरुषांस ते साधते. नीच इतक्या उंचीवर येऊनही नीचच असतात. खाली उतरल्यावर लेक लोमंड (सरोवराचे) काठी फराळ केला. काठाने फिरून ६ वाजता आगबोटीतून परत टार्बेटला आलो. नंतर घरी. एकंदर सुमारे २० मैल आज चालणे झाले. पर्वतावरून लोमंड सरोवराचा आकार पिंपळाच्या पानासारखा दिसत होता. दोन्ही बाजूने उंच पर्वत, मध्ये सुमारे २५ मैल लांब क्लाइड नदीपर्यंत हे पसरले आहे. एका बाजूस लाँग व दुसरे बाजूस काट्रिन ह्याच्या हाताप्रमाणे पसरलेली दिसली.

Inverhullan, Tarbet,

Loch Lomand

बुधवार, १३.

आरखर येथून ब्रॅड्स हॉटेलातून वरील झोपडीत आलो. येथे एक गरीब बाई आणि तिची ७ मुले राहत होती. झोपडी अगदी लोमंड सरोवराच्या काठी होती. लहानसे द्वीपकल्प सरोवरात गेले होते. त्यावर देवदाराची मोठी झाडे होती. आत एक चिमुकला तंबू उभा होता. संध्याकाळी तंबूत अगर अगदी पाण्याच्या काठी खुर्ची टाकून मी Pictorial Towns of the World जगाचा सचित्र प्रवास हे बूक वाचीत असे. शेजारी झिपऱ्या मुली ॲग्नेस व जेसी आणि उनाड जॉनी आणि टॉमी हुदोड्या घालीत. जेसी तीन विती पण फार धीट असे. तिने मला स्पष्ट सांगितले, तिची बाहुली माझ्याइतकी मोठी आहे. तीन दिवस ह्या रानातल्या गरीब कुटुंबाचा सहवास सुखाचा गेला.

शुक्रवार १५ आगष्ट.

सकाळी १० वाजता डनव्हर्स्नेडपर्यंत टार्बेटहून बोटीतून गेलो. नंतर पाच मैल लॉख कॅट्रिनपर्यंत चाललो. वाटेत एक जर्मन तरुणी भेटली. ही प्रदेशातून बायसिकलवरून एकटीच प्रवास करीत होती. फार धीट व हुशार दिसली. देखणी तर होतीच. येत्या ऑक्टोबरमध्ये ऑक्सफर्डास आभ्यासास

येणार होती. लॉख कॅंट्रीनवर ट्रॉसेक दरीपर्यंत पुनः बोट घेतली. एलनेस बेटाजवळ सरोवराचा देखावा अती रमणीय दिसला. स्कॉटच्या लेडी ऑफ दि लेकमधली हीच एलन होय.[६१] ट्रॉसेक दरी ही स्कॉटलंडातील उत्तम देखाव्यापैकी एक आहे. दोहो बाजूस उंच डोंगरातील दरीतून एक मैलपर्यंत जी सडक आहे तिचे नाव ट्रॉसेकस. ह्या हंगामात ह्या प्रदेशात नेहमी रोज १००-१५० माणसे पाहून हिंडून जातात. वाटेत आर्कलट नावाच्या सरोवराच्या काठी प्रसिद्ध स्कॉच रामोशी रॉब रॉय ह्याची बायको जन्मली. जवळच त्याची गुहा आहे.

Woodburn cottege, Rowardennan,
Loch Lomand

18 Aug. 02.

The bonne[1] bonne banks of Loch Lomand
By yon/by yon banks & by you bonne braes [2]
Where the sea shines bright on Loch Lomand
Where me & my true Love will never meet again
On the bonne bonne banks of Loch Lomand
Chorus
For I'll take the high road & you'll take the low road
And I'll be in Scottland before you
Where me & my true Love will never meet again
On the bonne bonne banks of Loch Lomand.
It was there that we parted on your shady glen
On the steep steep side of Ben Lomand
Where the heilen[3] heather grew & the heilen hills to view
And the moon comming out in the gloaming[4]
Chorus - For I'll take the high road etc.
The wee[5] birds sing & the wild flowers spring
And in sunshine the waters are sleeping
But the broken hearted keans[6] naa[7] second spring
So the een[8] may cease from their greating[9]
again chorus

— By Prof. Blackie of Edinbrugh

—Given by Stella Mclaren.

[1]pretty [2] hills [3] highland [4] evening [5] small [6] knows [7] no [8] eyes [9] weeping

ह्या मुलींच्या शुद्ध व सुखी कुटुंबात मी पुढे लिहिल्याप्रमाणे थोडे दिवस घालविले. त्याला अनुसरून अनुभव वरील काव्यात आहे! [६२]

आदित्यवार १७ आगष्ट, १९०२.

काल दोन प्रहरी इनव्हर्हुलन झोपडीतून वुडबर्न कॉटेजमध्ये आलो. हे स्थान अगदी शांत व स्वच्छ आहे. घराच्या भिंतीजवळून एक धबधबा धबधबत आहे. Wood (वुड्) म्हणजे रान आणि बर्न म्हणजे (ओढा) असा स्कॉच शब्द. वुडबर्नकॉट = रानटी ओढ्याच्या काठची झोपडी असा अर्थ. नवराबायको, ३ मुली, १ मुलगा, एक भाचा असे हे अत्यंत गोड कुटुंब. बाई प्रामाणिक, अल्पसंतोषी, अती समजूतदार आणि उद्योगी आहे. मुले मूर्तीमंत आरोग्य आणि आनंद आहेत. बेझी, डेझी, डंकन आणि नेली ही त्यांची खालपासून नावे. बॉब भाच्याचे नाव.

संध्याकाळी २ मैलावरच्या एक शाळेत उपासनेस गेलो. बरोबर ५ ही मुले होती. कामामुळे नवराबायकोस येणे झाले नाही. पाऊस पडत होता. उपासनेस सुमारे २५ जण हाजर होते. उपदेशकाने जुन्या करारातील मोजेसची गोष्ट सांगितली. आजारी लोकांस नीट करण्यास मोजेसने एक पितळेचा साप उभा केला. तो ज्यास चावे तो बरा होई. ४ वर्षांच्या बेझीला हे मोजेसचे आणि उपदेशकाचे दीर्घ शहाणपण कोठे समजावयाला! साप चावे इतके ऐकून तिचे बालअंत:करण कळवळले. शेवटपर्यंत तिने रडे कसे तरी दाबले. पण संपल्याबरोबर तिचा गळा दाटून ती ओकसाबोकशी रडू लागली. भयंकर गोष्टी सांगून ईश्वराचे प्रेम प्रतिपादण्याचे धाडस आम्ही निदान बालकांपुढे तरी करू नये. धर्मवेडाने त्यांचे मन अद्याप पुरेसे निर्ढावलेले नसते. म्हणून त्यास साधा खरा व स्वाभाविक धर्म सांगितला पाहिजे. नाहीतर बिचारी अर्भके रडून अगर बावरून आपली नापसंती दर्शिवतात. पण ती समजून घेण्याची व आपली चुकी सुधारण्याची अक्कल पुष्कळ पंडितमन्य उपदेशकांस नसते, ही खेदाची पण खरी गोष्ट उघड आहे! 'उपदेशक आणि त्याची मुलगी' ही कविता पहा.[६३]

ता. १९ मंगळवार.

लॉख लोमंड सरोवरात स्नान केले. थंड पाण्यात, उघड्या हवेत, इंग्लंड देशातील हे पहिलेच स्नान व बहुतकरून शेवटचे होईल.

मँचेस्टर

ता. २१ गुरु. आगष्ट.

पाच दिवस ह्या एकांत व स्वच्छ झोपडीत फार सुखाचे गेले. नेहमी पाच मुलात मिसळून घालविले. मॅकलेरनबाई (चा) स्वभाव तर फार समजूतदार आणि मन थोर आहे. तिने अत्यंत काळजी घेतली. आज सकाळी बॅलॉक पिअरवरून ग्लासगोला आलो. तेथे जेवण करून मँचेस्टर शहरी रात्री ८ वाजता आलो. एका टेंपरन्स हॉटेलात रात्र काढली.

Mr. Holt, 3 Hope Str; Higher Bronghton, Manchester

ता. २२ शुक्रवार आगष्ट.

मँचेस्टर शहरात कोणातरी युनिटेरिन आचर्याची गाठ घ्यावी म्हणून हिंडू लागलो तर जो तो सुटीसाठी बाहेर गेला होता. शेवटी एका गृहस्थाची गाठ पडली. ते मि. होल्ट. फार सात्त्विक आहेत. ह्यांनी बोलावल्यावरून ह्यांचेकडेच १ आठवडा राहिलो.

ता. २४ आदित्यवार.

हेल येथील युनिटेरिअन मंदिरात सकाळसंध्याकाळ दोन उपासना चालविल्या. सकाळी सुमारे ३०, संध्याकाळी ६० जण हाजर होते. मँचेस्टरपासून हे ठिकाण १०/११ मैल आहे. गावापासून मंदीर १ मैलावर आहे. बाजुच्या १/२ मैलातील युनिटेरिअन उपासनेस येतात. दिवस सुरेख होता.

ता. २५.

ओवेन्स कॉलेज, रायलंड लायब्ररी आणि टेक्निकल स्कूल ही पाहिली. अगदी पाहण्यासारखी होती. बरोबर दाखविण्यास मिस् कॉन्स्टन्स होल्ट व तिची धाकटी बहीण एथेल ह्या दोघी होत्या.

संध्याकाळी ७ वाजता मँचेस्टरहून ५ मैलांवर एक मोठी दगडी कोळशाची खाण पाहवयास गेलो.[६४] ही खाण जमिनीखाली ४४४ यार्ड खोलात होती. १-२ मिनिटांत आम्हा चौघांस खाली सोडले. इतक्या वेगाने खाली उतरताना जीव घाबरा झाला. आत घोडी, माणसे, गाड्या काम करीत होती. हवा व प्रकाशाचीही सोय होती. खाली सुमारे २ मैल लांब खाण होती. ती सर्व हिंडून दाखविण्यात आली. स्लोपवरून कोळशाच्या भरल्या गाड्या आपोआप घसरत जाण्याची योजना मोठी चमत्कारिक होती. खाणीत काम करणारी माणसे पिशाच्चासारखी दिसत होती. बरेच अंतर आम्हाला वाकून जावे लागले. सुमारे ३ तास पाहण्यास लागले.

लिव्हरपूल

४ डिंगल स्ट्रीट, लिव्हरपूल

आगस्ट ता. २८ शुक्रवार ते २, बुधवार.

रेव्ह. लॉइड जोन्स ह्यांचे, घरी होतो. आदित्यवारी संध्याकाळी डोमेस्टिक मिशन (मध्ये) उपासना चालविली. सोमवारी लिव्हरपूल येथील कंगाल वस्ती (Slums) पाहिली. बरोबर रेव्ह. जोन्स होते. मंगळवारी पोर्टसन लाइट हे साबणाच्या वखारीचे खेडे पाहिले. येथील मजुरास हिंदूस्थानच्या वरच्या वर्गापेक्षा अधिक सोई सुख मिळते.

क्रूकर्न

ता. २७ आदित्यवार सप्टंबर १९०२.

सकाळी व संध्याकाळी क्रूकर्न येथील मंदिरात Harvest festival उत्सवासंबंधी वार्षिक उपासना चालवल्या. हा उत्सव शेतातील मळणी घरी आणल्यावर ईश्वराचे आभार मानण्याप्रीत्यर्थचा आहे. मंदीर अनेक प्रकारची फुले, फळे, धान्ये, भाजीपाला, झाडे, रोपे इ. नी अत्यंत श्रमाने, कुशलतेने श्रृंगारले होते. लोकांमध्ये आदर आणि उत्साह व कळकळ पूर्ण दिसली. सकाळीही देवळात गर्दी झाली. संध्याकाळी वेळेच्या पूर्वी देऊळ गच्च भरले. माझी उपासना सुरू झाल्यावर पुष्कळास जागा नसल्यामुळे परत जावे लागले.

बॉस कॅसल (कॉर्नवॉल)

ता. २८ सोमवारी, सप्टंबर

सकाळी शर्ट करण्याचा एक कारखाना पाहिला सु. १०० मुली यंत्राप्रमाणे यंत्रावर शिवत होत्या. एक्सिटरवरून[६५] मि. कॉक् ह्याजबरोबर बॉस कॅसल येथे समुद्र किनाऱ्यावर गेलो. इंग्लंडचा दक्षिण व पश्चिम किनारा फार पाहण्यासारखा आहे. किनाऱ्यावर डोंगराचे ४००-५०० फूट उंच कडे सरळ तुटले आहेत. समुद्राचा देखावा फार प्रेरक दिसला. टेनिसनने वर्णन केलेला (ldylls of King) आर्थरचा किल्ला जंजीरा पाहिला.[६६] येथे मोठ्या गुहा पाहण्यासारख्या आहेत. येथून उत्तरेकडे हवा स्वच्छ असल्यास लॅडी बेट दिसते. प्रदेश सपाट व बिनझाडाचा दिसतो. पण दरीत झाडे व घरे ह्यांचा देखावा अती रमणीय आहे.

ता. १४ मार्च ०३ शनिवार

सकाळी १०.४३ वाजता ऑक्सफर्डहून पारीसला निघालो. रात्री १०।। वाजता इंग्लंडच्या किनाऱ्यावर न्यू हेव्हन येथे आलो. समुद्र शांत व चांदणे स्वच्छ असल्याने प्रवास सुखाचा झाला. पारीस येथे सकाळी ७ वाजता पोचलो. पहिल्या प्रमाणेच आताही पारीस प्रथम पाहून थोडी निराशा झाली.

ता. १८ मार्च ०३

लुक्षंबर्ग राजवाडा, पँथिऑन व सोबान अथवा पारीस युनिव्हर्सिटी पाहिली. पँथिआनची इमारत पाहून मनास अत्यंत समाधान झाले. ग्रीक पूर्वजांचे फ्रेंच बंधूंनी नाव राखिले आहे. कला, कल्पना आणि कारगिरी ह्यांत फ्रेंचांची सर कोणाकडूनही होणार नाही. सौंदर्याची रूची ग्रीकांप्रमाणे ह्यांच्यात आहे. अचाट कृत्य इजीप्त्याप्रमाणे आहे. पँथिआनमधील कामाची सफाई पाहून भान हारपले. विशेषकरून सेंट जिनीव्ही आणि जोन ऑफ आर्कची चित्रे पाहण्यासारखी आहेत.

ता. २०

ट्रायंफल आर्क, प्लेस डी कंकॉर्ड, शँफ एलेजी वगैरे पाहिली.

ता. २१ मार्च ०३

प्रो. जाँ रेव्हील ह्यांशी संभाषण-प्रॉटेस्टंट लोकसंख्या ६-७ लाख आहे. प्रॉटेस्टंट समाजाच्या एका मंडळास कनसिस्टार्स असे म्हणतात. १०६ कनसिस्टाअर्सपैकी ३३ सुधारक मताचे कमी अधिक (युनिटेरिअन) आहेत. १७८९ पर्यंत प्रोटेस्टंटास धर्मस्वातंत्र्य मुळीच नव्हते. आता कॅथॉलिक, प्रोटेस्टंट व यहुदी अशा तिन्ही संघास सरकारातून सारखाच आश्रय मिळतो. मदत देताना सरकार मताची अट मुळीच घालीत नाही. सुधारक समाजाची एक त्रिवार्षिक सभा भरते. तिचे नांव Assembly De Protestant Liberal. ह्या सभेने कमीटी निवडल्यावर तिच्या मार्फत सरकारतून खर्च मिळतो. पारीस समाज फार जुन्या मताचा आहे.

सोशालिझमची सामाजिक चळवळ जारीने चालू आहे. पण ह्या चळवळीतले सर्व सुधारक जरी हुषार आणि स्वार्थत्यागी आहेत तरी धर्मबाबतीत हे अत्यंत नास्तिक मताचे आहेत. कारण कॅथॉलिक मताच्या जुलमास कंटाळून सर्व धर्माविरूद्ध हे लोक बंडावले आहेत. ह्याप्रमाणे एकीकडे कॅथालिक धर्माचा अडाणीपणा, धर्मवेड व जुलूम, दुसरीकडे सुधारकाचा बुद्धिअंधपणा, औदासीन्य आणि बंडखोरपणा ह्यामध्ये उदार धर्माचे काम मोठे कठीण झाले आहे. सोशलिस्ट लोकांचा कटाक्ष धर्म आणि भांडवलाच्या विरूद्ध आहे.

मॉस्यू वेग्नेअर आणि रॉबर्टी आ-फॉटेनी हे उदार धर्माचे मोठे वजनदार वक्ते आहेत. ला प्रोटेस्टंट हे साप्ताहिक व लिबरल एव्हँजेलिक हे मासिक अशी दोन उदार पत्रे आहेत. (उदार धर्माच्या प्रसाराचे काम व्हावे तसे जोराने चालू नाही. धर्मबाबतीत आता बहुतेक पूर्ण स्वातंत्र्य आहे. व्यक्तीच्याच स्वभावाची नाही. धर्मंबाबतीत आता बहुतेक पूर्ण स्वातंत्र्य आहे. व्यक्तीच्याच स्वभावाची वाढ झाल्याशिवाय गती नाही. प्रोफेसर जाँ रेव्हिली हे आधुनिक धर्माच्या इतिहासाचे व्याख्याते आहेत. व्याख्यानास सर्वास मोकळिक आहे. आज सुमारे ९ पुरूष ४ म्हाताऱ्या बायका हाजर होत्या. पारीस येथे धर्माचे नाव काढण्यास कित्येकास हासे येते).

ता. ६ मार्च १९०३ गुरुवार

सा. व्हिनसां द पाल ह्या एका मोठ्या देवळात नित्याची उपासना पाहवयास गेलो. दोन प्रहरी ३ वाजले होते. उन्ह स्वच्छ पडले होते. देवळापुढच्या विस्तीर्ण आणि गोलाकार उतरत्या घाटावर कित्येक मुले खेळत बागडत होती. आणि दाया आपले शिवण करीत मुलांना खेळवीत होत्या. देऊळ सुंदर, भव्य व भपकेदार आहे. मुख्य देव्हारा मातब्बर आहे. त्यावर येशूचा सुळावरचा मोठा सोनेरी पुतळा आहे. सर्व देव्हारा झगझगीत सोनेरी आहे. मागे मेरीचा देव्हारा आहे. तिच्या बाजूच्या भिंतीवर नवसास वाहिलेली सोन्याची काळिजे Hearts टांगिली होती. दोन्ही बाजूस समोरासमोर दोन देव्हारे आहेत. एकात येशूचा बाप सां. जोसेफ येशूस नेत आहे. समोर येशूच्या आईची आई आपल्या मुलीस मेरीस चालवीत आहे. ह्यांच्या पुढे वेली फुले आणि नंदादीप व नवसाचे दिवे तेवत आहेत. कित्येक भावीक बायका मुकाट्याने बसून प्रार्थना करून जात. एक तरूण बाईने कोपऱ्यात विकावयास बसलेल्या एका बाईजवळून एळू मेणबत्ती विकत घेऊन ती येशूच्या मूर्तीपुढे पेटवली व काही वेळ प्रार्थना करून गेली. सर्व देवळात अशा अनेक संतांच्या मूर्ती उभ्या आहेत. त्या प्रत्येकापुढे भाविक लोक प्रार्थना, निदान नमन तरी करून पुढे जात. नंतर मी उपदेश चालला होता तेथे गेलो. सुमारे २०० दोनशे बायका ऐकत होत्या. एकंदरीत पुरुष फार तर ५/६ असतील. बहुतेक बायका उतार वयाच्या, साध्या पोषाकाच्या, मध्यम व कनिष्ठ दर्जाच्या आणि विधवाच होत्या.

रात्री ८ वाजता मुंबईचे पार्शी मित्र रा. कोतवाल ह्यांचेबरोबर ऑलिंपिया नाटकगृहात (Music Hall) गेलो. हे पारीस येथील उत्तमपैकी एक आहे. गारूडी चमत्कार झाल्यावर नाचगाणे वगैरे झाले[७०]. नव्याचा पाश्चात्य अतिशोष पडल्यामुळे ह्यांची रूची फार बिघडत चालली आहे. तरूण मुलींना तंग पोषाख देऊन त्यांच्याकडून निरनिराळे ढंग करविणे ह्यात ह्यांना मोठी करमणूक होते[७०]. एका पोरीचे गाणे मात्र फारच तारीफ करण्यासारखे होते[७०]. ती आपला गळा असा बदली, सुराची इतकी बारीक तार ओढी, आणि स्वरांचे इतके चमत्कारिक संमिश्रण करी जणू यंत्रातूनच हे आवाज निघताहेत असे वाटे. शेवटी एका मोठ्या गोलावरून बायसिकल उलटी नेण्याचे (Looping the loop) काम फारच आश्चर्यकारक झाले.

पारीस येथे स्त्रीपुरुषांच्या परस्परांच्या नात्यासंबंधी ताळ अगदी सुटला आहे, असे ऐकले होते. त्याचा आज रात्री बराच मासला नजरेस आला. नाटकगृहात पुष्कळ वारयोषिता राजरोस विचारीत हिंडत होत्या. इकडेतिकडे हिंडत असून नाटक पहाण्यास अशा नाटकगृहात पैस जागा असते. अशा बायका आपल्या धंद्यासाठी नाटक पाहवयास येतात. त्यांच्याशी बोलण्यात अगर हिंडण्यात कसलाही आडपडदा नसतो. नाटकगृहाच्या खाली तळघरात सुंदर व विस्तीर्ण उपहारगृह आहे (Olymipia tavern). नाटक संपल्यावर अशा बायकांची येथे दाटी जमते. त्यात सर्व प्रकारचे पुरुषही जमतात आणि यथेच्छ स्वैर वर्तन करितात. अशा विलासासाठीच हे एकंदर स्थान आहे असे दिसते. हे स्थळ दाखविल्यावर माझ्या मित्राने मॅक्झिमम Maximum नावाच्या श्रीमंती थाटाच्या बदफैली उपहार गृहात नेले. येथे फार वेळ राहिलो नाही. रात्री २/४ वाजेपर्यत येथे रंग उडतो. प्रत्यक्ष अशा ठिकाणी कसलेही अपकृत्य होत नाही. तथापि स्वैराचारी स्त्रीपुरूष येथे अगदी उघड उघड बसतात, उठतात, हिंडतात. काही स्त्रिया फार सुंदर आणि श्रीमंत दिसल्या. रात्री परत घरी येताना भेटणाऱ्या सर्व स्त्रिया

ता. २९ रविवार मार्च १९०३

मा दिलेन चर्चमध्ये उपासनेस गेलो. नंतर पेति प्यालेस व त्रकोदेरो प्यालेस पाहिले.

ता. ५ आदित्यवार एप्रिल १९०३

सां रोक देवळात उपासनेस गेलो. येथे उपासना सर्वात अधिक थाटाची होते. आज Branch Sunday होता. म्हणून सर्वानी एक प्रकारच्या वनस्पतीच्या फांद्या घेतल्या होत्या. क्वायर (गाणाऱ्या) मुलांनी मोठ्या फांद्या घेतल्या होत्या. नंतर लुव्ह्र् येथे अलॅक्झांडरचे व पोरसचे लेब्रने काढलेले चित्र पाहिले.

स्मशान

नंतर ३ वाजता पेर ला शाज नावाची मोठी स्मशानभूमी पाहवयास गेलो. ८ दिवसापूर्वी मों मार्ट ही स्मशानभूमी पाहिली होती. मो. पार्नास ही पारीसची तिसरी स्मशानवटिका मी पहावयास गेला असता बंद होती. पेर ला शाज ही सर्वात मोठी [७२] आहे. हिच्यात सुमारे ३० लक्ष प्रेते पुरली आहेत. प्रथम गेल्यावर समोरच्या उतरणीवरच्या एका भिंतीत, ज्याच्यासाठी कबरस्थान नाही अशा सर्वच माणसासाठी एक मोठे स्मारक भिंतीत कोरले आहे, ते पाहण्यासारखे. मृत नवराबायको भिंतीतल्या दाराशी अज्ञेय प्रदेशाकडे जात आहे. दोहीकडून कित्येक मृत विन्मुखपणे त्याच्या मागून चालले आहेत. खाली तेच जोडपे अखेर निद्रेत उघडे पडले आहे. त्यावर त्यांचे अर्भक पालथे पडले आहे. आशादेवीने थडग्यावरील शिळा उचलून धरिली आहे ! चित्र फार परिणामकारी आहे.

हे कॅथॉलिक स्मशान पहाण्यासारखे आहे. पुष्कळ थडगी म्हणजे लहान लहान देवळेच आहेत. आत वेदी, त्यावर येशूचा पुतळा, मेरीच पुतळा, मृताचा पुतळा, मुखवटा अगर निदान फोटो इ. ठेविले होते. त्यावरून फुले, माळा घातल्या होत्या. मोठ्या मेणबत्त्या होत्या. त्यापुढे बसून प्रार्थना करण्याकरिता खुर्च्या ठेविल्या होत्या. अशा देवळात सर्व कुटुंबाची माणसे पुरलेली असत. स्मशानात स्वच्छ व सुंदर सडका, दोहो बाजूनी उंच झाडी. त्यांच्या खालीही एकाला एक चिकटून असली थडग्यावरची देवळे असा एकंदर देखावा पाहून आपण पाताळ लोकात मृतांच्या स्तब्ध शहरातच आहो असे वाटते. येथे करुणरसपर शिल्पकारागिरी ही पाहण्यासारखी आहे. कवी, वक्ते ; योद्धे, मुत्सद्दी, चित्रकार, गायक ह्या सर्वांची माती येथे मातीत मिसळली आहे. येथे प्रेते जाळण्याची एका बाजूस टोलेजग व्यवस्था केली आहे. ह्या इमारतीभोवती मृताची रक्षा ठेवण्याकरता एक ग्यालरी बांधली आहे. भिंतीत सु. २ फूट लांबीरुंदीचे कोनाडे केले आहेत. त्यात राख ठेवून वर तावदान अगर संगमरवरी दगड बसवला आहे. मृतांचा फोटो अगर लहानसा मुखवटा वर बसवला आहे. शिवाय त्यांचे नातलग वरचेवर ह्या कोनाड्यावर फुले, माळा, मेणबत्त्या वाहत असतात. हल्ली सुमारे २००० दोन हजार अशी लहान स्मारके येथे दिसतात. फुलामाळांचे निर्माल्य येथे बरेच साचले असते. जळत्या राखेवरही मागच्याची माया कशी लोलूप होते हे पाहून मन द्रवते. तसेच अशा प्रकारे स्मारक करण्याची चाल अगदी रानटी अवस्थेपासून युरोपच्या हल्लीच्या सुधारलेल्या काळापर्यंत कशी अखंड चालू हे पाहून मनात ऐतिहासिक विस्मयही वाटतो. एकंदरीत तत्त्वज्ञान, नीती, काव्य व धर्म इ. अनेक गहन विषयावर गंभीर चिंतन करण्यास ही पारीस येथील कॅथॉलिक स्मशानस्थळे अत्यंत अनुकुळ आहेत!

ता. १० एप्रिल ०३

आज भावीक लोक उपवास करितात. मासे खाण्यास परवानगी आहे. खाटकांची सर्व दुकाने बंद होती. धार्मिक लोक मुख्य मुख्य सर्व देवळात दर्शनास जातात. सकाळपासून संध्याकाळ सर्व देवळांत गर्दी असते. मी आज सां व्हिन सां दी पॉल, सां रोक्, मादिलेन ह्या तीन मोठ्या देवळात गेलो. गायनवादन आणि मंत्रघोष, उपदेश वगैरे चालू होती. पुष्पवेली, पाने ह्यांनी काही देव्हारे अत्यंत सजवलेले होते. एका टेबलावर मखमालीच्या गिर्दीवर सुळावर चढवलेल्या येशूची लहान मूर्ती ठेवलेली असे. जवळ एक लहान मुलगा बसला असे. स्त्रीपुरुषे एकामागून एक येत व मोठ्या भक्तीने येशूचे दोन्ही बाहू, गुडघे, पावले चाटून जात. वृद्ध बाया फारच प्रेमाने चाटीत. जवळ ठेवलेल्या ताटात एक पैसा टाकून पुढे जात. मग जवळ बसलेला मुलगा रुमालाने प्रत्येक वेळी मूर्ती पुशीत असे. असा प्रकार सर्वत्र एकसारखा चालला होता. मोठ्या देवळात दोन मूर्ती ठेवल्या होत्या. सां रोक येथे येशूला सुळावर चढवल्याचा व थडग्यात नेण्याचा हुबेहुब देखावा दाखविण्या मोठमोठे पुतळे देवळाच्या मागील भागी आहेत, तो भाग आज उघडा होता. तो पाहून मनावर फार जोरदार परिणाम होतो.

नंतर मी सां क्लू येथील पार्क पाहवयास गेलो. येथे काल गेलो असता हे स्थान इतके आवडले की फिरून मी आज गेलो. ह्याचे वर्णन मी रुक्मिणीच्या पत्रात घरी पाठविले आहे १८७० च्या युद्धात जर्मन लोकांनी येथील वाड्याचा उध्वस्त केला !

मॅडेमोझील् द्युगा

ता. २ गुरुवार एप्रिल ०३

वरील बाई (कुमारी) मोलरी नावाच्या येथील स्त्रियांच्या कॉलेजात वाङ्मय व तत्त्वज्ञान विषयाची अध्यापिका आहे. पारीस येथील स्त्रीशिक्षणाविषयी माहिती मिळविण्याकरिता ह्या बाईची भेट घेतली. बाई अत्यंत गरीब, सभ्य व साधी आहे. हिचा पोषाख व वागणूक तर इतकी साधी दिसली, (की) ही पारीस नगरीत राहण्यास जवळ जवळ अयोग्यच दिसली. हरएक माहिती पुरवण्याची हिची अत्यंत उत्कंठा दिसली. लगेच आम्ही मन मोकळे करून बोलू लागलो. मी अनेक प्रश्न विचारले. त्याची तिने समर्पक, साधार उत्तरे दिली. सुमारे दोन तास बोललो तरी बोलणे संपले नाही की तिने कंटाळा दाखविला नाही. उलट माझी उदार मते पाहून तिला आनंद, आश्चर्य वाटले. तिने बोलून दाखविले. हिंदुस्थानचे लोक म्हणजे गहन विचारात गुंतलेले वैराग्य वृत्तीचे असावयाचेच असा हिचा समज होता. माझी ही प्रवृत्तीची, प्रगमनशील, शुद्धबुद्धिवादी सुधारकी मते पाहून आपणास आश्चर्य वाटते असे बोलून दाखविल्याबद्दल तिने माफी मागितली. मला तिचे भाषण व वर्तणूक फारच आवडली. दुसरे दिवशी शुक्रवारी तिने मला जेवणास बोलावले.

३ शुक्रवार एप्रिल

आदले दिवशी प्राथमिक व द्वितीय स्त्रीशिक्षणासंबंधी भाषण झाले होते. आज उच्च शिक्षणाविषयी बोललो. जेवणाचे पंक्तीस आम्ही दोघेच होतो. फ्रेंच विवाहपद्धतीसंबंधी मोठे मौजेचे बोलणे झाले. फ्रान्सात मुलामुलींची लग्ने आईबापच त्यांच्या मोठेपणी त्यांच्या संमतीने लावतात. इंग्रजाप्रमाणे

येथेही स्वयंवराची चाल हळू हळू पडत चालली आहे. तरुण मुलीस तेथल्याप्रमाणे स्वातंत्र्य नाही. एका मुलीचे उदाहरण सांगितले की आईला सोडून ती एकटीच अशी केवळ स्नानगृहातच जात असे ! नंतर पारीसच्या नीतीसंबंधाने बाईने मोकळेपणे आपले विचार कळविले. ब्रिटिशापेक्षा फ्रेंच लोकात वैवाहिक नीती कमी आहे. जसजसे दक्षिण युरोपात जावे तसतसे नीतीचे मान कमी कमी होते, असे म्हणाली. गरीब कामकरी स्त्रीपुरुषे लग्न न लावता नवराबायकोप्रमाणेच राहतात. ते केवळ अनीतीचे असतेच असे नाही. ह्याचे एक कारण लग्नाच्या विधीचा धर्मदृष्टीने व कायद्याने फाजील अवडंबर माजविला आहे, तो गरीबांना झेपत नाही. नीती बिघडण्याचे दुसरे एक कारण तरूण मुलांनी २१ वर्षानंतर दोन वर्षे लष्करात नोकरी केली पाहिजे असा सक्तीचा कायदा आहे. अशा तारुण्याच्या वेळी अशा पेशात स्वैरवृत्ती साहजिक वाढते. शिवाय पारीस हे जगातले करमणुकीचे स्थान असल्याने परकीय चैनी लोकांचे एथे चाळे फार चालतात, हे एक कारण.

नंतर उच्च शिक्षणात स्त्रियांचा कसा थोडा थोडा शिरकाव होत आहे व चळवळीचे काम स्त्रिया कशा अंगावर घेत आहेत, ह्याविषयी बोलणे झाले. एकंदरीत ह्या बाबतीत फ्रान्स अमेरिकेच्या व इंग्लंडाच्या मागे आहे असे बाईने कबूल केले. स्त्रीशिक्षणाचे कामी काथॉलिक धर्माकडून कसा अडथळा येतो ते स्वत:च्या अनुभवावरून सांगितले.

ह्याप्रमाणे ह्या दोन दिवसाच्या संभाषणानंतर ह्या विद्वान, आपल्या जातीविषयी झटून प्रयत्न करणाऱ्या ह्या बाईविषयी मला फार आदर व प्रेम वाटू लागले. तसेच तिलाही मजबद्दल व माझ्या धर्माबद्दल आस्था उत्पन्न झाली. आपल्या भेटीची आठवण म्हणून तिने मला एमर्सनविषयी एक पुस्तक दिले. ११ वाजता रात्री मी घरी परत निघालो. ट्राममधून सेन नदीचे काठाने येताना तो रात्रीचा देखावा पाहात, नुक्त्याच घडलेल्या शुद्ध सहवासाविषयी माझे मनात अनेक गोड विचारतरंग येऊ लागले. आत्मा आत्म्यावर लुब्ध झाला होता. म्हणून वियोग झाल्यावरही सुखच होत होते. शरीराची सर्वच सुखे दु:खपर्यवसायी आहेत. आत्म्याला पर्यवसानच नाही. कारण आत्मा अनंत आहे म्हणून त्याची वृत्ती अखंडित राहते.

व्हर्साय्य Versailles

१२ आदित्यवार एप्रिल ०३

पारीसच्या नैऋत्येस सुमारे १४ मैलावर वरील इतिहासप्रसिद्ध वैभवशाली स्थल आहे. मी दोन प्रहरी ३ वाजता तेथे पोचले. येथे १४ व्या लुईचा प्रचंड आणि श्रीमंत राजवाडा आहे. मध्ये चौकात १४ व्या लुईचा घोड्यावर बसलेला मोठा धातूचा पुतळा आहे. ह्या ठिकाणी ऐतिहासिक चित्रांचा व पुतळ्यांचा जसा संग्रह आहे तसा जगात कोठेही नाही. बहूतेक फ्रेंच इतिहासाचीच चित्र आहेत, व ती नामांकित चिताऱ्यांनी काढिली आहेत. चित्रे अलिकडे मी इतकी पाहिली आहेत की आता तितके लवकर लक्ष लागत नाही. तरी काही चित्रांनी माझे येथे मन वेधले. शार्लमेन, सां लुई Sain Lui ह्यांची चित्रे पाहवी असे वाटले. क्रुसेड्स हॉलमध्ये क्रुसेड्ससंबंधी चित्रे आहेत. दुसऱ्या मजल्यातील ग्यालरीत १७९७ पासून १८३५ पर्यंतची भव्य चित्रे आहेत. ह्यात नेपोलियनचा पराक्रम वर्णिला आहे. त्याचे सेंट हेलेना येथील थडगे, राटिसबन येथे त्याच्या पायाला झालेली जखम डाक्तर बांधीत

(असता) तो आपल्या पांढऱ्या घोड्यावर चढत आहे, आले क्झांड्रिया शहरात त्याचा प्रवेश, तेथील राजाचे शरण येणे, आस्टर्लिट्झ लढाईची आदली रात्र, वगैरे चित्रे पाहून वीर व करुण रसाची महती कळली.

नंतर निरनिराळे दिवाणखाने पाहिले. येथे संपत्तीची परमावधी पाहून तोंडावाटे गांवढळाप्रमाणे आपोआप सुस्कारे निघत. लुईची निजावयाची खोली व हांतरुण व चादर राखून ठेविली आहेत. राजदेऊळ फार सुंदर व भपकेदार आहे. वेळ नसल्यामुळे १।। तासात सर्व राजवाडा पाहणे झाले नाही. वाड्याचे खिडक्यातून सुंदर बागेची व उपवनाची अनुपम शोभा दिसत होती. मग आम्ही बागेत आलो. उंच झाडे, वीथिका, पुष्पवाटिका, गुंफा, तटाक, लहानमोठे कारंजे, वाड्यापासून उतरत जाणारी सपाटी, पुढे दूरवर दिसणारा रुंद व प्रशस्त पसरलेला कालवा, त्यावरील क्रीडानौका, एक की दोन असा नानाविध चैनीचा व सुखाचा देखावा पाहून मन समाधान पावले. आज इष्टरचा सण असल्याने हाजारो स्त्रीपुरुषे व लहान मुले विहरण्याकरिता येथे आली होती. मजबरोबरही एक सभ्य बाई, तिचा भाऊ व लहानगा अत्यंत गोड व पाणीदार भाचा Andrew Jevonsal इतकेजण होते. फिरून लहान मूल थकल्यावर ती सर्व मंडळी ६ वाजता घरी गेली. मी एकटाच कालव्याच्या काठाने उपवनात हिंडू लागलो. उपवन विस्तीर्ण आहे. सुमारे ८ वाजता उपवन बंद होण्याची वेळ झाली तर मला बाहेर जाववेना. वाड्याचे पुढे पायऱ्यावर, मागे वाडा, पुढे उद्यान, भोवती क्षितीजापर्यंत पसरलेली वनराजी पाहात मी चित्रासारखा एवढा वेळ अगदी एकटाच उभा होतो. पौणिमेचा चंद्र स्वच्छ आकाशात वर येत होता. वाड्यापुढची बाजू (१३६० फूट लांब) रंगीत फोटोसारखी सुबक व प्रमाणबद्ध नजरेत भरली. मानवी ऐश्वर्य, सौंदर्य, स्वातंत्र्याच्या व सुधारणेच्या वातावरणात असे एकवटलेले माझ्या पाहण्यात तर अद्यापि कोठे आले नाही व पुढेही येईलसे दिसत नाही. म्हणून ८ चे सुमारास बाहेर पडताना थोडे अवघड वाटले !!

ऑक्सफर्ड

ता. २४ जून १९०३

आज ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटीचा मोठा वार्षिक पदवीदान समारंभ झाला. सकाळी ११ वाजल्यापासून शेल्डोनियन थिएटरात स्त्रीपुरुषाची गर्दी जमू लागली. १२ वाजता थिएटर खालवर गच्च भरले. आदमासे २००० दोन हजार समाज असेल. ३/४ वर स्त्रिया होत्या. आत जाण्यास तिकीट मिळवण्यास मोठी पंचायत पडते. Eighth Week बोटीच्या शर्यतीच्या खालोखाल हा आठवडा ऑक्सफर्ड येथे मोठ्या मौजेचा व चैनीचा आहे. चोहीकडे नाच, मेजवान्या व खेळ चालतात. परीक्षा आटपल्यामुळे विद्यार्थी मोकळे असतात. १२ वाजता सेनेटचा च्छबिना आत आला. नंतर ज्या बड्या लोकांस सन्मानाच्या पदव्या घ्यावयाच्या होत्या ते आले. त्यांत सर जॉर्ज व्हाईट, आफ्रिकेतील युद्धातील वीर हे होते. त्यास D.C.L. ची पदवी देण्यात आली. बादशहा एडवर्डचे परलोकवासी बंधू ड्यूक ऑफ आलबनी ह्यांची पत्नी व कन्या हाजर होत्या. समारंभातील सर्व भाषणे लॅटिनमध्ये झाली. अशा गंभीर प्रसंगीदेखील विद्यार्थ्यांनी गोंगाट व वात्रटपणा केलाच. तो पाहून सर्वांस मोठी मौजच वाटलीसे दिसले. व्हाइट ह्यांस पदवी दिल्यावर त्यांनी काही बोलावे म्हणून विद्यार्थांनी ३/४ मिनिटे एकसारखे टाळ्यांनी ठिकाण दणाणले. क्रुएन व ह्यांचे लाटीनमध्ये

मार्च १९०३ चे आरंभी मँचेस्टर कॉलेज येथे एक सामाजिक मेळा झाला. त्यात हिंदूंचे सामाजिक जीवन ह्यावर एक व्याख्यान दिले व सप्रयोग देखावे करून दाखविले. ते व्याख्यान ता. १४ मार्चचे "इनक्वायरर" पत्रात प्रसिद्ध झाले. लोकांस फार आवडले. 12 Avenue Da Pavillion Sully Le pecq, France येथे राहणारे मिस्तर हॉजसन प्रॅट नावाचे इंग्रज गृहस्थाने ता. १६ एप्रिल, १९०३ तारखेचे मोठे कळकळीचे अभिनंदन पत्र पाठवले.[७३]

३१ आगस्ट १९०३ सकाळी ९.२५ वाजता होबर्न येथून निघालो व लंडनला व इंग्लंडला शेवटचा रामराम केला. जर्मन सीमधून इंटरनॅशनल परिषदेसाठी ॲमस्टर्डाम येथे गेलो. तेथे ता. ४ सप्टेंबरपर्यंत होतो.

ता. ५ सप्टेंबर ०३ सकाळी (शनिवारी) कलॉन (कॉन) जर्मनीतील सुंदर शहरी पोचलो. तेथील कॅथीड्रल, प्रसिद्ध देऊळ, एक दिवस पाहून स्वित्झर्लंडला निघालो.

ता. ७ सप्टेंबर सोमवारी बाझल (बाल) येथे पोचलो. सायंकाळी ७-५० वाजता. त्याच रात्री ११-१४ वाजता लूसर्न ह्या अती रमणीय सरोवराकाठचे लूसर्न गावी पोचलो.

ता. ९ सप्टेंबर ०३. शॉन हॉटेलमध्ये जागा बदलली. एसलपीक टेकडीवरील देखावे पाहिले.

ता. १० सप्टेंबर ०३. स्विस गरीब मजूराचे घर पाहून बारीक माहिती घेतली. दरमहा १० फ्रांक एका खोलीचे भाडे. ४ खोल्या व एक स्वयंपाक घराचे द. म. भाडे ३० फ्रांक. कँपाझिटरची दर दिवसाची मजूरी २ फ्रांक.

ता. ११ सप्टेंबर ०३. सकाळी ११ वाजता लूसर्न सोडून सायंकाळी जिनोव्हा येथे पोचलो. इतालीतील.

ता. १२. जिनोव्हातील कॅपो सँक्टो नावाचे अत्यंत विस्तीर्ण व सुंदर स्मशान पाहिले. येथील पुतळे अवर्णनीय आहेत. नंतर ५ दिवस सुमारे रोम येथील स्थळे पाहिली.

ता. १५ रविवार सप्टेंबर ०३. व्हॅटिकन येथील प्रसिद्ध चित्रे पाहिली. पोप पायसचे प्रत्यक्ष दर्शन घेतले. भक्त त्याचे चरणाचे चुंबन घेत. मी नुसती आंगठी (हातावरील) चुंबली. सुमारे १८ शुक्रवारी नेपल्सला पोचलो.

ता. शनिवारी पाँपी शहराचे जुने अवशेष पाहिले.

ता. २१ सप्टेंबर ०३ सोमवारी नेपल्सहून रुबातीनो बोटीने हिंदुस्थानाला निघालो.

ता. ६ आक्टोंबर ०३ मुंबईस पोचलो.

ॲमस्टर्डाम (हॉलंड)

हॉलंडमधून जर्मनीत कॉन उर्फ कलोन शहरी पोचल्यावर दुसऱ्या दिवशी खालील हकीकत लिहिली आहे.[७४]

Hotel Ewige Lampe
(Antonetty)
and
Hotel de l'Europe
Koln

Besitzer : P. Urban

भिंतीवरील चित्र, वगैरे फार प्रेक्षणीय आहेत. भाकर, कपडे, निराळी धान्ये भाजून (भाजलेली) काळवंडलेल्या स्थितीत पाहण्यासाठी ठेविली आहेत. दाराजवळ एक कुत्रे दडपून मेलेले उलथे पडलेले दिसते. त्याच्या गळ्यातील पट्टा आणि साखळी ही जशीच्या तशीच दिसते. रांजण, हौद वगैरे दगडामातीच्या घरगुती वस्तू पाहून तसेच विस्तीर्ण बाजाराचे चौक, अर्धवर्तुळाकार मंडई, सार्वजनिक व्याख्यानाच्या जागा, भव्य जोती वगैरे पाहून तत्कालीन कौटुंबिक व सामाजिक स्थिती अजमावण्याची साधने दिसतात.

ही हकीकत ता. १९ सप्टेंबर, ०३ च्या रोजनिशीचे पान शिशपेन्सलीने लिहिलेले जसेचे तसेच उतरून तयार केली असे.[७५]

वि. रा. शिंदे, पुणे ता. २४ मार्च, १९२६

पुरवणी [७६]

ही रोजनिशी माझे मुख्यत: १९०१-०३ इ. स. ह्या वर्षी परदेशात माझे जे निरीक्षण व शिक्षण झाले त्या विषयीच आहे. मी इंग्लंडास केवळ धर्माचे मँचेस्टर कॉलेज (ऑक्सफर्ड) येथे पुस्तकी शिक्षण घेण्याकरिता गेलो नव्हतो. मुख्यत: तुलनात्मक पद्धतीने जगातील सर्व धर्माचा इतिहास ऊर्फ विकासाचे अवलोकन करून स्वत:ची धर्मबुद्धी विशद करून धर्मप्रचाराची तयारी करणे हा तर मुख्य, पण एक हेतू. शिवाय युरोपातील काही प्रमुख देशांतील चालीरीती पाहव्या, वाङ्मय वाचावे, पंडित आणि सज्जनाच्या भेटी घ्याव्या, नव्याजुन्या संस्थांची वाढ पाहावी, निराळ्या वर्गाची-विशेषत: खालच्या व चिरडलेल्या वर्गाची अंतस्थ स्थिती निरखावी, त्यांच्यात रहावे, सुंदर आणि प्रेक्षणीय स्थळे पाहावीत इ. दुसरेही हेतू होते.

मँचेस्टर कॉलेज ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटीत जरी सामील नव्हते तरी त्याचा अध्ययनाचा व अनध्यायाचा काळ इतर कॉलेजप्रमाणे नियमित केला होता. तो साधारणपणे असा. पहिली टर्म आक्टोबर मध्यापासून तो डिसेंबर मध्यापर्यंत ८/९ आठवड्याची, नंतर नाताळाची सुट्टी चार आठवडे. दुसरी टर्म जानेवारी मध्यापासून तो मार्च मध्यापर्यंत आठ आठवडे व नंतर ईस्टरची सुट्टी सहा आठवडे. तिसरी टर्म मेच्या सुरवातीपासून जवळ (जवळ) जून अखेर. नंतर उन्हाळ्याची दीर्घ सुट्टी सप्टेंबरअखेर.

मी ऑक्सफर्ड येथे दोन वर्षे होतो. त्या काळात ६ टर्मस् व सहा सुट्या पडल्या. पहिली सुटी मी लंडनमध्ये घालविली. ती नाताळची होती. तिसरी सुट्टी इंग्लिश व स्कॉच लेक डिस्ट्रिक्टस्मध्ये पर्वतशिखरे व सरोवरप्रांत हिंडून पाहण्यात घालविली. पैकी १५ दिवस बॉरोडेल दरीत लीथ कॉटेजमध्ये प्रो. कार्पेंटरसो. चा मी पाहुणा होतो. चौथी सुट्टी नाताळची मी ऑक्सफर्डमध्येच घालविली. पाचवी मी कॉर्नवालमध्ये बस्टनहॅम वगैरेमध्ये घालविली. पैकी १५ दिवस पोल्ट्रनी येथे माझे मित्र मिस्टर व मिस् कॉककडे मी पाहुणा होतो. शेवटी सुट्टीला मी हॉलंड देशात सर्वराष्ट्रीय धार्मिक परिषद ॲमस्टर्डम येथे भरली तेथे हिंदुस्थानचा प्रतिनिधी म्हणून गेलो. नंतर जर्मनी, स्विट्झर्लंड, इताली वगैरे देश पाहिले व स्वदेशी आलो. लुसर्न (आल्पस्), कोलोनचे कॅथिड्रल; (व) जिनोवा, नेपल्स ही शहरे पाहिली व रुबातिनो बोटीने मुंबईस आलो.

येरवड्याच्या तुरुंगातील रोजनिशी (१९३०)



ता २१ मुंबई १९३० पासून —

दैनंदिनी ३।।

येथे मी कोणत्या स्वरूपाचा अनुभव व स्वाध्याय टिपणे लिहीणार. येथे जीवनांत घाणेरडे विचार लिहीणे असे होत आहे. राजकारण, समाजकारण अगर कोणतेही स्वार्थप्रेरक विचार कारणीभूत हे स्थानच नव्हे. अध्यात्मिक चिंतनाला या तुरुंगवास मला अनुकूल वाटतो. पुस्तके मात्र पुरवीत्या पाहिजेत मला स्वतःला तुरुंगांत जास्त लागतात!

(येरवड्याच्या तुरुंगातील रोजनिशीच्या आधीच्या पानावरील प्रास्ताविक मजकूर म. शिंदे यांच्या हस्ताक्षरात).

येथे आल्यापासून मला लिहावयाचे सामान मिळावे म्हणून मी प्रयत्न करीत होतो. ते सामान आज मला सर्व मिळाले म्हणून किती आनंद झाला म्हणून सांगू !

ता. २६ जूनला गुरुवारी सुपरिंटेंडंटनी लिहिण्याचे सामानासाठी घरी पत्र लिहिण्यास परवानगी दिली. ते पत्र ३ जुलैला तुरुंगातून रवाना झाले. ता. १२ जुलै शनिवारी जनाक्का, विश्वास[१], छबू आणि बबन मला भेटावयाला आले. त्यांनी बरोबर तीन वह्या, दोन टाक, एक शिसपेन, ४ शाईच्या पुड्या व एक ब्लॉटिंगची प्याड, एक दस्ता सुटे कागद इतके सामान आणिले. पण शाईची दौत आणावयाला विसरले. झाली, माझी सामान मिळविण्याची दोन महिन्याची तपश्चर्या फुकट गेली.

शाईची दौत मागण्यासाठी सर्वांपुढे तोंड वेंगडावे लागले. ऑफिसमध्ये माझे पैसे आहेत त्यातून मला एक लहानशी दौत मिळावी म्हणून चिठ्ठी लिहिली. पण दाद लागेना. ता. १७ ला गुरुवारी आठवड्याचे तपासणीला सुररिंटेंडेंटसो. आले. मी दौतीचा अर्ज केला. दौत देणे नियमात आहे काय, त्याचा विचार होईल असे उत्तर मिळाले. रविवारी ता. २० ला सहज जेलरसो. आले. त्यांना दौत पुनः मागतिली. मी Ink-Stand हा शब्द वापरीत होतो. त्यामुळे ह्या लोकांची मोठे कलमदान अशी गैरसमजूत *(होऊन)* हा सर्व विलंब लागला. नुसती एक लहान दौत असे हाताने दाखवून सांगितल्याने साहेबांनी तात्काळ पोलिसास एक दौत देण्यास फर्माविले. ता. २१ सोमवारी मि. रॉजर्स डेप्युटी जेलरने एक उंदराच्या कानाएवढी चिमुकली दौत जुनी दिली. मला स्वराज्य मिळाल्याइतका आनंद झाला. त्याच दिवशी सायंकाळी मी माझ्या आयुष्यातल्या आठवणी[२] लिहीण्यास आरंभ केला !

[रोजनिशीच्या समासात नंतर लिहिलेला मजकूर.--- संपादक]

जे सामान मी ता. २१ जूनला मागितले ते येवढे गोते खाल्यावर शेवटी ता. २१ जुलै रोजी जवळजवळ एका महिन्याने मिळाले !

ता. २४ जुलै गुरुवारी प्रतापरावांनी[३] चि. रविंद्राबरोबर मला एक दौत पाठविली. ती मिस्ट. रॉजर्सने २५ रोजी मला नुसती कळविली. ता. २६ रोजी शनिवार संध्याकाळी सदाशिव जमादारांनी मला आणून दिली. तीही ता. ४ ऑगष्ट रोजी फुटली ! हे तुरुंगातली दशा !!

मंगळवार ता. २२ जुलै १९३०

आज जवळ जवळ तीन महिने झाले. मला लिहावयाला वेळ नाही, किंवा लिहावयाला कागदशाईलाही मी पारखा झालो ना ! एप्रिलच्या तिसऱ्या आठवड्यापासून मेच्या दुसऱ्या आठवड्यापर्यंत मी पुणे जिल्ह्यातील खेड्यांतून कायदेभंगाच्या प्रचारावर फिरत होतो. ता. १० मे १९३० शनिवारी तिसरे प्रहरी मी पुण्यास घरी पोचलो. ह्या माझ्या तिसऱ्या फेरीवर मी सुमारे ५० मैल पायी चाललो होतो. पहिल्या फेरीत मी १०० मैल चाललो होतो. पण ह्या फेरीत भीमाशंकर डोंगर चढून उतरावा लागला. जंगल सत्याग्रहाची मी पूर्ण काल्पनिक तयारी केली होती. पण त्याप्रमाणे प्रत्यक्ष काही घडले नाही. मी फार थकलो होतो. *(पुढील पानावर चालू).*

ता. २५ जुलै १९३० शुक्रवार

सुमारे ३/४ चे सुमारास खंडाळा येथील सरकारी बंगल्यात पोचल्यावर रा. शिंदे इन्स्पेक्टर म्हणाले की मि. मिलर जे खेडला नेतो असे मला सांगितले ती त्यांची गैरसमज होती. माझ्या खटल्याची सुनावणी येथे रा. माधव नारायण हुल्याळ, बी. ए., Deputy Collector पुणे पश्चिम भागाचे प्रांत, ह्यांचेपुढे होणार. मला पकडताना वॉरंटही दाखविले नाही. मीही मागितले नाही. माझेवर चार्ज ११७ कलम पिनलकोड (गुन्ह्याला चिथावणी देण्याचा) व ४७ सी (बेकायदेशीर मिठाची विक्री केल्याचा) होता. अर्ध्या तासात सर्व फार्स आटपला. हे मॅजिस्ट्रेट माझ्या जमखंडी गावचे बालमित्र, कॉलेजमध्ये बी. ए. पर्यंतचे सहाध्यायी आहेत. त्यांनी मी खोलीत (कोर्टात) शिरताच प्रथम आपण होऊनच मला नमस्कार केला. आपल्या टेबलाला लागूनच मला खुर्ची दिली. प्रॉसिक्युटर, दोन पोलीस व एक मॅजिस्ट्रेटशिवाय कोर्टात कोणीच नव्हते. गर्दी टाळण्याची ही उत्तम युक्ती ! शेवटी गुन्हा कबूल आहे काय असे मॅजिस्ट्रेटनी विचारता मी एकच वाक्य विचारले की "खेड येथील १०,००० लोकांपुढील सभेत मी अध्यक्ष होतो, भाषण केले, व मिठाचा लिलाव केला, वगैरे पोलीसची हकीकत खरी आहे. पण मी गुन्हा केला की कसे ते सांगणे माझे काम नव्हे. ते कोर्टाने वाटेल तसे ठरवावे." सहा महिने सक्त मजुरीची शिक्षा झाली. क्लास बी अशी शिफारस केली. पण ती वारंटवर न लिहिता तोंडीच पोलीस इन्स्पेक्टरला बजावली.

रा. हुल्याळ फिरतीवर ह्या बंगल्यात उतरले होते. आता मॅजिस्ट्रेटचे नाते संपले. मित्राचे नात्याने त्यांचे कुटुंबाला सौ. रमाबाईला भेटण्याची हरकत आहे काय ? असे मी विनोदाने विचारले. अर्थात् आनंदाने भेटा, चला म्हणून मला आत नेऊ लागले. मी पुनः म्हटले, मी आता कैदी आहे. पोलीसची परवानगी पाहिजे. इन्स्पेक्टर शिंदे म्हणाले, प्रत्यक्ष मालकच तुम्हाला नेत आहेत, तर पोलीस कशी हरकत घेतील. भेटीस गेल्यावर सौ. रमाबाईंचे डोळे अश्रूने भरलेले पाहून मी पुनः विनोद केला, "आपल्याच नवऱ्याचा मी कैदी असून आपणच पुनः अश्रू गाळता !" एक अंजीर खाऊन पाणी पिऊन मी पोलिसांबरोबर मोटारीत बसलो.

सायंकाळी ७ वाजता (ता. १२ मे १९३०) वैशाख पौर्णिमेचा चंद्र उगवला असता मला येरवड्याच्या तुरुंगाचे दारात उभे केले गेले. बुद्धजयंतीवर व्याख्यान देण्याची ही वेळ. दरसालच्या नियमाप्रमाणे शिवाजी शाळेच्या आंगणात ते मी दिलेही असते. पण योगायोग असा ! सर्वे सुखिनः सन्तु सर्वे सन्तु निरामया। सर्वे भद्राणि पश्यन्तु एष बुद्धानुशासनम्।। हा श्लोक म्हणून मी त्या प्रचंड कारागृहात पाय टाकला. (मला खेड येथे नेले अशा समजुतीने २०-२५ मंडळी तेथे गेली.नंतर तळेगावला गेली. फुलांचे हार वगैरे सर्व तयारी फुकट गेली असे मागाहून कळले !).

ता. २७ जुलै १९३० रविवार

ता. २४ जुलैपासून दिव्याचा प्रकाश मिळावा म्हणून आपली खोली ऊर्फ पिंजरा बदलून जेथे रा. बाळूकाका कानिटकर वगैरे B Class कैदी होते तेथे (अंधारी वॉर्ड नं. २) बदलून घेतला असे वर सांगितलेच आहे. अर्थात येथे बाळूकाका वगैरे मित्रांची भेट होते. आज बाळूकाकांनी मला मोठी मेजवानी दिली. म्हणजे त्यांनी मला एक मोठा कांदा खावयास दिला. कांदा, मीठभाकर म्हणजे मला

बासुंदी पुरीपेक्षा प्रिय, हे माझे आईला माहीत होते. लहानपणी मी गरीब विद्यार्थी होतो तेव्हा आई मला भाकरी, हिरव्या पातीचा कांदा जेव्हा देई, तेव्हा मी म्हणे की कांदा म्हणजे माझे तूप अगर लोणी आहे. हा माझा अल्पसंतोष पाहून माझी आई अश्रू गाळी. आज आनंदाने कांदा खात असता ही आठवण झाली. B Class मध्ये चपाती, लोणी, साखर, दूध मिळत असता मला कांदाच इतका जास्त आवडावा ! कारण मी मराठ्याचा साधा बच्चा. बी क्लासमध्ये गुजराथी स्वयंपाकी वरण, भाजी अगदी आळणी करतो. माझा लहानपणाचा गोडघाशेपणा लवकरच मावळून मी लहानपणीच साध्या अन्नाचा भोक्ता झालो. आता सर्व हिंदुस्थानातील प्रांतात वरचेवर फिरूनही मराठ्याच्या झुणकाभाकरीची आठवण व्हावी ! किती मानवी लक्षण !

रविवार २७ जुलै १९३०

तुरुंगात दर पंधरा दिवसांत रविवारी कैद्याचे वजन मोजून त्याच्या इतिहासाच्या पुस्तकात ते नमूद करीत असतात. गेल्या २।। महिन्यात माझे सारखे वजन कमी होत होते. आलो त्यावेळी १५६ पौंड होते, ते मागील पंधरवड्यात १४६ पौंडावर आले. आज ह्याच पंधरवड्यात १५० पौंड झाले हे पाहून मला आनंदापेक्षा आश्चर्यच अधिक वाटू लागले. वरील कांद्याच्या मेजवानीमुळे तर हा फरक झाला नसावा ना ! मात्र आज वजन मापण्याचे नवीन येत्र आणिले होते, त्याचा तर हा प्रताप नसेल ना ?

सोमवार २८ जुलै १९३०

दर शुक्रवारी सुपरिंटेंडेंट तपासणीस आम्हा सर्वांकडे येत असतात. शिवाय मध्ये कधी तरी येत असतात. आज तसे ते व जेलर मि. क्वीन पाहण्यास आले होते.

अलीकडे माझी धार्मिक वर्तमानपत्रे 1) Indian Messenger २) सुबोध पत्रिका 3) Inquirer 4) Xian Register मला मिळावी अशी परवानगी असता, ती अलीकडे फारच थोडी मिळतात. सुबोध पत्रिका तर कधीच मिळाली नाही. Indian Messenger दोनच प्रती मिळाल्या. लंडनचे Inquirer ही अलीकडे दोन आठवडे मिळाले. म्हणून आज सुपरिंटेंडेंटना विचारले. सुपरिंटेंडेंट Major Martin, I. M. S. फार चांगले सभ्य गृहस्थ आहेत. त्यांनी आपल्यास काही माहीत नाही असे सांगितले. इतक्यात जेलर मि. क्वीन पुढे आले, ते म्हणाले की ह्या पत्रांतून राजकारण असते म्हणून ते दिले नाही. मी म्हटले, ह्या कारणावरून जर पत्रे मला द्यावयाची नसली तर निदान ती माझ्या खर्चाने का होईनात माझे घरी परत पाठवावीत. मध्येच गहाळ होऊ नयेत.

आज सुपरिंटेंडेंटनी मला कांदा एक रोजचे जेवणांत देण्यास परवानगी दिली !

मंगळवार २९ जुलै १९३०

जुलै १ तारखे मंगळवारी रा. भास्करराव जाधवं मला भेटावयाला आले. स्वतः सुपरिंटेंडेंटनी मला ह्या भेटीसाठी ऑफिसात बोलावले. अर्थात चहुकडे गडबड झाली. सुपरिंटेंडेंटनी मला फार चांगल्या रीतीने वागविले.[१०]

ह्या भेटीत मला सुपरिंटेंडेंटकडून कळले की दर मंगळवारी येथे एक कॅथोलिक उपासना होत असते. पुढच्या मंगळवारपासून ह्या उपासनेस हाजर राहण्यास मला परवानगी मिळाली.

आषाढात कर्नाटकात बहुजन समाजात गुळ्ळवाची पूजा आणि श्रावणात ब्राह्मणांत दर मंगळवारी मंगळागौरीची पूजा होत असते. मी विनोदाने ह्या उपासनेस मंगळागौर म्हणत असतो. कारण ब्राह्मणाचे संस्कृत जसे मुलींना समजत नाही, त्याप्रमाणे उपासनेतील सर्व विधी व प्रार्थना लॅटीनमधल्या मला समजत नाहीत. तथापि कॅथॉलिक मास (Mass) म्हणजे ख्रिस्ताचा आत्मयज्ञ म्हणजे काय ह्या उपासनेतील तंत्रावरून प्रत्यक्ष कळले. आजपर्यंत चार मंगळवार झाले.

दर मंगळावरी रोमन कॅथॉलिक पाद्री खडकीहून ह्या उपासनेस मुद्दाम येतात. आज त्यांनी त्यांचे नाव दिले.

Rev. John Lauder S. J.

R. C. Chaplain St. Ignatius Church

Opp. R. A. Officers Mess.

Burr Road, Khirkee

असा त्यांनी आपला पत्ता दिला. हे आयरिश आहेत. उपासना एका कैद्याच्या लहानशा खोलीत होते. सुमारे २५-३० युरेजियन व नेटिव्ह ख्रिस्ती कैदी जमतात. अर्थात सर्व कॅथॉलिकच. मीच एकटा विक्षिप्त ब्राह्य ! उपदेश १०-१२ मिनिटे. बाकी सर्व विधीचाच अवडंबर असतो. भजन किंवा गाणे मुळीच नाही. सर्व लॅटीन असल्यामुळे गुडघे टेकून बराच वेळ राहण्यापलिकडे मंडळीना काहीच करावयाचे नसते ! प्रभू येशूचे शेवटचे भोजनाशी नक्कल तीच तीच नेहमी होते. भाकरी माझे शरीर व दारू माझे रक्त हेच माझे स्मारक समजा, ही येशूची आज्ञा अक्षरश: खरी करून दाखविली जाते ! हा मानवी स्वभावाचा चमत्कारच म्हणावयाचा ! !

दुसरीकडे दर सोमवारी एक चर्च ऑफ इंग्लंडची अशीच उपासना होत असते. पण त्या वॉर्डमध्येच महात्मा गांधी असल्याने बाहेरच्या कोणालाही जाता येत नाही असे Mr. रॉजर डेप्युटी जेलरने मला सांगितले !

ता. २ ऑगस्ट १९३० शनिवार

लिहावयाचे सामान मिळाले म्हणून दिव्याची जरूरी लागली. म्हणून ही B Class च्या वॉर्डमधील खोली मागितली. एक आठवडा रात्री मी लिहीत असे. पण येथे आल्यापासून कामाचे तास वाढले. पूर्वीच्या वॉर्डमध्ये आम्ही आपल्या सवडीप्रमाणे रोज सुमारे १ पौंड दोन औंस काथ्या वळीत असू. येथे असा नियम दिसला, सकाळी ७ पासून तिसरे प्रहरी ३ पर्यंत काम करीत बसलेच पाहिजे. मध्यंतरी ९ पासून १०।। पर्यंत आंघोळीला व जेवणाला मोकळीक असे. एकंदरीत ६।। तासपर्यंत काम केलेच पाहिजे. १ पौंड २ औंसच जरी काथ्या वळला तरी इतके तास रोज ८ दिवसपर्यंत बसून पुन: ५ वाजता खोलीत कोंडल्यावर रात्री ९ पर्यंत वाचन व लेखन करीत होतो. ह्यामुळे काल रात्री मला फारच थकवा व थोडा ताप आला. रोज १०।। तास काम केल्याने आज तीन चार दिवस फार शीण आला. आज सकाळी डॉक्टरांनी टॉनिक दोन दिवसाकरिता दिले आहे ! (पानाच्या वरच्या जागेत पुढील वाक्य लिहिले आहे : टॉनिकचे (लोहभस्म) औषध डॉ. सय्यदनी आज सुरू केले.--- संपादक)

परवा ३१ जुलै गुरूवारी नेहमीप्रमाणे सुपरिंटेंडेंटसाहेबाची तपासणी झाली. ही सकाळी ६ वाजण्याचे वेळी होते. त्यावेळी सुपरिंटेंडेंटबरोबर असिस्टंट सुपरिंटेंडेंट, जेलर, त्यांचा एक लास्ट असिस्टंट जेलर, २ पोलीस, ४ वॉर्डर असा लवाजमा येतो. प्रत्येक खोलीपुढे (मेजर मार्टिन, I. M. S. हे सुपरिंटेंडेंटचे नाव) एक मिनिट फार तर उभे राहतात. त्याचे आत काही सांगावयाचे अगर मागावयाचे असते. थोडक्यात ते दाद घेतात. सुपरिंटेंडेंट गंभीर चांगले माणूस आहेत. माझी धार्मिक वर्तमानपत्रे सुबोधपत्रिका, Indian Messenger, Inquirer, Xian Register ही मला घरून दर आठवड्याला मिळण्याची परवानगी मिळाली आहे. पण अलीकडे ही पत्रे मला मिळत नव्हती पत्रिका तर कधीच मिळाली नाही. कारण ती घरीच काही दिवस बंद झाली होती, असे ऐकले. Indian Messenger तीन अंक व Inquirer ७/८ अंक मिळाला. Xain Register मात्र परवापर्यंत मिळत होता. राजकीय मजकूर काही पत्रात येतो म्हणून देण्यात येत नाही, असे मला जेलरसाहेबांनी सुपरिंटेंडेंडसो. समक्ष सांगितले. जर द्यावयाची नसल्यास ही पत्रे माझे घरी तशीच परत करावीत, असे मी सुपरिंटेंडेंडसाहेबांस कळविले. त्यावर मला Xian Register हेही पत्र मिळाले नाही !

विजेचा दिवा निदान ९।। पर्यंत असावा अशी सुपरिंटेंडेंटची आज्ञा आहे. पण वॉर्डर नवाचे पुढे जागण्यास कंटाळतात. म्हणून ९ लाच सर्व खोलीतील दिवे बंद होतात. परवा ही गोष्ट मार्टिन सो. ना सांगूनही काही इलाज झाला नाही !

ता. २ ऑगष्ट १९३० शनिवार

आज टॉनिक घेतल्यामुळे लिहिण्याला किंचित उत्साह वाटतो म्हणून हे लिहित आहे. सकाळी ६ ला उठल्यापसून तो पुनः सायंकाळी ५ ला खोलीत कोंडीतोंपर्यंत मिळत नाही. मग लिहिण्याची गोष्ट दूरच राहिली !

रविवार ता. ऑगष्ट १९३०

मागचे रविवारी माझे वजन वाढलेले जरी डॉक्टरनी सांगितले (४ पौंड वाढलेले) तरी माझी अशक्तता वाढत आहे, हे पाहून तुरुंगवास मला जाणवू लागला आहे, माझी प्रकृती ढासळत आहे, असे दिसते. मी तसे घरी कळविले नाही. तरी प्रकृतीवर कायमचा परिणाम होईल की काय न कळे, बसल्या जागेवरून उठताना त्रास पडतो. पाण्याचे टंबरेल एका हाताने उचलून थोडा वेळ धरवत नाही. रोज नियमाने १-२ तास लिहवत नाही. ही लक्षणे बरी नव्हत ! असो. तरी ह्याचा माझ्या मनावर परिणाम होऊ नये म्हणून मी वाचण्यात व लिहिण्यात काळ घालवित आहे.

बाळूकाका कानीटकरांनी Hachinson's History of Nations हे सुंदर नियतकालिक वाचावयास दिले आहे. त्या प्रत्येक पानात भरपूर सुंदर चित्रे आहेत. इतिहास वाचून बरे वाटते.

मंगळवार ता. ५ ऑगस्ट १९३०

आज सकाळी कॅथॉलिक उपासनेला गेलो. फादर लॉडरनी सेंट इग्नॅशस लायलॉ ह्यांची माहिती उपदेशात सांगितली. कारण त्यांचे खडकीचे देऊळ इग्नेशसच्या नावाने चालते. आणि ही तुरुंगातील उपासक मंडळी त्यांच्या पॅरिशमधली (पंचक्रोशीतली) आहे.

आजही मला बरे वाटत नव्हते. अशक्तता व कणकण वाटत होती. तरी पण नित्याप्रमाणे काथ्या वळण्याचे काम करावे लागलेच !

काल रात्री मी लिहित असता विजेचा दिवा एकदम मालविला. खोलीत अंधार पडला. मी चाचपडत उठलो तो माझ्या काचेच्या तुकड्यावर पाय पडेल म्हणून चाचपडत वेचावे लागले. कानीटकरांनी दिलेल्या मोठ्या पुस्तकावर शाईचे मोठाले डाग पडले. असे हे तुरुंगातले सोहाळे !

बुधवार ता. ६ ऑगस्ट १९३०

ता. १२ मे १९३० सोमवारी मी येरवडा तुरुंगात आलो. ता. २२ मेपर्यंत मला सी क्लासातच ठेवण्यात आले. तेथे माझी धार्मिक पुस्तके गीता, धर्मपद, बायबल, हीच तेवढी वाचावयाला मिळत. पुढे ता. २२ जूनपासून मी बी क्लासमध्ये आल्यावर माझा वार्ड बदलला. म्हणजे अंधारीतील ४ थ्या मधून मी तिसऱ्यामध्ये आलो. येथे घरून माझे Life's Basis & Life's Ideals हे प्रो. ऑयकेनचे पुस्तक वाचावयास मिळाले. शिवाय येथील लायब्ररीतील कांदबऱ्या व तुकारामाची गाथा वगैरे पुस्तके वाचावयाला मिळत.

सकाळी ७ पासून काथ्याची तरटे उकलण्याचे काम करावे लागे. ९ पासून १०।। वाजेपर्यंत स्नानाला व जेवणाला वेळ मिळे. मग पुन: काथ्याचे काम दोन प्रहरी वाजेपर्यंत करावे लागे. त्यापुढे वाचावयास वेळ मिळे. रात्री ७ वाजता अंधार पडे. ह्या तिसऱ्या किंवा चौथ्या वार्डात दिव्याची सोय मुळीच नसे. पहिल्या व दुसऱ्या वार्डातल्या १५ खोल्यातून माझे अगोदर आलेले जे बी क्लासचे राजकैदी असत त्यांना सायंकाळी ७ पासून ९ पर्यंत विजेच्या दिव्याचा प्रकाश मिळे. पण मला तेथे जागा नव्हती म्हणून ता. २४ जुलै गुरूवारपर्यंत ह्या अंधारी खोलीतच रात्री काढाव्या लागल्या. ह्या "अंधारी" --- Solitary असेच नाव आहे. दिवसा उजेड आणि हवा उत्तम असते. पूर्वी तीही नसावी म्हणून पूर्वीचेच नाव "अंधारी" हे अद्यापि चालू आहे.

ता. २१ जुलै किंवा ता. २४ जुलैपर्यंत सुमारे २।। महिने मला येथे वाचणे काही म्हणण्यासारखे करता आले नाही. लिहिण्याचे तर अशक्यच. त्यानंतर लिहिण्याचे सामान माझे घरुन मिळाले, व दिव्याची खोली मिळाली म्हणून आता ही माझी रोजनिशी व दुसऱ्या एक वहीत माझ्या आयुष्यातल्या आठवणी मी लिहू लागलो आहे.

मी आल्यापासून ही अशी सोय व्हावी म्हणून मी सारखा मागत होतो. तो आता कोठेशी दाद लागली. तरी पण दिवे ७ वाजल्याबरोबर एकदम लागत नाहीत. काळोख तर पडू लागतोच. अर्धा पाव तास वाट पहावी लागते. १० वाजेपर्यंत प्रकाश असावा असा नियम आहे. ९।। वाजेपर्यंत तरी असावाच असे सुपरिंटेंडंटने मला स्वत: सांगितले. तरी ९ वाजताच दिवे बंद होतात ! गेल्या गुरुवारी ही तक्रार मी केली, पण अद्यापि ९चे पुढे प्रकाश मिळत नाही. इतकेच नव्हे, ९चे अगोदरच केव्हा तरी एकदम दिवे बंद होऊन, गेल्या सोमवारी तर पुढे (म्हणजे मंगळवारच्या रोजनिशीत) लिहिल्याप्रमाणे हाल होतात ! तथापि इतके तरी लिहिणे वाचणे होते ह्यात मोठा आनंद मानून आहे !

अंधारी (Solitary) म्हणून एरवड्याच्या तुरुंगाचा एक भाग आहे. तो मुख्य दरवाजा ओलांडल्याबरोबरच लागतो. अंधारी हे नाव ऐकूनच शहारे यावयाचे. पण नावाप्रमाणे हा भाग

मुळीच भयंकर नाही. पूर्वी असेल कदाचित. बी क्लासच्या सर्व कैद्यांची राहण्याची व्यवस्था अंधारी नावाच्या ह्या चार वार्ड उर्फ चौकांतच केली आहे. नंबर २ च्या दालनात मी हल्ली आहे. हे दालन ह्या चारीमध्ये सुंदर व एकांत आहे. येथे आल्यापासून मी रमलो आहे. ह्या दालनात सात खोल्या आहेत. त्यात पाच गुजराथी व नगरचे नानासो. देवचके व मी असे दोघे मराठे आहो. पुढच्या दालनात बाळूकाका कानीटकर व इतर सहा मंडळी आहेत. पुढील सात कैदी बंधूंना स्नानासाठी व शौच्यासाठी आमच्याच दालनात यावे लागते. त्यामुळे आम्हा १४ जणांची भेट वरचेवर होते. (पुढील पानावर नावे आहेत).

सुमारे १००० चौरस फुटांचे खुले आंगण आमच्या दालनापुढे आहे. शेवटची नंबर ७ची खोली माझी निवांत आहे ! मनमुराद फिरावयाला मिळते. विशेष हे की ह्या आंगणात तीन झाडे-एक कलमी आंब्यांचे अगदी ठेंगणे, गर्द हिरव्या पालवीने झाकून गेलेले; दुसऱ्या टोकाला एक त्याहून उंच पण हिरव्यागार पानांनी व शाखांनी वाकलेले लिंबाचे झाड असून त्यांच्या मधोमध त्याच ओळीत एक लिंबाऱ्याच्या झाडाचे एक उंच खोड वरती शेंड्याला मात्र अगदी थोडी पालवी-अशी ही तीन नमुनेदार झाडे आमच्या घरातील सौ. रूक्मीणीबाई, माई व जनाक्का ह्यांची वेळोवेळी अनुक्रमाने आठवण करून देणारी आहेत. कलमी आंब्याच्या झाडाखाली नेहमी थंड पाण्याने भरलेले घडे गर्द सावलीत ठेविले असतात. ते आक्काच्या ४ मुलांची (च्छबूसुद्धा) आठवण देतात. माईच्या झाडाखाली एक अगदीच नूतन जन्मलेले लिंबाचे रोप तिच्या तुरुंगीची[१९] आठवण करते. माईच्या सावलीत मी वाचावयास बसतो. अक्का इतकी ठेंगणी आहे की उभा राहिलो असता तिच्या फांद्या व पाने माझ्या खांद्याखाली येतात. जनाक्का रोडकी, मध्ये वाकलेली, पाने नसल्यामुळे उन्हात उभी आहे. म्हणून तिलाच रोज प्रेमाने पाणी घालतो ! ह्याप्रमाणे मी दालनाला घरच समजून सुखात काळ ढकलीत बसलो आहे !

गुरुवार ता. ७ ऑगस्ट १९३०

आज आठवड्याची तपासणी झाली. मला आज अशक्तता वाटत होती. टॉनिकचे औषध चालूच आहे. सुपरिंटेंडंना "काम फार पडते. सकाळी ७ पासून तिसरे प्रहरी तीनपर्यंत बसणे फार होते," म्हणून सांगितले. आज नवीन जास्त भांडी मिळाली. एक ॲल्युमिनम ताट, एक गडवा, आणि तोंड धुण्याला एक मोठे तस्त (बसीन) इतकी मिळाली. इतर आढ्यतेने सांगू लागले की आपल्याजवळ पंचपात्रे आहेत. मी त्याहून आढ्यतेने सांगे की मी षटपात्री आहे. कारण माझेजवळ एक मातीचे परळ हॉस्पिटलमध्ये मिळालेले होते !

शनिवार ता. ९ ऑगस्ट १९३०

आज श्रावणी पौर्णिमा (नारळी पौर्णिमा) म्हणून आज आमचे काम बंद होते. सुट्टी होती. पण रविवारप्रमाणे आज आम्हाला तिसरे १ वाजता जेवण आणि दोन वाजताच कोंडण्यात आले. अशा सुट्टीबद्दल हसावे की रडावे समजत नाही ! सणाचे दिवशी जेवणात काहीच फरक नसतो. ही सुट्टीदेखील आमच्यासाठी नसतेच मुळी. पोलीस व वरच्या अधिकाऱ्यासाठी असते.

मंगळवार ता. १२ ऑगस्ट १९३०

सकाळी कॅथेलिक उपासना आटपून परत वॉर्डमध्ये येतो तो आम्हा सर्व बी क्लासवाल्यांची तेथून उचलबांगडी दुसरीकडे झाली होती. कारण काल मध्यान्ह रात्री कोणी प्रतिष्ठित पाहुणे A class चे कैदी-हे बहुतकरून फारच मोठे बादशाही कैदी कोण असावेत हे कळले- आमचे तेथे आल्याने त्यांना जागा पाहिजे होती. आमच्या सहवासी मंडळीना मी येण्यापूर्वीच दुसरीकडे नेले होते. चहुकडे शुक-शुकाट. मला वाटले सर्वांना सोडून दिले. एक सेकंदभर आनंदाचा पूर आला ! लगेच आम्हाला नं. ३ सर्कलमध्ये नं. १ चे बराकीत नेऊन एकाच विस्तीर्ण बराकीत आम्हा चौदा जणांची मांडणी झाली. आज ह्या धांदलीत काम देण्यात आले नाही. सर्वांची एकाच मोठ्या दालनात पथारी पडल्याने बोलण्यास, एकत्र बसण्या-उठण्यास पूर्ण स्वराज्य आजच मिळाले.

बुधवार ता. १३ ऑगस्ट १९३०

आज सायंकाळी बराच वेळ स्वामी सहजानंद ह्यांच्याशी धर्मपर चर्चा झाली. मुख्य विषय वैराग्य हा होता. आम्ही चौदाजण आमच्या १/२ वार्डातून येथे सर्कलमध्ये आलो होतो. त्यांची नावें[१२] :-

१ बाळूकाका कानीटकर (गजानन नारायण)

२ पांडुरंग दत्तात्रय खाडीलकर, वाई.

३ रामभाऊ बळवंत हिरे, अहमदनगर.

४ त्रिंबक अण्णाजी देवचके, अहमदनगर.

५ भीमभाई अखुभाई वशी, बारडोली स्वराज्य आश्रम.

६ भिखाभाई ईश्वरभाई पटेल.

७ च्छोटालाल घेलाभाई गांधी, अंकलेश्वर, भडोच.

८ केशवलाल गणेशजी पटेल, बारडोली.

९ ठाकूरलाल दयाराम ठाकूर, भडोच.

१० फुलसिंहजी भारतसिंगजी दाभि, विनयमंदीर, सुणाव, खेडा Via आनंद.

११ नगीनलाल नारायणदास पारख, गुजराथ पीठ, अहमदाबाद.

१२ हिराभाई नरसीभाई पटेल, करणसद्, खेडा Dist.

१३ स्वामी सहजानंद भारती, नावूर पोस्ट पुणतांबे, अहमदनगर.

१४ वि. रा. शिंदे.

चतुर्भुज अमीन बिरसद, खेडा Dist.

नरसीभाई ईश्वरभाई पटेल, पाटीदार आश्रम, आनंद.

ही सर्वजण आम्ही ह्या चर्चेच्या वेळी एकत्र झालो. काही मंडळीने अगदी हळू स्वरात भजन केले. नंतर मीही ह्या भजनात सामील झालो. रामभाऊ ह्यांनी मला एक अभंग म्हणावयास सांगितला. तो म्हणून मी लहानशी प्रार्थना केली. समाधान झाले.

गुरुवार ता. १४ ऑगस्ट १९३०

आज सायंकाळी आम्हा वरील चौदा जणांना कोंडल्यावर माझे त्यांच्यापुढे भाषाशास्त्रावर एक तास व्याख्यान झाले. त्यांना ते सर्वांना फार आवडलेसे ते म्हणाले, स्वामी स्वात्मानंदजीनी[१३] माझी फार स्तुती केली. ह्यानंतर भजन होऊन नंतर मी हिंदीमध्ये प्रार्थना केली. रामभाऊ हिरे ह्यांना माझे भजन व प्रार्थना फार आवडतात असे ते व इतर मंडळी वारंवार म्हणते.

शनिवार ता. १६ ऑगस्ट १९३०

जुन्या पंचांगाप्रमाणे आज कृष्णाष्टमी आल्याने आम्हाला सुट्टी होती. काही लोकांनी फराळाचे मिळेल काय म्हणून मि. रॉजर्सला विचारले. सुपरिंटेंडंटला विचारून पाहतो असे म्हणाले. काल संध्याकाळी फार तर रताळी मिळतील म्हणाले (होते). शेवटी तीही न मिळाल्यामुळे आज नेहमीचेच अन्न मिळाल !!

आजचा दिवस धार्मिक चर्चा, प्रवचन, भजन (करण्यात) घालवावा, असा काहींचा अभिप्राय कालच झालेला होता. पण सकाळी एक* गोष्ट घडून आल्यामुळे आमची मने तिच्यासंबंधाने व्याकूळ झाली. शेवटी सायंकाळी आम्ही नित्याच्या भजन प्रार्थनेस जमलो. उपासना चालविणेचे काम मजकडे असते. त्यात मी आज १० मिनिटे प्रवचन केले. आणि सुचविले की जे धर्मसाधन आज झाले नाही ते आम्ही उद्या तरी करू या. उद्या जरी काही आपत्ती आमचेवर आजच्या प्रकरणातून आली नाही तरी उद्या सकाळ कपडे धुण्यात व दोन प्रहर Illustrated Weekly वर्तमानपत्र वाचण्यात जाणार. मग पुढे जो आम्ही प्रोग्राम केला आहे तो कसा काय पार पडेल ह्याची शंकाच आहे. तुरुंगातले मनाचे स्वस्थ आळवावरच्या पाण्याहूनही किती तरी अधिक चंचल ! हे तुरुंगात आल्याविना कळत नाही !

रविवार ता. १७ ऑगस्ट १९३०

आज सकाळी आम्हाला कुलूपे उघडून बाहेर घेतल्यावर समोरील बराकीच्या व्हरांड्यात बसविण्यात आले. व ज्या बराकीत आमची निजण्याची सोय केली होती तिला कुलूप लावण्यात आले. कारण तिच्यामागील व्हरांड्यात ५-६ चक्क्या होत्या, व त्यावर १५-२० मुलांना दळावयास लावले होते. ही मुले सर्व आमच्या ओळखीचे राजकीय कैदी असल्याने आमचा व त्यांचा निकट संबंध येऊ नये म्हणून असे करण्यात आले. सकाळी मि. रॉजर्स B Class वरचा डेप्युटी जेलर मला भेटला. हा माझ्या फार ओळखीचा झाला होता. व सलगीही फार झाली होती. काल घडलेल्या प्रकारासंबंधाने माझे व त्याचे बरेच खासगी बोलणे झाले. शेवटी ह्या संभाषणाने हे प्रकरण मिटेल असे वाटले.

---

*ही गोष्ट ही की रा. बाळूकाका कानीटकर ह्यांनी चक्कीवरील तरुण व लहान स्वयंसेवकांना फार मार बसतो ह्याबद्दल सुपरिंटेंडंटची भेट मागितली. त्यामुळे जेलर मि. क्वीन ह्यांना राग येऊन, बाळूकाकांना निराळ्या खोलीत कोंडण्यात येईल अशी धमकी मिळाली. दुसरे दिवशी डेप्युटी जेलर रॉजर्स मजकडे आल्यावर त्यांना मी स्पष्ट सांगितले की बाळूकाकांना ही धमकी नसून ती आम्हा सगळ्यांना आहे. ह्याचा परिणाम नीट होणार नाही. येवढ्यावरच हे प्रकरण मिटले.

(तांबड्या शाईतील (हा) शेरा ५ सपटंबर १९३२ रोजी लिहिला. वि. रा. शिंदे)

आज व काल सुटी असल्याने २ वाजता सुटीच्या नियमाप्रमाणे आम्हाला ह्याच बराकीत कोंडण्यात आले. कारण सुटीच्या दिवशी १२ वाजताच सी क्लासची कामे आटोपतात. म्हणून आम्हाला बराक मोकळी झाली. सायंकाळी ३।। वाजता काल ठरलेला प्रोग्राम सुरू झाला. नेहमीप्रमाणे सर्व मंडळी माझ्या हांतरुणाभोवती जमली. माझ्या हांतरुणाजवळच स्वामी सहजानंदांचे हांतरुण होते. प्रथम च्छोटालाल घेलाभाई गांधी (अंकलेश्वर, भडोच) ह्यांचे जैन धर्मावर सुमारे १ तासभर व्याख्यान झाले. हे स्वत: जैन आहेत. नंतर अर्धा तास विश्रांती झाल्यावर स्वामी सहजानंदाचे नामस्मरण ह्यावर व्याख्यान झाले. खरे पाहता हे व्याख्यान वेदांत किंवा अद्वैवादावरच होते. ते काहीजणांना आवडले. नेहमीप्रमाणे मीच अध्यक्ष ठरलेला होतो. तुलनात्मक धर्मावर माझे व्याख्यान व्हावयाचे. पण मला फार कणकण वाटत होती. क्वीनीन फार (झाल्याने ?) कान बहिरे झाले होते. अध्यक्षस्थानी म्हणजे माझे गादीवर कांबळे पांघरून मी अर्धा कललेलाच पडलो होतो. माझे व्याख्यान तहकूब केले. पुढे नित्याची उपासना झाली. ती मीच चालविली. मग आम्ही निजलो.

सोमवार ता. १८ ऑगस्ट १९३०

सकाळी ११ वाजता पुन: आम्हाला पूर्वस्थळी म्हणजे अंधारीत वॉर्ड नं. १ व दोनमध्ये आणिले. येथे पंडित मोतीलाल व जवाहरलाल नेहरूंना ठेवण्यात आले होते. त्यांना परत नेल्यामुळे आम्हाला येथे पुन: आणिले. आम्ही सर्कल नंबर ३ बराक नंबर १ मध्ये होतो. तेथून येताना काही ढेकूण आणिले होते. एकंदरीत गेले सात दिवस आम्ही एकत्र सुखात घालविले. ही बराक ५२ लोकांसाठी होती. तेथे आम्ही १४ जण होतो. पण तुरुंगात अलीकडे गर्दी झाल्यामुळे ह्याच बराकीत आम्ही येण्यापूर्वी ८५ सी क्लासचे कैदी होते. हा बी आणि सी क्लासमध्ये फरक. आम्ही येथे गेल्या (वर) दुसरे दिवशीच सुपरिंटेंडंट तपासावयाला आले. ढेकूण फार आहेत. असे सांगितल्याबरोबर ह्या नंबर १ च्या बराकीला उत्तम रीतीने चुना लावून साफसफाई करण्यात आली !

ह्या बराकीतून आम्हाला आळंदीचे वाटेवरील दोन डोंगर पावसाने हिरवेगार झालेले दिसत होते. ह्या तीन महिन्यात हा सृष्टीचा देखावा नवीनच पाहून फार आनंद होत असे. काही असो, आम्ही पूर्वीच्या जागी आलो तेव्हा तीच आम्हाला आवडते असे सर्वांच्या तोंडून आले !

आज घरच्या मंडळीला भेटीला बोलावण्या चि. जनाक्काला एक पत्र लिहिले. येताना एक दौत, साबणाची वडी, सुलभ संगीताची नवी प्रत मागितली.

मंगळवार ता. १९ ऑगस्ट १९३०

नित्याप्रमाणे कॅथॅलिक उपासनेला सकाळी गेलो. शेवटी फादर लॉडर म्हणाले, "तुम्ही पुढच्या मंगळवारी येणार नाही कदाचित ? कारण काही तरी समेट येत्या शनिवारच्या आत होईल असे पत्रे म्हणतात. तुम्ही सुटाल."

(ह्या आशेची पुढच्या रविवारचा Weekly पाहून निराशा झाली ! पण ता. ३१ रविवारचा अंक पाहून पुन: आशा वाटू लागली.)

गुरुवार ता. २१ ऑगष्ट १९३०

नित्याप्रमाणे आज गुरुवारच्या साप्ताहिक तपासणीसाठी मेजर मार्टिन सुपरिंटेंडंट येऊन गेले. मी येथे आल्यापासून माझे वजन एकसारखे किती कमी होत आहे हे माझ्या History Ticket बुकातून वजनाचे आकडे मार्टिन सो. ना दाखविले. तुरुंगात आलो तेव्हा माझे वजन १५६ पौंड भरले. दर पंधरावड्याला रविवारी सकाळी आमचे वजन होत असते. ता. १०-८-३० रोजी माझे वजन १४४ पौंड भरले. तीन महिन्यात माझे १२ पौंड वजन कमी झाले ! येत्या रविवारी किती वजन भरते हे पाहून पुनः सांगण्यास सुपरिंटेंडंटने सांगितले. मी येथे आल्यापासून जून महिन्याचे शेवटचे आठवड्यात आमांशाने आजारी पडलो. त्यातच मला (गौट) संधीवाताचा विकार झाल्याचे कळले. माझ्या उजव्या पायाची पहिली तीनी बोटे नखांजवळ पाळीपाळीने सुजून दुखू लागली. हा आजार मला पूर्वी कधी झाला नव्हता. मला हॉस्पिटलमध्ये सुमारे आठ दिवस ठेवण्यात आले होते.

ता. १४ ऑगस्ट शनिवारी चि. प्रताप, रा. पाताडे[१६], सुभेदार घाटगे[१७] व बाबूराव जेधे भेटून गेले. त्यावेळी मी हॉस्पिटलमध्ये होतो. भेटावयाला ऑफिसमध्ये जावयाला शक्ती नव्हती. काठी टेकीत कसा तरी गेलो. परत आल्याबरोबर अंगात ताप भरला. पायाचे बोट रात्रभर ठणकून फारच त्रास झाला ! प्रकृतीची काळजी वाटू लागली. बोटाला रोज तीनचारदा शेकण्यात येत होते. माझा बडदाशी, काळजी घेण्यास ठेवलेले मनुष्य फारच भला माणूस होता. तो फार जपत असे. दुसरे दिवशी सुजलेले बोट फुटले. पू गेल्यामुळे आराम पडला.

ता. ९ सोमवारी (जून) मला हॉस्पिटलमध्ये ठेविले. ता. १९ जून गुरुवारी मला हॉस्पिटलमधून पुनः अंधारी नंबर ३ वार्डमध्ये परत आणिले. ता. १ जुलै रोजी मला भास्कर जाधव भेटावयास आले ! (पुढील पानावर)

शुक्रवार ता. २२ ऑगष्ट १९३०

तेव्हापासून प्रकृती नादुरुस्तच आहे.

जुलैचे शेवटी पुनः थोडासा आमांश किंवा अतिसाराचा उपद्रव झाला. तेव्हापासून सारखी अशक्तता वाढत आहे. हांतरुणात पडण्यासारखा आजारी नाही, नेहमीप्रमाो खातो, पितो, कामही पण करितो. मात्र एक दिवसआड रात्री कणकण येते. आतापर्यंत तीन आठवडे टॉनिकची बाटली (Iron) चालू आहे. डॉ. (Sayyad) नेहमी रोज सकाळी सर्वालाच पाहून जातात. मधूनमधून क्विनीन घेतो. पण उत्साह किंवा शक्ती काही आल्याप्रमाणे वाटत नाही. हांतरुणात निजलो असता हातपाय मोडून आल्यासारखे होतात. रोज काथ्या वळण्याचे काम ६।। तास करावे लागल्यामुळे हाताची बोटे दुखतात. पडल्या जागेवरून उठतानाही श्रम होतात. हा प्रताप वार्धक्याचा की तुरुंगाचा ?

शुक्रवार ता. २२ ऑगष्ट १९३०

आज माझी नात चि. प्रतापाची पहिली मुलगी जन्मून दोन महिने झाले म्हणून मी तिचेसाठी प्रार्थना केली. तिचे मी विनोदाने तुरुंगी हे नाव ठेविले आहे ! ती सुखी असो !!

शनिवार ता. २३ ऑगष्ट १९३०

आज सायंकाळी प्रतापराव मला भेटावयाला आला. बरोबर माधवराव केळकर[१८] गोविंदराव शासने आले. विशेषत: मला अत्यंत आवडणाऱ्या अहल्याबाई शिंदे ह्या आलेल्या पाहून मला गहीवर आला. चि. केशव[१९], हिरू, व शिवाजी ह्यांना त्यांनी आणले होते. पण त्यांना आत मजपर्यंत येण्याची परवानगी मिळाली नाही ! कारण चारच माणसे एका भेटीत भेटू शकतात. मी दारात उभा राहून ह्या लहानग्यांना पाहू शकलो असतो व तीही मला पाहू शकली असती.पण बऱ्याच गोष्टी बोलावयाच्या होत्या. २० मिनिटे संपली म्हणून जेलर मि. एर्मने तगादा चालविला. गर्दीत मुले बाहेर मोटारीत तशीच राहिली !

अहल्याबाई ऊर्फ मैनाबाई साळुंखे ह्यांना मी ता. २० ऑगष्ट रोजी रोजनिशीत काय त्यांचेसंबंधी लिहिले ते गर्दीत एक दोन वाक्यांत सांगितले. ते त्यांना समजलेही नसेल. गणपतरावही आले असते तर किती बरे !

मला ता. १२ मे १९३० रोजी पकडले व त्याच रोजी संध्याकाळी ह्या तुरुंगात आणिले. त्याचे आदले दिवशी रविवारी मी शिवाजी शाळेत कौटुंबिक उपासना चालविली. रा. गणपतराव शिंदे त्याच दिवशी मुंबईस गेले होते, पण अहल्याबाई आल्या होत्या. संध्याकाळपर्यंत आमचे घरी राहिल्या. जाताना त्या मजकडे आल्या व नमस्कार करून "ह्यावर आता भेट केव्हा" हा अर्थपूर्ण प्रश्न केला. मला पकडण्याची गावात दाट वर्दता होती. म्हणून पुन: भेटीचा हा प्रश्न होता की काय, त्यावेळी कळले नाही. पण दुसरेच दिवशी मला पकडले ! मी रविवारी सायंकाळी कोणास भेटावयास, फार थकल्यामुळे, कोठे गेलो नाही. गणपतरावांची भेट झालीच नाही.

वरील प्रसंगाचे स्मरण आज अहल्याबाईंना दिले, व विनोदाने म्हटले, अहल्याबाई मला तुमचा शाप बाधला काय ? त्या पदराने डोळे पुसू लागल्या, तेव्हा मी विषय बदलला ! त्यांचे मैनाबाई हे नाव सांगावयास विसरलो. घरी तुरुंगीपासून सर्वांचा समाचार घेतला. माईची प्रकृती Aminic म्हणजे रक्ताचा कमी साठ्याची बाधा ऐकून काळजी वाढू लागली. असो. एकंदरीत अशा घरच्या भेटीमुळे सुखापेक्षा हुरहुरच फार वाटते. बहुतेक रात्री पुढे जागरणच होते ! सुखगर्भी दु:ख व दु:खगर्भी सुख ह्याचे रहस्य ते हेच !!

रविवार ता. २४ ऑगष्ट १९३०

दर पंधरवड्याचे आमचे वजन करण्यात आले. मागील पंधरवड्याप्रमाणे आजही माझे वजन १४४ पौंडच भरले. कमी जास्त काही नाही.

आम्हाला तुरुंगात Illustrated Weekly of India हे एकच इंग्रजी चित्राचे साप्ताहिक मिळते. राजकीय मजकूर नसतोच म्हटले तरी चालेल. जी काही थोडी शनिवारची बातमी असते तिचेसाठी आम्ही आठवडाभर लाळ घोटीत टक लावून बसलेले असतो. चालू धर्मयुद्धाचा काही समेट झाल्याची बातमी आज मिळेल अशी आशा होती. पण अद्यापि काहीच निकाल कळत नाही असे वाचून निराशा झाली ! तुरुंगवासापेक्षा आशेच्या व अपेक्षेच्या वेदना असह्य झाल्या आहेत. सुटकेचे दिवस जसे जसे जवळ येतात तशा ह्या वेदना तीव्र होऊ लागल्या आहेत ! ह्यामुळेच वजन कमी होत आहे !!

सोमवार ता. २५ ऑगष्ट १९३०

काल तिसरे प्रहरी माझ्या उजवीकडच्या ओटीत जांघेवरच्या पोटाच्या खालच्या भागात थोडेसे दुखल्यासारखे होऊ लागले. आज सकाळपासून ही कळ जास्त भासू लागली आहे. चालताना थोडे लंगडावे लागते. आज तिसरे प्रहरी वृषणाची उजवी गोटी सुजून बरीच मोठी झालेली आढळली. हात लागल्यावर उजवीकडे दुखते. उद्या बरे वाटले नाही तर डॉक्टरला कळवावे लागेल.

मंगळवार ता. २६ ऑगष्ट १९३०

सकाळी कॅथॅलिक उपासनेला गेलो.

रफ नोट बुक पान ८ वर तेरदाळ देशपांडेकडून आलेले दोन गहाणखत, १ चंद्राबाई भ्रतार सिदरामप्पा पाटील २ कृष्णाबाई मंगसुळी ह्यांनी लिहून दिले ते व सोबतचे पाच कागद ह्यांचा तपशील लिहिला असे अनुक्रमे २००० रु. व ३००० रु.

बुधवार ता. २७ ऑगष्ट १९३० गणेशचतुर्थी

आज अर्धा दिवस सुटी होती. म्हणजे आम्हाला १२ वाजेपर्यंत काम दिले. २।। वाजता जेवण मिळाले. ३ वाजण्याचे पूर्वीच खोलीत कोंडिले.

आज डॉक्टरास प्रकृती दाखविली. त्यांनी नित्याचे औषधात बदल केला. ओटीत जी कळ येत होती ती आज किंचित बरी आहे.

ता. २१ जुलै पासून "माझ्या आयुष्यातील आठवणी आणि अनुभव" हा विस्तृत लेख लिहावयास सुरुवात केली. आजपावेतो सुमारे २०० पाने झाली आहेत. आज थोडी प्रस्तावना लिहिली. ह्याचप्रमाणावर जर लिहीन तर हा ग्रंथ १००० पानावर जाईल.

मी इंग्रजी शाळेत असताना वाचलेले ग्रंथ :

धर्म--- पांडवप्रताप, रामविजय, हरिवि., भक्तवि., गुरुचरित्र, करवीरमहात्म्य, शिवलीलामृत, शनिमाहात्म्य, व्यंकटेशस्तोत्र, गयासुरआख्यान, एकनाथी भागवत, नवनीत.

कांदबऱ्या--- मंजुघोषा, विचित्रपुरी, मदनमंजरी, शृंगारसुंदरी, वसंतकोकिळा, वेशधारी पंजाबी, वेताळपंचविशी, शुकबहात्तरी, बत्तिसपुतळी, अरबी नाइट्स, पंचतंत्र, नारायणराव आणि गोदावरी.

संभाजीचरित्र वाचले, पण शिवाजीचरित्र त्यावेळी झाले नव्हते !

गुरुवार ता. २८ ऑगष्ट १९३०

आज सुपरिटेंडेंटची साप्ताहिक तपासणी झाली. माझ्या हिस्टरी टिकेटमध्ये ता. २१ सप्टंबर १९३० ही तारीख माझ्या सुटकेची संभवनीय तारीख म्हणून लिहिले आहे. हे टिकेट म्हणजे आमच्या तुरुंगातल्या हालहवालीचे तारीखवार दाखल्याचे छापील पुस्तक असते. आज मी सुपरिंटेंडेंटना ह्यावरील तारिखेदिवशी खरेच माझी सुटका होईल काय, विचारले. ते म्हणाले, माझी सुटका ऑक्टोबरच्या मध्याला होईल. सक्तमजुरीच्या कैद्याला दर महिन्याला ४ दिवस माफी असते. नवंबर २१ तारिखेस माझे सहा महिने भरतात. ह्यांतून २४ दिवस वजा करता ता. १८ ऑक्टोबर १९३० ला माझी सुटका व्हावयाला पाहिजे. त्याप्रमाणे हिशेब करून सुपरिंटेंडेंटने सांगितले असावे. पण वरील पुस्तकात उगाच २ महिन्याची माफी का लिहिली ते कळत नाही.

दर शनिवारी आम्हाला एकत्र उपासना करावयाला परवानगी असावी असे मी मि. रॉजर्सना विचारले तर ती मिळत नाही असे जेलरकडून कळले.

शुक्रवार ता. २४ ऑगष्ट १९३०

माझी धार्मिक वर्तमानपत्रे मला वेळेवर पोचत नाहीत. ४ पैकी २ तर मुळीच पोचत नाहीत. रात्रीचा दिवा ९।। पर्यंत आसावयास पाहिजे तो नऊलाच बंद होतो, वगैरे तक्रारी पुष्कळ करून काही इलाज होत नाही, म्हणून मि. रॉजर्स (ची) बरीच कानउघाडणी केली. हा लास्ट जेलर आहे. व बी क्लासची देखरेख ह्याच्याकडे आहे. म्हणून हा रोज आमचेकडे येत असतो. हा आयरिश मनुष्य आहे. ह्याला हिंदी शिकावयाचे आहे. मनुष्य साधाभोळा बरा आहे. ह्याचा माझा बराच परिचय झाला आहे. बराच वेळ माझ्याशी सलगीने बोलत उभा असतो. मी त्याला म्हटले, आमच्या कामाची तू इतकी चौकशी करतोस व तसदी लावतोस, पण आमच्या गरजांचा व तक्रारींचा विचार करीत नाहीस, हे काय ? आमच्या तक्रारीला तू मान देशील तर तुझ्या तक्रारीला आम्ही तरी का मानावे ? तो म्हणतो, अशा सर्व गोष्टी सुपरिंटेंडेंटकडेच आहेत.

आज ह्या स्वारीने मला सांगितले की "विविधवृत्त" हे पत्र आमचे खर्चाने आम्हाला मिळण्याची परवानगी I. G. Inspector of Gaols तुरुंगाच्या मुख्य इन्स्पेक्टरकडून मिळाली आहे! आम्ही येऊन ३/४ महिने झाल्यावर ह्या लहानशा गोष्टीची आता दाद लागते ! तुरुंगात दुप्पट तिप्पट कैद्यांची गर्दी झाल्याने अधिकाऱ्यांना काम फार पडते ही त्यांची कुरकुर असतेच. आजच मी विविधवृत्त पत्र माझ्या खर्चाने मिळावे अशी लेखी मागणी केली आहे.

ता. ३० शनिवार ऑगष्ट १९३०

मि. रॉजर्स म्हणतो की सुपरिंटेंडेंटची माझ्या चिठीवर सही घेऊन मला विविधवृत्त पत्र मिळावयाला ४/६ (*दिवस*) तरी लागतील ! तुरुंगात चार पाच हजारावर कैदी झाल्याने रात्रदिवस काम पडते. आज कामाला काथ्या संपला आहे. जुनी तरटे उकलावयास दिली. त्यात ढेकूण गच्च भरले होते.

ता. ३१ रविवार १९३० ऑगष्ट

आजचा आठवड्याचा टाईम्स वाचून समेटाची आशा आणखी वाटू लागली. गेल्या रविवारी निराशा झाली होती ! जयकरसप्रू मिशन व्हाईसरॉयचा बराच अनुकूल निरोप घेऊन काल आज नेहरूद्वयाला तुरुंगात भेटून लवकरच म. गांधींना पुन: भेटावयाला येथे येणार आहेत.

मंगळवार ता. २ सपटंबर १९३०

प्रत्येक तीन महिन्यांनी एक ॲडव्हायसरी कमिटी तुरुंग पाहवयाला येत असते. जून महिन्यात मी दवाखान्यात असताना ही कमिटी आली होती. त्यावेळी मि. मॅफकी, कमिशनर व त्यांच्या बरोबर ७/८ युरोपियन व हिंदी गृहस्थ आले होते. आजही एक युरोपियन बडे ऑफिसर, पुण्याचे कलेक्टर व काही हिंदी मंडळी आली. ही माणसे नुसते आमच्याकडे जणू काय आम्ही प्राणीसंग्रहालयातील प्राणीच आहोत, असे पाहून जातात ! कोणी कोणाला काही विचारीत नाहीत. मग ह्या कमिटीचा काय उपयोग ! निदान आम्हाला तरी कळला नाही ! मी नुकताच दूध घ्यावयाला खाली बसणार

--- नुकताच कॅथॉलिक उपासनेहून आलो --- इतक्यात हा कळप आला. दुसऱ्या कोणाजवळ न उभा राहता शेवटी मजसमोर सर्वांना आणिले. माझे हिस्टरी टिकेट मुख्य साहेबांनी *(दाखविले).* मंडळी मुक्याचे व्रत पाळून चालती झाली. मला हे दु:सह वाटले !

मागचे वेळी, मि. मॅकीनेच माझी ओळख धरली. You have changed your occupation = तुम्ही आपली वृत्ती बदलली असे म्हटले. मी ओळख लागत नाही असे म्हटलेवर डि. सी. मिशन *(वर)* वरचेवर येत होतो म्हणाले. माझी ओळख धरिल्याबद्दल मी जरी त्यांना Thank you आभार मानतो म्हटले तरी त्यांचा टोमणा मला आवडला नाही हे दाखविण्यासाठी ही वृत्ती नसून वृत्तीचा अभाव आहे, असे म्हणालो.

आज इतकेही कोणी बोलले नाही !

आज सायंकाळी पावसाची एक मोठी सर येऊन आमचा व्हरांडा सर्व भिजला. मी तो मग सर्व धुवून काढला.

बुधवार ता. ३ सपटंबर १९३०

काल आणि आज माझे पोट शेकण्यास हॉट वॉटरबॅग मिळते. नानासो देवचके नावाचे नगरच्या अनाथालयाचे सुपरिंटेंडेंट आमचेच वॉर्डमध्ये आहेत. त्यांनी मजकरिता डॉक्टरकडून ही बॅग आणविली. आजीबाईसारखी सर्वांची काळजी घेण्याची त्यांना सवयच लागली आहे.

गुरुवार ता. ४ सपटंबर १९३०

आज सुपरिंटेंडेंटची साप्ताहिक तपासणी झाली. माझी धार्मिक पत्रे दिली नाहीत. तसे 'विविधवृत्त' पत्र मि. रॉजर्सनी मिळेल असे सांगितले, ते मी लेखी मागून आज ६ दिवस झाले तरी काहीच दाद नाही म्हणून मी पुन्हा तक्रार केली. धार्मिक पत्राविषयी आपल्यास काहीच माहीत नाही असे सुपरिंटेंडेंटने म्हटल्याबरोबर ही पत्रे येतात असे त्यांचे तीन कारकून सांगतात, असे मी म्हणालो. लगेच कारकुनाला सुपरिंटेंडेंटने बोलावून पुन: आमचेकडे आले. कारकुनाने मी सांगितलेली हकीकत कबूल केली. सुपरिंटेंडेंट किंचित रागावले. ह्यात जेलरची चूक काय ते कळेना काही. आज दोन अंक इन्क्वायरचे मिळाले. विविधवृत्त आणि माझी चारी धार्मिक पत्रे मिळावीत म्हणून मी पुन: प्रत्यक्ष सुपरिंटेंडेंटलाच आज तारखेला पत्र लिहिले. ते रॉजर्सचे मार्फत उद्या पाठवीन. रा. कानीटकरांनी डेली ज्ञानप्रकाशही आज मागविला आहे. अधिकाऱ्यांची ही टोलवाटोलवी नमुनेदार आहे. त्यांच्या वर्तनात पुष्कळ अनुकूल फरक पडत आहे खास ! ही चांगली चिन्हे आहेत.

काल आणि आज जयकर सप्रू पुन: वाटाघाट करून गेले. पुष्कळ आशा आहे !

शनिवार ता. ६ सपटंबर १९३०

आज सकाळी पहाटे उठल्यावर नित्याप्रमाणे अत्यंत शांतरसाचे तात्त्विक विचार मनात येऊ लागले. बहुतेक ४ वाजता जाग येतेच. आज ती ३ वाजता आली. काल माझ्या आठवणी व अनुभव लिहिण्याचा कंटाळा केला. म्हणून मला आठवणी झाल्या व अनुभव आला तो असा : माझ्या बाळपणी खेळ व खोड्या केल्या, तरुणपणी श्रृंगार केला --- (पण माझ्या वाट्याला तारुण्य

आलेच नाही. बाल्य १९२७ साली संपले आणि वार्धक्य तर त्याच्या आधीच म्हणजे १८८५ साली माझा वडील भाऊ वारला आणि मी हायस्कूलमध्ये गेलो तेव्हाच आले) --- व वृद्धपणी मी तत्त्वचिंतेला लागलो. खेळ, अनुराग, आणि कर्मयोगातील त्याग ह्या सर्वांना प्रेम हे एकच नाव आहे. एकच वृत्ती तम, रज, सत्त्व तीन रूपाने कमी अधिक सर्व मानवी जीवनामध्ये प्रगट होते. म्हणून मानवी आत्म्याचे पूर्ण स्वरूप त्याला ब्रह्मविहार (करुणा, मुदिता, मैत्री, उपेक्षा हे बौद्धाने दिलेले नाव) किंवा सच्चिदानंद (हे अद्वैतवेदांत्यांनी दिलेले नाव) असे माझ्या अनुभवास आज पुनः आले. १/२ तास ह्या धन्य विवेकाचे स्थितीत घालविल्यावर मी नेहमीप्रमाणे माझी स्मरणी घेऊन माझा शांतिजप केला ! लहान मूल खेळते, तरूण तरुणीशी रत होतो, पोक्त मनुष्य स्वार्थत्यागपूर्वक कर्मयोगी (भगवद्गीतेत सांगितल्याप्रमाणे) व शेवटी वृद्ध समाधी (बुद्धांनी सांगितल्याप्रमाणे निर्वाणाची) घेतो. ह्या सर्वांना प्रेम, वल्लभाचार्य म्हणतात त्याप्रमाणे किंवा God is Love, St. John ने म्हटल्याप्रमाणे एकच नाव आहे. केवळ नैतिक न्याय (Justice) पेक्षा हे प्रेम अथवा भक्ती अर्थात श्रेष्ठ आहे. म्हणून शुष्क कर्मयोगापेक्षा रसिक भक्तीमार्ग श्रेष्ठ होय. तो जास्त व्यापक आहे. जीवात्म्याचा परमात्म्यात लय होतो तो केवळ कर्माने किंवा ज्ञानानेच नसून भक्तीने अधिक पूर्ण आणि स्पष्ट होतो. वल्लभाचार्यांचा पुष्टी मार्ग = Way of Grace जरी मला अद्यापि कळला नाही तरी भक्तीमार्ग माझ्या आठवणीने व अनुभवांनी कळविला आहे. भक्तीचा मी अधिकारी, व ईश्वरच केवळ (Grace = कृपेचा) अनुग्रहाचा अधिकारी आहे. असो. माझी भक्ती ईश्वराच्या अनुग्रहाला पात्र आहे की नाही हे मी पाहात बसलो तर मी खरा भक्तच नव्हे मूल खेळताना, तरूण तरुणीशी रमताना, प्रौढ पुरुष अनासक्त कर्म करीत असता आणि वृद्ध तत्त्वचिंतामग्न असताना, तो ईश्वरी कृपेला आपण पात्र आहे काय हे पाहतो काय ? मग मीच का ईश्वरी कृपेची आकांक्षा करावी ? पण वल्लभाचार्यांचे म्हणणे असे दिसते की मनुष्य (उदाहरणार्थ मी) जसा जसा भक्तीला वश होतो तसा ईश्वरही आपोआपच कृपेला वश होतो. ईश्वर भक्तापेक्षाही खालच्या पायरीला जाऊन आपणच कृपा करावयाला भक्ताच्या पाठीस लागतो. हाच जर वल्लभाचार्यांचा पुष्ठिमार्ग असेल तर तो खास सुंदर आहे. पण हा मार्ग ईश्वराचा झाला. माझ्या जीवनात सहज रसिकता उर्फ प्रेम उर्फ भक्ती उर्फ Love --- कोणी काही म्हणोत, कोणी निंदोत, कोणी वानोत--- प्रत्यक्ष ईश्वरही कृपा करो न करो--- माझे प्रेमच मला खरे आणि म्हणूनच मला ते पुरे !

ता. ७ रविवार सपटंबर १९३०

समेटाविषयी आमची कालच निराशा झाली होती. आज टाईम्स वुइकलीचे रडगाणे वाचून विशेष वाईट वाटण्याचे कारण उरले नव्हते. तरी चहुकडे उदासीनतेचे ढग सर्वांचे तोंडावर दिसू लागलेच ! मनुष्य हा आशेवर जगणारा प्राणी आहे. ह्या न्यायाने पुनः पुढच्या रविवारची वाट पाहण्याचे आम्ही ठरविले !

आज पंधरावड्याचे वजन झाले. माझे १४५ पौंड म्हणजे गेल्या पंधरावड्यापेक्षा १ पौंड जास्त भरले. टॉनिक सतत सव्वा महिना चालू असल्यामुळे माझ्या प्रकृतीत बराच अनुकूल फरक भासत आहे. तरी पण उठता बसता अशक्तपणा भासतच आहे !

ता. ८ सोमवार सपटंबर १९३०

आज पार्शी सणाबद्दल आम्हाला सुटी होती. पण अनंत चर्तुदशीबद्दल गेल्या शनिवारी सुटी नव्हती. पण सुटीचे दिवशी ३ वाजताच कोंडण्यात येते. आणि काम नसते. वर्तमानपत्रे तर अझूनी वाचावयास मिळाली नाहीत. विविधवृत्त, ज्ञानप्रकाश मिळेल म्हणून वचन देऊन ते अद्यापि तरी पाळण्यात आले नाही. त्यामुळे अशा सुटीमुळे मनाला उल्हासाऐवजी उदासीनता जास्तच उग्र भासते ! एकांतवासाचा कंटाळा येतो, अशावेळी आमच्या दोन वार्डातले बी क्लासचे १४ जण मिळून काही धार्मिक उपासना प्रवचन करू म्हटले तर त्यालाही परवानगी मिळत नाही ! मग सी क्लासची कोण अवस्था !

गुरुवार ता. ११ सपटंबर १९३०

आज सुपरिंटेंडेंटची साप्ताहिक तपासणी झाली. माझ्या हिस्टरी टिकेटमध्ये मी सुटण्याची संभवनीय तारीख सपटंबर ११ असे लिहिले होते. ते खोडून ऑक्टोबर २६ ही तारीख घातलेली आज नवीनच दिसली. मी सुपरिंटेंडेंटला विचारले की मागील खेपेस ऑक्टोबरच्या मध्याला माझी सुटका होईल असे ते म्हणाले असता आता ऑक्टोबरचे शेवटी ही तारीख २६ कशी ? ता. २६ आक्ट.ला रविवार येतो. शिवाय ता. २२ रोजी बळिप्रतिपदा व त्याचेपूर्वी तीन दिवस सुट्टी आहे. एकूण ता. १८ ऑक्टोबरला तरी माझी सुटका होणे रास्त आहे. ती होईल काय म्हणून मी विचारले. सुपरिंटेंडेंट म्हणाले ही तारीखही २६ अद्याप निश्चित नाही. अझूनी एक महिना अवकाश आहे. पुढे मला आणखी विचारा. पाहू काय होते ते.

शनिवार ता. १३ सपटंबर १९३०

घरी चि. जनाक्काना पत्र लिहिले. १ माझे लेख व्याख्याने[२०] २ रा. कृ. बाबर मास्तरांनी लिहिलेले नवीन चरित्र[२१] ३ बुद्धधर्म आणि संघ[२२] ४ माझी इंग्लंडातली मोठी डायरी ५ फर्ग्युसन कॉलेजातील डायरी ६ टाकाची दोन निब्स इतके सामान घेऊन पुढचे शनिवारचे आत कोणी तरी भेटावयास यावे असे लिहिले. विविधवृत्ताचे मागील दोनचार अंक व एक ताजा अंक आणावयास लिहिले.

रविवार ता. १४ सपटंबर १९३०

आजच्या वुइकलीमध्ये समेटाचे ओंफस झाल्याचे वाचले. ही निराशा अगोदरच झाली होती. विविधवृत्ताचे मागील ४ अंक ४ महिन्याचे बांधलेले कानीटकरांकडून वाचावयाला मिळाले.

ता. १५ सोमवार सपटंबर १९३०

आज ता. २३ ऑगस्टच्या इन्क्वायरर मिळाला. त्यात प्रमथलाल सेन कलकत्त्यातील नवविधानाचे[२३] आचार्य वारल्याचे वाचले. इंडियन मेसेंजर मला न दिल्यामुळे ही बातमी मला इतक्या उशीर पोचली. चि. प्रतापचे सुपरिंटेंडेंटला आलेले पत्र मला दाखविले. पण त्यात असलेले पत्र मात्र मला मिळाले नाही.

मंगळवार ता. १६ सपटंबर १९३०

आज कॅथॉलिक मासला गेलो. गेल्या मंगळवारी पावसामुळे जाता आले नाही. आजपर्यंत सबंध आठवडाभर पाऊस पडतच होता !

गुरुवार ता. १८ सपटंबर १९३०

आज सुपरिंटेंडेंटच्या साप्ताहिक तपासणीचे वेळी मी कॅथोलिक उपासना लॅटिनमध्ये होते, दुसरीकडे प्रोटेस्टंट उपासना इंग्रजीत होते तिला जाण्याची परवानगी मागितली. पण तिकडे कोणालाच जाण्याची परवानगी नाही, असे सुपरिंटेंडेंट म्हणाले. राजकीय कारणावरून मला परवानगी मिळत नाही काय, असे मी पुन: विचारले. कारण तिकडे महात्मा गांधी असतात, म्हणून परवानगी नसावी हे मला कळले होते. काही असो परवानगी मिळाली नाही. नंतर मी विचारले, की मी तुरुंगातून सुटल्यावर कैद्यांना काही तरी आध्यात्मिक उपदेश करण्याची अगर त्यांचा समाचार घेण्याची व्यवस्था करावी. आणि ही केवळ कोणत्या संप्रदायाला केवळ अनुसरून न होता हिंदु-मुसलमान-ख्रिस्ती कोणत्याही कैद्याला ह्याचा फायदा मिळावा अशी तजवीज करावयाचा विचार करण्यासाठी सुपरिंटेंडेंट *(ची)* खास भेट होईल काय ? ते म्हणाले, तुरुंगातील अधिकाऱ्यांची हरकत नाही. पण ही गोष्ट मध्यभाग कमिशनरचे हातात आहे. मी म्हटले त्यांना भेटण्यापूर्वी तुरुंगातील अधिकाऱ्यांचा विचार घेणे आवश्य आहे. त्यांच्या सहानुभूती आणि सहकार्याशिवाय ही गोष्ट होणे नाही. पण ह्याला उडवाउडवीचेच उत्तर मिळाले.

मग माझ्या सुटकेचा प्रश्न निघाला. जेलर मि. क्वीनने माझे हिस्टरी तिकेट घेऊन त्यात ता. २६ ऑक्टोबर ३० (रविवार) ही तारीख पाहिली. हीच कायम तारीख. सुपरिंटेंडेंटने विशेष सवलत दिल्याशिवाय मला ता. २५ चे अगोदर जाता येणार नाही. मी सुपरिंटेंडेंटला विचारता "अशी सवलत देण्यासारखे तुम्ही काय केले आहे," असे मला हासून म्हणाले. "ही गोष्ट मजपेक्षा आपणच जास्त सांगू शकाल. तुरुंगात मला काय करणे शक्य आहे ?" असे मी उत्तर दिले. एकंदरीत ही वेळही थट्टेवारीच मारून नेली ! मी चुरमुरे खात उभा राहिलो.

शनिवार ता. २० सपटंबर १९३०

आज प्रतापची भेट झाली. कारकून रा. रास्ने ह्यांनी मला सांगितले की शनिवारी भेटीची परवानगी दिल्याचे पत्र प्रतापाला ता. १७ मंगळवारीच गेले म्हणून. परंतु प्रताप म्हणाला की त्याला अशा परवानगीचे पत्र मिळालेच नाही. तरी तो सायकलीवर आला म्हणून माझी भेट झाली. येथील लोक खरे बोलत नाहीत, ह्याची किती तरी उदाहरणे ही ! असो. प्रतापाने माझ्या डायऱ्या व मच्छरदाणी व मी ता. १३ सपटंबरचे पत्रात मागितलेले सर्व सामान आणिले. डेप्युटी जेलर मि. मॅक्लीयन ह्यांनी ते सर्व सामान ताबडतोब पास करून दिले. मि. रॉजर्स इतक्यात आले. त्यांची व मॅक्लीयनची ओळख करून दिली.

मंगळवार ता. २३ सपटंबर १९३०

कॅथॉलिक उपासनेला गेलो होतो. शनिवारी मिळालेली मच्छरदाणी लावण्याची सोय आज झाली. मि. व्हीलर Mr. Wheeler नावाचा यूरोपियन वॉर्डर भिंतीत खिळे मारून देण्याकरिता आला. हा फार आनंदी, गुलहौशी, बोलका आहे. खिळे मारता मारता "रघुपटि राघव राजाराम। पटीट पावन शीटाराम।" हे भजन गुणगुणू लागला ! मी म्हटले "अरे तुझा खाईष्ट आणि पाद्री रागावतील ना ?" तो म्हणतो, "Damn that Padri I am my own Padri !! मेला तो पाद्री, मीच माझा पाद्री !" चार खिळे मारून आठ आणे लाव म्हणून हात पुढे केला ! मी म्हटले येवढी उधारी राहू दे जा ! हासत खिदळत स्वारी चालती झाली !

सोमवार ता. २९ सपटंबर १९३०

आज आमच्या "ब" वर्गातल्या कैद्यांपैकी जवळ जवळ २२ कैदी मित्र ह्या तुरुंगातून नाशिक येथील तुरुंगात पाठविण्याचा हुकूम झाला ! निळ्या आकाशातून एकदम मेघवृष्टीची मुसळधार लागावी तितका आचंबा आम्हाला झाला. लागलीच आपल्या नुसत्या खासगी सामानासकट आमच्या अंधारी वार्ड नं. २ मधून चौघांना बाहेर काढले. ह्यात नवीन आलेले दोन विद्यार्थी आणि नानासो. देवचके आणि नगीनदास हे चौघे होते. नंबर १ मधून खाडीलकर, रामभाऊ हिरे व दोन विद्यार्थी इतके मिळून आठ होते. पैकी नानासाहेब व रामभाऊंचा व माझा फार जिव्हाळा जमला होता. ते दोघेही गहीवरून माझा निरोप घेण्यासाठी माझेकडे आले. माझ्या पायावर डोके ठेविले. नानासाहेबांना उचलून कडकडीत आर्लींगन दिले.

पण संध्याकाळी त्यांची गाडी चुकली म्हणून ते सर्व पुनः परत आले !

पाच वाजल्यावर नियमाप्रमाणे आम्हाला कोंडल्यावर माझे एक पार्सल आले आहे म्हणून मला ऑफिसातून बोलावणे आले. गेल्यावर "कर्मवीर विद्यार्थी" हे रा. कृष्णराव बाबरने लिहिलेले माझे चरित्राचे पुस्तक प्रतापाने पाठविलेले मला जेलर मि. क्वीननी दिले. त्यांना मराठी थोडे येते. ते वाचण्याची त्यांची इच्छा दिसली. पण समजेना. तेव्हा नुसता माझा फोटो तेवढा पाहून तेवढ्यावरच तृप्त होऊन पुस्तक मला दिले !

काय योगायोग ! हे पुस्तक मी नानासो.साठीच मागविले होते. त्यांची आजच बदली व्हावी ! त्यांची गाडी चुकावी ! आणि ता. २४ ला मागविलेले पुस्तकही मला आजच मिळावे. माझे चरित्र व लेख वाचण्याची नानासाहेबांची तीव्र आणि मनःपूर्वक इच्छा अशी फळास आली !

मंगळवार ता. ३० सपटंबर १९३०

आज सकाळी कॅथॉलिक मासला गेलो. १ वाजता "ब" वर्गातील सुमारे ३० कैदी नाशिकला गेले. अंधारी १ व २ वॉर्डमध्ये आम्ही ६ जणच उरलो. त्यात हरिभाऊ तुळपुळे,[२४] बाळूकाका कानीटकर, व मी तिघेच मराठे !

दसरा, गुरुवार ता. २ ऑक्टोबर १९३०

आज दसरा असून अर्धाच दिवस सुटी मिळाली ! सुटीचा अर्थ इतकाच की सकाळी ७ पासून ९।। पर्यंत आणि मग ११-१२ पर्यंत आम्हाला काम करावे लागले. ९।। वाजता सकाळीचे

शनिवार ता. ११ ऑक्टोबर १९३०

आज घरी एक पत्र लिहिले. आज आमचे वॉर्डात नाडी विणण्याचे दोन माग आणून उभे केले.

सायंकाळी अवचित चि. प्रताप भेटावयास आला. बरोबर सौ. रूक्मिणीबाई, चि. बबन, रा. गणपतराव आणि आत्माराम पाटील इतकी मंडळी होती. त्यांनी "कर्मवीर विद्यार्थी" हे माझे चरित्र व ता. १० ज्ञानप्रकाशात त्यावरील अभिप्राय व इतर ज्ञानप्रकाशाचा एक अंक आणिला. पण दैनिक ज्ञानप्रकाशाचा ता. ११ चा अंक मला घेण्याची परवानगी मिळाली नाही. ता. १८ रोजी माझी सुटका होणार हे कळविले. त्या दिवशी मंडळी मला घेण्यास येईल. कानीटकरांची काही पुस्तके व माझी काही पुस्तके घरी परत केली. भार कमी केला. टाटा स्टील कंपनीच्या डिव्हिडेंटवर सही केली. मी येणार नाही म्हणून दिवाळी घरी करणार नव्हते. आता करतो असे सौ. म्हणाल्या. पण डोळे ओले झालेच शेवटी ! ता. १८ रोजी माई व तुरुंगी मला न्यावयाला येणार !

(ह्यापुढील तीन पाने ता. ५ सपटंबर १९३२ म्हणजे जवळजवळ दोन वर्षांनी लिहिली आहेत.--वि. रा. शिंदे)

सोमवार ता. १३ ऑक्टोबर १९३०

आज सायंकाळी ५ वाजण्याचे सुमारास मी व बाळूकाका आंगणात शतपावली करीत असता, आमचा वॉर्डर सखाराम तुकाराम धोकरे एकदम मजकडे येऊन माझ्या पायावर पडून रडू लागला. १०/१५ मिनिटे काही कारण सांगेना. आपल्याला पश्चाताप झाला येवढेच म्हणत होता. मला मागाहून कळले की माझी सुटका दुसरे दिवशी ता. १४ रोजी मंगळवारीच होणार होती हे त्याला कळले होते. ते त्याला मला कळविण्याचा अधिकार नव्हता. उद्या सकाळी येण्याचे पूर्वीच माझी सुटका होणार होती. म्हणून हे रडे.

रात्री कोंडल्यावर दुसरे वॉर्डर येऊन मला उद्या सुटका होणार काय, विचारू लागले. एकंदर गडबड पाहून मी उद्या सुटणार म्हणून अर्थात आनंद झाला.

आज रात्री झोप येईना. नेहमीचे लिहिणे होईना. पाळीस जमादार रात्री येऊन विचारू लागला की सर्व बांधाबांधाची तयारी आहे काय ? हा प्रश्न ऐकून मला सुटण्याची जवळ जवळ नोटीसच मिळाली.

ता. १४ ऑक्टोबर १९३०

सकाळी उठल्याबरोबर कालच्याच जमादाराने येऊन मी सुटलो व सामानाची तयारी लवकर करून ऑफिसात येण्याची वर्दी दिली. पुणे शहर काँग्रेस कमिटीचे सेक्रेटरी जोशी माझेबरोबर सुटले. माझी ही डायरी व इतर लेख तपासून काही आक्षेप निघतील की काय भीती होती. तसे काही झाले नाही. ८ वाजण्याचे सुमारास आम्ही बाहेर पडलो. गावातून एका मित्राकडून मोटर आणण्याविषयी

ब्राह्मसमाज शतसांवत्सरिक सफर
(१९२८)

वाय ४७३-२६

ऑगस्ट, ता. ८, बुधवार

सकाळी जोशी वकील आले. त्यांच्या घरी खासगी सभा सायंकाळी ५ वाजता ठरली. आत्मोद्धारकर्ते चौधरीकडे दोन प्रहरी जेवणास गेलो. सेनू नारायण मेढे ह्यांचे 'अस्पृश्य' बोर्डिंग पाहिले. २७ बोर्डर्स होते. समाधानकारक आहे. मराठा बोर्डिंग पाहिले. इमारत भव्य आहे. बोर्डस सुमारे ४० शाळेस गेले होते. खासगी सभा होऊन जळगाव शेतकरी संघ स्थापनेचा ठराव सर्वानुमते पास झाला. ब्राह्मण ब्राह्मणेतराचे सलोख्याचे मिळून झालेले हेच पहिले कार्य, असे चौधरी म्हणाले. रात्री ९ वाजता मैदानात जाहीर सभा झाली. शेजारच्या खेड्यातून शेतकरी आले होते. जोशी वकील अध्यक्ष होते. गर्दी प्रचंड होती. व्याख्यान उत्तम वठले.

ऑगस्ट, ता. ९, गुरुवार, उमरावती

सकाळी ७.३० वाजता अमरावतीस निघालो. आयत्या वेळी गोविंदराव आले. अगदी गाडी निघाली व ते गाडीत चढले. सामान फेकून घ्यावे लागले. दोन प्रहरी अमरावतीस डॉ. पंजाबराव देशमुखांचे घरी पोचलो. रात्री काही मंडळी बोलावली. पावसामुळे नुसते पाटील व बागवे बारिष्टर आले होते.

ऑगस्ट, ता. १०, शुक्रवार

सकाळी श्री. अप्पासाहेब देशमुखरावांना भेटलो. त्यांनी आपल्या मोटारीत रा. तिडवेकर, मुटकेकर, हणमंतराव देशमुख, डॉ. भट वगैरेंना भेटविले. रात्री गणेश थिएटरांत 'हिंदू धर्म व सुधारणा' वर व्याख्यान झाले. अगोदर तिसरे प्रहरी उमरावती कॉलेजात Failure of Modern Education या विषयावर विद्यार्थ्यांनी व्याख्यान करविले. प्रथम विषय कडक वाटल्यावरून युरोपियन प्रिन्सिपालची अनुमती मिळाली नाही. विषय शैक्षणिक असूनही अनुमती नसल्यास माझी मुळीच व्याख्यान देण्याची तयारी नाही असा माझा रोकडा जबाब गेला. पाहुण्यांचा असा अपमान होतो असे पाहून तोच विषय ठरवून मला नेण्यात आले. प्रिन्सिपाल हजर होते. पाऊण तास मराठीत विनोदपूर्ण भाषण झाले. सर्व खूष झाले. दुसरे दिवशी सकाळी इतिहासावर दुसरे भाषणाचे निमंत्रण आले. रात्रीच्या जाहीर सभेस थिएटर गच्च भरले होते. डॉ. हणमंतराव देशमुख अध्यक्ष होते.

ऑगस्ट, ता. ११, शनिवार

सकाळी ७ वा. शिवाजी हायस्कुलात व्याख्यान व पानसुपारी. नंतर ९ वाजता कॉलेजात Genesis of Indian History ह्या विषयावर तेथील Historical Association पुढे व्याख्यान. नंतर ११ वा. रा. मुटकेकरकडे भोजन समारंभ आणि ११।। वाजता बडनेरा येथून नागपुराकडे प्रयाण झाले. बडनेरा येथे अप्पासो व जानराव देशमुख, मुटकेकर, हायस्कुलचे हेडमास्तर सासने ही मंडळी बडनेरास पोहचविण्यास आली होती. ४ वा. नागपुरात पोचलो.

ऑगस्ट, ता. १२, रविवार, नागपूर

स्टेशनावर ४ वाजता तिसरे प्रहरी रा. बर्वे, बंदसोडे, खापर्डे वगैरे मंडळी आली होती. रा. रुईकराकडे उतरलो. हे वकील असून मजूर संघाचे सेक्रेटरी होते. शेतकरी संघ स्थापन करण्याची त्यांची कळकळ दिसली. सायंकाळी टौनहॉलमध्ये जाहीर सभा 'शेतकरी व सरकार' या विषयावर

ऑगस्ट, ता. १९, रविवार

सकाळी सतीशचंद्र चक्रवर्ती ह्यांनी उपासना चालविली. दोन प्रहरी दोन वाजल्यापासून रात्री ७ पर्यंत सर्व धर्मीयांची मजलस झाली. पार्शी, हिंदू, बौद्ध, ख्रिस्ती, मुसलमान, बहाई इतक्या धर्माचे प्रतिनिधी पहिल्या अधिवेशनात बोलले. डॉ. हॉवेल सिरामपूर ख्रिस्ती मिशन कॉलेजचे प्रिन्सिपालचे भाषण फार जोरात प्रागतिक झाले. सॅल्वेशन आर्मीचे ले. कर्नल मॅकेंझी ह्यांनी कलकत्ता येथील पतित स्त्रिया व बेकारीसंबंधी चांगली माहिती सांगितली. पण सर्वात उत्तम भाषण को. एस. एच. कोरेशी ह्यांनी बहाई धर्मावर केले. अवघ्या १० च मिनिटात त्यांनी इतक्या सुंदर व स्पष्ट, शब्दांत आपल निरोप कळविला की सभा संपल्यावर त्यांच्याभोवती गराडाच पडला. अर्धा तास सुट्टी झाल्यावर पुनः सभा भरली. आर्य समाज, थिऑसफी व ब्राह्मसमाज ह्यावर भाषणे झाली. पण मी फार थकल्यामुळे गेलो नाही.

ता. २०, सोमवार

सकाळी हेरंबचंद्र मैत्र ह्यांनी उपासना चालविली. ह्यांचा स्वर चढउतार एका गालातच न झाल्याने नीट परिणाम होत नाही. प्रार्थनेतदेखील देवांशी भांडल्यास भास होतो. कोणास वाटावे की हे जणू देवास दरडावीतच आहेत. पदोपदी आपल्या इंग्लंड-अमेरिकेतील प्रवासाचे अनुभव सांगायची ह्यांना खोडच लागली आहे. एमर्सनचा दाखला दिल्यावाचून ह्यांना चार पावलेही चालवत नाही. सायंकाळी ७।। वाजता सर पी. सी. रायचे अध्यक्षत्वाखाली ब्राह्मसमाजाचा संदेश ह्या विषयावर भाषणे झाली. सुरवातीची प्रार्थना करणे मजकडे आले. ती मी इंग्रजीत केली ती सतीशचंद्र चक्रवर्तींना फार आवडली असे ते मुद्दाम येऊन म्हणाले. पहिले भाषण माझेच झाले. ते फार जोरात थोडक्यात व निश्चित मुद्द्यांचे झाले. लोकांना फार आवडले. प्रो. रजनीकांत गुह ह्यांनी तर माझा हात धरून जोराजोराने हालविला. अतुलचंद्र सोम व बिपीनचंद्र पाल ह्यांनी वाहवा केली. नंतर त्रिवेदी धीरेंद्रनाथ चौधरी व कटकचे विश्वनाथ कार ह्यांची भाषणे झाली. गर्दी चिकार होती.

ऑगस्ट, ता. २१, मंगळवार

सकाळी ७ वाजता मीच उपासना चालविली. प्रत्येकाने आपआपला देव घडविला पाहिजे. पार्थिव पूजेत जसे नित्य नवे लिंग करावे लागते व त्याप्रमाणे आम्ही आपला देव बनवावा. सत्य, ज्ञान, अनंत ही नावे आम्हीच देवाला दिली आहेत. भक्तिविजयातील प्रथमाध्यायात देव भक्तांनी कसा नावारूपास आणिला ते सांगितले. नंतर प्रार्थनेत म्हटले O God thy names are but our moods. May we he as moodless as thou art Oh Transcendent God ! ही प्रार्थना आशाकुमार बानर्जीला आवडली. ह्यानंतर आमच्या समाजाची घटना 'ह्यावर पंडित सीतानाथ तत्त्वभूषण ह्यांच्या अध्यक्षत्वाखाली परिषद झाली. ती १० पर्यंत झाली. आपण सांप्रदायाला (सेक्ट) ला चाहतो असे अध्यक्षांनी सांगितले. तसेच तरुणांवर त्यांनी फार टीका केली. तरुणाच्या बंडाला mob rule गर्दीचे राज्य अगर गुंडशाही असे संबोधल्याबद्दल वरदाकांत बसून ह्यांची निषेध व्यक्त केला. ही परिषद ता २३ गुरुवारी सकाळी ७ ते १० पर्यंत झाली.'

ह्यानंतर ७.४५ वाजता मिसेस के. एन. रॉय ह्या विदूषी कवी बाईंच्या अध्यक्षत्वाखाली आमची सामाजिक उपासना व 'घरातील धार्मिक जीवन' ह्यावर परिषद झाली. वृद्ध शशिभूषण दत्त

ता. २४, शुक्रवार

सकाळी विश्वनाथ कारची उपासना. परिषद विषय 'आमचे सामाजिक प्रश्न'. अध्यक्ष सतीशचंद्र चक्रवर्ती ह्यांनी प्रस्तावनेत बऱ्याच महत्त्वाच्या मुद्द्यांचा उल्लेख केला. प्रथम मिसेस के. एन. रॉय बाईंनी बंगालीत भाषण केले. त्यात स्त्रियांनी नृत्यगान व नाटकात जाण्यात काही वावगे नाही असे सहज समर्थन केले. लागलेच अध्यक्षांनी उठून इशारा दिला, की ह्या विषयावर कोणी बोलू नये असे पूर्वीच ठरले आहे. असा आज ठराव व्हावा अशी त्यांची सूचना होती. मी म्हणालो, ठरावाची जरुरी नाही. अध्यक्षांचा इशारा सर्वांनी मानावा. पण ज्याअर्थी बाईंनी हा विषय पुढे आणला त्याअर्थी त्याला दुसऱ्या बाजूकडून उत्तर आलेच पाहिजे. ह्यावर मी उठून स्पष्ट सांगितले की उत्तर आल्यास पुनः प्रत्युत्तर येईल व ह्या नाजूक विषयावर मोठे युद्ध माजेल व परिषदेचा वेळ त्यातच जाईल. शिवाय त्यात स्त्रीदाक्षिण्यही नाहीसे होईल. हे त्रिवेदीला आवडले नाही. ह्यांनी आपल्या भाषणात Free Love प्रेमस्वातंत्र्याचा मुद्दा अप्रस्तुतपणे पुढे आणून त्यावर अध्यक्षाचे मत निर्णायक मागितले. ते त्यांनी ब्राह्मसमाजाचे वतीने अर्थात प्रतिकूल दिले. म्हणजे प्रेमाला बंधन असलेच पाहिजे असे ब्राह्मसमाजाचे स्पष्ट मत पडले. नंतर शेवटी माझे भाषण झाले. गेल्या शतकात ब्राह्मसमाजाचे स्वातंत्र्याचा पुकारा केला आहे. आता पुढल्या शतकात जनता जागृत होणार, स्त्रिया समानाधिकारी होणार आणि युवक स्वतंत्र होणार. दास मनोवृत्तीचे Slave meatality ब्राह्मसमाजाकडून निर्मूलन झाल्यावर वरील तिन्ही बाजूंनी वावटळ उठणार त्याला ब्राह्मसमाज तयार आहे काय ? आजवर धार्मिक स्वातंत्र्याचे भावनामय युद्ध झाले. येथून पुढे आर्थिक स्वातंत्र्याचे व्यावहारिक युद्ध जुंपणार त्यात ब्राह्मसमाज माघार घेईल तर आपणच उठविलेल्या वावटळीत आपणच गारद होण्याची आपत्ती येणार !

ता. २५, शनिवार

सकाळी उपासना. भाई सीताराम, त्यावेळी मि. फिलिप्सने आत्मनिवेदन केले. हे प्रथम हिंदू नंतर ख्रिस्ती, नंतर आर्यसमाजी आता ब्राह्म का व कसे झाले ह्याचे कथन केले. ७.४५ मिशनचे कार्य ह्यावर परिषद झाली. मीच अध्यक्ष होतो. तीन भाग होते. १. स्वदेशातील, २. बाहेर देशातील कार्य, ३. बहुजन समाजातील आणि दलित वर्गातील कार्य. पहिले दोन विषय सकाळच्या बैठकीत १० पर्यंत झाले. पुन्हा ३ वाजता सुरू होऊन ५ पर्यंत तिसरा विषय झाला. कालिदास नाग ह्यांचे बाह्य देशातील कार्य ह्यावर महत्त्वाचे भाषण होणार होते. पण हा विषय संध्याकाळी होईल म्हणून ते संध्याकाळी असल्यामुळे त्यांचे भाषण झाले नाही. डॉ. चिटणीस व सुधीरचंद्र बॅनर्जी ह्यांची बाह्य देशीय प्रचारावर भाषणे झाली. सायंकाळी नमःशूद्र वक्त्यांची बरीच उद्‌बोधक भाषणे झाली.

ह्यानंतर डॉ. प्राणकृष्ण आचार्याच्या वाढदिवसानिमित्त त्यांच्या घरी गेले. पुढे ६ वाजता मेरी कार्पेटर हॉलमध्ये मोठा सामाजिक मेळा जमला, तेथे डॉ. डी. एन. मैत्र ह्यांनी आपले मॅजिक लॅटर्नचे देखावे व आपल्या सामाजिक सेवा संघाचे कार्य दाखविले.

ता. २६, रविवार

सकाळी उपासना. दुपारी तरुणाची सभा व सायंकाळी लहान मुलांचा मेळा झाला. अत्यंत थकवा आल्यामुळे मी गेलो नाही. रा. गोविंदराव सासने हे ता. २२ रोजी अतिसाराने आजारी पडले.

पूर्व बंगालची सफर

सप्टेंबर, ता. १, शनिवार

हेमचंद्राने मजसाठी पूर्व बंगाल, उत्तर बंगाल, बिहार, संयुक्त प्रांत आणि पंजाब ह्या पाच निरनिराळ्या भागातील सुमारे ५०/६० मुख्य ठिकाणी मोठ्या व्याख्यान उपासनाच्या द्वारा भागातील शतसांवतत्सरीनिमित्त प्रचार करून ह्या वर्षाअखेर पुण्यास जावे असे ठरविले. माझे वय, मलेरियामुळे आलेली अशक्तता, अशा घाईच्या प्रचार कार्यासंबंधी माझा अनुत्साह व त्रिवेदीसारख्याचा अत्याचार वगैरे अनेक कारणांमुळे मी नाखूष होतो. पण बंगाल्याबाहेर पडण्याला कोणी बंगाली मिशनरी तयार होत नाही हे पाहून जुलमाने मला हे त्रासदायक पण मला स्वत:ला आत्मिकदृष्ट्या प्रिय कार्य स्वीकारावे लागले. पूर्व बंगाल्यात पावसाळा, मलेरिया, मला व न रुचणारे अन्न, न समजणारी भाषा ह्यावर निदान बंगालातील कामापासून माझी सुटका झाल्यास बरे झाले असते. पण त्रिवेदींच्या कृपेमुळे म्हणा किंवा बंगाली मित्रांच्या स्नेहलोभाने म्हणा मी इतर ७ जणांबरोबर मी पूर्व बंगाल्यात चित्तागाँगपासून उत्तर बंगाल्यातील हिमालयावरील दार्जिलिंगपर्यंत जावे असे ठरले.

रात्री कृष्णकुमार मित्र ह्यांनी साधनाश्रमात आमच्या प्रचार दळासंबंधी प्रार्थना केली व आम्ही पुढील सात जण रात्री ९/११ (स्टॅन्डर्ड टाइम) वाजता सियाल्डा स्टेशन सोडले. रमेशचंद्र मुकर्जी १, बारीसालचे २, राजकुमार घोस व त्यांचा मुलगा ३, जितेंद्र कुमार ४, अनिलचंद्र चौधरी, ५ सुधीर कुमार बोस, ६ बभ्रुवाहन ठाकूर, ७ माधवचंद्र विश्वास व मी (वि. रा. शिंदे)

ता. २, रविवार मलियाट

पहाटे २ वाजता सिंघाई (जैसोर जिल्हा) स्टेशनावर पोहोचलो. मुरकुंटाचा कहर होता. भैरव नदीवर बोट घेतली. ती पाऊण मैल स्टेशनापासून आहे. अरुणोदयापर्यंत विलंब झाला. तीन-चार तासांनी मलीयाटीला पोचलो. वाटेत प्रभात, नदीप्रवाह, किनारा व बोटी ह्यांचा सुंदर देखावा दिसला. मुलीच्या शाळेत उतरलो. आसमंतात ४०/५० मैल पाणी पसरले होते. त्यातच भात, आंबाडी, आळू, कोचरी वगैरेंची राने माजली होती. खेडी किंचित उंचवट्यावर असल्यामुळे ती तेवढी पाण्यावर होती. एका खेड्यातून जवळच्या १०० यार्डावरील ठिकाणी जाण्याला पडावाची जरुरी लागे. हा प्रकार पावसाळ्याचे निदान चार महिने तरी असतो. पिके मार्च एप्रिल मध्येच पेरावी लागतात. समद्वारचे घर सर्वांत मातब्बर. त्यांचेकडे दोन प्रहरची उपासना व जेवण चाले. ५ वाजता निरनिराळ्या मोहल्यांतून नगरसंकीर्तन ७ पर्यंत झाले. दुसऱ्या मोहल्यातून जाताना पडावातून कीर्तन झाले. इंग्रजी शाळेत माझे हिंदीत व्याख्यान झाले. ९ वाजता माधवचंद्राचे मॅजिक लँटर्न व्याख्यान झाले. शाळेचे सेक्रेटरी द्वारकानाथ मिश्र ह्यांचेकडे १ वाजता जेवण झाले.

सप्टेंबर, ता. ३, सोमवार

सकाळी प्रार्तविधीची पंचायत पडली. आम्ही राहतो तो मोहला अवघा ४/५ एकरांचा. चोहोकडून पाण्याने वेष्टलेला. शौचास कोठे जावयाचे कळेना. एकास विचारले तर त्याने किनाऱ्यावरील बोटीत बसवून दूर खुणेने जाण्यास सुचविले. मी बोटीत बसलो तो तोल संभाळेना. कसे तरी पुढे गेलो तो सर्वत्र पिकाखाली पाणीच ! एका मुलाने आपल्या बोटीत घेतले. माझा पडाव मी तसाच

तिसरे प्रहरी चार वाजता ह्या हायस्कूलच्या नव्या इमारतीच्या पायाचा दगड बसविण्याचा समारंभ माझे हातून झाला. संगीत, प्रार्थना झाल्यावर हेडमास्तरांनी अहवाल सांगितला. नंतर माझे मागून सर्व सभा पायाच्या दगडाजवळ गंभीरपणे गेली. मी हिंदीत प्रार्थना करून तीन वाटा जागेच्या उत्तर सीमेवर बसविल्या नंतर सभेच्या ठिकाणी मोठा जमाव जमला. सुमारे २००० होता. बायकामुली निदान १५० होत्या. माझे प्रथम हिंदीत भाषण, नंतर शरच्चंद्र मुझूमदार आसिस्टंट हेडमास्तरांनी आभारप्रदर्शक भाषण केले. नंतर राजकुमारांचे अध्यक्षत्वाखाली दुसरी सभा झाली. माधवचंद्र विश्वास नामशुद्रनंतर हेमचंद्र मुकर्जीची आवेशयुक्त बंगालीत भाषणे झाली. हेडमास्तरांनी आभाराचेवेळी पुनः मंदिराचा उल्लेख केला.

मला सर्व उत्साह पाहून मंदिराला स्वतः मदत केल्याशिवाय प्रारंभ नाहीसे वाटले. मी शेवटी उठून परत आभार मानण्यासाठी भाषण केले. मंदिरास निदान २०० रु. तरी पाहिजे असे हेडमास्तर म्हणाले. त्यापैकी १०० जर येथील ब्राह्मधर्माचे हितचिंतकांनी जमवावेत म्हणून बाकीचे १०० रु. मी स्वतः देईन असे मी वचन दिले. सभेत आनंदाचा जयघोष झाला. हे २०० रुपये जमले तर आणखी ३०० जमविणे सोपे होईल. ५०० रुपयात चांगली कच्ची इमारत होईल असे हेडमास्तर म्हणाले. व तेथल्या तेथे रुपये देण्याविषयी मंडळीस बजावले.

२ ब्राह्मसमाजाचे व तीन शूद्राचे प्रतिनिधी असे ५ ट्रस्टी असावेत म्हणजे मी माझी रक्कम ब्राह्मसमाजाच्या सेक्रेटरीकडे केव्हाही पाठवीन म्हणालो. शरच्चंद्र मुझूमदार बी.ए. हे एकेकाळी नास्तिक होते. पण ब्राह्म संगीत ऐकून एकेश्वरी उपासक झाले असे त्यांनीच आत्मनिवेदन केले होते. मंदिर स्थापन झाल्यावर आपण आचार्याचे काम भक्तिभावाने करू असे वचन दिले. हे मशीहाटी येथील कायमचे पिढीजात राहणार आहेत.

सप्टेंबर, ता. ६, गुरुवार

सकाळी लवकर खुलन्याकडे निघावयाचे होते. पण मंडळीत अनुभवी प्रवासी कोणी नव्हता. वृद्ध थकलेले व तरुण बेपर्वा. शिवाय पावसाळ्यात पडाववाले मिळण्याची पंचाइत. ह्यामुळे ६ तास उशीर होऊन सायंकाळी ४।। वाजता निघालो. कीर्तन करीत बंदरावर पोचलो. सुमारे २५ मशीहाटीचे तरुण एक स्वतंत्र बोट करुन अर्धा मैल पोचवावयास आले. मशीहाटीसारखे स्वागत कोठेच झाले नाही. रात्री ८ वाजता मोठा पाऊस झाला. सुदैवाने आम्ही राजापूर गाव जवळच गाठले. तेथील गावकऱ्यांनी जेवणाचा आग्रह केला. जेऊन ११ वाजता निघालो. चिंघुरिया १ मैलच होते. पण २ तास लागले. फार त्रास झाला. १ वाजता स्टेशनावर पोहोचलो. आम्हाला अडीचची मेल गाठावयाची म्हणून त्रास सोसला पण मेल येथे थांबणारच नव्हती. दुसरे दिवशी सकाळी ९ वाजताच्या गाडीने खुलन्यास निघालो.

सप्टेंबर, ता. ७, शुक्रवार

खुलना

१०।। वाजता खुलन्यास पोहोचलो. २ वाजता जेवण झाले. रात्री ६ वाजता कॉरोनेशन हॉलमध्ये जाहीर सभा झाली. कलकत्त्याहून बाबू कृष्णकुमार मित्र व बारासालहून मनमोहन चक्रवर्ती

कुरीआना

सुमारे ९।। वाजता दोन स्वतंत्र पडाव करून आम्ही कुरीआनाकडे नदीतून निघालो. ही एक लहान नदी होती. दुतर्फा फार सुंदर शोभा त्रावणकोर प्रमाणेच होती. तिसरे प्रहरी ३ वाजता कुरीआना हायस्कूलमध्ये पोचलो. हे केवळ नमःशूद्रांनी चालविलेले आठवे हायस्कूल बारीसाल जिल्ह्यात आहे. शाळेची इमारत किनाऱ्याला अगदी चिकटून १०-५ यार्डातच होती. आम्हाला पाहिल्याबरोबर "व्ही. आर. शिंदेर जय" असा प्रचंड ध्वनी दुमदुमू लागला. मी लगेच हा अयोग्य जयजयकार बंद करविला. दुतर्फा विद्यार्थ्यांची रांग उभी होती. ही शाळा मशीहाटीपेक्षा मोठी दिसली. स्वागत चांगले झाले. रात्री मॅजिक लँटर्न झाला.

सप्टेंबर, ता. ११, मंगळवार

सकाळी उषाकीर्तन खेड्यातून झाले. एका घरातून दुसरीकडे जाण्यास वाटेत लहान लहान नाले व त्यावर नारळीचे खोड टाकून पायवाटा केल्या होत्या. कीर्तन मेळ्याला कष्ट झाले. सुमारे १०० विद्यार्थी व शिक्षक उत्साहाने गात होते. परत आल्यावर रमेशबाबूंनी उपासना चालविली. नंतर आठ घर नावाची एक वाडी १ मैलावर होती. तेथे बोटीने गेलो. सभेत मला अध्यक्ष केले. प्रथम बंगालीत अल्प भाषण मी केले. ते मंडळीस विशेष आवडले. हिंदीत प्रार्थना केली.

तिसरे प्रहरी ४।। वाजता जाहीर सभा झाली. मनमोहनबाबू अध्यक्ष. मला एक लहानसे मानपत्र अर्पण करण्यात आले. मी अल्प बंगालीत प्रस्तावना करून पुढे १० मिनिटे इंग्रजी भाषण केले. बंगालीत भाषांतर झाले. नंतर मुकर्जी व राजकुमारांची भाषणे झाली. नंतर रोहिणीकुमार शिकदार, बी. ए. रामचरण बाला बी. ए. हेडमास्तर बोलले. ब्राह्मसमाजाचा सार ग्रहण केले की, पुरे, सभासद होण्याची जरुरी नाही. देव देवीची पूजा सोडण्याचे कारण नाही असा त्यांचा भाव होता. हे आमच्या मंडळीस आवडले नाही. ६ वाजता मनमोहन बाबूंनी ईश्वरोपासना चालविली. जेवण करुन १० वाजता बरिसालवरून आम्ही आलेल्या बोटीने निघालो. हेडमास्तर व रोहिणीबाबूंनी सभेत किंचित विरोध केल्याबद्दल माफी मागितली. सारा दिवस उघडे बसले तरी घामाने चिंब भिजत होतो. तरुण विद्यार्थी सतत पंख्याने वारा घालीत. अलोट आदर दिसला.

सप्टेंबर, ता. १२, बुधवार

बारीसाल

सकाळी सुमारे १० वाजता बारीसालला पोचलो. मनमोहन बाबूंचे घरी ता. १३ सायंकाळपर्यंत होतो. बाबूंनी आज व दुसरे दिवशी आम्हाला फिरून सर्व गाव दाखविला. पुढाऱ्यांची आमची ओळख करून दिली. सायंकाळी मनमोहन दासगुप्त सेक्रेटरीचे घरी, दुसरे दिवशी राजकुमार बाबूंचे घरी सर्वांचे जेवण झाले.

ता. १३, गुरुवार

येथील एक शंकराचार्य अनुयायांचा मठ व ब्रजमोहन कॉलेज आश्विनीकुमार दत्तांनी आपल्या वडिलांच्या स्मरणार्थ स्थापिलेले पाहिले. कॉलेज व वसतिगृह, व्यायाम भूमी, जलाशय बरीच विस्तीर्ण व उघड्या हवेत आहेत. सायंकाळी ६ वाजता पाटुआखालीला स्टीमरमधून निघालो. तो मध्यन्ह रात्री तेथील ब्राह्ममंदिरात पोचलो.

सप्टेंबर, ता. १६, रविवार

नगरसंकीर्तन करीत मंदीरात गेलो. सकाळी सत्यानंद दासनी उपासना चालविली. नंतर सामाजिक उपासना ह्यावर परिषदेत चर्चा झाली. त्यात दास, सतीशबाबू, रमेशबाबू वगैरेंनी भाग घेतला. सायंकाळी सतीशबाबूंनी उपासना चालविली.

ता. १७, सोमवार

पुन्हा दुसऱ्या मोठ्या रस्त्यावरून कीर्तन करीत सकाळी मंदिरात गेलो. अमृतलाल गुप्तनी उपासना चालविली. तिसरे प्रहरी महिला समाजापुढे सतीशनी उपासना चालविली. रात्री ७।। वाजता पाल बाबूचे "ब्राह्मसमाजाचे भारतातील स्थान" वर विस्तृत व्याख्यान झाले. बंगालची १ स्वाधीनता व २ मानवता ह्या दोन तत्त्वामुळे वैशिष्ट्य असल्यामुळे इंग्रजी संस्कृतीशी इतर प्रांतापेक्षा हा प्रांत तादात्म्य पावून वैशिष्ट्य गाजवितो. इतर प्रांतात मारुती, गणपत वगैरेंची पूजा आहे तशी बंगालने कधी केली नाही. बंगालची देवता केवळ काली ही मानवतेचे चिन्ह. नंतर राममोहनपासून बंकीमचंद्रांपर्यंत वाङ्मयात ब्राह्मसमाजाचा संचार आहे, वगैरे बोलले. त्यातील काही भाग मला पटला नाही. आज गर्दी अतिशय होऊन पुष्कळांना बाहेर उभे राहण्यालाही जागा मिळाली नाही. हे व्याख्यान टौन हॉलात व्हावयाला पाहिजे होते.

सप्टेंबर, ता. १८, मंगळवार

सकाळी वि. रा. शिंदे ह्यांनी उपासना चालविली. उद्‌बोधनात मांडुक्य उपनिषदातील आत्म्याचे चार पाद वाचून, उपदेशात धम्मपदातील सहस्त्रवर्ग वाचून ईश्वराशी खास परिचय प्रत्येकाने साधणे व ईश्वर सखा करणे आवश्य हे सांगितले. नंतर ब्राह्मसमाजाच्या काही समस्या ह्या विषयावर मनमोहन व वि. रा. शिंदे ह्यांनी चर्चा केली सायंकाळी विश्वजनीन धर्म Universal Religion ह्यावर प्रथम वि. रा. शिंदे १।। तास व नंतर बिपिनचंद्र पालचे अर्धा तास भाषण झाले. शिंदे यांनी प्रथम महाराष्ट्रातील पंढरपूर संप्रदायी भागवत धर्माचा उल्लेख करून तुकारामादि साधूंना प्रार्थनासमाजाने कसे पुढे आणिले व विद्वत वर्गात त्यांना मान्यता दिली हे सांगून ब्राह्मसमाज हे एक राजा राममोहनचे स्वप्न गेल्या १०० वर्षात सकल ब्राह्मांकडून मूर्त स्वरूपात पोचत आहे हे वर्णन आहे. रोम शहरात मायकेल आंजेलो ह्यांनी मोजेसचा तो पुतळा केला त्याला ४० वर्षे लागली. त्याची मूर्ती आंजेलोच्या मनात आधी मूर्त झाली होती. ती त्यांनी संगमरवरी दगडातून जणू पोखरून काढली. ती जणू आत दडली होती. तद्वत ब्राह्मसमाज आधीच होता. त्याची ईश्वराने राममोहनास स्वप्नात सूचना दिली. ती ब्राह्मांनी सकल बाह्य कुसंस्कार हळूहळू दूर करुन गेल्या शतकात उघड केली. हे आविष्करण अद्याप पूर्ण झाले नाही. ताजमहलचे स्वप्न शहाजहानास अगोदरच पडले. ते २०,००० माणसांनी २२ वर्षे खपून मूर्त स्वरूपात आणिले. तसेच ब्राह्म करीत आहेत. इजिप्त प्रांतातील मनोरे, हिंदुस्थानातील मोठमोठी देवळे ही सर्व हजारो कैद्यांकडून अथवा वेठीस धरलेल्या मजुरांकडून उभारली आहेत. त्यांच्या भयंकर अन्यायाची कष्टांची स्मारके आहेत.

सप्टेंबर, ता. २१,

चितागाँग

सकाळी ७।। वाजता चितागाँग स्टेशनवर पोचलो. ब्राह्मसमाजाची पुरुष मुले मिळून सुमारे २०/२५ जण खोल, करताल, पताका घेऊन स्टेशनावर वाट पाहत होते. आम्ही सर्व नगरसंकीर्तन करीत १० वाजता मंदिरात पोचलो. येथे दोन समाज (नवविधान, साधारण) आहेत. अर्थात आम्ही साधारणाचे पाहुणे होतो. मंदीर पुरेसे व दुरुस्त आहे. उत्सवासाठी काही विशेष तयारी दिसली नाही. उलटे मंदिरात नेहमीची अव्यवस्था दिसली. मात्र ८ दिवसाचा प्रोग्राम बंगालीत छापलेला मिळाला. बंगाली हे किती वाग्लोलूप आहे हे कळले. त्यांचा प्रोग्राम शनिवारपासून सुरू होणार होता, तरी (आज) सायंकाळी मंडळींनी माझे व्याख्यान ठेविले. ते ७ वाजता होते. तर ६ वाजता एकजण १०-५ छापील नोटिसा वाटताना दिसला. अर्थात ७ वाजता ७/८ च श्रोते जमले. मी वाटल्यास व्याख्यान रहीत करावे असे त्यांचे म्हणणे दिसले. मी 'ब्राह्मसमाजाची शतवर्षे' ह्या विषयावर इंग्रजीत १ तास बोललो. मंडळी जमत जमत ४०/५० जमली. मंदिराच्या ट्रस्टडीडसंबंधी ह्या समाजात वाद माजून अनास्था चालली आहे. लोक गरीब आहेत. रमेशबाबूला आज किंचित ज्वर आला. ते मंदिरात येऊ शकत नाहीत.

आज सकाळी एक अप्रिय प्रकार घडला. अनिल व सुधीर हे दोन तरुण काल रात्री स्टेशनावर जाऊन त्यांनी आमची व्यवस्था केली होती. कदाचित झोप नसल्यामुळे ते त्रासले होते. स्टेशनावरून नगरसंकीर्तन करीत जावयाचे म्हटल्याबरोबर अनिलाने डोळे वटारले. हा काय पागलपणा असे त्यांनी रागाने उद्‌गार काढिला. हा खराच उद्धटपणा होता. पण मंडळीपुढे दुर्लक्ष्यणीय होता. पण वृद्ध पक्षाचे जमदग्नी राजकुमार बाबूंनी त्याच्यावर सर्वांसमक्षच तोंड सोडले. चहा पितानाही त्यांचे तोंड मोठ्याने चालू होते. कीर्तनास निघताना त्यांनी जी प्रार्थना केली, त्यात ह्या अप्रिय प्रकाराचा निषेध केला. अगदी गाईच्या वाणाचे आमचे मवाळ रमेशबाबू मजजवळ येऊन म्हणाले, ह्या दोन तरुणांना परत कलकत्त्यास पाठविल्याशिवाय, चितागाँगच्या मंडळीवर आपली चांगली छाप बसणार नाही. मी कसे तरी सर्वांना आवरून ह्या दोन रुसलेल्या तरुणांना संकीर्तनात ओढले. राजकुमारांनी मंदिरात पोचल्यावर पुन:शेष प्रार्थना केली. आणि लगेच त्यांनी जाऊन अनिल बाबूला घट्ट कवटाळले. मग मात्र मला ह्या बंगाल्याच्या चवचाल भावना पाहून हसावे की रडावे असे झाले. असल्या रंग बदलणाऱ्या ब्राह्मभावनांची बिपिनचंद्र पाल सारखे धूर्त वक्ते तिरपीट उडवतात ह्यात काय नवल ? एकंदरीत ब्राह्मसमाजाची पताका पुढील शतकांत उचलून धरण्याची ताकद बंगाल्यातून कमी होऊ लागली आहे व ती बंगाल्याबाहेर अद्यापि दिसूही लागली नाही, ह्याबद्दल माझ्या अंतरात्म्यातील वेदना केव्हा केव्हा असह्य होता. ॐ शांती.

सप्टेंबर, ता. २२, शनिवार

रमेशचंद्रांचा ताप कमी झाला नाही. सायंकाळी ५ नगरसंकीर्तन नगरातून निघाले. ते हातरुणात साधारण अशी दोन मंदिरे. पण साधारण समाजातच समाजाच्या ट्रस्टडीसंबंधी मोठा वाद माजून कोर्टात खटला चालू आहे. ह्यामुळे समाजाची शक्ती फारच कमी होऊन बाहेरील लोकात सहानुभूती

आजाराने दुबळे झालेले आता एकदम धरणीवर पडताच आम्ही सर्व चकीत झालो. कारण कळल्याबरोबर सर्व हाजर मंडळी सेनबाबूंना आग्रहाने विनंतीचा जोर केल्यावर बिचाऱ्याची तारांबळ उडून होय नाही करता त्यांनी अगदी सांगितल्याप्रमाणे १२ आण्याच्या स्टांपवर आपल्या स्वतःच्या तक्रारीचा राजीनामा दिला. !

रमापतीराय व त्यांच्या कुटुंबाने चहापेक्षा आम्हाला रमेश सेन व त्याच्या पक्षाच्या उलट माहितीच जास्त दिली. त्यांचे म्हणणे की सेनबाबूने अननुष्ठानिकांचा एक निराळा समाजच करून मंदीर त्यांचे स्वाधीन करण्याचा व हल्लीच्या मंडळींना स्वॅप करण्याचा विचार चालविला आहे. नलिनीकुमार दत्त, पीएच. डी. निवारणचंद्र (आम्ही उतरलो आहो ह्या घरचे मालक), रमेश सेन वगैरेंचा एक पक्ष. सेन हे एक साधारण मुकत्यार वकील आहेत. मात्र मोठे खटपटी व चलाख आहेत. वजन फारसे नाही. रमेशचे म्हणणे की ट्रस्टडीडमध्ये मंदीर उपासक मंडळीचे नावे असावे असे असता मंडळीचा व मंदिराची मुख्य व्यवस्था साधारण ब्राह्मसमाजाच्या अनुष्ठानाने वागणाऱ्या सभासदाप्रमाणेच व्हावी असा नियमात साधारणसभेने जो फरक केला आहे. तो अन्यायाचा आहे. ह्याच्या उलट मुख्य आचार्य हरिचंद्र दत्त, रमापती राय, सेक्रेटरी ललित मोहन रॉय वगैरे मंडळी आहेत. त्यांचे म्हणणे की ट्रस्टडीडच्या नियमात असा फरक न केल्यास मंदीर हिंदू लोकांच्या (बेजबाबदार) हाती जाईल.

सप्टेंबर, ता. २५, मंगळवार

मुकर्जीला पुनः ताप १०४° आला. वांती व डोके दुखणे ह्यांनी ते फार बेजारले. सकाळी मंदिरात अन्नदाचरण दासने व सायंकाळी राजकुमारने उपासना केली. हेमचंद्रला पुनः एक कार्ड लिहिले.

मिसेस रायनी मला सकाळी मंदिरात उपासना करण्यास सांगितले. ती मी सर्व हिंदीत चालविली. ईश्वराला आपली स्तुती आराधना आवडत नसावी. वृक्ष, लता, पर्वत, समुद्रांना त्यांच्या सौंदर्याच्या व गांभीर्याच्या आराधना आवडत नाहीत. मानवी मातेला त्या आवडत नाहीत. केवळ आपल्या मुलाने सुखी व्हावे, चांगले व्हावे इतकीच तिची अपेक्षा. मग स्वर्गीय मातेची अपेक्षा जास्त काय असणार ? ईश्वराप्रमाणे आम्ही त्याच्या संतानांनी पवित्र व सात्त्विक व्हावे, ही त्यांची याचना आम्ही अमान्य करून आम्ही केवळ लांवशी आराधना करावयास जेव्हा बसतो तेव्हा त्याला काय वाटत असावे, हा माझ्या प्रवचनाचा सारांश होता. तो मंडळींना आवडला.

नंतर ब्यारिस्टर ज्योतिंद्र मोहन सेनगुप्त कलकत्त्याहून येथे आले होते, त्यांना मी, राजकुमार भेटावयास गेलो. रमेश सेनने आम्हाला मुद्दाम नेले. बॅरिस्टरसो ह्या समाजाचे सभासद व ट्रस्टी आहेत. पण त्यांचे लक्ष मुळीच नाही. आपल्यास ट्रस्टी असल्याचे माहीत नाही असे ते स्वतःच म्हणाले, ह्यांचे वडील जात्रामोहन सेन हे एक श्रीमंत भाविक गृहस्थ. ह्यांचा मोठा वाडा व प्रजा येथे आहे. ते ह्या समाजाचे एक संस्थापक व मोठे भक्त होते. बॅरिस्टरसाहेब हे स्वराज्य पक्षाचे देशबंधु दासचे मागे मोठे पुढारी. कलकत्ता कॉरपोरेशनचे लार्ड मेयर. पण सेंटिनरी उत्सवात कलकत्त्यातही कधी आले नाहीत.

माझ्या व्याख्यानातून श्री. केशवचंद्र सेनच्या कर्तृत्वाचा नेहमी झालेला उल्लेख येथील नवविधान समाजाच्या मंडळींना फार आवडला. साधारण समाजातील प्रत्येक प्रसंगी ते येत असत. नवविधानाचे निराळे स्वतंत्र मंदिरे गव्हर्मेंट कॉलेजचेजवळ एक उंचवट्यावर आहे. सुमारे ५/६ च अनुष्ठानिक कुटुंबे आहेत. दर रविवारच्या उपासनेत ५/७ च जण असतात.

चितागाँग

नवविधान समाज

आज ह्या समाजात मला जाहीर उपासना चालविण्यास बोलावले. जाहीर पत्रके वाटल्यामुळे सायंकाळी समाजात बरीच गर्दी जमली. मी साधारणी असून मला वेदीवरून उपासना चालविण्यास सांगितले. हा प्रकार अगदी अपूर्व; व अकल्पनीय ऐक्याचा विजय झाला, असे सर्वजण म्हणून लागले. माझे अभिनंदन होऊ लागले. तरी साधारण समाजाच्या काही जणांना हा प्रकार आवडला नाही. रमेश सेनची ही कारवाई असावी असा त्याचा संशय होता. मी 'समन्वय' ह्या विषयावर इंग्रजीत प्रवचन केले. उपासना हिंदीत केली. स्त्रियांना ती समजली. केशवच्या Baptism in fire, Invisible Church वगैरे लेखांमुळे माझे परिवर्तन होऊन मी ब्राह्मसमाजात आलो असे मजसंबंधी निवेदन केले. घरी परत येईपर्यंत रमेश मुकर्जी व अनिल चौधरी हे कलकत्त्यास जाण्यास स्टेशनावर गेले होते.

आज राजा राममोहन रॉयचे श्राद्ध. सकाळी हरिश्चंद्र दत्त ह्यांनी उपासना चालविली. सायंकाळी ५ वाजता मंदिरात जाहीर सभा झाली. 'राममोहन राय' ह्या विषयावर Rev Mr. Agnus, Prof. J. C. Sinha, Prof. K. Rehman, Mr. V. R. Shinde ह्यांची भाषणे झाली. Mr. S. L. Khastagir येथील साधारण ब्राह्मसमाजाचे अध्यक्ष हे अध्यक्षस्थानी होते. मंडळी बरीच जमली होती. प्रो. रहमान ह्यांनी लांब निबंध लिहून आणिला होता. त्यावरुन राममोहन मुसलमानप्रिय दिसतो.

सप्टेंबर, ता. २८, शुक्रवार

आज सकाळी मंदिरात बाबू शामाचरण सेन ह्यांनी उपासना चालविली. नंतर आम्ही येथील बुद्धविहारात गेलो. ह्या विहारास माझी तिसरी भेट. येथील भिक्षू येथील कॉलेजातील पाली प्रोफेसर आहेत. फसर अगत्यशील आहेत. दोन वेळा त्यांची जेवणाची वेळ असल्याने त्यांच्याशी फुरसतीने बोलण्यास मिळाले नाही.

सप्टेंबर, ता. २९, शनिवार

कुतुबदिया मस्कली

सकाळी ८ वाजता निला स्टीमरने कॉक्सबझारला निघालो. वाटेने सुंदर देखावा दिसला. सुमारे एक तासाने नदी बंगालचे उपसागारास मिळाली. तेथे पोचल्यावर समुद्राला पाहून अती आनंद झाला. पुढे कुतुबदिया व मस्कली बेटाजवळ खाडीतून गेलो. ३।। वाजता पडावात बसून ३ मैलावरील कॉक्सबझारला यावयाला ३ तास लागले. वाटेत नावाड्याशी कटकट झाली. कॉक्सबझार ब्राह्मसमाजात जोगेंद्रसेन वकील ऑनररी मॅजिस्ट्रेट हे एकच ब्राह्म असूनही आमचे स्वागत करावयास दिंडी, पताका घेऊन मुलाबाळासह सुमारे १०० माणसे बंदरावर आली होती. अपूर्व उत्साह दिसला.

सप्टेंबर, ता. ३०, रविवार

सकाळी भल्या पहाटे ५।। वाजता संकीर्तन थाटाने निघाले. येथे ब्रह्मीवस्ती फार आहे. बाजारातून मुसलमान ब्रह्मीच दिसले. हा पूर्वीचा ब्रह्मदेशचाच भाग आहे. आरकानी ब्रह्मींना येथे मग म्हणतात. हा ब्रह्मी माँग अपभ्रंश आहे. हेच मांग असावेत. मघ ब्राह्मणाशी ह्याचा काही संबंध नसावा.

सायंकाळी येथे बौद्ध विहार व टेकडीवर लहानसा पगोडा पाहिला. समुद्राकाठावरील टेकडीवरचा देखावा फारच बहारीचा होता. पाचूसारख्या हिरव्या उंच गवतांनी वेळूनी व तरुलतांनी टेकडी भरून गेलेली दिसली. ढगांनी नभ आच्छादून पाऊस आला. आम्ही ५/६ जण होतो. पगोड्यात आश्रयास बसलो.

रात्री ७।। वाजता येथील लायब्ररी हॉलमध्ये शिवनाथ शास्त्री ह्याच्या श्राद्धानिमित्त मी हिंदीत उपासना व इंग्रजीत प्रवचन केले. खरा स्मृतिदिन कालच होता. पण जलप्रवासामुळे तो आज करावा लागला.

ऑक्टोबर, ता. १, सोमवार

सकाळी जोगेंद्र सेन ह्यांनी मंदिरात उपासना केली. हे नवविधान मताचे आहेत. आमच्या स्वागताचा सर्व खर्च ह्यांच्यावरच होता. हे फार सज्जन गृहस्थ आहेत. प्रवचनात त्यांनी प्रचारक दलावर टीका केली. ह्याचे कारण काल रोजी आम्ही प्रचारकांनी जेवताना त्यांच्या समक्षच भांडणतंटा केला. दोन दिवसांचा प्रोग्रॅम जोगेंद्रांनी मला विचारून केला म्हणून वृद्ध राजकुमार बाबूंना घुस्सा आला होता. आज सकाळी जोगेंद्राचे घरी कुटुंबउपासना ठरली होती. ती त्यांनी विनाकारण परवा सभेत जाहीर केली. मी म्हटले सकाळी मी फिरावयास जाईन कौटुंबिक उपासना सायंकाळी झाल्यास येईन. एरवी येणार नाही. राजकुमार म्हणाले, की जाहीर केल्याप्रमाणे सकाळीच कौटुंबिक उपासना झाली पाहिजे. पण स्वत: जोगेंद्र म्हणाले की घरी बायको आजारी असल्याने सकाळी अनुकूल होणार नाही. तरी राजकुमारांचे समाधान होईना. मी म्हटले राजकुमाराचा स्वभाव तामसी शीघ्रकोपी असल्यामुळे मी त्याच्याशी वादविवाद करु इच्छिणार नाही. राजकुमार भडकले, म्हणाले की ते मजबरोबर प्रवास करू इच्छित नाहीत. मी म्हटले त्यांची मर्जी, त्यांचा मुलगा जितेंद्र रागाने म्हणाला की, मी काय प्रचारक दलाचा नेता आहे ? हा सर्व दिवस असा तुसडेपणानं गेला. आज सकाळच्या उपसनेत राजकुमार व तीन तरुण आले नाहीत. जोगेंद्रास व इतरास हे न आवडून त्यांनी प्रवचनात टीका केली.

तिसरे प्रहरी ३।। वाजता येथील हायस्कुलात मुलांपुढे माझे भाषण झाले. मी राममोहनची बालपणाची गोष्ट सांगून ह्या मुलाचे नाव कोण सांगेल त्यांनी हात वर करावा म्हणालो. त्यापैकी एक मुसलमान मुलाने राममोहन हे नाव उत्साहाने सांगितले. मी उद्‌गारलो हा पहा ब्राह्मधर्माचा विजय. मुसलमान लहान मुलालाही राममोहनाचे नाव माहीत आहे वगैरे.

सायंकाळी जोगेंद्राचे घरी ५०/६० माणसे २०/३० बायका जमल्या होत्या. राजकुमारांनी स्त्रियांसाठी सुंदर उपदेश केला. स्त्री मोठी शक्ती आहे. पुरुषाचे बळ तिच्या प्रेमावरच अवलंबून आहे. वगैरे.

रात्री ७ वाजता Message and Messengers of the Brahma Samaj ह्यावर माझे इंग्रजीत जोरदार भाषण एक तास झाले. कॉक्स बझारचे डेप्युटी कलेक्टर अध्यक्षस्थानी होते. Individual Freedom And Mutual Felloship and Universial Freedom हे तीन ब्राह्मसमाजाचे संदेश राममोहन, देवेंद्र, केशव हे तर मोठे संदेशहारी माहीतच आहेत. पण लहानलहान अनेक संदेशहारी समाजात गेली १०० वर्षे होऊन गेले. त्याचे फळ आजचा समाज व आजचे भारतवर्ष. त्यांची नावे इतिहासात येणार नाहीत तरी भावी जीवनात चिरस्थायी राहतील. ही कल्पना जमलेल्या मंडळीस इतकी आवडली की दुसरे दिवशी सकाळपर्यंत मंडळी माझा गौरव करीत होती. पुष्कळ माणसे दुसरे दिवशी ८ वाजता पोहोचावयास बंदरावर आली होती. मालार्ड बोटीने आम्ही चितागाँगला परतलो.

ऑक्टोबर, ता. २, मंगळवार

चितागाँग

आज मला सन स्ट्रोक (मस्तिष्कताप) झाला. रात्री अन्नदाचरण दासचे घरी सर्वांना आमंत्रण होते. तेथे गेल्यावर माझे माथे फिरू लागले. मी स्वस्थ पडून राहिलो. मोठी मुलगी अमीया दास जी माझी नेहमी फार काळजी घेई, तिने अर्धा तास मस्तकावर थंड पाण्याची संततधार धरून सुमारे एक तास वारा घातला. नंतर उठून मी सर्वांबरोबर जेवण केले.

ऑक्टोबर, ता. ३, बुधवार

पहारतली

आज सकाळी चितागाँग जवळील ३ मैलावरील पहारतली स्टेशनला घोड्याच्या गाडीने गेलो. तेथून १ मैलावर सुंदर विस्तीर्ण टेकड्यांमधून तळे आहे. येथील देखावा अत्यंत प्रेक्षणीय आहे. तेथे प्रार्थना केली. पहारतली येथे बाबू देवेंद्र भट्टाचार्य व त्यांची पत्नी राहतात. पण त्याचे घरी जाण्यास वेळ मिळाला नाही.

बरोमा

रमेश सेन बरोबर तिसरे प्रहरी ३।। वाजता आम्ही बरोमा नावाचे खेडे १८/२० मैल आहे तेथे मोटार लाँचने गेलो. सायंकाळी पोचलो. मी उपासना केली.

ऑक्टोबर, ता. ४, गुरुवार

दुसरे दिवशी सकाळी नगर कीर्तन. राजकुमारची उपासना. तिसरे प्रहरी हायस्कूलमध्ये माझे इंग्रजीत व्याख्यान. रात्री माझी उपासना झाली.

ऑक्टोबर, ता. ५, शुक्रवार

फेनी (जि. कॉमिला)

दुसरे दिवशी पहाटे मोटार लाँचने परत ११ वाजता चितागाँगला आलो. ४ वाजता फेनीकडे आगगाडीतून निघाले. रात्री ७ वाजता फेनी येथे पोचलो. बाबू त्वरित गुप्त हे तिपरा (त्रिपुरा) संस्थानचे महाराजाचे वहिवाटदार ह्यांचे ऑफिशिअल पाहुणे होतो. व्यवस्था संस्थानी थाटाची होती.

ऑक्टोबर, ता. ६, शनिवार

सकाळी नगरसंकीर्तन व उपासना राजकुमाराने चालविली. तिसरे प्रहरी ४।। वाजता कचेरी पुढील मैदानात जाहीर सभा व रात्री ७ वाजता येथील कॉलेजात माझी हिंदीत व इंग्रजीत व्याख्याने झाली.

ऑक्टोबर, ता. ७, रविवार

नोवाखाली

सकाळी ७ वाजता निघून १२ वाजता नोवाखाली येथे रायबहादूर राधाकांत आइस ह्यांचे पाहुणे राहिलो. पावसामुळे दुसरे काही झाले नाही. रात्री समाजात उपासना झाली. रविवारमुळे पास न मिळाल्यामुळे नगरसंकीर्तन झाले नाही. तिसरे प्रहरी ३ वाजता कॉमीलाकडे निघून तेथे रात्री ७।। वाजता पोचलो.

नोवाखाली हा जिल्ह्याचा गाव आहे पण मेघना व पद्मा नदीच्या अत्याचारामुळे ३/४ गाव हळूहळू वाहून गेला आहे. बाकीचा त्याच पंथाला लागला आहे. दक्षिणपूर्व व काही उत्तरभाग भयाण, ओसाड भिजलेल्या चिखलाचा ८/१० मैल पर्यंत दिसतो. पात्राजवळ गेलो असता जमीन कातरून पाण्यात टाकण्याचा नद्यांचा क्रम सतत चालू असलेला दिसतो. विधात्याची विनाशक लीला !

येथे ब्राह्ममंदिर आहे पण नगराप्रमाणेच समाजही कातरला जाऊन मंदिर जवळ-जवळ ओस पडले आहे. रायबहादूर एकटेच ब्राह्म (तेही अनुष्ठानिक नाहीत) हे आमच्यासाठी कॉमिलाहून आपल्या चिरंजिवाचे घरी नोवाखाली येथे आले होते. ब्राह्म समाज म्हणजे वकील, डॉक्टर, सरकारी अधिकारी अशा उपऱ्या, सुशिक्षितांचा. स्थायिक फारच कमी. हे शाळूसोबती चोहीकडे पांगून मंदिर ओस पडल्याची उदाहरणे इतर प्रांतात तर पुष्कळच पण खुद्द बंगाल्यात तर अधिकच ! हे ठिकाण तर एक मोठेच उदाहरण आहे.

ऑक्टोबर, ता. ८, कॉमिल्ला

दोन प्रहरानंतर ३ वाजता नोवाखालीहून ७ वाजता रात्री कॉमिल्ला येथे पोचलो. समाज मंदिरांत बारीसालचे मिशनरी बाबू मनमोहन चक्रवर्तींचे व्याख्यान चालले होते. हा एक पूर्व बंगाल्यातील प्रसिद्ध वक्ता प्रचारक असून श्रोतृ समाज बेताचाच होता. पाऊस पडत होता हे कारण असावे. ब्रह्मदेशातून आणलेली माझी शाल, बॅग, आतील टोवेल्स, लोटा, वाटी वगैरेसह गाडीत विसरूनच आलो. ती माझी बैराग्याची झोळी मला सोडून गेली ह्यावरून वैराग्यास अद्यापि मी किती अपात्र आहे ह्याची सूचना मला वरून मिळाली. झोळी गेली तर मला वाईट वाटण्याचे थांबेना मग काया सोडते वेळी काय वाटेल ते आठवले. तथापि वैराग्य माझे हळूहळू वाढत आहेसे दिसते.

ऑक्टोबर, ता. ८, मंगळवार

दुसरे दिवशी सकाळी माझी मंदिरात मुख्य उपासना झाली. उद्‌बोधनात "त्वम् स्त्री, त्वं पुरुषः कुमार उत कुमारी । त्वं जीर्णो दंडेन वंचसी । त्वं जाता विश्वतो मुखः ।।" हे श्रेताश्वेतर उपनिषदातील वचनावरून जीवात्म्याने अहंकार सोडावे असे सांगितले. मानव जीवित एक मुरली आहे ती वाजविण्यास आम्ही स्वेच्छेने ईश्वरास देणे बरे. ईश्वर जुलूम करण्यास असमर्थ आहे. पण

ता. १२, शनिवार
गोवालंडो

रात्री ९ वाजता दार्जिलिंग जाण्याकरिता चांदपूरकडे जाणाऱ्या गाडीने इंटर क्लासातून निघालो. दार्जिलिंगला जाणारा चटर्जी नावाचा एक सोबती अनायासे गाडीत मिळाला. १ वाजता चांदपुरास आगबोटीवर चढलो.

ती सकाळी निघून गोवालंडोला १ वाजता दोन प्रहरी पोचली. ४।। वाजता पोरादाहला ७ वाजता इबुर्दील पोचलो. तेथे १० वाजता दार्जिलिंग स्पेशल मिळाली. ६।। वाजता सकाळी सिलीगुरी येथे पोचलो. तेथे कांचनगंगा शिखराचे हिमाच्छादित दर्शन खाली मैदानातून घडले.

ता. १३, रविवार
सिलीगुरी

दार्जिलिंग हिमालयन रेल्वेतून सकाळी ७ वाजता निघालो १० वाजता कर्सिआँगला पोचलो.

कर्सिआँग, हिमालय

कलकत्त्याहून हेमचंद्र किंवा युरोपियन पार्टी ह्या गाडीने आलो नाही. रायसो. शरच्चंद्र दास दार्जिलिंगहून आम्हास घेण्यास मुद्दाम आले होते. त्यांनी कार्सिआँग ब्राह्मसमाज मंदिरात माझी उतरण्याची व्यवस्था केली. हे मंदीर अगदी स्टेशन जवळच्या उंचवट्यावर असलेले, लावण्यप्रभा बोस (हेमचंद्रांची परलोकवास पत्नी) हिचे घर. हेमचंद्राने हे सर्व घर (सुमारे १४००० रु. किमतीचे) येथील ब्राह्मसमाजाला दिले आहे. तळमजला उपासनालय व वरचा मिशनरींना साधनासाठी, राहण्यासाठी दिला आहे. खालील साधनाश्रमाचे ५ सभासद ह्याचे ट्रस्टी आहेत. हेमचंद्र सरकार, सतीशचंद्र चक्रवर्ती, हेमेंद्र दत्त, देवेंद्रनाथ मित्र. ही सुंदर, प्रशस्त दोन मजली कुटी असून येथून दरीतून खाली मैदानातील तिस्ता नदीचा देखावा व मेघांचा विलास चांगला दिसतो. एक चौकीदार रक्षक सहकुटुंब असतो. त्याचे नाव भीम बायकोचे नानी. ३/४ वर्षाची एक छोटी गोड मुलगी आहे. नाव काली. हे नेपाळी कुटुंब गरीब व आज्ञाधारक आहे. हे ठिकाण ५००० फूट असल्याने स्नानास गरम पाण्याची आवश्यकता आहे. नानीने २/४ तांब्याभर पाणी गरम दिले ते बारडीभर थंड पाण्यात ओतल्यावर सगळेच थंड झाले. त्यातच स्नान उरकले. स्टेशनवरील रिफ्रेशमेंट रूममध्ये राय साहेबांनी माझ्या जेवणाची सोय केली. हा दिवस माझा एकांताचा व विश्रांतीचा गेला.

तिसरे प्रहरी ३ वाजता हेमचंद्र व शकुंतला आली. दुसरे दोन दिवसाच्या समाजाच्या उत्सवाचा पोग्राम ठरला. ४ वाजता माझे नखुरडे कापून घेण्यासाठी दवाखान्यात गेलो. दोन दिवस पू होऊन मला त्रास झाला होता. कापताना तीक्ष्ण वेदना झाल्या पण पुढे आराम वाटला. रात्रीपर्यंत टेकडीवर फिरावयास गेलो. वाटेत येथील कपिलाराम संस्थेचे परमहंस संन्याशी धर्ममेघ अरण्य हे भेटले. भगवा पोशाख, उंच सुंदर बांधा, गौर कांती, गंभीर चेहरा सायंकाळच्या ढगातून उतरणीवरून उतरताना मोहक दिसला. मुद्दाम परिचय करून घेतला.

आज सायंकाळी 'दाव' टेकडीवर मी एकटाच हिंडत असताना ७/८ वर्षाचा युरोपिअन मुलगा भेटला. तो अनाथ असून येथील एका वसतिगृहात शिकत होता. त्याने मला सलाम करून विचारले.

एक मुलगा हल्ली ग्लासगो येथे एंजिनिअरींग शिकत आहे. आज सकाळी येथील ब्राह्मसमाजाचा शताब्दी उत्सव सुरू झाला. पहिली उपासना मी चालविली. सभासद सर्व सुखवस्तू, दार्जिलिंगला शोभणारे आहेत. युरोपिअन प्रतिनिधी २ पुरुष (Dr. W. H. Drammond and Mr. Monk) व ५ स्त्रिया 1. Mrs. Drummond, 2. Mrs. Monak, 3. Miss Monk, 4. Mrs. Wodehouse, 5. Miss Nettlefield इतके येथे उत्सवासाठी व पाहण्यासाठी ३/४ दिवस आहेत. डॉ. ड्रमंडशिवाय सर्व हाजर होते. तिसरे प्रहरी महिला समाज झाला. मी फिरावयास गेलो.

ता. १७, बुधवार
दार्जिलिंग

सकाळी डॉ. ड्रमंडची उपासना. तिसरे प्रहरी अशोक बोसचे घरी ड्रमंड उतरले होते तेथे चहा व सायंकाळी ५ वाजता टाऊन हॉलमध्ये डॉ. ड्रमंडचे लेक्चर झाले. प्रो. विजयकुमार मुजुमदार (संबळपूरचे) अध्यक्ष होते.

दार्जिलिंग हा गाव बंगाली श्रीमंत आळशाचा व खुशालचंदांचा आहे. अर्थात श्रीमंत ब्राह्माची येथे सुंदर सुंदर ठिकाणी ऐटदार घरे आहेत. प्रसिद्ध चित्तरंजन दासचा पुतण्या अजित दासचे घरी युरोपिअन ५ पाहुणे मिस्टर मंक वगैरे उतरले आहेत तेथे गेलो. अजित विद्वान असून विरक्त वृत्तीचा आहे. फार सात्त्विक व दानशूर आहे. त्याची पत्नी माया विलासी आहे. पण एस. आर. दास आजारी असल्याने दोघेही कलकत्त्याला गेले आहेत. माया हिचा दिवाणखाना अगदी पौरस्त्य अस्सल श्रीमंती थाटाचा आहे. दार्जिलिंगमध्ये इतक्या थाटाचा दुसरा क्वचित. फर्निचर, चित्रे व मूर्ती अगदी नमुनेदार. एक फार खर्चाचे विजेच्या योगे रोग बरे करण्याचे रुग्णालय व सूतिकागृह धर्मार्थ आहे. अजित हा स्वत: वैद्य आहे.

ब्राह्मसमाजात धर्म, अर्थ व काम हे तिन्ही पुरूषार्थ अगदी मनमुराद आहेत ह्याचे हे घर उत्तम साक्ष आहे. ज्ञान, भक्ती, कर्म ही तिन्ही ब्राह्मसमाजात पाणी भरत आहेत. हे सर्व खरे, पण तरी ब्राह्मसमाजात मोक्ष नाही. मोक्षधर्म पाहावयाचा असल्यास तो कोठेतरी बाहेरच पाहिला पाहिजे. निदान तो दार्जिलिंगमध्ये दुर्मीळ. पाश्चात्त्य आसुरी संस्कृतीने येथे हिमालय विटाळलेला आहे. केरळ कन्यकेने मच्छिंद्रनाथास योगभ्रष्ट केले. मेनकेने जसे विश्वामित्रास तपोभ्रष्ट केले तसे येथे पाश्चात्त्य सुधारणेने हिमालयास भ्रष्ट केल्याचा भास होत आहे.

ता. १८, गुरुवार

सकाळी ८।। वाजता हेमचंद्र सरकारांनी मंदिरात उपासना केल्यावर डॉ. ड्रमंडनी प्रवचन केले. त्यांनी काल धर्माच्या अध्यात्मिक भागावर व आज व्यावहारिक म्हणजे सुधारणा व सेवा ह्यावर भाषण केले. ते म्हणाले, धर्माशी कोणताही संबंध नसताही पुष्कळांना मानवसेवा करता येते. पण पुष्कळ वेळा ही सेवा केवळ असंतोषामुळे, अन्यायाची चीड आल्यामुळे रागाच्या भरात केली जाण्याचा संभव आहे. पण ईश्वरी प्रेमाचा साक्षात्कार होऊन ती झालेली पूर्ण होय. तिसरे प्रहरी ४ वाजता टाऊन हॉलमध्ये सामाजिक संमेलन झाले. सुमारे निवडक १०० स्त्रीपुरुषे आली होती. माझ्या मते हा खर्च व्यर्थ आहे. येथे बनारसबाबू, दुर्गाप्रसाद ऑनररी मॅजिस्ट्रेट, लक्सा रोड, बनारस

धारिष्ट्य मोठेच होते. ह्या जंगलात केव्हा केव्हा लहान अस्वले भेटतात, असे मागून ऐकले. पण एकंदरीत काही धोका नाही. श्वापदे, साप, चोर, काटेरी झाडे वगैरे कशाचीही येथे बाधा नाही. येथे मला घरच्या मंडळींची फार आठवण झाली.

फॉरेस्ट स्कूलवरून उतरून मी पुनः व्हिक्टोरिया स्कूल नावाच्या युरोपिअन मुलाच्या विस्तीर्ण शाळेत गेलो. वसतिगृहाच्या दुसऱ्या मजल्यावरील व्हरांड्यातून मी कांचनगंगा थोडी पाहिली. उन्हातून तिचे निरनिराळे रंग दिसले. ह्या शाळेतील विस्तीर्ण खेळण्याची मैदाने व इतर उत्तम व्यवस्था पाहून मी थक्क झालो. प्राचीन काळी आमच्याकडे अशी गुरुकुले होती. पण त्यात धार्मिक शिक्षण दिले जात असे. येथेही एक सुंदर उपासना मंदीर आहे. पण शिक्षणाच्या वातावरणात आध्यात्मिक भाव नाही. पाश्चात्त्य लोक ऐहिक विषयात तल्लीन झाले आहेत.

नंतर मी १० वाजता खाली कापिलारामातील स्वामी धर्ममेघ परमहंसाला भेटला. त्यांची रोज सांख्य योगांवर तिसरे प्रहरी तीन वाजता दुर्गापूजेत प्रवचने चालू आहेत. सायंकाळी हेमचंद्राने उपासना चालविली. आज कलकत्त्याहून पंजाबचे डॉ. बालमुकुंद येथे आले.

ता. २१, रविवार

आज भल्या पहाटे ३।। वाजता उठून चिमनी येथील घाटशिळेवरून कांचनगंगा सूर्योदयाच्या वेळी पाहण्याचा माझा निश्चय होता. डॉ. बालमुकुंद मजबरोबर येणार होते. शकुंतलेने लोणी भाकरी, केळी, पेरू वगैरे आमचे पाथेय व्यवस्थेने एका डब्यात भरुन ठेविले. पण रात्रभर आज पाऊस पडल्यामुळे आम्ही हिरमुसले झालो. दार्जिलिंगमध्ये माझी ढगांनी अशीच निराशा केली. सकाळी चहा झाल्यावर रविवारचा बाजार केला. वाटाण्याच्या शेंगा, पाच आणे शेराप्रमाणे घेतल्या. कलकत्त्यास आठ आणे शेर, पुण्यास एक आणा. केव्हा केव्हा दोन पैसे शेर मिळतात. सर्व भाजीपाला असाच महाग आहे. ताजे म्हशीचे दूध मात्र दर रूपयास ६ शेर स्वस्त आहे.

नंतर बालमुकुंद, टेकडीचे खाली सुमारे १००० फूट. बाबू सुशांत हलधर ह्यांचे शेत आणि वाडी आहे. त्यांचे नाव Holnybury असे आहे. वाटेने उतरणीवरचे चहाचे मळे अतिसुंदर दिसले. बाजाराचा दिवस असल्यामुळे नेपाळी व भुतानी बायका पाठीवर बांबूच्या पाट्या व त्यातली आपली मुले घेऊन येताना भेटल्या. त्यांचा पोषाख पूजेच्या सणानिमित्त नवा व दागिनेही होते.

१० वाजता हलधर बाबूंचे घरी पोचलो, भ्दांचा सुमारे १९ एकरचा मळा व त्यात दोन मोठे सुंदर नव्या थाटाने शृंगारलेले बंगले आहेत. एकात ते स्वतः व दुसऱ्यात कुचबहारच्या महाराजाचे परलोकवासी बंधू गजेंद्रनारायणची पत्नी सुनीतीदेवी पाहुणी राहात आहे. सुशांत बाबूच्या वृद्ध आईने आम्हाला चहा व फलाहार दिला. बाबूनी चोहीकडे फिरुन आपल्या मळ्यातील मलबेरी, आंबे, जांभूळ, पीच, पेरू, वांगी वगैरेची झाडे, कोंबडी, बदके वगैरे दाखविली. नुकत्याच महिन्यापूर्वी बिब्या वाघाने त्यांची एक मोठी कुत्री नेली असे सांगितले. जंगली बकरे, कोल्ही वगैरे शिकार ते करतात. शेत खालवर उंचवट्यावर फारच सुंदर व निवांत दिसले. मग दुसऱ्या मजल्यावर बाबूचे परलोकवासी वडील यांची व त्यांच्या दोन प. वा. मुली रक्षा संगमरवरी घटात खरी घरात ठेवली आहे. ह्या सुंदर प्रशांत स्थळी आम्ही अल्पशी प्रार्थना करून परत निघालो. घरी १।। वाजता पोचलो. आज रविवारची उपासना मी इंग्रजीत चालविली.

आज येथे दसऱ्याला सण होता. आमच्या ब्राह्ममंदिराजवळील लायब्ररीत काही बंगाल्यांनी दुर्गापूजा चालविली. ४ दिवस सांजसकाळी वाजंत्र्याचा वा ढोलग्यांचा गोंगाट होता. आज दुर्गेचे विसर्जन गणपतीप्रमाणे झाले. जनसमाजात धर्माला करमणुकीचे स्वरूप सर्वत्र येते. जो मेळा निघाला तो पाहण्यास मोठे मोठे सुशिक्षित बंगाली तसेच पहाडी, नेपाळी व भूतानी मजूरही सणाचे कपडे घालून आले होते. सुमारे ५०० चा मेळा सायंकाळी निघाला. पुण्याचा गणपतीउत्सव केवळ राष्ट्रीय करमणुकीचा. त्यापेक्षा दुर्गोत्सवात पूजेचे अंग जास्त आहे. वाजंत्र्याप्रमाणे भटजींचा सुळसुळाट आहे. पण केव्हा केव्हा भटजीपेक्षा ढोलकेवाल्यांची वरचढ होते. आज सकाळी समोरील गृध्र कूटावर चढून देखावा पाहिला. येथे बरद्वान महाराजांचा बंगला आहे. पण टेकडीच्या शिखरावर हिंदू स्मशान आहे. बाजूवर चहाचे मळे आहेत. त्यातील काही चहाची पाने व सुंदर फुले घेऊन चि. जनाक्काकडे पत्रातून दसऱ्याची ओवाळणी म्हणून पाठविली. Centenary Pilgrim's Progress चा दुसरा अंक. आमच्या मिशन यात्रेची माहिती Indian Messenger कडे १० पाने इंग्रजीत पाठविली.

ऑक्टोबर, ता. २५, गुरुवार

सकाळी दार्जिलिंग रस्त्याने २ मैल फिरून आलो. ह्या रस्त्यावरून बालाशान दरीचा देखावा चांगला दिसतो. दोन प्रहरी १ वाजता कर्सिआंग सोडले. चार वाजता सिलिगुरी, ८ वाजता पार्वतीपूर, दुसरे दिवशी पहाटे ३ वाजता कटीहार पोहचून तेथे बाकीपूरसाठी सोनपूरची गाडी घेतली.

ऑक्टोबर, ता. २६, शुक्रवार

बरौनी

दोन प्रहरी ११।। वाजता बरौनी जंक्शनवर आलो. सोनपुराहून गंगा उतरून बाकीपुरास पोचण्यास रात्र झाली असता म्हणून येथेच उतरून मोकामे घाटास पोचलो. तिकीट बदलण्यास चार आणे जास्त द्यावे लागले. गंगेवर स्टीमरचा प्रवास अर्धा तास सुंदर झाला.

मोकामे

दोन प्रहरी २ पासून मोकामे जंक्शनहून पाटना जंक्शन (बांकीपूर) पर्यंत ६.१ चा गंगा पाटना जंक्शन (बांकीपूर) पर्यंत E. I. Ry. चा गंगा तटाकाचा देखावा फारच नयनमनोहारी झाला. गंगेचे महत्त्व भारत देशाला किती आहे हे तिच्या सुजल सुफल तटाकावरुन फिरल्याशिवाय दिसत नाही. ज्वारी बाजरीची लागवड येथे होऊ लागलेली पाहून आश्चर्य वाटले. ज्वारीची धाटे १५/१६ फूट उंच, तूर ७/८ फूट उंच पाहिली. कापसाची लागवड बंद झाली आहे. ह्यात लँकशायरचे राजकारण दिसते. बिहारात तांदळाची लागवड गव्हाची मिळूनच आहे. मिरची, तंबाखू, एरंड त्याचप्रमाणे शिसवी, आंबा, वड वगैरे झाडावर बंगालचा देखावा मागे पडून हिंदीचे साम्राज्य दिसू लागले. सायंकाळी ६ वाजता बांकीपूर येथील राममोहन राय सेमिनरीचे भव्य इमारतीत उतरलो.

ऑक्टोबर, ता. २७, शनिवार

बाकीपूर

बांकीपुरातील समाजाची मुख्य मंडळी सर्व दुर्गापूजेच्या निमित्त बाहेरगावी गेली होती. राममोहन हायस्कूलचे हेडमास्तर डाक्काला गेले होते. त्यांची पत्नी (श्रीशचंद्र चक्रवर्तीची) व तिची पाच मुले

व तिचा पुतण्या विरेंद्र ह्यांनी स्वागत केले. सकाळी गंगा किनाऱ्यावर थोडा फिरुन आलो. पण मला वाटेच्या श्रमाने व एकाकी हवेचा व स्थळाच्या उंचीचा बदल झाल्यामुळे कणकण आली. सर्व दिवसभर निजून होतो.

सायंकाळी येथून ५ मैलावर गर्दन बाग म्हणून ठिकाण आहे. तेथे ब्राह्म मंडळी उपासनेत जमा झाली पण मला जाणे झाले नाही. त्यांची मोठी निराशा झाली. विनोद बिहारी घोष मला भेटले.

ऑक्टोबर, ता. २८, शुक्रवार

सकाळी राममोहन सेमिनटीचे हॉलमध्ये रविवारची साप्ताहिक उपासना चालविली. ६ पुरुष व महेंद्र कुमार सेनची पत्नी इतकीजण हजर होती. विनोदबिहारीचे घरी जेवलो. सायंकाळी येथील नवविधान मंदिरात उपासनेस गेलो. ग्यानांजन नियोगी कलकत्त्याचे काँग्रेस भक्त ह्यांनी उपासना चालविली. आज शारदीय पौर्णिमा होती. त्यांनी उपासनेत दुर्गेचा उल्लेख करुन शारदीय उत्सवाप्रीत्यर्थ प्रार्थना केली.

मंदीर सुंदर, स्वच्छ व भव्य होते. नीटनेटकेपणा व निवांतपणा, विजेचे दिवे व पंखे एकंदर फारच समाधानकारक दिसली. असा देखावा इतर समाजात विरळा. उपासक मंडळी ८/१० च होती. सत्यसुंदर बोसने संगीत उत्कृष्ट केले. २५ वर्षापूर्वी प्रकाशचंद्र रॉय होते त्यावेळेपेक्षा सभासद, उत्साह कमी आहे तरी एकंदरीत इतर ठिकाणी जी पडती कळा दिसली तशी येथे न दिसता मोठा उल्हास वाटला. उपासना आध्यात्मिक भाव उत्पन्न करणारी झाली.

येथील प्रसिद्ध बॅरिस्टर, काहीवेळ हायकोर्टचे जज्ज बाबू पी. के. सेन भेटले. त्यांनीहूनच मला केंब्रिजची ओळख दिली. मला त्यांनी तेथे बोलावले होते, वगैरे सांगितले पण मला न आठविल्यामुळे शरमविले.

रात्री महेंद्रकुमार सेनचे घरी त्यांच्या पत्नीने जेवणास बोलाविले. प्रो. मेहेंद्रकुमार सुट्टीनिमित्त बाहेर गेले होते. दार्जिलिंग येथील सुषमा ह्यांचीच मुलगी तिची बहीण शोभना येथे होती. विनोदबाबूची मुलगी लतिका बी. ए. हिलाही व वीरेंद्राला आमंत्रण होते. एकंदर मेळा तरुणांचा होता. लतिकेने 'के विदेशी बन उदासी' ही बंगाली गज्जल सुंदर म्हणून दाखविली. काजी नझरूल इस्लाम हे तरुण मुसलमान बंगाली कवी बंगालचे गडकरी आहेत. त्यांचे हे शृंगारिक काव्य बहारीचे आहे. ते मी उतरून घेऊन लतिकेकडून पुनःपुन्हा म्हणवून घेतले. तिनेही मोठ्या प्रेमाने मला शिकविले. ती उद्याच अलाहाबादेस शाळेत शिक्षक असल्याने जाणार आहे. मला तेथे आवश्य भेटण्यास सांगितले. ही रात्र ह्या गाण्याच्याच तंद्रीत गेली. रवींद्रनाथाने भाकीत केले आहे की हा मुसलमान कवी त्याच्यावर ताण करणार.

आक्टोबर, ता. २९, सोमवार

गया

गयेहून बिहारीलाल गुप्तचे न येण्याविषयी निराशेचे पत्र आले. सुटी, आजार वगैरे कारणांमुळे. तरी मी १२ वाजता निघून अंबिकाप्रसादाचे घरी मुरारीपुऱ्यात गयेस पोचलो. ३।। वाजता बाबूजी आपुल्या हासवा नामक जमीनदारीच्या गावी गेले होते. त्यांच्या पत्नीने स्वागत केले.

ऑक्टोबर, ता. ३०, मंगळवार

सकाळी फल्गू नदीवर फिरावयास गेलो. परत येऊन चहा घेऊन डॉ. सुकुमार गुप्त व बिहारीलालचा गुप्त ह्यांना भेटावयास गेलो पण दोघेही घरी नव्हते. बिहारीलालचा तरुण जावई बंकीमचंद्र चौधरी भेटला. तो बाहेरूनच मजशी बोलला. माझी ओळख कलकत्त्याची त्यानेच सांगितली. पण गृहस्थाने मला या, बसा देखील म्हटले नाही. बिहारीलालचे पत्नीने आतून मला पाहिले. हा लोकांचा अडाणीपणा. मी घरी परत आलो तरी अंबिकाबाबू आजही आले नाहीत. त्यांच्या पत्नीनी एक माणूस पाठवून रात्री त्यांना बोलावून घेतले.

बंकीमचंद्र मला संध्याकाळी भेटावयास आले. उद्या सायंकाळी मंदिरात ७ वाजता उपासना ठरली. सकाळी बौद्ध गयेला जावयाचे ठरले. रात्री मंदीर पाहिले. आणखी काही देवळे, बाजारचौक, नदीवरचा पूल वगैरे पाहिले. मारुतीची इकडे मी देवळे व मोठ्या मूर्ती पाहिल्या. त्याला इकडे महावीर म्हणतात.

ऑक्टोबर, ता. ३१, बुधवार

बुद्धगया

सकाळी आठ वाजता मी, बंकीमचंद्र, त्याचा मेहुणा शांतिबिंदू गुप्त, मावसबहीण बनज्योत्स्ना भट्टाचार्य, डाकाच्या अमरचंद्र भट्टाचार्याची कन्या असे चारजण घोड्याच्या गाडीतून बौद्धगयेला गेला. ती गयेच्या दक्षिणेला ७ मैल आहे. उद्या येथे गव्हर्नर येणार म्हणून कमानी मंटपाची तयारी चालली होती. हे स्थळ मी मागे २० वर्षापूर्वी पाहिले होते. त्यापेक्षा चोहीकडचा बराच भाग उकरून बरेच लहानमोठे स्तूप मोकळे केलेले दिसले. मुख्य मंदीर भव्य उंच भरभक्कम पूर्वाभिमुखी आहे. स्वच्छ व नीटनेटके आहे. मागील खेपेस इतके स्वच्छ नव्हते. मग गव्हर्नरचे आभार मानावेत की काय ? पश्चिम बाजूचे उंच भागावर एक सुंदर नवीन दुमजली धर्मशाळा आहे. ती अनागरिक धर्मपालच्या परिश्रमाने बांधली आहे. ब्रह्मदेश व सिलोनहून १५००० रु. मदत मिळाली आहे. बाकीचा खर्च गया डिस्ट्रिक्ट बोर्डाने केला आहे. येथे कोणासही, विशेषत: बौद्ध उतारूंना, राहता येते. तिबेटचीनकडचे बरेच भिक्षू वरच्या मजल्यात असतात. स्थळ शांतिकारक व रमणीय आहे.

परत येताना विष्णुपद मंदीर फल्गू नदीचे काठावर उंच टेकडीवर भव्य काळ्या दगडाचे बांधलेले आहे. ते पाहिले. फल्गू नदी बौद्ध गयेहून येते. तिला समांतरच रस्ता आहे. विष्णुमंदीर इतर देवळाप्रमाणे बेशिस्त घाणेरडे आहे. देऊळ पुष्कळ पैसे खर्चून बांधले आहे. पण बेढब आहे. भुवनेश्वराच्या देवळाप्रमाणे येथे कलाकुसरी मुळीच नाही. पिंडदान व श्राद्धविधीचा गोंधळ व भिकाऱ्यांची गर्दी पुष्कळ दिसली. ते भोळ्या यात्रेकरूंना बेजारून सोडतात. घरी १२ वाजता आलो. गाडीवानाने तीन रुपये घेतले. ते बंकीमचंद्राने दिले.

रात्री ७ वाजता येथील ब्राह्म मंदिरात मी शतवार्षिक उत्सवानिमित्त एक खास उपासना चालविली. पण त्यावेळी बाबू विश्वमोहन, बंकीमचंद्र, सेन वकील, डॉ. सुकुमार गुप्त अंबिकाप्रसाद इतकीच मंडळी. बिहारीलाल किंवा कोणी स्त्रिया आल्या नाहीत. इतकी उदासीनता पाहून मला वाईट वाटले. बंगालशिवाय इतर प्रांतीय लोक ब्राह्मधर्माकडे लक्ष देत नाहीत आणि आपल्या प्रांताबाहेर

तर आताच मोठे आहे. सर्व हिंदुस्थान व दक्षिण आफ्रिकेतून विद्यार्थी व प्रोफेसर येतात. तरी पण पौरस्त्य लक्षणे येथे न दिसून सर्व आत्मा आधुनिक व पाश्चात्त्य थाटावर आहे. हे पाहून निराशा होते. इमारतीचा थाट हिंदू जैन तऱ्हेचा आहे. त्यातही विविधता किंवा कल्पकता originality दिसत नाही. तथापि col.wedgewood M. P. ने म्हटल्याप्रमाणे "The thing that Indians have done in this century ह्या देशात हिंदूनी केलेली सर्वात मोठी गोष्ट," हे काही अंशी खरे आहे. हिच्यापेक्षा हिंदूंची मोठी कृत्ये आहेत. त्यात ब्राह्मसमाज एक आहे.

सायंकाळी ६ वाजता दुर्गाप्रसादचे घरी मी ब्रह्मोपासना चालविली. प्रो. दत्त, Mid wife Mrs. B. M. Sen, महेशचंद्र चक्रवर्ती व काही मुले, दुर्गाप्रसाद व त्यांची काही मुले हजर होती. मिसेस दुर्गाप्रसाद बाहेर व्हरांड्यात भिंतीआड बसल्या होत्या. ही बाई दार्जिलिंगमध्ये पुरुषांत मजबरोबर आज आपल्या घरी एक दुसरा हिंदुस्थानी मनुष्य होता, ह्या सबबीवर सर्वांबरोबर बसली नाही. आश्चर्य ! बंगाली लोक येथे ब्राह्मो फार नाहीत. बंगाल्याबाहेर बंगाली ब्राह्मो गेला म्हणजे त्यांचा ब्राह्मधर्म विरघळतो. ज्याप्रमाणे हिंदू आपल्या प्रांताबाहेर गेला म्हणजे आपली जात फारशी पाळत नाहीत. त्याचप्रमाणे ब्राह्मही आपला धर्म फारसा पाळत नाहीत काय ?

नवंबर, ता. ३, शनिवार

गंगेवरून देखावा

सकाळी गंगेवर एक नाव करून शहराचा देखावा पहावयास गेलो. नावाड्याला १० आणे दिले. पण हा फार उद्धट आणि भांडखोर होता. दशाश्वामेध घाटावर नाव घेऊन दक्षिणेकडे हरिश्चंद्र घाट अमृतराय नागाराव घाटापर्यंत गेल्यावर हा भांडू लागला. म्हणून त्याचे पैसे देऊन त्याला सोडून दिले. गंगेचा सर्व किनारा मोठमोठ्या संस्थानिकांनी आपल्या हवेल्या बांधून व्यापला आहे. आपला वाईचा घाट, बडोद्याचा घाट अमृतरावाचा घाट प्रमुख आहेत. स्मशानाच्या घाटाला हरिश्चंद्र हे नाव आहे. प्रेते जळत असता पहारा करण्यास हरिश्चंद्र बसत होता ती देवडी अद्यापी दाखवितात. येथे ज्या डोंबाची नोकरी करीत होता. त्याची मोठी विस्तीर्ण हवेली व घाट इतर राजे रजवाड्याच्या हवेलीसारखीच आहे हे पाहून आश्चर्य वाटले.

९ वाजता, अन्नछत्रे

बोट सोडल्यावर आम्ही काठाने चालत विश्वेश्वराचे देवळात गेलो. हे रस्ते फारच अरूंद ४/५ फुटांचे व दोन बाजूंनी ३/४ मजली हवेल्या. त्यात माणसांची व गुरांची खेचाखेची. बनारशी रेशमी वस्त्रे व पितळेच्या सुंदर सामानाची दुकाने येथेच आहेत. मोठमोठ्या अन्नछत्राच्या दारात शेकडो अतिथी, अभ्यागत, बैरागी, अनाथ, विधवा, विद्यार्थी जेवणाची वाट पाहत बसलेले दिसले. १००-१५० लोकांना १०।। वाजण्याच्या आत अशा ठिकाणी अन्न मिळते. महिन्यातून तीन वेळांपेक्षा जास्तदा मिळत नाही. डाळ-भात, भाज्या, दूध दही भरपूर मिळते. मात्र येथेच बसून खाल्ले पाहिजे. भिक्षेकरी, यात्रेकरी, गिऱ्हाईक ह्यांची खेचाखेची होते. गंगास्नान करून विश्वेश्वराचे दर्शन घेऊन परत चाललेली, सुंदर गोषातील स्त्री अथवा बुद्ध ब्राह्मण, त्यांना धक्का देऊन जाणारी एखादी भंगीण. पूजेचे सामान घेऊन कोणी जातो तर त्याचेसमोर एखादी बंगाली बाई एखादा मोठा मासा भाजीसाठी घेऊन येते. मधूनच एखादा महारोगी शिरतो. पंजाबी, बंगाली, गुजराथी, तेलंगी ह्यांचा रंगीबेरंगी देखावा व त्यांच्या भाषेचा हार्मोनियम नेत्रांना व कर्णांना सुखावह वाटतो.

ता. ५, सोमवार
अलहाबाद

सकाळी ५ ला उठून सर्व आटपून ६ ला स्टेशनवर गेलो. ६।। ला अलहाबादला निघालो. सुमारे १० वाजता तेथे पोचलो. ४ दिवस अगोदर लिहिले होते तरी ध्रुवज्योती सेन स्टेशनावर आले नाहीत. प्रोफेसर अमीयचंद्र बानर्जी युनिव्हर्सिटीचे मोठे वजनदार माणूस. त्यांचेकडे गेलो. त्यांचे वृद्ध वडील ग्यानचंद्र ह्यांनी स्पष्ट सांगितले, आपण नवविधानी हा सेंटनरी उत्सवच मानीत नाही. मला वाईट वाटले. त्यांनी आपल्याकडे उतरण्यास वरवर सांगितले. मला बरे वाटले नाही. ध्रुवज्योतीचा पत्ता विचारून त्यांना कॉलेजात भेटलो. त्याचे कॉलेज त्याचदिवशी सुरू झाले होते. घरी त्याची बायको नव्हती. एक दुसरा पाहुणा होता. त्यांने डॉ. न्यरोधचंद्र मैत्रकडे नेले. हे हेरंबचंद्र मैत्र चे पुतणे. साधारणीस्ट असूनही ह्याना हा उत्सव नको होता. शिवाय त्याच्या हाताला जबर जखम होऊन ते आजारी होते तरी प्रॅक्टीस डाक्टरीची करत होते. त्यांनी स्वागत केले नाही. शिवाय त्यांचे घर भर वस्तीतून फार दूर होते. म्हणून शेवटी जुलमाने ध्रुवज्योतीच्या घरी एकटा गेलो. तिसरे प्रहरी १ वाजला वैतागलो. रजा घेऊन येतो म्हणाले. ते ५।। झाले तरी येईनात. त्यांच्या कॉलेजच्या प्रिन्सिपालाच्या टेबलावर माझ्या चष्म्याचे घर मी विसरलो होतो. येथे काही काम होण्याचा संभव उरला नाही. कारण ध्रुवज्योती एकटाच काम करणारा पण त्या दिवशी त्रासलेले दिसले. भ्दांनी विचारून पोग्राम ठरवावा म्हणून मी त्यांच्याकडे कॉलेजात गेलो. मीही फार वैतागलो होतो. मी त्यास म्हटले, ३।। वाजता येतो असे म्हणाला पण ५।। वाजले तरी आला नाही. ते म्हणाले, आज पहिला दिवस मला एकाएकी फार काम लागले. मी म्हटले मला तशी एखादी चिठ्ठी का लिहिली नाही, असे म्हणताच त्या तरुण गृहस्थाचा त्रास कळसाला पोचून तो एकदम माझे अंगावर खेकसून बोलला, 'तुम्ही मिशनरी आहा तर आम्हावर का असे अवलंबून ? तुमचे काम करा जा. आम्हाला का त्रास? मी काय तुमचेबरोबर घरोघर हिंडू काय ?' मी अत्यंत वाईट वाटल्यामुळे शांत झालो. 'अहो मजवर का रागवता. मला तुम्ही अगदी स्तब्ध केले.' तो पुनः म्हणाला. 'तुम्ही फार तापट दिसता' उलट मला असा बोल लावल्यामुळे ब्राह्मसमाजाविषयी बंगाल्याबाहेर किती अनास्था आहे ह्याचे मूर्तिमंत चित्र मजपुढे उभे राहिले. मी चष्म्याचे घर घेऊन निघालो. ध्रुवज्योतीला टांग्यातून जावयाचे होते. त्यांनी तो करून मला त्यात बोलविले. हा त्यांचा अत्याचार व पाहुणचार दोन्हीचा एकाचवेळी स्वीकार करणे मला बरे वाटले नाही. मी नाकारून पायीच निघालो. ते पुनः चिडले. मी त्यांना शांतपणे म्हटले, मला काही कामाकरिता पायी जाणे आवश्य आहे. आज रात्रभर मला कसेतरी आपल्या घरी राहिलेच पाहिजे. तर तुम्ही पदोपदी असे चिडून नका. मी पायी घरी आलो. ध्रुवज्योती माझे आधीच आले होते. वाटेत केळी व पाव मी घेणार होतो. पण तीही मला मिळाली नाहीत. घरी आलो तर ७ वाजून अंधार पडला. मी एकदम थकून त्रासून बिछान्यावर पडलो. बऱ्याच वेळाने थोडा पाव व थोडे दूध घेतले. निजताना ध्रुवज्योतीचा राग शांत होऊन त्यांनी दुःख प्रदर्शन केले.

नवंबर, ता. ६, मंगळवार
मुंबईचे वाटेवर परत

सकाळी पहाटे उठून मला चहा दिला. अल्पशी दोघांनी प्रार्थना करून टांगा करून मी स्टेशनावरून चौककडे निघालो. एकदम मुंबईचे तिकीट घेतले. चौकावर कलकत्त्याहून मुंबईची मेल

टिपा

१. Thomas Hughes यांनी लिहिलेल्या 'डेव्हिड लिव्हिंग्स्टन' ह्या चरित्रावरील (प्रकाशक, मॅकमिलन आणि कं., लंडन, प्रथम प्रकाशन १८८९) अभिप्राय. म. शिंदे यांनी नमूद केलेला उतारा लिव्हिंग्स्टनच्या ७ जुलै १८७२ च्या रोजनिशीतील आहे (तेरावे पुनर्मुद्रण, १९२८ ह्या प्रतीत पृ. १७२). डेव्हिड लिव्हिंग्स्टन (१८१३-१८७३) ह्याने धर्मप्रसार करणे, पूर्व आफ्रिकेतील गुलामांचा व्यापार थांबविणे व नाईल नदीचा उगम शोधणे हे उद्देश मनात ठेवून १८६६ मध्ये आफ्रिकेतील अखेरची सफर सुरू केली. त्याने ह्यावेळेस आपल्याबरोबर घेतलेले आशियाई व आफ्रिकी मदतनीस त्याला सोडून गेले. त्यांनी त्याची औषधाची पेटीही पळविली व लिव्हिंग्स्टन मेला असे उठविले. त्याच्या ह्या अखेरच्या काळात तो आजारी होता. त्याचा शोध घेण्यासाठी आलेला 'न्यूयार्क हेराल्ड' चा वार्ताहर एच. एम. स्टॅन्ले त्याला ह्या काळात भेटला. दोघांनी मिळून काही दिवस प्रवास केला. स्टॅन्ले ह्याचा परत स्वदेशी जाण्याचा सल्ला न जुमानता लिव्हिंग्स्टनने नाईलच्या मुखाचा शोध घेण्याचा प्रयत्न चालूच ठेवला. त्याच्या आजारी व एकाकी अवस्थेतील वरील उद्‌गार आहेत. रोजनिशीतील शेवटची ओळ पानाच्या जीर्णतेमुळे नष्ट झाली आहे.

२. हा मजकूर रोजनिशीच्या नवीन पानावर सुरू होतो. त्याचा कोपरा झिजलेला आहे. कदाचित नवीन तारखेखालील हा मजकूर असू शकेल. उल्लेखिलेले पुस्तक : F. W. Bain, *On the Principles of Wealth-Creation; Its Nature, Origin, Evolution and Corrolaries;* London, Parker James and Co., 1892.

३. हे चिंतामणी कोण याचा नेमका पत्ता लागत नाही. जमखंडीच्या परशुरामभाऊ हायस्कूलमधील विद्यार्थांच्या जंत्रीमध्ये इ. स. १८८४ मध्ये दाखल झालेल्या विद्यार्थ्यांत चिंतामण यशवंत यादवाड असे नाव आढळते. म. शिंदे यांचे वडील रामजी यांचा यादवाड कुटुंबाशी स्नेह होता व आप्पा यादवाड हे दत्तक जाऊन जमखंडीचे अधिपती म्हणून श्रीमंत आप्पासाहेब पटवर्धन बनले. (भगिनी जनाबाई शिंदे, 'स्मृतिचित्रे', साप्ताहिक तरुण महाराष्ट्र, पुणे, संपादक अ. आ. मानकर, दि. २०-१-१९४९). सदर चिंतामणी हे यादवाड कुटुंबातील असण्याची शक्यता आहे. पन्हाळगड वगैरेच्या कौटुंबिक सहलीत हेच चिंतामणी त्यांच्यासोबत असावेत. (पहा, प्रस्तुत रोजनिशी, पृ. ५४, ५६).

४. गोविंदराव सासने (१८७२-१० ऑक्टोबर १९६४). अण्णासाहेब शिंदे यांचे अखेरपर्यंतचे निकट स्नेही. ह्यांचे वडील कोल्हापूर संस्थानात फौजदार होते. गोविंदराव काही काळ कागल येथील हायस्कूलचे हेडमास्तर. त्यानंतर शिक्षणखात्यात असि. डे. एज्यु. इन्स्पेक्टर. सार्वजनिक कामाकडे ओढा. राजर्षी श्री शाहू महाराजांच्या प्रेरणेने १९१८ मध्ये निवृत्त होऊन सत्यशोधक समाजाचे काम. अस्पृश्यतानिवारणाच्या कार्यात विशेष भाग घेतला. (मुलाखत : श्री. सासने यांचे जावई री. नानासाहेब व्यंकटराव सूर्यवंशी, कोल्हापूर, व श्री. सासने यांच्या कन्या श्रीमती सुशीलाबाई मोहिते, कोल्हापूर).

५. श्री. शि. म. परांजपे यांच्या 'काळ' ह्या वृत्तपत्राचा हा उल्लेख आहे. 'काळ' चे प्रारंभीचे अंक शोध करूनही पाहावयास मिळाले नाहीत.

६. पुणे येथील १८९८ च्या प्लेगात अण्णासाहेब राहात असलेला जमखंडीकरांचा वाडा पठाण, बलुची लोकांना राहाण्यासाठी रिकामा करून द्यावा लागला; व ते भगिनी जनाबाईंच्या एका मैत्रिणीच्या वडिलांच्या शुक्रवार पेठेतील वाड्यात राहावयास गेले. तेच हे कंत्राटदार. आपल्या आठवणींमध्ये जनाबाईंनी ह्या कुटुंबाविषयी माहिती दिली आहे ('स्मृतिचित्रे', तरुण महाराष्ट्र, पुणे, दि. १-४-४९).

जनाबाईंचा जन्म १८७८. विवाह त्यांच्या लहानपणीच झाला. त्या चार यत्ता शिकलेल्या. नवरा निरक्षर. नवऱ्याकडून भयंकर छळ होऊ लागला. त्याने द्वितीय संबंधाची बाई घरात आणली व जनाबाईच्या जिवाला धोका निर्माण झाला तेव्हा अण्णासाहेबांनी जनाबाईस कायमचे माहेरी आणले. पुण्यास मॅट्रिकपर्यंत शिक्षण. पनवेलीस हेड्मिस्ट्रेस असताना नोकरी सोडून अण्णासाहेबांच्या मिशनमध्ये आजीव कार्यवाहक झाल्या. अण्णासाहेबांच्या अस्पृश्यतानिवारणाच्या व धर्मप्रसाराच्या कामात निष्ठावंतपणे आयुष्यभर साह्य केले. आगीच्या अपघातात सापडलेल्या शेजारच्या सौ. मट्टू ह्या तरुणीस वाचविण्याच्या प्रयत्नात स्वत: भाजून पुणे येथे २७ एप्रिल १९५६ मध्ये मृत्यू.

७. पोटे हे जमखंडीचे सुखवस्तू कुटुंब. हरिपंत पोटे हे फौजदार. अण्णासाहेब शिंदे यांचे स्नेही विष्णुपंत देशपांडे, तेरदाळकर यांशी आप्तसंबंधाने निगडित. येथे उल्लेखिलेल्या विष्णू हरीचा मृत्यू १९३५ मध्ये वयाच्या ६५ व्या वर्षी व कृष्णाजी हरी यांचा मृत्यू १९११-१२ च्या सुमारास झाला. (जमखंडी येथे श्री. विष्णू उर्फ बाबूराव दामोदर हुल्याळकर यांच्यासमवेत पोटे कुटुंबियांची मुलाखत).

८. श्री. रामचंद्र नारायण सावंत. अण्णासाहेबांचे मित्र. १८९५ मध्ये पुण्यातील सदाशिव पेठेतील नागनाथ पाराजवळ पालकरांच्या वाड्यात अण्णासाहेब व त्यांचे मित्र जनुभाऊ करंदीकर, सासने व हे सावंत राहात होते.

९. 'करमणुकी' मधून क्रमश: प्रसिद्ध होत असलेल्या हरिभाऊ आपट्यांच्या 'कृष्णदेव यादव' ह्या कथेवरील प्रतिक्रिया.

१०. अण्णासाहेब कावेबाज हा शब्द चातुर्यनिदर्शक ह्या चांगल्या अर्थाने वापरतात.

११. लो. टिळकांच्या प्रेरणेने सुरू झालेल्या शिवजयंत्युत्सवाच्या चळवळीबद्दल इंग्रज सरकार सावध होते. त्यावेळच्या वातावरणावर ह्या चळवळीचा प्रभाव असल्याचे म. शिंदे यांच्या ह्या प्रतिक्रियेवरून जाणवते. १८९८ च्या शिवजयंत्युत्सवाच्या कार्यक्रमाची माहिती केसरीच्या दि. १८-४-९८ च्या अंकात येते, व हा कार्यक्रम पार पडल्याची माहिती २९-४-१८९८ च्या अंकात आहे.

१२. *The Nineteenth Century*, A Monthly Review, Edited by James Knowles, February, 1898, (Pages 250 to 255) ह्या लेखावरील प्रतिक्रिया.

१३. George Henry Lewes, *History of Philosophy Vol. II - Modern Philosophy*, Fifth Edition, London, Longmans, Green and Co., 1867 सदर पुस्तकातील महत्त्वाची वाक्ये म. शिंदे यांनी रोजनिशीत उतरलेली आहेत. गोल कंसातील पृष्ठ क्रमांक संपादकाने टाकलेले आहेत. तिरकस टाइपातील वाक्ये आणि शब्द म. शिंदे यांचे आहे.

१४. 'माझा विशेष कल तत्त्वज्ञानाच्या अभ्यासाकडे असताना लॉजिक आणि मॉरल फिलासफी, न्यायशास्त्र आणि नीतिशास्त्र हे विषय न घेता, मी इतिहास आणि कायदा हे विषय घेतले ह्याचे कारण बी. ए. च्या परीक्षेत कायद्याच्या पेपरमध्ये शे. ६० वर मार्क मिळाल्यास एल्एल्. बी. ची परीक्षा पास झाली असे गणण्यात येत होते. म्हणून मी या सवलतीचा फायदा घेण्यासाठी ही निवड केली.' (वि. रा. शिंदे, *माझ्या आठवणी व अनुभव,* उनि., पृ. १०८).

१५. उपरिनिर्दिष्ट लेविसच्या पुस्तकातील उतारे. तिरकस ठशातील मजकूर म. शिंदे यांचा.

१६. बंडगार्डन्स नजीकच्या पुलासमोर येरवड्याच्या दिशेने एक मोठी टेकडी आहे. ह्या टेकडीवर जमिनीपासून सुमारे दीडशे ते पावणेदोनशे फूट उंचीवर हे लहानसे शिवाचे मंदिर आहे. गाभारा व समोरचा थोडा भाग डोंगरात कोरलेला आहे. त्यासमोर बऱ्याच अलीकडच्या काळात एक मोठा सभामंडप बांधलेला आहे. शिवमंदिराचे खोदकाम अकराव्या-बाराव्या शतकात झाले असावे. त्यानंतर अशी खोदकामे झाल्याची नोंद नाही. पुण्याजवळची सर्व शेलगृहे या काळातीलच आहेत. कदाचित येरवडा गावाचे हे स्थलदैवत असावे. (माहिती : डॉ. म. श्री. माटे, पुणे, यांजकडून).

१७. माधव नारायण हुल्याळ (१८७३-१९५८). बी. ए., सरकारी नोकरी पत्करली. डिस्ट्रिक्ट डेप्युटी कलेक्टर असतानाच १९३१ ते ३७ पर्यंत भोर संस्थानचे दिवाण. १९३५ मध्ये रावसाहेबांचे 'रावबहादूर' झाले. १९३८ मं १९४० रामदुर्ग संस्थानचे व १९४३ ते १९४६ पर्यंत जमखंडीचे दिवाण, येरवड्याच्या रोजनिशीत यांचाच उल्लेख आलेला आहे. (मुलाखत : श्री. बिंदुराव हुल्याळकर व श्री. व्ही. डी. ऊर्फ बाबूराव हुल्याळकर, जमखंडी).

१८. केशव रामचंद्र कानिटकर (१८७६-१९५४). जन्मगाव वाईजवळील धोम. म. शिंदे यांचे अखेरच्या काळापर्यंतचे निकट मित्र. फर्ग्युसन कॉलेजात १९०५ पासून शास्त्रविषयाचे प्राध्यापक व १९२१ ते १९२९ पर्यंत प्राचार्य डे. ए. सोसायटी सोडल्यानंतर पुणे येथील मॉडर्न हायस्कूल, वाडिया कॉलेज ह्या संस्था काढण्यात पुढाकार. जातिभेद मानीत नसत. घरातील वातावरणही जातिभेदारहित. (मुलाखत : श्री. नरहर केशव कानिटकर; व *हिस्ट्री ऑफ दि डेक्कन एज्युकेशन सोसायटी*) (संपा.) पी. एम. लिमये, भाग २, पृ. २३१ ३२).

१९. *The Nineteenth Century,* A Monthly Review, Edited by James Knowles, February 1898 मधील The Native Press in India (पृ. २६६-२७६) ह्या G. M. Chesney ह्यांच्या लेखाचा हा निर्देश हिंदुस्थानातील वर्तमानपत्रे केवळ राजकारणापुरती बंदिस्त असून खेळ, संगीत, शास्त्र, साहित्य इत्यादींकांना, एवढेच नव्हे तर हा शेतकीप्रधान देश असून शेतीविषयाला जागा देत नाहीत. येथील लोकांना सरकार उलथून टाकायचे आहे परंतु पर्यायी व्यवस्थेची कल्पना त्यांच्या डोळ्यासमोर नाही. शिवाय, येथील लोकांना नोकरशाही नष्ट व्हावी असे वाटत नाही. दर दोन माणसामागे एकाची आकांक्षा सरकारी नोकरी मिळावी ही असल्याने नोकरीच्या जागा वाढवा अशीच त्यांची हाकाटी असते, अशी टीका ह्या लेखात केली आहे.

२०. हे तेरदाळचे विष्णुपंत देशपांडे (१८७३-१९४९). म. शिंद्यांचे लहानपणापासून तो अखेरपर्यंतचे जिवाभावाचे मित्र. १९१७ च्या लखनौ काँग्रेसला उपस्थित व त्यानंतर काँग्रेसच्या राजकारणात प्रवेश. १९२१ नंतर संस्थानी राजकारणात भाग. १९२७ मध्ये तेरदाळला सांगली

संस्थान प्रजापरिषदेचे अधिवेशन व १९३० मध्ये दक्षिणी शेतकरी परिषद भरविण्यात पुढाकार. १९२८ मध्ये सारावाढ व तुकडेबंदी बिलाविरुद्ध म. शिंद्यांच्या प्रेरणेने चळवळ. १९३७ मध्ये मागडी येथील प्रजापरिषदेच्या अधिवेशनाचे अध्यक्ष. ह्याच विष्णुपंत देशपांड्यांचे अनेक उल्लेख रोजनिशीत येतात. (मुलाखत व हस्तलिखित लेख : सौ. शकुंतलाबाई जमदग्नी, विष्णुपंतांच्या कन्या, कोल्हापूर; व मुलाखत : श्री. भाऊराव देशपांडे, विष्णुपंतांचे चिरंजीव, तेरदाळ).

२१. नामदार गोपाळ कृष्ण गोखले हे इंग्लंडला १८९७ साली वेल्वी कमिशनसमोर साक्ष देण्यासाठी पुण्याच्या डेक्कन सभेचे प्रतिनिधी म्हणून गेले होते. तेथून आल्यानंतरचे हे भाषण.

येथे उल्लेखिलेली मद्रास वेळ ही मुंबई वेळेच्या ३० मिनिटे पुढे व स्टॅन्डर्ड टाइमच्या ३९ मिनिटे मागे असायची.

२२. वैजनाथ काशीनाथ राजवाडे (१८६०-१९४४). निरुक्ताचे भाषांतरकार व वैदिक वाङ्मयाचे गाढे अभ्यासक. १८८६ ते ९६ कराचीच्या डी. जे. कॉलेजात इंग्रजीचे प्राध्यापक. १८९६ ते १९१६ पर्यंत फर्ग्युसन कॉलेजचे प्रिन्सिपॉल.

२३. आयझॅक टॉडहंटर (१८२०-१८८४). हे इंग्रज गणिती. बीजगणित, भूमिती इ. विषयांवर अनेक क्रमिक पुस्तके लिहिली. फर्ग्युसन कॉलेजच्या ग्रंथालयात यांची वीसेक पुस्तके आहेत.

२४. जेरोरेशन ह्या शब्दाचा अर्थ प्रयत्न करूनही उपलब्ध होऊ शकला नाही. कथन, निवेदन असा अर्थ संदर्भावरून वाटतो.

२५. मंगळवार ता. २६ एप्रिल १८९८ च्या केसरीत शिवजयंत्युत्सवाचा कार्यक्रम कसा पार पडला याची माहिती आहे.

२६. प्रो. श्रीधर गणेश जिन्सीवाले (१८५२-१९०३). काही काळ विल्सन कॉलेजात संस्कृतचे प्राध्यापक. पुराणमताभिमानी. वक्तृत्वोत्तेजक मंडळी, वसंत व्याख्यानमाला, सार्वजनिक सभा इ. संस्थांच्या कार्यात भाग. 'सभेत दीड-दोन तास बोलत. बोलताना गाडी कुठे वाहवत जाईल याचा नेम नसे. त्यांचे धर्माचरण कडक, विद्वत्ता जाडी, आणि वक्तृत्व तर भारी पल्लेदार, प्रभावी होते.' (दत्तो वामन पोतदार, *लो. टिळकांचे सांगाती,* पुणे, केसरी प्रकाशन, १९७५, पृ. ३९-४०).

२७. 'दुसरे दिवशी म्हणजे तृतीयेस संध्याकाळी प्रो. परांजपे यांचे भारतातील वनपर्वामधील पांडव विराट सदनी जाण्यापूर्वी तेथे गेल्यावर त्यांनी कशी वागणूक ठेवावी या विषयावर धौम्य ऋषींनी केलेला नीतिबोध या विषयावर पुराण झाले.' (केसरी, २६ एप्रिल १८९८, पुणे).

'शिवाजी उत्सव, गणपती उत्सव, दुष्काळी चळवळ या सर्व प्रारंभीच्या टिळकांच्या चळवळीत त्यांनी धडाडीने भाग घेतला... याच सुमाराला त्यांनी जागृतीची एक नवी टूम काढली. ते देवळात पोथी पुढे ठेवून पुराण सांगत. अर्थात हा थाट पुराणाचा असला तरी आतला घाट राजकारणाचा असे.'

(वामन कृष्ण परांजपे, *शिवरामपंत परांजपे-व्यक्ती, वक्तृत्व, वाङ्मय,* पुणे, चित्रशाळा प्रकाशन, १९५४, पृ. ३८).

२८ श्रीमंत सयाजीराव महाराजांकडून म. शिंदे यांना द. म. रु. २५ ची स्कॉलरशिप १८९६ पासून मिळत होती. बी. ए. च्या परीक्षेत १८९७ साली नापास झाल्यामुळे स्कॉलरशिपचा अर्ज करण्याचा संकोच त्यांना वाटत असावा.

२९. मोती बुलासा (१८६९-१९००). मध्यप्रदेशातील मारवाडी बनिया जातीचे गृहस्थ. खांडवा, नागपूर येथे शिक्षण झाल्यावर १८९५ मध्ये डे. ए. सोसायटीत आले व न्यू इंग्लिश स्कूलमध्ये शिक्षक झाले. प्रार्थनासमाजी बनले. युनिटेरियन स्कॉलरशिप मिळाल्यावर तौलनिक धर्माचा अभ्यास करण्यासाठी सप्टेंबर १९०० मध्ये इंग्लंडला निघाले असता वाटेत पोर्ट सैदला वारले. ह्यांच्या मृत्यूनंतर रिकामी पडलेली स्कॉलरशिप घेऊन अण्णासाहेब शिंदे इंग्लंडला धर्मशिक्षणासाठी गेले.

३०. विष्णुपंत देशपांडे, तेरदाळकर ह्या जिवलग मित्रास उद्देशून कथन केलेले मनोगत.

३१. विधुरावस्था हा शब्द पत्नीविरहित एकाकी अवस्था ह्या अर्थाने वापरलेला दिसतो. विधुर ह्या शब्दाचा व्यंग, अपूर्ण असाही एक अर्थ शब्दकोशात आहे. (*महाराष्ट्र शब्दकोश,* विभाग सहावा, पृ. २८३४).

३२. विष्णू वामन मोडक (१८६८-१९१८). शिक्षण मॅट्रिकपर्यंत. इंग्रजी भाषेवर उत्तम प्रभुत्व. 'ॲडव्होकेट ऑफ इंडिया' या वृत्तपत्राचे सबएडिटर. दोन वर्षे 'इंदुप्रकाश' चे संपादक. इंग्रजी आणि मराठी भाषेतील नामांकित वक्ते. लो. टिळकांवर यांनी लिहिलेले 'दि ब्रेव्हेस्ट ऑफ दि ब्रेव्ह' हे काव्य सरकारने जप्त केले. (*मोडक-कुल-वृत्तांत,* (संपा.) मोरो हरी खरे, पुणे, १९४६, पृ. २३८).

१८९८ च्या आधी वसंत व्याख्यानमालेत १८९५ साली 'राज्यक्रांत्या' ह्या विषयावर इंग्रजीत व्याख्यान. (माहिती : श्री. म. श्री. दीक्षित, पुणे, यांजकडून).

३३. रामचंद्र अण्णाजी कळसकर. "त्यानंतर (प. वा. श्री. जोतिबा फुले यांच्या प्रयत्नानंतर) ह्या हतभागी लोकांकडे ज्या दुसऱ्या उदार अंत:करणाच्या पुरुषाचे लक्ष गेले, ते परलोकवासी श्रीयुत रामचंद्र आण्णाजी कळसकर हे होत. ह्यांनी प्रथम 'वांगी व्हिलेज एज्युकेशन सोसायटी' नावाची संस्था वांगी येथे स्थापन करून नंतर ती बारामती येथे नेली. ह्या संस्थेच्या आश्रयाखाली त्यांनी महार लोकांकरिता खेड्यातून काही शाळा उघडल्या होत्या; पण त्या फार दिवस चालल्या नाहीत; हे काम भरपूर द्रव्यसाहाय्याशिवाय नावारूपास येणे शक्य नव्हते." (विठ्ठल रामजी शिंदे, 'निराश्रित साहाय्यक मंडळी', *लेख, व्याख्याने व उपदेश,* उनि., पृ. १०९, ११०).

३४. काशीनाथ बाळकृष्ण मराठे (१८४४-१३ नोव्हेंबर १९१८). डेक्कन कॉलेजमधून बी. ए. झाल्यानंतर न्यायखात्यात नोकरी. १९०१ मध्ये सबजज्जाच्या जागेवरून निवृत्त. नंतर १२ वर्षे डेक्कन कॉलेजात संस्कृतचे ऑनररी प्रोफेसर. काही काळ पुणे प्रार्थनासमाजाचे उपाध्यक्ष. 'वेदाविषयी निबंध' व 'नावल व नाटक ह्याविषयी निबंध' एवढे प्रमुख लेखन. तुकारामाच्या अभंगांचे इंग्रजीत भाषांतर.

३५. "मालेबाबतचा नेमस्त, सुधारक इत्यादींचा हा तटस्थ पवित्रा लक्षात घेऊन याच साली मालेची व्याख्याने हिराबागेसारख्या दूरच्या गैरसोयीच्या ठिकाणी न करता शहरात अन्य जागी करावीत असा 'केसरी' तून प्रचार होऊ लागला. रानड्यांची अनुपस्थिती, त्यांच्या चाहत्यांचा अलिप्तपणा,

आणि सार्वजनिक सभेतील टिळकांचे वर्चस्व या गोष्टी जमून आल्यामुळे मालेचे स्थित्यंतर सोपे झाले. यानंतर १८९८ ते १९०३ ही पाच वर्षे मालेचे सत्र दाणेआळीतील सार्वजनिक सभेच्या नवीन दिवाणखान्यात भरले." (म. श्री. दीक्षित, *वाटचाल : वसंत व्याख्यानमाला स्मरणिका,* पुणे, कार्यवाह वसंत व्याख्यानमाला, १९७४, पृ. १४).

३६. श्रीनिवास अय्यंगार सेटलूर (१८६२-१९३०). आरंभी मद्रास-बेंगलोरकडे होते. नंतर मुंबईस वकिली करू लागले. १८९७ च्या टिळकांच्या राजद्रोहाच्या खटल्यात यांची टिळकांना मदत झाली. 'टिळक ट्रायल' हे खटल्याचे पुस्तक माधवराव देशमुख (लोकहितवादींचे नातू) यांच्या सहकार्याने छापले.

३७. बॅ. कृष्णाजी वामन भट (१८६७-१९१८). मूळ गाव रत्नागिरीजवळील शिरगाव. मुंबई हायकोर्टात ओरिजिनल साइडकडे वकिली. पुण्यास नारायण पेठेतील पत्र्या मारुतीजवळील भटवाडा यांचा टांगा ठेवण्याची, फुलझाडांची हौस होती. (मुलाखत : श्री. विश्वनाथ कृष्णराव भट, बू. भटांचे चिरंजीव, पुणे).

३८. वालूताई : थोरले आप्पासाहेब सरकार, जमखंडी (१८३५-१८९७) यांची नात. इतर तीन नातींप्रमाणेच वालूताईच्या लग्नासाठी रु. १५०००/- ची तरतूद श्रीमंत आप्पासाहेब यांनी मृत्युपत्राद्वारेच करून ठेवली होती. वालूताईंचा विवाह पुण्यास सरदार गोळे यांच्याशी झाला. (माहिती : वालूताईंचे पुतणे श्री. वि. भा. ऊर्फ तात्यासाहेब जोशी, जमखंडी, यांच्याकडून).

३९. गणेश कृष्ण ऊर्फ दादासाहेब खापर्डे (१८५४-१९३८). नामवंत वकील, प्रभावी वक्ते, राजकारणात व सार्वजनिक कार्यात आघाडीवर. राष्ट्रसभेच्या कामात लो. टिळकांच्या बाजूने राहून कार्य.

४०. कुलुलीत हा शब्द उतावीळ, खाज असलेला, हुरळलेला अशा अर्थाने वापरलेला दिसतो. कुलुली अथवा कुलोली ह्या शब्दाचा मोल्सवर्थच्या कोशातील अर्थ पुढीलप्रमाणे-The excitement of a stallion or horse towards the mare; also heat or desire of the male mares (पृ. १७६). 'महाराष्ट्र शब्दकोशा' मध्ये कुलुली, कुलोली ह्या शब्दाचे अर्थ पुढीलप्रमाणे दिले आहेत : १. कुलकुली २. खाज; आवेग ३. आरडाओरडा; आरोळ्या मारणे ४. बोंब मारणे; ओरडणे. (पृ. ७६०).

४१. हरिभक्तपरायण म्हणून पुढील काळात प्रसिद्धीस आलेल्या श्री. ल. रा. पांगारकरांचा येथे उल्लेख आहे. पांगारकर हे बी. ए. मध्ये दोन वर्षे नापास होत होते तरी १८९८ सालीच त्यांनी शिवजयंत्सुत्वात पुण्यास व गणेशोत्सवात मुंबईस व्याख्याने देऊन नावलौकिक मिळविला होता. (ल. रा. पांगारकर यांच्या 'चरित्रचंद्र' ह्या आत्मचरित्रावरून).

४२. ह्यापुढील तीन पाने अथवा सहा पृष्ठे रोजनिशीत नाहीत. स्पष्टीकरण प्रस्तावनेत केले आहे. ह्यानंतरच्या काळात रोजनिशीलेखात मोठा खंड पडलेला दिसतो. पृष्ठ ७३ वर ३१ मार्च १८९९ ला म्हणजे जवळजवळ सात महिन्यानंतर रोजनिशी लिहिलेली आहे. मधल्या अवधीत अण्णासाहेब बी. ए. परीक्षा उत्तीर्ण होऊन मुंबईस एल्एल्. बी. चा अभ्यास करीत होते.

४३. येथे सोमवार हा चुकीने पडलेला आहे. कारण आधीच्या तारखेला सोमवार येतो व तसा लिहिलेलाही आहे.

४४. डॉ. कृष्णाजी दादाजी केळवकर (१८४७-२९-६-१९०६) मूळ गाव वसई. ग्रँट मेडिकल कॉलेजचे पदवीधर. अलिबाग येथे सरकारी इस्पितळात नोकरी. स्त्रीशिक्षणाची आवड. निरक्षर पत्नीस स्वतः उल्हासाने शिकवून सुशिक्षित केले. आजारपणानंतर नोकरी सोडली. पत्नीच्या नोकरीनिमित्त १८८३ पासून कोल्हापूरास वास्तव्य.

रखमाबाई (१८५५-२९ जून १९५०) ह्या पत्नी. पतीने घरीच उत्तम शिक्षण दिले. तांत्रिक दृष्टीने पुण्याच्या फीमेल कॉलेजमध्ये राहून सर्टिफिकेट मिळविले. कोल्हापूर दरबारने एक उत्तम स्त्रीशिक्षक मिळावा म्हणून मागणी केल्यानंतर कोल्हापुरास १८८३ मध्ये आल्या. १८९५ मध्ये लेडी सुपरिटेंडेंट म्हणून नेमणूक. १९२० मध्ये सेवानिवृत्त.

ह्या परिच्छेदात उल्लेखिलेले डॉ. धनवडे म्हणजे श्री. रामचंद्र यल्लाप्पा धनवडे. कोल्हापूरच्या सरकारी दवाखान्यात डॉक्टर. साथीच्या रोगाच्या वेळी शिरोळ स्टेशनवर क्वारंटाइनचे डॉक्टर होते. राजर्षी शाहू छत्रपतींशी निकटचा संबंध. महाराज त्याना 'देव डॉक्टर' असे संबोधित. वृत्तीने धार्मिक, मारुतीची फार भक्ती करीत असत. जयसिंगपूर स्टेशननजीक मारुतीची स्थापना केली. कोल्हापूर येथील पंचगंगा नदीवर त्यांच्या ज्येष्ठ कन्येच्या स्मरणार्थ मारुतीचे देऊळ बांधले. (माहिती : डॉ. एस. डी. धनवडे, कोल्हापूर, यांजकडून).

४५. श्री. विष्णुपंत देशपांडे यांचे चिरंजीव श्री. भाऊराव यांची तेरदाळास जाऊन मी भेट घेतली. म. शिंदे यांच्याकडून विष्णुपंतांना गेलेली पत्रे जतन करून ठेवली नसल्याने उपलब्ध होऊ शकली नाहीत.

४६. रोजनिशीत येथपासून सहा पृष्ठे नसल्याचा उल्लेख वर केला आहेच.

४७. श्री शाहू छत्रपतींना ३१ जुलै १८९७ रोजी प्रथम पुत्रलाभ झाला. त्यांचे नाव राजारामराजे असे ठेवले. १५ एप्रील १८९९ रोजी द्वितीय पुत्र झाला. त्यांचे नाव शिवाजीराजे असे ठेवण्यात आले. यांच्याच जन्मसोहळ्याचा उल्लेख येथे आहे.

४८. इंग्रजीतील sophisticated ह्या शब्दाचा आशय म. शिंदे यांना प्रकट करावयाचा आहे असे दिसते.

४९. पन्हाळगड, पावनगड, विशाळगड व आजूबाजूचा रम्य परिसर पाहण्याचे म. शिंदे यांनी ठरविले होते. नैसर्गिक सौंदर्य पाहण्याची आवड वडिलांमुळेच त्यांच्यात लहानपणापासूनच निर्माण झाली होती. (वि. रा. शिंदे, 'माझ्या एकांत सहली', *माझ्या आठवणी व अनुभव,* उनि., पृ. ६३-६४).

'गडाला एक प्रदक्षिणा तीन दिवसात केली' (पृ. ५७) असे म. शिंदे यांनी रोजनिशीत लिहिले आहे. 'दिवसात' हा शब्द 'प्रहरात' या शब्दाऐवजी अनवधानाने पडलेला दिसतो.

इंग्लंडमधील रोजनिशी

१. बाबण बापू कोरगावकर (१८७७-१३ मे १९५२). मुंबई विद्यापीठात अकौंटंट म्हणून नोकरी. मुंबई प्रार्थनासमाजाचे निष्ठावंत कार्यकर्ते. सेक्रेटरी, खजिनदार, ऑडिटर, प्रेसिडेंट, ट्रस्टी इ. पदांवर काम केले. १८९१ मध्ये मुंबईस अस्पृश्यांसाठी पहिली शाळा काढली. "पूर्वी कोणत्या ना कोणत्या निमित्ताने बाबांचे घरी सामाजिक मेळे भरविले जाईत. तुलनात्मक धर्मशास्त्राचा अभ्यास करण्याकरिता जाणारे प्रमोथलाल सेन, हेमचंद्र सरकार, मोती बुलासा, अण्णासाहेब शिंदे, डॉ. सुखटणकर इत्यादिकांना निरोप देण्याकरिता व त्यांचे शुभ चिंतण्याकरिता त्यांचे घरी मेळे भरले आहेत." (बी. बी. केसकर, *बाबण बापू कोरगावकर,* मुंबई, रावसाहेब वामन सदाशिव सोहोनी, १९४३, पृ. ६०).

२. एकनाथ हे म. शिंदे यांचे धाकटे बंधू. जन्म १८८५. काही काळ डिप्रेस्ड क्लासेस मिशनच्या उद्योगशाळेत शिक्षकाची नोकरी. नंतर मुंबईस बर्माशेलमध्ये. चित्रकलेची आवड होती. मृत्यू १९४६.

३. ह्या रामतीर्थकरांची माहिती मिळू शकली नाही. हे कदाचित विजापूरच्या रामतीर्थकर कुटुंबापैकी कोणी असतील असे उगारचे श्री. श्री. अ. रामतीर्थकर ह्यांनी सुचविले.

४. द्वारकानाथ गोविंद वैद्य (१८७७-२९ फेब्रु. १९४०). प्रार्थनासमाजाचे निष्ठावंत कार्यकर्ते. मुंबई विद्यापीठात नोकरी. सुबोध पत्रिकेचे साक्षेपी कष्टाळू संपादक. सुमारे ३५ वर्षे संपादन केले. 'प्रार्थनासमाजाचा इतिहास', 'डॉ. भांडारकर यांचे चरित्र' ह्या पुस्तकांचे लेखक. डॉ. भांडारकर, न्या रानडे यांच्या धर्मपर व्याख्यानांची पुस्तके संपादिली. सुबोध पत्रिकेतून ६०० पेक्षा जास्त लेख. 'संसार व धर्मसाधन' ह्या बी. बी. केसकरसंपादित पुस्तकात बरेचसे लेखन समाविष्ट. अण्णासाहेब शिंदे यांचे स्नेही. मुंबई प्रार्थनासमाजाचे प्रचारकपद १९१० मध्ये अण्णासाहेबांनी सोडल्यावर दोन वर्षे त्यांच्या कौटुंबिक खर्चाची जबाबदारी यांनी घेतली होती.

५. सदाशिव पांडुरंग केळकर (१८४८-२० डिसेंबर १९०६). शिक्षण मॅट्रिकपर्यंत. प्रथम पत्नी निवर्तल्यावर १८७८ मध्ये गतभर्तृकेशी पुनर्विवाह. स्वदेशीचे पुरस्कर्ते. स्वदेशी उद्योगास उपयोग व्हावा या उद्देशाने पॅरिसचे प्रदर्शन पाहून आले. मुंबई प्रार्थनासमाजाचे १८८२ ते १८९४ पर्यंत प्रचारक. काही काळ सुबोध पत्रिकेचे संपादन. ह्यांच्या मराठी वळणाच्या शैलीबद्दल म. शिंदे यांनी गौरवोद्‌गार काढले आहेत.

६. हे विश्वनाथपंत उर्फ दादासाहेब संत असावेत. पुणे प्रार्थनासमाजाचे चिटणीस होते.

७. शिवराम नारायण गोखले. पुणे प्रार्थनासमाजाचे १८९८ पासून प्रचारक. अत्यंत साधे, सच्छील म्हणून प्रसिद्ध. अण्णासाहेबांच्या बरोबर १९०४ मध्ये जमखंडीच्या दौऱ्यावर गेले होते.

८. दीनानाथ विष्णू माडगावकर (१८४७-७ जानेवारी १९१७). मुंबई प्रार्थनासमाजाशी प्रारंभीच्या काळापासून संबंधित. प्रथम थीईस्टिक असोसिएशनचे चिटणीस, नंतर समाजाचे हिशेब तपासनीस, चिटणीस, उपाध्यक्ष म्हणून उत्तम काम. समाजाचे प्रार्थनासंगीताचे पुस्तक तयार करण्यात परिश्रम घेतले. न्या. मू. रानडे व डॉ. भांडारकर यांची व्याख्याने उतरून घेतली. तुकारामाच्या अभंगांचा आस्थापूर्वक अभ्यास.

९. डॉ. वासुदेव अनंत सुखटणकर मूळ कोल्हापूरचे. अण्णासाहेबांचे पुण्यापासूनचे स्नेही. त्यांच्याबरोबरच प्रार्थनासमाजाकडे आकृष्ट होऊन दीक्षा घेतली. इंग्लंडला धर्मविषयक शिक्षण घेतल्यावर जर्मनीत तत्त्वज्ञानाची पीएच्. डी. पदवी संपादली. परत आल्यावर मुंबई प्रार्थनासमाजात १९०८-०९ हे एकच वर्ष धर्मप्रचारक म्हणून काम. नंतरच्या काळात प्रामुख्याने वास्तव्य इंदूरमध्ये. तेथील होळकर कॉलेजात प्राध्यापक. अहल्याश्रमाचे संस्थापक व संचालक, भारतवर्षीय ब्राह्मसमाजाचे अनेक वर्षे कार्य केले.

१०. हे पत्र 'जलप्रवास' ह्या शीर्षकाखाली सुबोध पत्रिकेत प्रसिद्ध म. शिंदे यांच्या 'लेख, व्याख्याने व उपदेश' ह्या पुस्तकात संगृहीत. पृ. १ ते ९.

११. येथे नमूद केलेले अरबी शब्दाचे अर्थ बरोबर आहेत. त्यांचा उच्चार अरबी भाषेत 'बाबुलमांदेब' असा केला जातो.

१२. कुलजुम् असा अरबीमध्ये उच्चार केला जातो. तांबडा समुद्र ह्या अर्थी बेहरे कुलजुम् अशा शब्दाचा उपयोग करतात. (ह्या दोन्ही टीपांतील माहिती : प्रा. रियाज फारूकी, औरंगाबाद).

१३. ह्या तारखेच्या सुमारास म. शिंदे आपल्या सर्व रोजनिशा चाळून पाहात होते असे दिसते. ७ सें. मी. x १३ सें. मी. आकाराची दुसरी एक छोटी रोजनिशी इंग्लंडच्या प्रवासात त्यांनी बरोबर नेली होती. तीत अगदी छोटी टिपणे तारीखवार प्रारंभी केलेली आहेत. त्या रोजनिशीचा उपयोग त्यांनी ही मोठी रोजनिशी लिहिताना केला. त्या डायरीवरूनच प्रस्तुत मोठ्या रोजनिशीत खालील मजकूर उतरून काढला आहे. ह्या छोट्या डायरीत इंग्लंडमधील वास्तव्यात क्वचित वर्गातील वा स्वतःची टिपणे, कोडी, काव्यपंक्ती असा मजकूर लिहिलेला आढळतो.

१४. हे देऊळ व ते पाहून सुचलेले विचार ह्यावर लेख सुबोध पत्रिकेस २९-११-१९०१ रोजी ऑक्सफर्डहून पाठविला. (*लेख, व्याख्याने व उपदेश,* उनि., पृ. १३-१५).

१५. रोमेशचंद्र दत्त (१८४८-१९०९). बंगालमधील प्रारंभीचे आय. सी. एस. अधिकारी, थोर अभ्यासक, राष्ट्रसभेचे अध्यक्ष (१८९९). इतिहास, काव्य, कादंबऱ्या यांचे लेखन इंग्रजी व बंगालीमधून निर्भीड व स्वतंत्र वृत्तीचे अधिकारी, इतिहासाचा दांडगा व्यासंग. आय. सी. एस. अधिकारी म्हणून १८९७ मध्ये निवृत्त झाल्यानंतर १९०४ पर्यंत लंडन विद्यापीठात भारतीय इतिहासाचे प्राध्यापक. ह्या वास्तव्यकालातच म. शिंदे त्यांजकडे गेले होते. म. शिंदे यांच्या छोट्या डायरीत ७ ऑक्टोबर १९०१ ला पुढील नोंद आहे. "लंडन येथे पोचलो. ८२ नं. टालबट रोड बेजवाटर येथे उतरलो. ते हवा पालटण्याकरता बाहेरगावी गेले होते म्हणून त्यांच्याच खोलीत मी होतो."

१६. इंग्लंडच्या ज्या युनिटेरियन समाजाच्या वतीने अण्णासाहेबांना स्कॉलरशिप मिळाली होती तिचे हे सेक्रेटरी.

१७. V. G. Chertcov हे टॉलस्टॉयच्या धर्मविचाराचा प्रभाव पडून त्यांचे कट्टर अनुयायी झाले. सैन्यातील अधिकाराची नोकरी व संपत्तीचा त्याग करून शेतकऱ्यासारखे साधे जीवन जगू लागले. टॉलस्टॉयची पत्नी प्रारंभी यांच्याशी स्नेहभावाने वागत होती, परंतु आपला नवरा ह्यांच्या पूर्ण आहारी गेला ह्या समजुतीने उत्तर काळात मत्सराने वागली.

१८. डॉ. आनी बिझांट (१८४७-१९३३). सुप्रसिद्ध तत्त्ववेत्त्या, वक्त्या व थिऑसॉफिकल सोसायटीच्या अध्यक्ष (१९०७-३३). इंग्लंडच्या राजकारणात व समाजकारणामध्ये १८७३ ते १८९३ भाग. साक्षात्कारावर विश्वास बसून थिऑसॉफिस्ट बनल्या व १८९३ मध्ये भारतात. आल्या. मॅडम ब्लॅव्हॅट्स्कीनंतर थिऑसॉफीच्या प्रमुख बनल्या. यांनी ३३० पुस्तके लिहिली. भारताच्या राजकारणात, सामाजिक कार्यातही भाग. १९१७ साली राष्ट्रसभेचे अध्यक्षपद. म. शिंदे यांच्या कार्याचा यांना परिचय होता व सहानुभूती होती. शिंद्यांच्या प्रेरणेने १९१७ च्या राष्ट्रसभेत अस्पृश्यतानिवारणाचा ठराव मंजूर.

१९. चित्रे काढण्याची म. शिंदे यांना हौस होती असे दिसते. प्रस्तुत रोजनिशीतही दोन चित्रे आहेत; एक पवनचक्कीचे ता. ७ जानेवारी १९०३ च्या रोजनिशीत आहे; व दुसरे आगगाडीच्या पुलाचे (पृ. १२२).

२०. शामराव गाइकवाड यांच्यासंबंधी माहिती मिळू शकली नाही.

२१. 'मार्सेय शहर', *लेख, व्याख्याने व उपदेश,* उनि., पृ. १२-१३.

२२. रोमच्या पोपच्या प्रभुत्वापासून फुटून निघालेला पंथ. धर्मगुरू नेमण्याचा पोपचा अधिकार झुगारला. १७६९ मध्ये फिलाडेल्फिया येथे मेळावा भरून प्रोटेस्टंट एपिस्कोपल चर्च हे नाव, स्वतंत्र घटना सिद्ध. अमेरिकेत या पंथाचा पुष्कळ प्रसार झाला.

२३. ह्या टोयोसाकीचे आकर्षक व्यक्तिचित्र म. शिंदे यांनी 'माझ्या आठवणी व अनुभव (पृ. १२४)' ह्या पुस्तकात रेखाटले आहे. १९०३ मध्ये ॲम्स्टरडॅम येथे भरलेल्या आंतरराष्ट्रीय उदार धर्मपरिषदेत झेनोसुके टोयोसाकी ह्यांनी जपानी प्रतिनिधी म्हणून भाग घेऊन निबंध वाचला. म. शिंदे यांनी १९१२ मध्ये प्रसिद्ध केलेल्या 'थीइस्टिक डिरेक्टरी' ह्या पुस्तकातील 'लिबरल रिलिजन इन जपान' ह्या प्रकरणासाठी म. शिंदे यांना साहित्य पुरविल्याचे दिसते.

२४. रेव्हरंड चार्ल्स व्हायसे (१८२८-१९१२). १८५२ पासून लंडनमध्ये धर्मोपदेशक, नंतर विचारात फरक. बायबलमधील देवविषयक विचार चुकीचा आहे असे १८६५ पासून प्रतिपादन करू लागले, म्हणून नोकरीवरून काढले. १८८० मध्ये थीइस्टिक चर्च स्थापन करून स्वतंत्र विचाराचे प्रतिपादन. युनिटेरियन लोक येशूला आपला मार्गदर्शक मानतात हे त्यांना मान्य नव्हते, कारण तोही निर्दोष नव्हता असे त्यांचे मत.

२५. राजाराम पानवलकर यांची माहिती पुष्कळ प्रयत्न करूनही मिळाली नाही.

२६. दादाभाई नवरोजी (१८२५-१९१७) ह्यांनी डब्ल्यू. बी. बॅनर्जी ह्यांच्या सहकार्याने ह्या लंडन इंडियन सोसायटीची १८६५ मध्ये स्थापना केली. ह्या सोसायटीच्या स्थापनेपासून तो १९०७ पर्यंत ते अध्यक्ष व मृत्यू होईपर्यंत ऑननरी अध्यक्ष होते.

२७. 'लंडन येथील बालहत्त्यानिवारक गृह' हा लेख. (*लेख, व्याख्याने व उपदेश,* उनि., पृ. २१-२४).

२८. पोस्टल मिशनची माहिती मिळाल्यानंतर असाच धर्मप्रचारकार्याचा उपक्रम प्रार्थनासमाजामार्फत सुरु व्हावा असे वाटल्यावरून म. शिंदे यांनी श्री. वासुदेवराव सुखटणकरांना

लिहिले व सुखटणकरांनी १९०२ मध्ये ब्राह्म पोस्टल मिशन काढून लहान लहान ब्राह्म व युनिटेरियन पत्रके यांच्याद्वारा ब्राह्मधर्माचा प्रचार सुरु केला. (*बाबण बापू कोरगावकर,* उनि., पृ. ४६). वासुदेवराव धर्मशिक्षणासाठी इंग्लंडास जाणार असे ठरल्यावर म. शिंदे यांनी सुबोध पत्रिकेत भगिनींना अनावृत्त व पत्र लिहून या कार्याची माहिती दिली व हे काम करण्यासाठी त्यांनी पुढे यावे असे आवाहन केले. ('सुशिक्षित धर्मभगिनीस अनावृत्त पत्र, *लेख, व्याख्याने व उपदेश,* उनि., पृ. ५१-५३').

२९. ॲडॅम स्मिथ (१७२३-१७९०). सुप्रसिद्ध इंग्रज अर्थशास्त्रज्ञ. याचा 'राष्ट्राची संपत्ती (वेल्थ ऑफ नेशन्स)' हा ग्रंथ क्रांतिकारक ठरला. त्यातील प्रतिपादन व्यक्तिस्वातंत्र्य, नैसर्गिक हक्क या कल्पनांना तसेच खुल्या व्यापाराच्या तत्त्वाला पोषक ठरले.

३०. सिजविक (१८३८-१९००). इंग्रज अर्थशास्त्रज्ञ व तत्त्ववेत्ता. स्त्रियांना उच्च शिक्षणाचा हक्क मिळावा यासाठी झटला. मिल, बेंथॅमप्रमाणे उपयुक्ततावादी; परंतु त्याच्या भूमिकेत नैतिकतेवर भर होता.

३१. लॉर्ड ऑल्फ्रेड टेनिसन (१८०९-१८९२). सुप्रसिद्ध इंग्रज कवी.

३२. राजा राममोहन रॉय (१७७४-१८३३). प्रमुख बंगाली समाजसुधारक, धर्मसुधारक व ब्राह्मसमाजाचे संस्थापक. सतीची चाल बंद करण्याचा प्रयत्न केला. १८३० मध्ये ब्राह्मसमाजाची स्थापना केली. दिल्लीच्या बादशहाचे वकील म्हणून गाऱ्हाणी सांगण्यासाठी १८३० मध्ये इंग्लंडला गेले. १८३३ मध्ये ब्रिस्टल येथे मृत्यू.

३३. 'इन्क्वायरर' हे इंग्लंडमधील युनिटेरियन समाजाचे मुखपत्र. म. शिंदे यांनी The Romance of Social Reform in India या नावाचा निबंध मार्टिनो क्लबमध्ये वाचला व हिंदू गृहस्थितीचा देखावा प्रयोगरूपाने दाखविला. त्यांचा हा निबंध व प्रयोगाचे वर्णन ह्या 'इन्क्वायरर' पत्रात १४ मार्च १९०३ मध्ये प्रसिद्ध झाले. (प्रस्तुत रोजनिशी, पृ. १५० व *माझ्या आठवणी व अनुभव,* उनि., पृ. १२२-२३). म. शिंदे यांचा हा निबंध उपलब्ध होऊ शकला नाही.

३४. इंग्लिश चर्चमध्ये धर्मोपदेशकांना महत्त्व देणारे ते हाय चर्च व तसे महत्त्व न देणारे ते लो चर्च.

३५. ही माहिती 'बर्टन खेड्यातील शाळा कशी दिसली !' या शीर्षकाच्या लेखातून सुबोध पत्रिकेमध्ये (२४-८-१९०२) प्रसिद्ध. (*लेख, व्याख्याने व उपदेश,* उनि., पृ. ३२-३४).

३६. 'आपला व खालील प्राण्यांचा संबंध' या नावाचा लेख सुबोध पत्रिकेत (५-१०-१९०२) प्रसिद्ध. मुलांना उद्देशून लिहिलेल्या लेखात ह्या हकीगतीचा समावेश केलेला आहे. (कित्ता, पृ. ५३-५४).

३७. 'डेव्हनपोर्ट येथील गुड् फ्रायडे' ह्या शीर्षकाखाली ता. १०-४-१९०२ रोजी सुबोध पत्रिकेसाठी म. शिंदे ह्यांनी ही माहिती अधिक विस्ताराने व हुबेहुब वर्णन करणारी अशी पाठविली. (कित्ता, पृ. २६-२८).

३८. 'बोअर युद्धाचा शेवट व ऑक्सफर्ड येथील उल्हास' (ता. २०-६-१९०२) व 'राष्ट्रीय निराशा' (ता. २७-६-१९०२). हे दोन लेख सुबोध पत्रिकेत प्रसिद्ध. (कित्ता, पृ. २८-३२).

३९. शेक्स्पीयरच्या जन्मस्थानाचे वर्णन व ते पाहून त्यांनी केलेले चिंतन 'विभूतिपूजा' ह्या लेखात प्रसिद्ध. सुबोधपत्रिका, १९-१०-१९०२. (कित्ता, पृ. ३४-३६).

४०. इंग्लिश सरोवर प्रांतातील म. शिंदे यांचे वास्तव्य, तेथील सृष्टिसौंदर्य, व ते अनुभवून त्यांना येणारा श्रेष्ठ आध्यात्मिक अनुभव व त्या अनुषंगाने घडणारे त्यांचे चिंतन ह्यांचा प्रत्यय देणारा 'जनातून वनात व परत' ह्या शीर्षकाचा लेख म. शिंदे ह्यांनी लिहिला. (कित्ता, पृ. ५७-६८).

४१. डी क्विन्सीच्या The Reminiscences of the English Lake Poets ह्या पुस्तकात सरोवर प्रांतातील निसर्गाचे, बॉरोडेल दरीचे उल्लेख आढळतात; परंतु तोफेच्या प्रतिध्वनीचा उल्लेख सापडला नाही. कदाचित त्याच्या वर्तमानापत्री लिखाणातील हा उल्लेख म. शिंदे यांच्या वाचनात आला असावा. (कित्ता, पृ. २६-२८).

४२. ह्या ओळी म. शिंदे यांनी आपल्या 'जनातून वनात व परत' ह्या लेखात प्रस्तुत अनुभवाच्या संदर्भात उल्लेखिल्या असून त्याखाली माँटगोमेरी असे नाव लिहिले आहे. जेम्स माँटगोमेरी ह्या कवीच्या त्या असाव्यात. १८२९ मध्ये A. and W. Galignani ह्या कंपनीने पॅरिसमध्ये प्रसिद्ध केलेल्या The Poetical Works ह्या संग्रहात माँटगोमेरीच्या ह्य ओळी आढळल्या नाहीत.

४३. ह्या 'पॉझ' हस्तलिखित पाक्षिक पत्रात प्राध्यापक व विद्यार्थी ह्यांवर विनोदी चुटकेही असत. प्रो. कार्पेंटर ह्यांच्यावर पुढील कविता होती--

Each day he does a mountain climb
A ten mile row, three meals, a witicism
And fills the intervening time
with Pali texts and Hebrew criticism.

शिंदे यांच्यावरील कविता अशी :

A meek and modest Indian
Who will, unless he faints,
Some day duly be worshipped
Among his country saints.
He is no vulgar fraction
As single student be
But he and Mrs. Shinde
Form one integrity.

(*माझ्या आठवणी व अनुभव,* उनि., पृ. १२६).

४४. उपरोल्लेखित 'आमचा खालील प्राण्यांशी संबंध' ह्या लेखात शिंदे ह्यांनी ही हकीकत दिली. आहे.

४५. Fidelity ही कविता विल्यम वर्डस्वर्थने १८०५ मध्ये लिहिली व ती १८०७ मध्ये प्रसिद्ध झाली. ह्या कुत्र्याच्या एकनिष्ठेचे कथात्मक निवेदन ह्या कवितेत आहे.

४६. वर्डस्वर्थ हा म. शिंदे यांचा आवडता कवी असल्याचे त्यांच्या 'जनातून वनात व परत' ह्या लेखात दिसून येते.

४७. इंग्लंडातील विल्यम बूथ व त्याची पत्नी कॅथरिन ह्यांनी धार्मिक व मानवतावादी कार्य करणारी संघटना १८६० च्या सुमारास स्थापन केली. १८७८ च्या सुमारास हिची सैन्याच्या धर्तीवर पुनर्घटना केल्यानंतर सॉल्व्हेशन आर्मी हे नाव प्राप्त झाले. ह्यातील कार्यकर्ते गणवेश धारण करणारे, तंबाखू आदि व्यसनापासून मुक्त असे असत. १९३१ मध्ये ह्या संघटनेचे ८४ देशांत कार्य चालू होते, एवढा तिचा विस्तार झाला.

४८. ग्रासमिअर खेड्यातील वर्डस्वर्थचे 'डव्ह कॉटेज' हे कुटीर राष्ट्रीय स्मारक म्हणून राखले आहे. त्याचे वर्णन शिंदे यांनी वर उल्लेखिलेल्या 'जनातून वनात व परत' ह्या लेखात विस्ताराने केले आहे. मूर्तिपूजेचा निषेध करणाऱ्या कवीचीच अशा प्रकारे मूर्तिपूजा होत राहावी यातील विसंगती म. शिंदे यांना रुचली नसल्याचे ह्या लेखावरून जाणवते. (*लेख, व्याख्याने व उपदेश,* उनि., पृ. ६३-६५).

४९. ही नोंद पुढील तारखेची आहे. स्त्रियांच्या उत्साहाचे उदाहरण म्हणून ह्या तारखेच्या रोजनिशीत विषयाच्या अनुरोधाने उल्लेख केलेला दिसतो.

५०. इंग्लंडमध्ये प्राचीन काळी अस्तित्वात असलेला, जादूटोणा इ. अतिभौतिकी सामर्थ्यांवर विश्वास ठेवणाऱ्या लोकांचा धर्म. हे ड्रुइडपंथी वृक्षपूजक होते. विद्वत्ता व शहाणपणासाठी विख्यात. येथे वर्णन केलेल्या धर्तीची शिळावर्तुळे भारतातील काही प्रांतात, विशेषत: दक्षिणेत आढळतात. विदर्भातील नागपूर-पारशिवणी मार्गावरील नैकुण्ड येथे केलेल्या उत्खननांसंबंधी व शिळावर्तुळामध्ये मृताला पुरणाऱ्या आदिवासींच्या संस्कृतीसंबंधीची काहीशी माहिती डॉ. शां. भा. देव यांच्या केसरी, दि. ७ मे १९७८ च्या 'शिळावर्तुळे : संस्कृतीचे विलक्षण पान' ह्या लेखात पाहावयास मिळते.

५१. रॉबर्ट साउदे (१७७४-१८४३). इंग्रज कवी व लेखक. ह्याचे 'लाइफ ऑफ नेल्सन' हे पुस्तक विशेष प्रसिद्ध.

५२. आधीच्या तारखेस भाटवडेकरांचा तपशील जसा दिला आहे तसा भाटे यांच्याबद्दलचा नाही. ह्या दोन्ही व्यक्तींबद्दल माहिती मिळू शकली नाही.

५३. होलीरूड हा एडिंबरो येथील राजवाडा. इ. स. ११२८ मध्ये बांधलेल्या मठाचा काही भाग त्यात समाविष्ट. राणी मेरीचा नवरा लॉर्ड डार्ने ह्याने तिचा इटालियन सेक्रेटरी रिझिओ याचा मत्सर वाटून तिच्यासमक्ष त्याचा वध ह्या राजवाड्यात केला. अघोर कृत्ये ह्या मेरीच्याच वेळी घडल्याचे उल्लेख आढळतात.

५४. सर वॉल्टर स्कॉट (१७७१-१८३२). सुप्रसिद्ध स्कॉटिश कवी आणि कादंबरीकार.

५५. रॉबर्ट बर्न्स (१७५९-९६). स्कॉटलंडचा राष्ट्रकवी मानला जातो. स्कॉटलंडच्या बोलीत याने काव्ये लिहिली. विशेषत: प्रेमकाव्यासाठी प्रसिद्ध.

५६. जॉन नॉक्स (१५१५-१५७२). स्कॉटिश धर्मसुधारक. कॅल्व्हिनच्या सुधारकी धर्ममताचा कट्टा पुरस्कर्ता. प्रॉटेस्टंट हा साऱ्या स्कॉटलंडचा धर्म व्हावा असा प्रयत्न केला.

५७. स्कॉटलंडची मेरी राणी (१५४२-१५८७) ही पक्की कॅथॉलिक व म्हणून जॉन नॉक्सची विरोधक होती.

५८. ह्या पोपटाची हकीगत 'आमचा व खालील प्राण्यांचा संबंध' ह्या पूर्वी उल्लेखिलेल्या लेखात म. शिंदे यांनी दिली आहे.

५९. कार्तिकाचे दिवे ह्याचा अर्थ कार्तिक महिन्यात लावण्यात येणारे आकाशदिवे (*महाराष्ट्र शब्दकोश,* विभाग दुसरा, पृ. ७००). येथे, कागद कातरून तयार केलेले सुशोभित आकाशदिवे असा अर्थ अभिप्रेत दिसतो.

६०. स्कॉच बोलीत इंग्रजीतील 'लेक' ला लॉख म्हटले जाते स्कॉच सरोप्रांताचे वर्णनही पूर्वी उल्लेखिलेल्या म. शिंदे यांच्या 'जनातून वनात व परत' ह्या लेखात आले आहे.

६१. स्कॉटच्या लेडी ऑफ दि लेक ह्या काव्यात एलनची कथा वर्णिली आहे. ह्या बेटाला Ellen's Isle हे नाव तिच्यावरूनच पडले.

६२. समासात शिंदे यांनी ज्या शब्दांचे अर्थ अधोरेखित करून दिले त्या शब्दांवर आकडे टाकून ते कवितेच्या अखेरीस दिले आहेत. ही कविता स्कॉटलंडमध्ये अतिशय लोकप्रिय असल्याचे गाइडबुकातील उल्लेखावरून दिसते.

६३. ही कविता उपलब्ध झाली नाही.

६४. मुलांना उद्देशून म. शिंदे यांनी माहितीपर लेख लिहिला. (*लेख, व्याख्याने व उपदेश,* कित्ता, पृ. ५५-५७).

६५. एक्सिटर हे इंग्लंडच्या नैऋत्य किनाऱ्यावरील गावाचे नाव.

६६. ऑर्थर राजाबद्दलच्या दंतकथेवरील हे काव्य टेनिसनने १८५९ मध्ये प्रथम लिहिले, ६९ मध्ये भर घातली व १८८५ मध्ये पूर्ण केले.

६७. फर्ग्युसन कॉलेजचे प्रिन्सिपॉल महादेव शिवराम गोळे ह्यांनी 'विद्याधर पंडित' ह्या टोपणनावाने 'हिंदुधर्म आणि सुधारणा' हा ग्रंथ लिहून पुण्यास १८९८ मध्ये प्रसिद्ध केला. सर्व ग्रंथाचा रोख हिंदू धर्मातील रूढ चालीचे समर्थन करण्याकडे आहे. येथे उल्लेखिलेल्या, लीलावती या पात्राचे विचार 'विवाह पद्धतीसंबंधाने एका नवीन प्रयोगाची कल्पना' (पृ. २५६-२८६) ह्या प्रकरणात आले असून 'कुटुंबात स्त्री किंवा पुरुष यांपैकी एक सेव्य व एक सेवक झाला पाहिजे. ज्याचे गुण व कर्तृत्व कमी (मग तो पुरुष असेल तर त्याने) सेवक व्हावे हे रास्त आहे' अशी तिची प्रारंभी कल्पना असते. विद्याधराचा उपदेश ऐकून तिचे हे मत बदलते व तिला उपरती होऊन नम्रता या गुणाची महती पटते व रूढीची बाजू ती उचलून धरते.

६८. प्लेटो या ग्रीक तत्त्वज्ञाच्या 'रिपब्लिक' या ग्रंथाच्या भाग ५ च्या प्रारंभी येथे उल्लेखिलेल्या स्त्रीपुरषविषयक प्रश्नांची चर्चा आहे. निश्चित स्वरूपाचे निष्कर्ष मांडण्यापेक्षा अनेक प्रश्न उपस्थित करणे व प्रत्यक्ष विचार करण्याची प्रक्रिया देणे हीच प्लेटोची प्रतिपादनाची पद्धती असल्याने म. शिंदे यांनी वरील मत मांडले असावे.

६९. मूळ रोजनिशीत पवनचक्कीचे ७ सें.मी. x ४ सें.मी. असे चित्र म. शिंदे यांनी काढले आहे.

७०. ही त्यांनी आधी उल्लेखिलेली युनिटेरियन रोजनिशी असावी. उपलब्ध झाली नाही.

७१. ऑगस्ट डि कोंट (१७९८-१८५७) हा सुप्रसिद्ध प्रत्यक्षज्ञानवादी फ्रेंच तत्त्ववेत्ता. याचा सिद्ध केलेल्या गोष्टीवरच विश्वास व धर्मसत्तेस विरोध होता. १८४९ मध्ये 'पॉझिटिव्हिस्ट कॅलेंडर' प्रसिद्ध करून त्यात ख्रिस्ती साधूंच्या ऐवजी जगातील सुधारणेच्या प्रगतीत मदत केलेल्या पुरुषांची नावे घातली.

७२. ह्या नोंदीतील हे अखेरचे वाक्य नंतर लिहिलेले दिसते.

७३. सदर पत्र उपलब्ध झाले नाही.

७४. ज्या हॉटेलात अण्णासाहेब शिंदे उतरले होते त्या हॉटेलचे नाव असलेल्या कागदावरच स्वतंत्रपणे ही माहिती लिहिलेली आहे. त्यावरूनच त्यांनी रोजनिशीत उतरून घेतली आहे.

७५. ही रोजनिशी उपलब्ध झाली नाही.

७६. ही पुरवणी म. शिंदे यांनी आधीच्या मजकुराप्रमाणेच २४ मार्च १९२६ रोजी अथवा त्यानंतर लगेच लिहिली असावी.

येरवड्याच्या तुरुंगातील रोजनिशी

१. विश्वास (जन्म १९०७) हे म. शिंदे यांचे मधले चिरंजीव. ह्यांची मानसिक वाढ झाली नव्हती. १९६५ मध्ये मृत्यू होईपर्यंत थोरले चिरंजीव प्रतापराव यांनी त्यांचा प्रतिपाळ केला. छबू ऊर्फ शुभदा ह्या म. शिंदे यांचे बंधू एकनाथराव यांच्या कन्या. यांचा विवाह श्री. एकनाथराव घोरपडे यांच्याशी झाला. बबन ऊर्फ रवींद्रराव (जन्म ६ जुलै १९१३) हे म. शिंदे यांचे धाकटे चिरंजीव. काही दिवस सैन्यात नोकरी करून निवृत्त झाल्यानंतर पुण्यास शेतकी खात्यात नोकरी केली. म. शिंदे यांच्या अखेरच्या दिवसांत त्यांच्या मागे लागून, त्यांना सर्व प्रकारे मदत करून त्यांच्या 'माझ्या आठवणी व अनुभव' ह्या पुस्तकाचा अखेरचा भाग उतरून घेतला. यांचा मृत्यू २९ जून १९७५ ला झाला.

२. म. शिंदे यांच्या 'माझ्या आठवणी व अनुभव' ह्या नावाने पुढे प्रसिद्ध झालेल्या आत्मचरित्रपर पुस्तकाचे लेखन करावयास प्रारंभ केल्याचा हा उल्लेख. ह्या सुमारे ४१३ छापील पृष्ठांच्या पुस्तकापैकी १०३ पृष्ठांपर्यंतचा मजकूर त्यांनी तुरुंगवासात लिहिला.

३. प्रतापराव (जन्म ११ सप्टेंबर १९००) हे म. शिंदे यांचे थोरले चिरंजीव. पुणे कँटोनमेंट बोर्डात हिशोबखात्यात नोकरी केली. पुणे प्रार्थनासमाज, जातिनिर्मूलन संस्था इ. संस्थांशी निगडित. सामाजिक, धार्मिक विषयांवर अनेक मासिकांतून व वृत्तपत्रांतून स्फुट लेखन. मृत्यू ९ सप्टेंबर १९७३.

४. ब्राह्मधर्माचा प्रचार बहुजनसमाजात आणि विशेषत: कुटुंबात (बायकामुलांत) व्हावा ह्या तळमळीतून म. शिंदे यांनी 'कौटुंबिक उपासना मंडळा' ची १९२६ मध्ये पुण्यास स्थापना केली. 'आईबाप, बहीणभाऊ, नवराबायको, ह्यांच्या प्रेमाचे केंद्र म्हणजे कुटुंब. हेच धर्माचरणाचे व प्रसाराचे क्षेत्र', ह्या भूमिकेतून, व्यक्तीने नव्हे तर कुटुंबाने, ह्या मंडळाचे सदस्य व्हावे ही अपेक्षा होती. बाबूराव जगताप, केशवराव जेधे, गणपतराव शिंदे, रामराव शिंदे, कृ. गो. पाताडे इत्यादींची कुटुंबे ह्या मंडळात सहभागी होती. मंडळाचे काम १९३६ पर्यंत विशेष जोरात होते व म. शिंदे यांच्या मृत्यूपर्यंत ते चालले. (वि. रा. शिंदे, *माझ्या आठवणी व अनुभव,* उनि., पृ. ३६१-६४).

५. श्रीमती लक्ष्मीबाई (जन्म १९१४) ह्या म. शिंदे यांचे थोरले चिरंजीव श्री. प्रतापराव यांच्या पत्नी. बडोद्याच्या गायकवाड घराण्यातील पदच्युत राजे मल्हारराव ह्यांचे पुत्र गणपतराव ह्यांच्या कन्या. आपल्या पतीसमवेत ह्याही सामाजिक कार्यात भाग घेत. पुणे प्रार्थनासमाजाशी निगडित. काही काळ उपाध्यक्ष. हल्ली वास्तव्य लॉस एंजेलिस येथे इंजिनीअर असलेल्या शंतनू ह्या मुलाकडे.

६. बाबूराव मारुतीराव जेधे (१८९९-१९६७). सत्यशोधक चळवळीतील एक प्रमुख कार्यकर्ते. बहुजनसमाजाच्या चळवळीस सर्वतोपती साह्य केले. केशवराव जेधे यांचे बंधू. अण्णासाहेबांशी यांचे अतिशय घरोब्याचे संबंध होते.

७. रूक्मिणीबाई (१८८२-१९५४) ह्या म. शिंदे यांच्या पत्नी. १९०९ साली पुण्यास भरलेल्या डिप्रेड क्लासेस मिशनच्या प्रांतिक परिषदेच्या वेळी व्यवस्था ठेवण्यात झटून काम केले. अण्णासाहेबांच्या बरोबर सार्वजनिक कार्यात भाग घेतला.

८. गजानन नारायण ऊर्फ सेवानंद बाळूकाका कानिटकर (१८८६-१९५९). १९०८ मध्ये बी.ए. प्रथम टिळकांचे अनुयायी. १९२० ते ४४ पर्यंत म. गांधींचे अनुयायी. मुळशी सत्याग्रह (१९२१-२३) संघटित केला. मिठाचा सत्याग्रह, दारूबंदी, 'चले जाव' ह्या चळवळींत भाग. १९४४ मध्ये काँग्रेसचा राजीनामा व त्यानंतर पुणे येथे 'हिंदमाता मंदिर' स्थापन करून गरीब विद्यार्थ्यांना राष्ट्रीय स्वावलंबनाचे शिक्षण. ग्रामोद्धाराचे कार्य.

९. भास्करराव विठोजीराव जाधव (१८६७-१९५०). १८८८ साली मॅट्रिक परीक्षेत इलाख्यात पहिले. एम्. ए., एल्एल्. बी. १८९५ ते १९२१ पर्यंत कोल्हापूर संस्थानात नोकरी. सहकारी चळवळीस चालना दिली. ब्राह्मणेतर पक्षाची स्थापना करण्यात पुढाकार. १९२३ पासून मुंबई कायदेकौन्सिलात विविध मंत्रिपदावर, म. शिंदे यांना तुरुंगात भेटण्यास आले त्यावेळी ते मुंबई प्रांताचे शिक्षणमंत्री होते.

१०. ह्या वाक्यानंतर मूळ रोजनिशीत सुमारे १० ओळींची जागा कोरी ठेवलेली आहे. रा. भास्करराव जाधवांशी ह्या प्रसंगी जे बोलणे झाले ते तुरुंगातील निर्बंधामुळे ह्या वेळेस लिहिणे म. शिंदे यांना योग्य वाटले नसावे. तुरुंगातून सुटल्यानंतर लिहिण्यासाठी ही जागा कोरी ठेवली असावी.

ह्या भेटीत म. शिंदे व श्री. भास्करराव जाधव यांचे काय बोलणे झाले याची कल्पना त्यांच्या पुढील निवेदनावरून येते. "भास्करराव‌ांना मी 'का आलात ?' असे विचारले. 'एरव्ही समाचाराला आलो' असे सांगून ते म्हणाले" "आता तुम्ही वृद्ध झाला आहात. तुम्हास विश्रांतीची जरूरी आहे. ती घेण्याचे निश्चित करीत असाल तर तुम्हाला नेण्यासाठी आलो आहे." मी म्हटले, "विश्रांतीच जर मला पाहिजे आहे, तर येथल्यासारखी बाहेर दुसरीकडे कोठे मिळणार नाही. आणि आमच्यासारखी मंडळी येथे असली तर बाहेरचीही थोडी गडबड कमी होईल." (*माझ्या आठवणी व अनुभव,* उनि., पृ. ४०२)

११. श्री. प्रतापराव व लक्ष्मीबाई शिंदे यांची प्रथम कन्या २२ जून १९३० रोजी जन्मली. हिचे उर्मिला असे नाव ठेवले. अमेरिकेतील युटा स्टेट युनिव्हर्सिटीतील प्राध्यापक डॉ. दत्ताजीराव साळुंखे यांच्याशी विवाह.

१२. रामभाऊ हिरे (जन्म १८ नोव्हेंबर १८९९). फर्ग्युसन कॉलेजमधून बी. ए. राष्ट्रीय चळवळीत भाग घेऊन तुरुंगवास पत्करला. अहमदनगर येथे राष्ट्रीय पाठशाळा काढली. तिला आर्थिक मदत व्हावी म्हणून 'मोहनमुद्रा मंदिर' नावाचा छापखाना काढला. तुरुंगातील आठवण सांगताना त्यांनी म्हटले, 'महर्षी शिंदे स्वभावाने फार मनमिळावू होते. स्वच्छतेची त्यांना अतिशय आवड असे. आपले धोतर ते पांढरेशुभ्र ठेवीत. त्याचप्रमाणे सर्व भांडी घासूनपुसून स्वच्छ ठेवीत.' हल्ली श्री. हिरे यांचे वास्तव्य अहमदनगर येथे आहे.

त्रिंबक अण्णाजी उर्फ नानासाहेब देवचके (५ नोव्हेंबर १८९५-२६ फेब्रुवारी १९५५). अहमदनगरचे अनाथ विद्यार्थी गृह ही संस्था स्थापन करून तिच्यासाठी कष्ट घेतले. नगर येथील सामाजिक जीवनात कार्य केले. (माहिती : श्री. द. बा. डावरे, वकील, अहमदनगर, श्री. रामभाऊ हिरे यांचे मेहुणे, यांच्याकडून).

१३. स्वामी सहजानंद यांच्याऐवजी स्वात्मानंदजी हे नाव चुकून लिहिले गेलेले दिसते. कारण नमूद केलेल्या १४ नावांत यांचे नाव नाही. स्वामी स्वात्मानंदजी हे प्रार्थनासमाजाच्या आणि डिस्प्रेड क्लासेस मिशनच्या कामातील म. शिंदे यांचे सहकारी होते. परिचयातील हे नाव अनवधानाने येथे लिहिले गेले असावे.

१४. अहल्याबाई शिंदे (जन्म १८९४) ह्या श्री. तुकाराम बाबांजी गरूड यांच्या कन्या. हे चित्रपट व्यवसायाची सामग्री व इस्पितळ उपकरणे यांचा व्यापार करणाऱ्या बाबाजी सखाराम आणि कं. चे व 'करमणूक' वृत्तपत्राचे मालक. अहल्याबाईंचा विवाह १९१५ मध्ये श्री. गणपतराव शिंदे यांच्याशी झाला. वडिलांकडून आलेली मोठी संपत्ती मराठा फ्री बोर्डिंग चालविण्यासाठी व दीनदलितांना साह्य करण्यासाठी पतीच्या स्वाधीन केली. प्रार्थनासमाजी. पतीच्या सामाजिक -धार्मिक कार्यात अंत:करणपूर्वक सहकार्य केले. सध्या अतीव वार्धक्याच्या स्थितीत पुण्यास मुलगा केशवराव यांजकडे आहेत.

१५. गणपतराव शिंदे (३ डिसेंबर १८८०-२१ फेब्रुवारी १९७५). शिक्षण मॅट्रिकपर्यंत. १९०६ पासून शेतकीखात्यात नोकरी. दत्तात्रय अनंत आपटे हे कविमित्र भेटले. रविकिरण मंडळातील कवींशी स्नेह. मासिक मनोरंजन, विविध ज्ञानविस्तार, करमणूक इ. मधून 'सरस्वतीकंठाभरण' व 'विनीत' ह्या टोपणनावांनी कवितालेखन. प्रार्थनासमाजाचे निष्ठावंत सभासद व कार्यकर्ते. वयाच्या ९४ व्या वर्षीदेखील उपासना चालवीत. कौटुंबिक उपासना मंडळाचे सेक्रेटरी म्हणून काम केले. पुण्याचे मराठा फ्री बोर्डिंग स्वार्थत्यागपूर्वक चालविले. अण्णाचे साहेबांचा शिंदे दंपतीवर फार लोभ होता. (मुलाखत : गणपतराव शिंदे, पुणे, १० मे १९७४; व माहिती : केशवराव शिंदे, गणपतरावांचे चिरंजीव, यांजकडून).

१६. कृष्णराव गोविंदराव पाताडे (१८९६-१९३३). अण्णासाहेब शिंदे यांचे निष्ठावंत सहकारी, मुंबई, बंगलोर, पुणे येथील मिशनच्या शाखांमध्ये धडाडीने कार्य. पर्वती सत्याग्रहात भाग. म. गांधींनी मिठाच्या सत्याग्रहाच्या आधी अस्पृश्यतेच्या विरुद्ध सत्याग्रह करावा हे बिंबविण्यासाठी १९२० साली दांडी सत्याग्रहाच्या वेळी मिठाचे मडके ताब्यात घेऊन त्या सत्याग्रहाला विरोध दर्शविला. पर्वती सत्याग्रहात भाग घेतला. राष्ट्रीय वृत्तीचे. अण्णासाहेब शिंदे यांचे त्यांच्यावर अपत्यवत् प्रेम होते. १९३३ मध्ये मानसिक बिघाड झाला. त्यातच न्यूमोनियाचा विकार होऊन मृत्यू.

१७. सुभेदार आर. एस. घाटगे हे १९०६ च्या सुमारास अण्णासाहेबांच्या सहवासात आले. डिस्प्रेड क्लासेस मिशनेच कार्यकर्ते. रा. पाताडे यांजबरोबर म. गांधींच्या दांडी सत्याग्रहास विरोध केला. नंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे सहकारी बनले. महाडच्या चवदार तळ्याच्या सत्याग्रहात सक्रीय भाग घेतला.

१८. माधवराव केळकर (१८९९-२८ ऑगस्ट १९६५). प्रार्थनासमाजाचे धर्मप्रचारक श्री. सदाशिव पांडुरंग केळकर यांचे चिरंजीव. ह्यांचा निसर्गोपचार पद्धतीचा अभ्यास होता, व तिला अनुसरून वैद्यकी करीत.

१९. केशव, हिरु व शिवाजी ही गणपतराव व अहल्याबाई शिंदे ह्यांची मुले.

२०. श्री. बी. बी. केसकर ह्यांनी संपादित केलेले 'विठ्ठल रामजी शिंदे यांचे लेख, व्याख्याने आणि उपदेश' हे दामोदर सावळाराम आणि मंडळीने मुंबई येथे १९१२ मध्ये प्रसिद्ध केलेले पुस्तक.

२१. श्री. कृ. भा. बाबर यांनी मुख्यत: विद्यार्थ्यांसाठी म. शिंदे यांचे चरित्र 'कर्मवीर विद्यार्थी' या नावाने लिहून एप्रिल १९३० मध्ये प्रसिद्ध केले.

२२. बौद्ध धर्म व तत्त्वज्ञान यांचे गाढे अभ्यासक श्री. धर्मानंद कोसंबी यांनी श्रीमंत सयाजीराव गायकवाड यांच्या सूचनेवरून फेब्रुवारी १९१० मध्ये बडोद्यास दिलेल्या व्याख्यानांच्या आधारे तयार केलेले हे पुस्तक निर्णयसागर प्रेसने मुंबई येथे एप्रिल १९१० मध्ये प्रसिद्ध केले.

२३. केशवचंद्र सेन (१८३८-८ जानेवारी १८८४) यांनी १८८१ मध्ये स्थापन केलेला ब्राह्मसमाजाचा उपपंथ. केशवचंद्र हे १८६२ मध्ये बंगालमधील 'आदि ब्राह्मसमाजा' चे आचार्य होते. १८६६ मध्ये इतरांशी मतभेद झाल्यावर 'भारतवर्ष ब्राह्मसमाज' त्यांनी स्थापन केला. १८७८ मध्ये ह्या समाजातून फुटून पं. शिवनाथ शास्त्री वगैरेंनी 'साधारण ब्राह्मसमाज' स्थापन केला. १८८१ मध्ये केशवचंद्रांनी सर्व राष्ट्रे, लोक, धर्म, लोकाचार, भक्तिमार्ग, वैराग्यसाधने यांचे एकत्व सांगणारा 'नवविधान पंथ' स्थापन करून आपण स्वत: व इतर बाराजण ईश्वराचे प्रेषित असल्याचे घोषित केले. केशवचंद्रांचा हा पंथ ख्रिस्ती वळणावर अधिक होता.

२४. हरिभाऊ तुळपुळे (९ जुलै १८८५-१० सप्टेंबर १९५७). पुण्यातील निष्ठावंत, स्वार्थत्यागी काँग्रेस कार्यकर्ते. देशकार्यासाठी पुष्कळ पैसा खर्च केला. आयुष्यातील सात-आठ वर्षे तुरुंगवासात काढली. १९३७ मध्ये मुंबई विधिमंडळावर निवडून गेले. सर्व जातीच्या लोकांना बरोबर घेऊन कार्य केले. (माहिती : श्रीमती कमलाबाई भागवत, पुणे).

२५. रा. हे राजमान्य शब्दाचे संक्षेपचिन्ह असावे व 'हा. कर' हा हारोलीकर या नावाचा संक्षेप असावा. श्री. हारोलीकर नावाचे कार्यकर्ते १९२८ पासून येरवड्याच्या तुरुंगात अडीच वर्षांची शिक्षा भोगीत होते, व तेथे ते आजारीही होते.

२६. येथे उल्लेखिलेले अमितगती आचार्य हे जैन कवींत विद्वान आचार्य म्हणून प्रसिद्ध. काळ अंदाजे इ. स. ९७९ ते १०२१ तत्त्वभावना ह्या त्यांच्या ग्रंथात जैन तत्त्वज्ञानातील सात तत्त्वांची महती व तद्विषयक चिंतन आहे. बृहत् सामायिक पाठापैकी 'सामायिक पाठ' ऊर्फ 'भावना द्वात्रिंशिका' हा ३२ श्लोकांचा भाग अमितगती आचार्यांचा असून यामध्ये प्रत्येक जीवात आत्मा असतो, मनुष्ययोनीत राहूनच आत्मा स्थिर करता येतो, व जन्ममरणाचा फेरा चुकविता येतो, असे प्रतिपादन आले आहे. (माहिती : जैन ज्ञानकोशाचे विद्वान कर्ते श्री. मोतीलाल हिराचंद गांधी, औरंगाबाद).

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे समग्र वाङ्मय

खंड २ रा : आत्मपर लेखन

विभाग दुसरा

माझ्या आठवणी व अनुभव

अनुक्रमणिका

प्रकरण	भाग पहिला	[२०५ - ३६२]
	प्रस्तावना - वि. भि. कोलते	२०५-२१६
	आदरांजली - यशवंतराव चव्हाण	२१७
	माझ्या आठवणीसंबंधी - रवींद्र शिंदे	२१९-२२१
पहिले	**माझे आजोबा**	२२३-२२६
	पहिल्या आठवणी – चंद्रोजीराव – एक हिकमत – बसप्पा अथणी – बेहिशेबी उधारी – लष्करी पेशा – माझा जन्म – एक स्वप्न – जनाक्का.	
दुसरे	**माझी आजी**	२२७-२३१
	संताबाई – पोरकट चोरी – यल्लमाची यात्रा – अंबाबाईची यात्रा – कठीण नवस – शाकाहार – अंतकालचे वेड.	
तिसरे	**आजोळ**	२३२-२३५
	कृष्णराव काळे – पतिव्रता गंगाबाई – आमचा तोरा – आजीचे घर – सावलीतील तुळस - माझे मामा.	
चौथे	**माझे बाबा**	२३६-२३९
	जन्म (अदमासे) १८३५ : मृत्यू २७ जून, १९१० – पांढरपेशी शिक्षण – ब्राह्मणी वळण - कडक स्वभाव – बाबांची रसवंती – विठोबाचा सप्ताह – बबलादीचे स्वामी.	
पाचवे	**माझी आई**	२४०-२४६
	जन्म (अदमासे) १८४० : मृत्यु ८ फेब्रवारी, १९१० – बाबांचे लग्न – यमुनाबाई - सासुरवास - आमचा रयतावा – हालअपेष्टा – तान्याक्का – जनाक्का – आमचा वाडा - आईच्या गोष्टी –आत्मसंतोष – वाशांचे सरपण – करवीरची यात्रा.	
सहावे	**आमची लग्ने**	२४७-२४९
	तीन लग्ने – सालंकृत कन्यादान – व्याह्यांचा धिंगाणा – केळवण – आसंगीचे वऱ्हाड - पेंढारधाड.	
सातवे	**वडील भावाचा मृत्यू**	२५०-२५३
	नवीन टप्पा – बंधू एकनाथ – चुणचुणीतपणा – चिमुकली स्कॉलरशीप – तुकारामाचा संसार.	
आठवे	**खडतर पाच वर्षे**	२५४-२५६
	स्वभावदोष – संस्थांनी नोकरी – व्यसनी विराप्पा – बबलादिचे सिद्ध – स्वभावातील पालट.	
नववे	**बालपण**	२५७-२५९
	जन्म – एक आपत्ती – पहिला लळा – धाडसी तांडेल – सवयीचा परिणाम – १८७७ चा दुष्काळ – चोरटे दान.	

दहावे **माझे प्राथमिक शिक्षण** २६०-२६२

धूळपाटी – मौजीबंधन – अक्काची माया – माझा हट्ट.

अकरावे **माझा हायस्कूलचा काळ** २६३-२६६

शिक्षकवर्ग – विषयांची गोडी – ग्रहणशीलता – इंग्रजी अभ्यास – सकृतदर्शनी प्रेम – मराठी अभ्यास – संस्कृत अभ्यास – रसिकता.

बारावे **माझे सोबती** २६७-२७०

माझी भावंडे – माणूसघाणेपणा – गोड देखावा – मित्रमंडळ – मुक्तद्वार वाडा – नवीन भरणा.

तेरावे **माझे खेळ** २७१-२७४

सोंगट्यांचा खेळ – एक मल्लयुद्ध – पटाईत वृत्ती – 'किर्र' खेळ – सूरपारंब्या सूरपाट्या - आमचा कंपू – चित्रकला – कारागिरी – आमचे कारखाने.

चौदावे **माझ्या खोड्या** २७५-२७९

आग्रहीपणा – गांवढळ खोड – रामतीर्थ – विंचवाशी खेळ – सहिष्णूता – विक्षिप्तपणा - शर्यत – विशेष करामत.

पंधरावे **काही सवयी आणि वागणूक** २८०-२८३

पेहराव – साधी राहणी – स्नान – अखंड सहवास – गुळ्ळव्वा – घरकामाची लहर – अव्यवहारीपणा – बाजारातील शोभा.

सोळावे **माझ्या एकांत सहली** २८४-२८५

एकांतातील सहली – पहिला ठसा – वनभोजन.

सतरावे **माझे वाचन** २८६-२८७

खाजगी वाचन – कादंबरी वाचन – वाचनाचे वेड – पोथीवाचन – धार्मिक पंथ.

अठरावे **पोरवयातील माझी धर्मभावना** २८८-२९३

प्रस्ताव – स्पष्टोक्ती – बागुलबोवा – पहिली धर्मभावना – धर्माची गोडी – ताईबाईचे प्रस्थ - सूडाची कल्पना – यथासांग पूजा – मारुतीची पूजा – गाड्याची पूजा – भिंतीवरील थाप.

एकोणीसावे **मूर्तिपूजा** २९४-२९९

देव्हारा – पूजेचा उत्साह – आध्यात्मिकता – शिवलिंगपूजा – शिव व विष्णु – पुराणिकाचा थाट – गोड फरक – भक्ती व यश – अधिक स्फोट – साधुसमागम – जटाधारी गोसावी - इतर वैरागी – योग्य पारख.

विसावे **भावी सामाजिक सुधारणेची तयारी** ३००-३०५

भावंडांची नावे – मातापित्यांचे ऋण – पवित्र वातावरण – मुलींचे शिक्षण – स्वभाव – लक्षणे – अभेद भाव – मुसलमान स्नेही – शुद्ध तत्त्वे – सहृदयता – इतराजी.

एकविसावे **कॉलेज प्रवेश** ३०६-३०८

गं. भा. म्हस्के – स्कॉलरशीप – फर्ग्युसन कॉलेज – प्रि. आगरकर.

बाविसावे **प्रीव्हियसचे वर्ष** ३०९-३१३

कॉलेजचा पसारा – व्याख्यानपद्धती – मॅग्नाचार्टा – लाजाळू वृत्ती – पेच प्रसंग – तिघेजण - कॉलेज खर्च – काटकसर – पैशांची टंचाई – डॉ. शेळके – सौ. बहिणाबाई.

तेविसावे **इंटरमिजिएटचे वर्ष** ३१४-३२४

उलटा प्रकार – गाढवी सवाष्णी – कंगाल स्थिती – जनाक्काचा छळ – बाळमित्र रा. शासने - स्वयंपाकव्रत – चैतन्यशून्यता – बौद्धिक विकास – नास्तिकपणा – चर्चामंडळ – पशुपणा - कडेवाला मित्र – खाद्यक्रम – व्यायामाची इर्षा – आजार – दु:खानंद – मुक्तता – सुधारकी हेतू – पंडिता रमाबाई – प्रो. कर्वे – मिस मेरी भोर – कावेबाजपणा – रे. डॉ. संडरलंड - प्रपंचाची काळजी – जादा मदत.

चोविसावे **पदवीग्रहण** ३२५-३३२

सवलत – डेक्कन कॉलेज – निकाल – पिळवणूक – प्रो. मॅक्समुल्लर – रा. कळसकर - प्रार्थनासमाज – परिचय – सभासद दीक्षा – पहिली उपासना – रा. सुकथनकर – रा. मोती बुलासा – अटींचा खुलासा – व्यत्यय – दयाळू महाराज – आश्वासन.

पंचविसावे **विहंगमावलोकन** ३३३-३३४

हेतू – कॉलेजातील सुट्ट्या.

सव्विसावे **माझे बिऱ्हाड** ३३५-३३६

डॉ. ग्रेडन – भाड्याची जागा – पिअर्सन – व्यक्तित्व.

सत्ताविसावे **मँचेस्टर कॉलेज** ३३७-३३९

अध्यापक वर्ग – पूर्व व पश्चिम – धर्मपरिवार – निबंध व प्रयोग – चहापान – उपासक.

अठ्ठाविसावे **खेळकर वृत्ती** ३४०-३४२

टोयोसाकी – मलूल हिंदी – इव्हर्ट – मर्कटलीला – पॉझ मॅगेझिन.

एकोणतिसावे **काही टिपणे** ३४३-३५६

युनिटेरियन समाज – साधनसभा – नाताळची पहिली सुट्टी – मिस मॅनिंग – दादाभाई नौरोजी - एक जागृतीतले स्वप्न – रे. चार्लस व्हायसे – शेरलॉक होम्स – Domestic Mission - Postal Mission (पोस्टल मिशन) – संडे स्कूल असोसिएशन साउथ प्लेस नैतिक समाज – पॅरिस - बॉने मोरी – प्रो. रेव्हील – मोस्यु रोज – बॉई बॉला – परे ला शाज - रॉबिन्सन – गुड फ्रायडे - मॅडोमासील ड्युगा – व्हर्सायचा राजवाडा – ऑगस्ट डि कॉम - राममोहन रॉय – १९०२ ची ईस्टर सुट्टी – 'ए' गार्डन – नाताळची सुट्टी – मिसेस मॅक्समुल्लर - बोटींच्या शर्यती – ऑक्सफर्ड - पदवीदान समारंभ.

तिसावे **परत प्रवास** ३५७-३६२

शेवटचा निरोप – एक अडचण – ॲम्स्टरडॅमचा खर्च – ॲम्स्टरडॅमची परिषद – व्होलंदाम - कलोन कॅथेड्रल – मोझेसचा पुतळा – नेपल्स – पाँपी – स्वागत – परिशिष्ट १ – मँचेस्टर कॉलेजचे दोन दाखले.

प्रकरण	भाग दुसरा	[३६५ - ४८०]

पहिले **धर्मसेवा** ३६५-३७४

माझी मनोरचना – दोन पक्ष – प्रयोगाचे नाविन्य – पद्धतीचे भेद – माझ्या वेळीची परिस्थिती - नाताळातील धामधूम – बंगलोर – मद्रास – मद्रासचे तिखट – जगन्नाथपुरी – राममोहन रायची आई – माघोत्सव – महर्षि देवेंद्रनाथ ठाकूर – कालीमाता.

दुसरे **मुंबईतील स्थानिक कार्यक्रम** ३७५-३७८

पोस्टल मिशन – उदार धर्मग्रंथ वाचनवर्ग – तरुण ब्राह्म संघ – घरची स्थिती – जमखंडीचा दौरा – सामाजिक प्रकोप – मुधोळ.

तिसरे **काठेवाडचा दौरा** ३७९-३८२

काठेवाडचा दौरा – गिरनार – मियागाव – राममोहन आश्रम.

चौथे **स्थानिक कार्य** ३८३-३८५

प्रेमळ गोतावळा – क्रांती – उपासनापद्धती – सुलभ संगीत.

पाचवे **घरच्या अडचणी** ३८६-३८७

चंद्राक्का – रात्रीची शाळा – नियमांची गडबड.

सहावे **दौरा** ३८८-३८९

नाशिक – एक पंढरीमाहात्म्य – तातडीची तार – उदार धर्म वाचनवर्ग.

सातवे **स्थानिक समाज** ३९०-३९७

सातारा समाज – अहमदनगर समाज – सोनईची चळवळ – इंदूर – मांडवगड – नवसारी - सोनगड – बडोदे – मराठ्यांकडून स्वागत – मंगळूर – समाजाची स्थापना प्रेमाचे भांडण - बिल्लवांची गृहस्थिती – पनवेल – कोल्हापूर.

आठवे **भारतीय एकेश्वरी धर्मपरिषद** ३९८-४१४

ब्राह्मसंघ – मुंबई – काशी – तीन पक्ष – बांकीपूर – मोघीर – भागलपूर– काठीहार – पूर्णिया – कुचबिहार – मंदिर – डुब्री – मैमनसिंग – डाक्का – कलकत्ता सुरत – मद्रास लाहोर – मातोश्रींचा अंत – अलाहाबाद – कलकत्ता – बांकीपूर – कराची – मदतीचे आश्वासन – महायुद्ध.

नववे **ब्राह्मधर्मसूची ग्रंथ** ४१५-४१७

प्रकाशन.

दहावे **विविध प्रयत्न** ४१८-४२५

पूर्वोतिहास – महात्मा ज्योतिबा फुले – बाबू शशिपाद बंदोपाध्यायजी (बानर्जी) – मुंबईतील एक प्रयत्न – सयाजीराव महाराज – थिऑसोफिकल सोसायटी – के. रंगराव – ब्रिटीश सरकार आणि ख्रिस्ती मिशने.

अकरावे **भारतीय निराश्रित साह्यकारी मंडळाची स्थापना** ४२६-४३२

पूर्वतयारी – लोकजागृती – अंत्यज आणि एकूण हिंदू यांची प्रांतनिहाय संख्या – तिरपगडा - स्थापना – मंडळीची पहिली कार्यकारी समिती – त्रेवार्षिक अहवाल.

बारावे **सामान्य विचार** ४३३-४३५

दोन पद्धती – प्रचारकांचे दोन प्रकार – कार्याची घटना – पहिले कार्यवाहक.

तेरावे **कार्याची सुरुवात** ४३६-४४४

निराश्रित सेवासदन – पहिली शाळा – हेतू व कार्य – समाचार – सोमवंशीय मित्रसमाज - अनुभवाचा फायदा – मातेचा लळा – आणखी काही प्रयोग – प्रतिष्ठित स्त्रियांची कमिटी - विद्यार्थी वसतिगृह – मोफत दवाखाना – शाळाखाते.

चौदावे **मिशनची घटना** ४४५-४५०

मिशनची घटना – पुणे शाखा – मदतीसाठी जलसा – पहिला बक्षिस समारंभ – पुण्याचा पाठिंबा – मुरळी प्रतिबंधक सभा – मेघवृष्टीने प्रचार – वसतिगृहाची स्थापना – चंदावरकर यांचा दौरा – वेड्यांचे इस्पितळ.

पंधरावे **निधीची योजना** ४५१-४६६

निधीची टंचाई – संस्थापनेचा दिनसमारंभ – रुपीफंड – तांदूळ फंड – कापड फंड व पेटी फंड – औद्योगिक शिक्षण – वाडिया ट्रस्टींची मदत.

सोळावे **महाराष्ट्र परिषद** ४६७-४७२

मिशनच्या परिषदा – परिषदेची तयारी – पुढाऱ्यांचा मेळावा – कार्याचे क्षेत्र – भाषणे – स्त्रियांची सभा – दोन विघ्ने – अपूर्व कामगिरी – उदार देणगी.

सतरावे **अंतर्बाह्य खळबळ** ४७३-४८०

एक प्रश्न – माझी स्थिती – टिळकांस शिक्षा – एक काहूर – दुष्ट वार्ता – शिष्टमंडळ - गौरवपूर्ण उल्लेख – मिशनचा बक्षिससमारंभ – संशयाचे निराकरण – कठीण परीक्षा – मातापित्यांचा अंत – मातापित्यांचे कार्य.

प्रकरण	भाग तिसरा	[४८३ - ६१६]

पहिले **आयुष्यातील परिवर्तन** ४८३-४८५

जन्मपत्रिका – ता. २३ एप्रिल, १८७३ जन्मकाल – परिवर्तने १ ते ७ -- ए. के. मुदलियार - कार्यवाहकांची फेरव्यवस्था.

दुसरे **अहल्याश्रमाची तयारी** ४८६-४८७

लेडी विलिंग्डन – आश्रमासाठी जागा – शिष्टमंडळ.

तिसरे **नागपूर व हुबळी शाखा** ४८८-४९१

नागपूर शाखा – हुबळी शाखा – मांगांची वसाहत.

चौथे **राजकारणाची सुरूवात** ४९२-४९८

लखनौ पॅक्ट – राष्ट्रीय ऐक्याची चळवळ -- मराठा राष्ट्रीय संघ -- दुही -- न्या. मू. चंदावरकर -- ना. म. जोशी – विजापूर येथील धर्मकार्य – महार परिषद.

पाचवे **अस्पृश्यतानिवारक संघ** ४९९-५०३

मिसेस् बेझंट – काँग्रेसचा ठराव – अस्पृश्यतानिवारक परिषद – प्रमुख ठराव – व्यंगचित्र - सही नाही – लोणावळे येथील परिषद – नागपूरचे शिष्टमंडळ – रंगपंचमीचा अनुभव.

सहावे **हिंदुस्थान सरकारास सूचना** ५०४-५०५

निराळ्या शाळा.

सातवे **बंगलोर शाखा** ५०६-५०९

कृ. गो. पाताडे – तामिळ प्रांतातील दौरा – बॅ. जॉर्ज – ख्रिस्त्यांचा कावा – रेडा आणि माणूस.

आठवे **इमारतींची योजना** ५१०-५१२

गट १ ला – गट २ रा – तान्याक्काचा मृत्यू – चिमुकला बळी.

नववे **निवडणूक** ५१३-५१६

कार्यपद्धती – १ ला, शेतकरी वर्ग – २ रा, शिपाई वर्ग – ३ रा, शिक्षकवर्ग – ४ था, उदमी - ५ वा, दुकानदार – ६ वा, मजूरवर्ग – ७ वा, अस्पृश्यवर्ग – ८ वा, स्त्रीवर्ग – छत्रपतींचे पत्र - भवानी पेठेतील मारामारी.

दहावे **दुष्काळ व इतर कामे** ५१७-५२२

दुष्काळाची आपत्ती – होलिकासंमेलन – सक्तीचे शिक्षण – मद्यपान बंदी – मुरळी – जिवावरचा प्रसंग – इन्फ्ल्यूएंझा.

अकरावे **दुसऱ्या गटाची तयारी** ५२३-५२९

अस्पृशोद्धारक मंडळी -- आक्षेपास उत्तर -- असहकार -- टिळकांचे मत -- गांधींचे मत - नागपूर परिषद.

बारावे **निवेदन** ५३०-५३२

प्रचारकांच्या बदल्या – निवेदन.

तेरावे **पुनर्घटना** ५३३-५३५

अधिकारसंन्यास – पाचवे परिवर्तन.

चौदावे **ट्रस्टींचा गोंधळ** ५३६-५३८

गुप्त कारस्थान – अहल्याश्रमाचे उद्‌घाटन.

पंधरावे **कार्यवाहकांची निवेदने** ५३९-५४७

सर्वांशी समानतेची वागणूक – राष्ट्रीय कार्याची तळमळ – सहकाऱ्यांशी बंधुत्वाचे वर्तन - साहाय्यकारी.

सोळावे **लोकमताचे हेलकावे** ५४८-५५१

लोकमताचे हेलकावे.

सतरावे **सुट्या आठवणी** ५५२-५५६

लाला लजपतराय – सय्यद आणि शिंदे – म्हैसूरच्या राजवाड्यात – धारचे महाराज – गोंडलचे महाराज – घेडोने माटे घेडोन माटे – थूंगावची परिषद – मालाडचा लांडगा – भोकरवाडीतील गाढवी – बंड्या माकड – मुडबीक्षिचा डॉ. ह्यूम – ना. आगाखान.

अठरावे **मंगलोर ब्राह्मसमाज** ५५७-५५९

ड्रॉ. ड्रमंड – मंगलोरचे स्वागत – राजकारणाचे वावडे.

एकोणिसावे **व्हायकोम सत्याग्रह** ५६०-५६३

साधू शिवप्रसाद – व्हायकोम सत्याग्रहाची धामधूम – दिवा व राघवैय्या – मुंबई कॉनिकलमधील तार – नंबुद्री व नायर.

विसावे **बिल्लवांची तक्रार** ५६४-५६५

दहाजणांची तक्रार – दि. ब. बंगेरा.

एकविसावे **कौटुंबिक उपासना मंडळ** ५६६-५७३

विनंतीपत्र – जिजाई ऊर्फ अवलाई – अवलाईची नवलाई – फटका – जुनी श्रद्धा व नवीन सुधारणा यांचा संवाद – वार्षिकोत्सव.

बावीसावे **ब्रह्मदेशाची यात्रा** ५७४-५८४

'मी बौद्ध आहे' – उ कोडण्णा – जिवंत माशांची विक्री – टॉ सिन को : मृतमांस – महादेवराव मांडे – मनुहा – थैली – श्वे डगून पॅगोडा – सगाईन टेकड्या – महाशिव चौंग - भिक्षुणी मठ - श्वे जिन् आणि तु धम्म – चार वर्ग – हाडांचा सांगाडा – उपोसथ – प्राथमिक शिक्षण – तादना बँ – सामाजिक चालीरीती व बायकांचा दर्जा – फोंजी ब्यान : एका भिक्षूची अंत्येष्ठी – ब्रह्मी विवाह.

तेवीसावे **शेतकरी चळवळ** ५८५-५८८

अध्यक्षीय भाषण – संस्थानातील स्थिती – दुहेरी व्यवस्था – सारावाढ.

चोवीसावे **ब्राह्मसमाजाचा शतसांवत्सरिक उत्सव** ५८९-५९०

कविसम्राट टागोर – सामाजिक प्रश्न.

पंचविसावे **पूर्व बंगालची सफर** ५९१-५९५

बंगाल्यांतील महापूर – एक कोनशिलासमारंभ – राममोहन रॉयचे स्वप्न – चित्तागाँग – हेमलताबाई - हा पहा ब्राह्मधर्माचा विजय – नोआखली – माझे बंगालीत भाषण – उल्हास दत्त – अभयाश्रम.

सव्विसावे **हिमाचल-निवास** ५९६-५९९

कर्सिआँग – घूम – दार्जिलिंग बाह्मसमाज – कांचनगंगा – केशवचंद्र सेनांची कन्या – पाटणा-बुद्ध गया – विष्णूपद – काशी – बनारस हिंदू युनिव्हर्सिटी – एक नमुनेदार विवाह.

सत्ताविसावे **सत्याग्रह व तुरुंगवास** ६००-६०९

दौरा – दुसरा दौरा – तिसरा दौरा – माझी अटक – भास्करराव जाधव – तुरुंगातील दिनचर्या - तुरुंगातील कामे – आमांश व गाउटचा आजार – तुरुंगातील धर्माचरण – स्थलांतर – ॲडव्हायझरी कमिटी – मुक्तता – बडोद्याच्या सफरी – ६ वे परिवर्तन.

अठ्ठाविसावे **साहित्यसेवा** ६१०-६१६

पुणेरी पेशव्यांची कामगिरी – कानडी मराठी संबंध – भागवतधर्माचा विकास – पाच भागवत – मराठ्यांची पूर्वपीठीका – साहित्यसंमेलने – समारोप.

प्रस्तावना....

महर्षी अण्णासाहेब शिंदे यांना मी प्रथम पाहिले ते इ. स. १९३३ मध्ये उमरावतीला आले असताना तेथील ब्रह्मविद्या-मंदिरात त्यांचे एक व्याख्यान झाले. त्या व्याख्यानाला मी हजर होतो. त्या वेळी त्यांच्या व्यक्तित्वाचा जो परिणाम माझ्यावर झाला तो विसरणे मला शक्य नाही. त्यांच्या नावाचा व कार्याचा परिचय पूर्वी झालेलाच होता. तशात, मला वाटते, त्यांचे 'भारतीय अस्पृश्यतेचा प्रश्न' हे पुस्तक त्या वेळी नुकतेच प्रसिद्ध झालेले होते. ते वाचून त्यांच्या तीव्र तळमळीचा, व्यापक अवलोकनाचा व सूक्ष्म संशोधनाचा ठसा अंत:करणावर आधीच उमटलेला होता. त्यामुळे त्यांना पाहण्याची व त्यांचे भाषण ऐकण्याची उत्कट इच्छा होती. ब्रह्मविद्या-मंदिरात व्याख्यानासाठी उभी असलेली त्यांची ती मूर्ती पाहून जणु एखादा प्राचीन महर्षी आपल्याला आशीर्वाद देण्यासाठी आपल्यासमोर उभा आहे असे वाटले. एकंदर देहयष्टी धिप्पाड, वर्ण काळा, चेहऱ्यावरील भाव शांत, जणु शून्य संशोधन करीत असलेले डोळे, या सर्वांना भव्यता प्राप्त करून देणारे मानेवर रुळणारे पांढरे शुभ्र केस व दाढी यामुळे अंत:करणाला समाधान वाटले. त्यांच्या भाषणाच्या शांत लयीमुळे आणि विशेषत: त्यातील उन्नत विचारांमुळे ते अधिक वाढले. त्यांचे भाषण शेवटपर्यंत मी अत्यंत शांतपणे ऐकले, व्याख्यानानंतर, त्यांची ओळख करून घ्यावी म्हणून विनीत भावाने मी त्यांच्या जवळपास जाऊन उभाही राहिलो. तथापि, त्यांच्याबरोबर इतर काही सज्जन बोलत राहिल्यामुळे मला त्यांची प्रत्यक्ष ओळख करून घेण्याची संधी त्या दिवशी मिळाली नाही.... आणि माझ्या दुर्दैवाने, पुढे ही कधी तो योग जुळून आला नाही याची मला आता राहून राहून खंत वाटते.

*

महर्षी शिंदे यांचे नाव निघाले की आणखी एका प्रसंगाचे स्मरण होऊन मला वारंवार खंत वाटते - तोही प्रसंग उमरावती येथे आणि ब्रह्मविद्या-मंदिरातच घडून आला. तारीख २ जानेवारी, १९४४ रोजी अण्णासाहेबांनी आपली इहलोकची यात्रा संपवली, ही बातमी प्रसिद्ध होताच मनाला फार दु:ख झाले, त्यांना श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी एखादी शोकसभा भरवली जाणे आवश्यक होते. उमरावती येथील प्रतिष्ठित पुढाऱ्यांकडून या बाबतीत काही हालचाल होईल अशी अपेक्षा मी करीत होतो. पण दोन तीन दिवस उलटून गेले तरी तसा योग जुळून येण्याची काही लक्षणे दिसेनात, जणु शिंदे यांना उमरावतीतील पुढारी पूर्णपणे विसरून गेले होते. एके दिवशी श्री. गवई यांची गाठ पडली. भेट होता क्षणीच त्यांनीही माझ्या मनातील विचार बोलून दाखविले. त्यानंतर त्यांनीच पुढाकार घेऊन ब्रह्मविद्या-मंदिरात (या वेळी त्याला जोशी सभागृह हे नाव देण्यात आले होते.) एक शोकसभा घेतली. पण त्या सभेला पुरते वीस-पंचवीसही लोक नव्हते. अर्थात् शोकसभेचा कार्यक्रम व्यवस्थितपणे पार पडला हे खरे. तथापि, ते एकंदर दृश्य पाहून मनाला वाईट वाटल्याखेरीज राहिले नाही.

*

या उपेक्षेची मीमांसा अनेक दृष्टीने करता येईल, याची मला जाणीव आहे. तसे पाहिले तर खुद्द अण्णासाहेबांनीच म्हटल्याप्रमाणे त्यांची धडाधडीची सार्वजनिक कामगिरी सुमारे १९३३ च्या

अखेरीस संपली. त्यानंतरची ११ वर्षे जवळजवळ शरपंजरी पडलेल्या भीष्माचार्याप्रमाणे त्यांची स्थिती होती. या कालावधीत सामान्य लोक त्यांचे नाव आणि कामगिरीही विसरले असल्यास ते कित्येकांना स्वाभाविक वाटेल. एखादा कार्यकर्ता आपल्या सार्वजनिक कर्तृत्वाने जोपर्यंत जनतेसमोर एकसारखा चमकत असतो तोपर्यंत लोकही त्याची वाहवा करीत असतात; आणि कर्तव्याच्या क्षेत्रातून थोडा काळ का असेना तो दूर होताच त्याला ते विसरतातही लवकर. काळाच्या हातातील विस्मृतीच्या कुंचल्याने मोठमोठ्यांच्या जीवनचित्रावर हात फिरवले जात असल्याचे आपण एरवी पाहात नाही काय ? तशात आण्णासाहेबांनी उभी हयात ज्या कार्यात घालविली ते अस्पृश्योद्धाराचे कार्य स्पृश्य आणि त्यातूनही वरिष्ठ वर्णांना मनापासून रुचण्यासारखे होते असे नाही. त्या अस्पृश्यांसाठी त्यांनी जीवाचे रान केले, खुद्द त्यांच्यातच राजकारणाचे नवीन वारे शिरले आणि म्हणून तेही जिथे आण्णासाहेबांची उपेक्षा करू लागले होते तेथे इतरांच्याकडून अधिक सहानुभूतीची अपेक्षा कशी करता येईल तशात त्यांच्या मुख्य कार्यक्षेत्रापासून उमरावती किती दूर! आण्णांच्या भारतीय निराश्रित साह्यकारी मंडळीची शाखा उमरावतीस होती हे खरे, पण अस्पृश्यवर्गातील नवीन राजकारणाच्या झंझावातामुळे ती जवळजवळ मोडून पडल्यासारखीच होती. अशा स्थितीत उमरावती येथे भरविलेल्या शोकसभेचे करुणास्पद दृश्य पाहून खरे म्हटले तर कुणीही एवढे काही मनाला लावून घेता कामा नये!

ही स्थिती फक्त उमरावती-नागपूरकडचीच आहे असे नाही, मुंबई-पुण्याकडचीही हीच स्थिती आहे. पुण्या-मुंबईला कदाचित् त्या वेळी मोठमोठ्या शोकसभा झाल्या असतील आणि त्यादिवशी अनेकांनी आण्णासाहेबांवर स्तुतीसुमने उधळली असतील - पण त्यानंतर ? सर्वत्र सामसूम! ज्या मराठा समाजात ते जन्मले तो त्यांच्याविषयी उदासीन आहे, ज्या दलित समाजासाठी त्यांनर आपले आयुष्य वेचले त्याला त्यांचे आज महत्त्व कळत नाही, आणि राजकारणात ब्राह्मणेतर पक्षाशी सूत न ठेवता ज्या राष्ट्रीय पक्षाला ते मिळाले त्यांच्या महाराष्ट्रीय वारसदारांनी सोयीस्कर रीतिने त्यांची उपेक्षा चालविली आहे. वाङ्मयाच्या क्षेत्रात अण्णासाहेबांची कामगिरी अगदीच उपेक्षणीय आहे असे नाही ; पण खास पुण्यात भरणाऱ्या साहित्य-संमेलनाच्या व्यासपीठावरून जेथे अति सामान्य व्यक्तींच्या चोपड्यांचा आवर्जून गौरव केला जातो. तेथे अण्णासाहेबांचा किंवा त्यांच्या वाङ्मयीन कामगिरीचा नुसता उल्लेखही होत नाही असा प्रत्यक्ष अनुभव आहे. इतक्या थोड्या कालावधीत अण्णासाहेबांना महाराष्ट्राच्या उपेक्षित मानकऱ्यांत जाऊन बसण्याचे भाग्य लाभलेले पाहून आश्चर्य वाटल्यावाचून राहात नाही. तथापि उपेक्षेचे हे वातावरण अगदी सर्वत्र पसरलेले आहे असे नाही. व्यापक सहानुभूतीच्या काही दूरदर्शी पुरुषांनी ही उणीव भरून काढलेली आहे यात शंका नाही. महाराष्ट्र-राष्ट्रभाषा-सभेच्या दिनदर्शिकेत २ जानेवारीचा दिवस 'महर्षी शिंदे स्मृतीदिन ' म्हणून निर्देशिलेला आहे. प्रा. श्री. ना. बनहट्टी यांनी त्यांना १९४८ मध्ये आपली आदरांजली वाहिली आहे. महाराष्ट्राने श्री. शिंदे यांच्या केलेल्या उपेक्षेसंबंधीचे त्यांचे विवेचन येथे उद्धृत करण्यास हरकत नाही. ते म्हणतात--

"विठ्ठल रामजी ऊर्फ अण्णासाहेब शिंदे हे महाराष्ट्राचे एक उपेक्षित मानकरीच म्हटले पाहिजेत. पुण्याचे एक व्यासंगी प्राध्यापक गं. बा. सरदार यांनी 'महाराष्ट्राचे उपेक्षित मानकरी'

म्हणून एक पुस्तक लिहिले आहे, त्यात त्यांनी चिपळूणकरांपूर्वी होऊन गेलेल्या भाऊ महाजन, विष्णुबुवा ब्रह्मचारी इत्यादि थोर कार्यकर्त्यांची माहिती देऊन महाराष्ट्र या कार्यकर्त्यांना बहुतांशी कसा विसरला आहे, हे दाखवून दिले आहे. ही विसरण्याची क्रिया चिपळूणकरांपूर्वीच्या लोकांनीच फक्त आचरून दाखविली आणि त्यानंतर मात्र आपण जागृत आणि स्मरणशील बनलो, अशातली गोष्ट नाही. आपला महाराष्ट्रीयांचा तोच स्वभाव कायम आहे. आपण गुणांचे पूजक नाही; व्यक्तीचे पूजक आहो, एकाद्या व्यक्तीच्या मागे आम्ही लागलो म्हणजे तिला आभाळापर्यंत उंच चढवतो, तिच्या पायावर लोटांगणे घेतो, तिला जयजयकाराने गुदमरवून सोडतो, तिच्या मूर्ती स्थापून तिची विटंबना करतो, आणि ज्यांचे गुण आपणाला खरोखरी अनुसरण्यासारखे असतात. अशा इतर अनेक थोर कार्यकर्त्यांना आपण विसरतो; इतके की त्यांचे नामोनिशाण देखील शिल्लक ठेवीत नाही. आमच्या राष्ट्रीय मूर्खपणाची ही एक खूण आहे...."

अशा स्थितीत प्रा. बनहट्टी यांनी अण्णासाहेबांचे पुण्यस्मरण करण्यात मनाचे मोठेपण दाखविले हे केव्हाही त्यांना भूषणावह होय. गेल्या जानेवारीत 'महाराष्ट्रचा एक कर्मवीर' म्हणून अग्रलेख लिहून ' मराठ्या ' चे संपादक आचार्य अत्रे यांनीही त्यांचे पुण्य-स्मरण महाराष्ट्राला करून दिले. अशी चिन्हे तुरळक असली तरी अनास्थेचे व उपेक्षेचे जौळ दूर सारण्याला त्यांची मदत होते हे खरे आहे. असा एक मोठा हृद्य प्रसंग माझ्या अनुभवला आला होता तो येथे सांगणे अप्रासंगिक होणार नाही. दोन तीन वर्षापूर्वी एक तरुण गृहस्थ माझ्या भेटीला आले कै. शिंदे यांचा स्मृतिदिन साजरा करण्यासंबंधी त्यांनी माझ्याजवळ गोष्ट काढताचा मला सानंद आश्चर्य वाटले. मी आस्थापूर्वक चौकशी केल्यावर मला कळले की, हे तरुण गृहस्थ म्हणजे नागपूर येथील प्रसिद्ध अस्पृश्य पुढारी कै. किसन फागूजी बंदसोडे यांचे चिरंजीव होत. कै. बंदसोडे हे नागपूर येथील भारतीय निराश्रित साह्यकारी मंडळीचे एक अत्यंत निष्ठावंत कार्यकर्ते होते. १९४४ मध्ये नागपुरला मी बदलून आल्यावर त्यांच्याशी माझा परिचय झाला. त्यांच्या भाषणातून अण्णासाहेबांच्याविषयी जो नितांत आदर व्यक्त होत होता त्यामुळे माझे अंत:करण भरून आले होते!

कोणी म्हणतील की, "अण्णासाहेबांविषयीच्या उपेक्षेची इतक्या विस्ताराने चर्चा करण्याचे कारणही नाही. स्वत: अण्णासाहेब यशापयशाच्या कल्पनांच्या पलीकडे गेलेले कर्मवीर होते. 'कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेषु कदा च न' या वृत्तीने ते आचरण करीत. 'माझ्या कामात यश मिळाले नाही. यशाची मला आकांक्षाच नव्हती. यशाची मला नीट व्याख्याचच करता येत नाही, तर मी त्यांची इच्छा तरी कशी करू?' असे त्यांनीच म्हटलेले आहे. त्यांच्या स्थितप्रज्ञतेचा हा पुरावाच नाही काय?" हे म्हणणे किंचित् खरे असले तरी या उद्‌गारातून त्यांचे हळूवार मानवी अंत:करण व्यक्त होत आहे असे मला वाटते. आपल्याला आलेल्या अनुभवांचे सार सांगताना ते म्हणतात, "माझ्या कामात माझ्या साथीदारांचा, इतरांचा, फार काय ज्यांच्यासाठी मी घरदारही कमी समजून ती ती कामे करीत होतो त्यांचाही माझ्यासंबंधी गैरसमज, दुराग्रह, नव्हे उघड विरोधही झाला. हाच माझ्या अनुभवाचा कठीणपणा किंवा दारूणपणा होय. ह्यामुळे माझ्या मनाची शांती

ढासळली आणि अकाली बहुतेक स्वीकृत कामातून मी विराम पावलो." हे निराश झालेल्या अंत:करणाचे उद्‌गार आहेत यात शंकाच नाही. या उद्‌गारांची थोडी मीमांसा या ठिकाणी करणे अप्रासंगिक होणार नाही.

अण्णासाहेबांच्या जीवितातील सर्वातिशायित्वाने उठून दिसणारे महत्त्वाचे कार्य कोणते हा प्रश्न सामान्य जनतेला विचारला तर 'अस्पृश्यांची उन्नती' असेच उत्तर बहुतेक देतील. पण खुद्द आण्णांना हा प्रश्न घातला तर ते काय म्हणतील ? त्यांचेच उद्‌गार पहा; "..... मात्र धर्माचा प्रचार ह्या माझ्या अस्सल कामातून मी विराम पावणे शक्यच नाही; कारण मी धर्माचा स्वीकार केला हे खरे नसून, धर्मानेच माझा स्वीकार केला. अशी माझी समजूत असल्यामुळे ह्या शरीरातून विराम पावेपर्यंत तरी धर्मान मला पछाडले आहेच व पुढेही तो मला अंतरणार नाही ही मला अशा आहे " या उद्‌गारावरून अण्णासाहेब 'धर्माचा प्रचार' हे आपले 'अस्सल काम' मानीत होते असे दिसून येईल. त्या मानाने त्यांची इतर कार्ये दुय्यम ठरतात. या दृष्टीने पाहता त्यांनी अंगीकारलेले अस्पृश्योद्धाराचे कार्यही दुय्यम ठरते. पण लौकिक दृष्टीने तर तेच त्यांचे जीवितकार्य होय. तेव्हा याचा समन्वय कसा करावयाचा ? मला वाटते, याचे उत्तर असे देता येईल की, अण्णासाहेबांनी चालविलेले अस्पृश्योद्धाराचे कार्य त्यांच्या अंत:करणातील धार्मिक वृत्तीतून निर्माण झाले होते. धर्मभावना हा मूळ पाया आणि अस्पृश्योद्धाराचे कार्य ही त्यावर उभारलेली इमारत होय. माझे हे म्हणणे सत्याला अगदीच सोडून नाही. १९१२ मध्ये त्यांच्या मित्राने त्यांचे जे एक त्रोटक चारित्र लिहिले आहे त्यात त्यांनी म्हटले आहे की, "हीन मानलेले लोक हे आपले बंधु आहेत, ही भावना अंत:करणात दृढ करून घेऊन ते जे काम करीत आहेत त्याचा पाया धर्म हाच आहे. त्यांच्या शाळातून धर्मशिक्षण देण्यात येते, भजन होते, उपासना होतात व सद्धर्माची गोडी लावण्यासाठी अनेक प्रकारे प्रयत्न होत असतात [१]" "मिशनचे कार्य धर्माच्या पायावरच चालावयाचे होते [२]" असे खुद्द अण्णासाहेबांनीही स्पष्ट केले आहे. हा धार्मिक पाया ब्राह्मधर्माचा होता अशी काहींनी समजूत करून घेतलेली दिसते, पण ते बरोबर नाही. अण्णासाहेबांनी प्रार्थना-समाजात सामील होऊन ब्राह्मधर्माचा प्रचार चालविला होता हे खरे आहे. तथापि, अस्पृश्योद्धाराचे कार्य करताना या अस्पृश्यांना ब्राह्मधर्मात ओढण्याचा त्यांचा मुळी सुद्धा हेतू नव्हता. "मिशनचे कार्य धर्माच्या पायावरच चालवावयाचे होते" असे सांगून अण्णासाहेब लागलीच स्पष्ट करतात "मात्र, अस्पृश्यवर्गातून समाजाला सभासद मिळावे असा हेतू समाजाने कधीच बाळगला नाही आणि तशी तक्रारही कधी कोणी बाहेरच्यांनी केली नाही." असे असले तरी त्यांच्या कार्याविषयी असे गैरसमज होत होते असे दिसून येते. अण्णासाहेब शिंदे यांच्याप्रमाणे अस्पृश्योद्धाराचे कार्य करणारे कै. प्रा. माटे हे आपल्या 'चित्रपटात' लिहितात, विठ्ठल रामजी शिंदे यांच्या कामाची काय पद्धती आहे, याचे मी बारकाईने अवलोकन केले..... इतक्या दिवसानंतर सुद्धा लिहिताना मला कसेचेच वाटते; पण लिहावयास हवे म्हणून लिहितो की, शिंदे यांचे ब्रह्मसमाजी धोरण व त्यास अनुसरून त्यांनी घातलेली कामाची पद्धती मला आवडेना. जनसेवा करावयास किंवा विचाराला औदार्य प्राप्त

१. विठ्ठल रामजी शिंदे यांचे लेख, व्याख्याने आणि उपदेश.

२. माझ्या आठवणीत व अनुभव, पा. २६४.

करून घेण्याला आपल्या जुन्या धर्माच्या पोटात पुरेसा वाव आहे, असे मला वाटे व जर ही अस्पृश्य प्रजा हिंदू धर्मांची, तर आपण चळवळ सुद्धा पूर्वकालीन विचार-धनाच्या ऐपतीवरच चालवावी असे वाटे, मूर्तिपूजेला ब्रह्मसमाजात कोठेही स्थान नाही म्हणून अस्पृश्यांच्या प्रश्नातील देवालय-प्रवेश हा जो भाग त्या बाबतीत आपल्या तत्त्वाशी बेइमान न होता शिंदे यांना चळवळ करता येण्यासारखी नाही, असे मला वाटे" (पा. २१८) प्रा. माटे यांच्या या मतांचा समाचार घेण्याचे हे स्थळ नाही. पण शिंदे यांच्या कार्याविषयी सूक्ष्म गैरसमज कसे करून घेण्यात येत होते याचे उदाहरण म्हणून ही वाक्ये उद्धृत केली आहेत. मला वाटते अशा प्रकारच्या गैरसमजांमुळेच, आपले कार्य अशस्वी झाले असे अण्णासाहेबांना वाटत असावे.

वस्तुतः अण्णांचे कार्य अयशस्वी झाले असे मला वाटत नाही. यासंबंधी एक गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे. ती अशी की, अशा सुधारणांच्या कार्याकडे ऐतिहासिक दृष्टीने पाहावयास पाहिजे, सामाजिक किंवा धार्मिक सुधारणा ही अशी गोष्ट आहे की, जी पूर्णतेला कधीच पोचणे शक्य नाही. जग नेहमी बदलत असते आणि या बदलत्या जगात नवीन नवीन विचारांचे वारे सदैव खेळत असते. ज्या सुधारणा आज आपण मोठ्या हिरिरीने करून पाहतो त्यांना कालांतराने फारसा अर्थ राहात नाही. कारण त्या बाबतीतली समाजाची विचारसरणीच बदलेली असते. उदाहरण म्हणून हेच पाहा ना की, ज्या देवालय-प्रवेशाच्या प्रश्नाच्या अभिनिवेशाने आपल्या कार्याचा नवीन मांड मांडणे माटे यांना आवश्यक वाटले त्या प्रश्नाकडे आजचे अस्पृश्य पुढारी ढुंकूनही पाहायला तयार नाहीत. पण म्हणून अस्पृश्यांना देवालयात प्रवेश मिळवून देण्यासाठी ज्या सुधारकांनी पूर्वी जीवापाड श्रम केले त्यांच्या कार्याचे महत्त्व कमी होत नाही. त्यांच्या प्रयत्नामुळे समाजाचे किंचित् हृदयपरिवर्तन झालेले असले तरी त्यांना पुष्कळच यश आले असेच समजले पाहिजे. या दृष्टीने पाहता अण्णासाहेबांचे कार्य सफल झाले असेच म्हणावे लागेल. अस्पृश्योद्धाराचे कार्य हा अण्णांच्या कार्याचा मेरुमणी आहे. त्यांनी हे कार्य केवळ पुण्यामुंबईत किंवा महाराष्ट्रात नाही तर भारतभर पसरवले. या प्रश्नाकडे भारताच्या सर्व प्रांतातील विचारवंतांचे लक्ष वेधले आणि शक्य त्या रीतीने त्या त्या ठिकाणी प्रत्यक्ष कार्याला सुरूवातही केली अण्णासाहेबांचे हे यश मला वाटते वादातीत आहे. त्यांच्या मागून आलेल्या व्यक्तींनी हे कार्य कदाचित् अधिक चांगल्या रीतीने केले असेल; पण त्यांच्या कार्याची भूमिका अण्णांनी तयार करून ठेवली होती हे विसरता येत नाही. अण्णांच्या पूर्वी निरनिराळ्या प्रांतात या कार्याला सुरूवात झालेली होती. या प्रयत्नांचा इतिहास त्यांनी स्वतःच या पुस्तकाच्या १० व्या प्रकरणात सांगितला आहे. या कार्याला अखिल भारतीय स्वरूप प्राप्त करून देण्याचे कार्य अण्णासाहेबांचे आहे. भारतीय निराश्रित साह्यकारी मंडळी (The Depressed Classe's Mission Society, India) ही मंडळी स्थापन करून तिच्याद्वारा महाराष्ट्र, कर्नाटक, गुजराथ, मद्रास इत्यादि प्रांतात त्यांनी केलेले कार्य ऐतिहासिक महत्त्वाचे होय. पण माझ्या दृष्टीने अण्णासाहेबांच्या कार्याचे महत्त्व आणखी एका गोष्टीत आहे. ती गोष्ट म्हणजे त्यांनी अस्पृश्योद्धाराच्या प्रश्नाला प्राप्त करून दिलेले राष्ट्रीय स्वरूप ही होय. या कार्याला सुरूवात केल्यानंतर लवकरच त्यांच्या लक्षात आले की, राष्ट्रीय सभेसारख्या संस्थेने हे कार्य हाती घेतल्यावाचून ते तडीस जाणे शक्य नाही. त्या दृष्टीने त्यांनी वारंवार प्रयत्नही केले. पण हा धार्मिक प्रश्न असल्यामुळे राष्ट्रसभेला

तो आपल्या कार्यक्रमात स्वीकारावासा वाटेना. शेवटी कलकत्ता येथे राष्ट्रसभेचे अधिवेशन भरले असताना अध्यक्ष ॲनी बेझंटच्या सहानुभूतीमुळे अण्णासाहेबांच्या प्रयत्नांना यश आले. त्यांच्या आग्रहावरून अस्पृश्यता-निवारणाचा ठराव काँग्रेसच्या कार्यक्रमात घेण्यात आला व पासही झाला. नंतर नागपूर येथील अधिवेशनात तर महात्मा गांधीनी त्या विषयाची कड घेऊन तयाला राष्ट्रीय प्रश्न करून सोडण्याचे श्रेय घेतले. अर्थात् त्यांच्या या यशामागे अण्णासाहेबांच्या तपश्चर्येची पुण्याई होती हे विसरता कामा नसे. यानंतर लवकरच अण्णासाहेबांनी भारतीय निराश्रित साह्यकारी मंडळीची धुरा अस्पृश्यातूनच निर्माण झालेल्या पुढाऱ्यांच्या खांद्यावर सोपवली. मला वाटते की, अस्पृश्यतेच्या प्रश्नाला राष्ट्रीय स्वरूप देण्याच्या कार्याप्रमाणे अण्णासाहेबांचे हेही कार्य फार महत्त्वाचे आहे. ज्यांच्या उन्नतीसाठी आपण प्रयत्न करायचे तेच लोक स्वतःची उन्नती करून घेण्यासाठी पुढे आलेले पाहण्यापेक्षा अधिक मोठे यश कोणते असणार ? पण असे असूनही आपल्या अंगीकृत कार्यातच आपणाला यश मिळाले नाही असे अण्णासाहेबांना वाटत होते याचे कारण अस्पृश्योद्धाराचा प्रश्न केवळ राष्ट्रीय करून सोडण्याने किंवा तो अस्पृश्यांच्या हाती सोपविल्याने कायमचा सुटला असे होत नाही. शिवाय ज्या धार्मिक पायावरून त्यांनी या प्रश्नाला हात घातला होता त्यासंबंधी मोठमोठ्यांनीही गैरसमज करून घेतल्यामुळे व संस्था-संचालनात नेहमी अनुभवाला येणाऱ्या मतभेद, पूर्वग्रह, विरोध इत्यादिकांमुळे अण्णाला यश आले नाही असे अण्णासाहेबांना वाटत असले पाहिजे हे स्पष्ट दिसते. या एकंदर कार्यात आपणाला आलेले अनुभव आपल्या मनःशांतीसाठी अण्णासाहेबांनी या ग्रंथात लिहिले आहेत. केशवसुतांनी म्हटले आहे की---

अमुचा पेला दुःखाचा
डोळे मिटुनी प्यायाचा
पिता बुडाशी गाळ दिसे
त्या अनुभव हे नाव असे !
फेकून द्या तो जगावरी
अमृत होऊ तो कुणा तरी !

या उक्तीप्रमाणे जणु पुढच्यांना अमृत प्राप्त करून देण्यासाठी अण्णासाहेबांनी आपल्या आयुष्यातील दुःखाच्या पेल्यातील बुडाशी असलेला हा अनुभवाचा गाळ एकत्रीत करून तो जनतेच्या हाती दिला आहे.

*

त्यांनी स्वतः मात्र अशी इतरांना अमृत प्राप्त करून देण्याची भूमिका घेतलेली नाही. प्रस्तुत आठवणी त्यांनी स्वतःच्या करमणुकीसाठी लिहिल्या आहेत, इतरांच्या करमणुकीसाठी नाहीत; आणि बोधासाठी तर नाहीतच नाहीत. अनेक एक थोर पुरुषांनी तुरुंगात असताना आत्मचरित्रे किंवा आठवणी लिहून काढलेल्या आढळतात. तसेच अण्णांच्याही बाबतीत घडले आहे. एकांतवासाला आणि चिंतनाला अनेक कार्यकर्त्यांना दुसरी जागा आढळत नाही. कारण, बाहेर असताना प्रत्यक्ष कार्यात ते गढून गेलेले असतात, आणि तुरुंगातील एकांतवासात आपल्या गतायुष्यातील सुखदुःखाच्या

आठवणीहून अधिक हृद्य ते काय असणार ? स्मृती नसती तर जगातली अर्धी अधिक दु:खे नाहीशी झाली असती असे गडकऱ्यांच्या एका पात्राने म्हटले आहे. हे एका दृष्टीने खरे असले तरी स्मृती आहे, म्हणूनच आयुष्याला गोडी आलेली आहे हेही खरे आहे. जुन्या आठवणी काढून मनुष्य स्वत:ची करमणूक करून घेऊ शकतो. तुरुंगातील दु:सह जीवन सुसह्य करण्यासाठी कार्यकर्त्यांचा हा एक विरंगुळा आहे. अण्णासाहेबांनीही याच हेतूने ह्या आठवणी लिहिल्या आहेत. आपल्या गत आयुष्यातील आठवणी तुरुंगात लिहून काढल्या म्हणजे त्याला आत्मचरित्राचे स्वरूप येते. पण आत्मचरित्रे व आठवणी यांची स्वरूपे काही बाबतीत भिन्न असतात. आत्मचरित्राचा संबंध सर्वस्वी लेखकाच्या जीवनाशी असतो, आठवणी अथवा स्मृतिचित्रे ही लेखकाची स्वत:ची त्याप्रमाणे इतरांचीही असू शकतात. आत्मचरित्राचा नायक लेखक स्वत:च असतो, आठवणीने लेखकाप्रमाणे इतरानांही तितकेच महत्त्वाचे स्थान असते, यामुळेच रमाबाई रानडे, लक्ष्मीबाई टिळक, रमाबाई केदार इत्यादिनी लिहिलेल्या आठवणीत त्यांच्या स्वत:पेक्षाही क्वचित् त्यांच्या पतींना अधिक महत्त्वाचे स्थान मिळालेले आहे. दुसरे असे की, आत्मचरित्रात ज्याप्रमाणे काल आणि कलादृष्ट्या सुसंगती राखावी लागते तशी ती आठवणीत राखावी लागत नाही, किंवा राखलीच पाहिजे असे नाही. आठवणींचे स्वरूप सुटे असू शकते. आत्मचरित्रकार हा आपल्या आयुष्यातील घटना सुसूत्र रीतीने सांगताना त्या घटनांच्या मागची आपली मानसिक पार्श्वभूमी मांडून दाखवितो. त्यामुळे आत्मचरित्रात आत्मविश्लेषण भरपूर झालेले आढळते. आठवणी लिहितांना अशा आत्मविश्लेषणाला वाव नसतो असे नाही; तथापि त्यांच्या सुटेपणामुळे ते नेहमी शक्य होतेच असे नाही.

अण्णासाहेब शिंदे यांनी आत्मचरित्रलेखनाचा प्रयत्न केलेला नाही तर आपल्या आठवणी व अनुभव नमूद केलेले आहेत; आणि याची त्यांना चांगली जाणीव आहे. आठवणी सांगताना मनुष्य आपल्या पूर्वायुष्यात अधिक रंगून जातो. उलट आत्मचरित्रकार बहुधा आपल्या निकटतम उत्तरायुष्यातील घडामोडी अधिक समरसतेने आणि खुलासेवार सांगतो. अण्णासाहेबांच्या या आठवणीत त्यांच्या आयुष्याचा पूर्वकाल जसा चित्रीत झालेला आहे तसा उत्तरकाल नाही. किंबहुना भारतीय निराश्रित साह्यकारी मंडळीतून त्यांनी आपले अंग काडून घेतल्यानंतरचा त्यांच्या जीवनाचा फारच थोडा वृत्तांत या आठवणीत आलेला आहे. त्या मानाने त्यांचे बालपण, शिक्षण, आरंभीची धर्मसेवा आणि भारतीय निराश्रित साह्यकारी मंडळीचा वृत्तांत यांना सविस्तर स्थान मिळालेले आहे. त्यातही आपल्या बाळपणाचा वृत्तांत अण्णासाहेबांनी विशेष खुलासेवार---इतकेच नाही तर समरसतेने व सहृदयतेने---लिहिलेला आहे. आपल्या मातुश्रींच्या आठवणी सांगताना, 'या सर्व करुण रसाने भरलेल्या नाटकात मुख्य नायिकेचे पात्र माझी आई साध्वी यमुनाबाई ही होय' (पृ. १८) असे जेव्हा ते सांगतात तेव्हा या सहृदयतेचा चटका लावणारा प्रत्यय येतो. जुन्या आठवणी काढीत असताना त्या सर्व जशाच्या तशा आठवतात. असे नाही, आणि त्यामुळे 'हे आता मला आठवत नाही' असे लिहिण्याची पाळी लेखकावर येते. अण्णासाहेबांच्या बाबतीतही अनेकदा असे झालेले आढळते (पृ. ९३, ९६, ९७, १४० इत्यादि). सत्यकथनाच्या दृष्टीने यात त्यांचा प्रांजलपणा दिसून येतो. सत्यकथन हा चरित्रवाङ्मयाचा आत्मा होय. याविषयी लेखकाला जितकी काळजी व सावधानता बाळगणे शक्य होईल तेवढी थोडीच असते. अशा स्थितीत विस्मृत प्रसंग कल्पनेने

रचून आत्मचरित्राची किंवा आठवणींची कादंबरी करण्यापेक्षा आपल्या विस्मरणाची नोंद करण्यातच अधिक औचित्य असते. अण्णासाहेबांनी ते पाळण्याचा कसोशीने प्रयत्न केलेला दिसतो आणि त्यामुळे त्यांच्या या लेखनाला प्रामाणिकपणा आलेला आहे. आपल्या आठवणी लिहून काढीत असताना क्वचित् लेखकाच्या ठिकाणी गर्व किंवा आढ्यता येणे स्वाभाविक ठरेल! तथापि, या दोषाचा स्पर्श या ग्रंथाला झालेला आढळत नाही. याला कारण अण्णासाहेबांची शालीन आणि नम्र वृत्ती. लहानपणाची संस्मरणे देताना खेळातील आणि अभ्यासातील आपली हुशारी नुसती नमूद करणे निराळे आणि ती आढ्यतेने सांगणे निराळे. ही आढ्यता अण्णांच्या स्वभावातच नसल्यामुळे त्यांच्या निवेदनातही आलेली नाही. क्वचित आपल्याविषयीची इतरांची मते त्यांनी नमूद केली आहेत हे खरे. पण ती जशी गौरवाची आहेत तशी निंदेचीही आहेत. मँचेस्टर कॉलेजातील विद्यार्थ्यांनी त्यांच्या विषयी लिहिलेली दोन पद्ये किंवा तेथील अधिकाऱ्यांनी त्यांना दिलेले दोन दाखले उद्धृत करण्यात केवळ वस्तुस्थितीचे निवेदन आहे; आत्मस्तुतीचा अहंकार किंवा आनंद नाही 'लोकमताचे हेलकावे' या प्रकरणात आपणाला मिळालेल्या मानपत्राची यादी दिली हेही खरे आहे. पण त्यातील आपल्या स्तुतीचा मजकूर त्यानी उद्धृत केला नाही. उलट आपल्यावर वेळोवेळी होणाऱ्या प्रतिकूल टिकेतील दोन पत्रे व एक उतारा त्यांनी विस्ताराने दिला आहे. यावरून त्यांच्या वृत्तीवर चांगला प्रकाश पडतो. किंबहुना ह्या सगळ्या आठवणी वाचीत असताना एका सात्विक सत्पुरुषाचे विनम्र निवेदन आपण वाचीत असल्याचा प्रत्यय पदोपदी येतो.

तसे पाहिले तर खुद्द अण्णासाहेबांनीच लिहिल्याप्रमाणे आपल्या अस्पृश्योद्धाराच्या कार्यात पुढे पुढे त्यांना आपल्या साक्षीदारांपासून, इतकेच नव्हे तर 'ज्यांच्यासाठी घरदारही कमी समजून' ते ती कार्ये करीत होते, त्या अस्पृश्यबंधूंपासूनही बराच त्रास सोसावा लागला. इतका की त्यामुळे त्यांची मनःशांती ढळली व त्यामुळे त्या कार्यातून ते अकाली निवृत्त झाले. एखाद्या आत्मकेंद्रीत लेखकाने 'गैरसमज, दुराग्रह व विरोध' यांचे हे प्रसंग घोळून घोळून सांगितले असते व त्यातील आपल्या भूमिकेचे समर्थनही केले असते. अण्णासाहेबांनी असे काहीही केलेले नाही. यात त्यांच्या स्वभावाचे सार आलेले आहे. यामुळे या आठवणींना एका दृष्टीने वैगुण्य आलेले आहे असेही म्हणता येईल. आपल्या सामाजिक कार्यामध्ये आलेले सगळ्या प्रकारचे बरेवाईट अनुभव आत्मचरित्रपर आठवणी सांगणाऱ्या लेखकाने अवश्य नमूद करून ठेवायला पाहिजेत. त्यावरून समाजसेवकांना मार्गदर्शन तर लाभतेच, पण शिवाय मानवी स्वभावाचे सूक्ष्म ज्ञान करून घेण्याला मदत होते. अण्णासाहेबासारख्या स्वभावतःच सात्विक पुरुषाची मनःशांती ढळण्याला कारणीभूत झालेले हे प्रसंग तितकेच दुःखदायक असले पाहिजेत; आणि मनात आणले असते तर त्यांना ते सरसतेने रंगवून वाचकांची सहानुभूती आपल्याकडे सहज खेचून घेता आली असती. पण अण्णासाहेब या मोहाला बळी पडले नाहीत. त्यांनी आपली लेखणी त्यापासून अत्यंत संयमाने अलिप्त ठेवली आहे! याच्या उलट दृश्य पाहावयाचे असेत तर वाचकांनी कोल्हटकरांचे 'आत्मवृत्त' वाचावे. आपल्या सान्निध्यात आलेल्या व्यक्तीवर खवचटपणाने व कुत्सितपणाने केलेल्या आरोपांनी बरबटलेले दुसरे आत्मचरित्र मराठीत क्वचित् सापडेल. तथापि, यातही आत्मचरित्रकाराच्या मनोवृत्तीवर व स्वभावविशेषावर अप्रत्यक्षपणे प्रकाश पडतो हे नाकारता येत नाही. अण्णासाहेबांचा प्रकृतिधर्म

अगदी निराळा असल्यामुळे ते आत्मसमर्थनाच्या भानगडीत फारसे पडले नाहीत. मग इतरांवर दोषारोपण करीत सुटणे तर दूरच राहिले. वादांच्या बाबतीतील आपण कितीही तिऱ्हाईतपणे निकाल दिला तरी तो दोन्ही पक्षास मान्य होणार नाही म्हणून तो त्यांनी देण्याचेही टाळले आहे. क्वचित् त्या त्या व्यक्तीशी असलेले आपले मतभेद त्यांनी नमूद केलेले आहेत हे खरे; पण ते अत्यंत सौम्यपणाने आणि प्रांजळ वृत्तीने. त्यामुळे त्यांच्या या आठवणीत प्रसन्नतेचे वातावरण सर्वत्र पसरलेले आढळते.

प्रार्थनासामाजाच्याद्वारे ब्राह्मधर्माचा प्रचार आणि अस्पृश्यतानिवारण ही अण्णासाहेबांच्या कार्याची दोन महत्त्वाची अंगे होत. पहिल्या कार्याच्या निमित्तानेच त्यांना परदेशात जाऊन अध्ययनाची संधी मिळाली आणि नंतरही त्याचसाठी त्यांनी भरतखंडभर प्रवास केला. या परिभ्रमणात त्यांना आलेल्या अनुभवांनी धर्ममूलक समतेचा त्यांचा दृष्टिकोन अधिक व्यापक झाला आणि त्यांच्या सहानुभूतीचे क्षेत्र विस्तारले. त्यातच त्यांच्या अस्पृश्योद्धाराच्या कार्याचे बीजारोपण होऊन त्याचे रोपटे वाढीस लागले व ते भारतीय निराश्रित साह्यकारी मंडळीच्या वृक्षात परिणत झाले त्यांच्या या संस्थेचा इतिहास हा या आठवणींचा महत्त्वाचा भाग होय. हा इतिहास हा या आठवणींचा महत्त्वाचा भाग होय. हा इतिहास सध्याच्या नवीन पिढीस माहीत होणे आवश्यक होते. विशेषत: अस्पृश्यवर्गातील तरुणांनी तो वाचणे जरूर आहे. आता या वर्गाने आपल्या उन्नतीचे कार्य स्वत:च हाती घेतलेले आहे ही संतोषाची गोष्ट असली तरी ते करीत असताना त्यांच्या समोर पूर्वीच्या प्रयत्नांचा इतिहास असणे आवश्यक आहे. म्हणजे आपण आणि आपले पुढारी कुणाच्या खंद्यावर उभे आहोत याची त्यांना कल्पना येईल व त्यामुळे स्पृश्यवर्गातील जुन्या कार्यकर्त्याविषयी या तरुण पिढीच्या बोलण्यातून क्वचित् जी अवहेलनाची भाषा ऐकू येते ती कमी होण्याला मदत होईल. स्पृश्य वर्गातील अस्पृश्योद्धारकांचे कार्य हे स्थूलमानाने धार्मिक समतेच्या पायावर आधारलेले मुख्यत: शैक्षणिक व सामाजिक स्वरूपाचे होते. नंतर हळूहळू त्याला राजकारणाचा व अर्थकारणाचा रंग चढू लागला. हा रंग देण्यासाठी अस्पृश्यवर्गातूनच नवीन पुढारी पुढे येऊ लागले व त्यांनी या कार्याची धुरा आपल्या खांद्यावर उचलली. हे खरे असले तरी त्यांच्यात शैक्षणिक जागृती करण्याला पूर्वीच्या स्पृश्य पुढाऱ्यांनी आपल्या जिवाचे रान केलेले आहे हे आजच्या अस्पृश्य तरुणांनी विसरता कामा नये. शैक्षणिक जागृती हा आर्थिक व राजकीय जागृतीचा पाया होय. तो ज्यांनी आपल्या रक्ताचे पाणी करून भरला अशा व्यक्तीस अण्णासाहेबांचे स्थान सर्वश्रेष्ठ आहे. महात्मा ज्योतिबा फुले यांनी प्रथम अस्पृश्यांच्या घरात शिक्षणाची ज्योत पेटवली. ती आपल्या हातात घेऊन केवळ महाराष्ट्रात नाही तर भरतवर्षभर अण्णासाहेबांनी ज्ञानाचे असंख्य दिवे लावले. हे अण्णासाहेबांचे कार्य राष्ट्रीय स्वरूपाचे होते. ते करण्यासाठी ते स्वत:च नाही तर त्यांचे सर्व कुटुंब अविश्रांत खपले. त्यांचे आईवडील व भाऊबहिणी या सर्वांनी त्यांनी या कामी लावले. त्यांच्या वृद्ध मातापितरांप्रमाणेच त्यांच्या भगिनी जनाक्का यांची या बाबतीतील कामगिरी केवळ अद्वितीय आहे. एक स्त्री, तशात विधवा झालेली, शिक्षणाचा फारसा गंध नाही, पण आपल्या वडील बंधूने स्वीकारलेल्या या सेवाकार्यात तिने आपले संपूर्ण जीवन ओतले हे या ग्रंथातून पाहिले म्हणजे या त्यागमूर्तीसमोर ज्याला नम्र व्हावेसे वाटणार नाही असा वाचक विरळच आढळेल! आपल्या

आईवडिलांची अण्णासाहेबांनी काढलेली चित्रे अत्यंत चित्तवेधक आहेत. ती पाहून जुन्या पिढीतीतल असूनही अत्यंत प्रगतीपर विचारांच्या या पतिपत्नीविषयी मनात नितांत आदर निर्माण होतो. अण्णासाहेबांच्या स्वभावाची काही वैशिष्ट्ये त्यांनी आपल्या आईवडिलांच्या स्वभावातून कशी उचलली याचेही त्यावरून सम्यक् दर्शन होते.

धर्मभावनेचे उदारतेचे व समाजसेवेचे धडे त्यांना आपल्या मातापित्याकडूनच अप्रत्यक्षपणे मिळालेले होते. त्यांचाच विकास त्यांच्या जीवनात झालेला आढळतो. लहानपणी अंगी बाणलेल्या कणखरपणामुळे नंतरच्या आयुष्यातील अनेक आपत्तींना आणि विरोधांना ते यशस्वीपणे तोंड देऊ शकले. अण्णासाहेब हे हाडाचे सुधारक होते. हिंदुधर्मावरील अस्पृश्यतेचा कलंक धुऊन काढण्यासाठी त्यांनी जसे अविश्रांत श्रम केले तसेच इतर अन्याय्य रूढींच्या निर्दलनासाठीही केले. जातिभेद, क्षुद्र दैवतांची उपासना, स्त्रियांची होणारी विटंबना, होळीतील बीभत्स प्रकार—धर्माच्या नावाखाली चालू असलेल्या या अन्यायांच्या विरुद्ध अण्णासाहेबांनी सुधारणेचे शस्त्र उपसले होते. देवदासी, मुरळी या संस्था म्हणजे धार्मिक वेश्यागारे होत. ती नष्ट करून या दुर्दैवी स्त्रियांना सभ्य समाजात आणून सोडण्याचे कार्य कितीही उदारपणाचे असले तरी धर्माची अफू प्यालेल्यांच्या डोळ्यांवर ते न येणे अशक्य होते. अण्णासाहेबांवर मारेकरी घालण्यालाही या लोकांनी कमी केले नाही. 'शिंद्यांची सर्कस' म्हणून व्यंगचित्र काढून आणि 'आधुनिक काळातील महान् कलिपुरुष' म्हणून त्यांचा निषेध करून त्यांची अवहेलना करण्याचाही प्रयत्न काही समाजपुंगवानी आणि धर्ममार्तंडांनी केला. पण निंदा, अवहेलना, प्राणांतिक आपत्ती इत्यादींना तोंड देऊन आपले कार्य अण्णांनी पुढे चालू ठेवले. त्यांच्या अंगी लहानपणापासून असलेल्या कणखरपणाचा व स्पार्टन सहिष्णुतेचा हा परिणाम होय. या बाबतीत विधायक कार्य करण्यावरच त्यांचा भर विशेष होता. मुलांप्रमाणे मुलींनाही सक्तीचे शिक्षण चालू करण्याविषयी त्यांनी केलेली चळवळ त्यांच्या विधायक कार्यकर्तृत्वाचीच द्योतक होय. या कामात लो. टिळकांसारख्या राष्ट्रपुरुषाकडून त्यांना विरोध व्हावा हे दुर्दैव होय. त्यांच्या विरोधाला तोंड देऊनही अण्णासाहेबांनी आपले कार्य चालूच ठेवले.

ही सर्व कार्ये अण्णासाहेबांनी निरपेक्ष वृत्तीने केली ही महत्त्वाची गोष्ट होय. त्यांचे जीवित जणू आर्पित जीवित होते. आपल्या कार्यासाठी त्यांनी आपणहून गरिबी पत्करली होती. प्रार्थनासमाजात काम करीत असताना काय किंवा भारतीय निराश्रित साहाय्यक मंडळीचे काम करीत असताना काय त्यांचा दारिद्र्य-मित्र त्यांच्या सोबतीला नेहमी असे. त्यामुळे प्रपंचाची काळजी ही जी त्यांची चौथी सख्खी बहीण, तिने त्यांना कधीच सोडले नाही. ते व त्यांचे सहकारी यांना कित्येकदा आपल्या भुकेच्या वेदना कशा तरी शमवाव्या लागत. ज्या दारिद्र्याशी झगडत त्यांनी उच्च शिक्षण घ्यावे लागले त्याच्याशीच झगडत झगडत त्यांना आपली सेवाकार्ये पार पाडावी लागली. वस्तुतः बडोदेसरकारचा त्यांना केव्हाही आश्रय मिळण्यासारखा होता. अनेकदा महाराजांनी त्यांना बोलावले होते, पण त्यांनी त्यांना विनम्रपणे नकार दिला. यातच त्यांच्या तळमळीच्या समाजसेवेचे सार आले!

अण्णासाहेब हे सुधारक असले तरी राष्ट्रीय वृत्तीचे होते हा त्यांचा आणखी एक महत्त्वाचा विशेष होय. रानडे-भांडारकर-चंदावरकर यांच्यासारख्यांच्या सान्निध्यात राहूनही त्यांनी आपली ही राष्ट्रीय वृत्ती कधी लुप्त होऊ दिली नाही. लोकमान्य टिळकांना १९०७ मध्ये कारावासाची जबर

शिक्षा झाल्यानंतर आपल्या साप्ताहिक उपासनेत त्यांच्याबद्दल प्रार्थना करण्यात तर अण्णासाहेबांची ही राजकीय वृत्ती दिसू येते. पण त्याबद्दल स्पष्टीकरण विचारणाऱ्या गुरुजनांना त्यांनी दिलेल्या उत्तरातही तो दिसून येते. 'मी केवळ मराठ्यांसाठी नाही-सर्वांसाठी आहे' असे म्हणणाऱ्या अण्णासाहेबांनी १९२० च्या निवडणुकीच्यावेळी ब्राह्मणेतर पक्षात सामील न होता स्वतंत्र बहुजन पक्ष स्थापन केला याचेही कारण तेच आहे. १९३० मध्ये तर महात्मा गांधींच्या सत्याग्रह-संग्रामात उडी घेऊन त्यांनी ६ महिन्यांचा कारावासही सोसला. जेथे-बंधूंना राष्ट्रीय सभेकडे वळविण्याला अप्रत्यक्षपणे अण्णासाहेब कारणीभूत झालेले आहेत. ही गोष्ट आजच्या राजकारणाच्या दृष्टीने लक्षात घेतली म्हणजे त्यांच्या राष्ट्रीय वृत्तीचे व दूरदृष्टीचे कौतुक करावे तितके थोडेच होईल असे वाटते!

हा सर्व चित्रपट अण्णासाहेबांनी आपल्या आठवणीत रेखाटला आहे. त्यातील रंग अत्यंत सौम्य आहेत. अहंकाराचा किंवा दर्पाचा भडक रंग त्यात कुठेही आढळणार नाही. सर्व चित्रपट पाहून मन कसे प्रसन्न होते. अण्णासाहेबांच्या लेखणीतून उतरलेल्या ह्या आठवणी त्यांच्या स्वभावातील सात्विकतेचा रस घेऊन जशा उतरल्या आहेत, तशाच त्यांच्या अध्ययनाचा, संशोधनाचा व संस्कृतीचा परिपाक घेऊनही उतरल्या आहेत. अण्णासाहेबांचे संस्कृत, मराठी व इंग्रजी भाषेचे आणि वाङ्मयाचे ज्ञान फार चांगले होते याचा प्रत्यय या ग्रंथात पदोपदी येतो. विशेषत: मराठी व संस्कृत कवींच्या काव्यातील प्रसंगोचित वचने विवेचनाच्या ओघात आलेली वाचताच त्यांच्या लेखनाच्या अभिजात शैलीचा प्रत्यय येतो. मधूनमधून त्यांनी केलेली वर्णनेही त्यांच्या काव्यात्मक वृत्तीची साक्ष देतात. डुभी येथील ब्रह्मपुत्रेच्या विराट दर्शनाने हेलावलेल्या त्यांच्या अंत:करणातून बाहेर पडलेले धन्यतेचे उद्‌गार वाचले म्हणजे याची कल्पना येईल. भारतीय आर्य भाषांप्रमाणेच द्राविड भाषांशीही त्यांचा चांगला परिचय होता. कानडी ही तर जवळजवळ त्यांची मातृभाषाच, तिचा त्यांच्या लेखणीला झालेला संस्कार अधून-मधून या ग्रंथात आढळतो. अण्णासाहेबांचे एकंदर लिहिणे सुबोध असूनही सफाईदार आहे. वाक्यरचनेच्या साधेपणाचे सौंदर्य तीत सर्वत्र पसरलेले आढळते. प्रत्यक्ष विधायक कार्याने अशी त्यांनी जनतेची सेवा केली आहे तशी वाणीने आणि लेखणीनेही केलेली आहे. इंग्लंडमधून शिक्षण घेऊन परत आल्यापासून ब्राह्मधर्माच्या प्रचारासाठी आणि समाजसुधारणेच्या कार्यासाठी भारतभर प्रवास करून त्यांनी हजारो व्याख्याने देऊन श्रोत्यांची मने जिंकली आहेत आणि त्यांना विचारप्रवृत्त केले आहे. प्रार्थना-समाजाच्या आणि अन्य व्यासपीठावरून चालविलेल्या उपासनांच्या प्रसंगी धीरगंभीर वाणीने उपदेशामृताचे सिंचन करून अनेकांच्या अंत:करणात सात्विक भावनांचे अंकूर त्यांनी निर्माण केले आहेत. या आध्यात्मिक, धार्मिक आणि सामाजिक कार्यात आपली लेखणीही त्यांनी सतत चालवली आहे. श्री. बी. बी. केसरकर यांना संपादिलेले त्यांचे 'लेख, व्याख्याने आणि उपदेश' वाचले म्हणजे त्यांची चांगली कल्पना येईल. त्यातील प्रवास वृत्तातून त्यांच्या रमणीय लेखन-शैलीचे सौंदर्य जसे पाहावयास मिळते तसेच त्यांच्या सूक्ष्म निरीक्षण शक्तीचे व जागृत सामाजिक मनाचेही ज्ञान होते. त्यांचे हे 'सर्व लेख व व्याख्याने.... वाचनींय असून त्यातील कित्येक व्याख्याने विवेकास जागृत करणारी आहेत. मन त्रस्त झाले असेल तेव्हा अगर विश्रांतीच्यावेळी ह्या पुस्तकात प्रसिद्ध झालेली रा. शिंदे यांची केवळ विलायतेहून लिहिलेली पत्रे जे कोणी वाचतील त्यास रा. शिंदे यांचे निरीक्षण सामर्थ्य, कल्पकता, भाषेतील काव्य व रस अवलोकून समाधान वाटल्यावाचून राहणार नाही ' असे श्री. द्वा. गो. वैद्य यांनी आपल्या प्रार्थना समाजाच्या इतिहासात म्हटले आहे ते अगदी यथार्थ वाटते.

यातील 'बहिष्कृत भारत' या अण्णासाहेबांच्या लेखाने त्या काळी सर्वांचे लक्ष वेधून घेतले होते. त्यातील विवेचनाच्या बीजातूनच 'भारतीय अस्पृश्यतेचा प्रश्न ' ह्या ग्रंथाचा वृक्ष निर्माण झाला आहे. हा ग्रंथ म्हणजे अण्णासाहेबांच्या एतद्विषयक सूक्ष्म व सखोल अध्ययनाचा, संशोधनाचा व चिंतनाचा उत्कृष्ट परिपाक होय. अस्पृश्यतेच्या प्रश्नाचा त्यांनी किती मूलगामी आणि शास्त्रशुद्ध विचार केला होता याची या ग्रंथावरून उत्तम कल्पना येते. अस्पृश्यतेची संस्था केवळ भारतीय आहे असे नाही तर भारताबाहेर ब्रह्मदेशादी राष्ट्रातही तीचा व्याप आहे. तिच्या निर्मितीचा आणि विकासाचा इतिहास प्रथम खंडात देऊन दुसऱ्या खंडात अस्पृश्यतेच्या प्रश्नाच्या अंगोपांगाचा त्यांनी विचार केलेला आहे. अस्पृश्य म्हणून समजल्या जाणाऱ्या भिन्न प्रांतीय जातींच्या नावांचा भाषाशास्त्राच्या साह्याने त्यांनी जो इतिहास शोधला आहे तो त्यांच्या कुशाग्र बुद्धीचा द्योतक आहे. तौलनिक भाषाशास्त्राची अण्णासाहेबांना विशेष आवड होती. या विषयावर त्यांनी काही ठिकाणी व्याख्याने दिल्याचा उल्लेख या आठवणीतच आलेला आहे. 'कानडी-मराठी संबंध ' 'कोकणी व मराठी संबंध ' इत्यादी विषयांवरील त्यांचे निबंध त्यांच्या या तौलनिक अध्ययनातून बाहेर पडलेले स्पष्ट दिसतात. मराठी भाषा ही महाराष्ट्रीयपासून निर्माण झालेली नसून ती मगध देशातून बंगाल, ओरिसा, तेलंगण, वऱ्हाड व कर्नाटक या प्रांतातून प्रवास करीत असलेली एक निराळीच भाषा आहे, हा त्यांचा विचार भाषाशास्त्रज्ञांनी सूक्ष्मपणे तपासून पाहण्याच्या योग्यतेचा आहे. मराठ्यांच्या पूर्वपीठिकेचाही त्यांनी भाषाशास्त्राच्या दृष्टीने 'रत्नाकरा ' त विचार केलेला होता. या सर्व लेखात भाषाशास्त्राच्या आधाराने अण्णासाहेबांनी मांडलेले काही ऐतिहासिक प्रश्न पाहिले म्हणजे आश्चर्य वाटते. याच पद्धतीने अस्पृश्य जातींच्या नावांची मीमांसा करून हा वर्ग मुळात बराच उन्नत, सुसंस्कृत आणि पराक्रमी असला पाहिजे असा निष्कर्ष त्यांनी काढलेला आहे, तो इतिहासाच्या आणि अस्पृश्योद्धाराविषयक चळवळीच्या दृष्टीने फार महत्त्वाचा वाटतो. अस्पृश्यांच्या पूर्वपीठिकेविषयी मनुस्मृतीने केलेली मीमांसा निराधार आणि अनैतिहासिक असल्याचेही त्यांनी साधार व सडेतोड रीतिने प्रतिपादन केलेले आहे. इतिहास, भाषाशास्त्र, समाजशास्त्र, राजकारण इत्यादी अनेक दृष्टींनी या प्रश्नाकडे इतक्या सूक्ष्मपणे पाहणारे विचारवंत भारतात अण्णासाहेबांव्यतिरिक्त दुसरे क्वचितच आढळतील. सर्व अस्पृश्य बंधूनी अभ्यासण्याच्या योग्यतेचा असा हा मौलिक ग्रंथ आहे. सर्व भारतीय भाषातून त्याची भाषांतरे झाली पाहिजेत असे मला वाटते. प्रस्तुत ग्रंथ म्हणजे या विषयाचा पूर्वार्ध होय. अण्णासाहेब यांचा उत्तरार्ध लिहिणार होते. त्यात दलित समाजाच्या उद्धाराचा व अस्पृश्यता निवारणाचा इतिहास व उपाय यांचा अंतर्भाव व्हावयाचा होता. अण्णासाहेबांनी महाराष्ट्रीय ज्ञानकोशातील आपल्या लेखात हा भाग संक्षिप्त रूपाने दिला आहे, हे खरे; पण तो सर्व वृत्तांत त्यांच्या अनुभवी लेखणीतून सविस्तर बाहेर पडणे अवश्य होते. तसे होऊ शकले नाही याबद्दल आता हळहळ वाटणे स्वाभाविक आहे. पण त्याला इलाज काय ?

अण्णासाहेबांच्या चरित्राची आणि चारित्र्याची, स्वभावाची आणि कार्याची माहिती करून देणाऱ्या या आठवणी त्यांनी स्वतःच्या विरंगुळ्यासाठी लिहिल्या असल्या तरी त्यापासून आपणा सर्वांना उत्तम मार्गदर्शन लाभणार आहे. तेव्हा आता अधिक न लिहिता या आठवणी वाचण्याची वाचकांना विनंती करतो.

वि. भि. कोलते

आदरांजली....

महर्षी विठ्ठल रामजी ऊर्फ अण्णासाहेब शिंदे यांचे पुनर्मुद्रित केलेले आत्मचरित्र ' माझ्या आठवणी व अनुभव ' हे मी वाचले. ज्यांनी आपले संबंध आयुष्य सर्वस्वी समाजसेवेसाठी व अस्पृश्योद्धारासाठी वाहिले अशा या थोर पुरुषाच्या आयुष्यातील या पुस्तकात ग्रथित केलेल्या आठवणी वाचल्यानंतर त्यांच्याविषयीचा आदर दुणावतो. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतून मार्ग काढून आपले कार्य आत्यंतिक निष्ठेने व तळमळीने सतत करीत राहणे हा गुण असामान्य व्यक्तींच्या चरित्रात आपणास प्रामुख्याने आढळतो. महर्षी शिंदे यांच्या चरित्रात आपणांस याचे प्रत्यंतर येते. लहानपणाची गरिबी, त्यात अनेक कौटुंबिक आपत्तीची भर असे असूनही स्वाभिमान न दुखवता जेवढी मदत मिळेल तिच्यावर त्यांनी आपले शिक्षण पुरे केले. त्यांच्या दारूण परिस्थितीचा व प्रेमळ मातापित्यांच्या धार्मिक प्रवृत्तीचा त्यांच्या मनावर जो परिणाम झाला त्यामधूनच त्यांना धार्मिक शिक्षण घेण्याची प्रेरणा झाली व ऑक्सफर्ड येथे हे शिक्षण घेऊन परत आल्यावर त्यांनी धर्मप्रचाराचे काम हाती घेतले. या कार्यातूनच पुढे त्यांनी केलेल्या अस्पृश्योद्धाराच्या महान कार्याचा उदय झाला.

त्यांच्या सार्वजनिक आयुष्याचा परिपोष त्यांच्याच भाषेत सांगावयाचे झाल्यास विश्वधर्मापासून सुरुवात होऊन समाजसुधारणा, समाजसेवा वा राष्ट्रोद्धार अशा टप्प्यांनी झाला.

तत्कालीन महाराष्ट्रात ज्या ज्या समाजसुधारणेच्या चळवळी झाल्या त्यात महर्षी शिंद्यांचे प्रामुख्याने अंग होते. परंतु त्यांच्या आयुष्यातील अत्यंत मौलिक कार्य म्हणजे अस्पृश्यांची त्यांनी केलेली महान सेवा. आपले सर्व जीवन त्यांनी कार्यासाठी वेचले, जातीनिरपेक्ष व धर्मनिरपेक्ष बुद्धीने त्यांनी हे कार्य सतत केले. तत्कालीन सरकारचीही या कार्यात त्यांनी सहानुभूती मिळविली. एवढेच नव्हे तर सतत प्रयत्न करून राष्ट्रीय सभेलाही हे कार्य हाती घेण्यास त्यांनी प्रवृत्त केले. या कार्याचा पुढे महात्मा गांधीजीच्या नेतृत्वाखाली प्रचंड वृक्ष फोफावला.

महर्षी शिंद्यांनी आपल्या हयातीत केलेली धार्मिक, सामाजिक, ऐतिहासिक व राजकीय क्षेत्रातील कामगिरी आधुनिक महाराष्ट्राच्या इतिहासात अद्वितीय गणली जाईल. इतक्या निरपेक्ष, निरलस व तळमळीने काम करणाऱ्या एका थोर समाजसेवकाच्या चरित्राचा आदर्श तरुण पिढीपुढे सतत रहावा व त्यापासून त्यांना शक्ती व स्फूर्ती मिळावी अशी इच्छा व्यक्त करून ह्या चरित्राच्या रूपाने मराठी वाङ्मयातील बहुमोल ठेवा वाचकांच्या हाती दिल्याबद्दल महर्षींच्या चिरंजीवांना मी धन्यवाद देतो.

यशवंतराव चव्हाण

' माझ्या आठवणी ' संबंधी....

परमुलुखांत नोकरी करीत असता मी १९३९ चे सुमारास रजेनिमित्त पुण्यात घरी आलो असता सहज माझ्या हाती वडिलांच्या हस्ताक्षरात लिहिलेली जाडजूड वही लागताच मी तीबद्दल कुतूहलाने त्यांना प्रश्न केला. त्यावर त्यांनी स्वत: १९३० साली कायदेभंगाच्या चळवळीत तुरुंगात असताना लिहिलेल्या त्या स्वत:च्या आठवणी आहेत असे सांगितले. तीर्थरूप त्या वेळी साठीच्या पलिकडे गेलेले, तशात त्यांना मधुमेहाचा विकार आणि त्यामुळेच त्यांच्या दोन्ही हातांना कंपवायूची बाधा झालेली. अशा स्थितीत भर म्हणून की काय दृष्टी मंद होऊन त्यांना अजिबात वाचता येत नव्हते. हे सर्व ठाऊक असताही मी त्यांना सहज विचारले, "या आठवणीत तुम्ही भर घालून संपूर्ण आत्मचरित्रच का लिहित नाही ?" तो अण्णांनी या माझ्या म्हणण्याला उत्तरच दिले नाही; पण मी तेवढ्याने काही गप्प बसणार नव्हतो. एकसारखा पाठपुरावा करून मी त्यांना त्याबाबत बोलावयास लावलेच. परंतु वार्धक्याने जर्जर झालेल्या निरुत्साही मन:स्थितीतलेच ते निराशाजनक उत्तर होते. पण मी आपला हेका न सोडताच सुचविले की, 'आत्मचरित्रासंबंधीची जी काही सामुग्री असेल ती मी मिळवितो. ती तुम्हास वाचून दाखवितो. आठवणीचे धागेदोरे जुळवून आपण आत्मचरित्राचे कथन तेवढे करावे, म्हणजे लिहिण्याचे काम मी स्वत: करीन ' या कामाला बराच कालावधी लागणार असल्याची वडिलांना खात्री होतीच. तेव्हा त्यांनी मला प्रश्न केला " हे सर्व काम काही एक-दोन महिन्याचे नाही. त्याला किती तरी महिने लागतील ! तेव्हा तू नोकरी सांभाळून हे सारे कसे करणार ? शिवाय माझे आत्मचरित्र लोकांसमोर पुस्तकरूपाने यावे अस मलाच मुळातून वाटत नाही. आणि आता तर मी इतका थकलेला आहे की, तू सांगितलेली सूचना पाळून देखील कथन करण्याचे श्रम माझ्याच्याने होतील असे वाटत नाही. दुसरी गोष्ट अशी की, कथन काही नियमितपणे होईल म्हणावे तर तेही नाही. माझी प्रकृती, माझी मन:स्थिती, मनाचा एक विशिष्ट कल या गोष्टी जमेस धरता हे काम सुतराम् कसे पार पडेल याची मोठीच वानवा आहे. तेव्हा तू आपला हेका सोडून नोकरीवर जा पाहू कसा !"

मी ऐकले नाही. निमूठपणे मी सामुग्री जमवली आणि वडिलांच्या इच्छेविरूद्ध बिनपगारी दीर्घकालाची सुट्टी घेऊन आत्मचरित्राचा पूर्वार्ध संपवला. आत्मचरित्राचा पूर्वार्ध पुस्तकरूपाने प्रसिद्ध झालेला पाहताच दुसऱ्या भागाची तयारी देखील अशाच परिस्थितीत मी करून टाकली. पूर्वार्ध छापून प्रसिद्ध करण्याचे काम माझे मित्र श्री. जयवंतराव जगताप यांनी आपल्या 'वत्सला साहित्य प्रकाशन ' संस्थेतर्फे पुरे केले; पण दुसऱ्या भागांचे हस्तलिखित तयार करून त्यांना १९४१ च्या आरंभी दिले असताही छपाईच्या कामात त्यांच्याकडून कारणपरत्वे दिरंगाई झाली. पुढे १९४४ साली वडिलांच्या निधनानंतर त्यांनी छपाईचे काम धूमधडाक्याने सुरू केले. समग्र आत्मचरित्र वडिलांच्या हयातीत प्रसिद्ध होण्यासारखे असताना जयवंतरावांनी बुद्धिपुर:सर चालढकल केली आणि त्यांच्या निधनाला अवघा आठवडा लोटतो न लोटतो तोच पुस्तकप्रसिद्धीबाबत वर्तमानपत्रातून अगाऊ जाहिरात करून धमाल उडवण्याचा जो उपक्रम आरंभला त्यावरून त्यांच्या व्यवहारी वृत्तीचे कौतुक करावे तेवढे कमीच आहे. वडिलांना आपल्या हयातीत, आपल्या डोळ्यांनी समग्र

चरित्राचे प्रकाशन पुस्तकरूपाने पाहावे हाच ऐक हेतू मनात बाळगून मी आटोकाट प्रयत्न केले असता त्यांच्या निधनानंतर पुस्तकाचे प्रकाशन होण्यात मला तरी विशेष उत्साह वाटत नव्हता. बरे, इतके असताही पुस्तक हस्तलिखिताबरहुकुम तरी प्रसिद्ध करावयाचे, ते सोडून जयवंतरावांनी त्यात जी बेसुमार काटछाट चालवली त्यामुळे मी चकितच झालो. हस्तलिखितातील पॅरेच्या पॅरेच नव्हे, तर आठ-आठ दहा-दहा पाने अनावश्यक, नीरस आणि कंटाळवाणा मजकूर या सबबीखाली काढून टाकण्यास जेव्हा जयवंतरावांनी आरंभ केला, तेव्हा नाइलाजाने मला त्यांना विरोध करावा लागला. परिणाम असा झाला की, जयवंतरावानीच हस्तलिखिताचे सर्व भाग माझ्यापुढे टाकून म्हटले की, "हे बाड उचला अन् चालू लागा. माझ्याखेरीज दुसरा कोणीही हे काम करीत किंवा कसे हे तुम्हाला कळून येईल !" एक शब्दही न उच्चारता मी पुढ्यात टाकलेले बाड उचलून घरी आणले. वडिलांच्या पश्चात् हस्तलिखितात कसलीही काटछाट करण्याचा अधिकार प्रकाशकाला बिलकूल नाही, हे परोपरीने सांगूनही जेव्हा निरुपाय झाला तेव्हाच मला हा मार्ग पत्करावा लागाला. काही का असेना, पुस्तकाचा पूर्वार्ध तरी वडिलांच्या नजरेस पडला यातच मी समाधान मानून होतो. परंतु वडिलांच्या कार्याच्या दृष्टीने उत्तरार्ध अत्यंत महत्त्वाचा होता, आणि तो प्रसिद्ध झालेला त्यांनी पाहिला असता तर माझे घोडे गंगेत न्हाले असते.

तीर्थरूपांच्या तोंडून होत असलेल्या आत्मचरित्राचे कथन करताना मी दोनच गोष्टीवर त्यांचे विचार काय आहेत हे जाणून घेतले, त्या गोष्टी म्हणजे ब्राह्मण-ब्राह्मणेतरवाद आणि त्यांनी केलेले सामाजिक कार्य, ब्राह्मण-ब्राह्मणेतरवाद हा इंग्रजांनी आपल्या भेदनीतीला पूरक म्हणून उपस्थित केला असल्याने तो सर्वस्वी त्याज्य आहे असे वडिलांचे स्पष्ट मत होते. हिंदू-मुसलमान वादाप्रमाणे हा वाद देखील देशाच्या एकजुटीला बाधक आहे असे त्यांचे ठाम मत होते. शिवाय जातिभेदावर आधारलेला पक्ष केव्हाही चिरस्थायी असू शकत नाही याची ग्वाही त्यांना मनोमन पटल्याने त्यांनी ह्या वादापासून स्वतःला सुरुवातीपासूनच अलिप्त ठेवले होते आणि केवळ या एकाच कारणामुळे ब्राह्मणेतरवादीय व्यक्ती त्यांची उपेक्षा करीत, तर सनातनी जातीयवादी उच्चवर्गीय त्यांच्याकडे साशंकतेने पाहात. ही गोष्ट सूर्यप्रकाशाइतकी उघड होती. एक मात्र खरे की विचारवंत व्यक्ती, मग ती कोठल्याही जातीची असली तरी वडिलांच्या कार्याबद्दल कळकळ व आत्मीयता दर्शवल्यावाचून राहात नसे, ह्याची सत्यता खालील गोष्टीवरून दिसून येईल. ती, अण्णांच्या वाङ्मयीन गुणांचे चीज व त्यांच्या सामाजिक कार्याबद्दलचा सहानुभूतिपूर्वक विचार जसा उच्चवर्गीयांनी केला तसाच ब्राह्मणेतर वर्गातल्या श्रीमंत सयाजीराव किंवा कै. शाहु महाराज यांनी देखील केलेला आहे हे आत्मचरित्राचे वाचन करताना आढळून येईल.

दुसरी गोष्ट म्हणजे त्यांना स्वतःला स्वतःच्या कार्याबाबत म्हणावी तशी परिपूर्तता आली नसल्याचे वाटत होते. याचे कारण सांगताना त्यांनी मजजवळ उद्‌गार काढले ते असे, या कामाला पैसा हे काही कारण नव्हते. पैशापेक्षा आत्मीय जाणिवेने काम करण्याची उणीव हेच एक महत्त्वाचे कारण आहे. डिप्रेस्ड क्लासेस मिशन या संस्थेला माझ्या मनासारखी ऊर्जितावस्था आली नाही याला पैसा हे कारण बिलकूल नसून आंतरीक तळमळीने, स्वार्थत्यागी वृत्तीने काम करण्याची उणीव हेच एक मोठे कारण आहे."

सुशिक्षित व सुसंस्कृत वर्गीयांकडून जे काही घेण्यासारखे आहे, ते अवश्य घ्यावे आणि आपला उद्धार करून घ्यावा, असे न करता केवळ रूढ कल्पना उराशी बाळगून त्यांच्याबद्दलचा मत्सरग्रस्त पूर्वग्रह मनात उगाळीत बसून काही आपला कार्यभाग होणारा नाही, ही गोष्ट जशी मागासलेल्या वर्गीयांनी अंमलात आणावयाची आहे तशीच उच्चवर्गीयांनी देखील आपला अहंभाव विसरून मागासलेल्या वर्गीयांकडे तुच्छतेने न पाहता त्यांना आपल्यात वागवूनच घ्यावे हे परिणामी हितकर होणार आहे असे ते नेहमीच म्हणत असत.

बऱ्याच काळानंतर आत्मचरित्राचे समग्र प्रकाशन करण्याचा जो योग आलेला आहे तो समाजाच्या दृष्टीने अत्यंत उपयुक्त आहे. हा योग घडवून आणण्याचे कार्य जयवंतराव जगतापानंतर श्री. ग. ल. ठोकळ यांनी ज्या धडाडीने केले आहे त्याबद्दल त्यांचे अभिनंदन मीच काय पण ती. अण्णासाहेबांबद्दल आस्था बाळगणारी महाराष्ट्रातली कोणतीही विचारवंत व्यक्ती यथोचित केल्याविना राहणार नाही.

पुणे, ता. २ फेब्रुवारी, १९५८ **रवींद्र विठ्ठल शिंदे**

१

माझे आजोबा

पहिल्या आठवणी : माझ्या घराण्यातील मी पाहिलेला सर्वात वडील मनुष्य म्हणजे माझे आजे बसवंतराव. त्यांचे मेहुणे व्यंकटराव (व्यंकप्पा) हे माझ्या आजीचे सख्खे भाऊ, हे माझ्या आजीपेक्षा मोठे होते. पण हे आजोबांपेक्षा लहान की मोठे हे मला ठाऊक नाही. हे आमच्या आजोबांच्या आश्रयाखाली आमचेच घरी राहात असत. त्यांची मला फारच अंधुक आठवण आहे. आमचे घरी एक मोठा, काळा, म्हातारा, पाठाळ बैल यल्लमादेवीला वाहिलेला (कंठाळीचा बैल) होता. त्यावरून त्याला कठल्या बैल असे नाव होते. त्याचेवर ओझे लादून व्यंकप्पा आमचे मळ्यातून रोज घरी येत. हीच माझ्या आयुष्यातील अगदी पहिली आठवण होय. व्यंकप्पा फार सात्विक, साधे व सहनशील होते. आमचे आजे बसवंतराव नेहमी त्यांची चेष्टा करीत व तिकडे केवळ दुर्लक्ष करून व्यंकप्पा केव्हा तरी गंभीरपणाने उत्तर देत. ह्या वेळी मी फार तर तीन किंवा चार वर्षांचा असेन.

माझ्या जन्मभूमीचा गाव जमखंडी. हा कृष्णा नदीचे दक्षिणेस ४।। मैलावर, विजापूरचे पश्चिमेस ३६ मैलावर व कुडची (एस्. एम्. आर्.) स्टेशनपासून ३३ मैलावर आहे. विजापूरपैकी लिंगायत तेली जातीच्या देसायांचा हा मूळ गाव. पटवर्धनांनी त्यांच्यापासून हा प्रांत जिंकून घेतला.

अप्पा दप्तरदार नावाचे एक श्रीमंत ब्राह्मण ग्रहस्थ जमखंडीचे यजमान रावसाहेब (गोपाळराव) पटवर्धनांचे वेळी होते. त्यांचा आश्रय आमच्या आजोबास असावा. त्यांचा मळा जमखंडीचे पूर्वेस आलगूरच्या वाटेवर दोन मैलावर होता. तो आमच्या आजोबाकडे पुष्कळ वर्षे लागवडीस होता. आमचे रहाते घराची जागाही ह्या दप्तरदारानीच दिली असे मी ऐकत होतो. पण माझ्या जन्मापूर्वी हा जुना संबंध आधीच पुष्कळ वर्षे तुटलेला असावा. हा मळा मात्र माझे जन्माचे वेळीही आमचेकडेच होता. ह्या मळ्याला 'अप्पांचा मळा ' असे माझ्या लहानपणी म्हणत असत. आता तो अगदी उद्ध्वस्त झाला आहे.

चंद्रोजीराव : आजोबांचे वडील चंद्रोजीराव हे लढाईत मारले जाऊन त्यांच्या सर्व घराण्याचा नाश झाला! ते विजापूरपैकी सुरापूरचे राहणारे. ही लढाई परशुराम भाऊ पटवर्धन ह्यांनी जिंकली, असे इतिहासकार खरेशास्त्री ह्यांनी एका केसरीचे अंकात लिहिले आहे. चंद्रोजीराव शिंदे हे जर सुरापूरचे जहागिरदार असतील तर हे शक्य आहे. पण ते आता कळण्यास मार्ग नाही. सौंदत्ती येथे १२ व्या शतकात शिंदे घराण्याचे राज्य होते. त्या घराण्यातील कोणी पुरुष सुरापूरचा जहागिरदार असल्यास चंद्रोजीरावाचा संबंध शोधून काढण्यास जागा आहे. पण माझे वडील जिवंत असताना मला आपल्या वंशावळीचा शोध करण्याचा विचारही सुचला नाही. आता तर गोष्टी फारच जुन्या झाल्या!

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, समग्र वाङ्मय, खंड -२ रा ~~~

पुरली होती. पुढे हत्यारांचा कायदा झाल्याने ही हत्यारे तशीच पुरलेली राहिली. आजोबा वारल्यावर मी इंग्रजी शाळेत असताना माझ्या वडिलांनी आमच्या वाड्याच्या एका जुन्या भागाची जमीन उकरून ही हत्यारे पाहिली. तलवारी व कट्यारी अगदी गंजून निकामी झाल्या होत्या. ढाली वगैरेचे लोखंडी खिळे गंजलेले सापडले. त्या हत्यारात बंदुकी अजिबात नव्हत्या.

आजोबांविषयी एक आख्यायिका आमची आई सांगे. ती अशी की, एकदा आजोबांनी गोसाव्याचे सोंग घेऊन काही महत्त्वाचे कागदपत्र व टपाल दुसरीकडे लांबचा प्रवास करून पोचविले. शिवाय आजोबांच्या लष्करी साहसाच्या, तरुणपणच्या काही गोष्टी आम्हाला आम्ही लहान असताना सांगून आई आमची करमणूक करीत असे.

शेवटी शेवटी आजोबांना वृद्धपणामुळे अगदी दिसेनासे झाले. ते आपल्या खोलीतून बाहेर सोप्यात जेथे माझा पाळणा बांधलेला असे तिथे भिंतीला टेकून माझा पाळणा हालवीत बसत. मला थोडे थोडे समजत असे. मी त्यांचा लाडका होतो. मला साखरफुटाणे व साखरेतले काजू आजोबा खावयास देत. म्हणून मी नेहमी त्यांच्या आजूबाजूला लाडीगोडी करीत असे. त्यावेळी मला ते काही तरी मजेदार गोष्टी व बालगीते शिकवीत.

माझा जन्म : आजोबा सुमारे १८७८-७९ इसवीत वारले असावे, असा माझा तर्क आहे. त्या वेळी माझ्या बाबांनी संस्थानची नोकरी सोडली, असे आई म्हणत होती. मी. इ. स. १८७३ मध्ये एप्रिल महिन्याचे २३ तारखेला जन्मला, असा माझ्या जन्मपत्रिकेत उल्लेख आहे.

एक स्वप्न : ह्या वेळची एक गोष्ट आठवते. तिजवरून आजोबांचा मी किती लाडका होतो हे दिसते. आजोबा वारण्याचे सुमारास मला देवी काढल्या होत्या. त्या वेळी मी ५ किंवा ६ वर्षांचा होतो; अद्यापि शाळेत जात नव्हतो. देवी टोचल्याने माझे दंड सुजले होते. आजोबांच्या मृत्यूमुळे घराणे शोकात होते. माझ्या दंडावरील जखमांची हयगय होऊन ते सुजून त्यात किडे पडलेले कोणी पाहिलेच नव्हते. दहावे दिवशी दसपिंडीच्या विधीकरिता आम्ही घरातील सर्व मंडळी कृष्णा नदीवर जाणार होतो. आदले दिवशी रात्रभर माझा हात दुखून मला झोप कशी ती आली नव्हती. माझी आई दिवसा नेहमी कामात असे. तिला गाढ झोप लागली होती. तिला स्वप्न पडले. त्यात आजोबा माझ्या पाळण्याजवळ मला कुरवाळीत म्हणाले, "पकुल्या, तुझ्या दंडात किडे पडले असून तुझ्याकडे लेकाचे कुणीच पाहात नाही की रे !" हे वाक्य ऐकून आई जागी होऊन मला पाळण्यात पाहू लागली, तो माझ्या दंडात किडे बुजबुजत असलेले दिसले. तिने लगेच बाबांना जागे केले. नंतर उन्ह पाण्याने माझे दंड धुऊन त्यात टरपेंटाईन घातल्यावर सर्व किडे बाहेर येऊन माझे हात हलके झाले. दुसरे दिवशी सकाळी आईचे स्वप्नाबद्दल आश्चर्य करीत सर्व मंडळी नदीवर दसपिंडाच्या विधीला गेली. मीही त्यांच्यात होतो.

जनाक्का : आजोबा वारण्यापूर्वी १-२ महिने माझी बहीण जनाक्का जन्मली होती. आजोबांना मुळीच दिसत नव्हते. ते एक दिवस पाळण्याजवळ येऊन तान्ह्या जनाक्काला हाताने चाचपून पाहू लागले आणि उद्‌गारले, "हां! बिद्री कासव्वाने अदाळ." जमखंडीपैकी बिद्री नावाचा एक पेठ्याचा गाव आहे. तेथील कासव्वा (काशीबाई) नावाची एक ब्राह्मणाची बाई आजोबांच्या ओळखीची असे. ती फार लठ्ठ असे. जनाक्का लहानपणी जास्त बाळशामुळे लठ्ठ असे; म्हणून ती कासव्वाप्रमाणे आहे. असा आजोबांचा बोलण्याचा आशय होता.

●●●

२

माझी आजी

संताबाई : जमखंडीचे आग्नेयीस मुधोळचे बाजूला निंगनूर (लिंगन + ऊर = लिंगाचे गाव) नावाचे देसायांचे एक खेडे आहे. ही माझ्या आजीची व तिचा भाऊ व्यंकप्पा ह्यांची जन्मभूमी. आमच्या घराण्याची म्हणजे बसवंतरावांची कुलदेवता तुळजापूरची अंबाबाई. तेथील भोपे भाऊराव कदम हे आमचे आश्रित, त्यांच्या वहीत आजोबांचे नाव बसवंतराव आणि आजीचे संताबाई असे आहे. असे मला स्वत: भाऊराव कदम ह्यांनी सांगितले. पण ह्या कानडी मुलखांत आमच्या आजाआजीला लोक बसप्पा व सत्यव्वा असे म्हणत. माझ्या आजीचा स्वभाव करारी व काही अंशी तामसी होता. तिची माहेराकडील कुलदेवता सौंदत्तीची यल्लमा होती. हा संबंध सौंदत्तीच्या शिंदे घराण्याकडे जातो. तुळजापूरची अंबाबाई ही खरी अस्सल मराठ्यांची देवता. आमच्या देव्हाऱ्यावर ह्या दोन्ही देवता असत; पण आजी धार्मिक व आग्रही असल्यामुळे घरी यल्लमाचे प्रस्थच फार असे, तरी भाऊराव कदम आपला हक्क गाजविण्यात वरचेवर येतच.

आजी वर्णाने काळी, रूपाने राकट, पण संसारात शहाणी, फार उद्योगी व कर्तृत्ववान् होती. तिचे माहेर फार गरीब दिसते. एरव्ही तिचा भाऊ आमचे घरी का राहाता ? इतकेच नव्हे तर त्याचा एकुलता एक मुलगा शिद्दु आमच्याच घरी लहानाचा मोठा झाला. शिद्दु हे नाव कर्नाटकी मराठ्यात असते. एकंदरीत बसवंतरावांचा विवाह त्यांच्या आपत्काली झालेला दिसतो. त्यांचा स्वभाव विनोदी व सहिष्णू असल्यामुळे घरगुती बाबी त्यांनी बहुतेक आजीकडेच सोपविल्या होत्या. आजी कष्टाळू व कर्तृत्ववान् असल्यामुळे शेतवाडी, घर, देवधर्म वगैरे सर्वच कारभार स्वत: पाहात असे. आमचे आजोबा फारसे धार्मिक दिसले नाहीत. एकंदरीत आजोबांत मराठ्यांची व आजीत कर्नाटक्यांची लक्षणे भरपूर दिसत. आजी खेडवळ व राकट कुणबाऊ, तर आजोबा नागरिक, दरबारी व गुलहौशी दिसत. पोरकेपणामुळे व जमखंडी संस्थान ब्राह्मणी पडल्यामुळे बिचाऱ्या बसवंतरावांचा खानदानीपणा बराच खाली उतरला.

पुढे त्यांचे एकुलते एक चिरंजीव, माझे वडील रामजीबाबा ह्यांनी आपल्या सुशिक्षणाने आणि आपल्या खंबीर लेखणीच्या जोरावर आमचा खानदानीपणा पुन्हा वर उचलला, तथापि, पुढे तलवारीचे दिवस अजिबात गेल्यामुळे आमच्या घराण्यातल्या जुन्या मराठमोळ्याला ब्राह्मणी तऱ्हा व कारकुनी वळण लागले.

आजोबांचे मागून १/२ वर्षांनी आजी वारली. पण तिच्या फारशा गोष्टी मला आठवत नाहीत. ह्याचे कारण तिचा मला फार लळा नव्हता व ती नेहमी शेताच्या व घराच्या कामात गुंतलेली असे. तिचा स्वभावही प्रेमळ नव्हता. ती घरी शेताचा कापूस आल्यावर तो वटून त्याचे सूत स्वत: कातून

ते कोष्ट्याला देऊन लुगडी विणवून घेत असे. पुढे आम्हाला गरिबी आल्यावर माझी आईही सूत कातून प्रपंच कसा तरी भागवत असे.

पोरकट चोरी : दूधदुभते करण्यात आजी फार वाकब असे. घरच्या दुभत्याचे लोणी कढवून एक गाडगे भरून सुंदर साजुक तूप फडताळात आजीने एकदा ठेविले होते. माझ्या बाबांची एकुलती एक बहीण अंबाबाई तेव्हा आमचे घरीच दुष्काळामुळे राहात असे. भागूबाई नावाची तिची मुलगी, माझा वडीलबंधु भाऊराव आणि मी खेळगडी असू, लहानपणी मी मोठा गोडघाशा, खादाड व चोरटा होतो. घरी गोडधड झाले की आजीने व आईने काही जपून व कोठे तरी दूर ठेविले असले, तरी त्यांच्यामागे ते हुडकून चोरून खाण्यात माझा हातखंडा होता. एकदा आई, आजी व आत्या (तिला आम्ही अक्का म्हणत असू.) ह्या तिघी पाणी आणावयास विहिरीवर गेल्या होत्या. त्या येण्याच्या आत आम्ही तिघांनी ताज्या तुपाच्या मडक्यावर हल्ला केला. मडक्यातून तूप भरलेले वरवर थिजले होते. पण खाली अद्याप पातळ होते. ते आम्हा चोरांना कळले नाही आम्ही घाईत मडके ताटात पालथे केले. तेव्हा भसकन सगळेच तूप पडून उष्टे झाले. आजी तर इकडे येण्याची वेळ झाली. ताटातील तूप काही आम्हा तिघांनाही संपेना. ओटावर, पोटावर, हातावर, कोपरापर्यंत तुपाचे ओघळ पडलेले असा आमचा देखावा पाहण्यासारखा होता. आजी, आई व आत्या तिघी आत आल्या, तेव्हा ताज्या तुपाचा घमघमाट सुटला होता. त्यांनी आमचे ध्यान पाहिल्याबरोबर आम्हाला मुद्देमालासकट पकडले. मग काय ? आम्ही एकमेकावर चोरीचा आरोप ठेवू लागलो. एकाने हुडकुन काढले, दुसऱ्याने खिडकी उघडली व तिसऱ्याने मडके पालथे केले. अशा प्रकारे खरे पाहता सगळेच गुन्हेगार व सगळ्यांचेच हात व तोंडे तुपाने बरबटलेली त्या तिघांनी पाहिली. एकंदरीत ह्या जिवंत चित्राचे जे त्यांना दृश्य दिसले त्यातच त्या तिघी गुंग झाल्यामुळे आम्ही सुटून पळालो.

यल्लमाची यात्रा : सौंदत्तीची यल्लमा ही आमच्या आजीची कुलदेवता, ह्या देवीची भक्ती आजी मोठ्या निष्ठेने करी. तिने ह्या देवीची ताळी देव्हाऱ्यात ठेविली होती. पंढरपूरची जशी माळ तशी ही सौंदत्तीची ताळी—एक सोन्याची सॉव्हरीनसारखी ताळी (पुतळी), नंतर तांबड्या पोवळ्याचे व पांढरे मणी ओवलेली ही ताळी असे. उपास करणे, लिंब नेसणे, दंडवत घेणे, सौंदत्तीच्या डोंगरातील प्रसिद्ध क्षेत्राची यात्रा करणे वगैरे गोष्टीत आजीचा करारी स्वभाव दिसे. मार्गशीर्ष पौर्णिमेला दरवर्षी ह्या यात्रेला जमखंडी येथील यल्लमाची मूर्ती तिचे पुजारी सौंदत्तीला घेऊन जात. हिला जगाची यल्लमा म्हणत. जग म्हणजे एक मोठी ३/४ फुट व्यासाची, वाटोळी, १।।-२ फूट खोल अशी बांबूची परडी असे. तिच्यात यल्लमाचा रुप्याचा भव्य मुखवटा ठेवून तिला खाली मोठे लुगडे नेसवून सजावट करीत. ह्या यात्रेबरोबर जमखंडीच्या आजूबाजूचे २००।४०० स्त्री-पुरुष कोणी गाड्यातून, कोणी बैल-घोड्यांवरून तर कोणी पायी चालत जात. ही यात्रा आटोपून परत आल्यावर एकदम देवळात न जाता जमखंडी गावाबाहेर दक्षिणेकडे कट्टेगिरी म्हणून एक तलाव आहे. त्याच्याजवळ ही सर्व यात्रा उतरत असे. गावातील सर्व भक्तमंडळीने देवीस नैवेद्य न्यावयाचा असतो. मग रात्री मिरवणूक काढून थाटाने मूर्ती देवळात आणीत, गोड खावयास व मौज पहावयाला

मिळे. म्हणून मला लहानपणी यल्लमाच नव्हे तर आजीदेखील तेवढ्या वेळेपुरती फार आवडे. धर्माचे पहिले संस्कार माझ्या कोमल मेंदूवर आजीच्या त्या द्राविडी देवतेने उठवलेले. आठवण झाल्यावर मला ते अजून रमणीय वाटतात. इतकेच नव्हे तर आजी वारल्यावर बऱ्याच वर्षांनी मी इंग्रजी पाचव्या इयत्तेत असताना मला खरूज झाली; तेव्हा मी ह्या यल्लमाला नवस केला. खरूज बरी झाल्यावर यल्लमाची यात्रा करून यावे म्हणून मी माझ्या वडिलांजवळ आग्रह धरला. कौतुकाने त्यांनी तो पुरविला. आम्ही घरची सर्व मंडळी सौंदत्तीची यात्रा करून आलो. ही गोष्ट इ.स. १८८९ च्या डिसेंबरच्या महिन्यात घडली असावी.

अंबाबाईची यात्रा : ह्यापूर्वी सुमारे ९।१० वर्षांमागे आम्ही तुळजापूरची यात्रा केली होती. ती मला फार आवडली होती. ती मला चांगली आठवते. अंबाबाई आमची कुलदैवत. तिचे नाव माझ्या आत्तेला ठेवले होते. आजोबा वारल्यानंतर एकदोन वर्षात आजी वारण्याचे पूर्वी— सुमारे १८७९।८० इ. स. साली—ही यात्रा घडली असावी. घरची बैलगाडी होती. राम्या व मदाऱ्या ही दोन मोठ्या बैलांची जोडी होती. काडाप्पा हे गड्याचे नाव होते. हा गडी मोठा विश्वासू व फार दिवस आमच्या घरी काम करीत असलेला होता. तो आमच्या आजीच्या निंगनूर ह्या खेड्यातला होता. आई, बाबा, आजी, मी, माझा मोठा बंधु (नाव भाऊराव), धाकटी बहीण (तान्हे बाळ जनाक्का फार तर एक वर्षाची असेल) आणि गाडी हाकणारा काडाप्पा गडी असे आम्ही सातजण गाडीत होतो. त्यावेळी मी फार तर सहा-सात वर्षांचा असेन व भाऊ अकरा बारा वर्षांचा असेल. वाटेत विजापूर, सोलापूर ही शहरे आणि कृष्णा, भीमा व सीना ह्या नद्या लागल्या. सीना नदीवरील वाळवंटात आम्ही उपाहार केला. तेव्हा प्रथम लांब सोलापुरी पांढऱ्या साखरकाकड्या खाल्ल्या हे आठवते. विजापुरास गोलघुमट व जुन्या मशिदी आणि सोलापुरास जुने सिद्धेश्वराचे देऊळ पाहिल्याचे ठसे मला अद्यापि आठवतात. पुढे मोठेपणी विलायतच्या प्रवासात माझ्यामध्ये जी निरीक्षणशक्ती आढळली तिची ही पूर्वबीजे होत. त्या वेळी आगगाडी म्हणजे मोठे नवल! सोलापुराजवळ आगगाडीच्या रस्त्यालगत धावती गाडी पाहावी म्हणून बाबांनी आम्हा सर्व मंडळींना कुठल्या तरी एका लेव्हल क्रॉसिंगजवळ अडवून ठेविले. दोन प्रहर झाले. तरी गाडी आली नाही. भूक लागल्याने मला त्या आगगाडीचा मोठा कंटाळा व राग आला आणि तिचेविषयी कल्पनाच नसल्याने ती पाहाण्याची मला हौसही वाटली नाही.

तुळजापुरात जे पाहिले त्यापैकी काही देखावे अद्यापि आठवतात. देवीचा निजावयाचा पलंग व त्यावरील अतिशय उंच गादी आठवते. रात्री आराध्ये लोक जळती पोत अंगाभोवती कशी पाजळीत, त्यांच्या कवड्यांच्या माळा, तेलाने माखलेला पायघोळ पोशाख वगैरे सर्व आठवते.

कठीण नवस : तुळजापरची अंबाबाई व सौंदत्तीची यल्लमा या शिवाय इतर काही देवांची व देवर्षीची भक्ती आमची आजी करीत असे. जमखंडीच्या पूर्वेस चार मैलावर कुंभारहाळ व त्याच्याही पूर्वेस कुंचनूर म्हणून एक गाव आहे. कुंचनुरास महादेवाचे (महादप्पा) देवस्थान आहे. तेथे आमच्या घरची सर्व मंडळी दरवर्षी चैत्री प्रतिपदेस नैवेद्य घेऊन जात व तेथे एक दिवस राहून परत येत असत.

सन १८५७ चे नंतर जमखंडीच्या संस्थानिकावर बंडात सामील झाल्याचा वहीम आला होता. तो खोटा ठरावा. म्हणून ह्याच देवतेला आजीने सात मैल दंडवत घालण्याचा नवस करून तो पार पाडला. सुदैवाने जमखंडीकरांचा प्रत्यक्ष संबंध शाबीत झाला नाही. म्हणून काही दिवस बेळगावच्या किल्ल्यात ठेवून, त्यांना परत गादीवर आणून बसविण्यात आले. त्यांचा विश्वासू मसलतदार छोटूसिंग या एका बाणेदार रजपुताने सर्व कारभार आपल्या अंगावर घेतल्याने त्याला मात्र जमखंडी येथे इंग्रज सरकारने फाशी दिले. जमखंडी शहराच्या उत्तरेस कृष्णा नदीचे वाटेवर छोटुसिंगाचे थडगे आहे. हा नवसास पावतो, अशी भोळ्या लोकांची समजूत आहे.

कुंभारहाळ येथे लक्ष्मण नावाचा एक धनगराच्या जातीचा देवर्षी राहात असे. त्याच्या दर्शनाला आमचे वडील मंडळी जात असत.

शिवाय ताईबाई नावाची एक देवता कर्नाटकात पुजली जाते. ही कदाचित् शितळामाता असावी. हिला "येळ मक्कळ ताई" (सात मुलांची माता) असे कानडीत म्हणत. आमच्या वाड्यातील गोठ्यात, एका कोनाड्यात ह्या देवीच्या नावाने एक तिकोनी धोंडा शेंदुर फासून बसविला होता. आमच्या वडिलांना देवी आल्या होत्या त्यातून ते वाचले, म्हणून आमच्या आजीने ही स्थापिली असल्यास न कळे, आमचे बाबा एकुलते एक पुत्र म्हणून हे शक्य आहे. ह्या ताईबाईला दरवर्षी एक आठखुरी मेंढीचा बळी लागत असे. आठखुरी मेंढी दिल्याने आपली मुले सुखी राहतात, अशी समजूत दिसते. त्या दिवशी आमचे घरी मांसाचे जेवणाची मोठी समाराधना होत असे. ही प्रथा मला समजू लागल्यावर माझ्या सांगण्यावरून बंद करण्यात आली.

ह्या शिवाय आमच्या आजाआजीच्या देवता दुसऱ्या विशेष दिसल्या नाहीत. हे सर्व धर्माचरण आमच्या आजीचेच होते. आजोबा आपले तिचे लाड पुरवित असत. आजीनंतर ह्या सर्व देवीदेवतांची श्रद्धा आमच्या घराण्यातून लवकरच नामशेष झाली.

बाबा त्या काळचे सुशिक्षित असल्याने असल्या देवतांवर त्यांची धार्मिक वृत्ती तृप्त होणे शक्य नव्हते. त्यांनी पुढे पंढरपूरचा संप्रदाय पत्करला. ते पंढरपूरच्या वारीला जात होते, पण त्यांनी माळ मात्र घातली नाही. जमखंडीच्या यजमानाजवळ त्यांचे वजन असल्याने त्यांच्या वजनाने आपल्या वाड्याजवळ त्यांनी विठोबाचे एक लहानसे देऊळ बांधविले. त्याला विठोबाचा मठ म्हणत.

शाकाहार : आमची आजी शाकाहारी होती. यल्लमा देवीला मांसाचा नैवेद्य चालत नाही. ही तेलंगणातल्या रड्डी लोकांची देवता. कर्नाटकातले रड्डी व दक्षिण महाराष्ट्रातील मराठे हे एकाच जातीचे असावेत, असे माझे मत मी शास्त्रदृष्ट्या सिद्ध केले आहे. हे तेलंगी रड्डी वैष्णवही आहेत. त्यामुळे ते शाकाहारी बनले, ते व्यंकटेशाचेही उपासक आहेत. आजीच्या भावाचे नाव व्यंकप्पा होते. ह्यावरूनही हाच समज दुणावतो. आमच्या आईच्या माहेरची माणसेही शाकाहारी होती. पंढरपूरच्या वारकरी संप्रदायामुळे आणि आमच्या बाबांची वहिवाट ब्राह्मणमंडळीत फार असल्यामुळे, केवळ आमच्या आजोबांशिवाय आमचे घरी मांसाहारी कोणीच नव्हते. अशा परिस्थितीत ताईबाईचा

३

आजोळ

येथवर माझ्या बाबांच्या व त्यांच्या आईबापांच्या आठवणी झाल्या. आता माझ्या आईच्या आईबापांच्या आठवणीकडे वळू.

कृष्णराव काळे : जमखंडीच्या पूर्वेस ६ मैलावर आलगूर म्हणून कृष्णाकाठी एक खेडेगाव आहे. हे माझ्या आईचे माहेर. माझ्या आईचे नाव यमुनाबाई तिच्या आईचे नाव गंगाबाई व बापाचे नाव कृष्णराव काळे असे होते. गुडघीच्या रोगाने त्यांचा एक पाय गुडघ्यात अगदी वाकडा झाला. त्यामुळे ते तरुणपणीच कायमचे लंगडे झाले होते. म्हणून त्यांना गावात कुंट कृष्णाप्पा म्हणजे लंगडा कृष्णराव असे म्हणत असत. जमखंडी संस्थानात खेड्यातील सर्व लोक कानडीच बोलतात. मराठी कोणालाच येत नाही. माझ्या आजाआजीला मराठी बोलता येत होते. आजापेक्षा आजीला जास्त चांगले येत असे.

पतिव्रता गंगाबाई : वसंतराव मराठी तर संताबाई जशी कानडी, तशी गंगाबाई मराठी तर कृष्णराव कानडी असे हे जोडपे होते. गंगाबाई गोरी होती. कृष्णराव अगदी काळे होते. इकडे वसंतराव गोरे, तर संताबाई काळी होती. बाबांचे घराणे सुखवस्तु, वजनदार होते आणि आईचे गरीब होते. तरी कृष्णरावांचा आलगुरात चांगला दरारा होता, तो त्यांच्या प्रामाणिकपणामुळे होता. गुडघीच्या रोगाने ते वर्षभर अंथरूणावर खिळलेले होते. गंगाबाईने त्यांची अतिशय प्रेमाने व श्रद्धेने रात्रंदिवस शुश्रुषा केली. त्या वेळी माझी आई ५/६ वर्षांची व तिचा भाऊ सोमा नावाचा १/२ वर्षाचा होता. आलगूरचे कुळकर्णी गोंविदाप्पा नावाचे वैष्णव ब्राह्मण मोठे देवमाणूस होते. त्यांची पत्नी सरस्वतीबाई, वडील बंधु बाबासाहेब व एकंदरीत सर्व घराणे अगदी बाळबोध, प्रेमळ व प्रामाणिक असे, कृष्णरावांना या घराण्याचा मोठा आश्रय होता. कृष्णरावांचे या घराण्यात त्यांच्या प्रामाणिकपणामुळे मोठे वजनही होते. एक वर्षाच्या आजारात आमची आजी नेहमी अंथरूणाला धरून बसलेली राहिल्यामुळे चूल आणि मुलाचा सर्व जोजार (भार) माझ्या आईवरच पडला. तेवढ्या लहान वयातही तिने तो बिनबोभाट चालविला. या लहानपणाच्या हालाने आमच्या आईला पुढे सहिष्णुतेचे व दक्षतेचे चांगलेच वळण लागले. माझ्या आईचा सारा जन्मच सहन करण्यात गेला. ते सामर्थ्य तिने लहानपणीच माहेरी मिळविले होते. माझी आजी व तिची नमुनेदार मुलगी माझी आई ही दोन माणसे साऱ्या आलगूर गावाला पातिव्रत्याचा व हिंदु स्त्रियेच्या चांगुलपणाचा एक अनुपम नमुनाच वाटत होता. अद्याप त्यांचे नाव काढले, तर त्यांची माहिती असणारांपैकी न गहिवरणारे माणूस त्या गावात सापडणार नाही.

आजीचे घर : आजीचे घर धाब्याचे, जमीन धुळीने भरलेली, न झाडावी तेच बरे. सोपा कोठे संपला व गोठा कोठे सुरू झाला हे तीन आठवडे राहिलो तरी समजले नाही. निजलो असताना रात्री म्हशीचे पारडू मुसकटीत शिरावयाचे किंवा आमच्या तंगड्या त्या वांझ म्हशीच्या शिंगात गुंतावयाच्या! आजीची चूल घर बांधल्यानंतर सारवली असेल तर गावच्या मारुतीची शपथ! खोलीत दोन मडकी, एक काथवट, व एक भला मोठा पाटा. तो सुद्धा कधी उभा करावयाचा नाही. मग धुवायची गोष्ट कशाला ! मीठ असेल तर लसूण नाही व दोनही असले तर मिरची नाही, हे रोजचे रडगाणे. तरी तिची तांबडी भगभगीत मिरच्यांची चटणी, घट्ट ताक आणि ताज्या शाळूच्या भाकरी हे जेवण आम्हाला परमाअमृतासारखे गोड लागे. वांग्याची भाजी तर सुखाची परमावधी! कृष्णातीरची वांगी प्रसिद्धच आहेत.

देवघर म्हणून जी एक खोली होती ती एक काळोखाचे पेवच होते. भर दोन प्रहरीही तिथे जाण्याची छाती होत नसे. भिंतीला व जमिनीला लोणा चढलेला. देव्हाऱ्यावर देव कोण होते, किती होते की मुळीच नव्हते, हे शोधायला धाडशी कोलंबसच आला पाहिजे. खिडकी तर नव्हतीच, एक साणे होते. ते जर उघडले तर वरून जो दोन प्रहरी प्रकाश पडे, त्यामुळे त्या गुहेला अधिकच भयानक स्वरूप येई. अशा देवघरातील देव होण्यापेक्षा बाहेरील मोकळ्या हवेतील गोठ्यातील म्हशीचे पारडू होणे बरे वाटे!

सावलीतील तुळस : माझ्या बाबांची आई जशी धार्मिक होती तशी आईची आई धार्मिक दिसत नव्हती. पण ती स्वतःच धर्माची मूर्ती होती. निराळा धर्म तिला कोठून येईल ? ती नावाप्रमाणे आतबाहेर शुभ्र यशाची गंगाच होती आणि तिच्या कुशीतून माझी आई यमुना निघालेली. गंगाबाईचा देव म्हणजे तिचा लंगडा नवरा. मराठ्यातला पडदानशीनपणा तिच्यात नव्हता. तरी पण ती उंबरठा ओलांडून कधी बाहेर जात नसे. खेड्यातील स्त्रिया शेतात खपतात, पाणी आणतात व अष्टौप्रहर उघड्यावर असतात. प्रत्यक्ष माझ्या बाबांची आई उघड्यात वाढलेली रानदांडगी बाई होती. पण गंगाबाई सावलीतील तुळस होती. कधी म्हणून शेजारणीकडे बोलायला गेली, अशी गोष्ट कशाला! हा जातिवंत मराठमोळा काही औरच होता. ज्या कुळकर्ण्यांचा घराचा आजाला आश्रय होता ते घराणे वैष्णव ब्राह्मणांचे असून मोठे धार्मिक होते. वैष्णव कर्मठ असावयाचेच, विधी, संस्कार, उपवास, व्रते, गाणी, न्हाणी, सौभाग्यलेणी इत्यादीची तिथे लयलूट होती. ह्या सर्वांचा जन्मजात संस्कार माझ्या आईच्या हाडाहाडात व रोमरोमांत शिरला होता. ती एखाद्या वैष्णव ब्राह्मणीप्रमाणे दिसत होती. पण माझी आजी अगदी साधी, तिच्यात रुढ धर्माचा कसलाही वरपंग नव्हता. इतकेच नव्हे तर तिच्यात धर्मभोळेपणाही नव्हता. मग कर्मठपणाचे तर नावच नको, हा प्राणीच काही विरळा होता. आळीतल्या स्त्रिया गंगाबाईचे नाव घेऊनच आपणास पवित्र मानीत होत्या. साध्या रोगावर माझी आजी काही साधे उपचार करी. कावीळ झाली असता ती नेमक्या ठिकाणी मनगटात बिबा घाली व त्यामुळे अचूक गुण येई. उसण भरली असता ती उतारा करी. वनस्पतीपेक्षा अशा वैद्यकीय श्रद्धेचाच जोर असावयाचा, हे सांगावयास नको. अशा अकृत्रिम पवित्र पतिव्रत्याला आकर्षून घेणारे आमचे आजोबाही तसेच पात्र आणि गरीब असूनही बाणेदार पती होते. नदीचे पाणी

४

माझे बाबा

[जन्म (अदमासे) १८३५ : मृत्यू २७ जून १९१०]

आजे बसवंतराव यांना दोनच अपत्ये. वडील मुलगा माझे बाबा रामजीबाबा आणि धाकटी बहीण, माझी आत्या (आम्ही तिला अक्का म्हणत असू) अंबाबाई. माझ्या बाबांचे रूप व स्वभाव बहुतेक माझ्या आजीचे वळवणावर गेले होते. शेतकऱ्यांचे पोर, निसर्गाचे मांडीवरच खेळून वाढलेले. लहानपणी ते खोडकर होते. तथापि पुढे कोणा एका शास्त्रीबुवांच्या जवळ ते लिहावयाला व हिशेब ठेवायला त्या वेळच्या मानाने फारच उत्तम प्रकारे शिकले. ह्याचे श्रेय आजोबाला, बाबांच्या तैलबुद्धीला किंवा त्या शास्त्रीबुवांच्या चांगुलपणाला द्यावे हे ठरविण्याला आता मार्ग नाही. कारकुनी शिक्षणात तर बाबांचा जमखंडीत नंबर पहिला होता! त्यांचे मोडी अक्षर म्हणजे मोत्याचे दाणे! माझ्या वेळेला बाबा तर मुलांना कित्ते घालून देत. जमाखर्चात जमखंडी दरबारात त्यांचा हात धरणारा कोणी नव्हता. मामुली शिक्षण संपल्यावर संस्थानात बिद्री नावाचा एक पेट्याचा गाव आहे. तेथे त्यांना प्रथम शिक्षकाची नोकरी लागली. त्या वेळी ब्राह्मणी संस्थानांत ह्या मराठ्याच्या मुलाला शिक्षकाची नोकरी मिळाली ही सामान्य गोष्ट नव्हती. ही शाळा सरकारीच असली पाहिजे. एरवी हा खाऊनपिऊन सुखी अशा मराठ्याचा एकुलता एक लाडका मुलगा, खासगी शाळा काढावयाला जमखंडी हा राजधानीचा गाव सोडून बिद्रीसारख्या पेठ्यात का गेला असता? ह्या सर्व गोष्टीत त्या शास्त्रीबुवांचे काही अंग आहे. त्या ब्राह्मणाचे लक्ष ओढून घेण्यासारखे काही विशेष पाणी बाबांत असले पाहिजे. हे पाणी आमच्या आजोबांकडून आले असावे. ते मजमध्ये किती आले, हे ठरविणे माझे काम नव्हे.

पांढरपेशी शिक्षण : नुसते कारकुनी शिक्षणच नव्हे, तर धर्मशास्त्र, ज्योतिषशास्त्र, वैद्यकशास्त्र वगैरे सांस्कृतिक विषयांची तांत्रिक माहिती बाबांना बरीच होती, हे मला समजू लागल्यापासून माझे नजरेस येऊ लागले. त्यांना संस्कृत येत नव्हते, तरी मराठीतील संस्कृत तत्सम शब्दांचे कठीण अर्थ त्यांना समजत असत. इतके त्यांचे प्राकृत पोथ्यांचे वाचन झाले होते. त्या काळच्या प्राकृत पौराणिक सर्व पोथ्यांचा व मूलस्तंभ पंचांगे वगैरे शास्त्रीय वाङ्मयाचाही संग्रह त्यांनी चांगला केला होता. ह्यावरून त्यांची वाङमयभक्ती दिसते. माझ्या लहानपणी एक शास्त्री पुराण सांगावयाला आमचे घरी नेहमी येत. ह्यावरून गुणी माणसांची संभावना करून खानदानी लौकिक राखण्याची बाबांची प्रवृत्ती चांगली दिसते. त्यांचा हात सढळ होता, किंबहुना ते बेहिशेबी मराठा होते असे म्हटले तरी चालेल. कारकुनी हिशेबात ते कोणालाही हार न जाणारे असता संसारातील काटकसरीने ते फार मागासलेले होते हे मोठे आश्चर्य! सर्व जातीतील संभावित माणसांचा त्यांना स्नेह व लळा होता.

तेही त्यांनी १५-१६ वर्षे मागितले नाहीत. पुढे आमच्या घरी आम्ही दारिद्र्याच्या भयंकर यातना सोशीत असताना ही तसलमात परत मागण्याच्या याद्या कितीदा तरी श्रीमंत आप्पासाहेबांकडे केलेल्या मी पाहिल्या ; पण कवडीही परत मिळाली नाही.

तरुणपणी बाबांच्या हातात चार पैसे खेळत, म्हणून त्यांनी प्रथम प्रथम ऐषआराम केला. पण त्यांचा धर्माकडे स्वाभाविक असलेला ओढा बळावला, विशेषत: पंढरपूरच्या वारकरी पंथाचा त्यांना फारच नाद लागला. प्रथमपासून त्यांचा स्वभाव प्रेमळ, श्रद्धाळू, उदार आणि करारी असे. त्यांच्या प्रामाणिकपणाचा किंबहुना सर्वच आमच्या घराण्याच्या प्रामाणिकपणाचा लौकिक जमखंडी संस्थानात गाजत होता.

बाबांची रसवंती : मी अगदी लहान असताना बाबांच्या मित्रांपेकी म्हातारबा सुतार, बसाप्पा अथणी (लिंगायत) आणि बापू जामदार (मराठे) हे वरचेवर घरी येत. नंतर मी थोडा मोठा झाल्यावर सटवप्पा सुतार आणि पांडाप्पा टर्की (ब्राह्मण वारकरी) हे येत असत. पण बाबा काही फारसे कोणाचे घरी जात नसत. आमच्या वाड्यात सोप्याच्या उजव्या बाजूस एक चारपाच फुट लांबरुंद, स्वच्छ व प्रशस्त चुनेगच्ची कट्टा असे. ह्याला आम्ही तुळशीकट्टा म्हणत असू. कारण पूर्वी येथे तुळशीवृंदावन होते. ह्या कट्ट्यावर बाबा मी आपला ते आपल्या मित्रांशी बोलत बसत. मी आपला तेथे घुटमळत असावयाचा. कारण बाबांचे संभाषण मला आवडत असे. मला वाटते माझे अंगी जर काही वक्तृत्व आले असेल तर त्याचे प्रथम बीजारोपण बाबांच्या अकृत्रिम, साध्या व जोमदार रसवंतीने केले असावे. रूपाने, रंगाने व स्वभावाने मी अगदी बाबांचे वळणावरचा आहे. असे मला लोक म्हणत असत.

जमखंडीस पंढरपूरचा भजनी संप्रदाय वाढविण्याच्या कामी बाबांचा पुढाकार होता. नरसप्पा नावाचे एक रजपूत गृहस्थ फार सात्विक होते. मी त्यांना कधी पाहिले नाही. ते जमखंडीस हा पंथ काढण्यात मुख्य होते. असे मी ऐकले होते.

विठोबाचा सप्ताह : आमचे घराजवळ ' आप्पासाहेबांची विहीर' म्हणून एक पिण्याच्या पाण्याची मोठी विस्तीर्ण व खोल विहीर आहे. तिचे काठी सटवाप्पा सुताराचे घर व सुतारीचा कारखाना आहे आणि त्याचे समोर रस्त्याच्या दुसऱ्या बाजूस विठोबाचा मठ आहे. फाल्गुन वद्य द्वितीयेपासून (ही श्री तुकारामबोवांची पुण्यतिथी) तो पुढच्या षष्ठीअखेर (ही श्री एकनाथस्वामींची पुण्यतिथी) पाच दिवस आणि त्यापूर्वी व नंतरचे दोन दिवस असा दरवर्षी त्या मठात भजनाचा मोठा सप्ताह साजरा केला जात असे, सात दिवस वीणा रात्रंदिवस खाली ठेवायचाच नसतो. दररोज काकड आरती, शेजारती सकाळ संध्याकाळ होई. त्या वेळी मोठी गर्दी जमे. ३०-४० नियमित टाळकरी लंबगोलात उभे राहात. मध्ये वीणेकरी उभे राहात. दोहो बाजूस या गोलाचे शेवटी दोन मृदुंग्ये उभे असत. आरतीचे वेळी भजनाच्या सोहळ्याला फार रंग येई. बीजेच्या व षष्ठीच्या आरतीचा थाट मोठा होई. कुरमुरे, नारळ व बत्तासे ह्यांनी भरलेली खिरापतीची ताटे ऐकणारे स्त्रीपुरुष आणीत. आरतीचे वेळी गुलाल उधळला जाई. बुका, उदकाड्या, कापूर यांचा घमघमाट सुटे. टाळकऱ्यात मुले उभी राहात. त्यात मी व माझा मोठा भाऊही असू. वीणेकरी हरीबा

५

माझी आई

[जन्म (अदमासे) १८४० : मृत्यू ८ फेब्रुवारी १९१०]

येथवर आठवणी लिहून कोणाचीच जन्माची किंवा मृत्यूची तिथी, महिना अगर निदान वर्ष तरी मी का लिहिले नाही याचे कारण मला माहीत नाही. माझ्या बाबांचा चौकसपणा, सुसंस्कृतपणा इतका होता की, त्यांनी आमच्या घरच्या पुरोहितांकडून घरच्या सर्व मुलांच्या जन्मपत्रिका ज्योतिष शास्त्रान्वये वर्तवून ठेविल्या आहेत. सुदैवाने तेवढ्या तरी आम्ही अद्यापि जपून ठेवल्या आहेत. मी मोठा झाल्यावर मला आपली जन्मभूमी बदलावी लागली. इतकेच नव्हे तर मी एवढी मोठी परीक्षा इतक्या मागल्या काळात पास होऊनही आपल्या संसारात लक्ष न घालता आजन्म दारिद्र्याचे व्रत घेतले. त्यामुळे व्यवहारात मी बाबांपेक्षाही अधिक नालायक व निष्काळजी ठरलो. बाबांनी कर्जाखाली खानदानी घालविली तर त्यांच्यापेक्षा सुशिक्षितपणाचा कांदा त्या मी ती कधीच मिळविली नाही, किंबहुना खानदानीने राहण्याला मी अपात्र ठरलो. तशात काही वर्षे मुंबईत व नंतर पुण्यात नेहमी बदलणाऱ्या भाड्याचे घरात राहावे लागल्यामुळे बाबांच्या पोथीपुस्तकांची व कागदपत्रांची मी अक्षम्य हयगय केली आणि दैवहत असा मी आता आठवणी लिहीत बसलो आहे! फार काय पण मी माझा स्वतःचा पत्रव्यवहारही जपून ठेवला नाही. ही चूक मला खेद देत आहे.

बाबांचे लग्न : माझी आई आलगूर या गावी जन्मली. ती आपल्या आईबापाची बहुतेक पहिलीच मुलगी असावी असे तिच्या बोलण्यावरून दिसते. नंतर काही मुलानंतर आता हयात असलेले आमचे मामा रामजीबाबा व शेवटची मुलगी आमची मावशी तानूबाई ही होय. आमच्या आईची पहिली मुलगी बाळाबाई हिचेपेक्षा माझा मामा रामजी हा लहान असावा असे दिसते. सोमा मुलगा अगदी लहान असताना आलगूरचे आजोबा एक वर्ष गुडघी रोगाने आजारी पडले. त्या आजारात चूल व मूल याची सर्व जबाबदारी माझ्या अगदी लहान असलेल्या आईवर पडली. आईचे लग्न ह्या आजारापूर्वी झाले की मागाहून झाले हे कळत नाही. आमच्या घरची स्थिती जर चांगली होती आणि माझे बाबा जर शिकलेले व हुशार होते तर माझ्या आजोबांनी अशा गरीब व लंगड्या मनुष्याशी सोयरीक का केली बरे ? यावरून वाटते की, माझ्या आईबाबांचे लग्न अगदी लहानपणी-म्हणजे माझ्या बाबांच्या शिक्षणापूर्वी झाले असेल. म्हणजे माझी आई सात वर्षाची व बाबा बारा वर्षाचे असतील. हा सर्व केवळ अजमासच आहे. या अजमासाला आणखी एक कारण आहे. माझे बाबा लहानपणी फार खोडकर असत. विशेषत: त्यांना झाडावर चढण्याचा नाद असे. माझ्या आजोबांचे मळ्यात एक मोठे केवड्याचे झाड होते. केवडा काढावयास जाऊन बाबा लहानपणी

सासुरवास : माझ्या आईच्या अंगी ही दैवी पात्रता येण्याला तीन प्रकारचे टाकीचे घाव तिला अगदी लहानपणापासून तो अगदी मरणाचे दारापर्यंत, जवळजवळ ७० वर्षे सोसावे लागले. प्रथम माहेरच्या दारिद्र्यामुळे आणि बाप लंगडा व आई कर्तृत्वहीन असल्यामुळे माझ्या आईचे झालेले हाल, दुसरे तिला परकीयांचे म्हणजे वैष्णव ब्राह्मणांचे लागलेले वळण आणि तिसरे तिला झालेला कठीण सासुरवास, तिसरा जो सासुरवास त्याच्या गोष्टी आईने आमच्या लहानपणी ज्या उठता-बसता सांगितल्या त्या ऐकून आमचे कोवळे हृदय करपत होते. आमच्या आजीचा-संताबाईचा-स्वभाव खाष्ट होता. ती फार क्रूर होती अशातला प्रकार नव्हता; पण अगदी हेकट, सहानुभूतिशुन्य आणि पक्षपाती होती. तिला दोनच मुले होती व त्यातल्या त्यात तिचे प्रेम तिच्या मुलीवर, अंबाबाईवर जास्त होते. गरिबीमुळे ही मुलगी आमच्या घरीच राहात असल्यामुळे सासूच्या कहरात नणंदेची भर पडत असे. त्यामुळे ती सुनेला मरेमरेतो राबवी.

आमचा रयतावा : आमचे घरी रयतावा मोठा होता. दावणीत औताचे आठ बैल तर असतच ; शिवाय गाई, म्हशी आणि वासरांचे खिल्लार असे. आजी रानात गड्यांच्या बरोबर सर्व काम स्वत: करी. तिचा भाऊ व्यंकप्पाही राबत असेच. माझ्या आईला मात्र शेतात जावे लागत नसे. पण घरकामाचा बोजा लहानपणापासून एकटीवरच पडे. नणंद होती तिचा उपयोग चहाड्या सांगण्यापुरताच. आजोबा, आजी, बाबा, नणंद, अंबाबाई, केव्हा केव्हा तिचा नवराही, व्यंकप्पा, त्याचा मुलगा शिद्दु, आम्ही दोन तीन मुले, अंबाबाईची मुलगी भागूबाई, दोन चार गडी माणसे व याशिवाय अतिथी, बैरागी, पाहुणे इतका हा नेहमीचा राब! सकाळी चार वाजल्यापासून दळणाची घरघर सात वाजेपर्यंत चाले. मग विहिरीतून पाणी आणणे, स्वयंपाक, भांडी, धुणे, जेवण होते न होते तोच सूत कातणे, मग इतक्या बैलांच्या शेणाच्या गोवऱ्या करणे. शिवाय रात्रीचा स्वयंपाक. श्रीमंत आप्पासाहेबांचे राहाणे जमखंडीहून १।। मैलावर डोंगरात रामतीर्थ नावाचे ठिकाणी असे. ते काम आटोपून यावायाला रात्री ११।१२ वाजत. तोपर्यंतही घरचे काम आटपत नसे. बाबा कामावरून लौकर येत नसत. पुन्हा भल्या सकाळी दळणाला उठावे लागत असे. बाबांचे आणि आजोबांचे वैभव असता तरुण सुनेला इतके काम का? तर त्या काळची साधी आणि कष्टाळू राहाणी आणि विशेषत: आजीचा हेकटपणा. आजोबांना हा सासुरवास आवडत नसे. पण नित्याची कटकट करणेही त्यांच्या सुखवस्तु स्वभावाला पटत नसे. नशीब आईचे !

हालअपेष्टा : आईला नुसता कामाचा भार नसे. तिला एकदा जी अगदी लहानपणी सासरी आणली होती ती माहेर ६ मैलावर असूनही २-४ वर्षात एकदाही तेथे पाठविण्याची मारामार पडू लागली. कारण माहेरची माणसे गरीब, आईचे बाळंतपण करण्यासही असमर्थ. घरात वस्त्रांलकारांची रेलचेल असूनही सुनेला ते घरात घालून तिचे कौतुक करण्याची सहृदयता आजीत नसे. इतकेच नव्हे तर आपल्या लाडक्या मुलीला तितकेच दागिने नाहीत म्हणून काही अंशी मत्सरही आड येत असावा. हिंदु सासुरवासाची नाजूक कारणे इतकी आहेत की, जुन्या वळणातील सर्व लोकांनासुद्धा त्यांची मीमांसा करता येत नसे. आमच्या बाबांचाही स्वभाव फार रागीट असे. मुले होऊ लागेपर्यंत एक प्रकारचा जाच व मुले होऊ लागल्यावर तो एक दुसराच भार. आमच्या आईला एकंदर वीस मुले झाली (एक खंडीभर अशी म्हण आहे.) त्यापैकी एकाच वेळी पाचाहून जास्त केव्हाच नव्हती.

स्वभाव शांत व सहनशील असल्याने आम्हा दोघांनाही तिच्या रागाचा धाक मुळीच वाटत नसे. पण बाबांचा, नुसता त्यांच्या नावाचाही आम्हास जबर धाक असे. ते घरी असेतोपर्यंत त्यांच्यासमोर उभे राहण्याचीही आम्हाला छाती होत नसे. ते बाहेर गेले की, ताबडतोब आमच्या धांगडधिंग्याला सुरुवात होई. माझा मोठा भाऊ माझ्या आईसारखा शांत व मवाळ होता. तो आमच्यात फारसा मिसळत नसे. धाकटी तान्याक्का थोडी मोठी झाल्यावर आमच्याबरोबर खेळावयास येई. पण ती फारच भोळसर असल्यामुळे आम्ही सांगू ते ते ती मुकाट्याने करी. माझा मोठा भाऊ इ. स. १८८५ साली पावसाळ्यात पटकीच्या रोगाने वारला. त्या वेळी गावात ही साथ बरीच होती. म्हणून जमखंडीच्या गावकऱ्यांनी मरीआईची मोठी यात्रा केली. त्या वेळी कित्येक रेडे, पुष्कळशी बकरी व कोंबड्यांची तर गणतीच नाही, इतक्या प्राण्यांचा वध झाला !

आमचा वाडा : इतकी मुले लहानपणी वारण्याचे कारण आमच्या वाड्याची आरोग्याच्या दृष्टीने परिस्थिती वाईट होती. आमचे घराचे पच्छिमेला लागून एक मोठे तळे होते. त्याच्या खालच्या सखल भागात आमचा वाडा असे. सांडपाणी जाण्याला कोठे वावच नव्हता. दक्षिणेलाही आमच्या घराचे मागे उंचवटाच होता. स्वयंपाकघरात एक न्हाणी होती व बाहेर सोप्याचे खाली मोठ्या दरवाजाला लागुनच एक दुसरी न्हाणी होती. पण दोनही न्हाण्यांचे सांडपाणी दोनचार हातावर जमिनीतच जिरत असे. अर्ध्या घरात अंधार, ओल व कोंदट हवा असे. मोठा मुख्य दरवाजा उत्तरेकडे तोंड करून होता व त्याच्या आत थोडे अंगण व थोडी पडवी होती. हवा आणि उजेड यावयाला काय ती एवढीच वाट होती. दक्षिणेच्या बाजूला तीन खिडक्या होत्या. त्या लहान होत्या व त्या बाजूला गावचे लोक शौचास बसत. म्हणून त्या आम्हाला झाकाव्या लागत. उजेडाला साणी राखली होती. त्यातून दोन प्रहरी ऊन पडे. पण हवा येणे शक्य नसे. आरोग्याचे दृष्टीने हे घर अतिशय वाईट असे. मोठ्या दाराच्या पुढे सुमारे एक एकराचे अंगण असे. त्यात उकिरडे, कडब्याच्या गंजी, गोवऱ्याचे हुडवे, शेणाचे ढिगारे असत. वायव्य कोनास एक पेवाचा पायखाना असे. त्याचा उपसाही वेळेवर होत नसे. एवढेच बरे होते की, आमच्या वाड्याच्या दक्षिण, पश्चिम व उत्तर बाजूने बऱ्याचं अंतरापर्यंत दुसऱ्या कोणाचेही घरे नसत. पश्चिमेच्या बाजूला तर मोठे विस्तीर्ण तळे (लक्कनकेरी नावाचे) आणि त्याच्या पश्चिमेस मोठा डोंगर होता. आमचा वाडा गावाच्या पश्चिम हद्दीवरचा शेवटचा होता. वाड्याबाहेर जरी मोकळी हवा मुबलक होती. तरी आतली स्थिती अपायकारक होती. बाळंतपणात बाळंतिणीचे खोलीतच एक खड्डा खणून त्यातच बाळंतिणीला १०-१२ दिवस न्हाऊ घालीत. अशा स्थितीत इतकी मुले लहानपणीच वारली हे आश्चर्य नसून आम्ही ५-७ जण कसे वाचलो हेच आश्चर्य होय !

आईच्या गोष्टी : दर दुसरे वर्षी आमच्या आईचे बाळंतपण हे ठरलेलेच असे आणि त्या वेळी मागले मूल काही जिवंत नसे. बाळंतपण, मुलांचा आजार किंवा मरण याखाली माझ्या आईची सर्व शक्ती खचली, तरी पण मुलांचा कंटाळा किंवा संसाराचा-तिटकारा-किंबहुना दु:खाचा किंवा निराशेचा एक उद्‌गारही कधी आईच्या तोंडातून आमच्या कानांवर आला नाही. उलट दारिद्र्याच्या असह्य वेदना, नवऱ्याचा रागीट स्वभाव व मुलांचा जोजार सोसूनही आम्हा लहानग्यांना नेहमी

मुले व आई हेच पंचायत आत्मसंतोषाचे दिव्य आगर होते. आमच्या भोवतालचे भंगुर वैभव कसे पार नाहीसे झाले याचे एकच हृदयद्रावक उदाहरण सांगतो. आमच्या राहात्या घरातील माया तर सर्व गेलीच; पण आमच्या बाहेरच्या विस्तीर्ण अंगणात चौफेर कुळवाडी होती. म्हणजे भोवताली खोल्यातून गरीब भाडोत्री कुटुंबे राहात असत. त्यांच्यापासून बाबा काही भाडे घेत असतील, असे मला वाटत नाही. कारण त्या वेळी घराला भाडे घेणे लाजीरवाणे गोष्ट समजत. हळूहळू ही सर्व कुळे परागंदा झाली. त्यांच्या धाबीवजा खोल्यांच्या दुरुस्तीचा त्राण आमच्यात उरला नाही. स्वत: आमच्या जळणाची पंचायत पडू लागली. मग काय विचारता! या पडक्या खोल्यांच्या मोठ्या तुळया व वासे आम्ही सोळा वर्षात सरपण करून जाळले. 'विठू वासे आण ' म्हणून आईने सांगण्याचा अवकाश, की एका हाताने शेंडी व दुसऱ्या हाताने लंगोटीचे शेपूट ओढीत मी वासे ओढावयाला धावलोच ! पांडवप्रतापांतील द्रौपदीवस्त्रहरणाचे चित्र मी पोथीतून पाहिलेच होते. दु:शासनाचा आविर्भाव आणून मी आमच्या जुन्या वाड्यातील अंगणाचे बाजूच्या धाब्याचे वासे ओढीत असे आणि मोठ्या फुशारकीने आईला जळण नेऊन देत असे.

करवीरची यात्रा : घराचे आणि संसाराचे काही होवो, बाबांच्या देवदेवतेमध्ये व भजनपूजनात काही खंड पडला नाही. आजी वारल्यावर दोनतीन वर्षांनी बाबांना दत्ताच्या उपासनेचा नाद लागला. घरी श्रीगुरुचरित्राच्या पोथींचे पारायण चाललेले. बाहेरची भाविक मंडळी ऐकावयास येत व बाब मोठ्या खड्या आवाजात पोथी वाचून अर्थ सांगत. जमखंडीत काण्णव आळीत एक दत्ताचे देऊळ आहे. तेथे बाबा सायंकाळी भजनाला जात. त्याच वेळी नरसोबाच्या वाडीची आणि कोल्हापूरच्या यात्रेची टूम निघाली. त्या वेळी आमच्या घरचे गाडीबैल, गडीमाणसे होती. बाबा, आई, आम्ही चार भावंडे, एखादे पाचवे तान्हे मूल, शिवाय चिऊबाई नावाची काण्णव आळीतील एक विधवा ब्राह्मणाची बाई (ही आमच्या घरची पुरोहित चंद्रभट डेंगरे यांची बहीण होती) व आमच्या तुकाराम नावाचा मराठा गडी इतकेजण आमच्या स्वत:च्या गाडीतून कोल्हापूरचे महालक्ष्मीचे यात्रेस निघाले. वाटेत अथणी, शेडबाळ, कागवाड, कुरुंदवाड, मिरज, सांगली, हातकणंगले वगैरे लहानमोठी गावे आम्ही पाहिली व नरसोबाच्या वाडीत श्रीदत्ताची यात्रा केली.

एका ब्राह्मणाची घरी उतरून आम्ही देवाचा नैवेद्य व ब्राह्मणभोजन केले. कोल्हापुरास गावाबाहेर पूर्वेकडे एकवेरीचे देऊळ आहे. त्याच्या ओवरीत आम्ही तीन दिवस उतरलो होतो. कोल्हापूरचे राजधानीचे वैभव, अंबाबाईचे भव्य देऊळ, त्याचे महाद्वार, कोल्हापुरातील पाण्याचे नळांना लावलेली सुंदर गायमुखे, रंकाळे व पदमाळे हे तलाव या साऱ्यांचा मनावर चांगला ठसा उमटला. एकवेरी देवळातील अंगणात एक मोठा विस्तीर्ण चबुतरा आहे. त्यावर खेळत असता तेथील एका मुलीशी भांडण होऊन माझी मारामारी झाली. "विठ्या, तू कोठे गेलास तरी तुझी आगळीक काही थांबत नाही ना रे!" असे म्हणून आईने मला त्या वेळी मारामारीतून सोडविले.

येथपर्यंत माझ्या पूर्वजांचा वृत्तान्त संपला. येथून पुढे माझ्या स्वत:च्या पिढीचा वृत्तान्त सुरू होत आहे.

●●●

६

आमची लग्ने

तीन लग्ने : माझा भाऊ, मी आणि माझी धाकटी बहीण ह्या तीन भावंडांची लग्ने एकाच वेळी जमखंडीत बाबांनी केली. बहुतकरून ही लग्ने कोल्हापूरच्या यात्रेनंतर इ. स. १८८२ च्या सुमारास मे महिन्यात (वैशाखात) झाली असावी. सालाची खात्री नाही. १८८२ हे साल नक्की असेल तर माझे वय त्या वेळी ९ वर्षाचे, भाऊचे १४ वर्षाचे आणि बहिणीचे ४ वर्षाचे होते. ही लग्ने करण्यात बाबांचा फार अव्यवहारीपणा व अविचार दिसतो. माझ्या भावाचे वय फार तर शोभण्यासारखे होते ; पण माझे वय व माझ्या बहिणीचे वय अगदीच अक्षम्य होते. वधूची पारख म्हणावी तर माझ्या भावाची वधू फार तर ५-६ वर्षांची होती. ती जमखंडीतील नातलगांची होती. माझी वधू माझ्या आत्या अंबाबाई हिची सर्वात धाकटी मुलगी, ही पुरी एक वर्षाची तरी होती की नव्हती ह्याची शंकाच आहे. आई तर म्हणत होती की, ती सहा महिन्यांची होती. लग्नाचे वेळी तिला नीट बसताहि येत नव्हते. तीन लग्ने एका वेळी करू नयेत अशी आमच्या आईची समजूत होती. पण तिचे कोण ऐकतो ? मला आपली मुलगी द्यावी असा माझ्या आत्येचा आग्रह होता. मी तिचा फार लाडका होतो. माझा वडील भाऊ १३-१४ वर्षांचा झाला म्हणून त्या वेळचे समजुतीप्रमाणे तो लग्नाला योग्य झाला होता. तशात आमच्या घरात बऱ्याच वर्षात लग्नकार्य होण्याचा प्रसंग आला नव्हता. त्या वेळी जरी आमच्या घराण्याला पूर्ण दारिद्र्य आले नव्हते, तरी कर्ज काढल्याशिवाय लग्न होणे शक्य नव्हते. लग्नाचे वेळी घरातील जे काही दागिने उरले होते, तेही पण गहाण ठेवणे शक्य नव्हते. म्हणून बाबांनी आमचा वाडा गहाण ठेवून प्रथम कर्ज काढले. ते चिंतोपंत भिडे ह्या नावाच्या त्यांच्या एका मित्राकडून अस्सल मुद्दल ५०० रुपयांचे होते. धान्य वगैरे घरचे असावे.

सालंकृत कन्यादान : ह्या तिन्ही लग्नाचा खर्च बाबांच्याच अंगावर पडला. कारण माझ्या भावाचा सासरा हा गरीबच होता. माझा सासरा रामजी माने हा दुष्काळात आमचेकडेच होता. तेव्हा ही दोन्ही लग्ने आमच्याच खर्चाने करावी लागली. माझ्या बहिणीचे सालंकृत कन्यादान केले. तिचे सासरचे घराणे आसंगीचे चांगले खाऊनपिऊन सुखी होते. तरी सर्व खर्च बाबांनी कर्ज काढून केला. यावरून आमचे बाबांचे जवळ जरी स्वत:ची फारसी माया उरली नव्हती. तरी त्यांची पत बरी होती म्हणावयाची. आसंगीचे व्याही गोपाळबाबा कामते नावाचे सभ्य गृहस्थ आणि समजूतदार रयत होते. पण वराला लिहितावाचता येत नव्हते. सुखवस्तु बापाचा तो एकुलता एक लाडका मुलगा होता. त्याचे वय माझ्याइतकेच म्हणजे ८-९ वर्षांचे होते. नाव कृष्णराव होते. गोपाळरावांची बायको द्वारकाबाई ही स्वभावाने खाष्ट व मत्सरी होती. या लग्नाचे वेळी माझे आईचे पायाला नारू होऊन ती फार आजारी होती. मुख्य वरमाई अशी आजारी, घर दुसरे कोणी कर्ते वडील माणूस

नाही. अशा वेळी ही लग्ने बाबांनी कर्ज काढून उभारली! ब्राह्मणाला दक्षिणा देऊन मुहूर्त व लग्नपत्रिका वर्तविली असेल. पण यापैकी एकही स्थळ माझ्या आईला मान्य नव्हते.

व्याह्यांचा धिंगाणा : लग्नसमारंभात आईची हेळसांड झाली. आमच्या बाहेरच्या विस्तीर्ण अंगणात मोठा मांडव घातला होता. अर्थात् याच मांडवात माझ्या बहिणीचे लग्न लोकरीतीप्रमाणे आमचे घरी झाले. पण माझ्या आत्येची घरची गरिबी फार म्हणून माझेही लग्न यात मांडवात झाले आणि तीन लग्ने एकाच मांडवात करून नयेत म्हणून माझ्या भावाचे लग्न मात्र त्याच्या सासऱ्याच्या घरी झाले. पण जेवणाखाण्याचा सर्व खर्च बाबांचा. खर्च आमचा पण देखरेखीला आमचेकडेचे कोणी नसल्यामुळे एकंदर लग्नसमारंभात चार दिवस एकसारखी अंदाधुंदी चालली होती. मी लहानपणी फार खेळकर होतो. हळदी लागल्यावर नवऱ्या मुलाने बाहेर जाऊ नये, असे असता मी लग्नाचे वेळी तळ्यावर खेळत होतो. तेथून मला धरून आणिले. माझ्या बायकोला तर पाळण्यातून आणून माझेच मांडीवर बसविले. ती माझी आतेबहीण असल्यामुळे पूर्वीपासून माझा तिचा लळा होताच. लाजावयाचे कसे ते आम्ही शिकावयाचे पुढेच होते. सर्व खर्च आम्ही करून व्याह्यांनी म्हणजे माझ्या व माझ्या भावाच्या सासऱ्यांनी बाबांना लग्नात फार त्रास दिला. वरपक्षाने हिणवावयाचे ते उलट वधूपक्षांचीच कारवाई फार चालली. शेवटी गावजेवणाचे दिवशी रात्री बारा वाजता पाने पडली. पण काही तरी भांडण काढून जेवावयाला आलेली बरीच मंडळी पानावरून अभद्रध्वनी काढीत निघून गेली. ही हकीकत माझी आई पुढे किती दिवस तरी सांगून आमची करमणूक करीत असे.

केळवण : आमची ही तिन्ही लग्ने सायंकाळी गोरज मुहूर्तावर झाली. लग्नसमारंभ ४-५ दिवस यथासांग झाला. हळदी, रुखवत, रासन्हाणी, अक्षता, लग्नानंतरचे नवरानवरीचे खेळ, नवऱ्याला बागेत नेणे वगैरे सर्व सोहळे झाले. लग्नात केळवणासाठी इतक्या घरी जेवणास जावे लागले की, मला फारच कंटाळा आला होता. सर्व ओळखीची माणसे एकाच दिवशी जेवणास बोलावणार. मग जेवण कसचे होते! नुसता भात किंवा शेवयाचे ताट पुढे ठेविले की त्यावरचा गूळ किंवा साखरेला थोडा हात लावला की झाले जेवण ! आणि प्रत्येक घरी वाजंत्री लावून जावयाचे असे, मी अगदी बेजारून गेलो.

आसंगीचे वऱ्हाड : याप्रमाणे हा लग्नाचा धांगडधिंगाणा संपल्यावर आम्ही सर्व माझ्या बहिणीच्या सासुरवाडीला म्हणजे आसंगी गावाला निघालो. हे खेडे जमखंडीच्या पश्चिमेस कुडची स्टेशनच्या वाटेवर ११ मैलावर आहे. सुमारे चार पाच गाड्यांच्या भरतीचे वऱ्हाड निघाले. आमचेबरोबर आमचे आलगुरचे मामा रामजीबाबा हे होते. फक्त बाबा आणि आई मात्र आली नाहीत. कारण कन्यादान केले असता कन्येच्या घरी आईबापांनी कन्येला मुले होईपर्यंत अन्नग्रहण करावयाचे नसते. आसंगीचे व्याह्याची शेती मोठी व घरही प्रशस्त होते. रात्रीच्या वेळी आम्ही गावात प्रवेश केला. आमची थाटाने वरात निघाली. दारूकाम वगैरे चांगला थाट झाला.

पेंढारधाड : आसंगीस नदी आहे. नदीवर व विहिरीत पोहणे, यथेच्छ जेवणे आणि रस्त्यातून धिंगाणा घालणे हाच काय तो आमचा कार्यक्रम होता. बरोबर आमचे आईबाबा नव्हते. मग व्याह्यांच्या घरी आम्हाला कोण दाबात ठेवणार? आमच्या धुडगुशीला ताळच उरला नाही.

७

वडील भावाचा मृत्यू

१८८५ साली मी १२ वर्षांचा झालो. माझा भाऊ १७-१८ वर्षांचा झाला होता. ह्या सालाच्या आरंभी माझी मराठी ५वी इयत्ता संपून मी इंग्रजी पहिल्या यत्तेत हायस्कुलात गेलो. एव्हापासून माझ्या आयुष्यातील एक नवीन टप्पा सुरू झाला. माझे बाळपण संपले आणि विद्यार्थीदशेला प्रारंभ झाला म्हणावयाचा.

नवीन टप्पा : मराठी शाळेत माझा गणित व भाषा वगैरे अभ्यास त्या वेळच्या शिक्षणाच्या मानाने बरा होता. मराठी शाळेचे हेडमास्तर विष्णुपंत गवंडे फार कडक होते. तरी माझी तरतरी पाहून ते मजवर प्रेम करीत असत. चौथ्या इयत्तेत अंताजीपंत पोंक्षे नावाचे मास्तर होते. तेही प्रेम करीत असत. त्यावेळी ब्राह्मणेतरांची मुले सरकारी शाळेत फारच कमी असत, त्यामुळे व मी हुषार म्हणून कोणीही माझे कौतुकच करीत. पण दुसऱ्या इयत्तेत असताना दत्तोपंत बेडेकर नावाचा एक मास्तर फार तिरसट असे. त्याने एके दिवशी मला अतिशय मारले, त्यामुळे मांडीतून रक्त येत असताना मी घरी आलो. हे पाहून माझे बाबा शाळेत गेले व त्यांनी त्या मारकट मास्तराचा खरपूस समाचार घेतला. त्यामुळे पुढे सगळ्याच मास्तरांवर दाब बसला. माझ्या वडील भावाची प्रगती मात्र शाळेत मुळीच होईना. बाबांनी त्याला नेहमी बोलण्याचे व मारण्याचे हे एक कारण होते.

इंग्रजी शाळेच्या अभ्यासात इंग्रजी शब्द पाठ करण्याचा व विशेषत: त्यांच्या स्पेलिंगचा मला भारी कंटाळा येई. इतका की त्यामुळे मला इंग्रजी शाळा नकोशी वाटू लागली. आबा म्हैसकर नावाचा एक ब्राह्मण मास्तर पहिल्या इयत्तेवर होता. तो स्पेलिंग नुसते पाठ करावयाला लावी. घरी किंवा शाळेत मला मदत करावयास कोणीच नव्हते.

ह्या वेळी आमच्या घरी एक अरिष्ट घडले. इ.स. १८८५ मध्ये जमखंडीत पटकीचा उपद्रव सुरू झाला आणि अगदी सुरूवातीलाच माझा तरुण भाऊ १-२ दिवसच आजारी पडून एकदम वारला. तो शांत व समजूतदार होता. म्हणून शेजाऱ्यांना व नातलगांना माझ्यापेक्षा तोच जास्त आवडत असे. बाबा त्याच्यावर राग करीत, म्हणून आईला तो अधिक आवडत असे. तो असा एकाएकी वारल्यामुळे आईला व बाबांना एकदम फारच मोठा धक्का बसला. आईने तर पुढे ५-६ वर्षे अतिशय शोक केला.

बंधु एकनाथ : माझा भाऊ वारल्यावर सुमारे पाच वर्षे आम्ही अत्यंत भयंकर दारिद्र्याचे हाल सोसले. इ स. १८८५ च्या डिसेंबर महिन्यात माझा धाकटा भाऊ एकनाथ हा जन्मला. ह्यापुढची, माझी धाकटी बहीण मुक्ताबाई हिच्या पाठीवरची मुले जन्मत:च फार अशक्त जन्मली.

तर भयंकर दारिद्र्य असे. माझ्या चिमुकल्या स्कॉलरशिपचीच घरी मोठी मदत होत असे. त्या वेळी जमखंडीत मोठी स्वस्ताई असे. एक रुपयाला १६ पायल्या धान्य झालेले मला आठवते. मग माझ्या चिमुकल्या स्कॉलरशिपकडे माझ्या आईचे डोळे लागून राहात. ह्यात नवल काय! इतकी जरी स्वस्ताई होती, तरी आमचे घरी उत्पन्न नसल्याने आई आम्हा चार मुलांचे, बाबांचे व आपले प्राण कसे राखीत असे ते आईला किंवा देवालाच ठावे! अर्थात तिला बाजारातले वाईट व स्वस्त धान्य व तसलाच भाजीपाला आणावा लागे. पुष्कळ वेळा पेवात बरेच दिवस ठेवूल बिघडलेले जोंधळे बाजारात विकावयास येत. ते फार स्वस्त म्हणून आई नेमके तेच आणी, त्याचा वास वाईट येई, पण आम्ही मुले त्याच्याच भाकरी गोड करून खात असू. कारण गोडी धान्यात नसून आमच्या आईच्या हातात असे. असल्या दाण्यांची भाकरी, तसल्याच तुरीच्या डाळीचे वरण व तांबड्या मिरच्यांची चटणी हे तीन पदार्थ आम्हाला बासुंदीपुरीसारखे गोड लागत. आमचे लक्ष अन्नाकडे जाऊ नये, म्हणून आई आपल्या माहेरच्या लहानपणाच्या व सासरच्या करुणास्पद कहाण्या सांगत असे. त्या आमच्या काळजात इतक्या खोल जात की, आमचे जेवण आटपून आमचे हात वाळले तरी आम्हाला भान राहात नसे.

पुष्कळ वेळा हे कदान्नही आम्हाला पुरेसे मिळत नसे. वालूबाई नावाची एक कुणबीण पूर्वी आमची स्थिती बरी असताना आमचे घरी कामाला होती. पुढे आम्हाला अशी भयंकर स्थिती प्राप्त झाल्यावर त्या प्रामाणिक बाईला आम्हा बाळांचा कळवळा येऊन, कोठले तरी फार दिवसांचे शिळे तुकडे आणून तिने हळूच झाकून आईला आणून द्यावे. मग आईने ते ताकात अगर वरणात अगर दोन्ही नसल्यास नुसते पाण्यात भिजवून आमचेसाठी ठेवावे. आम्ही सर्व मुले शाळेतून भूक, भूक करीत आल्यावर तेच पक्वान्न खावे आणि पुढे किती तरी वेळ नुसती बोटेच चाटीत बसावे, आमचा हा अल्पसंतोषीपणा पाहून आईने आम्हाला न कळत आसवे गाळावी आणि अशा आनंदात आपली भूक विसरावी!

तुकारामाचा संसार : इतके झाले, तरी आईने कधी कोणाची मजुरी केली नाही, की कोणाचे दारी चिमूटभर मीठ मागण्यासाठी उभी राहिली नाही. तिच्या आईप्रमाणे तीही उंबरठ्याच्या आतच राही. बाजारहाट, हिशेब वगैरे सर्व आईलाच करावे लागे. वाणी, माळणी, तेलणी, गवळणी आईची कदर ओळखून असत. त्या सढळ हाताने माप देत व पैशाची कधीही जिकीर करीत नसत. एकंदरीत आमचा संसार अगदी तुकारामबोवाच्या वळणावर चालला होता. फरक इतकाच की, तुकारामाच्या मुलांना मराठी तरी लिहिता येत होते की नाही शंका आहे. पण मी मात्र हायस्कूलमध्ये पहिला नंबर होतो. इतकेच नव्हे तर माझ्या बहिणीही मुलींच्या शाळेत लिहिणे, वाचणे, कशिदा काढणे वगैरे शिकत होत्या. दारिद्र्याने पाठ पुरविली, तरी आमच्या घराण्याचा रुबाब काही कमी झाला नाही किंवा चालत असलेल्या धार्मिक व सामाजिक परंपरेत खंड पडला नाही. एकादशी, शिवरात्री, हरतालिका, गौरी-गणपती, रानसठवाई या क्षुद्र देवतांचीही समजूत माझे आई व बाबा करावयास कधीच चुकले नाहीत. मग नवरात्रात समारंभ चुकत नसत हे सांगावयास नको. या समारंभात आमच्या घरचा पुरोहित तम्मणभट्ट डेंगरे, निदान त्याच्या घरचा कोणी लहान मुलगा

८

खडतर पाच वर्षे

(१८८५-१८९०)

स्वभावदोष : येथपर्यंत घरातील दारिद्र्याच्या मी ज्या आठवणी दिल्या त्या केवळ माझ्या बाबांच्या व विशेषत: आईच्या स्वभावाचे वर्णन करण्यासाठी दिल्या. त्यांच्या स्वभावातील दोष दाखविण्यासाठी नव्हे. ह्या दारिद्र्याचे कारण माझ्या बाबांचा आळशी स्वभाव असेल, पण कोणत्याही प्रकारची कोणाची फसवणूक किंवा अप्रामाणिकपणामुळे त्यांच्या उत्पन्नामध्ये आलेला तोटा हे नव्हते. आता ह्यापुढेही काही आठवणी द्यावयाच्या. त्यात बाबांच्या स्वभावातील काही दोष दिसतील. पण ते त्यांचे दोष नसून-निदान दोष दाखविण्याचा माझा हेतु मुळीच नसून-माझ्या आईच्या स्वभावातला दैवी चांगुलपणा दाखविण्यासाठीच केवळ त्या आठवणी मी देत आहे. माझ्या आईच्या सहिष्णूतेची पारख करण्याकरिता व आम्हा मुलांच्या भावी शिक्षणाकरिता देवाने आम्हाला दारिद्र्य हा मित्र दिला. त्याबद्दल आम्ही त्यांचे आभारी आहोत. पण त्याही पुढे आम्हा मुलांची नसली तरी आमच्या आईची पारख करण्याकरिता आम्हावर जे दुर्धर संकट आले, त्याबद्दल काय म्हणावे हे समजत नाही. ते संकट म्हणजे माझ्या बाबांना नशा करण्याचे व्यसन लागले हे होय! बाबांना प्रथम गांजा ओढण्याचे व नंतर काही दिवसांनी दारू पिण्याचे व्यसन लागले!

संस्थानी नोकरी : बाबा त्यांचे लहानपणापासून सुखात व लाडात वाढलेले, पैशाचा लोभ त्यांच्यामध्ये मुळीच नव्हता, लोभाचा इतका अभाव की त्यामुळे त्यांना पैशाची योग्य किंमतही कळत नव्हती, असे म्हटले तरी चालेल, त्यांचे शिक्षण बैठे आणि पांढरपेशी होते. ही स्थिती त्यांचे अर्धे वय म्हणजे जवळजवळ ते चाळीस वर्षांचे होईपर्यंत चालून मग त्यांना दारिद्र्य आल्यान पुढे त्यांच्या स्वभावात व धंद्यात फरक पडणे कठीण झाले. जमखंडीचे यजमानांशी ते भांडून आपण होऊनच घरी बसले होते व त्यावर यजमानांनी दोनतीनदा बोलाविले तरी ते गेले नाहीत. मला समजू लागल्यावर ते म्हणत असलेले मला आठवते की, आपण कोणता धंदा नोकरीशिवाय केला नाही व आता नोकरीही जमखंडीच्या यजमानांशिवाय दुसरीकडे करावयाची नाही आणि हा आग्रह-मग तो बरा असो की वाईट असो-त्यांनी सोळा वर्षे चालविला. माझ्या जन्माचे सुमारास म्हणजे इ. सन १८७३ चे सुमारास त्यांनी नोकरी सोडली. पुढे सोळा वर्षांनी त्यांचा हा करारी आग्रह पाहून यजमान श्रीमंत आप्पासाहेबांनी आपणच इ. सन १८९० चे सुमारास त्यांना स्टोअरकीपरचे (हिशेबी) विश्वासचे काम दिले. पण दरमहा पगार दहा रुपये होता. १६ वर्षे घरी अभिमानाने बसलेल्या नोकराला पुन्हा बोलावल्याबद्दल आप्पासाहेबांचे आभार मानायचे की इतक्या जुन्या अनुभवी

संबंध जडला. हा इ. सन १८८९ साली जडला असावा. इ. सन १८९० मध्ये बाबांना नोकरी लागली. हे स्वामी उघड उघड अभेद-मार्गी असत, म्हणजे जातिभेद पाळीत नसत. ते कोणाची पर्वा करीत नसत व निःस्पृह आणि धुंद असत. ते दारू पीत व मांस खात. तुळजापूरची देवी आमची कुळदेवता. तिला मांसाचा नैवेद्य जरूर लागतो. तुळजापूरचे भोपे भाऊराव कदम आमचेकडे भिक्षेला आले की हा नैवेद्य होत असे. शिवाय एक रामदासी ब्राह्मण संन्यासी येत. ते तर दारू व मांस दोन्हीही घेत. अशा अनेकांच्या संगतीत बाबांना दारूचीही चटक लागली व मांसाचा प्रघात आमचे घरात पडला असावा. तरी पण आमच्या दारिद्र्यामुळे त्यांचे हे व्यसन अनावर होऊ शकले नाही, हे आमच्या दारिद्र्यमित्राचे आम्हावर मोठे उपकराच!

स्वभावातील पालट : प्रथम प्रथम बबलादीच्या सिद्धावर माझीही चांगली श्रद्धा होती. ते घरी आले की, त्यांची पूजा आमचे घरी होत असे, चहूकडून सर्व जातीचे भक्त येत. स्वामी तुळशी-कट्ट्यावर बसत व आम्ही ताटात कापूर ठेवून आरती म्हणत ओवाळावयाचे व त्यांच्या पायावर फुले घालावयाची हीच काय ती त्यांची साधी पूजा होती. आरती झाल्यावर भक्त लोक दारूच्या बाटल्या त्यांचेपुढे ठेवीत आणि आशीर्वाद मागत. ती दारू सर्वजण पीत, त्यात मोठा वाटा ह्या सिद्धाचा असे. दारुच्या निशेत सिद्धाच्या तोंडून जी भविष्यवाक्ये निघत ती खरी होत, अशी भक्तांची समजूत असे. ही आरती करीत असताना मीच ताट ओवाळीत असे व कानडीतील त्यांच्या संप्रदायाच्या आरत्या व इतरही चांगली पदे मी नीट चालीवर म्हणत असे. शाळेतला माझा चांगला अभ्यास. माझी श्रद्धा व निर्व्याज वर्तन वगैरेमुळे मीही त्या सर्व साधूंना आवडत असे. पण पुढे माझी इंग्रजी हायस्कुलातील मॅट्रिकची परीक्षा पास होऊन मी कॉलेजात जाऊन पुणे-मुंबईकडचे मला नवे वळण लागल्यावर त्या प्रांती लोकांत सिद्धांपेक्षा माझीच प्रसिद्धी होऊ लागली. तेव्हा मात्र ही सिद्धमंडळी मला पाहून चपापू लागली. मी मोठा विद्वान होईन, हे त्यांच्या तोंडचे कानडी भविष्य मी कित्येक वेळा प्रत्यक्ष ऐकले होते. मॅट्रिक क्लासमध्ये असतानाच मला या सिद्धांच्या लीला आवडेनाशा झाल्या होत्या. बाबांवरही माझ्या सर्व वर्तनाचा दाब बसून हे बंड आमच्या घरातून अजिबात बंद झाले. इतकेच नव्हे तर पुढे नोकरी लागल्यावर बाबांच्या भांबावलेल्या मनाला काही व्यापार मिळाल्यामुळे म्हणा किंवा माझ्यामुळे म्हणा त्यांची नशाबाजी अगदी बंद झाली! इ. सन १८९१ चे डिसेंबरात माझी मॅट्रिकची परीक्षा झाली आणि माझ्यातच नव्हे तर माझ्या घराण्यातही मोठाच पालट झाला!

●●●

९

बालपण

जन्म : आता माझ्यासंबंधीच्या आठवणीकडे वळतो. मी इ. स. १८७३ एप्रिल ता. २३ (शके १७९५ चैत्र वद्य एकादशी) बुधवारी दोन प्रहरी ११ वाजता जन्मलो. बाबांनी माझी जन्मपत्रिका इतर सर्व मुलांप्रमाणे रीतसर ज्योतिषाकडून वर्तवून ठेविली आहे. त्या जन्मपत्रिकेची भाषा अर्धवट संस्कृत व अर्धवट मराठी, पण दोन्ही अशुद्ध त्यामुळे ह्या ज्योतिषीबुवांचे भाषेचेच नव्हे तर ज्योतिषाचेही ज्ञान तुटपुंजेच दिसते. त्यात मी अमुक होईन, तमुक होईन, म्हणून ज्या माझ्या भावी गुणांची लांब माळ ओविली आहे, ती वाचून अद्यापि मला मौज वाटते. अर्थात् हे भविष्य अशा काही साधारण मोघम भाषेत आहे की, गोळाबेरजेत ते कोणालाही लागू पडावे. लहानपणी मला वाचायला व लिहायला आल्यावर माझ्या पत्रिकेतील मी मोठा विद्वान व लोकप्रिय होणार हे भविष्य वाचून मला मोठी फुशारकी वाटे. अगदी बालपणी माझ्या अंगात बाळसे चांगले असे. आता जरी मी काळा आहे, तरी बांध्याने व चेहऱ्याने मी लहान वयात फार आकर्षक होतो, असे आई मला सांगे. माझा वडील भाऊ मजपेक्षा रंगाने उजळ, रूपाने जास्त चांगला आणि स्वभावाने शांत होता. तरी माझ्या बाळशाची व तरतरीपणाची छाप पाहणारावर माझ्या इतर भावंडांपेक्षा अधिक बसे. दादाभाई डॉक्टर नावाचा कोणी एक दरबारचा पारशी नोकर बाबांच्या परिचयाचा होता. तो पारशी तर मजवर फार लुब्ध होता. रस्त्यात कोठेही भेटला तरी जवळ येऊन तो माझे बरेचसे मुके घेऊन मला बेजार करी, असे आई मला सांगत असे.

एक आपत्ती : तेव्हा मी फार तर सव्वा-दीड वर्षाचा असेन, माझे कानात सोन्याचे सुंदर झुबे घातले होते. त्याच्या भोवताली लहान मोत्ये लावली होती. हा दागिना साधाच, परंतु मला फार शोभे. तो घालताना कान टोचावा लागला. त्यात काही तरी कमीजास्त होऊन माझे कानाला जखम झाली. डावा कान सुजून त्यात पू झाला. आजीला वाटले की, मला कोणाची तरी दृष्ट झाली. योग्य उपाय न होता दृष्टीबद्दल बऱ्याच वस्तु ओवाळून टाकण्यात आल्या. शेवटी कानाचा लोंबता भाग कुजून तुटलेसा झाला. एके दिवशी मला न्हाऊ घालीत असताना तो भाग तुटून झुब्यासह खाली पडला. मग काय विचारता! आजी, आई आणि आत्या ह्यांनी आकांत मांडला, तेव्हा आजोबा जिवंत होते. हा प्रसंग आठवण्याइतका मी मोठा झालो नव्हतो.

पहिला लळा : तिसऱ्या वर्षापासून मी थोडे थोडे बोबडे बोलू लागलो असेन. अगदी पहिल्या पानावर लिहिलेली माझी आठवण तिसऱ्या वर्षातली असावी. मला पहिला लळा आजीचा, बाबांचा किंवा आईचा नसून माझ्या आजोबांचा बसवंतरावांचाच होता. हिंदू घरात असे होणे

साहजिक होते. नवरा-बायको तरुण असतात. मुलाचा आजा-आजी असेतोपर्यंत त्यांच्यासमोर आपल्या मुलांचे कौतुक आपणच करण्यास त्यांना लाज वाटते. घरकामामुळे त्यांना फुरसतही मिळत नसते. आजा-आजी म्हातारी असतात. त्यांना काम नसते. मुलांचा मोह त्यांनाच जास्त असतो.

धाडशी तांडेल : आजी कष्टाळू व कडक असल्याने मी नेहमी आजोबांच्याच भोवती असे. त्यामुळे माझ्या मनावरचे अगदी पहिले ठसे आजोबांनीच उठविले. मला अद्यापि चांगले आठवते. आमच्या घराच्या सोप्यात माझा पाळणा बांधलेला असे. मला त्यात बसवून नेहमीप्रमाणे तो आडवा न हलविता उभा हालवीत. असा पाळणा हालू लागला म्हणजे मी नावेत बसल्याप्रमाणे खालवर हेलकावे खाई. अशा हालणाऱ्या पाळण्याला मी नावच म्हणत असे. आजोबा आपल्या ठरलेल्या जागी सोप्यात बसून माझे लाड पुरविण्यासाठी पाळणा उभा हालवीत. पाळणा जोरात हलू लागला म्हणजे मोठ्या धाडसी तांडेलाप्रमाणे मी स्वत:ला मोठा धन्य मानीत असे. भावी इर्षेचे हे पहिले धडेच नव्हेत काय ? आजोबा त्या वेळी वार्धक्यमुळे आंधळे होते. माझ्या तोंडावरची विजयशाली नावाड्याची विजयश्री जरी त्यांच्या चर्मचक्षूंना दिसत नव्हती, तरी ती कल्पनाचक्षूने निरखून ते मला उत्तेजन देत. त्या वेळी ते एक बालगीत म्हणत, त्याचे ध्रुवपद हे असे- " माझे पकुले कसे खेळते! माझे छकुले कसे खेळते!" ते ऐकून मला धन्यता वाटे!

सवयीचा परिणाम : माझ्या बाबांचे नाव रामजी, आजोबा व आजी त्यांना 'रामा' अशी हाक मारीत. तीऐकून मीही बाबांना 'रामा' व आईला 'यमुना' अशा नावानीच बोलावीत असे. कौतुकामुळे काही दिवस वडील मंडळीनी तिकडे लक्ष दिले नाही. मी तीनचार वर्षांचा झालो तरी अशीचच नावे घेऊ लागलो. आजोबांनी मला बाबा व आई अशा हाका मारण्यास सांगावे, पण तसे म्हणण्यास मला मोठी लाज वाटत असे! एक दिवस दाराआड उभा राहून मी 'बाबा' अशी हाक मारली व लाजून आत पळून गेलो. सर्वत्र हशा पिकला. तेव्हा तर मला या नवीन नावाची जास्तच लाज वाटायला लागली. माझ्या बाबांना व आईलाही आपल्या वडिलांसमोर ह्या नावांनी हाका मारून घेण्याचे आवडेना! हा सवयीचा परिणाम!

१८७७ चा दुष्काळ : मी चार वर्षांचा झालो त्या वेळी, म्हणजे इ. स. १८७७ साली दक्षिणेत भयंकर दुष्काळ पडला होता. तेव्हा चार शेरांची धारण होती असे म्हणतात. पण त्या वेळी आमच्या घरात आबादीआबाद होती. आमच्या मळ्यात मक्याचे पीक फार माजले होते. मक्यची कणसे आमचे घरात रचावयास जागा पुरेना. ही कणसे शिजवून खाणे आम्हाला आवडत असे. कणसे खाऊन आम्ही भुरकुंडे बाहेर फेकून देत असू. ती पटकन् उचलून भिकारी लोक फोडून त्यांचा कोंडा खात. एकदा तर हा कोंडा न पचल्यामुळे एक भिकारी ओकला आणि त्याचा ओकच दुसऱ्या भिकाऱ्याने आधाशीपणाने खाल्ला. हे मी स्वत: डोळ्यांनी पाहिले. पण मी इतका लहान होतो की, दुष्काळ म्हणजे काय याची मला कल्पना नव्हती. आम्ही कणसे अर्धवट खाऊन टाकीत असू. म्हणून दारी भिकाऱ्यांची गर्दी जमे. पण त्यात करुणेपेक्षा कौतुकच जास्त असे.

चोरटे दान : आमचे आजोबा एका ठोकळ्यात एक शेरभर दाणे घालून कट्ट्यावर आलेल्या भिकाऱ्याला एकेक मूठ भिक्षा घालण्यासाठी सकाळी बसत असत. त्यांना नीट दिसत

१०

माझे प्राथमिक शिक्षण

धूळपाटी : मी ५ किंवा ६ वर्षाचा झालो असता माझे आजोबा बसवंतराव वारले. तेव्हापासून ११ वर्षांचा होईपर्यंतची, म्हणजे इ.स. १८७९ पासून १८८४ पर्यंतची ५ वर्षे ही माझ्या प्राथमिक शिक्षणाची होती. मला प्रथम एक गावठी शाळेत घालण्यात आले होते. हल्ली जमखंडीत ज्या घरात रा. सदाशिवराव पेंडसे वकील राहात आहेत, तेथे ही खाजगी शाळा होती. पंतोजींचे नाव हरिपंत फडके किंवा असेच काहीसे होते. ह्या शाळेत फक्त लिहिणे लिहिणे, वाचणे, मोडी अक्षर वळविणे, हस्तलिखिते वाचणे, हिशोब करणे वगैरे केवळ व्यावहारिक साधे विषय होते. त्या वेळी संस्थानात सरकारी शाळा होत्या की नव्हत्या हे माहीत नाही. असल्याच तर मला या गावठी शाळेत का ठेवले ते कळत नाही. निदान इंग्रजी शाळा तरी त्या पूर्वकाळी नसावी. शाळा खात्याची घटना त्या वेळी नुकतीच चाललली असावी. या गावठी शाळेत मी प्रथम माझी धुळाक्षरे कशी शिकलो ते आठवते. एक लाकडी फळी सुमारे दीड हात लांब व एक वीत रुंद असे. तिला आम्ही पाटी म्हणत असू. वेळूची एक बारीक लेखणी असे. तिने या पसरलेल्या धुळीत आम्ही धुळाक्षरे कोरीत असू. म्हणूनच मुळाक्षरांना धुळाक्षरे हे नाव पडले आहे. ह्या वेळी दगडी स्लेटींचा प्रचार जमखंडीस दिसत नव्हता. मला शाळेत घालण्याचा मुहूर्तसमारंभ झाला. चैत्री पाडवा, दसरा, पंचमी आणि अक्षय्यतृतीया हे साडेतीन शुभमुहूर्त गणले जातात. कोणत्याही गोष्टीस सुरूवात करावयाची ती ह्या मुहूर्तावर करतात. रा. बाळा काणे या नावाचा एक ब्राह्मण खाजगी शिक्षकाचा धंदा करीत असे. माझ्या वडिलांनी त्याला घरी बोलावून आणून माझ्या शिक्षणाच्या आरंभाचा एक लहानसा विधी करविला. सोप्यात दोन पाट मांडून मला व काणेमास्तरांना समोरासमोर बसवून मध्यंतरी ही धूळपाटी ठेवून तिची पूजा करण्यात आली. नंतर शिक्षकांनी माझा हात धरून पहिला धडा **'श्रीगणेशाय नमः'** माझ्याकडून गिरविला. माझ्या वडील भावाचा हा विधी मला आठवत नाही. माझ्या पाठीवर ८-१० मुले जरी झाली तरी ती बाळपणीच वारली. जनाक्का व तान्याक्का ह्या मुली होत्या व एकनाथ हा शाळेत जाण्याइतका मोठा होईपर्यंत युगांतरच झाले होते. म्हणून हा विधी पुन्हा कधी आमचे घरी झाला नाही.

मौजीबंधन : बाबांना धार्मिक विधी-समारंभाची श्रद्धा होती व आपल्या घरी पुरोहितास आणवून सर्व संस्कार यथासांग करावेत, असे त्यांना पूर्वीपासून वळण लागलेले होते. आमची लग्ने होण्यापूर्वी माझ्या भावाची व माझी विधीपूर्वक मुंज करण्यात आली. ह्यावरून आमचे घराणे क्षत्रिय होते, अशी भावना आमच्या बाबांमध्ये विशेष होती असे दिसते. वरील दोन्ही उपनयनसमारंभाच्या वेळी आजोबा जिवंत नव्हते. मुंजीच्या वेळी आजीही जिवंत नसावी. आमचे लग्नानंतरही एकदोनदा

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, समग्र वाङ्मय, खंड -२ रा ~~~

११

माझा हायस्कूलचा काळ

(१८८५-१८९१ अखेर)

ही सात वर्षे माझ्या आयुष्यातील महत्त्वाची होती. इ. स. १८८५ च्या पावसाळ्याचे आरंभी माझा वडील भाऊ वारल्यामुळे माझ्या भावंडात मीच वडील झालो आणि माझ्या स्वभावात एकदम विलक्षण फरक पडला! बाळपणाचा हूडपणा कमी होऊन मी गंभीर, विचारी व अभ्यासी बनलो. आईबाबांचा शोक, घरची झपाट्याने खालावत चाललेली सांपत्तिक स्थिती, माझ्या आईला वरचेवर झालेल्या मुलांचे बाळंतपणातले मृत्यू आणि बाबांचा हताश उदासीनपणा ह्यांचा परिणाम मजवर दिवसेंदिवस अधिकाधिक घडत चालला. ह्यावेळी मला ११ वे वर्ष संपून १२ वे नुकतेच लागले होते.

शिक्षकवर्ग : जमखंडी हा लहान संस्थांनी गाव. त्या वेळी संस्थानचे उत्पन्न ४-५ लाखांचे असावे. शहराची वस्ती १५ हजारांची. शाळा खात्याची स्थापना नुकतीच झाली असावी. अशा ठिकाणचे हायस्कूल कोणत्या दर्जाचे असावे ह्याची कल्पना सहज होते. मी हायस्कूलात गेलो तेव्हा ते हायस्कूल झाले नव्हते. फार तर पाच इयत्ता असतील. रा. त्रिंबकराव खांडेकर ह्यांना पुण्याहून हेडमास्तरचे जागेवर आणिले होते. त्यांची स्वतःची मॅट्रिकची तरी परीक्षा झाली असेल की नाही हे मला माहीत नाही. पण त्यांचा स्वभाव सुशील, नीतिमान्, नेमस्त, गंभीर आणि करारी होता. नवीन इंग्रजी शिकलेल्यांचा उथळपणा त्यांच्यात मुळीच नव्हता. जमखंडी गावात व दरबारात त्यांच्या ह्या स्वभावामुळे लोक व स्वतः यजमानही वचकून होते. असिस्टंट शिक्षकात विशेष कोणी म्हणण्यासारखे शिकलेले किंवा फारसे बुद्धिमान नव्हते. मी पाचव्या इयत्तेत गेल्यावर शाळेचा दर्जा वाढून त्याच वर्षी वरील वर्गातील बाहेरील पदवीधारक शिक्षक आणावे लागले. मी सहाव्या इयत्तेत गेल्यावर जमखंडीच्या शाळेतून मुले प्रथमच मॅट्रिकच्या परीक्षेस पाठविण्यात आली. तिसऱ्या वर्षी आम्हा चौघांना जमखंडी हायस्कुलातून पाठविण्यात आले. त्याच सुमारास आमच्या शाळेला हायस्कूलचा दर्जा प्राप्त झाला. सहाव्या इयत्तेत रा. वासुदेवराव चिरमुले, बी. ए. हे पहिले पदवीधर नवीन नेमण्यात आले. रसायनशास्त्राच्या प्रयोगांचेही काही सामान शाळेला मिळाले. एकंदरीत आताप्रमाणे त्या वेळी तशा मागासलेल्या प्रांतात इंग्रजी शिक्षणाचा दर्जा असावा तसा नव्हता. आगगाडी (सदर्न मराठा रेल्वे) मी पाचव्या इयत्तेत जाईपर्यंत झाली नसावी.

विषयांची गोडी : पहिल्या वर्षी इंग्रजी हा विषय मला नवा असल्यामुळे व शिक्षक चांगला सहानुभूतीचा नसल्यामुळे मला ते वर्ष फार जड गेले. पण दुसऱ्या वर्षापासून मला इंग्रजी भाषेची व शाळेतील इतर सर्व सर्वसामान्य विषयांची गोडी लागली. तेव्हापासून शिक्षक जरी विद्वान् नव्हते

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, समग्र वाङ्मय, खंड -२ रा ~~~

गोठ्यात गाईचे शेण काढीत असताना तोंडात तंबाकूचा बार भरून त्याच्या मधून मधून पिचका-या मारीत कधी कधी इकडे तिकडे फिरत आम्हाला रघुवंशातील श्लोक सांगत. बाणाची कादंबरी त्यांनी आम्हाला अशी शिकवली की, ती त्यांची हसत मुद्रा, सूक्ष्म विनोद, प्रेमळ बोल मला अद्यापि आठवतात. अच्छोद सरोवरावरील शिवालयातील महाश्वेतेच्या संगीत भजनासारख्या देखाव्याचे वर्णन करण्याची पाळी आली की, गणेशशास्त्र्यांच्या स्वाभाविक रसिकतेला पाझर फुटे, शृंगार, वीर, करुणादि नऊ रसांचे अभ्यंगस्नान आम्हाला घडे. ॲडिसनचे ' सर रॉजर डी कॉव्हरले ' वाचीत असताना जो मी इंग्लंडातील खेड्यातील देखाव्यात रमे. तोच एकदम दीड हजार वर्षांपूर्वीच्या श्रीहर्षाचे चरित्र शास्त्रीबोवांच्या मुखातून ऐकताना मागील भारतीय वैभवाच्या शिखरावर भ्रमण करू लागे. आणि ही स्थळ-कालांतरे करणारा मी त्या वेळी १७-१८ वर्षाचाच होतो !

रसिकता : गणित असो वा शास्त्र असो, भाषा असो वा व्याकरण असो, परकीय इंग्रजी असो व मृत संस्कृत असो की मातृभाषा चालू मराठी असो, माझी गती सारखीच अकुंठितपणे चाले. सर्व हायस्कूलच्या अभ्यासक्रमात मला अभ्यासाचे श्रम म्हणून कधी भासलेच नाहीत. ह्याचे कारण माझ्या बुद्धीचे तेज नसून (मी बुद्धीने साधारणच आहे) केवळ माझ्या हृदयाची निर्मळ रसिकताच होय, हे मला येथे नमूद करावयाचे आहे. ही रसिकता मला शाळेपेक्षा घरातच अधिक, गुरूंपेक्षा माझ्या आई-बापांकडूनच जास्त मिळाली हे खास. माझ्या घरी जातिभेद नव्हता, तसा माझ्या हृदयात संस्कृतिभेदाचा किंवा पक्षपाताचा कृत्रिमपणाही नव्हता. सौंदर्य जेथे भेटेल तेथे ऊर्ध्वहस्ताने स्वीकारण्यास मी लहानपणापासून एका पायावर तयार आहे. मग ते इंग्लंडातले असो की स्वदेशातले असो, शहरातले असो की खेड्यातले असो, संस्कृत असो की प्राकृत असो, ते सहज व स्वाभाविक असले की पुरे. मी त्याला बिलगलोच म्हणून समजावे. ह्या माझ्या मुग्ध शृंगारी स्वभावामुळे, केवळ कपटी व्यवहाराच्या दृष्टीने पाहता प्रपंचात माझे बऱ्याच अंशी नुकसान झाले आहे आणि काहीजणांमध्ये मजसंबंधी दुराग्रही पसरला आहे, तरी पण ' स्वभावो दुरतिक्रमः ' ह्या न्यायाने मी आपला माझ्याच चालीने चाललो आहे, ही चाल मी हायस्कूलातच नव्हे तर अगदी माझ्या पाळण्यातच किंबहुना माझ्या मातृगर्भातच शिकलो असेन.

●●●

१२

माझे सोबती

हायस्कूलातील माझे शिक्षक व अभ्यास याविषयी साधारण आठवणी वर दिल्या. आता सोबती व त्यांच्याशी करमणुकीचे प्रकार सांगितले पाहिजेत. कारण स्वभाव आणि शील बनण्यात केवळ पुस्तकी अभ्यासापेक्षा ह्या दोहोंचा परिणाम अधिक होतो.

माझी भावंडे : माझी इंग्रजी पहिली इयत्ता मला कठीण व त्रासदायक गेली. त्या वेळी माझा वडील भाऊ जिवंत होता. त्यामुळे मला स्वतंत्र सोबती असणे साहजिक नव्हते. त्याचे जे सोबती असत त्यांच्याच मागे मागे दुय्यमप्रमाणे मला वागावे लागे. माझा भाऊ मजवर वडीलपणा गाजवी असे नव्हे. तो शांत स्वभावाचा होता. बरेच वेळा मी त्याचे ऐकत नसलो तरी तो समजुतीने माझ्याशी वागून मला आपल्याबरोबर नेहमी ठेवी. असा मायाळू भाऊ ह्या वर्षी एकदम वारल्यामुळे एकाएकी उघडा पडल्यासारखे मला झाले. तोपर्यंत माझ्या भावाशिवाय मी इतर कोणाशी मिसळत नसे. हायस्कूलात जाऊन मला माझ्या स्वत:चा शोध लागेपर्यंत माझी भावंडे हेच माझे मित्रमंडळ होते.

आमचा वाडा ज्या आळीत होता, तेथे मराठ्यांची जी घरे होती ती अगदी गरीब व खालच्या दर्जाची होती. एखाद्या किल्ल्याप्रमाणे आमचा वाडा किंचित् एकलकोंडा होता. तशात माझे प्राथमिक शिक्षण आटोपून मी इंग्रजी शाळेत जाऊ लागल्यामुळे, आळीतल्या मुलांतच काय पण मोठ्या माणसांमध्ये ही माझे महत्त्व वाढत असल्याची जाणीव मजमध्ये दिसू लागली. माझ्या भावात अशी अहंता नव्हती. समजूतदार असल्यामुळे तो भोवतालच्या लोकात अधिक मिसळत असे. अशा वेळी तो मला एकाएकी सोडून गेला. इकडे शाळेत नव्या इंग्रजी विषयाशी माझे नीट जमेना. त्यामुळे मी त्रासलेला व बहुतेक दुर्मुखलेला असे. माझे पहिल्या इयत्तेतले वर्ष इ. स. १८८५ बहुतेक एकलकोंडेपणातच गेले. आळीतील सामान्य लोकांना ही कारणे कशी कळणार? ते मला गर्विष्ठ समजत. माझ्या भावाच्या तुलनेने मी लोकांत जवळजवळ अप्रियच होतो.

माणुसघाणेपणा : मी लहानपणी फार लाजाळू असल्याने लोकांत न मिसळण्याचा माझा स्वभावच होता. अद्यापिही मला एकदम एखाद्या समाजात कारणाविना, किंबहुना अगत्याने बोलाविल्याविना जाणे आवडत नाही. त्यामुळे अजून केव्हाकेव्हा मजवर गर्विष्ठपणाचा–निदान मानीपणाचा–आरोप येतोच. माझ्या आत्येचा कितीही आग्रह असला तरी मी त्यांच्या आळीत कधी फिरकत नसे. पण माझा भाऊ मात्र त्या बाजूला फार लोकप्रिय असे. तो तरुण होता, माझ्यापेक्षा तो रंगाने उजळ व रूपाने देखणा होता. बड्या बापाचा वडील मुलगा आणि स्वभावाने मनमिळाऊ, मग का लोकप्रिय होणार नाही? विशेषत: त्या बाजूच्या तरुण मुली त्याच्यावर फार फिदा होत्या.

मला हे रहस्य त्या वेळी कळणे शक्य नव्हते. म्हणून माझ्या भावाच्या चहाड्या घरी येऊन मी आईजवळ सांगे. आई त्या मनावर घेत नसे आणि भावाला तर मजविषयी कधी रागच नसे. त्यामुळे माझ्या सासूच्या आळीतील लोक मला चहाडगा व मत्सरी म्हणत. मी जो मुलांशीही न मिसळणारा, तो मुलीत कसा मिसळणार? म्हणून त्या मला माणूसघाणा म्हणत. पुढे तर मी मोठा शिकलो, विलायतेला जाऊन आलो, ब्राह्मसमाजात शिरून सुधारणेचा अतिरेक केला, दारिद्र्याचे व्रत घेतले आणि शेवटी कुटुंबासह महारामांगांच्या वाड्यात त्यांची सेवा केली! ह्यापैकी एकाही कारणाने मराठ्यांसारखा मागासलेला समाज मला अद्यापि विक्षिप्त समजणे साहजिक आहे. मग ह्या सर्व कारणांचा कडेलोट करणाऱ्या मला जमखंडीतील सर्वच लोक अद्यापि माणूसघाणा म्हणतात ह्यात नवल का वाटावे? आता देखील फार दिवसांनी मी जन्मभूमीला गेलो, तर माझ्या घराण्याचा लौकिक जाणून लोक मला गावात तरी घेतात. बाटगा, ख्रिश्चन, बहकलेला समजून ते मला महारवाड्यात बसवीत नाहीत, ह्यातच मी भाग्य समजतो! अर्थात मराठेतर समजूतदार माणसे-मग ती ब्राह्मण असोत, लिंगायत असोत की मुसलमान असोत—मला फार बहुमानाने वागवितात तो प्रकार वेगळा. जमखंडीतील मराठे तरी मला अद्यापि दूरदूरच करीत आहेत.

माझा लाजाळू स्वभाव, लोकात बसण्या–उठण्याचा संकोच, माझ्या भावाच्या मृत्यूमुळे झालेला विरह आणि अंगवळणी न पडलेल्या इंग्रजी अभ्यासाचा कांच इत्यादी कारणामुळे ह्या वेळी मी फार घुम्या स्वभावाचा झालो होतो. अशा वेळी एक लहानशी सुंदर गोष्ट घडली ती आठवते. ती दिसण्यात क्षुद्र असली तरी माझ्या त्या वेळच्या अंत:स्थितीवर मोठा मनोरंजक प्रकाश पाडते.

गोड देखावा : माझा भाऊ वारल्यानंतर फार तर एक दोन महिन्यातली ही गोष्ट. त्या वेळी मी बारा वर्षांचाही नव्हतो व माझी बायको फार तर तीन वर्षांची असावी माझी आत्या वरचेवर समाचाराला आमचे घरी येई. एकदा तिने माझ्या या लहानग्या बायकोला लुगडे वगैरे विशेष काही न नेसविता तसेच बरोबर आणिले होते. कारण माझे घर जरी माझ्या बायकोचे सासर तरी तिच्या आईचे माहेर होते. किंबहुना तीच लहान पोर आईला न कळत अर्धी नागडीउघडी सहज मागे लागून आली असावी. आमच्या वाड्याच्या मोठ्या दरवाजातून आतील लहानशा चौकात येताना दारात एक मोठी गुळगुळीत फरशी होती. तिचेवरून दुडदुड धावत येताना हे लहान मूल पाय घसरून कोलमडून पडले. त्या वेळी मी जवळच एका खांबाला टेकून खाली मान घालून दु:खीकष्टी बसलो होतो. मी चटकन् उठून तिला कवटाळून उचलले व जेथे सर्व मंडळी बसली होती त्या कट्ट्यावर नेऊन ठेविले. हा देखावा पाहून मंडळीत हशा पिकला. लग्नात माझी बायको ६-७ महिन्यांची होती म्हणतात. तिची मानही नीट राहात नव्हती. लग्नात बायको लपवून ठेवितात. तिला नवऱ्याने शोधून कडेवर घेऊन यावयाचे वगैरे खेळ असतात. माझ्या लग्नात हा खेळ होणे शक्य नव्हते. तो खेळ मी आज केला, म्हणून मंडळी हसत माझी थट्टा करू लागली. मी स्वभावाने लाजाळू, घुमा व मंडळीत फारसा न मिसळणारा होतो. तरी प्रसंग पडल्यास उचित असेल ती गोष्ट करण्यास किंवा बोलण्यास मी कधी कसली फाजील लाज अगर भीड राखीत नसे. माझी बायको अद्यापि फार लहान असल्यामुळे तिला फार लाज कशी ती माहीतच नव्हती. ती माझी आतेबहीणच असल्याने मी तरी

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, समग्र वाङ्मय, खंड -२ रा ~~~

१३

माझे खेळ

जमखंडी गाव हा खेडेवजा. इंग्रजी शाळा नुकतीच झालेली. तेथे अलीकडच्या हायस्कुलांप्रमाणे क्रीडांगणे, व्यायामाचे प्रकार, ड्रिलमास्तर हे कोठून असणार ? आम्ही कोठे तरी गावाबाहेर जाऊन खेळत असू.

सोंगट्यांचा खेळ : माझा वडील भाऊ असताना आमच्या घरी बैठा खेळ म्हणजे सोंगट्यांचा, गंजिफा, बुद्धिबळे, सोंगट्याचे हस्तिदंती फासे वगैरे खेळाची सर्व साधने आमच्या बाबांनी घरी करून ठेविली होती ; पण त्यांना कधी खेळताना आम्ही पाहिले नाही. हे सामान मात्र घरी भरपूर होते. हा एक बाबांच्या रसिकपणाचा मासलाच म्हणावयाचा. दिवाळीच्या सणात आमच्या घरी सोंगट्याची मजलसच भरे. नरकचतुर्दशीच्या आदले रात्रीपासून तो भाऊबिजेची रात्र उजाडेपर्यंत कवड्यांचा खळखळाट अष्टौप्रहर चालत असे. हा खेळ मोठ्या इरेचा. मनुष्य कितीही शांत असला तरी तो चिडून भांडल्याशिवाय ह्या खेळाची समाप्ती म्हणून व्हावयाची नाही. एकाएका बाजूला दहा-दहा बारा-बारा गडी बसलेले. संध्याकाळी खेळ सुरू होऊन उजाडेपर्यंत आम्ही त्यात गढून जात असू. भांडण केव्हा केव्हा हातघाईवरही यावयाचे.

एक मल्लयुद्ध : माझा स्वभाव विशेष तापट असे. एकदा अलगूरचे आमचे मामा (हे वयाने माझ्या वडील भावाहून फार तर १-२ वर्षांनी मोठे असतील) एकीकडे आणि मी व माझा भाऊ एकीकडे असे सोंगट्या खेळत होतो. मामा फार विनोदी, रडी खेळणारे, चिडखोरांना अधिक चिडवून मजा बघणारे. खेळ बाजूस राहून आमचे भांडण जुंपले. शब्दयुद्ध संपून मल्लयुद्ध सुरू झाले. मामा म्हणजे पट्टीचा पहिलवान ! आम्ही दोघेच काय, पण दहा असलो तरी ते कसची दाद देतात! दुसऱ्याला चिडवून ते स्वत: कधीचच चिडत नसत. शेवटी प्रकरण अगदी निकरावर जाऊन स्वयंपाकघरातून आईला आमचेकडे यावे लागले. गलिव्हरच्या अंगावरील लिलिपुटांप्रमाणे आम्ही दोघे बंधु मामांच्या पाठीवर चढून लाथांचा व बुक्क्यांचा मारा चालविला होता. मामा खाली तसाच वाकून हासून आम्हाला अधिकच खिजवीत होते. हा प्रकार पाहून आई म्हणाली, "अरे, हा कसला नवीनच डाव आज काढला आहे रे!" तीही आपल्या भावाचे पाठबळ न घेता आमचीच बाजू घेऊन मामांना म्हणाली, " तू मोठा असून तुला लहान मुलांशी असले प्रसंग करायला कळत नाही काय ?" खरे पाहता चूक आम्हांकडेच असावयाची. पुढे मी हायस्कुलात गेल्यावर अगदी मॅट्रिक होईपर्यंत आमचे घरी ह्या खेळाचा अड्डा जमत असे.

पटाईत वृत्ती : दीपवाळी आली की, माझ्या अभ्यासाच्या खोलीला चुना, रंग वगैरे मी स्वत: व माझे सोबती लावीत असू. वर छत, झालर आणि रोषणाई आम्ही आमच्या ऐपतीप्रमाणे

करीत असू. दुसऱ्यांच्या घरही असे अड्डे होत, तेव्हा अरसपरस जावे यावे लागे. रात्री किती भांडणे झाली, बोलाचाली केली, तरी उजाडल्यावर रात्रीचा प्रकार जणु काय स्वप्नात झाल्याप्रमाणे आम्ही सर्व विसरून जात असू! सहाव्या-सातव्या इयत्तेत असताना तेरदाळचे विष्णु देशपांडे, रामू पाटील, अंतू हनगंडी, मळलीचे हणमंत कुलकर्णी, त्यांचा भाऊ रामू, जमखंडीचे भिमू निवर्गी, व्यंकू कुलकर्णी, सिनू करकंबकर, रामू जासूद वगैरे १५-२० जण ह्या खेळात जमत असत. मी व तेरदाळचे देशपांडे नेहमी विरूद्ध पक्षाला असू. दोघेही सारखेच चिडखोर आणि हेकेखोर. खेळापेक्षा भांडणातच वेळ आणि शक्ती यांचा जास्त खर्च. शेवटी शेवटी जुळवून कवड्या टाकण्याची पद्धत निघाली. व्यंकू कुलकर्णी म्हणजे प्रत्यक्ष शकुनीमामाच. कवड्या जुळवून वाटेल तो फासा हमखास टाकण्यात त्याचा हातखंडा. त्याच्या खालोखाल मीही जुळवण्यास शिकलो. दहा, पंचवीस, सहा, बाराच काय, पण साधे तीन आणि चार हेही आम्ही जुळवून नेमके पाडीत असू. केव्हा केव्हा बाहेरचे लोक डाव पाहावयाला बसत असत. रंग बहारीचा चढे, पत्ते, गंजीफा आम्ही क्वचित् खेळत असू. बुद्धिबळाला तर हातच लागत नसे. तो गर्दीचा खेळ नव्हे. तितकी गंभीरताही आमच्यात नव्हती.

'किर्र' खेळ : आट्यापाट्या, हुतूतू, खोखो वगैरे मैदानी खेळ आम्ही खेळत असू. शिवाय किर्र म्हणून एक खेळ विशेष चुरशीचा असे. यात हरलेल्या बाजूचे गडी एकामागे एक कंबरेला हात धरून वाकून उभे राहात आणि विजयी बाजूचे गडी लांबून धावत येऊन त्यांच्यावर स्वार होत. ते बराच वेळ बसले आणि भार सहन होईनासा झाला, म्हणजे खालच्यापैकी कोणी तरी 'किर्र' म्हटले की, खाली उतरून पुन्हा उडी घेत. पण जर का वर बसलेल्यापैकी एकाचा जमिनीला पाय लागला की, त्याच्यावर डाव येऊन त्याच्या पक्षाला खाली वाकावे लागे. ब्राह्मणांची मुले हा खेळ खेळावयाला कचरत असत.

सूरपारंब्या : झाडावरचा सूर हा खेळ फार मौजेचा वाटे. जमखंडी गावाभोवती डोंगराच्या दरीतून व तळ्यांच्या काठी बऱ्याच रम्य आंबराया असत. येथे सायंकाळच्या वेळी निवांत असे. आमची वानरसेना हा खेळ खेळावयास एखादे विस्तीर्ण शाखेचे ठेंगणे आंब्याचे झाड गाठीत असे. सर्वांनी झाडावर चढावयाचे, एकाने खाली उतरून, एक दांडके आपल्या उजव्या तंगडीखालून दूर फेकावयाचे. ज्याच्यावर डाव आलेला असे तो ते आणीपर्यंत टाकणारा झाडावर चढे. ते दांडके ठरलेल्या कोंडाळ्यात ठेवून डाव आलेला गडी झाडावरच्यांना शिवण्याचा प्रयत्न करी. त्याची नजर चुकवून कोणी तरी दांडक्यावर नेमकी उडी टाकून ते दांडके पुन्हा पूर्वीप्रमाणे फेकून तो झाडावर चढे. कोणी तरी एकाला शिवेपर्यंत त्याच्यावरचा डाव जात नसे. हा खेळ मुख्यतः गुराखी मुलांचा असे. ह्याला वडाचे झाड चांगले. त्याच्या फांद्या लांबवर गेलेल्या असतात व लाकूड चिवट असल्याने मोडण्याची भीती नसते. आंब्याचे झाड पोकळ असते. शिवाय आंब्याच्या मोसमात आंबराईत राखण बसे. वडाला नेहमी मुक्तद्वार. शिवाय पारंब्या खाली लोंबत असल्यामुळे त्या धरून खाली उड्या घेण्यास किंवा खालूनच उलटे झाडावर चढण्यास हेच झाड फार सोयीचे. मात्र घरी येईपर्यंत अंगावरचे कपडेच काय, पण कातडेही जागजागी फाटलेले असल्यामुळे घरच्या मंडळीपासून फाटका

चित्रकला : आमचा सर्व वेळ अभ्यासात किंवा खेळातच जाई, असे नव्हे. नित्य काही तरी नवीन कल्पना निघे आणि आम्ही सर्वच त्यात रमत असू. चित्र काढण्यात आमच्यातला रामू रानडे याचा हात चांगला चाले. आमच्या टोळीला लागला चित्रे काढण्याचा नाद ! आमच्या सोप्यात आणि तुळशीकट्ट्यावरच्या भिंतीवर चमकावयाला लागली रामाची, मारुतीची, देवदेवींची चित्रे. तुळशीकट्ट्यावरची भिंत चुन्याची होती. तिचेवर मी लाईफ साईझ रामपंचायत रंगीत काढले होते. ते बरीच वर्षे राहिले होते. घरात आलेल्यांना ते दर्शनी भागी असल्यामुळे दिसे. आता आठवल्यावर मला त्याची लाज वाटते. (कारण त्याच दर्जाची ती आमची कला होती!) पण त्या वेळी मला त्या चित्राचा पोरकट गर्व वाटत होता. ह्यावरून मी लहानपणी किंचित् बढाईखोर असेन, असे वाटते.

कारागिरी : गणेशचतुर्थी आली आणि आमच्या टाळक्याने घेतले की, प्रत्येकाने गणपती स्वत: करावयाचा! मग चालले हे माकडमंडळ जमखंडीच्या पूर्वेस २-२।। मैलावर एक डोंगर आहे. तेथून शाडूची माती आणावयाला. बरीच शाडू आणून जो तो चढाओढीने गणपती करू लागला. 'विनायकं प्रकुर्वाणो रचयामास वानरम् ' असाही प्रकार पुष्कळांचा झाला. तरी प्रत्येकाला आपलीच कृती पसंत पडून प्रत्येकाने आपापली पाट आपणच थोपटून घेतली. खरे पाहता रामू रानड्याचा गणपती मात्र त्यातल्या त्यात गणपतीसारखा दिसत होता. काही असो, त्या गणेशचतुर्थीत सर्वांनी स्वकृत गणपतीचीच पूजा केली, ही काही थोडी गोष्ट नव्हे!

आमचे कारखाने : एकदा साबण करण्याची टूम निघाली. जो तो चुना आणि तेल ह्यात हात घालून बसला. वड्या तयार झाल्या, पण त्या वाळेचनात! वाळल्या तर पुन्हा ओल्याच होईनात. कपड्याला लावू गेलो तर कपडा फाटे, पण डाग काही जाईना. साबणाचे नवे डाग कपड्याला पडू लागले. चहूंकडे छी:थू झाली आणि आमच्या पियर्स सोप कंपनीचे दिवाळे निघाले. ह्याचप्रमाणे शिसेपेन्सिली, दगडी पेना ह्यांचे आमचे कारखाने जसे निघाले तसेच बुडाले. भागीदार आमचे आम्हीच असल्याने कोण कोणावर फिर्याद करतो? केली तरी पुन्हा हसेच होणार! तरी एका गोष्टीत आमचा हातखंडा असे. आमची शाई आम्हीच करीत असू. बाभळीच्या शेंगा शिजवून त्यात हिरडा व हिराकस घालून आम्ही शाईच्या बाटल्या भरून ठेवीत असू. मग वाटेल तितक्या दौती लवंडल्या तरी भरलेल्या बाटल्या कोनाड्यात शिल्लक असतच. मात्र ह्या शाईच्या कारखान्याच्या भरभरटीमुळे, शाई वेळोवेळी घरभर सांडे आणि त्यामुळे बिचाऱ्या आमच्या आईला सारवणाचा नवीनच त्रास उद्भवे. ह्या गालबोटामुळे आमच्या यशाची शुभ्रता जास्त उठावदार दिसू लागली. मग आईच्या त्रासाला कोण जुमानतो?

●●●

१४

माझ्या खोड्या

आग्रहीपणा : दंगा, मारामारी आणि स्वैर खेळ हे बालपणाचे जन्मसिद्ध हक्क होत आणि ते मी माझ्या परीने-आमचे बाबांचा आम्हावर कितीही दाब असो-बजावयाला काही कमी केले नाही. अगदी लहानपणी मी शेजारच्या मुलांना मारून आईकडे कागाळ्या आणीत असे, हे मला अद्यापि आठवते. आमचे आजोबा असताना आमच्या वाड्याच्या बाहेरच्या पटांगणात काही भाडोत्री कुळे राहात असत. त्यात पाटोळे नावाचे एकगरीब कूळ असे. त्यांचा रामू नावाचा एक माझ्याच वयाचा लहान मुलगा असे. सहज खेळता खेळता मी त्यांच्या डोक्यावर हात ठेवण्याचा हट्ट घेतला; पण हात ठेवू न देण्याचा त्यानेही हट्ट घेतला. कारण हट्ट करणे हा दोघांचाही सारखाच जन्मसिद्ध हक्क होता ना! शेवटी आम्हा लहानग्यांची मारामारी झाली. रामू आपल्या आईकडे रडत गेला. तरी मी त्याच्या मागे लागलोच होतो. शेवटी ह्या खटल्याचे अपील आमचे आईकडे आले. कारण रामूची आई माझ्या आईची मोठी मैत्रीण होती. आईने हा खटला साहजिकच आजोबांकडे वर्ग केला. आजोबांनी आम्हा दोघा हेकेखोरेना आपल्या समोर घेतले आणि दोघांना खाऊ देऊ केला; पण खाऊपेक्षा मला दावेदाराचे डोक्यावर हात ठेवण्यातच जास्ती ईर्षा वाटत होती. रामू खाऊला कबूल झाला आणि मी त्याच्या डोक्यावर हात ठेविला खटल्याचा निकाल लागला. बरा म्हणा वाईट म्हणा हा आग्रहीपणा माझ्यात केव्हा केव्हा चमकतो!

गांवढळ खोड : म्हातारबा सुतार म्हणून माझ्या वडिलांचे एक मित्र असत. त्यांची दोन मुले रामू आणि कृष्णा ही अनुक्रमे माझ्या आणि माझ्या वडील भावाच्या वयाची असत. मी मराठी शाळेत असताना आमची चौघांची फार गट्टी असे. एकदा आम्ही चौघे एकीकडे व दुसऱ्या आळीतील मुले दुसरीकडे, ह्यांची आमच्या घराच्या पश्चिमेस असलेल्या तळयात एक मोठी मारामारी झालेली आठवते. तळयात पाणी नसे. त्यात खेळण्यास विस्तीर्ण जागा असे ; पण एकदा रामूची आणि माझीच मारामारी जुंपुन आम्ही दोघेही आमच्या आळीतील मोठ्या रस्त्यात भली मोठी खोल गटारे होती त्यात घाणीत पडलो. रामूच्या आईने आम्हाला दोघांना धुतले, पुसले, खडे व काटे रुतले होते ते काढले. माझ्यापेक्षा रामूला जरी मार जास्त लागला होता. तरी त्याच्या आईने माझेच कौतुक करून मला आईकडे पाठविले.

विहिरीच्या जुन्या भिंतीवर एक प्रकारची बारीक लव्हाळ्याप्रमाणे वनस्पती चिकटून वाढत असे. ती वाळल्यावर आम्ही काढून आणीत असे. ती प्रतीपक्षाच्या मानेला न कळत फासल्यावर तेथे आग सुटे. हा खरोखर आमचा दृष्टपणा आणि भ्याडपणाही खरा; पण म्हणतात ना, प्रेमात

आणि युद्धात सगळेच काही शोभते. मग त्याला आम्हीच कसे अपवाद? शिमगा आला म्हणजे ह्या बालयुद्धाला नवीन जोम येई. पण जसजसा मी वरच्या वर्गात जाऊन ब्राह्मणांच्या मुलांना हाताशी घेऊ लागलो तसतसा हा गांवढळपणा कमी झाला. तरी माझ्या काही वैयक्तिक खोड्या चालूच होत्या.

रामतीर्थ : जमखंडीच्या पश्चिमेस रामतीर्थ म्हणून एक रम्य ठिकाण आहे. तेथे दर श्रावण सोमवारी जत्रा भरत असे. इ.स. १८५७ सालच्या बंडानंतर जमखंडीचे यजमान श्रीमंत अप्पासाहेब पटवर्धन ह्यांनी ह्या ठिकाणीच आपली वस्ती मांडली. पूर्वी येथे रामेश्वराचे एक जुने रम्य देऊळ होते. पुढे २५-३० वर्षात येथे विस्तीर्ण राजधानीचे स्थान झाले. पश्चिमेस डोंगराखाली कडपट्टी म्हणून एक लहान खेडेगाव आहे. तेथे बसवण्णाचे पुरातन प्रसिद्ध लिंगायत देवालय आहे. येथे मोठी यात्रा भरत असे. अप्पासाहेबांनी रामतीर्थ लोकप्रिय करण्यासाठीही यात्रा वर डोंगरात आपल्या राहण्याच्या जागी काही वर्षे नेली. रामतीर्थास जाण्याला एक वरची डोंगराची व दुसरी खालची सपाट-गाड्या वगैरे जाण्याची-अशा दोन वाटा असत. ह्या दोन्ही वाटा सोडून अगदी डोंगराच्या माथ्यावरून मेलगिरी लिंगाप्पाच्या देवळामागून रामेश्वराच्या देवळाला जाण्याची मी नवीन टूम काढली. ह्याचे कारण पावसाळ्यात डोंगरावरची व भोवतालच्या दूरवर मैदानी प्रदेशातील शोभा फार सुंदर दिसे.

विंचवांशी खेळ : ह्या डोंगरावर विंचू फार असत. ते भले मोठे काळे तांबडे असत. काळ्या विंचवाला इंगळी म्हणतात. ती चावली की प्राणान्तच! हे विंचू धरून त्यांची एक मोठी माळ करण्याची आम्हाला खोड लागली. दगड उचलला की, खाली विंचू आढळावयाचाच. मी तर विंचू धरण्यात मोठा धीट व पटाईत झालो. पुढे पुढे विंचवाच्या नांगीतले विष काढून त्याला अगदी तळहातात घेऊन मी इतर मुलांना चकीत करीत असे. विंचू नजरेस पडला की, तो आपली नांगी आधी वर करतो. ती मी मोठ्या शिताफीने चिमटीत घट्ट पकडीत असे. मग नखावर त्याच्या नांगीचे टोक घासले म्हणजे त्यातून विषाचा एक लहानसा बिंदू बाहेर निघे. तो पुसून टाकला की, विंचवाचे सर्व तेजच नाहीसे होई. तो आपोआपच नांगी खाली टाकी. मग त्याला कोणीही खुशाल हातावर घ्यावे. पण निस्तेज विंचवालाही हातात घेण्याचे धैर्य कोणास होत नसे. मग माझ्या फुशारकीला कोठली सीमा उरणार! घरात किंवा आमच्या शाळेत एखादा मोठा विंचू निघाला की मुले मजकडे येत. मी चटकन् तो धरून त्याचे विष काढून हातावर घेई. अशा गडबडीत एखादे वेळी चुकून मला विंचू चावतही असे; पण अभिमानास पेटून त्या वेदना मी मुकाट्याने सहन करीत असे. कोण हा अर्कटपणा!

सहिष्णूता : दुखणे आले किंवा जबर इजा झाली तर इतरांप्रमाणे मी विव्हळत नसे; स्वस्थ घुमेपणाने पडे. "विठ्या, काय तू बेरड आहेस रे!" असे आई म्हणे. तिकडे माझे लक्षच नसे. ही स्पार्टन सहिष्णुता माझ्यात जन्मतः नसून ती माझ्या मानीपणाने मी आणली होती. शिक्षकांनी छडी मारली की, साधारण मुले मोठ्याने किंकाळी फोडीत. इंग्रजी शाळेत गेल्यापासून मला तर शिक्षकाच्या हातून मार खाण्याची कधी अपवादादाखलही पाळी आली नाही. सहनशीलपणा वाढवावा म्हणून

रोज २०-२५ मैल सरोवरावरून बोटीतून जाई आणि उंच डोंगराच्या अगदी शिखरावर एकटाच तासन् तास जाऊन बसे. भीती वाटत नसे. भिण्यासारखे काही नव्हतेही. हॉटेलात श्रीमंत चोचले करणाऱ्या मंडळीत न मिसळता कोठे तरी अगदी एकान्तवासातील गरिबाच्या झोपडीत मी उतरत असे. सॅवरडेनॉन नावाच्या खेड्यात एका गरीब कुटुंबात मी उतरलो होतो. तेथील लहान मुलांना घेऊन मी लॉक् लोमंड सरोवरावर एकदा फिरत होतो. मनात आले की पोहावे. कपडे काढून घेतली उडी! जरी उन्हाळा होता तरी सरोवराचे पाणी इतके थंड होते की, मी पडल्याबरोबरच गारठलो. अंगाची मूठ वळावयाला लागली. पायाला गोळे येऊ लागले. मग पोहतो कसचा! मोठ्या प्रयासाने मी काठाला लागलो. लहान मुले घाबरून गेली. हा जिवावरचा प्रसंग गुदरला !

शर्यत : मी मराठी शाळेत असताना १०-१२ वर्षांचा होईपर्यंत तर फारच उतावळा, चळवळ्या व खोडकर होतो; पण माझा वडील भाऊ नेहमी पाठीराखा असे. म्हणूनच बाहेर गेलेला मी सुरक्षित घरी येत असे. एरवी आईला मोठी काळजीच असे. चैत्र महिन्यात रामतीर्थात श्रीमंत अप्पासाहेब गुरांचे जंगी प्रदर्शन करीत. त्या वेळी मोठमोठ्या शक्तिवान बैलाची ओझ्याने भरलेल्या गाड्या ओढण्याची शर्यत होत असे. ती पाहण्यास गावोगावच्या लोकांची मोठी गर्दी जमे. एकदा ही शर्यत पाहण्यासाठी मी आणि माझा भाऊ गेलो होतो. गर्दीत आम्हा मुलास कसे दिसणार? म्हणून आम्ही एका मोठ्या झाडावर चढलो; पण त्या झाडावर अगोदरच पुष्कळ माणसे चढून पाहात होती. त्या झाडाच्या एका मोठ्या उंच आणि लांब फांदीवर इतकी माणसे गर्दी करून बसली की, शेवटी भार सहन न होऊन ती संबंध फांदी माणसांसह तुटून खाली पडली. खाली देखील माणसांची गर्दीच होती. त्यामुळे मोठा हाहाःकार झाला. मीही उंचीवरून खाली पडलो. गर्दीत पडलो म्हणून हातपाय मोडले नाहीत; पण विलक्षण ओरखडले होते. इतक्यात पोलिसांची धराधरी चालली. मग मी जीव घेऊन पळत सुटलो. माझे लग्नातले मोठे लांब लाल पागोटे झाडाच्या फांदीत अडकलेले व लग्नातला लांब चिटाचा अंगरखा फाटलेला, शिवाय धोतर पायात अडकत होते. पोलीस तर धरावयास जवळ आलेला, अहाहा! काय तो प्रसंग! पण सर्वांना चुकवून पागोटेही झटकन ओढून घेऊन शेंडी सावरीत मी जी धूम ठोकली ती दीड मैल मागे न पाहाता घरापर्यंत मजल गाठली; पण मरण अद्यापि पुढेच होते. घरी बाबांनी फाटके कपडे पाहिल्यावर काय दशा होईल ती आठवून पोलिसपेक्षाही ह्या नवीन धास्तीने काळीज धडधडू लागले. घरी प्रवेश करण्याची छाती काही होईना. बाबा आहेत काय, कोठे बसले आहेत ह्याचा कानोसा वाकून पाहून घेतल्यावर चोराप्रमाणे मी आत शिरलो. बाबा घरी नाहीत हे पाहून हायसे वाटले व सर्व श्रमांचा परिहार झाला.

विशेष करामत : शिमग्यात एकदा अशीच खोड मोडली. शिमग्याचे दिवसात चांदण्या रात्री बाबांचा डोळा चुकवून उनाडक्या करीत आम्ही फिरत असू. विशेष करामत म्हणजे वेश्यांच्या आळीत बदफैली लोकांच्या नावाने शिमग्यातील अचकट-विचकट म्हणी म्हणत, अभद्र ध्वनी काढीत मध्यरात्र उलटून जाईपर्यंत हिंडावयाचे आणि पुन्हा धुळवडीच्या सकाळी भुताटकी करावयाची, ती निराळीच! एकदा मी काही मुलांबरोबर एका वेश्येच्या घराजवळ वाईट गाणी म्हणत बोंबलत गेलो. मुलाच्या नादी लागून तिच्या दाराशी मी दंगामस्ती करू लागलो. आतून बाळा काणे नावाचा एक तरुण ब्राह्मण त्रासून आला व त्याने मलाच पकडले. त्याच शिक्षकाने मला शाळेत घालण्याचा

१५

काही सवयी आणि वागणूक

हा काळ संपविण्यापूर्वी माझ्या काही सवयी व काही विशिष्ट वागणूक यासंबंधी आठवणी देणे बरे. माझ्या वयाच्या ६ व्या वर्षी मी प्राथमिक शाळेत गेलो आणि १२ व्या वर्षी हायस्कुलात गेलो. १९ वे वर्ष संपण्यापूर्वी माझे दुय्यम शिक्षण संपले. ह्या तिन्ही टप्प्यात माझ्या स्वभावात निरनिराळे फरक पडून अधिकाधिक विकास घडत असलेला मला देखील कळून येत होता.

पेहराव : प्राथमिक शाळेत असताना माझ्या पोषाखाचे बाबतीत मी फार गबाळ्या होतो. कर्नाटकात प्राथमिक शाळेत जाण्याच्या वयातही लहान मुले रुमालच बांधीत असतात. अजूनही खेड्यात तेथे हाच प्रकार दिसतो. पुणेरी टोपी मी सबंध हायस्कूलात असताना घातली नाही. पुण्यात कॉलेजात आल्यावर मोठमोठी बी. ए. च्या वर्गातली मुले नेहमीच-आणि मोठे प्रोफेसरही केव्हा केव्हा-टोपी घातलेली पाहून आम्हा कर्नाटकीयांना मोठेच आश्चर्य वाटे. आमच्या हायस्कूलच्या काळात पुणेरी टोप्या जमखंडी येथील दुकानात विकत मिळणेच संभवनीय नव्हते. मग कोट आणि वास्कुटांचे नावच घ्यावयाला नको. खादीच्या बंड्या आणि वरती केव्हा तरी घालावयाला लांब झग्याचे व अस्तन्याचे मांजरपाटी आंगरखे आणि नेसण्यास धोतर असत. डोईला कर्नाटकी जाडाभरडा रुमाल. तो मला प्राथमिक शाळेत असताना तरी नीट बांधावयाला येत नसे ! ब्राह्मणांची मुले लंगोटी घालीत; पण घरंदाज मराठ्यांची मुले धोतरे किंवा विजारी घालावयाची. धोतरे मळलेली, अंगारख्यावर शाई सांडलेली आणि रुमालाच्या एकदोन फेरी गळ्यात आलेल्या, कसे तरी अस्ताव्यस्त बांधलेले खड्यांचे दप्तर आणि पाटी सावरीत १०-१०।। वाजता आमची स्वारी दुडदुड धावत येई. भूक इतकी लागलेली असे की, आईला ओरबाडून खाण्याची तयारी! आमच्या सोप्यात समोरच्या भिंतीत एकावर एक असे दोन मोठे कोनाडे असत. वरच्या कोनाड्यात दप्तर पुस्तके वगैरे आणि खालच्यात कपडे ठेवावयाचे असत. पण मी हे सर्व उभ्याउभ्याच फेकून देत असे. ते सर्व नीट ठेवण्याचे काम माझ्या मोठ्या भावाचे किंवा आईचे. बाबांच्या दाबामुळे आंघोळ केल्याशिवाय गत्यंतरच नसे; पण ती आंघोळ त्याच मासल्याची, म्हणजे सगळे आंग काही भिजावयाचे नाही. मात्र कपाळावर गंधाचा नाम मात्र मोठा ओढलेला. त्यामुळे बाबांचे लक्ष आंघोळीच्या व्यंगाकडे जात नसे!

साधी राहणी : पोषाख भपकेदार करणे किंवा दागदागिने घालून नटणे ह्याची मला लहानपणापासून कधीच आवड नव्हती. हायस्कुलात गेल्यावर पोषाखातला गैदीपणा कमी झाला. तरी माझे लक्ष अशा गोष्टीकडे फारसे नसे. साधेपणा मला नेहमीच आवडे. बरेच दिवस अंगात

होई. एका जेकावर (चिखलाचा ६ इंचाचा एक लहानसा खांब) एक आडवी चोय ठेवून तिला दोन्ही टोकांना चिखलाच्या पणत्यातून दिवे लावून ते गरगर फिरवून आम्ही गुळ्ळव्वापुढे खेळत असू. चिखलाचा एक रेडा करावयाचा, त्याच्या पाठीला एक खळगा करून त्यात कुंकवाचे पाणी भरावयाचे आणि चिखलाच्याच सुरीने तो रेडा गुळ्ळव्वापुढे कापावयाचा. ह्या कामात माझा हातखंडा. दुसरे दिवशी बुधवारी गुळ्ळव्वाचे विसर्जन करावयाला आम्ही जनाक्काच्या मैत्रिणी घेऊन डोंगरात जाऊन सबंध दिवसभर खेळून येत असू. तेव्हा शिदोऱ्या, लाह्या, खोबरे यांची लयलूट! हे एक बाळ वनभोजनच. खरे पाहाता हा खेळ मुलींचाच. मी गेलो म्हणजे मुली "शेळ्यात लांडगा आणि बायकात हांडगा" असे म्हणून माझी टिंगल करीत. तरी पण जनाक्कासाठी ते सर्व सोसून तिच्या खेळाचे सुख मी भोगी. मी माझ्या वाचनातल्या गोष्टी व सहलीतील अनुभवही जनाक्काला वेळोवेळी सांगून तिला मी माझ्या ज्ञानाच्या व माहितीच्या पातळीवर (Level) ठेवण्याचा सतत प्रयत्न करी. जनाक्काचा प्रतियोगी सहकार असावयाचाच.

घरकामाची लहर : लहर आली म्हणजे मी आईच्या घरकामालाही हातभार लावीत असे. विशेषत: सणावारी स्वयंपाकघरात काही गोडधोड होऊ लागले की, माझ्या मातृभक्तीला पूर यावयाचा! नागपंचमीचे लाह्यापीठाचे लाडू, गणेशचतुर्थीचे मोदक, नवरात्रीच्या कडाकण्या, दिवाळीच्या करंज्या-कडबोळी, मोहरमातला मलीदा-चोंगे वगैरे खाण्याचे पदार्थ करण्याला माझी पुस्तके टाकून तिच्या पुढेपुढे मी इतका सुळसुळत असे की, जणू तिची मी एक सूनच! आईने पुरण घातले की कणीक मऊ करण्याला मी काच्या मारून दु:शासनवधासाठी जसा भीम असा सज्ज होई! अशा वेळी रामायण-भारतातील वामनाचे श्लोक, मोरोपंतांच्या आर्या आईपुढे म्हणून दाखविण्याचा तोंडाचा पट्टा एकदा का सुरू झाला, की कणीक मऊ झाली तरी हे साग्रसंगीत दु:शासन वध चालूच राही. मग आई तिकडे न का ऐकेना! "अरे विठ्या, लाकडाचे असते तर हे तोंड केव्हाच झिजले असते की रे!" असे आई कानडीत म्हणे. जनाक्का मात्र मोठी कामचुकार असे. खायला मी आणि कामाला माझा मोठा भाऊ हा तिचा बाणा असे.

अव्यवहारीपणा : डोंगरातून जळाऊ लाकाडांचा भारा आणून आईला मदत करण्याचे एकदा अस्मादिकांनी मनात आणिले. लागलीच एक कुऱ्हाड व एक मोठी दोरी मी घेऊन निघालो. पण शेवटी "जेनु काम तेनु थाय, बिजा करेसो गोते खाय" असाच शेवटी प्रकार घडला. जाळण्याला अगदी निरुपयोगी अशा काटेरी झुडुपांचा भारा मी तयार केला. पण तो काही केल्या मला घरापर्यंत आणता येईना. रात्र पडावयाला झाली तरी हा गडी घरी येईना, म्हणून आई अर्ध्या वाटेवर मला हुडकायला आलेली भेटली. भारा अर्ध्या वाटेवरच टाकून कसे यावे लागले ही रडकथा आईस सांगण्याची पाळी आली. कसली लाकडे गोळा केली हे आईने विचारता त्या झुडुपाचा मासला दाखविला. तिने कपाळाला हात मारून म्हटले "हायस्कुलात पहिला नंबर मिळाला तरी जळाऊ लाकूड कोणते व त्याचा भारा घरापर्यंत कसा आणावा हे व्यवहारज्ञान तुला नाही रे पोरा! लाकडे नाहीत ती नाहीत, पण दोरी मात्र डोंगरात टाकून हात हालवीत आलास. काय तुझी तारीफ !"

१६

माझ्या एकांत सहली

एकान्तातील सहली : जमखंडी हा गाव तिन्ही बाजूंनी डोंगराच्या बगलेत आहे. विशेषत: दक्षिणेस मुधोळ संस्थानच्या वाटेवर तर एक सुंदर लांब दरी आहे. तिच्यात कट्टेगिरी नावाचा दुसरा एक विस्तीर्ण तलाव आहे. पावसाळ्यात हा भरून वाहू लागला, म्हणजे त्या सर्व प्रदेशास सुंदर वन्य शोभा येत असे. मी जरी नेहमी माझ्या सवंगड्यांच्या घेऱ्यात अडकलेला दिसे, तरी एखाद्या दरीतून, डोंगराच्या माथ्यावरून, पूर्व व उत्तर या बाजूने पिकलेल्या शेतातून किंवा जमखंडीतील मोतीबागेतून एकटेच हिंडणे मला फार आवडत असे. जमखंडीचे उत्तरेस ४-४।। मैलांवर कृष्णेचे भव्य पात्र आहे. ते माझ्या नित्याच्या आटोक्याच्या बाहेरचे असे ; पण तेथेही केव्हा केव्हा मी माझी गोपाळमंडळी घेऊन जात असे. माझ्या हृदयाचा परिपोष माझ्या एकान्तातील सहलीमुळेच विशेष झाला. निर्जन डोंगरातून व दरीतून हिंडत असताना मी वाचलेल्या कादंबरीतला नायक मीच बनत असे. मात्र नायिका नसल्यामुळे माझा विप्रलंभ श्रृंगार लंगडालुळा पडत असे. जमखंडीत वसंत ऋतूत काही आंबरायांना मोहोर येऊन झाडावरच्या कोकिळा मदोन्मत होत ! उन्हाळा तेथे कडक भासे, सायंकाळच्या क्लांत समयी मी मोतीबागेतल्या कारंज्याजवळच्या बकुळीच्या झाडाखाली बकुळीच्या मधुर सुगंधाच्या फुलांच्या माळा विणीत बसलो असता--

कारंजाचे तुषार वाटति अग्निकणांचे परी,
पुष्पांचा तो सुगंध माझ्या शूळ निपजवी शिरी
कोकिळकूजित ऐकुनि वाटे वीज कडाडे वरी

वगैरे संगीत सौभद्र नाटकातून ऐकलेल्या पीडा मलाच होऊ लागत! पण सुभद्रेचा मागमूस कोठेच नसे ! सुभद्रा खोटी असली तरी सृष्टिदेवीचे हावभाव नजरेपुढे खरेच असत. मोठा झाल्यावर कालिदास, बाणभट्ट आणि त्याहीपुढे वर्डस्वर्थ आणि स्कॉटस् ह्या कवींनी व कादंबरीकारांनी जे दिव्यामृत पाजिले त्याचेच बाळकडू मला ह्या ओबडधोबड कादंबऱ्यांनी व नाटकांनी पोरवयातच पाजिले होते. मग त्यांचा मी आभारी का असू नये?

पहिला ठसा : पण सर्वांच्याही पूर्वी मला हृदयदान दिले. ते माझ्या पवित्र आईनेच! तिच्याच पुण्यप्रभावाने मला सर्व जड रसातून तारण मिळून माझ्या हृदयाचा परिपाक प्रथम धर्माच्या भक्तीरसात व नंतर तत्त्वज्ञानाच्या शांत रसात झाला. माझ्या वेळच्या मराठी पाचव्या क्रमिक पुस्तकात 'सहल करून येणे' हा एक धडा होता. तो मला फार आवडत असे. त्या आवडीचे

१७

माझे वाचन

खाजगी वाचन : आधुनिक विद्यार्थ्यांच्या मनाची वाट शाळेबाहेरच्या वाचनावर अवलंबून आहे. आधुनिक शिक्षणाला विद्यार्थ्यांच्या खाजगी वाचनाची जोड मिळाल्याशिवाय ते सर्व निरुपयोगी ठरते, हे आता सर्वमान्य तत्त्व झाले आहे ; पण माझ्या हायस्कुलच्या काळात हे तत्त्व आमच्या शिक्षकांना नुसते माहीतही नव्हते, मग मान्यता बाजूसच राहिली. आमची शाळा बहुतेक खेडवळ. मग तेथे पुस्तकालय कोठून असणार ? त्या वेळी मराठीतील वाङ्मयच मुळी जर संपुष्टात होते, तर माझ्या वाचनाचा मुद्दा कसा निघणार ? तरी मी इंग्रजी तिसऱ्या-चौथ्या इयत्तेत जाईपर्यंत मराठीतल्या त्या वेळच्या अद्‌भुत कथानकाच्या व उघड शृंगाराच्या कादंबऱ्या बऱ्याच वाचल्या होत्या. माझ्याइतक्या कादंबऱ्या त्या वेळच्या माझ्या सोबत्यांपैकी कोणीच वाचल्या नव्हत्या. मला अगदी लहानपणी तोंडी गोष्टी ऐकण्याचा फार नाद असे. हा नाद माझ्या आईनेच मला बाळपणी अद्‌भुत व करुण रसांच्या गोड गोड गोष्टी सांगून लावून ठेविला होता. पुढे घरी कोणी आल्या-गेल्याजवळ गोष्टी सांगण्याचा मी तगादा लावीत असे. ह्या बाहेरच्या लोकांनी मला ज्या गोष्टी सांगितल्या त्या मात्र सर्वच लहान मुलांनी ऐकण्यासारख्या नव्हत्या. काहीत बीभत्सपणा उघड असे. त्या वेळचे गांवढळ जगच तसे होते.

कादंबरी वाचन : पुढे मराठी ४/५ इयत्तेत असताना गुलबकावली, वेताळपंचविशी, बत्तीस पुतळी, शुकबहात्तरी वगैरे पुस्तके माझ्या हातात येऊ लागली. इंग्रजी शाळेतील खालच्या वर्गात असताना विचित्रपुरी, मंजुघोषा, मदनमंजरी, वसंतकोकिला, शृंगारसुंदरी ही आणि अशी कित्येक पुस्तके मी आधाशाप्रमाणे केव्हाच वाचून टाकीत असे. ही पुस्तके मला कोठून मिळत ह्याचेच मला आता आश्चर्य वाटते. 'इच्छा तेथे वाट सापडते' ही इंग्रजी म्हण माझ्या अनुभवास, ह्या कादंबरी-वाचनाच्या बाबतीत त्या वेळी फार येत असे. पुढे पुढे ६/७ व्या इयत्तेत गेल्यावर अरेबियन नाइटस्‌चे भाषांतर, नारायणराव गोदावरी, वेषधारी पंजाबी अशा प्रकारची पुस्तके मिळू लागली. हरि नारायण आपटे ह्यांची पुस्तके व 'करमणूक' हे पत्र मी पुण्यात कॉलेजात जाईपर्यंत मिळणे शक्यच नव्हते. किंबहुना ती त्या वेळी अस्तित्वातच नव्हती. मराठी शाळेतील बींभत्स गोष्टी आणि इंग्रजी शाळेतल्या उघड शृंगाराच्या घवघवीत वर्णनाच्या कादंबऱ्या यामुळे माझ्या कोमल आणि भावनाशील मनावर काही अंशी अनिष्ट परिणाम झाला, हे मला पुढे कळून आले. १४/१५ व्या वर्षाच्या आतच माझ्यात अकालीन शृंगार रसाचा प्रादुर्भाव झाला असावा, असे मला वाटते.

वाचनाचे वेड : करुण, श्रृंगार, वीर, रौद्र इत्यादी रसही समजू लागून माझ्या बुद्धीप्रमाणेच हृदयाचाही परिपोष होऊ लागला. तरी पण त्या काळच्या वाङ्मयातील तुटपुंजेपणामुळे मी अकाली

१८

पोरवयातील माझी धर्मभावना

प्रस्ताव : हायस्कूलचा काळ, इ.स. १८९१ अखेर म्हणजे माझ्या वयाची अठरा वर्षे. तेथपर्यंत माझा अभ्यास, खेळ, खोड्या, सोबत्यांचा सहवास व माझा एकान्तवास वगैरे गोष्टी उघडपणे मी सांगितल्या. आता जी धर्मभावनांची आठवण मी सांगणार आहे तो विषय गंभीर आहे. इतकेच नव्हे तर तो माझ्या चरित्रातला आत्मा आहे. धर्माने माझ्या आयुष्याचा प्रवाह, निदान त्याची दिशा तरी, पुढे पार बदलली. अशा महत्त्वाच्या विषयासंबंधी लिहिण्यापूर्वी धर्माविषयी माझी दृष्टी कशी आहे ते सांगणे जरूर आहे. मी केवळ आठवणी व मागील अनुभव लिहीत असता मध्येच माझी आताची दृष्टी किंवा विचार देणे आगंतुक विषयांतर आहे, हे मला कबूल आहे. पण माझी दृष्टी समजल्याशिवाय मी धर्माविषयी जे लिहीन ते वाचकांस न समजता कदाचित् गैरसमज होण्याचा संभव आहे. म्हणून हे विषयांतर क्षम्य आहे, असे मला वाटते.

इतर गोष्टी वेगळ्या आणि धर्म ही बाब वेगळी, अशी पुष्कळ सुज्ञांचीही समज असते. पण इतर गोष्टींप्रमाणेच मनुष्यमात्रात धर्माची जी उपजत बुद्धी आढळते तीही परिणतीचा व विकासाचा विषय आहे असे मला वाटते. म्हणजे तीही नैसर्गिक नियमांना अनुसरूनच उपजते, वाढते आणि कदाचित् लयही पावते. खाणे, पिणे, वाचन, अभ्यास, मैत्री, वैर, खेळ, खोड्या, संपत्ती, विपत्ती वगैरे गोष्टी केवळ निसर्गाच्या नियमाप्रमाणे घडतात. त्यांना काही ईश्वरी प्रसादाची किंवा प्रेरणेची गरज नाही. मात्र धर्माच्या जागृतीला आणि वाढीलाच काय ती ईश्वरी कृत्याची जरुरी आहे, असे मला वाटत नाही. अशी जरूरी माझ्या धर्मबुद्धीला असेल तर ती माझ्या पाळण्यातल्या खेळांना आणि पोरकट खोड्यांना का नसावी ? मी जे बरे केले असेल, तेवढीच नेमकी ईश्वरी कृपा आणि वाईट गोष्टींना मात्र मीच जबाबदार, असे माझे मत नाही.

आपल्या चारित्र्याबद्दल व्यक्तीच सर्वस्वी जबाबदार असेही माझे म्हणणे नाही. जशी व्यक्ती जबाबदार आहे तसाच त्या व्यक्तीचा अनुवंश (पूर्वपरंपरा) आणि परिस्थिती (हिच्यातच त्या व्यक्तीचे शिक्षण, नातलग, स्नेही, वैरी वगैरे सर्वच नैसर्गिक बाबींचा समावेश होतो.) ह्याही गोष्टी जबाबदार आहेत. एकूण मनुष्याच्या चारित्र्याबद्दल व्यक्ती आणि निसर्ग ही दोनच कारणे पुरी असून, ईश्वराला त्यामध्ये खेचणे अनावश्यक दिसते. दांडगाई, मारामारी आणि माझ्या दुष्ट खोड्यांच्या आठवणी ज्या लेखणीने आणि ज्या ओघात लिहिल्या त्याच लेखणीने आणि त्याच ओघात मी माझ्या धर्माचाही विषय लिहितो, हे पाहून कोणा वाचकाचे कोवळे मन प्रथमच बिचकू नये आणि पुढेही ज्या सहज आणि मोकळ्या मनाने माझी व्यंगे मी सांगितली तशाच मोकळेपणाने माझ्या धार्मिक भावनांचा अहवाल मी सांगत आहे हे वाचून कोणाच्या कोवळ्या विचारांना धक्का लागू नये, म्हणून मध्येच ही थोडी प्रस्तावना केली आहे.

धर्माची गोडी : ह्या पुढील चार वर्षात म्हणजे मी सात वर्षाचा होईपर्यंत घरातल्या कुळाचारात आणि विधि संस्कारात देवापेक्षा देवी उपासनेचे प्राबल्य अधिक असे. माझे आजोबा बसंतराव विशेष धार्मिक नव्हते. संताबाई ही माझी आजीच धर्मकृत्यात पुढाकार घेत असे. आमचे घरी नवरात्राचा सण आणि सोहळा सर्वात मोठा होत असे. नवरात्रात माझी आजी नऊ दिवस उपास करीत असे. केवळ फळांवर, तीही थोडी केळी खाऊन ती असे. तिचे मुख्य दैवत श्री यल्लमादेवी हिचे वर्णन मागे आले आहेच. तुळजापूरची अंबाबाई माझ्या आजोबांची व यल्लमा ही माझ्या आजीची. वस्तुतः पहिलीपेक्षा दुसरी मला अधिक पसंत असण्याचे काही कारण नाही. असलेच तर आजीचा पुढाकार एवढेच. जितका गाजावाजा अधिक किंवा जितके गोड खावयाला ज्याच्या पूजेत अधिक मिळेल तितके ते दैवत लहान मुलाला अधिक प्रिय, हा नियम निसर्गसिद्धच आहे. वैदिक दैवतात इंद्र अधिक प्रिय आणि प्रबल का ? तर तो दारू अधिक पीत असे म्हणून. ती इंद्रालाही प्रिय अशी समजूत रूढ झाली असावी. ह्या न्यायाने मला ही यल्लमा ५/६ वर्षापासून प्रिय झाली. मनावरचा हा संस्कार मी पुढे इंग्रजी पाचव्या इयत्तेत असतानाही मला कसा जाणवला, हे मी मागे सांगितलेच आहे.

ताईबाईचे प्रस्थ : आमच्या देव्हाऱ्यावर आणि नवरात्राच्या पूजेत तुळजापूरच्या अंबाबाईचे चित्र आणि आरत्या अधिक येतात. ह्याचे कारण श्री यल्लमा ही कानडी देवता आणि तिची उपासना अधिक ग्राम्यपणाची. आमचे घरचे पुरोहित तम्मण भटजी डेंगरे ह्यांना अंबाबाईच्याच मराठी व कानडी आरत्या येत असत, पण सौंदत्तीपेक्षा तुळजापूर अधिक लांब आणि जमखंडीस अंबाबाईच्या देवळापेक्षा श्री यल्लमाचेच देऊळ अधिक प्रसिद्ध व शिवाय माझ्या आजीचा करारीपणा जास्त. म्हणून ती जिवंत असेपर्यंत माझ्या बाबांनी पुढे सुरू केलेल्या ब्राह्मणी संस्कृतीला विशेष बळ आले नाही. देव्हाऱ्यावरच्या श्री यल्लमापेक्षाही बाहेरच्या गोठ्यातील कोनाड्यात बसलेली ताईबाई हिचे प्रस्थ वर्षातून एक दिवस इतके माजे की, आम्ही सर्वजण त्या दिवशी अगदी हैराण होऊन जात असू, आम्ही सर्वजण शाकाहारी असूनही केवळ नवसासाठी म्हणून ह्या ग्राम्य ताईबाईची एक गाभण मेंढी कापून आजीला कंदुरी करावी लागत असे. आमचे आजोबा जरी मोठे भाविक नव्हते, तरी तेच एकटे मांसाहारी असल्यामुळे ताईबाईची ही पूजा त्यांच्या पथ्यावर पडे. आजाआजीचे सर्व ठीक झाले, तरी मला हे काय गौडबंगाल चाले ते कळत नसे ! ते कसेही असो, यल्लमामुळे माझ्या मनावर अनुकूल परिणाम होत, तर ताईबाईकडे पाहून प्रतिकूल ठसे उमटत!

सूडाची कल्पना : मी लहानपणी इतका खोडकर होतो तरी फार कनवाळू होतो. ह्या ताईबाईला बळी देण्यास आणिलेल्या गाभण मेंढीची मला मोठी कीव येत असे. पण माझा इलाज तो काय चालणार ? माझ्या देखत त्या बिचाऱ्या जिवाचा घात झालेला पाहून मला ह्या ताईबाईचा मोठा राग येत असे. तरी दुसरे दिवशी इतर देवांबरोबर तिचीही पूजा मला मुकाट्याने करावी लागत असे. ह्या ताईबाईचे उणेपुरे करण्याचा मार्ग जरी नव्हता, तरी तिचा सूड उगविण्याची मला दुसरी एक चमत्कारिक संधी मिळत असे, ती अशी. आमच्या वाड्याच्या महाद्वाराच्या बाहेर दाराशी लागून दोन्ही बाजूस दोन तिकोनी दगड ठेविलेले असत. त्यांना चुना लावलेला असे. प्रसंगविशेषी त्यांना हळद-कुंकूही लागत असे. ह्या दोन द्वारपालक देवताच असत म्हणावयाच्या. दिसण्यात आकृतीने हे दगड ताईबाईप्रमाणे आणि तेवढेच असत. मला वाटे की, हे ताईबाईचे कोणीतरी

जेवताना नुसती कोरडी भाकर, तुरीची पातळ डाळ आणि तांबडी भगभगीत मिरच्यांची चटणी ह्याशिवाय काही मिळत नसे. चटणीवर तेलही मिळावयाची मारामार! मग माझा कावेळ्या मनावर ह्या पूजेचा काय परिणाम होत असेल बरे?

गाड्याची पूजा : अर्थात् मला ह्या सर्व पासरीभर देवांचा केव्हा केव्हा भारी राग येत असे. पूजा करीत असता सगळे देव माझ्या हातीच येत. जे दगडाचे कठीण असत ते वाचत ; पण जे सोन्यारुपाचे नाजूक टाक असत त्यांना मी धरधरून वाकवीत असे आणि पुन्हा बाबांनी पाहू नये म्हणून सरळ करून ठेवी. घाई झाली म्हणजे दुरूनच मी त्यांच्यावर पाणी फेकून भिजवीत असे. घरातल्या देवांचा असा झटपट संक्षिप्त समाचार घेतल्यावर मारुतीचीही तशीच वाट लागावयाची. घरातून निघताना पंचपात्री, गंध, फुले, अक्षता सर्व श्रृंगार थाटाचा असावयाचा ; पण पोटात कावळे चावू लागल्यावर कोण मारुतीपर्यंत जातो? आमचे मोठे अंगण ओलांडल्यावर बाहेर रस्त्यात लगेच म्हातारबा नावाच्या माझ्या बाबांच्या एका सुतार मित्राच्या मालकीचा सुतारी कारखाना लागत असे. त्यांच्याकडे दुरुस्तीला आलेल्या खटारगाड्या रस्त्यातच उभ्या असावयाच्या. त्यापैकी एखाद्या गाडीच्या चाकाच्या गड्ड्याची पूजा करून मी घरी तीर्थ द्यावयाला येत असे ; पण माझी ही चोरी फार दिवस न लागताच उघडकीला आली. म्हातारबा वरचेवर बाबांना भेटावयाला येत असत. ते म्हणत, "रामा! (माझ्या बाबांपेक्षा वयाने बरेच वडील असल्याने ते अशी एकेरी हाक मारीत) आमच्या रस्त्यात उभ्या असलेल्या गाड्यांच्या चाकांवरून अलीकडे बरेच दिवस पाणी, गंध, फुले, अक्षता आढळतात. हा काय चमत्कार!" बाबांनाही हे काय गौडबंगाल आहे ते पाहावेसे वाटल्यावरून ते पाहावयास गेले. पाहतात तो आपल्या घरची गंध व फुले नित्याची त्यांच्या ओळखीची दिसली. घरी येऊन त्यांनी मला दरडावून विचारले, "कायरे विठ्या, रस्त्यातल्या गाड्यांची पूजा करीत असतोस काय?" काही झाले तरी मी खरे बोलणारा मुलगा, अशी बाबांची नेहमी खात्री होती. म्हणूनच त्यांचा मी लाडका होतो. मी मोठा खजील झालो व खरा प्रकार सांगितला. त्यांच्या रागाला वावच न उरल्यामुळे त्यांना उलट माझी कीव आली आणि खरे बोलण्याबद्दल त्यांनी माझे कौतुकच केले. गोष्ट अशा थरावर आली म्हणजे माझे आईलाही मध्यस्थी करण्याचे धैर्य होई. शाळेत जाणाऱ्या लहान मुलाला जेवणाला उशीर होतो, म्हणून तिनेही मला पाठबळ दिले. शेवटी माझ्या मागची मारुतीची ब्याद सुटली. मारुतीपेक्षा मला रस्त्यातली गाडीच पावली म्हणून मीही आनंदलो. मग त्यापुढे देव्हाऱ्यातल्या सोन्यारुप्याच्या टाकांच्या कंबराही मी फारशा वाकविल्या नाहीत. कारण केव्हा तरी बाबा पूजा करावयास आले म्हणजे सगळ्या देवांच्या कंबरा वाकलेल्या पाहून त्यांना चमत्कार वाटे हे देव म्हणजे आमचे आजे, पणजे हे पूर्वजच असत. ते सर्व म्हातारे होऊन वारले होते. म्हणून त्यांच्या कंबरा वाकणे साहजिकच होते. असल्या पुजाऱ्यापासून आमचे रक्षण कर, अशी त्यांनी ईश्वराजवळ प्रार्थना केली असावी. म्हणून त्यांची व माझी ह्या अवेळी पूजेच्या चरकातून सुटका झाली ! मूर्तिपूजा ही पहिली पायरी म्हणून तिचे मंडन करणाऱ्यांनी हा एक धडा घेण्यासारखा आहे. काही असो, बाबांनी पूजा करणे अगर न करणे केवळ माझ्याच मर्जीवर सोपवून आपला समंजसपणा प्रगट केला व त्याचा सुपरिणाम असा झाला की, माझ्या धर्मबुद्धीला कायमचा धक्का पोचला नाही.

१९

मूर्तिपूजा

देव्हारा : येथपर्यंत मी जे लिहिले त्या माझ्या बालवयातल्या चेष्टा होत्या. हा प्राथमिक शाळेतला १२ वर्षाच्या वयातला काळ होता. ह्या काळातही मी घरी देवपूजा केव्हा केव्हा फार मन लावून करीत असे. देव्हाऱ्यावर देव पुष्कळ असत. शिवाय इतर कोनाड्यातूनही पूजनीय वस्तु पुष्कळ ठेविलेल्या असत. उदाहरणार्थ, आमचा देव्हारा म्हणजे देवघरातल्या भिंतीत माझ्या कंबरेइतक्या उंचीवर एक मोठा चार फूट रुंद व तितकाच उंच आणि ३/४ फूट खोल असा कोनाडा होता. त्यात प्रथम देवांच्या मूर्ती आणि पितरांचे टाक नीट मांडावयाचे असत. त्यापुढे शाळिग्राम, निरनिराळ्या नद्यांतले गोटे, त्याचेहीपुढे घंटा, धूपारती, कापुरारती निरांजने, पळी, पंचपात्री आणि उजवीकडे एका अडणीवर मोठा शंख आणखी एक लहान शंख वगैरे ठेवलेले असत. उजवीकडे आत पुन्हा एका खिडकीत श्री यल्लमाची चवरी आणि आमच्या आजीची ताळी वगैरे जवाहीर असे. डावीकडील एका लहानशा देवळीत एक समई आणि जवळ एक काशीहून आणलेला गंगोदक बंद करून ठेवलेला तांब्या अशा किती तरी वस्तूंचा सुंदर संभार असे.

पूजेचा उत्साह : मनाला आले की, ह्या सर्व देवदेवता आणि इतर वस्तु धुऊन पुसून व्यवस्थेने मांडून त्यावर गंधाक्षता, कुंकू, हळद, फुले यथासांग लावून पूजा करण्यात करण्यात त्या बाळपणी देखील मला मोठे सुख आणि ईर्षा वाटे. ती माझ्या वडील भावाला वाटत नसावी आणि हा आम्हा दोघा भावांमधील भेद बहुतकरून माझ्या बाबांच्या लक्षात आला असावा ; म्हणून ते मलाच पूजा करावयास सांगत असावेत. ह्यावरून माझ्या स्वभावातील उत्साह हा गुणही दिसून येतो. विशेष सणावारी घरी काही गोडधोड नैवेद्याचे झाले, म्हणजे माझ्या बाळभक्तीला पूरच येत असे. मानवी जातीप्रमाणे व्यक्तीतही सकाम भक्ती अगोदर असणारच. मग मला ह्यात लाज आणणारे काही विशेष नाही.

आध्यात्मिकता : मूर्तिपूजा मुलांना आणि बायकांना देखील आवश्यक नाही, असे माझे आता धर्माचा इतिहास शास्त्रीय दृष्टीने वाचून ठाम मत झाले आहे. तरी त्या वेळी मूर्तिपूजेत माझी मोठी करमणूकच होई. आपण काही विशेष गोष्ट करीत आहो असे वाटे. ती गोष्ट अध्यात्मिक होती, हे त्या वेळी वाटणे शक्यच नव्हते. तरी मला जो उत्साह आणि निरतिशय आनंद वाटत होता, तो केवळ नैवेद्याच्या लोभामुळेच होता असेही नव्हते. माझ्या बाबांची दरारा घरी फार होता, तरी माझ्या आईवर लहानपणीही मी इतका दाब टाकत असे की, हट्ट धरला असता तर देवांच्याही अगोदर मला केलेले गोड पदार्थ खावयाला मिळाले असते. बाबांनीही ज्या अर्थी पूजेची मजवर सक्ती कधी केली नाही त्या अर्थी पूजा करण्यात मला तितक्या कोवळ्या वयातही ९/१० वर्षांचा

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, समग्र वाङ्मय, खंड २ रा ~~~

विचार प्रकट केले आहेत ते विचार आता मी येथे भक्तीभावनेविषयी जी मीमांसा करीत आहे तिच्या उलट आहेत हे खरे ; पण हल्लीची माझी दृष्टी आधुनिक शास्त्रातील विकासवादाला अधिक सुसंगत आहे असे वाटते. ह्यामुळे हायस्कूलमधलाच काय पण पुढचाही माझ्या धर्मभावनांचा सर्व विकास माझ्या आयुष्यातील इतर सर्व अनुभवांशी आणि तदनुसार घडलेल्या वागणुकीशी तत्त्वत: मुळीच विसंगत नाही, असे माझे आता मत झाले आहे.

साधुसमागम : पोरवयातल्या सहजभक्तीच्या आठवणी सांगताना मी माझ्या पूजाअर्चाच्या, पोथीवाचनाच्या, नामजपाच्या, भजनाच्या व यात्रादिकांच्या वगैरे आठवणी सांगितल्या ; पण आणखी एका मुख्य विषयाच्या आठवणी सांगणे जरूर आहे. ती गोष्ट संतसमागम ही होय. आता ह्या पोरवयात मला खरे संत व खोटे संत ह्यात फरक तो काय कळणार? मी करीत होतो त्या भक्तीचा विषय जरी मूर्तीच होत्या आणि ती भावना जरी पोरकट होती, तरी त्या सर्व भावना त्या वेळच्या मानाने अगदी शुद्ध, निष्कपट आणि जोरदार होत्या एवढीच गोष्ट मुद्द्याची आहे. त्याचप्रमाणे ज्या ज्या काही पुरुषांच्या समागमामुळे मला ह्या वयात धार्मिक आनंद होत असे, त्या त्या पुरुषांचा खरा साधुपणा किंवा विज्ञान कोणत्या दर्जाचा होता हा मुद्दा गौण आहे. माझी श्रद्धा व प्रेम त्या माणसावर बसत असे हाच मुद्दा मुख्य आहे. ह्याच दृष्टीने पुढच्या आठवणींचे महत्त्व आहे. एरवी त्यात काही विशेष अर्थ नाही. बाबांना देवळांचा व भजनाचा जबर नाद होता, तसाच भटकणाऱ्या साधु-बैराग्यांचा आणि सिद्ध-महंतांचाही नाद होता. त्यांनी नादावून घरी आणलेल्या असल्या माणसांवरच साधु समजून माझीही श्रद्धा बसत असे.

जटाधारी गोसावी : अघोरी पंथातल्या एका जटाधारी गोसाव्याकडे बाबा एका काळी फार जात येत असत. त्या वेळी मी हायस्कुलात जात होतो की त्यापूर्वीचा हा काळ होता हे मला नीट स्मरत नाही. हा एका ठिकाणी गुप्त होऊन दुसरीकडे प्रगट होतो, अशी काही भाविक लोकांची समजूत झाली असावी. साधारणपणे हा बुवा गावाबाहेर कोठल्या तरी झाडाखाली धुनी पेटवून रात्रंदिवस अंगाला राख लावून बसलेला असे. तो बसल्या जागचा कधी उठतच नसे अशीही लोकांची समजूत असे. ह्याची मुद्रा प्रसन्न, बोलणे हेंगाडे व मराठीच का असे ना, पण प्रेमळ असे. हा एकाएकी एके दिवशी दोन प्रहरी आमच्या गोठ्यातल्या एका अंधारी कोपऱ्यात उभा असलेला आम्हाला दिसला. बाबा जरी विश्वासू आणि आदरशील होते, तरी भलत्यासलत्या चमत्कारावर भुलून जाण्याइतकी त्यांची श्रद्धा आंधळी नव्हती. म्हणून त्या बोवाचे हे चमत्कारिक येणे बाबांना आवडले नाही. त्यांनी त्याला आपल्या ठिकाणी पोचविले. तरी पण विशेष न रागावता त्या बुवाला रोज दोन प्रहरी एक भाकरी व थोडी भाजी पाठविण्यास बाबांनी आईस सांगितले. हे अन्न रोज नेऊन पोचविण्याचे काम मजकडे होते आणि ते मी आनंदाने करीत असे. ह्यात मला आनंद का वाटावा बरे ? लहान मुलाला असली कामे नियमाने करण्याची हौस असणे मुळीच साहजिक नाही. मला तर त्या साधूकडे जाऊन त्याचा समाचार घेणे, तो भुकेलेला गोसावी ते अन्न आतुरतेने घेई म्हणून विशेषत: कळकळीने ते पोचविणे, अन्न ज्या ताटातून नेत असे त्यात तो साधु चार दाळिंबाचे दाणे, खोबऱ्याचा लहानसा तुकडा किंवा थोडीशी खडीसाखर प्रसाद म्हणून काही तरी आपल्याजवळचे घालून ताट परत करीत असे- तो प्रसाद मी श्रद्धेने घरी भावंडांना आणून वाटणे वगैरे गोष्टी त्या

लहान वयात भक्तीच्याच द्योतक होत्या! केवळ भुकेलेल्यास अन्न देण्याची परोपकारी भावना किंवा साधुसमागमाची जाणूनबुजून आवड राखण्याच्या आध्यात्मिक भावनेला माझे ते लहान वय पात्र नव्हते. पण ह्या दोन्हीच्या मधली एक स्थिती मी तेव्हा अनुभवीत होतो हे खरे. तिला काय नाव द्यावे हे मला आता देखील नीट समजत नाही!

इतर बैरागी : मराठा जातीत कोणी तरी गोसावी गुरु करून घेण्याची परंपरा चालत आली आहे. नाशिक जिल्ह्यातील त्र्यंबकेश्वर येथील विठ्ठलपुरी नावाचे गोसावी माझे वडिलांचे गुरु होते. ते वृद्ध होते. त्यांचे शिष्य गोसावी ह्यांचा उपदेश मला आणि माझ्या भावाला बाबांनी कान फुंकण्याचा विधी करून देवविला होता. हे गोसावी एक दोन वर्षांनी आमचे घरी फिरतीवर येऊन संभावना घेऊन जात. त्या वेळी त्यांच्याशी माझा लळा विशेष असे. तुळजापूरचे भोपे भवानराव कदम आमचे घरी कुळदेवतेचा नवस वगैरे काय असेल ते घेऊन जाण्यास मधून मधून येत. तेही मला फार आवडत. पुढे इंग्रजी शाळेत असताना नाशिककडचे भगवानदास आणि माधवदास नावाचे दोन वैष्णव बैरागी आमचेकडे वरचेवर येत असत. हे नुसते पांथस्थ या नात्याने जमखंडीच्या कोठल्या तरी देवळात उतरून बाजारात भिक्षा मागून एक वेळ जेवून राहात. आमच्याकडून त्यांना कसलीही अपेक्षा नसे. तरी त्यांचा व आमच्या घरचा फार लोभ जडला होता. त्याचे विशेष कारण मी इंग्रजी शाळेत जाणारा, मोठा समजूतदार, प्रेमळ मुलगा हे ओळखून, बाबा असोत नसोत, माझ्या भेटीला घरी येऊन माझ्याशी त्यांनी परिचय वाढविला होता. शेवटी इंग्रजी ६ व्या ७ व्या इयत्तेत असताना बबलादीच्या सिद्धांचे येणे-जाणे फार वाढले.

योग्य पारख : देवपूजा, भजन, पोथीवाचन आणि साधूंची आवड वगैरे जे धार्मिक भावनांचे प्रकार आठवतील तसे मी सांगितले त्यावरून व आमच्या घराण्यातील आजी आणि आई ह्यांची व्रते आणि उपास ह्याविषयी जी मी हकिकत दिली तिच्यावरून आमच्या घराण्यात हिंदु धर्माची जुनी परंपरा, आचारविचार आणि बाळबोधपणा कसा रुजला होता हे दिसून येते. पण ह्यापेक्षा विशेष गोष्ट सांगावयाची ती ही की, जुन्या धर्माचे इतके तपशिलवार आचार आमचे घरी चालत होते तरी केवळ कर्मठपणा, धर्मभोळेपणा, दंभ आणि दुराग्रहाचा पगडा आमच्या घरी आईबाबांच्या वर्तनात मला केव्हाच दिसून आला नाही. एखाद्या ढोंगी साधूचे कपट दिसून आले किंवा कोणाही सांप्रदायिक अतिथीचा स्वार्थी मतलब दिसून आला की, बाबांचा निःस्पृहपणा उग्र स्वरूप धारण करीत असे. आल्या अतिथीची आमचे घरी जरी शक्तिनुसार संभावना होण्याला कधी चुकत नसे. तरी त्याने एखादे दुर्वर्तन केले किंवा त्याचा लोभी आणि मतलबी डाव दिसला तर लागलीच त्याची उलट दिशेने संभावना करावयाला बाबा कधी मागे घेत नसत ! ह्यामुळे भलत्यासलत्या सालोमालो भटक्याला आमचे दारात पाय ठेवण्यापूर्वी विचार करावा लागत असे. आईच्या भक्तीत कोणताही वरपंग नव्हता. माझ्या वडिलांच्या स्वभावातच माझ्या भावी सामाजिक आणि धार्मिक सुधारणेची बीजे पूर्णपणे आढळतात. आईने व्रते जरी बरीच केली तरी अमक्या वेळी अमका नवस केलाच पाहिजे, अमक्याला अमके दान दिलेच पाहिजे, असा हट्ट कधीच केला नाही. दोघांच्याही धर्मभावना साध्या, सहज आणि निर्हेतुक होत्या. आणि त्यातच माझ्या 'भावी' धर्माचा माझ्या सर्व सामाजिक सुधारणांचाही उगम आहे.

●●●

२०

भावी सामाजिक सुधारणेची तयारी

हायस्कुलात असताना विशेषतः ४ थ्या ५ व्या इयत्तेपासून पुढे माझ्यामध्ये भावी सामाजिक सुधारणेचे बीजारोपण कसे होऊ लागले ह्या संबंधीच्या आठवणी देऊन मी हा हायस्कूलचा काळ पूर्ण करणार आहे. ह्यालाही माझ्या आईबाबांचा धर्म आणि शील हीच केवळ कारणीभूत आहेत.

भावंडांची नावे : माझ्या आजा-आजींचा धर्म कसाही असो, ते जिवंत असेतोपर्यंत जरी माझ्या आईबाबांनी त्यांच्या पुरातन देवदेवींच्या उपासनेची परंपरा बिन तक्रार चालविली होती, तरी ती त्यांच्या पाठीमागे फार दिवस टिकली नाही. आजा-आजी असतानाच बाबांचा पंढरपूरच्या वारकरी पंथात नुसता प्रवेशच नव्हे तर पुढाकारही चालू होता. माझ्या वडील भावाचे लाडके नाव जरी भाऊ असे होते तरी त्याचे पाळण्यात ठेवलेले खरे नाव परशुराम हे होते. श्री यल्लमा हे रेणुकादेवी-जमदग्नी ऋषीची पत्नी-हिचे तेलुगू अथवा कानडी नाव होय. तिचा मुलगा परशुराम. हे नाव माझ्या भावाला श्री यल्लमाची भक्ती करणारी जी माझी आजी तिने ठेविले असावे. पण पुढील सर्व मुलांची नावे माझ्या बाबांनी आपल्या पंढरपूरच्या भागवत संप्रदायाप्रमाणे ठेविलेली आहेत. ती अशी, परशुरामाच्या पाठीवरच्या आणि माझ्या आधीच्या मुलाचे नाव कृष्णा. हा लहान असतानाच माझे आईचे अंगाखाली झोपेत चेंगरून मरण पावला, हे मागे आलेच आहे. ह्यानंतर माझे नाव विठू. जन्मपत्रिकेत माझे पाळण्यात ठेविलेले नाव तुकाराम असे आढळते. माझ्या जन्माचे वेळी बाबा पंढरपूरच्या वारीला गेले होते. म्हणून परत आल्यावर त्यांनी माझे नाव विठ्ठल हे ठेविले. मी पाचवा मुलगा. माझ्यानंतरचा मुलगा नाव ठेवण्यापूर्वी ६/७ वे दिवशीच वारला. नंतर मुलगी झाली. ती ७ वी जनाक्का. ही कार्तिक शुद्ध एकादशीस जन्मली. ह्या वेळीही बाबा पंढरपुरास जाऊन आले असावेत. आठवी मुलगी तान्याक्का. हिचे पाळण्यातले नाव मुक्ताबाई असे आहे. पुढे जी बरीच मुले झाली ती लहानपणीच वारली. त्यापैकी एकाचे नाव दत्त होते. शेवटचा मुलगा एकनाथ. अगदी अखेरचे मूल चंद्राबाई. हे नाव मात्र बबलादी सिद्धांचे जे उपास्यदैवत चंद्रगिरीताई तिचेवरून ठेविले होते. एकंदरीत वारकरी पंथाच्या साध्या, उदार, प्रागतिक, भागवत धर्माचा पगडा माझ्या वडिलांच्या मनावर आणि अकृत्रिम शीलावरही बसला होता.

मातापित्यांचे ऋण : तुकाराम हे नाव मागे पडून विठू हे माझे नाव कसे पुढे रूढ झाले त्याचा जरी शोध आता नीट लागण्याचा संभव नाही, तरी माझ्या बाबांच्या भागवत धर्मातून माझी भावी सामाजिक सुधारणा कशी उदय पावली हे शोधून काढणे तितके कठीण नाही.

विष्णुमय जग वैष्णवांचा धर्म। भेदाभेद भ्रम अमंगळ।।
कोणाही जीवाचा न घडो मत्सर। वर्म सर्वेश्वर पूजनाचे।।१।।

लहानग्या मित्रांबरोबर लडिवाळपणाने व मोकळेपणाने वागत. आई तर माझ्या कोणाही मित्राला आपल्याच मुलाप्रमाणे वागवावयाला केव्हाही तयार असे. ह्यामुळे आमचे घरी विश्वकुटुंबीयतेचा जिवंत देखावा अथवा साक्षात्कार दिसे.

नुसता पडदा न घालणे ह्यात काही विशेष नाही ; पण अंतःकरणातच मुळी पडद्याला थारा न देणे ही दैवी कृपा होय. आमचे घर म्हणजे ह्या कृपेचा एक देव्हारा होता! प्रापंचिक विपत्ती कितीही आल्या; दारिद्र्य, आजार, मरण, कर्जाचा बोजा असले इतर कितीही मनाची पारख करणारे प्रसंग आले, तरी घरचे शांतीचे वातावरण कधी क्षुब्ध होत नसे. येणेप्रमाणे भौतिक दारिद्र्यात आत्मिक श्रीमंतीचा भोग आमचे घरी आणि घरातील लहानथोर व्यक्तीत दिसत असे. अशा घरी मग जातिभेदाला कोठून वाव मिळणार! आधुनिक सुधारकांप्रमाणे जातिभेद मोडण्याची उठाठेव करण्याची आम्हाला कधी पाळीच येत नसे. कारण तो जातिभेदाचा संस्कारच आम्हावर घडला नव्हता. लहान मुलांपुढे मद्यपाननिषेधाच्या व्याख्यानाची जरुरीच नसते. त्याप्रमाणे जातिभेद मोडण्याचा कोणी आम्हाला उपदेश केला असता, तर तो मुळी आम्हाला समजलाही नसता. इतके आम्ही ह्या भेदाच्या अमंगळ विषाला अनभिज्ञ होतो!

मुलींचे शिक्षण : शिक्षणाचे बाबतीत आमच्या घराण्याचा त्या प्रांतात मोठा विशेष होता. बाबांनी जे पुस्तकी शिक्षण आणि जी बहुश्रुतता मिळविली ती त्या काळचे मानाने नावाजण्यासारखी होती. आणि मीही पुढे हायस्कुलात जाऊन सतत नंबर पहिला ठेविला व त्या काळच्या विद्यार्थी वर्गात अग्रगण्य झालो. ह्याचे प्रत्यक्ष श्रेय बाबांना नाही तरी अप्रत्यक्षपणे पूर्व भूमिका तयार केल्याचे श्रेय त्यांचेकडेच जाते. पण ह्यापेक्षाही त्यांच्या प्रागतिकपणाचे मोठे कौतुक करण्यासारखी गोष्ट म्हणजे त्यांनी आपल्या दोन्ही मुलींनाही शाळेत घातले ही होय. मी जसा माझ्या हायस्कुलात अगदी पहिल्या अमदानीतला मुलगा तशा माझ्या बहिणी त्या वेळच्या मुलींच्या शाळेतल्या जवळजवळ पहिल्याच विद्यार्थिनी होत्या! जनाक्का आणि तान्याक्का ह्या दोघी माझेपेक्षा धाकट्या बहिणी. पहिली मोठी हुशार, सतेज दिसे. दुसरी धाकटी मात्र अगदी भोळी आणि बुद्धीने मागासलेली असे. जनाक्का बाबांची विशेष लाडकी. क्षत्रिय घराण्यात लहानपणी मुलींना मुलांचाच पोषाख घालण्याची बऱ्याच ठिकाणी चाल आहे. अशा मुलींना वडील केव्हा केव्हा सभांतून व दरबारातून अशाच पुरुषी पोषाखात घेऊन जात असतात. जनाक्काचा हा पोषाख व त्या वेळचे तिचे बाळसे बाबांना व आमच्या घरच्या सर्व मंडळींना फार आवडत असे. आम्ही मुलांनी कधी विजार घातली नाहीत तरी पण जनाक्काला ऊर्फ आपल्या 'आईला' बाबांनी कोल्हापूरी पद्धतीची तुमान करून आवडीने घालावी! आणि तिनेही ती घालून मोठ्या दिमाखाने आम्हापुढे यावे!

स्वभाव-लक्षणे : वरील परिस्थितीत वाढल्यामुळे माझ्या भावी सुधारणेची तयारी कशी झाली हे निराळे फारसे सांगावयाला नको. स्वातंत्र्याची प्रीती, नव्या जीवनाचा शोक व सत्याचा छडा लावण्याची जन्मजात हौस ही माझ्या स्वभावाची मुख्य लक्षणे होती. ह्या लक्षणांना कोणत्याही तऱ्हेने आळा घालण्याचा माझ्या आईबाबांनी कधीही प्रयत्न केला नाही, हे केवढे माझे भाग्य. कुरणात चरणाऱ्या आईबापांजवळ त्यांचे शिंगरू ज्याप्रमाणे स्वच्छंदाने बागडत असते, तद्वत् माझ्या आईबाबांचा मला आश्रय होता पण दाब कसलाही नव्हता! मी एखादी चांगली, पण अगदी

स्वतंत्रतेचे अंत:करणापासून प्रेमाचे नाते असेल तरच आम्ही जात असू. एरवी नाही. ह्या न्यायाने मीरासाहेबांना किंवा त्यांच्या पत्नीना आमच्या घराण्यापुरता तरी आपला पडदानशीनपणा सोडावा लागला, हे सहजच आहे. अशा गोष्टी केवळ देवाणघेवाण ह्या व्यापारी तत्त्वाने किंबहुना आधुनिक सुधारकांच्या शुद्ध बुद्धिवादानेही घडून येण्यासारख्या नसतात. अंत:करणाचा जिव्हाळ, हेतूचा शुद्धपणा आणि अकृत्रिम प्रेम हा सर्व सुधारणांचा अढळ पाया होय. ह्याच तत्त्वावर आमच्या घराण्याला त्या जुन्या काळी व जमखंडीसारख्या मागासलेल्या अथवा कानाकोपऱ्यातल्या प्रांती एवढी प्रागतिकता राखता आली. तीच शुद्ध स्नेहाची तत्त्वे माझ्या हायस्कूलच्या काळात माझ्या स्नेह्यांशी आमच्या परस्पर वर्तनात होती.

पडदा, शिक्षण, जातिभेद वगैरेंचे बाबतीत इतकी प्रगती करून आमच्या विवाहाचे बाबतीत मात्र बाबांनी असा अविचार का केला ह्या वरील कारणांवरून खुलासा होण्यासारखा आहे. तो असा की, त्यांची प्रागतिकता केवळ नवीन बुद्धिवादावर किंवा विचारावरून अवलंबून नव्हती. ती निर्मळ अंत:करणावर व दांभिकपणाच्या अभावावर अवलंबून होती आणि ह्याच वळणानुसार माझेही वर्तन होते.

हायस्कूलमध्ये नवीन वाङ्मय, नवीन विषयांचे अध्ययन व नवीन संस्कृतीचा परिचय घडल्यामुळे माझ्या स्वत:मध्ये काही अंशी बुद्धिवादाचा अंकुर दिसू लागला होता. तो मॅट्रिकची परीक्षा पास होऊन मी कॉलेजात गेल्यावर अर्थात् जोराने फोफावू लागला. पण सातव्या इयत्तेत असताना त्या बुद्धिवादाची पूर्वचिन्हे थोडीशी माझ्या वर्तनात दिसू लागली होती. घरी माझे वजन घरगुती बाबतीत बाबांवरही पडू लागले. त्यामुळे त्यांनी माझी धाकटी बहीण मुक्ताबाई हिच्या विवाहाची घाई केली नाही. एरवी उपवर होण्यापूर्वी मुलींचे लग्न झालेच पाहिजे, ह्या समजुतीला जर आईबाबा चिकटले असते, तर मुक्ताबाईचे लग्न माझ्या आणि जनाक्काच्याप्रमाणे त्यांनी लहानपणीच उरकून घेतले असते. मुक्ताबाईचे लग्न ती जवळ जवळ १४ वर्षाची झाल्यावर झाले. त्या वेळी मी कॉलेजात होतो.

सहृदयता : मी मॅट्रिक्युलेशनच्या परीक्षेला पुणे सेंटरला बसून इ.स. १८९१ च्या नोव्हेंबर-डिसेंबर मध्ये पास झालो. त्या वेळी माझे वय १८ वर्षाचे होते. ह्या कोवळ्या वयात आणि मागासलेल्या कर्नाटक प्रांतातील जमखंडीसारख्या एका छोट्या ब्राह्मणी संस्कृतीच्या संस्थानात त्या जुन्या काळात माझ्या हातून सामाजिक सुधारणेचे जाणूनबुजून प्रयत्न होण्याचा प्रश्न नव्हता. वर ज्या गोष्टी सांगितल्या आहेत त्या केवळ माझ्या भावी सुधारणेची पूर्वचिन्हे एवढ्याच अर्थाने सांगितल्या आहेत. पण ह्यात एका महत्त्वाच्या तत्त्वाचा येथेच निर्देश करणे बरे वाटते. ते तत्त्व म्हणजे सामाजिक असो अगर धार्मिक असो कोणत्याही खऱ्या सुधारणेचे मूळ कारण शुद्ध बुद्धिवाद आहे किंवा सहृदयता आहे ह्याचा निर्णय हे होय. ह्या निर्णयाचे बाबतीत माझा कल दुसऱ्या कारणाकडे म्हणजे सहृदयतेकडे जास्त आहे. हीच गोष्ट मी वर लिहिलेल्या आठवणीतून बऱ्याच अंशी सिद्ध होऊ पाहते. निदान त्या वेळच्या माझ्या हायस्कूलच्या शिक्षणात तरी शुद्ध बुद्धिवादाचा प्रादुर्भाव करून देणारे विषय म्हणजे रसायनशास्त्र आणि खगोलशास्त्र ह्यांच्या मूलतत्त्वांची लहान पुस्तकेच होत. एका वर्षात ह्यांचे शिकवणीमुळे काय आणि त्यामुळे माझ्या विचारसरणीस निराळे

२१

कॉलेज प्रवेश

इ. स. १८९३ चे आरंभापासून तो इ. स. १८९८ अखेर सहा वर्षे मी पुणे येथील फर्ग्युसन कॉलेजमध्ये होतो. ह्या काळाचे दोन भाग पडतात. प्रिव्हियस आणि इंटरमिजियट परीक्षांचा पहिला भाग आणि बी. ए. आणि एल्एल्. बी. या परीक्षांचा दुसरा भाग. ह्या दोन भागात माझ्या घरची स्थिती, सांपत्तिक स्थिती, मनःस्थिती व देशस्थिती वगैरे अनेक कारणांमुळे बराच भेद पडला आहे.

घरची अत्यंत गरिबी, निराधार होऊन मी पुण्यासारख्या विस्तीर्ण शहरात कोणाची ओळख ना पाळख असा आलेला. तशात फर्ग्युसन कॉलेजमध्ये कसा प्रवेश मिळाला ह्याचे मला अद्यापी आश्चर्य वाटते. हायस्कुलातील सहाव्या इयत्तेतील माझे शिक्षक रा. वासुदेवराव चिरमुले, बी. ए. ह्यांनी 'पुणे येथे गरीब मराठा विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाचे बाबतीत मदत करणारी एक संस्था आहे,' असे सांगितले, म्हणून केवळ माझे नशिबाची परीक्षा करण्याकरिता मी ह्या अफाट शहरात येऊन पडलो.

त्या वेळी मला विसावे वर्ष देखील पुरे झाले नव्हते. मॅट्रिकच्या परीक्षेकरिता मी पुण्यास इ. स. १८९१ चे अखेरीस फार तर एक आठवडा राहिलो असेन ; पण परीक्षेच्या घाईत ह्या शहरातील परीक्षेच्या मंडपापलीकडे अधिक माहिती होणे संभवनीय नव्हते. आमचे हायस्कूलचे हेडमास्तर रा. त्रिंबकराव खांडेकर ह्यांना मी आवडत नसे. त्यांचे एक बंधु पुण्यास वकील होते. त्यांना एखादे माझ्या ओळखीचे पत्र दिले असेल की काय हेही मला आठवत नाही. ह्या वकिलांचा एक मुलगा जमखंडी हायस्कुलात शिकण्यासाठी आपल्या चुलत्याकडे राहण्यासाठी आला होता. त्याचेशी माझी थोडी ओळख होती. पण त्याची भेट होऊन त्याच्याकडून किंवा त्याच्या वडिलांकडून मला विशेष मदत झाली असेल असे काही मला वाटत नाही. पुण्यास गरीब मराठ्यांना कॉलेजात मदत करणारी डेक्कन मराठा एज्युकेशन असोसिएशन नावाची संस्था आहे व तिचे संस्थापक व सेक्रेटरी रा. गंगाराम भाऊ म्हस्के ह्या नावाचे एक मराठा जातीचे इंग्रजी शिकलेले पुढारी गृहस्थ प्रसिद्ध वकील आहेत वगैरे माहिती रा. खांडेकर वकिलांनी मला दिली असावी. ह्या वेळी सदाशिव पेठेतल्या हौदाच्या रस्त्यावरील फडतरे यांच्या वाड्यात मी थोडे दिवस होतो, एवढीच अंधुक आठवण मला आता आहे.

गं. भा. म्हस्के : गंगाराम भाऊ म्हस्के ह्या गृहस्थाचे मराठा जातीवर मोठ उपकार आहेत. त्या काळचे एक फरडे इंग्रजी शिकलेले, सुधारकी बाण्याचे हुशार वकील अशी त्यांची प्रसिद्धी होती. पुणे लष्करात मेन स्ट्रीटवर त्यांचे मोठे चांगले स्वतःचे घर आहे. रानडे, भांडारकर वगैरेसारखी त्या काळच्या सुधारक पक्षात त्यांची चांगली मान्यता होती. वकिलीत त्यांनी बरेच पैसे मिळविले होते. हिराबागेत असलेल्या कॉस्मॉपॉलिटन क्लबच्या दिवाणखान्यात पुण्याच्या तत्कालीन

माझा प्रवेश अशा तुटपुंज्या स्कॉलरशिपने झाला नसता. फर्ग्युसन कॉलेजचे प्रिन्सिपॉल वामन शिवराम आपटे (संस्कृत कोशकार) हे मी जाण्यापूर्वीच वारले असल्यामुळे त्यांचे जागी प्रसिद्ध सुधारक रा. गोपाळ गणेश आगरकर हे होते. हे गावात न राहता गावाच्या पश्चिम बाजूस ज्या विस्तीर्ण जागी हल्ली कॉलेजच्या स्वतःच्या इमारती आहेत त्या जागेवर एक झोपडे बांधून राहात असत. त्या झोपडीशिवाय आजूबाजूस त्या काळी वसतीचे एकही चिन्ह दिसत नव्हते. दरमहा दहा रुपये स्कॉलरशिपमध्ये माझा त्या वेळीही कॉलेजचा खर्च भागण्याचे मुष्किल होते. कारण कॉलेजची फी दरमहा ५ रु. वजा जाता माझ्या हाती ५ रुपयेच उरत ! म्हणून कॉलेजची फी माफ करण्याबद्दल मी एक अर्ज घेऊन प्रिन्सिपॉल आगरकर ह्यांना भेटावयाला गेलो.

आगरकर मोठे सुधारकाग्रणी ही कीर्ती माझ्या कानावर जमखंडीस असतानाच आली होती. इ. स. १८९२ साली मी जमखंडी शाळेत शिक्षक असताना त्यांचे सुधारक पत्रातले सणसणीत लेख माझ्या वाचनात येऊन माझी मते झपाट्याने सुधारणेच्या बाजूची बनत चालली होती. रा. गंगाराम भाऊ म्हस्के हे सुधारक आणि वकीलही होते. त्यांना पाहून पुणेरी सुधारक कसे असतात ह्याविषयी मला काहीशी कल्पना आली होती ; पण आगरकरांना प्रथम पाहिल्यावर त्या देखाव्याचा माझ्या ह्या कल्पनेशी नीट मेळ बसेना.

प्रि. आगरकर : माझ्या भेटीची वेळ सकाळी नऊ वाजण्याच्या सुमाराची होती. दिवस हिवाळ्याचे होते. आगरकर कायमचेच दमेकरी होते. ते झोपडीच्या बाहेर अंगणात उन्हात उभे होते. लोकरीचा जवळजवळ फाटलेला काळा मळकट कोट, चित्पावनी थाटाचे नेसलेले धोतर, लहानशा शेंडीचे थोडेसे विखुरलेले केस, पायात आगरकरी सुधारणेचा जोडा-म्हणजे ब्राह्मणी जोडाच ; पण त्याचे टाचेवरचे कातडे टाचेच्या मागे वर उभे आलेले, मुद्रा बरीच त्रासलेली, भुवयांचे केस दाट व डोळे किंचित् खोल व भेदक असे हे प्रथम दर्शन घडले. माझा अर्ज पाहून, मला डेक्कन मराठा असोसिएशनची स्कॉलरशिप मिळत आहे हे ऐकल्याबरोबर स्वारीने मला फी माफ व्हावयाची नाही हे निर्भीडपणे सांगितले. उगाच नादाला लावण्यापेक्षा त्यांचे हे तडकाफडकी उत्तर एका रीतीने योग्यच होते ; पण मजवर मात्र त्या उत्तराचा परिणाम बरा झाला नाही. आधीच त्यांचा एकंदर पोषाख व मुद्रा पाहून, त्यांच्या सुधारकी कीर्तीमुळे मी जी भलतीच कल्पना करून घेतली होती ती ढासळली होती आणि त्यावर हा नकाराचा बाँब मजवर आदळल्यामुळे आगरकरांविषयी माझा ग्रह अनुकूल झाला नाही. हा ग्रह कॉलेजच्या इतर प्रोफेसरांशी माझा पुढे जो अत्यल्प प्रत्यक्ष संबंध आला त्यामुळे काही म्हणण्यासारखा दुरुस्त झाला नाही. खरोखर पाहता ह्यात आगरकरांचा, इतर प्रोफेसरांचा किंवा कॉलेजच्या इतर परिस्थितीचा काहीच दोष नव्हता. केवळ ह्या निराशेला माझा अजाणपणा व व अननुभवीपणा हेच कारण होय.

●●●

२२

प्रीव्हियसचे वर्ष

कॉलेजचा पसारा : मी फर्ग्युसन कॉलेजातील पहिल्या म्हणजे प्रीव्हियसच्या वर्गात इ. स. १८९३ सालाचे आरंभी गेलो ; तेव्हा ते कॉलेज फुलग्रेड कॉलेज झाले होते की नाही हे मला आठवत नाही. निदान बी. ए. चा वर्ग त्या वेळी असला तरी तो सुरू होऊन फार वर्षे झाली असतील, असे मला वाटत नाही. कॉलेज पुणे शहरात शनिवार पेठेतील गद्रे ह्यांच्या वाड्यात भरत होते. त्यातच न्यू इंग्लिश स्कूलही भरत होते. त्याला लागूनच होळकरांचा मोठा वाडाही आहे. तो मी पुढे इंटरमिजिएट वर्गात गेल्यावर डेक्कन एज्युकेशन सोसायटीकडे आला होता. त्या वेळी शिक्षणासाठी ह्या मंडळींच्या एवढ्याच इमारती होत्या. खेळण्यासाठी पुढे लवकरच नारायण पेठेतील नदीजवळचा कबूतरखानाही मिळाला असावा. कारण आम्ही इंटरमिजिएटमध्ये असताना तेथे फुटबॉल खेळत होतो.

व्याख्यानपद्धती : प्रीव्हियसचा क्लास त्या वेळी गद्रेवाड्याच्या समोरच्या मोठ्या दिवाणखान्यात भरत असे, आमच्या वेळी देखील हा भव्य दिवाणखाना भरेल इतके सुमारे ६०/७५ विद्यार्थी तरी असत. ह्या वर्गात पोटतुकड्या नव्हत्या. त्यामुळे हा क्लास म्हणजे एक मेंढवाडाच दिसत असे. मराठी प्राथमिक शाळा सोडून जमखंडीस हायस्कुलात गेल्यावर मला जसे नव्या जगात व संस्कृतीत स्थित्यंतर झाल्याप्रमाणे वाटले तसेच तेथे वाटले. कॉलेजातल्या शिक्षणाच्या फरकाचे मुख्य लक्षण म्हणजे व्याख्यानपद्धती ही होय. शे-पन्नास मुलांनी एका उंच पीठावर बसलेल्या अगर उभ्या असलेल्या शिक्षकाचे निरूपण अगर प्रवचन ऐकत बसणे म्हणजे हायस्कूलमधल्या वैयक्तिक शिक्षणपद्धतीला मुकणेच होय. हायस्कुलाच्या वर्गात तीस मुलांपेक्षा अधिक शिष्यसमुदाय असणे इष्ट नाही. कॉलेजात ह्या संख्येला आळाच नसतो. त्यामुळे शिक्षकाचा शिष्याशी व्यक्तिगत संबंध तुटतो आणि विद्यार्थी धागा तुटलेल्या पतंगाप्रमाणे शिक्षकापासून किती लांब गेलेला असतो, हे शिक्षकास कळणे अशक्य होते. तथापि आम्ही व्याख्यान ऐकणारे सभ्य गृहस्थ (Gentlemen) झालो, ही भावना कॉलेजात गेल्याबरोबर प्रसवून एक प्रकारची आढ्यता येत असेल खरी; पण तिने खरा आध्यात्मिक किंवा बौद्धिक लाभ घडत नाही, हे माझ्या अनुभवास लवकरच येऊ लागले, आमच्या ह्या नवीन आढ्यतेची एक मौजेची गोष्ट आठवते, ती अशी--

मॅग्नाचार्टा : शे-पन्नास मुलांची हजेरी रोज घेणे अवश्य होते, कारण विश्वविद्यालयाच्या परीक्षेला बसण्यापूर्वी अमुक दिवसांची हजेरी (टर्म) कॉलेजात भरली आहे, असा दाखला विद्यार्थ्याला विद्यालयास द्यावयाचा असतो. प्रोफेसरचा वेळ हजेरी घेण्यात जाऊ नये म्हणून हे काम ह्या कॉलेजच्या श्री. दीक्षित नावाच्या एक अनुभविक कारकुनाकडे असे. हे भले धिप्पाड गृहस्थ न्यू इंग्लिश स्कूलमध्ये ड्रिलही शिकवीत असत. त्यामुळे हे लष्करी कुर्त्यात हजेरी घेत. ह्यांचा आवाज

दणकट व चर्या उग्रट म्हणून त्यांची वागणूक विद्यार्थ्यांशी-विशेषत: बाहेरगावच्या नवख्यांशी-थोडीशी चढेलपणाची व उर्मटपणाची होती. प्रत्येक विद्यार्थ्याचे नाव पुकारल्यावर विद्यार्थ्यांने Present Sir असे सभ्यपणाचे उत्तर द्यावयाचे असते. ही स्वारी विद्यार्थ्यांचे नाव पुकारताना त्याच्या मागे मिस्टर हे सभ्यतादर्शक उपपद लावण्याचा कंटाळा दाखवू लागली; पण विद्यार्थ्यांना आपण सभ्य गृहस्थ आहोत ही जाणीव होती. 'मिस्टर' नावामागे न ऐकू आल्याने Sir (महाराज) हे Present (हजर) ह्या उत्तरापुढे लावण्याची ही सभ्य मंडळी टाळू लागली. शेवटी हे प्रकरण प्रिन्सिपॉलपर्यंत जाऊन ह्या ड्रिल (कवाईत) शिकविणाऱ्या कारकूनजीला विद्यार्थ्यांच्या नावामागे मिस्टर हे पद जरूर लावण्याचा धडा शिकावा लागला ! आणि अशा प्रकारे आम्हा विद्यार्थ्यांनाही आम्ही सभ्य गृहस्थ आहोत ह्याबद्दलचा मॅग्नाचार्टा-पुराव्याचा पट्टा-मिळाला!

लाजाळू वृत्ती : सभ्य गृहस्थपणाचे तिसरे लक्षण म्हणजे हायस्कूलप्रमाणे कॉलेजात शिक्षकांपुढे ५/६ तास रोज डांबून बसण्याची आवश्यकता नव्हती. दोन तीन तास दोन तीन विषयांवर व्याख्याने ऐकली की, आम्ही सभ्य गृहस्थ झालो मोकळे! मग वाटल्यास पुस्तकात डोके खुपसून बसा, किंवा खेळाच्या मैदानात बागडा किंवा गावातून उनाडक्या करा. कोणा विचारणाराच नसे. सभ्यपणाच्या लक्षणांच्या एकाहून जास्त माळा इतरांप्रमाणे माझ्याही गळ्यात जरी पडल्या होत्या, तरी मी इतरांसारखा व इतका एकदम काही 'सभ्य गृहस्थ' होण्याइतका धीट बनलो नाही. भेदरट, लाजाळू, अनोळखी असा मी सर्वात मागच्या बाकावर बसत असे आणि ही सवय पुढे अनेक कारणांनी शेवटपर्यंत मला कायम जडली.

आमच्या कॉलेजचे त्या वेळी विद्यार्थी वसतिगृह नव्हते. ते पुढे १८९५ साली कॉलेजची स्वत:ची इमारत चतु:शृंगीच्या माळावर उभारल्यावर झाले. ते झाल्यावरही माझ्यामध्ये निरंतर सुख मानून वास करणाऱ्या माझ्या दारिद्र्य मित्राने तेथे राहण्याची मला मनाई केली. अर्थात मग मला शहरात जेथे जागा मिळेल तेथे माझ्या बिऱ्हाडाची सोय करावी लागली.

पेच-प्रसंग : मला स्कॉलरशिप तर अवघी दरमहा १० रुपयांची! प्रिन्सिपॉलने माझ्या फी माफीचा अर्ज तर देखतहुकूम धुडकावून लावला. दरमहा ५ रुपये कॉलेजची फी. तरीही सगळ्या टर्मची आगाऊ ३० रुपये भरावयाची होती. शिवाय कॉलेजची पुस्तके व इतर उपकरणे घ्यावयाची होतीच. मग खोलीभाड्याला व खाणावळीला काय उरणार? मी ही सर्व आवश्यक सोय कशी लावली ह्याचा उलगडा मला आता किती आठवण करून पाहिले तरी सुचत नाही. मी त्या वेळी काय केले ते एक हरीच जाणे! विशेष पेच हा की, ज्या आगरकर महाशयांनी मला नादारी दिली नाही, त्यांच्या सुधारकांतील लेख वाचून माझी अलीकडे कित्येक दिवसापूर्वीपासूनच त्या हरीवरील श्रद्धाही बरीच कमी कमी होत आली होती; पण ज्या अर्थी मी जगून वाचून राहिलो आणि बी. ए. व अर्धा एल. एल. बी. झालो त्या अर्थी ह्या सर्व सोयी झाल्या हे तर खासच आणि ज्या अर्थी तुरुंगात कधी गेलो नाही व आजारीही फारसा पडलो नाही त्या अर्थी मी काही तरी उपाय केले असावेत.

वरील प्रश्नास उत्तर म्हणजे त्या वेळची स्वस्ताई आणि त्यापेक्षाही निखालस उत्तर म्हणजे गरजा आणि उणीवा सहन करण्याची माझी अपार तयारी. माझ्या आईबाबांनी विशेषत: ही

माझी तयारी सगळ्या आयुष्यभर पुरून मागे मुलांबाळांस लागल्यास उरेल इतकी केली होती. मी पुण्यास आल्याबरोबर जरी कॉलेजातला 'सभ्य गृहस्थ' बनलो नाही, तरी कशीही वेळ आल्यास वर्षअखेर परीक्षा उतरण्याची तयारी ठेविली.

तिघेजण : कोठून ओळख निघाली किंवा काढली ते काही आता आठवत नाही; पण लवकरच सदाशिव पेठेतील ताडपत्रीकरांच्या वाड्यातील ढेलजीतील दोन खणांची एक खोली आम्हा तिघा जमखंडीच्या विद्यार्थ्यांना भाडे काही न पडता राहावयास फुकट मिळाली. हे तिघे विद्यार्थी म्हणजे जनुभाऊ करंदीकर (रा. जनार्दन सखाराम करंदीकर), विश्वनाथ पोंक्षे आणि मी स्वत:! ह्याच खोलीत केव्हा केव्हा अभ्यास करावयाला व विशेषत: आम्हा सर्वांच्या आवडीचे वर्गात लावलेले इंग्रजी पुस्तक जेन ऑस्टिनची कादंबरी 'प्राइड ॲण्ड प्रेज्युडीस' हे आमच्याबरोबर वाचावयाला वाईचे केशव रामचंद्र कानिटकर 'फर्ग्युसन कॉलेज' चे भावी प्रसिद्ध प्रिन्सिपॉल, हे ही येत असत. बाहेरगावचा (पुण्याचा नव्हे हो) हाच काय तो सोबती आणि मित्र आम्हा जमखंडीकरांना लाभला आणि तो अद्यापी टिकला आहे पण खुद्द पुण्याच्या एकाही विद्यार्थ्याने अंगाशी लावून घेतले नाही. ह्याचे नाव पुणे.

कॉलेज खर्च : राहण्याची सोय झाल्यावर अर्थात खाणावळही पाहिलीच. दरमहा ५ रुपयांत, कदाचित ४।। ही असतील, खाणावळ मागे. भात, चपाती, वरण, भाजी, तूप, साखर सर्व काही बेताने, पण असेच. दूध नाही तरी पुण्याचे नमुनेदार पारदर्शक ताक तरी असेच! आंघोळीला पाणी पुण्यातील तेव्हांच्या हौदात गल्लोगल्ली थंडगार मुबलक मिळे. वाटेल तितक्या बादल्या टाळक्यावर ओतून घेतल्या तरी कोणी विचारीत नसत. पाण्याच्या बाबतीत पुण्याइतका सुखी गाव त्या वेळी साऱ्या जगात कोठे नसेल! बाकीचा चिल्लर खर्च आम्ही तिघांमध्ये अगदी गोडीगुलाबीने सहज वाटून घेत असू. एकंदरीत त्या वेळचा माझा कॉलेजचा खर्च हल्लीच्या माझ्या मुलाच्या हायस्कूलच्यापेक्षा निम्म्याहूनही कमी येत असावा. एरवी माझे शिक्षण झालेच नसते!

काटकसर : कॉलेजात दरवर्षी दोन मोठ्या सुट्या होत्याच. त्या वेळी घरी येण्याजाण्याचा जो आगगाडीचा खर्च होई तो खाणावळीचा जो खर्च वाचे त्यातून होई. कुडची स्टेशनावरून जमखंडीस जावयाला ३३ मैलांचा गाडीचा रस्ता आहे. कित्येक वेळा माझा सर्व बोजा घेऊन हा सर्व रस्ता मी पायीच प्रवास केलेला मला नीट आठवत आहे. बैलगाडीत एका स्वारीला चार आण्यांपासून फार तर आठ आण्यांपर्यंत खर्च येई. तो वाचविण्यासाठी मला हे ३३ मैल पायीच रखडावे लागे. आजची तरुण मंडळी मुंबईत अर्धा मैल जावयाचे झाल्यास निदान एक आणा ट्रामला खर्चून वर दोन आण्यांचा चहा पितात. एवढ्यातच हात आटोपले तरी त्यांना काटकसरी म्हणण्यास मी तयार आहे.

मला दरमहा दहा रुपयेप्रमाणे एक वर्षात १२० रुपये स्कॉलरशिप मिळे. त्यात साठ रुपये तर कॉलेजची फी झाली. बाकीच्या साठ रुपयांत जितके महिने मी पुण्यास राहात असे तितके ५ रु. तरी खाणावळीस द्यावे लागत. सुट्टीतले वाचलेले रुपये गावी जाण्यायेण्यास, खोलीभाड्यास आणि दिवाबत्ती, न्हावी, धोबी वगैरे खर्चास आवश्यक असत. मग माझ्या कॉलेजच्या पुस्तकांना मी पैसे कोठून आणिले ह्याचा मला काहीच थांग लागत नाही. जरूर तेवढीच पुस्तके आमची

स्वत:ची निरनिराळी असावीत; बाकीची काही तिघांत मिळून होती. तरी एवढी जरूर ती पुस्तके आम्ही कशी विकत घेतली असतील, हे मला आता काहीच आठवत नाही. मात्र मी ती किंवा त्याची किंमत कोणापासून चोरली नव्हती एवढेच स्पष्ट आठवते. अशा कठीण कात्रीत माझी कॉलेजची पहिली तीन वर्षे, म्हणजे इंटरमिजिएटची दुसरी परीक्षा पास होईपर्यंत मी कसे दिवस काढले ती ईश्वर जाणे!

पैशांची टंचाई : माझी प्रिलिमिनरी म्हणजे कॉलेजातील पूर्वीची चाचणी परीक्षा पास झाली. अर्थात् मला मुंबईच्या विश्वविद्यालयातील पहिल्या प्रीव्हियस परीक्षेला बसावयाचे होते. त्या परीक्षेची फी २० रुपये होती. ती कोठून आणावयाची हा मोठा तातडीचा प्रश्न पडला. परीक्षेचा फॉर्म (अर्जाचा नमुना) भरण्याचे दिवस आले; पण वीस रुपये काही मजजवळ येईनात. मी गांगरलो! वेळ कठीण आला. प्रीव्हियसच्या ही पूर्वीची एक अधिकच परीक्षा मजपुढे आली म्हणावयाची ! शेवटी हताश होऊन बसलो असता एका गृहस्थाने एक विचार सुचविला. नरहरपंत नावाचे एक गरीब ब्राह्मण गृहस्थ भटकीसाठी ताडपत्रीकरांच्या वाड्यात जात-येत असत. त्यांचा व आम्हा विद्यार्थ्यांचा परिचय झाला होता. मी मराठा असून इतका शिकलो ह्याचे त्यांना कदाचित कौतुक वाटत असावे. मी ह्या पेचात पडलो असे पाहून त्यांनी मला रावबहादूर नवलकर नावाच्या एका प्रभू सुधारक गृहस्थाकडे नेले. त्यांनी मला परीक्षेच्या फीकरिता दोन रुपये दिले व माझी फार निकडीची गरज आहे म्हणून मला ताबडतोब मदत करावी अशा अर्थाची एक चिठ्ठी, आपल्या काही मित्रांची नावे मला कळवून, त्यांना दाखविण्यासाठी दिली. परंतु ही चिठ्ठी घेऊन इतक्याजणांकडे जाणे मला फारच अवघड वाटू लागले. एक तर ही माणसे फार मोठमोठी होती आणि त्यांचे बंगले शोधून काढून त्यांच्यापुढे जाऊन उभा राहिलो तरी ते मला कसे वागवितील ह्याची मला फारच भीती वाटू लागली. कारण अशा प्रकारच्या याचनेचा माझ्या आयुष्यातला हा अगदी पहिलाच प्रसंग होता. रावबहादूर नवलकरांच्या घरीदेखील मला रा. नरहरपंतांनीच बळेबळे नेले होते. त्यांनीच मला भरीस भरवून रावबहादूर महादेव गोविंद रानडे, डॉ. रामकृष्ण गोपाळ भांडारकर, सरदार कुप्पुस्वामी मुदलियार, वकील राजन्ना लिंगो वगैरे मोठमोठ्या माणसांकडे पाठविले. इतर काहीजणांकडे ही चिठ्ठी घेऊन मी उन्हातान्हातून दीनवाणा होऊन फिरलो; त्या सर्वांची नावे आता आठवत नाहीत. रुपये सारे १४ च जमले. फी भरण्याची घाई तर अगदी गळ्याला फासासारखी लागली. अशा स्थितीत कधी न विसरण्यासारखी गोष्ट घडली ती अशी.

डॉ. शेळके : वरील चौदा रुपये जमविण्याकरिता मी ज्या गृहस्थांकडे गेलो त्यात मराठा जातीचा कोणीच गृहस्थ नव्हता. प्रत्यक्ष म्हस्केसाहेबांकडे मी मुळीच गेलो नाही. कारण त्यांनी आपल्या संस्थेतून स्कॉलरशिप दिली, ह्याचेच मला असह्य ओझे झाले होते. फीला पुन: पैसे पाहिजेत, हे दैन्य त्यांचेपुढे दाखविण्याचे धैर्य मला मुळीच होईना. सबंध वर्षभर मी जे काटकसरीचे हाल सोसले त्यापायी मदत मागण्यास जर मी त्यांचेकडे कधीच गेलो नाही, तर मग आता तरी कसे जावयाचे! शेवटी नरहरपंतांनी डॉ. शेळके नावाच्या एका मराठा जातीच्या गृहस्थांच्या घरी जाण्याचा आग्रह केला. शुक्रवार पेठेत बाळंत स्त्रियांसाठी जो दवाखाना आता आहे तेथे पूर्वी म्युनिसिपालिटीचा एक दवाखाना होता. त्यात शेळके हे डॉक्टर होते. हे मूळचे कोल्हापूरचे. तेथे त्यांचे एक घर आहे. ह्यांचेपुढे मी नवलकरांची चिठ्ठी ठेवल्याबरोबर त्यांनी जे मला खरपूस

तासडले ते मला आमरण आठवेल ! "मराठ्यांच्या कुळात जन्मून असे हे भिक्षापात्र मिरविण्याची तुला लाज वाटत नाही ? जवळ पैसे नसल्यास गुरे राखावीत. कशास शिकावे? ..." वगैरे वगैरे. ती चिठ्ठीच नव्हे तर मजजवळचे १४ रुपयेही ह्या मराठा जमदग्नीपुढे ठेवून तेथून निसटावे असे मला झाले. माझ्या अंगाला घाम आला.

सौ. बहिणाबाई : बाकीचे ६ रुपये आणि मुंबईला जाण्याचा खर्च ह्याबद्दल मला जी अनपेक्षित मदत झाली ती अशी--तेरदाळचे रा. विष्णुपंत देशपांडे हे माझे अत्यंत जिवलग बाळमित्र. माझ्यावर आलेली ही अडचण त्यांच्या लक्षात आली. ते घरचे जरी श्रीमंत होते तरी ते स्वत: वयात न आल्याने त्यांचे हाती पैसे खेळत नव्हते. त्यामुळे त्यांना तळमळ लागली. त्यांची प्रेमळ पत्नी सौ. बहिणाबाई* यांना ही तळमळ पाहवेना. त्यांनी आपल्या माहेराकडून दिवाळीतील भाऊबीजेच्या ओवाळणीत मिळालेले २० रुपये रा. विष्णुपंतांमार्फत मला पोचविले. जुन्या वळणातील ही साध्वी बाई आपल्या नवऱ्याचा मी मोठा भाऊ असे समजून मजसमोर अद्यापि कधीही उभी राहिली नाही. असा हा खऱ्या कळकळीचा अपूर्व मासला होता. मात्र ह्यापुढे मी स्वत:साठी कोणापुढे भीक अशी कधीच मागितली नाही. तरी आतापपर्यंत माझा व माझ्यावर अवलंबून असलेल्यांचा योगक्षेम चालला ह्यांचे श्रेय डॉ. शेळके ह्यांनाच देणे मला बरे वाटते! परोपकारासाठी पुढे लाखो रुपये जमविण्याची पात्रता व इच्छा मला आली ह्यातही कदाचित् डॉ. शेळके ह्यांचाच हा विरोधी आशीर्वाद कारण झाला असेल, नसेल कशावरून?

आमच्या वेळेला आताप्रमाणे प्रीव्हीयसची परीक्षा कॉलेजात घेत नसत. तिचेसाठी आम्हाला मुंबईलाच जावे लागले. त्या निमित्ताने मला ह्या मोहमई ऊर्फ मुंबईचे प्रथम दर्शन घडले. ह्या प्रथम दर्शनाचा परिणाम मुळीच अनुकूल नव्हता. आम्ही अगदी ऐन परीक्षेच्या वेळीच मुंबईस आलो आणि जागेपणाचे बहुतेक तास अभ्यासात किंवा परीक्षेचे पेपर्स लिहिण्यातच जात. त्याशिवाय मुंबईची कोंडलेली गर्दीची वस्ती, समुद्रकाठची घामट हवा, मुंबईच्या लोकांचा आत्मशून्य वरपांगी स्वभाव इत्यादी अनेक कारणे होती. कांदेवाडीत खत्रे यांच्या चाळीत दोन खणांचे एका खोलीत आम्ही काहीजणांनी जागा घेतली. त्या वेळी ह्या दोन खणांना चार रुपये भाडे पडले. ते आम्हाला किती जास्त वाटले! पण आता त्याच जागेला १२ रु. पेक्षा जास्त भाडे पडत असावे. रात्रंदिवस जागून कशीतरी परीक्षा देऊन मी फार वेळ न दवडिता सुट्टीत जमखंडीस गेलो. परीक्षेत पास झाल्याचा निकाल जमखंडीस समजला. माझ्यापेक्षा माझ्या आईबाबांनाच फार आनंद झाला!

●●●

* बहिणाबाई--विष्णुअण्णांच्या पत्नीचे माहेरचे नाव कृष्णाबाई, सासरचे अंबा व प्रचारातले बहिणाबाई असे होते.

२३

इंटरमिजिएटचे वर्ष

उलटा प्रकार : माझ्या हायस्कूलच्या काळापेक्षा कॉलेजचा काळ फार निराळा गेला. हायस्कुलात गेल्यापासून आमच्या घरच्या सांपत्तिक परिस्थितीमुळे मला मोठी आपत्ती कशी भोगावी लागली ह्याचे वर्णन मी केलेच आहे; पण ही आपत्ती मी अजून लहान व मुग्ध असल्यामुळे मला तितकी जाणवली नाही. ती माझ्या आई बाबांस जाणवली. मी त्यांच्या आश्रयाखाली सुखात (चैनीत) नाही तरी समाधानात होतो. जमखंडीसारख्या मागासलेल्या ठिकाणच्या मानाने माझा अभ्यास व हुषारी फार चांगली असल्यामुळे व मला स्कॉलरशिप मिळत असल्यामुळे मी आनंदात असे. आईबाबांच्या सहवासाशिवाय माझ्या भोवतालच्या मित्रमंडळींच्या सहवासामुळे माझा हायस्कूलचा सर्व काळ अगदी मजेचा गेला; पण कॉलेजचा सर्व प्रकार ह्याच्या उलट घडला.

गाढवी सवाष्णी : प्रीव्हियस परीक्षेत मी पास झालो असे मला जमखंडीसच कळले. कॉलेजची परीक्षा पास झालेला पहिलाच विद्यार्थी ह्या नात्याने जमखंडी गावात माझी ख्याती अधिकच पसरली. पुण्यास परत येऊन मुंबई इलाख्यातील प्रीव्हियसला बसलेल्या सर्व विद्यार्थ्यांमध्ये माझा नंबर कितवा आला आहे हे जेव्हा मला कळले तेव्हा माझी मोठी निराशा झाली. माझा नंबर पहिल्या वर्गात किंवा दुसऱ्या वर्गात तर आलाच नव्हता, पण तिसऱ्या वर्गातही फारसा वर नव्हता, हे पाहून जमखंडीतील माझी हुशारी म्हणजे खेडेगावात गाढवी सवाष्णी ही म्हण प्रत्ययास आणून देणारीच एक चीज झाली. जमखंडी हायस्कूल म्हणजे एक क्षुद्र उंबराचे फळ, त्यात भराऱ्या मारणारा मी एक किडा. मुंबई विश्वविद्यालयाच्या विस्तीर्ण उघड्या अंगणात आल्यावर माझे अल्पबळ मला कळून आले!

ह्याशिवाय कॉलेजशिक्षणात मी निस्तेज होण्याची दुसरीही अनेक कारणे होती. माझ्या घरच्या गरिबीची जाणीव जी मला हायस्कुलात घडली नाही ती पुण्यास मी एकटाच आईबापांपासून दूर राहू लागल्यामुळे मोठ्या तीव्रपणाने भासू लागली. शिवाय माझ्या लाजाळू स्वभावामुळे जमखंडीतलेच जे काय एक-दोन ओळखीचे सोबती होते, त्यापलीकडे पुणेकर विद्यार्थ्यांपैकी कोणाशी माझी मैत्री जमली नाही. जनार्दनपंत करंदीकर, विश्वनाथ पोंक्षे आणि मी ह्या तिघा जमखंडीच्या विद्यार्थ्यांपैकी करंदीकर आणि मी दोघेच पास झालो.

कंगाल स्थिती : फर्ग्युसन कॉलेजची त्या वेळेची स्थितीही माझ्या स्वत:च्या स्थितीप्रमाणे कंगालच होती. वसतिगृह, क्रीडांगण वगैरे इतर उपकरणांचा व विद्यार्थ्यांनी वरचेवर एकत्र जमण्याच्या प्रसंगाचा अभाव असल्यामुळे त्या वेळची आमची निदान माझी तरी स्थिती जंगलात चुकलेल्या कोकराप्रमाणे असह्य भासत होती. अनेक कारणांमुळे कॉलेजच्या शिक्षणावर माझे प्रेम बसेना.

कोवळ्या शिरावर पडली. हे किती प्रचंड ओझे मी शिरावर घेतले ह्याची मला त्या वेळी काहीच कल्पना नव्हती ! ह्या वेळी माझी इंटरमिजिएट क्लासातली एक टर्म संपली असावी; पण मला हा काळ नक्की कोणता हे आता आठवत नाही.

बाळमित्र : प्रीव्हियस परीक्षा पास होऊन मी पुण्यास आल्यावर प्रथम नारायण पेठेत मुंजाबाचे बोळासमोरील केळकरांचे वाड्यात खोली घेतली होती. एक खोली माझी आणि दुसरे कोल्हापूरचे रा. गोविंदराव सासने यांची असे जोडखोलीचे ते एक दालन होते. दुसरे विजापूरचे रा. गोविंदराव कलकेरी आणि कोल्हापूरचे रा. तळाशीकर ह्यांचे एक जोडखोलीचे दालन, अशा चार खोल्या आम्हा चौघांमध्ये होत्या. अर्थात् मी ह्या वेळी खोलीचे भाडे भरीत होतो; पण कसे ते मला सांगता येत नाही. रा. सासने ह्यांची ओळख नक्की कोठे व कशी झाली हे मला आता निश्चितपणे आठवत नाही; पण आरंभापासून अगदी आतापर्यंत टिकलेल्या अगदी थोड्या मित्रांपैकी, म्हणजे चौघा मित्रांपैकी ते एक आहेत. तेरदाळचे विष्णुपंत देशपांडे हे इंग्रजी ५-६ व्या इयत्तेपासून म्हणजे इ. स. १८९० पासून, प्रिन्सिपॉल केशव रामचंद्र कानिटकर हे प्रीव्हियस वर्गापासून म्हणजे इ. स. १८९३ पासून आणि गोविंदराव सासने इंटरमिजिएट वर्षापासून म्हणजे सन १८९४ पासूनच माझे मित्र आहेत. पहिले देशस्थ, दुसरे कोकणस्थ ब्राह्मण आणि तिसरे मराठा जातीचे आहेत. चौथे जनार्दनपंत करंदीकर हे तर माझ्या गावचेच बाळमित्र आहेत. ह्यापेक्षा जास्त लहानपणापासूनचे मित्र किंवा अलीकडचेही कोणी विशेष म्हणण्यासारखे समान वयाचे मित्र मला नाहीत.

रा. सासने : सासने ह्या वेळी पुणे नेटिव्ह इन्स्टिट्यूशन नावाच्या हायस्कुलातील ७ व्या इयत्तेतील विद्यार्थी होते. ते वयाने माझेपेक्षा सुमारे वर्ष-सहा महिन्यांनी मोठे असावेत. हे दिलदार मनाचे मराठा मित्र लवकरच माझ्या घरातल्या माणसाप्रमाणे मला जवळचे भासू लागले. 'समानशिले व्यसनेषु सख्यम्' ह्या न्यायाने आम्हा दोघांचा सहज जो स्नेहसंबंध जडला तो कायमचाच जडला. माझा स्वभाव तापट तर त्यांचा किरकिऱ्या! ह्या प्रकृतिदोषामुळे आमच्यात नेहमी कमीअधिक गोष्टीवरून वाद माजे व तो विकोपासही जाई; पण त्या मतभेदामुळे आमच्या स्नेहात लवमात्रही बाधा येत नसे. गोविंदरावांची घरगुती स्थिती माझ्याप्रमाणे तंग नव्हती. त्यांचे वडील कोल्हापुरातील एक घरंदाज फौजदार होते. खाऊनपिऊन सुखी असे ते घराणे होते. माझी उदार मते व मोकळा स्वभाव यावर लुब्ध होऊन गोविंदराव मजबरोबर राहू लागले. ते आणि आम्ही जरी अभ्यासात भिन्न वर्गातले होतो, तरी परस्परांचा स्वाभाविक चांगुलपणा ओळखून होतो.

स्वयंपाकव्रत : ह्या वेळी साहजिकपणे मला खर्चाचा फारच तुटवडा पडत असावा. कारण खानावळीत न जाता मी घरीच माझा स्वयंपाक काही दिवस करून जेवत होतो आणि केवळ माझ्यासाठी म्हणून गोविंदरावही माझेप्रमाणे स्वयंपाकी बनले असतील असे वाटते; पण दुसऱ्या टर्ममध्ये परीक्षेचे दिवस जवळ येऊन अभ्यासाचा मारा जास्त पडल्यावर आम्हाला हे स्वयंपाकव्रत नाइलाजाने सोडावे लागले. मी किंवा गोविंदराव या कलेत कधीच प्रवीण होण्यालायक नव्हतो. भात आम्ही चांगला करीत असू; पण गव्हाची पोळी मात्र खाण्यापेक्षा प्रदर्शनात पाठविण्याच्या अधिक लायक होत असे. त्यामुळे प्रकृतीवरही परिणाम होऊन हा नाद आम्ही सोडला.

पुस्तके जरी मी म्हणण्यासारखी पुष्कळशी वाचली नसली तरी जी तात्त्विक महत्त्वाची वाचली त्यांचा माझ्यामध्ये फार जोराचा अभिनिवेश घडला. थोडक्यात सांगावयाचे म्हणजे जमखंडीतल्या आमच्या वाड्यातल्या अंधेऱ्या देवघरात बसून श्रीशिवलीलामृताचे पारायण करीत शिवलिंगावार श्रावणी सोमवारी सहस्रदळे वाहिल्याशिवाय तोंडात पाणी न घेणारा मी पुण्यात आल्यावर आगरकरांचे लेख आणि मिल्ल-स्पेन्सरचे प्रत्यक्ष ग्रंथ वाचून पुण्यातल्या विद्यार्थ्यात एक पक्ष्या नास्तिक बनलो!

चर्चामंडळ : मी नुसते वाचून स्वस्थ बसणारा युवक नव्हतो. जे आपल्या मनात आले ते दुसऱ्याजवळ बोलून त्यावर चर्चा करावयाची प्रवृत्ती किंबहुना खोड माझ्यामध्ये आनुवंशिकच होती. माझ्या वडिलांप्रमाणेच मलाही बोलावयाला फार आवडते. मात्र लाजाळूपणाचा दाब असल्यामुळे अपरिचिताजवळ किंवा अप्रासंगिकपणे वाक्तांडव करण्याचे मात्र मला कधी धैर्य होत नसे. तथापि पोटात घटकाभर विष आवरेल, पण नवीन विचार अगर एखादा सुंदर अनुभव मनाला घडला, की कोणा तरी सहानुभूतीच्या मित्राजवळ किंवा आप्ताजवळ ओकूल टाकल्याशिवाय मला चैनच पडत नसे. ह्यामुळे केळकरांच्या वाड्यात असताना माझ्या नेतृत्वाखाली आमच्या खोलीत एक छोटेखानी Debating Union [चर्चामंडळ] स्थापन करण्यात आले होते. त्याच माझा सुळसुळाट जास्त असावयाचा. ह्या लहानशा मंडळात नवीन भेटलेल्या मिल्ल-स्पेन्सरच्या विचारांची पुनरावृत्ती करण्यात मी मोठे वक्तृत्व पाजळीत असे. ह्या वक्तृत्वाची सवय आमच्या जमखंडीतील वसंत व्याख्यानमालेतल्या माझ्या ढुढ्ढाचार्यपणावरून मला लागत चालली होती. विचारस्वातंत्र्य, व्यक्तिस्वातंत्र्य, विकासवाद, स्त्रीदाक्षिण्य इ. मोठमोठ्या अवजड विषयावर लहान तोंडी मोठा घास घेण्याचे मला जमखंडीतल्या वसंत व्याख्यानमालेतच अंगवळणी पडले होते. मग पुण्यासारख्या वाचाळ आणि मुंबईसारख्या चवचाल शहरांचा संपर्क घडल्यावर आणि विशेषत: मिल्ल-स्पेन्सरच्या तत्कालीन वेदतुल्य नवीन विचारांच्या ज्ञानलवांनी दुर्विदग्ध झाल्यावर माझे डोके ताळ्यावर राहणे कठीण झाले. मंडळातील सभांतून नव्हे तर विद्यार्थ्यांशी खासगी संभाषणात मी त्यांना माझा नवीन तुटपुंजा नास्तिकपणा शिकवू लागलो. त्या वेळी मी एक लहानसा निबंध इंग्रजीत लिहिला होता. त्यात 'देवाने माणसाला निर्माण केले नसून उलट माणसानेच देवाला निर्माण केले' हे अर्धवट सत्य मी मोठ्या उत्साहाने प्रतिपादिले होते, हे पण आता नीट आठवते! ते कसेही असो, कोणी कोणाला निर्माण केले हा वाद जगाच्या अंतापर्यंत चालणारा आहे; पण इतर अनेक कारणात माझ्या विक्षिप्त खाजगी वाचनाची आणि वादविवादांची भर पडून ठराविक अभ्यासाची आबाळ झाली. अर्थात् मला इंटरमिजिएट परीक्षेत अपयश आले! जमखंडी हायस्कुलातील पहिला नंबर विश्वविद्यालयात बराच खाली घसरतो; इतकेच नव्हे तर उगीच घमेंड मारील तर चांगली आपटीही कसा खातो, हे माझ्या प्रत्यक्ष अनुभवास आले. विशेष हा की, ज्या (Logic) तर्कशास्त्र ह्या विषयात माझा विशेष तोरा चालत असे त्यातच मी नापास झालो हे पाहून 'ज्वर इव मदो मे व्यपगत:' हा भर्तृहारीचा टोमणा मला चांगलाच जाणवला!

पशुपणा : परीक्षेत नापास होण्याचा अनुभव मला आतापर्यंत मुळीच नव्हता. तो आला हे एका परीने बरेच झाले. वाईट वाटणे साहजिकच होते ; पण अगदी धक्का असा बसला नाही. मात्र विश्वविद्यालयीन परीक्षांविषयी आदर कमी कमी होऊ लागला. ह्या परीक्षेच्या चरकांत तरुण

काही तरी पौष्टिक असले पाहिजे, म्हणून भिजलेली डाळ, वाळलेले खोबरे आणि खारका ह्यांचा खुराक आम्ही सर्वांनी चालू केला. मग काय विचारता? झटपट पैलवान बनण्यास आतुर झालेले आम्ही जाता-येता डाळीचे फक्के मारणे, खोबऱ्याचे चावे घेणे आणि खारका कुरतडणे ह्यात एकमेकावर चढाओढ करू लागलो. जो जास्त खाऊन पचवील तो शूर वीर ही व्याख्या ठरली. अशात पाडव्याचा की कसलासा सण आला. खानावळवाल्या बाईने केळाचे शिकरण केले होते. अर्थात् केळापेक्षा शिकरणात पाण्याचेच प्रमाण बेफाम जास्त झाले होते. मी मागे पुढे न पाहता त्याचा समाचार घेतला. तिसरे प्रहरी पुन्हा कच्ची डाळ, खोबरे, खारका आणि कैऱ्या ह्यांचा तोबरा चालू झाला. ह्याचा परिणाम काय झाला, हे निराळे सांगण्याची आता जरुरीच उरली नाही.

आजार : त्या रात्री इतर मंडळी निजली; पण मला काही झोप येईना. पोटात घडघड करू लागले; कळा येऊ लागल्या आणि वादळ झाल्यावर ज्याप्रमाणे वळवाच्या पावसाच्या सरीवर सरी याव्यात त्याप्रमाणे जोरजोराचे जुलाब मला होऊ लागले. चारपाच जुलाबानंतर मला जिना उतरून खाली पायखान्यापर्यंत जाण्याची शक्ती उरली नाही. खोलीतल्या न्हाणीतच विधी उरकावा लागला. असे १०/१२ जुलाब झाल्यावर नीट बसावयाचेही त्राण उरले नाही. पोटातल्या तिडिकांना कसली उपमा द्यावी हे समजत नव्हते. कोणी तरी दोघांनी मिळून एखादे धोतर जोराने पिळून त्यातला पाण्याचा थेंबन् थेंब बाहेर काढावा तशी माझ्या आतड्याची अवस्था झाली. ही उपमा तरी हल्ली माझ्या आतड्याला पीळ पडला नाही म्हणूनच सुचत आहे. त्या वेळेला ही सुंदर उपमा सुचणे शक्यच नव्हते!

दुःखानंद : कादंबरीकार आपल्या स्वकपोलकल्पित कथानकातील नायक-नायिकेच्या दुःखाच्या वेदनांचे रसभरीत वर्णन करीत असतो, ह्याचे कारण तो स्वतः त्या वेदनांच्या चटक्यांपासून सुरक्षित असतो म्हणूनच. एरवी हे काव्य शक्यच नाही. संगीत नाटकातील पात्रे रंगभूमीवर उभी असताना त्यांच्यावर घोर संकट ओढवले असता मोठमोठ्याने आलाप काढून आपल्या दुःखाचे वर्णन प्रेक्षकांपुढे करीत असतात. फासावर जाणारा चारुदत्त इतका सुंदर गातो की गाऊन गाऊन मरावयाला पडद्याआड जाऊ लागला म्हणजे लोक त्याला "वन्स मोअर" करून पुन्हा फासावर आणतात आणि चारुदत्त लोकाग्रहास्तव पुन्हा त्याच वेदनांचा आनंदाने उपभोग घेतो. हा प्रकार पाहून मला तर माझे हसेच आवरत नाही! अरे पण मी कोणीकडे भरकटत चाललो? मीही त्या नटाप्रमाणेच माझ्या जुलाबांचे वर्णन चालू करतो; कारण पोटात हल्ली दुखत नसल्याने वर्णन करण्यास कोणती हरकत आहे.

मुक्तता : उजाडल्यावर उतार पडला; पण तेव्हा माझ्या तोंडावर निव्वळ प्रेताची कळा आली होती. आदले दिवशी सायंकाळी ज्यांनी पाहिले होते त्यांना दुसऱ्याच दिवशी पहाटे माझी ओळख लागेना. अशी भयंकर पालट केवळ सहा तासात घडली! सकाळी कोणत्याशा डॉक्टरला बोलावून आणिले. त्याने तत्काळ थोडासा हिंग आणि तूप खावयास दिले; पण औषधापूर्वीच व्याधीचा अस्त झाला असल्याकारणाने हे नाटक शोकपर्यावसायी झाले नाही. मात्र डाळ, खोबरे आणि खारका ह्यांच्यावर हद्दपारीची शिक्षा ताबडतोब समरीपॉवरने बजावण्यात आली. झटपट पहिलवान होण्याची ईर्षा बाळगणाऱ्या मला घरी नुसते पत्र लिहिण्याचे सामर्थ्य यावयालाही बरेच

आम्ही मुलीच्या शिक्षणक्रमात अडथळे आणू. ह्याचा सरळ अर्थ मला तरुण हिंदूला कळेना. मुलीच्या हिताच्या दृष्टीने ही अट अवश्य होती, असे बाईंचे मत पडले. पण ज्या नवमताचे पाणी ही पंडिता प्याली होती त्याचे चार थेंब माझ्याही पोटात गेले होते. मी उत्तर दिले, "बाई, शिक्षणात अडथळे आणण्यासाठी मी बहिणीस तुमच्याकडे पाठवण्याचे नाकारीन हे खरे कारण नाही. तिने ख्रिस्ती होण्यास आम्ही अडथळे आणू ही भीती तुम्हास असणे साहजिकच आहे. मुलीस नियमाप्रमाणे (विद्याखात्याच्या) सर्व सुट्या तुम्हाला देणे अवश्य आहे. मुलीच्या हिताची काळजी निदान तुमच्या इतकी तरी मला व मुलीच्या आईबापांना आहेच, हा विश्वास तुम्हाला असावा. तुमच्या शिक्षणाने मुलगी आपखुशीने व अक्कलहुशारीने ख्रिस्ती होऊ लागल्यास निदान मी तरी अडथळा आणणार नाही. तिच्यावर तिला न कळत जबरी तर राहोच, पण भुलभुलावणी होऊ लागली तर ते मी सहन करणार नाही. बेहत्तर आहे अशी तुमची अटीतटीची मदत न मिळाली तरी!"

पंडिता रमाबाईंना मी तरुण असून दिसतो तसा बावळट नाही, हे कळून चुकले. त्यांनी माझ्याविषयी अधिक चौकशी केली. मी फर्ग्युसन कॉलेजचा विद्यार्थी आहे असे ऐकल्यावर, ह्या कॉलेजचे प्रोफेसर नास्तिक आहेत, असा शेरा त्यांनी मारला. जखडलेल्या धर्मापेक्षा मोकळा नास्तिकपणा बरा, असे मी माझे मत सांगितले.

प्रो. कर्वे : ह्या सुमारास प्रो. आण्णासाहेब कर्वे यांनी हिंगणे येथे अनाथ बालिकाश्रमाची स्थापना नुकतीच केली होती. त्यांच्याकडे मी माझ्या बहिणीसाठी भेटावयास गेलो होतो. शेणमातीने सारवलेल्या कुडाच्या भिंतीच्या एका खोपटात प्रो. आण्णासाहेब जमिनीवर बसले होते. त्यांचे आश्रमात ब्राह्मण जातीच्याच १०/१५ विधवा मुली होत्या. माझे बहिणीला आपल्या आश्रमात घेता काय ह्या माझ्या प्रश्नाला, "ब्राह्मणेतरांच्या मुलींना घेण्याचा हा काळ नाही" असे प्रोफेसर आण्णासाहेबांनी सांगितले व माझ्या बहिणीला आश्रमात घेण्याचे साफ नाकारले. त्यामुळे माझी फार निराशा झाली. तत्कालीन महाराष्ट्रात एक सुधारणा करताना दुसऱ्या सुधारणेला कसा अडथळा येई ह्याचे हे उदाहरणच आहे.

मिस् मेरी भोर : पुढे माझ्या बहिणीच्या शिक्षणासाठी मला पुष्कळ धडपड करावी लागली. तिला मी शेवटी पुणे येथील प्रसिद्ध (हुजूरपागेतील) मुलींच्या हायस्कुलात घातले. जमखंडीस तिच्या ३/४ मराठी इयत्ता झाल्याच होत्या. इंग्रजी पहिल्या इयत्तेत तिचे नाव घालण्यास कोणतीच हरकत नव्हती. पण हिंदु विवाहित स्त्री म्हणजे कोणत्या भयंकर तुरुंगात असते, ह्याची कल्पना मला नव्हती. शाळेचे अधिकारी चि. जनाक्काच्या नवऱ्याची तिच्या शिकण्यास परवानगी मागू लागले. तिचे येथवर शिक्षण झाले हेच तर तिच्यावर नवरा जिवंत असून वैधव्याचा असला प्रसंग गुदरायचे कारण झाले वगैरे माहिती मला कष्टाने सांगावी लागली. नवऱ्याच्या हरकतीची जबाबदारी मी घेतली. तिला शाळेत प्रवेश मिळाला, पण मला तिला कोठून तरी स्कॉलरशिप मिळवावयाची होती. माझा वशिला तर कोठेच नव्हता. त्या वेळी हुजूरपागेत मिस् मेरी भोर नावाची हुशार ख्रिस्ती बाई शिक्षकीण होती आणि मिस् हरफर्ड नावाची एक युरोपियन बाई मुख्याध्यापिका होती. त्या दोघींना जनाक्काचा कळवळा आला. उच्चवर्णीय हिंदु लोकात घटस्फोटाचा कायदा नाही आणि

केला. युनिटेरीयन पंथाच्या बऱ्याच लहान लहान चोपड्या मी वाचल्या. Larger meaning of Uniteranism हे चोपडे मला फार बोधपर वाटले. त्याच वर्षी पुणे येथील प्रार्थनासमाजात एक लहानशी एकेश्वरी पंथाची परिषद भरली होती, असे मला पुढे किती तरी वर्षांनी कळले. आमच्या लोकांची काम करण्याची पद्धत किती टाळाटाळीची व पाश्चात्यांची विशेषत: अमेरिकनांची किती आकर्षक आहे हे कळले. डॉ. संडरलंडसाहेबांनी हिंदुस्थानातील आपल्या कामाचा अहवाल देशातील युनिटेरिअन सभेपुढे मांडला व विशेष सूचना केली की, हिंदुस्थानातील एकेश्वरी पंथाचा (ब्राह्म व प्रार्थनासमाजाचा) एक तरुण होतकरू विद्यार्थी अमेरिका, इंग्लंड येथील धर्माला वाहिलेल्या कॉलेजात स्कॉलरशिप देऊन बोलविण्यात यावा. ह्या सूचनेप्रमाणे १/२ वर्षात कलकत्त्याहून ब्राह्मसमाजाने दर दोन वर्षांनी एक असे तीन विद्यार्थी पाठविल्यानंतर इ. स. १९०१ साली पुढे स्वत: माझीच ह्या कामी योजना झाली.

प्रपंचाची काळजी : पण हा योग १८९५ साली मला कळण्यासारखा नव्हता. मला पुन्हा इंटरमिजिएटमध्ये बसावे लागले. पुण्यास मी व माझी बहीण, शिवाय १८९६ मध्ये माझ्या पत्नीलाही बहिणीबरोबर शाळेत घालुन ह्या तिघांचा पुण्याचा खर्चच नव्हे तर जमखंडीस माझे आईबाप व इतर ३ भावंडे ह्यांच्याही खर्चाचा भार माझेवरच पडला. मला १० रु. आणि जनाक्का हिला १० रु. अशी दरमहा वीस रुपयांचीच काय ती जमा असे. शिकवणीचे ५/७ रु. मिळालेच तर भर पडे. बाकीच्या खर्चाचे कर्जच होऊ लागले ! मोठी काळजी पडली. माझ्या तीन सख्ख्या बहिणी ; पण प्रपंचाची काळजी ही चौथी एक जन्माची सख्खी बहीण होती. तिनेच मला शहाणे केले. तितके शहाणपण मला मुंबई विश्वविद्यालयाने किंबहुना ऑक्सफर्ड विद्यालयानेही दिले नाही.

जादा मदत : पण नुसत्या काळजीने उपासमारीचा लांडगा काही दारातून निघत नाही. शेवटी मला बडोदा नरेश श्रीमंत सयाजीराव महाराज यांची आठवण झाली. डेक्कन मराठा असोसिएशनकडून मला दोन किंवा तीन वर्षे दरमहा १० रु. प्रमाणे फार तर ३६० रु. स्कॉलरशिप मिळाली व १८९६ साली इंटरमिजिएट मध्ये पास झालो. पण पुढे बी. ए. ची दोन वर्षे कशी जावीत ही विवंचना श्रीमंत गायकवाड महाराजांपुढे समक्ष ठेवण्यास मी बडोद्यास सुमारे १८९६ मध्ये गेलो. श्री. लक्ष्मणराव माने ह्या नावाचे एक थोर मनाचे मराठा गृहस्थ बडोदे येथे शहाबाग ह्या भागात होते. त्यांची व माझी कशी ओळख झाली व त्यांचेहुन एक बडे गृहस्थ श्री. खासेराव जाधव ह्यांचा व माझा कसा संबंध जडला हे मला काहीच आठवत नाही. तरी ह्या सद्गृहस्थांच्या शिफारशीने महाराजांनी माझ्यासारख्या निराधार तरुण विद्यार्थ्याची गाठ घेतली. त्यांनी मला दरमहा २५ रु. स्कॉलरशिप दिली. ही रक्कम मला डेक्कन मराठा असोसिएशनचे द्वारेच मिळावयाची होती. ही मदत मिळते म्हणून ह्या संस्थेने आपली १० रु. ची मदत बंद केली. खरे पाहता मला १५ रु. च अधिक मिळू लागले. तेवढ्यालाच पाहून भुकेचा लांडगा आमचे दार सोडून दूर गेला. ही स्कॉलरशिप देताना माझ्याकडून स्टँपवर एक कायदेशीर बाँड लिहून घेण्यात आला. त्यात माझे शिक्षण संपल्यावर मी बडोदा संस्थानात नोकरीस राहावे ; नाही तर घेतलेल्या स्कॉलरशिपची रक्कम परत करावी असा स्पष्ट करार होता ; पण ईश्वरी घटनेमुळे ह्यातील एकही अट पुरी करणे झाले नाही. कसे ते पुढे ओघाने कळेल.

●●●

२४

पदवीग्रहण

सवलत : बी. ए. मध्ये माझे ऐच्छिक विषय इतिहास आणि कायदा हे होते. माझा विशेष कल तत्त्वज्ञानाच्या अभ्यासाकडे असतांना लॉजिक आणि मॉरल फिलासफी, न्यायशास्त्र आणि नीतिशास्त्र हे विषय न घेता, मी इतिहास आणि कायदा हे विषय घेतले ह्याचे कारण बी.ए.च्या कायद्याच्या पेपरमध्ये शेकडा ६० वर मार्क मिळाल्यास फर्स्ट एल्एल् बी. ची परीक्षा पास झाली असे गणण्यात येत होते, म्हणून मी या सवलतीचा फायदा घेण्यासाठी ही निवड केली, दुसरे कारण असे की, माझे शिक्षण पुरे झाल्यावर कुठल्याही सरकारी नोकरीत अडकवून घेण्यापेक्षा सार्वजनिक कार्यात पडण्याचा माझा इरादा होता. त्यासाठी स्वतंत्रपणे वकिली करणे भाग होते, त्याशिवाय भावी आयुष्यांत माझा इतिहासाकडेच कल असल्याचे पुढे आढळून आले, विचारांच्या दोन पद्धती आहेत. एक तत्त्वज्ञानांची मोघम पद्धत, तीत ज्ञात कारणावरून अज्ञात कार्यांकडे; जाणे आणि दुसरी ऐतिहासिक पद्धत; तीत ज्ञात कार्यावरून अज्ञात कारणांचा शोध करीत जाणे, दुसरी पद्धत नवी असून अधिक परिणामकारी म्हणून मला तीच जास्त पसंत पडली; पण ही पसंती पुढील शिक्षणाचे काळांत झाली.

डेक्कन कॉलेज : कायदा ह्या विषयावरील व्याख्याने त्या वेळी डेक्कन कॉलेजात होत होती. त्यासाठी आम्हांला फर्ग्युसन कॉलेजातून डेक्कन कॉलेजात जावे लागे, त्या वेळी अनुभाऊ करंदीकर, माधव नारायण हुल्याळ इतकी मंडळी जमखंडीकरांचे शनिवारांतल्या वाड्यांत राहात होती. तेथून फर्ग्युसन कॉलेजात जाऊन तेथून डेक्कन कॉलेजात आठवड्यांतून दोनदा पायीं चालत जावे लागे, टांग्याचे भाडे जबर पडत असल्याने आणि त्या वेळी पुण्यांत सायकलीचा सुळसुळाट झाला नसल्याने मला पावसांत भिजत, उन्हाळ्यात शिजत एवढा मोठा पल्ला गाठावा लागे. पण त्याचे मला काही वाटत नसे, संगमावरून होडी चालू असे, तीत बसून शेतावरून डेक्कन कॉलेजला जाण्यास एक जवळच वाट होती. एकदा असे झाले की, कॉलेजवरून परत येण्यास रात्र पडली आणि होडी बंद झाली होती. मी एकटाच होतो, अंगावरचे सारे कपडे डोक्याला गुंडाळून मी पोहून संगमावर आलो. याचे माझ्या मित्रांना फार आश्चर्य वाटले. पावसाळ्यांत नदीला पूर आल्यावर फर्ग्युसन कॉलेजपासून होळकर ब्रिजवरून डेक्कन कॉलेजांत जाऊन, परत येते वेळी बंडगाईनवरून यावे लागे.

निकाल : १८९७ साली पुण्यास प्रथम फेगचा कहर सुरू झाला, त्या वेळी शाळा-कॉलेज बंद झाल्याने, माझ्या घरच्या मंडळींना घेऊन जमखंडीस जावे लागले. या सुमारास मुंबईस हिंदु-मुसलमानांचा दंगा सुरू झाल्याने पुण्यात सार्वजनिक गणपतीचा उत्सव लो. टिळकांनी राष्ट्रीय

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, समग्र वाङ्मय, खंड २ रा ~~~

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, समग्र वाङ्मय, खंड २ रा ~~~

बाहेरून येणाऱ्या मंडळीनाही हा प्रकार विशेष असा वाटला नाही. माझे मित्र मीरासाहेब हथरूट या मुसलमान गृहस्थास व लिंगायत, ब्राह्मण इत्यादी जुन्या मित्रांस ह्या प्रकाराचे कौतुक वाटले.

रा. सुखटणकर : मी इंटरच्या वर्गात असतांना कोल्हापूरच्या वासुदेव अनंत सुखटणकर नावाच्या एका गरीब सालस विद्यार्थ्यांची गाठ पडली. सदाशिव पेठेत आम्ही पालकर यांचे वाड्यात असताना ते आमच्याच जागी राहू लागले. ह्यांच्याशी फारच मैत्री जमल्यावर पुढे हेही माझ्याबरोबर प्रार्थनासमाजात जाऊ येऊ लागून शेवटी सभासदही झाले, सन १८९५ साली पुण्यास काँग्रेस भरली त्या वेळी अमेरिकेतील डॉ. जे. टी. संडरलड ह्यांची पुण्यास व्याख्याने झाली असा उल्लेख येऊन गेला आहेच. अमेरिकेतील युनिटेरियन समाजाकडून प्रतिनिधी म्हणून युरोप-अमेरिका येथील उदारधर्माच्या समाजाचे हिदुस्थानातील प्रार्थना व ब्राह्म इत्यादी उदारधर्माच्या समाजाशी अधिक दळणवळण व सहकार्य करण्यासाठी काय उपाय करावा यास्तव सूचनावजा रिपोर्ट करण्यासाठी हे हिदुस्थानात आले होते. त्यांना भेटण्यासाठी माझे बरोबर सुखटणकर हेही असत.

रा. मोतीबुलासा : सन १८९९ च्या सुमारास न्यू इंग्लिश स्कूलचे पदवीधर तरुण शिक्षक रा. मोतीबुलासा बी. ए. ह्यास ऑक्सफर्ड येथील मँचेस्टर कॉलेज येथे हिंदी विद्यार्थी म्हणून तौलनिक धर्माच्या अध्ययनासाठी पाठविण्याची नेमणूक झाली. विलायतेस रवाना झाल्यानंतर वाटेत पोर्टसय्यद येथे वातज्वराचा विकार होऊन त्याचे (१५ सप्टेंबर, १९००) आकस्मिक निधन झाले. ही बातमी ऐकून पुणे व मुंबई येथील प्रार्थना-समाजिस्टांना फार वाईट वाटले. विशेषत: समाजाचे गुरुवर्य डॉ. भांडारकर यांच्या मनाला ती गोष्ट फारच लागून राहिली. मोतीबुलासांच्या दुखवट्यानिमित्त पुणे प्रार्थनासमाजांत डॉ. भांडारकरांनी एक विशेष उपासना चालविली. त्या वेळी त्यांनी मोठे कळवळीचे दु:खोद्‌गार वाढले. त्यांच्या डोळ्यांतून सतत अश्रुधार चालली होती. ह्या प्रकारचा माझ्या हृदयावर जोराचा परिणाम झाला. गुरुवर्य व्यासपीठावरून उतरताच मी त्यांचेजवळ जाऊन, 'मोतीबुलासांच्या निधनाने रिकाम्या पडलेल्या जागेसाठी मला जर गुरुवर्यानी पात्र ठरविले तर मी विलायतेस जाण्यास तयार आहे' असे सांगितले. ते ऐकून गुरुवर्यास आनंदाचे भरते आले व त्यांनी मला मोठ्या प्रेमाने कुरवाळले.

अटींचा खुलासा : मेंचेस्टर कॉलेजांत हिंदी विद्यार्थ्याला पाठवावयाचे झाल्यास त्याला बऱ्याच अटी असतात. अशा विद्यार्थ्याची वरिष्ठ विद्यालयीन शिक्षणांत बरीच प्रगती व्हावयाला पाहिजे असते. इतकेच नव्हे तर ब्राह्म व प्रार्थनासमाजाच्या कार्याविषयी त्याच्यामध्ये पात्रता दिसून काही थोडेबहुत कार्यही व्हावयाला पाहिजे असते. या सर्व गोष्टी ध्यानांत घेऊन तो विद्यार्थी ज्या भागातला असेल त्या भागांतील सभासदांनी आणि कार्यवाहकांनी त्याची एकमताने शिफारस करायला पहिजे. डॉ. संडरलंडच्या सूचनेनुसार अशा विद्यार्थ्याची निवड करण्यासाठी आदि ब्राह्मसमाज, साधारण ब्राह्मसमाज आणि नवविधान ब्राह्मसमाज या कलकत्त्यांतील तिन्ही शाखांच्या प्रतिनिधीची ब्राह्मसमाज कमिटी या नावाने नेमलेली एक एक समिती आहे. वरील प्रांतिक सभासदांची शिफारस या समितीकडे जाऊन तिने ती पसंत करावयास पाहिजे असते. विलायतेतील ब्रिटिश अँड फॉरेन असोसिएशन ही संस्था अशा पसंत झालेल्या विद्यार्थ्यास वर्षाला १०० पौंडांच्या स्कॉलरशिप दोन वर्षे देत असते. पण विलायतेला आण्याचा प्रवासखर्च या विद्यार्थ्याने आपला

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, समग्र वाङ्मय, खंड २ रा ~~~

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, समग्र वाङ्मय, खंड २ रा ~~~

२५

विहंगमावलोकन

हेतू : परदेशात १९०१ ते १९०३ या दोन वर्षात माझे जे निरीक्षण व शिक्षण झाले त्याचा आराखडा विहंगमदृष्ट्या प्रथम घेणे बरे. मी इंग्लंडांत केवळ ऑक्स्फर्ड येथे मॅंचेस्टर कॉलेजात धर्माचे पुस्तकी शिक्षण घेण्याकरता गेलो नव्हतो. मुख्यत: तुलनात्मक पद्धतीने जगातील सर्व धर्माच्या इतिहासाचे ऊर्फ विकासाचे अवलोकन करून स्वत:ची धर्मबुद्धी विशद करून धर्मप्रचाराची तयारी करणे हा तर मुख्य हेतु होताच. पण तो एक हेतु होता. शिवाय युरोपातील प्रमुख चालीरीती पाहाव्या, वाङ्मय वाचावे, पंडित आणि सज्जन यांच्या भेटी घ्याव्या, नव्या-जुन्या संस्थांची वाढ निरखावी, निरनिराळ्या वर्गाची-विशेषत: खालच्या व चिरडलेल्या वर्गाची-अंत:स्थिती ओळखावी व त्यांच्यांत राहावे. सुंदर आणि प्रेक्षणीय स्थळे पाहावीत आणि तेथे एकान्तवास करावा व आत्मशोध करावा. इ. अनेक हेतू होते.

कॉलेजातील सुट्ट्या : मॅंचेस्टर कॉलेज हे सुधारकी कॉलेज होते. ऑक्स्फर्ड युनिव्हर्सिटीत जुन्या ख्रिस्तीमताचा दाब दृढ असल्याने ह्या कॉलेजचा त्या युनिव्हर्सिटीत प्रवेश होणे शक्य नव्हते. तथापि त्या विश्वविद्यालयाचा बरा-वाईट परिणाम व संसर्ग ह्या कॉलेजवर न घडणे अशक्य होते. ह्या कॉलेजचा अध्ययनाचा व अनध्ययनाचा ऊर्फ सुट्टीचा काळ इतर कॉलेजांप्रमाणेच नियमित केला होता. पहिली टर्म ऑक्टोबरच्या मध्यापासून तो डिसेंबरच्या मध्यापर्यंत ८/९ आठवड्यांची व नंतर नाताळची सुट्टी ४ आठवडे. दुसरी टर्म जानेवारीच्या मध्यापासून तो मार्चच्या मध्यापर्यंत ८ आठवडे व नतर इस्टरचा सुटी ६ आठवडे. तिसरी टर्म मेच्या सुरुवातीपासून जवळ जवळ जून अखेर; नंतर उन्हाळ्याची दीर्घ सुट्टी सप्टेंबरअखेर १२ आठवड्यांची. म्हणजे जवळ जवळ सहा महिने सुट्टी व सहा महिने अभ्यास असा प्रकार आहे. मी ऑक्स्फर्डमध्ये दोन वर्षे होतो. त्या काळी सहा टर्म्स व सहा सुट्या पडल्या. पहिली नाताळची सुट्टी मी लंडनमध्ये घालविली. दुसरी सुट्टी पॅरिसमध्ये घालविली. तिसरी उन्हाळ्याची दीर्घ सुट्टी इंग्लिश व स्कॉच Lake Districts मध्ये, म्हणजे पर्वत शिखरे व सरोवरे पाहण्यांत हिंडून घालविली. पैकी पहिले पंधरा दिवस बॉरोडेल नावाच्या सुंदर दरीत डरवेट वॉटर नावाच्या सुंदर सरोवराच्या किनाऱ्यावर माझे परमपूज्य प्रो. जे. एस्लीन कार्पेटर यांच्या लिथ नावाच्या कुटीरांत पाहुणा म्हणून होतो. माझ्याबरोबर ७/८ विद्यार्थी होते. चौथी दुसऱ्या नाताळची सुट्टी मी मुद्दाम ऑक्सर्फडमध्येच राहून घालविली. पाचवी मी कॉर्नवॉलमध्ये नैऋत्य किनाऱ्याकडील प्रदेशांतील वस्टनहॅम वगैरे शहरे व खेडी पाहण्यात घालविली, पैकी १३ दिवस माझे मित्र मिस्टर आणि मिस् जे. वॉल्टरकॉककडे त्यांच्या (बॉस कॅसल् या भागातील) पोल्ट्रुनी नामक झोपडीत पाहुणचार घेतला.

शेवटची दीर्घ सुट्टी मी काही दिवस चेस्टनहॅम येथील मध्यदेशात घालवून पुढे हॉलंडची राजधानी ॲम्स्टरडॅम येथे अनेक सुधारलेल्या देशांतील उदार धर्मीयांची परिषद भरली होती, तीत

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, समग्र वाङ्मय, खंड २ रा ~~~

२६

माझे बिऱ्हाड

डॉ. ग्रेडन : इंग्लंडांत परक्याना राहण्यासाठी उत्तम व्यवस्था असते. श्रीमंतांसाठी व सामान्यांसाठी निरनिराळ्या दर्जाची हॉटेल शहरांत, गावांत आणि प्रेक्षणीय स्थळे असलेल्या रानावनातून सुद्धा मुबलक आहेत. शिवाय खाजगी रीतीने राहण्यासाठी मध्यम प्रतीचे लोक पाहुण्यांकडून पैसे घेऊन (Paying Guest) आपल्या घरी वाटेल तितके दिवस सोय करतात. डॉ. आणि मिसेस ग्रेडन या दंपतीकडे मी बहुतेक पहिली टर्म घालवली. मी उशिरा गेल्याने कॉलेजच्या वसतिगृहात जागा मिळाली नाही. पण पुढील अनुभवावरून स्वातंत्र्य आणि काटकसर या दृष्टीने बाहेर राहणेच बरे वाटू लागले. ग्रेडनसारख्या संभावित कुटुंबामध्ये मला इंग्रजी चालीरीती आणि सभ्यता यांची बरीच माहिती मिळून फार लाभ झाला, सामान्य हिंदू विद्यार्थ्याला टेबलावर बसून काटे-चमचे वापरणे, टॉय-कॉलर नीट बांधणे वगैरे शुल्लक गोष्टी पासून ती संभावित मंडळामध्ये बोलण्याचालण्यासाठी ढब राखणे व दुसऱ्यांचा पाहुणचार करणे वगैरेपर्यंतची फार खबरदारी घ्यावी लागते. शिकल्याशिवाय ही खबरदारी शक्य नाही. काटकसरीच्या दृष्टीने मला हे घर सोडून स्वतंत्र रीतीने भाड्याची जागा घेणे पुढे बरे वाटले. गरीब स्थितीचे कुटुंब एक सबंध घर घेऊन आपण तळघरांत राहून इतर मजले सभ्य गृहस्थास भाड्याने देऊन आपली गुजराण करते. कुटुंबातील मालकीण (हिला Land Lady असे म्हणतात) बहुतेक अशा प्रकारचा धंदा करते. पाहुण्याचे जेवणखान, स्नानाची, कपडे धुण्याची व काही घरगुती व्यवस्थेची जबाबदारी या बाईकडे असते.

भाड्याची जागा : ऑक्सफर्ड वूर्स्टर प्लेस नावाच्या मध्यम वस्तीच्या भागात नं. २३ च्या घरातील पहिल्या मजल्यातील दोन खोल्या मी घेतल्या होत्या. ऑक्सफर्डचा विद्यार्थी, विशेषत: ब्राह्मणसमाजाचा प्रतिनिधी म्हणून काटकसर संभाळून व्यवस्थेने व सभ्यतेने वागणे मला जरूर होते. निजावयाची खोली व उठण्याबसण्याची खोली निराळी ठेवावी लागते. युनिव्हर्सिटीतील बाहेर राहणाऱ्या विद्यार्थ्यावर युनिव्हर्सिटीच्या शिस्तीचा डोळा असतो. म्हणून अशा घरांना युनिव्हर्सिटीकडून परवाना घ्यावा लागतो. माझ्या लँडलेडीचे नाव मिसेस पिअर्सन होते. मिस्टर पिअर्सन ऑक्सफर्डच्या एका मोठ्या हॉटेलांत वाढण्याचे काम करीत होते. ह्यांना दोन मुले व चार मुली होत्या. माझ्या वरच्या मजल्यास दुसरा एक पाहुणा होता. आम्ही दोघे ६ महिन्यांचे वर तेथे राहिलो तरी एकमेकांशी कधीच बोललो नाही. कारणाशिवाय एकमेकांशी सलगी लावणे हे असभ्य समजले जाते.

पिअर्सन : पिअर्सन हे कुटुंब अत्यंत साधे, गरीब व फार प्रामाणिक होते. जातिभेद नाही तरी इंग्लंडांत वर्गभेदाचे प्रस्थ फार आहे. ऑक्सफर्डचा विद्यार्थी आणि त्यातल्या त्यात धर्मशिक्षणाचा

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, समग्र वाङ्मय, खंड २ रा ~~~

२७

मँचेस्टर कॉलेज

इंग्लंडांतील धर्म प्रचारक पद्धतशीरपणे तयार करण्यासाठी मँचेस्टर कॉलेज या नावाची केवळ उदार धर्मशिक्षणासाठी वाहिलेली संस्था ऑक्सफर्ड येथे आहे. मँचेस्टर कॅालेज हे मँचेस्टर येथे प्रथम निघून लंडन वगैरे ठिकाणी स्थलांतर पावून आता ऑक्सफर्ड शहरांत स्वतःच्या कायमच्या इमारतीत चालू आहे.

वास्तविक पाहता ही संस्था इ.स. १७५७ मध्ये वॉरिंग्टन अकॅडमी या नावाने वॉरिंग्टन येथे स्थापन झाली. तिचे पुढे १७८६ साली मँचेस्टर कॉलेज असे रूपांतर झाले, या क्रांतीच्या काळी संस्थापकांना धर्म व शास्त्र या दोन्होवरही सारखाच विश्वास होता. म्हणजे यांचा धर्म शास्त्रीय व शास्त्र धार्मिक होते.

अध्यापक वर्ग : पहिले प्राध्यापक जॉन टेलर हे (१७५७-६१ साली) होते. इ.स. १८९७ सालापर्यंत प्रसिद्ध डॉ. मार्टिनो हे प्राध्यापक होते. त्यानंतर माझ्या वेळी व नंतरही डॉ. ड्रमंड हे प्रिन्सिपाल होते. हे विद्येने तसेच श्रद्धेने आणि शीलाने फार मोठे गृहस्थ होते. ह्यांच्याशिवाय प्रो. अप्टन (तत्त्वज्ञान), प्रो. कार्पेन्टर (तुलनात्मक धर्म व पाली भाषा), प्रो. ऑजर्स (Church Histary) ख्रिस्तीसंघाचा इतिहास), प्रो. जॅक्स (समाजशास्त्र आणि Higbburt Jonrnal चे संस्थापक व संचालक) वगैरे जाडे पंडीत त्या विषयांचे अध्यापक होते. प्रिन्सिपाल ड्रमंड हे बायबल आणि धर्मशास्त्र शिकवीत. ह्यापैकी प्रो. कार्पेन्टर ह तुलनात्मक धर्म ह्या माझ्या ऐच्छिक विषयाचे विशिष्ट Tutor म्हणजे माझ्या अभ्यासावर देखरेख ठेवणारे, नेमून दिलेले गुरु असत. त्यांच्याजवळ मी पाली भाषा आणि बुद्धधर्माचा विशेष अभ्यास केला. दोन वर्षाचा अभ्यास आटोपून ह्या कॉलेजचा डिप्लोमा मला देतेवेळी कॉलेज कमिटीकडे प्रो. कार्पेन्टरने मजबद्दलचे जे प्रशस्तीपत्र पाठविले त्यांत माझ्या खास गुरुने (डॉ. कार्पेन्टरने) चांगले गौरवपर आणि प्रेमळ उद्‌गार काढले होते.

पूर्व व पश्चिम : हिंदुस्थानांतील विश्वविद्यालयाप्रमाणे ह्या कॉलेजात विद्यार्थ्यांची परीक्षारूपी शर्यत लावून त्यांच्या शहाणपणाचा दर्जा ठरवीत नाहीत. नेमून दिलेले खास गुरू आपापल्या शिष्यांना निरनिराळ्या विषयांत निबंध लिहिण्यास सांगून त्यांच्या अभ्यासाची आणि विचारविकासाची पारख करतात. वर्षअखेर खास निबंध लिहावयाला देऊन त्यात दाखवलेल्या हुशारीप्रमाणे प्रशस्तिपत्र लिहून देतात. कॉलेजात विद्यार्थीही इकडच्याप्रमाणे शेकड्यानी प्रशस्तिपत्र लिहून देतात. कॉलेजात विद्यार्थीही इकडच्याप्रमाणे शेकड्यांनी किंवा हजारांनी मोजता येण्यासारखा प्रकार मँचेस्टर कॉलेजात नाही. एका वेळी फार तर १५/२० विद्यार्थ्याहून जास्त नसतात. तेही दोन वर्षातून विभागलेले

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, समग्र वाङ्मय, खंड २ रा ~~~

नसत. त्यांच्या घरी चहाची परतभेट देण्यासही आनंदाने जात. मग अशा कॉलेजला कुटुंब म्हणू नये तर काय म्हणावे ?

उपासक : सकाळी १० पासून दोन प्रहरी १ पर्यंत तीनच तास कॉलेजची व्याख्याने असत. झालीच तर संध्याकाळी जाहीर व्याख्याने असत. रात्रीच्या वेळी क्लबच्या सभा, संमेलने चालत. वर्षातून सहा महिने अभ्यास आणि सहा महिने सुट्टी असे वर सांगितलेच आहे. पण आठवड्यांतून चार दिवस कॉलेज व तीन दिवस सुट्ट्या असत. शनिवार, आदितवार, सोमवार हे सुट्टीचे दिवस ठेवण्याचे कारण हे की, इतर गांवातील कुठल्याही एका युनिटेरियन समाजामध्ये जर एखादे वेळी उपासक आचार्य नसले तर मँचेस्टर कॉलेजांतील विद्यार्थ्यांला ते काम करण्याला पाठविण्यात येत असे आणि सांजसकाळच्या दोन उपासनेसाठी जाण्यायेण्याचे भाडे, पाहुणचारासह दोन पौंड वेतन त्याला मिळत असे. ही वर्णी मलाही लागत असे. ब्राह्मसमाजाचा प्रतिनिधी म्हणून मला विशेष आवडीने निवडण्यात येत असे. ह्या व इतर अनेक प्रकारांनी हे कॉलेज म्हणजे सर्व देशांतील सर्व युनिटेरियम समाजाचे एक काळीजच (Heart) होऊन राहिले होते. याशिवाय मुलांना गरीब लोकांच्या वस्तीत जाऊन तेथे दयेची व परोपकाराची कामे करण्याची सवय लागावी म्हणून एका स्वतंत्र लहानशा मिशनची स्थापन झाली होती. ह्याचा कॉलेजशी प्रत्यक्ष संबंध नव्हता. तरी डॉ. ड्रॅमंड यांची कन्या मिस नेली हिने पुढाकार घेऊन हे चालविले होते आणि कॉलेजचे विद्यार्थी त्यात भाग घेत होते.

●●●

२८

खेळकर वृत्ती

मँचेस्टर कॉलेजातील विद्यार्थी पोक्त वयाचे पदवीधर व पुढे धर्मोपदेशकाचे गंभीर काम करणारे होते. म्हणून हे नेहमीच गंभीरपणाने वागत असत असे मुळीच नाही. ते बहुतेक खेळकर वृत्तीने वागत. केव्हा केव्हा तर ते लहान मुलांप्रमाणे दंगा माजवून सोडीत.

टोयोसाकी : जापनचे एक टोयोसाकी नावाचे आमचे वर्गबंधू असत. ते ठेंगू असून मोठे गमती होते. त्यांच्याशी इतर विद्यार्थ्याच्या नेहमी चेष्टा चालत, ते कॉलेजच्या वसतिगृहातच राहात. एखादे दिवशी रात्री नाटकाला जाऊन उशिरा परत आले आणि दार ठोठावू लागले म्हणजे दारावरील खिडकीवरून त्यांच्यावर पाणी ओतावे; ते असे की ते फार भिजू नयेत अशाच बेताने, असे चाळे चालत. एकदा एक अशी टूम निघाली की, सर्वाची उंची मोजावी, टोयोसाकीला एका भिंतीजवळ उभे केले. त्याच्या उंचीची रेघ मारण्याच्या मिषाने हात वर करून वर असलेली पाण्याची तोटी खुली केली. टोयो दचकून निसटला व सर्वत्र हशा पिकला. दर रविवारी टोयो फार सभ्यतेचा पोशाख करी. लाँग कोट, टॉप हॅट घालून स्वारी सडकून सभ्य गृहस्थ बने आणि शहरातल्या मुख्य रस्त्यांवरून हिंडून येई. एकदा एका चावट मित्राने त्याच्या पाठीवर कोटाला एक कागदाची चिठी लावली व त्यावर (Chase me Girls) असे जाड अक्षरात लिहिले होते. टोयो घरी परत येईपर्यंत त्याला हे कळलेच नव्हते. हे पाहून मोठा हशा पिकला.

मलूल हिंदी : कॉलेजच्या इमारतींत विद्यार्थ्यांसाठी Common Room म्हणून एक मोठे दालन होते. त्यात विद्यार्थ्यांनी मोकळेपणाने वागावे, सिगारेट्स फुंकाव्यात, खेळावे, खिदळावे असा प्रकार चाले. केव्हा केव्हा प्रोफेसरही या खोलीत येत. त्यांच्याबरोबर सिगारेट्स फुंकणे, एखादी त्यांना देणे असेही चाले. या दालनांत मध्यभागी एक मोठे गोल मेज होते. मी इतरांइतका खिदळत नसे, म्हणून मला Meek Indian म्हणजे 'मलूल हिंदी' असे नाव पडले होते. माझा निरुपद्रवीपणा त्यांना जणू उपद्रवच देत होता; म्हणून सूड उगवण्यासाठीच की काय दोघा धटिंगणानी मला सपशेल उचलले, गोल मेजावर आडवे ठेवले आणि गाणे गात ते मला घाण्यासारखे फिरवू लागले. असा वात्रटपणा केलेल्या धटिंगणाला पुन्हा पुढच्या बुधवारी उपासनालयात गंभीरपणे उपासना चालवताना पाहून मला हसे आवरत नसे. अशा चाळ्यांपासून खुद्द प्रि. ड्रमंड हे सुरक्षित नव्हते. तशात त्यांची व्याख्याने असल्याने या चेष्टांना साहजिकच उत्तेजन मिळे.

इव्हर्ट : कॉलेजात मी केव्हा केव्हा माझा आवडता पिवळा फेटा बांधून शेमला सोडीत असे. इव्हर्ट नावाचा एक स्कॉच विद्यार्थी नेहमीच माकडचेष्टेत गुंतलेला असे. त्याने हळूहळू माझा शेमला ओढण्याला सुरुवात केली. फेट्याचा खालचा एक विळखा सुटला, दुसरा सुटला तरी

प्रिन्सिपाल ड्रमंड यांना पाच सुंदर तरुण मुली होत्या. त्यांच्या नावापुढे खालील वाक्य होते-

Happy is the man whose quiver is full

टोयोसाकी---

There came from far Japan
To cheer this gloomy place
A merry little man
With mischief in his face.

He flirts like any boy
Although a married man
So we must send our Toy
Once more to far Japan.

शिंदे--

A meek and modest Indian
Who will, unless he faints,
Some day duly be worshipped
Among his country saints.

He is no valgur fraction
As single studeut be
But he and Mrs. Shinde
Form one integrity.

●●●

२९

काही टिपणे

युनिटेरियन समाज : ज्या युनिटेरियन लोकांकडून हिंदुस्थानांतील ब्राह्मसमाजाच्या प्रतिनिधी विद्यार्थ्यांला मँचेस्टर कॉलेजातून धर्मप्रचारासाठी तयार करण्या प्रीत्यर्थ स्कॉलरशिप मिळते तो इंग्लडांतील युनिटेरियन समाज आणि हिंदुस्थानांतील ब्राह्मसमाज या दोहोंची धर्मतत्त्वे, आचारांचे आणि कार्याचे धोरण स्थूल मानाने पाहता जवळजवळ सारखेच उदारपणाचे आहे. हिंदुस्थातील निरनिराळ्या ब्राह्मसमाजाची व प्रार्थनासमाजांची संख्या, मी १९१२ साली प्रसिद्ध केलेल्या Theistic Directory मध्ये हिंदुस्थानातील निरनिराळ्या प्रांतातील मिळून एकंदर संख्या १६७ आहे. इंग्लंड, आयलंड, व वेल्स मिळून एकंदर युनिटेरियन समाजाची संख्या १९०३ सालच्या Unitarian Pocket Book मध्ये दिल्याप्रमाणे ४५६ आहे. पण ब्राह्मसमाजापेक्षा युनिटेरियन समाजाची घटना किती तरी पटींनी अधिक कार्यक्षम व सांपत्तिक स्थिती अधिक अनुकूल असल्यामुळे हिंदुस्थानात आजन्म वाहून घेतलेले ब्राह्मधर्मप्रचारक आणि आचार्य फार थोडे म्हणजे हाताच्या बोटांवर मोजण्याइतके आहेत. आणि त्यात पद्धतशीर रीतीने तयार करून घेतलेले २/४ असतील किंवा नसतील. इंग्लंडात अशा प्रचारकांची संख्या १९०३ मध्ये ३७४ होती. सर्व युनिटेरियन कामकाज आवरण्यासाठी लंडनमध्ये British and Foreign Unitarian Association नावाची एक संख्या आहे, तशी हिंदुस्थानात नाही. साधारण ब्राह्मसमाज नावाची कलकत्यात एक मध्यवर्ती संस्था आहे. पण तिचा ताबा सगळ्यांवर सारखा चालत नाही. न्यूयॉर्कमध्ये American Unitarisan Association नावाची एक मध्यवर्ती संस्था आहे. कलकत्ता, लंडन आणि न्यूयॉर्क या तिन्ही मध्यवर्ती संस्थांकडून परस्पर सलोख्याचे सहकार्य घडते. हे कार्य आजपर्यंत जवळजवळ शेसव्वाशे वर्षापासून चालत आले आहे.

साधनसभा : ता. १० नोव्हेंबर १९०१ च्या आदितवारी संध्याकाळी ६ वाजता आमचे कॉलेजबंधू मि. कॉक यांचे घरी साधनसभा होती. जेवण तेथेच झाले. परस्परांची हकिकत सांगितली. त्यांच्या घरी मि. कॉक व त्यांची बहीण दोघेच आहेत. मोठ्या आनंदाने दिवस घालवत आहेत. दोघे अत्यंत समताळू व सात्त्विक आणि हिंदूधर्माचे व तत्त्वज्ञानाचे चाहते आहेत. दोघे Theosophist आहेत. मि. कॉक हा स्वत: खाटकाचा मुलगा असून पूर्वाश्रमी बरेच दिवस खाटकाचा धंदा करुनही, हा आणि ह्याची बहीण आतां पूर्णत: शाकाहारी बनली आहेत. आध्यात्मिक भाव व भक्ती वाढविण्याकरिता नियमित वेळी आम्ही एकत्र असून काही साधन करण्याचे त्यांनी सुचविले. माझे मनात हे होतेच, त्यास मी चांगलेच प्रोत्साहन दिले. घरी परत आल्यावर जेवताना मिस्टर व मिसेस ग्रेडन (ज्यांचेकडे मी भाड्यांने राहात होतो) यांच्याशी मांसाहाराबद्दल कडाक्याचा वाद

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, समग्र वाङ्मय, खंड २ रा ~~~

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, समग्र वाङ्मय, खंड २ रा ~~~

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, समग्र वाङ्मय, खंड २ रा ~~~

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, समग्र वाङ्मय, खंड २ रा ~~~

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, समग्र वाङ्मय, खंड २ रा ~~~

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, समग्र वाङ्मय, खंड २ रा ~~~

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, समग्र वाङ्मय, खंड २ रा ~~~

३०

परत प्रवास

शेवटचा निरोप : ३१ ऑगस्ट, १९०३ रोजी सकाळी मी होवर्न येथून निघालो. लंडनला आणि इंग्लंडलाही शेवटचा रामराम केला. जर्मन समुद्रांतून हॉलंडची राजधानी ॲम्स्टरडॅम येथे इंटरनॅशनल लिबरल रिलीजस कॉन्फरन्स करता गेलो तेथे मी ता. ४ सप्टेंबरपर्यंत होतो.

एक अडचण : विलायतेला येताना मला बोटीच्या प्रवासाबद्दलचा खर्च श्रीमंत सरकार सर सयाजीरावमहाराजांनी दिला होता. स्वदेशी परत जाण्याचा खर्च मिळण्यापूर्वी माझ्या कॉलेजातील अभ्यासाबद्दल कॉलेज अधिकाऱ्यांकडून रिपोर्ट मागविण्याबद्दल हुकूम महाराजांकडून झाला होता. त्याप्रमाणे हा इंग्रजीतला रिपार्ट अध्यापकांकडून महाराजांकडे गेला. त्याअन्वये मी महाराजांकडे अर्ज केला असता त्यांच्या प्रायव्हेट सेक्रेटरीकडून पत्र आले की, मी स्वदेशी परत गेल्यावर बडोदे संस्थानात नोकरी करण्याबद्दलचा करार लिहून देईन तर हा खर्च मिळेल. मी ता. १ मे, १९०३ रोजी महाराजांना खुलाशाचे सविस्तर पत्र लिहिले की, 'मला जी युनिटेरियन स्कॉलरशिप मिळाली होती तिची एक शर्त अशी होती की, मी आजन्म स्वतःला धर्मप्रचारासाठीच वाहून घेईन. यदाकदाचित माझ्या योगक्षेमाची कोणी जबाबदारी घेतली नाही, तर या प्रचाराला प्रतिकूल होणार नाही असेच एखादे काम करून उदरनिर्वाह करीन; पण प्रचार सोडणार नाही. महाराजांनी हे सर्व पसंत केले होते. म्हणून आता कोणती हरकत न घेता स्वदेशी परत जाण्याला मला ते मदतच करतील.' हे पत्र पावताच महाराजांनी टॉमस कुक कंपनीकडे तारेने तिकीट देण्याबद्दल हुकूम केला असल्याचे त्यांच्या प्रायव्हेट सेक्रेटरींनी मला कळविले.

ॲम्स्टरडॅमचा खर्च : कॉलेजला उन्हाळ्याची सुटी झाल्याबरोबर माझे इंग्लंडातील काम संपले म्हणून स्वदेशी निघता आले असते, पण ॲम्स्टरडॅम येथील आंतरराष्ट्रीय उदार धर्मपरिषदेला मला ब्राह्मसमाजाने हिंदुस्थानचा प्रतिनिधी निवडल्यामुळे आणि ती परिषद सप्टेंबरमध्ये भरणार असल्याने दरम्यानचा तीन महिन्यांचा खर्च आणि जादा प्रवासखर्च यांची पंचायत पडली. युनिटेरियन स्कॉलरशिप मला दरसाल १०० पौंडांची होती. तीच अपुरी होती. मी फार काटकसरीने राहून माझ्या खर्चाची कशीबशी तोंडमिळवणी केली होती. ॲम्स्टरडॅमच्या जादा खर्चाविषयी माझे मित्र श्रीयुत बा. बा. कोरगावकर यांनी वर्गणीचे परिश्रम करून ता. २५ जुलै, १९०३ राजी पत्राने १३ पौंड ६ शिलिंग ८ पेन्सचा (म्हणजे २०० रुपयांचा) चेक पाठविला. कलकत्त्याहून हेमचंद सरकारकडूनही निदान तितकीच रक्कम मिळेल असे कळविले. अशा रीतीने माझी अडचण भागली.

ॲम्स्टरडॅमची परिषद : ता. १ सप्टेंबर रोजी इंग्लंडहून निघालेल्या पाहुण्यांची बोट ॲम्स्टरडॅमला पोहोचली. तीतच मी होतो. नदीच्या काठावरच्या सुंदर अम्स्टील हॉटेलात आमची

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, समग्र वाङ्मय, खंड २ रा ~~~

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, समग्र वाङ्मय, खंड २ रा ~~~

भाग दुसरा

१

धर्मसेवा

माझी मनोरचना : माझ्या सार्वजनिक कामाच्या आठवणी आणि अनुभव देण्यापूर्वी माझी ध्येये आणि मनोरचना याविषयी थोडासा सामान्य विचार करणे जरूर आहे. त्याशिवाय पुढील आयुष्यामध्ये ज्या क्रांत्या झाल्या आणि जे वळसे पडले त्यांची वाचकांना नीटशी कल्पना येणार नाही. कोणाही व्यक्तीच्या सार्वजनिक जीविताचा जो परिपोष होतो त्याचे दोन अगदी भिन्न प्रकार आहेत. एकाचा उदय विश्वात्मकतेमध्ये होऊन हळूहळू स्थानिक प्रश्नाकडे उतरत जातो, तर दुसऱ्याचा उदय अगदीच स्थानिक प्रयत्नात होऊन त्याचे वलय विश्वात्मकतेकडे विस्तृत होऊ लागते. उदाहरणार्थ, एखादा आपल्या जातीच्या सुधारणेकडे लक्ष घालतो किंवा जातिभेदावर त्याचा मुळीच विश्वास नसला तर नागरिक सेवेत लक्ष घालतो व हळूहळू राष्ट्राकडे आणि अखेरीस विश्वाकडेही त्याचा लय लागतो. याच्या उलट दुसरी व्यक्ती एकदम धर्मसुधारणेकडे वळते, म्हणजे विश्वधर्मापासून सुरुवात करून त्याची भिन्न भिन्न प्रतीके, समाजसुधारणा, समाजसेवा, राष्ट्रोद्धार त्यातील निरनिराळ्या वर्गाची उन्नती किंवा अखेरीस आपल्या स्वतःच्या कुटुंबातील आप्तांची काळजी इकडे उतरू लागते. माझा जीवितविकास यापैकी दुसऱ्या प्रकारे घडला. पहिल्या भागात (पृष्ठ १२९) 'जागृतीतले स्वप्न' म्हणून जे सदर आहे ते फार अर्थपूर्ण आहे. लंडन येथील पॅस्मोर एडवर्ड इन्स्टिट्यूटमधील चित्रे पाहून व व्याख्याने ऐकून माझ्या विश्वव्यापक ध्येयाला जी चालना मिळाली त्याचे हे स्वप्न द्योतक आहे. ह्या स्वप्नाप्रमाणे जरी माझ्या हातून जगभर प्रवास घडला नाही, तरी माझ्या जीवितकार्यात माझे विश्वध्येय ध्रुवाच्या ताऱ्याप्रमाणे माझ्या नजरेपुढे कायमचे राहिले.

पहिल्या भागात माझ्या मनोविकासाचे वर्णन करीत असताना मी म्हटले आहे की, मी ब्राह्मसमाजात गेल्याने सुधारक झालो असे नसून मी सुधारक होतो, म्हणून ब्राह्मसमाजात गेलो. माझ्या उदार ध्येयामुळे मी मनामध्ये जी वेळोवेळी मानवी आयुष्याची चित्रे रेखाटली तिला तंतोतंत जुळेल अशी ब्राह्मसमाजाची ठेवण मला दिसली. त्यामुळे मी एकदम ब्राह्मसमाजात (मुंबई प्रार्थनासमाजात) शिरलो. एवढेच नव्हे तर लवकरच त्याच्याशी मी इतका तादात्म्य पावलो की, स्वतःला पूर्णतः वाहून घेऊन त्याचे प्रचारकार्य हीच तळमळ मला लागली.

दोन पक्ष : त्या वेळी हिंदुस्थानात विशेषतः महाराष्ट्रात, सार्वजनिक चळवळ करणाऱ्यांचे दोन भिन्न पक्ष होते. एक स्वतःला राष्ट्रीय उर्फ जहाल म्हणवीत असे, तर दुसरा स्वतःला प्रागतिक उर्फ उदार म्हणवीत असे. पण एकाचा जहालपणा आणि दुसऱ्याचा उदारपणा प्रतिपक्षाच्या कार्यात मात्र दिसून येत नसे. म्हणून हे एकमेकांच्या कार्यांचा हेवादावा आणि वेळप्रसंगी एकमेकास

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, समग्र वाङ्मय, खंड २ रा ~~~

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, समग्र वाङ्मय, खंड २ रा ~~~

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, समग्र वाङ्मय, खंड २ रा ~~~

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, समग्र वाङ्मय, खंड २ रा ~~~

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, समग्र वाङ्मय, खंड २ रा ~~~

२

मुंबईतील स्थानिक कार्यक्रम

परत आल्यावर मुंबईतील कामाचा कार्यक्रम मी ठरवू लागलो. धर्मकार्याची दोन मुख्य अंगे आहेत. पहिले आचार्यकार्य ; दुसरे प्रसारकार्य, ज्यांनी धर्माच्या स्वीकार करून दीक्षा घेतलेली असते अशांच्या धर्माचरणाची व्यवस्था राखण्यासाठी प्रयत्न करणे, त्यांतील प्रमुख भाग म्हणजे दर आठवड्याला साप्ताहिक उपासना चालविणे, घरोघरी भेटी देऊन कौटुंबिक धर्माचरणाची निगा ठेवणे, समाजात जे निराश्रित आणि अंपग असतील त्यांची शुश्रूषा करणे; नामकरण, उपनयन, विवाह, अंत्येष्टी इत्यादी गृहविधी चालविणे, सभासदांतील परस्पर-परिचय वाढवून समाज दृढ व्हावा म्हणून वेळोवेळी स्नेहसंमेलने करणे इत्यादी, स्त्रियांसाठी दर शनिवारी आर्य महिलासमाज, मुलांसाठी रविवारचे धर्म व नीती शिकवण्याचे वर्ग, तरुणांसाठी तरुण ब्राह्म मंडळ, वृद्धांसाठी संगतसभा आणि बाहेच्यांसाठी व्याख्याने हा क्रम आठवडाभर चाले. ह्यात मी आल्यावर पुढील नवीन संस्थांची भर टाकली.

पोस्टल मिशन : मी विलायतेत असताना तेथील स्त्रियांनी चालवलेले युनिटेरियन पोस्टल मिशन हे कार्य निरखून पाहिले होते. माझे मित्र वासुदेवराव सुखटणकर या वेळी पुण्यास होते. त्यांच्याकडून अशाच थाटावर ब्राह्म पोस्टल मिशन ही घटना मी स्वदेशी येण्यापूर्वीच करवली होती. ब्राह्मधर्माच्या तत्त्वावर आणि उपासनापद्धतीवर लहान लहान पुस्तके छापवून ती टपालमार्गे लोकास वाटून त्यावर वाचकांकडून जी प्रश्नोत्तरे येतील त्याबाबत सतत पत्रव्यवहार ठेवून सवडीप्रमाणे वाचकांस भेटीस बोलावून धर्मप्रसार करण्याच्या पद्धतीला पोस्टल मिशन हे नाव आहे. या कामात युनिटेरियन लोकांकडून त्यांची लहानमोठी पुस्तके व द्रव्यनिधीची ही मदत मी मिळविली. मी स्वदेशी आल्यावर सुखटणकर माझ्याजागी विलायतेला गेले. त्यांचे पुण्यांतील कार्य मुंबईला आणून मी ते वाढविले. ह्या कामी माझे मित्र व समाजाचे सभासद सय्यद अब्दुल कादर यांची मोठी मदत झाली. ह्या मिशनसंबंधाने पहिल्या १० वर्षाची जी माहिती प्रसिद्ध झाली आहे ती फार बोधपर आहे. त्या सातआठ वर्षीच्या अवधीत एकंदर ३४३८ ब्राह्मधर्मावरील पुस्तके १२७०० लहानसान पत्रके, ६३३ युनिटेरियन पुस्तके व ५००० युनिटेरियन पत्रकांचा प्रसार करण्यात आला. ह्यातील पुष्कळशी फुकट वाटण्यात आली. काहीची अल्प किंमत घेण्यात येत असे, जे कोणी पुस्तकांची मागणी करीत अगर पत्रव्यवहार करीत त्यांची नावे एका पुस्तकात दाखल करण्यात येत असत व त्यांच्याशी पत्रव्यवहार करून उदार धर्मवार्ता त्यास कळावी, अशी व्यवस्था करण्यात आली होती. मी दोन वेळा मुंबई इलाख्यातील काही ठिकाणी प्रवास करून व्याख्याने दिली. ह्या दोन्ही सफरीचा खर्च युनिटेरियन असोसिएशनने त्या वेळी दिला होता. पुढे प्रार्थनासमाजाशी धर्मप्रचारक या नात्याने असलेला माझा संबंध सुटल्यानंतर हे काम बंद पडले.

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, समग्र वाङ्मय, खंड २ रा ~~~

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, समग्र वाङ्मय, खंड २ रा ~~~

३

काठेवाडचा दौरा

काठेवाडचा दौरा : १९०४ च्या एप्रिल महिन्यामध्ये माझे मित्र गुजराथेचे नानालाल कवी सादरा येथे सरकारी नोकरीत होते. उन्हाळ्याची सुट्टी पडल्यामुळे माझ्याबरोबर काठेवाडात समाजाच्या प्रचारकार्यासाठी दौरा काढण्याचे त्यांनी ठरविले. मी सादरा येथे गेलो. स्टेशनहून सादरा गाव बराच लांब असल्याने व प्रदेश वाळवंटाचा असल्यामुळे माझी प्रवासाची उंटावरून जाण्याची व्यवस्था केली होती. सवय नसल्यामुळे ह्या प्रवासाचा मला बराच त्रास झाला. अंग फार हालल्याने दोन दिवस कमरेला ठणका लागला होता. साद-याहून आम्ही दोघे प्रथम अहमदाबाद प्रार्थनासमाजात गेलो. तेथे व्याख्याने आणि सभासदांशी परिचय वगैरे करून घेण्यात दोन दिवस गेले. समाजाचे अध्यक्ष लालशंकर उमीयाशंकर यांची प्रथमच ओळख झाली. त्यांनी स्थापलेले मोठे अनाथालय पाहिले. ह्या समाजाला पैशाचे भरपूर साहाय्य आहे, प्रार्थनामंदिर प्रशस्त आणि सुंदर आहे. सभासदांची संख्या पुष्कळ आहे. पण अनुष्ठानिक सभासद फारच कमी होते. रा. रमणभाई नीलकंठ हे समाजाचे सेक्रेटरी होते. आम्ही अहमदाबादहून राजकोटला गेलो. प्रसिद्ध विद्वान् (प. वा.) शंकर पांडुरंग पंडित, बॅ. सिताराम नारायण पंडित आणि धनश्याम नारायण पंडित हे काठेवाडात मोठी मान्यता पावलेले तीन पंडित बंधु राजकोटात कायमची वस्ती करून राहात असत. आम्ही शंकर पांडुरंग यांचे घरी उतरलो. रा. शंकर पांडुरंग पंडित हे प्रार्थनासमाजिस्ट होते आणि दुसरे दोघे प्रागतिक ध्येयाचे होते. राजकोटात राजकुमार कॉलेज व इतर तशाच मोठ्या लोकांच्या शिक्षणी मध्यवर्ती संस्था होतो. ग्राशिया नावाचा काठेवाडातील जमीनदारांचा एक श्रीमत वर्ग आहे. त्याचीही एक शाळा श्रीमती थाटाची होतो. कवाईत करणे, घोड्यावर बसणे व इतर मर्दानी खेळ खेळणे ह्या बाबतीत ह्या कुमारांची फार काळजी घेण्यात येत असे आणि ही कामे ह्या तरुणांना फार आवडतही असत. क्षत्रियाला शोभणारा पेहेराव, पाणीदार वृत्ती आणि कसलेली शरीरप्रकृती पाहून आनंद झाला. मुंबई इलाख्यातील राजेरजवाड्यांच्या मुलांची सोय येथे एकत्र केल्याने परस्पर परिचय होऊन ते पुढे राजपदारूढ झाल्यावरही तो कायम राहातो. राजकोटहून आम्ही भावनगरला गेलो. तेथील कॉलेजात माझे व्याख्यान झाले, सर प्रभाशंकर पट्टणी यांचे या संस्थानांत फार वजन असे. त्याचीही ओळख झाली भावनगरहून आम्ही जुनागडला गेलो व दिवाण बेचरदास यांचेकडे उतरलो. व्याख्याने, भेटी हा ठरीव कार्यक्रम झाल्यावर जवळीच असलेल्या गिरनार पर्वतावर जाण्याचा विचार ठरला. दिवाणांच्या ओळखीमुळे गिरनार पर्वतावर आमची राहण्याची व्यवस्था मोठ्या बडदास्तीची झाली.

गिरनार : 'गढ जुनो गिरनार बादल थीनुं बातुं करी' ही काठीवाडी म्हण बहुजनसमाजात प्रसिद्ध आहे. तिच्यामुळे हा गड पाहण्याची आम्हास फार आतुरता लागली होती. मेघांशी भाषण

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, समग्र वाङ्मय, खंड २ रा ~~~

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, समग्र वाङ्मय, खंड २ रा ~~~

४

स्थानिक कार्य

प्रेमळ गोतावळा : वर आखलेल्या आराखड्याप्रमाणे मी स्थानिक कामास लागलो. दिवसाची कामे आटोपल्यावर रात्री सभासदांच्या भेटी घेणे. रात्रीच्या शाळांची देखरेख करणे वगैरे आटोपून घरी येण्यास रात्रीच ११/१२ वाजत. मुंबईसारख्या अफाट वस्तीत सभासदांची घरे १०/१२ मैल लांबवर पसरलेली असत व शाळाही दूरदूर असत. म्हणून इतका वेळ लागे. कामात वक्तशिरपणा राखण्यास जड जाई. प्रथम प्रथम संघटना होणे कठीण गेले. समाजात तरुणांचा उत्साह वाढत होता. त्यांचे साहाय्य आनंदाने मिळू लागले; पण अनियमितपणाबद्दल काहीजणांकडून प्रथमपासूनच टीका चालत असे; पण ती प्रेममूलक होती. त्यामुळे तो दु:सह होत नसे. समाजाच्या बाहेरची मंडळी मला माझ्या कामात कितपत यश मिळेल याबद्दल साशंक नजरेने पाहात असत. तर काही कौतुकाने पहात असत. या भिन्न प्रवृतीमुळे मी माझी करमणूक करून घेत असे, आमच्या घरची मंडळी साध्या राहाणीची व खेडवळ प्रांतातून आलेली. त्यांना ह्या मुंबईसारख्या नवीन नवीन ढंगाच्या समाजामध्ये आपले बस्तान बसविण्यास प्रथम प्रथम कठीण गेले. प्रार्थनासामजाच्या थोर थोर घराण्यांनी आमची खरी स्थिती पाहून आम्हास मोठ्या मान्यतेने सांभाळून घेतले. भांडारकर, भाडगावकर, चंदावरकर वगैरे घराण्यातील स्त्रियांनी माझ्या वृद्ध आईशी मिळूनमिसळून वागणूक ठेवून मुंबईचा परकेपणा व तुटकपणा भासू दिला नाही. वासुदेव बाबाजी नवरंगे, सदाशिवराव केळकर, द्वारकानाथ वैद्य, सौ. लक्ष्मीबाई रानडे वगैरे घराणी तर आम्हास आमच्या घराण्यासारखीच वाटत होती. रा. कोरगावकरांनी तर प्रथमपासूनच माझ्याबद्दल फारच काळजी वाहिली. वामनराव सोहोनी व सय्यद अबदुल कादर हे तर माझ्या कामात आजीव येऊन मिळाले. डॉ. सुखटणकरांची माझ्याशी परदेशातून कळकळीचा पत्रव्यवहार चालू असे. डॉ. काशीबाई नवरंगे, डॉ. वैकुंठ कामत वगैरे तरुण मंडळी आमच्या घरगुती अडचणी भागविण्याला सदैव तत्पर असत. असा हा गोतावळा भोवताली जमून आल्यामुळे मुंबई शहरातल्या राहणीच्या आर्थिक तंगीच्या वेदना सहज सह्य झाल्या. जसजसा माझ्या कामाचा व्याप वाढू लागला तसतसा हा गोतावळाही वाढू लागला.

क्रांती : विसाव्या शतकाच्या आरंभापासून वृद्ध पिढी जाऊन नवीन पिढीने त्याची जागा घेतल्यामुळे प्रार्थनासमाजात एक प्रकारची क्रांती होऊन तो वाढीला लागला. जुन्या संस्थांना नवीन जोम आणि नवीन संस्थांची भर ह्यामुळे चहूकडे नवचैतन्य फुलू लागले. रा. द्वारकानाथ वैद्यांनी सुबोध-पत्रिका सावरली. वामनराव सोहोनी यांनी रात्रीच्या शाळा हाती घेतल्या. कोरगावकरांनी जमाबंदीची काळजी केली आणि इतर नवीन नवीन तरुण स्वयंसेवक म्हणून पुढे आले. ह्याचा परिणाम पुढे काही वर्षे समाजाच्या वार्षिक उत्सवाचे वेळी स्पष्ट दिसू लागला. दूरदूर राहणाऱ्या सर्व कुटुंबांची स्नेहसंमेलने घडू लागली. निरनिराळ्या दर्जामध्ये परिचय वाटून निरनिराळ्या कुटुंबांमध्ये

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, समग्र वाङ्मय, खंड २ रा ~~~

५

घरच्या अडचणी

चंद्राक्का : समाजाच्या स्थानिक कामाला अशा रीतीने रंग चढला; पण इकडे घरच्या मंडळीच्या हलाखीची स्थिती जास्त वाढत चालली जमखंडीसारख्या खुल्या हवेच्या आणि साध्या राहणीच्या आमच्या मंडळीना मुंबईची दाट वस्ती व कोंदट हवा नीट मानवेना. माझी पत्नी सौ. रुक्मिणीबाई हिला १९०४ ऑक्टोबरचे सुमारास तिसरा मुलगा विश्वास झाला ह्या बाळपणापासून त्याची प्रकृती खालावली. आईबाप वृद्ध आणि बहिणी शाळेत जाणाऱ्या म्हणून घरकामाचा सारा भार माझ्या पत्नीवरच पडत असल्यामुळे तिची तारांबळ उडाली. अशा स्थितीत माझी धाकटी बहीण चंद्राक्का हिला क्षयाची भावना जडली. १९०१ साली माझे मित्र वासुदेवराव सुखटणकर यांची बहीण शांताबाई ही माझे बहिणीसह पुण्याचे हुजूरपागेच्या हास्कूलमध्ये शिकत होती. ती प्रकृतीने फार अशक्त होती. सुखटणकरांची आई वारल्यामुळे तिची काळजी घेण्यास घरी कोणी नव्हते. पुढे तिला क्षयाची भावना झाली. म्हणून आमच्या घरी जमखंडी येथे तिला हवापालटीसाठी नेण्यात आले. पुढे ती त्याच रोगाने वारली. माझी बहीण चंद्राबाई ही नेहमी तिच्या सहवासात व शुश्रूषेत असल्यामुळे आणि पुढे मुंबईतील कोंदट हवेचा तिच्यावर परिणाम झाल्याने तिला तोच रोग जडला. माझ्या वृद्ध आईबाबास ही एक नवीन चिंता उपस्थित झाली.

रात्रीची शाळा : १९०५ च्या उन्हाळ्याचे आरंभी माझे बाबा चंद्राबाईला घेऊन खंडाळ्याला हवाफेरीसाठी राहू लागले तेथून त्यांनी पुण्यास वेताळ पेठेतील भाजेकरांच्या वाड्यात स्थानांतर केले. मी मुंबईहून जाऊन येऊन राहात होतो. या वर्षी मी पुण्यातच जास्त राहून तेथील समाजाचे कामात मदत करू लागलो. ह्या सालातील रामनवमीच्या दिवशी मीठगंज पेठेत अस्पृश्यांसाठी एक रात्रीची शाळा मी उघडली. त्या वेळी जनाक्का व तान्याक्का उन्हाळ्याच्या सुटीनिमित घरी आल्या होत्या. शाळा उघडण्याचा समारंभ झाला. त्यात हुजूरपागेतील बऱ्याच मुली हजर होत्या. भिजलेली डाळ व ऊसाचा रस वाटण्यात आला. हा समारंभ भाजेकरांचे वाड्यातच करण्यात आला समारंभास काही ख्रिश्चन मुली हजर होत्या. त्यातील एक उसाच्या रसात थुंकली, अशी खोटी हूल उठविण्यात आली. समारंभाचा बराच विरस झाला. या अपशकुनामुळे या शाळेत पुढे वेळोवेळी अडचणी येऊ लागल्या. ही शाळा पुणे प्रार्थना समाजाच्या स्वाधीन करण्यात आली आणि अखेरीस पुढे निघालेल्या डिप्रेस्ड क्लास मिशनमध्ये सामील करण्यात आली.

सुबोध-पत्रिकेच्या ता. १९-३-१९०५ च्या अंकात खालील इंग्रजी मजकूर आहे.

A friend writing from Poona says that the presence of Mr. V. R. Shinde there, is infusing a new spirit in the Prarthana Samaj of that town. He has within the short time that he has been there, organised a Sangat

६

दौरा

नाशिक : अशा वेळी माझ्या मुलाच्या मृत्युमूळे वैतागून मी मन:शांतीसाठी महाराष्ट्रात व कर्नाटकात दौरा काढला, 'केवळ विश्वासासाठी' या मथळ्याखाली हा दौरा सुबोध पत्रिकेत प्रसिद्ध झाला आहे. बरोबर मी डॉ. रुबेन व स्वामी स्वात्मानंदजी यांना घेतले. प्रथम ठाण्यास उतरलो. तेथे डॉ. संतुजी रामजी लाड यांचे घरी राहून उपासना चालवली. जाहीर व्याख्यान झाले. त्यात तेथील सभासद रा. गुप्ते यांनी भाग घेतला. त्यानंतर नाशिक येथे तेथील सुप्रसिद्ध वकील माझे मित्र रा. नीळकंठराव पाटणकर याचेकडे उतरलो. जाहीर व्याख्याने व खाजगी संभाषणे सुरू झाली; पण सर्वात डॉ. रुबेनचे भजन लोकप्रिय ठरले. भजनमार्गात फारसा शुष्क बुद्धिवाद किंवा खरा प्रयत्नवाद आम्हा हिंदू लोकांना मानवत नाही. भक्तिरसाच्या पुरात वाहात जाणे आम्हाला आवडते. रुबेनने एकतारीवरील भजनात काहीही मत प्रतिवादले तरी चालेल; एरव्ही खटखट नको, असे एका पुढाऱ्याने स्पष्ट सांगितले. रा. पाटणकरांचे ओळखीने व सूचनेवरून नाशिक जिल्ह्यातील आसवले येथे राहणाऱ्या अस्पृश्यवर्गातल्या एका श्रीमंत पुढाऱ्याकडे गेलो पण आम्ही तिघांचा विचित्र वेष पाहून आम्ही काही तरी मागावयाला भिकारबैरागीच आलो. अशी समजूत करून घेऊन मुख्य मालक आम्हास घराबाहेर भेटावयासच आला नाही. आम्ही कंटाळून नदीवर जाऊन स्नान वगैरे उरकले. खावयास आमच्याजवळ उन्हाशिवाय काहीच नव्हते. मुकाट्याने आम्ही अहमदनरगची वाट धरली. पुढे रा. पाटणकरांनी या गृहस्थाची चांगलीच हजेरी घेतली. वर्तमानपत्री याची चर्चा झाली; पण सर्व व्यर्थ! अहमदनगरचे काम आटोपून आम्ही बारामतीस आलो. डॉ. रुबेननी अहमदनगराहूनच कामाची रजा घेतली आणि त्यांची जागा रा. लक्ष्मण मनकू सत्तूर यांनी घेतली. बारामतीला ब्राह्मधर्माचा प्रसार अगदी नवीन होता.

एक पंढरीमाहात्म्य : बैलगाडीने आम्ही तिघे पंढरपुरास गेले. तेथे प्रार्थना समाजाच्या बालहत्त्या प्रतिबंधक गृहात उतरलो. तेथील हायस्कूलचे प्रमुख रा. मोडक आमच्या परिचयाचे होते. स्वात्मानंदजीचे व माझी अशी दोन व्याख्याने या दोन दिवशी स्वारीने जाहिराती लावून आपल्या शाळेत केली; पण आयत्या वेळी पाहतो तो या स्वारीचा डाव भलताच होता. अर्धा तास उलटून गेला. तरी शाळेत एक चिट्पाखरूही आले नाही. हेडमास्तरांनी आपल्या विद्यार्थ्याकडून ठिकठिकाणी नाकेबंदी केल्यामुळे आमचा हा कोंडमारा झाला. अक्षरश: रिकामी बाके आमच्यासमोर दिसू लागली. स्वामी स्वात्मानंदजी मोठे करारी, "शिंदेजी, आज हम व्याख्यान करेंगे, आप सुनीये कल आप कीजिये और मैं सुनोगा." असे म्हणून त्यानी संपूर्ण व्याख्यान दिले. दुसरे दिवशी मीही तसेच केले. हे पंढरीमाहात्म्य 'हा तो काही नव्हे निराशेचा गांव। भले पोटी बाब राखिलीया।।

७

स्थानिक समाज

सातारा समाज : मुंबई शहराशिवाय महाराष्ट्रात पुणे, सातारा, अहमदनगर, गुजराथेत अहमदाबाद, बडोदे आणि माळव्यात इंदोर वगैरे ठिकाणी प्रार्थना समाजाचे स्थानिक समाज आहेत. ह्याचे सालोसाल वार्षिक उत्सवाचे समारंभ होत असतात. ते जवळजवळ आठवडाभर चालत असतात. त्यात भाग घेण्यास मला जावे लागे. १९०५ सालच्या उन्हाळ्यात सातारा येथील उत्सवासाठी मी गेलो. रा. सितारामपंत जव्हेरे जे ह्या समाजाचे काम कळकळीने चालवीत असत. रा. काळे, रा. मोरोपंत जोशी व त्यांची कन्या मथुराबाई वगैरे मंडळी त्यांना मदत करीत असत. भजन, उपासना, व्याख्याने ही कार्यक्रमातील ठराविक कामे झाल्यावर तेथील लष्करात, अस्पृश्य लोकांच्या सैनिकांकरिता एक विशेष व्याख्यान झाले. गावात अस्पृस्यांसाठी एक शाळा उघडण्यात आली. साताऱ्याहून पाच मैलावर वर्णे नावाचे एक खेडे आहे तेथील सबरजिस्ट्रार रा. बापूजी बच्चाजी शिंदे यांचे ज्येष्ठ चिरंजीव श्री. गणपतराव शिंदे यांनी मुद्दाम बोलावून नेले. खेड्यातील लोकांसाठी भजन, उपासना, करवल्या. लोकांमध्ये वाटण्यासाठी पोस्टल मिशनचे वाङ्मय पाठविण्यात आले. पुढील एका वर्षी डॉ. भांडारकर गणपतराव आंजर्लेकर, स्वामी स्वात्मानंद गणपतराव कोटकर, श्रीमती जनाबाई शिंदे वगैरे मंडळीसह साताऱ्यास गेलो. उत्सव थाटाचा झाला. यवतेश्वराच्या डोंगरावर वनोपासना झाली.

अहमदनगर समाज : १९०६ साली अहमदनगर समाजात उत्सवासाठी गेलो. तेथील साळी समाजाचे प्रमुख पुढारी रा. सहदेवराव बागडे या समाजाचा पुढाकार घेऊन काम चालवीत. यांच्या वजनामुळे समाजात बरेच साळी जातीचे लोक येत असत. शंकर पांडुरंग पंडित, लालशंकर उमीयाशंकर वगैरे विद्वानांच्या प्रोत्साहनाने नगर येथे स्वतंत्र मंदिर बांधण्यात आले होते. इ. स. १९०५ सालापासून पुढे मी या समाजात मधूनमधून जाऊ लागलो. त्या वेळी व पुढे संत, हिवरगावकर, धनेश्वर, ऋषी वगैरे तरुण मंडळीनी समाजाचे काम नेटाने चालविले होते. फ्रेंड्स् लिबरल् असोसिएशन नावाची संस्था स्थापन होऊन तिच्या विद्यमाने समाजाबाहेरही व्याख्याने देण्याचा उपक्रम तेव्हा झाला; पण समाजाचा मुख्य भार त्या वेळी प. बा. सहदेवराव बागडे यांच्यावरच पडला होता. त्यांच्या साहाय्याने एक स्पृश्यासाठी व एक अस्पृश्यांसाठी अशा दोन रात्रीच्या शाळा काढण्यात आल्या. पुढे काही वर्षानी त्या बंद पडल्या. रा. ब मारुतीराव भुजंगराव या वृद्ध गृहस्थाने आपल्या स्वकुळ साळी समाजातील विद्यार्थ्यांना शिक्षण देण्यासाठी ५००० रु. व केवळ प्रार्थनासमाजासाठी ३००० रु. अशा देणग्या दिल्या त्यातच सहदेवराव बागडे यांनी स्वत:च्या १००० रु. ची भर घातली (प्रार्थनासमाजाचा इतिहास, पान २९२).

सोनईची चळवळ : पुढे १९०८ साली अहमदनगरास गेलो असता सोनई येथे मोठी चळवळ झाली. तेथील खेड्यातील लोकांचे एक शिष्टमंडळ मला तेथे नेण्यास आले, ही सत्यशोधक मंडळी होती. तेथील स्थानिक ब्राह्मणमंडळीशी काही वाद माजून आसपासच्या बऱ्याच खेड्यात असंतोष उत्पन्न झाला होता. जातीजातीत समाजिक बाबतीत वैमनस्य माजले असता त्यांच्यात सलोखा घडवून आणून उदारधर्माच्या चळवळीकडे लक्ष लावणे हे प्रार्थनासमाजाचे ब्रीद आहे. म्हणून मी सोनई येथे गेलो. तेथील ओढ्याच्या काठी वाळवंटात प्रचंड जाहीर सभा भरली. निरनिराळ्या खेड्यातून सर्व जातीची हजारो मंडळी जमली होती. प्रत्येक जातीचे दोन दोन प्रतिनिधी घेऊन एक साधारण समिती बनविण्यात आली. त्यात ब्राह्मणांचेही दोन प्रतिनिधी घेण्यात आले. सत्यसमाज हे नाव ह्या नवीन चळवळीला देण्यात आले. एक दोन वर्षे काम चालल्यावर सोनई येथील दोन पाटील घराण्यात वितुष्ट आल्याने ह्या नवीन चळवळीचा लोप झाला.

इंदूर : १९०७ साली मी इंदुरास समाजाचे उत्सवास गेली. बरोबर माझी पत्नी सौ. रुक्मिणीबाई आणि सहकारी स्वात्मानंद हे होते. इंदूर समाजाचे नाव मध्यभारतवर्षीय ब्राह्मसमाज असे आहे. डॉ. प्रभाकरपंत भांडारकर, होळकर कॉलेजचे प्रो. देसाई, तेथील प्रसिद्ध पाटकर जाधव यांचे घराणे, चित्रकार मिटबावकर ह्यांचा या समाजात मोठा पुढाकार असे ही सर्व मंडळी अनुष्ठानिक असून समाजाचे काम जोरात चालले होते. रा. सदाशिवराव केळकरही तेथेच होते. ह्या उत्सवास नगरसंकीर्तनाचे कार्य थाटाचे झाले. शेवटी नगराबाहेर वनोपासनेत प्रीतिभोजनाचा समारंभही गोड झाला. ता. २४ एप्रिल, १९०७ रोजी तेथील काही पुढारी मंडळीच्या मदतीने एक कमिटी स्थापन करुन अस्पृश्यांसाठी ता. ५ मे, १९०७ रोजी एक संस्था उघडण्यांत आली. होळकर कॉलेजचे प्रो. गोखले हे व्हाइस प्रेसिडेन्ट व रामचंद्रराव मिटबावकर हे सेक्रेटरी होते. ह्या समाजाचे एक सुंदर बाह्ममंदिर आहे. तेथील पाटकर-जाधव घराण्यातील मंडळीची समाजाला फार मदत होती. त्यांचे होळकर दरबारात वजन असल्याने श्रीमंत तुकोजीराव महाराज व त्यांची पत्नी सीताबाई होळकर यांचे समाजाकडे लक्ष लागले. महाराजांकडून या समाजास दरमहा ३० रु. चे वर्षासनही मिळत असते.

मांडवगड : उत्सव आटोपल्यावर जाधवमंडळीनी धार, मांडवगड, महू वगैरे प्रेक्षणीय स्थळे पाहण्यासाठी बैलगाडीतून सफर काढली. माझ्या पत्नीलाही घेऊन मी त्या सफरीस गेलो. धार येथील प्रसिद्ध किल्ला आणि तेथील प्राचीन राज्याचे अवशेष पाहून आनंद झाला. विंध्याद्रीच्या शिखरावर मांडवगड ही मध्ययुगीन मुसलमान बादशाहीची राजधानी होती. तेथे दहावीस मोठमोठ्या मशिदी, देवळे आणि राजमहल ही फार प्रेक्षणीय दिसली मध्ययुगीन राजा बाजबहादूर व रूपमती यांच्या प्रेमाची स्थळे पाहण्यास आली. यानंतर नर्सिंगचे शिक्षण घेण्यासाठी सौ. रुक्मिणीबाई काही महिने इंदुरास जाधवमंडळीकडे ठेवून मी मुंबईस आलो. तुकोजीरावमहाराजांची दाई व बाळकृष्णपंत जाधव यांची पत्नी सौ. अहल्याबाई या फार चारित्र्यवान व थोर मनाच्या बाई होत्या. त्यांच्या प्रेमळ सहवासात रुक्मिणीबाईना मोठा लाभ घडला.

नवसारी : पोस्टल मिशनच्या कामात परिचय झालेले रा. जी. के. वैद्य यांचे ता. सप्टेंबर, १९०४ चे पत्र आढळते. त्यावरून नवसारी येथील प्रार्थना समाजाची खालील हकिगत मिळते. रा. ब. हरी रामचंद्र शिंदे, बडोदा स्टेट इंजिनियर यांनी ३० ऑक्टोबर १८९८ रोजी नवसारी येथे समाज

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, समग्र वाङ्मय, खंड २ रा ~~~

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, समग्र वाङ्मय, खंड २ रा ~~~

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, समग्र वाङ्मय, खंड २ रा ~~~

८

भारतीय एकेश्वरी धर्मपरिषद

[All India Theistic Conference]

येथवर माझ्या प्रचारकार्यांचे स्थानिक आणि प्रांतिक स्वरूपाचे वर्णन केले. पण प्रथम सांगितल्याप्रमाणे माझे लक्ष ब्राह्मधर्माच्या विश्वव्यापकत्वाकडे आणि त्या उच्च अधिष्ठानावरून ब्राह्मधर्माच्या भारतीय कार्याकडे नेहमी लागून राहिलेले असे. या धर्माचे मुख्य अंग ही धर्मपरिषद होती. सन १८८५ साली हिंदी राष्ट्रीय सभेचे पाहिले अधिवेशन मुंबई येथे भरले. त्यात न्या. मू. रानडे यांचा अप्रत्यक्ष पुढाकार होता. त्यांची बुद्धी अष्टपैलू, भावना उदार व उच्च प्रतीच्या होत्या. पुढील दोन अधिवेशने कलकत्ता व मद्रास शहरी झाल्यावर अलहाबादला चौथी बैठक भरली. आरंभापासूनच राजकारणास समाजसुधारणेचा बळकट पाठपुरावा होता. अर्थात ह्या चौथ्या बैठकीत उदारधर्माचा पाठिंबा ह्या राष्ट्रीय चळवळीस मिळणे क्रमप्राप्तच होते. एकेश्वरी बैठकीचे अध्यक्ष न्या. मू. रानडे झाले. कलकत्त्याचे मिस्टर आणि मिसेस् आनंदमोहन बोस, लखनौचे बिपिनबिहारी बोस, बिहारचे बलदेव नारायण, लाहोरचे पं. शिवनारायण अग्निहोत्री यांनी आपापल्या प्रांतातील ब्राह्मसमाजाच्या कार्यासंबंधी भाषणे केली. पुढे सालोसाली राष्ट्रीय सभा जेथे जेथे भरेल तेथे त्या वेळी ही धर्मपरिषदही भरविण्यात यावी आणि पुढील वर्षाचे सेक्रेटरी म्हणून पं. शिवनाथशास्त्री यांना नेमावे, असा ठराव करण्यात आला.

ब्राह्मसंघ : १८८९ साली मुंबईला ही परिषद मुं. प्रांतिक समाजात भरली आणि त्या वेळी प्रांतोप्रांतीच्या पुढाऱ्यांनी भाग घेतला. कलकत्त्याहून नवविधान समाजाचे प्रतापचंद्र मुझुमदारही हजर होते. तेव्हा Theistic Union (ब्राह्मसंघ) या नावाची एक मध्यवर्ती संस्था स्थापून पुढील कार्याचा प्रयत्न करण्यात यावा असे ठरले. (१) ब्राह्मसमाजाच्या निरनिराळ्या पक्षांच्या एकत्र उपासना व संमेलने व्हावीत. (२) प्रचारासाठी एकत्र प्रयत्न व्हावा. (३) परोपकाराचे आणि भूतदयेचे काम एकत्र व्हावे वगैरे. नवीनचंद्र राय ह्यांना ह्या संघाचे सेक्रेटरी नेमले. कलकत्त्यास साधारण ब्राह्मसमाज, नवविधान ब्राह्मसमाज व आदि ब्राह्मसमाज असे निरनिराळे पक्ष पडून ब्राह्मसमाजाच्या सामाईक कार्यात फूट पडली होती. ह्या नवीन संघामुळे ही फूट भरून येण्याचा बराच संभव होता आणि त्यात आम्ही मुंबईकडील पुढाऱ्यांनीच न्या. मू. रानडे ह्यांच्या नेतृत्वाखाली उचल खाल्ली असा तर्क करण्यास बरीच जागा आहे. कारण पुढील दोनतीन साली रानडे ह्यांनाच परिषदेचे अध्यक्षस्थान देण्यात आले होते. चवथी बैठक नागपुरास १८८१ साली भरली. तेथे ब्राह्मसमाज नसल्यामुळे काम फारसे झाले नाही. पुढील सालाकरिता वामन आबाजी मोडक व पांडुरंग सदाशिव केळकर यांस सेक्रेटरी नेमण्यात आले. १८९४ साली मद्रासच्या बैठकीस डॉ. भांडारकर हे अध्यक्ष होते व पुढील साली म्हणजे १८९५ साली पुण्याच्या काँग्रेसचे वेळी पुणे

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, समग्र वाङ्मय, खंड २ रा ~~~

मुं. प्रा. समाजासारख्या तिऱ्हाइताचे कामाची माहिती इकडल्या दूरदूरच्या समाजास कळावी, (कारण प्रार्थनासमाज व आर्यसमाज ह्यांतील भेद न जाणणारे काही ब्राह्मसमाजिस्ट इकडे भेटले.) काही प्रमुख सभासदांची प्रत्यक्ष ओळख करून घ्यावी, मुख्य मुख्य स्थानिक समाज पाहावे वगैरे हेतू मनात धरून मी ह्या सफरीवर निघालो.

बांकीपूर : बिहार प्रांताची राजधानी बांकीपूर येथे ता. २ जानेवारी, १९०६ रोजी आलो. हा देश जरी बिहारी (हिंदुस्थानी) लोकांचा असला तरी येथे बंगाली लोकांची बरीच वस्ती असून सार्वजनिक बाबतीत त्यांचाच पुढाकार व सुळसुळाट दिसला. वायव्येकडील प्रांतात ज्याप्रमाणे एकही तद्देशीय ब्राह्म सापडणे कठीण त्याप्रमाणे सबंध बिहार प्रांतात बिहारी ब्राह्मांची एकाच बोटावर मोजण्याइतकी संख्या आहे. मुख्य ब्राह्मसमाज नवविधान मताचा आहे. भाई प्रकाशचंद्र राय हे त्याचे पुढारी. हे सर्वांशी मिळूनमिसळून वागून सार्वजनिक कामात पुढाकार घेणारे आहेत. राममोहन राय सेमिनरी ही साधारण ब्राह्मसमाजाची असून त्या शाळेतच ह्या पक्षाच्या उपासनाही होतात. तारीख ४ रोजी राय यांचे घरी मी प्रमुख मंडळी जमवून प्रथम मुंबईकडची हकीकत सांगितली. उत्सवांत एकमेकांनी मिळून कार्यक्रम ठरवावा, एकमेकांच्या उपासनेस पाळीपाळीने जावे असे ठरले. बॅ. दास यांचे घरी तारीख ५ रोजी दोन्ही पक्षांच्या स्त्रियांची सभा भरली. पोस्टल मिशन, डोमेस्टिक मिशन, सामाजिक मेळा वगैरे कामे स्त्रियांनी कशी करावयाची हे मी सांगितले. सिल्हेटहून काशी परिषदेस आलेल्या सौ. हेमंतकुमारी चौधरी ह्यांनी हिंदीत भाषण केले.

मोघीर : तारीख ६ रोजी मोघीर येथे आलो. हे रमणीय स्थान भागीरथीचे काठी आहे. पुराणातील राजा दानशूर कर्ण ह्याची दान देण्याची जागा अद्यापि गंगेच्या तीरावर दाखवितात. ब्राह्म यात्रेकरूंस या स्थळाचे महत्त्व असे सांगण्यात येते की, ब्राह्मसमाजात पुढे जो भक्तिसंप्रदाय सुरू झाला तो मूळ या ठिकाणी. १८७२ साली हल्लीचे मंदिर बांधण्यात आले. या मंदिरात एकदा काही वैष्णव मंडळीस भजनास बोलविले होते. त्यापैकी एका चांडाळ जातीच्या भक्ताने इतके सुश्राव्य व आवेशयुक्त भजन केले की, त्याचा मंडळीवर विलक्षण परिणाम झाला. पुढे साधु अधीरनाथ ब्राह्मप्रचारक यांचे भजनाविषयी प्रेम अधिकाधिक वाढून शेवटी स्वत: केशवचंद्र सेन येथे असता त्याच्यावरही भजनाचा परिणाम घडला व येथील कार्य बरेच वाढले. तरी येथील हल्लीची ओसाड व दीनवाणी स्थिती पाहून माझे मन गहिवरले व मानवी मनाची अस्थिरता पाहून विस्मयले. मंदिरापुढील पटांगणात केशवचंद्र सेन, साधु अघोरनाथ व दीननाथ चक्रवर्ती यांच्या तीन समाधी मध्यभागी एका चौथऱ्यावर बांधल्या आहेत. १९०२ साली या गावी आर्यसमाजाची स्थापना झाली; पण तोही नीट चालत नाही.

भागलपूर : भागलपूर येथे तारीख ७ रोजी पोचलो. हा समाज तारीख २२ फेब्रुवारी १८६४ रोजी स्थापण्यात आला. राजा शिवचंद्र बॅनर्जी नावाच्या एका अत्यंत आस्थेवाईक हितचिंतकाने स्वत: सर्व खर्च सोसून मंदिर बांधविले. केशवचंद्र सेन ह्यांच्या हस्ते हे मंदिर उघडण्यात आले. समाजात थोडी का होईना, पण बडी बडी प्रमुख व वृद्ध मंडळी आहेत; पण उपासनेशिवाय काही काम होत नाही. तारीख ९ रोजी सुमारे ५/६ तरूण पदवीधर ब्राह्ममंडळीपुढे मुंबईच्या तरुण ब्राह्ममंडळाचे छापील नियम मी वाचून दाखविले आणि तेथील पूर्वीची तरूण संस्था पुन्हा स्थापन

करण्याचे ठरविले. ह्यानंतर रात्री ७ वाजता बाबू निवारणचंद्र मुकर्जी यांचे घरी प्रमुख मंडळी जमली. मुंबईकडील समाजाचे तिऱ्हाईतपणाचे काम ऐकून त्यांना फार समाधान झाले. दोघांनी तर वारंवार अशी इच्छा प्रगट केली की, मुंबई व बंगाल प्रांतातील ब्राह्मांचे अधिक निकट संबंध जुळविणे फार इष्ट आहे व त्याकरिता परस्पर विवाहव्यवहार करणे अवश्य आहे. मी म्हटले की, निरनिराळ्या प्रांतातील ऐपतदार ब्राह्मांनी निरनिराळ्या प्रांतात प्रवास केल्याशिवाय वरील व्यवहार कधीही शक्य होणार नाही.

काठीहार : हे रेल्वेचे एक मोठे जंक्शन आहे. बरीच चौकशी केल्यावर अर्धवट बांधलेल्या ब्राह्ममंदिराचा पत्ता लागला; पण येथे समाज नाही. दारे व खिडक्या नाहीत. नुसत्या भिंतीच पाहून हे मुक्तद्वार गौडबंगाल काय आहे याचा तपास करण्यासाठी मी तेथेच राहिलो. शेजारच्या एका मुसलमान गृहस्थाने सांगितले की, या अर्धवट इमारतीचा क्वचित् प्रसंगी अत्यंत खेदजनक दुरुपयोग होतो. १८८७ साली रेल्वेतील ब्राह्म नोकरांच्या-विशेषत: जानकीनाथ गांगुली व रखलदर्श चतर्जी यांच्या-प्रयत्नाने येथे समाज स्थापन झाला. त्या वेळी १० सभासद होते. १८९९ साली ही अर्धवट इमारत उभी राहिली; पण इतक्यात येथील रेल्वे ऑफिस एकदम कलकत्त्यास गेल्यामुळे येथे एकही ब्राह्मो उरला नाही.

पूर्णिया : काठीहारपासून १८ मैलांवर पूर्णिया हे जिल्ह्याचे गाव आहे. येथे बाबू हजारीलाल हे आस्थेवाईक गृहस्थ होते. त्यांचेकडे गेलो. तेथे मला तारकनाथ राय नावाचे गृहस्थ भेटले. ह्या दोघांना मी काठीहारचे वर्तमान कळविले. तेथील पूर्वीच्या फंडापैकी २०० रू. अद्यापि शिल्लक आहेत, असे कळले. काठीहार येथे मंदिर आहे, पण समाज नाही आणि पूर्णिया येथे समाज आहे, पण मंदिर नाही. पूर्णिया येथील आस्थेवाईक सभासदास घेऊन काठीहार येथे पुन्हा गेलो. सायंकाळी माझे हायस्कुलात व्याख्यान झाले. तेथील मुख्य अधिकारी मुन्सफ एक उदार मताचे बॅरिस्टर मुसलमान होते. त्यांनी आपल्या सहीच्या आमंत्रणचिठ्ठ्या लोकांना पाठविल्या व अध्यक्षस्थान पत्करले. व्याख्यानानंतर बाबू हजारीलाल यांनी येथील काही मंडळीच्या सल्ल्याने बाकी उरलेल्या शिलकेतून मंदिर पुरे करून देण्याचे ठरविले.

ह्या प्रकारे बिहार प्रांतातील काम झाल्यावर मी श्रीगंगेचा निरोप घेऊन तिचा पिता जो पर्वतराज हिमाचल त्याचे चरणांगुलीवर विराजमान झालेली वनश्रीची जणू माहेरकडची सखी जी कुचबिहार नगरी तिच्यात सायंकाळच्या शांत समयी अत्यादरपूर्वक प्रवेश केला.

कुचबिहार : कुचबिहार संस्थानची हद्द भूतान संस्थानचे हद्दीस लागूनच आहे. येथील मूळचे रहिवासी जे अर्धवट जंगली लोक (कोल = कोळी) शेतकी करून आहेत, त्यांची सांपत्तिक हद्द कंगालपणाच्या सीमेला लागून आहे. ह्यांच्या चेहऱ्यात आर्यापेक्षा मोगली साम्य अधिक दिसते. कुचबिहारचे राजघराणे ह्याच जंगली जातीचे आहे. राजा, प्रजा व मानकरीमंडळ हे सर्व एकजात असून यांचे दरम्यानचा अधिकारीवर्ग मात्र कारकुनापासून तो थेट दिवाणापर्यंत बंगाली बाबूंचा आहे. मनुष्यस्वभावास अनुसरून यांचे एतद्देशीयांशी अरेरावीचे वर्तन पाहून किंचित कौतुकच वाटते. उत्पन्नाचे मानाने हे संस्थान जवळजवळ कोल्हापूर संस्थानइतके आहे; पण बंगाल्यात हे

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, समग्र वाङ्मय, खंड २ रा ~~~

मंदिर : इतके सुंदर ब्राह्ममंदिर निदान माझ्या तरी पाहण्यात कुठे आले नाही. डाक्का, कलकत्ता वगैरे ठिकाणी यापेक्षा मोठमोठी मंदिरे आहेत; पण ती केवळ व्याख्यानमंदिरे. आत्म्याला जागृत करण्याकरिता त्यात विशेष असा काही सात्त्विक भाव नाही, तो ह्या मंदिरात भरपूर आहे. ह्या मंदिरात रविवारी सायंकाळी उपासना झाली. ती फार गंभीर झाली. बराच धूप जळत असल्याने चहूकडे सात्त्विक गंध सुटला होता. नियमित वेळी घंटानाद झाल्यावर नेमणुकीचे प्रचारक वेदीवर बसले. दुर्गानाथराय हे केशवचंद्रांच्या प्रिय शिष्यांपैकी एक असून फार साधे व सात्त्विक दिसले. गायन सुस्वर व भजन प्रेमळ झाले.

माझी राहण्याची सुंदर सोय व थाटाचा पाहुणचार एका बोर्डिंगात केला होता. तारीख १३ रोजी टाउन हॉलमध्ये Religion at the Basis of Life ह्यावर माझे इंग्रजीत व्याख्यान झाले. दिवाणसाहेब अध्यक्ष होते. कुचबिहार येथे दोन पक्षांचे समाज आहेत. एकाचे अध्यक्ष राजेसाहेब व व्यवस्थापक राणीसाहेब. शिवाय तत्त्वज्ञानाच्या अध्ययनाबद्दल सर्व बंगाल्यात नावाजलेले ब्रजेंद्रनाथ झील हे कॉलेजचे ब्राह्म प्रिन्सिपॉल होते. मी तेथे असताना तेथील कॉलेजकुमारानी दाखविलेली जिज्ञासा, तत्परता, सभा पुन्हा सुरू करण्याची उत्सुकता व त्यानंतर त्यांची आलेली पत्रे ह्या सर्वावरून पाहता कुचबिहार संस्थानात एखादा ताज्या दमाचा प्रचारक पाठविल्यास पुष्कळ काम होण्यासारखे आहे; पण राजकारणामुळे ते होणार नाही ह्याचीही खात्री आहे. म्हणून मी दोन दिवसातच कार्यक्रम आटोपून मुकाट्याने १५ जानेवारी रोजी ब्रह्मपुत्रेची वाट धरली.

डुब्री : "ब्राह्मधर्माचा प्रचारक होण्यात मला जी मान्यता व सुख वाटत आहे त्यापुढे राजसुखही तुच्छ होय" हे वाक्य जेव्हा मी बाबू उपेन्द्रनाथ बोस, डुब्री ब्राह्मसमाजाचे एक वजनदार पुरस्कर्ते, यांच्यापुढे उच्चारले तेव्हा त्यांची मुद्रा संचित झाली. कोठे अरबी समुद्रावरील मुंबई बेट व कोठे आसाम प्रांतातील हा डुब्री गाव ! पण ज्या सनातन ब्राह्म समाजाचा मी वार्ताहर होतो त्याचा शुभमहिमा असा आहे की, त्यायोगे ह्या विशाल भरतखंडाचीच नव्हेत तर ह्या विपुल पृथ्वीचीही दूरदूरची टोके पवित्र प्रेमरज्जूने एकत्र होणार आहेत व हल्ली होतही आहेत. तथापि, वरील उद्‌गार ह्या विशिष्ट प्रसंगी निघण्याचे कारण हे केवळ अंतरीचे सुखच होते, असे नव्हे तर त्यात भोवतालच्या शांत व गंभीर देखाव्याची जबर भर पडली होती. तारीख १५ जानेवारी रोजी सायंकाळी आगगाडीतून उतरल्यावर बाबूमजकुरांबरोबर मी ब्रह्मपुत्रेच्या उंच व विस्तीर्ण तीरावर फिरावयास निघालो. प्रथम एका अक्षरशः एकान्त व तटस्थ स्थळी--जणु प्रार्थनेत मग्न झालेले-ब्राह्ममंदिर पाहिले. मंदिराच्या दाराशेजारीच एका गत ब्राह्मबंधूची सुंदर संगमरवरी समाधी पाहिली. ह्या बंधूच्या प्रार्थना फार प्रेमळ व तन्मय होत असत व अशीच एकदा प्रार्थना करीत असताना तिच्या भरात ह्यांचे देहावसान झाले. म्हणून त्या प्रसंगाच्या स्मारकार्थ समाजमंडळीनी ही समाधी बांधली आहे, हे ऐकून व समाधी पाहून झाल्यावर मागे वळतो तोच साक्षात ब्रह्मपुत्रेने मला आपले विराट दर्शन दिले. "मृत्योर्मा अमृतं गमय" असे मनात येते न येते तोच अमृताची पताकाच माझ्यापुढे फडकू लागली. हिमालयाच्या पलीकडे कैलास पर्वताच्या पूर्व पायथ्याशी असलेल्या मानसरोवरातून निघून पित्यास प्रदक्षिणा घालून आलेली ही महाभाग ब्रह्मपुत्रा! हिने केवळ दर्शनहेळामात्रेकरून किती दिवसांची वार्ता सांगितली! किती काळाची साक्ष दिली! डुब्री गावच्या

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, समग्र वाङ्मय, खंड २ रा ~~~

एका महत्त्वाच्या प्रश्नावर मोठा वाद माजला होता. तो विषय म्हणजे ब्राह्मसमाजातील तरुणांनी रंगभूमीवर नाटकातील कामे करावीत किंवा नाही हा होय. ब्राह्मसमाजातील तिन्ही पक्षांतील सर्व वृद्ध मंडळी--विशेषत: कृष्णकुमार मित्र आणि हेरंबचंद्र मैत्र--यांचा या कामी फार विरोध होता. पण प्रसिद्ध कलाप्रिय रवींद्रनाथ टागोर हे या कामी फार अनुकूल होते. बहुतेक सारा तरुणवर्ग त्यांच्याच मताचा होता. डॉ. रवींद्रनाथ टागोर यांना साधारण ब्राह्मसमाजाचे सन्मान्य सभासद करावे असा आग्रह तरुणांनी घेतला. वृद्धांना याची फार चीड आली. बिपिनचंद्र पाल हे टागोर यांच्या मताचेच होते. त्यांच्याकडूनच मला ह्या रणसंग्रामाची बरीच हकीकत कळली. पुढे बरीच वर्षे हा तंटा विकोपाला गेला. अखेरीस रवीद्रबाबूंचाच जय झाला. १९११ साली ब्राह्मसमाजाच्या माघोत्सवात रविवारच्या नीतिशाळेचा जो बक्षीससमारंभ झाला त्या वेळी तरुण मुलामुलींनी एक सुंदर नाट्यप्रयोग केला. पण तो पाहण्यास वृद्धांचीच अधिक गर्दी जमली होती. पुढे पुढे तर रवींद्रनाथ टागोर हे माघोत्सवाच्या वेळी आपल्या घरी आपल्या लेकी, सुना व नातवंडे यांना घेऊन आपण लिहिलेल्या नाटकांचे प्रयोग जाहीरपणे करून दाखवीत. १९२३ च्या सुमारास मी कलकत्त्यास गेलो असता रवींद्रनाथ टागोर यांना साधारण ब्राह्मसमाजाने आपल्या वेदीवरून उपासना करण्यास बोलावले. त्या वेळी मी हजर होतो. तरुणवर्गाचा हा मोठा विजय. पण वृद्ध हेरंबचंद्रबाबूंना हा शेवटपर्यंत कधीच खपला नाही. त्यांचीच एक चमत्कारिक गोष्ट सांगतात की, बाबूमहाशय एकदा रस्त्याने जात असता त्यांच्याजवळ एक तरुण विद्यार्थी येऊन त्याने "अमुक एक नाटकगृह कोठे आहे?" असे विचारले. बाबूजीना अत्यंत संताप आला. "मला ठाऊक नाही जा!" असे रागारागाने सांगून त्यांनी त्याला झिडकारले. विद्यार्थी गेला; पण बाबूजींना आपण खोटे बोललो याचा पश्चाताप झाला व त्यांनी त्या विद्यार्थ्यास परत बोलावले. "अरे, मला ठाऊक आहे. पण मी सांगत नाही जा!" असे म्हणून त्यांनी त्यास पुन्हा झिडकारले.

सुरत : १९०७ च्या नाताळात सुरतेस या परिषदेची बैठक झाली. रवीन्द्रनाथ टागोरांचे वडील बंधु व हिंदुस्थानातील पहिले आय्. सी. एस्. सत्येन्द्रनाथ टागोर हे त्या परिषदेचे अध्यक्ष होते. अहमदाबाद समाजाचे अध्यक्ष लालशंकर उमियाशंकर यांनी स्वागतमंडळाचे अध्यक्ष या नात्याने प्रतिनिधीचे स्वागत केले. सुरतेस समाज नसताही ही बैठक समाधानकारक रीतीने येथील टाउन हॉलमध्ये पार पडली. पाहिली उपासना मुंबई समाजाचे स्वामी स्वात्मानंदजी यांनी हिंदीत चालविली. जाहीर सभेत डॉ. भांडारकर, गुजराथचे प्रसिद्ध कवी नानालाल, लाहोरचे प्रो. रुचिराम सहानी यांची भाषणे झाली. ठरावाचे वेळी ह्या परिषदेचे मार्फत लाहोरचे अविनाशचंद्र मुझुमदार यांचे नेतृत्वाखाली दुष्काळनिवारणाचे कामी घटना व्हावी, असा एक विशिष्ट ठराव पास करण्यात आला.

राष्ट्रीय सभेचा मात्र या वेळेस फार गोंधळ उडाला. ही सभा आजपर्यंत मवाळांच्या हातात होती. लोकमान्य टिळकांनी ती ह्या वर्षी उधळून लावली व पुढे कित्येक वर्षे तिला आपल्या मुठीत ठेवले. गेल्या वर्षी मुंबईत स्थापन झालेल्या डिप्रेस्ड क्लासेस मिशनची एक जाहीर सभा ह्याच वेळी झाली.

ह्या वेळी काही कारणांवरून पंजाबातील आर्य समाजावर पतियाळाच्या संस्थानधिपतीचा फार रोष झाला होता. लाला मुन्शीराम, स्वामी श्रद्धानंद यांचेवर ह्या रोषाचा घाला पडला होता. पतियाळाच्या आर्यसमाजमंदिराचे रूपांतर संस्थानच्या घोडशाळेत करण्यात आले होते. लालाजीना आम्ही भेटण्यास गेलो, तेव्हा ते खिन्न मुद्रेने पण उदात्त वृत्तीने या शाळेत बसलेले दिसले. सौ. हेमंतकुमारी चौधरी ह्या ब्राह्मभगिनीकडे आम्ही एक दिवस उतरलो. उपासना वगैरे आटोपून आम्ही निघालो. परत येतांना अजमीरजवळील अबूच्या पहाडात आम्ही दोन दिवस धर्मचिंतनात घालविले. तेथील सुप्रसिद्ध जैनमंदिर, दिलवारा आणि प्रेक्षणीय स्थळे पाहिली. ह्या मंदिराचे सर्व काम संगमरवरी दगडाचे असून तेथे कलाकुसरीची इतकी कमाल झाली आहे की, तशी सुबकता व नाजुकता जगात इतरत्र क्वचितच आढळेल. मोगलांच्या तडाक्यातून हे रत्न कसे वाचले याचे आम्हाला मोठे आश्चर्य वाटले. हे स्थळ इतके अपूर्व असून त्या मानाने त्याची प्रसिद्धी का नाही याचे अधिक आश्चर्य वाटले. कदाचित अप्रसिद्धपणामुळेच हे स्थळ सुरक्षित राहिले असेल अशी भोळी समजूत आम्ही करून घेतली.

मातोश्रीचा अंत : ह्या प्रवासास निघण्यापूर्वी माझी वृद्ध मातोश्री कॅन्सरच्या व्यथेने अत्यवस्थ होती. तिला सोडून मला प्रवासास निघवेना आणि गेल्याशिवाय राहवेना असा पेच पडला; पण मातोश्रींनी मला धीर दिला. त्यांनी मला जावयास अनुज्ञा दिली आणि "तू परत येईपर्यंत मी तुला सोडून जात नाही" असे आश्वासनही दिले. हा जुन्या माणसांचा करारीपणा! मी परत आल्यावर तारीख ८ फेब्रुवारी, १९१० रोजी माझ्या प्रेमळ मातोश्री सुमारे ७० वर्षाच्या होऊन निवर्तल्या.

ह्या परिषदेचा अहवाल प्रसिद्ध करताना मुंबईतील सुबोधपत्रिकेत खालील अर्थाचा मजकूर आहे :--

परिषदेचे जनरल सेक्रेटरी रा. वि. रा. शिंदे यांनी परिषदेपुढे आपल्या प्रास्ताविक भाषणात सांगिलते की, १९०३ साली भरलेल्या मद्रासच्या बैठकीत या परिषदेची मंदावलेली स्थिती पाहून १९०४ साली मुंबईच्या बैठकीत हिची पुनर्घटना करण्यात आली. तेव्हापासून मुंबई, काशी, कलकत्ता, सुरत, मद्रास आणि लाहोर या सहा ठिकाणी परिषद भरल्यामुळे तिची भरतखंडात एक फेरी संपूर्ण झाली असून तिच्या विकासाचा एक टप्पा संपला आहे. म्हणजे ब्राह्मसमाजाच्या सामान्य गरजा निरनिराळ्या प्रांतिक पुढाऱ्यांच्या द्वारे एकमेकास कळून चुकल्या आहेत. ह्यापुढे ह्या परिषदेची अधिक पद्धतशीर घटना व्हावी, मध्यवर्ती कचेरी, निधी आणि वाहून घेतलेले कार्यवाहक नेमून त्यांच्या द्वारे वेळोवेळी करण्यात आलेल्या ठरावांची अंमलबजावणी व्हावी, अशी कळकळीची विनंती रा. शिंदे यांनी केली. ह्यावर पुढे दोन तास कडाक्याचा वाद होऊन शेवटी परिषदेला अद्याप अशी घटनेची वेळ आली नाही, असे बहुमताने ठरले. या निराशेचे कारण कलकत्त्यातील ब्राह्मसमाजाच्या शाखांची मने अद्यापि परस्परांविषयी कलुषित राहिल्यामुळे एकत्र कार्य करणे अशक्य होते.

अलाहाबाद : १९१० साली ही परिषद अलाहाबाद येथे भरली. तेथे पूर्वी एक ब्राह्मसमाज होता ; पण अलीकडे तो बंद पडला होता. लाहोरचे अविनाशचंद्र मुझुमदार या प्रांतातील माहितगार

होते, म्हणून त्यांना माझ्या जोडीला सेक्रेटरी म्हणून नेमण्यात आले होते. परिषदेच्या पूर्वी तीन आठवडे जाऊन त्यांनी पूर्वतयारी चालविली. जागा मिळण्यास कठीण जाऊ लागले. कर्नलगंज बंगाली स्कूलच्या अधिकाऱ्याला त्यांच्या शाळेला २०० रूपयांची मदत देऊन परिषदेसाठी तेथे जागा मिळविली. अध्यक्ष कोणास नेमावे हाही प्रश्न बिकट झाला. शेवटी पं. शिवनाथशास्त्री यांनी कबूल केल्यावर हा प्रश्न सुटला.

मी तेथे एक आठवड्यापूर्वी गेलो. प्रत्येक परिषदेपूर्वी सर्व ब्राह्म आणि प्रार्थनासमाजांना सर्क्युलर काढून खर्चाची तरतूद करणे हे माझे काम असे. केव्हा पुरेसे पैसे मिळत आणि केव्हा मिळतही नसत. माझ्या प्रवासखर्चाची ही नेहमीची रड असे. एकच महिन्यापूर्वी (नोव्हेंबर १९१० मध्ये) मुंबई प्रार्थनासमाजाशी प्रचारक या नात्याने मी संबंध सोडला होता. अर्थात् प्रवासखर्चाचाच नव्हे तर घरखर्चाचाही प्रश्न मजपुढे आ पसरून उभा होता. नाताळचे थंडीचे दिवस, आगगाडीतून भयंकर गर्दी, थर्ड क्लासची दगदग, अशा स्थितीत मध्यरात्री मी अलाहाबादेस उतरलो. प्रो. बाबू रामानंद चतर्जी यांचेकडे मी उतरणार होतो ; पण गाडीवाल्याला ते ठिकाण माहीत नव्हते तास दोन तास अपरात्री इकडे तिकडे भटकल्यावर नाइलाज म्हणून त्याने शेवटी म्युइर कॉलेजच्या विस्तीर्ण पटांगणात माझे सामान टाकले व तो निघून गेला. थंडी भयंकर पडली होती. सामानाला डोके टेकून त्या माळरानावर ती रात्र मी कशीबशी मोठ्या कष्टाने काढली. माझ्या प्रवासात हे सोहाळे नित्याचेच असत. कलकत्त्याचे बाबू हेमचंद्र सरकार ह्या परिषदेला हजर होते. ह्या परिषदेचे विशेष काम म्हणजे परिषदेच्या संघटनेचा खलिता तयार करून मंजूर करून घेणे. हा मसुदा तयार करण्यासाठी हेमचंद्र सरकार, नृत्यगोपाळ राय, लाहोरचे लाला रघुनाथ सहाई आणि मी स्वत: यांची एक पोटसमिती नेमण्यात आली होती. खलित्यात पुढील मुद्दे होते : (१) नाव थिइस्टिक कॉन्फरन्स असे असावे. (२) उद्देश एकेश्वरी धर्माचा प्रसार. (३) एकेश्वरी धर्माचे कोणीही अनुयायी, रीतसर निवडून आलेले, हे सभासद. (४) परिषदेचा तत्कालीन अध्यक्ष, चार सभासद, एक किंवा दोन सेक्रेटरी यांची स्टँडिंग कमिटी. या सर्वाची निवडणूक दरवर्षी परिषदेत होणे. वर्षभर कम करून शेवटी अहवाल सादर करणे. (५) ठरावाचा अंमल करणे वगैरे स्टँडिंग कमिटीची कामे. (६) परिषदेच्या ठिकाणी स्थानिक सभासदांची स्वागत कमिटी नेमून आपले अवश्य ते अधिकार स्टँडिंग कमिटीने या कमिटीस तात्पुरते देणे. या नियमात बदल करावयाचा असल्यास परिषदेच्या उघड्या जाहीर सभेत दोन तृतीयांश सभासदांच्या अनुमतीची जरुरी.

लवकर एकमत होईना, म्हणून अध्यक्षाने हा खलिता निरनिराळ्या ब्राह्म आणि प्रार्थना समाजाच्या अभिप्रायासाठी सर्व देशभर फिरविण्यात यावा आणि कलकत्त्यात पुढच्या वर्षीच्या परिषदेत हे सर्व प्रकरण सादर करावे, असा ठराव मांडल्यावर तो पास झाला. प्रचाराचे काम चोहीकडे फार अव्यवस्थित रीतीने चालले होते, पण तत्कालीन प्रचारक आपापली कामे सोडून बाहेरगावी फारसा संचार करीत नसत. म्हणून मी एक ठराव आणला की, देशातील मुख्य मुख्य ब्राह्मसमाजांनी आपापल्या प्रचारकांना निवडक प्रांतातून निदान तीन महिने तरी संचारास पाठवावे. अर्थात् बंगाल्यांनी हा ठराव हाणून पाडला. एकत्र काम करा म्हटले की त्यांचा मस्तकशूळ उठत असे. मी दुसरा ठराव बहु जनसमाजात ब्राह्मधर्माचा प्रचार करावा हा आणल्याबरोबर मात्र तत्काळ

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, समग्र वाङ्मय, खंड २ रा ~~~

मदतीचे आश्वासन : कराची येथील काम आटोपल्यावर बडोद्याचे श्रीमंत सर सयाजीरावमहाराज गायकवाड यांची डॉ. संडरलंडशी समक्ष भेट करून देण्यासाठी महाराजांच्या प्रायव्हेट सेक्रेटरीला आगाऊ भेटून तयारी केली. डॉ संडरलंड, त्यांची कन्या व मी महाराजांचे पाहुणे म्हणून बडोद्यास दोन तीन दिवस होती. अशा जागतिक परिषदेची महाराजांना हौस फार. त्यांची सहानुभूती आणि मदत मिळण्याची आम्हाला आशा होती. त्यांनी मदतीचे आश्वासन दिले. राजवाड्यात डॉ. संडरलंडचे एक व्याख्यान त्यांनी करविले. विषय 'इमर्सन' हा होता. व्याख्यान संपल्यावर लक्ष्मीविलास राजवाडा संपूर्णपणे फिरून दाखविण्यात आला. वाड्याचे एकंदर काम व मांडणी पाहून डॉ. साहेबांनी संतोष व्यक्त केला आणि जगातील उत्तमोत्तम वाड्यांमध्ये ह्याचा नंबर बराच वर येतो असा अभिप्राय दिला. हिंदुस्थानातील प्रमुख शहरी ह्या जागतिक परिषदेची ठरलेली योजना तेथील पुढाऱ्यांस समक्ष समजावून सांगून डॉक्टरमजकूर अमेरिकेस परत गेले.

महायुद्ध : लगेच मी ह्या नवीन कामास लागलो. एक जाहीर विनंतीचे लहानसे पुस्तक मी छापले आणि ते हिंदुस्थानातील युरोपातील आणि अमेरिकेतील परिचित गृहस्थांना पाठवून पत्रव्यवहार सुरू केला. बरीच समाधानकारक उत्तरे आली. युरोपातील त्या काळचे प्रसिद्ध व अग्रगण्य जर्मन तत्त्वज्ञानी प्रो. रुडॉल्फ ऑयकेन यांचे 'परिषदेस हजर राहून भाग घेतो' अशा आशयाचे पत्र आले. प्रोफेसर मजकूर पुढील वर्षी जपानला जाणार होते. म्हणून वाटेत हा कार्यभाग उरकून घेण्यास त्यांना कठीण पडणार नव्हते. पूर्वतयारीची ही धामधूम चालली असतांना विधिघटना निराळीच चालू होती. १९१४ च्या ऑगस्ट महिन्यात महायुद्ध अकस्मात सुरू झाले. त्यात ही परिषदच काय पण अनेक जागतिक महत्त्वाच्या गोष्टींची होळी झाली. महायुद्धाने सर्व जगाला 'त्राहि माम्' करून सोडले. मग पुढे भरणाऱ्या परिषदेची कथा काय! गेल्या दहा वर्षात अत्यंत श्रम करून ज्या एकेश्वरी धर्मपरिषदेला आम्ही नावारूपाला आणले होते तिचासुद्धा ह्या खाईत स्वाहा झाला.

प्रार्थनासमाजाचा प्रचारक या नात्याने माझा संबंध १९१० साली सुटला होता. पुढे तीन वर्षे डि. क्ला. मिशनच्या कामानिमित्त मध्यवर्ती शाखा मुंबईतच होती, म्हणून मला मुंबईलाच राहावे लागले; पण मिशनची वाढ कल्पनेबाहेर वाढू लागली. म्हणून माझे मुख्य ठिकाण मुंबई हे सोडून पुणे करावे लागले.

●●●

९

ब्राह्मधर्मसूची ग्रंथ

या विषयाची रजा घेण्यापूर्वी या परिषदेच्या कामातूनच निघालेल्या Theistic Directory ऊर्फ ब्राह्मधर्मसूची ग्रंथ ह्याविषयी थोडी माहिती देऊन हा भाग पुरा करू. भारतातील निरनिराळ्या ब्राह्मसमाजाच्या कार्याची आणि प्रगतीची माहिती जमा करून सालोसाल प्रसिद्ध करण्याचे काम कलकत्त्याचे भाई प्रतापचंद्र मुझुमदार यांनी प्रथम १८७२ च्या सुमारास सुरू केले आणि Theistic Anuual या नावाखाली १८७९ पर्यंत चालू ठेवले. पुढील वर्षी एका त्रैमासिकाच्या रूपाने त्यांनी हेच काम चालविले. पुढे मिस्. एस. डी. कॉलेट ह्या उत्साही इंग्रज स्त्रीने १८७६-८७ पर्यंत Bramho Year Book या नावाने हेच काम अधिक पद्धतशीर चालविले.

प्रकाशन : त्यापुढे १८८८ साली ब्राह्मपरिषदेचे काम सुरू झाले. १९०५ साली काशीच्या परिषदेत या सूचीग्रंथाच्या कामासाठी मी पुन्हा उचल केली. परिषदेकडून मी एकमताने ठराव पास करून घेतला व समक्ष माहिती करून घेण्यास बंगालची सफर काढली. जाहीर सर्क्युलर काढून व खासगी पत्रव्यवहार करून कित्येक वर्षे प्रयत्न करूनही समाधानकारक माहिती मिळेना, म्हणून हा प्रयत्न मला दोनदा सोडून द्यावा लागला. शेवटी १९१२ साली मी हा प्रयत्न पुन्हा केला. ज्या अर्थी निरनिराळ्या स्थानिक ब्राह्मसमाजांच्या इतिहासाची मनोवेधक माहिती मला आधीच मिळाली होती व ती मी छापूनही काढली होती त्या अर्थी हे काम असे अर्धवट टाकणे मला पसंत पडले नाही. भारताच्या दूरदूरच्या कानाकोपऱ्यांतील कार्यवाहकांना मिळालेले अपयश देखील उद्बोधक होते. ही माहिती ठिकठिकाणच्या प्रत्यक्ष कार्य करणाऱ्यांनी आणि डोळ्यांपुढे घडलेल्या गोष्टीची साक्ष देणारांनी लिहून पाठविली होती. समुद्रापलीकडील इतर देशातील उदारधर्माची चळवळ करणारांनी आपापल्या माहितीची आणि संदेशांचीही यात भर टाकली म्हणून मी हे अत्यंत परिश्रमाने तयार केलेले सुमारे ३७५ पानांचे इंग्रजी पुस्तक १९१२ च्या डिसेंबर महिन्यात प्रसिद्ध केले. ह्याला सर नारायण चंदावरकरांनी आपली सुंदर प्रस्तावना जोडली आहे. त्यात त्यांनी म्हटले आहे की, "भरतखंडात ब्राह्म आणि प्रार्थनासमाजांनी चालविलेल्या एकेश्वरी धर्माची एकत्रित माहिती ह्या समाजाच्या सभासदांना व हितचिंतकांनाच नव्हे तर ज्या कोणाला ह्या चळवळीकडे चिकित्सक दृष्टीने पाहावयाचे असेल तर अशा बाहेरच्यांना देखील ही माहिती अत्यंत उपयोगी ठरेल. आधुनिक सुशिक्षित हिंदुलोक धर्माचे बाबतीत अत्यंत उदासीन आहेत, असा आक्षेप वरचेवर करण्यात येतो; पण तो सर्वाशी खरा नाही. हिंदुमहामंडळ, आर्यसमाज, थिऑसफी आणि इतर धर्माच्या चळवळी यांचे कोणी निरीक्षण केल्यास नवीन चैतन्याची साक्ष सहज पटण्यासारखी आहे. आधुनिक विचारी जगात दोन भिन्न प्रमुख शक्तीचे कार्य चालू आहे. एक धर्मकारण व दुसरे

अर्थकारण. ह्या दोन शक्ती सर्व सुधारलेल्या जगास हालवून सोडीत आहेत. नुसत्या अर्थाच्या मागे लागलेला मनुष्य अथवा संस्था असणे शक्य नाही. जसजशी श्रीमंती वाढते तसतसा कंगालपणाही त्याचबरोबर वाढतो आणि त्याच्या मागोमाग युद्ध हे ठेवलेलेच! दुसरे सत्य हे की, मतमतांतरांचा गलबला चालला असता त्यातूनच एक मूलभूत सामान्य तत्त्व बाहेर डोकावते. बंगाल्याकडील राममोहन राय, महर्षी देवेंद्रनाथ, ब्रह्मानंद केशवचंद्र आणि आमचेकडील सर रामकृष्णपंत भांडारकर यांनी या सामान्य तत्त्वाचा स्वीकार केला असून त्याचा पुकारा ते आधुनिक जगास करीत आहेत. त्यांची जबाबदारी किती मोठी आहे हे हा सूचीग्रंथ दाखवीत आहे. ह्या ग्रंथांत वर्णिलेली परिस्थिती वाचून नेहमी आनंदच होईल असे नाही. तथापि ब्राह्मधर्माचा प्रचार अधिक नेटाने करणे कसे अवश्य आहे हे पटले आणि ब्राह्मधर्मानुयायी होणे हे सुखातले मोठे सुख आणि भाग्यातले मोठे भाग्य आहे याची खात्री पटते."

माझे मित्र द्वा. गो. वैद्य व वामनराव सोहनी यांनी या पुस्तकप्रकाशनाच्या कामी फार मदत केली. या पुस्तकाचे दोन निराळे भाग असून पहिल्या भागात जगातील उदारधर्माच्या निरनिराळ्या पंथाचे कार्य, परोपकारी प्रयत्न व त्या त्या चालकाकडून लिहून आलेल्या निबंधाचा समावेश करण्यात आला आहे. अशा चालकांकडून जी माहिती मिळाली नाही अशी प्रकरणे मी स्वतःच लिहून काढली आहेत. पश्चिम हिंदुस्थानातील प्रार्थनासमाजाची चळवळ, एकेश्वरी धर्मपरिषद, भारतीय निराश्रित साहाय्यकारी मंडळी, इराणातील बहाई धर्माची चळवळ, युरोपातील व अमेरिकेतील युनिटेरियन आणि युनिव्हर्स्यालिस्ट समाज ही प्रकरणे माझीच आहेत. बंगाल्यांतील ब्राह्मसमाज ह्यावरील लेख प्रसिद्ध पं. शिवनाथशास्त्री यांनी स्वतः लिहिला आहे. मँचेस्टर कॉलेजातील माझे सहाध्यायी झेनो सूके टोया साकी यांनी जपानमधील उदारधर्म हे प्रकरण तयार केले आहे. दुसऱ्या भागात बंगाल, बिहार आणि ओरिसा ह्या प्रांतातील १०१ ब्राह्मसमाज, मद्रास प्रांतातील ३२ ब्राह्मसमाज, मुंबई प्रांतातील १६ प्रार्थनासमाज, पंजाब आणि संयुक्त प्रांतातील १८ ब्राह्मसमाज आणि लंडन येथील रे. चार्ल्स व्हायसे यांचे Theistic Church अशा एकूण १६८ संस्थांची तपशीलवार माहिती आणि सविस्तर इतिहास आला आहे. सेक्रेटरीचे नाव आणि पत्ता, सभासदांची संख्या, अनुष्ठानिक किती व इतर किती याचा निर्देश, हितचिंतकांची संख्या आठवड्यातून सभा किती वेळा भरते, पोटसंस्थांचा तपशील, स्वतंत्र मंदिर आहे की नाही, वर्तमानपत्रे, मासिके कोणती आहेत, प्रचाराची तजवीज काय वगैरे सर्व माहिती अत्यंत कसोशीने गोळा केलेली आहे. एकंदरीत हे पुस्तक प्रचाराचे काम करणारासच नव्हे तर इतर जिज्ञासूंना देखील एक अमोलिक ठेवाच वाटण्यासारखे आहे.

पुस्तकाचा छपाईखर्च, माझ्या प्रवासाचा आणि पत्रव्यवहाराचा खर्च अनुक्रमे ब्राह्मो पोस्टल मिशन व बनारस येथील परिषदेच्या शिलकेतून भागविण्यात आला. कोणत्याही स्थानिक समाजावर ह्याचा बोजा पडलेला नाही. नुसती माहिती पुरविण्यास ज्यांनी विलंब केला किंवा मुळीच दिली नाही अशांकडून पैशाची मदत कोण अपेक्षील? ही पुस्तके ब्राह्मधर्मप्रचारकांना फुकट वाटण्यात येतील, टपालहशील देखील पडणार नाही. फक्त त्यांनी मागणी करावी, असे वेळोवेळी जाहीर करूनही कोणा एकाकडून मागणी देखील आली नाही. हा अव्यवहारीपणा पाहून आश्चर्याचा मोठा धक्का

बसला ! पाश्चात्य कार्यकर्त्यांना मात्र ह्या प्रयत्नाचे महत्त्व फार वाटले व त्यांनी त्याची वेळोवेळी मुक्तकंठाने प्रशंसा केली. अशी माहिती वेळोवेळी प्रसिद्ध करण्याची इष्टता होती ; पण ती आशा आजवर समाधानकारक रीतीने पूर्ण झालेली नाही, हे निराळे सांगावयास नकोच. शेकडो प्रती धूळ खात पडलेल्या असून त्या ठेवण्यास जागा नाही. ब्राह्मधर्म ही प्रार्थना करणारी संस्था आहे, प्रयत्न करणारी नव्हे, असे केव्हा केव्हा विनोदाने सांगण्यात येते. त्यात सत्याचा अंश बराच आहे, असे हा ग्रंथ जोराने पुकारीत आहे.

●●●

१०

विविध प्रयत्न

नागपूरच्या सरकारी कॉलेजचे प्रो. श्रीनिवास नारायण बनहट्टी यांनी आपल्या नवभारत ग्रंथमालेतर्फे माझे 'भारतीय अस्पृश्यतेचा प्रश्न' हे पुस्तक इ. स. १९३३ साली प्रसिद्ध केले आहे. त्यात मी या प्रश्नाचा प्राचीन कालापासून सविस्तर व सांगोपांग विचार केला आहे. ह्याचा परामर्ष पुढे योग्य स्थळी घेणे बरे पडेल. तूर्त अस्पृश्यतानिवारणासंबंधी डिप्रेस्ड क्लासेस मिशनचे काम सुरू होण्यापूर्वी गेल्या शतकाच्या मध्यापासून जे प्रयत्न झाले आहेत. त्याचा जरुरीपुरता निर्देश करणे बरे. याविषयी रा. श्री. व्यं. केतकरकृत 'महाराष्ट्रीय ज्ञानकोश' या पुस्तकात १९२४ साली माझा सविस्तर लेख प्रसिद्ध झाला आहे.

पूर्वेतिहास : या जागतिक प्रश्नाच्या उत्पतीविषयी मी 'ज्ञानकोशा' च्या लेखाच्या आरंभी म्हटले आहे की, अस्पृश्यतेचा इतिहास निदान हिंदुस्थानात तरी आर्य लोकांच्या आगमनाइतकाच जुना आहे. चांडाल हा शब्द वैदिक वाङ्मयात आणि बौद्ध वाङ्मयातून आढळतो. बुद्धाच्या वेळेच्या पूर्वीपासून तरी निदान चांडाल आणि इतर राष्ट्रे अस्पृश्य गणली जात होती, असे उल्लेख आढळतात. इराणातील झरतुष्ट्रपंथी आर्य व हिंदुस्थानातील देवयज्ञी आर्य यांना अस्पृश्य आणि तिरस्करणीय समजत असत, असे पारश्यांच्या जुन्या व अर्वाचीन ग्रंथात पुरावे मिळतात. आर्याचा हिंदुस्थानात कायमचा जम बसल्यावर त्यांनी येथील दस्यु ऊर्फ शूद्र नावाच्या जित लोकांना आपल्या वस्तीजवळच, पण बाहेर राहावयास लावले. त्यांच्या व आपल्या संस्कृतीत भेसळ होऊ नये म्हणून त्यांनी त्यांना अस्पृश्य ठरविले. ज्या अर्थी जपानात हैटा व हीना नावाच्या अस्पृश्य जाती अद्यापि आहेत त्या अर्थी अस्पृश्य जात ही संस्था आर्यानीच निर्माण केली नसून तिचा प्रादुर्भाव पूर्वी मोगल लोकांतही होता हे सिद्ध होते. हैटा किंवा ऐटा ही जात फिलिपाइन बेटातून जपानात गेली असावी. अथ्रवण (ब्राह्मण), रथेष्ट्र (राजन्य), वस्ट्रय (वैश्य) आणि हुइटि (शुद्र) असे झरतुष्ट्राच्या वेळी इराणात चार भेद होते. वेदांत शूद्र हा भेद फारसा आढळत नाही, पण महाभारतात अभीर आणि शूद्र यांचा उल्लेख असून सिंधु नदीच्या मुखाजवळील भागात त्यांची वस्ती असावी असे दिसते. ऋग्वेदात पुरुषसूक्तात शूद्र शब्द आला आहे व शुल्क यजुर्वेदात आठ वेळा हा शब्द आला आहे. Castes of India ह्या पुस्तकात विल्सनने म्हटले आहे की, कंदाहार प्रांतात शूद्रोई नावाचे प्राचीन राष्ट्र होते आणि सिंधु नदीवर शूद्रोस नावाचे शहर होते. इराणातील हुइटी अथवा शूद्रोई आणि फिलिपाइन बेटातील हैटा या जातीचा संबंध असल्याचे सिद्ध करता आल्यास अस्पृश्यतेच्या प्राचीन उत्पत्तीवर आणि प्रसारावर बराच प्रकाश पडण्यासारखा आहे. इंग्रजी शिक्षणामुळे हिंदुस्थानात जी आधुनिक सुधारेची प्रवृत्ती झाली तिच्यामुळे अस्पृश्यतेच्या निवारणार्थ जे ठिकठिकाणी प्रयत्न झाले त्यांचा आता विचार करू.

चोखामेळ्याप्रमाणे बंगाल्यांतील कर्ताभजापंथी चांडाळवर्ग भजनाचा शोकी आहे. त्यांचा बिहालपारा गावी सारंगी तयार करण्याचा एक उत्तम कारखाना आहे. तेथे जाऊन बाबूजी चांडाळांचे कीर्तन ऐकत. १८७० सालच्या ऑगस्ट महिन्यात त्यानी अशा मजूरवर्गाचा एक क्लब काढला. त्याच्या द्वारा त्यांना वाचनाची गोडी लागली आणि त्यांच्या मद्यपानादि दुष्ट चाली सुटल्या. वेडीवाकडी अभद्र गाणी सोडून ही मंडळी सात्त्विक कीर्तने करू लागली. १८७१ मध्ये जेव्हा बाबूजी विलायतेस निघाले तेव्हा ह्या गरीब मजुरांनी त्यांना अत्यंत कृतज्ञतापूर्वक मानपत्र दिले. या दीनांच्या सेवेबद्दलचा बाबूजींचा सत्कार ते विलायतेस गेल्यावर ब्रिस्टल शहरी एक मिशनरी संस्थेने मोठे मानपत्र देऊन केला. परत आल्यावर शशिपाद बाबूंनी गरिबांसाठी एक पैसा किंमतीचे एक मासिक काढले. दर महिन्यास त्याच्या १४०० प्रती खपू लागल्या. त्यात पं. शिवनाथसारख्यांनी लेख लिहिले. श्रीमंत वर्गाचीही त्यास चांगलीच मदत असे. 'बारानगरसमाचार' नावाचे साप्ताहिकही त्यांनी काढले. ते चांडाळाबरोबर जेवीत; मेहेतरांच्या मुलांची शुश्रूषा करीत. सरकारने नुकत्याच उघडलेल्या सेव्हिंग्ज बँकेत त्याचे पैसे ठेवायला लावून त्यांनी काटकसर शिकविली. बारानगरास पुढे ब्राह्मसमाज स्थापन झाल्यावर तेथे बरेच काम होऊ लागले. कलकत्ता येथे ब्राह्मसमाजाचा माघोत्सव होतो. त्या वेळी मोठ्या थाटाचे नगरसंकीर्तन निघते. त्यात बारानगरच्या मजुरांची एक दिंडी येऊन भजनात भाग घेते. हल्ली बंगाल्यांत जे Backward Classes Mission आहे त्याचे मूळ महाराष्ट्रातील Depressed Classes Mission हे आहे.

मुंबईतील एक प्रयत्न : मुंबई शहरात १८५५ साली एक मंडळी नेमून तिच्या विद्यमाने काही शाळा अस्पृश्य विद्यार्थ्यांसाठी स्थापन झाल्या होत्या, पण त्या वेळी काल अनुकूल नसल्यामुळे व चिकाटी धरून काम न झाल्याने त्या शाळा बंद पडल्या. १८७० साली ब्रह्मानंद केशवचंद्र सेन विलायतेहून परत आले व त्यांनी धोबी तलावावर फ्रामजी कावसजी इन्स्टिट्यूटमध्ये जे व्याख्यान दिले त्यात त्यांनी खालच्या जातींच्या उन्नतीसाठी मुं. प्रा. समाजाने काही कार्य करावे अशी सूचना केली. ह्या सूचनेस अनुसरून मुं. प्रा. स. च्या मंडळींनी रात्रीच्या काही शाळा स्थापन केल्या. त्यापैकी दोन शाळा फक्त अस्पृश्य मानलेल्या जातीसाठी होत्या. १८५१ साली प्रा. स. चे एक सभासद शेठ दामोदरदास सुखडवाला ह्या उदार गृहस्थानी भायखळा येथे स्वखर्चाने अस्पृश्यांसाठी शाळा चालविण्यासाठी मदत केली. सर नारायणराव चंदावरकर यांनी १८९१ साली असे म्हटले आहे की, 'अस्पृश्योद्धाराच्या एकंदर चळवळीचा त्या वेळपर्यंतचा इतिहास अवलोकन केला व आज अस्पृश्योद्धारार्थ चालू असलेले कार्य ध्यानात घेतले तर बरेचसे श्रेय ख्रिस्ती मिशनरी, ब्राह्मसमाज, कर्नल अल्कॉट व इतर थिऑसॉफिस्ट, स्वामी दयानंद सरस्वती व आर्यसमाज यांच्याकडे जाते यात काही संशय नाही.

सयाजीराव महाराज : भारतीय अस्पृश्यता ही एक स्वतंत्र संस्थाचा आहे. बौद्ध, जैन, शीख, लिंगायत, वैष्णव वगैरे धर्मपंथीयांनी व इतर साधुसंतांनी प्राचीन व मध्ययुगीन काली अस्पृश्यांच्या आत्मिक उद्धारासाठी प्रयत्न केले आहेत, पण ते सर्व वैय्यक्तिक स्वरूपाचे होते. सामुदायिक अस्पृश्यता मुळातच नष्ट करून आधुनिक अर्थाने ती निवारण्याचे व त्यापुढचे भौतिक उद्धाराचे काम या पंथांनी किंवा कुणी संतांनी केलेले इतिहासात नमूद नाही. ह्या बाबतीतील चालू

भरून राममोहन आश्रमात श्रीमंत महाराजांनी प्रीतिभोजनात भाग घेऊन आमच्याशी सहकार्य केले. या परिषदेचा महाराष्ट्रावर व विशेषत: पुण्यातील कार्यकारी पुढाऱ्यांवर जसा शुभ परिणाम झाला तसाच महाराजांच्या उत्साहशक्तीवरही झालेला दिसतो. लगेच दोनतीन वर्षात पुणे-मुंबई येथे सर्व्हंटस् ऑफ इंडिया सोसायटी, सोशल सर्व्हिस लीग, सेवासदन, डि. क्ला. मिशनसारख्या अखिल हिंदुस्थानच्या राष्ट्रीय जीवनावर परिणाम करणाऱ्या संस्थांचा उद्‌भव झाला. उलटपक्षी याच सुमारास श्रीमंत महाराजांनीही आपल्या राज्यात सक्तीच्या शिक्षणाचा कायदा पास करून राष्ट्रीय शिक्षणाचा धडा इतर लहान-मोठ्या संस्थानांसच नव्हे तर प्रत्यक्ष इंग्रज सरकारासही घालून दिला. बडोद्याच्या इतिहासात हे साल सोन्याच्या अक्षरात लिहिले जाईल. बडोद्यात सक्तीच्या शिक्षणाचे प्रस्थान मांडल्यावर उसळीसरशी अंत्यज शाळांची संख्या १८ ची २४७ आणि विद्यार्थ्यांची संख्या ५००० ची ९२६९ झाली. बंद केलेल्या वसतिगृहांची पुन्हा गरज भासू लागली. लौकरच अंत्यजांच्या सुदैवाने आर्यसमाजी पं. आत्माराम ह्या तरबेज आणि स्वत:स वाहून घेतलेल्या कार्यवाहकाची जोड मिळाली. १९०७-८ च्या सुमारास हल्लीचे नावाजलेले बडोद्याचे अंत्यज विद्यार्थी वसतिगृह उघडण्यात आले. पंडितजींना त्यांचे सुपरिटेंडेंट व बडोदे राज्यातील अंत्यजांच्या शिक्षणाचे इन्स्पेक्टर नेमण्यात आले. ह्याच सुमारास महाराजांनी मला बडोद्यास पुन्हा बोलविले. न्यायमंदिराच्या भव्य दिवाणखान्यात एक जंगी दरबारवजा जाहीर सभा बोलावून महाराजांनी स्वत:च्या अध्यक्षतेखाली माझे 'अस्पृश्योद्धार' ह्या विषयावर व्याख्यान करविले. हेच व्याख्यान मला पुढे लिहून काढावयास सांगून 'बहिष्कृत भारत' या नावाने ते प्रसिद्ध झाल्यावर त्याच्या १०० प्रती बडोदे दरबारने विकत घेतल्या. ह्या सर्व गोष्टींचा परिणाम बडोद्याच्या कार्यावर होऊन पंडित आत्मारामांच्या देखरेखीखाली त्याला मोठा जोर आला.

डॉ. आंबेडकर ह्या अस्पृश्यवर्गाच्या प्रसिद्ध पुढाऱ्याला महाराजांचा मोठा आश्रय होता. बडोदा कॉलेजातून ते बी. ए. झाल्यावर महाराजांनी त्यांना अमेरिकेत दरबारच्या खर्चाने कित्येक वर्षे ठेवून पीएच. डी. करवून आणले. बडोदे शहरातील चार वसतिगृहांतील विद्यार्थ्यांना शिक्षण देऊनच न थांबता त्याच्या धार्मिक शिक्षणाचीही उत्तम सोय करण्यात आली आहे. गुजराथेतील अंत्यजवर्ग आपापली धार्मिक गृहकृत्ये आपल्याच जातीच्या पुरोहिताकडून करवून घेत असतात. त्यांना गरोडा म्हणतात. या गरोड्यांकडून धर्मकृत्ये योग्य रीतीने व्हावीत म्हणून त्यांच्यासाठी एक संस्कृत शाळा काढण्यात आली आणि त्यात २५ गरोडा विद्यार्थ्यांना दरमहा ८ रू. स्कॉलरशिप देऊन तयार करण्यात आले. वसतिगृहांतील सर्व विद्यार्थ्यांना वेदमंत्रासह नित्याची उपासना करण्यास शिकविण्यात येते. शिवाय त्यांची दोन बालवीरपथके आहेत.

खालील कोष्टकावरून बडोद्यातील अंत्यज शाळांची कशी प्रगती झाली हे दिसून येईल.

वर्ष	मुलांच्या शाळा	मुलींच्या शाळा	एकंदर शाळा	विद्यार्थी
१८८३	..	..	२	..
१८८४	..	..	९	..
१८९१	..	..	१०	७८४
१९००	..	..	२२	१,७२६

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, समग्र वाङ्मय, खंड २ रा ~~~

भरलेल्या काँग्रेसच्या वेळी ह्यांनी चळवळ केली होती. दापोली येथील अस्पृश्य वर्गातील महार-चांभार लष्करी पेन्शनरवाल्यांच्या वसाहतीत सदर बाबाने बरीच चळवळ केली. पण चळवळ नवीन असल्यामुळे यश आले नाही. त्यांनी हिंदुस्थान सरकाराकडे अर्ज केला असता पेन्शनर लोकांना त्या वेळी नुसत्या सह्या करण्याचेही त्या वेळी धैर्य झाले नाही. पुढे हीच चळवळ पुण्याचे श्री. शिवराम जानबा कांबळे यांनी १९०३ सालापासून मोठ्या नेटाने १९१० पर्यंत चालवली. ती अद्याप चालूच आहे.

●●●

११

भारतीय निराश्रित साह्यकारी मंडळाची स्थापना

पूर्वतयारी : अमावस्येची काळोखी रात्र. १९०५ सालचे उन्हाळ्यातले दिवस. अहमदनगरच्या समाजाच्या उत्सवासाठी मी तेथे गेलो होतो. नेहमीची दगदगीची कामे करून मी नुकतेच कोठे जमिनीला अंग टेकले होते. अवचित अस्पृश्यवर्गाचे एक शिष्टमंडळ रात्री १२ वाजता मला भेटण्यास आले. भिंगार म्हणून अहमदनगराहून चार मैलांवर एक खेडेगाव आहे. तेथील स्थानिक अस्पृश्यांनी अशावेळी एक मोठी जाहीर सभा बोलावली होती. तिचे अध्यक्षस्थान स्वीकारून मी चार शब्द सांगावे म्हणून आमंत्रण करण्यासाठी हे शिष्टमंडळ अपरात्री आले होते. नित्याप्रमाणे माझे बरोबर स्वामी स्वात्मानंद हेही होते. मी त्यांना म्हणालो, "चला स्वामीजी, जाऊ या." "काय हो, कोण हे लोक ? काय ही सभा! आगाऊ तपास केल्याखेरीज एकाएकी कसे जावयाचे?" स्वामीजी किंचित् त्रासून उद्‌गारले. "स्वामीजी, सत्कार्याला काळ वेळ, मुहूर्त लागत नाही. तुमच्या शंकेला उत्तर सभेच्या ठिकाणी गेल्याशिवाय मिळणार नाही. भलताच काही प्रकार घडला, तर तुमच्या हातात दंडा आहेच. आणखी मग काय पाहिजे?"

स्वामीजींना चेव आला. "बेशक चलीये!" म्हणून ते टांग्यात बसले. गावाच्या हद्दीवर महारवाड्यात उतरलो. मोठमोठे हिल्लाळ पेटलेले होते. लहानथोर, बायकामुले गजबजलेली सभा वाट पहात बसली होती. आम्ही गेल्याबरोबर टाळ्यांच्या प्रचंड गजरात स्वागत झाले. खेडेगावातल्या मागासलेला समाजाचा एवढा जमाव जमलेला पाहून स्वामीजी आश्चर्य पावले. "ही सभा अशावेळी का बोलाविली?" असे स्वामिजीनी चालकांना विचारले. "साहेब, आम्ही गरीब लोक. दिवसभर कष्टात राबावे लागते. आम्हाला हिच्याशिवाय दुसरी वेळ कोणती? तशात आम्ही सर्व चालकमंडळी शेजारच्या जिल्ह्याच्या गावच्या परकीय साहेबांच्या घरगुती कामात गुंतलेलो. आम्हाला या वेळेपूर्वी हूं की चूं करण्यास वेळ मिळत नाही. आपल्यास तसदी दिली याची माफी असावी." माझ्या अंत:करणात चक्क उजेड पडला. ह्या लोकांची हजारो वर्षाची कहाणी अभ्यासून माझे मन हळुवार झाले होते. अधिक खुलासा नको होता. स्वामीजींच्याही सर्व शंका तत्काळ मिटल्या. कामास सुरूवात झाली.

किसन फागू बंदसोडे आणि वऱ्हाड-नागपूरकडील इतर अस्पृश्य पुढारी यांनी सोमवंशी हितचिंतक समाज ही संस्था त्या प्रांती काढली होती. त्यांच्या सूचनेवरून अहमदनगर येथील अस्पृश्यांचे पुढारी श्रीपतराव थोरात (बटलर), पांडुरंग लक्ष्मण डांगळे (हेडमास्तर), रावजी सदोबा गायकवाड (शिक्षक नगर म्युनिसीपालिटीची शाळा) वगैरेनी ही सभा बोलविली होती. ह्या मंडळीचे आत्मसुधारणेचे कामी पुण्यातील पुढारी शिवराम ज्ञानबा कांबळे यांच्या मदतीने ठिकठिकाणी चार

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, समग्र वाङ्मय, खंड २ रा ~~~

उत्तर हिंदुस्थानातील मुसलमान लोकांचे उच्चनीच दर्जाचे विभाग :--

	पंजाब काश्मीर	संयुक्तप्रांत, बिहार	बंगाल, ओरिसा
अश्राफ् (वरिष्ठ)	१५,१६,९९८	४५,९०,०६०	१,९९,८०,५४७
अज्लाफ् (कनिष्ठ)	५६,६८,६४९	१३,६१,९८३	८,८७,६८९
अर्जालू (हीन)	५८,४६,४६	२७,७५,००३	७,०९७
वर्गीकरण न केलेले	२३,०२,६९४	१५,६६,४००	५,४४,०७५
एकूण	१,५३,३४,८०७	१,०२,९४,४४६	२,१४,१९,४०८

उत्तर हिंदुस्थानांतील एकंदर मुसलमानांची संख्या	४,७०,४८,५८१
सदरपैकी हीन मुसलमानवर्गाची संख्या	८६,२८,५६६
सर्व हिंदुस्थानांतील एकूण मुसलमानांची संख्या	६,२४,५८,०७७

अंत्यज अथवा पंचम वर्गाच्या काही मुख्य जातीची सर्व हिंदुस्थानांतील एकूण संख्या :-

जात	वस्तीचा प्रदेश	एकूण संख्या
चांभार	बहुतेक भाग	१,११,३७,३६२
मोची	--,,--	१०,०७,८१२
डोंब	बंगाल, आसाम, पंजाब	९,७७,०२६
भंगी	मुंबई संयुक्तप्रांत, राजपुताना	६,५६,५८६
ढाणूक	बंगाल व पंजाब	८,७०,५५७
बागडी	बंगाल व आसाम	१०,४२,५५०
बळई	मावळा व मध्यप्रांत	५,८४,३३४
च्छुरा	उत्तर हिंदुस्थान	१३,२९,४१८
नामशूद्र चंडाल	--,,--	२०,३१,७२५
राजवंशी	--,,--	२४,००,६५४
महार	मुंबई, वऱ्हाड, मध्यप्रांत	२९,२८,६६६
मांग	मुंबई, वऱ्हाड, मध्यप्रांत	५,७९,३०६
व्हलिया (महार)	कर्नाटक, मद्रास	७,७०,८९९
मादिक (मांग)	--,,--	१२,८१,२५२
पारिया	मद्रास, ब्रह्मदेश	२२,५८,६११
शिक्लिया	--,,--	४,७८,४९६
माल	मद्रास, बंगाल	१८,६३,९०८
इतर सर्व		२,०९,९९,४७६
		एकूण -- ५,३२,०६,६३२

जात	वस्तीचा प्रदेश	एकूण संख्या
हिंदुस्थानची एकंदर लोकसंख्या		२९,४३,६१,०५६
एकूण हिंदू लोकसंख्या		२०,७१,४७,०२०
एकूण अंत्यज लोकसंख्या		५,३२,०६,६३२
हिंदुस्थानची एकंदर लोकसंख्या		२९,४३,६१,०५६
एकूण मुसलमान लोकसंख्या		६,२४,५८,०७७
पैकी हीन मुसलमान लोकसंख्या		८६,२८,५६६

ह्या आकड्यांवरून असे सिद्ध होते की, हिंदू लोकांपैकी एकचतुर्थांश लोकसंख्या हीन मानलेल्या अंत्यज लोकांची आहे व मुसलमान लोकांपैकी जवळजवळ एकसप्तमांश लोकसंख्या हीन मानलेल्या अर्जालू लोकांची आहे. ह्या हीन मानलेल्या मुसलमानांची संख्या विचारात न घेता नुसत्या हिंदू अंत्यजांची संख्या हिंदुस्थानच्या एकंदर लोकसंख्येशी ताडून पाहिली तरी ही तिच्या एकषष्ठांशाहूनही अधिक भरते. म्हणजे प्रत्येक सहा हिंदी माणसांत (मग ते कोणत्याही जातीचे, धर्माचे अगर रंगाचे असोत) एक अगदी टाकाऊ, शिवून घेण्यास देखील अयोग्य असा मनुष्यप्राणी सापडतो.

तिरपगडा : पण मुख्य प्रश्न बाजूलाच राहिला आहे. तो हा की, जवळजवळ साडेपाच कोटी प्रजेने अशा हीन स्थितीत राहून चालेल काय? हिंदुसमाज तर आपला सोवळेपणा सोडावयाला तयार नाही आणि तो सोवळेपणा कायम आहे तोपर्यंत ह्या हीन जातीला पुढे सरकावयाला जागा नाही; तर मग हे व्हावे कसे? इतक्या सगळ्यांनी एकदम ख्रिस्ती व्हावे! यक्षिणीची कांडी फिरून इतक्या लोकसमुदायाला एकदम कोणी ख्रिस्ती करील म्हणावे तर संभवनीय नाही. तथापि, हिंदू लोकांची उदासीन विस्कळितता शाश्वत राहिली तर मात्र वरील चमत्कारही घडण्याचा संभव आहे. असा प्रकार खरोखरीच घडून आला तर राष्ट्रीयदृष्ट्या काय प्रकार होईल पहा. हल्ली भारतीय साम्राज्यात खालीलप्रमाणे लोकसंख्या आहे.

(इतर १५ + हीन ५।। मिळून) २०।। कोटी हिंदू लोक.

(इतर ५ + हीन १ मिळून) ६ कोटी मुसलमान.

३० लक्ष ख्रिस्ती.

१ कोटी जंगली.

१ कोटी बुद्ध, जैन, शीख वगैरे

हिंदुसमाजाची उदासीनता आणि ख्रिस्ती समाजाची चळवळ आताप्रमाणेच कायम राहिली तर पुढे खालीलप्रमाणे गणना होण्याचा संभव आहे.

१५ कोटी हिंदू, ६ कोटी मुसलमान, ७ कोटी ख्रिस्ती, १ कोटी बुद्ध, जैन, शीख.

म्हणजे राष्ट्रीयदृष्ट्या आता जी हिंदूमुसलमानांची दुही आहे तिच्याऐवजी वरील प्रकार घडलाच तर हिंदू, मुसलमान व ख्रिस्ती यांचा तिरपगडा होणार! १५ कोटी मवाळ हिंदू आणि जवळजवळ तितकेच कडवे मुसलमान आणि ख्रिस्ती मिळून या तिघांचे सूत कसे जमणार ईश्वर जाणे!

निराश्रितांना सदनात आणीत व शिवण्याचा वर्ग आणि बायकांचा वर्ग चालवीत. तरुण गृहस्थ सर्व संस्थांची देखरेख करीत. परळ शाळेतील सुमारे १२ विद्यार्थ्यांच्या जेवण्याखाण्याची सोय सदनांतील वसतिगृहात केली जाई.

१०. Purity Servant या नावाचे इंग्रजी मासिक दर महिन्याच्या तारीख १५ ला प्रसिद्ध होत असे. त्यात मद्यपाननिषेध व इतर सामाजिक विषयांवर लेख येत आणि मिशनची सर्व बातमी प्रसिद्ध होई. ह्याचे संपादक श्री. वा. स. सोहोनी हे होते. ह्याशिवाय मुंबईबाहेर खालील शाखा होत्या.

१. पुणे – (१) दिवसाची शाळा, (२) रात्रीची शाळा, (३) भजनसमाज, (४) चर्चामंडळ. शाळांतील पटावरील संख्या, अनुक्रमे १४९, २५, ३३.

२. मनमाड – १ रात्रीची शाळा, ४५ विद्यार्थी.

३. इगतपुरी – १ दिवसाची शाळा, ६८ मुले. ही शाळा दोन महार तरुणांनी चालविली होती. शिवाय रविवारची धर्मशिक्षणाची शाळा व धर्मसमाज चालू होते.

४. इंदूर – १ रात्रीची शाळा, २० विद्यार्थी.

५. अकोला – २ रात्रीच्या शाळा, ७२ विद्यार्थी, १ भजनसमाज, १ विद्यार्थी वसतिगृह.

६. अमरावती – २ रात्रीच्या शाळा, ५३ विद्यार्थी.

७. दापोली -- १ दिवसाची शाळा, ३७ विद्यार्थी. ह्याशिवाय मुलांना विद्यार्थीवेतने मिळत.

८. मंगळूर – १ दिवसाची शाळा, ४९ विद्यार्थी, हातमागाचा विणण्याचा कारखाना. सर्व मुलांना दुपारचे जेवण मिळे. ७ मुले मोफत वसतिगृहात राहात.

९. मद्रास – १ पारिया जातीच्या अस्पृश्यांसाठी दिवसाची शाळा, २३ विद्यार्थी, १ चांभारांसाठी दिवसाची शाळा, विद्यार्थी २९.

१०. महाबळेश्वर – मे १९०९ मध्ये गव्हर्नरच्या बंगल्यावर लेडी म्यूर मॅकेंझी यांच्या आश्रयाखाली मिशनच्या हितचिंतकांची सभा भरली. सुपरिटेंडेंट मेजर जेम्सन हे अध्यक्ष होते. पूर्वी जमलेला ९०० रू. चा फंड मिशनला देण्यात आला आणि ही शाखा उघडली. दोरखंड तयार करणे, वेताचे विणकाम करणे वगैरे कामे होत.

११. नाशिक – १९०९ सप्टेंबरमध्ये जनरल सेक्रेटरी ह्या जिल्ह्यात दौऱ्यावर गेले असताना नाशिक येथे जाहीर सभा होऊन जिल्ह्याची कमिटी नेमण्यात आली. जिल्ह्याचे कलेक्टर मि. जॅक्सन ह्यांस अध्यक्ष नेमण्यात आले. येणेप्रमाणे तिसरे वर्षाच्या अखेरीस ह्या मिशनच्या १२ शाखा, १६ दिवसांच्या प्राथमिक शाळा, १०१८ विद्यार्थी, ६ रविवारच्या शाळा, ५ भजनसभा, ४ उद्योगशाळा, ७ मिशनरी कामाला वाहून घेतलेले कार्यवाह आणि एक मासिक पत्र इतकी वाढ झाली.

●●●

१२

सामान्य विचार

दोन पद्धती : कोणत्याही एका मोठ्या समाजसुधारणेचे व्यापक कार्य घेतल्यावर कार्यपद्धतीचे ढोबळदृष्ट्या दोन भिन्न प्रकार पडतात. विवक्षित आणि मर्यादित क्षेत्र घेऊन पद्धतीचे केंद्रीकरण आणि संघटन ही पहिली पद्धत अमर्याद लोकसमाजाचे मत आणि वळण बदलण्यासाठी प्रचारकार्य करणे ही दुसरी पद्धत. पहिलीला सुवर्णकार-पद्धती आणि दुसरीला मेघवृष्टी-पद्धती असे म्हणावयास हरकत नाही. सोने, मोती हिरे वगैरे धातू घेऊन सुवर्णकार आपल्या कलाकुसरीने त्यांचे उत्तम नग बनवतो, तर दुसऱ्या पद्धतीत अमर्याद क्षेत्रावर मेघाने वर्षाव केल्यामुळे अखेरीस उत्तम पीक येते. हा पद्धतीचा भेद केवळ आधुनिक आहे असे म्हणता येणार नाही. पुरातन काली मोठमोठे धर्मप्रसार झाले. धर्मबुद्धीच्या घटना झाल्या. त्यांच्या चालकांना या दोन्ही पद्धती स्वीकाराव्या लागल्या. ठिकठिकाणी गुरुकुले स्थापून त्यांनी आचार्यांच्याद्वारा धर्मबुद्धीची शिकवण दिली व पुरोहित नेमून धर्माची अनुष्ठाने, गृह अथवा सामाजिक संस्कार यांच्याद्वारे धर्माची प्रत्यक्ष अंमलबजावणी केली ही पहिली पद्धत. निस्संग परिव्राट् व सतत संचार करणारे परमहंस संन्यासी नेमून त्यांच्या द्वारा वेळोवेळी झोपी जाणाऱ्या लहानथोर जनतेला जागी करणे आणि कार्यप्रवण राखणे ही दुसरी.

अस्पृश्यतानिवारण हे मोठे जागतिक कार्य. खंडवजा भारतासारख्या देशसमुहावर ह्या कार्याचा प्रयोग करणे हे काही लहानसहान कृत्य नव्हे. कार्य मोठे, पण कार्यवाह लहान. पण विभूतीची वाट पहात बसण्याला अवसर कोठून आणणार! विभूतीची वाट पहाण्यात बराच काळ अगोदरच लोटून गेला होता. अलौकिक, लोकोत्तर विभूती आणि सामान्य माणसांची घटना ह्या दोहोंचे मी समाजशास्त्रदृष्ट्या विद्यार्थीदशेत थोडेबहुत आकलन केले होते. म्हणून विभूतिवादावरील माझा विश्वास कमी होऊन सामान्य माणसांच्या घटनात्मक प्रयत्नाकडे माझा कल विद्यार्थीदशेतच होऊ लागला होता. थॉमस कार्लाईलचा विभूतिवाद आणि हर्बर्ट स्पेन्सरचा सामान्य माणसांचा घटनात्मक प्रयत्नवाद ह्या दोहोंची तुलनात्मक मीमांसा मी तरुणपणीच केलेली होती. म्हणून अस्पृश्यतानिवारणाचे कामी आधुनिक काळात कोणी विभूती पुढे येत नाही आणि मी तर स्वतः अत्यंत सामान्य माणूस ही वस्तुस्थिती पाहून मी हताश झालो नाही. श्रद्धेने पर्वत हलतात ह्या ख्रिस्तोक्तीची प्रचिती पाहण्याची वेळ आली होती. श्रद्धा मग ती एखाद्या विभूतीची असो वा सामान्य माणसांची असो, श्रद्धा ती श्रद्धाच! तिने पर्वत हे हललेच पाहिजेत. मात्र सामान्य माणसाची तशी घटना झाली पाहिजे. अपेक्षेप्रमाणे थोडाबहुत पैशाचा निधी जमल्यावर कामासाठी मी योग्य माणसे जमा करू लागलो. निधी जमवणे हे माणसाचे काम. पण माणसे मिळणे ही ईश्वरी देणगी. ह्या कामाला स्वार्थत्यागपूर्वक वाहून घेऊन काम करणारी माणसे मिळणे कठीण जाऊ लागले.

प्रचारकांचे दोन प्रकार : अशा माणसांचेही दोन प्रकार पडतात. सर्वसंगपरित्यागी संन्यासी हा पहिला प्रकार. घरादारांची जबाबदारी असलेली, अरण्यात जाण्यापेक्षा समाजातच राहून गृहस्थाश्रम चालविणारी सामान्य माणसे हा दुसरा प्रकार. संन्यासी कामाला मिळाले असते तरी ते शिस्तीत बसणारे व चालणारे नसतात. ज्यांना घर करण्याचा अनुभव नाही त्यांना समाज वळविण्याचा अनुभव कोठून येणार! तो अनुभव असला तरी तसले अनुभवी संन्यासी कोठून आणावयाचे? असल्या संन्याश्यांशी गाठ पडली नाही हेच मी नशीब समजतो. प्रार्थनासमाजाचे प्रचारकार्य करीत असताना मला असले एक संन्यासी मिळाले होते. त्याचे नाव स्वामी स्वात्मानंदजी. मेघवृष्टीने उपदेश आणि प्रवचने करण्यात त्यांचा मला मोठा लाभही झाला होता. त्यातही केव्हा केव्हा मतभेद झाल्यास स्वामीजी दंडा घेऊन उठत. हा अनुभव मला आलेला होता. म्हणून अशा संन्याश्याची मला फार हळहळ लागली नाही. त्यात मी स्वत: पडलो अगदी सामान्य माणूस. माझ्याबरोबर काम करण्याला असामान्य माणूस कशाला येईल? नुसती बी. ए., एम. ए. आणि परदेशविद्याभूषित माणसेसुद्धा माझ्या भेदरट मनाला असामान्य दिसू लागली. अशी माणसे थोडा वेळ स्वार्थत्याग करतील, पण ती अखेरपर्यंत मिशनची शिस्त पाळतील याची खातरजमा कोण देणार! 'श्रद्धावान् लभते ज्ञानम्' अशी म्हण आहे 'ज्ञानवान् लभते श्रद्धा' अशी म्हण नाही. म्हणून फारशी इंग्रजी विद्या न मिळवलेली आणि गरजेपुरते व कामापुरते आधुनिक विद्येचे चांगले ज्ञान असलेली अशी माणसे क्रमाक्रमाने मिळाली. त्यांनाच ह्या मिशनचे सारे श्रेय आहे!

कार्याची घटना : मिशनच्या कामाची खालीलप्रमाणे मांडणी करण्यात आली. एक मध्यवर्ती शाखा ठरवायची. तिचा हेतू आणि रचना यासंबंधी जरूर तितकेच नियम करावयाचे. अशी ही मातृसंस्था मुंबई शहरात स्थापण्यात आली. प्राथमिक अथवा दुय्यम शिक्षणाची शाळा, उद्योगशाळा, विद्यार्थी-वसतिगृहे, फुकट दवाखाना, धर्मशिक्षणाच्या आणि नीतिशिक्षणाच्या साप्ताहिक शाळा, केवळ सार्वत्रिक धर्माला अनुसरून म्हणजे जातिभेद आणि मूर्तिपूजा यांना फाटा देऊन चालविण्यात येणारी उपासनालये एवढी तरी निदान ह्या मध्यवर्ती संस्थेची अंगे ठरली. ह्यासाठी एक आश्रम स्थापण्यात येऊन त्याची सर्व जबाबदारी अंगावर येणाऱ्या कुलगुरूची आवश्यकता मला भासली. ह्या मध्यवर्ती आश्रमाची घडी नीट बसल्यावर पुढे जसजसा अनुभव येईल तसतशा निरनिराळ्या प्रांतांतून भाषावार प्रांतिक शाखा आणि त्याच्या जिल्हानिहाय व तालुकानिहाय पोटसंस्था स्थापण्याचा विचार ठरला. सुवर्णकार पद्धतीने ही कामे चालू असता मेघवृष्टीचे काम म्हणजे जाहीर व्याख्यानांच्याद्वारे परिषदा, प्रदर्शने, प्रात्यक्षिके, मिरवणुकी वगैरे साधनांच्याद्वारे लोकमत तयार करणे हे काम आवश्यक होते. ह्या दोन्ही पद्धतीची कामे परस्परावलंबी होती. ठिकठिकाणच्या केंद्रीकृत संस्था नसत्या आणि नुसते प्रचाराचेच काम चालले असते तर लोकमत कसे बनणार आणि मेघवृष्टी प्रचाराचे काम न चालवता नुसत्या स्थानिक संस्थांना द्रव्याचे व सहानुभूतीचे साहाय्य तरी कसे मिळणार! म्हणून या दोन पद्धतीची कामे मी एकमेकांपासून भिन्न पण परस्परपोषक अशी प्रथमपासूनच ठरविली होती. प्रचाराचे काम मी स्वत: अंगावर घेऊन करण्यासारखे होते. पण पहिल्या कामासाठी मात्र तज्ज्ञ आणि अधिकारी माणसे पाहिजे होती. मिशनचे काम म्हणजे अस्सल धर्मयुद्धाचे काम होते. नुसती मुलुखगिरी केल्याने युद्धात जय मिळत नाही आणि मिळाला तरी तो टिकत नाही.

१३

कार्याची सुरुवात

निराश्रित सेवासदन : अशा रीतीने एक वर्ष लोटल्यावर निराश्रित साह्यकारी मंडळीचे कामाचा चहूकडे बोलबाला होऊ लागला. या नवीन कार्याबद्दल अनुकूल-प्रतिकूल मते प्रकट करण्यात वृत्तपत्रकारांची चढाओढ लागली. या राष्ट्रीय मुहूर्तकालात मुंबईस बिनबोभाट परोपकारी कृत्ये करणारे दोन दानशूर गृहस्थ होते. एक मलबारी नावाचे पारशी गृहस्थ व दुसरे दयाराम गिडुमल, सुरतेचे डिस्ट्रिक्ट जज्ज. पुण्याचे प्रो. धोंडोपंत कर्वे– अनाथ महिलाश्रमाचे संस्थापक, प्रो. गोपाळ कृष्ण गोखले–भारत सेवकमंडळाचे संस्थापक, राजकारणात सारा हिंदुस्थान हलवून सोडणारे टिळक वगैरेंनी महाराष्ट्राला तत्कालीन अग्रपद मिळवून दिले होते. अशा मुहूर्तकाळी वरील दोन परोपकारी गृहस्थांना केवळ महिलांच्या उद्धारासाठी निष्काम बुद्धीने काही तरी करावे ही तळमळ लागून राहिली होती.

एके दिवशी दयाराम गिडुमल या थोर पुरुषाकडून मी त्यांना समक्ष भेटून जावे अशी अत्यंत प्रेमळपणाची चिठ्ठी आली. ती भेट मी कधी विसरणार नाही त्यांनी मला अत्यंत आपलेपणाने कवटाळून, डोळ्यात आसवे आणून विचारले. "हे अपूर्व मिशन काढण्याची कल्पना तुम्हाला कशी सुचली? ह्या कामी अस्पृश्यवर्गातल्या महिलांसाठी तुम्ही काही तजवीज केली आहे काय?" मी निर्भीडपणे सांगितले, "ह्या हतभागी भारतामध्ये पुरुषांपेक्षा महिलांची स्थिती अत्यंत दुर्बल व केविलवाणी आहे, हे मी जाणून आहे. माझ्याप्रमाणेच माझ्या घरातल्या मंडळीनाही ही जाणीव असल्याने माझी त्यागी बहीण आणि पूज्य माता यांनी आपले पाठबळ दिले आहे." ही वार्ता दयारामजींच्या कानावर अगोदरच आली होती. म्हणूनच त्यांनी मला समक्ष भेटीला बोलावून असे कळकळीचे स्वागत केले. त्यांनी पुढे विचारले, "ह्या अस्पृश्य महिलांच्या सेवेसाठी आम्ही काय करू शकू?" मी उत्तर दिले. "आमच्या मध्यवर्ती आश्रमात निराश्रित सेवासदन या नावाखाली एक स्वतंत्र शाखा आम्ही काढू." दयारामजींनी ताबडतोब दरमहा १०० रु. ची मदत देऊ केली आणि हे सदन निघाले.

पहिली शाळा : मिशनची पहिली शाळा १८ ऑगस्ट, १९०६ साली एल्फीन्स्टन रोडवरील, स्टेशनच्या पूर्वेस मुरारजी वालजीच्या बंगल्यात निघाली, असे मागे सांगितलेच आहे. पण कामाची वाढ झाल्याने ही जागा पुरेना, म्हणून ह्या स्टेशनाचे पश्चिमेस ग्लोब मिलजवळ एका चाळीत अधिक प्रशस्त जागा घेतली. मिशनचा पहिल्यापासूनच एक दंडक ठरला होता की, मिशनमध्ये काम करणाऱ्यांनी ज्या ठिकाणी अस्पृश्य लोक राहतात तेथेच त्यांच्यात मिळूनमिसळून राहावे. काम करणाऱ्यांनी आपल्या कुटुंबासह येऊन राहावे. मिशनऱ्यांच्या बायकामुलांनी अस्पृश्य मानलेल्या

बायकामुलांमध्ये मिळूनमिसळून राहावे. ह्या उद्देशाला अनुसरून ग्लोब मिलजवळच्या एका चाळीत मिशनने आपले ठाणे घातले. खालच्या मजल्यात शाळा, दवाखाना, उद्योगालय वगैरेची व्यवस्था करण्यात आली आणि वरच्या मजल्यात माझे वृद्ध आईबाप, सय्यद, अबदुल कादर, त्यांची बहीण आणि तिचा नवरा इतक्यांची राहण्याची सोय करण्यात आली. तेथे वरील सदनाची संस्थापना २१ मे १९०७ रोजी झाली. ग्लोब मिलच्या आसपास या चाळीला लागूनच एक मोठे पटांगण होते. येथे शहराची वस्ती संपली होती आणि उन्हाळ्याच्या दिवसात मुलांना खेळावयास प्रशस्त जागा होती. पण पावसाळ्यात या जागेत मोठी दलदल माजून दोनतीन महिने पाणी साचून राहात होते. त्यामुळे राहण्याला जागा रोगराईची आणि गैरसोईची होती. म्हणून लवकरच ही जागा सोडून स्टेशनला लागूनच नवीन प्रशस्त बंगला घेतला व तेथे या सदनाचे काम जोरात चालले.

हेतू व कार्य : मिशनचे हेतू पहिल्यापासूनच पुढीलप्रमाणे होते : (१) शिक्षण-प्रसार, (२) नोकऱ्या मिळवून देणे, (३) सामाजिक अडचणीचे निवारण करणे आणि (४) सार्वत्रिक धर्म, व्यक्तिगत शील आणि नागरिकता वगैरे गुणांचा प्रसार ह्या गरीब लोकात करणे. शेवटचे तीन हेतू वरील सदन निघेपर्यंत साधणे अशक्य होते. म्हणून ह्या सदनाचे हेतू खालीलप्रमाणे ठेवण्यात आले. वरिष्ठ वर्गातील जे कोणी उत्साही स्त्री-पुरुष विशेषत: सुशिक्षित भगिनी-आपणास वाहून घेऊन मिशनच्या कामासाठी येण्यास तयार असतील त्याच्यामध्ये कामाची पात्रता येण्यासाठी त्यांना तयार करणे आणि अस्पृश्यवर्गातल्या गरीब स्त्रियांमधून त्यांना कामे देणे. मिशनचे काम उदार धर्माच्या पायावर चालले होते. त्यासाठी दर शनिवारी व्याख्याने आणि कीर्तने होत, रविवारी सकाळी धार्मिक शिक्षणाचे वर्ग आणि सायंकाळी उपासना होत. प्रथम प्रथम हे काम मी स्वत:च माझ्या बहिणीच्या साहाय्याने करीत असे. सदन निघाल्यावर त्याची स्वतंत्र व्यवस्था चांगली झाली. सणाचे दिवशी सामाजिक मेळे होत. त्यात अस्पृश्यवर्गीय स्त्री-पुरुष वरिष्ठ वर्गातल्या स्त्री-पुरुषात समानतेने भाग घेत. पहिल्या वर्षी ९ जाहीर व्याख्याने, ४ कीर्तने, ५ पुराणवाचने असे प्रसंग झाले. भजनसमाज उघडण्याच्या दिवशी परळ आणि देवनार या शाळेतल्या सर्व मुलांना व्हिक्टोरिया गार्डनमध्ये फिरवून आणून मिठाई वाटण्यात आली. मोहरमचे सुटीत सर्व मुलांना आणखी काही वडील माणसांना घारापुरी येथील लेणी दाखवून आणण्यात आली. त्या वेळी तेथे प्रीतिभोजन झाले. गावातील लोकांपासून जुने वा नवीन कपडे (सुमारे १५००) गोळा करून गरीब लोकांस वाटण्यात आले. गरीब बायांसाठी-विशेषत: कुमारी व विधवा यांच्या शिक्षणासाठी-शिवणकामाचा वर्ग सुरू करण्यात आला. त्यात तयार करण्यात आलेले कपडेही वाटण्यात आले. ह्या लोकांत स्वच्छतेच्या सवयी वाढाव्या म्हणून दर शनिवारी शाळांतील मुलांना सदनात स्नान घालण्याची सोय करण्यात आली. ह्या साध्या गोष्टीचाही प्रथम प्रथम गैरसमज होऊन बऱ्याच अडचणी येऊ लागल्या. अस्पृश्यवर्गातील निरनिराळ्या जातीची मुले एकमेकांत मिसळण्यास कचरत. चिकाटीने आणि चतुराईने काम चालवून या अडचणीतून पार व्हावे लागले.

शाळा जरी काढल्या तरी त्यावेळी अस्पृश्यवर्गीय मुलांना शाळेत रोजच्या रोज जाण्याची सवय नसे व त्यांच्या पालकांना रोजच्या रोज पाठविण्याची आवड नसे. शिक्षणाची अभिरुची लावून देण्यासाठी सदनातील स्त्रीप्रचारकांना घरोघरी भेटी घ्याव्या लागत असत. हे काम ख्रिस्ती

लोकांचे आहे, असे समजून हे मिशनरी ख्रिस्ती असावे असा गैरसमज होऊ लागला. त्याचे निराकरण करण्यासाठी प्रचारक बायांनी भारत, भागवत, रामायण वगैरे हिंदू लोकग्रंथांचे घरोघरी वाचन सुरू केले. एकादशी, शिवरात्र वगैरे हिंदू सणांचे दिवशी सदनामध्ये भक्तिविजयासारखी हिंदू संतांची चरित्रे वाचून दाखविण्यात आली. आजाऱ्यांची शुश्रुषा करण्यासाठी आणि बाळंतपणात मदत देण्यासाठी सदनातील स्त्रियांना शिक्षण देऊन तयार करण्यात आले. श्रीमती वेणूबाई, द्वारकाबाई आणि श्रीमती कल्याणीबाई सय्यद ह्या तीन स्त्रिया सदनात राहून ही कामे उत्कृष्ट रीतीने करीत. या सदनातील घरगुती सर्व कामे माझी बहीण जनाबाई जबाबदारीने पार पाडी. बाहेरच्या कामाचा सर्व बोजा रा. सय्यद अबदुल कादर यांनी उचलला होता. या कामासाठी निराश्रित महिलासमाज ही निराळी संस्थाच जनाबाईने काढली होती. या महिलासमाजाचा पहिला वार्षिकोत्सव मदनपुरा मोरलँड रोडवरील इंप्रुव्हमेंट ट्रस्टच्या चार माड्यांसमोरील मंडपात त्यावेळी सौ. लेडी लक्ष्मीबाई चंदावरकर ह्यांच्या अध्यक्षतेखाली साजरा करण्यात आला होता. गावातील प्रमुख स्त्रिया हजर होत्या. या महिलासमाजाची कामे भायखळा व परळ येथे दोन ठिकाणी स्वतंत्रपणे चालत असत.

समाचार : घरोघरी भेटीला जाऊन समाचार घेण्याचे काम वर्षभर चालत होते. त्या कामाचा फायदा आमच्या निराश्रित भगिनींना कितपत मिळतो हे आम्हास सांगवत नाही. परंतु त्याचा आम्हाला मात्र निरीक्षणदृष्ट्या बराच मिळतो. ह्यानंतर सौ. कल्याणीबाई सय्यद यांनी भायखळा येथील कामाबद्दलचा वाचलेला रिपोर्ट पुढीलप्रमाणे आहे. 'घरातील वर्ग सुमारे ६ महिने चालले. गेल्या वर्षी एकंदर १३ बायकांची प्रसूती करण्यात आली. पुष्कळांना दवाखान्याचा लाभ देण्यात आला. पोलीस कमिशनरकडून बेवारशी मुले व बायका मिळून ५ आली. त्यांची निगा ठेवण्यात आली.

सोमवंशीय मित्रसमाज : महिलांच्या समाजाप्रमाणेच पुरुषांचाही सोमवंशीय समाज स्थापन करण्यात आला. इंप्रुव्हमेंट ट्रस्टमधील चाळ नं. ३ मध्ये हा समाज तारीख २४ मार्च, १९०७ रोजी स्थापन करण्यात आला. ह्याचा हेतू अस्पृश्य लोकांकरवीच स्वोद्धारार्थ धार्मिक व सामाजिक सुधारणा करवून घ्यावा असा होता. १९१० अखेर पटावर ४० सभासद होते. ते दरमहा ४ आणे वर्गणी देत. दर रविवारी एकेश्वरी माताच्या उपासना त्यांचेसाठी चालविण्यात येत. १९१० साली अस्पृश्यांच्या निरनिराळ्या मोहल्ल्यांतून ह्या लोकांनी ११ जाहीर सभा घडवून आणल्या. अशाच एका सभेचेवेळी एकनाथ व अस्पृश्य जाती या विषयावर माझे जाहीर व्याख्यान झाले. ह्या मंडळीचा उत्साह इतका वाढला की, ह्या समाजासाठी एक स्वतंत्र उपासनामंदीर बांधावे असा विचार १९०९ नोव्हेंबरमध्ये ठरून वेळोवेळी सभा होऊ लागल्या. ह्यासाठी फंड जमा होऊन ६५० रु. मुंबई बँकेत ठेव ठेवण्यात आली. ती ठेव पंचांच्या नावे होती. परंतु कोणत्याही कामात स्थावर मिळकत येऊ लागली म्हणजे वादाची मुळी पेरल्याप्रमाणे होते. हा अनुभव ह्या लहानशा कामातही येऊन काही वर्षानी हे काम बंद पडले.

अनुभवाचा फायदा : ह्या निराश्रित सेवासदनाच्या खर्चासाठी दयाराम गिडुमल यांनी दरमहा १०० रु. देणगी दिली होती. ती तीन वर्षांपुरतीच होती. सुरुवातीचे अनुभव घेऊन पाहण्यासाठीच

हे प्रयोग चालले होते त्या दृष्टीने पाहता ह्या मिशनला फार लाभ झाला. प्रचारकांना अशा कामाचा आणि मनुष्यस्वभावाचा जो अनुभव आला तो प्रत्यक्ष कामापेक्षाही अधिक महत्त्वाचा वाटला. लहान मुले आणि वयपरत्वे अंथरुणाला टेकलेली माणसे यांचे फार हाल होतात, हे माझ्या नजरेस येत असे. गिरणीत १२ तास काम करणाऱ्या माणसांना आपली पोटची मुले आणि वृद्ध जराग्रस्त आईबाप यांच्या जोपासनेस वेळ मिळत नसे, म्हणून अशांची सेवा हेच सदनाचे मुख्य काम असे. सदर काढल्याबरोबर माझे आई, वडील व तरुण बहिणी ग्लोब मिलच्या घाणेरड्या चाळीत जाऊन राहिली.

मातेचा लळा : अशा कामातील अनुभवाची काही उदाहरणे लक्षात घेण्यासारखी आहेत. मुलांना शाळेत पाठविण्यासाठी आमच्यावर विश्वास बसावा म्हणून सदनाच्या ठिकाणी माझ्या आईबापांकडे मुले आणून ठेवण्याचा प्रयोग करून पाहिला. लष्करातून सेवानिवृत्त झालेले एक महार जमादार समजूतदार गृहस्थ होते. ८ वर्षांची एक मुलगी व ६ वर्षांचा एक मुलगा अशी दोन आपत्ये त्यांना होती. आठ-आठ दिवस त्या मुलांना आमच्या सदनात ठेवण्यास ते कबूल झाले. अगदी आपल्या पोटच्या पोराप्रमाणे त्यांना ठेवून घेण्यास माझी आईदेखील कबूल झाली. चंद्राबाई नावाची माझी धाकटी बहीण नुकतीच वारल्यामुळे विरहाचा मोठा धक्का बिचारीला बसला होता. त्यातून थोडासा विरंगुळा मिळावा म्हणून तिने हे संगोपनाचे कार्य पत्करले. एके दिवशी सदनात गोडधोड झाले होते. म्हणून लहानग्या गंगूने (मुलीचे नाव) नेहमीपेक्षा जरा जास्त खाल्ले. गंगूला आपल्या स्वतःच्या बिछान्यात घेऊन आई निजत असे. असा लळा लावल्याशिवाय मुले घर सोडून राहण्यास तयार होण्यासारखी नव्हती. मध्यरात्रीनंतर गंगूला अंथरूणातच जुलाब होऊ लागले. बिचाऱ्या आईने सर्व अंथरूण धुऊन काढून, मुलीला साफसूफ करून, ऊबदार उपचार करून उजाडण्याचे पूर्वी नीटनीटके केले होते. मी रागावेन म्हणून घडलेला प्रकार तिने मला कळविला नाही. तरी तो मला पुढे कळलाच. मी माझ्या आईचे पाय धरले. अशा गोष्टींनी या लोकांचा विश्वास आमच्यावर हळूहळू बसून पुढे लवकरच आमच्या प्राथमिक आणि दुय्यम शाळा व एक मोठे विद्यार्थी वसतिगृह चांगले नावारूपास आले.

आणखी काही प्रयोग : माझी बहीण जनाबाई समाचारास घरोघरी जात असताना तिला खडतर अनुभव आले : (१) एका घरी एक अगदी वृद्ध बाई अंथरुणास खिळली होती. पडून पडून तिच्या पाठीला जखमा झाल्या होत्या. जनाबाई रोज तिची पाठ शेकण्यास जाई. तिच्या पाठीला शेकण्याला पाणी तापवण्याकरिता जनाबाई चुलीकडे जाऊ लागली, तेव्हा बाई म्हणाली, "बाई, तुमचे फार उपकार आहेत ; पण माझ्या चुलीला शिवू नका तुम्हा ख्रिस्ती लोकांनी चूल बाटविल्यास लोक मला नावे ठेवून वाळीत टाकतील." जनाबाईला आपल्या घरचा स्टोव्ह नेऊन आपले स्वीकृत काम मुकाट्याने करावे लागले. (२) राही नावाच्या दुसऱ्या एका वृद्ध बाईला असाध्य जखमा झाल्या होत्या. मोठ्या सायासाने ह्या बाईला जे. जे. हॉस्पिटलात पोचवण्यात आले. दुसरे दिवशी तिचा समाचार घेण्यासाठी जनाबाई जाऊन पाहते तो तिच्या तरुण मुलाने तिला घरी नेलेले आढळले आणि हा उपद्व्याप केल्याबद्दल त्याच्याकडून बराच शिव्यांचा प्रसादही मिळाला. घरी नेऊन मुलाने आपल्या वृद्ध आईच्या थोबाडातही मारल्याचे कळले. मुलगा दारूच्या नशेत

होता, म्हणूनच ही कृत्ये त्याच्याकडून पार पडली. तो कामावर गेल्यावर जनाबाई बाईला भेटण्यास घरी गेल्या. मुलगा रेल्वेत मजूर होता. दारुच्या नशेत रेल्वे ओलांडीत असता दोन्ही डब्यात चेंगरून तो जागच्या जागी ठार झाला. तेव्हा त्याची आई, "बाळा, माझ्या तोंडात मारायला तरी पुन्हा येरे!" असे हंबरडे फोडू लागली. त्याच शोकात म्हातारीचा त्या रात्री शेवट झाला आणि जनाबाईचे हे हृदयविदारक कामही संपले. (३) खालच्या वर्गात मुरळी सोडण्याची चाल त्या वेळी जारी असे. मदनपुऱ्यात आमच्या शाळेत येणाऱ्या एका मुलीला सोडणार आहेत असे कळल्यावरून सदनांतील भगिनीं चार समजुतीच्या गोष्टी सांगण्यास त्या मुलीच्या आईकडे गेल्या. आपल्या धर्मात हात घातल्याबद्दल अत्यंत संताप येऊन पुन्हा आमच्या अंगणात येऊ नका असे त्या मुलीच्या आईने दरडावून सांगितले आणि आपल्या मुलीला शाळेतून काढून घेतले. (४) पुण्याच्या डॉ. मॅनकडून मुरळी सोडलेली मुलगी सदनांत आली. तिला अंगभरून वाईट रोग जडला होता. तिची कोठेही व्यवस्था होत नसल्याने निर्वाणीचा उपाय म्हणून ही मुलगी सदनात पाठवली गेली; पण मुलांबाळांनी भरलेल्या सदनांत ही मुलगी ठेवणे धोक्याचे होते. म्हणून आमच्या भायखळा येथील शाळेजवळ एक स्वतंत्र खोली घेऊन जनाबाईला तिच्यासाठी निराळे राहावे लागले. मुलगी फार आडदांड स्वभावाची होती. बरेच दिवस तिने फार त्रास दिला. तथापि तिला तसेच शिकवून बरी केल्यावर आणि ती चांगली शिकल्यावर तिचा योग्य स्थळी विवाह करून देण्यात आला. ही मुलगी महाराची होती. ती हल्ली निजाम हैद्राबाद येथे शिक्षकीण आहे.

पुष्कळ बायांना गरोदरपणी व बाळंतपणी फार नाजूक उपचार करण्याची पाळी येई. मिशनचे हितचिंतक मोठमोठे स्त्री-डॉक्टर असत. ते औषधोपचार सांगत; पण शुश्रुषेची कामे सदनातील स्त्रियांवर पडत एनिमा देणे वगैरे नवीन उपचाराचे काम आल्यास जुन्या मताच्या रोग्यांना आवरणे फार कठीण होई. ते अत्यंत बीभत्स शिव्या देऊन निघून जात. वेळोवेळी पोलिसांकडून अनाथ अर्भके सदनात पाठवली जात. अस्पृश्य म्हणून इतर अनाथालयात त्यांचा शिरकाव होणे अशक्य होते. अशा मुलांना पंढरपूरच्या आश्रमात किंवा दयारामशेठनी मालाड येथे काढलेल्या आश्रमात पाठविण्यात येई.

प्रतिष्ठित स्त्रियांची कमिटी : अशा प्रकारची दयार्द्रतेची कामे करण्यास पुरुषांपेक्षा स्त्रियांच्या अंत:करणाची जोड मिळविणे आवश्यक असते. या सदनाच्या कामामुळे तेही लवकर घडून आले. १९०८ साली खालील प्रतिष्ठित स्त्रियांची कमिटी नेमण्यात आली. लेडी म्यूर मॅकेंझी–अध्यक्ष ; लेडी चंदावरकर–उपाध्यक्ष ; मिसेस स्टॅनले रीड–चेअरमन; सौ. सीताबाई सुखटणकर आणि सौ. लक्ष्मीबाई रानडे ह्या जॉईंट सेक्रेटरी; कु. एस. के. काब्राजी–खजिनदार; ह्यापैकी डॉ. वासुदेवराव ह्यांची पत्नी सौ. सीताबाई सुखटणकर ह्या पूर्वाश्रमीच्या मँचेस्टर डोमेस्टिक मिशनचे चालक रेव्हरंड बिशप ह्यांची कन्या. ह्यांनी इंग्लंडमध्ये असतानाच ह्या मिशनला तेथील युनिटेरियन लोकांची सहानुभूती मिळवून एकंदर ७०० रु. पाठविले होते. त्या हिंदुस्थानात आल्यावर त्यांनी ह्या स्त्रियांच्या कमिटीचा सेक्रेटरीपणा पत्करला; पण पुढे डॉ. सुखटणकरांना लवकरच मुंबई सोडून लाहोरला जावे लागल्याने ह्या बाईचा मिशनशी फारसा संबंध उरला नाही. ह्या कमिटीवरच्या मोठमोठ्या घरंदाज बायकांनी व्यक्तिश: मिशनची वेळोवेळी फार काळजी घेतली आणि मोठमोठे

होता. स्पृश्य मुलांशी मिळूनमिसळून वागून त्यांच्याशी अभ्यासात चढाओढ करून व त्यांच्या सवयीचा फायदा घेऊन अस्पृश्यांनी आपला फायदा करून घ्यावा. उलटपक्षी अस्पृश्यांविषयी जो विनाकरण तिटकारा स्पृश्यांमध्ये असतो तो निराधार आहे हे त्यांच्याशी प्रत्यक्ष मिसळून पाहण्याची संधी ह्या स्पृश्यांना मिळावी. केवळ मुलांशी वागण्यातच नव्हे तर मोठ्या माणसांमध्ये प्रचार करतांनाही पुढारलेल्या आणि मागासलेल्या समाजाशी वागतांना, व्याख्यानपीठावरून बोलताना प्रचारकांना हा दुहेरी हेतू सांभाळावा लागे. इतकेच नव्हे तर अस्पृश्यांपेक्षा स्पृश्यांनाच शिक्षण देण्याचे काम कित्येक वेळा अधिक अवघड होत असे. विद्यार्थ्यांचा दैनिक कार्यक्रम येणेप्रमाणे :-

सकाळी	५-००	नियमितपणे सकाळी उठणे	११-०० ते १-००	दिवसाची शाळा
	५-३०	सकाळी प्रार्थना	१-०० ते १-३०	भोजन
	६-००	कांजी	१-३० ते ५-००	दिवसाची शाळा
	६-३०	बुकबाईडिंगचे काम	५-०० ते ६-००	व्यायाम
	७-३०	शालेय अभ्याय	६-००	भोजन
	९-००	स्नान व न्याहारी	७-३०	शालेय अभ्यास किंवा रात्रीची शाळा
	१०-००	बुकबाईडिंगचे काम	१०-००	झोपणे

याखेरीज रविवारी सकाळी नैतिक शिक्षण, तिसरे प्रहरी विद्यार्थ्यांचे चर्चामंडळ व सायंकाळी साप्ताहिक उपासना होत असत. स्वयंपाकाकरिता एक बाई नेमलेली असे. घरकामाकरिता एकही नोकर नसे. आपापली कामे करून सामान्य कामाची वाटणी मुलेच बिनबोभाट करीत असत. कोणत्याही प्रकारे कोणत्याही प्रसंगी जातिभेद पाळला जात नसे. या बाबतीत कोणी कधी तक्रारही केली नाही. अन्न नेहमी शाकाहारी असे आणि ते विद्यार्थ्यांना मानवलेही. स्वच्छता आणि नैतिक बंधने ह्या दृष्टीने विद्यार्थ्याच्या वर्तनाकडे कसोशीने पाहण्यात येई. पुरेशा जागेची मोठी उणीव भासत असे.

मोफत दवाखाना : हे कामही प्रयोगादाखल १९०६ नोव्हेंबरपासून १९०८ अखेर चालले. उद्देश हा होता की, औषधाचे द्वारे मिशनचा संबंध या लोकांशी जडावा व नवीन औषधोपचाराची या लोकांस सवय लागावी. नोव्हेंबर १९०६ पासून डिसेंबर, १९०८ अखेरपर्यंत दोन वर्षे दवाखाना खुला राहून त्यात १२३९ रोग्यांना दाखल करण्यात आले व ३४४४ वेळा औषधोपचार देण्यात आले.

जात आणि लिंग या भेदाची वर्गवारी ---

जाती	पुरुष	स्त्रिया	मुले		एकूण
मराठा	१६१	९६	८१	=	३३८
महार	२२२	६४	१६०	=	४४६
मोची	४८	२२	७५	=	१४५
मांग	१७	२२	३	=	४२
भंगी	९	१	६	=	१६

जाती	पुरुष	स्त्रिया	मुले		एकूण
सुरती	२७	२६	८६	=	१३९
मुसलमान	३५	४१	२१	=	९७
ख्रिस्ती	११	१२	९	=	३२
ज्यू	५	१२	१	=	१८
एकूण - ५३५		२९६	४४२		१२७३

ह्या सर्व कामाचा खर्च २३३ रु. ९ आ. ९ पै आला. ह्यावरून किती काटकसरीने हे काम करण्यात येत होते, हे दिसून येते.

शाळाखाते : राहता राहिलेले महत्त्वाचे काम म्हणजे शिक्षणाचे. यासाठी शाळाखाते पसंत करील अशा तज्ज्ञाची मोठी जरूरी होती. निराश्रित सेवासदनाचे काम पाहून आणि त्यासाठी मिळालेल्या स्वार्थत्यागी माणसांची तयारी पाहून रा. वामनराव सोहोनी या प्रार्थनासमाजाच्या सभासदाला आपल्याला वाहून घेऊन काम करण्याची प्रेरणा झाली. ते ह्या कामाला सर्वतोपरी पात्र होते. सदनातील प्रचारकमंडळी सदनांतील कामे करूनच तयार झाली. रा. सोहोनी अगोदर बाहेर तयार होऊनच मिशनला १९०८ सालच्या आरंभी येऊन मिळाले. ते आल्याबरोबर त्यांनी मिशनच्या परळ येथील शाळेचा दर्जा प्राथमिक शाळेतून दुय्यम शाळेत वाढविला. रा. सोहोनींचे काम मागे सांगितलेल्या दोन पद्धतीपैकी सुवर्णकार पद्धतीचे (Intensive) होते. शाळाखात्याचे सर्व नियम सांभाळून त्यांनी हे काम फार चोखपणे केले.

(१) परळ येथील दुय्यम शाळेतील पटावरील संख्या —

इंग्रजी	इयत्ता	४ थी	३	मराठी	इयत्ता	तिसरी	१७
-,,-	-,,-	३ री	२	-,,-	-,,-	दुसरी	१५
-,,-	-,,-	२ री	७	-,,-	-,,-	पहिली	२८
-,,-	-,,-	१ ली	१५	-,,-	-,,-	बिगर	५४
			२७				११४

(२) देवनार कचरापट्टी प्राथमिक शाळा —

इयत्ता	पटावरील संख्या	हजेरी
२ री	३	३
१ ली	४	३
बालवर्ग	३३	२५

ही शाळा ठाणे जिल्ह्यातील चेंबूर येथे उघडण्यात आली. ह्या शाळेचेकामी मुंबई कार्पोरेशनमधील इंजिनियर, रा. अमृतलाल ठक्कर याचे अविश्रांत श्रम फार उपयोगी पडले.

(३) मदनपुरा -- दिवसाची शाळा---पटावरील संख्या १२२, पैकी ९७ मुले आणि २५ मुली.

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, समग्र वाङ्मय, खंड २ रा ~~~

१४

मिशनची घटना

मिशनची घटना : येणेप्रमाणे मुंबई येथील मध्यवर्ती संस्थांची कामे होऊ लागून एका नमुनेदार मातृसंस्थेची उभारणी झाली. यापुढे या संस्थेच्या प्रत्यक्ष शासनाखाली प्रांतिक मुख्य शाखांची घटना करावयाला जनरल सेक्रेटरी लागले. ह्या मिशनच्या सनदेचे जे नियम होते त्यांच्या अन्वये मिशनच्या शाखांचे तीन प्रकार ठरले होते. पहिला प्रकार अंगभूत शाखांचा. ह्या शाखा मिशनची जी मध्यवर्ती कार्यवाहक कमिटी होती तिच्या प्रत्यक्ष अंमलाखाली चालावयाच्या होत्या. जमाखर्चाची सर्व जबाबदारी आणि इतर कारभार मध्यवर्ती कमिटीच्या संमतीने चालावयाचा होता. प्रांतिक शाखांचे मुख्य चालक आणि त्यांच्या मदतनीस कमिटीचे सभासद हे मध्यवर्ती कमिटीच्या संमतीने नेमले जात. हा चालक स्वत:ला वाहून घेऊन काम करणारा असल्यास त्याच्या पगाराची जबाबदारी मध्यवर्ती कमिटीकडे असे. बाकीचा सर्व खर्च चालविण्याची जबाबदारी ह्या मुख्य चालकांवर आणि त्याच्या कमिटीवर असे. वर्षअखेर जमाखर्चाचा खर्डा स्थानिक ऑडिटरने मंजूर केल्यावर तो खर्डा आणि वार्षिक अहवाल मध्यवर्ती कमिटीच्या पसंतीला मुंबईस पाठवण्यात येई. वेळोवेळी या शाखांची आणि त्यांच्या आश्रयाखाली चाललेल्या इतर शाखांच्या संस्थांची तपासणी जनरल सेक्रेटरीकडून होत असे. ह्या शाखांची वर्षअखेर जी शिल्लक असे ती पैकी जास्तीत जास्त १००० रू. मध्यवर्ती कमिटीच्याद्वारे मातृसंस्थेकडे येत. याशिवाय विशिष्ट हेतुने दिलेले कायमचे निधी असतील तर हे ट्रस्टफंड या नात्याने वरील ट्रस्टीकडे येत.

दुसरा प्रकार संलग्न शाखांचा. ह्या शाखांची जमाखर्चाची आणि कामाची जबाबदारी प्रत्यक्षपणे मध्यवर्ती कमिटीकडे नसे. मात्र कामाचे धोरण मिशनच्या हेतुला धरून चालले आहे की नाही हे जनरल सेक्रेटरी वेळोवेळी तपासून पाहात. मिशनच्या वार्षिक सर्वसाधारण अहवालात सामील करण्यासाठी अशा शाखांच्या जमाखर्चाचा तक्ता आणि कामाचा अहवाल जनरल सेक्रेटरीच्या ऑफिसात वेळेवर येत असे.

तिसरा प्रकार सहकारी शाखांचा. ह्या बहुतेक स्वतंत्रपणे चालत. सामान्य धोरण आणि परस्पर सहानुभूती असली की अशा शाखा मिशन मान्य करीत असे.

मातृसंस्थेचे आद्य ट्रस्टी — (१) नामदार गोकुळदास कहानदास पारेख, बी.ए.एल.एल.बी., (२) शेठ दामोदरदास गोवर्धनदास सुखडवाला व (३) श्री. विठ्ठल रामजी शिंदे, बी. ए. तारीख १ जानेवारीपासून ३१ डिसेंबरपर्यंत मिशनचे दप्तरी वर्ष ठरलेले असे.

पुणे शाखा : मि. ए. के. मुदलियार हे पुणे शाखेचे सन्मान्य सेक्रेटरी. ह्यांनी पाठविलेल्या पहिल्या सहामाही अहवालाचा पुढील सारांश आहे. १९०८ सालच्या एप्रिलमध्ये पुणे येथील काही

अस्पृश्य पुढाऱ्यांच्या कळकळीच्या विनंतीवरून मिशनचे जनरल सेक्रेटरी वि. रा. शिंदे यांनी पुण्यास भेट दिली. मिशनची पहिली अंगभूत शाखा पुण्यास असावी असा त्यांचा विचार ठरला. पुढे दोन महिन्यांनी रा. शिंदे यांनी आपले मदतनीस रा. सय्यद अबदुल कादर यांना पुण्यास पाठविले त्यांनी २२ जून, १९०८ रोजी पुणे लष्कर, सेंटर स्ट्रीट, येथील एका घरात या शाखेची पाहिली दिवसाची शाळा उघडली. पैशाची व्यवस्था तात्पुरतीच होती. शाळेचे सामान काहीच नव्हते. एका अस्पृश्यवर्गीय पुढाऱ्याकडून एक टेबल व खुर्ची तात्पुरती मिळाली होती. पुढील सर्व व्यवस्था करण्याचे काम रा. ए. के. मुदलियार यांचेवर सोपवून रा. सय्यद मुंबईस परत गेले. वर्तमान पत्रांतून जाहिराती देऊन पहिल्या महिन्यात ५७७ रू. जमविण्यात आले. बॅ. एच्. ए. वाडिया या उदार गृहस्थाने १०० रू. ची पहिली देणगी दिली. नंतर मि. डब्ल्यू टी. मॉरिसन. आय. सी. एस. मध्यभाग कमिशनर, व डेक्कन कॉलेजचे प्रोफेसर वुडहाउस यांनी प्रत्येकी ३० रू. देऊन सुरुवातीच्या अडचणी भागविल्या; पण शिकविण्यास शिक्षक कोणी मिळेना. म्हणून मातृसंस्थेतून मुंबईहून ए. व्ही. गुर्जर या नावाच्या गृहस्थास पाठवावे लागले. खर्चाची रात्रंदिवस तळमळ लागली असता मुंबईचे त्या वेळचे गव्हर्नर सर जार्ज क्लार्क यांजकडे पुणे शाखेचे चिटणीस रा. मुदलियार यांनी एक विनंतीपत्र पाठविण्याचे धाडस केले. मिशनचे चालक कोण आहेत आणि त्याचे कार्य कसे चालू आहे याची योग्य ती चौकशी केल्यावर गव्हर्नरसाहेबांच्या प्रायव्हेट सेक्रेटरीकडून रा. मुदलियार यांस तारीख १८ ऑगस्ट, १९०८ रोजी खालील उत्तर आले, "आपल्या गेल्या महिन्याच्या १९ तारखेच्या पत्रास नामदार गव्हर्नरसाहेबांच्या आज्ञेने कळविण्यात येते की, आपले मिशन मदतीला लायक आहे आणि ते यशस्वी होवो अशी गव्हर्नरसाहेबांची इच्छा आहे. मदतीसंबंधी आपणास कळविण्यात येते की, गव्हर्नरसाहेबांनी आपली कन्या मिस व्हायोलेट क्लार्क यांना पुढील महिन्यात एक जाहीर गायनाचा जलसा करण्याची परवानगी दिली आहे. जलशाच्या उत्पन्नातून मिशनला बरीचशी शिल्लक उरेल अशी आशा आहे."

मदतीसाठी जलसा : हा प्रसिद्ध गायनवादनाचा जलसा पुणे येथे सप्टेंबर महिन्यात करण्यात आला. प्रत्यक्ष गव्हर्नरसाहेबांचा आणि पुणे येथील सैन्यविभागाचे कमांडर मेजर आल्डरसन यांचा आश्रय होता, म्हणून ह्या इलाख्यातील बऱ्याच राजेरजवाड्यांनी आणि शेठ-सावकारांनी मुक्त हस्ते उदार आश्रय दिला. सर्व खर्च वजा जाता ३,४६७ रु. १३ आणे ६ पै ही शिल्लक ह्या मिशनला मिळाली. ती मातृसंस्थेच्या अध्यक्षाकडे मुंबईस पाठविण्यात आली. राजेरजवाडे आणि प्रसिद्ध पुढारी गृहस्थांच्या नजरेला ह्या मिशनचे कार्य आल्यामुळे ह्या प्रसंगाचे महत्त्व दिसून येण्यासारखे आहे.

या जलशाच्या काही देणगीदारांची नावे —

श्रीमंत सर सयाजीराव महाराज गायकवाड	...		५०० रू.
श्रीमंत शाहू छत्रपतीमहाराज	...	...	२०० रू.
आमोदचे ठाकूरसाहेब ...	...	...	१०० रू.
साचीनचे नबाबसाहेब ...	...	...	१०३ रू.
धरमपूरचे अधिपती ...	...	...	१० रू.

बोलावून त्यांना मी सांगितले की, "मिशनचे रजिस्टर्ड ट्रस्टडीड आहे. त्याबरहुकूम मिशनलाच अशा प्रकारचा जातिविशिष्ट काम करण्याचा अधिकार नाही. मिशनचे कार्यामध्ये जी वरिष्ठवर्गीय माणसे आहेत ती सर्व जातीची व धर्माची आहेत; पण त्यांनाही सार्वत्रिक उदार धर्माच्या पायावरच मिशनचे कार्य करावे लागत आहे स्वत: महाराजसरकारांनाही जातिविशिष्ट मानपत्र रुचणार नाही. ह्या उप्पर महार लोकांचा आग्रहच असेल तर आणि महाराज असे मानपत्र स्वीकारीत असतील तर ह्या मंडपाचे बाहेर अन्य ठिकाणी व अन्य वेळी कुणीही मानपत्र द्यावे. येथेच आणि आताच द्यावयाचे असेल सर्व अस्पृश्यवर्गाने एकत्र होऊन द्यावे. त्यांनी हा एकत्रपणा दाखविला नाही तर त्यांच्यासाठी काम करण्यामध्ये वरिष्ठ वर्गालाही विघ्ने येऊ लागतील." सर्वांची समजूत पटून मिळूनमिसळून मानपत्रसमारंभ झाला. ह्यानंतर सेक्रेटरी मुदलियार यांनी अहवाल वाचला. लेडी म्यूर मॅकेंझी याचे सुंदर व जोरदार भाषण झाले. शेवटी महाराजांनी यथोचित भाषण करून १००० रु. ची देणगी दिली. तो कायमनिधी समजून सयाजीराव गायकवाड स्कॉलर्शिप या नावाने होतकरू विद्यार्थ्यांना स्कॉलर्शिप देण्याचे ठरले. श्रीमंत सयाजीरावमहाराजांना ह्या प्रसंगी मानपत्र देण्यात आल्यावर महार, मांग व चांभार जातीच्या तीन बायकांनी महाराजांना आरती ओवाळली. तेव्हा महाराजांनी प्रत्येक आरतीत एक एक सोन्याची गिनी टाकली.

पुण्याचा पाठिंबा : तारीख १८ ऑक्टोबर, १९०९ रोजी हा डिप्रेस्ड क्लास मिशन डे साजरा करण्यासाठी पुणे शहरी किर्लोस्कर थिएटरात एक प्रचंड जाहीर सभा भरविण्यात आली. पुणे शहरात अशा प्रकारची ही पहिलीच सभा होती. मिशनला चोहीकडून जरी मदत मिळाली तरी पुण्यासारख्या जुन्या वळणाच्या शहराची अद्याप मिळावयाची होती, म्हणून हा समारंभ घडवून आणला. प्रि. र. पु. परांजपे ह्यांनी अध्यक्षस्थान स्वीकारले. महारांचे पुढारी श्रीपतराव थोरात, सुप्रसिद्ध वकील ल. ब. भोपटकर मुसलमानांचे पुढारी इस्माइल बहादूर, हंपी येथील शंकराचार्याचे एजंट रा. हरकारे, रा. न. चिं. केळकर, प्रो. धर्मानंद कोसंबी यांनी जोरदार भाषणे केली. अध्यक्षांचे आभार मानतांना प्रो. धोंडो केशव कर्वे यांनी आपली १०० रू. ची देणगी दिली. रा. हरकारे यांनी आपल्या भाषणाचे शेवटी हंपीचे शंकराचार्याचे प्रत्यक्ष सहानुभूतीचे द्योतक म्हणून त्यांचे आज्ञेनुसार ३०० रु. ची देणगी दिली. ह्या सभेमुळे ह्या इतिहासप्रसिद्ध शहराचे हृदयकपाट उघडले.

मुरळी प्रतिबंधक सभा : २५ एप्रिल, १९१० रोजी जेजुरीच्या यात्रेत ही सभा पुणे शाखेकडून भरविण्यात आली. खडकीचे लक्ष्मणराव सतूर, मुंबईहून मी स्वत: व स. के. नाईक ह्या सभेस मुद्दाम हजर होते. मुरळी सोडण्याची दृष्ट चाल महाराष्ट्रात प्रसिद्धच आहे. मुरळी सोडण्याचा धार्मिक विधी आणि तिचा प्रसार ह्या खंडोबाचे देवळातूनच होतो. ही चाल बंद पाडण्यात यावी असा ह्या सभेचा हेतू होता; पण अस्पृश्यवर्गीय जनतेला मान्य होण्यासारखा तो काळ नव्हता. कित्येक लोक दारुने झिंगून सभेला विरोध करू लागले. सभा चालविणे अशक्य झाले. मिशनमधील भजन करणाऱ्या विद्यार्थ्यांकडून गाणी म्हणविण्यात आली. मग सभेला रंग येऊन ती यशस्वी रीतीने पर पाडली. पुढे जी मुरळीप्रतिबंधक चळवळ मोठ्या प्रमाणावर झाली तिचे मूळ ह्या सभेत आहे.

मेघवृष्टीने प्रचार : येथपर्यंत अंगभूत शाखांतील केंद्रीभूत कार्याचे वर्णन केले. आता मेघवृष्टीने सर्व देशभर जे कार्य झाले त्याचे कथन करतो. ही दोन भिन्न कार्ये समांतर आणि सारखी

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, समग्र वाङ्मय, खंड २ रा ~~~

१५

निधीची योजना

निधीची टंचाई : मिशनच्या सुरुवातीस निराश्रित सेवासदन चालू करण्यासाठी दरमहा १०० रु. ची देणगी दयाराम गिडुमल यांनी दिली हे मागे सांगितलेच आहे. ही देणगी तीन वर्षांसाठीच होती. ह्या तीन वर्षांत मिशनची बरीच वाढ झाली; पण १९१० च्या जूनअखेर ही वर्गणी बंद झाली. काम वाढले पण मदत नाही, अशी पंचाईत पडली. गरिबांची लग्ने करण्यात लोक मोठा परोपकार समजतात; पण लग्नामुळे संसाराचा पसारा होऊन गरिबांचे फार हाल होतात. तसाच ह्या मिशनचा प्रकार झाला. निराश्रित सेवासदन बंद पडल्यामुळे त्यातील कार्यकर्त्यांची इतर कामांकडे वाटणी करण्यात आली. श्रीमती वेणूबाईस पुण्याच्या शाखेत पाठविले. भगिनी जनाबाईस प्रचारकार्यासाठी बरोबर नेण्यात आले. भगिनी तान्याबाईस परळच्या शाळेत शिक्षकीण म्हणून ठेवण्यात आले. सय्यद अबदुल कादर यास बाहेरच्या शाखांची पूर्वतयारी करण्यास पाठविण्यात आले. पण ह्या सर्व कामास निधीची फार जरूर लागली. ती पुरेशी न मिळाल्याने जनाबाईला जे अल्पवेतन होते तेही बंद करण्यात आले. शिक्षकिणीची कायमची नोकरी सोडून त्या मिशनमध्ये आल्या होत्या; पण आता त्यांचे काम मात्र फार वाढले होते आणि अल्पवेतनही बंद झाले. त्यामुळे मोठी खाजगी आपत्ती ओढवली. सय्यद अबदुल कादर व इतर कार्यकर्ते ह्यांची वेतने बंद करणे शक्य व इष्ट नव्हते; म्हणून आम्ही रूपी फंड, तांदूळ फंड, कपडे फंड, पेटी फंड इत्यादी युक्त्या काढून भुकेच्या वेदना कशाबशा शमवू लागलो. पुण्यास ना. गव्हर्नर सर जॉर्ज क्लार्क ह्यांच्या कन्येने जलसा करून जी शिल्लक उरली त्यात थोड्या रकमेची भर घालून ५००० रु. ची रक्कम मुंबईतील ट्रस्टीकडे पाठविण्यात आली. पण तो कायम निधी म्हणून राखून ठेवण्यात आल्याने चालू खर्चास त्याचा उपयोग करता येईना.

संस्थापनेचा दिनसमारंभ : तारीख १८ ऑक्टोबर, १९०९ रोजी मिशनच्या संस्थापनेचा दिवस साजरा करण्यासाठी आणि शाळांतील मुलांचा बक्षीससमारंभ करण्यासाठी मुंबईच्या टाऊन हॉलमध्ये एक अपूर्व जाहीर सभा भरविण्यात आली. तिचे अध्यक्षस्थान श्रीमंत सर सयाजीराव यांनी मंडित केले. त्यावेळी मिशनचे अध्यक्ष चंदावरकर, नामदार जी. के. गोखले, मि. विमा दलाल, बडोद्याचे पं. आत्माराम ह्यांची भाषणे झाली. गावातील प्रमुख स्त्री-पुरुषांनी प्रशस्त टाऊन हॉल चिक्कार भरला होता. महाराजांनी आपले अध्यक्षीय भाषण संपवून आपली २००० रु. ची देणगी देऊ केली. सयाजीराव गायकवाड शिष्यवृत्ती या नावाने तिचा उल्लेख करण्यात आला. मिशनचे उपाध्यक्ष शेठ दामोदरदास सुखडवाला ह्यांनी ५००० रू. ची देणगी दिली. मिशनच्या घटनेच्या नियमाप्रमाणे त्यांना आश्रयदाते करण्यात आले. ह्याप्रमाणे त्या मोठ्या रकमा कायम

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, समग्र वाङ्मय, खंड २ रा ~~~

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, समग्र वाङ्मय, खंड २ रा ~~~

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, समग्र वाङ्मय, खंड २ रा ~~~

अध्यक्ष	स्थानिक कमिटी	फंडाची रोख रक्कम रु.-आ.-पै.	प्रवास-खर्च रु.-आ.-पै.	शेरे
गोंडल संस्थानचे दिवाण				श्रीमंत ठाकोरसाहेब इंग्लडला जाण्याचे गडबडीत असल्याने कायम स्वरूपाचे विधायक कार्य होऊ शकले नाही.
दिवाणसाहेब प्रभाशंकर पट्टणी	एक नवीन स्थानिक कमिटी स्थापून तिचे अध्यक्ष व सेक्रेटरी अनुक्रमे डॉ. देव आणि एल. बी. वैद्य यांना नेमले. ह्या कमिटीने एक नवीन शाळा स्थापण्याचा ठराव केला. ती शाळा अद्याप चालू आहे.	४०५-००-०		दिवाण प्रभाशंकर पट्टणी यांनी हार्दिक सहानुभूती दर्शवून शिंदे यांचा संस्थानच्यावतीने यथोचित गौरव केला.
दिवाणसाहेब बॅ. अलिमहंमद देहलवी	एक नवीन कमिटी स्थापिली. डॉ. रविशंकर अंजारी यांस सन्मान्य सेक्रेटरी करून कमिटीतर्फे एक दिवसाची शाळा उघडली.	२५-००-०		मांगरोलचे चीफसाहेब हिज हायनेस शेखसाहेब व दिवाण मि. देहेलवी यांनी मिशनच्या कार्यास योग्य ते साहाय्य देण्याचे अभिवाचन दिले.
जुनागडचे डायरेक्टर ऑफ पब्लिक इन्स्ट्रक्शन मि. तर्खड	स्थानिक कमिटीची स्थापना करून मि. तर्खड यांना चेअरमन व मि. पी. बी. नानावटी यांस सेक्रेटरी करून अस्पृश्यांची शाळा स्थापिली.	३५०-००-०		संस्थानचे उत्साही ॲडमिनेस्ट्रेटर मि. रेडॉल यांनी व्यक्तिशः आर्थिक मदत तर दिलीच, पण शिवाय अस्पृश्यांच्या शाळेचा सारा खर्च संस्थानकडून चालविण्याचे वचन दिले.
वादियाचे चिफसाहेब		२५०-००-०		लिमडीच्या महाराजांकडून पोरबंदरच्या ॲडमिनिस्ट्रेटरकडून.
	काठेवाडांतील	१००-००-०	५७-१३-६	
	एकूण --	१४२९-००-०	५७-१३-६	

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, समग्र वाङ्मय, खंड २ रा ~~~

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, समग्र वाङ्मय, खंड २ रा ~~~

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, समग्र वाङ्मय, खंड २ रा ~~~

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, समग्र वाङ्मय, खंड २ रा ~~~

१६

महाराष्ट्र परिषद

मिशनच्या परिषदा : मेघवृष्टीने प्रचार करण्याचे तीन प्रकार आहेत---(१) ठिकठिकाणच्या हितचिंतक पुढाऱ्यांची मने वळवून त्यांच्याकडून लोकमत तयार करण्यासाठी त्यांच्या त्यांच्या गावी प्रचंड सभा भरविणे. (२) अशा रीतीने लोकमत अजमाविल्यावर जनरल सेक्रेटरीने (मुख्य प्रचारकाने) प्रांताच्या एका मुख्य ठिकाणी अंगभूत शाखा स्थापून तिच्या नियंत्रणाखाली जिल्ह्याच्या ठिकाणी उप शाखा स्थापण्यासाठी प्रांताचे निरीक्षण करून आणि निधी मिळविण्यासाठी दौरे काढणे. (३) तिसरा प्रकार मिशनच्या खास परिषदा भरविणे. भारतीय राष्ट्रीय सभेची बैठक नाताळात जेथे जेथे होत असे तेथे तेथे एकेश्वरी धर्माची परिषद भरविण्यास मला जावे लागत असे. त्याच वेळी मी ह्या मिशनच्याही परिषदा संघटित रूपाने भरवीत असे. १९०६ मध्ये मिशन स्थापल्यावर १९०७ मध्ये सुरत, १९०८ मध्ये मद्रास, १९०९ लाहोर, १९१० अलाहाबाद, १९१२ बांकीपूर, १९१३ कराची येथे काँग्रेसच्या वेळी या परिषदा भरविण्यात आल्या. बांकीपूर येथे काँग्रेसचे अध्यक्ष, अमरावतीचे नामदार मुधोळकर वकील हेच मिशनच्या परिषदेचे अध्यक्ष होते. कराचीच्या परिषदेत लाला लजपतराय हे अध्यक्ष होते. ह्या परिषदांमुळे प्रांताप्रांतांतून आलेल्या पुढाऱ्यांचे लक्ष ह्या मिशनच्या कार्याकडे लागत असे. त्या त्या प्रांतात ह्या मिशनच्या कार्याची उभारणी करण्यासाठी माहिती आणि मदत मिळत असे. पण प्रत्यक्ष काँग्रेसच्या कार्यात ह्या अस्पृश्यांच्या प्रश्नाला शिरकाव होण्याला त्या वेळी अनुकूलता मुळीच नव्हती. हा प्रश्न धर्माचा आहे; त्याची भेसळ राजकारणात नको, अशी सबब सांगून त्या वेळचे जहाल अथवा मवाळ राजकीय पुरुष हा प्रश्न सफाईदारपणे टाळीत असत.

परिषदेची तयारी : १९०६ साली हे मिशन निघून त्याचे अर्धे तप १९१२ अखेर संपूर्ण झाले. ह्या राष्ट्रीय प्रश्नाच्या बाबतीत ह्या अर्ध्या तपात महाराष्ट्रीयांनी उचल खाऊन सर्व प्रातांत आघाडी मारली. मुंबई, मद्रास, मध्यप्रांत ह्या हिंदुस्थानातील तीन इलाख्यात ह्या मिशनच्या द्वारे व शासनाखाली ह्या प्रश्नाची अपूर्व घटना केली. म्हणून मला असे वाटू लागले की, ह्या मिशनची खास महाराष्ट्रीय परिषद भरवून लोकमताचा आढावा घ्यावा. ह्या प्रयोगासाठी पुणे शहर हेच योग्य ठिकाण असे ठरविले. मुंबई हे पैशाचे केंद्र आणि पुणे हे चळवळीचे केंद्र हा आधुनिक महाराष्ट्राचा अनुभव आहे. पुणे शाखेचे वसतिगृह स्थापावे, सर्व मिशनचा एक मध्यवर्ती आश्रम स्थापावा, सनातनी पक्षाला हालवून पाहावे, भिन्नजातीय व भिन्नधर्मीय पुढाऱ्यांची सक्रीय सहानुभूति कसोटीस लावून पहावी वगैरे इतर अनेक हेतु होतेच. ही परिषद वरिष्ठ वर्ग आणि अस्पृश्यवर्ग ह्यांच्या सहकार्यावर घडवून आणण्यात आली.

परिषद फर्ग्युसन कॉलेजच्या ॲंफि-थिएटरमध्ये सर रामकृष्णपंत भांडारकर यांचे अध्यक्षतेखाली सन १९१२ ऑक्टोबर तारीख ५, ६, ७ ह्या तीन दिवशी भरली. परिषदेच्या कामाकरिता स्वयंसेवकांची जोरदार घटना केली. त्यात विशेषत: पुणे येथील शेतकी कॉलेजचे व इतर कॉलेजातील बऱ्याच तरूण स्वयंसेवकांनी ऊन, वारा, पाऊस यांना न जुमानता एकसारखी मेहनत केली. सर्व्हंट्स ऑफ इंडिया सोसायटीचे सभासद रा. वझे यांनी आणि इतरांनी फारच श्रम घेतले. परिषदेकरिता आलेल्या सर्व जातीच्या दूरदूरच्या पाहुण्यांची जेवण्याची व राहण्याची सोय मिशनच्या लष्करांतील शाळेत करण्यात आली. जेवणासाठी भव्य मंडप घालण्यात आला होता. सर्व जातीचे मिळून २६० पाहुणे आले होते. त्यांची एकत्र भोजने तीन दिवस मिळून-मिसळून होत होती. परिषदेच्या दुसऱ्या दिवशी म्हणजे रविवारी परिषदेचे स्वयंसेवक, वरिष्ठ जातीचे हितचिंतक आणि निरनिराळ्या अस्पृश्य जातीचे पाहुणे मिळून सुमारे ४०० पानांचे थाटाचे प्रीतिभोजन झाले. ह्या भोजनात ५० वरिष्ठ जातीच्या लोकांनी भाग घेतला. कमिटीचे स्वागताध्यक्ष म्हणून डॉ. मॅन यांनी प्रीतीभोजनात सर्वात मिसळून भोजन केले.

सर्व पाहुणेमंडळी पुण्यास आल्यावर त्यांचे नाव, जात ह्यांची नोंद होई. सकाळचा चहा झाल्यावर परस्पर परिचय होऊन भोजन होई. सभेचा कार्यक्रम ठरल्याप्रमाणे उरकण्यात येई. सर्व कार्यक्रमाला भजनाने व उपासनेने आरंभ होई. पाहिले दिवशी रा. ब. काशिनाथ बाळकृष्ण मराठे यांनी उपासना चालविली. दुसरे दिवशी परिषदेसाठी प्रार्थना समाजाच्या हरिमंदिरात परिषदेचे अध्यक्ष डॉ. भांडारकर यांनी उपासना चालविली. त्या वेळी परिषदेचे बाहेरगावचे २५० पाहुणे हजर होते. तिसऱ्या दिवशी मिशनचे शाळेत मी स्वत: उपासना चालविली. त्या वेळी मुंबईहून आलेल्या परळ मिशनच्या मुलांनी निरनिराळ्या व्यक्ति-प्रार्थना केल्या.

पुढाऱ्यांचा मेळावा : दोन प्रहरी अध्यक्ष भांडारकर स्थानापन्न झाले. जमलेल्या थोर मंडळीत सर चंदावरकर, डॉ. मॅन, भावनगर संस्थानचे दिवाण पट्टणी, ना. मौलवी रफिउद्दीन, इचलकरंजीचे अधिपती श्रीमंत बाबासाहेब घोरपडे, कोल्हापूरचे भास्करराव जाधव, गोपाळराव देवधर, बी. एस. कामत, प्रो. धोंडोपंत कर्वे, रेव्हरंड रॉबर्टन्, तेलुगू समाजाचे पुढारी डॉ. कोरेज, अस्पृश्यांपैकी सुभेदार मेजर भाटणकर, नगरचे डांगळे, पुण्याचे कांबळे, भंग्याचे पुढारी नाथामहाराज, साताराचे मातंग पुढारी श्रीपतराव नांदणे वगैरे अनेक पुढारी होते.

कार्याचे क्षेत्र : प्रथम मी माझ्या भाषणात ह्या चळवळीचा थोडक्यात इतिहास सांगून मिशनच्या हल्लीच्या कार्याचा विस्तार पुढील कोष्टक देऊन सांगितला.

अ.क्र.	ठिकाणे		संस्था
१	मुंबई	--	५ दिवसाच्या शाळा व १ रात्रीची शाळा, ५०० विद्यार्थी, १ वसतिगृह व त्यातील २६ मुले, २ भजनसमाज, १ धंदेशिक्षणाची शाळा.
२	पुणे	--	एक २०० मुलांची शाळा, १ भजनसमाज, १ वाचनालय, क्रिकेट क्लब वगैरे.
३	हुबळी	--	१ दिवसाची शाळा, १ रात्रीची शाळा, १ वसतिगृह.
४	सातारा	--	१ रात्रीची शाळा, १ भजनसमाज.

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, समग्र वाङ्मय, खंड २ रा ~~~

दुय्यम चिटणीस रा. दा. ना. पटवर्धन ह्यांनी ही परिषद घडवून आणण्यासाठी जे अविश्रांत श्रम केले त्यांचे वर्णन शब्दाने करवत नाही. रा. ए. के. मुदलियार यांचे हाताखाली त्यांना दक्षतेचे आणि तत्परतेचे वळण लागले होते. परिषदेचे बहुतेक श्रेय त्यांनाच आहे. सुमारे पाऊणशे पानांचा परिषदेचा अहवाल पुस्तकरूपाने प्रसिद्ध करून परिषदेच्य वाङ्मयात त्यांनी एक संस्मरणीय भर टाकली.

उदार देणगी : ही परिषद पुणे येथील इमारतफंडासाठी मुखत्वेकरून भरविण्यात आली होती. परिषदेत तो फंड न मिळता उलट खर्चातच २५९ रु. १४ आ. ३ पै. तूट आली. पुणे शहराच्या दारिद्र्याचे याहून सुंदर प्रदर्शन दुसरीकडे कोठे दिसणार! पण चिटणीस रा. पटवर्धन यांचे सात्त्विक परिश्रमाला दुसरीकडूनच यश येणार होते. परिषदेचा सुंदर अहवाल वाचून इंदूरचे महाराज श्रीमंत तुकोजीराव होळकर यांना दयेचा पाझर फुटला आणि त्यांनी पुढील महिन्यांतच जनरल सेक्रेटरी म्हणून मला ताजमहल हॉटेलमध्ये बोलावून २०,००० रु. चा चेक माझे हाती दिला. ह्यांतच पुढे मुंबई सरकारच्या ८७,००० रु. ची भर पडून पुणे शाखेसाठी भोकरवाडीत 'अहल्याश्रम' या नावाच्या सुंदर इमारतीत आश्रम उघडण्यात आला.

●●●

१७

अंतर्बाह्य खळबळ

एक प्रश्न : पहिल्या सहा वर्षात मिशनची वरील वाढ झाली हे खरे! पण ती होत असताना अनेक अडचणी, विघ्ने, गैरसमज आणि परिक्षेचे प्रसंग आले हेही खरेच. वाढ झपाट्याने होऊ लागली असता पहिला प्रश्न असा उद्‌भवला की, हे मिशन मुंबई प्रार्थनासमाजाने आपल्या ताब्यात आणि जबाबदारीखाली आपलेच एक अंगभूत काम अशा दृष्टीने चालवावे की, ते सर्व राष्ट्राचे काम आहे म्हणून सर्वांचे सहकार्य मिळवून शक्य तेवढी त्याला बाहेरूनच मदत करावी? डॉ. भांडारकरांचे मत पहिल्या बाजूने पडले. आरंभी मिशनच्या मध्यवर्ती कमिटीवर सर्व अधिकारी आणि सभासद प्रार्थनासमाजाचेच पुढारी होते. अध्यक्ष आणि उपाध्यक्ष यांच्या प्रोत्साहनाने आणि बळावरच मी हे काम काढले होते. पुढे बरीच वर्षे समाजाची सहानुभूति आणि मदत मिशनला बिनतक्रार व आनंदाने मिळत होती. मिशनचा सामाजिक हेतु समजाला पूर्णपणे मान्य होता. इतकेच नव्हे तर मिशनचे कार्य धर्माच्या पायावरच चालवावयाचे होते. तो पायाही समाजाला मान्य होता. मात्र अस्पृश्यवर्गातून समाजाला सभासद मिळावे असा हेतू समाजाने कधीच बाळगला नाही आणि तशी तक्रारही कधी कोणी बाहेच्यांनी केली नाही. म्हणून साहजिकच डॉ. भांडारकारांना वाटू लागले की, प्रार्थना समाजाने हे काम आपल्याच जबाबदारीवर चालवावे. बंगल्यात ब्राह्म समाजाने आणि पंजाबात आर्य समाजाने ह्या मिशनचे काम इतरांची मदत घेऊन पण स्वतःच्याच नियंत्रणाखाली चालविले होते. म्हणून डॉ. भांडारकरांचे मतात काही वावगे होते असे नाही. पण ह्या मिशनचे काम नेहमी वाढते राहणार. प्रश्न जरी हिंदूपुरता असला तरी अस्पृश्यतानिवारणाची जबाबदारी ब्रिटिश सरकार आणि हिंदुस्थानांत राहणाऱ्या प्रत्येक जातीच्या आणि धर्माच्या माणसावर पडते, हे आम्ही वेळोवेळी सर्वांना बजावूनच काम चालविले होते. पैशाची मदत जर सर्वांकडून घ्यावयाची तर त्याचा विनियोग आणि सर्व कामांच्या जबाबदारीचा वाटा खुशीने घेतील त्यांना देण्यातच शहाणपणा आहे, हे आम्ही जाणूनच होतो. म्हणूनच सर नारायणराव आणि कमिटीचे इतर सभासदांना मिशनच्या कामांत सर्वांना मोकळीक ठेवावी असे वाटले डॉ. भांडारकरांनाही लवकरच ते पटले आणि हा वाद फारसा माजला नाही.

माझी स्थिती : काम झपाट्याने वाढू लागल्यामुळे अर्थातच माझा वेळही ह्या कामात अधिक अधिक जाऊ लागला. मी मूळ प्रांतिक समाजाच्या कामाला वाहिलेला. अल्प का होईना पण माझ्या योगक्षेमाची तरतूद समाजाने केलेली. अर्थातच समाजाच्या कळकळीच्या सभासदांना-विशेषत: ज्यांनी मला मदत केली होती त्यांना--सहाजिकपणे ह्या बाबतीत वैषम्य वाटू लागले. हळूहळू हा विषय वादग्रस्त होऊ लागला, आणि त्यात कोणाचा काय इलाज! जनतेची सेवा हीच

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, समग्र वाङ्मय, खंड २ रा ~~~

सोज्वळपणाबद्दल ह्या दोघा नवराबायकोची खात्री पटविली होती. माझ्या मुलाखतीत सर जॉन यांनी स्पष्ट सांगितले की, "सर नारायण चंदावरकरांचे नावामुळे आणि तुमच्या कामाच्या तपशीलवार माहितीमुळे तुमच्याबद्दल तिळमात्रही संदेह आमच्या मनात येणार नाही हे पक्के ध्यानात ठेवा आणि तुमचे काम निर्वेधपणे पुढे चालवा. झालेल्या गुन्ह्याबद्दल सरकार योग्य तो बंदोबस्त करील. त्याची झळ तुम्हाला लागणार नाही." माझा जीव खाली पडला. पुणे शाखेच्या कमिटीला नवीन धीर आणि नवीन जोम आला. कमिटीचे अध्यक्ष डॉ. मॅन हे दमदार कार्यकर्ते. सर नारायणरावांप्रमाणेच ते मिशनच्या कामी जातीने लक्ष घालीत. त्यांना कोणत्याच प्रकारचा संशय आला नव्हता. पण मी मुंबईस परत येऊन पाहतो तो सर नारायणराव यांच्या राजीनाम्याचे पत्र माझ्या टेबलावर आढळले. मी ताबडतोब त्यांच्याकडे जाऊन घडलेला सर्व प्रकार सांगितला. अशा धामधुमीच्या वेळी नामदार गव्हर्नरांची भेट घेणे उचित नव्हे; ही लाट उसळून गेल्यावर त्यांच्याकडे एक शिष्टमंडळ नेऊन घडलेल्या शोचनीय प्रकाराचा त्यात संबंध न दाखवता मिशनच्या अनेक गरजा त्यांचेपुढे ठेवून सरकारी रीत्या त्यांची सहानुभूती मिळविण्याचा आम्ही प्रयत्न करावा. असा प्रेमळ आणि पोक्त सल्ला सर जॉन म्यूर मॅकेझी यांनी दिला वगैरे मजकूरही मी सर नारायणरावांस सांगितला. मग त्यांनी राजीनाम्याचा आग्रह धरला नाही.

दुष्ट वार्ता : पुढे १९०९ सालच्या आरंभी मी मुंबईस असताना मिस् व्हायोलेट क्लार्क ह्यांच्याकडून एक खाजगी पत्र आले. ह्या उदार स्त्रीने जलसा करून मिशनला देणगी दिल्यापासून मिशनचे कार्य प्रत्यक्ष पाहावे अशी इच्छा धरली होती. प्रतिष्ठित स्त्रियांच्या कमिटीकडून आणि निराश्रित सेवासदनाच्या प्रचारकांकडून अस्पृश्यवर्गाच्या कंगालखान्यातून या गरीब लोकांची जी प्रेमळ शुश्रुषा व निःस्वार्थ सेवा चालली होती तिचा तपशील ह्या उदार स्त्रीचे कानांवर गेला असला पाहिजे. म्हणूनच तिने मजला खाजगी पत्र लिहून गरिबांच्या घरोघर जाऊन ही सेवेची कामे आपल्याला समक्ष पाहाण्यास मिळतील काय असा प्रश्न केला होता. अर्थात् मी अनुकूल उत्तर दिले. लवकरच १९०९ च्या मार्चमध्ये मिशनच्या शाळेचा बक्षिससमारंभाचा बेत ठरविण्यात आला. एल्फिन्स्टन रोडजवळील मिशनच्या ठिकाणाच्या बाजूस एक विस्तीर्ण पटांगण होते. तेथे भव्य मांडव घालण्यात आला. सामाजिक मेळा, स्त्रियांची सभा, प्रीतिभोजन वगैरे पूर्वीची कामे देखील आटोपून घेण्यात आली. मुख्य बक्षीससमारंभाचे दिवशी अध्यक्षस्थान स्वीकारून आपल्या कन्येच्या हस्ते मुलांना बक्षिसे वाटण्याचे गव्हर्नरसाहेबांनी कबूल केले होते. पण दैवदुर्विलास काही निराळाच होता. आम्ही ह्या समारंभाची वाट पहात असता त्याच दिवशी एक भयंकर व्याधी अचानकपणे होऊन ही प्रेमळ तरुण कुमारी ख्रिस्तवासी झाली अशी दुष्ट वार्ता गावभर पसरली. आश्चर्य आणि दुःख यांनी आम्हा सर्वांस घेरले आणि ईश्वरी इच्छेस मुकाट्याने मान द्यावा लागला. अर्थात मिस क्लार्क यांना गरिबांची दुःखे समक्ष बघण्यास संधी मिळाली नाही. पुढे काही दिवसांनी सर जॉर्ज यांच्या पत्नीही निवर्तल्या, म्हणून रजा घेऊन ते काही दिवस एडन येथे रहावयास गेले. त्यांच्याकडे रीतसर मिशनचे दुखवटे गेले. त्यांच्या जागी सर जॉन म्यूर हे तात्पुरते गव्हर्नर झाले. पुढे ढकलण्यात आलेला बक्षीससमारंभ तारीख १२ ऑक्टोबर, १९०९ रोजी श्रीमंत सर सयाजीराव गायकवाड यांच्या हस्ते मुंबई येथील टाऊन हॉलमध्ये टोलेजंग सभा भरवून उरकण्यात आला. त्याचे वर्णन मागे आलेच आहे.

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, समग्र वाङ्मय, खंड २ रा ~~~

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, समग्र वाङ्मय, खंड २ रा ~~~

भाग तिसरा

१

आयुष्यातील परिवर्तने

माझ्या आयुष्याचे साकल्येकरून निरीक्षण केल्यास त्यात खालील चमत्कारिक योगायोग येऊन प्रत्येक दहा वर्षांनी एक निश्चित परिवर्तन घडून आल्याचे दिसून येत आहे. मी ज्योतिषशास्त्राचा अभ्यास केलेला नाही. पण निश्चितकाली झालेली ही परिवर्तने पाहून त्यांच्या मुळाशी काही ग्रहलाघव आहे असा एखादा ज्योतिषशास्त्रज्ञ सांगू शकेल. माझ्या जन्मकाळीच म्हणजे ता. २३ एप्रिल, १८७३ रोजी आमच्या गृहपुरोहिताने माझी सशास्त्र जन्मपत्रिका वर्तवली. ती मी खाली जशीच्या तशी देत आहे.

जन्मपत्रिका : स्वस्ति श्रीनृपशालिवाहन शके १७९५ प्रवर्तमाने श्रीमुखनाम संवत्सरे।। चैत्र वद्य ११ बुधवार घटी १५ पळ १ शततारानक्षत्र घटी ० पळ ५८।। ब्रह्मनामयोग घटी ९ पळ ४८ नराकर्ण घटी १५ पळ २८ एवं पंचांगशुद्धौ।। अस्मिन् शुभदिवसे रामबसप्पा तस्य भार्या कुंकुमोक्तसौभाग्यवती यमुनाबाई तृतीय (पंचम संतानं अथवा चतुर्थ पुत्रः V. R. Shinde) मजीजनत्॥ अवकहडाचक्रानुसारेण जननकाल घटी सूर्योदयानंतर १४ घटिका प्रसूतकालाः॥ पूर्वाभाद्रपदा नक्षत्र प्रथम चरण॥ जन्मनामशंक्रप्पाइति॥ शेशिगिरीइतिप्रतिष्टितं॥ कुंभराशीमहानक्षत्रमुखं पतति उत्तमं।। मुखेअन्नसुखंचैवशीर्षोराजंश्वमेवच। मनुष्यगण। हारणी जाति॥ आजायोनी॥ जन्मकालेसिंहलग्न॥ जनकाले गुरू महर्दश॥ ..... जन्मापासून सोळा वर्षापर्यंत सर्व गोष्टी उत्तम प्रकार होईल।। १२, १७, २१, ३२, ४२, ४३ येतेषुशुभगृहावलोकिते॥ आयुष्य ८०॥ मातापितृसेवकः॥ विद्यावंतः॥ बहुजनप्रियः॥ देवब्राह्मणद्विजपूजिकः॥ श्रीमंगलमाहेश्वरी शुभं भवतु॥ तदेव लग्नं॥ शुभमस्तु॥ कल्याणमस्तु॥

जन्मकुंडली



राशिकुंडली



महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, समग्र वाङ्मय, खंड २ रा ~~~

मिशनला मिळू लागला. ह्या कामासाठी महाराष्ट्राची राजधानी आणि चळवळीचे केंद्र पुणे शहर ह्याकडे मला नजर वळवावी लागली. याच वेळी पुणे शाखेत एक अचानक कारण घडले.

ए. के. मुदलियार : ह्या शाखेचे सन्मान्य सेक्रेटरी रा. ए. के. मुदलियार ह्यांनी पहिली ६ वर्षे अत्यंत जोमाने आणि दक्षतेने काही एक वेतन न घेता बाजू संभाळली होती. त्यांची पत्नी सौ. सीताबाई ही एकाएकी निवर्तल्यामुळे मुदलियार यांवर मोठी आपत्ती आली. त्यांना घरी कोणीच जोडीदार नव्हता. ते पुणे येथील न्यू इंग्लिश स्कूलमध्ये शिक्षक होते. काही कारणाने ती जागाही सुटली. मुदलियार यांच्या कामात त्यांच्या पत्नीची मोठी मदत होत होती. यापुढे श्री. मुदलियार यांना मिशनच्या कामाचा राजीनामा देणे भाग पडले आणि ऑगस्ट १९१२ मध्ये पुणे शाखेचा ठराव होऊन मी जरूर ती तजवीज करावी व ती होईतोपर्यंत मी स्वत: पुण्यास राहून कामाचा सर्व ताबा घ्यावा असे तातडीचे पत्र आले. मी तेथे गेल्यावर असे आढळून आले की, मुंबईप्रमाणे पुण्याला एक वसतिगृह असावे आणि त्यासाठी मिशनला स्वत:ची इमारत असावी. ही सर्व परिस्थिती जनतेपुढे ठेवून एक मोठी परिषद भरवून जनताजनार्दनापुढे एक जाहीर विनंती ठेवावी. ऑक्टोबर महिन्यात जी महाराष्ट्रीय परिषद भरली तिचे सविस्तर वर्णन मागे आलेच आहे.

कार्यवाहकांची फेरव्यवस्था : निराश्रित सेवासदन बंद पडल्यावर त्यात तयार झालेले प्रचारक-भगिनी जनाबाई-यांची दुसऱ्या कामावर रवानगी झाली. वऱ्हाडची आणि मध्यप्रांताची परिस्थिती अजमावून पाहण्याकरिता जनाबाई तिकडे गेल्या आणि यवतमाळ येथे लहानसे वसतिगृह काढून ते चालवू लागल्या. हुबळी येथे याच वेळी कर्नाटक शाखा उघडण्यात येऊन तिचे चालकत्व रा. सय्यद अबदुल कादर यांस देण्यात आले. त्यात त्यांची पत्नी कल्याणीबाई यांचे पूर्ण साहाय्य मिळाले. इकडे मुंबईला मध्यवर्ती मातृसंस्थेस रा. वामनराव सोहोनी हे नवीन वाहून घेतलेले कार्यवाहक मिळाले. भगिनी जनाबाई आणि सय्यद अबदुल कादर यांचे उदाहरण पाहून रा. सोहनींना आत्मसमर्पणाची प्रेरणा (१९१० चे सुमारास) झाली होती. दोन वर्षे त्यांनी कामही केले आणि पूर्ण व स्वतंत्र जबाबदारीची तयारी केली. याच साली औद्योगिक शिक्षणाप्रीत्यर्थ वाडिया ट्रस्टची दरसाल ६००० रु. ची ग्रँट मिळून मुंबई येथील वसतिगृहात ४० मुलांची खाण्यापिण्याची वगैरे आणि शाळांतील मुलांची सर्वतोपरी सोय झाली. ह्या सर्व कामाचे केन्द्रस्थान परळ येथील पोयबावडीचे नाक्यासमोर घडियाळी हॉल नावाचा एक प्रशस्त जुना बंगला होता, तेथे करण्यात आली. बंगला दोन मजली असून भोवताली उपगृहे आणि समोर उंच वृक्षांची विस्तीर्ण बाग आणि त्याभोवती उंच तटबंदी होती. इंप्रुव्हमेंट ट्रस्टच्या मेहेरबानीने हा बंगला अगदी सवलतीच्या भाड्याने मिळाला. मिशनच्या दंडकाप्रमाणे रा. सोहोनी हे आपल्या सर्व कुटुंबाला घेऊन मुंबई शाखेचे कुलगुरू म्हणून वरील आश्रमात कायमचे येऊन राहिले. ते लवकरच ह्या कामाशी इतके समरस झाले की, मध्यवर्ती कामाची माझी सर्व काळजी दूर झाली आणि मी १९१३ च्या आरंभी पुणे शाखेच्या पुनर्घटनेसाठी पुण्यास सहकुटुंब येऊन राहिलो. त्या शाखेचे हेडमास्तर रा. दा. ना. पटवर्धन ह्यांनी महाराष्ट्र परिषदेची जुळवाजुळव करण्याचे कामी फार दक्षता दाखवली. त्यांच्या साहाय्याने मी ह्या शाखेचा, माझे जनरल सेक्रेटरीचे काम सांभाळून, ताबा घेतला. येथे माझ्या आयुष्यातले चौथे परिवर्तन आणि मिशनच्या ६ वर्षांचे पहिले अर्धे तप संपले!

●●●

२

अहल्याश्रमाची तयारी

लेडी विलिंग्डन : १९१३ साली मी पुण्यास येऊन राहून लागल्यावर मुंबईचे गव्हर्नरचे जागी लॉर्ड विलिंग्डन हे आले. त्यांची उत्साही पत्नी लेडी विलिंग्डन यांच्या कानावर माजी गव्हर्नरकन्या ख्रिस्तवासी मिस् व्हायोलेट क्लार्क हिची हकिकत गेली असावी. लेडी विलिंग्डन ह्या पुण्यास राहण्यास आल्याबरोबर पुण्यातील मिशनचे काम समक्ष पाहण्याची इच्छा त्यांनी मला पत्राने कळवली. मला मिस् क्लार्कची आठवण झाली. मोठमोठ्या परकीय अधिकाऱ्यांना त्यांच्या घरच्या मंडळींचे कसे सहकार्य असते ह्याची मला खात्री पटली. लागलीच मी एक मिशनची जाहीर सभा बोलावली. मोठा शामियाना घातला. अस्पृश्य बायकामुले व त्यांच्या मदतीला वेळोवेळी येणाऱ्या गावातील प्रतिष्ठित स्त्रियाही बोलावल्या. ठरल्या वेळी नियमितपणे लेडी विलिंग्डन शामियानात आल्या. जमलेला मोठा मिश्र समाज पाहून त्यांना आश्चर्य वाटले. प्रमुख स्त्रीपुरुषांचा परिचय झाल्यावर कामाची अपूर्वता पाहून त्यांना आनंद वाटला. शाळेची टापटीप, विद्यार्थ्यांची प्रसन्न वदने, विशेषत: त्यांची चित्तवेधक व तालसुरावर झालेली कवाईत पाहून बाई रममाण झाल्या. पुणे शाखेच्या अस्पृश्य मुलांना कवाईत शिकवण्यासाठी अस्पृश्यवर्गाचाच लष्करी पेन्शनर मिळत असे. बँडच्या चालीवर निशाणीची कवाईत तो फार उठावदार करी. कवाईत संपल्याबरोबर लेडी विलिंग्डन माझ्या कानात विनोदाने म्हणाल्या, "मि. शिंदे हे गरीब लोक पुढे एके काळी हिंदस्थानचे राजे होतील!" तितक्याच विनोदाने मी उत्तर दिले, "बाईसाहेब, आपला आशीर्वाद खरा होणार यात मला तिळमात्र संदेह नाही. पण हे लोक राजे झाल्यावर आपण आपली तशरीफ कोठे न्याल?" बाई मन:पूर्वक हसल्या. पुढे लॉर्ड विलिंग्डनने मिशनला जी वेळोवेळी उदार मदत केली आणि मिशनच्या चालकांशी मिळून वागले त्याचे हे पूर्वचिन्ह होते.

आश्रमासाठी जागा : ह्यापुढे मी ह्या शाखेच्या स्वतंत्र इमारतीच्या तयारीला लागलो. त्याप्रीत्यर्थ श्रीमंत सर तुकोजीराव होळकरांकडून २०००० रु. ची रोख देणगी मिळाली होती. देणगीतून पुणे शाखेसाठी ज्या इमारती व्हावयाच्या होत्या त्यांना "अहल्याश्रम" हे नाव देण्याचे ठरले होते. त्या आश्रमासाठी प्रशस्त जागा हुडकू लागलो. नानाच्या पेठेत जेथे हल्ली पोलीस क्वार्टर्स आहेत त्याच्या उत्तरेला भोकरवाडी म्हणून अस्पृश्यांची एक कंगाल वस्ती आहे. ती त्या वेळी अत्यंत गलिच्छ स्थितीत होती. तिच्या आजूबाजूस जवळजवळ दोन फर्लांग मैदानाची उघडी जागा होती. ते सर्व स्थळ इतके उजाड आणि भयाण दिसत होते की, दिवसाढवळ्या तेथे जाण्याला कोणी धजत नसत. खाचखळगे, काटेखडेच नव्हे तर जनावरांच्या हाडांचे मोठमोठे सापळे, चिंध्या, मोडके डबे वगैरे कंगालांच्या संपत्तीचे हे मैदान एक उघडे भांडारच होते. हल्ली ज्याला 'आर्यावन रोड' म्हणून मोठे आढ्यतेचे नाव आले आहे त्यावर पोलीस लोकांच्या वस्तीचे ठाणे असूनही हा

३

नागपूर व हुबळी शाखा

नागपूर शाखा : मुंबई इलाख्यात मुंबई, पुणे, हुबळी वगैरे अंगभूत शाखा आणि त्यांच्या उपशाखांचे येणेप्रमाणे बस्तान बसल्यावर माझे लक्ष नागपूर येथे सर्व मध्यप्रांतासाठी मिळून एक अंगभूत शाखा काढण्याकडे लागले. कोल्हापुरचे वकील रा. गणपत कृष्णाजी कदम ह्यांनी ह्या कामी स्वत:ला वाहून घेण्याचे कबूल केले. अमरावती, अकोला, यवतमाळ वगैरे ठिकाणी संलग्न शाखांची कामे ह्यापूर्वीच चालू होती. राजधानीचे ठिकाण नागपूर येथे ह्या प्रांताची मध्यवर्ती शाखा उघडून ह्या संलग्न शाखा तिच्याकडे सोपवून एक प्रांतिक नवीन अंगभूत शाखा उघडण्याची वेळ ठेपली होती. १९१४ च्या उन्हाळ्यात मी एकटाच नागपूरला गेलो. नागपूर शहराची परिस्थिती पाहून निधी मिळविण्याचा अंदाज करणे हा उद्देश होता. तेथील प्रागतिक पक्षाचे वृद्ध पुढारी रा. ब. वामनराव कोल्हटकर यांच्या घरी मी उतरलो. त्यांनी माझे फार प्रेमळपणे स्वागत केले. उन्हातान्हातून मला घरोघर नेऊन त्यांनी आपल्या वजनदार मित्रांचा परिचय करून दिला ; थोडीबहुत आरंभीची मदतही मिळवून दिली. ह्या गोष्टीने उत्तेजन मिळून पुढे लवकरच रा. कदम यांना बरोबर घेऊन मध्यप्रांतातील हिंदी जिल्ह्यातून पूर्वतयारीसाठी आणि निधी जमवण्यासाठी एक विस्तृत दौरा मी काढला. भंडारा, बालाघाट, जबलपूर, रायपूर, विलासपूर आणि उत्तर हिंदुस्थानात सागर व दमोह वगैरे ठिकाणी माझी आणि रा. कदम यांची व्याख्याने झाली. सुमारे ४००० रु. ची मदत मिळाली. दमोहहून कदमांना नागपूरकडे परत पाठविले आणि मी पुढे एकटाच भोपाळ, देवास, इंदूर आणि धार या संस्थानिकांच्या भेटी घेऊन आणि सहानुभूती घेऊन मुंबईला परत आलो. नागपूर येथे पुन्हा जाऊन एंप्रेस मिलचे मॅनेजर सर बेझनजी यांची गाठ घेऊन त्यांच्या मालकीची पाचपावली येथील चाळीपैकी एक चाळ मिशनकडे घेतली. सर मोरोपंत जोशी, ना. मुधोळकर वकील, वामनराव कोल्हटकर, डॉ. ल. वि. परांजपे, नामदार नियोगी वगैरेची एक कमिटी नेमण्यात आली. पुढे लवकरच प्लेगची साथ उद्‌भवून कामात मोठाच अडथळा आला. रा. कदमांकडून हे काम निभवेना म्हणून स्थानिक कमिटीच्या तक्रारीवरून त्यांना कमी करून त्यांच्या जागी रा. सय्यद अबदुल कादर यांची हुबळीहून सहकुटुंब रवानगी करण्यात आली. त्यांनी पाचपावली येथे वर सांगितलेल्या चाळीत एक वसतिगृह म्हणून तेच आपले राहण्याचे ठिकाण मुक्रर केले आणि तेथून अमरावती, अकोला, यवतमाळ वगैरेंकडील संस्थांची देखरेख आपल्याकडे घेतली.

हुबळी शाखा : रा. सय्यद यांची रवानगी हुबळी येथून नागपूरला करण्यात आल्याने त्या शाखेची जबाबदारी घेण्याला कोण तरी तज्ज्ञ अधिकाऱ्याची नेमणूक करणे भाग पडले. रा. दामोदर नारायण पटवर्धन ह्यांची तयारी पुणे येथील कामात पूर्ण झाल्याचे दिसून आले. हुबळी येथील

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, समग्र वाङ्मय, खंड २ रा ~~~

४

राजकारणाची सुरुवात

१९१४ सालच्या महायुद्धामुळे सरकारचे, शेटसावकराचे, पुढाऱ्यांचे आणि जनतेचेही लक्ष देशाबाहेरच्या गोष्टींकडे लागले. सरकारची सहानुभूती पददलित म्हणून अस्पृश्यवर्गाकडे होती, ती आता आणखी एका कारणामुळे अस्पृश्यांकडे विशेष लागली. अस्पृश्य लोकांनी, विशेषत: महार व चांभार जातींनी ब्रिटिश लष्करात फार चांगली कामे केलेली आहेत. दक्षिण देशातील पारिया वगैरे पलटणींनी लॉर्ड क्लाइव्हच्या कालापासून लष्करी कामगिरीत प्रसिद्धी मिळवलेली आहे; पण पुढे बराच काळ शांतीत गेल्यामुळे या गरीब लोकांना लष्करात मिळालेले स्थान टिकून राहिले नाही. हा इतिहास स्वतंत्रपणे अभ्यासण्यासारखा आहे. २० व्या शतकाच्या आरंभापासून विशेषत: महार जातीय पुढाऱ्यांनी ह्या बाबतीत उचल खाल्ली होती. शांतीच्या काळात कमी केलेल्या पलटणी पुन्हा सुरू कराव्यात अशा प्रकारचे अर्ज गव्हर्नर, व्हाइसरॉय, स्टेट सेक्रेटरी यांच्याकडे वेळोवेळी करून पाहिले होते. पुण्याचे शिवराम जानबा कांबळे, पनवेलचे सुभेदार मेजर वलंगकर वगैरेंनी ह्या बाबतीत पुढाकार घेतला होता. अर्थात या युद्धाच्या वेळी सरकारला रिक्रूटांची आवश्यकता लागली. तेव्हा मराठ्यांबरोबर महारांचाही जयजयकाराचा ध्वनी उमटू लागला. मुंबई व पुणे येथील टाऊन हॉलमध्ये चालू युद्धाकडे अस्पृश्यांचे लक्ष वेधण्याकरिता मोठमोठ्या जाहीर सभा होऊ लागल्या. मिशनचे काम ह्या वर्गाची सर्व बाजूंनी उन्नती व्हावी--मग ती शैक्षणिक असो, सामाजिक असो किंवा राजकीय असो; सरकारसंबंधी असो किवा सनातनी धर्माधिकाऱ्यांसंबंधी असो--चोहीकडून सतत चालवणे हे होते. म्हणून ह्या युद्धामुळे ह्या वर्गाच्या राजकारणी महत्त्वाकांक्षेला नवीन अंकुर फुटू लागले. ते वाढीस लावणे मिशनला क्रमप्राप्तच होते.

लखनौ पॅक्ट : महायुद्धाला जसजसा रंग चढू लागल तसतसा भारतीय वरिष्ठ वर्गाच्या पुढाऱ्यांच्या महत्त्वाकांक्षेला नवीन वळण लागू लागले. १९१६ साली लखनौला काँग्रेस भरली त्या वेळी हिंदुस्थानातील जे निरनिराळे पक्ष होते त्यांच्यात दृढ ऐक्य व्हावे अशी गरज भासू लागली. युद्धाचे शेवटी विलायत सरकारपुढे हिंदुस्थानसाठी अधिक हक्क मागण्याचे कामी, ह्या मागण्या एकमुखाने व्हाव्यात म्हणून, हे ऐक्य आवश्यक होते. हिंदुस्थानातील मुख्य पक्ष म्हणजे हिंदू आणि मुसलमान. ह्यांना एकमेकांजवळ ओढण्याचा प्रयत्न काँग्रेसला करावयाचा होता. म्हणून लखनौच्या अधिवेशनात हिंदू-मुसलमानांचा लखनौ पॅक्ट (गट्टी) हा इतिहासप्रसिद्ध बनाव तयार झाला. पुण्याचे लोकमान्य टिळकांची या वेळी मोठी चलती होती. त्यांनी ह्या गट्टीत पुढाकार घेतला होता ; पण ही गट्टी नुसती हिंदू-मुसलमानांपुरतीच होऊन कार्य भागणारे नव्हते. हिंदूमध्ये जे अनेक पंथ व जाती आहेत त्यांच्यातही ऐक्य व्हावयाला पाहिजे होते. पण ज्या वर्गात राजकारणाबद्दल जागृतीच नाही

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, समग्र वाङ्मय, खंड २ रा ~~~

सुधारणेसंबंधाने दोन ठराव आहेत. राजकीय बाबतीत तुमच्यामध्ये जागृती होत आहे ही समाधानाची गोष्ट आहे. राजकीय सुधारणा व्हावी ही हिंदी लोकांची मागणी कित्येक वर्षांची आहे. कोणत्या सुधारणा करावयाच्या ते ठरविण्याकरिता स्टेट सेक्रेटरी मि. मॉंटेग्यू व व्हाइसरॉय लॉर्ड चेम्सफर्ड हे निरनिराळ्या प्रांतात फिरून चौकशी करणार आहेत. राजकीय बाबतीत सुधारणा झालीच पाहिजे; परंतु ती सुधारणा सर्वांनाच फायदेशीर झाली पाहिजे. सर्व जातीच्या व धर्मांच्या लोकांना-स्पृश्य व अस्पृश्य लोकांना--फायदा झालाच पाहिजे. अस्पृश्यवर्गातील लोकांची संख्या या देशातील एकंदर लोकसंख्येच्या एकपंचामांशाइतकी आहे. ह्या लोकांनाही या सुधारणा फायदेशीर झाल्या पाहिजेत. तेव्हा त्यांनी आपले म्हणणे सरकारास कळविले पाहिजे. या वेळी ते उदासीन राहिले तर त्यांचे नुकसान होईल. अस्पृश्यांचा उदयकाल नजीक आला आहे. मात्र त्यांनी ह्या काळाचा फायदा घेण्यासाठी दक्षता ठेवली पाहिजे."

ना. म. जोशी : ह्यानंतर अध्यक्षांच्या आज्ञेवरून रा. ना. म. जोशी यांनी भाषण केले. "ह्यापूर्वी शिक्षणप्रसार, अस्पृश्यत्वाचा निषेध, मद्यपाननिषेध वगैरे विषयासंबंधी अस्पृश्य लोकांतील पुष्कळ सभा आजपर्यंत भरल्या आहेत. परंतु आमची सभा ह्या सभांहून भिन्न आहे. राजकीय बाबतीत अस्पृश्यातही जागृती होत असल्याचे त्यांच्यामध्ये स्वहक्काबद्दल जाणीव होत असल्याचे, ही सभा दर्शवते. त्याबद्दल मी त्यांचे अभिनंदन करतो. ह्या देशातील अधिकारीवर्गाने पुष्कळ चांगल्या गोष्टी केल्या आहेत, पण तो परकीय असल्याने आणि त्यांच्यावर लोकताचा दाब नसल्याने एकंदरीत राज्यपद्धती सदोषच आहे. जोड्यातला काटा पायाला कोठे टोचतो हे तो जोडा वापरणारासच समजते. त्याप्रमाणे लोकांची सुखदु:खे लोकांच्या प्रतिनिधींना जितकी समजतील तितकी अधिकारीवर्गाला कळणे अशक्य आहे. हिंदी लोकांना महत्त्वाचे राजकीय हक्क मिळाले तर अस्पृश्यवर्गाची सुधारणा बंद होईल अशी कित्येकांना भीती वाटते. परंतु तशी भीती वाटण्याचे कारण नाही. आपल्याच देशातील लोकांचे मन वळविणे कठीण जाईल की परकीयांचे ह्याचा विचार करा. अस्पृश्यांचे स्वतंत्र प्रतिनिधी कायदे कौन्सिलात बसू नयेत, असे म्हणणारे काही लोक आहेत."

दुही : ही सभा उधळून लावण्याकरिता रा. नारायणराव पवार आणि इतर काही मंडळी सभेत चळवळ करीत होती. त्यांना तेथे यश आले नाही; तरी अखेरीस राष्ट्रीय मराठा पक्ष व सत्यशोधक मराठा पक्ष असे दोन तट मराठा समाजामध्ये पडले. पहिल्या पक्षाच्या दोन परिषदा बेळगाव व वर्धा येथे पुढील दोन वर्षात झाल्या. दुसऱ्या पक्षाच्या मुंबई व पुणे येथे झाल्या; पण मराठा राष्ट्रीय संघाला अनुसरून त्या पक्षातील काहीना सामाजिक सुधारणा मान्य होईना आणि सत्यशोधक समाजाला सामाजिक सुधारणा पूर्ण मान्य होती तरी राष्ट्रीय सभेची चळवळ मान्य होईना. हळूहळू ब्राह्मणेतर पक्षाची स्वतंत्र घटना होऊ लागली. शनिवारवाड्यापुढील जाहीर सभेत महारांच्या वतीने कोणी वक्ता नव्हता हे ध्यानात घेण्यासारखे आहे. चांभार, मांग वगैरेंच्या बहुसंख्य लोकांना राष्ट्रीय सभेचे अनुयायित्व पटत असे, पण महार बहुश: राष्ट्रीय सभेपासून फटकून राहत. ब्राह्मणेतर पक्षातही ते मिसळत नसत. त्यांचा स्वतंत्र तृतीय पंथ निघाला.

झाला हा प्रकार ठीक झाला नाही असे टाइम्स ऑफ इंडियासारख्या पत्रालाही वाटले. इकडे हा असा प्रकार झाला तर तिकडे अकोल्यास महारांच्या परिषदेत निराश्रित साह्यकारी मंडळींचे आभार मानण्याचा ठराव पसार होऊन या संस्थेचे राजकीय धोरण आपल्याला पसंत नाही असा अव्यापारेषु व्यापार करणारा ठराव पास झाला आहे! ही मंडळी लोकहिताचे काम करण्यासाठी स्थापन झालेली आहे व हिच्यातील सर्व माणसांचे राजकीय बाबतीत मतैक्य नाही ह्या एका गोष्टीवरून संस्थेचे असे राजकीय धोरण असणे शक्य नाही हे कोणासही सहज कळण्यासारखे आहे. असे असता आपली प्रतिष्ठा वाढविण्यासाठी ही कुचेष्टा करण्याची बुद्धी आमच्या महारबंधूंना झाली ह्याबद्दल आम्हाला फार वाईट वाटते. निराश्रित सहकारी मंडळी ही सरकारमध्ये नोंदलेली संस्था आहे हे पूर्णपणे माहीत असून तीतील काही मंडळींचे विचार संबंध संस्थेवर लादून संस्थेला राजकीय करण्याचा प्रयत्न करणे हे सरळ वृत्तीच्या माणसाला शोभण्यासारखे नाही."

●●●

५

अस्पृश्यतानिवारक संघ

हिंदुस्थानातील सर्व लोकांमध्ये राजकारणाची जागृती होऊ लागली. अशा वेळी ह्या मिशनला कोणत्याही राजकीय पक्षाशी तादात्म्य न पावता केवळ तिऱ्हाईत दृष्टीने मागासलेल्या लोकांच्या हितसंबंधाचा पुरस्कार करणे भाग पडले. हे राजकारणाचे काम मिशनच्या शैक्षणिक कामापासून निराळे ठेवून स्वतंत्र रीतीने चालविणे इष्ट होते. त्यासाठी एक निराळीच सहकारी संस्था काढणे जरूर पडले. म्हणून त्यासाठी पुणे येथे अखिल भारतीय अस्पृश्यतानिवारक संघ (All India Untouchability League) ही संस्था स्थापण्यात आली. तिच्या- द्वारे अस्पृश्यांसंबंधी वेळोवेळी जे राजकीय प्रश्न निघत, त्यांचा विचार आणि पुरस्कार करणे बरे पडेल म्हणून हा स्वतंत्र संघ काढला.

मिसेस् बेझंट : या वेळी डी. सी. मिशनकडे कित्येक राष्ट्रीय पक्षाच्या प्रमुख पुढाऱ्यांचे लक्ष वेधले होते आणि ते मिशनची वर्गणी देऊन कळकळीचे सभासदही झाले होते. याचे कारण मुंबई आणि पुणे या ठिकाणी राष्ट्रकार्यवाहकाचे ऐक्य व्हावे आणि बहुजनसमाज आणि अस्पृश्यांनी ह्या ऐक्यात भाग घ्यावा म्हणून वरील संघाने केलेले प्रयत्न होत. ह्या सुसंधीचा फायदा घेऊन सर्व पक्षांची आणि विशेषत: अस्पृश्य वर्गाच्या पुढाऱ्यांची एक अखिल भारतीय परिषद मुंबईला घडवून आणण्याचा मी प्रयत्न करू लागलो. १९१७ सालच्या अखेरीस कलकत्ता येथे जे काँग्रेसचे अधिवेशन भरले त्याचे अध्यक्षस्थान मिसेस् बेझंट ह्या बाईंनी स्वीकारले होते. ह्या थोर बाईंनी डी. सी. मिशनची मुंबईतील परळ येथील शाखा व वसतिगृहाचे काम स्वत: डोळ्यांनी पाहिले होते. म्हणून काँग्रेसमध्ये अस्पृश्यतानिवारणाचा एक ठराव आणव म्हणून मी त्यांना निकराची विनंती केली होती ह्यापूर्वी मी सतत १० वर्षे अशा प्रकारची विनंती काँग्रेसला केली असताही तिची दाद लागली नव्हती. थिऑसॉफिस्टांनी मद्रासकडे अस्पृश्यांसाठी पुष्कळ काम केले होते. ह्या बाईंच्या वजनामुळे माझ्या विनंतीस मान देऊन हा ठराव काँग्रसने प्रथमच पास केला.

काँग्रेसचा ठराव : ही राष्ट्रीय सभा हिंदुस्थानातील सर्व लोकांस अशी जाहीर विनंती करते की, अस्पृश्यवर्गावर आजपर्यंत जो अनन्वित जुलूम होत आहे तो ताबडतोब बंद करण्यात यावा. हा ठराव मद्रासचे जी. ए. नटेशम् यांनी मांडला. कलकत्त्याचे एस्. आर. बमनजी यांनी त्यास अनुमोदन दिले. पुण्याचे रा. एस्. के. दामले आणि कालिकतचे मि. मंजेरी रामय्या यांनी पुष्टी दिली. हा ठराव सर्वानुमते पास झाला. ह्यानंतर मोठमोठ्या राष्ट्रीय मंडळींनी मिशनच्या कामात सक्रीय भाग घेण्यास सुरुवात केली.

अस्पृश्यतानिवारक परिषद : ता. २३ मार्च, १९१८ रोजी श्रीमंत सयाजीरावमहाराज यांच्या अध्यक्षत्वाखाली अखिल भारतीय अस्पृश्यतानिवारक परिषदेला सुरुवात झाली. चौपाटीजवळील फ्रेंच ब्रिजनजिकच्या पटांगणात भव्य मंडप घालण्यात आला होता. हिंदुस्थानातील प्रमुख पुढाऱ्यांना आमंत्रणे दिली गेली होती. स्वागत मंडळाचे अध्यक्ष सर नारायणराव चंदावरकर आणि सभासद ना. सी. व्ही. मेहता, ना. व्ही. जे. पटेल, ना. बेळवी, बाबू बिपिनचंद्र पाल, एस्. आर. बमनजी, जमनादास द्वारकादास, पी. के. तेलंग, आर. जी. प्रधान, लक्ष्मीदास तेरसी, बॅ. जयकर, भुलाभाई देसाई, डॉ. साठ्ये, वेलकर वगैरे बडी बडी मंडळी प्रामुख्याने झळकत होती. सभेचे काम ता. २३, २४, २५ असे तीन दिवस झाले.

पहिल्या दिवशी सुमारे ५००० तर तिसरे दिवशी ७००० चे वर इतकी चिक्कार गर्दी जमली होती. त्यात अर्ध्याहून जास्त अस्पृश्य स्त्री-पुरुष यांची भरती होती. स्वागताध्यक्ष सर नारायणराव यांनी फार कळकळीचे भाषण केले. ते म्हणाले,--"इतिहास आपणास सांगतो की, ज्यापासून राष्ट्राचा विकास होतो अशा सर्व प्रकारच्या जागतिक चळवळींचा उगम थोड्याश्या व्यक्तींच्या कार्यातच आढळतो. प्रस्तुतच्या बाबतीत त्या व्यक्ती म्हणजे ज्यांची प्रथम प्रथम अत्यंत हेटाळणी झाली ते डी. सी. मि. चे कार्यकर्ते होत. त्यांच्या कार्याने प्रचंड हिंदुसमाजाची सदसद्विवेकबुद्धी जागृत झाली." भाषण संपविताना सर नारायणरावांनी निरनिराळ्या संस्थानिकांचा--विशेषत: गायकवाडसरकारांचा-आपापल्या संस्थानात अस्पृश्योद्धारार्थ केलेल्या कार्याबद्दल आभारपूर्वक उल्लेख केला. नंतर श्रीमंत सर सयाजीराव महाराजांनी अध्यक्षस्थान स्वीकारले. त्यानंतर जनरल सेक्रेटरींनी सर्व हिंदुस्थानातून अभिनंदनाच्या ज्या तारा आल्या त्या वाचून दाखविल्या. महात्मा गांधी, डॉ. रवीन्द्रनाथ टागोर, करवीर मठाधिपती शंकराचार्य वगैरेंच्या तारा प्रमुख होत्या. द्वारकापीठाच्या शंकराचार्यांकडून एक विलक्षण तार आली होती. त्यात "सर सयाजीरावमहाराज, रा. वि. रा. शिंदे हे आधुनिक काळातील महान् कलिपुरुष आहेत" म्हणून त्यांचा तीव्र निषेध केला होता. ह्यानंतर श्रीमंत सर सयाजीरावमहाराजांचे विचारपरिप्लुत असे भाषण झाले.

प्रमुख ठराव : सभेचा पहिला मुख्य ठराव बॅ. जयकर यांनी मांडला :--"निकृष्ट वर्गावर लादलेली अस्पृश्यता यापुढे ताबडतोब काढून टाकण्यात यावी आणि या कार्यासाठी प्रत्येक प्रांतातील वजनदार व विचारी कार्यकर्त्या पुढाऱ्यांनी एक अस्पृश्यतानिवारक जाहीरनामा काढून निकृष्ट वर्गास शाळा, दवाखाने, न्यायकचेऱ्या, सार्वजनिक खर्चाने चालविलेल्या सर्व सार्वजनिक संस्थांत तसे विहिरी, तळी, म्युनिसिपालिटीचे नळ अशा सार्वजनिक पानवट्यास व्यवहाराची व करमणूकीची ठिकाणे व देवालयासारख्या सार्वजनिक ठिकाणी कोणत्याही प्रकारे प्रतिबंध न राहता पूर्ण मोकळीक करून द्यावी असे ह्या परिषदेचे मत आहे." अशा प्रकारच्या जाहिरनाम्याचा मसुदा करून त्यावर राष्ट्रातील पुढाऱ्यांच्या सह्या घेण्याचा अधिकार मिशनच्या जनरल सेक्रेटरीस देण्यात आला. मसुद्याच्या शेवटी वरील ठरावात सांगितल्याप्रमाणे अस्पृश्यता निवारणाचे कामी जाहीरनाम्याचे खाली सही करणाऱ्यांनी व्यक्तिश: जबाबदारी घेण्याचे कलम मुख्य व महत्त्वाचे होते. हेच कलम ह्या परिषदेच्या कार्याचे मुख्य लक्षण होते. ह्या ठरावास मुंबई आर्य समाजाचे प्रचारक पं. बाळकृष्ण शर्मा ह्यांनी अनुमोदन दिले. हा ठराव श्रीमंत सर सयाजीरावांनी सभेपुढे मांडल्यावर तो सर्वानुमते पसार झाला.

लोणावळे येथील परिषद : १९१७ साली कलकत्त्याच्या काँग्रेसच्या अधिवेशनाच्या ठरावानंतर त्या शहरी पुढे ज्या प्रांतिक व जिल्हानिहाय राजकीय परिषदा भरू लागल्या त्यातून कलकत्त्यातील ठरावाचा व मुंबईस भरलेल्या अखिल भारतीय अस्पृश्यतानिवारक परिषदेत लो. टिळकांनी मांडलेल्या ठरावाचा अनुवाद होऊ लागला. पुढे लवकरच लोणावळे येथे जिल्हा राजकीय परिषद भरली होती. आमंत्रणावरून मीही तेथे हजर होतो. सभेतील स्वराज्याचा मुख्य ठराव मी स्वत:पुढे मांडावा अशी परिषदेची इच्छा दिसली. मी स्पष्ट सांगितले की, "अस्पृश्यतानिवारणाचा ठराव या परिषदेने एकमताने पास करून घ्यावा म्हणजे मीही स्वराज्याचा ठराव आनंदाने पुढे मांडीन." माझे मित्र प्रसिद्ध मद्यपाननिषेधक रा. शंकरराव लवाटे यांनी माझ्या म्हणण्यास विरोध केला. त्या वेळी 'केसरी' पक्षातील सगळे तरुण पुढारी माझ्या बाजूला आले व म्हणू लागले, "रा. लवाटे ह्यांच्याशिवाय बहुतेक मंडळी माझ्या मताला अनुकूल दिसतात, म्हणून मी स्वराज्याचा ठराव मांडावा." मी नम्रपणे सांगितले, "अस्पृश्यतानिवारणाचा ठराव एकमताने पास होण्यातच विशेष आहे. असा महत्त्वाचा ठराव काँग्रेसच्या मुख्य अधिवेशनात एकमताने पास झाला असताना जिल्हा परिषदेत तो नुसत्या बहुमताने पास होणे म्हणजे राष्ट्राने माघार घेण्यासारखे आहे. शिवाय त्यात राष्ट्रीय सभेची शिस्तही मोडते." अशी भवति न भवति चालून हा प्रश्न सभेपुढे दुपारच्या अधिवेशनात यावा असे ठरले. काही केल्या तडजोड होईना. लो. टिळक सभेच्या बाहेर काही कामात गुंतले होते. त्यांच्याकडे रा. लवाटे यांना नेण्यात आले. टिळकांनी पोक्त विचार करून अखेरचा सल्ला दिला की, "धर्माची सबब काढून अस्पृश्यतानिवारण्याचे कामी कचराई करण्याचा काळ गेला आहे. रा. शिंदे यांना अनुकूल करून घेऊन स्वराज्याचा ठराव एकमताने पास करून घ्यावयाचा असेल तर त्यांचा अस्पृश्यतानिवारणाचा ठरावही एकमतानेच पास झाला पाहिजे. हे जर रा. लवाटे यांना पटत नसेल तर त्यांनी अस्पृश्यतानिवारणाचे ठरावावर मते घेताना मंडप सोडून जावे हे इष्ट. या सभेला यश यावे." त्याप्रमाणे लवाट्यांनी मान्य केल्यावर वरील दोन्ही ठराव सभेत एकमताने पास झाले.

नागपूरचे शिष्टमंडळ : मागे सांगितल्याप्रमाणे मिशनच्या कामाला हिंदुस्थानातील निरनिराळ्या पक्षांचे पुढारी आणि अखेर राष्ट्रीय सभा यांचे सहकार्य मिळाले. सरकारची सहानुभूती आणि मिशनशी सहकार्य ही या पूर्वीच मिळालेली होती. यासंबंधी मुंबई सरकारने सर्वात आघाडी मारली हे वर आलेच आहे. याचे कारण मिशनचा आरंभ मुंबईलाच झाला व तेथून प्रांतोप्रांती वाढ सुरू झाली. नागपूरची शाखा संघटित रूपाने स्थापित झाल्यावर १९१६-१७ च्या साली त्या वेळचे नागपूरचे चीफ कमिशनर सर रॉबर्टसन (प्रांताधिपती) यांच्याकडे एक शिष्टमंडळ नेण्यात आले. त्याचे मुख्य सर मोरोपंत जोशी हे होते. ह्या प्रांतात अस्पृश्य मुलांची संख्या जरी बरीच शिकत होती तरी मुंबईतील मुलांप्रमाणे त्यांना स्वतंत्र शाळा नव्हती. अनुभव घेऊन पाहण्याकरिता काही नमुनेदार शाळा सरकारने चालवाव्यात अशी शिष्टमंडळाने मागणी केली. ह्या मिशनच्या शाळा व वसतिगृहे नागपूर, अकोला व यवतमाळ वगैरे ठिकाणी होती. त्यांना सरकारने खास सवलती आणि पुरेशी मदत द्यावी अशी दुसरी मागणी होती. महारांच्या वतनाची जी जुनी संस्था होती ती आता निरुपयोगी ठरत असल्याने व ती चालू असेतोपर्यंत अस्पृश्यतानिवारणास प्रतिबंध होत आहे असा अनुभव आल्याने ही वतनसंस्था बंद करून रोख नेमणुका द्याव्यात अशी तिसरी मागणी होती. ह्या वतनासंबंधी वऱ्हाड व नागपूर प्रांतात मोठी चळवळ चालू होती.

६

हिंदुस्थान सरकारास सूचना

१९१६ सालापर्यंत हिंदुस्थानातील निरनिराळ्या प्रांतिक सरकारांकडूनच नव्हे तर प्रत्यक्ष हिंदुस्थान सरकारकडूनही आमच्या मिशनला मान्यता मिळाली. ह्याचे एक उदाहरण म्हणून ता. १२ मे, १९१६ तारखेचा एक खलिता हिंदुस्थानच्या चीफ सेक्रेटरीकडून मुंबई इलाख्याच्या चीफ सेक्रेटरीमार्फत आमच्या मिशनकडे आला. ता. १६ मार्च, १९१६ रोजी मध्यवर्ती कायदेमंडळापुढे नागपूरचे नामदार मि. दादाभाई यांनी अस्पृश्यवर्गाच्या सुधारणेकरिता एक ठराव आणला होता. त्याअन्वये हिंदुस्थान सरकारने निरनिराळ्या प्रांताच्या सरकारांनी आजपर्यंत अस्पृश्यवर्गाच्या बाबतीत काय काय केले आहे व पुढे काय काय करणार आहेत याविषयी तपशीलवार माहिती मागितली आणि ह्या बाबतीत आमच्या मिशनची मते काय आहेत आणि सरकारने पुढे काय काय करावे ह्या विषयी मिशनची सूचना पाठवण्याविषयी लिहिले होते. मिशनचे सविस्तर अहवालही मागविले होते.

ता. ३० ऑक्टो. १९१६ रोजी मुंबई सरकारच्या सेक्रेटरीमार्फत हिंदुस्थान सरकारला उत्तरी कळवले. अस्पृश्यवर्ग, गुन्हेगार जाती आणि जंगली जाती हा प्रस्तुत चौकशीचा विषय होता. पैकी अस्पृश्यवर्गाचेच हे मिशन काम करीत आहे. ह्या जातीला सक्तीच्या मोफत शिक्षणाची तर जरूर आहेच; पण ते यशस्वी होण्याला पुरेसे आकर्षणही झाले पाहिजे. ह्या बाबतीत सरकारने आमच्या मिशनसारख्या खासगी संस्थांची मदत घ्यावयाला पाहिजे. वाङमयीन शिक्षणाला औद्योगिक शिक्षणाची जोड आवश्यक आहे; पण ह्या जातीला हजार वर्षे केवळ शारीरिक कष्टाची गुलामगिरी करण्याचे अंगवळण पडल्याने औद्योगिक बाबतीत वरिष्ठ दर्जाचे प्राविण्य मिळविण्यात त्यांना उत्साह नाही. सामाजिक बंधनाने त्यांना मोकळीक नाही. त्यानी उत्पन्न केलेल्या मालाला उठाव मिळत नाही. हा प्रश्न त्यांचा जन्मस्वभाव बदलण्याचा आहे. ही क्रांती घडवून काम चुटकीसरीशी, किंबहुना एकदोन पिढ्यात घडवून आणण्यासारखे नाही. नैतिक शिक्षण याहूनही कठीण आहे; आणि ते झाल्याशिवाय शिक्षणाचे काम पुरे होणार नाही. स्वाभिमान, आत्मसंयमन, आत्मविश्वास ही तत्त्वे ह्यांच्या अंगी बाणल्याशिवाय ह्यांच्या उद्धाराविषयी बोलणे व्यर्थ आहे. गेल्या १० वर्षात मिशन हे पायाशुद्ध काम करीत आले आहे. खास वसतिगृहाची योजना ठिकठिकाणी हे मिशन करीत आहे. साधे पण उदात्त घरगुती वातावरण ह्या वर्गातील होतकरू तरुणास मिशन पुरवीत आहे. ह्या बाबतीत मिशनला अकल्पनीय अडचणी येत आहेत. मिशन मुलांबरोबर मुलींचीही सोय करीत आहे. मॅट्रिक्युलेशनपर्यंत शिक्षण देऊन निरनिराळ्या कॉलेजात जाणारी मुलेही या वसतिगृहात आहेत. औद्योगिक शिक्षण केवळ शाळांतूनच देऊन चालणार नाही. मुले मोठी झाल्यावर त्यांना निरनिराळ्या कारखान्यातून जडजोखमीची कामे हाताळण्याची सवय व्हावी, म्हणून त्यांना मोठमोठ्या कारखान्यांतून उमेदवार

७

बंगलोर शाखा

मागासलेल्या लोकांत, विशेषत: अस्पृश्यवर्गात त्यांच्या राजकीय हितसंबंधाची जागृती व्हावी म्हणून अस्पृश्यतानिवारक संघ ही स्वतंत्र सहकारी संस्था पुण्यात १९१७ सालच्या अखेरीस स्थापण्यात आली. या संस्थेची जरूरी विशेषत: मद्रास प्रांती फार भासली. पूर्व किनाऱ्यावरील मद्रास शहरी आणि पश्चिम किनाऱ्यावर मंगळूर व मलबारात मिशनच्या शिक्षणविषयक संस्था याच्या अगोदरच कित्येक वर्षे स्थापण्यात येऊन त्यांचे काम बरे चालले होते. या दोन किनाऱ्यांवरील परस्परांची माहिती होऊन त्यांचा संबंध मिशनच्या मातृसंस्थेशी निकट यावा म्हणून मधोमध बंगलोर येथे आमच्या मिशनची एक नवीन प्रांतिक अंगभूत शाखा स्थापावी, असे विचार माझ्या मनात १९१८ सालापासून घोळू लागले. त्या सुमारास माझे मित्र आणि प्रा. समाजाचे एक जुने सभासद रा. काशीनाथ नारायण देवल यांच्या परिश्रमाने तेथील अस्पृश्यवर्गासाठी बंगलोर लष्करात, टॅनरी रोडवर एक दिवसाची शाळा स्थापण्यात आली होती. ती मातृसंस्थेस जोडून घ्यावी अशी रा. देवलांनी मागणी केली होती. म्हणून मी रा. कृष्णाजी गोविंदराव पाताडे यांस बरोबर घेऊन बंगलोरला ऑगस्ट १९१९ मध्ये गेलो.

कृ. गो. पाताडे : रा. कृष्णाजी गो. पाताडे ह्या तरुण गृहस्थाची गाठ १९१७ मध्ये मुंबईस प्रथम पडली. हे राष्ट्रीय वृत्तीचे उत्साही तरुण होते. ता. ८ नोव्हेंबर, १९१७ रोजी शनिवारवाड्यापुढे भरलेल्या सभेत ह्यांनी भाग घेतला होता. त्यानंतर त्यांचा पुणे शाखेत प्रवेश झाला. वर्षदीड वर्षातच त्यांच्यामध्ये मिशनची स्वतंत्र शाखा चालविण्याइतपत तयारी झाली. लहानपणी गिरणीत काम करून रात्रीच्या शाळेत इंग्रजी सातव्या इयत्तेपर्यंत त्यांनी अभ्यास केला होता. गृहस्थ फार हिंमतीचे असत.

तामिळ प्रांतातील दौरा : ह्या कामी १९१५ साली मिशनचे अध्यक्ष सर नारायणराव चंदावरकर यांनी जो दौरा काढला होता त्याचा उत्कृष्ट परिणाम ह्या प्रांतात झालेला आढळून आला. आम्ही प्रथम बंगलोरहून सेलम ह्या जिल्ह्याच्या गावी गेलो. तेथे सुप्रसिद्ध राजगोपालाचारी ह्यांचा पुढाकार होता. त्यांचे मित्र प्रो. यज्ञनारायण ह्यांच्या घरी उतरलो. हे मद्रासच्या पाछाप्पा कॉलेजचे प्रोफेसर होते. राजगोपालाचारी ह्यांनी एका सार्वजनिक क्लबात आम्हाला मोठी चहापार्टी देऊन व्याख्यान करविले आणि पुढे अस्पृश्योद्धारासाठी त्यांनी एक स्वतंत्र आश्रम स्थापून प्रत्यक्ष कार्य केले. ह्या ठिकाणी आम्हास अशी बातमी लागली की, तंजावर त्रिचनापल्लीकडे अस्पृश्य व जमीनदारवर्ग ह्यामध्ये मोठा चुरशीचा लढा चालू आहे. आम्ही तो पाहून घ्यावा. मद्रासला गेल्यावर तेथे चालू असलेले आमच्या शाखेचे काम तपासले. बंगलोरास असताना सर व्ही. पी. माधवराव

म्हणतात तेच खरे. त्यांनी दंग्याच्या जागी जाण्याच्या निर्धारापासून आमचे मन पूर्णपणे वळविले. आम्हालाही काही निकडीच्या कामासाठी बंगलोरकडे व मुंबईकडे जाणे भाग होते. नाइलाजाने आम्ही हुल्लडखोरीचा मार्ग सोडला.

ख्रिस्त्यांचा कावा : या सफरीत आणखी एक मोठा मजेदार अनुभव आम्हास आला. रोमन कॅथॉलिक व प्रॉटेस्टंट पंथाच्या ख्रिस्ती लोकांनी अस्पृश्यवर्गाच्या असंख्य प्राण्यांना आपल्या जाळ्यात कोंडून ठेवलेले आम्ही प्रत्यक्ष पाहिले. ह्या गरिबांचे धर्मांतर करून त्यांचा भौतिक, मानसिक व आध्यात्मिक असा कोणताच फायदा झालेला दिसला नाही. उलट त्या फायद्याच्या मार्गात मूर्तिपूजक ख्रिस्ती धर्माच्या नावाने सतिपूजा, रथोत्सव, यात्रा, जातिभेद याचे भयंकर तट उभारलेले आम्ही पाहिले, त्रिचनापल्ली या शहराच्या आसमतात ज्या पारिया लोकांच्या कंगाल वस्त्या पाहिल्या त्यात झोपड्यातून क्षुद्र ख्रिस्ती देवस्थाने आम्ही डोळ्यांनी पाहिली. खेड्यांतील म्हसोबा, रवळनाथ, सटवाई, जाखाई-जोखाई अशा क्षुद्र हिंदू-दैवतांप्रमाणेच मेरी, जोसेफ, ख्रिस्त व त्याचे बारा शिष्य यांच्या नावाने शेकडो दगड ठेवून त्यांना शेंदूर माखलेला आम्हीं पाहिला ख्रिस्ती सणासुदीला हिंदूप्रमाणेच रथोत्सवही करीत असतात. प्रत्येक देवस्थानापुढे लाकडी रथ दिसले. या गरीब लोकापेक्षा प्रत्यक्ष ख्रिस्ती धर्माची व स्वत: ख्रिस्तीची अशी हालअपेष्टा पाहून आम्हाला कीव आली. अशा उपायाने अस्पृश्यांनी ख्रिस्ती अनुयायांचा भरणा केलेला आम्ही पाहिला. इतर प्रांतातील समजूतदार ख्रिस्ती मिशन-यांना ह्या प्रकाराची गंधवार्ता तरी आहे की नाही, असल्यास ते मूग गिळून स्वस्थ कसे बसतात याचा उलगडा आम्हास काही केल्या होईना. हिंदू धर्माप्रमाणेच ख्रिस्ती झालेल्यात कडक जातिभेद आहेत. ब्राह्मण, मुदलियार, पिल्ले, रड्डी, शेट्टी वगैरे हिंदू जाती ख्रिस्ती धर्मानुयायांमध्ये अबाधित कशा राहतील ह्याचीच रोमन कॅथालिक पाद्र्यांना मोठी काळजी पडलेली असते. लहानमोठ्या ख्रिस्ती उपासनालयातून ह्या निरनिराळ्या जातींची बाके व दर्जे ठरवलेले असतात. अस्पृश्य ख्रिस्तांना तर या सर्वच मंदिरातून शिरकाव नसतो. त्यांनी बाहेरूनच रस्त्यांतून अगर अंगणातून गुडघे टेकून प्रार्थना करावी आणि मोक्ष मिळवावा. मात्र हिंदू धर्मांत त्यांनी पुन्हा जाऊ नये. ख्रिस्ती अनुयायांत त्या प्रांती स्वतंत्रतेची मोठी चळवळ चालली होती. ती दाबून टाकण्यासाठी रोमहून एक मोठे धर्माधिकारी पोपसाहेब आले होते. ही शिस्तीची परंपरा सर्वांनी मानावी असा अखेरचा फतवा मागे ठेवून हे आलेले बडे अधिकारी परत गेले असे माझ्या ऐकण्यात आले.

रेडा आणि माणूस : एके दिवशी तिसरे प्रहरी त्रिचनापल्लीच्या मोठ्या रस्त्यातून जात असता म्युनिसिपालिटीचा कचऱ्याने भरलेला एक मोठा गाडा मोठ्या कष्टाने रखडत चाललेला आढळला. त्याला एका बाजूला एक रेडा व दुसऱ्या बाजूला एक माणूस जुंपलेला आढळला. हा काय चमत्कार म्हणून जवळ जाऊन शोध करता माणसाने उत्तर दिले की, "मी जातीने पारिया पण धर्माने रोमन कॅथालिक आहे." जात व धर्म कोणताही असो, माणसाने रेड्याची मजल गाठली हे पाहून आम्ही थक्क झालो! रेड्यांचा तुटवडा पडतो म्हणून माणसांना असली कामे करावी लागतात. धर्मांतर केलेल्या पारियांची ही भौतिक उन्नती! असे आम्ही अनुभवलेले अनेक प्रकार एका फूलस्केप कागदावर छापून त्यांच्या अनेक प्रती आम्ही चोहोकडे वाटल्या; पण त्याला उत्तर

८

इमारतीची योजना

याच सुमारास युरोपातील महायुद्ध नुकतेच संपले होते. सर्व जगाला हायसे वाटले. ह्याच वेळी आमच्या मिशनच्या विस्ताराचे कामही तूर्त पूर्ण झाले होते. सबंध दक्षिण हिंदुस्थान व उत्तरेकडे काठेवाडपर्यंत पश्चिम हिंदुस्थानाइतक्या प्रदेशात मिशनच्या मध्यवर्ती मातृसंस्थेच्या नजरेखाली घटनेची तयारी पूर्ण झाली होती. पूर्वेकडील बंगाल्यात ब्राह्म समाजाच्या सत्तेखाली आणि मध्यसंयुक्त प्रांती व पश्चिमेकडे आर्यसमाजाच्या नजरेखाली या वर्गाच्या कल्याणासाठी ठिकठिकाणी कामे चालू होती. १९०८ साली मी कलकत्त्याला गेलो असता साधारण ब्राह्म समाजाचे पुढारी पं. शिवनाथशास्त्री यांनी साधारण ब्राह्म समाजाच्या मुख्य मंदिरात अस्पृश्यतेच्या प्रश्नावर माझे एक खास व्याख्यान करविले. त्यात मी बंगाल्यात ब्राह्म समाजाने हे काम सुरू करावे अशी निकराची सूचना केली. तिचा स्वीकार करून १९०९ साली बंगाल डिप्रेस्ड क्लासेस मिशनची संस्थापना वरील शास्त्रीमहाशयांनी केली. ह्यापुढे मोर्ले-मिंटो सुधारणेचे प्रस्थान हिंदुस्थानात सुरू झाले. त्या धुमश्चक्रीत हिंदुस्थानातील लहानमोठ्या सर्व जातीतून राजकारणाचा धुमाकूळ माजला. त्याचा शेक ह्या मिशनलाही बसला. पुणे येथील अहल्याश्रमाच्या इमारतीच्या कामातून ह्या राजकारणी वादाचा आरंभ कसा झाला ते सांगण्याचे क्लेशकारण काम माझ्या भागास कसे आले ते आता सांगतो.

मद्रासहून पुण्यास परत आल्यावर महायुद्धामुळे तहकूब झालेले इमारतीचे दगदगीचे काम मी पुन्हा हाती घेतले. या इमारतीचा नकाशा मुंबईतील पाटकर, शहा आणि कंपनीकडून आणि खर्चाचे अंदाजपत्रक अमृतलाल व्ही. ठक्कर या मित्राकडून मोफत करून घेण्यात आले. एकंदर खर्चाचा अंदाज एक लाख रुपयावर गेला. खालील ६ इमारतीचे नकाशे तयार झाले.

गट १ ला : (१) सुपरिंटेडिंग मिशनरीची राहण्याची जागा, (२) विद्यार्थी वसतिगृहे, (३) स्नानगृहे वगैरे.

गट २ रा : (१) मध्यवर्ती इंग्रजी मराठी शाळा, (२) उद्योगशाळा, (३) स्नानगृहे वगैरे.

एवढ्या इमारतीसाठी वर सांगितलेल्या ४० हजार रुपयांचे जे आश्वासन मिळाले होते ते अगदी अपुरे होते. म्हणून विद्याखात्याला अधिक मागणीचा दुसरा अर्ज पुन्हा करण्यात आला. त्यावेळी लॉर्ड विलिंग्डन गव्हर्नर होते. त्यांच्याच सहानुभुतीमुळे विद्याखात्याने आणखी ६५,००० रु. ची ग्रँट, वरील २०,००० रु. शिवाय मंजूर केली. परंतु नुकतेच महायुद्ध झाले असल्यामुळे सरकारला चोहोकडेच काटकसरीची कातर लावावी लागलो. त्यामुळे रोख मदत मिळण्याला अडचण येऊन इमारतीचे काम कांही दिवस तहकूब ठेवावे लागले. मध्यतरी नवीनच एक आपत्ती आली. होळकर सरकारने दिलेली २०,००० रु.ची मदत सरकारी प्रॉमिसरीच्या नोटात गुंतून पडली

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, समग्र वाङ्मय, खंड २ रा ~~~

९

निवडणूक

१९२० साली माँटेग्यू-चेम्स्फर्ड सुधारणांची धामधूम उठली. वरील सुधारणान्वये नोव्हेंबर, महिन्यांत पाहिली निवडणूक होणार होती. मराठ्यांमध्ये जे दोन भिन्न पक्ष पडले होते त्या दोहोची एक संयुक्त सभा जेथे मॅन्शनमध्ये झाली. त्या सभेचे मला बोलावणे आले. पुढील निवडणुकीत मी उभे राहावे असे दोघांचे मत पडले. मराठ्यासाठी सात राखीव जागा सरकारने ठेवल्या होत्या. "त्या राखीव जागेसाठी मी उभा राहणार नाही. त्यातील जातीयवाचक तत्त्वाच्या मी विरूद्ध आहे." असे मी बजावले. पुणे शहरच्या उघड्या जागेसाठी सर्व पक्षांनी मिळून मदत केल्यास मी उभा राहण्याचे कबूल केले. माझे म्हणणे कळवण्यासाठी 'बहुजनपक्ष' या नावाने मी माझा सविस्तर जाहीरनामा प्रसिद्ध केला. त्यातील पुढील उताऱ्यावरून माझे मत समजेल-हिंदुस्थानांतील एकंदर **बहुजनपक्ष** लोकसंख्येचे केवळ राजकीय दृष्ट्या दोन मुख्य भाग पडत आहेत. ते हे की (१) विद्याबल, द्रव्यबल किंवा अधिकारबलाने पुढारलेला वर्ग. (२) आणि दुसरा यातील कोणतेच बल अंगी नसल्याने व नाइलाजाने मागासलेला वर्ग किंवा बहुजनसमाज. ह्या दुसऱ्या वर्गातच अत्यंत तिरस्कृत अशा अस्पृश्यवर्गाचा अंतर्भाव होतो. हल्लीच्या राजकीय सुधारणेचा नुसता अरुणोदय होतो न होतो तोच ह्या दोन भागात मोठा विरोध भासू लागला आणि या विरोधानुसार बहुजनसमाजाचा अथवा मागासलेल्या वर्गाचा एक नवीन पक्षच होऊन चुकला आहे. ह्यालाच ब्राह्मणेतरपक्ष असे नाव दिले जाते. पण नाइलाज आणि बलहीनता ही जी मागासलेल्या वर्गाची मुख्य लक्षणे ती ह्या वर्गाच्या पक्षास 'ब्राह्मणेतरपक्ष' असे जातिविशिष्ट नाव दिल्याने अगदी काटेकोर रीतीने सार्थ होत नाहीत. म्हणूनच ह्या नवीन पक्षास बहुजनपक्ष अथवा जनपदपक्ष असे अगदी सार्थ व निर्विकल्प नाव दिल्याने त्यावर कसलाही आक्षेप आणण्यास जागा उरणार नाही.

कार्यपद्धती : हा नवीन पक्ष जरी इतरांशी स्वतंत्रपणाने वागणारा आहे तरी जेथे जेथे त्याचा हितसंबंधाचा प्रश्न उभा राहील, तेथे तेथे त्याचा समानतेचा दर्जा संभाळून जी कोणी व्यक्ति असो अथवा पक्ष असो त्याला सक्रीय साहाय्य करण्यास तयार असेल त्याच्यासाठी तेवढ्यापुरते सहकार्य करावयाला हा पक्षही तयार राहील. कारण ह्या पक्षाच्या पायाखाली केवळ पोकळ भावना नसून भरीव हितसंबंध आहेत, ह्या पक्षात खालील वर्ग मोडतात.

१ ला, शेतकरीवर्ग : ह्यात डोईजड जमीनदारांचा किंवा पिढीजात जहागीरदारांचा समावेश मुळींच होत नाही. जो आपल्या मालकीचे अथवा कौलाचे शेत आपणच वाहतो आणि त्या कामासाठी पुरेशा मजुरदारांना समान दर्जाने योग्य वेतन देऊन संभाळतो तोच शेतकरी जाणावा.

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, समग्र वाङ्मय, खंड २ रा ~~~

ता. क. आम्ही कोणातच मिळू इच्छित नाही. सत्य असेल तेथे मिसळल्याशिवाय राहणार नाही. हेच ना आम्ही मुलांनी ध्येय ठेवायचे ? लोभ करावा ही विनंती.

(सही) शाहू छत्रपती
स्टेशन बंगला, ता. ३०/८/१९२० इसवी

आपण आम्हा सर्वांचे विनंतीस मान देऊन इलेक्शनला उभे राहण्याचे कबूल केले याबद्दल आम्हास आपले उपकार वाटत आहेत. आपल्यासारखे मोठे योग्य पुरुष मराठा समाजाला काय तर कोणत्याही समाजाला लाभले तर फारच उत्तम आहे. इलेक्शनच्या कामी माझ्या हातून जी सेवा होईल ती मी मोठ्या आनंदाने करीन.

(सही) शाहू छत्रपती

भवानी पेठेतील मारामारी : शाहू छत्रपती पुण्यात आले. शिवाजी मराठा शाळेने त्यांचे अध्यक्षतेखाली भवानी पेठेत एक मोठी जाहीर सभा बोलविली. त्यात सर्व पक्षांनी व इतरही मराठे मंडळी हजर होती. छत्रपतींनी मराठा क्षात्रजगद्गुरू नेमण्याचा विचार चालविला होता. मीही काही बोलावे असा आग्रह केल्यावरून मी उठून सांगितले, "धार्मिक बाबतीत काही वाद निघाल्यास त्यात अखेरचे मत अभिषिक्त राजाने द्यावे अशी परंपरा पहिल्या शाहूमहाराजांपासून आहे, असे इतिहास सांगतो. आता छत्रपती शाहू महाराजानी दुसऱ्या कोणास जगद्गुरु न नेमता त्याचे सर्व अधिकार आपणच चालवावेत." यानंतर माझ्या मागून रा. भास्करराव जाधव यांचे भाषण झाले. त्यावर बराच वाद माजून सभेत गोंधळ उडाला. चांगली मारामारी झाली. सभा उधळली, शेवटी या सभेचा परिणाम माझ्या निवडणुकीवर झाला. कारण ज्या सर्व पक्षाच्या मराठ्यांनी मिळून मला उभे केले होते, त्यांच्यात भयंकर फूट पडली.

याच सुमारास अखिल राष्ट्रात महात्मा गांधीच्या कौन्सिलप्रवेशावर बहिष्काराची चळवळ मोठ्या जोरात चालली. म्हणून रा. नरसोपंत केळकर यांनी आपली उमेदवारी मागे घेतली आणि अखेरीस मलाही या निवडणुकीत अपयश आले. तथापि माझे मित्र खासेराव जाधव ह्यांनी घरोघर हिंडून मते मिळवण्यासाठी जी अंगमेहनत केली आणि हजारो रुपयांची झीज सोसली त्याबद्दल त्यांचे उपकार मी कधी विसरणार नाही. 'विजयी मराठा' कार श्रीपतराव शिंदे, रा. रा. गंगारामबुवा काळभोर, रा. जेधेबंधु आणि लष्करातील माझे पारशी मित्र डॉ. मोदी यांनी जी निष्काम मदत केली त्या सर्वांचा मी ऋणी आहे.

●●●

१०

दुष्काळ व इतर कामे

दुष्काळाची आपत्ती : निवडणुकीची दंगल संपते न संपते तोच दुसरी एक मोठी आपत्तीही येऊन पडली. पुणे येथील डी.सी. मिशन शाखेचे सेक्रेटरी श्री. कृ. गो. पाताडे यांनी १९२१-२३ सालचा जो अहवाल प्रसिद्धिला आहे, त्यात पान ४१ वर खालील मजूर आहे :--

"१९२० साली नगर व पुणे जिल्ह्यातील काही तालुक्यांतील दुष्काळामुळे कसेही करून प्राण वाचवावे ह्या हेतूने अस्पृश्यवर्गाची-मुख्यत: मातंग (मांग) जातीची सुमारे १००० मंडळी त्या सालच्या हिवाळ्यात आमच्या मिशनच्या मैदानात येऊन दाखल झाली. सदर मंडळीजवळ कपडालत्ता, खावयास अन्न किंवा राहण्यास जागा यांचा अभाव असून, कडक हिवाळ्यामुळे ते आजारी पडू लागले व काही मृत्यूही पावले. ही गोष्ट रा. वि. रा.शिंदे ह्यांच्या नजरेस येतोच त्यांनी व रा.जी.जी. ठकार यांनी या सर्व कुटुंबाची पाहणी करून प्रथमत: मिशनतर्फे अल्प मदत देण्यात सुरुवात केली.

पण तेवढ्याने भागणार नाही असे दिसताच पुणे शहर म्युनिसिपालिटीच्या दिवाणखान्यात एक जाहीर सभा श्री. एल्. जी. आपटे (म्युनिसिपालिटीचे अध्यक्ष) यांचे अध्यक्षतेखाली भरून त्यांचेच अध्यक्षतेखाली दुष्काळ-आपत्तिनिवारक कमिटी स्थापन करून तिच्या स्वयंसेवकांतर्फे धान्य, कपडे, पैसे जमवण्यास जोरात सुरुवात झाली. मदत जमविण्याचे निरनिराळे सहा सेंटर्स ठरविले होते. दुष्काळग्रस्तास राहण्यासाठी एक विस्तृत मांडव आणि कच्च्या भिंतीची एक चाळ बांधण्यात आली. धट्ट्याकट्ट्या माणसांसाठी सदर मांडवात दिवसा तागाच्या आणि वाखाच्या दोऱ्या वळण्याचा कारखाना सुरु करण्यात आला. मुले आणि वृद्ध माणसे ह्याना ज्वारी, बाजरी व तांदूळ फुकट देऊन अगदी अनाथांना तर स्वयंपाकही तयार करून वाटण्यात येत असे, औषधपाणी व कपडे मिळतील तसे दर दिवशी क्रमाने वाटण्यात आले. असि, कलेक्टर, श्री. जी. टी. गॅरेट. I.C.S. व मध्यभाग कमिशनर मि. प्रॅटसाहेब ह्यांनी दुष्काळग्रस्तांची कमिटीच्या विनंतीवरून समक्ष पाहणी करून मिशन पसंत करील त्या गरीब लोकांना आठवड्यातून दोन वेळा तांदूळ, बाजरी, ज्वारी फुकट वाटण्याचे (डोल) काम सुरू केले. गॅरेटसाहेबांच्या आज्ञेने शहरमामलेदार मि. देशपांडे हे स्वत: डोल वाटीत त्या वेळी मिशनचे अधिकारी समक्ष हजर राहून शिफारस करीत.

असोसिएटेड प्रेस व बॉम्बे क्रॉनिकलच्या बातमीदारांनी व मुंबईचे शेठ एल्. आर. तेरसी ह्यांनी वेळोवेळी सर्व प्रकार समक्ष येऊन पाहून कमिटीला फार उत्कृष्ट मदत केली.

तारीख १५/३/१९२१ रोजी कमिटीतर्फे मदत वांटण्याचे काम बंद करून त्याच दिवशी डॉ. एच. मॅन ह्यांच्या अध्यक्षत्वाखाली जाहीर सभा करून कमिटीचा अहवाल वाचण्यात आला

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, समग्र वाङ्मय, खंड २ रा ~~~

प्रतापराव यांना मध्ये पडावे लागले. अखेरीस ही सभा काही काम न होता बरखास्त करावी लागली. पुढे टिळकांच्या गायकवाडवाड्यात सभा करण्याचा प्रयत्न झाला. पण तेथील सभाही तरुण मराठ्यांनी उधळली.

"ही शिक्षणाची चळवळ पुढे दौरा काढून सर्व दक्षिण महाराष्ट्रात विठ्ठलरावांनी सुरू केली. या चळवळीत प्रि. केशवराव कानिटकर यांची आणि हुबळी येथील मिशनच्या शाखेचे सेक्रेटरी रा. दा. ना. पटवर्धन यांची चांगलीच मदत झाली. ह्याच वेळी रा. विठ्ठलरावांनी लो. मा. टिळकांच्या उलट "ज्ञानप्रकाशात" जोराची लेखमाला लिहिली ती पाहण्यासारखी आहे. पुण्याच्या सभेच्या वेळी या चळवळीत कर्मवीर विठ्ठलरावांना पुण्यातील तरुण मराठा वर्गाचे चांगले साहाय्य झाले. आज पुढारी म्हणून प्रसिद्ध झालेले रा. केशवराव जेधे, रामराव बर्गे वगैरे मंडळी या तरुण वर्गातीलच होती.

"या सक्तीच्या शिक्षणाच्या चळवळीचा परिणाम पुढे होऊन विठ्ठलराव यांचे दुसरे एक स्नेही रँ. र. पु. परांजपे यांनी कौन्सिलात येऊन शिक्षणमंत्री होताच त्यांनी सक्तीच्या शिक्षणाचा कायदा केला. ह्या कायद्याच्या आधारे काही म्युनिसिपालिटीनी आपल्या हद्दीत सक्तीचे शिक्षण सुरू केले आहे. तथापि अजूनही हा प्रश्न भिजत पडलेला आहे. बहुजनसमाजावर सक्तीच्या शिक्षणाच्या कायद्याची अमलबजावणी सरकारच्या दिरंगाईमुळे झालेली नाही."

मद्यपानबंदी : कर्मवीर विठ्ठलरावांनी मद्यपानबंदीच्या चळवळीतही बराच भाग घेतला होता. आरंभी लवाटे, टिळक इत्यादिकांचे बरोबर व नंतर म. गांधीच्या असहकारितेच्या काळातही व्याख्याने देऊन व पिकेटिंग करून विठ्ठलरावांनी भाग घेतला. डॉ. एच. मॅनसाहेब यांचेही त्यांना बरेच साहाय्य होते. ह्यासंबंधी विठ्ठलरावानी पुणे वसंत व्याख्यानमालेत मुद्देसूद आकडेनिशी दिलेली व्याख्याने प्रसिद्धच आहेत."

मुरळी : महाराष्ट्रात विशेषत: दक्षिण महाराष्ट्रात खालच्या जातीतून मुरळी, सोडण्याची चाल आहे. ही चाल पुरातन आहे. यासंबंधाने एक सविस्तर संशोधनात्मक लिहिलेला निबंध रा. बी. बी. केसकरकृत रा. रा. वि. रा. शिंदे यांचे लेख, व्याख्याने, कीर्तन या पुस्तकात प्रसिद्ध झाला आहे. मुंबईसह निराश्रित बालसंरक्षक मंडळी (सोसायटी फॉर दि प्रोटेक्शन ऑफ चिल्ड्रेन) नावाची संस्था १९०८-९ च्या सुमारास स्वतंत्रपणे काम करीत होती. लॉर्ड विशेष ऑफ बाँबे या संस्थेचे अध्यक्ष होते. रा. बंडोपंत भाजेकर, मि. मिर्झा, एका ख्रिश्चन मिशन शाळेचे हेडमास्तर मि. विल्सन आणि मी स्वत: असे चौघे सेक्रेटरी होते. अडचणीत सापडलेल्या मुलामुलींना शोधून काढण्यासाठी रहिमतुल्ला खान यान नावाच्या गृहस्थांना वेतन देऊन वरील मंडळीनी आपले एजंट नेमले होते. ह्या मंडळीचे काम मुंबईत बरेच दिवस चांगले होते. अशा पतित स्त्रियांना चांगल्या देखरेखीखाली ठेवून त्यांची उन्नती करण्यासाठी सांताक्रूझ येथे प्रसिद्ध दयाराम गिडूमल यांच्या आश्रयाखाली एक आश्रमही चालला होता. या आश्रमाची देखरेख व भगिनी जनाबाई शिंदे यांनी काही दिवस चालविली होती. या अनाथ बालसंरक्षक मंडळीची शाखा पुणे येथे डॉ. एच. मॅन यांच्या नेतृत्वाखाली बरीच वर्षे चालली होती."

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, समग्र वाङ्मय, खंड २ रा ~~~

११

दुसऱ्या गटाची तयारी

१९२१ साल सुरू झाले. दुष्काळाच्या आपत्तीत सापडलेल्या हजारो माणसांचे प्राण वाचले आणि भोकरवाडीतील भव्य पटांगण दुसऱ्या इतारतीचा पाय खणण्यासाठी मोकळे झाले. पाया खणूनही तयार झाला. होळकर सरकारने २०,००० रु. दिले तेव्हा भावी आश्रमाला "अहल्याश्रम" हे नाव देण्याचे त्यांनी कबूल केले. म्हणून सर तुकोजीराव होळकर यांचेकडे 'पाया घालण्यास या ' असे आमंत्रण करण्यास मी इंदूरास गेलो. पण त्या वेळी श्रीमंत महाराजांवरच आकाश कोसळले होते. त्यांना पदच्युत करण्याची धामधूम चालली होती. माझे काम झाले नाही. मी इंदुराहून मातृसंस्थेच्या एक्झिक्युटिव्ह कमिटीला माझ्या जनरल सेक्रेटरीशिपचा राजीनामा पाठवला. वाटेवरचे युद्ध घरी आले होते, आणि ज्यांच्यासाठी मी जिवाचे आणि घरादाराचे रान केले होते तेच माझ्यावर असंतुष्ट होते. कारण काय, तर आता मोठमाठ्या इमारती होऊ लागल्या, देशभर स्वराज्याची भाषा चालू लागली, मग ह्या मिशनमध्ये अस्पृश्यांना स्वराज्य का मिळू नये ? मातृसंस्थेतील लोक या वादाच्या मुळाशी जाईनात. या लोकांचे व्यर्थ लाड पूरवू नयेत असा वरवरचा उपदेश करून वेळीअवेळी ते मलाच दोष देऊ लागले.

विरोधक चळवळीत पुण्याचे शिवराम जानबा कांबळे यांचा हातखंडा असे. रा. हरिश्चंद्र नारायण नवलकर यांनी शिवराम जानबा कांबळे यांचे चरित्र लिहिले आहे. त्यात पान ४३ वर खालील मजकूर आहे :--

अस्पृश्योद्धारक मंडळी : रा. वि. रा. शिंदे ह्यांच्या नि. सा. मंडळीकडून अस्पृश्यात जितक्या जोराने विद्येचा प्रसार होईल अशी जी त्या समाजाची अपेक्षा होती ती निष्फळ होत चालली. अशा परिस्थितीत रा. किसन मुक्ताजी सोनवणे ह्या तरुण गृहस्थानी शिवराम जानबा कांबळे यांच्या घरी जाऊन त्यांना असे सुचवले की, आपण एक नवीन संस्था स्थापन करू आणि ह्या कामी श्री. वालचंद रामचंद्र कोठारी, बी. ए., संपादक ' जागरूक ' यांचा सल्ला घेऊ. ह्याप्रमाणे हे उभय गृहस्थ रा. कोठारी ह्यांना जाऊन भेटले. त्यांना हा विचार पसंत झाला आणि हे तीन गृहस्थ डॉ. मॅनसाहेबांच्या घरी जाऊन भेटले. डॉ. मॅनसाहेबांनाही हा विचार मान्य झाला आणि चौघांच्या संमतीने तारीख १६/४/१९२१ रोजी वरील संस्था स्थापली. डॉ. मॅनसाहेबांनी रा. कोठारी यांना अस्पृश्योद्धारकमंडळीची रचना कशी करावयाची यासंबंधाने एक मसुदा तयार करण्यास सांगितले. रा. कांबळे यांनी ता. १७/४/१९२१ रोजी डॉ. मॅनसाहेबांना एक पत्र पाठविले. त्यात वरील मंडळीसाठी ३००० रु.ची रक्कम जमवावी आणि तत्प्रीत्यर्थ १०० रु. रा. कांबळे यांनी आपल्यातर्फे आगाऊ दिले. डॉ. मॅननी कांबळे यास आभाराचे पत्र पाठविले."

भोकरवाडीत आमच्या मोठ्या इमारतीचा पाया एका बाजूस पडत होता तर दुसरीकडे मिशनला विरोधी संस्था अस्पृश्यवर्गाच्यातर्फे निघून तिचा पाया येणेप्रमाणे घातला जात होता. काही कारणामुळे डॉ. मॅन हे पुणे शाखेच्या कमिटीवर नव्हते. ही संधी साधून वरील अस्पृश्यमंडळीनी त्यांना आपल्याकडे खेचले. अस्पृश्यांच्या संस्थेने काय काम केले हे कळत नाही पण रा. शिवरामभाऊच्या चरित्राच्या प्रस्तावनेच्या आरंभी त्यांच्याच हस्ताक्षरांतील खालील पत्र प्रसिद्ध झालेले होते.

कामाठीपुरा, ५ वी गल्ली,
पुणे, तारीख २/४/१९२८.

रा. रा. वा. रा. कोठारी यांस :--

सा. न. वि. वि. आपला तारीख २७/३/१९२८ चा जोडकार्ड पोहचला. डिप्रेस्ड क्लासेस कमिटीच्या असलेल्या शिल्लक रक्कमेचा व्यय पुढे कसा करावयाचा असे डॉ. मॅन यांनी आपणांस विलायतेहून विचारले आहे, आणि त्याप्रमाणे आपण ही रक्कम अस्पृश्य विद्यार्थिगृहाला व येथील चांभार विद्यार्थी मंडळाला द्यावी असे आपले मत व्यक्त केले आहे. तरी आपण दोघांनीच या रक्कमेची विल्हेवाट लावणे हे मला बरे दिसत नाही.

आपली संस्था स्थापन होऊन आज सुमारे ७ वर्षे होऊन गेली आहेत. एवढ्या अवधीत जमा खर्चाची हिशोब कमिटीपुढे एकदाही ठेवण्यात आला नाही. तेव्हा आता आपणाला संस्था बंद ठेवायची असेल तर तिच्या सभासदांची मीटींग बोलावून ह्या गोष्टीचा विचार करावा अशी माझी सूचना आहे.

आपला
शिवराम जानबा कांबळे

ह्या सुमारास मिशनच्या वसतिगृहातून बरेच वरिष्ठ दर्जाचे शिक्षण घेतलेले दोन विद्यार्थी, वऱ्हाडातील रा. गणेश अक्काजी गवई व पां. ना. भटकर, अस्पृश्योद्धारार्थ स्वत: झटू लागले. पण अस्पृश्यांच्या उच्च शिक्षणाच्या कामी हयगय करून विद्यार्थिगृहे व उद्योगशाळा काढण्यात मिशन वेळेचा व पैशाचा उगाच व्यय करीत आहे अशा तक्रारी वरील पुढाऱ्यांकडून येऊ लागल्या आणि अशा तक्रारीस मिशनच्या प्रचारकार्यातून रिकामे झालेले रा. जी. के. कदम ह्यांच्याकडून आश्चर्यकारक पाठिंबा मिळू लागला. ता. ३० मे. १९२० च्या सु. पत्रिकेत या प्रकरणी खालील मजकूर आहे.

"रा. पां. ना. भटकर १९१८ सालच्या युनिव्हर्सिटीच्या परीक्षेत नापास झाले, नंतर बोर्डिग सोडून मिशनच्याच प्रयत्नाने नोकरीस लागले. १९१९ मध्ये पुन्हा कॉलेजच्या पहिल्या परीक्षेस बसले व पास झाले. आपल्याला कॉलेजकोर्स पुरा करावयाचा असेल तर मिशन मदत करावयास तयार आहे. मग चार सोडून ८ वर्षे लागली तरी हरकत नाही. फक्त बोर्डिंगात राहून अभ्यास केला पाहिजे. (रा. भटकर यांना रा. शिंदे यांनी स्वत: श्रीमंत सयाजीराव महाराजांकडे नेऊन २५ रु. ची दरमहा स्क्रॉलरशिप देवविली; पण त्याचा काही उपयोग झाला नाही.)

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, समग्र वाङ्मय, खंड २ रा ~~~

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, समग्र वाङ्मय, खंड २ रा ~~~

१२

निवेदन

प्रचारकांच्या बदल्या : १९१९ च्या सुमाराला सय्यद अबदुल कादर यांनी आपले काम सोडले. ते त्यापूर्वीच आपले नागपूर येथील काम सोडून असि. सेक्रेटरीचा चार्ज घेऊन आले होते. १९१८ तील अस्पृश्यतानिवारक परिषेचे काम, मुंबईस त्यांनी फार अंगमेहनतीने केले. बहुतेक मिशनच्या शाखांशी त्यांचा प्रत्यक्ष संबंध आला होता. त्यांच्या कामात त्याच्या पत्नीचे सहकार्य होते. रा. सय्यद यांच्यानंतर लौकरच रा. वामनराव सोहोनी यांनी आपल्या मुंबई शाखेचा चार्ज सोडला. ह्या दोघा आद्यप्रवर्तकांचा संबंध अशा रीतीने सुटल्याने मला फार वाईट वाटले. स्वत: माझ्या मानेवरचेच जू मी केव्हा ठेवावे या विचारात होतो. म्हणून हा सहका-यांचा वियोग मी कसाबसा सहन केला. बंगलोर शाखेतून रा. पाताडे यांनी १९२१ च्या सुमाराला मुंबई शाखेचा कारभार त्यांच्या स्वाधीन केला; पण १/२ महिन्यांतच त्यांना पुण्यास आणण्यात येऊन व त्यांचे जागी हुबळी शाखेचे दा. ना. पटवर्धन यास मुंबईस नेमले. अशा या तात्पुरत्या अदलाबदलीमुळे मिशनच्या कामाची फार आबाळ होऊ लागली.

निवेदन : अशा या कठीण प्रसंगी सर्व मिशनची पुनर्घटना निदान पुणे शाखेची तरी विशेष घटना करणे मला भाग पडले. त्याविषयी अगोदर माझे एक प्रांजल निवेदन वर्तमानपत्रातून जाहीर करणे इष्ट वाटले. त्याप्रमाणे ता. ३ एप्रिल, १९२३ रोजी केसरीत व ता. २९ मार्च, १९२३ रोजी ज्ञानप्रकाशात मी माझे जे निवेदन प्रसिद्ध केले त्यातील काही भाग देत आहे :--

" ही मंडळी स्थापण्याचे श्रेय ब्राह्म धर्माला आहे. प्राथमिक प्रयत्नास पूर्ण पाठिंबा मुं. प्रा. समाजातील प्रमुख सभासदांनी दिला; पण हे मिशन समाजाचे अंग म्हणून न चालवता, स्वतंत्रपणे एक राष्ट्रकार्य म्हणूनच चालवणे मंडळीस श्रेयस्कर वाटले. स्थापनेच्या वेळी वरवर विचार करणा-या लोकांनी अनुकूल-प्रतिकूल भविष्ये वर्तवली अस्पृश्यवर्गात तादात्म्य पाहून त्यांचा उद्धार न होता स्पृश्य कार्यवाहकांचीच अवनीत होण्याचा संभव आहे असे प्रांजलपणाचे उद्‌गार एका सच्छील गृहस्थाने काढले पुढे पुढे तर हा प्रयत्न अस्पृश्यांस वर नेण्यापेक्षा ब्राह्मणादी वरिष्ठ लोकांस खाली ओढण्यासाठीच आहे असे उद्‌गार जाहीर सभांतून स्पष्ट निघू लागले. ह्या मिशनच्या कार्यवाहकांनी अस्पृश्यवस्तीत आपल्या कुटुंबासह त्यांच्या बायकामुलांस समान वृत्तीने मिसळून बिनबोभाट निरपेक्ष रीतीने काम करावे, हे ह्या मंडळाचे आद्य तत्त्व ठरले. ह्या तत्त्वाप्रमाणे ७ बंधू व २ भगिनी यांनी काम केले आहे. त्यांपैकी ५ मराठे, ३ ब्राह्मण व १ मुसलमान प्रार्थनासमाजिष्ट, अशी त्यांनी जातवारी आहे. हे बहुतेक ब्राह्म धर्मानुयायीच असल्यामुळे प्रथम जातिभेद टाकूनच ही मंडळी कार्यास लागली."

"ह्या मिशनचे काम पुढेमागे अस्पृश्यांनी स्वत:आपल्यावर घ्यावे म्हणून प्रत्येक प्रांतिक शाखेच्या मुख्य ठिकाणी अस्पृश्य-विद्यार्थीगृह चालवण्याचा आग्रह आजपर्यंत चालू आहे. त्याशिवाय ह्या

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, समग्र वाङ्मय, खंड २ रा ~~~

१३

पुनर्घटना

ह्यापुढे तीन महिन्यांनी पुणे शाखेचे नवीन नेमलेले जॉइंट सेक्रेटरीज रा. कृ. गो. पाताडे (स्पृश्य), रा. डी. व्ही. गायकवाड व रा. रा. स. घाडगे (अस्पृश्य) यांनी पुणे शाखेचा ता. १ एप्रिल, १९२१ ते ८ जुलै, १९२३ पर्यंतचा सव्वादोन वर्षांचा मराठीत अहवाल प्रसिद्ध केला आहे. त्यात पान ६ वर खालील मजकूर आहे.

" तारीख २९ मार्च, १९२३ रोजी व्ही. आर. शिंदे यांनी आपले एक सविस्तर निवेदन ज्ञानप्रकाश व केसरी इत्यादी पत्रांतून प्रसिद्ध केले. थोडक्यात सांगावयाचे म्हणजे अस्पृश्य बंधूंना ह्या मिशनमध्ये स्वराज्याचे सर्व हक्क देऊन त्यांच्या आत्मोद्धाराची जबाबदारी त्यांच्याच खांद्यावर टाकणे हे या पुनर्घटनेचे मुख्य लक्षण आहे. तारीख २९ मार्च, १९२३ रोजी पुणे शाखेच्या सर्व वर्गणीदारांची साधारण सभा बोलावली. त्या सभेने पूर्वीच्या कमिटीत भर घालून तिजमध्ये अस्पृश्यवर्गाच्या सभासदांचे बहुमत राहील असे केले व तिजला नवीन नियमांची सनद करण्याचा अधिकार दिला. ह्या नव्या सदनेचा खर्डा तारीख १५ एप्रिल, १९२३ रोजी भरलेल्या साधारण सभेत पास केला. अशा रीतीने पुनर्घटनेचे काम चालले असता काही विघ्नसंतोषी मंडळीकडून अडथळे येऊ लागले. इतकेच नव्हे तर काही विद्वान सभासदांनी अस्पृश्यांपैकी काही सभासदांना चिथावून अडवणूकीचाही मार्ग पत्करला. सनदशीर प्रयत्न करण्याचे अंगवळण आमच्या लोकांत अगोदरच कामी, तशात ज्या वर्गासाठी हे मिशन आहे त्याच्यातच दुही माजवून दिल्यावर ह्या कामी अत्यंत हिरमोड करणारे अडथळे येऊ लागले. परंतु श्री. अण्णासाहेब शिंदे ह्यांनी निर्भीडपणे रेखाटलेले धोरण अस्पृश्य वर्गांना इतके प्रिय झाले की, महारमांग, चांभार, भंगी जातीचे पुढारी देखील आपसातील पुष्कळ दिवसांचे बखेडे विसरून आपला फायदा ओळखून झीज सोसून कामे करू लागले. बहुतेक दररोज रात्री कमिटीच्या सभा होऊ लागल्या. विरुद्ध पक्षाची कारवाईही काही वर्तमानपत्रातून चमकू लागली. मिशनमध्ये कधीच लक्ष न घातलेली माणसे आणि काही अस्पृश्यवर्गीय व्यक्तीही ह्या विरोधात दिसू लागल्या. तारीख २९ मार्च, १९२३ च्या सभेला ७७ सभासद नसलेले १२ गृहस्थ हितचिंतक म्हणून हजर हाते. तारीख १५ एप्रिल, १९२३ च्या सभेला (जीत नवीन घटना पास व्हावयाची होती) फक्त सभासदांनाच घेण्याचे ठरल्यामुळे ज्याना हजर राहण्याचा अधिकार नव्हता असे कित्येक लोक सभेच्या वेळेपूर्वीच अहल्याश्रमाच्या आजूबाजूला टेहळू लागले. हे डावपेच कार्यकारी मंडळींना ठाऊक असल्याने २५ स्वयंसेवकांची तुकडी बंदोबस्तासाठी ठेवली होती. नियमांची सनद मंजूर झाल्यावर २२ सभासदांचे नवीन कार्यकारी मंडळ निवडण्यात आले. त्यात अस्पृश्यवर्गाचे दोनतृतीयांश सभासद असून महार, चांभार, मांग, भंगी, मुसलमान या वर्गाचे प्रत्येकी दोन आणि पारशी, मराठा, ब्राह्मण आणि ब्राह्मणेतर या जातींचा प्रत्येकी एक असे जातवारीने कमिटीने १४ सभासद घेण्याचे ठरवले. ८ अधिकाऱ्यांपैकी ६ व तीन ट्रस्टीतील १ अस्पृश्यवर्गातील निवडण्यात आले.

याप्रमाणे पुणे शाखेचे मुख्य अधिकार आणि कार्याची जबाबदारी अस्पृश्य पुढाऱ्यांवर तारीख १५ एप्रिल, १९२३ पासून सोपवण्यात आली. या पुनर्घटनेला अद्यापि काही लोक नाके मुरडीत आहेत. पण अशा अपशकुनांकडे रा. शिंदे यांनी लक्ष दिले असते तर त्यांच्या हातून हे मिशन निघालेच नसते. अस्पृश्यवर्गाचे काही पुढारी ह्या स्वराज्याचे हक्कासाठी फार उतावीळ होऊन आपल्या परिषदांतून इतका वेळ प्रतिकूल टीका करीत असत. परंतु ते आता मिशनचे कृतज्ञ अनुयायी साह्यकारी बनले आहेत, श्री. अ. को. घोगरे, कांबळे, थोरात, घाडगे, उभाळे, सदाफुले, आदिकरून पोक्त्त आणि अनुभवशीर मंडळींनी पुनर्घटनेस मन:पूर्वक मदत केली हे ह्या मिशनला अत्यंत भूषणावह आहे."

अधिकारसंन्यास : येणेप्रमाणे पुनर्घटना होऊन पुणे शाखेच्या सर्व अधिकाऱ्यांची निवडणूक झाल्यानंतर माझे कार्य आटोपले आणि मी मातृसंस्थेतील व इतर शाखांतील सर्व अधिकार खाली ठेवले आणि फक्त्त मिशनचा संस्थापक ट्रस्टी एवढाच माझा अधिकार उरला. माझ्या व माझ्या बहिणीच्या अल्प वेतनाची नेमणूकही मी सोडली आणि आम्ही पुन्हा एकवार उघडे पडलो. पुणे शाखेच्या नव्या अधिकाऱ्यांनी मला एखादे लहानसे पेन्शन द्यावे असा विचार काढला ; पण काही मिशनऱ्यांनी काम सोडले होते आणि त्यांना कोणत्याही प्रकारची पेन्शन मिळाली नव्हती. मग मीच काढलेल्या मिशनमधून आणि मीच मिळवलेल्या पैशामधून मी रिकामपणी पेन्शन घेणे हा विचारही मला दु:सह झाला. काही अंशी शारीरिक विश्रांती आणि मानसिक शांती मिळाली हेच पुरे झाले. झालेली पुनर्घटना मातृसंस्थेला कळवून तिची संमती घेऊन पूर्वीप्रमाणे सहकार्य चालवणे हे या पुणे शाखेचे आणि मातृसंस्थेचे काम होते या बाबतीत यापुढे मला काहीच अधिकार उरला नव्हता; पण खेदाची गोष्ट ही होती की, मातृसंस्थेने पुनर्घटनेस मुळीच संमती दिली नाही. मातृसंस्थेने केलेल्या नियमांतील पुनर्घटनेप्रमाणे पुणे शाखेची ही नवी घटना स्पृश्य आणि अस्पृश्य वर्गाच्या सहकार्याची असूनही मातृसंस्थेची संमती न मिळाल्याने पुणे शाखेच्या नव्या अधिकाऱ्यांना आश्चर्य वाटले. इतकेच नव्हे, तर पुढील सर्व काम वादग्रस्त होऊन परस्परांचा तीव्र निषेध सुरू झाला आणि पुढील दोन तीन वर्षात वर्तमानपत्रांत निष्कारण वाद माजला. पुणे शाखेचे मोठमोठे फंड उदा. मिस् क्लार्क मेमोरियल फंड मातृसंस्थेच्या ट्रस्टीकडे अनामत होता. शिवाय ह्या पूर्वीच्या काळात मातृसंस्थेचा जनरल सेक्रेटरी आणि पुणे शाखेचा स्थानिक सेक्रेटरी हे दोन्ही अधिकार माझ्यामध्येच एकवटलेले असल्यामुळे पुणे शाखेच्या बाहेरच्या कामाचा बराचसा खर्च साहजिकपणे पुणे शाखेच्या खजिन्यांतूनच झाला होता. हा नवीन अकल्पित वाद निघाल्यामुळे मातृसंस्थेकडे एका दृष्टीने कर्जाऊ असलेल्या ह्या रकमांची परतफेड पुणे शाखेला मिळण्यास विरोध होऊ लागला; पण ह्या सर्व वादाचा तपशील येथे देणे केवळ अशक्यच नव्हे तर अनिष्ट आहे, तो सर्व देणे म्हणजे ग्रंथविस्तार अधिक होईल आणि तो कितीही तिऱ्हाईतपणे देऊ गेल्यास दोहो पक्षांसही मान्य होणार नाही. म्हणून या विषयाची अत्यंत कष्टाने रजा घेत आहे.

पुनर्घटना १५ एप्रिल, १९२३ रोजी पूर्ण झाली आणि पुढच्या २३ एप्रिल, १९२३ रोजी माझा ५१ वाढदिवस आाला. पुणे शाखेतील सर्व अधिकारी व शिक्षक वर्ग व विद्यार्थीवर्ग या सर्वांनी मिळून माझा तो वाढदिवस साजरा केला. मला निरोप देताना आनंद व खेद या भावनांनी जमलेल्या सर्व मंडळींनी मला एक मानपत्र दिले. उदास वृत्तीने मी त्यांचा स्वीकारही केला. "जोडोनिया धन उत्तम वेव्हारे । उदास विचारे वेंच करी।।" हा तुकारामांचा अनुभव मला प्रत्यक्ष आला.

१४

ट्रस्टींचा गोंधळ

गुप्त कारस्थान : १२ नोव्हेंबर, १९२२ रोजी मातृसंस्थेच्या साधारण सभेने माझ्या ट्रस्टीशिपविषयी एक भानगड करून ठेवली होती. ती तिने मला कळवली नव्हती. ती अशी होती की, श्रीयुत बॅ. मुकुंदराव जयकर, रा. लक्ष्मणराव नायक आणि मी हे तिघे ट्रस्टी असता आमच्याऐवजी रा. जी. बी. त्रिवेदी मुंबई, जी. जी. ठकार, पुणे आणि रा. लक्ष्मणराव नायक, मुंबई हे नवीन ट्रस्टी नेमण्याचा ठराव केला होता. बॅ. मुकुंदराव जयकर यांनी कदाचित आपल्या ट्रस्टीशिपचा राजीनामा दिला असेल म्हणून त्यांच्या ठिकाणी जी. जी. ठकार यांची नेमणूक झाली असेल; पण मी माझ्या ट्रस्टीशिपचा राजीनामा दिला नसतांही माझ्याऐवजी जी. बी. त्रिवेदी ह्यांना ट्रस्टी का नेमले हे कळले नाही. माझे नाव ट्रस्टीजमधून काढण्याचा जनरल बॉडीचा ठराव मला जवळ जवळ दोन वर्षे कळवण्यातही आला नाही ह्याचे गूढ तर मला मुळीच कळेना. पुढे मातृसंस्थेने माझ्याविरुद्ध हायकोर्टात फिर्याद केली आणि हायकोर्टाने मलाच ट्रस्टी ठेवावे असा अनुकूल निकाल दिला. त्यावर मातृसंस्थेचे जनरल सेक्रेटरी लक्ष्मणराव नायक यांनी ८ जुलै, १९२५ रोजी नं. ८६ चे सविस्तर खुलाशाचे पत्र पाठवले. त्यात असे लिहिले होते की, मी पुणे शाखा हीच सर्व मिशनचे मुख्य ठिकाण करू पहात होतो आणि मुंबई शाखा व बाहेरील सर्व कामे पुण्याहूनच चालवावयाची असा माझा प्रयत्न चालला होता इतकेच नव्हे तर मुंबई इलाख्याच्या विद्याखात्याच्या तत्कालीन पंचम वार्षिक अहवालात असा उल्लेखही होता, असे सांगून रा नायक त्याच पत्रात म्हणतात की, ह्या खोट्या विधानाबद्दल कोण जबाबदार आहे हे कळत नाही.

पण ही सर्व माझ्या उलट चाललेली कारवाई, मातृसंस्थेने १९२२ साली मला ट्रस्टीमधून कमी करण्याचा जो ठराव केला त्याच्यापूर्वी जर मला कळली असती, निदान झाल्यावर तरी लवकर कळवली असती तरी मी सलोख्यासाठी चालवलेले प्रयत्न मातृसंस्थेला कळून तिने माझ्याविरूद्ध हा ठराव केला नसता. १९२४ साली मी मिशन सोडून मंगलोरास ब्राह्म समाजाचे कामासाठी जाऊन राहिल्यावर मला ट्रस्टीमधून काढले आहे याची गुणगुण माझ्या कानावर आली. माझ्या उलट हायकोर्टमध्ये फिर्याद करून माझ्या जागी नवीन निवडलेल्या ट्रस्टीला कायम करून घेण्याबद्दलचा मातृसंस्थेचा प्रयत्न मला कळला. मी लागलीच जी. बी. त्रिवेदी यांस मित्रत्त्वाचे नात्याने तातडीच्या पत्राद्वारे कळवले की, माझ्या उलट केलेल्या फिर्यादीने मिशनला धोका आहे, आणि माझ्यावर तर अन्याय होत आहे. एखाद्या ट्रस्टीला ट्रस्टबोर्डवरून कमी करावयाचे असेल तर ट्रस्ट ॲक्टमध्ये सहा कारणे स्पष्ट सांगितली आहेत, त्यापैकी एकही कारण मजकडून घडले नसताना हा उपद्व्याप का करण्यात येत आहे? दुसरा एक स्पष्ट अन्याय असा होत होता की, हायकोर्टपुढील खटल्याचे स्वरूप एका बाजुला मिशनसारखी सन्मान्य संस्था ही वादी होती आणि दुसऱ्या बाजुला मजसारखी एक गरीब व्यक्ती

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, समग्र वाङ्मय, खंड २ रा ~~~

१५

कार्यवाहकांची निवेदने

माझ्या स्वीकृत पवित्र राष्ट्रकार्याचे श्रेय ज्यांनी ज्यांनी मजबरोबर वाहून घेऊन स्वार्थत्याग केला, ज्यांनी सन्मान्य सेवा केली, ज्यांनी मधून मधून मदत केली, अशांचे थोडेबहुत तरी स्मरण मी येथे केले पाहिजे. काहीजणांनी आपल्या आठवणी स्वतंत्रपणे पाठवल्या आहेत. काहीच्या आठवणी माझे मित्र बी. बी. केसकर ह्यांनी लिहून पाठवल्या आहेत. काहीजण वृद्ध झालेले आहेत, तर काहीजण कालवश झालेले आहेत. त्यांच्याविषयी पुढे दिल्याप्रमाणे हकीकत आहे.

(१) रा. सय्यद अबदुल कादर लिहितात :--

माझा जन्म १० ऑक्टोबर, १८८९ मध्ये जमखंडी येथे झाला. माझे वडील जमखंडीत बुकबाइंडर होते. ते धार्मिक वृत्तीचे असून तेथील एका जमातीचे पुढारी होते. ते आपल्या नोकरीबाहेरचा वेळ धर्मप्रचारार्थ घालवीत. इस्लामी संस्कृतीला अनुसरून आपल्या समाजात सामाजिक सुधारणा करण्याकडे त्यांचे लक्ष असे. मुसलमानात लग्न लावण्याचा हक्क काजींचा व त्याबद्दल त्याला स्थानिक रिवाजाप्रमाणे फी द्यावी लागे. 'शरीयत' प्रमाणे लग्न लावण्याचे काम कोणलाही करता येते व त्याबद्दल फी देण्याची जरुरी नाही अशी चळवळ माझ्या वडिलांनी सुरू केली. हे प्रकरण पुष्कळ ठिकाणी कोर्टात जाऊन त्यात त्यांना यश आले. ह्याच वेळी माझ्या वडिलांची व गुरुवर्य अण्णासाहेब शिंदे यांच्या वडिलांची ओळख झाली. गुरुवर्य अण्णासाहेब त्यावेळी जमखंडी हायस्कूलमध्ये शिकत होते. लग्नाच्या प्रकरणासंबंधी लॉ रिपोर्टरमधून काही उतारे मराठीमधून करून देण्यात गुरूवर्य अण्णासाहेबांची फार मदत होत होती. तेव्हापासून गुरुवर्य अण्णसाहेबांकडे माझे जाणे-येणे सुरू झाले. पुढे गुरुवर्य अण्णासाहेब प्रार्थनासमाजात गेल्यानंतर जमखंडीस जेव्हा-जेव्हा येत तेव्हा-तेव्हा त्यांच्या घरी उपासना होत. त्या मला फार आवडू लागल्या. पुढे अण्णासाहेब विलायतेला गेल्यावर त्यांच्या घरच्या मंडळीशी माझा स्नेह जडला. त्यांच्या मातोश्री फारच प्रेमळ असल्याने त्यांच्याविषयीचे पूज्य प्रेम अद्याप माझ्या मनामध्ये जागृत आहे. १९०३ साली गु. अण्णासाहेब विलायतेहून परत आल्यावर दौऱ्यावर ते जमखंडीस आले. त्या वेळी त्यांच्याबरोबर शिवरामपंत गोखले या नावाचे प्रचारक होते. त्या वेळी गुंडांनी त्यांचा जो छळ केला त्याचा परिणाम माझ्यावर उत्तम व्याख्यानापेक्षांही अधिक झाला. धर्मविषयक उदार विचार मनात येऊ लागले. १९०४ चे सुमारास कलकत्त्याचे पं. शिवनाथशास्त्री मुंबईस आले तेव्हा मी प्रा. समाजाचा सभासद झालो. त्याच वेळी संयुक्त प्रांतात एक मुसलमान गृहस्थ आर्य समाजात गेले, दुसरे एक मुसलमान उत्तर हिंदुस्थानात ख्रिस्ती झाले होते. मी मुंबई येथील अंजुमान इस्लाम हायस्कूलमधून मॅट्रिक झालो होतो. तेथेच मी हंगामी मास्तर होतो. तेथील अधिकाऱ्यांच्या ऐकण्यात वरील दोन मुसलमानांची धर्मांतरे आल्यावरून व मी प्रार्थना समाजिस्ट झाल्याचे नजरेस आल्यावरून वरील

अधिकाऱ्यांनी मला राजीनामा देण्यास सांगितले. ह्या प्रकरणी त्या शाळेतील दोन हिंदू मास्तरास विनाकारण त्रास झाला. मला धमकीही देण्यात आली. १९०७ मध्ये मी पोर्टट्रस्टमध्ये नोकरीला लागलो. १९०६ मध्ये डि. क्ला. मिशनची स्थापना झाली. त्या वेळी मी व माझी बहीण हजराबाई अण्णासाहेबांकडेच राहात होतो. मिशनच्या कामाला माणसे मिळत नव्हती. पोर्टट्रस्टचे काम सोडून मी मिशनच्या कामाला वाहून घेतले. १९०९ मध्ये प्रार्थनासमाज पद्धतीने माझा विवाह समाजमंदिरात झाला. माझी पत्नी सौ. कल्याणीबाई सारस्वत समाजातील होती. ह्या विवाहामुळे दोन्ही समाजात बरीच खळबळ उडाली. माझ्या पत्नीची माझ्या स्वीकृत कार्यी बरीच मोठी मदत झाली. आम्ही १९१२ मध्ये कर्नाटक शाखा उघडण्यास हुबळीस गेलो. तेथे १९१६ पर्यंत काम केले. नंतर नागपुरची शाखा १ वर्ष चालवली. पुढे १९२० पर्यंत गु. अण्णासाहेबांचे हाताखाली असिस्टंट म्हणून काम करीत होतो. ह्या सर्व क्रांतिकारक व आनंदकारक गोष्टींस कारण कोण असा कधी कधी मनात विचार येतो तेव्हा गु. अण्णासाहेबांची मूर्ती डोळ्यांपुढे उभी राहते.

लॅमिंग्टन रोड, मुंबई.
ता. २२/३/४१ } ए. एम्. सय्यद.

(२) रा. वामनराव सदाशिव सोहोनी लिहितात :--

रा. विठ्ठलरावांचा व माझा परिचय ते विलायतेस धर्माचा तुलनात्मक अभ्यास करण्यास जाण्यापूर्वीच्या त्यांच्या मुंबईच्या वास्तव्यात झाला. विलायतेहून परत आल्यावर ते प्रा. समाजाचे काम करणार अशी आमची खात्री असल्यामुळे आम्ही त्यांच्या विलायतेहून परत येण्याची चातकाप्रमाणे वाट पाहात होतो. त्यांनी सुबोध-पत्रिकेसाठी धाडलेली अनेक पत्रे त्यांच्याविषयीचा आदरभाव वृद्धिंगत करण्यास कारणीभूत झाली. प्रा. समाजाचे प्रचारक झाल्यावर त्यांनी समाजातील व समाजाबाहेरील अनेक तरुणांना एकत्रित करून प्रा. समाजाच्या जीवनात नवचैतन्य उत्पन्न केले. त्यांच्यासारख्या कर्तबगार माणसाला गिरगावातील समाजजीवन हे कार्य करण्यास पुरेसे वाटले नाही ह्यात आश्चर्य नाही. विलायतेत असताना त्यांनी समाजसेवेच्या भिन्नभिन्न कार्याचे निरीक्षण केले होते. साहजिकपणेच त्यांचे लक्ष अस्पृश्यांच्या दु:स्थितीकडे वळले.

१९०६ साली होळीच्या दिवशी आम्ही दोघेजण मुंबईच्या परळ भागातील अस्पृश्यांची स्थिती अवलोकन करण्यासाठी गेलो असता आमच्या नजरेस जे करुणामय देखावे पडले त्यांची विस्मृती होणे शक्य नाही. रा. विठ्ठलरावांनी भा. नि. साह्यकारी मंडळी स्थापली. संस्थेतील मुहूर्तमेढ सर नारायण चंदावरकर यांचे हस्ते करण्यात आली. मी त्या वेळेस विल्सन हायस्कूलमध्ये शिक्षक होतो. पण माझे अंत:करण निराश्रित साह्यकारी मंडळीत होते. रा. विठ्ठलरावांच्या आग्रहावरून १९०८ मध्ये मी मंडळीचे मुंबई शाखेचे काम अंगावर घेतले. १९०८ ते १९२१ पर्यंत १३ वर्षे मी मुंबई शाखेचे व काही वर्षे मंडळीच्या असि. सेक्रेटरीचे काम केले. मंडळीचा श्रेष्ठ उद्देश नजरेपुढे ठेवून तपशिलांत कोणालाही ढवळाढवळ करू न देता कार्य करण्याचा माझा प्रयत्न होता. मुंबईच्या कार्याला अनपेक्षित यश आले. रा. विठ्ठलराव येथील काम मजवर सोपवून अस्पृश्यतेच्या कार्याची जागृती करण्यासाठी देशभर दौरे काढीत. ऊन, पाऊस, थंडी, वारा, ह्यांना न जुमानता सापडेल तेथे वस्ती करावी, मिळेल ते जाडेभरडे जेवण जेवावे, तिसऱ्या वर्गातून कधी कधी चौथ्या वर्गातून (काठेवाडात) प्रवास करावा, अशा प्रकारचे

(३) रा. दामोदर नारायण पटवर्धन लिहितात :--१९०९ ते १९१२ पर्यंत बरेच वेळा सहवासाचे प्रसंग आल्यामुळे रा. शिंदे ह्यांच्या कार्यात शिक्षक म्हणून नुसते वरवरचे काम न करता प्रत्यक्ष प्रचारक म्हणून वाहून घ्यावे असा निश्चय होऊ लागला. त्यामुळे हायकोर्ट वकिली किंवा सरकारी ट्रेनिंगकडे न जाता मी बराच वेळ ह्या संस्थेतच घालवू लागलो. १९१२ पासून १९२१ पर्यंत रा. शिंदे ह्यांच्या प्रत्यक्ष देखरेखीखालीच मी काम केले. ह्यामुळे विविध प्रसंगी त्यांचा स्वभावविशेषांचे जे दर्शन झाले त्याचा सारांश खाली देत आहे.

सर्वांशी समानतेची वागणूक : रा. शिंदे मराठा समाजातील प्रख्यात विद्वान असल्यामुळे त्यांच्याकडे श्रीमंत, सरदार, नामांकित विद्वान हे भेटीस येत. त्याचप्रमाणे पत्करलेल्या कामामुळे अस्पृश्यांतील अविद्वान व दरिद्री माणसेसुद्धा येत. अशा वेळी आपणाकडून करता येईल ती त्यांची कामगिरी करून त्यांना संतोषित करून वाटेला लावणे हे मोठे कौशल्याचे काम आहे. पण हे काम रा. शिंदे आपल्या गोड व सुविनीत वाणीने उत्तम प्रकारे पार पाडीत. अशिक्षितांच्या सभा असोत की सुशिक्षितांच्या परिषदा असोत. प्रत्येक प्रसंगी त्या त्या उपस्थित समाजास योग्य असा शब्दसमूह वापरून त्यांची व्याख्याने होत. आलेल्यांचे आदरातिथ्य आपल्या पदरास खार लावून व घरच्या मंडळीस कष्टवूनही ते करीत. आपल्या प्रोफेसर व श्रीमंत मित्रांप्रमाणेच अस्पृश्यांनाही ते वागवीत. यामुळेच श्रीमंत व गरीब यामधील संबंध जुळवणारा हा परोपकारी दुवा माझ्या सारख्यांना फार आवडे. त्यांचा हा वागणुकीचा कित्ता मी आपल्यापुढे ठेवला आहे.

राष्ट्रीय कार्याची तळमळ : रा. शिंदे प्रत्येक पक्षाच्या लहानथोर कार्यकर्त्यास आपला कार्यक्रम नीटपणे समजावून देत व आपल्या कार्यास सर्व पक्षांची जरुरी आहे व हे सर्व पक्षांनी करावयाचे राष्ट्रीय कार्य आहे अशी त्यांची खात्री करून देता. त्यामुळे त्यांचे पक्षातील धोरण संस्थेला फायदेशीरच झाले. आपण पत्करलेले काम सामाजिक व शिक्षणविषयक असले तरी वेळोवेळी होणाऱ्या राजकीय व सामाजिक कामातून इतर पक्षांबरोबर सहकार्य न भिता करीत. कामाची राष्ट्रीयता ओळखण्याची पात्रता व तळमळ ही मी बरेच प्रसंगी अनुभवलेली असल्यामुळे व मला तेच तत्त्व पटल्यामुळे माझी रा. शिंदे याजवरील निष्ठा वाढली. राष्ट्रीय चळवळीत सर्व पंथ, धर्म, वर्ग व पक्ष एकजीव होऊन झटले तरच यश मिळते. पण कधी कधी रा. शिंदे यांच्या या धोरणामुळे आमच्या संस्थेतील अधिकारी म्हणजे कै. डॉ. भांडारकर, न्यायमूर्ती चंदावरकर इत्यादी सभासदांचा रोषही त्यांना सोसावा लागला.

(३) **सहकाऱ्यांशी बंधुत्वाचे वर्तन :** वयाने मी लहान असल्यामुळे माझ्याशी ते धाकट्या भावाप्रमाणे वागत व माझ्या कुटुंबातील मंडळीशीही तसेच वागत. त्यांच्या कुटुंबातील मंडळीशी म्हणजे सौ. वहिनीसाहेब व भगिनी जनाबाई ह्या आम्हाला वहिनी-भगिनीप्रमाणेच वाटत व वाटतात. डी. सी. एम्. सोडताना आमचा मतभेद व वादविवाद चांगलाच झाला, पण त्याचे कार्य झाल्यानंतर आता माझ्या मनात मागील स्नेहाचीच आठवण येते व पुण्यास मी जातो तेव्हा एकदा तरी त्यांचे भेटीस जाऊन येतो. अस्पृश्यतानिवारकांचे रा. शिंदे गुरू असल्यामुळे थोड्याशा मतभेदामुळे त्यांच्या गुणांची योग्यता कमी करणे कधीही अयोग्यच ठरेल.

दा. ना. पटवर्धन

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, समग्र वाङ्मय, खंड २ रा ~~~

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, समग्र वाङ्मय, खंड २ रा ~~~

१६

लोकमताचे हेलकावे

लोकमताचे हेलकावे : आमच्या मिशनचा प्रसार सर्व देशभर झाल्याने मी निरनिराळ्या प्रांतात फिरत असतांना वेळोवेळी अनेक मानपत्रे मिळाली. त्यापैकी काहीचा खाली उल्लेख करीत आहे :--

(१) पालघाट, मलबार.

(२) हुबळी, कर्नाटक.

(३) २३ एप्रिल, १९२३ रोजी पुणे शाखेचे शिक्षक व विद्यार्थी यांजकडून ५१ व्या वाढदिवसानिमित्त.

(४) २३ एप्रिल, १९२३ रोजी पुणे शाखेच्या शिक्षकिणी व विद्यार्थिनी यांजकडून ५१ व्या वाढदिवसानिमित्त.

(५) २३ एप्रिल, १९२३ रोजी पुणे शाखेच्या शिक्षकिणी व विद्यार्थिनी यांजकडून भगिनी जनाबाईस.

(६) २३ एप्रिल, १९२५ रोजी ब्राह्मणेतर पुढाऱ्यांतर्फे.

(७) १९२८ साली दौलतपूर (पूर्व बंगाल) कॉलेज विद्यार्थ्यांतर्फे.

(८) १९३३ डिसेंबर, २३ रोजी चोखा मेळा बोर्डिंग, आर्वी (नागपूर).

(९) १९३३ डिसेंबरमध्ये नागपूर अस्पृश्यवर्गातर्फे गणेश अक्काजी गवईकडून.

(१०) १९३४ जून, १८ रोजी मुंबईतील ४१ संस्थातर्फे.

१९२५ सालातील ब्राह्मणेतर पक्षाच्या मानपत्रास मी खालीप्रमाणे उत्तर दिले.

"मुंबई येथे ४१ संस्थातर्फे १९३४ साली, जो मानपत्रसमारंभ झाला तो सर्वांत मोठा होता. महात्मा गांधी हे या समारंभाचे अध्यक्षस्थान घेणार असे प्रसिद्ध झाल्याने संध्याकाळी परळच्या दामोदरदास ठाकरसी हॉलमध्ये अलोट गर्दी झाली होती, इतकी की काही वेळ ट्रॅमगाड्या बंद ठेवाव्या लागल्या. शेवटी श्री. मथुरादास बसनजी यांच्या अध्यक्षतेखाली समारंभ पार पडला. उत्तर देताना मी म्हटले, "हा मी माझा स्वतःचा सन्मान समजत नाही. हा माझ्या कार्यात साह्यकारी झालेल्या सर्वांना सन्मान आहे. मला हिंदु, मुसलमान, खिश्चन, पारशी, युरोपियन वेगैर सर्वांनी मदत केली आहे. पण ती त्यांनी माझ्यावर मेहेरबानी म्हणून केलेली नसून कर्तव्य म्हणून केलेली आहे. हिंदुस्थानातला अस्पृश्यतेसारखा

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, समग्र वाङ्मय, खंड २ रा ~~~

१७

सुट्या आठवणी

लाला लजपतराय : मिशन नुकतेच सुरू झाले होते. सुरतेच्या काँग्रेसच्या बैठकीस (१९०७ साली) लाला लजपतराय आले होते. आमच्या मिशनच्या निराश्रित सेवासदनात माझे आईबाबा आणि घरची सर्व मंडळी राहून महारामांगाची सेवा करितात ही गोष्ट लालाजींच्या कानावर गेली. म्हणून ते हे सदर पाहण्यास आले. माझी वृद्ध आई सामोरी गेली. लालाजींनी एकदम तिच्या चरणावर मस्तक ठेवून दंडवत प्रणाम केला. आईने त्यांना उचलून उभे केले आणि त्यांच्या कपाळावर हात फिरवून आपल्या शिरावर कडकडून बोटे मोडली. हा कुरवाळण्याचा मराठी प्रकार पाहून लालाजींना अत्यंत आनंद झाला. It is one of the holiest thing that can be done by the religious and charitable societies of this country.

Lala Lajpatrai

सय्यद आणि शिंदे : कर्नाटक शाखेची घटना करीत असताना सय्यद आणि शिंदे या नावांचा मोठा गमतीदार घोटाळा होत असे. एके दिवशी मध्यरात्री बेळगांवच्या स्टेशनवर उतरलो. भूक लागली होती. संबंध बाजारात एकच चहाचे दुकान उघडे होते. सफरीवर असताना आम्हा दोघांची नावे वर्तमानपत्रांतून जाहीर झाली होती. आम्ही चहा घेण्यास दुकानात गेलो असता आम्हास चहा देण्यास दुकानदार मागेपुढे करू लागला. माझी दाढी पाहून मीच सैय्यद असावा, असा त्यास संशय आला. सय्यदला दाढी नव्हती म्हणून त्याच्या हिंदुत्वाविषयी संशय आला नाही. हा घोटाळा ओळखून सय्यद पुढे होऊन चहावाल्यास म्हणाले की, "अहो, दाढी असली म्हणून काय झाले? ते हिंदू आहेत!" पण खुद्द सय्यदविषयी प्रश्नच निघाला नाही. काही आढे-वेढे न घेता आम्हाला चहा मिळाला आणि काम झाले.

पुढे धारवाड व हुबळी येथील कामे आटोपून आम्ही गदग येथे गेलो. तेथील एका श्रीमंत व्यापाऱ्याने गावाबाहेरील आपल्या एका मोठ्या बंगल्यात उतरण्याची आमची सोय केली होती. पण जेवण्याची सोय आम्हासच करावयाची होती. कर्नाटकात लिंगायतांच्या मठात पैसे घेऊन भाकरी देण्याची सोय असते. एक दिवस तशी सोय झाली. पण आम्ही कुणीतरी महारामांगामध्ये काम करणारे विक्षिप्तराव आहोत असे ऐकून दुसरे दिवशी मठाधिकाऱ्यांनी भाकरी देण्याचे नाकारले. आमचा स्वयंपाक आम्हीच करू लागलो. बागेतल्या नळावर बसून मी भांडी घासावीत आणि सय्यदने आत बसून स्वयपाक करावा अशी वाटणी झाली. गावातून लहानमोठे गृहस्थ आम्हास भेटण्यास येत भांडी घाशीत बसलेला मीच सय्यद असे समजून शिंदेसाहेब कोठे आहेत असे मला विचारीत. "दिवाणखान्यात बसा, भेटतील तेथे" म्हणून त्यांना आत पाठवी. आत गेल्यावर सय्यदलाही तोच प्रश्न विचारीत.

गोंडलचे महाराज : राजकोटास असताना मी एकदा गोंडलच्या महाराजांना भेटावयास गेलो. माझ्याबरोबर भगिनी जनाक्काही होत्या. ही गोष्ट सर भगवतसिंगजींना कळवली नव्हती. आम्हांस दुरून येताना पाहून ते चटकन् उठून आत गेले. ते आम्ही पाहिले, पण का ते आम्हास प्रथम कळेना. इतक्यात महाराज आपल्या पत्नीला व कन्येला घेऊन बाहेर आले, त्यांनी मोठ्या अदबीने माझ्या बहिणीशी ओळख करून दिली . मोठ्या लोकांचा हा रुबाब पाहून आम्हास फार संतोष झाला.

धेडोने माटे धेडोने माटे : काठेवाडात फिरत असता एके दिवशी दोन प्रहरी एका स्टेशनावर पुढील दोन अनुभव आला. साधारणपणे आगगाडीत पहिला, दुसरा आणि तिसरा असे वर्ग असत. क्वचित् ठिकाणी फक्त युरोपियनांसाठी म्हणून खास चौथा असामान्य वर्ग असतो. पण काठेवाडात ' धेडोने माटे ' म्हणजे ' अस्पृश्यांसाठी ' म्हणून मला एक पाचवा असामान्य वर्ग सापडला. या वर्गात काही अस्पृश्यांची स्त्री-पुरुषमंडळी गर्दी करून बसली होती. तिसऱ्या वर्गात मी होतो. वेळ भर दोन प्रहरची होती इतक्यात एक पोलीस पार्टी आली. त्यांनी अस्पृश्यवर्गीयांना धक्के मारीत खाली उतरवले व त्या डब्यात ऐसपैस पाय पसरून बसले. धेडांना दुसरीकडे जागा मिळणे अशक्य होते. पोलिसांपुढे त्यांचा उपाय चालेना. मला अत्यंत चीड आली. गार्डाकडे गेलो आणि मी होत असलेला अन्याय ताबडतोब दूर झाला पाहिजे "नाही तर मी येथल्या तेथेच वरिष्ठांस तारा करून योग्य तो उपाय केल्यास तुम्हास जड जाईल" असे सांगितले. गार्डाला मी कोण ते स्टेशनवर कळले. त्याने लगेच पोलिसाला खाली उतरवून अस्पृश्यांची सोय केली. मला थोडे आश्चर्य वाटले. कारण इतर ठिकाणी मलाच मोठी अद्दल घडली होती. या ठिकाणी इतक्या सहजासहजी मला यश आलेले पाहून शोध करू लागलो असता असे कळले की, हा गार्ड पूर्वाश्रमीचा धेड असून हल्ली ख्रिश्चन झाल्याने त्याला गार्डची जागा मिळाली होती. म्हणून त्याने आनंदाने माझ्या तक्रारीचा बदोबस्त केला.

थुंगावची परिषद : वरिष्ठ वर्गाच्या मोठमोठ्या परिषदा आम्ही भरवल्या होत्या; पण अमरावती जिल्ह्यातील थुंगाव येथे रा. गणेश आक्काजी गवई यांनी एक महार परिषद भरवली होती. थुंगाव हा गणेश आक्काजी गवईचा राहण्याचा गाव होता. अकोल्याचे दादासाहेब महाजनी, हरीभाऊ परचुरे व सौ. परचुरे, उमरावतीचे काणे वकील वगैरे बडी बडी १५-२० मंडळी मोठ्या सहानुभूतीने परिषदेस आली होती. मी व भगिनी जनाबाई हजर होतो आम्ही सर्व मंडळी भर दोन प्रहरी थुंगावला पोचलो. अमरावतीहून ब्राह्मण आचारी बरोबर घेतले होते. पण थूंगावला पोचल्यावर तेथील सर्व भ्रष्टाकार पाहून हे सर्व आचारी बुजले आणि पळया खांद्यावर ठेवून ते परत गेले. आम्ही आंघोळीस ओढ्यावर जाऊन पाहतो तो पाणी पाय घालण्याच्यासुद्धा लायकीचे नव्हते. पिण्यास पाणी जेथे मिळेना तेथे खावयास अन्न मिळाले नाही याचे दु:ख काय ! परिषदेच्या पाहुण्यांना डाळकुरमुऱ्यांवर भूक शमवावी लागली. अर्थात परिषद लवकर आटोपली हे निराळे सांगावयास नकोच. यावत् तैलं । तावत् आख्यानम् ।। संध्याकाळच्या आतच मंडळीनी आपापली वाट सुधारली; पण महारवाडा म्हणजे आमचे माहेरघर. गवईच्या घरच्या मंडळीशी आमचा दाट परिचय. महारांचा मोठा भंडारा चालला होता. गावोगावचे महार परिषदेला पुष्कळ जमा झाले होते. गवईच्या घरच्या मंडळीनी पुष्कळ आग्रह करून आम्हास ठेवून घेतले. खेडेगावचा धुरळा, महारवाड्यातला उकिरडा आणि वऱ्हाडातला उन्हाळा. एक का दोन आम्हाला पुष्कळ प्रेक्षणीय स्थळे पाहण्यास मिळाली.

ख्रिश्चन व ज्यू लोकाच्या घरी त्याने मोठा धुमाकूळ माजवला. मी गेलो तरी हुलकावण्या दाखवून पार होई. कंटाळून मी घरी घेऊन बसलो असता आपण होऊनच माझ्या टेबलावर मला सलाम करीत आला. जणू काही झालेला प्रकार त्याला ठाऊकच नाही. शेवटी ही ब्याद दुसऱ्याला देऊन टाकावी लागली.

मुडबीक्षिचा डॉ. ह्यूम : मिशनच्या सुरुवातीला एका ख्रिश्चन इसमास शिक्षकाची नोकरी देण्यात आली होती. तो अमेरिकन मिशनमधून आला होता. लगेच मिशनचे प्रमुख साहेब डॉ. ह्यूम ही तक्रार घेऊन मला भेटण्याला राममोहन आश्रमात (मुंबईस) आले आणि हुज्जत घालू लागले की, आम्ही ख्रिश्चन लोकास फूस लावून आमच्या धर्मात घेतो. मी सांगितले, "साहेब, त्याच्या अर्जावरून त्याला आम्ही फक्त शिक्षकाची नोकरी दिली आहे. त्याचा ख्रिस्ती धर्म अद्यापि कायम आहे. डॉ. ह्यूम साहेब, आजवर हजारो हिंदू लोकास तुम्ही ख्रिस्ती केलेत. आमच्याकडून कोणी तक्रार घेऊन आले काय ? मग आज एकासाठी विनाकारण इतकी तळमळ का? तो येण्यास तयार असल्यास त्याला तुम्ही खुशाल परत घेऊन जा! " डॉक्टरसाहेबाची समजूत पटेना. "ही तुमची सुरुवात आहे. मला वेळीच बंदोबस्त केला पाहिजे, मी अमेरिकन वर्तमानपत्रात तुमच्या उलट लिहून तिकडून तुम्हाला जी मदत मिळत असते ती बंद करवीन. "मला हसू आवरेना" साहेब, एवढे तुम्ही अवश्य करा. माझ्या मिशनची अमेरिकेत फुकट जाहिरात होऊन आजवर नसलेली मदत उलट मिळू लागेल." साहेब निरुत्तर होऊन निघून गेले !

ना. आगाखान : ना. आगाखान हा 'कलंकी अवतार' आहे असे सांगून महारमांगाना मुसलमान करण्याची मागे एकदा हूल उठली होती. भोकरवाडीतील काही मांग कुटुंबानी मुसलमानी धर्म स्वीकारला होता अशी अफवा उठली होती. त्यावेळी पुणे शहरात रा. माटे यांची चळवळ चालू होती. काही जाहीर सभाही धर्मांतर होऊ नये म्हणून झाल्या. पण पैसे घेऊन धर्मांतर केलेले पुन्हा हिंदू धर्मांत येऊन दाखल झाले.

●●●

१८

मंगलोर ब्राह्मसमाज

डॉ. ड्रमंड : मी तारीख ४ फेब्रुवारी, १९२४ ला कलकत्त्याहून पुण्यास आलो. ठरल्याप्रमाणे डॉ. ड्रमंड देखील अहल्याश्रमात माझे पाहुणे म्हणून आले. ते आठ दिवस मजबरोबर होते. ह्या वेळी पुढील गोष्ट घडली. कर्नल एच. सी. स्टीन नावाचे एक लष्करी अधिकारी पुणे शाखेचे दरसाल १०० रु. देणारे प्रथमपासूनच मेंबर होते. पुणे शाखेचे मी काम सोडल्यावर ते त्या शाखेचे अध्यक्ष म्हणून अद्यापही काम करीत आहेत. माझे पाहुणे डॉ. ड्रमंड ह्यांचा कर्नल स्टीनशी परिचय होता म्हणून कर्नल स्टीननी डॉ. ड्रमंड यांना पुणे लष्कर येथील वेस्टर्न इंडिया क्लबमध्ये एक दिवस जेवायला नेले. रात्री जेवणाचे वेळी विवक्षित पोषाख घालायचा असा जो युरोपियन सभ्यतेचा प्रघात आहे तो पोषाक त्यावेळी ह्या दोघांच्याही अंगावर नव्हता. जो पोषाख होता तो सभ्य तऱ्हेचा होता. तथापि ठराविक आढ्यतेच्या साचाचा तो नव्हता. म्हणून क्लबच्या मॅनेजराने नेहमीच्या टेबलावर जेवणाची त्यांना परवानगी दिली नाही. दुसऱ्या एका खोलीत कोपऱ्यात ठेवलेल्या टेबलावर कसे तरी जेवायला घालून त्यांची बोळवण केली. हा फाजील गौरव पाहून डॉ. ड्रमंडना फार वाईट वाटले असे त्यांनी मला सांगितले. यःकश्चित् पोषाखाच्या बाबतीत जर अस्सल युरोपियनास अशी गचांडी बसते तर राजकीय हक्कासंबंधी भांडत असता अत्यंत प्रतिष्ठित हिंदू लोकांचा युरोपियनाकडून कसा उपमर्द होत असावा याची कल्पना डॉ. ड्रमंडली करावी असे मी त्यांना सूचवले. पुढे वेळोवेळी राजकारणाचा वाद निघे तेव्हा डॉ. ड्रमंडचे व माझे एकमत होईना साहजिकच आहे. ज्याच्या पायात जोडा त्याला खिळा टोचतो, म्हणून आम्ही राजकारणावर अतःपर बोलू नये असे ठरले. आम्ही धर्मबंधू असलो म्हणून राजकारणबंधू थोडेच होणार ! हिंदुस्थानातील आम्ही काळे लोक राजकारणात एक होऊ शकत नाही, मग नुकतेच बाहेरून आलेल्या गोऱ्यांशी आमचे एकमत कसे होणार ?

मंगलोरचे स्वागत : बंगलोर, मद्रास, कोकोनाडा, पीठापूर, कोइमतूर, कालिकत, मंगलोर वगैरे ठिकाणी फिरून तेथील परिस्थिती डॉ. ड्रमंडला कळवून त्यांना पाठवून देण्यात आले आणि मी मुंबईला आलो. मुंबईस माझे कनिष्ठ बंधू एकनाथराव यांचेकडे माझी पत्नी व दोन मुले यास ठेवून, भगिनी जनाबाई व धाकटा मुलगा चि. रवींद्र यास घेऊन एप्रिल महिन्यात १९२४ त मंगळूरला आलो. हिंदुस्थानच्या नैऋत्य किनाऱ्यावर कानडा भागात कानडी भाषा चालू आहे. मद्रास इलाख्याकडील हा शेवटचा कानडी जिल्हा होय. ह्या जिल्ह्याच्या दक्षिणेस ब्रिटिश मलबार (कालिकत जिल्हा) आणि त्याच्या दक्षिणेस त्रावणकोर व कोचीन ह्या दोन संस्थानाचा अस्सल मलबार प्रांत लागतो. याच्या पूर्वेस कोइमतूरपासून बंगलोर नेलोर ते तहत कारोमांडलच्या किनाऱ्यापर्यंत

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, समग्र वाङ्मय, खंड २ रा ~~~

१९

व्हायकोम सत्याग्रह

१९२४ चा पावसाळा सुरू झाला. तसाच त्रावणकोर या संस्थानच्या व्हायकोम या गावी मोठा सत्याग्रह सुरू झाला. व्हायकोम येथील देवळातच नव्हे तर देवळाला जाण्यायेण्याच्या वाटेवरही मोठमोठ्या प्रतिष्ठित पण अस्पृश्य मानलेल्यास जाण्यास कायदेशीर मनाई होती. म्हणूनच स्वामी विवेकानंदानी 'मलबार म्हणजे एक वेड्यांचे इस्पितळ' असे म्हटले होते. अशा देवळांच्या वाटेवर जाण्याला ख्रिस्ती, मुसलमान वगैरे कोणत्याही परधर्मीयाला केव्हाही मनाई नव्हती. इतकेच नव्हे तर देवळाच्या मंडपात व बाह्य मंडपात अशा परकीयांना प्रतिष्ठितपणे नेण्यात येत असे. हा विलक्षण अन्याय हाणून पाडावा म्हणून व्हायकोमला सत्याग्रह सुरू झाला. हा विषय मुख्यत: सामाजिक सुधारणेचा होता तरी गांधींच्या नवीन राजकारणामुळे त्यास उग्र राजकीय स्वरूप प्राप्त झाले होते. काही अस्पृश्यवर्गीय मंडळी ह्या सत्याग्रहापूर्वी कित्येक वर्षे आर्य समाज, ब्राह्य समाज व थिऑसफी वगैरे नवीन धर्मपंथातून सभासद म्हणून दाखल झाली होती. त्यांनादेखील रस्त्यावर जाण्यास अटक होऊ लागली. लाहोरचे स्वामी श्रद्धानंद आर्य समाजाचे वतीने, कालिकतचे मंजिरी रामय्या (ज्यानी कलकत्त्याच्या काँग्रेसमध्ये अस्पृश्यतेच्या विरुद्ध प्रथम ठराव आणला) थिऑसफीच्या वतीने वगैरे सुधारक मंडळी ह्याच सत्याग्रहात मोठ्या अटीतटीने भाग घेत होती.

साधु शिवप्रसाद : अशा वेळी मलबार प्रांतातील ब्राह्म समाजाचे सभासदच नव्हे तर एक प्रचारक, साधु शिवप्रसाद नावाचे तरुण व्हायकोमला गेले. ते पूर्वाश्रमीचे तिय्या जातीचे होते. म्हणून इतर अस्पृश्यांप्रमाणे त्यांनाही मनाई झाली. त्यांनी तो वृत्तांत कलकत्त्याच्या साधारण ब्राह्म समाजाच्या कमिटीकडे लिहून कळवला. साधारण ब्राह्म समाजाचे तत्कालीन अध्यक्ष डॉ. प्राणकृष्ण आचार्य यांनी त्रावणकोर दरबाराकडे जाहीर विनंतीपत्र पाठवून ह्या बाबतीत ताबडतोब दाद मागितली आणि ती साधारण ब्राह्म समाजाचा मंगलोर येथील प्रतिनिधी म्हणून पत्राची एक प्रत मजकडे पाठवून मी समक्ष व्हायकोम येथे जावे आणि शक्य असेल तो प्रयत्न करावा अशी सूचना मला करण्यात आली. मलबार प्रातांत ब्राह्म समाजाचा प्रचार करणारे साधु शिवप्रसाद यांचीही मला वेळोवेळी पत्रे येऊ लागली आणि व्हायकोम येथेच नव्हे तर त्या प्रांतात प्रचारकार्यासाठी मी मदत करावी म्हणून दक्षिण व उत्तर मलबारात दौरा काढावा असा त्यांचा तगादा लागला. मी हे प्रकरण मंगलोर समाजाच्या कमिटीपुढे ठेवले; पण कमिटीला नको म्हणण्याचे धैर्य होईना व हो म्हणण्याचेही आवडेना. पैशाचाच प्रश्न (दौऱ्याच्या खर्चाचा) असेल तर तो भाग मी पाहून घेतो, पण ज्या अर्थी अस्पृश्यसेवा हे माझ्या ब्राह्म प्रचाराचे मुख्य अंग आहे आणि ज्या अर्थी कलकत्त्याच्या ब्राह्म समाजाच्या अध्यक्षांनी मी व्हायकोमला जावे म्हणून सुचवले त्या अर्थी हा दौरा काढणे माझे कर्तव्य आहे, आणि मंगलोर ब्राह्म समाज कमिटीला कोणतीही हरकत घेणे शक्य नाही.

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, समग्र वाङ्मय, खंड २ रा ~~~

विवाह असे न म्हणता संबंधम् असे म्हणतात. एका नंबुद्री ब्राह्मणास अशा प्रकारे अनेक नायर स्त्रियांशी संबंध ठेवता येतो. नंबुद्री कुटुंबात वडील मुलानेच आपल्या नंबुद्री जातीच्या स्त्रियांशी विवाह करावा व बाकीच्या मुलानी नायर जातीच्या स्त्रियांशी संबंधम् लावावा असा प्रघात आहे. नंबुद्री जातीयाशी असा संबंध ठेवून घेणे नायर लोकात मोठे भूषणावह समजले जाते. वडील मुलांशीच नंबुद्री स्त्रियांनी लग्न लावावे ही चाल असल्याने नंबुद्री स्त्रिया पुरुषापेक्षा अधिक शिल्लक राहून बहुपत्नीकत्वाची चाल पडली आहे. नायर व नंबुद्रीचा संबंध नुसता बेटीव्यवहारापुरताच होतो; रोटीव्यवहार होत नाही. आणि बेटीव्यवहारसुद्धा पुष्कळ प्रसंगी नावापुरताच असतो. नंबुद्रीप्रमाणेच नायर लोकही आपल्यापेक्षा कनिष्ठ जातीशी अशा प्रकारचा बेटीव्यवहार ठेवतात. नायर समाज मातृशासनपद्धतीचा (Matriarchy) आहे. आर्थिक मिळकतीचा वारसा व वहिवाट बायकांकडून चालवयाची. पुरुष मिळकतीचा नुसता व्यवस्थापक, एका बाईची मिळकत अशा प्रकारे तिच्या बहिणीच्या मुलीकडे जाते. वस्त्रप्रावरणाचे बाबतीतही नायर लोकात चमत्कारिक चाली आहेत. बेंबीपासून वरील भागावर कसलाही कपडा न वापरण्याची चाल त्यांच्यात आहे. स्त्रिया अर्धनग्न असतात. अर्थात् या बाबतीत कालमानेरून पुष्कळच सुधारणा झाली आहे. छातीवर एखादा लहानसा रुमाल किंवा तत्सम वस्त्र टाकले की झाला पोषाख; पण कोणी वडीलधारे माणूस सामोरे आल्यास त्याचा मान राखण्याकरिता तोही रुमाल काढून टाकण्याची पद्धत आहे. युरोपियन लोक जसे डोकीवरची टोपी उतरून सन्मान दर्शवतात त्याचप्रमाणे छातीवरचे वस्त्र काढण्याची ही स्त्रियांत पद्धत असे. नायरहूनही खालच्या जातीतील स्त्रिया राजरोसपणे रस्त्यांतून उघड्या छातीने हिंडत असल्याचे मी प्रत्यक्ष पाहिले आहे. वरिष्ठ जातीपुढे छातीवर वस्त्र घेऊन जाणे म्हणजे त्यांचा उपमर्द करण्यासारखे आहे असे कनिष्ठ वर्गीय स्त्रिया समजत. मात्र नंबुद्री जातीच्या स्त्रिया पडद्यात असत. त्या कधी उघड्यावर दिसत नसत. कलावंतिणी व वाईट चालीच्या स्त्रिया मात्र अंगावर संपूर्ण पोषाख घालीत. त्या प्रांताच्या सेन्सस् रिपोर्टातून व डिस्ट्रिक्ट गॅझेटमधून अशा विलक्षण चालीसंबंधी तपशीलवार आणि चित्तवेधक वर्णने आहेत.

मंगलोरकडे कोर्वी नावाची एक जंगली जात आहे. त्या जातीच्या बायका रस्त्यातून अर्धनग्न स्थितीत हिंडत असत. तेथील डिप्रेस्ड क्लासेस मिशनचे सेक्रेटरी रा. सा. के. रंगराव ह्यांनी त्या जातीच्या स्त्रियास सभ्य चालीरीती शिकावाव्यात असे मनात आणले. बरेचसे नवीन कापड आणून त्यांच्या चोळ्या शिवून त्या ह्या स्त्रियांस वाटण्यात आल्या. प्रथम हा नवीन पोषाख पाहून स्त्रियास आनंद वाटला. पण त्या घरोघर गेल्यावर त्यांच्या जमातीला हा भ्रष्टाकार पाहून इतका राग आला की, त्यांनी ह्या बायकास बेदम मारले. दुसरे दिवशी त्या बायकांनी नवीन पोषाखाचे गाठोडे परत आणून के. रंगरावांच्या अंगणात फेकून दिले व के. रंगरावास अत्यंत बीभत्स शिव्याशाप देत, त्रागा करीत त्या निघून गेल्या.

ह्या प्रांतात नायर लोकांचा मागील काळी इतका कडक अंमल असे की, एखाद्या खालच्या जातीच्या इसमास नायर माणसाने ठार केले तर त्याच्यावर काही खटला चालत नसे. ह्या प्रांतातील लोकांची स्वच्छतेविषयी फार-प्रसिद्धी आहे. प्रत्येकाच्या घरी परड्यामध्ये तळी असावयाची. जाता येता कित्येक वेळा तरी त्यात स्नान करून ओलेत्यानेच स्त्रीपुरुष हिंडत असल्याचे मी पाहिले. पावसाळ्यात मी स्वत: पुष्कळ तास भिजून चिंब झालो तरी सर्दी म्हणून कधी झाली नाही.

●●●

२०

बिल्लवांची तक्रार

दहाजणांची तक्रार : साधु शिवप्रसाद आणि मी त्या प्रांतातील निरनिराळ्या ब्राह्म समाजाची स्थिती पाहून व प्रचार करून आलो. प्रत्येक ठिकाणी अंतस्थ कलह आणि राजकारणाची अवास्तव धास्ती ही लक्षणे सर्वसामान्य दिसत होती. ज्यांनी उठावे त्यांनी नवीन समाज स्थापावा; पक्ष आणि तट वाढवावे; बाहेरून प्रचारक गेल्यास आपापली बाजू सांगून त्याचे कान भरवावेत. या प्रकारामुळे प्रचारकांची फार ओढाताण होई. कामात मोठा अडथळा होत असे. तारीख १८ जून, १९२४ रोजी मी मंगलोर शहरी परत आलो. येईपर्यंत मंगलोर ब्राह्म समाजात एक भयंकर वितुष्ट माजून राहिले. ब्राह्म समाजातील १० बिल्लव जातीय पुढाऱ्यांच्या सह्यांनी मला रजिस्टर पोस्टाने पत्र आले होते. ते मला २० जूनला पोचले. सही करणाऱ्यांची माझ्या उलट त्यात अशी तक्रार होती की, (१) त्यांनी पुष्कळ विनंती करूनही मी आपली गांधी टोपी घालावयाची सोडीत नाही. (२) व्हायकोमच्या दौऱ्यावर असतांना कालिकत येथे व दक्षिण मलबारात जाहीर सभातून मी राजकीय विषयावर भाषणे करून राजकीय चळवळीत भाग घेतला. (३) सही करणारे दहा गृहस्थ व इतरही कित्येक सभासद सरकारी नोकर आणि इतर युरोपियन कंपनीचे नोकर असल्याने माझ्या राजकारणापासून त्यांना मोठा धोका पोचणे संभवनीय आहे. (४) म्हणून मी अत:पर राजकारणात भाग घेणार नाही असा लेख माझ्या सहीनिशी लिहून ज्या वृत्तपत्रातून माझी राजकीय चळवळ प्रसिद्ध झाली होती त्यातून लेख प्रसिद्ध करावा. (५) असे लवकर न झाल्यास समाजाची जादा साधारण सभा बोलावून योग्य तो उपाय करावा लागेल.

मी ताबडतोब उत्तर दिले की, "मी मंगलोर येथे परत आल्यावर खुलासा घेऊन मग ही तक्रार केली असती तर चालले असते. दौऱ्यावर मी जी चळवळ केली व भाषणे केली त्यांचा विषय राजकारण मुळीच नसून समाजसुधारणा व धर्मसुधारणा हाच होता. अर्थात मी राजकारणात भाग घेणार नाही असे लिहून देण्यास मुळीच बांधलेला नाही. तो माझा व्यक्तिस्वातंत्र्याचा प्रश्न आहे. समाजाच्या हिताला बाध न आणता राजकारणाच्या मूल तत्त्वाबद्दल ऊहापोह करणे माझे पवित्र कर्तव्य आहे. आता तरी तक्रार करणाऱ्यांनी समक्ष भेटून तक्रार मिटवावी. ज्या कलकत्त्याच्या साधारण ब्राह्मसमाजाचा प्रतिनिधी म्हणून मी येथे कार्य करीत आहे त्यांच्या सांगण्यावरूनच मी व्हायकोमला गेलो आणि जे जे मी केले ते ते सर्व त्यांना पसंत पडेल अशी माझी खात्री आहे. " गांधी टोपीविषयी त्यांची तक्रार अगदीच पोरकटपणाची होती. पण त्याकाळी गांधी टोपीच्या उलट सरकारचा मोठा रोष होता हे मात्र खरे. एखाद्या घरी एखादा गांधी टोपीवाला पाहुणा आला तरीसुद्धा सरकार त्या घरावर नजर ठेवीत असे, असे मला कळले. गांधी टोपी घालावयाचा माझा आग्रहच असेल तर निदान तिचा रंग तरी काळा असावा असा ह्या दहाजणांचा आग्रह होता. पण ज्या अर्थी ही बाब मोठी

२१

कौटुंबिक उपासना मंडळ

१९२५ च्या एप्रिल महिन्यात मी मंगलोरहून पुण्यास आलो. त्यापूर्वी १० सप्टेंबर, १९२४ रोजी माझी पत्नी व चि. प्रतापराव व चि. विश्वास यांस घेऊन मुंबईहून पुण्यास अहल्याश्रमात राहण्यास आली होती. थोडे दिवस सर्वजण एकत्र राहून विश्रांती घेतल्यावर मी भावी धार्मिक कामाची योजना मनात आखू लागलो. अलीकडे बरेच दिवस ब्राह्म धर्मांचा प्रचार साधारणपणे बहुजनसमाजात आणि विशेषत: कुंटुंबात (बायकामुलात) कसा होईल याची विवंचना मनाला लागली होती. ब्राह्म समाजाची चळवळ म्हणजे सुशिक्षितात, शहरात राहणाऱ्यात आजवर गुंतून राहिली होती. या समाजाची उच्च आणि शुद्ध बुद्धिवादाची शिकवण साध्याभोळ्या बहुजनसमाजाला सहज कळण्यासारखी नव्हती. इंग्रजी आणि संस्कृत न जाणणाऱ्या आणि खेड्यात राहणाऱ्या लोकांसाठी ब्राह्मसमाजाकडून विशेष प्रयत्न होणे फार मुष्किलीचे होते; म्हणून आजपावेतो ते फार झाले नव्हते. मग अशा लोकांच्या बायकामुलांसाठी प्रयत्न होणे दूरच राहिले. म्हणून पुणे येथे तूर्त एक कौटुंबीय योजना मी करू लागली. याकामी भगिनी जनाबाईचे फार प्रोत्साहन मिळाले. शुक्रवार पेठत माझे मित्र श्री. बाबुराव जगताप हे जनतेस उच्च शिक्षण देऊन त्यांची उन्नती करण्यासाठी श्री. शिवाजी मराठा हायस्कूलचे काम आज बरेच दिवस करीत होते. ते आणि त्यांची इतर मित्रमंडळी रा. गणपतराव शिंदे, रामराव ज्योतीराव शिंदे, B.A., LL.B., जेधे, काळभोर वगैरे मराठा समाजाचे पुढारी धार्मिक बाबतीत प्रागतिक विचाराचे होते. बाबुराव जेधे तर पुणे सत्यशोधक समाजाचे अध्यक्ष होते. ह्या मंडळीच्या घरी मी आणि भगिनी जनाबाई जाऊन रविवारी आणि इतर सुटीच्या दिवशी ब्राह्म धर्माच्या कौटुंबिक उपासना चालवू लागलो. बायकामुलास समजतील अशी सोपी भजने व भक्तिपूर्ण प्रवचने मंडळींना आवड लागली. हे काम सुमारे एक वर्ष झाल्यावर आम्ही आपली वस्ती अहल्याश्रमातून काढून शुक्रवार पेठेत श्री. शिवाजी मराठा हायस्कूलला लागूनच पश्चिमेस असलेल्या छपरबंद आळीतील माळवदकराच्या वाड्यात हलविली. ह्या कामात बरेच यश येण्याचा संभव दिसू लागल्यामुळे पुढील जाहीर विनंतीपत्र तारीख १६ जून, १९२६ रोजी निघाले. ते असे--

कौटुंबिक उपासना मंडळ

विनंतीपत्र

यं हि किच्चं अपविद्धं अकिच्चं पन कयिरती ।

उन्नलानं पमत्तनं तेसं वड्ढन्ति आसवा ।। धम्पपद अ. २१ श्लो. ३

अर्थ-- जे करावयास पाहिजे त्याचा चुथडा होत आहे. जे करू नये ते पण केले जात आहे. उनाड आणि प्रमत्त जे, त्यांच्या वासना वाढत आहेत.

आपल्या सुना-लेकीसह हजर असत. मंडळाचे उपासनेत किंवा कोणत्याही कामात जातीचा किंवा धर्माचा भेद मुळीच पाडण्यात येत नाही. अर्ध वर्ष येणेप्रमाणे ईश्वरकृपेने निर्विन्घपणे काम झाले. म्हणून मंडळाने २६ डिसेंबर, १९२६ रोजी रविवारी हा सर्व दिवस गावाबाहेर मुठा नदीचे काठी विठ्ठलवाडीजवळील आंबराईत आध्यत्मिक उत्सवात घालविला. तेव्हा सकाळी ६ पासून सायंकाळी ६ पर्यंत भजन, प्रार्थना, उपदेश, संभाषणे आणि सहल इत्यादी कार्यक्रम व्यवस्थेने पार पडला. त्यात लहानथोर स्त्री-पुरुष सुमारे ५० जणांनी भाग घेतला होता. गेल्या सहा महिन्यांतील कामाप्रमाणेच हा शेवटचा एक दिवसाचा उत्सवही श्री. अण्णासाहेब शिंदे ह्यांच्या नेतृत्वाखाली सुरळीतपणे साजरा झाला. अशा प्रसंगास वनोपासना म्हणण्यात येते. मंडळ ईश्वराचे आभारी आहे.

कोणत्याही जातीच्या व धर्माच्या कुटुंबाला मंडळाचे सभासद होता येते, आपले स्त्री-पुरुष आप्त असतांना एखाद्या स्त्रीस किंवा पुरुषास तुटकपणे व्यक्तिशः सभासद होता येत नाही. मंडळ व्यक्तीचे नसून कुटुंबाचे आहे. तथापि सहानुभूती असल्यास एखाद्या आप्त नसलेल्या व्यक्तीसही मंडळाचा आध्यात्मिक फायदा घेण्यास हरकत नाही.

पुणे, पेठ शुक्रवार, घ. नं. २९६, **गणपतराव बापूजी शिंदे**
तारीख १ जानेवारी, १९२७. सेक्रेटरी, कौ. उ. मंडळ

जिजाई ऊर्फ अवलाई : ता. २१ जुलै, १९२६ रोजी आषाढी एकादशी आली होती. त्या दिवशी रात्री ८ पासून १२ पर्यंत शिवाजी हायस्कूलमध्ये माझे हरिकीर्तन झाले. श्री तुकाराम महाराजांची पत्नी जिजाऊ ह्यांचे आख्यान लावण्यात आले होते. प्रपंचामध्ये पुरुषांबरोबर स्त्रियांचे सहकार्य बिनबोभाट चाललेले असते. पुरुष ध्येयवादी असला तर बायका व्यवहारवादी असतात. मोठमोठे पुरुष कर्तबगारीने व्यावहारिक आणि अध्यात्मिक विषयात पुढे येतात; पण त्यांच्या बायका अशिक्षित म्हणून नावाजल्यामुळे त्यांनी केलेले सहकार्य जगाच्या नजरेत भरत नाही. तुकाराम महाराजाची पत्नी जिजाऊ ही कजाग होती, म्हणून तुकाराम महाराजांच्या तुलनेने जिजाऊची जो तो निंदा करीत असतो. ह्या अन्यायाचे निराकरण अंशतः तरी व्हावे म्हणून मी हे खालील पद मुद्दाम रचून त्याचे निरूपण आख्यानात केले.

अवलाईची नवलाई

(एक उपनिषद)

पद :-- (चाल-- चला चला गड्यांनो जाऊ चला)

अशी कशी तुक्याची अवलाई । ऐका हो तिची नवलाई ।। धृ।।

भजनी असतां भांडभांडते । संत आलिया वस्‌वस्‌ करिते ।।
विठ्‌ला "काळ्या, वैरी" म्हणते । भली तिची ती मंगळाई ।।
काय ही नवलाई ।। १ ।।

खुद्द पुण्याचा अप्पा चुव्वा । अस्सल मराठा माणूस बरवा ।।
साहुकार जगजाहीर सर्वा । कन्या त्याची जीजाई ।।
की अवलाई ।। २ ।।

आम्ही तुकोब्बा सदैव वंदू । परि अवलाई कधी न निंदूं ।।
हा तियेचा ऋणानुबंधु ।। जगी पसरो आख्याई
मागणे लइ नाही ।। १४ ।।

प्रकृतिपासुन पुरुष जन्मला । भोगुनी तिजला जागा झाला ।।
पुन्हा निगुर्णी झोपी गेला । बाइल त्याची ती आई
संपली नवलाई ।। १५ ।।

श्रीशिवनेरी जीर्णोद्धार कमिटीतर्फे श्री. शिवरायाचे जन्मस्थान जुन्नर येथे शिवनेरी किल्ल्यावर श्री. जिजामाता स्मारक होत आहे. त्यात सर्व जातीच्या स्त्रियांनी विशेषत: महाराष्ट्रातील स्त्रियांनी आस्थेने भाग घ्यावा म्हणून कौटुंबिक उपासना मडळामार्फत मी प्रयत्न करावेत म्हणून कमिटीने विनंती केली. त्यासाठी तारीख १३ ऑगस्ट, १९२७ रोजी पुण्यातील सर्व जातीतील स्त्रियांची मोठी जाहीर सभा पुणे येथील श्री. शिवाजी हायस्कूलात भरविण्यांत आली. ज्यावेळी प्रथम माझे कीर्तन झाले. आख्यान जिजामातेचे लावले होते. शाळेचा ड्रॉइंगहॉल स्त्रियांनी चिकार भरून गेला. जागा नसल्यामुळे पुरुषांची निराळी सभा भरवावी लागली. स्मारकास मदत म्हणून आरतीमध्ये रुपये, नोटा टाकण्यासाठी बायकांची मोठी गर्दी झाली. रुपयांची पोच देण्यालाही कठीण पडू लागले. म्हणून देणग्या स्वीकारण्याचे काम बंद ठेवावे लागले. स्त्रियांची एक खास कमिटी करून वर्गणी जमविण्याचे काम पुढे ढकल्याण्यात आले. जागच्याजागी आरतीत २०० हून अधिक रक्कम जमली. या वेळी मी केलेला फटका म्हणण्यात आला.

फटका

ऐका हो साजणी बायांनो, नवलाचा गातो फटका ।
नऊ लाखाचा माझा फटका, घटकाभर लाविल चटका ।। धृ।।

जिकडे तिकडे म्लेंच्छ मातला, हिंददेवी विधवा झाली ।
स्वराज्यसौभाग्याचे कुंकूं, पुसिले अवकळा आली ।।
धर्म बुडाला, न्याय बुडाला, दुकाळ पडला दारुण ।
प्याया नसे पसाभर पाणी, कोठून दाणावैरण ।।
दु:ख दैन्य दारिद्र्य पसरले, जुलुमाचे चहुदिशी रान ।
शत्रुमित्र सर्वत्र उदासिन, पुसे न कोणाला कोण ।।
महाराष्ट्राचा धर्म पुरातन, तोही झाला की लटका ।
नऊ लाखाचा फटका माझा, घटकाभर लाविल चटका ।। १।।

सह्यचलाच्या खाकेमध्ये, शिवनेरीचे वारूळ ।
त्यांत एक नागीण बैसली, पिलूं तिचे कर्दनकाळ ।।
काळाचा वरवंटा फिरला, नाग लागला देशधडी
परी धीराची ढाल जणू का, नागिण वारुळ ना सोडी ।।

सुधारणा :-- झाले परीक्षा पास, मते मिळाली खास, नेहरूदास,
उद्या कौन्सिल उघडले बघ ना ।। ३ ।।

श्रद्धा :-- नाक नाही तिथं, वरी करी काई नथ, नुसती चोळी नाही हात
खाली डोळे, ना, वरती चष्मा ।। ४ ।।

सुधारणा :-- मी युरोपला जाय, धरीन राष्ट्रांचे पाय, लोकसत्तेचा जय
मग तरी म्हणशील होय ना ? ।। ५ ।।

श्रद्धा :-- १ पोर नेसली दाट, म्हणून विसरली वाट, ही नवी वहिवाट,
कशी भटकते रानोराना ।। ६ ।।

१ पोर भपकेदार लुगडे नेसली, म्हणून वाट विसरली.

वार्षिकोत्सव : रविवार तारीख १७ जुलै, १९२७ रोजी मंडळाचा वार्षिकोत्सव श्री. शिवाजी हायस्कुलात सर्व कुटुंबाना एक दिवसभर जमवून साजरा करण्यात आला. कोल्हापुराहून रा. गोविंदराव सासने व जळगावहून सौ. आनंदीबाई शिर्के हे खास निमंत्रणावरून आले होते. सकाळी उपक्रम उपासना रा. बाबूराव जगताप यांनी चालविली. ९।। वाजता सकाळी चहा, नंतर सहल, १२ वाजता सहभोजन, ३ वाजता मुलामुलींचे बैठे खेळ, सायंकाळी ५।। वाजता जाहीर सभा वगैरे कार्यक्रम झाले. गणपतराव शिंदे, गोविंदराव सासने, सौ. आनंदीबाई शिर्के, नाशिकचे भिकाजी नारायणराव गोडसे ह्यांची विचारपूर्ण व्याख्याने झाली. अस्पृश्य कुटुंबासह सर्व मंडळीनी भेदभाव न बाळगता सहभोजनात भाग घेतला. सुमारे १०० हून अधिक पाने पडली होती.

ह्यापूर्वी १९२७ च्या एप्रिल महिन्यांत पुणे प्रार्थना समाजाचा ५६ वा वार्षिकोत्सव झाला. ह्या वेळी मुंबईहून बरीच पाहुणेमंडळी आली होती. त्या समाजाचा व ह्या मंडळाचा परस्पर स्नेह परिचय वाढावा म्हणून शुक्रवार तारीख २२ एप्रिल, १९२७ रोजी कौ. उ. मंडळाच्या सर्व सभासदांनी हिराबागेजवळील पुरंदरे यांच्या बागेत सर्व दिवस वनोपासनेत घालवला. सकाळी ८ वाजता डॉ. ग. य. चिटणीस यांनी उपासना चालवली. तिसरे प्रहरी श्री. शिवाजी हायस्कुलात माझे व्याख्यान झाले. ह्या वेळी मी ब्रह्मदेशातून नुकताच आलो होतो. ब्रह्मदेशातून आणलेल्या नवीन चिजा दाखवून त्यावर मी सप्रयोग भाषण केले.

वैशाख शुद्ध पोर्णिमा श्रीगौतमबुद्ध जयंती व तारीख २५ डिसेंबर, रोजी ख्रिस्त जयंती ह्या मंडळाकडून गावाबाहेर वनोउपासना करून आतापर्यंत साजरा करण्यात आल्या. बुद्ध जयंतीला दोनदा प्रो. धर्मानंद कोसांबी ह्याचा लाभ घडला. कलकत्त्याच्या ब्राह्म समाजाच्या शतसांवतसरिक उत्सवाप्रीत्यर्थ अमेरिका व इंग्लड वगैरे कडील स्त्रीपुरुष पाहुणे मंडळी, डॉ. आणि मिसेस् साउथवर्थ (चिकॅगो), मिसेस् बुडहाउस व मिस् नेट्लफील्ड ह्यांचा जाहीर सभा व संमेलने करून सत्कार करण्यात आला.

१९२७ सालात ऑगस्ट पासून डिसेंबर अखेर ५ महिने भगिनी जनाबाई शिंदे यांनी श्री. शिवाजी शाळेत मुलांमुलीचा विशेषत: मुलींचा एक गायनवर्ग चालवला. उपासनेतील भजने मुलांना शिकवण्याचा मुख्य उद्देश होता. मुली नियमाने येईनात, म्हणून हा वर्ग बंद करण्यात आला.

२२

ब्रह्मदेशाची यात्रा

ब्रह्मदेशाला जाण्याचा माझा मुख्य उद्देश, बौद्ध धर्मांचे जीवन प्रत्यक्ष पहावे आणि स्वत: अनुभवावे हा होता. मंगलोरहून परत पुण्यास आल्यावर १९२५-२६ साली मी बौद्धधर्मासंबंधी विशेष अभ्यास केला. विशेषत: पाली भाषेतील धम्मपद हे पुस्तक प्रो. चिं. वि. जोशी यांच्याजवळ वाचल्यापासून माझ्या मनाला मोठी शांती प्राप्त होऊन बऱ्याच अंशी माझा स्वभावही बदलत चालला होता. दुसरा हेतू ब्रह्मदेशची सामाजिक स्थिती पाहणे. त्या देशातील सामाजिक व कौटुंबिक स्थितीचे मला फार कौतुक वाटत असे. ब्रह्मदेशात जातिभेद तर नाहीत, पण स्त्री-पुरुषांत समानतेचे नाते किंबहुना स्त्रियांचा वरचष्मा आहे असे मी ऐकले होते. बौद्ध धर्माचे जीवन पाहण्यासाठी विशेषत: एकान्त विहारांत राहून त्या धर्माचे रहस्य अनुभवण्याचा विचार मनांत येऊन मी ही यात्रा करण्याचे ठरवले. प्रथमत: मी ह्या प्रवासाची तारीखवार तपशील देऊन नंतर कांही मुख्य मुख्य गोष्टींचे विवेचन करीन.

ब्रह्मदेशात गेल्यावर तेथे जातिभेद नसला ती अस्पृश्यता आहे असा मला शोध लागला. त्याविषयीची तपशीलवार माहिती माझ्या भारतीय अस्पृश्यतेचा प्रश्न या पुस्तकात सविस्तर आली आहे. म्हणून तेवढा भाग मी येथे वगळतो.

तारीख २१ जानेवारी, १९२७ रोजी तिसरे प्रहरी पुण्याहून निघालो.

तारीख २४ जानेवारीला कलकत्त्याला पोचलो.

'मी बौद्ध आहे' : तारीख २४ जानेवारी पासून तारीख ६ फ्रेब्रुवारीपर्यंत कलकत्त्याच्या ब्राह्म समाजाचा माघोत्सव होता. त्यात एके दिवशी ब्राह्म समाजाच्या मिशनरीची परिषद झाली. तीमध्ये भाषण करताना मी म्हटले. "मी बौद्ध आहे" हे एकून माझ्या मिशनरी बंधूना आश्चर्य वाटले. आमच्या ब्राह्म समाजात निरनिराळ्या धर्मांतून माणसे येतात, हे खरे ना ? मग मी बौद्ध धर्मांतून आलो असलोतर काय चुकले? आज जर गौतम बुद्ध जिवंत होऊन आले आणि त्यांनी ब्राह्म समाजाचे औदार्य पाहून त्यात प्रवेश करण्याची इच्छा प्रदर्शित केली तर त्यांना तुम्ही ब्राह्म समाजात घेणार नाही काय? जेथे ख्रिस्ताला व बुद्धाला शिरकाव नाही तेथे मजसारख्या पामराची काय धडगत? ह्या विषयावर वाद माजू लागला हे पाहून अध्यक्षस्थानी गुरुदास चक्रवर्ती हे बौद्ध प्रचारक होते, त्यांनी उठून सांगितले, "रा. शिंदे ह्यांचा आध्यत्मिक भाव मनात आणा, शब्दावर वाद नको. ब्राह्म समाज सर्वसंग्राहक आहे आणि रा. शिंदे हे त्याचे नमुनेदार उदाहरण आहे. आता हे लवकरच ब्रह्मदेशात बौद्ध धर्म पहावयास जाणार आहेत. येथील लोकांना त्यांच्या ब्राह्म धर्माचा उदारभाव पाहून ते व ब्राह्म समाज या दोघांना फायदाच होईल."

तारीख ८ फेब्रुवारी रात्री रंगूनला पोचलो. दुसरे दिवशी बंदरांतून डॉ. पी. के. मुजुमदार, ४७ वा रस्ता, घ. नं. १५२ मध्ये पाहुणा झालो. न्यूयॉर्क शहराप्रमाणे रंगूनचे रस्ते आकड्याकरून उल्लेखिले जातात. ११ फेब्रुवारीला ब्राह्ममंदिरात व्याख्यान देऊन तारीख १२ ला उपासना चालवली. तारीख १९ ला रामानंद चतर्जी व मला रंगून ब्राह्म समाजाने बेंगाल ॲकॅडेमीमध्ये चहापार्टी दिली. ब्रह्मदेशचे, दक्षिण ब्रह्मदेश व उत्तर ब्रह्मदेश, असे दोन भाग आहेत. दक्षिण ब्रह्मदेशात पाश्चात्य सुधारणेचा संस्कार, शिक्षण, व्यापार, राजकारण वगैरे द्वारा अधिक झालेला दिसतो. उत्तर ब्रह्मदेशात जुने वळण फार आहे. म्हणून मी प्रथम दक्षिण ब्रह्मदेश फिरून पाहिला.

उ कोडण्णा : तारीख २० फेब्रुवारीला रविवारी सकाळी रंगूनहून निघून मोलेमनला गेलो. तेथील मुख्य पॅगोडे पाहून एका वृद्ध फोंजीला (भिक्षूला) भेटून त्याचा मठ पाहिला. नंतर थाटून ह्या इतिहासप्रसिद्ध गावी गेलो. हे ठिकाण प्राचीन काळी आंध्र राजाची राजधानी होती. म्या दबे नावाचा पगोडा १००० फूट उंच टेकडीवर असलेला चढून पाहिला. ह्या निर्जन आणि एकान्त स्थळी माझी ध्यानसाधना फार चांगली झाली. नेपेंद्र चाँ (नृपेंद्र) नावाच्या विहारात उ कोडण्णा (कौंडिन्य) नावाच्या फौजीला मी भेटलो. हे पूर्वाश्रमीचे डेप्युटी कलेक्टर होते. कोणाही प्रापंचिक गृहस्थास काही काल बुद्ध भिक्षुला दीक्षा घेऊन परत गृहस्थाश्रमात जाण्याला मुभा आहे. ह्या सवलतीला अनुसरून उ कोडण्णा यांनी विश्रांतीसाठी आणि अध्ययनासाठी हा चौथा आश्रम घेतला होता. कोडण्णा यांच्या भेटीने शांती व गंभीरपणा ह्याचा परिणाम माझ्या मनावर फार झाला. त्या विहाराचे वातावरणही आध्यात्मिक भावनांनी भरलेले होते. इतके की आपणही काही काळ बौद्ध धर्माची उपसंपदा (दीक्षा) घ्यावी असे मला वाटू लागले. पोशाख व राहणी ह्याविषयी कोडण्णा यांनी जुने आचार घेतले तरी विचारात ते अगदी नवीन होते. मी त्यांना विचारले, 'बुद्धं सरणं गच्छामि, संघं सरणं गच्छामि, धम्मं सरणं गच्छामि' ही तीन शरण्यरत्ने आहेत खरी; पण बौद्धालाच तेवढे सरण जाऊन माझा बौद्ध धर्मांत प्रवेश होऊ शकणार नाही काय ? आणि तुम्ही मला दीक्षा देऊ शकाल काय ?" त्यांनी स्मितपूर्वक उत्तर केले, "तुमचा आध्यात्मिक भाव पाहून मला आनंद होत आहे. तुम्हाला बाह्य उपसंपदेची जरुरी तरी काय उरली? शिवाय दीक्षा देण्यास मला अधिकार नाही. तो अधिकार मठाधिपतीकडे असतो. मी अद्यापि साधकच आहे. एकंदरीत तुमच्या भेटीमुळे मला मोठे समाधान झाले. "

२४ फेब्रुवारी पेगूला गेलो व कल्याणिसीमा व श्वे थ याँ बुद्ध (उजव्या हातावर मान टेकून, निजलेला मोठा पुतळा) पाहिला. तारीख २५ सकाळी पेगूचा मोठा बाजार पाहून सायंकाळी रंगूनला आलो. तारीख २६ ला रामदास नवमी आली. सायंकाळी महाराष्ट्र मित्रमंडळाचे विद्यमाने रा. मयेकर यांचे घरी' महाराष्ट्रधर्म' ह्या विषयावर कीर्तन केले. मिसेस् पी. के. मुजुमदार यांचेकडे मी पाहुणा होतो. ह्याच दिवशी तानाजी मालुसरे यांची पुण्यतिथी होती.

२ मार्चला मिसेस् पारूबाला मुजुमदार यांनी आपले घरी काही बायकांना बोलावले होते. त्यांच्यापुढे 'महाराष्ट्रातील बायकांची कामे' ह्या विषयावर मी संभाषण केले. तारीख ५ मार्च, शनिवारी नं. ६१ रस्ता लक्ष्मीनारायण धर्मशाळेत 'बृहद् हिंदुधर्म' आणि 'जनतेचा उद्धार' ह्या

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, समग्र वाङ्मय, खंड २ रा ~~~

समाजात डॉ. पी. के. मुजुमदार व 'महाराष्ट्र मित्रमंडळात' रा. सबनीस एवढेच काय ते कळकळीचे पुरुष दिसले. पण उत्तरेकडे मंडाले येथे दत्तोपंत सखाराम नागवंशे आणि अमरपुरा येथे महादेवराव मांडे आणि त्यांच्या कुटुंबातील मंडळी ह्यांना जरी ब्राह्म समाजाची फारशी माहिती नव्हती, तरी माझ्या दोनचार दिवसांच्या समागमात, ब्राह्म समाजाविषयी ह्यांना फार आदर उत्पन्न झाला. रा. मांडे यांच्या इच्छेने त्यांच्या घरी ब्रह्मोपासना झाली. मिसेस् मांडे व त्यांचा मुलगा विद्याधर ही श्रद्धेने उपासनेस बसली होती. या समयी मंडालेहून आलेले रा. नागवंशे व रा. भिडे हेही हजर होते. ह्या उपासनेचा परिणाम सर्वांवर इतका इष्ट घडला की, पुढील रविवारी सगाईहून परत आल्यावर मंडाले येथे रा. मांडे, पायगुडे व नागवंशे ह्या तिघांच्या कुटुंबातील मंडळीनी नागवंशे ह्यांच्या बंगल्यावर सर्व दिवस उपासना, चिंतन, भजन, संभाषण व भोजन ह्यांत घालवण्याचे ठरवले होते. ही सर्व मंडळी मूळ महाराष्ट्रातूनच आलेली म्हणून मला अधिकच आपलेपणा वाटत होता. नागवंशे यांनी आपल्या माडीवर उपासनेची सांगितल्याप्रमाणे तयारी ठेवली होती. सर्व बेत ठरल्याप्रमाणे झाला. येथे एखादा हिंदी जाणणारा मिशनरी आल्यास ह्या मंडळीची ब्राह्म समाज स्थापण्याची तयारी दिसली. रा. मांडे यांचेकडे वरचेवर कौटुंबिक उपासना होई. हे देहू गावी राहणारे देशस्थ ब्राह्मण होते. मला निरोप देतांना त्यांना गहीवर आला. त्यांनी माझ्या जुन्या वहाणा आठवणीदाखल स्वत:ला ठेवून घेतल्या आणि बाजारातून पुष्कळ ब्रह्मी चिजा आणून आठवणीदाखल मला दिल्या.

मनुहा : २३ मार्चला सकाळी मंडाले सोडले. ७।। वाजता ऐरावती नदीवरून बोटीतून पॅगान ह्या शहराकडे निघालो. सायंकाळी मी जाँ ला पोचलो. वामन पाठक व थत्ते बोटीवर आले. बर्मा कॉटन कंपनीत हे नोकर होते. तारीख २४ ला तिसरे प्रहरी पॅगानला पोचलो. धक्क्यावर प्रिन्सिपॉल उ सैन हे मला घेण्यास आले होते. पॅगान येथे लाखेची भांडी व इतर वस्तू तयार करण्याची सरकारी शाळा आहे. त्याच शाळेचे उ सैन हे प्रिन्सिपॉल होते. त्यांचेकडे तीन दिवस राहिलो. पॅगान हे प्राचीन महत्त्वाचे शहर आहे. त्यांच्या असमंतात् अनेक प्राचीन पॅगोडे आहेत. तारीख २५ ला महाबोधी अथपिन्या, आनंद ही देवळे पाहिली. उ. शांती मा या फोंजीचे (भिक्षुचे) दर्शन घेतले. पॅगानचे दक्षिणेस टॉय वॉ नावाचे एक चांडालांचे खेडे आहे. तेथील प्राचीन मनुदा राजाचे देऊळ पाहिले. सायंकाळी अंधारी रात्र झाली तरी दोन मुले व एक कंदील बरोबर घेऊन रात्रीचे पाहिले. ह्या देवळांत मनुह राजा नजरकैदेत होता. ह्याच्याच वंशजांस पुढे वंशपरंपरा अस्पृश्य करण्यात आले.

थैली : २७ मार्च रविवारी न्याउ गावास निघालो. पॅगानच्या उत्तरेस ५ मैलांवर हा गाव आहे बरोबर प्रि. उ सैन हेही होते. जवळच पयाचून नावाच्या अस्पृश्य मानलेल्या जातीचे खेडे पाहिले. मनुहा ह्या तेलंग राजाच्या वंशजाची ही स्थिती ब्रह्मदेशच्या अनवरथ राजाने केलेली मी प्रत्यक्ष पाहिली. त्याच्या वंशांतल्या हल्लीच्या पुरुषाचे घर पाहून मला भडभडून आले. तारीख ३० ला थयोमयो व अलनम्यो ही गावे पाहिली.जलनभ्यो येथे रा. वाय. के. कर्णिक जपान कॉटन कंपनीचे मुख्य कारकून व इस्त्रइल गृहस्थ बेंजामिन नागवेकर हे भेटले. कुशिनारा पॅगोडांतील गौतम बुद्धाचा शेवटचा आजार, मृत्यू, स्मशानयात्रा, दहन वगैरेचे मूर्तिमंत देखावे पाहिले. ब्रह्मदेशच्या प्रवासांत जेथे जेथे महाराष्ट्रबंधू भेटले तेथे तेथे त्यांनी माझे फारच सन्मानपूर्वक हार्दिक स्वागत

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, समग्र वाङ्मय, खंड २ रा ~~~

पश्चिम काठी उत्तरेकडे ह्या टेकड्या नदीला लागून समांतर आहेत. १८९४ मध्ये ह्या टेकड्यांवर २४ मठ होते. त्यात ६५७ भिक्षू राहात होते. त्या पूर्वी प्रथम येथे नऊच मठ होते. टेकडीच्या उतरणीवर मठांच्या पार्श्वभागी भिक्षुंनी कित्येक गुहा कोरल्या होत्या. ह्या लेण्यांमधून हवा आणि प्रकाशाला बहुतेक प्रतिबंधच होता. दिवसांतून ५/७ तास भिक्षुंनी त्या ठिकाणी ध्यान करावे असा बौद्ध विनय ऊर्फ दंडक आहे."

महाशिव चाँग : सगाईन हे टेकडीवरील ठिकाण सर्व ब्रह्मदेशात अत्यंत पवित्र धर्मक्षेत्र आहे. हल्ली या टेकडीवर भिक्षू आणि भिक्षुणीचे मिळून सुमारे ४०० विहार ऊर्फ मठ (ब्रह्मी भाषेत चाँग म्हणतात. गचा उच्चार होत नाही.) आहेत. भिक्षुंची संख्या १००० व भिक्षुणीची संख्या २००० असावी. तारीख १४ मार्चला अमरपुराहून तिसरे प्रहरी मी सगाईनला निघालो. रा. महादेवराव मांडे यांनी सगाईन येथील गावी राहणारे उ माँ माँ, एम्. एल्. सी. नावाच्या एका श्रीमंत पारशी गृहस्थास पत्र लिहून सगाईन टेकडीवर माझी राहण्याची उत्तम व्यवस्था करून ठेवली होती. माझ्याबरोबर रा. वासुदेव गोविंद भिडे नावाच्या एका पोक्त गृहस्थाला माझे दुभाष्याचे काम करण्याला दिले होते. हे कोकणस्थ पेन्शनर ब्राह्मण गृहस्थ ब्रह्मदेशात बरीच वर्षे होते. उत्तर ब्रह्मदेशात असताना यांनी माझे दुभाषगिरीचे काम चांगले केले. ब्रह्मी, इंग्रजी व मराठी या तिन्ही भाषा यांना चांगल्या येत होत्या. भिडे आणि मी इरावती नदी ओलांडून वरील उ माँ माँच्या घरी तारीख १४ रोजी तिसरे प्रहरी पोचलो. येथे आम्हा दोघांचा उत्तम प्रकारे सत्कार झाला. उ माँ माँ हे पारशी बाप व ब्रह्मी आई ह्यांच्या पोटचे सभ्य गृहस्थ होते. त्यांनी आपली मोटार देऊन सायंकाळी टेकडीवर पोचवले. माझ्याबरोबर उ पो विन हे भले ब्रह्मी वृद्ध गृहस्थ आदरपूर्वक आमची सरबराई करीत होते. आम्ही महाशिव चाँग ह्या विहारांत उतरलो. मुख्य फोंजी उ कुमार यांची ओळख झाली. त्यांचे हाताखाली काम करणारे तरुण शिष्य व भिक्षु उ विलास हे वयाने ३२ वर्षांचे होते. मुख्य फोंजी उ कुमार ४५ वर्षांचे होते. दोघांनाही पाली भाषा थोडी येत होती; पण ब्रह्मी उच्चार फार वाईट असल्याने ह्या पालीचा मला काही एक फायदा झाली नाही. उ विलासाला थोडे इंग्रजीही येत होते. त्याचा फायदा घेऊन ते आमचा वेळोवळी समाचार घेत व मदत करीत. आमची उतरण्याची सोय एका स्वतंत्र बंगल्यात केली होती. उ कुमार मुख्य देवळातच निजतो. उ विलास व त्याचे विद्यार्थी दुसऱ्या बंगल्यात राहतात. याशिवाय त्या मठाच्या आवारात दुसरे चार पाच लाकडी बंगले होते. एकंदर जागा दहा एकर होती. एवढ्या आवारात नऊच माणसे होती. ह्यांना रोज षोपक कमिटीकडून (तांदूळ मंडळीकडून) रोज पुरेसे तांदूळ व थोडीशी भाजी मिळत असे, शिवाय रोज भिक्षुणी मठांतून शिजलेल्या उत्तम भाज्या, मासे, मांसान्न, आमट्या, लोणची वगैरे देतच असत. सकाळी ६ वाजता भिक्षूंची न्याहारी व ११।। वाजता मुख्य जेवण होत असे. मग दुसरे दिवशी सकाळपर्यंत जेवणाचे नाव नाही. तहान लागल्यास फक्त पाणी प्यावे. आमच्या जेवणाची सोय उ माँ माँ यांनी स्वतंत्रपणे व उत्तमपणे केली होती. मंडाले येथील सुवासिक तांदूळ, तरकाऱ्या, लोणची वगैरेंनी युक्त असे जेवण फार रुचकर लागे.

भिक्षुणी मठ : तारीख १५ मार्च, रोजी सकाळी पुष्कळ भिक्षुणी मठ हिंडून पाहिले. बरोबर उ विलास दाखवण्यास होतेच. ही टेकड्यांची रांग पाचसात मैल लांबपर्यंत इरावतीने काठांनी

पसरली होती. निरनिराळ्या टेकड्या, खोल दऱ्यांवरील उंच शिखरे, जागोजागी विहारांनी खेचून भरल्या होत्या. शिखरांवर देवळे, उतरणीवर मठ अशी रमणीय शोभा होती. वरपासून खालपर्यंत दाट झाडी, अत्यंत स्वच्छ भूभाग, गर्द छाया आणि झुळझुळ वाहणारी शुद्ध हवा अशी शारीरिक व आध्यात्मिक सुखाची विपुल साधने ह्या पुण्यक्षेत्री भरली होती. इतके असूनही ह्या पाचसात मैलात गृहस्थाश्रमाचा मागमूसही नव्हता. स्वयंपाकघरच नव्हते तर चूल व धूर यांची वार्ता कोठून असणार ? भिक्षुंनी भिक्षा मागून तरी अन्न आणावे नाही तर भिक्षुणीनी त्यांना अन्न आणेन द्यावे. मठात कोणतेही काम हाताने करावयाचे नसते. तरी सर्व प्रदेशात स्वच्छता व टापटीप, शांती, समाधान व स्तब्धता यामध्ये कोठेही खंड दिसत नव्हता. ही सर्व कामे साधारण मजुरांकडून करून न घेता बाल आणि तरुण शिष्यवर्गाकडूनच आटोपून घेण्यात येत होती. विहाराची खेचाखेच झाली असूनही नवीन विहार बांधण्याचे काम चालू होते. भिक्षुणींना भिक्षूप्रमाणे मान देण्यात येत नसे. त्यांनी कोरान्न भिक्षा मागावी. जरुर पडल्यास शिजवून भिक्षूस वाढावे भिक्षुंच्या मठात गेले असता कोणी कितीही श्रीमंत अथवा मोठ्या दर्जाचा असो, आवारात शिरण्यापूर्वी त्याला पायांतले जोडे हातात घ्यावे लगत असत. ते न काढल्याबद्दल युरोपियनांचेही खून पडलेले आहेत असे ऐकले आहे. म्हणून जोडे काढून आत जावे असा ब्रह्मदेशभर सरकारी वटहुकूम आहे आणि तशा जागजागी पाट्याही आहेत. भिक्षुणीच्या मठात मात्र जोडे घालून जाण्यास परवानगी आहे. एका विद्वान भिक्षुणीची भेट झाली. ती आपल्या शिष्येस पाली शिकवीत होती. धम्मपद पुस्तकातील सहस्त्रवग्ग हा अध्याय तिने मला आपल्या शिष्यिणीकडून वाचून दाखवला. जोडाक्षर आल्याबरोबर ते उच्चारतांना शिष्यिणीचे जे हाल होत ते पाहून माझेही बरेच हाल झाले. समोरून भिक्षू आला तर इतर सामान्य जनाप्रमाणे भिक्षुणीस रस्त्यावर जमिनीला गुडघे व कपाळ टेकून भिक्षुला तीन वेळा नमस्कार करावा लागे. ब्रह्मदेशात इतर सर्व ठिकाणी ऐहिक बाबतीत स्त्रियांना पुरषाबरोबर किंबहुना कांकणभर अधिकच मान असला तरी धार्मिक बाबतीतील स्त्रीपुरुषांचा पंक्तिप्रपंच पाहून मला आश्चर्य वाटले. ह्या भेदाला ब्रह्मदेश जबाबदार नसून हिंदुस्थानातून आलेला बौद्ध धर्म आहे.

तारीख १५ मार्चला तिसरे प्रहरी उ माँ माँ आणि उ पो विन हे नेहमीप्रमाणे महाशिवचाँगमध्ये आमच्या समाचारास आले. उ कुमार आणि शेजारच्या मठांतील मुख्य फोंजी ह्यांच्याशी आमचे दोन तास भाषण झाले. सबंध भेटीत हे दोन श्रीमंत ब्रह्मी गृहस्थ भिक्षुंचा मान राखण्यासाठी मांजराप्रमाणे जमिनीला बिलगून बसले होते. भिक्षू उभा असतो उपासकाने (सामान्य माणसाने) जमिनीवर बसावे; भिक्षू बसला असता जमिनीला पडून बिलगावे. एकंदरीत भिक्षूपेक्षा उच्च पातळीवर जाऊ नये अशी ही मान देण्याची ब्रह्मी तऱ्हा आहे.

श्वे जिन् आणि तु धम्म : संभाषणाचा विषय पुढीलप्रमाणे : श्वे जिन् आणि तु धम्म (सुधर्म) असे दोन मुख्य पंथ ह्या टेकडीवर आहेत. पहिला बौद्धविनय (बुद्धशिस्त) कडकडीत पाळतो. उदा. (१) विडी न पिणे, (२) विडा न खाणे, (३) नाटके न करणे, न करू देणे व न पाहणे, (४) पैशास न शिवणे, (५) प्राण्याने ओढलेल्या गाडीत न बसणे, (६) गावात छत्री वगैरे आढ्यतेचा प्रकार न ठेवणे इत्यादी इत्यादी. ह्या पंथात कित्येक भिक्षू शाकाहारी आहेत. उ खंती (क्षांती) च्या प्रयत्नामुळे ब्रह्मदेशात शाकाहार वाढत आहे. निदान गोहत्येला थोडा तरी आळा बसत

आहे. सुधर्मपंथात इतका कडकडीतपणा नाही. धर्ममतात काही फरक नाही. ब्राह्मसमाजाचे ध्येय सांगण्याचा मी प्रयत्न केला; पण त्याचा परिणाम भिक्षुंवर झाला नाही. कारण त्यांची कूपमंडूक वृत्ती. ऐकून घेण्याची तयारी दिसेना. ब्राह्मसमाजाची सर्वसंग्राहक तौलनिक वृत्ती पाहून भिक्षुंच्या कपाळाला आठ्या पडू लागल्या. ब्राह्मसमाज म्हणजे एक धड ना भाराभर चिंध्या असा गैरसमज होऊन भिक्षुंची तब्येत किंचित गरम होऊ लागली असे दिसले. आमचा दुभाषीपणा स्वत: उ माँ माँ, एम् एल्. सी. ह्यांनी चालवला होता. त्यांनी चतुरपणे उ कुमाराची समजूत घातली. एरव्ही ह्या बाबतीत अवास्तव गैरसमज वाढून आम्हाला पाहुणचारास मुकावे लागले असते. मी ह्या विहारांत उ माँ माँ च्या औदार्याने उतरलो होतो. तरी मी नास्तिक आहे असे समजले असते तर मला बाहेर निघावे लागले असते. पण मीही एका मोठ्या धर्मचळवळीचा भिक्षू आहे व जगात फिरून बौद्ध धर्माचा मोठ्या अभिमानाने अभ्यास करीत आहे हे नीट समजावून दिल्यावर भिक्षुंची समजून पटली. हिंदुस्थानात बौद्ध धर्मप्रसाराची चळवळ चालल्याचे ऐकून भिक्षुंना आनंद झाला.

चार वर्ग : मी ह्या ठिकाणी एकंदर ३।। दिवस होतो. (४ रात्री व तीन दिवस) एकंदर ठिकाणांतील पवित्र वातावरण पाहून पहिल्याच दिवशी मजवर फार परिणाम झाला. कोणताही विधिसंस्कार न करता मी आपल्या स्वत:च्याच मनाने ह्या ठिकाणी असेपर्यंत भिक्षुंचे व्रत धारण केले. एकान्तवास, शुद्ध चांदणे, कसलीही दगदग नाही. ददात नाही. माझ्यापुढे बौद्ध धर्माचा इतिहास साद्यंत उभा राहिला. बुद्ध चारित्र्य मूर्तिमंत दिसू लागले. रात्री उपासनालयाकडे गेलो. दार झाकलेले होते. बाहेरच बसून किती तरी वेळपर्यंत ध्यान केले. सकाळी पुन्हा पहाटे उठून हाच अनुभव घेतला. मठांतला गुरुशिष्यसंबंध पाहिला तो असा:-- बाहेरून येणारे विद्यार्थी :-- (१) काईन् म्हणजे मुंज झालेले पीतांबरधारी २० वर्षाखालचे शिष्य. (२) उब जेन् म्हणजे २० वर्षांवरचे दीक्षा घेतलेले तरुण भिक्षू (३) मठाचा मालक व चालक ऊर्फ शास्ता ह्याला फोंजी म्हणतात. (४) शिवाय कप्पियादायका नावाचा गृहस्थाश्रमी व्यवस्थापक मदतनीस कोठे कोठे आढळतात. असे चार प्रकार झाले. बाहेरून येणारे विद्यार्थी सकाळचे जेवण विहारातच जेवतात. दोन प्रहारानंतर आपले घरी जेवून रात्री निजण्यास आपल्या विहारातच येतात. बाकीचे सर्वजण विहारातच राहतात. रात्री अंधार पडल्यावर कोणीही विहाराचे बाहेर जरुरीच्या कामाविना आणि फोंजीच्या परवानगीविना जाऊ नये असा सक्त नियम आहे. अंधार पडल्यावर कोणतीही भिक्षुणी कोणत्याही सबबीवर भिक्षुंच्या मठात येऊ शकत नाही.

हाडांचा सांगाडा : श्वे जिन पंथाच्या मुख्य आश्रमातील एका खोल गुहेत मी गेलो असता एका कोपऱ्यांत हाडांचा सांगाडा उभा केलेला मी पाहिला. त्याच्यावर लय लावून अनित्याची (सर्व जग क्षणभंगुर आहे ही भावना) साधना साधावयाची असते. ह्याशिवाय उपोसथाचे दिवशी (उपवासाचे दिवशी) उपासकांना (सामान्य जनांना) यात्रेकरुंना किंवा साधारण पांथस्थांना थोडे दिवस उतरण्यासाठी झया (धर्मशाळा) एक किंवा अधिक असतात त्या निराळ्या. पाण्यासाठी विहिरी, तळी, बहिर्विधीसाठी पायखाने, चिंतनासाठी अगदी एकान्त जागी बांधलेल्या झोपड्याही वेगळ्या असतात. एकंदरीत बौद्ध विहारांतील देखावा व वातावरण फारच शांतिदायक व उन्नतिकारक असते यांत शंका नाही.

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, समग्र वाङ्मय, खंड २ रा ~~~

अशा गोल खांबावर उभारला आहे. त्यावर तीन छपरे निमुळती आहेत. यात उ नदीयार नावाचे अतिवृद्ध फोंजी राहतात. त्यांचे वय ९३ वर्षांचे आहे. त्यांच्याशिवाय २ उबजेन आणि ७ कोईन तेथे होते. मी येथे भर उन्हाळ्यात १२ वाजता अतिकष्टाने आलो. बरोबर उ सू हे ठिकाण दाखविण्यासाठी आणि माँ साँ हे दुभाष्याचे काम करण्यासाठी होते. विहारात ५/६ वर्षांची बाहेरून येणारी ४/५ पोरे होती. ह्या विहाराला लागूनच जवळच एक जीर्ण विहार होता. त्यात उपरोक्त तादना बँ निजले होते. बाहेर त्यांचा नातू बसला होता. त्याला मी तादना बँ ह्यांस उठविण्यास सांगितले. त्याने माझे इंग्रजी व्हिजिटिंग कार्ड आत नेले. काही वेळाने आम्ही आत गेलो. विहार अगदी पडझड झालेला व अस्ताव्यस्त होता. त्याला कित्येक दिवसांत कोणी झाडू मारल्याचे चिन्ह दिसत नव्हते. जमिनीवर एका वेताच्या चटईवर एवढे मोठे धर्माधिकारी लाकडाच्या ओंड्यावर डोके टेकून निजले होते. ते उठून माझ्याशी थोडेच बोलले. वृद्ध वय आणि दुपारची झोपेची वेळ म्हणून त्यांच्याने फार बोलवेना.

सामाजिक चालीरीती व बायकांचा दर्जा : मी विलायतेस असताना मि. फिल्डिंग ह्या गृहस्थाने ब्रह्मदेशाविषयी लिहिलेले The Soul of a People नावाने एक पुस्तेक वाचले होते. तेव्हापासून ब्रह्मदेश पाहण्याची इच्छा माझे मनात होती. मलबारात मातृसत्ताक पद्धती पाहून ब्रह्मदेशातही असाच काहीसा प्रकार असावा, असे वाटून तो प्रत्यक्ष पाहण्याची माझी इच्छा दुणावली. ब्रह्मी बायकांना शिक्षणामध्ये अजूनही पुरुषाबरोबरचा हिस्सा मिळाला नाही. टापटिपीने पोषाख करणे, केस विंचरणे, तोंडाला पावडर लावणे ह्यांतच त्यांचे विशेष गुण दिसून येतात. देवळात प्रार्थना करीत असताना बहुतेक स्त्रिया आपल्यास पुढच्या जन्मी पुरुषजन्म प्राप्त व्हावा अशी प्रार्थना करीत असतात. शेतकऱ्याची बायको आपल्या शेतातले सर्व तांदूळ युरोपियन कंपनीस आपल्या जबाबदारीवर विकते. त्यात ती नवऱ्यापेक्षा जास्ती फायदा काढते. खरे पाहता घरची मालकीण स्त्रीच असते. पुरुष तिच्या हाताखाली वागत असतो शेवटचा थीबा राजा अशाच प्रकारचा एक बायकोच्या आधीन असलेला पती होता. मुलाचे लग्न बहुधा १८ वे वर्षी व मुलीचे १४ वर्षी होते. आईबापापासून पळून जाऊन लग्न केल्याची उदाहरणे नेहमी आढळतात. लग्नानंतर नवीन दंपती मुलीच्या माहेरीच दोन-तीन वर्षे राहतात. जावई मुलीच्याच माहेरचा एक अशा रीतीने वागतो. मुलगी एकुलती एक असल्यास मुलीचे आईबाप दांपत्प मरेपर्यंत, त्याच घरांत राहते. घटस्फोट सर्रास चालू आहे. ब्रह्मी पुरुष एक संतुष्ट प्राणी आहे. श्रीमंत होण्याची त्याला महत्त्वाकांक्षा नसते. पुष्कळसा पैसा मिळालाच तर तो धर्मकृत्यात खर्चून टाकतो आणि याचा मोबदला दुसऱ्या जन्मी मिळेल म्हणून तो संतुष्ट असतो."

ब्रह्मी माणसाचा पोषाख म्हणजे एक रेशमाची लुंगी, एक रेशमी पोलका आणि डोईला एक लहानसे फडके. स्त्रियांचाही पोषाख याच धर्तीवर असतो. मात्र डोक्याला फडके नसून केसांचा बुचडा ऋषीच्या जटेसारखा टाळूवर बांधलेला असतो. नटणे-मुरडणे सारखे चाललेले असते. बायकांना फुलांचा फार षोक दिसला. खेड्यापाड्यांतसुद्धा घरांपुढे नाना प्रकारची फुलझाडे लावून त्यांची निगा राखण्यात ब्रह्मी बायका मोठ्या चतुर दिसल्या. शेतकी आणि शिपाईगिरी हीच पुरुषांची कामे. बाकी घरची व्यवस्था राखणे, व्यापार करणे, सावकारी करणे वगैरे सर्व कामे स्त्रिया

मोठ्या दक्षतेने करतात. खेड्यापासून तो रंगून-मंडालेसारख्या मोठमोठ्या शहरापर्यंत केव्हाही कोठेही जा, सर्व दुकानातून बायकाच बसलेल्या दिसतील. कोळणी माळणीपासून मौल्यवान् कापड आणि जवाहिराची दुकाने देखील स्त्रियाच मालकी हक्काने चालविताना आढळतील. माल विक्रीसाठी बसल्या असता त्यांची सारखी वेणीफणी चाललेली असते. नवरा दुकानात असला तरी तो देवडीवाल्यासारखा किंवा एखाद्या भय्यासारखा बाहेर बसलेला असतो.

फोंजी ब्यान : एका भिक्षुची अंत्येष्टी : गुरुवार ता. १० मार्च रोजी मी मंडाले येथे असता रात्री १० वाजता एका विहारात एका बुद्ध भिक्षुचा मृत्यूत्सव पाहण्यास गेलो होतो. अष्टमीचे शुद्ध चांदणे पडले होते. फौजी मेला असता ६ महिने त्याला ठेवण्यात येते पोटातील आतडी वगैरे काढून त्यात मसाला भरण्यात येतो. त्याची तिरडी पालखीसारखी श्रृंगारण्यात येते. ठिकठिकाणचे भक्तगण वर्गणी करून मोठा मांडव घालून त्यात ती सजवून ठेवतात. ह्या विहारात आज दोनतीन दिवस मोठा उत्सव चालू होता. सुमारे ३/४ हजारांत लोक जमले होते. मेवामिठाईची दुकाने होती. कळसूत्री बाहुल्यांचे खेळ व नेहमीचा नाच-तमाशा ठिकठिकाणी चालू होता. वृद्ध फोंजी देखील तो पाहत होते. चार उंच खांबांवर एक मोठा पाळणा टांगून त्यात मृत भिक्षूची तिरडी घालून ती झुलती ठेवली होती. तीवर हिरवे वस्त्र घालून बेगड लावली होती. एकाने एक रुपया दिल्यावर एक सेवेकरी मोठमोठ्याने रडक्या सुरांत प्रार्थना करू लागला. गुजराथ्यांप्रमाणे हे भाडोत्री रडे होते. डोळ्यांना पदर पुसून रडण्याचा आवाज आणीत होता. शोकाचे अगर गंभीरपणाचे चिन्ह कोठेच दिसत नव्हते. १२ वाजता रात्री मी कंटाळून घरी परतलो.

ब्रह्मी विवाह : परकीयांचा व ब्रह्मी लोकांचा मिश्रविवाह होण्याला काहीच अडथळा नाही. पण असे विवाह फारसे झालेले दिसले नाहीत आणि जे झाले आहेत तेही फारसे यशस्वी झालेले नाहीत. ब्रह्मी विवाह ही एक अत्यंत साधी गोष्ट आहे. तरुण व तरुणींची मने जमली की ती एकत्र राहू लागतात आणि पुढे सवडीनुसार कांही मित्रमंडळीना चहास बोलावून आपला विवाह झाला असे जाहीर करतात. घटस्फोटही विवाह इतकाच सुलभ आहे. ह्याचा अर्थ ब्रह्मी लोकांचे वैवाहीक जीवन शिथिल आहे असा नाही. विधिसंस्कारांचे अवडंबर नसणे म्हणजे शिथिलपणा नव्हे. उलट ह्या बाह्योपचारांचा जेथे अतिरेक होतो, तेथेच शिथिलपणाला वाव मिळतो. विवाहपद्धती स्वाभाविक आणि निसर्गापासून दूर नसली म्हणजे वेश्याव्यवसायाला जागाच मिळत नाही. हिंदुस्थान, युरोप, अमेरिकेतील लहान मोठ्या शहरांतून वेश्याव्यवसायाचे आणि इतर दुराचारांचे जे हिडिस प्रदर्शन दिसते तसे ब्रह्मदेशात मला कोठे दिसले नाही.

●●●

२३

शेतकरी चळवळ

१९२६-२७ च्या सुमारास गुजराथचे सरदार वल्लभभाई पटेल यांनी बार्डोलीस करबंदीची अपूर्व चळवळ काढली आणि विलक्षण धाडस व घटना करून ती सरकारविरुद्ध यशस्वी करून दाखवली. तीमुळे संबंध मुंबई इलाख्यांत शेतकऱ्यांमध्ये अपूर्व जागृती होत चालली होती. अशा मुहूर्तावर मुंबई कौन्सिलात सरकारपक्षाने दोन बिले आणली होती. एक सारावाढीचे व दुसरे तुकडे-बिलाचे. ही दोन्ही लोकांना अत्यंत अप्रिय होती. मुंबई इलाख्यांत विशेषत: महाराष्ट्रात मालकीच्या जमिनीचे वारसाहक्काने अगदी लहान लहान तुकडे इतके पडत चालले होते की, शेतकऱ्यांच्या वैयक्तिकदृष्टीने आणि राष्ट्राच्या हिताच्या दृष्टीने, पडत जाणाऱ्या शेतकीच्या जमिनीचे हे तुकडे अत्यंत अनिष्ट होते हे खरे; पण दुसऱ्या बाजूने मोठमोठे जमिनीचे भाग मोठमोठ्या भांडवलदार मंडळीनी विकत घेऊन साखरेचे कारखाने संयुक्त भांडवलाचे जोरावर चालवण्याचे सुरु केले होते. त्या व्यापाऱ्यांमध्ये परकीय भांडवलदारही पुष्कळ होते. म्हणून ह्या भांडवलदारांच्या कारवाईमुळे जनतेत मोठा संशय पसरत होता, अशा स्थितीत ही दोन बिले सरकारी रीतीने लोकांपुढे यावयास नको होती. १९२८ सालच्या पावसाळ्यात मुंबई सरकारचे कौन्सिल पुणे येथे आल्यावर ही दोन बिले सरकारास तातडीने पार पाडून घ्यावयाची होती. मुंबई सरकारचे जमाबंदीचे दिवाण सर सी. व्ही. मेहेता यांनी ह्या बिलांचा पुढाकार घेतला होता. म्हणून या इलाख्यातील प्रजापक्षाने ह्या परिषदेचे काम मोठ्या तातडीने व हिंमतीने चालवले होते.

पुणे येथील रे मार्केटात सुरू झालेल्या मुंबई इलाख्यांतील मराठी बोलणाऱ्या जिल्ह्यातील शेतकरीवर्गाची परिषद सुरू झाली. त्या परिषदेला महाराष्ट्र व कर्नाटक येथील निरनिराळ्या जिल्ह्यांतून सुमारे ५००० शेतकरी आले होते. सर्व पक्षांची आणि निरनिराळ्या मतांची पुढारी मंडळी हजर होती. दूरहून भाकरी बांधून आलेल्या शेतकरी मंडळीनी रे मार्केट चिक्कार भरून गेले होते. ह्या परिषदेसाठी मंडईतल्या भाजीवाल्या लोकांनी आपापली दुकाने बंद ठेवली होती. स्वागताध्यक्ष श्री. बाबूराव जेधे ह्यांचे भाषण झाल्यावर अध्यक्षस्थानी माझी योजना व्हावी असे सुचविले. अनुमोदन दे. भ. तात्यासाहेब केळकर यांनी दिले.

अध्यक्षीय भाषण : "गेल्या आठवड्यांत मी बंगालच्या फिरतीवर निघालो होतो. कलकत्त्यास ब्राह्मसमाजाची शतसांवत्सरी असल्याने मला तिकडे जाण्याची निकड लागली होती. पण इतक्यात मुंबईत असताना ह्या परिषदेच्या स्वागताध्यक्षांकडून मला जरुरीची तार आली आणि पकडवारंटाने धरून आणून मला ह्या स्थानी बसविण्यात आले आहे. दलित अस्पृश्यांची आजपर्यंत यथाशक्ती ब्राह्मसमाजाने सेवा केली आहे. आता शेतकरीवर्ग दलित होऊ लागला आहे. अस्पृश्यांची अस्पृश्यता

तिकडे कमी होऊ लागली आहे, तर इकडे सरकारने दुसरा एक दलितवर्ग मोठ्या प्रमाणांत निर्माण करण्याचा चंग बांधला आहे. हे काम धार्मिकच समजून मी पत्करले आहे...."

परवा मी एक सत्यशोधकी जलसा पाहिला. त्या जलश्यांतील अगदी पिळून निघालेल्या बाळा पाटलाने खालील टाहो फोडला.

" शेतकऱ्यांचा कुणी न्हाई वाली ।
मुलाबाळांची - माझ्या बाळांची ।
दशा कशी झाली! ।। शेतकरी - ई - ई - अ!! "

संस्थानांतील स्थिती : जगातील एका अत्यंत बुद्धिवान, संपत्तिमान व पराक्रमी लोकांचे ह्या देशावर शंभर वर्षे राज्य चालून देशांतील ९-१० लोकांची ही केविलवाणी लोकस्थिती असावी आणि इकडे या राज्यकर्त्यांच्या टेकडीवरील हवाशीर राजवाड्यात नाचरंग, तमाशे ह्यांची झोड उठावी ! धिक्कार असो ह्या राजनीतीला. इकडील नोकरशाही आमची ट्रस्टी असल्याचे आम्हास भासवीत आहे. ट्रस्टींचा हिंदुस्थानाला हा एक मोठा रोगच जडला आहे म्हणायचा. ह्या ट्रस्टी रोगाने आम्ही गेली शंभर वर्षे हैराण झालो असता गेल्या दहा वर्षात 'मंत्री रोग' म्हणून एक नवीनच व्याधी ह्या भल्या ट्रस्टी मंडळाने सुधारणेच्या नावाखाली सुरू केली आहे आणि तीही आमच्या सुधारणेच्या नावाखाली! परकीय ट्रस्टी आणि स्वकीय मंत्री ह्यांचा मिलाफ झाल्यामुळे आता काही धडगत नाही अशी हवालदील अवस्था आमची झाली आहे. नोकरशाहीची पोलादी चौकट आधीच काय कमी बळकट होती? तिलाच तेल रोगण लावून ठाकठीक ठेवण्यात आम्ही आमचे प्रतिनिधी म्हणून पाठवून दिलेल्या भरवशाच्या पुढाऱ्यांनी मंत्रिपदावरून सज्ज व्हावे ही कोण आपत्ती! अशा स्थितीत शेतकऱ्यांना आकाश फाटले असल्यासारखे झाल्यास काय नवल? हा देश म्हणजे शेतकऱ्यांचा, शेकडा ऐशींहून जास्त लोकांचा निर्वाह केवळ शेतीवर चालतो. अज्ञान, दारिद्र्य आणि असहाय्यतेच्या गाळात $\frac{८३}{१००}$ देशाचा गुंतला असता आम्ही थोडी शिकलेली दुबळी मंडळी स्वराज्याच्या काय गप्पा मारीत बसलो आहोत! इंग्रजी अमदानीत गिरण्या, गोद्या वगैरे मोठ्या भांडवलाचे धंदे सुरू झाल्याचे खेड्यातील कसदार तरुणांचा ओघ शहराकडे वळला आहे. खेड्यांत आणि लहान भांडवलाचे मारवाडी व ब्राह्मणादी पांढरपेशा जातीचे सावलीत सोकावलेले लोक अडाणी शेतकऱ्यास आपल्या सावकारी जाळ्यात गुंतवून त्यांच्या जमिनीचे आपण कर्ते मालक होऊन बसले आहेत. शेतकरीवर्ग आपल्याच शेतीवर खंडदार होण्याचीही ऐपत न उरल्यामुळे मजूर बनत चालला आहे. सतत फसवला गेल्यामुळे त्याची स्वत:चीही परंपरागत दानत आणि नीती बिघडून तो गांवगुंड बनू लागला आहे. मी गेल्या फेब्रुवारीच्या सुमारास ऐन हंगामाचे दिवसांत सांगली-जमखंडी संस्थानातील कृष्णातटाकावरील गावेच्या गावे आणि खेडीच्या खेडी एक महिनाभर हिंडत होतो. हा भाग पिकांविषयी प्रसिद्ध आहे. परंतु खेडीच्या खेडी शेतकरी मालकांच्या ताब्यातून स्वत: शेती न करणाऱ्या उपटसूळ लोकांच्या ताब्यात गेलेली पाहून माझे काळीज फाटले. संस्थानात शेतकऱ्यांच्या संरक्षणाचे कायदे नाहीत. व्याजाची दामदुप्पटची नव्हे तर पाचसहापट झाली तरी नवीन दस्तऐवज करून ब्राह्मण-मारवाडी सावकारांनी सबंध गावचे गाव बळकावल्याचे मी प्रत्यक्ष पाहिले.

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, समग्र वाङ्मय, खंड २ रा ~~~

२४

ब्राह्मसमाजाचा शतसांवत्सरिक उत्सव

तारीख १६ गुरुवार ऑगस्ट, १९२८ रोजी हौरा स्टेशनवर पोचलो. १८ शनिवारी ब्राह्मसमाज शतसांवत्सरिक उत्सव सुरू झाला. सायंकाळी प्रतिनिधीच्या स्वागतार्थ सभा झाली. मुंबईतर्फे उत्तर देण्याचे काम मजकडे आले. तारीख १९ ला दुपारी २ पासून रात्री ८ पर्यंत सर्व धर्मीयांची मजलस झाली. पार्शी, हिंदू, बौद्ध, ख्रिस्ती, मुसलमान व बहाई इतक्या धर्मांचे प्रतिनिधी पहिल्या अधिवेशनात बोलले. सर्वांत उत्तम भाषण मि. एस्. एच्. कोरेशी ह्यांनी बहाई धर्मावर केले. तारीख २० रोजी सायंकाळी सर पी. सी. रॉयचे अध्यक्षत्वाखाली ब्राह्म-समाजाचा संदेश ह्या विषयावर भाषणे झाली. सुरुवातीची प्रार्थना करणे मजकडे आले. ती मी इंग्रजीत केली. ती सतीशचंद्र चक्रवर्तीना फार आवडली असे ते मुद्दाम येऊन म्हणाले. पहिले भाषण माझेच झाले ते फार जोरात, थोडक्यात व निश्चित मुद्यांचे झाले. तारीख २१ सकाळी मीच उपासना चालवली. त्यात म्हटले, "प्रत्येकाने आपापला देव घडवला पाहिजे. पार्थिवपूजेत जशी नित्य नवी लिंगे करावी लागतात त्याप्रमाणे आम्ही आपला देव बनवावा. सत्य, ज्ञान, अनंत ही नावे आम्हीच देवास दिली आहेत. भक्तिविजयातील प्रथमाध्यायात देव भक्ताने कसा नावारूपास आणिला ते सांगितले आहे. "

कविसम्राट टागोर : तारीख २२ रोजी बंगाली भाद्रपद मासाची षष्ठी असल्याने हाच ह्या शतसांवत्सरिक उत्सवातील मुख्य दिवस होता. सकाळी ५।। वाजल्यापासूनच मंदिरात गर्दी जमू लागली. आज प्रसिद्ध कविवर्य डॉ. रवींद्रनाथ टागोर हे उपासना चालवणार होते. ८।। वाजता कविवर्य आले. मी त्यांना प्रथमच पाहिले. चेहरा अत्यंत सुंदर व गंभीर किंचित् औदासीन्याची छटा दिसली. प्राचीन ऋषिकालाची कल्पना मूर्त स्वरूपास आली. वेदी सर्व स्फूर्त झाली. वेदीभोवतीची मोठमोठी शुभ्र व लाल उत्फुल्ल गुलाबाची फुले विकसित होऊन कविवर्याचे उद्‌गार ऐकण्यास टपलेली होती असा भास झाला. खाली मान घालून कविवर्यांनी जे आसन घातले ते अर्धा तास वर पाहीचनात. आवाज अलगुजासारखा कोमल व हृदयप्रवेशी होता. मग पुढे विरल व अपांगदृष्टीने श्रोतृवृंदाकडे पाहात ते आपले प्रवचन वाचू लागले. त्यावेळी कमलनयन म्हणून काय चीज आहे ती अनुभवास आली. केशकलापांची शुभ्र शोभा गोधूमकांतीच्या भव्य कपाळावर विलसत होती. पिंगट रंगाचा रेशमी सैल सदरा असून त्यावर त्याच रंगाची चादर पसरली होती. सरल नासिका, विखुरलेली दाढी, पाणीदार दृष्टिविक्षेप, एकंदरीत एक दैवतचे पुढे दिसले. एक तास प्रवचन झाले. "ईश्वरी दयेला त्याच्या रौद्र स्वरूपाचे कोंदण लागते. विभूतीचे मोठेपण संकटाला सतत तोंड देण्यातच असते." हा प्रवचनाचा आशय होता. सर्व भाषण बंगालीत होते, तरी त्यात संस्कृत शब्दांची लयलूट असल्याने बरेच कळले. शेवटी लोकाग्रहास्तव कवींनी आपले एक लहानसे पद्य गाऊन दाखवले. हा प्रसंग शंभराव्या वाढदिवसाला शोभण्यासारखा झाला.

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, समग्र वाङ्मय, खंड २ रा ~~~

२५

पूर्व बंगालची सफर

तारीख १ सप्टेंबर रोजी बाबू हेमचंद्र सरकारने मजसाठी पूर्व बंगाल, उत्तर बंगाल, बिहार, संयुक्त प्रांत आणि पंजाब ह्या पाच निरनिराळ्या भागात शतसांवत्सरिका निमित्त प्रचार करून ह्या वर्षअखेर पुण्यास जावे असे ठरवले. माझे उतारवय, आज तीन महिने इन्ल्फुएंझाच्या व्याधीमुळे आलेली अशक्तता वगैरे अनेक कारणामुळे मी किंचित नाखुष होतो. पण बंगाल्याबाहेर पडण्याला कोणी बंगाली मिशनरी तयार होत नाही हे पाहून नाइलाजाने ते कार्य मला पत्करावे लागले. तरी ते मला आत्मिकदृष्ट्या प्रिय होते. पूर्व बंगाल्यांत संततधार पावसाळा, नद्यांना आलेले महापूर, मलेरिया, मला न रुचणारे अन्न, न समजणारी भाषा, ह्यावरुन निदान बंगाल्यातील कामातून जरी सुटका झाली असती तरी बरे झाले असते. पण तसे न होता इतर सात प्रचारकांना बरोबर घेऊन पूर्व बंगाल्यातील चितगांगपासून उत्तर बंगाल्यांतील दार्जिलिंगपर्यंत जावे, असे ठरले. (१) रमेशचंद्र मुकर्जी (२) बारिसालचे राजकुमार घोष व त्यांचा मुलगा जतींद्रकुमार, (३) अनिलचंद्र चौधरी, (४) सुधीरकुमार बोस, (५) बभ्रुवाहन ठाकूर, (६) माधवचंद्र विश्वास आणि मी असे आठ जण श्रियाळदास स्टेशनवरून निघालो.

बंगाल्यांतील महापूर : जेसोर जिल्ह्यांतील मलिहाट, मशीहाट व राजापूर खुलना जिल्ह्यातील मदारतोली, रुच्चिददाहा, जालोकाटी व कुरीयाना वगैरे बंगाल बॅकवर्ड क्लास मियानच्या ठिकाणी ही सफर नेऊन आम्ही ब्राह्म समाजाचा संदेश पोचवला. भैरव नदीला मलिहाटजवळ मोठा पूर आला होता. प्रभात, नदीप्रवाह व नदीकिनारी यांचा सुंदर देखावा दिसला. भात, अंबाडी, आळू, कोचुरीची राने माजली होती. खेडी किंचित उंचवट्यावर असल्याने तेवढीच पाण्यावर होती. बाकी सर्व जलमय दिसले. एका ठिकाणाहून १०० यार्डावरील ठिकाणी जाण्यास पडावाची जरुरी लागे शेतातील पिकांवर दहा दहा फूट पाणी पावसाळ्यात सतत चार महिने राहात असते. पिके मार्च-एप्रिलमध्येच पेरावी लागतात. पूर ओसरून गेल्यावर ती आपोआपच वाढलेली दिसतात. एक गाव सोडून दुसऱ्या गावी जाईपर्यंत तेथील मंडळी बायका-मुलांसहित आमची वाट पाहात उभी असत. टाळ, खोल (मोठे मृदंग), बाजाची पेटी इत्यादी भजनाची साधने असत. मोठा झेंडा व लहान लहान निशाणे प्रत्येकाचे हाती फडकत असत. होडीतून प्रवास करताना सतत भजन चालू असे. किनाऱ्यावर उतरल्यावर ठिकाणावर पोचेपर्यंत नगरसंकीर्तन सुरू होई. ठिकाणी पोचल्यावर उपासनेला सुरुवात होई. नंतर भोजन, संभाषण व भेटी वगैरे होत. हे सर्व पावसात भिजतच चालू असे.

एक कोनशिला-समारंभ : ह्या प्रांती मी दुसऱ्यांदा आलो होतो. माझा डिप्रेस्ड क्लासेस मिशनच्या कामाचा पुष्कळ परिचय ह्या प्रांती अगोदरच झाला होता. त्यामुळे मी जेथे जाई तेथे बंगाल्यातील

नम:शूद्र नावाच्या अस्पृश्य मानलेल्या जातीच्या बायकामुलांच्या झुंडीच्या झुंडी मला पाहण्यास येत. तारीख ५ रोजी माशाहाटी येथे अस्पृश्यांच्या हायस्कूलच्या इमारतीच्या पायाचा दगड बसवण्याचा सभारंभ होता तो माझ्या हस्ते झाला. त्यावेळी सुमारे २००० लोकसमुदाय लोटला होता. माझे हिंदीत भाषण झाले. हायस्कूलचे हेडमास्तर शरच्चंद्र मुझुमदार हे एकेकाळी नास्तिक होते; पण ब्राह्मसंगीत ऐकून ते एकेश्वरी झाले. लवकरच येथे ब्राह्म मंदिर उपस्थित झाल्यावर आपण तेथे आचार्याचे काम करू असे ते म्हणाले. दिवसा प्रचारकार्य करून आम्ही चांदण्या रात्री बोटीचा प्रवास करीत असू. पुष्कळ वेळा वाट माहीत नसल्याने प्रवसास विलंब लागे. सच्चिद्दाह येथे नम:शूद्रांची दोन हायस्कूले आहेत. काम आटोपून सकाळी ९।। वाजता बारिसाल जिल्ह्यातील जालोकाठी या गावी जाण्यास मोठी स्टीमर घेतली.

पूर्व बंगाल्यात बारीसाल, चितागाँग आणि कोमिल्ला ह्या तीन ठिकाणी सुसंघटित समाज आहेत. शतसांवत्सरिक उत्सवाचे एका सेक्रेटरीनी आमचे जसे संचारपथक करून पूर्व बंगाल्यात पाठवले होते. तसेच दुसरे एक पथक पश्चिम बंगाल्यात पाठवले होते ही दोन्ही पथके ठरलेल्या दिवशी ठराविक कार्यक्रम आटोपून डाक्का येथे जमणार होती. डाक्का ब्राह्म समाज कलकत्ता ब्राह्म समाजाच्या खालोखाल मोठा आहे पूर्व संकेताप्रमाणे मोठमोठ्या ब्राह्म समाजांनी आपापले ह्या सालचे वार्षिकोत्सव त्यांच्या गावी ही पथके जेव्हा येतील त्या वेळी ठरविले होते. त्यामुळे आम्हास ह्या मोठ्या गावी तीन चार दिवस तरी राहावे लागे. दरम्यान लहानसान ब्राह्म समाजास भेटी द्यावयाच्या होत्या.

राममोहन रॉयचे स्वप्न : बारिसाल समाजाने आमच्या पथकाशिवाय बाबू बिपिनचंद्र पाल ह्या मोठ्या वक्त्याला व राजकीय पुढाऱ्याला व ब्राह्म समाजाच्या सभासदाला मुद्दाम आमंत्रण करून आणवले होते. १८ सप्टेंबर, रोजी उत्सवाच्या शेवटच्या दिवशी ब्राह्ममंदिरात मोठी जाहीर सभा करण्यात आली. त्यावेळी " विश्वजननी धर्म " (Universal Religion) या विषयावर माझे व पालबाबूंचे सायंकाळी व्याख्यान प्रसिद्ध झाले होते. माझे प्रथम पाऊण तास इंग्रजी भाषण झाले. मी प्रथम महाराष्ट्रातील पंढरपूर संप्रदायाची संक्षिप्त माहिती सांगितली. मुंबई प्रार्थना समाजाने संत तुकारामास सुशिक्षितांच्या नजरेसमोर कसे आणले आणि विद्वानांकडून त्याला मान्यता कशी देवविली हे मी सांगितले. रोम शहरात पोपच्या राजवाड्याजवळ सिस्टाइन चॅपेल नावाच्या लहानशा दालनात मोझेसचा एक संगमरवरी भव्य बैठा पुतळा आहे. मायकेल अँजेलो या शिल्पकाराला हा पुतळा कोरण्यास चाळीस वर्षे लागली. मोझेसची मूर्ती अँजेलोच्या मनात अगोदर भरली होती. अशी त्याची प्रथम मनोमन मूस तयार झाल्यावर अँजेलोने संगमरवरी दगडाच्या ठोकळ्यांतून चाळीस वर्षे कलाकुसरी करून ती जणु पोखरून बाहेर काढली. जणु काय ती आत दडूनच बसली होती. तद्वत् ब्राह्म समाजाची ही मूस ईश्वराने राममोहन रॉयच्या मनात आधीच ओतली होती. ती पुढे राममोहन रॉयनी व अनेक ब्राह्म समाजाच्या बंधुभगिनीनी सकल बाह्म समाजीक कुसंस्काररूपी दगड दूर करून गेल्या शतकांत उघड केली. हे आविष्करण अद्यापि चालूच आहे. ताजमहालाचे स्वप्न शहाजहानास अगोदरच पडले होते. ते पुढे २०,००० माणसांनी २२ वर्षे खपून मूर्त स्वरुपास आणिले. बाह्म समाज हे राममोहन रॉयचे एक मानसिक संगमरवरी स्वप्नच होय. ईजिप्तातील मनोरे, हिंदुस्थानातील मोठमोठी देवळे, ही सर्व हजारो कैद्यांकडून व वेठीस धरलेल्या मजुरांकडून उभारलेली आहेत. ती त्यांच्या अन्यायाची स्मारकेच

सवाल केला. एका मुसलमान मुलाने राम मोहन हे नाव मोठ्या उत्साहाने सांगितले. मी उद्गारलो, "हा पाहा ब्राह्म धर्माचा विजय ! मुसलमान मुलासही राममोहनाचे नाव माहीत आहे !" (पण हिंदूना माहीत नव्हते याची वाट काय ?) तारीख २ ला चितागाँगला परतलो. येथे मला सनस्ट्रोक (मस्तिष्कताप) झाला. दासबंधूची मोठी कन्या अमिया हिने अर्धा तास थंड पाण्याची धार मस्तकावर धरून सुमारे एक तास वारा घालून मला बरे केले. तारीख ३ ऑक्टोबर रोजी पहारतली, तारीख ४ ला बरोमा, तारीख ५ ला फेनी या गावी जाऊन तारीख ७ रोजी नोआखली येथे आलो. फार पावसामुळे विशेष काम झाले नाही.

नोआखली : नोआखली हा जिल्ह्याचा गाव आहे. मेघनाद व पद्मा ह्या दोन नद्यांच्या आक्रमणामुळे ३/४ भाग वाहून गेला आहे. बाकीचाही त्याच पंथास लागला आहे. दक्षिण-पूर्व व काही उत्तर भाग भयाण, ओसाड व भिजलेल्या चिखलाचा, ८/१० मैलपर्यंत दिसतो. पात्राजवळ जाऊन पाहिले असता जमीन कात्रून पाण्यात टाकण्याचा नद्यांचा सतत उपक्रम नजरेस येतो. तेथे ब्राह्ममंदिर आहे. पण नगाराप्रमाणे मंदिरही कातरले जाऊन जवळजवळ ओस पडले आहे. रायबहादूर राधाकांत आईस हे एकटेच ब्राह्म. तेहि अनुष्ठानिक नाहीत. हे आमच्यासाठी कोमिल्लाहून आपल्या चिरंजिवाचे येथे आले होते. ब्राह्म समाज म्हणजे वकील, डॉक्टर, सरकारी अधिकारी वगैरे उपऱ्या सुशिक्षितांचा, स्थानिक फारच कमी. हे शाळूसोबती चोहीकडे पांगून मंदिरे ओस पडल्याची उदाहरणे उत्तर प्रांतात तर आहेतच, पण खुद्द बंगाल्यात तर अधिकच आहेत. तारीख ८ ऑक्टोबरला रात्री ७ वाजता कोमिल्ला येथे पोचलो.

माझे बंगालीत भाषण : सायंकाळी मला नित्याप्रमाणे थकवा व कणकण भासली. त्यावरून आज तीन महिने माझ्या मनावर व शरीरावर जो ताण पडत आहे तो आता कमी केला पाहिजे असे मला वाटते. पण व्याख्यानात उभे राहल्यावर मी हे सर्व विसरतो. सायंकाळने व्याख्यान इतके वठले की, दुसऱ्या दिवशी गावच्या मंडळीनी येऊन दुसरे व्याख्यान देण्याचा आग्रह केला. विषय World and Work of Brahma Samaj हा होता. प्रथम बंगालीत मी पाच-सात मिनिटे बोललो. अशा तऱ्हेने परकीयाने स्वभाषेत नांदी केल्याने श्रोतृवृंद खूष होतो.

उल्हास दत्त : पूर्व बंगाल हा जहाल राष्ट्रीयतेचा प्रांत आणि कोमिल्ला हे ठिकाण त्याचा आत्मा. तेथे मला उल्हास दत्त हे ज्वलज्जहाल तरुण भेटले. हे तरुण विद्यार्थी असताना आमच्या घरी मुंबईस यांचा फार घरोबा असे. क्रांतिकारक चळवळ करून ते अंदमानची ५/६ वर्षे हवा खाऊन आले होते. मला भेटताच त्यांनी मोठ्या आग्रहाने आपल्या घरी मातापितरांकडे नेले. बाप जहाल मताचा सुधारक असूनही वेदाचा अभ्यासी होता. आई साधीभोळी व प्रेमळ होती. तिने माझ्या आईची आठवण करून दिली. माझ्या आईने उल्हासला खाऊ घातले होते. म्हणून त्याच्या आईने मला गोडगोड जेवण खाऊ घातले.

अभयाश्रम : १० ऑक्टोबरला अभयाश्रम नावाची प्रसिद्ध नमुनेदार संस्था पाहिली. गावाबाहेर सुमारे २ मैलावर ७ एकर जमीन देऊन तेथे सुदंर निरनिराळ्या पर्णकुट्या बांधल्या आहेत. १०/१२ विद्वान तरुण राष्ट्रकार्यास सर्व जिवित अर्पण करून ब्रह्मचर्यव्रत घेऊन राहिले आहेत. खादीचे मुख्य भांडार व प्रसार येथून होतो. खादी रंगवण्याचे काम येथेच चालते. महात्मा गांधीची बहुतेक तत्त्वे येथे पाळण्यात येतात सर्व वातावरण अध्यात्मिक, निर्भय व स्वाधीनतेचे आहे. मोठे मोठे

२६

हिमाचल-निवास

कर्सिआँग : दार्जिलिंगहून रा. ब. शरच्चंद्र दास मला घेण्यास स्टेशनवर आले होते. स्टेशनजवळच ब्राह्ममंदिरात माझी उतरण्याची सोय केली होती. बाबू हेमचंद्र सरकार यांची पत्नी लावण्यप्रभा बोस (माहेरचे नाव), ही (प्रसिद्ध शास्त्रज्ञ जगदीशचंद्र बोस यांची बहीण) हिचे हे घर होते. हे तिच्या मागे सुमारे रु. १४,००० किंमतीचे घर बाबू हेमचंद्रांनी कर्सिआँग येथील ब्राह्म समाजास दिले आहे. येथून खाली खोल दरीचा देखावा फारच सुंदर दिसतो. टीस्टा नदीचा आणि आमच्या पायाखालील मेघांचा विलास चांगला दिसतो. तिसरे प्रहरी बाबू हेमचंद्र व त्यांची मानसकन्या शकुंतला ही आली. तारीख १५ ऑक्टोबरला इंग्लडचे पाहुणे डॉ. ड्रमंड दार्जिलिंगहून आले. त्यांच्या व्याख्यानास २०/१५ माणसेच हजर होती. घरे लांब व वस्ती उपरी म्हणून ही अवस्था !

घूम : माझी गाडी सायंकाळी ५ वाजता घूम स्टेशनवर आली. हे जगातील अतिशय उंचीवरचे म्हणजे ७४०७ फूट उंचीवरचे आगगाडीचे स्टेशन होय. धुक्याने दिशा धुंद झाल्या होत्या. कडाक्याची थंडी पडली होती. ५।। वाजता दार्जिलिंगला पोचलो. देवदाराच्या झिपऱ्या झाडांनी भरलेला तो प्रशांत गंभीर देखावा मी कधी विसरणार नाही !

दार्जिलिंग ब्राह्म समाज : तारीख १६ ऑक्टोबर, काल संध्याकाळी रा. सा. शरच्चंद्र दास ह्यांचे घरी पाहुणा झालो. यजमानीण व मुलेमुली फार अगत्यशील होती. रायसाहेब बाहेरगावी गेले होते. आज सकाळी ब्राह्म समाजात पहिली उपासना मी चालवली.

दार्जिलिंग हा गाव बंगाली श्रीमंत आळशांचा व खुशालचंदाचा आहे. गव्हर्नराचे व इतर श्रीमंताचे हे उन्हाळ्यातील हवा खाण्याचे स्थळ आहे. अर्थात श्रीमंत ब्राह्मो समाजिस्ट येथे, ऐटदार घरे करून राहतात. ज्ञान, भक्ती व कर्म ही तिन्ही ब्राह्म समाजात पाणी भरीत आहेत, हे सर्व खरे; पण मोक्षाची गोष्ट निराळी, मोक्षधर्म पाहावयाचा असल्यास तो कोठे तरी बाहेरच पाहावयास पाहिजे. निदान तो दार्जिलिंगमध्ये तरी दुर्मिळ! पाश्चात्य आसुरी संस्कृतीने येथे हिमालय विटाळलेला आहे. केरळकन्येने मच्छिंद्रनाथास योगभ्रष्ट केले, मेनकेने विश्वमित्रास तपोभ्रष्ट केले तसे येथे पाश्चात्य सुधारणेने हिमालयास भ्रष्ट केल्याचा भास होत आहे.

तारीख १८ स तिसरे प्रहरी टाऊन हॉलमध्ये सामाजिक संमेलन झाले. सुमारे १०० निवडक स्त्रीपुरुष जमले होते. बनारसहून आलेले बाबू दुर्गाप्रसाद, ऑनररी मॅजिस्ट्रेट ह्यांची व ह्यांच्या पत्नीची ओळख झाली. ह्या दंपतीने मला बनारस शहरी येण्याचा फार आग्रह केला. तारीख १९ ला मी, हेमचंद्र व त्यांची कन्या शकुंतला पुन्हा कर्सिआँगला आलो. येथे सुमारे एक आठवडा विश्रांती निरीक्षण व चिंतन यात घालवला.

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, समग्र वाङ्मय, खंड २ रा ~~~

२७

सत्याग्रह व तुरुंगवास

प्रसिद्ध दे. भ. श्री. बाळुकाका कानिटकर यांनी खालील टिपणे पाठवली आहेत :--

" (१) हरिभाऊ फाटक व बाळुकाका कानिटकर यांनी श्री. विठ्ठलरावांना भेटून १९३० च्या एप्रिल महिन्यात कायदेभंग चळवळीत पुढारीपण घेण्याची विनंती केली ती त्यांनी मान्य केली. लगेच श्री. केशवराव जेधे हे ही ह्या चळवळीत सामील झाले. (२) कर्मवीर शिंदे यांनी पुणे जिल्ह्यात खेडोपाडी पायी दौरा काढला. त्यांचे पथकाबरोबर श्री. हरिभाऊ पाठक, श्री. हरिभाऊ तुळपुळे, श्री. पोपटलाल शहा ही मंडळी मधूनमधून जात असत. ह्या दौऱ्याचा खेडेगावी फार परिणाम झाला. व्याख्यान, पोवाडे वगैरेंच्या साहाय्याने हा प्रचार झाला. खेडेगावातील मंडळींनी ह्या लोकांचे उत्साहाने स्वागत केले. जेवणखाण वगैरेंची सोय आपोआप न सांगता जागोजाग लोक स्वयंस्फूर्तीने करीत. (३) शिंदे आठवड्याचे शेवटी पुण्यास परत येऊन पुन्हा दौऱ्यावर जात. पुण्यास बाळूकाका कानिटकर हे चळवळीचे सर्वाधिकारी नेमले गेले होते. त्यांना सर्व प्रकारे उत्तेजन देऊन श्री. शिंदे व इतर पुढारी ह्यांनी महत्त्वाची मदत केली. पुण्याहून बाहेरगावी ठिकठिकाणी जाणाऱ्या सत्याग्रही तुकड्यांना निरोप देण्याचे समारंभ रा. शिंदे ह्यांचे अध्यक्षतेखाली अनेक वेळा होत असत. त्या वेळी श्री. शिंदे ह्यांच्या पत्नी समक्ष हजर राहून जाणाऱ्या सत्याग्रह्यांना नारळ व आशीर्वाद देत. (४) कानिटकर ह्यांचे वाड्यातच प्रथम सत्याग्रह शिबिरे होते. तेथे क. शिंदे, श्री. तात्यासाहेब केळकर, श्री. हरिभाऊ फाटक, श्री. हरिभाऊ तुळपुळे, संगमनेरचे श्री. रामकृष्ण दास वगैरेंची बैठक होऊन महाराष्ट्रात जंगल सत्याग्रह करण्याचे ठरले. प्रभातफेरी जशी पुण्याने सुरू केली तशीच जंगल सत्याग्रहाची कल्पना पुण्यानेच उचलून धरली व ती सबंध बृहन्महाराष्ट्रभर कालांतराने, वणव्याप्रमाणे पसरली. कानिटकर यांनी हजार सत्याग्रही निरनिराळ्या युद्धक्षेत्रावर पाठवल्यानंतर त्यांना ३० एप्रिल १९३० रोजी सरकारने पकडले."

एप्रिल महिन्याच्या तिसऱ्या आठवड्यात सोमवारी सकाळी मी हवेली तालुक्यातील पहिल्या दौऱ्यावर निघालो. बरोबर दहा पंधरा तरुण स्वयंसेवकांची तुकडी होती. सत्याग्रहाचा मोठा झेंडा पुढे फडकत होता. बाजाची पेटी, टाळ आणि प्रभातफेरीची पद्मावली प्रत्येकाच्या हाती होती. एक डफ-तुणतुण्यांसह पोवाडेवाल्यांचा ताफा बरोबर होता. पुण्याच्या हद्दीवर फर्ग्युसन कॉलेजच्या समोर प्रथम झेंडावंदन झाले.

दौरा : हा दौरा प्रथम पुण्याजवळील दापोडी गावी गेला. तेथून प्रत्येक खेडेगावात प्रथम प्रभातफेरी म्हणत उभ्याउभ्याच व्याख्याने देत पुढच्या गावी जात असू. दोन प्रहरी एखाद्या गावी जेवण्याचा बेत आधीच ठरलेला असे. स्नान वगैरे आटोपल्यावर जेवण्यास वेळ असेल तेव्हा पोवाडे सुरू होत. चिंचवड, देहू, आळंदी, चऱ्होली, लोणी, लोहगाव वगैरे लहानमोठी सर्व गावे करून

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, समग्र वाङ्मय, खंड २ रा ~~~

भास्करराव म्हणाले, "अहो, काय बाहेर वणवा पेटला आहे. शहरातून आणि खेड्यातून सारखीच धामधूम चालली आहे." "असे जर आहे तर आम्हाला येथेच राहू द्या" मी म्हटले. "मी येथे येण्यापूर्वी जर तुम्ही मनात आणले असते तर मी येथे आलोही नसतो. येथे आल्यावर मला बाहेर नेण्याचे मनात आणून काय उपयोग ?" असा एकमेकांच्या मनातला भाव एकमेकास कळल्यावर, मग ब्राह्मणेतर पक्षाविषयी बोलणे सुरू झाले. "ब्राह्मणेतर पक्षाची संघटना चांगली होत नाही, काम होत नाही" वगैरे वगैरे माझी स्पष्ट मते मी सांगितली. एकंदरीत हे संभाषण आणि ही भेट मला आंधळ्या कोशिंबिरीप्रमाणे वाटली.

तुरुंगातील दिनचर्या : 'सी' क्लास व 'बी' क्लास यातील फरक असा आहे. 'सी' क्लासच्या कैद्यांना सकाळी १ वाडगाभर जोंधळ्याची कांजी मिळते. मग १० वाजता १ किंवा २ बाजरीच्या भाकरी आणि मुगाची आमटी. संध्याकाळी ५ वाजता पुन्हा तेच जेवण मिळते. नेसावयास खादीचे दोन मांडचोळणे व दोन सदरे मिळतात. निजावयास एक काथ्याचे तरट व दोन कांबळी. 'बी' क्लासला कांजीच्या ऐवजी सकाळी ७ वाजता अर्धा शेर दूध, १० वाजता चपाती, भात, वरण, एक भाजी, लोणी व साखर. संध्याकाळी ५ वाजता तेच जेवण. दोन्ही क्लासला चटणी वगैरे काही तिखट मिळत नाही. 'बी' क्लासला नेसावयास ठराविक धोतराची पाने, अंगात दोन सदरे, डोक्यास खादीची गांधी टोपीसारखी टोपी. निजावयास एक गादी, एक चादर, एक उशी आणि अंथरावयास दोन कांबळी. भांडी 'सी' क्लासला १ उथळ वाडगा व १ कथलाचे टमरेल एवढीच भांडी मिळतात. 'बी' क्लासला ॲल्युमिनियमचे ताट, तांब्या, दोन वाडगे ही भांडी मिळतात. कैद्यांनी ही भांडी वरचेवर स्वछ ठेवावीत अशी ताकीद मिळे व त्याची तपासणी होत असे. रोज सकाळी डॉक्टर येऊन कैद्यांची तपासणी करीत असे. रोग्यास औषध आणून देत. 'बी' क्लासला खोलीतच औषध मिळे. 'सी' क्लासला दवाखान्यात जावे लागे. आजार गंभीर असल्यास रोग्याची तुरुंगातील हॉस्पिटलात रवानगी होई. दर आठवड्याला स्वत: जेल सुपरिटेंडेंट येऊन प्रत्येक कैद्याची तपासणी करून काही गरजा, अडचणी असल्यास ऐकत असे. त्याच्याबरोबर जेलर, असिस्टंट जेलर, वॉर्डर वगैरे असत. एक असिस्टंट जेलर रोज कैद्यास येऊन भेटून जात असे. ही सर्व बडदास्त राजकीय 'बी' कैद्यांसाठीच असे. 'बी' क्लासचे सगळे कैदी एकाच वॉर्डात ठेवण्यात आले होते. त्यांना एकमेकांच्या खोलीत जाण्यास मनाई असे ; पण व्हरांड्यात किंवा अंगणात बोलण्यास हरकत नसे.

तुरुंगातील कामे : 'बी' क्लासच्या सक्तमजुरीच्या कैद्यांना काथ्याची जुनी तरटे उकलणे आणि उकललेल्या काथ्याची पुन्हा नवीने दोरखंडे बनवणे हे काम सकाळी सातपासून १० पर्यंत व दुपारी १२ पासून ४ पर्यंत असे एकंदर ७ तास असे. 'सी' क्लासला बाहेरची कष्टाची कामे मिळत व धड्याकड्या माणसास चक्की मिळे. म्हाताऱ्या माणसांना सवलतीने काम मिळे. पण काथ्या वळण्याचे काम फार श्रमाचे नसल्याने माझे वय ५८ वर्षांचे होते तरी माझ्या आणि माझ्याबरोबरीच्या इतर तरुण कैद्यांच्या कामात काही फरक होत नसे. नित्य उठून ह्या प्रकाराशिवाय दुसरा कोणताही व्यवसाय नसल्याने कैद्यांच्या मनात उदासीनता येत असे. आमच्या दालनाच्या समोरील अंगणात पूर्व बाजूस एक कलमी आंब्याचे ठेंगणे झाड व पश्चिम बाजूस एक लिंबाचे झाड हिरव्यागार पालवीने वाकलेले दिसे. वरचेवर आम्ही त्याच्याजवळ जाऊन आमच्या मनाची उदासीनता घालवीत असू. दर पंधरवड्याने आमची वजने घेण्यात येत असत. ता. १०-८-३० रोजी माझे १४४ पौंड वजन भरले. तीन महिन्यात माझे १२ पौंड वजन कमी झाले.

आमच्या बोलण्यात राजकारण नसल्यामुळे आमच्या उपासनांकडे व व्याख्यानांकडे जेलर कानाडोळा करू लागले.

अॅडव्हायझरी कमिटी : प्रत्येक तीन महिन्यांनी एक अॅडव्हायझरी कमिटी तुरुंग पाहण्यास येत असे. जून व सप्टेंबर महिन्यात ही कमिटी आली. मि. मॅकी, कमिशनर व त्यांच्यासह सात-आठ युरोपियन व हिदी गृहस्थ बसले होते. ही माणसे आम्ही जणु काय प्राणिसंग्रहालयातील प्राणीच आहोत, अशा समजुतीने पाहून जात. कोणी काही व कसलीही विचारपूस करीत नाहीत. मग ह्या कमिटीचा उपयोग काय? दुसऱ्या कोणाजवळ न थांबता मजसमोर सर्वांना आणले. जणु काय संग्रहालयातील मी म्हणजे अतिशय प्रेक्षणीय प्राणी. हिस्ट्री तिकिट नावाचे लहानसे पुस्तक प्रत्येक कैद्याच्या नावे असते. त्यात त्याचे वर्तन, वजन, दिनचर्या नमूद केलेली असतात. माझे तिकिट कमिटीच्या मुख्य साहेबाने पाहिले. मंडळी मुक्याचे व्रत पाळून आली तशी गेली.

मी येथे ता. १२ मे रोजी आल्यापासून तुरुंगाधिकाऱ्याकडे लेखनसाहित्याची मागणी केली. एक महिन्याने मागणी सफल झाली. टाक असला तर दौत नाही, दौत असली तर शाई नाही, आणि हे सर्व असले तर दिवा नाही असा प्रकार नेहमी चालू असे. ता. २४ जुलै रोजी माझ्या खोलीत दिव्याची व्यवस्था करण्यात आली. अडीच महिन्यांनंतर मिळणाऱ्या दिव्याच्या प्रकाशाकडे पाहून मला आनंद झाला. तो इतका की लिहण्याचे सोडून मी दिव्याकडेच पाहात बसलो. त्या दिवसापासूनच मी माझी रोजनिशी व बाळपणीच्या आठवणी लिहू लागलो.

मुक्तता : ता. १३ ऑक्टोबर १९३० ला मी व बाळूकाका अंगणात शतपावली करीत असता आमचा वॉर्डर सखाराम तुकाराम धाकटे (एक मराठा जातीचा खुनी कैदी) एकदम मजकडे येऊन माझ्या पाया पडून रडू लागला. आपण वॉर्डर या नात्याने थोडेसे कडक वागवल्याबद्दल पश्चात्ताप झाला एवढेच तो म्हणत होता. मला मागाहून कळले की, माझी सुटका ता. १४ रोजी होणार होती हे त्याला आधी कळले होते. पण ते त्याला मला कळविण्याचा अधिकार नव्हता. ह्या शिस्तीमुळे मी त्यास पुन्हा भेटणार नाही म्हणून त्याचे हे रडे होते.

ता. १४ ऑक्टोबर १९३० रोजी सकाळी उठल्याबरोबर जमादारांनी येऊन मी सुटलो, म्हणून सामानाची तयारी करून लवकर ऑफिसात येण्याची वर्दी दिली. पुणे शहर काँग्रेस कमिटीचे चिटणीस श्री. जोशी हेही मजबरोबरच सुटले. माझी डायरी व लेख तपासून काही आक्षेप निघतील की काय अशी मला भिती होती ; पण तसे काही झाले नाही. ८ वाजण्याचे सुमारास आम्ही बाहेर पडलो.

एकंदरीत सर्व अधिकाऱ्यांनी माझ्या तुरुंगवासात मला बरे वागवले. मध्यंतरी एका तरुण युरोपियन जेलरने तुरुंगाच्या नियमांची सबब सांगून माझी दाढी व डोकीवरचे केस काढण्याचा घाट घातला होता. "पण ती कधी निघावयाची नाही" असा मी त्यास निक्षून जबाब दिला म्हणून ते प्रकरण कसेबसे निपटले.

मी सकाळी ९-१० च्या सुमारास घरी पोचलो. दुसरे दिवशी रे मार्केटात जाहीर सभा भरवून माझे अभिनंदन करण्यात आले. शेवटी माझ्या गळ्यात हार घालताना मी म्हटले, "आता कायदेभंग

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, समग्र वाङ्मय, खंड २ रा ~~~

२८

साहित्यसेवा

आतापर्यंत मी माझ्या क्रियात्मक सेवेच्या आठवणी दिल्या. साहित्यसेवेविषयी काही उल्लेख न केल्यास या ग्रंथास अपूर्णत्व येईल म्हणून या प्रकरणी त्याचा संक्षेपाने उल्लेख करणे भाग आहे. माझे सर्व आयुष्य परिश्रमाचे काम करण्यात गेल्यामुळे मोठमोठे ग्रंथ तयार करण्याकडे मला वेळच मिळाला नाही. तथापि प्रवासवर्णने, इतिहाससंशोधन, तत्त्वविवेचन, धर्मोपदेश वगैरे विषयावर माझी जी व्याख्याने झाली ती समग्र लिहून काढून तत्कालीन वर्तमानपत्रातून आणि मासिक पत्रातून प्रसिद्ध करण्यात आली आहेत. ह्याशिवाय निरनिराळ्या परिषदात आणि अध्यक्षपदावरून केलेली विस्तृत भाषणे वर्तमानपत्रातून प्रसिद्ध होऊन शिवाय पुस्तकरूपाने छापण्यात आली आहेत. विलायतेतील प्रवास, हिंदुस्थानातील प्रवचने आणि व्याख्याने ही सर्व एकत्र करून माझे मित्र रा. बी. बी. केसकर यांनी स्वतंत्रपणे पुस्तकरूपाने छापली. ती पुस्तके इंदुप्रकाशकारांनी आपल्या वर्गणीदारास १९३२ साली मोफत वाटली.

मराठा विद्यार्थी भ्रातृमंडळ पुणे, ह्या मंडळापुढे "सुशिक्षित मराठ्यांची कर्तव्ये" ह्या विषयावर माझे विस्तृत व्याख्यान झाले. ते इंदुप्रकाशात, जून १९१४ स ता. २३ ते २६ अखेर प्रसिद्ध झाले आहे. त्यात दिलेली आकडेवारी आणि केलेल्या सूचना महत्त्वाच्या आहेत. स्वतंत्र पुस्तकरूपानेही हे व्याख्यान प्रसिद्ध झाले आहे.

मी तरुण असताना ललितवाङ्मय लिहिण्याच्या विचारात होतो. एका सामाजिक कादंबरीची योजनाही मी करून ठेवली होती. पण कार्यबाहुल्यामुळे वेळ मिळाला नाही. माझा आवडीचा विषय इतिहास. त्यावर मात्र मी वेळोवेळी व्याख्याने दिली आहेत.

१९२३ साली डिप्रेस्ड क्लासेस मिशनच्या कामातून मी निवृत्त झालो. त्यानंतर माझ्या साहित्यसेवेच्या इच्छेने उचल खाल्ली. हिंदुस्थानचा इतिहास म्हणजे आर्यांचा इतिहास. आर्यांच्या आगमनापासून हिंदुस्थानच्या इतिहासास सुरुवात झाली वगैरे वगैरे भ्रामक कल्पना जाड्या जाड्या विद्वानांमध्येसुद्धा अजूनही दिसतात. आर्यांच्या पूर्वीही हिंदुस्थानात द्राविड आले. ते पश्चिमेकडून आले. त्यांच्याही पूर्वी हिंदुस्थानात मोगल (कोल = कोळी वगैरे) आले. हिंदुस्थानभर त्यांनी वस्ती केली. त्या विषयावर निरपेक्ष रीतीने संशोधन करण्याची जरुरी आहे असे वाटल्यावरून आर्य-द्राविड वाद ह्या विषयावर १९२५ सालच्या सुमारास, नाशिक, कोल्हापूर वगैरे ठिकाणी जाहीर व्याख्याने दिली. ती विषयाच्या नाविन्यतेमुळे, सामान्य जनांस रुचत नसत. ता. २१ जाने. १९२५ च्या Indian Daily Mail ह्या इंग्रजी दैनिकात व त्याच सुमारास Indian Social Reforomer मध्ये व मद्रासच्या Justice ह्या इंग्रजी दैनिकात ह्या विषयावरील माझे संशोधनात्मक लेख प्रसिद्ध झाले आहेत.

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, समग्र वाङ्मय, खंड २ रा ~~~

अंधश्रद्धा माजून धर्माला विकृत स्वरूप प्राप्त झाले. हे विकृत स्वरूप देवीभागवत आणि शिवभागवतातच नव्हे, तर बौद्ध आणि जैन धर्मातूनही प्रगट झाले. मंदिरे व मूर्ति ह्या तर जैनांनीच प्रथम प्रचारात आणल्या. शैवांनी व शाक्तांनी आणि पुढे वैष्णवांनी त्याचे अनुकरण केले. त्यामुळे सर्वांचाच बिघाड झाला. वेदांमध्ये मूर्तिपूजेला बिलकूल वाव नव्हता. तथापि प्राचीन आर्यांमध्ये व द्रावीडांमध्ये शिल्पशास्त्राचा व वास्तुशास्त्राचा प्रचार बराच होता. ऋभू नावाच्या ब्राह्मण रथकारांना तर वेदकाली अगदी देवासारखा मान होता. त्यांनी इंद्रास दोन पिवळ्या रंगाचे घोडे आणि अश्विनीकुमारास एक हलकासा पृथ्वीभोवती फिरणारा रथ करून दिला. ते मोठे कारागीर होते. उद्याने, विमाने, यंत्र, किल्ले, विहिरी, कवच, आयुधे वगैरे करण्यात ते फार पटाईत असत. [विश्वंभर वास्तुशास्त्र]

विश्वब्राह्मणाचा इतिहास नावाच्या बाळशास्त्री क्षीरसागर ह्यांनी लिहिलेल्या ग्रंथात ह्याविषयी बरीच मनोरंजक माहिती आहे. ह्या ब्राह्मणांनी धर्माला लौकिक स्वरूप आणून दिले आणि त्यामुळे ज्ञान, भक्ती, कर्म, वैष्णव वगैरे धर्माची मोक्षदायक मूलतत्त्वे मागे पडून, ब्राह्मक्रियेची बजबजपुरी वाढली. ह्यातच मंत्र आणि तंत्राची भर पडली. मंत्राने धर्माचरणावर संक्षेप बसला व धर्माला गूढ स्वरूप प्राप्त झाले. जेथे मंत्र सांगण्याची अक्कल सांगणाऱ्यांमध्ये व ऐकणाऱ्यांमध्ये उरली नाही तेथे तंत्र निघाले. तंत्र म्हणजे काही तरी भ्रम उत्पन्न करणारे बाह्य उपचार.

दैवाधीनं जगत् सर्व मंत्राधीनं तु दैवतम् ।
तन्मंत्रं ब्राह्मणाधीनं ब्राह्मणो मम दैवतम् ।।
भूताना प्राणिनः श्रेष्ठाः प्राणिनां बुद्धिजीविनः।
बुद्धिमत्सुवराः श्रेष्ठाः नरेषु ब्राह्मणाः स्मृतः ।।

मनुस्मृति १--९६

मांत्रिकाची आणि मूर्तिकारांची दुकानदारी, तांत्रिकांचा वाममार्ग, पुराणांनी केलेला इतिहासाचा विपर्यास ह्या सर्वांचा परिणाम घडून हिंदुस्थानातील धर्म म्हणजे एक विचित्र मायपोट होऊन बसले. बौद्ध धर्म हिंदुस्थानातून गेला. जैनधर्माची प्रगती खुंटली. बाकी उरलेल्या वैष्णव, शाक्त आणि शेष ह्या सर्वच पंथांची अवनती झाली.

चवथे व्याख्यान प्रार्थनासमाजात १८ जुलै, १९२५ रोजी झाले. त्यात हिंदुधर्माचे पुनरुज्जीवन व सुधारणा झाली. ती महाराष्ट्र भागवत धर्माने म्हणजे पंढरपूरच्या वारकरी संप्रदायाने कशी केली हे मी सांगितले. ज्ञानेश्वरांपासून तुकारामांपर्यंत वारकऱ्यांनी हिंदू धर्म चोखाळला व तो लोकसत्तात्मक केला हे मी विशद करून सांगितले.

पाचवे व्याख्यान प्रार्थनासमाजात ३१ ऑगस्ट, १९२५ रोजी झाले. त्यात दक्षिणेकडील लिंगायत धर्म, उत्तरेकडील शीखधर्म आणि पूर्वेकडील चैतन्यांचा वैष्णवधर्म ह्यांनी हिदुधर्माची सुधारणा कशी केली ही सांगितले. ह्यानंतर युगांतर झाले. पाश्चात्य सुधारणेचा हिंदुस्थानात प्रवेश झाला. ब्राह्म आणि प्रार्थनासमाज, आर्यसमाज, थिऑसफी, विवेकानंदांचे रामकृष्ण मिशन वगैरेंचे हिंदुधर्माची उजळणी करण्याचे प्रयत्न महशूरच आहेत. त्यांचे प्रयत्न अद्यापि चालू असल्यामुळे त्यांचा परामर्श मी माझ्या व्याख्यानात घेतला नाही.

साहित्यसंमेलने : मी महाराष्ट्र साहित्य संमेलनास बऱ्याच वेळा हजर होतो. १९३० च्या डिसेंबर महिन्यात नागपूर येथे हे संमेलन भरले. त्या वेळी इतिहासाचे प्रदर्शन मांडले होते. ते उघडण्याचा समारंभ माझ्या हस्ते करण्यात आला. न्यायमूर्ती आणि नागपूर युनिव्हर्सिटीचे कुलगुरु रा. नियोगी हे अध्यक्षस्थानी होते. त्यांनी मजसंबंधी मोठे गौरवपर भाषण केले. मी सांगितले, "इतिहासङ्मय आणि ललितवाङ्मय ह्यात मोठा फरक आहे. इतिहास लिहिण्यात भावना वर्ज्य कराव्या लागतात तर लालित्यात भावना आवश्यक असतात. १९३५ साली हे संमेलन नाताळात बडोद्यास भरले. त्या वेळी संमेलनातील विचारासाठी निरनिराळ्या विषयांसाठी निरनिराळ्या शाखा करून प्रत्येक शाखेवर स्वतंत्र उपाध्यक्ष नेमण्यात आला होता. 'धर्माचे तत्त्वज्ञान आणि समाजशास्त्र' ह्या शाखांचा उपाध्यक्ष मी होतो पण ही योजना फारशी यशस्वी झाली नाही. संमेलनाचे लक्ष कोणत्याही गंभीर विषयाकडे नसते. बहुतेक तरुण मंडळींचे लक्ष अश्लीलतेच्या ठरावाकडे लागून राहिलेले असते. ह्या नेहमीच्या अनुभवावरून मी पुढे संमेलनास कधी गेलो नाही.

समारोप : आता मी माझ्या वाचकांची रजा घेतो. माझ्या अत्यंत दुबळ्या अवस्थेकडे पाहिले असता इतक्या पानांचा मजकूर मी कसा सांगितला ह्याचे माझे मलाच आश्चर्य वाटते. दृष्टी अतिशय मंदावलेली. हात कंपवायूने सदैव कापत असत. त्यामुळे वाचन फार दुर्घट झाले. लिहिण्याचा प्रश्न तर दूरच राहिला. स्मरणशक्तीही बरीच क्षीण झालेली. ह्यामुळे ह्या सर्व लिखाणाचे श्रेय माझे धाकटे चि. कुमार रवींद्र यांचेकडेच आहे. हे मला आनंदाने नमूद केले पाहिजे. अनेक जुन्या रोजनिशा, हस्तलिखित पत्रे, वर्तमानपत्रातील व मासिकातील कात्रणे वगैरे वगैरे सामुग्रीचा ढीग अस्ताव्यस्त रीतीने पडलेला. त्यातून विषयाला लागू असे लिखाण शोधून काढण्यास दिवसचे दिवस लागत. मित्रांकडून इतर माहिती गोळा करणे आणि पुणे शहरातील परिचितांकडे हेलपाटे घालणे वगैरे दगदगीची कामे चि. रवींद्राने मोठ्या हौसेने आणि तितक्याच चिकाटीने केली. पुष्कळ वेळा मी गळून पडलो तरी मोठ्या विनयाने त्याने मला उत्साहाचा दम भरला. हे सर्व करीत असता स्वत: रवींद्राची तब्येतही बरोबर नव्हती. तरीही त्याने हे श्रम घेतले ही विशेष गोष्ट आहे. सामुग्री पुरवण्याचे कामी, प्रकृतीची क्षीणावस्था व उतारवय असताही माझे मित्र श्री. बी. बी. केसकर ह्यांनी जे परिश्रम घेतले त्याबद्दल मी त्यांचा फार ऋणी आहे.

●●●

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे समग्र वाङ्मय

खंड २ रा : आत्मपर लेखन

विभाग तिसरा

प्रवासवर्णन

अनुक्रमणिका

विभाग तिसरा

१.	जलप्रवास	..	..	६२१-६३२
२.	मार्सेय शहर	..	..	६३३-६३६
३.	पॅरीस शहर	..	..	६३७-६३८
४.	नॉटर डेम द ला गार्ड देऊळ व ते पाहून सुचलेले विचार		..	६३९-६४१
५.	लंडन शहर	..	..	६४२-६४४
६.	ब्रिटिश म्युझिअम	..	..	६४५-६५०
७.	लंडन येथील बालहत्यानिवारक गृह	..	..	६५१-६५४
८.	सोमयागाचे वर्णन वाचून वाटलेला विस्मय व विषाद	..	..	६५५-६५७
९.	डेव्हनपोर्ट येथील गुड फ्रायडे	..	..	६५८-६६०
१०.	बोअर युध्दाचा शेवट व ऑक्सफर्ड येथील उल्हास	..	..	६६१-६६४
११.	राष्ट्रीय निराशा	..	..	६६५-६६६
१२.	बर्टन खेड्यातील शाळा कशी दिसली ?	..	..	६६७-६६९
१३.	विभूतिपूजा	..	..	६७०-६७३
१४.	मँचेस्टर कॉलेज	..	..	६७४-६७९
१५.	पृथ्वीच्या पोटात ४४० यार्डाखाली	..	..	६८०-६८३
१६.	जनातून वनात आणि परत	..	..	६८४-७००
१७.	बंगलूरच्या रस्त्यातील एक फेरी	..	..	७०१-७०३
१८.	मंगळूर येथील काही विशेष गोष्टी	..	..	७०४-७०६
१९.	बंगालची सफर	..	..	७०७-७१९
२०.	शांतिनिकेतन	..	..	७२०-७२४
२१.	सह्याद्रीवर्णन-१	..	..	७२५-७३१
२२.	सह्याद्रीवर्णन-२	..	..	७३२-७४०

१

जलप्रवास

प्रयाण

आगबोट पर्शिया

तरुण भार्या, तान्हे बालक, वृद्धही माता-पितरे।
अनाथ भगिनी, बंधू धाकुटा, आश्रित बांधव सारे।।
आलो टाकुनिया। पदरी घेई दयामया।।१।।

शनिवार तारीख २१ सप्टेंबर, १९०१ रोजी सकाळचे १०।। वाजता रा. कोरगावकरांचे घरातून निघालो तेव्हापासून वियोगाच्या तीव्र वेदनांस सुरुवात झाली. बॅलर्ड पियरवर माझ्या आधी बरीच मित्रमंडळी जमली होती. गुरुजन आशीर्वाद देऊ लागले. मित्रमंडळ अभिष्टचिंतन करू लागला. काहीजण प्रवासात उपयोगी अशा महत्त्वाच्या सूचना करू लागले. अशी एकच गर्दी उडाल्यामुळे मी भांबावल्याप्रमाणे झालो होतो. अशा स्थितीत मी काहींचा मुळीच निरोप घेतला नसेन, काहीस मी उत्तरे दिली नसतील. त्या सर्वांची मी आता प्रांजलपणे क्षमा मागीत आहे. १२ वाजता प्लेग-डॉक्टरची तपासणी सुरू झाली. १२।। वाजता मी सर्वांचा शेवटचा निरोप घेऊन निघालो. दारावर आत सोडताना रखवालदाराने थोडासा दांडगाईचा प्रसंग आणिला, पण हिंदुस्थानातील निदान २ वर्षेपर्यंत तरी ही अखेरची असल्यामुळे मी ती कौतुकाने सहन केली! तपासणी एका मिनिटातच आटोपली. एकदा आत गेल्यावर जाणारांची आणि पोचविण्यास आलेल्यांची नुसती नजरानजरही होत नाही, म्हणून दोघांसही फार वाईट वाटते. मी मचव्यात बसल्यावर, मला न भेटलेल्या बाहेरच्या तिघा मित्रांकडून, पुनः भेटून जाण्याबद्दल ३ चिठ्या आल्या पण इतक्यात मचवा निघाल्यामुळे, माझा नाइलाज झाला. हळूहळू माझा मायदेश डोळ्यांदेखत अंतरू लागला. परदेशगमनाचा विचार प्रथम आल्यापासून तो आतापर्यंत मी सारखा धांदलीत असल्यामुळे स्वीकृत गोष्टीचे पूर्ण स्वरूप डोळ्यांपुढे आले नव्हते, ते मी मचव्यात स्थिरपणे बसल्यावर प्रत्यक्ष दिसू लागल्यामुळे ह्या पाच मिनिटांत मनाच्या ज्या कित्येक कधीच न अनुभविलेल्या भावना झाल्या, त्या लिहून व्यक्त करणे केवळ अश्यक्य आहे! वियोग मूर्तिमंत पुढे उभा राहून माझ्या जिवलग माणसांची उदास व खेदमय दिसणारी चित्रे मला एकामागून एक दाखवू लागला. अशाच कष्टमय स्थितीत मला दोन वर्षे काढावी लागतात की काय अशी धास्ती पडली. पण अखेरची मनाची भावना प्रार्थनामय झाली. विरहवेग कमी होऊ लागला. किंचित शांत दृष्टीने किना-याकडे पाहू लागलो, तो ह्या प्रवासाची मनात प्रेरणा होण्यास जी पर्यायाने कारण झाली आहे. ती मुंबई युनिव्हर्सिटी जणू काय हात वर करून आशीर्वाद देत आहे, असे दिसले.

याप्रमाणे मी १ वाजता पर्शिया आगबोटीवर दाखल झालो. नंतर एका तासाने माझे सर्व सामान मला मिळाले. २।। आम्ही सर्व मिळून जेवणास बसलो. जेवण चालले असता आगबोट सुटून केव्हा चालू लागली होती हे काही वेळ कळलेच नाही. एंजीनची धडधड लांबून किंचित ऐकू येत होती. ग्लासातील पाणी देखील सहज दिसण्यासारखे हालत नव्हते. ३ वाजता जेवण आटपून घाईने डेकवर येऊन पाहतो तो कुलाब्याचा दीपस्तंभही मागे राहिला होता. ३।। वाजता १० लाख वस्तीच्या मुंबई शहरास मला क्षितिजात शोधून काढावे लागले! ४। वाजता मुंबईजवळच्या डोंगराचाही कोठे मागमूस लागेना!! सभोवार क्षितिजाचे विशाल वलय पसरलेले, वरती ढग, खाली लाटा, याशिवाय आसमंतात दृश्य पदार्थ काय तो आगबोटीतून निघणारा धुराचा लोट हाच होता. खरोखर हा देखावा साक्षात दगडालाही कवित्वाची स्फूर्ती करणारा आहे! बोटीच्या अगदी पिछाडीच्या टोकावर–म्हणजे मजकडून होईल तितके करून माझ्या देशाजवळ–मी सुमारे एक तासभर हा देखावा पाहत चित्राप्रमाणे तटस्थ उभा होतो. बोट वेगाने चालली असता पाणी दुभंगून तिच्या मागे कोनाकृती धार दिसत होती. बाजूने पण्याचे तुषार उडून त्यावर ऊन पडून त्यातून इंद्रधनुष्य दिसे. संध्याकाळनंतर रात्री चांदणे पडले आणि समुद्राने आपला पेहराव बदलला. दुसरे दिवशी पहाटेस उठून पोशाक करून डेकच्या अगदी आघाडीस गेलो. हा देखावा कालच्यापेक्षाही अधिक मोहक व प्रेरक होता. आकाश अगदी निरभ्र असल्याकारणाने समुद्र त्याच्या रंगाने रंगला होता, आणि बोटीतून धूर निघालेला दिसत नसल्यामुळे, चहूकडे ऐक्य नांदत होते. अत्यंत पुरातन सागर महामुनी शांत व गंभीर रूप धारण करून 'एकमेवाद्वितीयम्' ह्या महामंत्राचा आपल्याशीच पाठ करीत संध्यावंदन करीत बसलेले दिसले. त्यास पाहून प्रत्यक्ष पापमूर्तीचाही संत बनेल ह्यात शंका नाही!!

पर्शिया आगबोट : कॅलिडोनिया, अरेबिया ह्याप्रमाणेच पर्शिया आगबोटही फार मोठी आहे. ही लांबीने सुमारे एक फर्लांग म्हणजे ³/₄ मैल व रुंदीने मध्ये २२ यार्ड आहे. ऊंचीने ४/५ मजली इमारतीइतकी भरेल. वजन ७,००० टनापर्यंत नेऊ शकते. हिजमध्ये ५३० प्रवाशांची सोय आहे. पण ह्या खेपेस प्रवासी फार थोडे म्हणजे केवळ ७५ च होते हिचा वेग दर तासास १५ मैल पडतो. पहिले दिवशी ३१८, दुसरे दिवशी ३५८, तिसरे दिवशी ३५५ मैल ह्याप्रमाणे ही चालते. हिला दोन धुराडी आहेत. समुद्र खवळून केव्हा केव्हा तुषार आत येतात, म्हणून आगबोटीच्या बाजूस पुष्कळ आणि मोठ्या अशा खिडक्यांची योजना करता येत नाही. ह्यामुळे चोहीकडे वारा खेळावा, विशेषकरून खालच्या मजल्यात हवा पोचावी म्हणून अशी योजना केली असते की, मोठाले २/३ फूट रुंदीचे बंब खालपासून वरपर्यंत नेऊन त्यांची तोंडे पुष्कळशी पसरट करून हवेत निरनिराळ्या दिशेने वळवून दिलेली असतात. तेणेकरून वारा कसाही वाहत असला, तरी त्यांच्या तोंडात सापडून खाली उतरतो. असे बंब सुमारे ४० आहेत. प्रकाशासाठी खालच्या मजल्यात २४ तास एकसारखे विजेचे दिवे जळत असतात. बोटीला एकंदर पाच मजले आहेत. तळमजला पाण्याखाली आहे. त्यामुळे त्यात अंधार असतो. त्यात जड सामान आणि माल भरलेला असतो. दुसऱ्या मजल्यास लोअर डेक

डायनिंग सलून : हा एक सुरेख दिवाणखाना आहे. त्यात दोन्हीकडे चार चार खुर्च्या ठेविलेल्या अशी पाच टेबले एकापुढे एक मांडली आहेत. अशा पाच टेबलांच्या दोन्ही बाजूस दोन रांगा असून मध्ये एक मोठे न्याहारीचे टेबल ठविलेले आहे. सकाळी ६।। वाजता चहा, रोटी, लोणी, फळे इ. असतात. ८।। स न्याहरी, १।। ला मुख्य जवेण, ४।। वाजता फराळ, ६।। ला चहा आणि रात्री ९।। वाजता फराळ, असा नेहमीचा क्रम असतो. ह्या सर्व प्रसंगी सर्व मंडळी हॉलमध्ये जमते, आणि आपापल्या ओळखीप्रमाणे जागा पसंत करते सकाळचा चहा व रात्रीचा फराळ सोडून बाकी सर्व प्रसंगी जेवणास कोणते पदार्थ तयार केले आहेत त्यांची यादी कार्डावर छापून ती कार्डे टेबलांवर मांडलेली असतात. प्रत्येक टेबलाजवळ एक स्टुअर्ड (वाकनीस) उभा असतो क्रमाने सर्व पदार्थ आपलेकडे हा वाकनीस आणितो. आपल्यास लागेल तो लागेल तितका आपण घ्यावा. प्रत्येक वेळी सात किंवा अधिक पदार्थ असतात. कलकत्त्याची कढी, फ्रान्सचे वाटाणे, यारमाऊथचे मासे, इटलीची आमटी, सार्डिनियाचे अमुक आणि रंगूनचे तमुक, अशी यादीतील चटकदार नावे वाचून नवख्यास मोठी मौज वाटते. तरी प्रत्यक्ष पदार्थ पाही पर्यंत नुसत्या यादीवरून काही कल्पना होत नाही. हा सर्व थाट आणि हे प्रकार पाहून नवीन मनुष्य सहजच वाजवीपेक्षा अधिक खातो आणि दोन दिवसांनी ओकू लागल्यावर म्हणतो की आपल्यास बोट लागली!

स्नानगृह : एका खोलीत एक हौद कंबरेइतका खोल असतो. त्यात एक ऊन पाण्याची व एक थंड पाण्याची अशा दोन तोट्या असतात. ह्या दोन्ही मोकळ्या करून आपल्यास लागेल तसे गरम पाणी करून घेता येते. पण हे पाणी खारे असते म्हणून एका वेगळ्या पिंपात गोडे पाणी ठेविलेले असते. हौदातल्या पाण्याने स्नान केल्यावर या गोड्या पाण्याने अंग धुवावे. खाऱ्या पाण्यात आपला नेहमीचा साबण चालत नाही म्हणून, खाऱ्या पाण्याचा साबण किंवा सीसोप वेगळा मिळतो तो येताना आपण आणावा. येथे मिळत नाही.

करमणूक : धुम्रपानाचे खोलीत बुद्धिबळाचा आणि दुसरा कसलासा खेळ मांडलेला असतो. शिवाय पत्ते गंजीफा मिळतात. इतर २/३ प्रकारच्या व्यायामाच्या खेळांचीही योजना आहे. डेक स्टुअर्ड एका बाजूस क्रिकेट खेळण्यास जागा करून देतो, तरट हांतरून पिच तयार करतो. पहिल्या वर्गाकरिता पियानो वगैरेची अधिक व्यवस्था असते. लायब्ररीतून आपल्या नावावर पुस्तके वाचण्यास मिळतात. त्याबद्दल वर्गणी भरावी लागते.

नोकर : पाच पाच केबिनला एक स्टुअर्ड इंग्लिश मनुष्य असतो. तो रोज सकाळी संध्याकाळी आमची खोली झाडून साफ करितो, सामान व्यवस्थेने ठेवितो पांघरुणाच्या घड्या घालतो, बूट साफ करितो आणि दुसरे काहीही सांगितलेले काम करितो व माहिती देतो. आम्ही मागितल्यास आमचे जवेण खोलीतच आणून देतो. दाराजवळ एक बटन असते, ते वाटेल तेव्हा दाबल्यास वरची घंटा वाजते आणि एक स्टुअर्ड खाली येऊन सांगितलेले काम करून जातो. सर्व गोरे नोकर कोणते

समुद्रावरच्या एकंदर प्रवासात मुंबईपासून एडनपर्यंतचाच प्रवास काय तो विशेष कंटाळवाणा होतो. सभोवतालची परिस्थिती अगदीच नवी असल्याने पहिला दिवस केव्हाच निघून जातो. पण दुसऱ्या दिवशी दोनप्रहरपासून हळूहळू कंटाळा येऊ लागतो. पाहिलेले तेच तेच नजरेस पडू लागल्यामुळे मनाचा उत्साह नाहीसा होतो. अष्टौप्रहर अंग हालल्याने तोंडाला प्रकृतीच्या मानाप्रमाणे कमीजास्त मळमळ सुटते. नवीन सोबत्यांशी अद्यापि चांगली घसट न पडल्यामुळे एकांतवास वाटू लागतो. सभोवती लोकांची इतकी गर्दी असून सुखदु:खाचे दोन शब्दही कोणाशी बोलण्यास मन धजत नाही आणि आत तर विरह धुमसत असतो. अशा स्थितीत, बायरन कवीने एके ठिकाणी वर्णिलेला हा गर्दीतला एकांतवास निर्जन एकांतवासापेक्षाही फार दु:सह होतो. पण अशी स्थिती बहुतकरून आमच्याच लोकांची होते. गोरे लोक लगेच एकमेकांशी मिसळून अनेक प्रकारचे खेळ खेळत दिवस काढतात. लहान मुले, पोक्त बाया आणि मोठे धटिंगण ह्यांचा दिवसभर धांगडधिंगा चालू असतो. या गुलहौशी पाश्चात्य लोकांनी सर्व जगभर–जमिनीवरच नव्हे तर पाण्यावरही–आपले घर पसरून टाकिले आहे, तेणेकरून हे कोठे गेले तरी ह्यांचा उल्हास कमी होत नाही. आम्हांला येथे धरून आणल्याप्रमाणे होते. असो, हा प्रकार रजोगुणाचा झाला, पण मनाची जर सात्विक वृत्ती होऊन ते धर्माच्या उच्च वातावरणात वावरू लागले, तर हीच परिस्थिती त्यास अत्यंत अनुकूल होते. लाटांचे एकसारखे उत्क्रमण, वायुचे सतत वाहणे, अपार आकाशमंडळात फाकणारी नि:सीम प्रभा वगैरे पाहून विश्वाचे आनंत्य व सृष्टिव्यापाराचे सातत्य आणि अखेरीस परमेशाचे सर्वत्र भरलेले मंगल वास्तव्य साक्षात दृग्गोचर होते आणि वर्डस्वर्थने सांगितल्याप्रमाणे, 'भेटीच्या अशा उदात्त प्रसंगी विचाराला अवकाशच नाही,' व परमात्म्याशी जिवात्म्याचे तादात्म्य होऊ लागते! पृथ्वीवर अशा ब्रह्मोपासना विरळ!

ता. २६ (सप्टेंबर) रोजी सकाळी एडन जवळची टेकडी दिसू लागली. ५ दिवसांत दगड आणि माती आमच्या मुळीच नजरेस न पडल्यामुळे ही टेकडी दुरून पाहून आम्हांस अत्यानंद झाला. एडन बंदर उंच उंच टेकड्यांमध्ये लपून बसल्यासारखे व मधून मधून डोकावते असे दिसते. टेकड्यांचे कडे उंचवर निमुळते होत गेले आहेत. चोहोंकडे वालुकामय प्रदेश दिसतो, झाडझुडूप किंवा एखादे हिरवे पानही कोठे दिसत नाही. बंदरात शिरल्यावर बोटीवर क्वारंटाईनचे निशाण फडकू लागले. व्यापारी लहान लहान होड्यांतून आपला माल विकण्यास अगदी बोटीजवळ येऊ लागले. व्यापारी गोरे अरब असत, व होड्या हाकणारी पोरे सोमाली शिद्दी असत. क्वारंटाईनमुळे ह्यांस बोटीवर येण्यास किंवा आम्हांस त्यांचेकडे जाण्यास परवानगी नव्हती. म्हणून खालूनच ते आपला माल दाखवीत व किंमती ओरडून सांगत. ह्यांस मुसलमानी साफ बोलता येत होते. होडी हाकणारी सोमाली पोरे केव्हा केव्हा आपला जिन्नस दाखवून, केव्हा केव्हा आपल्या इंग्रजी भाषेने आणि केव्हा केव्हा आपल्या विद्रुप अंगविक्षेपाने गिऱ्हाइकाचे चित्त वेधीत. अरबांचा पोषाक बोहरी लोकांसारखा होता, ह्यांस दाढ्या नव्हत्या, पण कानांवर केसांची लांब झुलपी होती. सोमाली पोरे अर्धी नागवीच

ता. ३० सप्टेंबर सकाळी ६ वाजता आम्ही सुवेज येथे पोचलो. व्यापाराच्या आणि जलपर्यटनाच्या बाबतीत ह्या कालव्यामुळे अत्यंत महत्त्वाच्या सोयी व सुधारणा झाल्या आहेत. ह्याची लांबी म्हणजे तांबडा समुद्र व भूमध्य समुद्र ह्यांमधील अंतर सुमारे ८२ मैल आहे, आणि आशिया आणि आफ्रिका ह्यांमधील अंतर १५० पासून २०० फुटांच्या आतच आहे. ह्यामुळे एकाच वेळी एकच बोट जाऊ शकते, आगबोटीला जाण्याला पाणी २५/३० फूट तरी खोल असले पाहिजे. तितक्या खोल पाण्याचा १०० फूट रुंद भाग कालव्याच्या मधोमध १०० यार्डांवर एकएक बोट तरंगत ठेवून आखून दिल्याप्रमाणे केला आहे. समोरून जर ट्रॅम आली तर अरुंद गल्लीत बाजूला उभी करण्यास जसा रस्ता करून दिलेला असतो तशी येथेही समोरून आगबोट आल्यास उभी करण्यास जागजागी बाजुला तळी खणली आहेत. हा कालवा दोन मोठ्या सरोवरातून व कित्येक लहान लहान सरोवरांतून जातो. हा सर्व प्रदेश सपाट मैदान आहे, आणि समुद्रसपाटीवर ह्याची उंची ५/१० फुटांच्या आतबाहेर इतकी आहे. ह्यावरून परमेश्वराच्याच मनात येथे कालवा व्हावा असे होतेसे दिसते. तरी त्याची ही इच्छा ओळखण्यास मास्यूलेसेप-ज्या फ्रेंच गृहस्थाने हा कालवा खणला-सारख्या धोरणी व साहसी मनुष्याला आपली सर्व अक्कल खर्च करावी लागली!

आमची आगबोट सुवेज बंदराच्या अगदी जवळ जाऊन उभी राहिली लगेच इजिप्त सरकाराकडून तीन लष्करी कामगार क्वारंटाईन कामासाठी बोटीवर आले, ते पोर्टसेडपर्यंत बोटीवरच होते. त्यापैकी एकास विचारता त्याने सांगितले की, कालवा अगदी अरुंद असल्यामुळे, बोटीतून कोणासही सहज मध्येच उतरून देशावर जाता येते. त्यांनी तसे जाऊ नये म्हणून देखरेखीस तिघांस ठेविले आहे. एडनमध्ये तर बोट बंदरापासून लांबच होती. सुवेज आणि मोर्सेयच्या दरम्यान उतरणाऱ्यास सुवेज येथेच उतरून घेऊन तेथे काही वेळ क्वारंटाईनमध्ये ठेवून मग सोडतात. पोर्टसेडपासून मार्सेयपर्यंतही एक कामगार होताच. ह्याप्रमाणे आम्ही हिंदुस्तान सोडून आलो, तरी युरोपच्या दारापर्यंत प्लेगच्या उपाधीने आमची पाठ सोडिली नाही. असो.

पृथ्वीवर जी काही अचाट मानवी कृत्ये आहेत त्यात सुवेजच्या कालव्याची गणना आहे. हा कालवा तयार करण्यास करोडो रुपये लागले आहेत, इतकेच नव्हे तर तो दुरुस्त ठवेणे अतोनात खर्चाचे काम आहे. दोन्ही काठची जमीन अगदी वालुची असल्याने काठ पसरून आत येतात. आणि कालवा वरचेवर उथळ होतो, म्हणून गाळ काढण्याचे काम नेहमी चाललेले असते. गाळ यंत्रानेच काढण्याची एक चकत्कारिक योजना केली आहे. एका आगबोटीवर एक रहाट-गाडगे उभे केले आहे. ज्या वाफेच्या यंत्राने ही बोट हळूहळू पुढे सरकते, त्याच्याच शक्तीने हे रहाटगाडगे हालते, आणि रहाटाचा खालचा भाग जसजसा गाळातून वर येतो, तसतसा प्रत्येक गाडग्यातून पाणी नितळून जाऊन गाळ वरती जातो. रहाटाच्या टोकापासून तो किनाऱ्यापर्यंत एक उतरता पूल जोडून दिला आहे. तो बोटीबरोबरच हालतो. त्यात प्रत्येक गाडग्यातील गाळ पडून तो घसरत किनाऱ्यावर जाऊन पडतो. कोळशाची आणि लोखंडाची खाण व काड्यांच्या पेट्या इतके मिळाले की हे

जोराने आपटून जात असे, त्यामुळे पाणी आत येते की काय असे वाटे, पण जाड काचेचे भक्कम झाकण असल्यामुळे एक थेंबही आत येत नाही. अशा वेळी अंथरुणावर नुसते बसवतही नाही, कारण बसले की तोंडाला मळमळ सुटून डोके फिरू लागते. कोणी चालू लागला तर दारू पिऊन झिंगल्याप्रमाणे झुकांड्या खात जातो. म्हणून अंथरुणावर अगदी पडून राहणेच बरे.

ता. ३ संध्याकाळी ४ वाजता आम्ही इताली आणि सिसिलीमधील मेसिनाचे सामुद्रधुनीतून जाऊ लागलो. एडन, सुवेज आणि सिसिली येथील वेळा अनुक्रमे सुमारे २, ३, ४ तास मुंबईच्या वेळेच्या मागे असाव्या, असे माझे घड्याळावरून दिसले. दोन्ही बाजुंच्या किनाऱ्यावर उंच डोंगर आहेत. त्यांच्या पायथ्याशी समुद्र व डोंगर ह्यांच्यामधील अरुंद प्रदेशात दोन्हीकडे लहान लहान खेडी व शहरे ह्यांच्या एकसारख्या रांगा लागून गेल्या आहेत. डोंगराच्या काही अवघड ठिकाणी देखील कड्यातून गावे वसलेली दिसली. अगदी काठावरच एक देऊळ होते, त्याचा घाट व शिखर ही थेट हिंदू देवळाप्रमाणेच दिसत होती. पावसाळ्यात डोंगरातील ओढ्यांचे पाणी गावांतून पसरू नये म्हणून वरपासून खालपर्यंत दोन्हीकडे भिंती बांधून वळणावळणाने सपाट उतरणी करून दिल्या आहेत. त्या दुरून फार सुंदर दिसतात. नकाशात इताली देशाचे जे निमुळते स्पार्टिव्हेंटो भूशिर दिसते, त्याच्या अगदी टोकालाच एक उंच तुकडा तुटला आहे. तो वाटोळा असल्याने बुरुजाप्रमाणे दिसतो. समुद्रकाठाने जाणारी एक आगगाडी ह्याच बुरुजाच्या बोगद्यातून बाहेर पडताना दिसली. इतालीचे किनाऱ्यावर मेलिटो, रेजिओ आणि सिला ही शहरे आणि सिसिलीचे किनाऱ्यावर मेसिना हे मोठे शहर नजीकच दिसते. ह्या ठिकाणी समुद्राची रुंदी २/३ मैल असेल. पण समुद्रसपाटीमुळे त्याहूनही कमीच असेल, असे दिसते, चांगला पोहणारा दुसऱ्या बाजूस पोहून सहज जाईल.

वेळ संध्याकाळचा असल्यामुळे व समुद्र फार शांत असल्यामुळे ह्या ठिकाणी दोहोंकडच्या शहरांचा व उंच डोंगरांचा देखावा फार मनोहर होता. कुलाब्याच्या दांडीसारखा सिसिलीचा एक लांब, सपाट, चिंचोळा जमिनीचा भाग इतालीजवळ गेला आहे. त्यास वळसा घालून आगबोट पुन: उघड्या समुद्रात शिरल्यावर डावीकडे लिपेरी बेटे आणि स्ट्रँबोलीचा ज्वालामुखी पर्वत दिसू लागतो. हाच देखावा पाहून बायरन् कवीस कवितेची स्फूर्ती झाली असावी. वारा मंद व शीतल वाहत होता. स्वर्गातून परमेश्वराने शांतीचा जणू निरोपच धाडिला होता! सूर्य अस्तास जात असताना पश्चिमेकडच्या ढगांतून तापलेल्या लोखंडाप्रमाणे तांबडा लाल दिसत होता. तो सगळा क्षितिजाखाली गेल्यावरही त्याचे चपटे प्रतिबिंब काही वेळ दिसत होतेच. अफाट समुद्रावर स्वच्छ आकाशात ह्या शांत वेळी सूर्यास्ताचा देखावा पाहण्याची भारी मौज असते. बुडताना त्याची आरक्त किरणे लाटांवरून लांबपर्यंत पसरल्यामुळे समुद्र जणू सोन्याच्या रंगाने उचंबळतो की काय असे दिसते! ६ वाजता स्ट्रँबोली ज्वालामुखी पर्वताच्या शिखरातून निघणारा धुराचा लोळ दिसू लागला. ह्या डोंगराच्या नजीक आलो, त्यावेळी अगदी काळोख पडल्यामुळे ह्याचा देखावा स्पष्ट दिसला नाही. ता. ४ रोजी संध्याकाळी ४।। वाजता आम्ही कार्सिका व सार्डिनीया बेटांमधील बोनिफोसिया सामुद्रधुनीत आलो. दोन्ही बेटांच्या किनाऱ्यावर मुळीच कोठे वस्ती दिसली नाही. ता. ५ ला सकाळी मोर्सेय येथे पोचलो.

कँपानियासारख्या प्रचंड आगबोटीला दररोज ४५० टन कोळसा लागतो म्हणजे प्रत्येक ३ ¾ मिनिटाला एक टन पडतो! ह्या आगबोटीची किंमत ६,००,००० पौंड म्हणजे जवळ जवळ एक कोट रुपये आहे!! एडिसनचे असे म्हणणे आहे की, अमेरिका आणि इंग्लंड ह्यांमधील प्रवास फार तर ३/४ दिवसात करता येईल! ह्याचे नाव प्रगती!!!

दर रविवारी बोटीवर धर्मसंबंधी काही होत नाही, असे जे मागे मी लिहिले आहे ते, चुकीचे आहे. ता. २९ सप्टेंबर आदित्यवारी 'पर्शिया' आगबोटीवर सार्वजनिक ईश्वरोपासना झाली, ती स्वत: कमांडरानेच चालविली. पुरुष व स्त्रिया मिळून ४० जण हजर होते. उपासनेनंतर समुद्रावरील धर्मकृत्यांकरिता म्हणून तेथल्या तेथेच सुमारे २० रुपये जमले. असो. कोणत्या तरी रीतीने ह्या लोकांची धर्मबुद्धी प्रकट होत आहे.

●●●

२

मार्सेय शहर

मँचेस्टर कॉलेज, ऑक्सफर्ड

तारीख ५ ऑक्टोबर रोजी सकाळी ६ वाजता मार्सेय जवळची टेकडी दिसू लागली. आगबोट बंदरावर पोचल्यावर काही वेळाने न्याहारी आटपून आम्ही 'पर्शिया' चा निरोप घेतला आणि ९।। वाजता युरोपच्या किनाऱ्यावर पाय ठेविला. ज्यांच्यामार्फत आम्ही तिकीट काढिले होते, त्या कुक कंपनीचे दुभाषे आमची वाट पाहात बंदरावर उभे होतेच. त्यापैकी एकाने आमचे सर्वही सामान आपल्या ताब्यात घेतले. हिंदुस्थानचे आम्ही पाच विद्यार्थी आणि एक व्यापारी एकत्र होतो व लंडनपर्यंत मिळूनच गेलो. आम्हा सर्वांना लंडनला लवकरच जावयाचे होते म्हणून आम्हांस मार्सेय येथे १२ च तास रहावयास सापडले. पण तितक्याच वेळात जेवण वगैरे लवकर आटोपून मार्सेयचा पहावेल तितका भाग पाहिला. आमच्या व्यापारी पारशी सोबत्यास फ्रेंच भाषेत थोडीशी जीभ हालविता येत होती, त्याचा आम्हांस अतोनात फायदा झाला. त्याच्याशिवाय आम्ही सर्व कान असलेले बहिरे आणि तोंड असलेले मुके झालो होतो. वरील दुभाष्याने मोठ्या आदबीने आमची सर्व सोय करून 'हॉटेल डी जि नीव्ही' नामक खाणावळीच्या एजंटाशी आमची गाठ घालून दिली. दोनप्रहरच्या फराळास बराच अवकाश होता, म्हणून आम्ही खाणावळीत विना कारण खोलीचे भाडे भरीत न बसता शहर पाहण्यास बाहेर पडलो. मार्सेय हे फ्रान्स देशातील दुसऱ्या प्रतीचे शहर व पहिल्या प्रतीचे मोठे महत्त्वाचे बंदर आहे. आम्ही ज्या धक्क्यावर उतरलो, तो म्हणण्यासारखा सुंदर नव्हता व स्वच्छही नव्हता. फ्रेंच लोकांच्या नखऱ्याविषयी व छानीविषयी माझी जी कल्पना होती, तिच्यामुळे माझी सकृदर्शनी थोडी निराशा झाली. पण जसजसा मी शहरात शिरू लागलो, तसतशी ही निराशा कमी होऊ लागली आणि काही भागातील रस्त्यांची शोभा व दुकानांचा थाट पाहून तर ती अजीबात नाहीशी झाली. आणि मुंबईचे उत्तम रस्तेही ग्राम्य वाटू लागले. पण स्वच्छतेच्या मानाने पाहिल्यास मुंबईला तिच्या काही गल्ल्यांची पावसाळ्यातील मासलेवाईक स्थितीची आठवण झाल्याबरोबर ही देखील तुलना करू नये असे वाटले. रस्ते बहुतेक फरसबंदीचे आहेत. काही ठिकाणी अगदी एका नमुन्याच्या घरांची रांग लागते. विजेच्या ट्रॅम्स्, घोड्यांच्या ट्रॅम्स्, ऑम्नीबसेस आणि घोंड्यांच्याव गाढवांच्या लहानमोठ्या गाड्या वगैरेंचा रस्त्यातून एकच घोळका चाललेला असतो. अशा रस्त्यातून आम्ही चाललो असता रस्त्यातील निदान अर्ध्या तरी लोकांचे डोळे आमच्याकडे लागले. का? तर मी डोक्यावर आपला गुलाबी फेटाच घातला होता म्हणून. एके ठिकाणी गाडी ठरविण्यास आम्ही एकदोन मिनिटे उभे राहिलो, तर आमचेमागे लहान मोठ्या

स्त्री-पुरुषांची मोठी गर्दी जमली! माझ्या एका डोक्याशिवाय आम्ही सहाहीजण जरी नखशिखांत साहेब बनलो होतो, तरी हा प्रकार घडू लागला. जर आम्ही सर्व आमचे सगळे निरनिराळे देशी पेहराव करून बाहेर पडलो असतो, तर रस्त्यात काय अनर्थ घडता कोण जाणे. तरी पण माझ्या एका फेट्यामुळे काही कमी खळबळ उडाली नाही. बायका आपल्या लहान मुलांस कडेवर किंवा खांद्यावर घेऊन आम्हांकडे बोट दाखवू लागल्या, तरुण मुली घरात पळत जाऊन इतरांस बाहेर बोलावून आम्हांस पाहात उभ्या राहत. या त्रासामुळे माझे सोबती थोडेसे कुरकूरू लागले व मलाही अडचण वाटू लागली. आगबोटीवर देखील यासंबंधी बरीच चर्चा झाली. मार्सेय बंदरावर बोटीवरून उतरताना आमच्या बरोबर येणाऱ्या एका सिव्हिलियनाने मजजवळ येऊन मोठ्या आस्थेने विचारले की, कायहो, हे तुमच्या डोक्यावरचे तुम्ही लंडनपर्यंत कायम ठेवणार की काय? लंडनची मुले वात्रट आहेत, ती तुम्हांस त्रास देतील. माझ्या पोषाखाची तो विशेष कळकळ दाखवू लागला, हे पाहून मी त्यास विचारले की, विलायतेस पोलिसची व्यवस्था चांगली आहेना! यानंतर विशेष बोलणे झाले नाही!

फ्रेंच लोक सर्वांपेक्षा अधिक उल्हासी व रंगेल आहेत, शहरातील पुष्कळ लोक घरी जेवणाची दगदग न करिता खाणावळीतच जेवतात, वगैरे गोष्टी मी मागे एका प्रवासवर्णनात वाचल्या होत्या. त्यापैकी एक प्रकार असा आढळून आला की, मुंबईतल्या इराण्यांच्या दुकानाप्रमाणे येथे खाण्यापिण्याची आरामस्थाने गल्लोगल्ली पुष्कळ आहेत. दुकानासमोर रस्त्याच्या बाजूने मोठे उघडे पटांगण असते. त्यात शेकडो खुर्च्या व टेबले मांडलेली असतात. येथे जेवणारांची गर्दी जमलेली असते. ही ठिकाणे स्वच्छ, सुंदर व भपकेदार असतात. रस्त्यातील गर्दीकडे पहात व चकाट्या पिटीत हे लोक उपहार करीत असतात. दुसरा एक चैनीचा प्रकार असा आढळला की, काही ठिकाणी रस्त्याच्या दोन्ही बाजूस उंच व दाट झाडे लाविली आहेत, ही झाडे वर एकात एक इतकी मिसळून गेली आहेत की, भर दोनप्रहरी देखील या रुंद रस्त्यात गर्द छाया असते. अशा ठिकाणास येथे बुलवर्ड असे म्हणतात. जाग-जागी विश्रांती घेण्यास बाके ठेविली आहेत. ह्या रस्त्यातून गाड्याघोडी जात नाहीत. त्यांच्याकरिता दोन्ही बाजूने वाटा करून दिलेल्या आहेत. मधून रिकामटेकडे हिंडत असतात किंवा बसलेले असतात.

आम्ही 'नॉटर डेम् द ला गार्ड' नावाचे देऊळ पाहून परत खाणावळीत जेवणास गेलो व जेवण आटोपल्यावर लगेच पॅलेस डिला शांप नावाचा महाल पाहावयास गेलो. हा महाल एका लहानशा टेकडीच्या बाजूवर बांधला आहे. त्याचे पहिले दोन मजले टेकडीतच कोरले आहेत व बाकीचे मजले त्यावर उभारले आहेत. ही एकंदर इमारत अर्धवर्तुळकार आहे. हिच्यापुढे रस्त्यापर्यंत सारखे उतरते पटांगण विस्तीर्ण पसरले आहे. त्यावर रसरशीत गवताचे आणि नानाविध रंगांच्या कोमल वनस्पतींचे गालिचे अंथरले आहेत. दोहों बाजूंच्या गालीच्यांची शोभा पाहत पाहत आम्ही चढण चढून वर गेलो. तो एका बाजूस पोस्टाच्या पेटीसारखी एक पेटी ठेवलेली दिसली. आमच्यातील एकाने तिच्या एका फटीतून आत एक पैसा टाकिल्याबरोबर दुसऱ्या एका फटीतून मार्सेयच्या एका सुंदर इमारतीचा

जाता येते. आगबोट बंदरावर पोहोचल्याबरोबर जरुरीच्या उतारूस ताबडतोब नेण्यास 'पी. अँण्ड ओ. स्पेशल' तयार असते, ती मार्सेयहून जी लगेच निघते ती कॅलेवरच थांबते. त्या गाडीत एक भोजनाचा स्वतंत्र हॉल आणि निजण्याच्याही खोल्या असतात. डी जॉन स्टेशनापासून तो पॅरीसपर्यंत, वाटेत शेते, कालवे, दऱ्या, बोगदे, गावे इ. चा सुंदर देखावा गाडीतून दिसला. पाऊस एकसारखा सपाटून पडत होता. फ्रेंच लोकांची सौंदर्याभिरुची त्यांच्या शेतातूनही दृष्टीस पडते. ह्यांची शेते म्हणजे केवळ बागच! कालव्याच्या काठी झाडे लागली होती, ती जणू कवाइतीलाच उभी आहेत असे वाटे. जागोजाग खेडी लागत, ती खेडी नव्हत, चित्रेच ती! फ्रान्सची शेते सकाळच्या वेळी गाडीतून धावत असताना प्रथमच पाहून एखाद्या नवख्यास, इतर ठिकाणी राजा होण्यापेक्षा फ्रान्समध्ये शेतकरी होणे बरे, असे वाटल्यास त्यात नवल काय?

●●●

३

पॅरीस शहर

समता-स्वतंत्रता-बंधूता झेंडा मिरविणारी, सौंदर्याची जी खाण त्या पॅरीसपुरीत आम्ही सकाळचे १० वाजता उतरलो. पॅरीस शहर पॅरीस शहराप्रमाणेच आहे. ह्यापेक्षा जास्त काही वर्णन करवत नाही. पुष्कळ लोकांनी याचे वर्णन केले असल्यामुळे, येथे त्याचे वर्णन करण्याचे विशेष प्रयोजन नाही. शिवाय जवेण वगैरे आटपून आम्ही गाडीत बसून बाहेर पडलो, तोच आम्हांस पावसाने गाठले. आम्ही मुख्य रस्त्याने प्रदर्शनाकरिता मुद्दाम बांधलेले मोठमोठे सुंदर महाल पाहत प्रथम 'पॅलेस डी नॅशनल इन्व्हालिड्' म्हणजे जेथे प्रसिद्ध ऐतिहासिक राजपुरुषांची थडगी आहेत, अशा राजवाड्यात गेलो. वीरमणी नेपोलियनाचे येथे भव्य कबरस्थान आहे. हौदासारखी सुमारे २० फूट व्यासाची वर्तुळाकार जागा जमिनीत सुमारे २० फूट खोल सुरेख बांधून काढली आहे. ह्या हौदाच्या मध्यभागी नेपोलियनाचे भव्य थडगे आहे. त्याचा रंग दाट काळसर तपकिरी आहे. हौदाच्या छातीइतक्या उंच कठड्यावरून खाली डोकावून त्याकडे पाहावे लागते. हा दिवस आदित्यवारचा असल्यामुळे, येथे हजारो लोकांची गर्दी जमली होती. हे ठिकाण गंभीर असल्यामुळे इतकी गर्दी असूनही चहूंकडे शांत होते, त्यामुळे देखावा अधिकच गंभीर दिसला! थडग्याभोवती भिंतीच्या कोनाड्यांतून ७-८ पुतळे उभे आहेत. तशीच सभोवती निशाणे, भाले व काही हत्त्यारे ठेविली आहेत आणि त्याने जिंकलेल्या मुख्य-मुख्य लढायांचा भोवताली उल्लेख केला आहे. पण शेवटी ह्या जग जिंकू पाहणाऱ्या जेत्यास काळाने चीत करून आपल्या सर्वभक्षतेचे स्मारक येथे त्याच्या थडग्याच्या रूपाने स्थापित केले आहे.

दि बिग् व्हील : ह्यानंतर आम्ही 'राक्षसी चक्र' पहावयास गेलो. आपल्याकडे जत्रेच्या ठिकाणी जसे उंच पाळणे उभारून त्यात लोकांस बसवून हालवितात, त्याच नमुन्याचे पण अत्यंत प्रचंड हे वरील चक्र आहे. ह्याचा व्यास २००-२५० फूट असावा. सुमारे १०० फूट उंचीच्या दोन्ही कडच्या दोन-दोन तिरकस खांबांवर ह्या राक्षसी चक्राचा राक्षसी कणा ठेविला आहे. ह्या चक्राच्या परिघात सुमारे २० मोठ्या लाकडी पेट्या अथवा खोल्या बसविल्या आहेत. प्रत्येक खोली १५ हात लांब, ५ हात रुंद आणि ५ हात उंच आहे. एका खोलीत २० माणसे बसतील इतकी जागा असते. आत एक टेबल व दोन खुर्च्या ठेविलेल्या असतात. हे चक्र पाच पाच मिनिटांनी एकदा थांबते. तेव्हा खोलीत बसलेली माणसे बाहेर येतात व नवी आत जातात. एका फेरीस एका माणसास एक फ्रँक म्हणजे सुमारे १० आणे पडतात. खोलीच्या बाजू तावदानाच्या असल्यामुळे चहूकडचा पॅरीस शहराचा देखावा दिसतो आणि जेव्हा चक्राच्या वरच्या टोकावर जातो तेव्हा आम्ही आकाशात २००-२५० फूट उंच असतो. ज्या सळयांवर ह्या खोल्या अडकविल्या असतात, त्या फार जाड नसल्यामुळे केव्हाच मोडतील की काय अशी विनाकारण भीती वाटत असते. हे चक्र जेव्हा प्रथम सुरू केले तेव्हा ह्यास

हालविणाऱ्या यंत्राचा काही भाग बिघडला होता, तो दुरुस्त करून चक्र पुन्हा चालू करण्यास १२ तास लागले, तोपर्यंत २०० फुटांवरच्या खोलीत बसलेल्या माणसांची काय भयंकर अवस्थ झाली असेल याची कल्पना हे चक्र प्रत्यक्ष पाहिल्याशिवाय सहज होण्यासारखी नाही.

नंतर आम्ही एफे नावाचा प्रसिद्ध मनोरा पहावयास गेलो. हा ७००-८०० फूट उंच असावा असे म्हणतात. वरील चक्रापेक्षाही हे काम अचाट आहे. हा सर्व मनोरा लोखंडाचा आहे. दर मानसी दोन फ्रॅंक दिल्यास खोलीसकट मनोऱ्याच्या शिखरावर उचलून नेतात. वरून खाली पाहण्याची देखील छाती होत नाही. आम्ही अर्धा मनोरा चढून गेल्यावर पाऊस सोसाट्याने पडू लागला व वारा सोसाट्याचा सुटला म्हणून वर जाण्याचा नाद सोडून खाली उतरलो. हे असले अचाट कृत्य इतका खर्च केला असून ते कायम ठेवावे की पाडावे ह्याविषयी म्यूनिसिपालिटी वाद करीत आहे. हा मनोरा १८८९ च्या प्रदर्शनासाठी बांधला. हा पाडावा असे म्हणणाऱ्यांचा एक मुद्दा असा आहे की, मनोरा बेढब झाला! कमाल आहे फ्रेंच सौंदर्याची!! नुकत्याच झालेल्या प्रदर्शनासाठी बांधलेल्या भव्य व सुंदर इमारती पाडण्याचे काम चालले आहे.

९।। वाजता पॅरीसहून निघून रात्री १ वाजता कॅले येथे पोचलो. इंग्लिश चॅनेल ओलांडण्यास १ तास लागला. येथे समुद्र नेहमी खवळलेला असतो. आमच्या बरोबरच्या बहुतेकांस वांत्या झाल्या, मलाही फार मळमळले. ता. ७ रोजी सकाळी ७ वाजता लंडन येथे पोहोचलो. तेथे ३ दिवस राहून १० ला संध्याकाळी सुखरूप ऑक्सफर्ड येथे पोहोचलो, येथे माझा प्रवास संपला तो सुखाचा झाला, ह्याबद्दल परमेश्वराचा मी आभारी आहे.

●●●

४

'नॉटर डेम् द ला गार्ड' देऊळ व ते पाहून सुचलेले विचार

मँचेस्टर कॉलेज, ऑक्सफर्ड

ता. २९-११-१९०१

पुण्यात जशी पर्वती, मुंबईत जसा बाबुलनाथ, तसे हे वरील नावाचे देऊळ मार्सेय येथे आहे. ह्या फ्रेंच नावाचा मराठीत अर्थ 'आमची रक्षक माता' असा होतो. ही माता म्हणजे श्री येशू ख्रिस्ताची आई कुमारी मेरी ही होय. हीच ह्या देवळातील मुख्य आराध्य-दैवत आहे. शहराला लागूनच आग्नेय बाजूस एक उंच टेकडी आहे. तिच्या माथ्यावर हे सुंदर देऊळ बांधले आहे. टेकडी चढून वर जाईपर्यंत थकवा येतो. टेकडीच्या पायथ्यापासून तो माथ्यावर देवळाच्या दारापर्यंत लिफ्टने प्रेक्षकजनांस वर उचलून नेण्याची योजना केली आहे, असे आम्हांस वर गेल्यावर कळून आले. ही टेकडी समुद्राच्या काठावर असल्याने येथून एका बाजूस अनंत महासागराचा व दुसऱ्या बाजूस चित्रविचित्र मार्सेय शहराचा देखावा एकाच वेळी दिसत होता. माथ्यावर पोहोचल्यावर देवळाचा दगडी घाट लागला. आजूबाजूस आतबाहेर चहूकडे झाडून साफ केले असल्यामुळे, मनाला फार निर्मळ वाटले. तसेच या उंच एकांत पवित्र स्थळी माणसांची फारशी चाहूल नव्हती. म्हणून येथे लवकरच मन निःशंक होऊन खेळू लागले. देऊळ भक्कम दगडांचे बांधले असून काम साधे, सफाईदार व सुबक झाले आहे. तळमजल्याचे दार झाकले होते व आत अंधार दिसत होता. देवळाचा मुख्य भाग दुसऱ्या मजल्यात होता म्हणून आम्ही वर गेलो. आम्ही हिंदुस्थानचे लोक परकीय यवनांस आमच्या पवित्र देवळात येऊ देत नाही, तसेच ह्या देवळातही आम्हा हिंदजनांस जाऊ देतील की नाही ही अपवित्र शंका आमच्या मनात येऊन आम्ही सगळे दारातच घुटमळू लागलो. इतक्यात एका वृद्ध मनुष्याने आत जाण्यास खूण केली.

देवळात शिरलो, तेव्हा १२ चा अम्मल होता. चोहीकडे शांत व गंभीर देखावा दिसत होता. विरळा एकदा प्रेक्षक अगर उपासक पावलांचा आवाज न करता जपून पाहून अगर प्रार्थना करून नकळत जात असे. आत गेल्याबरोबर दोन्ही बाजूस दोन मोठ्या ७-८ फूट उंच पितळेच्या लखलखीत ठाणवया दिसल्या. त्यांवर २-३ फूट लांब बारीक मोठ्या शेकडो मेणबत्त्या जळत होत्या. हे ख्रिस्ती नंदादीप पाहिल्यावर कॅथालिक धर्माचे साक्षात् स्वरूप पुढे दिसू लागले. खालपासून वरती गाभाऱ्यापर्यंत विशाल भिंतीवरून पौराणिक चित्रे टांगली आहेत. कोठे येशू मुलांस खेळवीत आहे, कोठे दुःखितांचे अश्रू पुशीत आहे. कोठे आजाऱ्यास बरे करीत आहे तर दुसरीकडे कोठे स्वतः येशूचीच छळणा चालली आहे, कोठे त्यास सुळावर खिळून टाकले आहे, अशी नानातऱ्हेची चित्रे हुबेहुब रेखिली

होती. शिवाय कोपऱ्यात, कोनाड्यात, चौकात चौरंगावर निरनिराळ्या धातूंचे ओतलेले व दगडांचे घडविलेले येशूचे व त्याच्या शिष्यांचे पुतळे बसविले होते व त्यापुढे धूप, दीप, पुष्पादिकांचा थाट सजला होता. ही दिव्य शोभा पहात पहात आम्ही शिखराखालच्या मुख्य गाभाऱ्यात उच्च स्थानी दैदिप्यमान् देव्हाऱ्यावर उभी असलेली कुमारी मरीआमा हिच्यापुढे आलो. ही उंचीने वीस वर्षांच्या कुमारीइतकी होती. रंग सावळा, पोषाक अगदी साधा व पायघोळ आणि चेहरा उदात्त पण सचिंत आणि उदास दिसत होता. हिने डाव्या कडेवर लहानग्या येशूस घेतले होते. ह्या उतावळ्या अर्भकाचे वय केवळ १।। वर्षाचे असून तो काही केल्या आईच्या बगलेत ठरत नव्हता, ती आई तशीच बालकाकडे अर्धवट दुर्लक्ष करून, त्याचे पुढे कसे होईल ह्याच विवंचनेत तटस्थ उभी होती. इकडे पोरालाही आईच्या चिंतेची पर्वा मुळीच नसून उलट त्याच्या गुबगुबीत गालावर हास्याचे कमल फुलले होते!! त्याच्या डोईवर काट्यांचा सोनेरी मुकुट लकाकत होता. दीनोद्धारासाठीच जणू ह्या अचाट कीर्तीच्या लहान मूर्तीने आईच्या कडेवरून पुढे झेप टाकिली होती. ह्या माय-लेकरांच्या दोन्ही बाजूस नंदादीपाच्या तेजाची हजारो कारंजी सतत वाहात होती! अशा प्रकारे ह्या दैवी गुणांचे हे मंगल प्रदर्शन पाहून मन आपल्या स्वाभाविक धर्मास अनुसरून सर्व मंगल गुणांचे जे मूळ त्यास आळवू लागले! क्षणमात्र सात्विक वृत्तीच्या उच्च वातावरणात विहार करून पुनः मानवी कृतीचे कौतूक करण्यास ते खाली उतरले. इतक्यात १२ चा ठोका पडून चर्चमधील मध्यान्ह-घंटा दणदणू लागली. आम्हांला इतर ठिकाणे पहावयाची घाई होती म्हणून देवळाच्या दुसऱ्या बाजूची चित्रे आणि पुतळे लगबगीने पाहून बाहेर पडलो.

तुळजापुरची भवानी, सौंदत्तीची यल्लमा, कोल्हापूरची महालक्ष्मी इत्यादी जी जी काही पुरातन हिंदू देवस्थाने पाहिली आहेत त्यांची सहजच आठवण होऊन मार्सेयच्या मरीआमाच्या देवळाचे त्यांच्याशी साम्यभेद काय आहेत ह्याविषयी मनात विचार येऊ लागले. साम्य हे की हिंदू उपासकांस बारमाही आणि आठी प्रहर आपल्या देवळात मोठमोठ्या दिव्यांची आवश्यकता वाटते, तशीच येथेही ख्रिस्ती उपासकांस वाटत आहे. हिंदू आपल्या देवळांतील भिंतीवर रामरावणाची व कौरव पांडवांची चित्रे काढितो तर ख्रिस्त्यानेही येथे आपल्या भिंती, चित्रविचित्र केल्या आहेत. हिंदू आपल्या देवळात मुख्य स्थानी झगमगीत देव्हाऱ्यावर पार्थिव मूर्तीची स्थापना करितो, तशी येथे ख्रिस्त्यानेही आपल्या उपास्य देवतेची मूर्ती उभी केली आहे. येथपर्यंत दोघांचे केवळ साम्य आहे. ख्रिस्त्याने हिंदूस हिंदन, ऑयडॉलेटर (मूर्तिपूजक) इ. नावे ठेवून कितीही हिणविले तरी त्याने येथे आपली आकारप्रियता पूर्ण व्यक्त केली आहे. ही उणीव एकाद्या विशिष्ट धर्मपंथाची अगर मनुष्यवर्गाची नव्हे, तर हिचे मूळ मानवी स्वभावातच आहे. म्हण आहे. की, वाघ्याचा पाग्या बनला तरी त्याचा यळकोट जात नाही! त्याचप्रमाणे तिकडे पौरस्त्याने आपल्यास पूर्ण ब्रह्मज्ञानी, अद्वैती इ. इ. जाड्या संज्ञा देऊनही त्याच्या पाठीची लिंगपूजा अद्यापि सुटली नाही, आणि इकडे पाश्चात्य पॅगनचा ख्रिस्ती झाला तरी मूर्तिपूजा आणि विभूतिपूजा यांनी कोणत्या ना कोणत्या तरी रूपाने त्यास घेरले आहेच.

असो, मला येथे मूर्तीपूजेच्या युक्तायुक्ततेबद्दल विचार मुळीच कर्तव्य नाही, उलट बाह्य देखावा व आकृती ह्यांच्या साह्याने ईश्वराकडे मन जास्त लवकर लागते, निदान साधारण मनुष्यास तर हाच मार्ग योग्य आहे, हा जो मूर्तिपूजेच्या अभिमान्यांचा मोठा मुद्दा आहे तो मी तूर्त येथे गृहीत धरून चालतो! आणि मी वर जे हिंदू व ख्रिस्ती देवळांमध्ये साम्य दाखविले आहे त्यावरूनही वरील मुद्यालाच बळकटी येते, पण पुढे ह्या दोन्ही देवळांत भेद काय आहे तो पहा. देवळात मुख्य स्थानी ज्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठा झाली असते त्याविषयी विचार केला तर बराच भेद दिसून येतो. कित्येक ठिकाणी मारुतीच्या, कित्येक ठिकाणी गणपतीच्या, कित्येक ठिकाणी भयंकर देवीच्या मूर्ती असतात. काही ठिकाणी शेंदूर आणि तेल ह्यांच्या थराखाली व काही ठिकाणी बेढब वस्त्रालंकारांसाठी मूर्तीच्या मूळच्या रूपाचा लोप झालेला असतो. देवळाच्या भिंतीवरील चित्राकडे लक्ष गेलेच तर तेथे गावठी जिनगराचे कौशल्य झळकत असते. चित्रातील विषय पाहू गेल्यास कोठे मारुतीने कुंभकर्णाच्या डोक्यावर गदा मारिली आहे, तर कोठे कृष्णाने राधेस कवटाळले आहे, कोठे महिषासुरवध तर कोठे रासक्रीडा इत्यादी प्रकार चाललेले असतात.

धर्मसाधनाचे बाबतीत चित्रकार व शिल्पकार ह्यांची मदत अगदी अवश्यकच वाटल्यास वाटो; पण ती घ्यावयाची झाल्यास सौंदर्यशास्त्री आणि नीतिशास्त्री ह्यांच्या सल्ल्याने तरी ती घ्यावयाला पाहिजे ना? विशेषत: जेथे केवळ साधारण जनसमूहाच्याच फायद्यासाठी मूर्तीची योजना झालेली असते, तेथे तर अधिक काळजी घ्यावयाला पाहिजे. एकाद्या तिऱ्हाईताने इकडची देवळे व त्यांतील मूर्ती पाहिल्या तर तो मूळचा निराकारवादी असला, तरी कदाचित मूर्तिपूजक होण्याची इच्छा करील, पण त्याच तिऱ्हाईतास आमच्या एका देवळात नेले आणि त्यापुढे मूर्तिपूजेवर कितीही लांब व्याख्यान दिले, तरी तो विषय त्याच्या मनात नीटसा भरणार नाही इतका मोठा भेद पडण्याचे कारण काय असावे बरे? आमच्यात कलाकौशल्य कमी आहे काय? आम्ही नीतीने कमी आहो काय? का आमच्या पुराणांत, दंतकथांतून व इतिहासातून उदात्त विषयांची वाण आहे? छे, ह्यापैकी एकही गोष्ट वरील भेदाचे कारण असावे असे आमच्या शत्रुसही वाटणार नाही. श्री ख्रिस्ताच्या चरित्रातील देखाव्याचे इकडे जसे प्रदर्शन केले जात आहे, तसे तिकडेही श्रीकृष्णाच्या काही कृत्यांचे प्रदर्शन करता येणार नाही काय? आपल्या भक्तांचे घोडे धुणे, उष्टी काढणे, आपल्या भक्ताची जी दासी तिची वेणी घालणे, तिला दळू लागणे, इत्यादी पवित्र प्रेमाचे मासले ज्या विभूतीसंबंधाने ऐकतो, तिचीच विडंबना जागोजागी व वेळोवेळी काव्यांतून व चित्रांतून होत आहे आणि ती धर्माभिमान्यास खपत आहे! गौतमबुद्धाचा स्वार्थत्याग, बाबा नानकाची सुधारणा, कबीराची सत्यप्रीती आणि तुकोबाची भक्ती इ. अनेक सुबोधपर विषयांची निवडणूक करून रविवर्म्यासारख्या मार्मिक चित्रकारांनी त्यावर आपले चातुर्य खर्चिले, तर आमच्या देवळांच्या सौंदर्यात व पावित्र्यात किती भर पडेल बरे! पण अलीकडे जे नवीन नवीन धर्माच्या नावाने उत्सव निघू लागले आहेत आणि त्यात ज्या मूर्तींचे व चित्रांचे प्रदर्शन होत आहे, त्यावरून पाहता आमच्याकडील मूर्तिपूजकांचे लक्ष ह्या गोष्टीकडे लागेल, ह्याची काही संभव दिसत नाही.

●●●

५

लंडन शहर

मँचेस्टर कॉलेज, ऑक्सफर्ड

ता. १०-१-१९०२

आमच्या कॉलेजास नाताळची रजा मिळाल्याबरोबर ती लंडन येथे घालवावी म्हणून तिकडे निघालो. ज्या पाश्चात्य सुधारणेचे गोडवे आपण शाळांतून, कॉलेजांतून, ग्रंथांतून, गुरुमुखांतून ऐकतो-इतकेच नव्हे, तर जे हे सुधारणाचक्र, खाऊन पिऊन घरी स्वस्थ राम राम म्हणत बसणाऱ्या आमच्या साध्याभोळ्या राष्ट्रास आज सुमारे १०० वर्षे सारखे चाळवीत आहे. त्याची काही कळसत्रे वरील अचाट शहरात दिसतील ती पहावी असा एक हेतू निघतेवेळी मनात दडून राहिला होता. कारण ऑक्सफर्डचे विद्यापीठ हे एक थोरले आश्रम असल्यासारखे आहे. येथे विद्याव्यासंगाशिवाय दुसऱ्या कसल्याही भानगडीचे वारे नाही. आणि आधुनिक सुधारणारूपी चीज तयार होण्याची लंडनएवढी मोठी वखार तर जगात दुसरीकडे कोठे नाही. तेव्हा निघताना माझ्या मनात वरील हेतू असणे साहजिक आहे. पण लंडन येथे गेल्यावर निराळाच प्रकार झाला! सुधारलेल्या उद्योगी लोकांचे ५६ लाख वस्तीचे हे मुख्य शहर ह्यात प्रथम गेल्याबरोबर मानवी महासागरात आपण जणू गटांगळ्या खातो आहो की काय असे वाटू लागते! आमच्याकडील पारमार्थिक कवींनी भवसागराविषयीची आपली भीती वारंवार प्रदर्शित केली आहे. त्यापैकी एकादा जर ह्या साक्षात भवसागरात येऊन पडला, तर बिचाऱ्याची कोण त्रेधा उडून जाईल! कुठल्याही रहदारीच्या रस्त्यात गेल्याबरोबर स्त्री-पुरुषांच्या लाटांवर लाटा थडकत असताना पाहून जगावर मनुष्यप्राणी सवंग झाला आहे, असे वाटते आणि त्याविषयी फारशी पूज्यबुद्धी राहत नाही. शेकडो मंडळ्या, हजारो संस्था, अनेक भानगडी व असंख्य चळवळी, सार्वजनिक हिताकरिता चाललेल्या आहेत हे गाईडबुकावरून कळते. पण त्या कोणत्या कोपऱ्यात आहेत व त्यांचे ह्या जनसमूहावर काय कार्य घडते, ह्याचा काही बोध होत नाही. अशा स्थितीत माझ्या वरील हेतूची काय वाट झाली असावी, हे निराळे सांगावयास नको. शिवाय स्पेन्सरने आपल्या 'समाजशास्त्राचे अध्ययन' ह्या ग्रंथात लिहिलेले आठवते की कोणी एक फ्रेंच प्रवासी इंग्लंडात येऊन आठ दिवस राहिल्यावर त्यास इंग्रजांविषयी एक ग्रंथ लिहावा असे वाटून तो लिहू लागला. एका महिन्याने त्याच्या मतांविषयी त्यालाच खात्री वाटेना. एक वर्षभर राहिल्यावर तर ग्रंथ लिहिण्याचे काम त्याने अजीबात टाकून दिले! तात्पर्य विश्रांतीकरिता मिळालेल्या सुटीत नुसते तर्क लढविण्याची दगदग न करिता ह्या अक्राळविक्राळ शहरात नजरेस पडतील ते चमत्कार मुकाट्याने पाहण्याचा मी निश्चय केला!

दिला आहे की पहावे तिकडे अक्षरे, चित्रे आणि पुतळे हीच दिसतात. कित्येक हालतात, कित्येक लकाकतात, तर कित्येक वारंवार आपला रंग बदलतात! शहरास कंटाळून बाहेर पडलो, तर शेतांतून व पिकांतूनही जाहिराती दिसाव्यात काय? भुईखालच्या विजेच्या गाडीकडे जाण्यास मी एकदा लिफ्टमधून खाली उतरत असताना माझी नजर काळोखातून सहज भुयाराच्या भिंतीकडे गेली. तितक्यातच लिफ्टच्या उजेडामुळे भिंतीवर एक जाहिरात दिसली!! अशा ह्या मायावी लोकांपुढे व्यापारात आमचा टिकाव कसा लागेल!

नुसत्या भपक्या-भपक्यानेच ह्यांचा व्यापार इतका वाढला आहे, असे म्हणणे केवळ भ्रममूलक आहे. अनियंत्रित व्यापार आणि कायदेशीर स्पर्धा ह्या तत्त्वाचा ह्या लोकांवर असा फायदेशीर परिणाम झाला आहे. की गिऱ्हाईकांशी बेशिस्तपणा, आडदांडपणा, बेविश्वास अगर किंमतीत अफरातफर केल्यास व्यापारी आपले भांडवल लवकरच गमावून घेईल. आपल्या पेढीची कोणत्याही प्रकारे बदनामी होऊ नये इतकेच नव्हे, तर लहान-थोर दर्जाच्या कसल्याही गिऱ्हाईकाचे क्षुल्लक बाबतीतही मन दुखवू नये म्हणून दुकानदार हरएक प्रयत्न करीत असतात. एकंदरीत सौंदर्य, बुध्दी आणि नीती ह्या तीनही मुख्य तत्त्वांची समान सांगड घालून दीर्घोद्योग व अचाट धाडस व निश्चळ श्रद्धा ह्यांच्या पायावर ह्या लोकांनी आपल्या व्यापारशास्त्राची इमारत उभारली आहे म्हणून लंडन शहरास हल्लीचे वैभव आले आहे.

हे लोक स्वार्थी आहेत, सुखार्थी आहेत, जडवादी आहेत इ. समज पुष्कळ शहाण्या लोकांचेही आहेत आणि इकडे आल्यावर ह्यांचे वैभव, ह्यांची चैन आणि फॅशन्स पाहून हेच ग्रह कायम होण्याचा पुष्कळ संभव आहे, इकडील बाजारातील एक चतुर्थांश तरी माल निव्वळ चैनीचा आहे असे दिसेल. परवा 'ख्रिस्तमस बजार' ह्या नावाचे केवळ नाताळाकरिता एक जंगी दुकान मांडण्यात आले होते, त्यात तळघरापासून तो वर चार मजल्यांपर्यंत लहान मुलांस नाताळात नजर करण्याची खेळणी मांडून ठेविली होती. हे लाखो रुपयांचे दुकान पाहून मला वाटले की इंग्लंडातील लहान मुलांनी जर नुसती आपली खेळणी विकली तर हिंदुस्तानातील दुष्काळपीडितांचे प्राण वाचतील! असो, तो भाग वेगळा. पण पाश्चात्य सुधारणेचे सर्व रहस्य केवळ चैनीतच नाही. जगात राहून सुख भोगण्याची अत्यंत लालसा ह्या लोकास आहे हे खरे. पण, पृथ्वीवर राहून आकाशातील स्वर्गाकडे उडी न घेता येथेच स्वर्ग उतरविण्याची ह्यांची दिशा आहे. हे लोक स्वार्थी आहेत हे तर खरेच. पण स्वार्थ साधल्याबरोबर परमार्थास ते कसे लागतात, हे आम्हांस समजून घेणे आहे. असो. आज इकडील भौतिक प्रकार सांगितला. पुढे साधल्यास एक दोन बौद्धिक आणि नैतिक मासले सांगेन.

●●●

६

ब्रिटिश म्युझिअम

मँचेस्टर कॉलेज, ऑक्सफर्ड

ता. ७-२-१९०२

'कालो ह्ययं निरवधिर्विपुला च पृथ्वी'

ह्या विपुल पृथ्वीवर निरवधी कालातून ज्या अनेक सुधारणांचा आजवर अवतार झाला आणि समाप्ती झाली, त्या सर्वांवर शिरोमणी होऊन बसलेली जी आधुनिक सुधारणा तिच्या साम्राज्याखाली आम्ही आहो. जगाच्या इतिहासात ज्यांनी हजारो वर्षे आपले प्रताप गाजविले, अशा गत सुधारणांपैकी काहींचे हल्ली फार थोडे अवशेष राहिले आहेत. काही नुसत्या नामशेष झाल्या आहेत, आणि काहींचा तर विस्मृतीच्या अभेद्य अंधार-पठलातून अद्यापि पत्ता लागला नाही. मागील सुधारणा जगाच्या रंगभूमीवरील एकेका कोपऱ्यात आपापले प्रकार पाडून अस्तास गेल्या, पण हल्लीच्या सुधारणा-सहस्त्ररश्मी सर्व भूगोलावर आपला प्रकाश पाडून वरती तारामंडलात चंद्र, मंगळ इत्यादी खगोलांकडे आपली किरणे सोडीत आहे. तथापि आमचे डोळे दिपून जाऊ नयेत. स्वकालीन सुधारणेविषयी पक्षपात घडून अंगी स्वयंमन्यता शिरू न दिली पाहिजे. कालचक्राच्या वाढत्या कलेकडे नजर दिली असता, शास्त्र कला, वाङ्मय इ. बाबतीत मागच्यात न सापडणारा असा एकादा जाज्वल्य विशेष गुण आधुनिकेत आहे, असे जरी म्हणता येत नाही, तरी एक भेद फार लक्षात ठेवण्यासारखा आहे. मागील सुधारणांचा प्रदेश आकुंचित होता, इतकेच नव्हे, तर त्यास परस्परांची खबरच नव्हती. ऐतिहासिक-प्रवृत्ती आणि तुलनात्मक शास्त्रीय पद्धती हे दोन गुण हल्लीप्रमाणे व हल्लीच्या प्रमाणाने मागे नव्हते, असे म्हटल्यास आत्मस्तुतीचा विशेष दोष घडेल असे वाटत नाही. ह्या प्रभेदाचे मूर्तिमंत स्वरूप पहावयाचे झाल्यास वर निर्दिष्ट केलेले ब्रिटिश म्युझिअम हे अत्यंत उत्तम स्थान आहे. तर ते आपण पाहू या.

लंडन शहराचे मध्यभागी ब्लूमसबरीमध्ये ब्रिटिश म्युझिअमची विशाल इमारत आहे. इमारत अत्यंत सुंदर व त्याहूनही अफाट आहे खरी, पण तिच्याकडे पहाण्यास व तिचे मोजमाप घेण्यास आपणास सध्या वेळ नाही, तर आपण थेट मध्य दालनात जाऊ या. अगणित पैसा अगदी पाण्याप्रमाणे ओतून ह्या लोकांनी जे हे विचित्र आणि विविध विषयांचे अदृष्टपूर्व संग्रहालय करून ठेविले आहे, ह्याचा हेतू केवळ चार रिकामटेकड्यांनी येथे सहज वाट चुकून येऊन आपल्या आळसावलेल्या मनाची चार घटका करमणूक करून घ्यावी एवढाच असेल अशी कल्पनादेखील मनात आणू नका.

उलट ते पहा, मोठे मोठे प्राचीन इतिहासशास्त्री, शोधक, लेखक, पंडित एकेका कोपऱ्यातून एकाद्या पदार्थाकडे किती खोल दृष्टीने टक लावून पहात आहेत! तर आपण त्यास कसलाही त्रास पोहोचू नये म्हणून पाऊल न वाजविता हळूच आत शिरू या. चित्त वेधून जाऊन अंतःकरण तल्लीन होणे ही खरोखर ज्ञानप्राप्तीच्या वेळेची स्वाभाविक अवस्था होय. अगदी लहान मुले अशीच बिनश्रमाने पण मोठ्या कौतुकाने मानवी ज्ञानाचा मोठ्या महत्त्वाचा भाग केवळ पूर्ववयातच शिकतात. तशातलाच काहीसा (प्रकृतीच्या मानाने अर्थात कमी-जास्त) प्रकार आपलाही येथे होईल, करमणूक तर होईलच होईल. पण नकळत ज्ञानप्राप्ती काय झाली, ते आपल्यास बाहेर पडल्यावर कळेल.

आता आपण मध्य दालनात उभे आहो. सभोवती प्रागैतिहासिक कालाचा देखावा पसरला आहे. ह्या कालाचे मुख्यतः चार भाग होतात.

(१) पूर्वपाषाणयुग (Palaeolithic Age) -- ह्या पहा आमच्या पूर्वजांच्या सापडलेल्या काही अत्यंत जुन्या वस्तू. आमचे बंधू जे इतर प्राणी त्यांच्यापासून आमचे पूर्वज येथे नुकतेच विभक्त झाले आहेत. संसारयात्रेत अगर जीवनकलहात त्यांनी आपल्या शरीराबाहेरची प्रथम जी उपकरणे उपयोगात आणिली ती हत्यारे ही होत. अर्थात ती दगडाचीच असावयाची. ही नदीच्या प्रवाहातून व गुहांतून सापडली आहेत. कारण आम्ही त्यावेळी गुहांतूनच राहत होतो. ही हत्यारे किती वेडीवाकडी ओबडधोबड आहेत! त्यातच पहा काही लहान मोठी हाडे मिसळून ठेविली आहेत. ती हल्ली लुप्तप्राय झालेल्या त्यावेळच्या पाणघोड्यांची व सांबरांची असावीत. हे लोक इंग्लंडात व वेल्समध्ये कोणकोणत्या प्रदेशात रहात होते, हे दाखविण्यासाठी तो पहा भिंतीवर त्यावेळचा इंग्लंडचा नकाशा टांगला आहे. आम्ही त्यावेळी भांडी वापरीत होतो की नाही, ते सांगता येत नाही. तसेच आमच्या हत्यारांस मुठीही नाहीत. थोडेसे पुढे चला, तुम्हांला मुठी दिसतील. शेवटी येथे पहा किती सुंदर हस्तीदंती व शिंगटांच्या मुठीत ही कट्यारे बसविली आहेत. ह्या मुठीवरून त्या त्या प्राण्यांची किती हुबेहूब चित्रे उठविली आहेत. ही ह्या युगातली नव्हेत बरे! ही पहा ह्या मोठ्या तावदानाच्या पेटीत आमच्या राहत्या गुहेची तळजमीन, जशीच्या तशीच आणून ठेविली आहे. ही फ्रान्सात सापडली.

(२) उत्तर-पाषाणयुग (Neolithic Age) -- येथील हत्यारे चांगली घासलेली-पुसलेली पाणीदार आहेत. ज्या प्राण्यांची हाडे येथे दिसतात, त्यांपैकी काही अद्यापि सापडतात. येथे पहा काही हत्यारे करण्याचे कारखाने सापडले आहेत. कारण येथे अर्धवट बनविलेली पुष्कळ हत्यारे व हत्यारे बनविण्याची काही यंत्रे व सामान सापडले आहे. तशीच येथे थडग्यात सापडलेली काही भांडी आहेत. बहुतकरून आत मृतांची राख असावी.

(३) काशाचे युग (Bronze Age) -- इतक्या प्राचीन काळी लोखंडाच्याही पूर्वी ही मिश्र धातू कशी आढळते, हा एक चमत्कारच आहे, येथे भांड्यात व हत्यारांत पुष्कळ सुधारणा झाली आहे. त्यांचे कट्यारे, कोयते, सुऱ्या, बर्च्या, तरवारी इ. अनेक प्रकार आढळतात. तसेच हे पहा सोन्याचे

मानितो, किंबहुना जगाच्या सुधारणेस येथूनच आरंभ झाला असे म्हणतो. इतकेच नव्हे तर वेद अनादी आहेत असे मानण्यापर्यंतही आमची मजल जाते. पण ह्या बाबतीत ज्यांनी परिश्रम केले आहेत ते वेदास ख्रिस्ती शकापूर्वी १५०० वर्षांपेक्षा अधिक मागे नेत नाहीत. त्यांचे म्हणणे खरे असेल तर आम्हांपासून वेदांचा उदय जितका दूर आहे, तितकाच जवळजवळ इजिप्शिअन सुधारणेचा उदय वेदापासून मागे दूर आहे, असे म्हणावे लागते. कारण ख्रिस्तीशतकापूर्वी ४५०० वर्षाच्याही मागचे इजिप्शिअन लेख आणि राखून ठेविलेली प्रेते आढळतात. इजिप्तच्या प्राचीन इतिहासात जे राजे झाले त्यांची एकंदर तीस घराणी आहेत. ह्यांनी इ. स. पूर्वी ४४००-३४० पर्यंत राज्य केल्याचे लेख आढळतात. प्राचीन शाही (इ. स. पूर्वी ४४००-२४६५), मधली शाही (इ. स. पूर्वी २४६५-१२००), नवी शाही (इ. स पूर्वी १२००-३४०) असे ह्याचे भाग पडतात. पहिल्या तीन घराण्यांतील राज्यांची नुसत्या नावापलीकडे काही माहिती मिळत नाही. चौथ्या घराण्याने आपल्या वैभवाची कायमची स्मारके करून ठेविली आहेत. दुसरा राजा खुफू (इ. स. पूर्वी ३७३३-३७००) याने गीझे येथील (Great Pyramid) मोठा मनोरा बांधिला. त्याचे काही दगड उत्तरेकडील खोलीत ठेविले आहेत. पहिल्या खोलीत कालानुक्रमाने ममी व ममीच्या पेट्या मांडून ठेविल्या आहेत. ममी म्हणजे इजिप्शिअन लोकांनी पुरातन काळी अनेक प्रकारचे मसाले तयार करून त्यात सुरक्षित स्थळी राखून ठेविलेली प्रेते होत. ह्या लोकांमध्ये ही चाल इ. स. पूर्वी ४५०० (कदाचित ह्यापेक्षा पूर्वी) वर्षापासून इ. स. नंतर ५०० वर्षांपर्यंत होती. निजलेल्या मनुष्याचा आत्मा जसा पुन: परत येतो तसा मृत शरीरातही आत्मा परत येणार आहे अशी ह्या लोकांची समजूत होती. म्हणून इतके श्रम करून व अक्कल खर्चून ते आपल्या नातलगांची प्रेते जपून ठेवणे हे आपले कर्तव्य मानीत. ममी करण्याच्या निरनिराळ्या तऱ्हा होत्या. प्रेताची आतडी बाहेर काढून एका घटामध्ये घालून त्याच्या शेजारी ठेवीत, आणि प्रेतास प्रथम अनेक प्रकारच्या क्षारांचे आणि अत्तरांचे लेप देऊन वर सुरेख तागाच्या पट्ट्यांनी त्यास लपेटीत. कधी-कधी ४०० यार्ड लांब पट्ट्या लागत असत! गुंडाळताना प्रेतास सपशेल उताणे निजवीत. ममी तयार झाल्यावर त्यास त्याच्याच आकाराच्या लाकडी अगर दगडी पेटीत घालून ती बंद करीत, वरती रंग देऊन प्रेताचे चित्र काढीत, व लेख खोदीत. बऱ्याच पेट्यांवरचा रंग व चित्रे अद्यापि जशीच्या तशीच आहेत. पिवळा रंग हा ह्यांचा मोठा आवडीचा दिसतो.

इजिप्शियन लोकांची अत्यंत पुरातन थडगी म्हणजे मास्टाबा अथवा पिरामिड (मनोरे) हे होत. खाली प्रथम देवळाच्या आकाराची एक खोली करून तिच्या एका भागात मयताची मूर्ती बसवीत. तिच्याच खाली जमिनीत तळघर करून त्यात त्याची ममी ठेवीत. कित्येक ठिकाणी खडकातून अशी पुष्कळ घरे खोदून त्यात एका कुटुंबातील अगर घराण्यातील सर्व ममींची योजना केली जात असे. ह्या घरांच्या भिंतीवरून मयताच्या करमणुकीसाठी त्याच्या चरित्रातील घरगुती आणि सामाजिक प्रसंगांची सुंदर चित्रे काढीत. उत्तरेकडील दालनात ह्या भिंतीवरचे पदर चित्रासकट जसेच्या तसेच काढून लाविले आहेत ते पहा, म्हणजे ५-६ हजार वर्षापूर्वीची इजिप्शिअन राहाटी तुम्हांला कळेल. त्याच भिंतीवर 'एबिडॉस'ची फळी लाविली आहे. तिच्यावर इ. स. पूर्वी ४४००-१३३३ पर्यंतच्या सर्व

कला कशी उद्‌भवली व नंतर तेथे आणि दुसरीकडे तिचा कसा विस्तार झाला, हे दाखविण्यासाठी त्या त्या काळाची छापील बुके अनुक्रमे लावून ठेविली आहेत पंधराव्या शतकापासून तो अठराव्या शतकाच्या अखेरपर्यंत पुस्तक बांधण्याच्या कलेचा कसा विकास झाला, हे दाखविण्याकरिता शेवटच्या सहा कपाटांत निवडक बांधणीची मोठमोठी पुस्तके जुळवून ठेविली आहेत. मध्यभागी सहा कपाटांत इ. स. पूर्वी ३०० वर्षांपासून तो इ. स. नंतर १५०० वर्षांपर्यंत लेखनकलेचा इतिहास दाखविण्याकरिता त्या त्या काळच्या हस्तलिखित प्रती अनुक्रमे मांडून ठेविल्या आहेत. प्रचीन काळी इजिप्त देशात पेपिरस नावाच्या बोरुच्या झाडाच्या सालीचा एक प्रकारचा कागद बनवीन असत. इजिप्तचे प्राचीन लेख ह्याच कागदावर लिहिले आहेत. सर्वात जुना उपलब्ध लेख इ. स. पूर्वी ३५०० वर्षांचा आहे!... ह्याशिवाय वर्तमानपत्रे आणि मासिके ह्यांची एक निराळी खोली आहे. नवीन होणाऱ्या पुस्तकांचा ह्या संग्रहात समावेश व्हावा म्हणून संयुक्त राज्यातील प्रत्येक प्रकाशकाने आपल्या नवीन पुस्तकाची एकेक प्रत एडिंबरोची लायब्ररी, आणि ब्रिटिश म्युझिअम येथे पाठवावी, असा पार्लमेंटाने सक्तीचा कायदा केला आहे. ह्याप्रकारे म्युझिअम पाहून दारात आल्यावर तोंडातून आपोआप उद्‌गार येतो की **"कालो ह्ययं निरवधिर्विपुला च पृथ्वी"**

●●●

७

लंडन येथील बालहत्यानिवारक गृह

मँचेस्टर कॉलेज, ऑक्सफर्ड

ता. ७-३-१९०२

ह्या अफाट शहराच्या मध्यभागी गिल्डफर्ड रस्त्यातून एके दिवशी जात असता एक भव्य व जुनी इमारत दिसली. तिचे दारावर लिहिलेले वरील नाव वाचून मला आत जाण्याची इच्छा झाली. पण सोमवारीच हे गृह प्रेक्षकांकरिता उघडे असते म्हणून एका सोमवारी ओळखीचे पत्र वगैरे मुद्दाम काही न नेता बरोबर एका सोबत्यास घेऊन पहावयास गेलो. रस्त्यातील फाटक ओलांडल्यावर विस्तीर्ण आणि स्वच्छ पटांगण लागले. त्यातून चिटणीसांचे कचेरीत गेल्यावर आम्हांला सर्व गृह हिंडून दाखविण्याकरिता आम्हांबरोबर एका चौदा वर्षाच्या हुषार मुलास दिले. ह्या छोकऱ्याने आम्हांस मोठ्या व्यवस्थेने चित्रांची खोली, कमिटी बसावयाची जागा, म्युझिअम इ. दाखविल्या आणि प्रत्येकाची थोडक्यात चटकदार माहिती दिली. कमिटीच्या खोलीतील एका मोठ्या सुंदर तसबिरीत ख्रिस्ताजवळ काही लहानलहान मुले खेळत होती, तिचे खाली हे सोन्याचे वाक्य बायबलातून लिहिले होते. **"लहानग्यास मजकडे येऊ द्या, कारण अशाकरिताच देवाचे राज्य आहे,"** चित्रांच्या खोलीत **हँडल** आणि **हॉगर्थ** ह्यांची प्रख्यात चित्रे ठेविली होती. म्युझिअममध्ये कित्येक मिशनऱ्यांकडून मुलास नाताळ निमित्त बक्षिसे देण्यास पुस्तके व इतर चिजा मिळालेल्या मांडून ठेविल्या होत्या. मध्यभागी एका गोल टेबलावर कोणा एका मोठ्या एडिटराने दिलेल्या बाहुल्या, फुले, माळा, खेळणी, कोनाकृती रचून ठेविल्या होत्या. ह्यानंतर आमच्या चिमुकल्या वाटाड्याने आम्हांस भोजनगृहात नेले. १०० मुले रांगेने दोन्ही बाजूने बसतील असे एक लांब टेबल होते. ५/७ मुले नाताळासाठी भोजनगृह सुशोभित करण्यात अगदी गर्क झाली होती. ती सर्वच आम्ही आत गेल्याबरोबर आम्हांजवळ आनंदाने हासत हासत आली. भिंतीवरच्या एका फळीवर जाड अक्षरांनी लिहिलेली १०-२० नावे आम्हांला मोठ्या अभिमानाने दाखविण्यात आली. ती नावे दक्षिण आफ्रिकेच्या लढाईत बँड बाजविण्यास नुकतेच पाठविलेल्या ह्यांच्या बंधूंची होती. एका पोटी जन्मलेल्या भावांमध्येदेखील क्वचित बाबतीत असा अभिमान आढळणार नाही. ह्याच खोलीत एका कोपऱ्यात मुलांच्या लक्षात सहज भरतील अशा रीतीने मोठमोठ्या आश्रयदात्यांची नावे लिहिली होती.

एकंदर आश्रमाचे तीन भाग केले आहेत. ७ पासून १२ वर्षांच्या मुलांचा एक भाग. ७ पासून १५ वर्षांच्या मुलींचा दुसरा भाग आणि ३ पासून ७ वर्षांच्या लहान मुला-मुलींचा तिसरा भाग. ह्यास

अनुलक्षूनच इमारतीच्या दोन उभ्या बाजू आणि मधली आडवी रांग अशी योजना केली आहे. एका बाजूस मुलांची खाली जेवणाची जागा, वरती निजण्याची जागा व मागे शाळा आणि दुसऱ्या बाजूस तशीच मुलींची व्यवस्था केली आहे. त्यास एकमेकांत मिसळण्याची सक्त मनाई आहे.

नंतर आम्ही शाळेत गेलो. एकंदर १०० मोठ्या मुलांचे वयाचे मानाने तीन वर्ग केलेले आहेत. तिन्हींचा अभ्यास चालला होता. मुख्य अध्यापकाने सांगितले की मुलांकडून शाळेतील अभ्यास अर्धा वेळ करून घेऊन बाकीच्या वेळात त्यास कसला तरी धंदा आणि विशेषेकरून बँड वाजविण्यास आणि कवाईत करण्यास शिकविले जाते. मुलींस सर्व घरगुती कामे करण्यास शिकवितात. १५ वर्षांनंतर मुलास बहुतकरून लढाईत बँड वाजविण्यास अगर कोणत्यातरी धंद्यात उमेदवारीस ठेवण्यात येते. मुलीस सभ्य कुटुंबात तिच्या हुषारीप्रमाणे नोकरी पाहून देतात, २१ वर्षांपर्यंत मुला-मुलींवर गृहाची नजर असते. नंतर ती मुखत्यार होतात. अशा प्रकारे ह्या गृहात अजमासे १०० मुलगे, १०० मुली आणि १०० लहान बालके इतक्या अनाथांची जोपासना होत आहे. ह्याशिवाय जन्मल्यापासून तो ३ वर्षांपर्यंतच्या सुमारे २०० तान्ह्या मुलांची जोपासना निरनिराळ्या खेड्यांतून गृहामार्फतच होत आहे.

ह्यानंतर मुलांस काही प्रश्न विचारल्यावर मग आम्ही बाहेरच्या पटांगणात आलो, इतक्यात लहान मुलांचा वर्ग सुटला. दोन दोन मुले हातात हात घालून रांगेने लांबवर लुटू लुटू चालू लागली. एक पोक्त बाई त्यांस हिंडवीत होती. ह्या चिमुकल्या पलटणीचा ड्रेस अगदी एकसारखा असल्यामुळे पुढे होणाऱ्या लढायातील ह्यात योद्धा कोण होता व त्याची शुश्रुषा करणारी दाई कोण होती हे सहज कळत नव्हते. सर्वांची प्रकृती सुदृढ, चेहरे प्रफुल्लित दिसत होते. ह्या बाईशी बोलत असता मुलांनी आम्हांभोवती गराडा दिला. सर्वांशीच हात हालविण्यास आम्हांस वेळ नव्हता म्हणून बाकीच्यांनी आम्हांस कोठे तरी नुसता स्पर्श करून आपली तृप्ती करून घेतली!

नंतर आम्ही प्रार्थनामंदिर पाहिले. हे मोठ्या थाटाचे असून ह्यात दोन तीन हजार लोक सुखाने बसतील अशी सोय केली आहे. निजावयाची जागा पाहिली, अगदी लहानापासून तो मोठ्यापर्यंत प्रत्येकास निराळी खाट आणि स्वच्छ मऊ व उबदार गाद्या आहेत. मागचे बाजूस आजारी मुलांकरिता दवाखाना आहे.

गृहाचा इतिहास

फ्रान्स, हॉलंड देशांतून अशा प्रकारच्या संस्था पाहून येऊन लंडन येथे टॉमस कोरम् नावाच्या एका मोठ्या परोपकारी व्यापाऱ्याने १७३९ त ही संस्था स्थापिली. प्रथम प्रथम जरी दोन महिन्यांच्या खालचीच मुले घेतली जात होती तरी दारावर मुले आणणाऱ्यांची मोठी गर्दी जमू लागली व दंगे व मारामाऱ्याही होऊ लागल्या. ह्याप्रमाणे पुष्कळ अर्भकांस नाइलाजास्तव परत पाठवावे लागत असे. म्हणून १७५६ मध्ये कमिटीने पार्लमेंटकडे मदतीबद्दल अर्ज केल्यावरून दहा हजार पौंडांची

पापी पण अनुतापी आईच्या पोटी यदृच्छेने आलेल्या इतक्या मुलांचे येथे पोषण व शिक्षण होते. वर सांगितलेल्या सुंदर भोजनालयात ह्यांच्यासाठी दर रविवारी उपासना होतात, त्यावेळी शेजारच्या भागातील भाविक सभ्य स्त्री-पुरुष उपासनेस येतात. उपदेशक पगारी आचार्य आहेत. प्रत्येक वेळी धर्मार्थ फंड गोळा होतो. ह्या प्रकारे धर्माचे खरे लक्षण जो निष्काम परोपकारी तो येथे नित्य घडतो! आणि आमच्यासारख्या परस्थास ह्या लोकांची एका दगडासरशी दोनचार पाखरे पाडण्याची बेमालूम तोड पाहून भारी कौतुक वाटते. मुले काम करण्याच्या लायकीची झाली म्हणजे त्यांना योग्य कामे व नोकऱ्या लावून देतात. आणि २१ वर्षांची होऊन मुखत्यार झाली म्हणजे वर्षातील एका नियमित रविवारी त्यांच्या आभार प्रदर्शनासाठी म्हणून एक थाटाची उपासना होते. त्यावेळी कोणा तरी नामांकित बिशपचा उपदेश होतो. मुलांच्यातर्फे आभार मानल्यावर त्यास बक्षिसे वाटून शिवाय चांगल्या वर्तणुकीबद्दल प्रेसिडेंटच्या सहीची शिफारसपत्रे मिळतात. गतसाली ड्यूक ऑफ पोर्टलंड (उपाध्यक्ष) ह्यांनी बक्षिसे वाटली. ह्या प्रकारे अत्यंत सोवळे धर्माधिकारी व बडेबडे जातिवंत मानकरी ह्यांना देखील ह्या संस्थेशी प्रत्यक्ष संबंध ठेविण्यात मुळीच लांछन वाटत नाही!! गृहाच्या म्युझिअममध्ये दोन ..... हृदयात बाणासारख्या घुसणाऱ्या मुर्ती ठेविल्या आहेत, त्या अशा - प्रस्थापक परोपकारी टॉमस कोरम ह्यांची वयाने वाकलेली गंभीर मूर्ती उभी आहे. त्यांच्या डाव्या, हातात नुकतेच जन्मलेले बालक खेळत आहे. त्याच्या पायाजवळ पश्चातापाखाली चुरडून गेलेल्या एका तरुण व मुग्ध पोरीने गुडघे टेकिले आहेत. तिने आपले शरमिंधे तोंड एका हाताने घट्ट झाकलेले आहे. कोरम साहेब मात्र दुसऱ्या हाताने शेक हँड करीत आहेत! इकडे मुलाने कोरम साहेबांच्या वासकुटाची गुंडी घट्ट धरली आहे! जणू काय, त्यांच्या परोपकाराचा फायदा ते हक्काने मागीत आहे!!

असो, अशा संस्थांचा उत्कर्ष होणे इष्ट आहे असे मुळीच नव्हे. पण मानवी स्वभावाची पूर्णता होईपर्यंत ह्या संस्था सर्व देशांत अवश्य आहेत, असे कष्टाने म्हणावे लागते. विधवा-विवाहास पूर्ण संमती असूनही ह्या देशात अशा संस्थांची गरज भासत आहे. हे सुधारकांनी ध्यानात घेण्यासारखे आहे. आणि नुसती गरज आहे असे म्हणून स्वस्थ न बसता आज शेकडो वर्षे ही एकच नव्हे तर अशाच दुसऱ्या अनेक संस्था ह्या एका लंडन शहरात चालू आहेत, ही गोष्ट, बालविधवांनादेखील शास्त्रोक्त विवाह करण्याची जेथे सक्त मनाई आहे, तेथील सदय धर्माभिमान्यांनी लक्षात आणावी.

जे का रंजले गांजले । त्यासी म्हणे जो आपुले।।
तुका म्हणे सांगो किती । तोचि भगवंताची मूर्ति।।

कित्येक प्रत्यक्ष कृती करून तुकारामाचे भगवंत बनतात! कित्येक नुसता त्यांचा उपदेश ऐकून माना डोलवितात! कित्येक कसल्याही भानगडीत पडत नाहीत! आणि कित्येक तर प्रार्थनासमाजाने असलीच एक संस्था पंढरपुरास चालविली आहे, म्हणून त्याच्यावर दात ओठ खातात!!

●●●

८

सोमयागाचे वर्णन वाचून वाटलेला विस्मय व विषाद

डेव्हनपोर्ट

ता. ३-४-१९०२

परवा गुडफ्रायडेच्या दिवशी येथील निरनिराळ्या ख्रिस्तीधर्मपंथाच्या देवळात निरनिराळ्या थाटाच्या उपासना सर्व दिवसभर झाल्या. अज्ञान, दुराग्रह, सवय किंवा दुसऱ्या अनेक अज्ञेय आणि अनिर्वाच्य कारणांमुळे ह्या सुधारणेच्या शिखरास पोहोचलेल्या राष्ट्रातसुद्धा अद्यापि धर्मभोळेपणाचे जे अवशेष राहिले आहेत, त्यांचे दिग्दर्शन वरीलप्रसंगी बरेच झाले. त्यांपैकी काही अनुभवाचे मासले आपल्याकडे पाठविणार होतो, इतक्यात ता. ११ मार्च, १९०२ च्या केसरीने कृष्णातटाकी नुकत्याच घडलेल्या सोमयागाची गोष्ट यथासांग सांगितली. ती ऐकून दुसऱ्याचे घरी डोकावून पाहून तेथे काय चालले आहे त्यासंबंधी चर्चा करण्यापूर्वी आपल्याच पायाखाली काय जळते आहे, ह्याची पृच्छा करणे अधिक जरूर वाटले. केसरीने सांगितलेली गोष्ट ऐकून केसरीचे आभार व त्या गोष्टीबद्दल विस्मयपूर्वक विषाद एका दोघासच नव्हे तर पुष्कळास वाटण्याचा संभव आहे. आणि खरोखर तो संभव नसेल तर विषाद वाटण्याला सोमयागाहूनही हे एक दुसरे जबर कारण आहे असेच म्हणावे लागते.

एकाद्या आडरानात चारचौघा कोळ्यांनी एकाद्या शेंदूर माखलेल्या दगडाच्या म्हसोबापुढे जमून 'जय म्हसोबा! भगतावर कृपा कर' अशी मराठीत साधी प्रार्थना करून एकादे कोंबडे कापले आणि म्हसोबाचा प्रसाद म्हणून ते सर्वांनी मिळून गिळिले तर होणारा जो प्राकृत यज्ञ तो, आणि कृष्णातटाकी वीस विद्वान ब्राह्मणांनी तीन बकऱ्यांस बुक्क्यांनी मारुन शेवटी त्याचे तिळाएवढे मांस खाऊन जी संस्कृत कंदुरी केली ती, या दोहोंमध्ये वास्तविक फरक किती! फरक जर असेल तर तो हाच की साध्या मराठी अनार्य यज्ञाचा साधारण समाजावर म्हणण्यासारखा परिणाम घडत नाही, आणि ह्या थाटाच्या खर्चाच्या सोवळ्या आर्यजत्रेचा परिणाम उच्चवर्गापासून तो खालपर्यंत समाजावर इतका जोरदार घडतो की बिचाऱ्या उदार धर्मास दोन पावले आणि दोन दशके मागे हटावे लागतेच!!

सोमयागाचे एकंदर वर्णन वाचून त्यात तीन निरुपद्रवी बकऱ्यांचा सदोषवध अगर निरर्थक खून याखेरीज दुसरे काहीही धडधडीत अनीतीचे अगर अन्यायाचे नाही ही गोष्ट प्रथम दर्शनीच धर्मवेडाच्या अगदी कट्ट्या शत्रूसही साफ कबूल करावी लागेल. (तशी काही अनीती अगर अन्याय असला तर कायद्याने त्याचा सक्त बंदोबस्त कधीच झाला असता, हेही सांगावयास नको.) समाजात उत्तरोत्तर विकसित होणाऱ्या न्याय, नीती आणि शिष्टाचार ह्या तीन गोष्टी संभाळून कोणाही व्यक्तीस अथवा समूहास आपले जुने आचार मोठ्या थाटाने साजरे करून मनाची करमणूक अगर

दुसरी कसलीही समजूत करून घेण्याची पूर्ण मुभा आहे. ते जुने आचार त्यांच्या कितीही पूर्वदशेतील असोत, त्यांची परंपरा आजघडीपर्यंत सारखी चालू असो, किंवा मध्यंतरी हजारो वर्षांची खळ पडली असून आजच त्याची आठवण होऊन त्याच्या जीर्णोद्धाराचा काळ आला असो, कोणत्याही बाजूने पाहिले तरी ते आमचे आचार आम्ही करण्याचा आमचा जो बाणेदार उपजत हक्क आहे, त्यास रतीमात्र बाध येत नाही, इतकेच नव्हे तर सार्वभौम सर्व सामर्थ्यवान, सरकारासही ह्या हक्काकडे वाकड्या नजरेने पाहण्याची छाती नाही. ह्या सर्व गोष्टी समाधानकारक आहेत ह्यात शंका नाही.

पण येथे हक्काचा किंबहुना आवडीचाही विचार कर्तव्य नाही. ह्या घडलेल्या प्रकरणात धर्म कितपत आहे किंवा तो मुळी आहे की नाही, किंबहुना बकऱ्याच्या रूपाने धर्माचाच येथे खून घडला आहे की काय, ही गोष्ट दिसल्यास पाहणे आहे, आणि डोळे उघडे असल्यास ती दिसण्यास मुळीच कठीण पडणार नाही, ह्याची खात्री आहे. घडलेला प्रकार जर गणपत्युत्सवाप्रमाणे केवळ राष्ट्रीय उत्साह वाढविण्याप्रीत्यर्थ घडला असता तर त्यात विशेष मन घालण्याची जरूरी नसती. पण ज्या अर्थी तो अस्सल धर्माच्या नावावर घडला आहे, त्या अर्थी त्याजकडे सर्व मुमुक्षू जनांचे लक्ष पोहोचले पाहिजे. आणि विशेषेकरून धर्मसुधारकांचे ह्या बाबतीत औदासीन्य तर अगदी अक्षम्य होईल.

आत-बाहेर सर्वत्र नांदणारा जो परमात्मा आणि व्यक्तिविशिष्ट जो जीवात्मा ह्यांचा परस्परसंबंध आणि निरंतर समागम ह्यास धर्म म्हणतात. अंतर्याम, उच्च मनोविकार, नैतिक शक्ती इत्यादिकांच्या द्वारे, बाह्यसृष्टी, अंतःसृष्टी आणि जगाचा विकासमय इतिहास ह्या तीन प्रदेशांत जिवंत जागृत परमेश्वराचे प्रतिक्षणी काय काय व्यापार घडतात ते ओळखणे, कृतज्ञतापूर्वक त्याचे सानिध्य साधणे आणि संसारातील लहान मोठी कामे त्याच्या सानिध्यास शोभतील अशा रीतीने करणे ही आमची धार्मिक कर्तव्ये. तीन साडेतीन हजार वर्षांपूर्वी आमच्या आर्यपूर्वजांनी जेव्हा हिंदुस्थानाच्या काठावर प्रथम बिऱ्हाड ठेविले असेल तेव्हा परमेश्वराचे बाह्यसृष्टीतील विलास पाहून ते किती मोहित झाले असावेत ह्याचे साद्यंत दाखले वेदात आढळतात. आपल्या साध्या सरळ आणि जिवंत भाषेत त्यांनी देवावरची गाणी गाइली. फूल नाही फुलाची पाकळी, जे काही ज्यांच्याजवळ होते त्याचा थोडा भाग, नवीन भेटलेल्या देवास आपली कृतज्ञता दर्शविण्यासाठी त्यांनी सांज-सकाळ अर्पण केला, हे त्यास कितीतरी शोभले! पण कालांतराने जेव्हा ह्या परकीयांच्या वसाहती उत्तर-हिंदुस्थानात बऱ्याच पसरल्या आणि ह्यांचे सांपत्तिक व सामाजिक वैभव पुष्कळ वाढले, तेव्हा अर्थात वरील आराधनेचा स्वाभाविकपणा नाहीसा होऊन तिच्यात कृत्रिमपणा शिरला. पूर्वी, जे अंतःकरणाच्या देठापासून निघत होते, तेच आता जिभेच्या व ओठाच्या शेवटापासून निघू लागले. पूर्वी प्रत्येक घरधनी आपला आपणच योद्धा, कुणबी व उपाध्याय होता, पण आता त्या तीन कामकऱ्यांच्या तीन जाती बनल्या, आणि धर्माच्या नावावर कर्मठपणा वाढू लागला, पण अद्यापि ब्राह्मण तेज लयास गेले नव्हते. खरे जे ब्रह्मवीर होते. त्यांनी अरण्यातच राहून उपनिषदांतून ह्या कर्मठपणाचा जोराने निषेध केला आणि धर्माची इमारत बाह्यसृष्टीतल्या साक्षात्कारावरून उठवून ती अंतःसृष्टीच्या अधिक खोल व खंबीर

पायावर उभारली. आमच्या धार्मिक इतिहासातील हा पहिला निषेध (Protestantism) होय. पण ह्या रानातील मानसिक चळवळीमुळे गावातील बहुजन समाजातील कर्मठपणा कमी होणे शक्य नव्हते. म्हणून त्यास वैतागून गौतमबुद्धाने दुसरी धर्मसुधारणा केली (ख्रि. श. पूर्वी ४६८) सुमारे १०००-१२०० वर्षानी बुद्धाच्या सुधारणेचाही जोर संपला आणि कर्मठपणाच्या लाटा तर पूर्वीपेक्षाही जास्त उंच उसळू लागल्या! नंतर १२ व्या शतकापासून तो १६ व्या शतकाअखेर सर्व हिंदुस्थानभर नानक, चैतन्य, तुकाराम वगैरे साधुसंतांनी तिसरी सुधारणा केली. आता २० व्या शतकातला प्रकार आमच्या डोळ्यापुढेच आहे.

धर्माचे जे लक्षण वर सांगितले आहे आणि त्या लक्षणाचा जो धर्म उपनिषदे, भगवद्गीता, गौतमबुद्ध आणि आधुनिक साधू यांनी प्रचारिला, त्या सनातन धर्माचा कोणता भाग किती अंशाने वरील सोमयागात आहे आणि ज्यास प. वा. आगरकरांनी आपल्या एका निबंधात 'हे भीषण, बीभत्स हिंदुधर्मा ..... तू आपले तोंड लवकर काळे कर,' अशी सक्त नोटीस दिली आहे, त्या धर्माचा किती अंश ह्या सोमयागात आहे, ह्याचा विचार धर्माची ज्यांना म्हणून किंचित तरी पर्वा आहे, त्या प्रत्येकाने आपल्या स्वत:शी केला पाहिजे. बाकी ज्यांना धर्माच्या नावाने नुसती करमणूकच करावयाची असेल अगर दुसरा कसला तरी अर्थ साधावयाचा असेल, त्यास हाच काय पण दुसरा कोणताही प्रकार चालेल आणि शोभेल. कृष्णातटाकी जमलेल्या वीस विद्वानांच्या विद्वत्तेसंबंधाने कोणासही शंका घेण्याचे कारण नाही. पाच दिवस एकसारखे तिन्ही वेदांचे पाठ ह्यांनी बिनचूक आणि बिनविलंब म्हटले तर श्रौतवाङ्मयात ह्यांची नंबर एकची गती असली पाहिजे. पण ह्यांच्या ह्या अमूल्य संपादणुकीचे चीज अशा योगाने होईल काय? इकडे पाश्चात्य पंडित, जर्मन, फ्रेंच आणि इंग्लिश भाषांतून वैदिक वाङ्मयाचा प्रत्येक शब्द उतरवीत आहेत, तर ह्या ब्राह्मण विद्वानांनी त्या वाङ्मयाचे निदान काही वेचे तरी देशी भाषेत उतरविल्यास त्यांची योग्य संभावना होणार नाही काय? जुन्याचा खरा उद्धार अशा रीतीने होईल की तीन हजार वर्षांपूर्वी ज्या गोष्टी जशा घडल्या त्या आता तशाच उठविल्याने होईल?

शेवटी धर्माच्या बाबतीत उदासीन राहणाऱ्या नास्तिक व अज्ञेयवादी सुधारकांनीही हे लक्षात ठेविले पाहिजे की धर्माच्या नावाने जी ही थोतांडे वेळोवेळी उपस्थित होतात व वाढत जातात ती त्यांची केवळ थट्टा किंवा निंदा केल्याने नाहीशी होत नाहीत. उलट लोकमतांचे ह्या थोतांडास पूर्ण पाठबळ असल्याने ह्या रिकामटेकड्या सुधारक थट्टेखोरांचीच थट्टा होते. शिवाय ही सर्व थोतांडे नाहीशी झाली तरी म्हणजे मोठासा कार्यभाग झाला असे नाही. शुद्ध धर्माची ज्योत राष्ट्रात सतत जळती राखल्यासच राष्ट्राच्या अनेक चळवळीस जोम येईल आणि ह्यास्तव प्रत्येक देशभक्ताने धर्मसुधारणेचे काम हस्ते परहस्ते करणे जरूर आहे.

●●●

९

डेव्हनपोर्ट येथील गुड फ्रायडे

मँचेस्टर कॉलेज, ऑक्सफर्ड

ता. १०-४-१९०२

नाताळच्या खालोखाल ईस्टर हा ख्रिस्ती लोकांचा मोठा सन आहे. ह्याची गणना चांद्रमानाप्रमाणे होत असल्यामुळे सौर वर्षात ह्याची तारीख मागे पुढे बदलते. गुड फ्रायडे (चांगला शुक्रवार) पासून तो पुढच्या सोमवार अखेर, अत्यंत गरजेची-विशेषकरून दारूची दुकाने खेरीज करून, बाकी सर्व दुकाने सर्वत्र ह्या चार दिवसांत बंद असतात. हा चांगला शुक्रवार येशू ख्रिस्ताची पुण्यतिथी होय. ह्याच दिवशी ज्यू लोकांनी त्यास सुळावर चढविले. पुढे तीन दिवसांनी आदित्यवारी तो थडग्यातून आपल्या जड शरीरासह उठला आणि आकाशात देवाच्या उजवीकडे बसला अशी जुन्या ख्रिस्ती लोकांची भोळी समजूत आहे. म्हणून शुक्रवार हा शोकाचा दिवस आणि आदित्यवार हा आनंदाचा दिवस मानून देवळातील सर्व आराधनेचे प्रकार ह्या समजुतीस अनुरूपच होतात. चांगल्या शुक्रवाराच्या पूर्वीच्या सहा आठवड्यास लेंट (Lent) हे नाव आहे. हा शब्द सॅक्सन भाषेतील लेनिटन् (Leneten) ह्या शब्दापासून आला आहे, लेनिटन्चा अर्थ लांबणे व ह्या सहा आठवड्यांत दिवस अधिकाधिक लांबत असतो व रात्र कमी होत असते. ह्या वरून लेंटची संस्था ख्रिस्ताच्याही पूर्वीची असून नंतर तिला ख्रिस्ती धर्माचे स्वरूप आले ते असे--..... जॉन दि बाप्टिस्ट ह्याने ख्रिस्तास बाप्तिस्मा दिल्यावर ख्रिस्ताने ४० दिवस वनवास भोगिला. चाळीस अहोरात्री त्याने उपवास केला. ह्या अवधीत सैतानाने त्यास अनेक प्रकारे भुलविण्याचा व्यर्थ प्रयत्न केला. ह्या नंतर ख्रिस्त, लोकांस उपदेश करण्यास निघाला. हे चाळीस दिवस आता लेंट ह्या नावाने पवित्र मानण्यात येत आहेत. हिंदू लोक जसे चातुर्मासात कोणतेही निषिद्ध पदार्थ खात नाहीत तसेच ख्रिस्ती लोकही लेंटमध्ये मांसाहार करीत नाहीत. पण खरोखरी हा निश्चय क्वचितच पाहण्यात येतो. आमचे हिंदू लोक जसे चातुर्मास साधला नाही तरी शेवटी कार्तिकी एकादशी तर पाळतात तसे इकडेही निदान गुडफ्रायडेच्या दिवशी पुष्कळ बायका, मुले व म्हातारी माणसे उपवास करितात,. फराळाचे मुख्य जिन्नस म्हणजे मासे व अंडी हे होत. आमच्याकडे जसे एकादशीच्या दिवशी केळी, रताळी, भुईमूग इ. जिन्नस दोनप्रहरी अगदी महाग होतात. तसेच येथे (डेव्हनपोर्ट हे मासे धरण्याचे मुख्य ठिकाण असूनही) शुक्रवारी सकाळीच बाजारात मासा म्हणजे अगदी दुर्मिळ पदार्थ झाला होता, असे आमच्या घरवालीने सांगितले. अशा प्रकारची व्रते आणि धार्मिकपणा रोमन कॅथोलिक लोकांमध्ये फार आढळतो. संध्याकाळी एका कॅथोलिक देवळातून बाहेर पडल्यावर एका गृहस्थाशी बोलत असताना

त्याने सांगितल्या, त्याचा पोषाक, पायघोळ, पांढरी कफनी, छातीवर तांबडे वस्त्र, कंबरेस व दोनही बाजूंनी जरीकाठी काळ्या कापडाच्या पट्ट्या, डोकीस मुकुटाकृती काळी टोपी असा होता. व्याख्यानात जेव्हा ख्रिस्ताचे नाव येई तेव्हा तो आपली टोपी उचलीत असे व सर्व उपासक नमन करीत. व्याख्यान आटपल्यावर मेळ्यातील मुलांनी अत्यंत करून व दीर्घ स्वराने काही गाणी म्हटली. आज कसलेही वाद्य वाजविण्यात आले नाही. ह्यानंतर ख्रिस्ताच्या प्राणोत्क्रमणाची वेळ आली. ह्यावेळी पृथ्वीवर चहूंकडे मोठा अंधार पडला, धरणीकंप झाला आणि मोठा आवाज झाला इ. वर्णन बायबलात आहे. म्हणून आता तसेच करण्यात आले. देवळातील सर्व दिवे गॅसचे असल्याने ते एकदम नाहीसे केले. पाच मिनिटे चहूंकडे अंधार आणि सामसूम झाले. ह्यावेळी ह्या मोठ्या देवळात सुमारे ३०० लोक होते; पण कोणीही मोठ्याने श्वासोच्छवास देखील करीना. शेवटी धरणीकंपाची नक्कल करण्यास्तव एका कोपऱ्यातून धडधड असा बारीक आवाज झाला! मग सर्व दिवे एकदम लागले आणि उपासना आटपली!!

प्रॉटेस्टंट देवळात ह्या नकला होत नाहीत, पण व्याख्यानांचा सारांश बहुतेक असाच असतो. युनिटेरिअन देऊळ गुड फ्रायडेच्या दिवशी तर मुळी बंदच होते व इस्टरच्या आदित्यवारी त्यातील दोन्ही उपासना एका ब्राह्माने चालविल्या!

●●●

१०

बोअर युद्धाचा शेवट व ऑक्सफर्ड येथील उल्हास

मँचेस्टर कॉलेज, ऑक्सफर्ड

परीक्षेच्या घाईमुळे हे पत्र एक-दोन आठवड्यांनी शिळे झाले आहे. तथापि मजकूर शांतीसंबंधाचा असल्याने इतकी घाई केली नाही म्हणून काही हरकत नाही.

दाक्षिणारण्यातील नरमेध तर संपला. त्याची आता गत गोष्ट झाली. आपले सुमारे ९६ हजार कामास आले. पैकी सुमारे चौथाई तर यमाने जागच्या जागी वसूल केली. हा जो इतक्यांना मोक्ष मिळाला तोही काही फुकट नव्हे. तर मागे हळहळणाऱ्यांना त्याबद्दल जवळजवळ ३ अब्जांचा खर्च आला आहे. प्रतिपक्षाचे काय काय नुकसान झाले ह्याचा अद्याप पत्ता नाही. भावी इतिहासकार रिकामपणी त्याचा हळूहळू छडा लावतील!

धर्मयुद्ध असो वा कसेही असो, युद्ध म्हणजे अनिष्ट. सतत विकास पावणाऱ्या मानवी आयुष्यात सांग्रामिक कालाची आवश्यकता असेल. पण आवश्यकतेवरून त्याचा चांगुलपणा सिद्ध होत नाही. एके काळी मानवजातीस विद्या, कला, शास्त्र ह्यांपेक्षा युद्धाचीच प्रौढी विशेष वाटत होती. आणि हल्लीच्या काळी, स्पेन्सरसारख्या सात्विक ब्राह्मणांनी सांग्रामिक युगाहून औद्योगिक युग अधिक श्रेयस्कर व उन्नत आहे असे कितीही प्रस्थापिले तरी वरील प्रौढी अद्यापि व्हावी तितकी कमी झाली नाही. इतकेच नव्हे तर त्याच स्पेन्सरसाहेबांनी नुकताच आपला अगदी शेवटचा म्हणून जो ग्रंथ प्रसिद्ध केला आहे त्यात सुधारलेल्या जगात हल्ली ज्या अनार्यपणाच्या लाटा उसळत आहेत त्यांचे चांगले दिग्दर्शन केले आहे. पशुदशेतून मानवदशेचा विकास झाला आहे हे डार्विनचे मत कित्येक कोमल अंत:करणाच्या माणसांस पसंत नाही. तरी जोवर राष्ट्रा-राष्ट्रातील वाद आम्हांस रक्तपाताशिवय मिटविणे अशक्य दिसते तोवर आमच्या पूर्वज-पशूंचे अवशेष आमच्यात अद्यापि कायम आहेत हे कबूल करणे निदान समंजसपणाचे आहे.

काही असो, दक्षिण खंडाला शोभणारे हे रणकंदन एकदाचे आटपले म्हणून ह्या उत्तर द्वीपात सर्वत्र आनंदी आनंद झाला आहे. आबालवृद्ध, स्त्रीपुरुष, सुधारक-उद्धारक ह्या सर्वांना अजुनी आनंदाचे उमाळे येत आहेत. ह्या लोकांची आनंद प्रदर्शित करण्याची तऱ्हा काही अप्रतिमच! युद्ध चांगले की वाईट हे सांगणे फार सोपे आहे. पण संपल्यावर ह्यांनी जो आपला राष्ट्रीय उल्हास दाखविला-आणि तोही ऑक्सफर्डसारख्या पवित्र आणि शांत शहरी-तो पाहून परकीयाने त्यास बरा

सुबोध पत्रिका, ता. २०-७-१९०२

अगर वाईट म्हणणे फार जोखमीचे काम आहे! म्हणून प्रथम एकदोन दिवशी--विशेषत: रात्री येथे जो प्रकार घडला-नव्हे मला दिसला तो लिहीत आहे. वाचकांनीच आपापले तर्क जपून करावेत.

तहाची तार येथे रविवारी रात्री पोहोचली, म्हणून तेव्हा काही विशेष घडले नाही. दुसरे दिवशी सकाळी मी माझे खोलीत न्याहारीस बसलो असता आमची घरवाली हातात एक मोठी रंगीबंरंगी पताका घेऊन अवचित माझ्यापुढे उभी राहिली. तिच्या तोंडावर विजयश्री स्पष्ट दिसत होती. नंतर खालील छोटासा संवाद झाला :

मी - कायहो तुम्हा (बायकां) लाही आनंद होतो ना!

ती - हो! हो! हे काय विचारणे.

मी - राज्य मिळाले म्हणून की लढाई संपली म्हणून?

ती - दोन्ही रीतीनी.

मी - म्हणजे दुसऱ्या रीतीनेही होतो म्हणावयाचा?

ती - तर हो काय! भाकरीवरदेखील कर बसविण्यापर्यंत मजल आली तर लढाई एकदाची संपली म्हणूनही आनंद का वाटू नये?

मी - तर मग ह्या निशाणीचे प्रयोजन काय?

ती - तो भाग वेगळा. ही निशाणी न लाविली तर संध्याकाळच्या आत माझ्या खिडक्यांना तावदाने राहणार नाहीत!

मी - काय म्हणता?

ती - तर काय! मॅफकिंगचा जेव्हा वेढा उठल्याची बातमी आली तेव्हा येथील रस्त्यातील पोरट्यांनी कोण कहर केला!

मी - एकूण ह्या निशाणीची अनेक कारणे आहेत एक, राज्य मिळाले म्हणून, दुसरे, लढाई संपली म्हणून, तिसरे रस्त्यातील उनाड देशाभिमानास बुजगावणे म्हणून इ. शेवटी बाईने हासत घरावर निशाण लाविले.

नंतर मी दाराबाहेर येऊन पाहतो तो आळीतील प्रत्येक खिडकीतून युनिअनजॅक बाहेर पडत होता. हामरस्त्यावर तर जारीने तयारी चालली होती. दुकानदार, वखारीवाले आणि घरंदाज इत्यादी लोक आपापल्यापरी निरनिराळी जयचिन्हे उभरण्यात गुंतले होते. लहानसान पताका, मोठे बावटे, गुढ्या, तोरणे ह्यांचा थोड्याच वेळात मोठा गहजब उडाला. शहरातील मुख्य रस्त्यात तर रंगाची चंगळ झाली होती. दिवस जसजसा वर येऊ लागला तसतशी अधिक तयारी होऊन अधिक शोभा येऊ लागली. खटारेवाल्यांनी आल्या खटाऱ्यांवर व बगीवाल्यांनी घोड्यांच्या कानांवर आणि चाबकांच्या शेवटास निरनिराळ्या रंगांच्या फिती लाविल्या! लवकरच बायसिकल्सवरूनही झेंडे फडकू लागले,

डोळ्यांचा भडका जसा कमी होऊ लागला तसे आजूबाजूचे फालतूक अडगळीचे सामान आत येऊन पडू लागले! एके ठिकाणी तर एका मोडक्या घरावर हल्ला झाल्यामुळे, पोलीसास मध्यस्थी करावी लागली! अशा प्रकारच्या आनंदाच्या वेळी ऑक्सफर्डमेध्ये दुसरा एक विशेष मौजेचा प्रकार दृष्टीस पडतो. तो असा, विद्यार्थ्यांच्या टोळ्या रस्त्यातून हिंडत असता गवातील टोळ्यांशी काही तरी कुरापत काढून मारामारी करतात. ह्या तंट्यास येथे 'टाऊनीज एँड गाऊनीज फ्यड्स' म्हणजे झगेकरी व गावकरी ह्यांचे तंटे असे म्हणतात. ही चाल फार पुरातन काळापासन आहे. पूर्वी खरोखरीचे मोठे इंगे होत असत. ह्या वेळीही एका कॉलेजच्या दारात सुमारे तासभर दंगामस्ती झाली. ह्याचे प्रथम मला फार आश्चर्य वाटून इकडे पोलीस का दुर्लक्ष करतात ह्याबद्दल मी एका शिपायास विचारले. येथील पोलीस म्हणजे धिप्पाड, कर्तव्यदक्ष, शांत आणि अतिसभ्य लोक असतात. त्यापैकीच एक म्हणाला..... "अशावेळी आम्ही जास्त सवलत देतो. आम्हीच जर चिडलो तर सारा गाव खवळेल. हे दंगे विशेष विकोपास पेटले तरच आम्ही शांतपणे मिटवितो" त्याने असेही हासत हासत सांगितले-- "भांडण मिटविताना मला स्वत:लाच तीनदा मार खावा लागला!" ह्यावरून हा शेंदाड शिपाई होता असे नव्हे. तर चिडखोरपणा व अरेरावी ह्या गुणांची पोलिसास आवश्यकता नाही, इतकेच त्याने फार गोडपणे सुचविले!

असो, ह्या प्रकारे पहिल्या एकदोन रात्री येथे अनेक तमाशे दिसले. पण हीच तमासगीर विद्यार्थी मंडळी दुसऱ्या दिवशी नेहमीप्रमाणे म्युझिअम, लायब्ररऱ्या लॅबोरेटरी वगैरे ठिकाणी आपापल्या व्यासंगात गुंग झालेली दिसली!!

●●●

११

राष्ट्रीय निराशा

लंडन

ता. २७-६-१९०२

आजचा दिवस म्हणजे इंग्लंडच्या इतिहासात अत्यंत बहारीचा होणार होता. पण विलक्षण दैवदुर्विलासामुळे त्या बहारीचा तूर्त पूर्ण विरस झाला आहे! त्यामुळे ह्या राष्ट्रास किती खेद वाटत आहे आणि काही लोकांचे किती खासगी नुकसान झाले आहे, ह्याचा नुसता अंदाज लागणेही अशक्य आहे.

ह्या राज्यारोहणाचा डंका आज जवळजवळ वर्षभर साऱ्या जगभर गाजत होता. तेव्हापासून त्याची सारखी जय्यत तयारी चालली होती. नुकत्याच संपलेल्या बोअर युद्धामुळे तर इंग्रजी साम्राज्याचा अगदी कळस होऊन गेला आहे. लढाई मिटविण्याच्या कामी स्वत: बादशहांनी खटपट केल्यामुळे ते अत्यंत लोकप्रिय झाले आहेत. ह्या अनेक कारणांमुळे हा समारंभ अपूर्व होणार होता. ह्या आठवड्याचे आरंभी जगातील देशोदेशींचे राजे अगर त्यांचे प्रतिनिधी लंडन शहरी दाखल झाले. पाहुण्यांची इतकी गर्दी झाली की ह्या अफाट शहरीदेखील ह्या आठवड्यात जागा मिळण्याची मारामार पडू लागली. दिवसा लंडनमध्ये समारंभ पाहून रात्री ऑक्सफर्डमध्ये निजावयास जाण्याचीदेखील काही लोकांस योजना करावी लागली.

गेल्या आठवड्यातच बादशहांची प्रकृती किंचित नादुरुस्त झाली होती. पण ती इतक्या विकोपास जाईल असे कोणास वाटले नव्हते. गेल्या सोमवारी दोनप्रहरी आमची गाडी ऑक्सफर्डहून लंडन येथील पॉंडिगटन् स्टेशनावर १२।। वाजता पोहोचली असता तेथे काही विशेष गडबड दिसू लागली. शहराचे स्वरूप तर अगदी पालटलेले होते. माळा, निशाणे आणि तोरणे ह्यांनी सर्व शहर जणू हासत होते. आळीतील गोजिरवाणी मुले आपले चिमुकले बावटे कंटाजनांच्या आत खुपसून आगगाडीच्या रस्त्याच्या दोन्ही बाजूंस उभी होती. इतक्यात वुइंडसर किल्ल्यातून एक गाडी मोठ्या तोऱ्याने फुसफुसत स्टेशनात आली. तिच्या एंजिनवरचा दैदिप्यामान मुकूट पाहून हिला इतका गर्व का झाला होता हे सहज कळले. भाग्यशाली एडवर्ड बादशहांची स्वारी आगगाडीतून घोड्यांच्या गाडीत बसताना त्यांच्या राजनिष्ठ प्रजेने एकच आनंदाचा टाहो फोडिला!

शहराच्या रस्त्यातून ह्याच दिवशी इतकी गर्दी उसळलेली होती की, पायवाटेने कोठे जाऊ लागल्यास अतिशय वेळ लागू लागला. ता. २६-२७ रोजी छबिन्याचा रस्ता सकाळी ८ पासून बंद

होईल असे शहर पोलीसाने जाहीर केले. ज्यांच्याजवळ बसावयाच्या जागेचे तिकीट होते त्यासच रस्त्यात येण्याची परवानगी होती. सुमारे ७ मैल लांबीच्या रस्त्यात नानातऱ्हेची शोभा व रोषणाई केली होती. जागोजाग ३-४ मजले उंच प्रेक्षक बसण्याकरिता सुंदर पायऱ्या केल्या होत्या. प्रेक्षकांच्या जागेचे तिकीट १ पासून तो ७ गिनीपर्यंतचे (सुमारे १०० रुपये) होते. निरनिराळ्या वसाहतीमार्फत जागोजाग भव्य व सुंदर कमानी उभारिल्या होत्या. अमेरिकेतील कानडा देशातून इंग्लंडास धान्याचा मुख्य पुरवठा होत असतो म्हणून कानड्याचे कमानीवर त्या देशात पिकणारी सर्व धान्ये, भाजीपाला, फळफळावळ आणि खाद्य प्राणी ह्यांचे प्रदर्शन केले होते.

मंगळवारी (ता. २४) दोनप्रहरी लंडनच्या रस्त्यात विपरीत देखावा दिसला. भराभर जादा पत्रकांचे अंक खपू लागले! जो तो कोपऱ्यावर उभा राहून आतील मजकूर आधाशासारखा वाचू लागला! घटकेपूर्वी ज्या राष्ट्राचा आनंद पोटात मावेनासा होऊन त्यास काय करू आणि काय न करू असे झाले होते, त्यासच आता निराशेचा असा जबर धक्का बसला की, त्याने ते काही वेळ सुंद होऊन गेले. आदले दिवशी बादशहाच्या आजाराने उलट खाल्यामुळे आज त्यावर अत्यंत कठीण शस्त्रक्रिया करण्याची पाळी आली. बादशहास आपल्या आजारापेक्षा आपल्या प्रजेची अशी खडतर निराशा झाली आणि त्यांचे इतके जबर नुकसान झाले ह्याची वेदना अधिक दु:सह झाली. आणि "मी मेलो तरी बेहत्तर पण वेस्टमिनिस्टर मठापर्यंत जाईन" असे त्यांच्या तोंडचे वाक्य पार्लमेंटमध्ये ना. वाल्फर साहेबांनी सांगितले! समारंभाची तर गोष्ट राहिलीच. पण बादशहाच्या प्रकृतीकडे सर्वांचे चित्त लागले आहे. आज दोन दिवस सर्व कामे तशीच तहकूब पडली आहेत, काय करावे हे कोणासच सुचत नाही. पुष्कळ पाहुणे व प्रेक्षक आणि राजांच्या स्वाऱ्या विन्मुख परत गेल्या, असो, आता ही निराशेची कहाणी मी शब्दांनी सांगण्यापेक्षा आपण कल्पनेने जाणावी!

जुन्या युगातील एकछत्री राजसत्ता व खासगी स्वामीनिष्ठा आणि नव्या युगातील सार्वजनिक प्रजासत्ता व स्वातंत्र्यप्रीती ह्या परस्पर भिन्न वस्तूंचे बेमालूम मिश्रण इंग्लंडच्या हल्लीच्या राज्यघटनेत आहे! ही घटना आमच्या रामराज्याहून जशी निराळी आहे तशीच हल्लीच्या युनायटेड स्टेट्समधील केवळ लोकनियुक्त राज्याहूनही निराळी आहे. राजकीय मानसशास्त्रातील हे एक अपूर्व कोडेच आहे म्हणावयाचे! हे कोडे आज एक दोन दिवसांत जसे नजरेस आले तसे कधीच आले नसेल. कित्येक अमेरिकन लोक ही धेडगुजरी राज्यपद्धती पाहून हासतात. पण एवढी गोष्ट निर्विवाद आहे की, इंग्रजी साम्राज्याची बळकटी ह्या कोड्यातच आहे. येथवर तर शहाण्या इंग्रज मुत्सद्यांनी हे गाडे सुरळीत आणले. पुढे काय ठेविले आहे ते हरी जाणे!

●●●

१२

बर्टन खेड्यातील शाळा कशी दिसली?

वुडसाईड रे. कार्लाइल

इंग्लंडच्या दक्षिण किनाऱ्यावर ब्रिडपोर्ट नावाचा एक टुमदार गाव आहे. त्याचे पूर्वेस तीन मैलावर बर्टन नावाचे एक सुमारे ७०० वस्तीचे चिमुकले खेडे आहे. खेड्याबाहेर गावकुशीत एका जुन्या पण स्वच्छ इमारतीत मी एक शाळा पाहिली. तिच्या भोवताली निर्मळ, साधे पण विस्तीर्ण पटांगण होते. येथून एका हाकेवर टेकडीच्या पलीकडे समुद्र पसरला होता. शाळेत शिरताना एक लहानशी देवडी लागली. तीत मुलांच्या टोप्या ठेवण्यास भिंतीत खुंट्या ठोकल्या होत्या. खाली नंबर लावले होते. प्रत्येकाचा नंबर ठरलेला होता. शाळेची मधली मोठी मुख्य खोली ६० फूट लांब व २० फूट रुंद होती. तीत मुलांच्या वयाच्या मानाने केलेले दोन मोठे वर्ग बसले होते. मुलांची संख्या ७१ व मुलींची ६७ होती. ती सर्व मिळूनच बसल्यामुळे मुलगे व मुली अशा फाजील जातिभेदास ह्या शाळेत कोठे जागा राहिली नव्हती. माणसांच्या निरनिराळ्या जातिभेदास तर ह्या बेटातूनच हद्दपार केले आहे, हे येथे नव्याने सांगावयास नकोच.

शाळेत गेल्यावर प्रथम भिंतीवर ख्रिस्ताची मोठमोठी चित्रे अगदी लहान मुलांसही कळतील अशी दिसली. समोरच्या तसबिरीत तो काही लहान मुलांस आपल्या जवळ घेत होता. खाली हे त्याचेच वाक्य होते. **'लहानग्यास मजकडे येऊ द्या. स्वर्गीय राज्य अशांचेच आहे.'** भोवताली त्याच्या इतर परोपकाराचे प्रदर्शन केले होते. शिवाय भिंतीवर चंद्र, चौक, कोन, गोल इ. अनेक रंगांच्या निरनिराळ्या आकृती जागोजाग लावल्या होत्या. मधून खंडाचे व देशाचे नकाशे कायमचे सोडले होते. शिवाय काही प्रसिद्ध पुरुषांचे व स्थळांचे लहान मोठे फोटो टांगले होते.

हेडमास्तर हुषार, दक्ष व अत्यंत आदरशील दिसले. त्यांची पत्नीही शाळेत शिकवीत होती. व दुसरी एक मदतनीस शिक्षकीण होती. वहिवाटीप्रमाणे मुलांच्या सात इयत्ता होत्या, पण शिक्षकांच्या अनुभवाप्रमाणे शिक्षणाच्या सोयीप्रमाणे व मुलांच्या हुषारीप्रमाणे मुलांचे खरे वर्ग चारच होते. वर्षातून एकदोनदा शाळेत येणाऱ्या उंटावरील शहाण्या इन्स्पेक्टरांची मास्तरांच्या मागे कोरडी पिरपिर फारशी दिसली नाही. त्यास व्यक्तिस्वातंत्र्य बरेच आहे.

६ व्या अगर ७ व्या वर्षी मुलांच्या शाळेतील नियमित अभ्यासक्रम सुरू होतो. त्याच्यापूर्वीही काही अर्भके शाळेत खेळावयास येतात. गरीबांची मुले १५ व्या वर्षी शाळेतून बाहेर काम पाहण्यास

सुबोध पत्रिका, ता. २४-८-१९०२

जातात. शाळा खेड्यातील असल्यामुळे मुलामुलींच्या शिक्षणात काही फरक दिसला नाही. मुलांपेक्षा मुली मोठ्या दिसल्या. कारण मुलास आपला धंदा शिकण्यास लवकर शाळेतून सुटण्याची घाई असते. शाळेतून बाहेर पडल्यावर ५-६ वर्षांत कोणता तरी विशेष धंदा शिकून स्वतःचा निर्वाह साधावा लागतो. मुलीस तितकी घाई नसते. शाळा सकाळी ९ पासून १२ पर्यंत व दुपारी २ ते ५ पर्यंत उघडी असते दररोज २ प्रमाणे वर्षातून निदान प्रत्येक मुलाच्या ४०० तरी हजिऱ्या असल्या पाहिजेत.

बाजुच्या एका खोलीत लहान मुलांचा वर्ग अगर बिनयत्ता होती. ह्यांच्या स्लेटीवर खिळ्याने कायमच्या आडव्या-उभ्या रेषा मारल्या होत्या, अक्षरे व आकडे लिहावयाचे ते प्रत्येक चौकात एक असे लिहीत. त्यामुळे लहानपणापासूनच प्रमाणशीर, व्यवस्थेने व रांगेने लिहिण्याची सवय लागे. ह्याचा परिणामही मला लवकरच दिसला. काही लेखीपरीक्षेच्या उत्तरांचे कागद मी पाहिले. कागदाचे छापलेले व आखलेले ठरीव नमुने होते. उत्तरे इतक्या व्यवस्थेशीर रीतीने लिहिली होती की परीक्षेच्या घाईत ती लिहिली असावीत हे संभवनीय वाटेना. पण ती तशी लिहिली होती ह्यात शंका नाही. कोठेही डाग अगर ठिपका दिसला नाही. तीन चार वर्षांची तीन अर्भके लाकडाच्या निरनिराळ्या आकृतींच्या तुकड्यांनी घरे बांधून एका बाजूस खेळत होती.

एका मोठ्या कपाटात शाळेची म्युझिअम होती, ती अशी : वरच्या खान्यात साबण तयार करण्याची सामग्री, क्षार, तेले वगैरे व निरनिराळे साबणांचे मासले, खालच्या खान्यात दगडी कोळसा व इतर उभ्दिजे, दुसऱ्या बाजूस साखरेची सामग्री, उसाचे कांडे, मक्याचे कणीस इ. पासून तयार झालेल्या साखरेपर्यंत रूपांतरे, त्याच्या खाली रेशमी किड्यांच्या वेष्टनापासून तो तयार केलेल्या सुंदर लडीपर्यंत रूपांतरे, दुसऱ्या बाजुस शेजारच्या कॉगडन डोंगरावर सापडलेले जुन्या रोमन लोकांचे दात, हाडे थडग्यातील भांडी, हत्यारे वगैरे; खालच्या खणात धान्ये, बीजे आणि कापसापासून तो कापडापर्यंत गिरणीतील रूपांतरे, दुसरीकडे भूमितीचे ज्ञान करून देण्यास निरनिराळ्या आकाराचे लहान मोठे ठोकळे ठेविले होते. एका तावदानी पेटीत शिसपेन्सिलीचे पर्याय व दुसरीत पोलाद व तांब्याच्या पट्टीपासून तो टाकाच्या टोकापर्यंत कृती दाखविली होती. एका बाजूस चित्रांचे काही कित्ते ठेविले होते. त्यात खेड्यातील दोंदील पाटीलबुवा व दरबारातील रणधीर सेनानी ह्यांचे तारतम्यदर्शक हावभाव हुबेहूब पण साध्या रेघांनी दाखविले होते. काही निरनिराळ्या घाटांचे गोंडस खोजे व मातीची इतर भांडीही होती. कपाटाखाली झाडाचे एक खोड कित्येक सहस्त्र वर्षांपूर्वी भूगर्भामध्ये दडपून जाऊन साक्षात दगड बनलेले पाहण्यासाठी ठेविले होते, इ. सामग्रीच्या साहाय्याने मुलांच्या कुवतीप्रमाणे खालील विषयांवर गोष्टीच्या रूपाने सप्रयोग व साक्षात पदार्थ दाखवून मुलांचे लक्ष वेधले जाई :

बिनयत्ता	१, २, ३री इयत्ता	४, ५, ६, ७वी इयत्ता
ॲपल फळ, सूर्यकमळ मध, मधमाशी, साबण, चामडे, खेड्यातील बाग, ससा, पोष्टशिपाई, ऑफिस, दिपस्तंभ, बर्फ, पाऊस.	एंजिन, सेफ्टी लॅप, कापड, घड्याळ, छत्री, बेडूक, काच, भुई, झाडाचे भाग, आगकाड्या, इ. इ.	दगडी कोळसा, मीठ, वाफेचे यंत्र, पंप, मेघवृष्टी, 'आमची निशाणे', गलबते, समुद्र, गवत, तारायंत्र इ. इ.

कोणत्याही मुलास फी मुळीच पडत नाही. इतकेच नव्हे तर पुस्तके, वह्या, पाट्या व पेनादेखील शाळेतूनच मिळतात. शाळा सुटताना शाळेच्या वस्तू शाळेतच व्यवस्थेने मांडून ठेवण्याची जी कवाईत होते ती प्रेक्षणीय असते. ह्याशिवाय प्रत्येक कौंटीत २० मुलांच्या आणि २० मुलींच्या स्कॉलरशिपांची दरसाल गुणांप्रमाणे वाटणी होते.

मुलांचा शाळेत जो अभ्यास होतो तेवढाच घरी धडे बिलकूल देत नाहीत. घरी धडे घोकीत बसलेला एकही कोवळा विद्यार्थी मला अजून तरी दिसला नाही. अलीकडे येथे सर्व शाळांतून ड्रॉईंगवर फारच मेहनत घेतली जाते. १२-१४ वर्षांच्या मुलांनी काढलेल्या चित्रांची सुबकता पाहून मन थक्क झाले. चित्रकलेने हातास कुशलता, डोळ्यांस मार्मिकता व चित्तास रसिकता येते. म्हणून ह्या कलेच्या भौतिक मानसिक व नैतिक गुणांची ह्या लोकांस मोठी चहा वाटत आहे. निदान कमीत कमी १०-१२ तरी चित्रे जीत नाहीत अशी मला ह्या देशात एकही झोपडी अद्यापि आढळली नाही. शेवटी मुलांकडून काही गाणी म्हणून दाखविली. आरंभी हारमोनिअममधून गाण्याचा सूर मास्तर सांगे. नंतर सर्व मुले अशी ठेक्यात म्हणत की जणू एक बँडच. ह्यावरून लहानग्यांसही सुरांची माहिती झालेली दिसली. बायबलाची साधारण माहिती, कोणत्याही विशिष्ट पंथाची मते अगर धर्मवेड मुलांच्या मनात न भरविता, शाळेतूनच देण्यात येते.

शाळा सुटण्याच्या पूर्वी शिक्षकाने प्रार्थना केली. नंतर 'हे दयाळू पित्या'..... अशी आर्तरवाने ह्या अर्भकांची प्रार्थना सुरू झाली. शेवटी प्रभूप्रार्थना संपून तथास्तू (Amen) म्हटल्यावर माझे डोळे उघडले. ते केव्हा मिटले होते हे मला कळलेच नव्हते.

प्रार्थना आटपल्याबरोबर प्रत्येक मुलगा लष्करी थाटाचा सलाम करून आपली टोपी व्यवस्थेने घेऊन बाहेर पडला. व्यायामशाळेत मुलांस लष्करी व साधे ड्रील आणि डंबेल्स शिकवितात. शाळा सुरू असता मुलांस वरचेवर ५-१० मिनिटे पटांगणात खेळावयास सोडतात.

कोणत्याही मोठ्या शहरापासून दूर व समुद्रकाठच्या डोंगराळ प्रदेशातील ह्या क्षुद्र खेड्यातील शाळेची ही व्यवस्था पाहून माझे डोक्यात विचारांचे व मनात विकारांचे काहूर माजले ह्यात काय नवल बरे! नसते तर मात्र नवल खरे!!

●●●

१३

विभूतिपूजा

असा कोण हतभागी आहे की ज्यास शेक्सपिअर माहीत नाही? आणि असा कोण त्याहूनही हतभागी आहे की ज्यास, शेक्सपिअरच्या काव्याचे 'भराभर पाठांतर' करून अगर त्याची नाटके पाहून अनेकवार टाळ्या पिटूनही अखेर त्याची सार्वत्रिकता कळून आली नाही! असा कोणी दुर्दैवी असेलच तर त्याने आपल्या अंधारकोठडीतून बाहेर उजेडात यावे, म्हणजे तत्काळ ही गोष्ट दिसेल.

शेक्सपिअर ही विभूती आहे. इतर विभूतिप्रमाणे ती सर्व जगासाठी आहे अर्थात सर्व जगाची आहे. असे असून इंग्रज जर तिला केवळ स्वदेशीय आणि राष्ट्रीय देणगी असे समजून कवटाळतील तर ते जगाच्या हशास पात्र होतील. ड्रायडन् पोप वगैरे त्यांचे राष्ट्रीय कवी होत, शेक्सपिअर नव्हे. त्याच्यात सर्व जगाचे प्रतिबिंब आहे. सर्व जगात त्याचे प्रतिबिंब आहे म्हणून त्यास जग कळते, जगास तो कळतो. शेक्सपिअर जर नुसता इंग्रज ठरेल तर ख्रिस्त हा नुसता ज्यू ठरेल. आणि बुद्ध हाही शाक्य ठरेल. कोपर्निकसाचे सिद्धांत केवळ उलट पक्षास निरुत्तर करण्यासाठी, एडिसनचे शोधकेवळ पेटंटसाठी असल्यास ह्या सगळ्या गोष्टींत सारखेच सत्य आहे.

शेक्सपिअर जर सर्व जगाची विभूती आहे, तर सर्व जगाने तिची पूजा केली पाहिजे. 'दिक्कालाद्यन वच्छिन्न' जी वस्तू तीच विभूतिपदाला पोहोचते. म्हणजे देशी, विदेशी, राष्ट्रीय, प्रांतिक, प्राचीन अर्वाचीन हे गुण तिला फार थोटे होतात. शेक्सपिअरास इंग्रज राष्ट्रीय म्हणत असतील, किंवा नसतील, पण केवळ ते म्हणतात म्हणून इतरांनी इतरांनी शेक्सपिअरवरचा आपला हक्क सोडणे हा अस्सल मेषपात्रपणा होय. आणि ह्यास स्वदेशाभिमानाचे कारण असेल तर मात्र थट्टेची परमावधीच झाली म्हणावयाची! जगाच्या विभूतीस एका राष्ट्राने बळकाविले असे वाटल्यास इतर राष्ट्रांनी अभिमानास पेटून आपापल्या देशात असतील नसतील त्या विभूतिंचीच फक्त पूजा करण्याचाहट्ट धरला तर ही विभूतिपूजा होणार नाही. केवळ मोहोरमी डोलेपूजा होईल. कारण हिच्यात पूजेपेक्षा हमरीतुमरीचा अंश अधिक असतो.

असो. जगाच्या ज्या सर्वसाधारण विभूती आहेत त्यांची सर्वांनी मिळून गोडीगुलाबीने पूजा केली पाहिजे. तरच पूजेचे श्रेय येईल. नाही तर हिंदुमुसलमानांसारखे दंगे होणार हे उघड आहे. कोठे शास्त्राचे, कोठे शिव्यांचे, कोठे सभ्य टिकेचे, कोठे आतल्याआत धुमसत असलेल्या विकारांचे निरनिराळे दंगे चालू राहतील. मानवी अंत:करणास विभूतिच्या पुजेची गरज आहे. कोण नाही

सुबोध पत्रिका, ता. १९-१०-१९०२

ठेक्यात पाठ म्हणू लागतात! त्यात शेक्सपिअरने एकदा तरुणपणी एक हरीण कसे चोरले, त्याबद्दल त्यास कसे पकडले वगैरे वगैरे चटकदार वर्णन तर पुढे पुढे येऊन गातात. शेक्सपिअर जन्मला ते घर, तो रहात होता ते घर आणि त्याच्या बायकोची झोपडी ह्या तिन्ही ठिकाणांची उत्तम व्यवस्था शेक्सपिअर स्मारक मंडळीकडून ठेवण्यात येत आहे. प्रत्येक ठिकाण ८/१२ आणे फी दिल्यास पहावयास मिळते. दाखविण्यास व त्यासंबंधाची माहिती सांगण्यास माणसे ठेविली आहेत. घराचा ३०० वर्षांचा जुनेपणा जितका शाबूद राखणे शक्य आहे, तितका राखिला आहे. हा कवी लहानपणी नेहमी चुलीजवळच्या कोनाड्यात बसत असे. तेही ठिकाण दाखविण्यास कोणी विसरत नाही.

ह्या घराचा अति महत्त्वाचा भाग म्हणजे कवी ज्या खोलीत जन्मला ती खोली होय. ती अगदी ओबडधोबड आहे. पण तिचे माहात्म्य किती! साधारण अजमासे किती लोक हे स्थळ पहावयास येतात म्हणून नोकरास विचारता त्याने सांगितले की, गेल्या वर्षी जगातील निरनिराळ्या ४० राष्ट्रांचे ३०,३७६ प्रेक्षक ही खोली पाहून गेले! तावदानावर, तुळईवर, भिंतीवर सर वॉल्टर स्कॉट, कार्लाईल, ब्राउनिंग, थॅकरे इत्यादी मोठमोठ्या दस्तुरखुद्द सह्या आहेत! परसातील बागेत शेक्सपिअरने आपल्या ग्रंथात ज्या ज्या वनस्पतींचा व फुलाफळांचा उल्लेख केला आहे, त्या सर्वांची लागवड आहे. घरात दुसऱ्या एका बाजूस शेक्सपिअरच्या ज्या ज्या जिनसा मिळाल्या आहेत, त्यांचा संग्रह करून ठेविला आहे. घरातून बाहेर पडल्यावर रस्त्यातील एका दुकानाकडे पाहिल्यास चहाच्या चिनी पेल्यावर अगर एकाद्या लहानशा गुंडीवरही कवीच्या बायकोच्या झोपडीचा ठसा उमटलेला दिसेल. कवी राहत होता त्या घरातही त्याच्या जिनसांचा मौजेचा संग्रह आहे. चिलमी व दारुच्या पेल्यापासून तो बसावयाच्या खुर्चीपर्यंत. बागेत एके ठिकाणी शेक्सपिअरने स्वतः लाविलेल्या झाडाची एक फांदी लाविली आहे. तिचे आता जुने झाड झाले आहे. शेक्सपिअरबरोबरच त्याच्या झाडालाही अमर करण्याचा त्याच्या भक्तांचा विचार दिसतो. एवढ्यानेच त्याची इच्छा तृप्त झालेली नाही. शेक्सपिअर स्मारक नाटकगृह नावाची एक भव्य आणि सुंदर इमारत व संस्था एव्हन नदीच्या काठी गावाबाहेर उभी केली आहे. येथे पुस्तकालय, संग्रहालय आणि नाटकालय असे तीन भाग आहेत. शेक्सपिअरबद्दल जितके म्हणून वाङ्मय अगर सामग्री उपलब्ध आहे, तिचा येथे संग्रह केला आहे. चोहोकडे कवीच्या जन्मापासून तो मरणापर्यंत निरनिराळ्या अवस्थांचे चित्रांनी व पुतळ्यांनी दिग्दर्शन केले आहे. दरवर्षी त्याच्या जयंतीचा उत्सव दोन तीन आठवडे मोठ्या थाटाचा व गर्दीचा होतो. त्यावेळी नाटकालयात प्रसिद्ध मंडळीकडून त्याच्या प्रसिद्ध नाटकांचे प्रयोग होतात. ते पाहण्यास गावोगावचे रसिक लोक येतात. मागच्या ज्युबिलीच्या वेळी तर ह्या गावी शेक्सपिअर पूजेची परमावधी झाली. तिचे मौजेचे वर्णन ऐकण्यात येते. तेव्हा ह्या कवीची मोठी मिरवणूक काढण्यात आली होती. एका रथात कवीचा पुतळा बसवून त्याभोवती गावातील तरुणी देवदूतांचा पोषाक करून तुताऱ्या वाजविण्यास उभ्या केल्या होत्या. रथापुढे गावातील शेठसावकार, महाजन वगैरेंची स्वारी चालली होती. एकंदरीत हा एक इंग्लंडासारख्या प्रॉटेस्टंट देशातला १९ व्या शतकातला शेक्सपिअरदेवाचा अपूर्व छबिना निघाला होता.

१४

मँचेस्टर कॉलेज

गेल्या ऑक्टोबरच्या ११ तारखेच्या तिसऱ्या प्रहरी एक हिंदू विद्यार्थी मँचेस्टर कॉलेजचे दार ठोठावीत होता. हा ह्या देशात एव्हा नुकताच आला असल्यामुळे, ह्याचे तोंडावर नवख्याचे प्रत्येक चिन्ह स्पष्ट दिसत होते. आगगाडीतून ऑक्सफर्ड विद्यापीठाचे दुरून दर्शन झाल्यापासून ह्याच्या मुद्रेत आदराची झाक कलेकलेने वाढत होती. मँचेस्टर कॉलेज पाहिल्यावर तर ह्याची भावना ह्यालाच कळेनाशी झाली! दाराजवळ पोहोचल्याबरोबर ह्यास सुंदर व सुवाच्य शिलालेख दिसला तो हा - 'सत्य, स्वातंत्र्य व धर्म ह्यास वाहिलेले!' हे बाणेदार ब्रीद ह्यास पुढे कॉलेजातील भेजनालयाच्या व पुस्तकालयाच्या दारावरही कोरलेले दिसले. काही वेळाने देवडीवाल्याने ह्यास आत नेले. थोड्याच वेळाने वयाने व त्याहून अधिक विद्येने वाकलेली एक लहानगी आकृती ह्याजपुढे आली. अर्थात ती परमपुज्य डॉ. प्रिन्सिपॉल ड्रमंडसाहेबांचीच होती. भर्तृहरीच्या लक्षणाप्रमाणे हे खरोखरीच 'नम्रत्वेनोन्नमंत: संत:' आहेत, ह्यात अतिशयोक्ती अगर पक्षपात लेशमात्र नाही. ह्यावरही ज्यास वरील वचनाची शंका येत असेल, त्याचेच कमनशीब म्हणावयाचे! प्रिन्सिपॉलसाहेबांनी ह्या परक्या विद्यार्थ्याचे इतक्या कळकळीने स्वागत केली की, जणू ह्याची व त्यांची फार दिवसांची ओळख आहे. असो! पण हा हिंदू विद्यार्थी ह्या विलायतेतील धार्मिक कॉलेजाचे दार ठोठावीत का उभा आहे! भरतभूमी एकेकाळी सुवर्णभूमी होती, पण आता दुष्काळाचे माहेरघर झाली आहे म्हणून काही हिंदू विद्यार्थी कायदे, कला इ. ऐहिक विषय शिकण्यास इकडे आल्यास ते येणे साहजिक आहे. पण धर्माबद्दल आर्यांच्या कीर्तीचा नगारा परके देशांतदेखील हल्ली वाजत असता हा वेडा पीर येथे का? आर्याच्या वंशजास बापुडे मँचेस्टर कॉलेज धर्म तो काय शिकविणार? काही दृष्टीने ही शंका अगदी यथार्थ आहे. धर्म ही बाब मुळी पढिक शिक्षणाची नव्हेच. येथे परमेश्वरच गुरू, विश्व हीच शाळा आणि सृष्टी हेच पुस्तक, हे कोण सूज्ञ नव्हे म्हणेल? मनुष्य काय मनुष्यास धर्म देणार! ह्या दृष्टीने पाहता जेथे धर्म नाही, तेथे तो उत्पन्न करण्याचा स्वत: मँचेस्टर कॉलेजचाही इरादा नाही. दुसऱ्या दृष्टीने पाहता धर्मशिक्षणात प्राणायाम कसा करावा, श्राद्धमंत्र कसे म्हणावेत, अगर बाप्तिस्मा अथवा होली कम्यूनियन कसे घ्यावे वगैरे प्रकारच्या गोष्टी येत असल्यास आर्यांच्या वंशजांस धर्म शिकविण्याची गोष्ट तर एकीकडेसच राहो, पण येथील ख्रिस्त्यांसही असला लौकिक ख्रिस्तीधर्म शिकविण्यास मँचेस्टर कॉलेज केवळ नालायक आहे, आणि ह्या नालायकीबद्दल कॉलेजास मुळीच वाईट वाटत नाही. ज्या धर्माचे उपदेशक तयार करण्यास्तव ह्या कॉलेजाची योजना आहे त्या धर्मातच अशा

सुबोध पत्रिका, ता. १७-८-१९०२

जर का एकाद्या धर्माच्या संस्थेस खरोखरच धक्का पोहोचत असेल, तर ती संस्था चोरांच्या किल्ल्याप्रमाणे जितक्या लवकर ढासळेल तितके बरेच म्हणावयाचे! आणि ती तशी ढासळल्यास चोरांशिवाय इतरांस वाईटही वाटणार नाही!!

पण धर्माशी ज्या गोष्टींचा मुळीच संबंध नाही अशांमुळे खऱ्या धर्माच्या मार्गात ह्या सुधारलेल्या काळात अद्यपिही अडथळे येत आहेत. आमचा देश बोलून चालून पुराणप्रिय, अवजड आणि न हालणारा, परंतु वाऱ्याच्या वेगाने प्रगतीच्या वाटेने धावणाऱ्या इकडील राष्ट्रांत तरी काय विशेष आहे! सबंध युरोपात मँचेस्टर कॉलेज हे एकच आणि तेही एकलकोंडे, पाखांड्यांचे कॉलेज म्हणून त्यावर जो एकदा शिक्का बसला आहे तो अद्यापि पुसला गेला नाही. ऑक्सफर्डच्या विद्यापीठात नावडतीच्या पोराप्रमाणे त्याची हेळसांड होत आहे. ह्या सोवळ्या युनिव्हर्सिटीत अद्यापि ह्या कॉलेजाचा विटाळ खपत नाही. तथापि सुधारणेची साथच अशी काही तीव्र आहे की, ह्या कॉलेजची उदार मते नकळतच इंग्लंडच्या साऱ्या चर्चमधून झिरपत आहेत! त्यामुळे युनिटेरिअन धर्माचा प्रसार दलदलीत पडलेल्या पावसाप्रमाणे वर दिसावा तितका दिसत नाही. धर्माच्या इतर कॉलेजांतील अध्यापकांस व विद्यार्थ्यांसही ख्रिस्ती शकाच्या तिसऱ्या व चवथ्या शतकांत मतांचे जे एकदा जुने नमुने ठरून गेले आहेत त्याप्रमाणे आपला विश्वास आहे अशी उघडपणे प्रतिज्ञा घ्यावी लागते. असल्या फार्सात ह्या कॉलेजास काही करमणूक वाटत नसल्यामुळे ते येथे घडत नाहीत. ह्या कॉलेजाबाहेर उदार मतच नाही असे म्हणणे म्हणजे ब्राह्मसमाजाबाहेर हिंदुस्थानात सुधारणाच नाही असे म्हणण्याप्रमाणे चुकीचे हाईल. पण आधुनिक शास्त्रास व तत्त्वज्ञानास पटेल अशा प्रकारचे धर्माचे उदार मत उघडउघड प्रतिपादणे ह्या समाजाच्या सर्व दर्जात ते पसरविण्यास उपदेशक व आचार्य तयार करणे हे काम मात्र ह्याच एका कॉलेजात होत आहे.

कॉलेज म्हणजे ५-७ प्रोफेसर असावयाचे. त्यांनी एकाद्या युनिव्हर्सिटीत होणाऱ्या परीक्षांकरिता दरसाल २००-३०० विद्यार्थ्यांस ठराविक पुस्तकातील विषयात ठराविक पद्धतीने तयार करावयाचे, व शिकणाऱ्यांनीही परीक्षेच्या धोरणाने संधान बांधावयाचे, इ. इ. कल्पना आमच्या लोकांच्या मनांत साहजिक येतात, पण वरील कॉलेजाचा ह्या कल्पनांशी फार थोडा मेळ बसतो. हे कॉलेज मागे सांगितल्याप्रमाणे केवळ धार्मिक अध्यापनाकरिता असून ह्याचा बहाणा अट्टल सुधारकी असल्यामुळे कोणत्याही बुढ्ढ्या युनिव्हर्सिटीस ह्याचा संसर्ग सोसत नाही (आणि ह्या कॉलेजासही त्याविषयी पर्वा नाही) म्हणून अर्थात कॉलेजातील अध्ययनाचा युनिव्हर्सिटीच्या परीक्षांशी कसलाही संबंध नाही. शिवाय कॉलेजाचा उद्देश उमेदवारांस सुधारकी पदव्या देण्याचा नसून, उदार व जिवंत धर्माचा समाजात सतत प्रसार करण्यासाठी दरवर्षी ताज्या दमाच्या तरुण उपदेशकांचा पुरवठा करण्याचा आहे.

अठराव्या शतकात युरोपात आधुनिक शास्त्राचा बहार अगदी नवा होता. तेव्हा जुना धर्म व नवे शास्त्र ह्यांमध्ये मोठा लढा पडला होता. ह्या दोहोंमध्ये कधी समेट होणे शक्य नाही असे

त्यांचे ह्या कॉलेजातील अध्ययन संपून बरोबर ७० वर्षे झाली, म्हणून कॉलेजकमिटीने त्यांस अभिनंदनपत्र पाठविले, त्यास पाठविलेल्या उत्तरात मार्टिनोचे खालील सुंदर उद्‌गार आहेत :-

> "ह्या कॉलेजने मला एक बोध दिला आहे, तो हा की मी नेहमी शिकत रहावे, आणि शिकवीत असताना तर विशेषेकरून शिकत असावे. हा बोध मजमध्ये पूर्णपणे बिंबला नसेल, तर माझा हा ७० वर्षांचा संबंध ह्या प्रगमनशील कॉलेजास, एकाद्या रिकामा पगार खात शिलकेत पडलेल्या पेन्शनदाराप्रमाणे, केवळ भारभूत झाला असेल. कॉलेज-शिक्षकांचा मी एका गोष्टीविषयी अत्यंत ऋणी आहे, ती ही की जी गोष्ट आपणास 'एकदा ..... खरी वाटली ती फिरफिरून दोनदा शिकविणे हा गुन्हा आहे, हे त्यांनी मला शिकविले, ... नवे विचार आणि ताजे वाङ्मय ह्यांचा समाजात जसजसा प्रसार होईल, तसतशा आपण मागे बांधलेल्या विचाररचना विसकळून त्यांच्या पायांवर नव्या इमारती उभारल्या पाहिजेत. म्हणजेच शिक्षकांच्या मनावर गंज चढणार नाही व त्यांची गणना केवळ मोडक्या तोडक्या टाकाऊ सामानात होणार नाही.....' ही मधली स्थिती झाली. हल्लीचे प्रिन्सिपॉल डॉ. ड्रमंड ह्यांनीही गेल्या वर्षाचे आरंभी आपले व्याख्यान सुरू करण्यापूर्वी आम्हांस मोठ्या कळकळीने सांगितले की, बाबांनो आम्ही जो तुमच्यापुढे कसलाही विचार करितो तो केवळ तुमच्या विचारास मदत व्हावी म्हणून होय, त्यावर जबरी करण्यासाठी नव्हे. तुम्हांस नापसंत झालेली आमची मते तर बाजूसच राहोत. पण जर एकादे मत आम्ही निरुत्तर प्रतिपादिले आणि त्याची सर्व प्रमाणे मिळाली असे तुम्हांस वाटले तरी तेवढ्यावरच तुम्ही तृप्त राहू नका. तुमचे व्यक्तिविषयक शोध नेहमी चालू असावेत, आमच्या प्रयत्नाने तुमचे शोध अडू नयेत किंवा आळसावू नयेत."

ह्या प्रकारे स्वातंत्र्य आणि मोकळेपणा हे कॉलेजचे ब्रीद केवळ शब्दांतच नाहीतर करणीतही आहे. कॉलेजचे एकंदर धोरण वाऱ्याप्रमाणे मोकळे, निर्भय व नि:शंक आहे. ही गोष्ट प्रोफेसरांची जी नेमणूक झाली आहे त्यावरून दिसून येत आहे. अक्सले ह्यांनी मागे एकदा म्हटले होते की जर्मनी व हॉलंद ह्या दोन देशांखेरीज साऱ्या युरोपात कोठेही धर्मशास्त्राच्या अध्यापकास स्वतंत्र विचार व शोध करण्याची सवड नाही. (कारण जुन्या धर्माची जी काही ठराविक मते आहेत त्याबाहेर अध्यापक जाईल तर त्याची वरणी बंद होते.) हक्सलेसाहेबांस मँचेस्टर कॉलेजचा अपवाद आठवला नसावा. किंवा ऑक्सफर्ड युनिवर्हसिटीचे मोठे नाव व दुर्भेद्य दुराग्रह इकडेच त्यांचे सर्व लक्ष लागले असावे. ह्या कॉलेजातील अध्यापकामागे ही अडाणी दहशत मुळीच नाही. तथापि हे सुधारकी कॉलेज म्हणून ह्यातील सर्व अध्यापक जहाल सुधारक आहेत असेही नाही. तसे असल्यास ह्याची स्वतंत्रता केवळ एकदेशीय झाली असती. आणि अशा बेफाम स्वातंत्र्याचे तुफान-तारू कधीच एकाद्या खडकावर आपटून नामशेष झाले असते. पण वास्तविक प्रकार तसा नाही. हल्ली कॉलेजात पाच कायमचे व दोन हंगामी अध्यापक आहेत. कायमच्या पाचापैकी जुन्या कराराचे अध्यापक रेव्ह. ॲडिस हे इतके जुन्या मताचे आहेत, की हे युनिटेरिअन आहेत, की नाहीत ह्याची पुष्कळ वेळा शंका येते. तथापि

१५

पृथ्वीच्या पोटात ४४० यार्डांखाली

ऑक्सफर्ड

मुलांनो, दगडी कोळसा तुम्हांला पाहून, निदान ऐकून तरी माहीत असेलच. लोखंड आणि दगडी कोळसा म्हणजे इंग्रज लोकांचे हाड आणि मांस असे म्हणण्यास काही हरकत नाही. ह्या कोळशाच्या खाणी सुदैवाने ह्या लहानशा बेटात इतक्या विपुल पसरल्या आहेत की, ह्या राष्ट्रांच्या जगड्व्याळ गरजा भगूनही त्या दरवर्षी अगणित खंडी बाहेरदेशी पाठविता येतात. आफ्रिकेतील हिऱ्याच्या खाणी घेऊन येथील कोळशाच्या खाणी घ्या, असे कोणी म्हटल्यास हे लोक कबूल होणार नाहीत! तर अशा ह्या अमोल द्रव्याची एकादी खाण आपण पाहू चला.

आपण सध्या मँचेस्टर शहराच्या उत्तरेकडे सुमारे ५ मैलांवर आलो आहो. हे पहा एक मोठे आवार आणि त्यातील पटांगण. मधोमध सुमारे २०-२५ फूट उंचीवर एक भले मोठे चक्र उभे फिरत आहे. त्या चक्रावरून भली भक्कम लोखंडी काढणी पृथ्वीच्या पोटात गेली आहे. बरोबर त्या चक्राच्या खाली जमिनीत सुमारे १० फुट लांब, रुंद, चौकोनी आडाप्रमाणे एक खळगा आहे. एकंदरीत हा सर्व देखावा एकाद्या साधारण रहाटगाडग्यासारखा दिसतो. त्याशिवाय सभोवती ह्या पटांगणात दुसरे काहीच विशेष दिसत नाही आणि मी तर तुम्हांस येथे कोळशाची एक आश्चर्यकारक खाण दाखविण्यास आणिले! मुलांनो, निराश होऊ नका. आपल्या पायाखालीच पृथ्वीच्या पोटात सुमारे पाव मैलाखाली एक ३/४ मैल लांबीची भली मातब्बर खान पसरली आहे बरे! ती पहा, आपणांस खाली नेण्याकरिता पाताळातून एक पिंजऱ्यासारखी खोली आडाच्या तोंडाशी आली. मी तुमच्यासाठी मॅनेजर साहेबांच्या परवानगीची वगैरे सर्व व्यवस्था केली आहे. पहा, आम्ही परकीय पाहुणे म्हणून येथील लोक एकादी गोष्ट किती आदराने दाखवितात. आमचेबरोबर सांभाळण्यास एक स्नेही व स्वत: मॅनेजरही खाली उतरत आहेत, तर तुम्हांस भिण्याचे काही कारण नाही. पण थांबा, उतरण्यापूर्वी आधी तुमचे चांगले कपडे काढून जुने कपडे चढवा. कोळशाच्या धुळीमुळे ते खराब झाले तरी हरकत नाही. तुमच्याजवळ आगकाड्या अगर दुसरा कसलाही ज्वालाग्राही पदार्थ असल्यास तो वरच ठेवा. तो खाली तुमच्याजवळ निघाल्यास खाडकन् सर्वांस कैदेची शिक्षा होईल हो!

चला, तर आपण पिंजऱ्यात जाऊ. हे पहा आता ७ वाजून १५ मिनिटे झाली आहेत. आमच्यासकट एवढा मोठा पिंजरा, एकादा धोंडा जसा पडावा, तसा एका मिनिटात खाली

सुबोध पत्रिका, ता. १८-१-१९०३

फूट जाड व ५६० यार्ड लांब आहे. कोळशाच्या गाड्या ओढण्याला वाटेने लोखंडी रुळ टाकले आहेत. खुणेची घंटा वाजवून पाहिजे त्या ठिकाणी वर्दी पोहोचविण्यास भिंतीवर विजेची तार आहे. समोर एक कोळशाची ट्रेन येत आहे, म्हणून आपण जपून एका बाजूस उभे राहू या. एका खटाऱ्यावर ३ घनफुटांची एक पेटी आहे. तीत सुमारे ७ हंड्रेडवेट कोळसा भरला आहे. असे १८ खटारे एकच घोडा रुळावरून ओढीत खाणीच्या तोंडाशी जात आहे. नंतर तितकेही खटारे आपण वर प्रथम पाहिलेल्या रहाटगाडग्याने वर ओढून घेतात. प्रत्येक रात्री अशा १८ खटाऱ्यांच्या २६ सफरी होतात. दिवसा त्याच्या दुप्पट! आणि असेच नेहमी.

चला आपण पुढे जाऊ. थोडेवर वळून पहा कोळशाचे कसे पहर सुटलेले आहेत! ते खाली कातरून पडू नयेत म्हणून भिंतीत भक्कम तुळ्या मारलेल्या आहेत. तथापि येथे कधी कधी कोण भयंकर अपघात होत असतील! आमच्या बरोबर असलेल्या स्नेह्याने आपल्यावर आलेल्या एका अरिष्टाचे नुकतेच वर्णन केले. ते कादंबरीकाराच्या कल्पनेतही येणार नाही. असो. आता येथे एक उंच डिगर लागली आहे. घोड्याचा येथे निभाव लागत नाही म्हणून खटारे पाठविण्याची कशी करामत लढविली आहे पहा. डिगरीवरून कोळशाच्या भरलेल्या गाड्या खाली धावत जाताना जी शक्ती उत्पन्न होते तिचाच उपयोग रिकाम्या गाड्या दुसऱ्या बाजूने डिगरीवर ओढण्यात केला जात आहे. आणि ह्या प्रकारे ह्या ३६ गाड्यांची घडामोड एकटाच मनुष्य एका साध्या यंत्राच्या सहाय्याने मध्ये उभा राहून चालवीत आहे! आणखी थोडे पुढे जाऊ या. येथे जागा फार कठीण आहे. घोडा फिरण्याला जागा नाही. वाफेचे यंत्र चालविणे म्हणून त्याहून धोक्याचे. म्हणून येथे एक मनुष्य पाण्याच्या जोराने यंत्र हाकीत आहे. आपण अंग सांभाळून ह्या कचाट्यातून पुढे थेट खाणीच्या गर्भात जेथे कोळसा उकरण्याचे काम चालले आहे तिकडे जाऊ या. आपल्या बरोबर खाणीतील दगाफटक्यासंबंधी जबाबदार तपासणीदार आहे. खाणीतील सुरुंग उडविण्याचेही काम त्याचेच आहे. इतरांनी खणून तयार केल्यावर हा तो भरून उडवितो. त्याचे आधी कोठे ग्यास बाहेर पडत आहे की काय, ह्याबद्दलची आपल्या दिव्याने तपासणी करतो. एका बाराने जवळ जवळ १० टनांचा कोळसा कातरला जातो. खाणीच्या मुळाशी काही विशेष पाहण्यासारखे काम चाललेले नसते. कोळसा उकरणे व भरणे, आणि निरुपयोगी जी भुकटी राहते ती वाटेतून दुसरीकडे रचणे ही खटपट चाललेली असते. पण ह्या चरकात जे प्राणी गुंतले असतात त्यांची स्थिती मात्र पाहण्यासारखी आहे. अंगावर केवळ लाज राखण्यापुरता कपडा, नखशिखांत कोळशाच्या भुकटीचा लेप, घामाच्या सारख्या धारा चाललेल्या. त्या रेघांतून ह्यांची जी अंगकांती दिसते तेवढ्यावरूनच हे प्राणी, वरील जगात गाडीतून हिंडणाऱ्या लॉर्ड साहेबांचे नातलग आहेत असे ओळखावयाचे.

मुलांनो, आमचे मानवी वैभव व ऐहिक ऐश्वर्य ह्यांची जी एकंदर इमारत आहे, तिचा पाया अशा काबाडकष्टाच्या आणि धोक्याच्या खंदकात रोविला आहे बरे! त्या पायाशी आम्ही नाही तरी आमचेसाठी दुसरे कोणी तरी निरंतर राबत असतात. आम्हीही आमचेपरी जर मनाने, नीतीने आणि

१६

जनातून वनात आणि परत

इंग्लंडच्या उत्तरभागी कंबर्लंडशायरमध्ये सरोवर प्रांत (Lake District) नावाचा प्रदेश आहे. उंच पहाड, विस्तृत सरोवरे, दाट वनराजी इ. बहुविधा सृष्टिसुंदरी तेथे नटली आहे. तशात वर्डस्वर्थ, कोलरिज्, साउदे इ. प्रासादिक कवींच्या सहवासाने हे शांतिस्थळ अधिकच पवित्र झाले आहे. उष्णकाळी इंग्लंडचे किंबहुना साऱ्या सुधारलेल्या जगाचे हे एक हवा खाण्याचे ठिकाण आहे. गेल्या उन्हाळ्याच्या सुटीत प्रो. कार्पेंटर साहेबांनी आमच्या कॉलेजच्या सर्व विद्यार्थ्यांस आपल्याबरोबर आपल्या कुटुंबात पंधरा-पंधरा दिवस सदर ठिकाणी रहावयास बोलाविले होते. कॉलेजातील व्याख्यानपीठातून व मंदिरातील व्यासपीठातून दिलेल्या ईश्वराविषयक ज्ञानाची पुरवणी वरील उदात्त स्थळी प्रकटलेले स्वरूप प्रत्यक्ष दाखवून करून देण्याचाच जणू ह्या गुरुवर्यांचा हेतू होता.

गेल्या जुलैत मी तिकडे ऑक्सफर्डहून निघालो पुढे मिळणारा धडा मनावर नीट बिंबावा म्हणूनच की काय वाटेत निराळाच अनुभव आला. आमची गाडी लांब पल्ल्याची असल्या कारणाने ती एक्स्प्रेस होती. वाटेत बर्मिंगहॅमपासून तो लँकेस्टरपर्यंत अगदी निराळा मुलूख लागला इंग्रजाने बहुतेक सगळ्या जगाचे कंत्राट आपल्याकडे घेतले आहे. म्हणून अर्थात एवढा प्रदेश म्हणजे जगाची एक मोठी वखारच! बर्मिंगहॅम, स्टॅफर्ड, शेफिल्ड, मँचेस्टर अशी अचाट घडामोडीची शहरे आणि त्यांच्या दरम्यान इतर कारखान्यांची गावे ह्यांची कशी येथे खेचाखेची झाली आहे. दाट जंगलातून एकादी चेतलेली वाघीण जशी सुटावी तशी आमची एक्स्प्रेस हजारो जीवांना घेऊन, अशा दाट वस्तीतून लांब लांब झापा टाकीत सुटली. स्टॅफर्डहून लँकेस्टरपर्यंत सुमारे दीडशे मैलांचा पल्ला तर तिने एकाच उडीसरशी मारला. त्यास पुरे दोन तासही लागले नाहीत.

लहान वस्तु ती स्थूल दिसली। तुटकी वाटे कुणी जुडली।
सहज कुटिला सरला झाली। जवळी न बाजुस अथवा आता।
दूर न मज काही।। १।।

असे झाल्याने मी दुष्यंत राजाच्याच रथात बसलो आहेसे वाटू लागले. शहरे, खेडी, नद्या, नाले इ. आमच्या पायाखलून पार निघून जात. अशा वेगाने आम्ही जात असता समोरून एकादी अशीच राक्षसी आमच्या अंगावर एक मोठा फुत्कार टाकून बिजलीसारखी समकून जाई! वाटेने मोठी स्टेशने आली म्हणजे आमच्यापुढे रुळांच्या जाळ्याचा गुंता पसरलेला दिसे, पण त्यातूनही ही नेमकी निसटून पार होई!

सुबोध पत्रिका, ता. १-२-१९०३

बाहेर धुराने व धुळीने दिशा धुंद झाल्या होत्या. मांडीवरच्या वर्तमानपत्रावर दोन चार मिनिटांतच कोळशाची भुकटी साचे. छाती करून बाहेर डोकावल्यास चहूकडे नुसती गिरण्यांची धुराडी व त्यातून निघणारे धुरांचे कल्लोळच दिसत. घरे, देवळे, झाडे व रस्ते ही सर्व सारखीच काळवंडून गेली होती. म्हणून त्या प्रदेशास ब्लॅक कंट्री म्हणजे काळा देश असे नाव आहे. अशा वातावरणात अष्टौप्रहर राहून निर्जीव यंत्राप्रमाणे झीज सोसणाऱ्या हतभागी मजुरांची काय दशा असेल! आमच्या कवीनी नुसत्या कल्पनेनेच भवचक्राची चित्रे काढली आहेत. येथे मात्र ते चक्र प्रत्यक्ष भ्रमत असलेले दिसत आहे! प्रगतीची ही काळी खरबरीत बाजू पाहून माझ्या तोंडातून आपोआपच हे उद्‌गार निघाले :

> "अहागे सुधारणे! तू दिवाणखान्यात येताना कशी नटून येतेस! तुझ्या पदरावर माशी देखील बसलेली खपत नाही. तुझा नाजूक बांधा, कोमल गात्रे, उंची पोषाक व जडजवाहीर पाहून आम्हा पौरस्त्यास कितीही कौतुक केले तरी पुरेसे होत नाही! पण हे गे काय तुझे एथले स्वरूप! किती हे तुझे कष्ट, कोण ह्या घामाच्या धारा आणि हे हातापायाला घट्टे! येथे तुला नुसते श्वासोच्छ्वास करण्यालाही वेळ मिळेना. तीच तू मंडळीत बसलीस म्हणजे काय काय ढंग करतेस! येथे तुला नुसती मोकळी हवाही मिळत नाही. दुसरीकडे काय तुझ्या क्रीडा, करमणुकी, चैनीचे प्रवास, रुचीच्या आलटापालटी! नाही आम्हाला हे तुझे हे बहुरूपी प्रकार कळत. कार्यालयातून क्रीडालयात व क्रीडालयातून पुनः अशा कार्यालयात जाणारी जर तूच असशील तर असे वेश पालटण्यात तुला किती शरम वाटत असेल? हाल आणि श्रमाची तर गोष्ट राहू दे. जगात राहण्याची कला आपल्यास चांगली साधली आहे, असे तू किती वेळा तरी म्हणतेस, पण नाही सुधारणे! तुलादेखील अद्यापि पुष्कळ सुधारले पाहिजे आहे. ते कसे ते सांगण्याची आमच्यातही शक्ती नाही, तोवर तुला तरी नावे ठेवून काय फळ! तरी दिसला तो प्रकार कळविण्याचे तूर्त आमचे काम आहे."

ज्या सुधारणेने आपल्यावर इतके जब्बर मोहिनी-अस्त्र टाकिले आहे तिची अशी कोणती व किती व्यंगे दिसली की मी तिला इतके टाकून व टोचून बोललो? मी तर अग्नीरथातून वाऱ्याच्या वेगाने चाललो होतो. पण तशातच ह्या सुंदरीचे कृष्ण आणि कठोर स्वरूप असे दिसून आले की वरील उद्‌गार मला नकळतच निघाले! एकाद्या भयंकर स्वप्नाचा काळ फार तर एक दोन पळेच असतो, पण तेवढ्यात कितीतरी स्थितीचा आपल्यास अनुभव येतो! इतकेच नव्हे तर जागे झाल्यावरही त्याचा परिणाम मनावर घडत असतोच! ह्याचे कारण हे की स्वप्नातले देखावे आपण जागृतीत आधीच निरनिराळ्या वेळी पाहिलेले असतात. फक्त त्यांचे एकीकरण मात्र मनाच्या केंद्रस्थानी एक-दोन क्षणांतच झाल्याने आपली अशी कासाविशी होते. अशातलाच काहीसा प्रकार ह्यावेळी माझा झाला. दम न घेता सारखा दोन तास धावत होतो तरी खिडकीतून बाहेर मोकळा प्रदेश असा फार वेळ पहावयाला सापडेना. व्यापाराची घडामोड व उद्योगाची धडपड किती लगट केली तरी मागे राहीनात. एकादे पटांगण नजरेस पडल्यास त्यात धुरकट व दमट हवेत आणि कोळशाच्या

राखेत कंगाल पोरे बागडत आहेत असे दिसावे! घरे पहावीत तर कबुतराच्या खुराड्यासारखी रांगेत नेमकी बसविलेली. सोय आणि शांती ह्यामुळे माणसे इतकी सवंगली आहेत की बिचाऱ्यास राहता भुई पुरेना. काही हौसेने, काही केवळ निरुपायाने ती अशी दिवसेंदिवस अधिकाधिक गर्दी करून राहत आहेत. एकाद्या आधुनिक मोठ्या शहरात सावकाशपणे हिंडू लागल्यास त्यातील मातबर चौक, उपवने, संग्रहालये, चित्रालये इत्यादी मोहक स्थळे नजरेस येतात आणि त्या झुरक्यासरशी शहरातील इतर ठिकाणच्या नानाविध यातनांचा विसर पडतो हे खरे पण त्याच शहराकडे असे विहंगम दृष्ट्या पाहू गेल्यास त्याचे रूप तितके मोहक दिसत नाही. ह्यावरून मला असे वाटू लागले की, काही गोष्टी सावकाश पाहिल्याशिवाय कळत नाहीत ; तर काही झटक्यासरशी पाहिल्याशिवाय कळत नाहीत. असो! अशा रीतीने मी पेनरिथ स्टेशनावर येऊन पोहोचलो. येथे दगदगीचे जग संपले आणि पुढे निराळेच जग दिसू लागले.

जन आणि वन

जगाचे दोन भाग आहेत. एक जन, दुसरे वन. ह्यासच आधुनिक शास्त्रीय नावे द्यावयाची झाल्यास एकास नीती व दुसऱ्यास निसर्ग असे म्हणता येईल. निसर्गात नीतीचा अत्यंताभाव आहे असे नाही. उलट स्वतः नीतीचा कोणताही प्रदेश निसर्गाच्या बाहेर आहे असेही नाही. निसर्गाच्या विराट मंडळात नीतीचा लहान गोल पोकळीतल्या परमाणूप्रमाणे तरंगत आहे! हाच विषय दुसऱ्या बाजूने निराळा दिसतो. नीतीचे अधिष्ठान मन. निसर्गाचे मूळ प्रकृती. प्रकृतीत मन मुळीच मावण्यासारखे नाही. उलट प्रकृती किती जरी अनंत भासली तरी मन तिला क्षणार्धात गिळून बसते. पण गिळते म्हणून त्यास कळते थोडेच! मन आणि माया, नीती आणि निसर्ग अथवा जन आणि वन ह्या द्वंद्वांचे परस्पर नाते काय आहे, ते काण सांगू शकेल? ह्या द्वंद्वांचे मूळ जी महावस्तू तिचे केवळ स्वरूप कोठे दिसेल! 'नकळे महीमा वेद मौनावले जेथे पांगुळले मन पवन' ते ह्याच ठिकाणी! महंतांनी जर प्रांजलपणे ही कबुली दिली आहे तर आमच्यासारख्या लहानांनी काय विचक्षणा करावी! असा प्रकार असून आम्ही प्रसंगी दुसऱ्याचे शब्द उसने घेऊन ज्ञानाची कितीतरी प्रौढी मिरवितो! वासनेचा थोडा कोठे हिसका बसला की तीनदा उलथून पडतो, तरी पुनः उठल्यावर 'अहं ब्रह्माऽस्मि' म्हणावयाला आहेच तयार!

प्रयत्नशाली जे महावीर आहेत ते जनात राहून सुधारणा साधोत. ज्ञानशाली जे महायोगी आहेत ते वनात राहून सत्य शोधोत. विषय हेच ज्यांचे सुख ते विषयाची खटपट करोत. वाद हेच ज्यांचे ज्ञान ते वादाची घटपट करोत. मध्यंतरी आम्ही साधारण माणसे विश्रांतीसाठी व उपासनेसाठी काही काळ जनातून वनात जाऊ या!

पेन्‌रिथपासून केसिकपर्यंत सरोवर प्रांतात जाण्यास सुमारे १८ मैल आगगाडीचा एक फाटा आहे. पेन्‌रिथ सोडल्यापासून नीतीचा गोंधळ मागे दूरदूर राहू लागला आणि निसर्गाचा सोहळा पुढे जवळजवळ येऊ लागला. दोहों बाजूस उंच उंच पर्वत हिरव्या गवताच्या झुली पांघरून हत्तीप्रमाणे

तटस्थ उभे राहिलेले आणि गंभीर दिसू लागले. अस्तास जाणाऱ्या सूर्याची शेवटची किरणे त्यांवर रेंगाळत होती. समुद्रावरील ताजा आणि मंद वारा आणि रानातील झाडपाल्याचा वास काळ्या प्रदेशातून नुकतेच बाहेर पडलेल्या प्रवाशास सुखवू लागेल. केसिक येथे पोहोचल्यावर सुधारणेची शेवटची खूण जी आगगाडी तिलाही निरोप दिला. माहेरी आल्यावर सासरच्या गड्यास निरोप देताना कितीसे वाईट वाटते हे प्रत्येक सासुरवासिणीस माहीत आहेच.

स्टेशनावर आम्ही तिघे विद्यार्थी उतरलो. आम्ही येण्याची वेळ जरी कळविली नव्हती तरी आमचे प्रोफेसरसाहेब व आमच्या पूर्वीचे आलेले एक विद्यार्थी आम्हास घरी नेण्याकरिता तेथे वाट पहात उभे होतेच. ऑक्सफर्ड विद्यालयात नेहमी विद्याव्यासंगात पाहिलेल्या प्रोफेसरसाहेबांची मूर्ती येथे किती निराळी दिसली! अंगात पहाडी सडा पोषाक, हातात रानटी काठी, खांद्यावरून आडवी जानव्यासारखी सोडलेली कातड्याच्या वादीस लटकलेली लहानशी दुर्बिणीची थैली, गालावर हासे, तोंडात माहितीचा पुरवठा (खिशातले गाईडबुक जणू पाठच केलेले) भाषणात विनोद, वर्तनात तत्परता, असे गुरूचे चालते बोलते चित्र पाहून आम्ही वाटेचे सर्व क्लेष केव्हाच विसरून गेलो. बॉरोडेल-दरीत लीथस कॉटेज हे आमचे ठिकाण येथून चार मैल होते. आमचे सर्व सामान घरी रवाना केल्यावर, डरवेंट वॉटर सरोवरावरून बोटीतून लिथस् कॉटेजला जाण्यास निघालो.

गाडीतून उतरल्याबरोबर बदललेल्या परिस्थितीत व बदललेल्या पेहरावात आपल्या गुरूस पाहून आम्ही आमचे श्रम विसरलो असे वर सांगितले, पण स्टेशनातून बाहेर येऊन सभोवती पाहतो तो गुरुंचा गुरू जो परमेश्वर त्याने तर ह्या ठिकाणी आपला पेहराव अधिकच बदललेला पाहून आम्ही श्रमच काय पण स्वत:लाही हळूहळू विसरू लागलो. डरवेंट वॉटर सरोवर केसिक गावाला अगदी येऊन भिडले आहे. प्रोफेसर, सगळे विद्यार्थी आणि एक युनिटेरियन् आचार्य इतकेजण आम्ही एका क्रीडानौकेत बसून निघालो! सूर्यास्त होऊन गोड संधिप्रकाश पडला होता. अशा शांत समयी देव कसा दिसला! ज्याने जन निर्माण केले त्यानेच वनही केले आहे. जो समाजात वसत आहे, तोच सृष्टीतही वसत आहे. असे असता दर्शनात किती तरी हा फरक! तिकडे समाजात तो स्वरूपाने प्रकटतो. पण ते सत्त्वदर्शन कित्येकास होते? आणि ज्या थोड्यास होते ते तरी कितीदा होते? आणि जे होते ते तरी किती कष्टाने, किती अनुतापाने आणि किती आत्मदंडाने आणि इतक्याही सायासाने एकदा कृपा झाली तर ती टिकते किती वेळ! तुकोबा सांगतात की, 'आठवचि पुरे। सुख अवघे मोहोरे' पण ह्या आठवेच्या मार्गातच अगणित अडथळे घडलेलेही पुन्हा त्यांनीच वर्णिले आहे की, 'कामक्रोध आड पडले पर्वत। राहिला अनंत पलीकडे' तेव्हा जन म्हणजे अशा अडथळ्यांचा डोंगराळ प्रदेश ह्यात आधीच अदृश्य असे जे सत्त्वरूप त्याचे दर्शन होणे अति कठीण. पण येथे पहा, तोच देव कसा सुंदर रूपाने प्रकटला आहे. आठवण करण्याचेही श्रम नकोत. डोळे उघडले की पुरे, सुख अवघे मोहोरे! समाजात जो इतका दुर्लभ तो येथे किती तरी सुलभ झाला आहे. समाजात जो दुर्मिळ, त्याचा सृष्टीत हा कोण सुकाळ! शास्त्रकारास आणि स्मृतिकारास जो तेथे सहसा लाभत नाही, तो येथे पशुपक्षांस भेट देऊन रमवीत आहे! येथे येण्याचाच अवकाश की ताबडतोब भेट व

लगेच सलगीदेखील! पश्चाताप नाही, प्रायश्चित्त नाही, इंद्रियदमन नको, देहदंडन नको, पापाची आठवणच नाही. मग क्षमेची गोष्ट कशाला! पुनर्जन्मच हा!!

समाजात सुख आहे, प्रीती आहे, प्रगती आहे, पण तेथे पुष्कळ अंशी ह्या गोष्टी असतात. आम्ही बसलो आहो ही नाव जर पुढे न्यावयाची झाली तर आधी वल्ह्यांनी पाणी मागे ढकलले पाहिजे. आणि हाच प्रकार सर्वदा नाही तरी पुष्कळदा समाजात चालला असतो. माझे धन ते दुसऱ्याचे ऋण, माझा आराम तो दुसऱ्याचे कष्ट, गर्दीतून माझे पाऊल पुढे पडावे म्हणून मी इतरांस मागे रेटीत असतो. असा प्रकार असल्यामुळे समाजात शुद्ध सुख मिळणे फार कठीण होते. तेथे इतर आत्म्यामध्ये परमात्म्याचे जे प्रतिबिंब दिसते ते स्थानमानाने थोडे बहुत अशुद्धच असते. पण सृष्टीतला प्रकार वेगळा. येथे आपण व परमात्मा ह्यांमध्ये इतर कोणी येत नाही म्हणून एथली सर्व सुखे निर्भेळ असतात, निश्चित असतात, निरालंब असतात!

असो. आम्ही पाळीपाळीने दोघे दोघे वल्हवीत, भोवतालची शोभा पाहत, मधूनमधून विनोद करीत, प्रसंगानुसार ह्या प्रदेशाची प्रोफेसरांच्या तोंडून चटकदार माहिती ऐकत निघालो. ह्या विस्तीर्ण सरोवराचे पाणी इतके स्वच्छ आणि शांत होते की एक मोठा आरसाच पसरलेला! केसिक गाव लवकरच वळणात लपून गेल्यावर आसमंतात कोठेही जीवांची हालचाल दिसेना. आमच्या बोटीभोवती लाटांची काय ती थोडी हालचाल होती तेवढीच. सर्वत्र एकच निर्विकल्प समाधी लागली होती. एका बाजूस सुमारे एक हजार फुटांचा एकदम तुटलेला काळाकुट्ट कडा किनाऱ्यावर तोल सांभाळून तटस्थ उभा होता. दुसऱ्या बाजूस हळूहळू उंच उंच होत जाणाऱ्या पर्वतसपाटीवर दाट गवताचा हिरवा गालिचा पसरला होता. पुढे पुढे हे दोहोंकडचे डोंगर अगदीच जवळ येऊन सरोवरास कवटाळू लागले. अखेरीस सरोवर संपले व आम्ही दरवेंट नदीच्या पात्रात शिरून तसेच बॉरोडेल नावाच्या रमणीय दरीतून वर वर जाऊ लागलो. नागिणीसारखी नदी वरचेवर वळसे मारू लागली. येथे सौंदर्याची तर अगदी सीमा झाली आणि सृष्टिसुंदरीचा गर्व तिच्या पोटात मावेना असे उघड दिसू लागले. किनाऱ्यावरील झाडे, लता आणि पर्वत ह्यांच्या प्रतिबिंबाची तर काय बहार! कुलस्त्री एकांतात असताना आरशात आपले रूप पाहून आपल्यासच धन्य मानीत असलेली दिसल्यास कोणास बरे परमावधीची धन्यता वाटणार नाही! आमची नौका पुढे नेऊन ह्या तरुणीचा रसभंग करण्याचे आम्हाला जीवावर आले! आम्ही अता अगदी लीथस् कॉटेजच्याजवळ पोहोचलो. नौका एका झाडाच्या मुळाशी बांधून किनाऱ्यावर पाय ठेवितो तोच मिसेस कार्पेंटरबाईनी झोपडीच्या खिडकीतून बाहेर डोकाविले आणि आपला हातरुमाल हालवून मोठ्या प्रेमाने आमचे स्वागत केले!

बॉरोडेलमधील प्रार्थना व भेट

लिथस् कॉटेजच्या वन्य कुटिकेत आमचे जे पुढील पंधरा दिवस अति सुखाचे गेले त्याची गोड सूचना, गुरुपत्नीने वर सांगितल्याप्रमाणे प्रथमदर्शनी दुरूनच जे स्वागत केले त्यात मिळाली होती.

क्रॅग्च्या निमुळत्या मनोऱ्यावर दशमीचा चंद्र लोंबत होता. आम्ही दोघे संगतीने चाललो होतो, तरी बोलत नव्हतो. स्वत: कौतुक करण्याचीही वेळ मागेच टळून गेली होती, मग संवादाला जागा कुठे राहिली! जसजसे पुढे जावे तसतशी दरी आकसू लागली. नकळतच सृष्टीने आम्हांला शेवटी अगदी अंत:पुरात नेले! तेथे जिवलग जनांचीही स्मृती उरली नाही. निकट विषयांचेदेखील भान उडाले. लौकिकातून नाहीसेच झालो!

असा कोण जादूवाला ह्या भरलेल्या अंत:पुरात होता की, ज्याने आमची अशी पाहता पाहता पराधीन अवस्था करून सोडली! वरती जो एकदा लय लागला तो खाली करण्याची काही शक्ती उरली नाही.

आनंद होत होता काय आम्हांला?
सांगवत नाही. काही वेळापूर्वी मात्र झाला होता खरा.
आम्ही काही पहात होतो काय?
नव्हतो! दिसत होते पण काहीतरी!
मागितले का काही?
छे हो! काय मागावयाचे?
जिवाला कसे होत होते?
मधूनमधून सुस्कारे बाहेर पडत होते!
ते का म्हणून?

कोणी सांगावे! काहीतरी आतून बाहेर निघत होते व काही बाहेरून आत शिरत होते-छे, मी काहीतरी वेड्यासारखे वर्णन करीत आहे.

एकूण हा प्रकार काय? आणि ते कोण?

"Prayer is the burthen a sigh,
The falling of a tear,
The upward glancing of an eye,
When none but God is near.

--(Montgomery)

(मुखी श्वास, आसवे गाळी। नेत्री वरतीच न्याहाळी।
अशा या प्रार्थनेच्या काळी। जवळी तोचि एकला।।)

कवीने हे वरील उद्‌गार कोणत्या वेळी काढले असतील ते असोत. मला तर आता असे कळून चुकले आहे की, वरील जो प्रकार घडला ती माझी प्रार्थना होती. आणि परमेश्वरावाचून जवळ कोणी नव्हते. एकूण प्रार्थनेचे काम इतके साधे व सोपे आहे काय ? होय. कार्लाइलही तेच सांगत आहे.

"Prayer is and always remains a native and deepest impulse of the soul... On the whole, silence* is the one safe form of prayer known to me in this poor, sordid era-though there are ejaculatory words too, which occasionally rise on one, with a felt propriety and variety."

* ह्याचे भाषांतर तुकारामाच्या विचारात असे आले आहे :-

'करावी ते पूजा मनेची उत्तम । लौकिकाचे काम काय तेथे ।।१।।

देवा! अशी प्रार्थना करावयाला व ही भेट घ्यावयाला सरोवर प्रांतापर्यंत येण्याचीच जरूरी आहे काय? नाही. जेथे कसली उपाधी नाही, अशा कोठल्याही उघड्या जागेत आणि मोकळ्या हवेतही उपासना घडण्यासारखी आहे. माणसांच्या गर्दीतही देवा तू भेटतोस. नाही कसे म्हणू! घरी आईची माया, बहिणीची प्रीती, पत्नीचा अनुराग, पुत्राचे वात्सल्य, समाजात शेजाऱ्याची सहानुभूती, मित्रांचा स्नेह, राष्ट्रात देशभक्तांची कळकळ व संतांचा अनुग्रह आणि शेवटी जगतात महात्म्यांची निरपेक्ष अनुकंपा इत्यादी दर्शनेही तुझ्याशिवाय इतर कोणाची असू शकतील? जनात तुझा असा साक्षात्कार घडतो खरा, पण तो किती विरळा. उलटपक्षी किती कठीण अनुभव येतो! पण एथले तुझे रूप कसे अबाधित आणि अखंड आहे! हे वरचे आकाशाचे छत कधी फाटले काय! हा खालचा सरोवराचा आरसा कधी फुटेल किंवा मळेल काय! ह्या पाखरांचे गळे कधी बसतील काय! हे पर्वताचे तट, हा वाऱ्याचा पंखा, वृक्ष, वल्ली, दळ, पाषाण, पाणी, आकाशातील मेघ ह्यांवरूनही सर्वत्र ईश्वरा 'तुझी कुशलधाम नामावली' कशी सुवाच्य रेखाटली आहे! लहान बालके देखील ती वाचून आनंद पावतात ! मग आम्ही का असे वारंवार विन्मुख व्हावे! हे कल्याणनिधान, आम्ही स्वत:भोवती जो क्षुद्र चिंतेचा गुंता निरंतर गोवीत असतो तो तूच करूणेने उकल, आणि आतासारखेच वेळोवेळी आपल्याकडे कृपाहस्ताने आम्हाला ओढून घे. आमच्या इच्छेनेच तुजकडे येण्याची आमची शक्ती नव्हे!

वगैरे प्रार्थना, देव भेटून गेल्यावर, उघडपणे करीत आम्ही परत कुटिकेत आलो.

वर्डस्वर्थची भेट आणि डव्ह कॉटेजची यात्रा

मूर्तिपूजक आणि सौंदर्योपासक असे जे प्रकृतीचे भक्त आहेत, त्यांचे हा सरोवर प्रांत म्हणजे एक मोठे क्षेत्रच आहे. ह्या क्षेत्रातील उपाध्यायाची कायमची नेमणूक वुइल्यम वर्डस्वर्थ ह्याजकडे आहे. ह्या कवीचा लौकिक-जीवनकाळ जरी १७७०-१८५० ह्या अवधीतच आटपला तरी ह्या क्षेत्रात उपाध्येपणाचा धंदा तो अद्यापि चालवीत आहे असे म्हणण्यास फारशी हरकत येणार नाही. ह्या प्रांती पदोपदी कोणातरी मोठ्या पुरुषाचे स्मारक पाहाण्यात येते अगर पुण्यकथा ऐकण्यात येतेच. झाडी, माळ, रस्ते, वाटा एकंदरीत सर्व वातावरणच ह्या पवित्र आत्म्यांनी गजबजून गेले आहे. ह्यामुळे येथे येणाऱ्या परकीयांची, विशेषत: मजसारख्या पौरस्त्याची मोठी चमत्कारिक स्थिती होऊन जाते. मूळ

देश पहावा तर तळहाताएवढा. भूगोलातच नव्हे तर इतिहासातही, आकृती लहान पण हल्ली पराक्रम भूमंडळी मावेनासा झाला आहे. पराक्रम खोटा आहे, असे कोणीही समंजस मनुष्य म्हणत नाही. गुणांचा मक्ता काही ह्याच राष्ट्राला दिलेला नाही. ते सर्वात कमीजास्त आहेत. पण गुणांचे चीज, किंबहुना बोभाटा देखील करण्याची इकडच्या लोकांना जी हातोटी साधली आहे ती पाहून निदान पौरस्त्याला तर फार फार कौतुक वाटल्यावाचून रहात नाही. मोठा पुरुष जन्माला की पुरे, तो सर्व राष्ट्राचे धन होऊन बसतो. त्याच्या पश्चात त्याचे स्मारक काय करू, कसे करू, असे सर्व राष्ट्राला होऊन जाते मोठमोठ्या शहरांत जेथे माणसांची गर्दी फार तेथे स्मारकांचीही गर्दी जमलेली असते, हे सांगावयाला नकोच. पण अशा निर्जन व निवांत स्थळीदेखील कोणत्या ना कोणत्या तरी रुपाने स्मारकेही पुढे येतातच. हे पाहून ह्या राष्ट्राची मोठी धन्यता वाटते. ह्यावरून पाहता वर्डस्वर्थला येथे जो आदर मिळत आहे तो त्याच्या थोरवीला मुळीच जास्त नाही. जास्त असो, कमी असो, जो मिळतो तो असा बिनबोभाट मिळत आहे की, एकांत-प्रियता हा त्याचा मोठा गुण त्याच्या स्मारकात विशेषच खुलून दिसत आहे.

वर्डस्वर्थची कविता म्हणजे सायंकाळच्या चिंतनासारखी शुद्ध आणि उदात्त, गंभीर आणि प्रसन्न आहे. तिचे सेवन केल्याने मनाला क्षोभ होत नाही की माज येत नाही, किळस वाटत नाही किंवा आळस वाटत नाही. ह्याची कृती म्हणजे खासगी अनुभवाची लहान लहान पद्ये, जणू रामबाण मात्रेच्या गोळ्याच! इतरांचे सूर नुसते कानातच राहतात. पण ह्याच्या सुरांचे ठसे अंतरातल्या फोनोग्राफवर तात्काळ उठून पुनः कधी तसा बाह्य प्रसंग आल्यास ते आपोआप आत वाजू लागतात! फ्रेंच ग्रंथकार व्हॉल्टेअर म्हणतो की, 'काव्यामध्ये नीतीचा उद्‌गार इंग्रजी कवींनी जितक्या जोराने केला आहे त्याहून जास्त इतर कोणीही केला नाही.' आणि वर्डस्वर्थने अस्सल नीतीची जी कामगिरी बजावली आहे, तशी इतर कोणत्याही इंग्रजी कवीने बजावलेली नाही. नीतीच नव्हे तर त्याच्या काव्यात धर्माचीही जिवंत आणि जागती ज्योत जळत आहे. त्याचे पद्य म्हणजे परमात्म्याचे परंपरया स्तोत्रच. परंपरया म्हटले म्हणून त्याची प्रत्यक्षता कमी असे मुळीच नव्हे, उलट अनेक रूढ धर्मात देवाच्या ज्या सहस्त्र नामावळीचा घोष चालू आहे, त्यावरूनही परमेश्वराचा संबंध इतक्या प्रत्यक्षपणे जडण्याचा मुळी संभव नाही. वर्डस्वर्थची नीती आणि धर्म ही दोन्ही नवीन जन्मलेल्या बालकाच्या उल्हासासारखी ताजी आणि नेणती आहेत, आणि तितकीच तंतोतंत निकट प्रत्यक्ष आहेत ! ह्याचे कारण हेच की, मुलाप्रमाणे वर्डस्वर्थनेही आपला सृष्टीशी अगदी अव्यभिचरित आणि अखंडित संबंध राखला होता. तो म्हणतो :

> The World is too much with us, - late and soon;
> Getting and spending, - we lay waste our powers;
> Little we see in Nature that is ours;
> We have given our hearts away, - a sordid boon.

ज्या फुलाजवळून आम्ही सहज न पाहता जाऊ त्यातच भ्रमर येऊन तासानुतास अडकून पडतो तीच स्थिती वर्डस्वर्थची होत होती हे त्याच्या खालील चरणावरून दिसते.

To me the meanest flower that blows
Can give thoughts that do often lie deep for tears.

असा हा सृष्टीचा भक्त आणि भोक्ता ईश्वराचे गुण डोळ्याने पाहून, तोंडाने गात मरेतोपर्यंत ह्याच प्रदेशात राहून गेला. बॉरोडेलहून सुमारे २५ मैलावर डोंगराच्या कुशीत ग्रासमिअर नावाच्या सुंदर सरोवराच्या काठी ग्रासमिअर खेड्यात डव्हकॉटेज नावाच्या कुटिकेत वर्डस्वर्थ राहत असे ती पाहण्यास आम्ही एके दिवशी गेलो.

स्ट्रॅटफर्ड-ऑन-इव्हन ह्या गावी शेक्सपियरच्या स्मारकाचा जो भपका, थाटमाट आणि गोंगाट दिसला तशातला येथे मुळीच प्रकार नव्हता. एक झोपडी केवळ साधेपणाची आणि शांतीची मूर्तीच! दगडमातीचे हे माणसांनी बांधलेले घरकुल, पण भोवतालची सर्व सृष्टी त्याकडे कशी आदरपूर्वक पहात बसली होती. झोपडीच्या भिंती मजबूत पण ठेंगण्या होत्या. त्यांना आत बाहेर चुन्याची सफेती फासली होती. (हल्ली ह्या देशात अशा सफेत भिंतीत क्वचित एकाद्या जुन्या खेड्यात आढळतात). खपरेल अगदी खालपर्यंत येऊन नम्रता दाखवीत होते. इंग्लिश घराचे मुख्य लक्षण जे धुराडे ते तर फारच जुन्या चालीचे, त्यावर शेकडो हिवाळ्यांच्या खुणा दिसत होत्या. घराभोवती पुराणपद्धतीचे पण हल्ली दुरुस्त राखलेले वळणदार कंपौंड होते. त्यातून आत जाण्यास १८ व्या शतकातले फाटक होते. आम्ही प्रत्येक ६ आण्याचे तिकीट घेऊन आत गेलो.

आत गेल्यावर १०० वर्षांमागची इंग्रजी साधी रहाटी आणि उच्च विचार ह्यांचे दाखले खाली फरशीवर, बाजूस भिंतीवर, वरती पाटणीवर भरपूर दिसू लागले. कवी १८०२ मध्ये एकदा लंडनला गेला असता त्याचे असे उद्‌गार निघाले होते :

... ... I am opprest
To think that now our life is only drest
For show mean handy work of craftman, cook
Or Groom --- we must run glitting like a brook
In the open sunshine or we are unblest,
rapine avarice, expense,
This is Idolatry and these we adore.

१८०२ साली जर बिचाऱ्याला ही स्थिती दिसली तर १९०२ साली परवा झालेला राज्याभिषेक समारंभ पाहून त्याला काय वाटले असते! ते काही असो. पण हा समारंभ आणि ही झोपडी दोन्ही एकाच देशात, एकाच काळी कशी असू शकतात, ह्याचे मला मोठे कोडे पडले. ही झोपडी पाहण्यास

वर्डस्वर्थचे भक्त म्हणविणाऱ्या हजारो खुशालचंदांची जी येथे गर्दी येते त्यांच्यात वर्डस्वर्थचा साधेपणा दशांशानेही नसतो, तरी ते ह्या झोपडीचे कौतुकच करीत असतात! तिचे फोटो घेतात, तिच्या प्रतिकृती बनवितात! कवीला लंडनातली मूर्तीपूजा सोसली नाही. मला तर ग्रासमिअरमधील मूर्तीपूजा अधिक दु:सह झाली! असो.

या खोपटीत कवी आणि त्याची जिवलग आणि चहाती बहीण डोरोथी अशी दोघेच रहात असत. तळमजल्यात काळ्या दगडाची फरशी होती ; ती अगदी झिजली होती. ती पहात पहात आम्ही जेव्हा भिंतीतील मोठ्या व ओबडधोबड चुलीजवळ आलो, तेव्हा कवीच्या एकंदर रहाटीचे चित्र पुढे दिसू लागले. चुलीजवळ रिकाम्या चकाट्या पिटण्यात कधी आनंद होत नसे. तो म्हणतो :

> Better than such discourse, doth silence long,
> Long, barren silence, square with my desire,
> To sit without emotion hope or aim,
> In the loved presence of my cottage fire,
> And listen to the flappint of the flame,
> Or kettle whispring its faint under song.

वरच्या मजल्यात बसावयाच्या खोलीत कवीच्या काही वस्तू, चित्रे वगैरे दोन जड खुर्च्या आणि इतर काही सामान ठेविले आहे. निजावयाचे खोलीत त्याचे अंथरुण तसेच राखून ठेविले आहे. दुसऱ्या एका खोलीत त्याच्या पुस्तकाच्या सर्व आवृत्ती व हस्तलिखिते तावदानात व्यवस्थेने मांडून ठेविली आहेत. काही महत्त्वाची हस्तलिखिते भिंतीवर काचेतून टांगली आहेत. त्याने जी सृष्टीतील निरनिराळ्या देखाव्यांवर गाणी (Sonnets) रचली आहेत, त्यांचे विषय हुबेहूब दाखविण्याकरिता काही वास्तविक व काही काल्पनिक फोटोग्राफ एका चौकटीत एकीकडे टांगले आहेत.

ही झोपडी डोंगराच्या अगदी पायथ्याशी चिकटलेली असल्यामुळे दुसऱ्या मजल्यातून मागच्या बाजूने बाहेर पडले की आपण परसात येतो. हे परसू म्हणजे डोंगराची सरळ उतरणच आहे. बागेत सृष्टीवर कोठेही बलात्कार केल्याचे चिन्ह दिसत नाही, पण तिच्या संमतीने जी साफसफाई आणि वेणीफणी करावयाची तितकीच केली आहे. बागेतील आसने म्हणजे खडकातल्या पायऱ्या, झाडांच्या वाकलेल्या फांद्या वगैरे. आगंतुक जड एकच बाक जे ठेविले आहे त्याचीही भोवतालच्या परिस्थितीशी पूर्ण संगती आहे! हल्ली येथे कोणी राहत नाही, फक्त दाखविण्यासाठी एक दोन बाया मात्र असतात.

नंतर आम्ही ग्रासमिअर खेड्यातील देवळाच्या स्मशानभूमीतील कवींचे कबरस्थान पाहिले, ते तळ्याच्या अगदी काठालाच आहे. त्याचे आणि त्याच्या प्रिय बहिणीचे थडगे एकमेकाला चिकटून आहेत. दोन लांब चौकोनी भुईसपाट निराळ्या फरशा आणि त्याभोवती दाट हिरवे गवत ह्याशिवाय

तेथे काही नाही. देवळाची इमारत किंचित मोठी जुन्या ओबडधोबड नॉर्मन घाटाची आणि भक्कम बांधणीची आहे. देवळात एका खांबावर कवीचा संगमरवरी मुखवटा ठेविला असून खाली या अर्थाचा लेख आहे :

To the memory of W. Wordsworth . . . who,
By the special gift and calling of God, was raised
Up to be the chief minister not only of the noblest
Poetry but of high and sacred truth . . .

असो, ह्या प्रकारे आमचे ह्या प्रांतात १५ दिवस अगदी नकळत गेले. ह्यांपैकी बहुतेक दिवस, सकाळी ८ वाजता न्याहारी करून संध्याकाळी ८ वाजता जेवणाचे वेळेपर्यंत खांद्यावर फराळाच्या पडशा टाकून जंगलातून हिंडत, पाण्यावरून तरंगत, पर्वतावरून सरपटत काळ घालविला म्हणावयाचा. ऑक्सफर्डचे प्रोफेसर व विद्यार्थी म्हणजे केवळ पुस्तकातील किडे नव्हेत. लीथस् कॉटेजमध्ये निघणाऱ्या आमच्या एका गमतीच्या पाक्षिक पत्रिकेत प्रोफेसर कार्पेंटर साहेबाबद्दलचा जो उल्लेख आहे तो अगदी खरा आहे आणि मासलेवाईक आहे.

Each day he does a mountain climb,
A ten mile row, three meals, a witticism
And fills the intervening time with
Pali texts and hebrew criticism.

खरोखरच आम्हा सर्वात प्रोफेसरच अधिक बळकट व काटक ठरले. किती चालले तरी तोंडावर थकल्याचे चिन्ह नसे. वाट शोधून काढणे, लहानसान माहिती देणे, श्रमाची सर्व कामे स्वत: हौसेने व काळजीने करणे वगैरेंची कशी अगदी त्यांना सवयच जडलेली. कोणी थकून मागे राहिल्यास पुन्हा त्याचेसाठी मागे जात. कोणी फार पुढे गेल्यास वाट चुकतील म्हणून पुढेही जात, घरीही निरनिराळे खेळ खेळून व नाना सुभाषिते सांगून सर्वांस उल्हासात ठेवीत.

अशा भल्या गुरूची, गुरुपत्नीची व आनंदी सहाध्यायाची शेवटी रजा घेऊन मी एका स्कॉच सरोवराची वाट धरली

स्कॉच सरोवरात

स्कॉटलंडचे राजधानीचे शहर एडिंबरो हे सगळ्या ग्रेटब्रिटनात अत्यंत सुंदर आहे. समुद्रकाठी टेकड्यांच्या आंदोलावर, ह्यास ठिकाणी फार अनुकूल मिळाले असून, स्वत:चा बांधाही पाखरासारखा आटोपशीर व टुमदार आहे. त्यामुळे अवजडशा लंडनसारख्या शहरातून आलेल्या पांथाचे मन हे सकृतद्दर्शनीच हरण करिते. युरोपात हे एक पाहण्यासारखे स्थळ असून आत्मसंतुष्ट स्कॉच लोकांस ह्याबद्दल मोठा अभिमान वाटत आहे. आजूबाजूच्या सात टेकड्यांमध्ये हे वसले असल्याकारणाने स्क्वॉच लोक ह्यांस आधुनिक अथेन्स असे म्हणतात, व आल्यागेल्यांस त्यांचे मत विचारतात.

इतकेच नव्हे तर अथेन्सची सर आणण्यास तेथील एका प्राचीन इमारतीच्या अवशेष राहिलेल्या खांबांच्या रांगेचे येथे एका टेकडीवर हुबेहुब अनुकरण केले आहे. ह्या स्वच्छ व सुखी नगरीत एक आठवडा घालवून पुढे मी ग्लासगो येथे गेलो. उद्योगाची धडधड, व्यापाराची घडामोड, गर्दी, धूर आणि धुरळा इ. आधुनिक सुधारणेची वरवर दिसणारी लक्षणे येथे भरपूर आहेत. तीनच दिवस येथे राहून माझे इष्ट स्थळ जो स्कॉच सरोवर प्रांत तिकडे निघालो. पण तितक्याच अवधीत मला भावी एकांताच्या सेवनार्थ फार भूक लागली होती.

ग्लासगोच्या एका धुरकटलेल्या बोगद्यातून आगगाडीने मला फरफटीत बाहेर ओढून एके सुप्रभाती क्लाईड नदीच्या खाडीत निवांत पाण्यावर आणून सोडीले. किती तरी आराणूक वाटली मनाला! पण येथेही माणसांची गर्दी काही चुकली नाही. इतका वेळ कामात गुंतलेल्यांच्या गर्दीत होतो, तर आता विश्रांती घेणाऱ्यांच्या गर्दीत पडलो! ज्या बोटीत मी उतरलो ती आधीच भरून गेली होती. अशा भरलेल्या बोटी वेळोवेळी बंदरातून निघून, गिरिगव्हर, मैदान, जंगल इ. निरनिराळ्या प्रांती शिरत. ह्या गर्दीपैकी काहीना काम फार पडल्यामुळे व काहीना काम मुळी नसल्यामुळे शीण आला होता. तथापि शरण आलेल्यांचे गुणावगुण न पाहता सृष्टिमाता सर्वांचे सांत्वन करू लागली. सुधारणेचा ताप किती आहे हे खरे पहावयाचे असल्यास एकाद्याने अशा विश्रांतीच्या ठिकाणी किती व कोणत्या प्रकारची झांगड लागुन गेलेली असते ते पहावे. इंग्लंड, स्कॉटलंड, आयर्लंड इतकेच नव्हे तर युरोपातील निरनिराळ्या ठिकाणांहून विशेष करून अमेरिकेतून लोक येथे येतात व तसेच इतर ठिकाणीही जातात. डोंगराच्या खबदडीतही सुखाचे प्रत्येक साधन पुरविणारी, व अहर्निश सृष्टि-नटीचे सर्व हावभाव दाखविणारी हॉटेल येथे सर्वत्र सज्ज होऊन वाट पहात उभी आहेत. खुश्कीने व जलमार्गाने प्रवासाचे दर कमी करून भपकेदार वर्णनाची गाईडबुके लिहून, जाहिराती देऊन वगैरे वगैरे नाना उपायांनी व्यापारी लोक गिऱ्हाईकांस घरातून बाहेर काढतात. तशात, फॅशनदेवीचे नवस पुरविणेही इकडे फार जरूरीचे झाले आहे. ज्या ठिकाणी हिवाळा व पावसाळा घालविला तेथेच उन्हाळ्यातही राहणे म्हणजे इकडच्या संभावितपणाला शोभत नाही. अशा अनेक कारणांमुळे मला ही गर्दी जमलेली पाहून फारसे आश्चर्य वाटले नाही. आश्चर्य वाटले ते हे की, ह्या लोकांची विश्रांती घेण्याची तऱ्हा दगदगीचीच. निदान मला ती तशी भासली. रेल्वेवर काम करून शिणलेले तरुण पुरुष, पोस्टात खपणाऱ्या तरुण मुली, गिरणीतले मजूरही, एथील निरनिराळ्या भागातील इतिहासप्रसिद्ध स्थळे व सुंदर देखावे रात्रीचा दिवस करून पाहून जात असतात.

असो. आमची आगबोट क्लाईड नदीच्या रुंद खाडीतून लवकरच लाखलाँग नावाच्या सुंदर चिंचोळ्या सरोवरात शिरली व स्कॉटलंडच्या पश्चिम भागातील हायलँड नावाच्या जगप्रसिध्द डोंगर प्रदेशात वरवर जाऊ लागली. दोहोंकडे केवळ सामसूम होते. शांती आणि समाधान ही स्वर्गीय भावंडे पहाटेच्या प्रहरी येथे विश्रंभाने दोहों काठावर झोपीच गेली होती जणू! प्रत्येक वळशासरशी नवेनवेच पडदे आम्हापुढे पसरत. आता सरोवर संपले, पुढील खडकावर आम्ही उतरणार असे म्हणतो तोच पुनः पाणी आणि पर्वत, गवत, वृक्ष आणि वेली ह्यांचे अकल्पित भांडार पुढे दिसू लागे.

अखेरीस लॉखलाँगच्या अगदी शिरोभागी ॲरोखर नावाच्या जंगली बंदरात आगबोट रिकामी झाली. ह्या लहानशा ठिकाणी घरापेक्षा हॉटेलांचीच संख्या अधिक होती आणि घरात राहणाऱ्या साध्याभोळ्या हायलंडरांनाही ह्या लाघवी सुधारणेने पैशाची चट लावून दिली होती हे लवकरच दिसून आले.

येथून दीड मैलावर सगळ्या, 'स्कॉच सरोवराची राणी' जी लॉखलोमंड तिचा अमल सुरू होतो. ह्या सर्व प्रदेशात वस्ती फार विरळ विरळ आहे. मैल-दीड मैलावर एकादी शेतकऱ्याची झोपडी अगर गृहस्थाचा वाडा लागतो. सुदैवाने ह्या एकांत स्थळी मला तीन निरनिराळ्या झोपड्यांत जागा मिळाल्याने ह्या सर्व प्रदेशात फिरून पाहण्यास सापडले, आणि हॉटेलात राहणाऱ्या नागरिक लोकांचा संसर्गही थोडा वेळ चुकविता आला. लॉखलोमंडच्या दुसऱ्या बाजूस ४-५ मैलांवर प्रख्यात कवी सर वॉल्टर स्कॉट ह्याच्या 'लेडी ऑफ दि लेक' ह्या काव्यातील मुख्य स्थळ लॉख कॅट्रीन हे आहे. ही तर सौंदर्याची खाणच स्कॉट कवीला लाभली होती. सरोवराच्या शिरोभागी ट्रोसॉक्स नावाच्या मनोहर दरीकडे जाताना एलन्स आईल नावाचे वरील काव्यातील नायिकेचे सुंदर स्थान लागते. त्याला अगदी चिकटून प्रेक्षकांची नौका जात असताना प्रत्येकाचे अंतःकरण सद्‌गदित झाल्यावाचून राहत नाही. यावत्काळ हा डोंगर, हे सरोवर व ही दरी पृथ्वीवर राहतील तावत्काळ स्कॉटच्या नावाला व त्याच्या साध्या सरळ व सोप्या भारतीला बाध येणार नाही ही साक्ष पटते. मी दरीत शिरलो तेव्हा :

"All in the Trossak's glen was still,
Noon tide was sleeping on the Hill"

हा कवीचा दाखला मला प्रत्यक्ष पटला! येथून पाऊल परत घेणे जिवावर आले!

बेन लोमंड शिखरावरील समाधी

ऑगस्ट महिन्यात एके दिवशी सकाळी लगबगीने न्याहारी आटोपून लोमंड सरोवराच्याकाठी हार्वेट बंदरावर आगबोटीची वाट पहात मी उभा होतो. जिच्या मुद्रेत सायंकाळचे प्रसंगी एक प्रकारच्या आध्यात्मिक औदासिन्याची आणि चिंतन गांभीर्याची शोभा दिसत असे ती ही 'स्कॉच सरोवराची राणी' आज सकाळी आपल्या सर्व परिवारासह अत्यंत सुप्रसन्न दिसत होती. आज दिवस इतका स्वच्छ व सोज्वळ होता की, ह्या उन्हाळ्यातला हा अगदी पहिल्या प्रतीचा असे लोक म्हणू लागले. पैलतीरावर 'बेनलोमंड' पर्वताचे निमुळते शिखर इतरांहून उंच आकाशात गेले होते. येथून सुमारे ५ मैलांवर पर्वताचे पायथ्याशी रॉबर्टनान् नावाच्या एका कोपऱ्यातील बंदरावर मी एकटाच उतरलो आणि हळूहळू चढण चढू लागलो. येथे एकांत म्हणजे अगदी पूर्ण प्रतीचा होता. जिवलग माणसे व देशबांधव हजारो कोसांवर, एतद्देशीय मित्र, ओळखीचेही शेकडो कोस दूर, आसमंतात माणसांची कोठेही चाहूल दिसेना, प्रदेश अनोळखीचा, वाट गैरमाहितीची, इतके असूनही मी अपरिचित स्थळी आहे असे वाटेच ना. जंगली हिंस्त्र पशुंची तर गोष्ट राहोच, पण साप, विंचू इत्यादी क्षुद्र किड्यांची येथे वार्ताही नाही. फार तर काय पायात काटाही मोडण्याची भीती नाही, अशी येथील

डोंगर व राने अगदीच माणसाळून गेली आहेत. एकदोन शतकापूर्वी ज्या प्रसिद्ध व बाणेदार रॉबरॉय रामोश्याने हा सारा प्रदेश दणाणून टाकला होता त्याचीच गुहा व कबर पाहण्यास आता कॉलेजातील तरुण मुली बायसिकलवरून शेजारच्या पहाडात एकट्याच हिंडत आहेत! असो, ह्या प्रकारे ह्या स्थळाचा आता उग्रपणा जरी सर्वस्वी नाहीसा झाला आहे तरी येथील एकांतवासाला व जंगली शोभेला अद्याप तिळमात्र बाध आलेला नाही.

मी रान तुडवीत वरवर चाललो. एका टेकडीच्या माथ्यावर जावे तो अवचित पुढे दुसरी टेकडी दत्त म्हणून उभी राही. तरी चढण्याचा कंटाळा येईना की थकवा वाटेना. भोवताली प्रदेश अगदी उघडा, झाड ना झुडूप, पाया खाली मात्र हिरवेगार गवताचे दाट आणि दमट हांतरुण हांतरले होते. नजरेत कोठे पशू येईना की पाखरूही येईना. केव्हातरी एखाद्या दगडाच्या मागे रवंथ करीत पडलेले एकादे स्कॉच मेंढरू दिसे. पण ह्या सत्त्वशून्य प्राण्याच्या अशा क्वचित दर्शनामुळे माझ्या एकांतात म्हणण्यासारखा व्यत्यय येत नव्हता. सहज चुकून मागे नजर गेल्यास, खाली लांबवर पसरलेला अप्रतिम देखावा दिसे. २५ मैल लांब त्रिकोणाकृती लॉखलोमंड सरोवर अगदी क्लाइड नदीला जाऊन भिडले होते ; जणू एक भले मोठे पिंपळाचे पानच कोठूनतरी तुटून ह्या विस्तीर्ण प्रदेशात पडले आहे! पण ते पाहूनही माझ्या आत्मचिंतनाचा भंग होईना की ऊर्ध्वगतीत खंड पडेना.

'आत्मैवात्मनो बंधु:' ही वाणी मला आजच्या इतकी पूर्वी कधीच कळली नव्हती; आपल्या खोल कपाटात अनुभव आणि अनुताप, ज्ञान आणि दर्शन बोध आणि प्रेरणा, इ. एक का दोन अनेक तऱ्हेचे दैवी भांडार भरले असता आम्ही एकमेकांपुढे आपले दैन्य आणि दारिद्र्य किती तरी दाखवितो. भोवतालच्या वनस्पती-पायाखालचे गवतही नाही का आपल्या बळावर वाढत! मग आम्हीच का अशी स्वत:ची हेळसांड आणि पुष्कळदा असा दुरुपयोगही करतो? मदत मागावयाची ती दुसऱ्याला का? ज्ञान धुंडावयाचे ते बाहेर का? पुस्तकाचे प्रामाण्य, माणसाचे माहात्म्य, मातीधोंड्याची आवश्यकता, वगैरे वगैरे कोण हे समजुतीचे व आग्रहाचे प्रकार आणि अशा हट्टाने किती डोईफोड! हा जो आमचा असा छळ होतो तो कोणी कोपलेला देव करीत नाही किंवा देवाचा कोणी प्रतिस्पर्धी सैतानही करीत नाही. तर आम्हीच आमच्या स्वत:चे न ऐकता असे आत्मशत्रू बनतो. लाज आणि संतोष, शिक्षा आणि शिफारस, बंधन आणि मोक्ष ह्या सर्व बाबतीत आमचे आम्हीच कारण आणि याला साक्षही स्वत:चीच, अशा ह्या आत्मसंभाषणात मी गुंतलो होतो. मजबरोबर जणू कोणी तरी पोक्त माणूस चालले आहे. आणि मी जर इकडे तिकडे पाहिण अगर मध्येच थांबेन तर ह्या माणसांचा जणू मोठा उपमर्द होईल अशा काही भावनेमुळे मी आजूबाजूस वाजवीपेक्षा फारसे लक्ष न पोहोचविता सारखा सरळ चढत होतो. अखेरीस अशा नादातच बेनलोमंडच्या माथ्यावरील सर्वात उंच टोकावर मी आलो.

येथे दोन तरुण विद्यार्थी भेटले. आश्चर्याचा पहिला झटका निघाल्यावर व अशा परक्या स्थळी अशा तीन परक्यांचे जे साहजिक स्वागत व संभाषण व्हावयाचे ते झाल्यावर ते दोघेही डोंगर

उतरुण दरीत दिसेनासे झाले. मी मागे माझ्याच समागमात राहिलो. बेन नेव्हीसचे शिखर खेरीज करून, सर्व ग्रेटब्रिटन देशातील अत्यंत उंच स्थानी एका शिळेवर मी आपले आसन मांडले. क्षुद्र पण क्षम्य गर्वाची थोडी झुळूक वाहिल्यावर, लगेच आतबाहेर निवांत झाले.

बारा वाजले होते, वारा वाहत नव्हता, थंडी वाजत नव्हती, उष्मा वाटत नव्हता, बाजूस शे-दोनशे कदम कोरडी आणि सपाट जमीन होती. शेवटी एकदम कडे तुटले होते. वर पसरलेले आकशाचे अवीट घुमट खाली भोवतालच्या विस्तीर्ण क्षितिजवलयावर टेकले होते. त्यावर मध्यंतरी ढगाचा कोठेही डाग लागला नव्हता. दिनमणी मधोमध तळपत होता. त्या प्रकाशात चाळीस मैलवरचा ग्लासगो शहरातला धूर आणि धुरळा दिसत होता. (समुद्रसपाटीपासून हे स्थान ३१९२ फूट उंच आहे.) पर्वत, नद्या, सरोवरे, बेटे, माळराने वगैरे आसमंतातील सुमारे १०० मैलपर्यंतची कारागिरी चर्मचक्षूपुढे दिसू लागली. अनंत स्थळ आणि अनंत काल हे दोन भिन्नजातीय गोल परस्परांच्या पोकळीत तरंगत आहेत, असा देखावा चित्तचक्षूला दिसू लागला. खाली लोमंड सरोवरावरून एकादी आगबोट केव्हातरी दुरून तरंगत जात असताना लहानशा हंसीसारखी दिसे. पुढे पसरलेल्या एवढ्या अफाट चित्रपटात त्या हंसीशिवाय चैतन्याची इतर खून म्हणून दिसेना! तसेच चित्तचक्षुपुढे पसरलेल्या स्मृतिपटात केव्हातरी एकादे व्यक्तिचरित्रातील पापपुण्य अगर मानवी इतिहासातले सुखदु:ख ह्याची नुसती ओझरती आठवण होऊन जाई, ह्यापेक्षा जास्त येथेही हालचाल घडेना, हळूहळू हे दोन्ही बाहेरचे व्यापार बंद पडू लागले. आत काय व्यापार चालला होता ते कोण लिहू शकेल! काही काळाने सर्वच सामसूम झाले!!

दोन वाजता ही समाधी आटोपली. नंतर मी वनातून परत जनाकडे हळूहळू उतरू लागलो. मोठ्यांची एक दोन वाक्ये आठवली आहेत ती येथे देतो :

> I had heard of Thee by hearsay;
> But now my eye seeth Thee,
>
> *Book of job XLII Old Test.*

> **कां जे ध्यौलोंक आणि पाताळ। अथवा पृथ्वी आणि अंतराळ। अथवा दशदिशा समाकुळ। दिशाचक्र।।१५।। हे आघवेची तुवां एके। भरले देखत आहे कौतुके। परी गगनाही संकट भयानके। आल्पविजे जेवी।।१६।। नातरी अद्‌भूत रसाचीया कल्लोळी। जाहाली चवदाही भुवनासी कडियाळी। तैसे आश्चर्यचि मग मी आकळी। काय एक।।१७।। नावरे व्याप्ती हे असाधारण। न साहवे रूपाचे उग्रपण। सुख दुरी गेले तरी प्राण। विपाये धरी जग।।१८।।**
>
> ज्ञानेश्वरी गीता अ. ११ श्लोक २०.

वरील पत्रात मी माझ्या निरनिराळ्या खासगी अनुभवास 'प्रार्थना' 'भेट' 'समाधी' अशी मोठी नावे दिली आहेत. त्यावरून वाचकास ही आत्मप्रौढी आहे असे वाटेल आणि केलेले वर्णन

अतिशयोक्तीचे आहे असा आरोप येईल. पण खरा प्रकार तसा नाही. वरील प्रसंगी कोणाही यःकश्चित् मनुष्याची वरील अवस्था होणे साहजिक आहे. फार तर काय, खालील प्राण्यातही जेथे जेथे चैतन्याचा अधिक विकास झालेला असतो तेथे तेथे वरील सौंदर्यदर्शनाचे प्रसंगी वरील समाधीचा म्हणजे चैतन्याच्या एकीकरणाचा प्रकार सहज घडतो. मेघास पाहून मोर नाचून नाचून तटस्थ होतो. वसंतगामी कोकिळा गाऊन गाऊन स्तब्ध बसते. "सर्प भुलोनी गुंतला नादा। गारुडिये फांदा घातलासे।" हे तुकाराम सांगतात. असो जर सर्वत्र सृष्टिनियम आहे तर त्याला माझेच मन का अपवाद असेल!

आता, वरील अनुभव सर्वसाधारण मानाने सर्वच माणसास होण्यासारखा असून, किंबहुना होत असूनही जर काहीजण तिकडे तादृश लक्ष पुरवीत नसतील अगर लक्ष पुरवूनही त्या त्या अनुभवांचा तादृश्य अर्थ करीत नसतील तर ती त्यांची खुशी. पण ह्या बाहेरच्या खुशीच्या भिन्नत्वामुळे आतील स्वाभाविक अनुभवास बाध येत नाही किंवा भिन्नत्वही येत नाही. अनुभव तो प्रकृतीच्या आणि प्रसंगाच्या मानाने सर्वत्र सारखाच यावयाचा. त्या अनुभवाचा झटका केव्हा केव्हा इतका जबर बसतो की, काव्य, कादंबरी, साहित्य ही सर्व बापुडी त्याच्या यथार्थ वर्णनाचे कामी केवळ पंगू ठरतात मग अतिशयोक्तीची गोष्ट कशाला!

●●●

१७

बंगलूरच्या रस्त्यातील एक फेरी

ता. २७ रोजी सकाळी ७ वाजता कॉफी आटपल्यावर ब्राह्मबंधु-स्वामी मजकडे आले व आम्ही दोघे मिळून शहर पाहण्यास निघालो. युरोपीय शहरांचा देखावा स्मृतिपटलावर अद्यापि ताजा असल्यामुळे त्याच्या तुलनेने आजच्या देखाव्याचे मला विशेषच कौतुक वाटू लागले. हिंदुस्थान म्हणजे रशिया खेरीज करून बाकीच्या युरोपाप्रमाणे एक खंडच आहे. असे म्हणतात ते पुष्कळ दृष्टीने खरे आहे. उत्तर युरोपातून आल्प्स् चढून खाली दक्षिणेस इटालीत उतरल्यावर पाहणारास जी देखाव्याची पालट दिसते तीहूनही जास्त मला येथे दिसू लागली. दक्षिण युरोपात जुन्या ग्रीक व लॅटिन सुधारणांच्या सांगाड्यावरून आधुनिक सुधारणेचे मांस भरलेले तर काही ठिकाणी नुसता रंग चढलेला पाहून इतिहासभक्तास जो विस्मय वाटण्यासारखा आहे त्याहून अधिक दक्षिण हिंदुस्थानात वाटतो-निदान मला तरी वाटला. आज सकाळच्या फेरीत रस्त्याने मला जागोजाग एक ना दोन, चार सुधारणा आढळल्या -- द्रविडी, आर्य, मुसलमानी, इंग्रजी. मोठी मौज ही की, काही ठिकाणी चारींची बेमालूम भेसळ होऊन गेली आहे तर काही ठिकाणी एकीवर दुसरीची, दुसरीवर तिसरीची अशी पुटे वसलेली आहेत. रस्त्यात जणाऱ्या येणाऱ्याकडे नुसते घटकाभर निरखून पाहिले तरी बस्स, मानवजातिशास्त्राचे एक दोन धडे सहज समजतात. काळा वर्ण तर सांगावयास नकोच. पण बसके नाक, पसरट तोंड, लोंबते ओठ, एकंदरीत बावळी व राकट मुद्रा ही खालील वर्गाची साधारण चेहेरेपट्टी पुष्कळ ठिकाणी उच्च वर्णासही लागू पडते. जातिभेदाचे ठराविक नियम अद्यापि जरी महाराष्ट्रातल्याहीपेक्षा अधिक कडकपणे इकडे पाळले जात आहेत तरी, आर्य आणि अनार्य ह्या नैसर्गिक वर्णांचा संकर कधीच होऊन गेला आहे हे उघड दिसते. हल्लीच्या अय्यर, अयंगार, राव कोमटी, मुदलीयार, नायडू बक्कलग्यार, कुरूबर, पारियार इत्यादी जाती, हिंदुस्थानच्या तर भागातल्या जाती आणि वेदातल्या चार जाती ह्यांचा कसा काय मेळ बसवावा ह्यासंबंधी घोटाळा रस्त्याने जाता जाता मनात माजत असे. ह्या घोटाळ्यात मन आहे तोच एकादी पारिया (महार) बाई (तिने स्वत: अगर तिच्या बापाने ख्रिस्तीधर्माचा स्वीकार केला असल्यामुळे) मॅडमसाहेबांसारखा पोशाख करून एकाद्या दुकानात शिरताना दिसे आणि मुख्य शेटजी तिला खडी ताजीम देऊन आपल्या सर्व जिनसा दाखविण्यास पुढे पुढे करीत. इकडे तिचा जातिबंधूच पण 'स्वधर्मे निधनं श्रेय:' म्हणून परधर्माला भिणारा एखादा पारिया गटारावरच उभा असलेला दिसे. असो.

ह्याप्रमाणे ..... स्वामीशी इंग्रजीत बोलत, स्वामींचे शब्द मात्र इंग्रजी पण उच्चार अस्सल तामिळी व कित्येक ठिकाणी वाक्यरचनाही तीच! इकडे वरचेवर लक्ष जाई पण गेल्यासारखे

सुबोध पत्रिका, ता. २७-१२-१९०३

दाखवीत रस्त्याने चाललो असता ह्या द्राविडी शहराची अस्ताव्यस्त शोभा नजरेत भरू लागली. भक्कम वर्तुळाकारमध्ये झिजलेल्या खांबांच्या रांगा, गुळगुळीत चुनेगच्चीच्या थंडगार ओट्या, स्वच्छ धुतलेली दगडी आंगणी, त्यांवर घातलेल्या रांगोळ्या, मधूनमधून लहान लहान शेणाच्या गोळ्यात रोवून ठेविलेली भोपळ्याची फुले, (मला वाटते लक्ष्मीची आवडती जी कमळे त्यांच्या ऐवजी ही असावीत) किंचित् आखूड पण भक्कम लाकडी दरवाजे आणि अुंबरठे आणि त्यावर ओढलेले हळदी कुंकवाचे पट्टे वगैरे पाहून खरोखर अल्हाद होत असे. आणि स्वच्छता व नीटनेटकेपणा ह्या गुणाने पाश्चात्यांनी आमच्यापुढे विशेष घमेंड मारू नये असे वाटू लागते तोच, ह्या स्वच्छ घरापुढच्या गलिच्छ गटारात केवळ सार्वजनिक हलगर्जीपणाची हेंदर साचली होती आणि कित्येक ठिकाणी तर स्वतः गटारांचाच हमरस्त्यात लोप होऊन गेला होता ते पाहून वरील तुलनात्मक बाबीत पुनः विचार करणे भाग पडे. नागरिक नीटनेटकेपणा राखण्याची जबाबदारी सर्व नगरावर आहे, आणि ती सक्तीने पाळण्याचे काम नागरिक अधिकाऱ्यांचे आहे हे काही नुसते सरकाराबरोबर भांडून आम्हाला कळण्यासारखे नाही. आमच्या रस्त्यांत सुंदर इमारती नाहीत असे नाही. चालता चालता एका चौकात आल्याबरोबर आडगल्लीतल्या लाल मसजीद नावाच्या एका सुंदर मुसलमानी उपासनामंदिराकडे माझी नजर गेली. मंदिराची मसालेवाईक बांधणी आणि रसिक सुबकता मनात एकदम भरल्यामुळे ते नीट पाहिल्याशिवाय पुढे पाऊल पडेना. ते सर्व पाहून बाहेर पडल्यावर बाजुचा दरिद्री व घाणेरडा देखावा पाहून चमत्कारिक हिरमोड झाला. एका बाजूस बुरुडांनी आपल्या उंच बेळूंची भलीमोठी जुडगी आणि तट्ट्यांची भेंडोळी मशिदीला लागूनच ठेविली होती. ती मशिदीहून उंच दिसत होती आणि जवळ त्यांच्या तक्रारी, व्यापाराचा गलबला चालला होता. मशिदीच्या दारातच मिठाईवाल्याची भजी तळण्याची एक जंगी कढई कढत होती. आणि हा खाण्याचा माल, विकणाऱ्याची मूर्ती व तिचा पेहराव ही दोन्ही कढईपेक्षाही काळी कुळकुळीत दिसत होती. दुसऱ्या बाजूस कोळसेविक्यांची दुकाने लागली होती. ह्या प्रकारे ह्या मशिदीच्या सौंदर्याची व सात्विकतेची चोहोंकडून हलाखी चाललेली पाहून सादृश्यामुळे चटकन माझ्या मनात निराळेच विचार आले. जो आमच्या रस्त्यात हा प्रकार नित्य चालला आहे. त्याहून ओंगळ प्रकार आमच्या धर्मात नाही का चालला? धर्मात किती शुद्ध, सात्विक व सुंदर तत्त्वे आहेत, धर्माच्या इतिहासात किती थोर प्रयत्न झालेले आहेत आणि त्या साऱ्यांवर आता भलत्याच गोष्टींचे किती कठीण वेष्टण पडले आहे आणि कोण गवगवा माजला आहे! लाल मशिदीची काळजी काजीसाहेबास असावयाला पाहिजे खरी. तथापि त्यांनी आपले काम केले नाही अगर त्यास करता आले नाही म्हणून एकादा म्युनिसिपालिटीचा कामगार येऊन केवळ रस्त्यातील शोभेची नाहक हानी होते ती न व्हावी ह्या हेतूने, मशिदीच्या दारातल्या भल्या मिठाईवाल्यास आपले दुकान तेथून उठविण्यास ताकीद देऊ लागला तर त्यास काजीसाहेब खात्रीने अनुकूल होतील काय? ते काही असो, काजीसाहेबाचा व दुकानदारांचा अंतस्थ संबंध काही असो किंवा त्या मशिदीचे काही होवो, सध्या धर्मात जी बाजारी लोकांनी चोहीकडे धुमाकूळ उडवून दिली आहे ती निवारण करणारा कोणीतरी चांगला खवीस आला पाहिजे खास. जेरुसलेमच्या देवळात नित्य जमून गिल्ला

१८

मंगळूर येथील काही विशेष गोष्टी

मंगळूर शहर

प्राचीन अथेन्स शहर सात टेकड्यांवर वसले होते असे इतिहासकार सांगतात. एडिंबरो हेही टेकड्यांवर वसलेले आहे म्हणून स्कॉच लोक त्यास अर्वाचीन अथेन्स असे अभिमानाने म्हणतात. पण मंगळूर शहर सातांहून अधिक टेकड्यांवर वसलेले असून वरील दोन्ही अथेन्सलाही स्वाभाविक सौंदर्याने खात्रीने लाजवीत आहे. तशात पावसाळा संपून दसरा झाला की, मंगळापुरी (मंगळूर) दरवर्षी जणू उपवरच होते. प्रेक्षकांनी तिला ह्याच वेळी पहावयाला यावे. दंतकथा सांगते की, गोरखनाथाची कोणी मंगळा नावाची दासी होती, तीच आता मंगळापुरी (मंगळा x उरु = शहर = मंगळूरु) ची अधिष्ट देवता झाली आहे. तिचे मोठे जुने देऊळ शहराच्या नैऋत्य कोनाला प्रसिद्ध आहे. आता देवी होऊन सर्वांना पूज्य होऊन बसलेली मंगळा ती पूर्वी गोरखनाथाची बटीक होती हे काय गौडबंगाल! पण समजूतदार माणसेही आपल्या जिभेची जबाबदारी न ओळखता स्वेच्छेप्रमाणे काहीतरी सांगत सुटतात, मग ती जी बोलून चालून दंतकथा तिच्या जिभेला हाड कोठून असणार? कसेही असो. मंगळादेवीचे नवरात्र आम्ही येथे पोचल्यादिवशीच संपून दसरा चालला होता. पण मंगळूरचे नवरात्र सर्व हिंवाळाभर चालणार आहे. चहूंकडे हिरवेगार गवत म्हणजे अगदी मी म्हणत आहे. बहुतेक मुख्य रस्ते टेकड्यांच्या बगलांतून बोगदेवजा खणून काढलेले असल्यामुळे त्यांच्या दोहो बाजूंस ७-८ फूट उंच ज्या भिंती आहेत त्यांवरही दोन-दोन हात लांब गवताच्या झिपऱ्या लागलेल्या व त्यांवर बारीक शुभ्र फुले लटकलेली दिसतात. शहर म्हणजे एक निबिड अरण्यच जसे. छपरावरील एकही कउल असे मिळणार नाही की ज्याला अर्धा तास सारखे सुर्यदर्शन मिळते, मग बाहेर कडक उन्हाळा का असेना! दोन घरे ओलांडली नाही तोच एक खाचर लागते व त्यात मस्तावलेला भात झुलत असलेला दिसतो. हिंदू मुसलमान, ख्रिस्ती हे तीन धर्म, तुलव, मलिआळी, कानडी व कोकणी-शिवाय मोडक्या तोडक्या इंग्रजीचे शिंतोडे रस्तोरस्ती उडतात ते वेगळेच- अशा या 'साडेचार भाषा'. ह्यातून येथील सुमारे ४० हजार लोकसंख्या बहुतेक सारखीच विभागलेली आहे. असल्या ह्या विचित्र पुरीत ऐक्य पाहू जाणारा 'तो एक मूर्खच.' 'सारस्वत' आणि 'कोकणी' हे अगदी जवळचे जातभाई. पण त्यांच्यात आगोदरच प्रेमाचा उल्हास होता त्यात. तेथे जन्मास आलेल्या संयुक्त परिषदेने फाल्गुनमासाची भर घातली आहे. जे सख्य सारस्वतात व कोकण्यात तेच येथील शेकडो वर्षांपूर्वी कॅथोलिक झालेल्यात व नुकताच बाझल मिशनने बाप्तिस्मा दिलेल्या ख्रिस्त्यांत.

सुबोध पत्रिका, ता. १२-१०-१९११

निराश्रित साह्यकारी मंडळी

दुसरा संगिया साह्यकारी याची वाट मागे फिरून न पाहता अस्पृश्य वर्गाच्या उद्धारार्थ काम आज जवळजवळ १३ वर्षे येथील ब्राह्मसमाजाचे सेक्रेटरी रा. के. रंगराव हे निश्चयाने करीत आहेत. हल्ली तर त्यांनी आपला २५/३० वर्षांचा वकिलीचा धंदा गेल्या ऑगस्टात आवरून संपूर्णपणे अंत्यंजांचीच सेवा स्वीकारली आहे. ते आपल्या कुटुंबासह आता ब्राह्ममंदिरासमोरील प्रचाराश्रमात येऊन राहिले आहेत, व नावाशिवाय अनभिषिक्त प्रचारकच बनले आहेत. स्वीकारलेल्या कामात वेळीवेळी त्यांची मित्रमंडळी त्यांचे दोष काढीत आहेत, त्यांना सरसकट एकच उत्तर म्हणून आपल्या टेबलाजवळील भिंतीवर 'Fault finders will find fault even in Paradise'. हे वाक्य भव्य अक्षरांनी एका तांबड्या फळीवर कोरून ठेविलेले आहे. त्यांच्या शाळेतील हजेरीपटावर ७३ पारियांच्या मुलांची नावे आहेत. रोजची सरासरी सुमारे ६० आहे. एक मुलगा शिकून शिक्षक बनला आहे. मुले २/३ मैलांवरून शिकावयास येतात, म्हणून त्यास दोनप्रहरचे एक जेवण शाळेत द्यावे लागेते. ६ हातमागांपैकी तीन चांगले चालले आहेत. पण कापडाला मागणी चांगली नाही. कारण गिरणीतील हलक्या स्वस्त दराच्या व वरून सारखेच दिसणाऱ्या नगापुढे हातमागाच्या भरीव पण महाग कापडाचा टिकाव लागत नाही. पण एरंडी रेशमाच्या किड्यांची लागवड करण्यात रा. रंगरावांनी बरेच श्रेय व प्रसिद्धी संपादन केली आहे. कोईमतूर येथील शेतकीच्या कॉलेजातून ह्या किड्यांसाठी त्यांच्याकडे पुष्कळ मागणी येत आहे. हे रेशीम तयार करण्याचे कामी उच्च शिक्षण मिळविण्याकरिता मि. मेलोथ नावाच्या एका अनुभवी गृहस्थास रा. रंगरावांनी मिशनच्या मार्फतीने बंगाल्यातील पुसा येथील कॉलेजात पाठविले आहे. मंगळूरच्या कलेक्टरसाहेबांनी ह्या कामगिरीचे महत्त्व जाणून सरकारातून ५०० रु. देणगी देवविली आहे. रा. मेलोथ हे लौकरच परत येतील व पश्चिम किनाऱ्यावर जागजागी मिशनची ठाणी उघडण्यात आपल्यास मदत करतील अशी रा. रंगरावांना मोठी उमेद आहे. रा. रंगरावांचे सर्वांत नावाजण्यासारखे व मदतीस अवश्य पात्र असे काम म्हणजे मंगळूरहून एका मैलावरील एका सुपीक टेकडीवर त्यांनी घातलेली पारियांची वसाहत होय. तेथे हल्ली १७ कुटुंबांची कशी तरी सोय झाली आहे. पैकी चौघांस मात्र पक्क्या इमारती मिळाल्या आहेत. बाकी तत्पुरत्या झोपड्यात आहेत. सरकारने इमारती लाकूड फुकट दिले असल्याने व मजुरी ज्याची त्यानेच पुरवावयाची असल्याने ३६ रुपयांत एका कुटुंबासाठी एक पक्के घर मिळेल अशी रंगरावांनी सोय केली आहे. ५० रु. दिल्यास दोन कुटुंबांची कायमची सोय होईल असे घर तयार होते. एकंदर साठ कुळे राहतील एवढी जागा आहे. इकडे श्रीमंत उदार गृहस्थांचे लक्ष जाईल काय? एक मोटारगाडी म्हणजे २०० पारियांच्या झोपड्या हे रंगरावांचे कोष्टक मुंबईचा एकादा भाटिया शिकेल तर गरिबांचे कोटकल्याण होणार आहे! ह्या वसाहतीत दोन विहिरी काढल्या आहेत. दोन्हींसही गोडे पाणी लागले आहे. पैकी एकीचा खर्च सुमारे ५०० रु. अंदमान बेटातील कैद्याकडून मि. सदाशिव पिले नावाच्या एका सद्गृहस्थाने जमवून दिला आहे; म्हणून तिचे नाव अंदमान विहीर असे पडले आहे. एकूण अंदमानातील कैद्यांना हिंदुस्थानातील पारियांचा उद्धार करण्याचे सामर्थ्य आहे काय?

●●●

१९

बंगालची सफर

ब्राह्मधर्माची परिषद १८८९ साली प्रथम मुंबईस भरल्यापासून एक दोन वर्षे खेरीज करून जरी सालोसाल दर काँग्रेसच्या वेळी भरत आली आहे, तरी तिजसंबंधी माहिती पुष्कळांना झालेली नव्हती. केवळ काँग्रेसकरिता आलेलेच लोक काय ते जमत व त्यांच्याही आठवणीत ती फार दिवस टिकत नसे. पण मुंबईस भरलेल्या १९०४ च्या परिषदेपासून हिची प्रसिद्धी होऊ लागली. ती काशी येथील परवाच्या परिषदेमुळे तर बरीच झाली. ह्या परिषदेत बंगाल्यातील दोन्ही पक्षांची परस्पर बरीच सहानुभूती वाढली व शिवाय निरनिराळ्या प्रांतांतील ब्राह्मांचा बराच स्नेह झाला. अशा हितकारक परिषदेची खबर अधिक पसरावी. मुंबईकडील कामाची हकीकत इकडच्या दूरदूरच्या समाजास कळवावी, (कारण प्रार्थनासमाज व आर्यसमाज यांतीलही भेद न जाणणारे काही ब्राह्म इकडे भेटले) काही प्रमुख सभासदांची प्रत्यक्ष ओळख करून घ्यावी, मुख्य मुख्य समाज समक्ष पहावे, शिवाय सर्व समाजाची एक डिरेक्टरी करावयाची आहे, त्याअर्थी काही माहिती स्वत: मिळवावी वगैरे हेतूने मी बंगाल व आसाम प्रांतात फिरतीवर निघालो. ता. २ जानेवारी रात्री ११ वाजता मी .....

बांकीपूर

बिहार प्रांतातील मुख्य शहर बांकीपूर येथे आलो. बांकीपूर, पाटणा व दिनापूर ही मोठमोठी शहरे एकमेकांला अगदी लागूनच भागीरथीच्या काठी आहेत. हा देश जरी बहारी (हिंदुस्थानी) लोकांचा, तरी येथे बंगाली लोकांची बरीच वस्ती आहे, व सरकारी नोकऱ्या पटकावण्याच्या व विद्याव्यासंगाच्याबाबतीत ह्यांचा पुष्कळच पुढाकार आहे. अर्थात एतद्देशीय बहाऱ्यास हे आवडत नाही, हे बंगाली जाणून आहेत. वायव्येकडील प्रांतात ज्याप्रमाणे एकही ब्राह्म एतद्देशीय सापडेणे कठीण, त्याप्रमाणे सबंध बहार प्रांतातही बहारी ब्राह्मांची संख्या एकाच हाताच्या बोटावर मोजता येण्यासारखी आहे. पण ही उणीव केवळ ब्राह्मसमाजीचीच आहे असे नव्हे. स्त्रीशिक्षणासारख्या सर्वमान्य सामाजिक सुधारणेतही इकडे महागाई फार आहे. बांकीपूर येथे एक मुलींचे खासगी हायस्कूल आहे; ते मूळ बंगाल्यांनीच काढले. हल्ली एकंदर सुमारे १०० मुलींपैकी बहारी मुली ४ च आहेत. बाकीच्या बंगाली मुलींपैकी २४ ब्राह्मांच्या आहेत. सर्व स्त्री व पुरुषशिक्षक ब्राह्मच आहेत. ह्या शाळेची व्यवस्था बहुतेक येथील प्रमुख ब्राह्मांच्याच हाती आहे. ह्याचे श्रेय येथील वृद्ध पेन्शनर आचार्य बाबू प्रकाशचंद्र राय व विशेषेकरून त्यांची परलोकवासी पत्नी अघोरकामिनी ह्यांजकडे आहे. मध्ये एकदा ही शाळा मोडकळीस आली असता अघोरकामिनीने सर्व व्यवस्था आपल्याकडे घेतली व शाळा हायस्कूलच्या दर्जास

सुबोध पत्रिका, ता. २८-१-१९०६

आणून सोडिली. ब्राह्मसमाजाच्या दृष्टीने पाहता कलकत्त्याच्या खाली डाक्का व त्याचे खाली बांकीपूरचाच नंबर लागतो. येथे जरी दोन पक्षांचे हल्ली दोन समाज आहेत तरी परस्पर बरीच सहानुभूती आहे व ती वाढत्या कलेवर आहे. तथापि अगदीच भेद मिटून पूर्ण ऐक्य होण्याची नुसती आशादेखील तूर्त दिसत नाही. मात्र दोन्ही पक्षांकडून प्रामाणिकपणे यत्न होत आहे.

बांकीपूर ब्राह्मसमाज

हा नवविधान पक्षाचा आहे. हा सन १८६६ मे, ता. २४ दिवशी स्थापण्यात आला. ह्यापूर्वी एकदा केशवचंद्र ह्यांनी येथे येऊन एका व्याख्यानाने सर्व प्रदेश दणाणून सोडला असे सांगातात. हल्ली ह्या समाजातील उपासकांची संख्या स्त्रीपुरुष व मोठी मुले मिळून सुमारे ५० आहे. शिवाय हितचिंतक. हल्ली जुने मंदिर पाडून नवीन बांधण्याचे काम चालू आहे. अघोरकामिनीच्या परिश्रमाने स्थापन झालेल्या दोन संस्था हल्ली तिच्या नावाने चालू आहेत. अघोर नारी समिती नावाची सभा स्त्रियांच्या उन्नतीसाठी व इतर परोपकाराची कामे करीत आहे. अघोरपरिवार नावाचे सुमारे १०-१२ लहान मुलींचे बोर्डींग बाबू गौरीप्रसाद मुजुमदार व त्यांची पत्नी ह्यांचे व्यवस्थेखाली आहे. शिवाय कॉलेजच्या विद्यार्थ्यांकरिता एक बोर्डिंग आहे. त्यात हल्ली ११ विद्यार्थी राहत आहेत. हे जरी ब्राह्म नाहीत तरी त्यांस ब्राह्मधर्माचेच वळण लागत आहे.

बांकीपूर बाह्म कॉंग्रिगेशन

हे साधारण समाजपक्षाचे आहे. सन १८९६ चे सुमारास कलकत्त्याच्या साधनाश्रमातून भाई प्रकाशदेव, सुंदरसिंग, गुरुदास चक्रवर्ती, सतीशचंद्र चक्रवर्ती एम. ए. व श्रीरंग बिहारीलाल एम. ए. असे पाचजण केवळ ईश्वरावर भरंवसा ठेवून धर्मप्रचारार्थ निघाले ते वाटेत बहारप्रांती आरा येथे उतरले व तेथे त्यांनी एक साधनाश्रम स्थापिला. सन १८९६, ऑगस्ट महिन्यात तो आश्रम आरा येथून बांकीपूर येथे नेण्यात आला. तेव्हापासून ह्या समाजची सुरुवात झाली. सुंदरसिंग परलोकी गेले, भाई प्रकाशदेव ह्यांनी लाहोरास ठाणे दिले व मागे राहिलेल्या तिघांनी जिवापाड श्रम करुन नावाजण्यासारखी कमे उभारली आहेत. ह्यांचे स्वतःचे अद्यापि मंदिर नाही. प्रचारक गुरुदास चक्रवर्ती ह्यांचे घरीच समाज दर रविवारी सायंकाळी भरतो. हल्ली ब्राह्मउपासकांची संख्या स्त्रिया, पुरुष व मुले मिळून एकंदर ६० आहे.

राममोहन राय सेमिनरी ही १८९७ जानेवारी ता. १ रोजी स्थापिली. ह्या शहरी हे एक पहिल्या नंबरचे हायस्कूल झाले आहे. लोक व सरकारी अधिकारी ह्या दोघांच्याही आदरास ते पात्र झाले आहे. शाळेस एक भक्कम व पुरेशी इमारत स्वतःच्या मालकीची आहे व तिच्याभोवती विस्तीर्ण पटांगण व कंपौंड आहे. मुलांची संख्या १०९ आहे. शाळेतच ब्राह्ममुलांकरिता एक बोर्डिंग आहे. प्लेगमुळे बोर्डिंगात मुलांची संख्या फार कमी झाली आहे. हल्ली ६ मुले आहेत, पैकी २ च ब्राह्म आहेत. पण बाकीच्या चौघांस पूर्ण रीतीने ब्राह्म वळण लावण्याचे अटीवरच घेण्यात आले आहे. ह्या शाळेची इमारत विकत घेण्याचे बाबतीत बरेच कर्ज झाले होते. ते शेठ दामोदरदास गोवर्धनदास

समाजाचे कार्य बरेच वाढले. पुढे हा भक्तीचा वेग जरी सर्व ब्राह्मसमाजात पसरला आणि मोंगीर समाजात एका काळी ४०-५० सभासद होते तरी हल्लीची येथली ओसाड व दीनवाणी स्थिती पाहून अंत:करण गहिवरते व मानवी मनाची अस्थिरता पाहून विस्मयते. मंदिरापुढील पटांगणात केशवचंद्रसेन, साधू अघोरनाथ, दीनानाथ चक्रवर्ती प्रचारक यांच्या तीन समाधी मध्यभागी एका चौथऱ्यावर बांधल्या आहेत. मंदिराकडे पाहून व इतिहास ऐकून मनास जी उदासीनता प्राप्त होते तिच्याच जणू ह्या तीन दृश्य मूर्ती.

पुढे लवकरच कर्ताभजा मंडळीचा कोणी एक पुरुष ह्या गावी आला. इकडे ह्या नावाची एक ईश्वराच्या कर्तृत्वगुणाची उपासक मंडळी आहे. ह्यांचे लक्षण जवळजवळ शाक्तमार्गीयांप्रमाणेच असावेसे वाटते. केवळ मनोविकारालाच वश होऊन समाजात आलेली काही नादलुब्ध मंडळी वरील पुरुषाच्या नादी लागली. सुमारे १८८० साली कृष्ण प्रसन्नसेन नावाच्या समाजातील एका हितचिंतकाने सनातनधर्म मंडळीची नवीनच एक ध्वजा उभारली. ह्या प्रकारे मंडळी कमी होता होता शेवटी मध्ये ऑडिट ऑफिसही पुन: पूर्वस्थळी गेले. १९०२ त ह्या गावी आर्यसमाजाची स्थापना झाली पण तोही नीट चालत नाही. हल्ली मंदिरात फार तर ३-४ जण उपासनेस जमतात. बागची बाबू (द्वारकानाथ बागची) नावाचे एक वृद्ध गृहस्थ मंदिरातच असतात. कुचबिहारच्या महाराजांकडून त्यास दरमहा ४ रु. मिळतात. आपल्या पित्याच्या समाधीपुढे दिवा लावण्याकरिता म्हणून महाराणी दरमहा ३ रु. देते.

येथील कॉलेजातील एक तरुण बाबू सुरेशचंद्र राय हे सभासद आहेत व दुसरे एक बोर्डिंग सुपरिंटेंडेंट हितचिंतक आहेत. त्यांच्याशी व इतर काही मंडळीशी दोनप्रहरी संभाषण झाले व येथील तरुण विद्यार्थ्यांकरिता काही धार्मिक संस्था काढावी असे ठरले. यानंतर

भागलपूर

येथे ता. ७ रोजी आदित्यवारी ७।। वाजता पोहोचलो. एकांतस्थळी एक लहानसे पण सुंदर मंदिर आहे. उपासना संपत आली होती. स्त्रिया-पुरुष मिळून उपासक १०-१२ होते. दुसरे दिवशी सकाळी आचार्य हरीसुंदर बोस ह्यांचे घरी केशवचंद्रसेन ह्यांच्या पुण्यातिथीसंबंधी उपासना त्यांनीच चालविली. येथील प्रमुख लोकांचा विशेष कल जरी नवविधान पक्षाकडे आहे तथापि मंत्री बाबू निवारणचंद्र मुकरजी हे फार समजूतदार व वजनदार असल्याने समाजाचे एकंदर धोरण अगदी तिऱ्हाईतपणाचे आहे. आनुष्ठानिक ब्राह्म उपासकांची एकंदर संख्या सुमारे ६० व इतर ५ आहे.

हा समाज ता. २२ माहे फेब्रुवारी सन १८६४ रोजी, विशेषेकरून बाबू ब्रजकृष्ण बसू व नवकुमार राय ह्यांच्या प्रयत्नाने व प. वा. प्रतापचंद्र मुझुमदार ह्यांच्या सल्ल्याने स्थापित झाला. राजा शिवचंद्र बानर्जी नावाच्या एका अत्यंत आस्थेवाईक हितचिंतकाने स्वत: सर्व खर्च सोसून मंदिर बांधविले ते केशवचंद्र ह्यांचे हस्ते ता. २२ फेब्रुवारी १८८० रोजी उघडण्यात आले. ह्याचे पूर्वी सन १८७८ साली ह्या जागेला लागूनच एक भली मोठी जागा विकत घेऊन त्यात ५ ब्राह्म कुटुंबांनी आपली राहण्याची मोठमोठी घरे बांधली.

स्थापन झाला. त्यावेळी १० सभासद होते. १८९९ साली हल्लीची इमारत बांधण्यास सुरुवात झाली. ८०० रु. चे काम झाले. आणखी १००-२०० रुपायांत काम पुरे होण्यासारखे आहे. पण इतक्यात येथील रेल्वे ऑफिस एकदम कलकत्ता येथे गेल्यामुळे येथे एकही ब्राह्म उरला नाही. इमारत तशीच पडली आहे. येथपर्यंत हकीकत ऐकत असताना ह्या इमारतीप्रमाणेच बुद्धिबळाचा डावही अगदी बहरात आलेला तसाच तहकूब पडला होता. मी मंडळीस म्हटले, दिवसभर काम करून तुम्हांला रात्री करमणूक अवश्य आहे पण करमणूक होऊन शिवाय आत्म्याला थोडीबहुत उन्नती व शांती मिळाल्यास कसे? आणि ह्यासाठी तुम्हांला ही इमारत पूर्ण करून वहिवाटीस मिळाल्यास कसे? मात्र एकच अट की ह्या ठिकाणी जे भजन हाईल ते केवळ एकच ईश्वरास उद्देशून व हिंदू-मुसलमान इ. कोणाही धर्मीयांस चालेल असे झाले पाहिजे. संभाषणाअंती मंडळीस कल्पना पूर्ण पसंत पडली. मंदिर उपयोगास मिळाल्यास बिच्छायतीचा व दिवाबत्तीचा खर्चही सोसण्यास मंडळी तयार झाली. पण मंदिर पूर्ण व्हावे कसे?

येथून १८ मैलांवर पूर्णीया हे जिल्ह्याचे गाव आहे. येथे बाबू हजारीलाल नावाचे आस्थेवाईक ब्राह्म गृहस्थ असतात. कॉन्फरन्समध्ये त्यांची ओळख झाली होती. पूर्णियाकडे आगगाडी रात्री १० वाजता निघाली. तीतून निघून रात्री सुमारे एक वाजाता

पूर्णिया

येथे बाबू मजकुरांचे घरी पोहचलो. आकस्मित आलेले तारकनाथ राय नावाचे आस्थेवाईक ब्राह्म मित्राची गाठ पडली. दोघांस हेतू कळवीला. पुर्वीच्या फंडापैकी २०० रु. अद्यापि शिल्लक आहेत असे कळले. विचार ठरल्यावर झोपी गेलो. पूर्णीया येथे समाज आहे, मंदिर नाही. दोनच आनुष्ठानिक ब्राह्म कुटुंबे आहेत. प्रातःकाळी दुसऱ्या कुटुंबात उपासना झाली दोनप्रहरी आम्ही चौघेजणही पुनः काठीहारी येथे गेलो. सायंकाळी तेथील हायस्कुलात व्याख्यान झाले. येथील मुख्य अधिकारी मुनसफ एक उदार मताचे मुसलमान बॅरिस्टर गृहस्थ आहेत. त्यांनी आपल्याच सहीनिशी सर्व रेल्वेवरच्या नोकर लोकांस आमंत्रणपत्रिका पाठविली व अध्यक्षस्थानही पतकरले. ह्या कामी येथील तरुण हेडमास्तरांनी मोठ्या उत्साहपूर्वक साहाय्य केले. व्याख्यानानंतर बाबू हजारीलाल हे येथील काही मंडळींच्या सल्ल्याने बाकी उरलेल्या शिलकेतून मंदिर पुरे करून हेण्याचे ठरवून नंतर पूर्णीयाकडे निघाले आणि मी रात्री १ वाजता कुचबिहाराची वाट पुनः धरली.

ह्या प्रकारे बहार प्रांतातील काम झाल्यावर मी श्रीगंगेचा निरोप घेऊन तिचा पिता जो पर्वतराज हिमाचल त्याचे चरणांगुलीवर विराजमान झालेली वनश्रीची जणू माहेरकडची जिवलग सखी जी कुचबिहार नगरी तिच्या आत सायंकाळच्या शांत समयी अत्यादरपूर्वक प्रवेश केला.

कुचबिहार

बहार सोडून बंगाल्यात शिरल्यावर भोवतालच्या देखाव्यात हळूहळू पालट होतो. गीतलदाहा जंक्शनवर रेल्वेचा मुख्य रस्ता सोडून कुचबिहार संस्थानच्या लहानशा गाडीचा आश्रय करावा

बांधले आहे. रुंद रस्त्याच्या दोन्ही बाजूंनी ह्या बांबूच्या झोपड्या, दरम्यान बरीचशी मोकळी जागा टाकून हारीने बांधलेल्या दिसतात. प्रथम सुमारे ३ फूट उंचीचा ओटा बांधून त्यावर झोपडी उभारलेली असते. तिची जमीन वेळूची, भिंती वेळूच्या, वरचे छत व छप्पर वेळूचे, आतील सामान वेळूचे आणि बाहेरील भक्कम काँपौंडही वेळूचेच. ह्याची कारणे पुष्कळ आहेत. एक तर लोक गरीब आणि अल्संतुष्ट. दुसरे, देश दलदलीचा, सर्द व अतिपावसाचा. तिसरे, घरे बांधण्यास दगड किंवा चिखल दोन्ही मिळत नाहीत. जमीन राखेच्या रंगाच्या बारीक व मऊ रेतीची, तिच्या विटाही बनत नाहीत. बरे, इतक्यालाही न जुमानता आढ्यतेने जर का एकादे पक्के घर उभारले, तर हिमालयबोवा वरचेवर भूकंपाचे धक्के देऊन जागे करण्यास तयार आहेतच. उलटपक्षी अशा दलदलीच्या जागी अशी वेळूची घरेच राहण्याला सोयीस्कर व आरोग्यकारक आहेत, आणि म्हणूनच, राजाचा सुमारे १३ लक्षांचा सुंदर व भव्य प्रासाद व भोवतालचा विस्तीर्ण बाग पाहून बाहेर राजरस्त्यात प्रेक्षक येतो, तोच दुतर्फा सेग्रिगेशन कँप पाहून त्यांचा आधी बराच हिरमोड होतो, आणि मग, ही साधी रहाणीच बरी, हा वाडा काय तीन दिवसांचा, इ. नाइलाजाचे तत्त्वज्ञान मागून सुचू लागते.

असो, ब्राह्म यात्रेकरूंस कुचबिहारचे महत्त्व कोणते बरे? कुचबिहारचे नाव माहीत नाही असा कोणीतरी ब्राह्म असू शकेल काय? ब्राह्मधर्माचा दिग्विजय करण्याकरिता केशवचंद्राने जी प्रचारक सेनेची अभेद्य फळी उभारली होती, तिची दुफळी केली ती ह्याच कोपऱ्यातल्या कुचबिहारने. कुचबिहारच्या राजपुत्राला केशवने आपली मुलगी दिली ती काय ईश्वरी प्ररणेने किंवा धूर्त व लौकिक दृष्टीने, हे ठरिविण्याची ही वेळ नव्हे व स्थळही नव्हे, पण केशवाचा हेतू काही असो, येथे येणाऱ्या प्रत्येक ब्राह्म नवख्याला एक गोष्ट विशेष निरखून पहावी असे साहजिक वाटते, ती ही, बुद्धधर्माला जसा अशोक, ख्रिस्तीधर्माला जसा कॉन्स्टंटाईन तसा ब्राह्मधर्माला एकादा राजबिंडा पुरस्कर्ता कुचबिहारपुरता तरी झाला आहे की काय? पुढे काय होईल ते सांगवत नाही, पण हल्लीची वस्तुस्थिती थोडक्यात अशी आहे.

कुचबिहारी ब्राह्मसमाज

ब्राह्मधर्माचे कार्य कुचबिहारी येथे कुचबिहार विवाहाच्या पूर्वीपासून चालू आहे. रायबहादूर कालिकादास दत्त हे ब्रिटिश सरकारच्या एका बड्या नोकरीवरून सन १८६९ साली कुचबिहारचे दिवाण होऊन येथे आले. ते अद्यापि तेच काम करीत आहेत. हे गृहस्थ लहानपणापासून ब्राह्म लोकांच्या सहवासात वाढले असल्यामुळे ब्राह्मसमाजासंबंधी व विशेषेकरून महर्षी देवेंद्रनाथ, केशवचंद्र, शिवनाथशास्त्री वगैरे पुढाऱ्यांविषयी ह्यांना फार आदर वाटत आहे. हे गृहस्थ व राय यादवचंद्र चक्रवर्ती बहादूर, त्या काळचे येथील न्यायाधीश, ह्या दोघांच्या निमंत्रणावरून प्रचारक विजयकृष्ण गोस्वामी हे सन १८७४ साली येथे आले व त्यांनी ब्राह्मसमाजाची स्थापना केली. त्यावेळी सुमारे १४ हितचिंतक मंडळी समाजात सामील होती. त्यांनी उपासनेकरिता एक झोळी बांधली, ती दोन वर्षांनी जळल्यावर सुमारे ५ वर्षे उपासना बंद होती. त्यानंतर हल्लीचे जागी मंदिर बांधण्यात आले.

सालीना ५,००० रु. ची नेमणूक आहे. त्यात एक कायमचा मिशनरी, एक गायक ह्यांचा खर्च व इतर खर्चही होत असतो. शिवाय आर्यनारीसमाजाची दरमहा १ सभा होत असते, महाराणी येथे असताना ही सभा दर आठवड्याला त्यांच्या अध्यक्षतेखाली भरत असते. हिच्यात सुमारे १५ सभासद व १० इतर स्त्रिया जमत असतात.

मंदिर

समाजाचे अर्थात एक सुंदरसे मंदिर आहे. खरोखर इतके सुंदर ब्राह्ममंदिर हिंदुस्थानात दुसरीकडे कोठे नसेल, निदान माझ्या तरी पाहण्यात नाही. राजाश्रयाने बांधले गेले आहे म्हणून हे केवळ शृंगारून सुंदर केले आहे असे नव्हे तर ह्याचा एकंदरीत घाटच साधा, सात्विक आणि उपासनालयास साजेल असा आहे. डाक्का, कलकत्ता वगैरे ठिकाणी ह्यापेक्षा मोठमोठाली मंदिरे आहेत, पण ती केवळ व्याख्यान-मंदिरेच. आत्म्याला जागृत करण्यासारखा विशेष काही सात्विक भाव त्यांच्यात नाही. काव्य आणि गायनकला ह्यांच्याद्वारे धर्माचे अंशत: कार्य निदान बंगाल्यात तरी होत आहे, पण शिल्पकला आणि चित्रकला ह्यांचेद्वारे आत्म्याचे किती तरी पोषण होण्यासारखे आहे. ह्याविषयी नीटशी कल्पना कोणातरी ब्राह्माच्या मनात आली असेल की नाही, ह्याविषयी मोठी शंकाच आहे. रविवारी सायंकाळी उपासना झाली, तीही मोठी गंभीर झाली. बराच धूप जळत असल्यामुळे चहूकडे मंदिरभर सात्विक गंध सुटला होता. नियमित वेळी गंभीर घंटानाद झाल्यावर नेमणुकीचे उपासक वेदीवर बसले. ते दुर्गानाथराय, हे केशवच्या प्रिय शिष्यांपैकी एक असून, फार साधे व सात्विक गृहस्थ आहेत. गायन सुस्वर आणि भजन प्रेमळ झाले. भजनाचा रस जेव्हा दाटत असे व मृदंगाचा नाद वरती घुमटात घुमू लागे तेव्हा पडद्यातील अदृश्य स्त्रियांनी आपल्याजवळचे मोठे शंख वाजवून त्यांच्या गंभीर ध्वनीचा मेळ भजनात असा मिळवून द्यावा की, श्रोत्यांची सर्व गात्रे बंद पडून तो केवळ काही वेळ आत्मरूपानेच उरावा!

मी कुचबिहार येथे ता. १९ रोजी गेलो. नदीच्या काठी 'केशव-आश्रम' नावाचा समाजाच्या मालकीचा एक मोठा बगीचा आहे, त्यात एक लहानशी इमारत बांधण्यात येत आहे. ह्या बागेतच राणीसाहेब आपला आर्यनारीसमाज भरवीत आहेत. ह्या बागेसमोरच्या जागेत, समाजाच्या खर्चाने कॉलेजातील ब्राह्म-विद्यार्थ्यांस राहण्याकरिता दोन सुंदर कुटिका करून दिल्या आहेत. त्यांत हल्ली चार विद्यार्थी राहतात, माझी राहण्याची व्यवस्था ह्या छात्रकुटिकेत केली होती. ता. १३ रोजी तिसऱ्या प्रहरी येथील टाऊनहॉलमध्ये धर्म हा जीवनाचा पाया (Religion as the basis of life) यावर माझे इंग्रजीत व्याख्यान झाले. दिवाणसाहेबांनी अध्यक्षस्थान स्वीकारले होते. ता. १४ रोजी केशव-आश्रमात वनभोजन झाले, त्यावेळी दोन्ही समाजाच्या मंडळीने मोठ्या प्रेमाने भोजन केले. नंतर मी मुंबईकडची हकीकत सांगितली, त्याच दिवशी आदित्यवारची सायंकाळी मंदिरात उपासना झाली. उपासनेनंतर लगेच सुमारे २०-२५ तरुणांची सभा जमली, त्यांचेपुढे मुंबईच्या तरुण ब्राह्मगणाचे नियम खुलासेवार वाचण्यात आले. तेथील समाजातील तरुणांची सभा बरेच दिवस बंद पडली होती. तिची पुन: मुंबईच्या सभेच्या नियमाप्रमाणे रचना करून, ह्या सभेस जोडण्याचा विचार ठरला.

जसजसे कमी दिसू लागले तसतसे स्मृतीच्या डोळ्यास अधिकाधिक स्पष्ट दूरदूरचा प्रदेश दिसू लागला. किती देश, किती भाषा किती जाती, किती रीती..... पण सद्धर्माची किंचित आच लागल्याबरोबर हे सर्व भेद विरघळून जाऊन एकच प्रेमरस कसा पाझरतो! धर्माची पताका धारण करून निघालो म्हणजे किती पाहूणचार, किती आदर, किती कळकळ ही आपला जणू शोध काढीत येतात आणि मग आलेल्या वाटेने आपल्यामागे हे प्रेमसुताचे जाळे किती फैलावलेले दिसते, तशीच पुढील खाचखळग्याची दिसणारी वाट जसजशी पायांखाली येते तसतशी कशी सपाट होते, आजच्या चिंताच उद्याच्या आनंदास कशा कारणीभूत होतात, काल भोगलेले क्षणिक शारीरिक कष्ट आज कसे अक्षय मानसिक सुख देतात..... ह्याप्रकारे बाहेरील ब्रह्मपुत्रेचे तरंग जरी दिसेनासे झाले तरी आतील मानससरोवरातून निघणाऱ्या ह्या स्मृतिनदीचे सुखदाई तरंग एकावर एक स्वप्नवेगाने सुटू लागले असता वरील उद्‌गार माझे तोंडून सहज निघाले ह्यात काय नवल?

हा गाव लहान येथला समाजही अगदी लहान आहे तरी समाजातील मंडळीची जूट व एकमेकांविषयी अगत्य पाहून संतोष झाला. विशेषेकरून स्त्रियांमध्ये उपासनेसंबंधी आतुरता दिसली. त्याच रात्री मी घरी परत येऊन पोशाक बदलून प्रार्थनेला गेलो, तो स्त्रिया आधीच पडद्यात बसल्या होत्या. बहुतेक सर्व उपासना हिंदुस्थानीतच करावी लागली. माघोत्सवाची सुरुवात होती, म्हणून पुढे दोन दिवशी सकाळी दोघा सभासदांच्या घरी पहाटेस सामाजिक उपासना झाल्या. त्यांचे आधी काही सभासद नगरसंकीर्तन करीत. तेथे ता. १६ जानेवारी रोजी संध्याकाळी मंदिरात 'Some ideals for Modern India' ह्यावर माझे इंग्रजीत व्याख्यान झाले व ता. १७ रोजी सकाळी तरुणांसाठी शाळेत व्याख्यान झाले. ज्यांचे घरी मी उतरलो होतो. ते जरी समाजाचे सभासद नव्हते, तरी समाजास त्यांचाच सर्व प्रकारे मोठा आधार होता व जातिभेदापेक्षाही पडद्याचे जे बंड बंगाल्यात फार आहे तेही ह्या गृहस्थाकडे नव्हते. ता. १७ रोजी तेथून निघून नदीवरून आगबोटीने मध्यरात्री जगन्नाथगंज येथे गेलो व नंतर ता. १८ रोजी

मैमनसिंग

येथे पोहोचलो. येथे हल्ली दोन पक्षांचे दोन समाज आहेत. बाबू इशानचंद्र विश्वास हे गृहस्थ येथे कलकत्त्याहून येऊन त्यांनी सन १८५५ चे सुमारास एका ब्राह्मसभेची स्थापना केली, त्यावेळी अगदी समाजाच्या पद्धतीने ३-४ जण उपासना करीत. नंतर डॉ. जगदीशचंद्र बोसचे वडील भगवानचंद्र येथे आल्यापासून ह्या समाजाची भरभराट होऊन, सुमारे २५-३० सभासद जमले, तथापि गावात ह्यांना फार हाल काढावे लागत. हा सर्व गाव येथील जमीनदाराचे ताब्यात असल्यामुळे व गावचे लोकांनी त्यांचे कान फुंकल्यामुळे गावात मंदिर बांधण्यास मुळीच जागा मिळेना म्हणून अगदी गावाबाहेर लांब 'साहेबक्वार्टस्' म्हणजे सरकारी जागेत जागा घेऊन एक मंदिर प्रथम १८६९ त बांधण्यात आले. पण ते १८७८ साली कुचबिहारचे लग्नामुळे ब्राह्मसमाजाला जो धक्का बसला होता तेव्हाच समाजमंदिराचे मालकीसंबंधी तंटा होऊन कोर्टमार्फत तडजोड झाली होती की, नवविधानी मंडळींनी आदित्यवारी सकाळी उपासना करावी व साधारणीयांनी सायंकाळी करावी. पुढे १८८६

२०

शांतिनिकेतन

बोलपूर

त्या गोष्टीला सुमारे ४०-५० वर्षे झाली असतील, महर्षी देवेंद्रनाथ ठाकूर हे कलकत्त्यापासून सुमारे १०० मैलांवर बिरभूम जिल्ह्यात धर्मसाधनार्थ भ्रमण करीत होते. कलकत्त्यापासून फार दूर नाही व फार जवळही नाही व जेथे सृष्टीचे शांत आणि सौम्य मुखावलोकन निरंतर घडेल असे चिंतनानुकूल ठिकाण शोधून काढण्यात ते बरेच दिवस गुंतले होते. इतक्यात त्यांचे स्नेही बाबू श्रीकांत सिंह (हल्लीच्या नामदार एस्. पी. सिंहचे चुलते) ह्यांनी महर्षींना वरील जिल्ह्यातील आपल्या जमीनदारीच्या ठिकाणी काही दिवस रहावयास बोलाविले आणि त्यांना ज्याप्रकारे ठिकाण हवे होते, ते आपल्या जमिनीतून पसंत करण्यास आग्रहाने सांगितले. त्यावरून महर्षींनी बोलपूर गाव आणि कोपाईनदी ह्यांच्या मधोमध १।।-२ मैलांवरच्या अफाट ओसाड उंचवट्यावरील एका माळावर थोडीशी जागा आश्रमाकरिता पसंत केली.

असे सांगतात की, त्यावेळी ह्या प्रदेशात चोरट्यांची व वाटमाऱ्यांची फारच भीती होती म्हणून दुसरी जागा पसंत करण्यास महर्षींना सांगण्यात आले. तरी पण त्यांनी तिकडे लक्ष दिले नाही. ह्याच माळावर एक जुना सप्तपर्ण वृक्ष (बंगालीत ह्याला छातीम हे नाव आहे) होता. त्याचे खाली बसून सूर्यास्ताकडे पाहात पाहात ध्यानस्थ होणे त्यांना फार आवडत असे. एकादोघांकडून माझे ऐकण्यात असे आले की, येथील चोरट्यांचा मुख्य दारिक सरदार नावाचा रामोशी एकदा महर्षींच्या अंगावर अपाय करण्यासाठी चालून आला, पण त्यांची ती भव्य, पण निरुपद्रवी आकृती व सौम्य मुद्रा आणि ते लवकरच ध्यानात गढून गेलेले पाहून, त्याची वृत्ती अगदी पालटून गेली! पुढे पुढे तर महर्षींची तेथेच कायमची वस्ती होऊ लागल्यामुळे दारिक सरदाराने आला क्रूर पेशा अजिबात सोडून दिला, शेवटी हल्लीचा शांतिनिकेतन आश्रम तयार झाल्यावर महर्षीजवळ त्याने बरीच वर्षे दरवानाची नोकरी केली. दारिक सरदार अद्यापि जिवंत आहे, असे ऐकल्यावर तर मी मोठ्या कौतुकाने जवळच्या भुवनडांगा नावाच्या खेड्यात त्याला मुद्दाम भेटावयास गेलो, तो त्याने खेड्याबाहेरील कालीच्या देवळासमोरील अंगणात गुरांची पात जुंपून धान्याची मळणी चालविली होती. जवळ जवळ ऐंशीच्या घराला येऊन पोहोचला आहे तरी त्याची अंगकाठी सरळ आहे आणि त्याच्या डोळ्यात एक प्रकारची चमक आहे. तो आमच्याशी फार नम्रपणे बोलला, व त्याच्या पारदर्शक संभाषणातून महर्षीसंबंधाचा त्याचा आदर स्पष्ट दिसत होता, इतकेच नव्हे तर त्यांनी त्याच्या

सुबोध पत्रिका, ता. ५-२-१९११

नाही. शांती म्हणावी तर महर्षी प्रथम येथे आले तेव्हा वाटमाऱ्यांनी हा मुलूख बेजार करून सोडला होता. असे सांगतात की ज्या सप्तपर्णवृक्षाखाली बसून महर्षी तासानुतास ध्यानमग्न होऊन जात त्याच्या तळाशी एकदा खणून पाहिले असता एक नरकपाळांची रासच आढळली! ह्यावरून आजच्या शांतिनिकेतनाच्या स्थळाचे स्वरूप १-२ पिढ्यांमागे किती भेसूर होते हे कळून येईल. ह्या प्रमाणे वरवर पाहता नैसर्गिक शोभा आणि मानवी शांती ह्यापैकी कोणतेही म्हणण्यासारखे कारण हेच स्थान विशेषेकरून पसंत करण्यास दिसून येईना. म्हणून मी दुसरे दिवशी पहाटे उठून ह्या स्थळाचे अधिक निरीक्षण करण्याचे हेतूने त्याचे आसमंतात ४-५ मैल हिंडून आलो. परत येऊन विशेष विचार करिता ह्या स्थळाचे रहस्य मला कळले. महर्षी हे सृष्टीचे मोठे भोक्ते होते. हिमालयाची उंच शृंगे व गंभीर दऱ्या, खोरी, गंगा, यमुना, ब्रह्मपुत्रा अशा नद्यांचे प्रशस्त प्रवाह, विस्तीर्ण पात्रे आणि समुद्राच्या लाटा इ. रूपाशी ज्या महर्षींचा अहर्निश सहवास घडत असे त्यांची सृष्टिसंबंधी अभिरुची कळसाला पोहोचली असली पाहिजे. सृष्टीची शोभा तिच्या अपवादक रूपातच आढळते असा सामान्य माणसासारखा महर्षींचाही ग्रह असणे शक्य नाही. शांतिविषयी म्हणावे तर हिंस्त्र पशू अथवा लुटारूंच्या उपद्रवामुळे प्राचीन मुनींच्या शांतीचा जसा भंग होत नसे, त्याचप्रमाणे आधुनिक महर्षींच्या शांतीलाही ह्या नैसर्गिक अपायांची बाधा वाटली नाही. मुनींच्या मनाच्या शांतीला बाधा होते ती सृष्टीच्या अपायामुळे नव्हे, तर ह्या संसारात सरपटणाऱ्या क्षुद्र नरनारी आपल्या ऐहिक अथवा पारलौकिक योगक्षेमाचे वेळोवेळी नीच उपाय योजतात त्यामुळेच होते. ज्या ठिकाणी अशा उपायांचा शिरकाव नाही, जेथे भूमीचा विस्तीर्ण प्रदेश एकदम नजरेच्या आटोक्यात येतो आणि जेथून भोवताली दूरवर पाहता क्षितिजाचे सुंदर आणि विशाल वलय--जणू जमीन अस्मानाचे गाढ अलिंगनच--अहोरात्र दिसते त्याच ठिकाणी शांती आणि शोभा ह्या दोन्ही जुळ्या बहिणींचे चिरसाम्राज्य पहावयास मिळते. महर्षींनी स्थापलेले शांतिनिकेतन ह्या साम्राज्याचे एक सिंहासनच होय!

भोवताली भला मोठा ओसाड उघडा माळ आहे आणि मध्ये सुमारे २ एकर जमीन ह्या निकेतनासाठी पसंत करून महर्षींनी ती आता तरुलतांनी गजबजून टाकिली आहे. आम्र, अशोक, देवदार इत्यादी प्रकारचे गगनचुंबी वृक्ष एकमेकांच्या खांद्यावर आपले प्रशस्त बाहू ठेवून डोलत आहेत. मध्यभागी महालवजा दोनमजली पक्की आणि भव्य इमारत आहे. तिच्यासमोर बागेत टुमदार, स्वच्छ, शुभ्र संगमरवरी दगडाचे ब्राह्ममंदिर आहे. त्याचे अग्रभागी मोकळा मंडप असून त्यावर लोहशलाकाचे नाजुक, निमुळते, गोल घुमट आहे. मंदिराच्या चारी भिंती भिंगाच्याच असल्याने उपासनेस बसले असताही चहूबाजूंचा दूरवर देखावा दिसतो. उपासकांसाठी रांगेने आसने मांडली असून, मध्यभागी वेदीसाठी एक लहानसा संगमरवरी चौरंग आणि त्यावर दोन शुभ्र शंख ठेविले आहेत. भिंतीला लागूनच चारी बाजूंनी प्रदक्षिणा करण्याकरिता येण्यासारखी उंच चबुतऱ्यावरून वाट आहे. त्यानंतर चोहोंकडून थोडीशी मोकळी जागा राखून, भोवताली छातीइतका प्रकार आहे. मंदिराच्या दारावर ॐ हे अक्षर लावलेले असून त्याच्या खालील कमानीवर पुढे दिल्याप्रमाणे त्याचा अर्थ लिहिला आहे.

ह्या ठिकाणी महर्षींची समाधी कशी नाही, ह्याचे आश्चर्य वाटल्यावरुन शोधाअंती त्यांचे नातू द्विपेंद्रबाबू ह्यांनी असे कळविले की आपल्या रक्षेवर समाधी, थडगे अगर कोणतेही स्मारक कोठेही उभारू नये अशी महर्षींनी अगदी कडकडीत आज्ञा दिली आहे, भोवतालच्या खेड्यातील लोकांत महर्षींसंबंधी इतका अलोट आदर आहे की, ह्या निराकाराच्या निष्काम आणि एकांतिक भक्तांची ही शेवटची इच्छा जर पूर्णपणे पाळली गेली नाही तर त्यांचे देव्हारे हा हा म्हणता माजतील, ह्यात तिळमात्र संशय नाही.

●●●

२१

सह्याद्रीवर्णन–१

मंगळूर अथवा दक्षिण कानडा हा मद्रास इलाख्यातला वायव्येकडील अगदी कोपऱ्यात खुपसलेला शेवटचा जिल्हा आहे. मुंबईकडे यावयाचे तर आगबोटीचाच काय तो मार्ग सोयीचा आहे. पावसाळ्यात चारपाच महिने तो बंद असता आगगाडीने यावयाचे ते दक्षिणेकडे उलट कोईमतूरपर्यंत ४०० मैल खाली जाऊन पुन्हा जवळ जवळ मद्रासचे बाजूचे आणखी ४०० मैल पूर्वेकडे जाऊन जालारपेठ, बंगलोराहून पुण्यास येण्यासाठी एक द्राविडी प्राणायाम करावा लागतो. अलीकडे मोटारीची वाहतूक सुरू झाल्यापासून सह्याद्री ओलांडून हरिहरपर्यंत जवळचा पण दगदगीचा असा एक तिसरा मार्ग उघडा झाला आहे. उंच टेकड्या व खोल दऱ्या, किर्रर्र झाडी व अगदी छातीवर येणारा बिकट घाट, नद्या, नाले, शेते व बागा इ. विविध देखाव्यामुळे हा मार्ग अतिशय रमणीय आहे. इतकेच नव्हे तर गेल्या दोन अडीच हजार वर्षांत घडलेल्या बौद्ध, जैन, शैव आणि वैष्णव धर्माच्या झटापटींचे रणांगणही ह्याच कोपऱ्यात विशेष खुलून दिसण्यासारखे असल्याने इतिहास भक्ताला तर हा मार्ग काशीयात्रेप्रमाणे पवित्र वाटतो. म्हणून मला ह्याच मार्गाने येण्याचा जो मोह पडला तो, बरोबर माझी बहीण, एक लहान मुलगा व बरेच सामानाचे लटांबर असतानाही मला काही केल्या आवरता येईना, शेवटी आम्ही तिघे ता. ९ एप्रिल रोजी आपले गाठोडे बांधून मंगळूराहून पूर्वेकडे सह्याद्रीवर डोळा लावून निघालो. तेव्हा पोहोचवावयास आलेल्या काही मित्रांना हासूही आले असावे, पण आमच्या धाकामुळे ते त्यांनी गालातल्या गालात दाबले असावे.

मुडबिद्री

त्याच दिवशी दोन प्रहरच्या सुमारास आम्ही सुमारे बाबीस मैलांवर मुडबिद्री येथे पोहोचलो. हा गाव जैनांचे एक मोठे क्षेत्र आहे. ह्याला जैनांची दक्षिण काशी असे म्हणतात. ह्याचे वर्णन मी गेल्या वर्षी एका पत्रात केलेलेच आहे. मूळ नाव मुडबिहार म्हणजे पूर्वेकडील ठाणे असे आहे. विजयनगरची सत्ता स्थापन होण्यापूर्वी भैरवराय उर्फ बैरासू नावाच्या जैन राजघराण्याची सत्ता इकडे निरंकुश होती. त्याचकाळी बांधलेली चंद्रनाथ नावाच्या तीर्थंकराची येथे एक साविरखंब (हजार खांबांची) ह्या नावाची बस्ती उर्फ देऊळ आहे. विस्तीर्ण, सुंदर आणि कोठेही भंग न पावलेल्या स्थितीत अद्यापि उरलेली ही बस्ती पाहून टिपू सुलतानासारख्या सर्वध्वंसक परकीयांचे आभार मानावेत मी असली उत्पन्नाची इतर ठिकाणे गट्ट करून हल्ली गबर बनलेल्या स्वकीय पण सर्वभक्षक ब्राम्हण पुजाऱ्यांचे अधिक आभार मानावेत ह्याचा काही सहज उलगडा होऊ शकत नाही. ह्याशिवाय

मासिक मनोरंजन, माहे आक्टोबर १९२५

येथे आणखी अठरा बस्त्या आहेत. त्यात गुरुबस्ती नावाची सर्वात मोठी व मानाची एक बस्ती आहे. येथील हल्लीची ४०००-५००० लोकवस्ती खाऊपिऊन सुखी दिसते. तेथे अद्यापि जैनांचेच प्राबल्य आहे. जमीन व व्यापार त्यांच्याच हाती आहे. पण विद्या आणि धर्माचे स्वरूप मात्र केवळ उपचारात व सोवळेपणात उरले आहे. हल्लीच्या इमारती जरी ५००-७०० वर्षांपेक्षा अधिक प्राचीन दिसत नाहीत, तरी जैनधर्माची व संस्कृतीची ह्या प्रांतातील घडलेली प्रभावशाली कारवाई पाहाता हे ठाणे बरेच प्राचीन असावे असे वाटते. पडुबुद्री (पश्चिमेकडचे ठाणे) नावाचे समुद्रकिनाऱ्याजवळ दुसरे एक ठाणे आहे. त्यावरून म्हैसूराकडून जैनांचा धर्म व त्यांची राजसत्ता सह्याद्री ओलांडून जी पश्चिमेकडे वळली त्या ओघाचे हे टप्पेच असावेत असे वाटते. येथे जैन राजाचे लष्कर होते असे सांगतात. चंद्रनाथाच्या उठावदार बस्तीचा कोट शाबूत आहे. बंदूक ठेवून मारण्यासाठी धिप्पाड भिंतीला जी पल्लेदार ऐसपैस भोके आहेत, त्यावरून त्या ठिकाणावर मागे कटकटीच्या काळी मोर्चेबंदी होते असावी अशी जबर शंका येते. ह्यावरून जैन धर्माची शिकवण कशीही असो, जैन राजे म्हणजे केवळ शेळपट होते असे दिसत नाही. देवळावरच जर मोर्चेबंदी तर त्यांनी आपल्या अहिंसावादाला हल्लीप्रमाणे बारा वाटा मोकळ्या ठेवल्या नसतील असा तर्क करावयास हरकत वाटत नाही. केवळ जमिनीसाठी किंवा इज्जतीसाठीदेखील स्थानिक जमीनदार आपल्या वैऱ्यांचे अमानुष रीतीने खून करून पोलीसांनाही उलट बगलेत दाबल्यासंबंधीची इकडे बरीच प्रसिध्दी आहे. असो, तरी जैनसाधूंपैकी प्रत्येकाजवळ वाटेतील किड्यांवर पाय पडू नये म्हणून मोराच्या पिसांचा झाडू असतोच.

आज चैत्री पौर्णिमा असल्यामुळे चंद्रनाथाचा वार्षिक रथोत्सव होता. नुकतीच श्रवणबेळगोळा येथील गोमटेश्वराला अभिषेक करण्याच्या महापर्वणीसाठी म्हैसूराकडे महायात्रा झाली. म्हणून हिंदुस्थानातील दूरदूरच्या प्रांतांतून हजारो जैन यात्रेकरू तेथे जमले होते. त्यापैकी बरेच आज त्या उत्सवासाठी येथे आले होते. रथयात्रा किंबहुना समग्र मूर्तिपूजेचा संभार आणि देवालयाची रचना ही हिंदूंनी जैन आणि बौद्धधर्मीयांकडून घेतली आहे हे जाणून मलाही हा रथोत्सव अनायासे पहावयास मिळतो त्याबद्दल आनंद वाटला. एका अजस्त्र रथावर कागदाच्या घोड्यांचे भव्य घुमटाकृती शिखर करण्यात आले होते. रात्री बाराला सुरू होऊन सुमारे तीन तास हा उत्सव चालू होता. रथापुढे वाजंत्री होते. पण देवदासी किंवा वारांगनांच्या नाचाचे दक्षिणेत जे सर्वत्र प्रस्थ माजले आहे ते येथे जैनांच्या कोणत्याच देवालयात दिसले नाही. बाकी सर्व थाट एकाद्या वैष्णव उत्सवाप्रमाणेच होता. मजुरांच्या खांद्यावर लांब-लांब बळकट वासे देऊन त्याला दहादहा बाराबारा दिवट्या लावल्या असून त्या दोहों बाजूंनी चालवून जी रोषणाई केली होती ती येथे मी नवीनच पाहिली.

येथील जैनसमाज मुख्यतः वैश्युवृत्तीचा व अशिक्षित असल्यामुळे त्याच्या दानशूरपणाचा ओघ देवभोळेपणाच्या वाळवंटातच गडप होत असल्यास नवल नाही. चलतीच्या काळी ह्या अठराही बस्तीतून किती ऐश्वर्याचे सोहाळे चालत असतील, ह्याची आता नुसती कल्पनाच करण्यापलीकडे मार्ग उरला नाही. पण हल्ली यात्रेच्या दिवसांतही ह्या विस्तीर्ण, सुंदर आणि धडधाकट देवालयांतून

वेणूर नावाचे येथून १०-१५ मैलांवर एक लहानसे खेडे आहे. तेथेही एक असाच ३५ फूट उंचीचा पुतळा आहे. तिसरा सर्वात उंच असा पुतळा श्रवण-बेळगोळा येथे ५६ फूट उंचीचा आहे. हे तिन्ही पुतळे (एकेकाच) दगडातून कोरून काढलेले आहेत, ही एक त्यातल्यात्यात आश्चर्याची गोष्ट आहे. ह्या सर्वांना गोमटेश्वर अथवा घुमटाराज हेच नाव आहे. ह्या पुतळ्यांविषयी व पूजेच्या संप्रदायाविषयी खात्रीलायक आणि पूर्ण असा खुलासा मिळत नाही. शेडबाळ येथे परवा जी अखिल भारतीय जैन परिषद झाली, तिचे अध्यक्ष श्री. नेमीसागर वर्णीजी ह्या जैन संन्याशाची मी मुडबिद्रीत भेट घेतली. त्यांनी सांगितले की, पहिल्या आदिनाथ तीर्थकरांचे दोन मुलगे पहिला भरत हा चक्रवर्ती झाला व दुसरा बाहुबली हा सामान्य राजा होता. त्या युगात माणसे फार उंच, बलवान व दीर्घायु होती. त्यातल्या त्यात बाहुबली हा तर भीमाप्रमाणे फारच धिप्पाड व बलिष्ठ होता. आपल्या थोरल्या भावाने चक्रवती व्हावे म्हणून ह्याने राज्य व संसारलोभ टाकून तटस्थ वृत्ती स्वीकारली, हे दाखविण्यासाठी हे पुतळे उभे केले आहेत, वगैरे दंतकथा आहेत. पण जगात दुसरीकडे असे भव्य पुतळे कोठेच नाहीत, तेथेच ते का आढळतात ह्याबाबतीत आमचे अज्ञान पाहून आमचे इतिहास संशोधन किती कमी दर्जाचे आहे ह्याबद्दल खंती वाटते. ह्या पुतळ्याच्या एका बाजूस एक शिलालेख आहे. त्यावरून इ.स. १३५४ चे सुमारास हा उभारण्यात आला असावा असे साऊथ कॅनरा डिस्ट्रिक्ट मॅन्युअलमध्ये म्हटले आहे. हा भव्य पुतळा एका मोठ्या सात-आठ फूट उंचीच्या प्रशस्त चौथऱ्यावर उभा केला आहे. जैनांशिवाय इतरांना ह्या चौथऱ्यावर चढण्याची मनाई असल्याने हा लेख प्रत्यक्ष वाचण्याची मी दगदग केली नाही. ह्या चौथऱ्याभोवताली सुमारे १-१।। एकर चौरस मोकळी जागा सोडून जाड भिंतीचा चौफेर असा भक्कम तट बांधला आहे. एका बाजूने वेशीवजा एक बळकट दरवाजा आहे. कोणी पहावयास गेल्यास टेकडीखालील पुजारी कुलुप उघडून दाखवावयास वर येतो. ह्या टेकडीवरून भोवतालच्या शहराचा डोंगराळ, दाट झाडीचा, विशेषत: पायथ्याशी पसरलेल्या रामसमुद्राचा देखावा फारच रमणीय व स्फूर्तिकारक दिसतो. समोरच दुसऱ्या एका लहानशा टेकडीवर चतुर्मुख बस्ती नावाचे एक जुने व अगदी शाबूत असलेले भव्य जैन देवालय आहे. ह्याला चारीकडे तोंडे आहेत, ही सर्व इमारत छपरासुध्दा दगडी आहे.

"घुमटाराजा" चा मागमूस काही समजत नाही, इतकेच नव्हे तर त्या शब्दाची व्युत्पत्तीही सहज लागण्यासारखी नाही. "गोमटेश्वर" हे नाव गोतमेश्वरावरून वर्णविपर्यास होऊन झाले असावे. पण अशी व्युत्पत्ती स्थानिक जैनांना पसंत नाही. श्री. नेमीसागर म्हणतात की, ज्या बाहुबलीचे पुतळे आहेत तो फार उंचच होता असे नव्हे, तर तो फार सुंदरही होता व त्याला कामदेव असे दुसरे एक नाव होते. त्याच्याशी गोमटेश्वर ह्या नावाचा संबंध आहे. गोमटे म्हणजे सुंदर असा शब्द इकडील कोकणी भाषेत फार प्रचारात आहे. व तो आमच्या जुन्या व बालबोध मराठीत अद्यापि आहे. हा शब्द कामदेव ह्या शब्दापासून आलेला असणे अगदीच अशक्य नाही. तरी श्री. नेमीसागर हे संस्कृतज्ञ असल्याने गाम म्हणजे पृथ्वीवर आणि अहति म्हणजे भटकतो जो ता गोमटे असा ह्या पदाचा अर्थ करतात. हा फारच दूरान्वय दिसतो. त्यापेक्षा गोतमराज हाच मूळशब्द असणे अधिक सरळ दिसते.

आपले जाधव हे आडनाव स्मरण करण्याला बरेच डोके खाजवावे लागले. मग ही वसाहत महाराष्ट्रातून कोणत्या काळी कशी आली हे सांगणे, म्हणजे पूर्वजन्माचा वृत्तांत सांगण्याइतकेच अशक्य झाले ह्यात नवल ते काय?

कामत नावाच्या एका गौड सारस्वताच्या दुकानावर जाधवबाबांची व आमची भेट झाली. कारकळ गाव ह्या सारस्वत उर्फ कोकणी ब्राह्मणाच्या पूर्ण कह्यात गेला होता. भटजीही तेच व शेटजीही तेच. धर्म, अर्थ काम आणि मोक्ष हे चारी पुरुषार्थ त्यांच्याच मुठीत वळलेले! ते काही असो, जाधवांच्या घराण्याची अत्यंत अंधुक जी माहिती मिळणे शक्य होती ती ह्या कामत शेटजीकडूनच. त्याने चटकन सांगितले की, अंबाबाईचे देऊळ जाधवरावांनीच बांधले. कदाचित मजप्रमाणेच जाधवबाबांनाही ही माहिती नवीनच मिळाली असावी! फरक इतकाच की ती आमच्या स्मरणात अद्यापि आहे. पण जाधवबाबांकडे पुन्हा जाऊन त्यांच्या देवळाविषयी विचारले तर खाजवून खाजवून त्यांच्या डोक्याला टक्कल पडेल, पण देऊळ स्वतःचे हे काही त्यांना कामत शेटजीशिवाय आठवणार नाही. ही येथील मराठ्यांच्या अगदी पुढाऱ्यांची दैना, मग इतरेजनांची काय स्थिती असेल ह्याची कल्पना "विजयी मराठ्यांच्या" वाचकांनीच करावी! तम्मोजी भेटण्यापूर्वी नेमोजी नावाचा दुसरा एक म्हातारा गृहस्थ भेटला. त्याला मागील इतिहासाचे एक दोन प्रश्न केल्याबरोबर आपल्यास पोलिसाचे धरणेच आले असे वाटून तो मुकाट्याने जो पसार झाला, तो मागे वळून पहातो कसचा? ही घराणी पूर्वी किल्ल्याच्या बंदोबस्ताकरिता होती. पण आता त्यांच्या तरवारी तर राहोच पण नांगराचा फाळही त्यांच्या वाट्यास उरला नाही. रोजची मजुरी करून किंवा आपल्या कर्जदाराच्या देवडीवर राखणदाराचे काम करून हे दिवस कंठीत आहेत! अशांना त्यांची गोत्रे कोणती, देवके कोणती, वगैरे प्रश्न विचारण्याचे माझ्या हातून होईना. तम्मोजी, नेमोजी वगैरे दुसऱ्या अशाच नावावरून ह्याच्यावर जैन संस्कृतीचा बराच पगडा बसलेला दिसून आला. ते सर्व सांगण्यास येथे अवकाश नाही.

येथे आम्ही तीनच दिवस होतो. ब्राह्मसमाजाचे प्रसारार्थ आम्ही एक कीर्तन केले. काँग्रेस कमिटीमार्फत थोडीबहुत अस्पृश्यनिवारणार्थ चळवळ झाली होती. तिचे रडगाणे ऐकले. आमचे यजमान (ज्यांचे पाहुणे आम्ही) श्रीयुत के. पद्मनाभ कामत, एम. ए., बी. एल., येथील मुख्य पुढारी हे स्वतःच ईस्टरचे सुट्टीत सार्वजनिक कामाकरिता परगावी गेले होते. म्हणून येथे विशेष काही न करिता आम्हांला सह्याद्रीची वाट धरावी लागली. पण घुमटाराजाकडे पुनः पुनः वळून पाहिल्याशिवाय कारकळहून आमचे पाऊल काही केल्या उचलवेना. आज जवळजवळ ६०० वर्षे उन्हात, वाऱ्यात कोकिळ-कूजित आणि विजेचा कडकडाट पायाखालील जगतातील पाप, पुण्ये, भौतिक व नैतिक द्वंद्वे इत्यादी अनेक प्रकार मैत्रिभावनेच्या समदृष्टीने पहात, तटस्थ पण उदासीन नव्हे, अशा उभ्या राहिलेल्या गोमटेश्वरा, तुला आम्ही कसे विसरावे! प्रतिभाशाली चित्रकाराने निर्माण केलेली, अनेक आधुनिक व प्राचीन विभूतींची चित्रे व मूर्ती मी इंग्लंड, फ्रान्स, जर्मनी व इटाली वगैरे पाश्चात्य पुढारलेल्या देशांत पाहिल्या. नेल्सन, नेपोलियन, शेक्सपिअर, सीझर, मिल्टन, डांटे इ. ऐहिकच नव्हे तर सेंट पॉल व मोझेस इ. पारलौकिक मार्गदर्शकांच्या उठावदार मूर्ती मी अनेक वेळा निरखून

२२

सह्याद्रीवर्णन–२

सोमेश्वर-आगंबे घाट

ता. १३ एप्रिल, १९२५ रोजी तिसरे प्रहरी आम्ही कारकळ सोडले. कारकळहून सह्याद्रीचे अगदी पायथ्याशी सोमेश्वर नावाचे एक अगदी क्षूद्र खेडे आहे. ते सुमारे ३५-४० मैल लांब आहे. रस्ता अगदी चढणीचा असल्याने मोटारला तीन तास लागतात. वेळ सायंकाळची. रस्ता घाटाजवळचा. मग भोवतालच्या सृष्टीसौंदर्याला काय उणीव असणार! दुतर्फा जाड, उंच, सरळ खोडांचे व गर्द पावलीचे गगनचुंबी जुनाट वृक्ष अगदी एकाला एक लागून जणू एक भिंतीचा तटच करून उभे असल्यामुळे मोटारीला कड्याखाली घसरण्याची भीती नव्हती. जेथे असा तट नव्हता तेथे एखाद्या नदीचे किंवा ओढ्याचे पात्र व वरील पूल लागून देखावा बदले, त्यामुळे दृष्टीला वाव मिळून दूरच्या पर्वतशिखरांचे किंवा त्यांवरील जीर्ण देवालयांचे किंवा पडलेल्या किल्ल्यांचेही दर्शन घडे. रात्री ७।। वाजता सोमेश्वरी पोचलो. येथे मोटर कंपनी बदलते. घाटाची अगदी ऊर फोडणारी उंच चढण लागते. येथून घाटाचे म्हणजे सह्याद्रीच्या अगदी माथ्यावर आगंबे म्हणून एक लहान गाव आहे. तेथपर्यंत बैलगाडीचा रस्ता फार तर ७-८ मैलांचा असावा. पण तो चढण्याला बैलांना ६-७ तास लागतात. दिवसा छातीवरील वाट पाहून बैलांची छाती फुटते. म्हणून हा प्रवास अगदी मध्यान्ह रात्रीचे काळोखातच करावयाचा असतो रस्ता कठीण, डोंगरातील उंच वळणावळणाचा, किर्रर्र झाडीमधला तरी पण श्वापदांची किंवा चोरांची वगैरे येथे कसलीच दहशत नाही. मात्र बैल प्रत्येक फर्लांग दोन फर्लांगाला थकून उभे रहात, त्यावरून चढण जास्त व घाटावरील बैलांपेक्षा घाटाखालच्या बैलांत कस कमी, हे उघड दिसे. खरोखर उत्तर कोकण काय किंवा केरल देश काय जनावरांची मोठी करुणास्पद आबाळ संबंध पश्चिम किनाऱ्यावर चाललेली दिसते. भातशेतीला औताची गुरे लागत नाहीत, तरी पण दुभत्याच्या गाई, म्हशी व गाडीचे बैलही इकडे देशावरून नेहमी आणावयाचे असतात. पण त्यांना खाण्याला घालण्याची कोणीच तरतूद करीत नसल्यामुळे दुभत्याची गुरे लवकर आटून व ओढीची गुरे छाती फुटून अकाली मरतात. इतकेच नव्हे तर लहान वासरेदेखील दात येण्यापूर्वीच प्राण सोडतात! ही जुनी परंपरा ह्या परशुराम क्षेत्रात अबाधित चालली आहे. तरी गोरक्षणाची दिखाऊ चळवळ काही पांढरपेशा देशभक्तांनी चालवलेली पाहून मात्र ती सहन करणे हा घाट चढण्याहूनही कठीण पडते.

मासिक मनोरंजन, दिवाळी अंक, ऑक्टोबर १९२५

जिवंत आणि चतूर व प्रामाणिक इंजिने दिली आहेत. हा नवीन देखावा पाहून माझ्या लहानग्या मुलाला फार अचंबा वाटला. तो पाहून मलाही माझ्या ह्या प्रवासात मजबरोबर निरीक्षण करण्याला माझा मुलगाही आहे, त्याबद्दल धन्यता वाटली.

तीर्थहळ्ळी

म्हैसूर संस्थानाचा हा तालुक्याचा गाव आगंबेहून सुमारे १५ मैलांवर आहे. तेथे आम्ही ८-८।। वाजता पोचलो. तेथे तुंगा नदी लागते. नदीत एक शिवालय आहे व तेथे स्नान करण्यासाठी एक क्षेत्र आहे, असे ऐकले होते. ह्या गावी काँग्रेसची एक डिस्ट्रिक्ट कमिटीही आहे, तिचे मुख्य अध्यक्ष भेटले, पण राज्य एतद्देशीय संस्थानचे असल्याने काँग्रेसच्या कामात ओघानेच तपशीलाच्या भरीवपणापेक्षा तत्त्वांचा पोकळपणाच जास्त आहे हे नजरेस आले. ब्राह्मसमाजाची गोष्टच काढावयाला नको, पण खादीच्या प्रसाराचा किंवा अस्पृश्यता निवारण्याच्या शिळोप्याच्या गोष्टींचादेखील इकडील विधायक कामगिरीत समावेश होत नसल्याने अध्यक्षांच्या खादीच्या टोपीशिवाय येथे काही प्रेक्षणीय व श्रवणीय नाही, हे शब्दशः खरे ठरले! सुशिक्षितांचे राजकारण व घरबसल्यांची चळवळ ही अशी टोपी घालण्यापुरतीच असणार, हे पहाण्यास संस्थानातील ह्या जंगली कोपऱ्यात जाण्याची जरुरी नाही. ती कलकत्त्याच्या कॉलेज स्वेअरमध्येही मुबलक पहावयास मिळते. तेथेही पण केव्हा केव्हा खादीचा पोषाख करणारा एखादा बाबू शोधून काढावयास तासानुतास हिंडावे लागते. तीर्थहळ्ळीस एक दिवस रहाण्याचा आमचा कार्यक्रम एक तासभर केलेल्या चौकशीत आटोपता घेतला आणि आम्ही मुकाट्याने पुढील मार्गास लागलो, येथून सुमारे ४० मैलांवर

शिमोगा (शिवमुख?)

हे म्हैसून संस्थानातील एक जिल्ह्याचे मुख्य ठिकाण आहे. ही सर्व वाट सारखी उताराची लागली. शिमोग्यास आम्ही भर दोन प्रहरी पोचलो. एवढा मोठा गाव असून येथे कोणत्याही प्रकारची हालचाल नाही. राजधानीचे ठिकाण म्हैसूर अथवा बंगळूर ही दोन्ही पुरेशी दूर असल्याने येथे दरबाऱ्यांचा सुळसुळाट नाही आणि काँग्रेस कमिटी नसल्याने खालसा इलाख्यातील चळवळेही येथवर लांब येण्याची तसदी घेत नाहीत. संस्थान ब्राह्मणी वर्चस्वाखाली चिरडल्याने व श्रृंगेरी मठ जवळच असल्याने सामाजिक व धार्मिक स्वातंत्र्याचे वारे येथे पोचावयाला अद्यापि पुष्कळ अवकाश आहे. ब्राह्मण-ब्राह्मणेतर वाद येथे नाही. आणि हरिहराचे देऊळ फार दूर नसल्यामुळे म्हैसूरातील अय्यर-अय्यंगार ऊर्फ शैव-वैष्णवांचाही तंटा येथे दिसला नाही. येथे मुसलमानांचा फार मोठा भरणा दिसला. पण जे मुसलमानांचे मासले दिसले, त्यांना आपण शिया आहो की सुन्नी आहो हे देखील सांगता आले नाही. मग खिलापत कमिटीची गोष्ट दूरच राहिली. अर्थात हिंदू संघटनांची किंवा अस्पृश्यता निवारणाची किंबहुना पुराणवस्तुसंशोधनासारख्या एकाद्या वाङ्मयीन विषयाचीही कोणाजवळ चर्चा करण्याचे मला धैर्यच झाले नाही. एकंदरीत हा प्रांत नैसर्गिक अथवा सामाजिक कोणत्याच भानगडीपासून अलिप्त दिसल्यामुळे आम्ही येथे पूर्ण विश्रांतीसुख घेण्यासाठीच मुद्दाम तीन दिवस राहिलो.

मोठा लोखंडाचा व पोलादाचा कारखाना दिसला. विजेच्या लखलखाटामुळे तो देखावा बंगाल-नागपूर रेल्वेवरून रात्रीच्या काळोखात जसा टाटा कंपनीच्या जमशेटपूरचा दिसतो, तसाच येथलाही दिसतो. विरूर स्टेशनवर कुली (हमाल) मुळीच नाहीत. उलट चोरट्यांचा सुळसुळाट आहे. कारण दोन संस्थानांच्या हद्दीवरील हे ठाणे, हेच उघड आहे. तेथे मजुरीपेक्षा उचलेपणाला तेजी असावी हे नीतिशास्त्राला नसले तरी हल्लीच्या अर्थशास्त्राला धरूनच आहे! गाड्यांची आवक-जावक तेथे अपरात्री असल्यामुळे जवळ जड सामान असल्यास उतारूचे फार हाल होतात. अधिकारी व श्रीमंतांचे कोठेच नडत नाही आणि बाकीच्यासाठी रेल्वे कंपन्या नसून उलट रेल्वे कंपन्यांसाठीच हिंदुस्थानातील तिसऱ्या वर्गाचा उतारू वर्ग आहे हे ज्यांना अनुभवावयाचे असेल त्यांनी विरूरची तीर्थयात्रा करावी. विशेषत: अमावस्येची रात्र असल्यास साक्षात्कार पूर्ण घडेल!

हरिहर येथे ता. १७ रोजी मोठ्या पहाटेस पोचलो. काही ओळखीमुळे हरिहरेश्वराच्या देवळातील आवारामध्ये एक खोली आम्हांला रहावयास मिळाली. हरिहर गाव पाहून आमची निराशा झाली. हा गाव तुंगभद्रेच्या सुंदर आणि विस्तीर्ण पात्रावर उभा आहे. हा फार प्राचीन आहे. हे क्षेत्राचे स्थान अशी प्रसिद्धी आम्ही फार ऐकिली होती. पण गाव पाहूनच नव्हे तर देऊळ पाहूनही सकृतदर्शनी आमची मोठी निराशा झाली. देवळाच्या पश्चिम बाजुला तुंगभद्रेचे विशाल पात्र अगदी जवळ येऊन भिडले आहे तरी पण मुख्य प्रवेशद्वार पूर्वेकडून आहे. तेथे भोवताली गावातील घरांची अशी दाटी झाली आहे की आपण एका प्रसिद्ध देवळापुढे आलो आहोत, असे वाटतच नाही. आत गेल्यावरही देऊळ किंचित ठेंगणे, जमिनीत बसल्यासारखे आणि ओसाड असे दिसते. आम्ही सामान उतरून किंचित विश्रांती घेऊन सावकाशपणे देऊळ पाहण्यास गेलो, आणि निरखून पाहू लागलो तो देवळातील खरी कारागिरी आणि त्याचे जुने पुराणे महात्म्य मनात भरू लागले.

शिव आणि विष्णू ह्या हिंदूंच्या दोन मुख्य उपास्य देवता. ह्यांच्यातील सख्य आणि विरोध म्हणजे हिंदू धर्माचे मोठेच रहस्य. दक्षिणेत तर ह्या विरोधावर बरीच रणे माजली आहेत. ह्या दोन्ही देवांचा ह्या ठिकाणी झालेला अभेद्य मिलाफ पहाण्याची माझी फार दिवसांची इच्छा होती. जमल्यास हा महत्त्वाचा मिलाफ होण्याला ऐतिहासिक कारणे काय झाली असावीत आणि तो मिलाफ ह्याच ठिकाणी का व कसा झाला हेही दिसल्यास पहाण्याचा माझा विचार होता.

इसवीसनाच्या ६ व्या शतकापर्यंत हिंदुस्थानात विशेष:त दक्षिण आणि पश्चिम हिंदुस्थानात बौद्ध आणि जैन धर्मांचेच अगदी निर्भेळ प्राबल्य होते. ह्या दोन्ही धर्मांतही आपसात सख्य होते. दक्षिणेतील व द्राविड राजवटीतून जैनांचाच विशेष वरचष्मा होता. त्यामुळे बुद्धांचा धर्म अगोदरच निस्तेज होत आला होता. पुढे हळूहळू शैवांचा उदय होऊन दक्षिणेत चालुक्यांच्या व तामिळ देशात चोळ आणि पांड्य राजांच्या आश्रयाने शैव आचार्यांनी प्रथम जैनाला हुसकून लावले. नंतर वैष्णवांनी शैवांवर कुरघोडी केली. तामिळ प्रांतात व काही अंशी कर्नाटकात वैष्णवांची आणि शैवांची अद्यापि

विस्तृत शिलालेख पोलाळ दंडाधिपाने कोरविलेला फार महत्त्वाचा आहे. त्यातील मुख्य भाग खालील शब्दात आहे :

> **'स्वस्तिश्री जयाभ्युदयश्च शके वर्ष ११४५ नेव स्वभानु संवत्सर माग शुद्ध ११ वृहवारद अंदु चोळ प्रतिष्टाचार्य श्री वीरनरसिंह देवर महाप्रधानं पोळाळव दंडनार्थ ११५ होन्नकलशदिं मरव अंत आगि हरिहर देवरग्ग देवतातयं माडिसिदन् आ देवता-भवन-वासद विलासमं पेळवोदे।'**

म्हैसूरच्या होयसल घराण्यातला दुसऱ्या नरसिंह राजाचा प्रधान आणि सेनापती पोलाळ ह्याने हल्लीचे हे देऊळ इ.स. १२२३-२४ ह्या साली अगणित द्रव्य खर्चून बांधले असा ह्या लेखाचा इत्यर्थ आहे. त्याच ह्या प्रदेशाला गुह्यारण्य आणि गावाला कुडलूर अशीही नावे असलेली दिसतात. लेखाचे आरंभी म्हटलेले आहे की, काही म्हणतात की हरिशिवाय देव नाही. काही म्हणतात की हराशिवाय देव नाही. लोकांचा हा संशय दूर व्हावा, म्हणून हरिहराचे हे संयुक्त स्वरूप परमेश्वराचे. विष्णूने शिवाचे रूप घेतले आणि शिवाने विष्णूचे रूप घेतले हे वेदवाक्य खरे करण्यासाठी कुडळ येथे धारण केले! हरिहर क्षेत्राचा महिमा सेतू, वाराणशी, कुरुक्षेत्र इ. क्षेत्रांहूनही जास्त आहे, असेही ह्या लेखाचे शेवटी म्हटले आहे. हे मंदिर जरी सन १२२४ साली झाले तरी ह्या देवस्थानाला देणग्या आलेल्यासंबंधी कित्येक शिलालेख इ.स. १०० पासून बरेच आहेत.

विस्ताराने हे देऊळ साधारण मध्यम प्रतीचे आहे. पण ह्यातील कोरीव काम मात्र अगदी वरिष्ठ दर्जाचे आहे. देवळाची जी सभोवार सज्जाची भिंत आहे, तिच्यावर अनेक प्राण्यांची हुबेहूब सुंदर चिमुकली चित्रे काढून नक्षी केलेली आहे. ती पाहून मन थक्क होते. खांब, भिंती आणि वर छत ही सारी अत्यंत कुसरीच्या जणू कशिद्याने भरगच्च भरून काढली आहेत. देवळाचा घाट उठावदार नसून ते ठेंगणे हेमाडपंथी थाटाचे आहे. त्याला चौथरा मुळीच नसल्याने ते जमिनीत रुतल्याप्रमाणे दिसते. निळसर रंगाच्या स्लेटीच्या मऊ दगडात एकंदर काम झाले असल्यामुळे, खांब आणि भिंती जणू शिशाच्या ओतून काढल्याप्रमाणे अगदी गुळगुळीत आणि मोहक दिसतात, भर उन्हाळ्यातही त्यांचा स्पर्श शीतळ आणि सुखदायी भासतो. माणसांची चाहूल फारच कमी असल्यामुळे आणि पश्चिमेकडील तुंगभद्रेवरचे वारे येण्याला कोठेच अडथळा नसल्यामुळे देवळात कोठेही विश्रांती घेण्यास बसले की मटकन डोळेच मिटतात, आणि "ब्रम्ह्यानंदी लागली टाळी। कोण देहाते सांभाळी।।" असा प्रकार काही वेळ तरी सहजच घडतो. मुख्य देवळाभोवती रथयात्रेसाठी चारी बाजूंनी ऐसपैस जागा आहे. तिच्याभोवती काळभैरव व लक्ष्मी इत्यादी देवतांची उपमंदिरे आहेत. पण देवळाच्या ओवऱ्यांतून कायमच्या बिऱ्हाडकऱ्यांना जागा दिल्या आहेत, इतकेच नव्हे तर देवळाचा काही भाग देवळाशी संबंध नसलेल्यांनी आपल्या कायमच्या मालकीचा करून घेतला आहे, बाहेर रस्ता अगदी अरुंद, त्याच्या पलीकडे घरांची खेचाखेची व गटारातून युगानुयुगे साचलेली घाण, अशी एकंदर हयगय चाललेली पाहून फार वाईट वाटते. मात्र मलबारातल्या देवळाप्रमाणे येथे फाजील सोवळे नसल्याने अगदी देवळाच्या उंबरठ्यापर्यंत जाऊन देवळातील मूर्तीचे दर्शन घेण्यास मुभा आहे.

वाय ४७३ (५०० पु.) १-२०१६

शासकीय मुद्रणालय, कोल्हापूर.

"स्वार्थावर लाथ मारून गळ्यात झोळी अडकवून संस्थेकरिता-अर्थात आमच्या लोकांकरिता-संस्थेचे जे चालक भिक्षांदेही करीत दारोदार फिरतात व त्यांना त्यात कितीही अल्प यश आले तरी ते पर्वा न करता चंदनासारखे स्वतः झिजून दुस-यांना-आम्हाला सुख देण्याकरिता, आमची स्थिती सुधारण्याकरिता आपला प्रयत्न चालू ठेवतात त्या संतांची किंमत आजपर्यंत झालेल्या कोणत्याही संतांपेक्षा आम्हाला यात्किंचितही कमी वाटत नाही. कित्येकांना ती जास्त वाटेल."

गणेश आकाजी गवई

डी. सी. मिशनच्या महाराष्ट्र परिषदेत केलेले भाषण

"इतिहास असे सांगतो की, ज्यापासून राष्ट्राचा विकास होतो अशा सर्व प्रकारच्या चळवळीचा उगम थोड्याशा व्यक्तींच्या कार्यात सापडतो. प्रस्तुतच्या बाबतीत त्या व्यक्ती म्हणजे ज्यांची प्रथम प्रथम हेटाळणी झाली ते डिप्रेस्ड क्लासेस मिशनचे गृहस्थ होते. त्यांच्या कार्याने प्रचंड अशा हिंदू समाजाची सद्सद्विवेकबुद्धी जागृत झाली."

न्यायमूर्ती सर नारायणराव चंदावरकर

डी. सी. मिशनची अस्पृश्यतानिवारक परिषद

मुंबई, १९१८

"शिंद्यांचा जिला भरीव हातभार लागला नाही अशी लोकसेवेची व समाजोन्नतीची चळवळ दाखवून देणे कठीण आहे. राजकारण, समाजकारण, धर्मकार्य, शिक्षणकार्य, इतकेच नव्हे तर वाङ्मयसेवा आणि इतिहाससंशोधन या सर्वांत शिंद्यांचा भाग आहे. आणि फार महत्त्वाचा भाग आहे. ज्या काळी विधवाविवाहासारखे साधे प्रश्न सुटणे दुरापास्त होते अशा त्या घनदाट धर्मवेडाच्या काळात अस्पृश्योद्धाराची चळवळ सुरू करणे, डिप्रेस्ड क्लासेस मिशन ही संस्था काढणे, इतकेच नव्हे तर अस्पृश्यांत जाऊन त्यांच्यापैकी एक झाल्याप्रमाणे त्यांच्यात वागणे या गोष्टींसाठी अतुल स्वमतधैर्याची, एवढेच नव्हेतर मूलमार्गी बुद्धीची व समाजाविषयी ख-या कळकळीचीही गरज होती. इतक्या व्यापक व सूक्ष्म दृष्टीच्या कार्यकर्त्यांची दृष्टी सबंध देशाइतकी विशाल विस्तृत असावी लागते. म्हणूनच श्री. शिंदे सामाजिक चळवळीप्रमाणेच अनेक राजकीय चळवळीत भाग घेताना दिसत."

न्यायमूर्ती भवानीशंकर नियोगी

महाराष्ट्र साहित्य संमेलन

नागपूर, १९३३

"मला राहून राहून एका गोष्टीविषयी दुःख होते. अस्पृश्यांच्या प्रश्नांच्या सोडवणुकीला हात घातला रा. विठ्ठलरावांनी. त्या कामी कमालीचा स्वार्थत्याग करून त्यांनी त्यांच्या कुटुंबियांनी देशभर जागृती घडवून आणली. हा प्रश्नाला राष्ट्राची मान्यता मिळण्याचे श्रमही त्यांचेच. आपण अलीकडे अस्पृश्यांच्या उन्नतीच्या प्रश्नाचा जेव्हा जेव्हा उल्लेख करण्याचा प्रसंग येतो तेव्हा तेव्हा ज्यांनी ह्या बाबतीत केवळ वाचिक कार्य केले आहे अशांनाच आगतीचे श्रेय अर्पण करण्यात येते व भारतीय निराश्रित सहाय्यकारी मंडळी व विठ्ठल रामजी शिंदे ह्यांच्यावर पद्धतशीर बहिष्कार घालून त्यांचा चुकूनही नामनिर्देश केला जात नाही. अशा संघटित बहिष्काराने सत्याचा अपलाप होतो."

वामन सदाशिव सोहोनी

आत्मनिवेदन, मुंबई, १९४०

"विठ्ठल रामजी शिंदे हे माझ्या चार गुरुंपैकी एक होते. माझ्या जन्मदात्यानंतर मी त्यांनाच मानतो. त्यांच्या पायांशीच मी सार्वजनिक कार्याचें धडे घेतले. माझ्यापेक्षा वयाने ते लहान असले तरी राष्ट्रहितासाठी करावयाच्या चळवळीबाबतच्या अभ्यासात त्यांची फार मोठी प्रगती होती. ही गोष्ट सर्वज्ञात आहे, की मुंबई प्रांताकडील अस्पृश्यवर्गाच्या सुधारणेचे ते जनक होते. पंजाब व उत्तरप्रदेश सोडला तर सर्व भारतातील या प्रकारच्या कार्याचा प्रारंभ करणारे ते पहिले पुरुष व या कार्याचे अग्रदूत होते.

अमृतलाल व्ही. ठक्कर ऊर्फ ठक्करबाप्पा

इंडियन सोशल रिफॉर्मर

६ एप्रिल १९४४